॥ श्री ॥

तुकारामकृत अभंगांची गाथा.

हा सुप्रसिद्ध व प्रासादिक ग्रंथ

त्र्यंबक हरि आवटे

यांनीं


हरिभक्तिपरायण विष्णुबोवा जोग

व

शंकर गणाप्पा गुळवे

हेडमास्तर शा० नं० २ पुणें

यांच्या साह्यानें विषयवार निवड करून तयार केला;



तो

पुणें येथें

सदाशिव पेठेंत "इंदिरा" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.

शके १८२३.—सन १९०१.

किंमत ३ रुपये.

हरिभक्तिपरायण गुरुवर्य

नाना महाराज जोशी साखरे

यांचे सेवेशीं

त्यांची कुलपरंपरागत भक्तिपरायणता, सत्यनिष्ठा, समाधान-
वृत्ति, भाविक मुमुक्षूंना ईश्वरविषयक ज्ञान समजाबून
सांगण्याची उत्सुकता, त्यांचें ज्ञानेश्वरीच्या निरूपणा-
विषयीं प्रावीण्य, इत्यादि सात्विक गुणांस लीन
होऊन सप्रेम व सन्मानपूर्वक ही गाथा
समर्पण केली आहे.

नम्र सेवक,

त्र्यंबक हरि आवटे.
माधव नारायण जोगळेकर.



प्रस्तावना.

महासाधु **तुकाराम**महाराज यांच्या अभंगांच्या गाथा अनेक लोकांनीं छापून प्रसिद्ध केल्या आहेत. ह्यांपैकीं सुमारें साडेचार हजार अभंगांच्या गाथा वारकरी सांप्रदायी मंडळीस मान्य आहेत. ह्या साडेचार हजार अभंगांतून विषयवारीनें प्रकरणें पाडून छापण्याचा प्रयत्न केलेला आढळून येतो, परंतु बहुतकरून दीड हजार अभंगांचीच बरोबर विषयवारी लावून बाकीचे सुमारें तीन हजार अभंग ' स्फुट अभंग ' ह्या सदरांत घातलेले आढळतात. **तुकाराम**महाराजांनीं निरनिराळ्या प्रसंगीं केलेले अभंग निवडून काढून त्यांचीं प्रकरणें पाडण्याचा हेतु, एका विषयावरील त्यांचे अभंग एके ठिकाणीं पहावयास मिळावे हा होय. हा हेतु उपलब्ध असलेल्या गाथा पाहिल्या म्हणजे जसा जावा तसा शेवटास गेलेला दिसत नाहीं. ही उणीव दूर होऊन हल्लींच्या गाथांतील दुर्बोधत्व होतां होईल तितकें कमी करावें ह्या हेतूनें आम्हीं ही गाथा प्रसिद्ध केली आहे. ह्या गाथेंत आम्ही केलेली नवीन सुधारणा खालीं थोडक्यांत देतों.

आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या साडेचार हजार अभंगांच्या गाथांत **तुकाराम**-बुवांच्या पौराणिक अभंगांचा एक भाग आहे. त्यांत निरनिराळ्या पौराणिक चरित्रांवर व इतर प्रकरणांवर केलेल्या अभंगांचा समावेश आहे. कोणत्या चरित्रावर व प्रकरणावर कोणते अभंग केले आहेत हें बहुतकरून सहज समजण्यासारखें असल्यामुळें त्यांतील विषयवारींत विशेष फेरफार करण्याचें कारण दिसलें नाहीं; म्हणून तो भाग आम्हीं बहुतकरून जशाचा तसाच छापिला आहे. तथापि त्यांत इतर विषयांवर असलेले जे अभंग आढळून आले ते त्यांतून काढून ज्या त्या विषयांत घातले असून वाचकांच्या सोयीकरितां शक्य होतें तेथें एक चरण एकाच ओळींत घातलें आहे. यांत **मंगलाचरण,**

बालक्रीडा, गौळणी, काला, खेळावरील रूपकें, रूपकें त्रोटक चरित्रें व प्रकरणें याप्रमाणें विषय घालून भजनाच्या रीतीप्रमाणें अभंगांची क्रमवार व्यवस्था लाविली आहे.

दुसरा स्फुट अभंगांचा भाग आहे. त्यांत मात्र आम्हीं विशेष निवड करून निरनिराळे विषय केले आहेत. **एकविध अभंग**--आपली इष्टदेवता जी पांडुरंग-मूर्ति त्यावाचून अन्यदेवता प्रमाण नाहीं अशा अर्थाचे अभंग. **भेटीचे अभंग**--पांडुरंगानें भेट द्यावी या अर्थाचे अभंग. **देवाशीं सलगीचीं भाषणें**--सलगीनें देवाशीं बरोबरीच्या नात्यानें बोलले अशा अर्थाचे अभंग. **देवापाशीं मागणें**--तुझी चरणसेवा हेंच माझें मागणें तें तूं मला दे अशा अर्थाचे अभंग. **देवाशीं प्रेमाचें भांडण**--आपले इष्ट हेतु देवाकडून पुरले जात नाहींत त्यासंबंधानें क्षणभर क्षोभवृत्तीनें बोलले अशा अर्थाचे अभंग. **करुणापर अभंग**--देवास आपली दया यावी याकरितां मोठ्या विनयानें देवाची प्रार्थना केली अशा अर्थाचे अभंग. **स्थितीपर अभंग**--(देवाशीं उद्गार) प्रसंगोप्रसंगीं आपली स्थिति जशी बदलत गेली. त्याप्रमाणें देवाजवळ बोलले अशा अर्थाचे अभंग. (जनाशीं उद्गार) आपल्या स्वतःचे संबंधानें जनाजवळ बोलले अशा अर्थाचे अभंग.--**संतपर अभंग, कीर्तनपर अभंग, नामपर अभंग**--ह्या प्रकरणांत समाविष्ट केलेले अभंग त्या त्या अर्थाचे बोधक आहेत हें येथें निराळे सांगण्याची जरूर नाहीं. **उपदेशपर अभंग**--उपदेशपर अभंगांत एका अर्थाचे अभंग वरले ते ओ-ळीनेंच देऊन दुसऱ्या अर्थाचे अभंग लागण्यापूर्वीं प्रत्येक ठिकाणीं रेघ मारली आहे. त्यांचीं निराळीं प्रकरणें करण्यास बरीच अडचण येण्याचा संभव आहे असें वाटल्यावरून त्यांच्या आरंभीं तदर्थबोधक मथळा न देतां ते मोघमच ठेविले आहेत. तथापि आरंभापासून हे अभंग लक्ष्यपूर्वक वाचले असतां त्यांत ओळीनें 'गृहस्थास उपदेश' 'साधकास उपदेश' 'ढोंग्यांस उपदेश' 'सामान्य जनास ईश्वरमहात्म्यासंबंधी उपदेश' 'नीतिपर उपदेश' 'मनास बोध' असे एकार्थी अभंग आहेत, असें मार्मिक वाचकांच्या सहज लक्ष्यांत येणार आहे. 'अद्वैतपर' (ज्ञानपर) यांतही उपदेशपर अभंगाप्रमाणें रेघा मारून क्रम लाविला आहे. **उत्तराधिपदें**--भजनीपद्धतीस अनुसरून भजनाचे शेवटीं म्हणतात अशा अभंगांचा या प्रकरणांत समावेश केला आहे.

तिसरा भाग **प्रासंगिक** अभंगांचा आहे. म्हणजे **तुकाराम**बुवांवर गुरुकृपा झाली, त्यांस कवित्व करण्याविषयीं दृष्टांत झाला, वगैरे प्रसंगीं त्यांनीं केलेल्या अभंगांचा ह्यांत समावेश केला असून **कान्होबाचे** अभंगही त्यांतच घातले आहेत. पुढें **विषयवर्णानुक्रमणिका** देऊन शेवटीं **शब्दार्थकोश** दिला आहे.

आतां **तुकाराम**महाराजांच्या चरित्रासंबंधानें येथें इतकेंच सांगावयाचें कीं, **तुकाराम**महाराजांच्या जन्माविषयीं, त्यांच्या वंशजांविषयीं, त्यांच्या गृहस्थितीविषयीं व त्यांच्या पुढील एकंदर आयुष्यक्रमाविषयीं ठिकठिकाणाहून कागदोपत्रीं व इतर मार्गानें खरी व विश्वसनीय माहिती मिळवून त्यांचें विस्तृत चरित्र लिहिण्याची आजपर्यंत अनास्थाच झालेली दिसून येते. महाराष्ट्रांतील इतिहासप्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें मोठ्या परिश्रमानें माहिती मिळवून प्रसिद्ध करण्याचा क्रम अलीकडे बऱ्याच इतिहासप्रिय विद्वानांनीं हातीं धरिला आहे; तशाच तऱ्हेनें **तुकाराम**बुवांचें खरें व माहितीनें भरलेलें चरित्र कोणी प्रसिद्ध करील तर त्याचे एकंदरीनें वारकरी सांप्रदायी मंडळींवर व महाराष्ट्रीयांवर मोठे उपकार होतील. आह्मांस तशीं साधनें उपलब्ध नसल्यामुळें, चरित्र लिहिण्याचे कामीं **महिपती**चे 'भक्तलीलामृत' व 'भक्तविजय' आणि इतर कांहीं माहिती शिवाय रा. रा. तुकाराम तात्या व रा. रा. कृष्णराव अर्जुन केळुसकर यांच्या चरित्राचें साह्य झालें. वरील ग्रंथांतील माहितीबद्दल आह्मी सदर गृहस्थांचे आभार मानितों. तसेंच हें चरित्र लिहिण्याचे कामीं रा. रा. गंगाधर रावजी खेर यांनीं आह्मांस मदत केली तीबद्दल आम्ही त्यांचेही फार आभारी आहों.

शेवटीं, सर्व भक्तिमान् व रसिक लोकांस हीच विनंति आहे कीं, आमचा हा पहिलाच प्रयत्न असल्यामुळें ह्या ग्रंथांत कोठें कोठें नजरचुका राहून गेल्या असतील त्याबद्दल क्षमा करून त्यांनीं सदरील दोष आह्मास कृपा करून कळवावे. शिवाय आम्हीं या गाथेंत जी निवड केली आहे तींत आणखी सुगमपणा येईल अशा तऱ्हेची कोणीं सूचना केल्यास व **तुकाराम**महाराजांविषयीं कागदोपत्रीं पुराव्यावरून कोणी कांहीं माहिती दिल्यास, त्याचा आह्मी आभारपूर्वक स्विकार करूं. अभंगांतील कठिण शब्दांच्या अर्थनिर्णयात्मक टीपा ज्या त्या पानांत द्यावयाच्या होत्या, परंतु गाथा छापाईचें काम चालत असतां प्लेगसारख्या अपरिहार्य अडचणीमुळें त्या देण्यास फुरसत झाली नाहीं याबद्दल

आह्मास मोठी दिलगिरी वाटते, तरी पुढील आवृत्ती छापण्याचा सुयोग आल्यास ती उणीव भरून काढण्याची व येणाऱ्या सूचनांचा योग्य विचार करण्याची आमची उमेद आहे.

ही गाथा छापून प्रसिद्ध करण्यास अनेक अडचणी आल्यामुळें आगाऊ कळविलेल्या मुदतीपेक्षां बराच विलंब लागला, ह्याबद्दल आमचे आश्रयदाते क्षमा करितील अशी आशा आहे. ह्या ग्रंथास भाविक गृहस्थांकडून उदार आश्रय मिळाल्यास **श्रीज्ञानदेव** व **श्रीएकनाथ** ह्यांच्या अभंगांची गाथा होईल तितकी विषयपर निवड करून व शब्दांच्या अर्थनिर्णयात्मक टीपा ज्या त्या पानांत देऊन छापण्याचा विचार आहे. ह्या कामीं आमचे आश्रयदाते आम्हांस उत्तेजन देतील व योग्य ती माहिती व सूचना आगाऊ करतील अशी आशा आहे. ह्या ग्रंथ इतका अवकाश लागून आमचे हातून शेवटीं पुरा झाला, ह्याबद्दल सर्वशक्तिमान् दयाघन **श्रीविठ्ठलाची** महत्कृपा मानून व त्याचे नामाचा जयजयकार करून ही प्रस्तावना संपवितों.

मिती आषाढ वद्य ११ शके १८२३
ता. १२ जुलै सन १९०१.

त्र्यंबक हरी आवटे.



अनुक्रमणिका.

भाग पाहिला.

भाग दुसरा.

भाग तिसरा.

श्रीतुकाराम महाराजांचें संक्षिप्त चरित्र.

प्रेमळ भक्तिमार्गाच्या सोज्ज्वल पताका हातीं देऊन लाखों लोकांस पांडुरंगाच्या भजनीं लावणारे जे महापुरुष अलिकडे सातआठशें वर्षांत आपल्या महाराष्ट्रांत होऊन गेले, त्यांपैकींच **तुकाराम** महाराज हे एक महापुरुष होत. **तुकाराम** महाराजांची जन्मतिथि, महिना व शक अगदीं खात्रीलायक कोठें आढळत नाहीं, ही मोठी उणीव आहे; परंतु तेवढी खेरीज करून बाकीचें त्यांचें कुलवृत्त व प्रयाणकाळपर्यंतचें चरित्र लिहिण्यास बरीच विश्वसनीय माहिती आजपर्यंत मिळालेली आहे व ती त्यांचें सद्भावानें कौतुक करणाऱ्या ग्रंथकारांनीं पद्य व गद्यरूपानें विस्तृतपणें दिली आहे. ज्यांनीं ज्यांनीं **तुकाराम** महाराजांच्या अभंगांच्या गाथा आजपर्यंत प्रसिद्ध केल्या आहेत. त्यांनीं त्यांनीं आपल्या गाथांच्या आरंभीं त्यांचें चरित्र देण्याचा उपक्रम केला आहे, आणि तो आम्हासही इष्ट वाटल्यावरून आम्हीही येथें त्यांचें संक्षिप्त चरित्र देत आहों.

तुकाराम महाराज जातीनें कुणबवाणी होते असें कोणी म्हणतात, परंतु त्यांच्या पूर्वजांचे, त्यांचे स्वतांचे व त्यांच्या हल्लींच्या हयात वंशजांचे जे सोईरसंबंध झालेले आहेत, त्यावरून ते चांगल्या थोर मराठे कुळांतले होते, ह्याविषयीं कांहीं शंकाच रहात नाहीं. त्यांच्या कुळाचें आडनांव **मोरे** असून रहाण्याचें ठिकाण पुण्यापासून सुमारें ८ कोसांवर इंद्रायणीचे कांठीं **देहू** नांवाचें गांव आहे तें होय. ह्या गांवास **तुकाराम** महाराजांमुळेंच विशेष प्रसिद्धी आली आहे. **तुकाराम** महाराजांपासून सात पिढ्यांपर्यंतच्या त्यांच्या पूर्वजांचीं नांवें व त्यांच्या विषयींची थोडीशी माहिती मिळते, परंतु त्यांच्या जन्ममृत्यूचे शक मिळत नाहींत, ह्यामुळें त्यांचा काल नक्की सांगतां येत नाहीं. त्यांचा व्यवसाय व कुलपरंपरागत भगवद्भक्ति ह्यांविषयीं महिपतीनें आपल्या 'भक्तलीलामृत' नामक ग्रंथांत त्रोटक माहिती दिली आहे, तीवरून **तुकाराम** महाराजांचे कुळांत किराणा वगैरे जिन्नस विकण्याचा धंदा व भजनपूजन, कीर्तन, नामस्मरण, साधुसंतांची सेवा व पंढरपूरची वारी इत्यादि नवविधा भक्तीचे प्रकार पिढ्यानपिढ्या* चालत आले आहेत असें आढळून येतें. ते जातीनें मराठे होते, तरी त्यावेळच्या मराठी बाण्याप्रमाणें त्यांनीं लष्करांत चाकरी नौकरी केली नाहीं, किंवा इतर मराठ्यांप्रमाणें शेतकीही केली नाहीं. त्यांनीं वंशपरंपरा वाण्याचाच धंदा केला व त्यांचा आचार भगवद्भक्तीमुळें शुद्ध असल्यानें, त्यांस कोणी कुणबवाणी समजत असतील.

तुकाराम महाराजांच्या सातव्या पूर्वजाचें नांव **विश्वंभर** होतें. ते मोठे भगवद्भक्त असून ते साधुसंत, अतिथि अभ्यागत वगैरे भक्तिमार्गांतील लोकांची

---

* तुकाराम महाराजांच्या पूर्वजांपैकीं हरी व मुकुंद हे दोघे मात्र ह्या गोष्टीस अपवाद आहेत.

चांगली सुश्रूषा करीत असत, व त्यांच्यापासून ईश्वरविषयक ज्ञान संपादन करीत असत. त्यांच्या तोंडावाटें नेहमीं ईश्वराचें नांव निघत असे, ते दररोज रात्रीं गांवांतील भाविक लोक जमवून भजन व कीर्तन करीत असत. त्यावेळीं ज्ञानदेव, नामदेव वगैरे सत्पुरुषांचीं अभंग वगैरे कवनें भाविक लोकांस पाठ असत, व तीं से भजन आणि कीर्तनसमयीं टाळ मृदंगाच्या तालसुरांत मोठ्या प्रेमानें व भक्तिभावानें म्हणत असत. विश्वंभरबुवास थरींच कवनें पाठ होतीं, त्यांस जीं नवीं आढळून येत तीं ते आपल्याजवळ आवडीनें लिहून ठेवीत व फुरसतीप्रमाणें पाठ करीत. ते आपला वाणसवद्याचा वडिलोपार्जित धंदा मोठ्या प्रामाणिकपणानें, सचोटीनें व दक्षतेनें करीत असून, त्यांत होणाऱ्या किफायतीचा बराच भाग ते साधुसंतांच्या सुश्रूशेकडे व धार्मिक कृत्यांकडे खर्च करीत असत.

पंढरपूरच्या श्रीविठ्ठलाचें माहात्म्य ज्ञानदेव व नामदेव यांच्या पूर्वीपासून चालत आलें होतें. आषाढी व कार्तिकी एकादशीस पंढरीच्या वारीला जाण्याचा लोकांचा क्रम फार पुरातन होता; हें ज्ञानदेव, नामदेव व तत्कालीन प्रसिद्ध भगवद्भक्त पंढरीच्या वारीस जात होते, यावरून उघड दिसतें. ज्ञानदेव व नामदेव हे महापुरुष निराकार, निर्गुण परब्रह्माचें रहस्य जरी पूर्णपणें जाणत होते, तरी सामान्य जनांचा विठ्ठलावरील प्रेमळ भाव पाहून तोच मार्ग त्यांच्या धार्मिक उन्नतीस योग्य आहे असें त्यांस वाटलें, व तोच मार्ग स्वीकारून ते सामान्य लोकांबरोबर पंढरपूरच्या वारीला जात असत. त्यांनीं विठोबाचें माहात्म्य आपल्या अभंगांत वर्णन करून भजन व नामसंकीर्तन यांचा महिमा जितका वाढवितां येईल तितका वाढविला. ह्यामुळें, त्यांच्या पश्चात पंढरीची वारी व भजन वगैरे प्रेमळ भक्तीचे प्रकार कुलपरंपरेनें चालत आले. **विश्वंभर**बुवांच्या पूर्वजांचाही पंढरीचे वारीस प्रतिवर्षी जाण्याचा व विठ्ठलाचें भजन पूजन करण्याचा नित्यक्रम होता, हें **विश्वंभर**बुवांस त्यांच्या आईनें वाडवडिलांच्या पंढरीच्या वारीची आठवण देऊन तोच मार्ग अनुसरण्यास सांगितलें. आधींच **विश्वंभर**बुवा प्रेमळ भगवद्भक्त व त्यांतच आईचा हा सदुपदेश, मग काय! **विश्वंभर**बुवा प्रतिवर्षी नियमानें वारीला जाऊं लागले. तेथें दूर दूरच्या ठिकाणांहून येणाऱ्या साधुसंतांचा मोठा थोरला जमाव, त्यांचीं ठिकठिकाणीं अहर्निश होणारीं प्रेमरसपूरित भजनें, कीर्तनें व उपदेशपर व्याख्यानें, त्यांचें आपपरभाव विसरून एकमेकांशीं प्रेमानें वागणें, नेहमीं मुखावाटें ईश्वरनामस्मरण, विठ्ठलाच्या दर्शनाची उत्सुकता, तेथील सोहळा, काल्याचा समारंभ इत्यादि प्रकार पाहून नास्तिकाचें हृदय देखील भक्तिभावानें उचंबळून येऊन त्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रु आल्यावांचून रहावयाचे नाहींत, मग **विश्वंभर**बुवा तर मूळचेच भाविक भक्त, त्यांच्या अंगीं वंशपरंपरेनें बाणलेला भक्तिभाव अधिकच जोरावला ह्यांत फारसें नवल नाहीं. त्यांस ईश्वरभक्तीचा पुरा छंद लागला व पंढरीचा सोहळा पुनः पुनः पाहण्याची त्यांना उत्सुकता झाली. ते पुढें दर पंधरा दिवसांनीं पंढरीच्या वारीस जाऊं लागले व वारीहून परत घरीं आल्यावरही त्यांस घरीं करमेनासें झालें. ह्याप्रमाणें आठ महिने त्यांचा

क्रम चालला होता, परंतु त्यापासून त्यास फार त्रास व नुकसान पोंचूं लागलें. संसारांत त्यांचें चित्त लागेनासें झालें व त्यांच्या हातून घरचा चरितार्थाचा धंदाही बरोबर होईनासा झाला. ही त्यांची स्थिति पाहून लोक त्यांना ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगून नांवें ठेवूं लागले. ते ह्मणत कीं, सर्व ठिकाणीं ईश्वर भरलेला आहे, मग नेमेंमीं पंढरीस जाण्याचें काय प्रयोजन आहे? संसारादिकाला इतकें भक्तीचें वेड उपयोगाचें नाहीं. त्याच्या योगानें चरितार्थाच्या धंद्याला अडथळा होऊन कुटुंबपोषणाची अडचण पडल्यावांचून रहावयाची नाहीं. भगवद्भक्ति व संसार दोन्ही गोष्टी चांगल्या तऱ्हेनें एका मनुष्याकडून चालणें फार कठीण आहे. ज्याला भगवद्भक्तीचा छंद लागला त्यानें संसार सोडला पाहिजे. नाहीं तर त्याची जगांत फजिती व बेअब्रू झाल्यावांचून रहाववयाची नाहीं. लोकांचें हें ह्मणणें त्यांना कांहींसें खरें वाटे. परंतु त्यांचा पंढरीस दर पंधरवड्याला जाण्याचा नाद सुटेना. त्यांच्या ह्या वृत्तीमुळें धंद्यांत पुरेशी किफायत होईनाशी झाली व प्रपंचाचा गाडा पूर्वीसारखा सुरळीत चालेनासा झाला. अशा स्थितींत असतांना **विश्वंभर**बुवास एके दिवशीं रात्रीं पांडुरंगानें स्वप्नांत दर्शन देऊन सांगितलें कीं, मी तुझा भक्तिभाव पाहून प्रसन्न झालों व यापुढें तुझ्यासन्निध राहण्यासाठीं येथें आलों आहे. हें स्वप्न पाहून **विश्वंभर**बुवा सकाळीं कांहीं भाविक लोकांसह स्वप्नांत पाहिलेल्या आंब्याच्या झाडापर्यंत भजन करीत गेले व तेथें त्यांस जमिनींत **विठोबा रखुमाई**च्या मूर्ति सांपडल्या. त्यांची त्यांनीं इंद्रायणीचे कांठीं लहानसें देऊळ बांधून स्थापना केली, पुढें ते दर पंधरा दिवसांची पंढरीची वारी सोडून देऊन तेथेंच नित्य नियमानें भजन पूजन; व दर एकादशीस उत्सव करूं लागले. त्यांनीं आषाढी कार्तिकीची पंढरीची वारी मात्र मरेपर्यंत सोडिली नाहीं.

विश्वंभरबुवांच्या कुटुंबाचें नांव **अमाबाई** असें होतें. ही साध्वी आपल्या पतीप्रमाणेंच विठोबाची पूजाअर्चा व नामस्मरण करीत असे. इच्या पोटीं **विश्वंभर**बुवांस **हरी** व **मुकुंद** नांवाचे दोन पुत्र झाले होते. आपल्या नवऱ्याच्या मागें **अमाबाई**, त्यानें स्थापन केलेल्या विठोबा रखुमाईच्या मूर्तींची भक्तिभावानें पूजाअर्चा करून देवळाची झाडलोट, दिवाबत्ती वगैरे व्यवस्था ठेवीत असे. **हरी** व **मुकुंद** ह्या दोघां मुलांचा कल आपल्या वडिलांप्रमाणें आपल्या वाणीपणाच्या धंद्याकडे व परंपरा भक्तिमार्गाकडे नसून क्षात्रधर्माकडे होता. ते वयांत आल्यावर आपल्या आईस आपला उद्देश कळवून त्यांनीं राजसेवा स्वीकारिली ते जात्या शूर असल्यामुळें त्यांची लवकरच चहा होऊन, त्यांना सेना, संपत्ति व वैभव प्राप्त झाले. त्यांनीं आपल्या आईस आपल्याजवळ राहण्यास बोलाविलें व तीही पुत्रप्रेमामुळें त्यांचेकडे गेली, परंतु तिला आपलें गांव व आपल्या नवऱ्यानें स्थापिलेल्या मूर्तींची पूजाअर्चा सोडून जातांना फार दुःख झालें. आपल्या मुलांनीं, आपल्या वाडवडिलांचा भक्तिमार्ग सोडून इहलोकच्या ह्या क्षणिक वैभवांतच सुख मानून त्यांतच निमग्न होणें तिला आवडत नसे. ती आपल्या मुलांस वारंवार त्याविषयीं आठवण देई व त्यांचें लक्ष्य ईश्वरभक्तीकडे लागावें म्हणून वेळोवेळीं उपदेश करी; परंतु त्याचा कांहींएक उपयोग होत

नसे. तिला मात्र विठोबास सोडून आल्याबद्दल अतिशय दुःख वाटूं लागलें व त्याबद्दल तिला स्वप्नें देखील पडत असत. एके दिवशीं रात्रीं स्वप्नांत विठोबा आपली हेळसांड करून इकडे आल्याबद्दल रागावून आपल्यापुढें उभा आहे व आपल्यास परत येण्यास सांगत आहे, असें **अमाबाई**स दिसलें व तिनें तें स्वप्न आपल्या मुलांस सांगितलें. मुलांनीं 'स्वप्नांत पाहिलेल्या गोष्टीवर काय भरंवसा ठेवितेस ?' असें सांगून तिची समजूत केली व पुढें थट्टेनें 'आज विठोबानें स्वप्नांत काय सांगितलें' असें विचारीत असत. पुढें कांहीं दिवसांनीं परचक्राच्या तावडींत सांपडून ते दोघे भाऊ लढाईंत मारले गेले व त्यांचें घरदार शत्रूंनीं लुटलें; ह्याप्रमाणें त्यांचा व त्यांच्या वैभवाचा एकदमच नाश होऊन त्यांच्या आईस विपत्ति प्राप्त झाली. ह्या मुलांच्या बायकांपैकीं धाकटा **मुकुंदा** याची बायको त्याच्या बरोबर सती गेली व थोरला हरी, याची बायको, गरोदर असल्यामुळें, **अमाबाई**बरोबर देहूस गेली. तेथें पोटाचा गुजारा चालेना म्हणून **अमाबाई**नें आपल्या सुनेस तिच्या माहेरीं, नवलाख्याचे **उंबरें** येथें पाठविलें. **अमाबाई** एकटीच देहूस राहून आपल्या नवऱ्यानें बांधलेल्या देवळांतील विठोबाच्या मूर्तीची भक्तीनें सेवा करीत असे. तिला ह्या भक्तिभावाची इतकी आवड लागली कीं, पुढें जरी तिचे डोळे गेले तरी तिनें त्याबद्दल खेद न मानितां, विठोबाच्या पूजेअर्चेंत अंतर पडूं दिलें नाहीं. शेवटीं समाधानानें तिनें परलोकीची वाट धरिली.

आपली सासू मृत्यु पावल्याचें वर्तमान नवलाख्याच्या उंबऱ्यास हरीच्या विधवा बायकोस समजल्यावर ती आपलें कुलवृत्त चालविण्यासाठीं मुलास घेऊन देहूस आली. ह्या मुलाचें नांव **विठोबा** होतें. त्यानें आपल्या आईचें अनुकरण करून वाडवडिलांचा भक्तिमार्ग पुढें चालविला. ह्यास **पदाजी** नांवाचा मुलगा होता. **पदाजी**चा मुलगा **शंकर**, शंकराचा **कान्हया** व कान्हयाचा **बोल्होबा** ह्याप्रमाणें **तुकाराम** महाराजांच्या बापापर्यंत वंशपरंपरा होय. ह्या सर्व पुरुषांनीं आपला वडिलोपार्जित धंदा स्वीकारून भगवद्भक्तींत आपला काळ घालविला.

तुकाराम महाराजांचा बाप **बोल्होबा** व आई **कनकाई** हीं दोघेंही भाविक असून विठ्ठलनामस्मरणांत व साधुसंतांच्या सेवेंत आपलें आयुष्य घालवीत असत. **बोल्होबा**नें आपल्या कुलाचाराप्रमाणें आषाढी कार्तिकीची पंढरीची वारी चालविली होती. त्यास फार वर्षें संतान झालें नव्हतें ह्मणून तो व **कनकाई** आपल्या परमपूज्य विठोबाजवळ मुलाविषयीं प्रार्थना करीत. **बोल्होबा**नें चोवीस वर्षें पंढरीची वारी केली व त्यास चाळीस वर्षांच्या वयाच्या सुमारास पहिलें संतान झालें. त्याचें नांव **सावजी** ठेविलें होतें. दुसऱ्या वेळेस **कनकाई**स **तुकाराम** महाराज झाले व तिसऱ्या खेपेस **कान्होबा** नांवाचा मुलगा झाला. ह्या तिघांसही बाळपणापासून विठ्ठलभक्तीचा छंद होता. यांस एक बहीण होती असें म्हणतात.

ह्याप्रमाणें **बोल्होबा**ची संततीची इच्छा विठ्ठलानें पूर्ण केली. दुकानदारी चांगली चालून दोन पैसे मिळाले. मुलांचीं लग्नें झालीं. थोर मराठे घरा-

ण्याशीं संबंध घडला. लोकांत अब्रू वाढली. ह्याप्रमाणें संसारी माणसास जीं कांहीं सुखें प्राप्त व्हावीं लागतात तीं **बोल्होबास** मिळालीं असून सामान्य नियमाप्रमाणें त्यांस ईश्वरभक्तीचा विसर पडला नाहीं. त्यांचें विठ्ठलाचें नामस्मरण, व भजनपूजन नित्य नियमानें चालू असून निरहंकारवृत्ति व लीनता हे गुण त्यांस सोडून गेले नाहींत. ते आपल्या धंद्यांत सचोटीनें व प्रामाणिकपणानें वागून वाजवी किफायत मिळवीत असत. बायाबापड्या व अडाणी लोकांस हिशेबांत व भावांत चुकवून त्यांनीं अन्यायानें कधींही पैसा मिळविला नाहीं. ह्याप्रमाणें संसारसुखाचा पूर्ण अनुभव घेत असतां त्यांचा वृद्धापकाळ झाला. तेव्हां संसाराचा भार आपल्या वडील मुलाचे अंगावर टाकून आपण ईश्वरभजनांत राहिलेलें आयुष्य घालवावें असें मनांत आणून त्यांनीं **सावजीस** जवळ बोलावून आपलें मनोगत कळविलें. **सावजींचें** लहानपणापासून संसारांत मुळींच लक्ष्य नव्हतें. त्याला ईश्वरभक्तीवांचून दुसरें कांहींच आवडत नसे. त्यानें दुकानदारी व संसार चालविण्याचें नाकारिलें. तेव्हां त्यांनीं **तुकाराम** महाराजांस ‘ नफ्यातोट्याकडे लक्ष्य देऊन ज्यांत आपलें हित होईल अशा तऱ्हेनें धंदा करून कुटुंबपोषण करावें ’ अशी आज्ञा केली. ती **तुकाराम** महाराजांनीं मान्य केली व त्यांनीं संसाराचा भार शिरावर घेतला. यानंतर **तुकाराम** महाराजांच्या पहिल्या बायकोस दम्याचा आजार असल्यामुळें त्यांचें पुण्याचे धनाढ्य सावकार **आपाजी गुळवे** यांची उपवर कन्या **अवलाई** ऊर्फ **जिजाई** इच्याशीं दुसरें लग्न झालें. तुकाराम महाराजांच्या पहिल्या बायकोचें नांव **रखुमाबाई** होतें. ती जरी वडील बायको होती तरी घरांतली कारभारीण **जिजाई**च होती. असो.

तुकाराम महाराजांची खरी जन्म तिथि, महिना व शक कोठेंच आढळत नाहीं, हें वर सांगितलेंच आहे. तथापि त्यांची प्रयाण तिथि निश्चितपणें ग्रंथांतरीं लिहिलेली असून त्यावेळीं त्यांचें वय अजमासें ४२ वर्षांचें असावें असें अनुमान काढिलेलें असल्यामुळें त्यांचा जन्म शके १५३०–३१ म्हणजे सन १६०८–९ सालीं झाला असावा असें कित्यकांचें मत आहे, त्यांच्या बाळपणचा इतिहासही फारसा कोठें उपलब्ध नाहीं, त्यामुळें त्यांच्या बाळपणच्या आख्यायिका देतां येत नाहींत. वयाच्या तेराव्या वर्षीं दुकानदारी व संसार **तुकाराम** महाराजांच्या गळ्यांत पडला. तेव्हांपासून सतरा वर्षांच्या वयापर्यंत वडिलांच्या देखरेखीखालीं त्यांनीं आपला धंदा मोठ्या दक्षतेनें व प्रामाणिकपणानें चालविला **तुकाराम**बुवांचे अंगीं लहानपणापासूनच लीनता होती व ते आपल्या अडचणीकडे किंवा श्रमाकडे लक्ष्य न देतां दुसऱ्याच्या कामीं पडण्यास नेहमीं तत्पर असत. त्यांची ही लीनता व तत्परता आणि दुकानदारी करण्याची सचोटी पाहून, आवडीनें गिऱ्हाइक त्यांचे दुकानीं जिन्नस घेई; गिऱ्हाइकी वाढल्यामुळें त्यांना किफायतही चांगली होत असे. अल्पवयांत गिऱ्हाइकाशीं नम्रतेनें बोलून त्यांची मर्जी संपादन करणें, त्यांना लागेल तो माल चटकन सचोटीनें काढून मापून देणें व वाजवी भावानें किंमत घेणें, वगैरे त्यांच्या गुणांविषयीं सर्व लोक वाहवा करीत. ती ऐकून **बोल्होबास** मोठी

धन्यता वाटे. **तुकाराम**बुवांच्या ह्या सद्गुणांनीं व व्यापारी दक्षतेनें गिऱ्हाइकी जमून थोड्या अवकाशांत त्यास दोन पैसे मिळाले, आणि प्रपंच सुखानें चालू लागला. मुलाची हुशारी व कर्तबगारी पाहून **बोल्होबास** व **कनकाईस** समाधान वाटे, व संसाराविषयीं निःकाळजी होऊन ते आपला काळ नामस्मरणांत व भजनपूजनांत घालवीत. धंद्यांत पूर्ण लक्ष्य घालूनच **तुकाराम**बुवा आईबापांस सुख देत होते असें नाहीं. तर रात्रीं आईबापांच्या सेवेंत तत्पर राहून त्यांच्या बरोबर भजन करून ते आपल्या भगवद्भक्तीनें त्यांस संतोषवीत असत. ह्याप्रमाणें इहलोकचे पूर्ण सुख अनुभवीत असतां **बोल्होबास** व **कनकाईस** पांच सहा महिन्यांचे अंतरानें देवाज्ञा झाली. आपल्या सात्विक व प्रिय आईबापांच्या मृत्यूनें **तुकाराम**बोवांस पराकाष्टेचें दुःख झालें. आपल्या लहान भावंडांचा शोक व दीनवदनें पाहून तर त्यांचें हृदय फाटून जाई. निरापेक्षवृत्तीनें तीर्थयात्रा करीत फिरणाऱ्या साधुसंतांच्या मुखानें, मनुष्य प्राण्याचें जीवित किती क्षणभंगुर आहे, त्याची संपत्ती व सुख मिळण्याची हाव किती व्यर्थ आहे व मरण समयीं स्वकष्टार्जित दौलतीकडे आणि प्रिय पत्नी व मुलें यांच्याकडे दीनपणानें पहात त्यांस सोडून एकटेच कसें जावें लागतें, इत्यादि गोष्टींविषयीं **तुकाराम**बुवांनीं नेहमीं वैराग्यपर उपदेश ऐकिला होता, व त्यांच्या कोंवळ्या मनावर त्याचा ठसा खोल उमटत चालला असतां, त्या गोष्टीचा त्यांस प्रत्यक्ष अनुभव आल्यामुळें त्यांचें चित्त संसाराविषयीं व व्यापाराविषयीं उदासीन होत चाललें. आईबापांस एक वर्ष लोटतें न लोटतें तोंच त्यांचा वडील भाऊ **सावजी** याची बायको स्वर्गवासी झाली. आधींच संसाराविषयीं विरक्त झालेला **सावजी** ईश्वरी संकेताप्रमाणें संसारत्याग करून गोसावी बनून तीर्थाटन करण्यास निघून गेला. सतरा अठरा वर्षांच्या वयांतच घरांतलीं प्रीतीचीं वडील माणसें **तुकाराम**बुवांस सोडून गेलीं आणि त्यांच्या वियोगजन्य दुःखांतच दोघी बायका व भावंडें यांच्या पालनपोषणाचा बोजा त्यांच्या अंगावर पडला. अशा स्थितींत चांगल्या पोक्त वयाच्या व बुद्धीच्या माणसांची देखील कंबर खचल्यावांचून रहावयाची नाहीं. मग **तुकाराम**बुवा तर अल्लड पोरच! त्यांचें चित्त उद्विग्न व उदास झाल्यास नवल तें काय? आपले आईबाप भरला संसार व प्रिय मुलें सोडून परलोकवासी झालीं, वडील बंधु संसार असार समजून आपल्या आत्म्याची उन्नति करून घेण्यासाठीं ईश्वरोपासनेंत लीन झाला. ह्या गोष्टींचा भगवद्भक्तींत वाढलेल्या **तुकाराम**बुवांवर फारच विलक्षण परिणाम झाला आणि त्यांची वृत्ति एकदम पालटली. त्यांच्या आंगचे सत्यप्रीति, लीनता, परोपकारबुद्धि, औदार्य व भिडस्तपणा हे गुण व्यापार धंद्यास फायदेशीर नव्हते, परंतु त्यांच्यावर बापाची नजर असल्यामुळें त्यांचा प्रभाव इतके दिवस त्यांस नुकसानकारक झाला नाहीं, उलट त्यांच्या सात्विक वृत्तीनें त्यांची गिऱ्हाइकी चांगली जुळली असावी; परंतु आईबापांच्या मागें ह्या सद्गुणामुळेंच त्यांस व्यापारांत बरकत आली नाहीं. कोणी गरिबी दाखवून एखादा जिन्नस भावापेक्षां थोडा ज्यास्त मागितला तरी त्यास तो द्यावयाचा. उधार निर्भिडपणें मागावयाचा नाहीं, कोणास कडक शब्दानें दुखवावयाचें नाहीं. एखाद्यानें खासगी काम सांगितलें

असतां दुकानदारीचा वेळ मोडेल हें मनांत न आणतां त्याचे कामांत गुंतून रहावयाचें, कोणी गरिबानें कांहीं मागितल्यास त्यास ऐपतीपेक्षां देखील अधिक औदार्यानें तें द्यावयाचें, अशा तऱ्हेचा सढळ व धंदेवाईकास घातक असा त्यांचा व्यवहार आईबापांच्या मागें स्वाभाविकपणेंच चालू झाल्यामुळें त्यांस धंद्यांत बूड येऊं लागली. तुकारामबुवासारख्या सात्विक, सत्यप्रिय, दयाळू, उदार व भाविक मनुष्याच्या सद्गुणांचा फायदा घेऊन त्यांस फसवून साधेल त्या युक्तीनें बुचाडणारे लबाड लोक सर्व कालीं व सर्वत्र कांहीं थोडे नसतात, मग देहूसच त्यांची वाण कोठून असणार? अशा लोकांनींच तुकारामबुवांस गरिबी व लाचारी दाखवून बुडविलें; परंतु त्या साधुवृत्तीच्या तुकारामबुवांस हे लोक लबाड आहेत व ते स्वार्थ साधून आपल्यास बुडवीत आहेत असें कधींही वाटलें नाहीं. ह्यामुळें ते पुढें देखील ह्या लोकांस ओळखून सावधगिरीनें वागले नाहींत. धंद्यांत अशा तऱ्हेनें बूड येत चालली वडिलोपार्जित संचय संपत आला, मोठा धंदा करण्याचें अवसान राहिलें नाहीं, कुटुंबपोषणाचा खर्च पूर्वी चालत आलेला तसाच कायम, परंतु तो चालण्यास नेहमीं अडचण पडूं लागली. येथपर्यंत स्थिति आली, तरी तुकारामबुवा आपल्या दयाळू, उदार व सात्विक वृत्तीपासून यत्किंचितही ढळले नाहींत. त्यांचा व्यवहार तसाच चालू राहिला. शेवटीं लहानसें किरकोळीचें दुकान घालून ते धंदा करूं लागले. त्यांतही व्यापारदृष्टि व दक्षता न राहिल्यामुळें त्यांस बूड आली. अधिक नफा घेऊन गिऱ्हाइकास जिन्नस देणें म्हणजे त्यांस नाडणें व उधारीसाठीं लोकांस तसदी लावणें म्हणजे त्यांच्या अडचणी व गरिबी ह्यांविषयीं पर्वा न करितां त्यांस छळणें होय अशी त्यांची समजूत असल्यामुळें, त्यांस कोणत्याही धंद्यांत फायदा आला नाहीं. तुकारामबुवांच्या ह्या वृत्तीमुळें घरचें भांडवल सारें बसलें. तेव्हां घरांतील किडूकमिडूक मोडून घरच्या चार बैलांवर कांहीं माल लादून ते गांवोगांव हळीकरांत फिरूं लागले. हळी करण्याचा धंदा दगदगीचा व त्रासदायक आहे, तरी कुटुंबपोषणाचा लकडा त्यांस यावेळीं सुटला नसल्यामुळें, उन्ह, वारा, पाऊस, खाण्यापिण्याचे हाल वगैरेकडे लक्ष्य न देतां ते जिवापाड मेहनत करीत होते, परंतु व्यापाऱ्याचे अंगीं अवश्य लागणारे निर्मळपणा, मिळेल तितका नफा मिळण्याची दृष्टि, निष्ठुरता वगैरे गुण त्यांच्या अंगीं मुळींच नसल्यामुळें, त्यांतही त्यांस बूडच आली. घरचे होते नव्हते मोडून ह्या हळीच्या धंद्यांत घातलेलें थोडेंसें भांडवलही ठार बुडालें. प्रपंचाचा खर्च तर हात धुवून मागें लागलेला. अशा स्थितींत काय करावें हें त्यांस सुचेना. आपण कोठें चुकतों म्हणून आपल्यास नुकसान लागतें हें कांहीं त्यांच्या लक्ष्यांत येईना, अथवा त्यांस आपली चूक समजत असली तरी त्यांचा सात्विक व उदार स्वभाव त्यांस ती सुधारण्यास बिलकूल सवड देईना. पुढें त्यांनीं सावकारांचें कर्ज काढून अनेक धंदे केले, परंतु त्या सर्वांत त्यांना बूडच आली. पैशासाठीं सावकारांचा तगादा त्यांच्यामागें लागला, पण त्यांना देण्यास त्यांचेजवळ काय राहिलें होतें? तगादेदारास वायदे करून टाळाटाळी करणें त्यांच्या सत्य-

निष्ठ स्वभावास आवडेना, पण उपाय काय? घरांत कुटुंबपोषणाची काळजी व दारांत सावकाराचा तगादा, अशा कठिण प्रसंगांत सांपडल्यामुळें ते अगदीं लाचार झाले. त्यांची ती स्थिति पाहून त्यांच्या आप्तेष्टांस त्यांची कींव येऊन त्यांनीं कांहीं सावकारांचे हवाले घेतले. पण रोजच्या खर्चाला पैसा पाहिजे तो त्यांना कोठून मिळणार? कांहीं आप्तांनीं आपली पत खर्चून त्यांस धंद्या-साठीं सावकारापासून कर्ज काढून द्यावें पण तें त्यांनीं पूर्ववत नाहींसें करून पुन्हा लब्बड होऊन बसावें. असें वारंवार होऊं लागल्यामुळें त्यांच्यासाठीं आपला गळा गुंतविण्यास कोणीही धजेनासें झालें. ज्यांनीं त्यांचे हवाले घेतले होते व आपल्या पतीवर त्यांस कर्ज काढून दिलें होतें, त्यांस ते पैसे आंगावर भरावे लागले व पुढें **तुकाराम**बुवांची कींव करण्याचें त्यांनीं सोडून दिलें.

ह्याप्रमाणें वडिलार्जित संपत्ति नाहींशी झाली, कर्जाच्या बोजामुळें बाहेर तोंड काढावयास जागा राहिली नाहीं व अशा प्रसंगांत कोणी सुहृज्जन सहाय्य करीनासे झाले, तेव्हां **तुकाराम**बुवांचें मन अतिशय उदास झालें. कुटुंबाच्या पोषणाची काय तजवीज करावी हें त्यांना सुचेना, काळजी कोठें चैन पडूं देईना व कशानेंही त्यांच्या मनास समाधान वाटेना. मनुष्य अशा विपत्तींमध्यें आला ह्मणजे त्याच्या संतप्त मनास साधुसंतांच्या निवृत्तिपर बोधवचनांवांचून व ईश्वरनामस्मरणावांचून विश्रांतीला दुसरा थारा नाहीं. तो अशा प्रसंगीं तीं बोधवचनें लक्ष्यपूर्वक पढत असतो व ईश्वराचें वरचेवर नामस्मरण करीत असतो. **तुकाराम** महाराजांची अशीच व्यवस्था झाली. त्यांस ज्ञानदेव, नामदेव, कबीर वगैरे साधु पुरुषांचे अभंग व पदें पूर्वींच पाठ येत होतीं. त्यांचें रहस्य प्रत्यक्ष अनुभवावरून त्यांस या प्रसंगीं कळलें. संसार किती दुःखमूळ आहे, सात्विक व गरीब स्वभावाच्या माणसांना जगांत पोट भरणें हेंसुद्धां किती मुष्किलीचें झालें आहे. लोकांची नीतिसंबंधानें कशी स्थिति बिघडली आहे, ईश्वराचा वचक कितपत पाळण्यांत येतो, जीवित व वित्त क्षणभंगुर असून त्यांच्याकरितां लबाड्या, घातपात वगैरे करण्याची कशी [illegible] नाशी झाली आहे, वगैरे गोष्टी पूर्णपणें समजून आल्यामुळें व ह्या सर्वांपासून आत्म्याची केवळ अवनति आहे; हें वरील साधुसंतांच्या वचनावरून त्यांच्या अंतःकरणांत वागल्यामुळें त्यांचें चित्त संसाराविषयीं उदासीन झालें. ह्या मायाजाळांतून सोडविणारा व लोकांचें ह्या अवनत स्थितीपासून रक्षण करणारा विठ्ठलावांचून दुसरा कोणी नाहीं, हें वारंवार त्यांच्या लक्ष्यांत येऊन त्यांच्या अंगीं वैराग्य व भक्ति बळावत चालली व विठ्ठलाचें नामस्मरण व भजन यांकडे त्यांचें लक्ष लागलें. प्रपंचाच्या व सावकारांच्या देण्याच्या काळजीसंबंधानें ते हळू हळू बेपरवा होत चालले, आपला बहुतेक वेळ ते ईश्वरनामस्मरणांत व भजनांत घालवू लागले. त्यांची ही वृत्ति पाहून, घरचें सारें वाटोळें करून आतां सावकारांस बुडविण्यासाठीं यानें हें ढोंग चालविलें आहे, अशी त्यांची लोक निंदा करूं लागले. त्यांचे कांहीं हितचिंतक आप्तसंबंधी होते ते उद्योगधंद्यांतलें मन काढून असें भजनांत व नामस्मरणांत दिवस घालविल्यानें प्रपंच कसा चालेल? विठोबाच्या नांवानें बायका पोरांचें पोट थोडेंच भरावयाचें आहे? अशानें [illegible]

भीक मागण्याची मात्र पाळी येईल, असा बुद्धिवाद सांगूं लागले; पण त्यापासून त्यांच्या मनावर कांहींएक परिणाम झाला नाहीं. **तुकाराम**महाराज असामान्य पुरुष होते. साधारण मनुष्याप्रमाणें संकटसमयीं ईश्वराचें क्षणोक्षणीं नांव घ्यावें, कथा पुराणांतला उपदेश व साधुसंतांचीं वचनें ऐकून सद्गदित व्हावें आणि पुनः कोठें आधार लागला कीं, तें भगवद्भक्तीचें प्रेम सर्व विसरून गुलामाप्रमाणें रात्रंदिवस पैशासाठीं धडपड करावी, अशांतले ते नव्हते. हा संसाराचा खटाटोप व भाऊबंद, बायका पोरें वगैरे मायेचा पसारा मिथ्या व दुःखमूलक असून आत्मोन्नतीसाठीं भगवद्भजनांत आयुष्य घालविणें हेंच श्रेयस्कर आहे, हा साधुसंतांचा सदुपदेश जो त्यांच्या मनांत बाणला तो पुढें कशानेंही डळमळला नाहीं. तथापि बायकामुलें आपल्यावर अवलंबून आहेत. त्यांचें पालनपोषण करणें हा आपला धर्म आहे व त्यासाठीं गुजाऱ्यापुरता कांहीं तरी धंदा केला पाहिजे असें त्यांस वाटत होतें, त्यांनीं आणखी एक वेळ प्रयत्न करून थोडेसें भांडवल मिळविलें व त्याच्या मिरच्या खरेदी करून ते आपल्या कांहीं सोबत्यांबरोबर कोकणांत हळी करावयास गेले. वाटेनें मुखावाटें विठ्ठल नामाचा घोष व मुक्कामावर रात्रींचे प्रेमपुरःसर भजन हा त्यांचा क्रम चालला होता. त्यांचे सोबती पैशाच्या मागें लागलेले असल्यामुळें त्यांस **तुकाराम** महाराजांचा हा क्रम कंटाळवाणा वाटूं लागला. दिवसभर दगदग करून रात्रींची निवांतपणें झोंप घ्यावी, तर याच्या टाळांची व भजनाची कटकट मागें लागलेली, तेव्हां यास टाळा देऊन आपण पुढें निघून जावें, असा संकेत करून ते निघून गेले. **तुकाराम**बुवांच्या मनास त्याबद्दल कांहींएक वाईट वाटलें नाहीं. ते एकटेच वाटेनें नामस्मरणामध्यें व अभंग वगैरे म्हणण्यामध्यें तल्लीन होऊन चालत होते. त्यांस आपल्या बैलांवरच्या गोण्या कलल्या आहेत किंवा ते वाट सोडून भलतीकडेच चालले आहेत, याचें भान देखील राहत नव्हतें. अशा तऱ्हेनें ते मार्ग क्रमीत असतां रात्रीचे सुमारास त्यांच्या एका बैलावरची गोणी रानामध्यें पडली. ती त्यांच्या एकट्याच्यानें बैलावर लादवेना, रात्रीचा समय असल्यामुळें त्या वाटेनें कोणी येईना, रात्र बरीच झाली, आपल्या मदतीस कोणी इतक्यांत येईल ही अशा राहिली नाहीं, ह्यामुळें ते मोठ्या विवंचनेंत पडले. त्यांनीं करुणस्वरानें विठ्ठलाचा धांवा करण्यास सुरुवात केली. कांहीं वेळानें एक वाटसरू त्या वाटेनें येऊन त्यानें **तुकाराम**बुवांस बैलावर गोणी लादण्यास मदत केली व त्यांस त्या अरण्यांतून सुखरूपपणें पार पोंचाविलें.

शेवटीं कोंकणांत त्यांनीं आपल्या सोबत्यांस गांठलें व त्यांच्याबरोबर आपणही मिरच्यांचा ढीग विकावयास मांडला. त्यांचे सोबती व्यापारांत दक्ष असल्यामुळें त्यांनीं आपल्या मिरच्या किफायतीनें विकल्या, परंतु **तुकाराम**बुवांचें ध्यान ईश्वरचिंतनाकडे लागलेलें; गिऱ्हाइकांस भाव सांगण्याकडे, हिशेबानें माप देण्याकडे किंवा आठवण ठेवून पैसे घेण्याकडे त्यांचें लक्ष्य नसल्यामुळें, गिऱ्हाइकांस चांगली शिकार सांपडली. ही भोळीभावडी व भजनांत निमग्न असलेली मूर्ति पाहून त्यांनीं त्यास बुचाडण्यास आरंभ केला. गिऱ्हाइक मागेल तो भाव, व सांगेल तसें माप, देईल तितके पैसे, उधार मागितलें तर उधार, हात घालून नेलें तर

त्यासही हरकत नाहीं, अशा तऱ्हेची विक्री करून **तुकाराम**बुवा मोकळे झाले. त्यांचे सोबती व्यापारी ही तऱ्हा दुरून पहात होते व अशानें त्यांचें नुकसान होईल हें ते जाणत होते; परंतु त्यांनीं त्यांस कोणतीही मदत केली नाहीं किंवा गिऱ्हाइकांस हात मारण्याची मनाई केली नाहीं. सर्वांचा माल खलास झाल्यावर त्यांनी त्यांनी विशेष करून आपले पैसे गांठीस बांधिले, व परत घरची वाट धरिली. **तुकाराम**बुवांही हातीं आले तितके पैसे घेऊन घरीं यावयास निघाले. वाटेनें त्यांस एक ठक भेटला व त्यानें सोन्याचीं म्हणून मुलाम्याचीं कडीं त्यांस देऊन त्यांच्याजवळ आलेले मिळकतीचे सर्व पैसे उपटून पोबारा केला. त्या खेपेस व **तुकाराम**बुवांचे तीन बैल गुराचा रोग होऊन मेले व ते राहिलेला बैल घेऊन घरीं परत आले. **तुकाराम**बुवांचे सोबत्यांनीं '**तुकाराम**बुवांनीं हयगय करून बैल मारले' म्हणून गांवांत अगोदरच सांगितलें होतें, त्यांत त्यांस ठकानें दिलेलीं कडीं सोन्याचीं नसून पितळेचीं आहेत, हें जेव्हां लोकांस समजलें, तेव्हां तर ते त्यांचा फारच उपहास करूं लागले. हा पक्का गयाळी आहे, याला धंदा करितां येत नाहीं, याला सोनें पितळ वगैरे कांहीं समजत नाहीं, हा अगदीं निरुपयोगी मनुष्य आहे, याच्यानें आपले बैल देखील संभाळवले गेले नाहींत. याच्या नादीं लागून आपण आपलें नुकसान करून घेण्यांत काय अर्थ आहे? याची दया करून आपल्यालाही याच्यासारखें भुक्कीस का मिळावयाचें आहे? असें नाना प्रकारें लोक त्यांना बोलूं लागले. **अवलाई** ऊर्फ **जिजाई** स्वभावानें कडक होती, परंतु अद्यापपर्यंत ती **तुकाराम**बुवांस टाकून बोलली नव्हती. तिला **तुकाराम**बुवांचे असले हे पालथे रोजगार व संसाराकडे दुर्लक्ष्य वरचेवर आढळून आल्यामुळें आणि या खेपेस ते सर्वच घालवून आल्यामुळें ती थोडें टाकून बोलली. त्यांस लागलेल्या नामस्मरणाच्या व भजनाच्या वेडाबद्दल तिनें इतर लोकांप्रमाणेंच त्यांची फजिती केली. लोकांच्या व बायकोच्या मर्मभेदक बोलण्यांनीं तरी **तुकाराम**बुवांनीं शुद्धीवर येऊन धंद्यांत व संसारांत मन घालावयाचें होतें, पण तसें त्यांच्याकडून घडलें नाहीं. आपल्याकडून झालेल्या चुकांबद्दल लोक व बायको देखील बोलली. त्याबद्दल त्यांना मुळींच कांहीं विषाद अथवा वाईट वाटलें नाहीं. शिवाय प्रांजळपणानें आपली चूक कबूल करून झालेली खरी हकीकत नम्रपणानें सांगण्यास ते बिलकुल कचरले नाहींत. लोकांनीं हा देवाचा नाद सोडून प्रपंचाकडे व धंद्याकडे लक्ष देण्यास पुष्कळ प्रकारें त्यांना सांगितलें, परंतु त्यांत लीन झालेलें त्यांचें मन पालटलें नाहीं. **तुकाराम**बुवांची ही वृत्ति पाहून घरांत त्यांच्या बायकोमाणसांस फार वाईट वाटलें व आतां हा प्रपंचाचा गाडा कसा चालेल त्याबद्दल त्यांस मोठी काळजी पडली. **तुकाराम**बुवांचें घरांतलें होतें नव्हतें तेवढें जाऊन केव्हांच दिवाळें निघालें होतें; त्यानंतरही त्यांच्या आप्तेष्टांनीं त्यांची कींव करून त्यांस प्रपंचाच्या खर्चासाठीं व धंद्यासाठीं जें द्रव्य दिलें होतें त्याचीही त्यांनीं वर सांगितल्याप्रमाणें पालथे धंदे करून वाट लावून टाकिली होती. त्यामुळें त्यांची कोणाजवळही पत राहिली नव्हती. घरांत अन्नपाण्याची व चिरगुट पांघरुणाची देखील पंचाईत पडूं लागली. शेजारीपाजारी उसनेंपासनें देण्यास देखील नाखूष करूं लागले.

तेव्हां **जिजाईस** फारच काळजी पडली. **तुकाराम**बुवांची जरी पत गेली होती, तरी **जिजाई** श्रीमंताची लेक असल्यामुळें लोकांत तिची पत कायम होती. आपल्या नांवावर एकदां पैसे काढून **तुकाराम**बुवांस द्यावे व चार चांगल्या उद्म्यांच्या संगतीनें त्यांस धंद्यास पाठवावें, असें **जिजाई**च्या मनांत येऊन तिनें आपल्या नांवानें सावकारास रोखा लिहून देऊन २०० रु. कर्जाऊ आणिले व **तुकाराम**बुवांस पूर्वीप्रमाणें ह्या रुपयांचीही वाट लावूं नका, बरोबरचे सोबती सांगतील तसें ऐका, त्यांच्या सल्ल्यानें धंदा करा व मिळतील ते पैसे जपून घरीं आणा; असें बजावून सांगून त्यांच्या हवालीं केले. **तुकाराम**बुवांनीं त्या रुपयांचें आपल्या सोबत्यांबरोबर मीठ खरेदी करून ते घाटावर त्यांच्या सोबतीनें फेरी करावयास गेले. ह्या खेपेचीं त्यांचीं सोबतीचीं माणसें सुस्वभावाचीं व त्यांचें हित पाहणारीं होतीं. त्यांनीं त्यास आपल्याबरोबर नेऊन त्यांचेंही मीठ खपविलें. त्यांच्या मदतीनें त्यांस सवाई नफा झाला. मिळालेली रक्कम घेऊन **तुकाराम**बुवा आपल्या सोबत्यांसह परत घरीं येत असतां, वाटेंत त्यांच्या कर्मानें त्यास गांठलेंच. शिपायाच्या ताब्यांत बायकोसह असलेला एक गरीब उघडा बोडका ब्राह्मण त्या मंडळीकडे आला व आपण कर्जामुळें बंदींत आहों आणि तें कर्ज भिक्षा मागून फेडावें ह्या हेतूनें गांवोगांव फिरत आहों, अशी हृदयद्रावक शब्दांनीं आपली हकीकत सांगून तो त्यांच्यापाशीं भिक्षा मागूं लागला. **तुकाराम**बुवांबरोबरची मंडळी पक्की उद्मी नजरेची होती. त्यांनीं पै पैसा देऊन त्याची बोळवण केली. कित्येकांनीं तर त्यास झिडकारूनही लाविलें, पण आमच्या **तुकाराम** महाराजांचें अंतःकरण मात्र त्याच्याविषयीं पूर्णपणें द्रवलें. त्यांनीं आपल्याजवळ मीठ विक्रीचे असलेले अडीचशेंचे अडीचशें रुपये त्याच्या पदरांत घालून त्यास एकदमच ऋणमुक्त केलें व आपणही वाटेनें पैसे संभाळण्याच्या काळजींतून मुक्त झाले.

घरीं आल्यावर ही हकीगत **जिजाईस** व गांवच्या लोकांस कळली तेव्हां **तुकाराम**बुवांचा जो उपहास केला तो काय सांगावा? जो तो **तुकाराम**बुवांस गयाळी समजून छीः थूः करूं लागला! अर्थात पुढें त्यांस कोणी पैशाची मदत करीना. ह्यामुळें कुटुंबाचे फार हाल होऊं लागले. तशांत त्या सालीं दुष्काळही पडला; मग त्यांच्या बायकामुलांच्या व इतर माणसांच्या हालअपेष्टेस काय विचारावयाचें? दोनदोन चारचार दिवस त्यांना कडाके पडूं लागले व गुरें चाऱ्यावांचून मेलीं, धारण होतां होतां शेरावर आली, ज्याचीं माणसें त्याला जड झालीं; अशा प्रसंगीं कोण कोणाची दया करितो. **तुकाराम**बुवा आपल्या बायका माणसांची ही दुःखकारक स्थिति पाहून गांवांत दीनवाणीनें 'या माणसांची कांहीं तरी दया करा' ह्मणून याचना करीत, पण त्यांची रोजची गरज कोण भागवितो. शेवटीं त्यांची थोरली बायको **रखुमाबाई** अन्न अन्न करीत मेली व तिचा एकुलता एक व **तुकाराम**बुवांचा आवडता मुलगा **संतोबा**ही मागाहून लवकरच उपासमारीनें वारला. याप्रमाणें **तुकाराम**बुवास पुन्हा कसोटीस लावणारे संसारांतील बिकट प्रसंग व दुःखाचे डोंगर एकामागून एक कोसळून त्यांच्या दुःखास पारावार राहिला नाहीं. पुढें संसार सुधारेल ही आशा राहिली नाहीं.

तुकारामबुवांची उमेद अगदीं खचली. जो धंदा करावा त्यांत आपल्या अंगच्या चांगल्यां अथवा वाईट गुणांमुळें बूड येते. लोकांत छीः थूः झाली. कोणी बरें पाहीनासें झालें. पूर्वी चांगले दिवस होते तेव्हां जे आपल्यास मानीत व नावाजीत होते, तेच आतां आपल्याला हलकट समजून आपली निंदा करूं लागले. आपण धंदारोजगाराच्या उपयोगाचे राहिलों नाहीं, कुटुंबपोषण आपल्याच्यानें होईनासें झालें व जगांत आपण तिरस्कारास पात्र झालों; अशा तऱ्हेचे दुःखद विचार त्यांच्या मनांत वरचेवर येऊन त्यांचें मन संसारास अगदीं विटलें. ह्यावेळीं त्यांचें वय केवळ २१ वर्षांचें होतें, हें वय म्हणजे पोर वयच. अशा वयांत वरच्यासारखे दुःखाचे प्रसंग, हालअपेष्टा कुटुंबपोषणाची भयंकर काळजी व लौकिकांत छीः थूः, कोणाचा आधार नाहीं; अशी स्थिति झाली म्हणजे कोणाचेंही मनांत हा संसाराचा व्याप सोडून कोठें तरी निघून जावें असें येणें स्वाभाविक आहे. **तुकाराम** महाराज ह्या संसार यातनांनीं त्रासून परमार्थ साधण्याच्या विचारास लागले. जों जों संसारांत सुख शोधावयास जावें तों तों दुःखाचे डोंगरच **तुकाराम**बुवांच्या अनुभवास येऊं लागले, तेव्हां ईश्वरप्राप्तीचें साधन करून ह्या जन्माचें सार्थक तरी करून घ्यावें हा निश्चय **तुकाराम**बुवांच्या अंतःकरणांत बाणला जाऊन परमार्थ साधनास योग्य स्थळ जो एकांतवास तो त्यांनीं स्वीकारिला. **तुकाराम** महाराजांस भर उमेदीच्या वयांत संसाराविषयीं अशी विरक्ति यावी ही गोष्ट सामान्य मनुष्यास चमत्कारिक व आश्चर्य वाटण्यासारखी आहे. कारण संसारयातनांनीं अतिशय पीडित होऊन वारंवार संसाराच्या असारतेविषयीं व आपल्या अस्तित्वाच्या अशाश्वतीविषयीं वैराग्यपर उद्गार काढून व साधुसंतांचीं वचनें सद्गदित अंतःकरणानें दाखल्यासाठीं म्हणून परमार्थ साधनाची महति दुसऱ्याला सांगणारी अनुभविक वृद्ध माणसें देखील पुन्हा मोह पावून संसारांत गुलामाप्रमाणें राबतांना नेहमीं दृष्टीस पडतात. परंतु **तुकाराम** महाराज सामान्य मनुष्यांपैकीं नव्हते. ते एक अद्वितीय पुरुष होते. त्यांना थोड्या अवकाशांत जगाचा व संसाराचा जो अनुभव आला, त्यापासून होणारा बोध त्यांच्या मनानें पूर्णपणानें घेतला. ह्या जगांत संसारसुखासाठीं झगडणें व्यर्थ आहे. आपल्यास संसारांत सुख प्राप्त व्हावें म्हणून आपण नाना तऱ्हेचे धंदे करितों व ते करितांना आपली दृष्टि जितका अधिक नफा मिळवेल तितका मिळविण्याकडे असते. कोणत्याही धंद्यांत अशा तऱ्हेनें नफा मिळविण्याची हांव धरिली म्हणजे शेंकडों अज्ञान, दुर्बळ, गरजू भोळ्या लोकांना तारल्याचें किंवा फसविल्याचें पातक आपल्यास लागून आपण त्यास अप्रत्यक्षरीतीनें विपत्तींत लोटण्यास कारण होतों. त्यांनीं उरी फुटेपर्यंत श्रम करावे व आपण आयतें दुकान मांडून त्यांना जरूर लागणाऱ्या वस्तूच हवी ती किंमत घेऊन त्यांच्या निढळाच्या घामाचा पैसा हिरावून घ्यावा, पैसा हातांत नसल्यास त्यांच्या गरजांकडे लक्ष्य न देतां, त्यांचे विपत्तिविलाप खुशालपणें ऐकून त्यांस उपाशीं मरूं द्यावें. त्यांची पैशावांचून कधीं गरज करूं नये. केल्यास दिढीच्या नफ्याच्या आशेनें करावी व पैशासाठीं त्यांच्या दारांत धरणें देऊन त्यांच्या गरिबीविषयीं व लाचारीविषयीं बेपरवा होऊन त्यास

संकटांत पाडावें. त्याची अब्रू घ्यावी, त्यास नानाप्रकारें छळावें, व शेवटीं त्याच्या कुटुंबांतील माणसांस उपाशीं मारून निर्दयपणानें आपले पैसे वसूल करून घ्यावे, कोणाची भीड धरूं नये, कोणावर दया करूं नये, कोणाच्या कामीं पडूं नये, सारें लक्ष्य कायतें आपला व आपल्या कुटुंबांतील माणसांचा चरितार्थ चैनीनें व विशेष मेहनत न करितां चालावा याकडे द्यावें, आणि अशा दक्षतेनें व निर्भिडपणानें धंदा न करणाऱ्याची जगांत छीःथू व्हावी, त्यास लोकांनीं गबाळी समजावें, त्याच्यावर प्रसंग गुजरला असतां त्यास कोणी सहाय्य करूं नये. इतकेंच नाहीं तर त्याच्या कुटुंबांतील माणसें अन्न अन्न करीत मेलीं तरी त्याविषयीं कोणी पर्वा करूं नये. अशा तऱ्हेची जगांतील व्यवहाराची तऱ्हा तुकारामबुवांच्या उदारधर्मबुद्धीस अगदीं पसंत नसल्यामुळें ज्या संसारासाठीं शेंकडों गरीब, निरपराधी, व अज्ञान लोकांचे गरिबांचे संसार धुळीस मिळवावे लागतात, तो संसारच कायमचा नको अशी तुकाराम-बुवांस पक्की उपरति झाल्यास नवल नाहीं. शिवाय आपल्या आईबापांच्या सहवासांत तुकाराम महाराजांस विठ्ठलनामस्मरणाची व भजनाची गोडी लागली होती व ज्ञानदेव, नामदेव वगैरे साधु पुरुषांचे अभंग व पदें वगैरे त्यास पाठ असून त्यांतील जगांतील वर्णन व त्यांनीं आपल्या कवितेंतून वर्णन केलेली जगाची रहाटी, संसाराचें मिथ्यत्व वगैरे विषयाचें रहस्य त्यांच्या अंतःकरणांत चांगलें ठसलें होतें, त्यामुळें संसाराविषयीं अत्यंत उदासीन होऊन परमार्थाकडे त्यांच्या मनाची प्रवृत्ति झाली. जगांतील लबाडीचे लफंगीचे व स्वार्थाचे व्यवहार पुष्कळांना समजून त्यांना आपल्या हातून जुलूम, अन्याय व पाप होत आहे हें कळतें व हे सर्व प्रकार अशाश्वत संसाराची मांडणी व धारणी करण्या-करितां समजून उमजून करावे लागतात, परंतु त्याविषयीं मनाला त्रास वाटून किंवा वाईट वाटून कोणीही ते प्रकार करण्याचे सोडून संसाराविषयीं उदासीन होत नाहींत; म्हणून तुकाराम महाराजास आम्ही अद्वितीय पुरुष म्हटलें आहे. असो. वर सांगितल्याप्रमाणें तुकारामबुवांस संसाराविषयीं अत्यंत उपरति होऊन ते ईश्वरचिंतन करण्यासाठीं एकांतवासांत निघून गेले, हें पूर्वी सांगि-तलेंच आहे. ते बरेच दिवस घरीं आले नाहींत व त्यांचा कोठें पत्ताही लागला नाहीं म्हणून त्यांचा धाकटा बंधु कान्होबा त्यांच्या शोधार्थ निघाला. त्यास सात दिवसांनीं तुकाराम महाराज भामनाथ नांवाच्या देहूहून तीन चार कोसां वर असलेल्या डोंगरावर विरक्त स्थितीमध्यें आढळले. कान्होबानें अत्यंत त्यांची करुणा भाकून त्यास देहूस आणिलें. परंतु गांवांत न जातां ते गांवा-बाहेर इंद्रायणीचे कांठीं राहिले व तेथें स्नान, ईश्वरचिंतन वगैरे करून दोघां भावांनीं तेथेंच सात दिवसांचा उपवास सोडला. तो झाल्यावर त्यांच्यामध्यें परस्पर-वासंबंधानें बोलणें झालें, त्यावेळीं आपल्यास हा निःसार संसार करणें नाहीं असें तुकाराम महाराजांनीं सांगितलें व [illegible] वगैरेचीं सर्व त्यांनीं मागितलीं. तीं हातीं येतांच तुकारामबुवा कान्होबास म्हणाले कीं, हीं दुःखाला कारण आहेत. ह्याकरितां हीं मी इंद्रायणींत बुडवितों. कान्होबानें विनंति केली कीं, महाराज, आपण संसाराविषयीं विरक्त बनलां, परंतु

माझ्यामागें पोरेंबाळें आहेत मीं कसें करावें ? यावर तुकारामबुवांनीं त्या सर्व पत्रांचे दोन हिस्से केले व एक कान्होबास देऊन म्हणाले, माझ्या हिश्शाचीं मी नदींत बुडवितों, कारण मला त्यांची जरूर नाहीं. तुझ्या हिश्शाचीं तूं घे व खुशाल वेगळा संसार कर. कान्होबानें तें मान्य केलें व घराबाहेर निघून गेला.

ह्याप्रमाणें तुकाराम महाराजांनीं अगदीं उघडपणें आपल्या भावाची व त्याबरोबरच आपल्या संसाराच्या काळजीची फारकत करून त्यांनीं परमार्थाचा मार्ग धरिला, यापुढें सकाळीं इंद्रायणींत स्नान करून आपल्या वडिलांनीं बांधलेल्या देवळांतील विठोबाची पूजा करावी, देहूच्या पश्चिमेस तीन कोसांवर भांडार डोंगर आहे. त्यावर जाऊन एकांतांत ईश्वरचिंतन करावें व रात्रीं देवळांत येऊन मोठ्या प्रेमानें भजन करावें. एकादशीला उपवास करून कोणी साधुसंत भेटल्यास त्यांच्या संगतीं रात्रीं भजन करून जागरण करावें व द्वादशीस त्यांना पंक्तीला घेऊन पारणें सोडावें, ह्याप्रमाणें त्यांनीं नित्य क्रम ठेविला. त्यांनीं कुटुंबपोषणाची काळजी जरी सोडिली होती तरी बायकोचा त्याग केला नव्हता. जिजाई स्वभावानें जरी कडक बायको होती तरी तुकाराम महाराजांवर तिचें पतिव्रतेप्रमाणें लक्ष्य व प्रेम होतें. तुकारामबुवांनीं घरप्रपंचाकडे पाहण्याचें व उदीमधंदा करण्याचें सोडून पंढरीनाथाचें चिंतन व सर्वकाळ विठ्ठल नामस्मरणांत ते निमग्न राहूं लागले. ह्याबद्दल ती त्यांस अन्नान्नाच्या ददातीमुळें त्रासून कधीं कधीं टाकून बोलत असे; पण तुकाराम महाराजांस जेऊं घातल्यावांचून ती अन्न ग्रहण करीत नसे. तुकारामबुवा भांडार डोंगरावर जाऊन बसत असत, तरी जिजाई इकडून तिकडून कांहीं तरी करून वेळेला भाजी भाकरी तयार करून गांवापासून तीन कोस चालत जाऊन त्यांस अन्न पोंचवी. तुकाराम महाराजांनीं अन्नाहार केला म्हणजे तिचें मन समाधान पावून ती राहिलेला प्रसाद ग्रहण करी. तिची आपल्याठिकाणीं ही निष्ठा पाहून तुकारामबुवा तिच्या जहाल बोलण्याकडे मुळींच लक्ष्य न देतां तिच्याशीं प्रीतीनें वागत असत. तुकाराम महाराज व जिजाई ह्या जोडप्याचा शेवटपर्यंत बिघाड झाला नाहीं हें त्यांच्या पुढील चरित्रावरून आढळून येईलच. असो.

भांडारडोंगरावर एकांतांत ईश्वरचिंतन करण्याचा क्रम चालला असतां तुकाराम महाराजांस धर्मग्रंथांचें परिशीलन व मनन करण्याची इच्छा झाली. त्यांनीं ज्ञानदेव नामदेव कबीर वगैरे साधुपुरुषांच्या अभंगांचीं व पदांचीं बाडें ज्ञानेश्वरी, योगवासिष्ठ, अमृतानुभव वगैरे अध्यात्मपर ग्रंथ, व एकनाथी भागवत भावार्थ रामायण वगैरे पुराणें मिळविलीं व त्यांचें एकसारखें पठण व मनन चालविलें. त्यांनीं भक्तिपूर्वक ह्या ग्रंथांचीं पारायणें केलीं. त्यांची स्मरणशक्ति तीव्र असल्यामुळें व एकांतांत एकाग्रतेनें त्यांचें पठण झाल्यामुळें त्यांस ह्या ग्रंथांतील, अभंग, पदें, ओव्या व कथानकें तोंडपाठ झालीं. पुढें त्यांस कीर्तन करण्याची स्फूर्ति झाली. कीर्तन करण्याचा गुण संपादन करण्यासाठीं त्यांनीं साधुसंतांचें कीर्तन चाललें असतां, मागें उभे राहून ध्रुपद धरावें, कीर्तनकारांची निरूपण सांगण्याची पद्धति व शैली लक्ष्यांत ठेवावी व त्यांचा प्रसाद

व्हावा म्हणून त्यांची सेवा करावी असा क्रम चालविला. भजनाविषयीं व कीर्तनाविषयीं त्यांचा प्रेमभाव अतिशय असे. कीर्तनाच्या जागेंत संतजनांना [illegible] होऊं नयेत म्हणून तेथले खडे त्यांनीं आपल्या हातांनीं काढून टाकावे. कीर्तनप्रसंगास मंडळी बसली म्हणजे त्यांनीं जोड्याजवळ ते संभाळीत बसावें. कीर्तनकारास घाम आला असतां त्यास वारा घालावा, कीर्तनांत प्रेमभरानें नाचावें, कीर्तन आटोपलें म्हणजे कीर्तनकार व साधुसंत खालीं बसले म्हणजे त्यांचे पाय दाबावे, आणि हें करितांना त्यांनीं बिलकुल लाजूं नये देहूंतील विठोबाचें देऊळ त्यांचे सातवे पूर्वज विश्वंभरबुवा यांनीं बांधिलें होतें हें मागें सांगितलेंच आहे, तें मोडकळीस आलें होतें, भजनास व कीर्तनास तेथें मंडळी जमत होती त्यास तें पुरण्यासारखें नव्हतें म्हणून त्याचा जीर्णोद्धार करावा असें तुकारामबुवांच्या मनांत आलें व त्याबद्दल गांवकऱ्याजवळ गोष्ट काढून त्यांनीं खटपट चालविली. हें जीर्णोद्धाराचें काम एका अलौकिक चमत्कारानें पुरें झालें असें महिपतीनें भक्तलीलामृत ग्रंथांत वर्णन केलें आहे. तो चमत्कार असा:—

तुकारामबुवांनीं संसार चालविण्यासाठीं कोणताही धंदा करण्याचें सोडून दिलें होतें हें मागें सांगितलेंच आहे, तथापि भगवद्भक्तींत व्यत्यय न येतां एखादा अनायासें धंदा करण्यास मिळाला असतां तो करण्यास ते तयार असत. त्यांच्या [illegible] एका कुणब्याचें शेत होतें. त्या शेतांतील ज्वारी राखणीस आली होती. परंतु त्या शेताच्या मालकास निकडीच्या कामासाठीं बाहेरगांवीं जावयाचें होतें. म्हणून त्यानें तुकारामबुवांस आपलें शेत राखण्याविषयीं गोष्ट काढिली व त्यांस त्याबद्दल अर्धा मण दाणे देऊं केलें. तुकारामबुवांनीं ती गोष्ट मान्य केल्यावर त्या कुणब्यानें आपल्या शेतांत तुकारामबुवांस राखणासाठीं एक उंच माळा बांधून दिला व त्यावर बसून [illegible] व पांखरेंही राखीत जा, म्हणून आज्ञा केली. ती तुकारामबुवांनीं इतक्या इमानानें व प्रामाणिकपणानें पाळिली कीं, रात्रंदिवस ते तेथून हलले नाहींत. जिजाईनें आपल्या नवऱ्यानें काम पतकरिलें म्हणून [illegible] व ती त्यांस तेथेंच भाकरी आणून पोंचवी. तुकारामबुवा [illegible] माळ्यावर स्वस्थ बसून रहात व इकडे पांखरें खुशालपणें [illegible] ईश्वराचे जीव पोटापुरतें खाण्यासाठीं येथें येतात व [illegible], ते संग्रह करण्यासाठीं बरोबर कांहीं नेत नाहींत. [illegible] पोटावर मारणें योग्य नाहीं असें मनांत आणून तुकारामबुवा त्यांना हाकलीत नसत. याप्रमाणें शेताची राखण [illegible] शेताचा मालक मुदतीप्रमाणें घरीं आला व शेतांत [illegible] त्यावर [illegible] धान्याचा थवा बसला आहे व तुकारामबुवा [illegible] भजन करीत आहेत. हें पाहून कुणब्यास [illegible] आणि तुकारामबुवांवर [illegible] आणून त्यास नानाप्रकारें टाकून बोलला. तुकारामबुवा [illegible] ऐकत उभे राहिले. शेवटीं कुणब्यानें तुकारामबुवांस ओढीत व [illegible] करीत पाटील कुळकर्ण्यांकडे

नेलें व आपली फिर्याद त्यांचे पुढें मांडली. ती ऐकून त्यांनीं तडजोडीचा मार्ग
काढिला व ह्या शेतांत किती धान्य झालें असतें तें कुणब्यास विचारून **तुका-**
रामबुवा जवळून त्यास दोन खंडी धान्याचा रोखा लिहून देवविला. पुढें कांहीं
दिवसांनीं धान्य काढणीला आलें, तेव्हां त्यांतील माल आतां **तुकाराम**बुवांचा
झाला होता, म्हणून पाटील कुळकर्णी वगैरे, **तुकाराम**बुवा गरीब, कुणबी त्यांस दाद
द्यावयाचा नाहीं असें समजून स्वतः तो पाहून **तुकाराम** महाराजांचे
पदरांत टाकण्याची व्यवस्था करण्याकरितां गेले व पाहतात तों त्या
शेतांत नेहमींपेक्षां पुष्कळच पीक झालेलें असून पांखरांनीं फारच थोडें
नुकसान केलें आहे. पाटील कुळकर्ण्यांनीं व गांवकऱ्यांनीं कुणब्यास
बोलावून आणून ताकीद दिली कीं, ह्या शेताची मळणी केल्यानंतर ने-
ख्याप्रमाणें तुझें धान्य तूं घे. कमी आल्यास बाकीच्या धान्याची भरती **तुकाराम**
करील व ज्यास्ती झाल्यास तें **तुकारामा**चें आहे, तें त्याचें त्यास दिलें पाहिजे.
कुणब्यासही त्यावेळीं धान्याचा अजमास समजला व आपण उगीच घाई करून
तुकारामबुवास छळिलें व पाटील कुळकर्ण्यांकडे फिर्याद गेलों असें मनांत
येऊन त्यास पश्चात्ताप झाला. पण आतां इलाज काय! गांवच्या अधिका-
ऱ्यांसमोर लेख होऊन चुकला. त्यास कांहीं बोलतां येईना. मळणी झाल्यावर
राशीवर गांवकऱ्यांनीं आपल्या समोर त्या कुणब्यास कबुलायतीप्रमाणें दोन
खंड्या धान्य देवविलें व बाकी बरेंच राहिलेलें धान्य **तुकाराम**बुवांस घेऊन
जाण्यास सांगितलें. परंतु **तुकाराम**बुवा तें धान्य कांहीं नेईनात, तेव्हां
पाटील कुळकर्ण्यांनीं व गांवकऱ्यांनीं तें धान्य **तुकाराम**बुवांच्या वतीनें आ-
पल्या ताब्यांत ठेविलें. पुढें विठोबाच्या देवळाच्या जीर्णोद्धाराचें जेव्हां काम
निघालें तेव्हां गांवकऱ्यांच्या वर्गणीबरोबर **तुकाराम**बुवांनीं तें धान्यही खर्ची
घातलें. हें काम चाललें असतांना ते चिखल माती, दगड धोंडा वगैरे देण्यास
स्वतां राबले. ह्याप्रमाणें **तुकाराम**बुवांनीं आपल्या वाडवडिलांनीं बांधिलेल्या
देवळाचा जीर्णोद्धार केला.

वर सांगितल्याप्रमाणें शेत राखणीचें काम व देवळाच्या जिर्णोद्धाराचें मह-
त्कृत्य संपल्यानंतर **तुकाराम**बुवांनीं भांडार डोंगरावर एकांतांत देवचिंतन व
ग्रंथपठण हा आपला क्रम पुन्हा आरंभिला. **जिजाई** नित्यक्रमाप्रमाणें
भाकर व भोपळाभर पाणी त्यांस तेथें पोंचवीत असे. एके दिवशीं जेवण
घेऊन जात असतां, एक मोठा करवंदीचा कांटा तिच्या पायांत इतक्या
जोरानें बोचला कीं तो तळव्यांतून वर निघाला. तों भर दोन प्रहरची वेळ
असून कडक उन्ह पडलें होतें. ह्यामुळें तिचा जीव कासावीस होऊन ती मूर्छित
झाली. तिच्या डोक्यावरची भाकरीची पाटी एकीकडे पडली व भोपळ्यांतील
पाणी सांडून जाऊन तो एकीकडे पडला. कांहीं वेळानें शुद्धीवर येऊन हातांत पाय
धरून ती कांट्याच्या वेदनानें विव्हळत इकडे तिकडे पाहूं लागली. इतक्यांत
एक म्हातारा ब्राह्मण समोरून तिच्या जवळ आला व तिची ती अवस्था
पाहून त्यास तिची दया आली, त्यानें तीस इजा न होऊं देतां तिच्या पाया-
तील कांटा काढिला व तीस दुःखांतून मोकळें केलें. पायांतला कांटा निघून

तिला येरे म्हणण्याबरोबर, प्रथम 'माझा तुकया उपाशी असेल, आज फार उशीर झाला' हे उद्गार तिच्या तोंडातून बाहेर पडले. तिनें इकडे तिकडे अस्ताव्यस्त पडलेल्या भाकरी गोळा करून पाटीत भरल्या व पाण्याचा भोपळा हातीं घेऊन पाणी शोधीत पुढें चालू लागली, भांडार डोंगरावर पाणी कोठें आहे हें तिला माहीत नसल्यामुळें ती मोठ्या काळजींत होती. तोंच पुढें दृष्टीस पडलेल्या खडकांत एका पाण्याचें लहानसें टांकें दृष्टीस पडलें. त्यांतून पाणी भरून घेऊन ती तुकारामबुवा बसत होते त्या जागीं गेली. तुकारामबुवांनीं पाहिल्या बरोबर तिचा तापट स्वभाव जाणून होऊन तिनें त्यांच्यावर तोंड सोडिलें, ते इतक्या दूर जाऊन बसतात व आपल्यास भाकरी पोंचविण्याला ताप होतो. आज आपल्यास काटा बोंचला, त्यामुळें आपला जीव कासाविस झाला वगैरे इकडील मधून मधून सांगत असतां ती त्यांच्यावर तोंडसुख प्रहार करूं लागली. तुकारामबुवांनीं तें सर्व निमुटपणें ऐकून घेऊन भाकरी खाली व जिजाई रागारागानेंच तेथून परत घरीं निघून गेली. आपल्या पोटाचा भार जिजाईवर पडून शिवाय आपल्याला अन्न पोंचविण्यासाठीं तिला ताप होतो हें लक्षांत आणून व ईश्वर सर्वत्र भरला आहे, त्याची प्राप्ति करून घेण्यासाठीं इतक्या लांब अडचणींत येऊन बसण्याचें कांहीं कारण नाहीं असा विचार करून ते गांवांत आले.

भांडार डोंगरावर एकांतांत ईश्वरचिंतन व साधुसंतांच्या ग्रंथांचा नित्यनैमित्तिक अभ्यास चालू असल्यामुळें तुकारामबुवांच्या वृत्तींत अतिशय फरक पडला. त्यांस मनुष्य, पशु, पक्षी, किडा मुंगी वगैरे सर्वांत ईश्वराचें दिव्य स्वरूप दिसूं लागलें व त्यांच्यामधील भेदाभेद भाव नाहींसा झाला. मतलबी, लबाड, ढोंगी वगैरे लोकांची निवड करून त्यांशीं तसें वागणें हें व्यवहारज्ञान त्यांस राहिलें नाहीं मानापमान, कोणाचें रागें भरणें, अपशब्द बोलणें वगैरे बद्दल त्यांना कांहीं वाईट वाटेनासें झालें. रात्रंदिवस तोंडानें विठ्ठलाचें नामस्मरण, भजनकीर्तनादि सेवा, कोणाच्याही उपयोगीं पडणें हा त्यांचा गांवांत आल्यापासून नित्यक्रम झाला होता. गांवांत कोणी साधुसंत आले असतां मोठ्या प्रेमानें ते त्यांस साष्टांग दंडवत घालून त्यांचें पादप्रक्षालन करीत व त्यांच्या पायांचें तीर्थ आनंदानें प्राशन करीत. कीर्तनाच्या वेळीं जोडे दारांत असत व लोक जाऊं लागले म्हणजे ते ज्यांचा त्यांचा जोडा नम्रपणें त्यांच्या पुढें करीत. कीर्तनाची जागा आपल्या हातानीं झाडून लोटून साफ करीत व कीर्तनाचे वेळीं मशाल धरीत. दिवसांत ते मार्गीं धुळवडी धरीत व जेथें जेथें कळणावर व कांट्यांत अडचणींत असा शब्द कानीं पडत तेथें तेथें त्यांचें हृदय सद्गदित होऊन त्यांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रूंच्या धारा चालत. ग्रामस्थांचें कीर्तनाविषयीं त्यांचें प्रेम असून पुढें कधींही ते आपला देह झिजवीत असत. कोणी थकलेला पांथस्थ आढळला कीं, त्याचें ओझें आपल्या डोक्यावर घेऊन त्याचा हलका भार करीत. कोणी अशक्त वाटसरूस कांहीं कारणामुळें गांवांत जाणें भाग पडल्यास त्यास उतरण्यासाठीं घेऊन किंवा आवडीनें बरोबर जाऊन पोंचवावें. कोणी चालण्याच्या श्रमानें अतिशय थकलेला असल्यास त्यास आपल्या घरीं नेणें व पाणी तापवून त्याचे पाय शेकीत व अंग आपल्या

हातांनीं रगडीत बसावें, रस्त्यानें जाणाऱ्या तान्हेल्या प्रवाशांसाठीं वाटेवर पाण्या-
च्या घागरी भरून ठेवाव्या. कोणी रोगानें पीडित असल्यास त्याच्या औषध-
पाण्याची वगैरे व्यवस्था करावी; ह्याप्रमाणें त्यांनीं आपला क्रम चालविला
होता. तुकारामबुवांचा हा क्रम पाहून गांवांतल्या थट्टेखोर व मत्सरी लोकांनीं
त्यांस आपल्याबरोबर बाजाराला न्यावें व आपला बोजा त्यांच्या डोकीवर
लादून त्यांस परत बरोबर आणावें. कोणी त्यांस पाणी भरावयास, अंगण
ओसरी, सडा सारवण करावयास सांगत व ते तीं कामें मोकळ्या मनानें करीत.
वाण्याच्या येथून कोणास कांहीं जिन्नस लागल्यास त्यानें तुकारामबुवांस
पैसे देऊन आणावयास सांगावें व तुकारामबुवांनीं तो त्यास आनंदानें व प्रेम-
नानें बरोबर आणून द्यावा. रोजखर्चास लागणारें तेल दुसरे संध्याकाळच्या
वेळेस आणावें असा खेडेगांवच्या लोकांचा बहुतेक रिवाज आहे. त्याप्रमाणें एकदां
एक म्हातारी जरख झालेली बाई हातांत तेलाचें भांडें घेऊन बसत उठत व
श्वास टाकीत जात असतांना तुकारामबुवांच्या दृष्टीस पडली. त्यांस तिची
दया येऊन त्यांनीं तिचे पैसे व भांडें घेऊन तिला तेल आणून दिलें. त्याब-
द्दल ती शेजाऱ्यापाजाऱ्याजवळ तुकारामबुवांचे उपकार आठवून त्यांनीं आणून
दिलेलें तेल फार दिवस गेलें, म्हणून भाविकपणानें सांगूं लागली. त्यावरून जो तो
तुकारामबुवांस आपला तेलाचा नळा व पैसे देऊन तेल आणावयास सांगूं
लागला. तुकारामबुवांनीं सर्वांचें काम ऐकावयाचें पतकरलें होतें. ते कोणा-
सही नाहीं म्हणत नसत. ह्यामुळें त्यांच्याजवळ तेलाचे इतके नळे जमत कीं, दोन्ही
हातांत घेतां येतील तितके घेऊन राहिलेले त्यांनीं गळ्यांत देखील अडकवावे व
ज्याचे त्याचें तेल त्यांनीं बिनचूक घेऊन त्यांच्या घरीं पोंचतें करावें. गांवां-
तल्या एखाद्या वेड्याची वाटेल त्यानें वाटेल तशी थट्टा करावी व त्यास वाटेल
तसें काम सांगावें त्याप्रमाणें देहू गांवांतील लोक तुकारामबुवांस समजून
वागवीत असत.

तुकारामबुवांनीं आपल्या समजुतीप्रमाणें आत्मोन्नतीचा अशा तऱ्हेनें प्र-
यत्न चालविला होता, परंतु लोकांना त्याची काय किंमत ? ज्यांच्या अंगीं पूर्ण
विरक्ति बाणली होती, जे मानापमानाच्या लिगाड्यापासून मोकळे आले होते,
ज्यांच्या अंगीं भेदभाव उरला नव्हता, साधुसंताच्या संगतीनें व ज्ञानेश्वर,
नामदेव, एकनाथ वगैरे महापुरुषांच्या ग्रंथपठणानें ज्यांस आध्यात्म ज्ञानाचें
पूर्ण रहस्य समजलें होतें, ज्यांच्या अंगीं भजन व कीर्तन करून इतरांना भग-
द्भक्तीला लावण्याची योग्यता आली होती त्यांची खरी ओळख लोकांस होऊं
नये हें त्यांचेंच दुर्भाग्य समजलें पाहिजे. असो, तुकारामबुवांस ईश्वर-
भक्तीचा निदिध्यास लागल्यामुळें व साधुसंतांचीं वचनें त्यांच्या हृदयांत पूर्ण-
पणें ठसल्यामुळें त्यांस झोंपेमध्यें देखील भजन, कीर्तन, विठोबाची मूर्ति वगैरे
प्रकार दिसावे ह्यांत मोठेंसें नवल नाहीं. एके दिवशीं स्वप्नामध्यें विठोबाची
सांवळी मूर्ति त्यांच्यापुढें उभी राहून 'नामदेवानें शतकोटि अभंग "करण्याची
प्रतिज्ञा केली होती परंतु मृत्यु लोकच्या घडामोडीप्रमाणें चव्याण्णव कोटि एकु-
णपन्नास लक्ष अभंग केल्यानंतर तो समाधिस्त झाला व त्याच्या प्रतिज्ञेप्रमाणें

पांच कोटी एकावन लक्ष अभंग करावयाचे राहिले आहेत ते तूं पुरे कर, मी तुला कवित्वशक्ति व तत्संबंधीं ज्ञान देतों व तूं जें कवितेंत वर्णन करिशील तें प्रसादवचन होईल' अशी आज्ञा करीत आहे, असा दृष्टांत झाला व तेव्हां-पासून त्यांना कवित्व करण्याची स्फूर्ति झाली. ईश्वर कर्ता करविता आहे व त्याच्या सत्तेनें अशक्य गोष्टी देखील शक्य होतील मग आपल्यासारख्या अज्ञान व अप्रबुद्ध माणसाकडून कविता होणें कठीण नाहीं, असा ज्याचा दृढ भाव त्यानें कविता करण्याचें धाडस केलें यांत कांहीं नवल नाहीं. त्यांनीं पहि-ल्यानें बाळक्रीडेचे अभंग केले असें महिपति आपल्या ग्रंथांत सांगतो. पुढें त्यांची कवित्वशक्ति इतकी वाढली कीं, ते अभंग सहज करीत. एकादशीस कीर्तन व हरिजागर करितांना ते आपण केलेले अभंग म्हणत व एखादें आ-ख्यान लाविलें असतां एखादी ग्रंथांतील ओंवी किंवा श्लोक न आठवल्यास ते लागलीच अभंग रचीत. त्यांची शब्दयोजना सोपी, सरळ व बोधप्रद असे भजनास व कीर्तनास येणारी मंडळी **तुकाराम**बुवांचे स्वकृत अभंग ऐकून प्रेमभावानें डुलत असे ह्या त्यांच्या कवित्वशक्तीनें व उपदेश करण्याच्या शैलीनें लोकांचा त्यांच्यावर भाव बसत चालला व दूरदूरचे लोक त्यांच्या कीर्तनास येऊं लागले. ह्याप्रमाणें ज्यांस '**वेडा तुका**' म्हणून उपहासानें म्हणत असत; त्यांचीच लोक कीर्ति गाऊं लागले व त्यांस साधु पुरुष समजून मानूं लागले.

साधुपुरुषांप्रमाणें **तुकाराम**बुवांचे अंगीं, दया, क्षमा, शांति, सहनशीलता, विरक्ति निरपेक्षबुद्धि वगैरे सद्गुण पूर्णपणें वसत होते, ह्मणून त्यांचें तेज लोकां-वर पडलें. त्यांनीं घरदार सोडिलें नव्हतें, याचें कारण असें झालें कीं, मानाप-मान, भेदाभेद, आनंद व खेद, वासना, इंद्रियसुखें इत्यादि संसारांत गुंतवून दुःख देणाऱ्या गोष्टींपासून मन पराङ्मुख झालें ह्मणजे घरदार, बायकापोरें वगैरे सोडण्याचें कांहीं कारण नाहीं अशी त्यांची दृढ समजूत होती. शिवाय **जिजाई**ची त्यांच्या ठिकाणीं निष्ठा व प्रेम हींही त्यांनीं घरदार न सोडण्याचें आणखी एक कारण असावें असें वाटतें. घरदार सोडावयाचें नाहीं तर तें चालविण्याचें साधन पाहणें हें **तुकाराम**बुवांचें कर्तव्य होतें; असा कोणी आक्षेप घेतील, परंतु ज्यांच्या अंतःकरणांत ईश्वरभक्ति पूर्णपणें बाणली गेली व जगाचा उद्धार करण्याची थोर योग्यता ज्यांच्या आंगीं आली त्यांच्या हातून संसारसंबंधीं व्यवसाय सुरळीत होणें शक्यच नाहीं. **तुकाराम**बुवांची साधुवृत्ति बनली व ते निरपेक्षतेनें लोकांत वागूं लागले ह्यामुळें त्यांची कीर्ति झाली; पण त्यामुळेंच **अवली** ऊर्फ **जिजाई** ईस कुटुंब चालविण्याचा अतिशय ताप झाला. लोक त्यांनी त्यांच्या साधुवृत्तीमुळें मानीत होते पण **जिजाई**, तिच्या अंगावर संसाराचा सर्व बोजा पडल्यामुळें त्यांना अवमानीत असे.

जिजाई स्वभावानें रागीट व तापट होती व ती **तुकाराम**बुवांस प्रसंग-विशेषीं दुरुत्तरें बोलत असे, ह्मणून तिला **तुकाराम**बुवांचे चरित्रकार दोष देतात, परंतु ती एक साध्वी होती. ती श्रीमान आईबापांच्या लडिवाळ-पणांत वाढलेली व चांगल्या अब्रूदार व खात्यापित्या घरांत पडलेली असून

जिला घरांतलें काम देखील करण्याची फारशी संवय नव्हती. तिला केवळ नवऱ्यानें धंद्याकडे दुर्लक्ष केल्यामुळें व संसारिकास अयोग्य अशा त्यांच्या दयाळू व उदार स्वभावामुळें विपत्तींत हालअपेष्टा भोगण्याची पाळी आली. पदरीं चार चिल्यांपिल्यांची पाटी असून त्यांच्या पोषणाची, आपल्या पोटाची व नवऱ्याच्याही पोटाची काळजी तिच्यावरच पडली. नवऱ्यानें संसारांतील आपला वाजवी भाग उचलावयाचा तो न उचलतां उलट बायकोनें मोलमजूरी करून व इकडून तिकडून मिळविलेलें धान्य वगैरे भिक्षुस त्यांनीं अतिथी अभ्यागतास द्यावे, त्यांना घरीं जेवावयास आणावें व त्याप्रमाणें तिनें मिळविलेल्या सामुग्रीचा फन्ना उडवावा. (एकदां तर तुकारामबुवांनीं तिचें एकचें एक लुगडें देखील भिकारणीस देऊन टाकलें होतें.) घरांत मिळवून आणावयाचें तर एका बाजूसच राहिलें. उलट घरांत कांहीं राहूं द्यावयाचें नाहीं. वगैरे गोष्टी लक्ष्यांत आणल्या ह्मणजे ती कावून व संतापून जाऊन तुकारामबुवांस टाकून बोलत असल्यास त्यांत तिला दोष देण्यासारखें फारसें कांहीं नाहीं असें आह्मांस वाटतें. स्त्रीजातीचा स्वाभाविकपणेंच संसाराकडे ओढा असतो व आपल्या नवऱ्यानें दोन पैसे मिळवून आणून आपण संसार थाटावा अशी तिची इच्छा असते, परंतु तुकारामबुवांचें वर्तन अगदीं तिच्या इच्छेविरुद्ध असल्यामुळें तिला त्यांचा राग येणें साहजिकच आहे. पुरुष त्यानें मुलांबाळांविषयीं निष्ठुर होऊन त्यांची काळजी वाहणार नाहीं, परंतु स्त्रियानें असें होणें अशक्य आहे. नवऱ्यानें त्यांच्या पोषणाची काळजी न करितां खुशाल निःष्काळजीपणानें ईश्वरभजन करीत फिरावें हें तीला कधींही आवडावयाचें नाहीं. शिवाय शेजारणी आयाबायांचें ' काय ग बया, घरीं पोरंबाळं उपाशी मरतात, नि हा बिचारा निसूर डोंगरावर भजन करीत बसतो. काय बाई हा नवरा ' अशा तऱ्हेचें बोलणें तिच्यामागें लागलें असे, त्यामुळें तिला तुकारामबुवांच्या निःकाळजीपणाबद्दल अधिकच वाईट वाटून, तिचा संताप होत असे. तुकारामबुवांनीं साऱ्या गांवाचीं हलकीं कामें धांवून धांवून करावीं व घरांतलें बिलकूल कांहीं पाहूं नये, हें वर्तनही जिजाईस चीड आणण्यासारखें होतें. तिला जेणेंकरून समाधान वाटेल असें तुकारामबुवांचें संसारसंबंधीं एकही कृत्य नव्हतें. उलट तिचें पित्त खवळून जाईल अशाच गोष्टी त्यांच्या हातून घडत आल्या होत्या. घरांत होतें नव्हतें तेवढें सर्व जाऊन त्यांचें दिवाळें निघालें होतें व त्यांना कोणी पैसा देत नव्हतें. जिजाईनें स्वताच्या जबाबदारीवर दोनशें रुपये कर्ज त्यांना रोजगारधंद्यासाठीं देवविलें होतें त्याचीही बुवांनीं एका ब्राह्मणास दान करून वाट लाविली. हें कृत्य पाहून कोणत्या स्त्रीची सहनशीलवृत्ति ठिकाणावर राहील बरें ? असो. तुकारामबुवांपासून तिला कोणत्याही प्रकारें सुख लागलें नसून उलट दुःख व त्रासच होत असे. असें असून, लोकांनीं त्यांना मजुराप्रमाणें राबविलें असतां ती त्यांना बोलत असे, त्यांच्या पोटापाण्याची काळजी वाहून भांडार डोंगरावर तीन कोस भर उन्हांत चालत जाऊन भाकरी पोंचवीत असे व ते जेवल्यावांचून आपण अन्न ग्रहण करीत नसे. त्याबद्दल तिची

स्तुतीच केली पाहिजे. तिची पतिव्रताधर्माप्रमाणें **तुकाराम**बुवांचे ठिकाणीं निष्ठा व प्रेम होतें ह्याबद्दल शंका घेण्यास जागाच नाहीं, आणि अशा नवऱ्यावर निष्ठा व प्रीति ठेवून राहिल्याबद्दल कोणत्याही स्त्रीची जगांत वाहवाच होणें वाजवी आहे. असें असून ती रागीट, कर्कशा, नवऱ्याला टाकून बोलणारी, दुष्ट, निर्दय, तिच्या ह्या स्वभावामुळेंच **तुकाराम**बुवांना संसाराचा वीट आला वगैरे विधानें करून तिला कमीपणा आणणें ही आमच्या समजुतीप्रमाणें चूक आहे. **तुकाराम**बुवांची ईश्वरभक्ति, त्यांचें ईश्वरविषयक ज्ञान, त्यांची जगदुद्धाराविषयींची थोर कल्पना वगैरे लक्षणें पाहून लोक जसे त्यांना पूज्य मानूं लागले तशी **जिजाई**सारखी पोराबाळांच्या पोषणाच्या, आपल्या पोटाच्या व आपल्या नवऱ्याच्या पोटाच्या काळजीनें त्रासून गेलेली सामान्य स्त्री त्यांना न मानितां त्यांबद्दल त्यांस व त्यांच्या विठ्ठलास दुरुत्तरें बोलत असे, म्हणून तिला नांवें ठेवणें न्यायाचें होईल असें आम्हांस वाटत नाहीं. **जिजाई**संबंधानें इतकेंच पुरें करून आपण आतां प्रकृत विषयाकडे वळूं.

येथपर्यंत **तुकाराम** महाराजांच्या चरित्राचा पूर्वार्ध झाला. यांत त्यांचें कुलवृत्त, संसारसंबंधीं त्यांचें वर्तन व भगवद्भक्तीचा अभ्यासक्रम हीं प्रकरणें मुख्यतः आहेत. येथून पुढें त्यांच्या चरित्राचें उत्तरार्ध लागलें व त्यांत त्यांचें साधुवृत्तीचें वर्तन, साधुसंतांच्या भेटी, त्यांच्या संबंधानें अद्भुत चमत्कार व त्यांचें निर्वाणप्रकरण वगैरे विषय आहेत. असो. **तुकाराम** महाराजांचें भगवद्भक्तीकडे लक्ष्य व त्यांची साधुवृत्ति पाहून लोक त्यांची गणना साधुसंतांमध्यें करूं लागून त्यांस पूज्य मानूं लागले. ब्राह्मण देखील त्यांना नमस्कार करूं लागले, ह्यामुळें कित्येक साधु, गोसावी म्हणविणारांस त्यांच्याविषयीं मत्सर उत्पन्न होऊं लागला. त्यावेळीं **मंबाजी** नांवाचा एक चिंचवडचा राहणारा ब्राह्मण महंत बनून आपल्या शिष्यवर्गासुद्धां मठ करून देहूस रहात असे. त्यास त्याच गांवांत **तुकाराम**बुवांचें महात्म्य वाढत चाललेलें खपेना, म्हणून तो द्वेषबुद्धीनें **तुकाराम**बुवांचा कमी मान करण्याच्या उद्योगास लागला. **मंबाजी**नें देवळाच्या मार्गे कांहीं झाडें लावून त्यांत कांट्याचें कुंपण केलें होतें. त्या कुंपणाच्या कांट्या प्रदक्षिणेच्या मार्गावर आल्या असल्यामुळें, त्यांपासून लोकांस इजा होत असे. एके एकादशीस देवदर्शनाला पुष्कळ यात्रा जमली होती व रात्रींच्या समयास प्रदक्षिणा घालतांना कोणाला इजा होईल ह्या भीतीनें **तुकाराम**बुवांनीं प्रदक्षिणेच्या वाटेवरील कांट्या उपटून टाकल्या. हें वर्तमान **मंबाजी**स समजलें; तेव्हां **तुकाराम**बुवांची मानहानि करण्यास हीच संधि उत्तम आहे असें समजून **मंबाजी** तेथें आला व रागानें लाल होऊन उपटलेल्या कांट्यापैकीं एक कांटी घेऊन त्यानें **तुकाराम**बुवांवर तिचा प्रयोग सुरू केला. मारितां मारितां ती कांटी पिंजली तेव्हां दुसरी, तिसरी ह्याप्रमाणें दहा पांच कांठ्या त्यांनीं **तुकाराम**बुवांच्या आंगावर मोडिल्या. शेवटीं मारितां मारितां आपलेच हात दुखूं लागले तेव्हां त्यानें मारण्याचें बंद केलें. इकडे **तुकाराम**बुवा **मंबाजी**चा हात चालू असतां हूं कीं चूं न करितां स्वस्थपणें उभे राहिले. त्यांनीं तोंडावाटें चकार शब्द

काढिला नाहीं किंवा अंग हालविलें नाहीं. मार पुरा करून **मंबाजी** आपल्या मठांत गेल्यावर **तुकाराम**बुवा देवळांत आले व त्यांनीं घडलेल्या हकीकतीबद्दल सहा अभंग केले. (४३६८–४३७३)

तुकारामबुवांच्या अंगास काटे मोडले होते ते **जिजाईनें** काढून टाकले, आणि तिनें **तुकाराम**बुवांस बरें वाटूं लागल्यावर एकादशी निमित्त हरिजागराची तयारी केली. कीर्तनाचे वेळीं नेहमीं येणारे '**मंबाजी**बुवा महापुरुष' त्यादिवशीं आलेले दिसले नाहींत, म्हणून **तुकाराम**बुवांनीं त्यांस बोलावणें पाठविलें; परंतु त्यांनीं आपलें अंग दुखतें, कीर्तनास येणें होणार नाहीं असें सांगून पाठविलें. त्यावरून **तुकाराम**बुवा त्याच्याकडे गेले व त्यास नमस्कार करून त्याचें अंग रगडीत बसले. शेवटीं 'मी कांट्या उपटल्या नसत्या तर स्वामींस एवढा शीण कां झाला असता, आतां एवढा अपराध माफ करून कीर्तनास चलावें' अशी **तुकाराम**बुवांनीं नम्रपणानें विनंती केल्यावरून **मंबाजी** कीर्तनास गेले! विनाकारण इतका मार खाऊन पुन्हा **मंबाजी**ची क्षमा मागण्याकरितां **तुकाराम**बुवा त्याचेकडे गेले, यावरून त्यांची वृत्ति किती सहनशील व निरभिमान बनली होती आणि कसलेही शरीरकष्ट सोसण्याची त्यांनीं कशी संवय करून घेतली होती, हें वाचकांच्या ध्यानांत येईल. **तुकाराम**बुवांची ही निरभिमान व सहनशील वृत्ति पाहून **मंबाजी** आपल्या मनांत फार ओशाळला व **तुकाराम**बुवा खरोखरच साधु पुरुष आहेत, त्यांची योग्यता मोठी आहे, आपण त्यांस व्यर्थ छळिलें, असा त्यास पश्चात्ताप होऊन तो पुढें **तुकाराम**बुवांस पूज्य मानून नम्रपणानें वागूं लागला. हा वेळपर्यंत बरेच लोक **तुकाराम** महाराजांचे शिष्य झाले होते व त्यांपैकीं कित्येक संसारत्याग करून त्यांच्याजवळच राहिले होते. गंगाधरपंत मवाळ कडूसकर ब्राह्मण व संताजी जगनाडे चाकणचे तेली हे त्यामध्यें प्रमुख होते. मवाळ हे **तुकाराम**बुवांची कविता लिहीत व दोघेही कीर्तनाचे वेळीं टाळ वीणा घेऊन ध्रुपद धरीत असत.

तुकारामबुवांचा भजन कीर्तनाचा याप्रमाणें क्रम चालला असतां एके दिवशीं रात्रीं त्यांस स्वप्न पडले, त्यांत त्यांनीं असें पाहिलें कीं आपण इंद्रायणींत स्नान करून व हातीं तुळशीपत्रें घेऊन देवळांत जात असतां आपल्यास एक ब्राह्मण भेटला, त्यास आपण नित्य सांप्रदायाप्रमाणें तुळशीपत्र देऊन सांष्टांग दंडवत घातला. त्यानें संतुष्ट होऊन आपल्या मस्तकीं हात ठेविला व आपल्यास रामकृष्णमंत्र सांगितला. त्यानें आपण बाबा चैतन्य, आपले वडील केशव चैतन्य व आजे राघव चैतन्य अशी आपुली परंपरा सांगून विठोबाची उपासना व नामस्मरण न सोडण्याविषयीं उपदेश केला. आपण त्यांस घरीं घेऊन जेवून जावें म्हणून विनंति केली व त्यानें 'पावशेर तूप देशील तर येतो' असें सांगितल्यावरून 'ठीक आहे' म्हणून त्यास आपल्या घरीं नेलें. **जिजाईनें** 'कुठला ब्राह्मण नि कुठलें पावशेर तूप आणूं' अशी कुरकूर चालविली, तेव्हां तो निघून गेला. **तुकाराम**बुवा हे स्वप्न पाहून जागे झाले व तेव्हांपासून आपले गुरु 'बाबा चैतन्य' बुवा व त्यांनीं आपल्यास

स्वप्नांत उपदेश केला असें ते मानूं लागले. **तुकाराम**बुवांस ह्या गुरुपदेश माघ शुद्ध १० गुरुवारीं झाला असें भक्तलीलामृतांत सांगितलें आहे, परंतु शक कोठें सांगितला नाहीं. बाबा चैतन्य शके १४९३ प्रजापति नाम संवत्सर वैशाख वद्य १२ स समाधिस्थ झाले व त्या नंतर ३० वर्षांनीं **तुकाराम**बुवांस भेट देऊन गुरुपदेश केला असें निबंधमालेंत (अं० ६४ पृ० २९–३०) सांगितलें आहे. परंतु त्यावरूनही खरा शक निघत नाहीं. असो. **तुकाराम**-बुवांनीं ह्या गोष्टीबद्दल चार अभंग केले आहेत. (४२२६–४२२९.)

ह्या सुमारासच **तुकाराम**बुवांचें चित्त अधिक उदासीन होऊन ते 'बह्मा-ळा'च्या वनांत जाऊन एकांतांत राहिले. पहांटेस इंद्रायणीचे स्नानासाठीं यावें, विठोबाची पूजाअर्चा करावी व परत जंगलांत जावें, असा क्रम त्यांनीं चाल-विला. तेथें कोणी भाकर आणून दिली तर खावी, नाहीं तर उपाशीं रहावें पण घराचें म्हणून त्यांनीं नांव घेऊं नये. असें होण्यास बहुतकरून **जिजा-ई**च कारण असावी असें वाटतें. ह्याप्रमाणें दोन महिने लोटल्यावर एके दिवशीं **जिजाई** पाणी आणण्याकरितां व **तुकाराम**बुवा स्नानाकरितां इंद्रायणीवर आले असतां त्यांची गांठ पडली व त्यांस पाहून **जिजाई**नें त्यांचा पदर धरिला. 'तुम्ही असे दोन दोन महिने घरीं न याल तर आमची वाट काय?' असें **जिजाई** बोलल्यावरून **तुकाराम**बुवांनीं तिला सांगितलें कीं, 'तूं विठोबा-रखुमाईची भक्ति कर म्हणजे तुला अन्नवस्त्राचें कमी पडणार नाहीं.' **जिजाई**नें 'आपल्या इच्छेप्रमाणें करीन आपण आतां घरीं यावें व भजन करीत स्वस्थ बसावें' असें नम्रपणानें विनविल्यावरून **तुकाराम**बुवा घरीं गेले. घरीं आल्यावर तुळशीवृंदावनापाशीं बसून, त्या दिवशीं एकादशी असल्यामुळें **तुकाराम**बुवांनीं **जिजाई**स जवळ बसवून उपदेशपर अकरा अभंग म्हटले. ह्या अभंगांस **तुकाराम**बुवांनीं पूर्णबोध असें नांव दिलें आहे. (४३८२–४३९२) ह्या अभंगांत त्यांनीं **जिजाई**स बोध केला आहे. ह्यांत **तुकाराम**बुवांनीं **जिजाई**स असें सांगितलें आहे कीं, तूं संसाराची काळजी धरूं नको. ईश्वर सर्वांचें चालविणारा समर्थ आहे, तूं आपल्या जन्माचें सार्थक कर. नाशवंताची आशा धरूं नको. ईश्वरप्राप्तीचा प्रयत्न कर. असा उपदेश तिच्या मनावर ठसवून 'उद्ईक द्वादशी आहे, तूं घरांत असेल तें सर्व ब्राह्मणांस अर्पण कर व या संसार बंधनांतून मोकळी हो' असें सांगितलें. नंतर रात्रभर भजन व जागरण झालें. ह्या रात्रीच्या उपदेशानें **जिजाई**ची वृत्ति इतकी पालटली कीं, तिनें दुसरें दिवशीं घरांतील सर्व कांहीं ब्राह्मणांक-डून लुटविलें. ह्याप्रमाणें **जिजाई**च्या मागची संसाराची काळजी दूर करून **तुकाराम**बुवा बाहेर जाऊं लागले तों गांवची महारीण पुढें येऊन 'तुम्ही ब्राह्म-णांस सर्व कांहीं देऊन टाकिलें, मला कांहींच दिलें नाहीं' असें म्हणाली. त्यावरून **जिजाई**चें लुगडें भिंतीशीं वाळत होतें तेंच उचलून त्यांनीं महारणीस देऊन टाकिलें. हें वर्तमान **जिजाई**स समजतांच रात्रींचा उपदेश पार विस-रून तिला संताप झाला, आणि आपण मूर्खपणानें घर धुवून टाकलें ह्याबद्दल पश्चात्ताप होऊन ती खेद करूं लागली.

तुकारामबुवांस तिघी मुली व दोन मुलगे होते. मुलींचीं नांवें **काशी, भागीरथी** व **गंगा** आणि मुलांचीं नांवें **महादेव** व **विठोबा**. ह्या मुली उपवर झाल्या असल्यामुळें **जिजाई** त्यांच्या लग्नाची नेहमीं काळजी करी व जेव्हां तेव्हां त्यांची सोय लावण्याविषयीं **तुकाराम**बुवांच्या मागें कटकट लावीत असे. एके दिवशीं त्यासंबंधानें तिनें **तुकाराम**बुवापाशीं गोष्ट काढिली व त्याच दिवशीं लग्नतिथि होती. **तुकाराम**बुवांनीं लागलीच बाहेर जाऊन तीन मुलें धरून आणिलीं व ब्राह्मणास बोलावून त्यांस व मुलीस हळद लावून त्यांचा लग्नविधि उरकून टाकिला. दूधभात करवून जावयांस जेऊं घातलें व आपण **जिजाई**च्या नेहमींच्या कटकटींतून मोकळे झाले. हे जावई **मोझे, गाडे** व **जांबूळकर** या मराठे घराण्यांतले होते. मुलांच्या आईबापांस दुसरे दिवशीं हें मुलांच्या लग्नाचें वर्तमान समजतांच संतोष झाला. व त्यांनीं मऱ्हाळी घेऊन येऊन चार दिवस लग्नसोहळा मोठ्या समारंभानें केला असें महिपती सांगतो. परंतु तोच आपल्या ग्रंथांत **तुकाराम**बुवांनीं भिकारणीस लुगडें दिलें त्या वेळचीं हकीकत सांगतांना 'गंगा तान्ही, बाहेर खेळत होती. **काशी** व **भागीरथी** जाणत्या असल्यामुळें सासरीं गेल्या होत्या व **बुबाई** दोघी पाणी आणावयास गेली होती. घरींत संभाळावयास कोणी नव्हतें. अशा संधींत **तुकाराम**बुवांनीं लुगडें उचलून दिलें' असें ह्मटलें आहे यावरून या तिघी मुलींचीं लग्नें एकदम झालीं नसावीं असें दिसतें. शिवाय **तुकाराम**बुवांचे तिघे जावई तीन गांवचे म्हणजे **मोझे** लोहगांवचे, **गाडे** एलवाडीचे व **जांबूळकर** जांबुळवाडीचे; असे असल्यामुळें '**तुकाराम**बुवांनीं तिन्हीं मुलें बाहेर जाऊन धरून आणिलीं' वगैरे महिपतीनें दिलेली हकीकत खरी नाहीं अशी शंका येते. असो.

तुकाकामबुवांचा भक्तिक्रम ह्याप्रमाणें चालला असतां, तोंच पारगांवच्या देशपांड्या आडनांवाचा एक ब्राम्हण आपल्यास व्युत्पत्ति प्राप्त व्हावी म्हणून पंढरीस अन्नपाणी वर्ज करून निर्धारानें धरणें घेऊन बसला. दहा दिवसांनीं त्यास आळंदीस जाऊन ज्ञानेश्वराची सेवा करण्याविषयीं दृष्टांत झाला. त्याप्रमाणें त्यानें बारा दिवस ज्ञानदेवाजवळ धरणें घेतलें. नंतर 'देहूस **तुकाराम**बुवांस शरण जावें म्हणजे मनोरथ पूर्ण होतील' असें त्यास स्वप्न पडलें. त्यावरून तो देहूस **तुकाराम** महाराजांकडे आला. त्यांनीं त्यास अकरा (४२६७–४२७७) अभंग व एक नारळ दिला. त्या प्राकृत अभंगांनीं व नारळानें त्याचें समाधान न होऊन ते तेथेंच टाकून तो परत आळंदीस जाऊन बसला. परंतु तेथून त्यास निराश होऊन जावें लागलें. **तुकाराम**बुवांजवळ अभंग व नारळ टाकून तो ब्राह्मण गेल्यानंतर कोंडो पंत नावाचा एक अज्ञान ब्राह्मण सहज जातां जातां **तुकाराम**बुवांच्या दर्शनाला आला व त्यानें त्यांस सद्भावपूर्वक नमस्कार केला. त्याचा हा निराभिमानपणा व भाव पाहून धरणेकरी ब्राम्हणानें टाकून दिलेले अभंग व नारळ **तुकाराम**बुवांनीं त्यास दिला. ह्या प्रसादापासून **कोंडोबा** व्युत्पन्न झाला असें **महिपति** म्हणतो. **कोंडोबानें** तो नारळ फोडिला तों त्यांतून उत्तम मोत्यें निघालीं व अनायासें त्यास संपत्तिही प्राप्त

झाली. ह्या नारळाविषयीं अशी दंतकथा आहे कीं, **अमदाबाद**च्या कोणी सावकारानें मनांत कांहीं इच्छा धरून ती सफल झाल्यास एक लक्ष रुपयांचें जवाहीर नजर करीन म्हणून नवस केला होता. त्याची इच्छा त्याप्रमाणें पूर्ण होतांच त्यानें लक्ष रुपयांचें जवाहीर घेऊन **ज्ञानदेवा**चें दर्शनास आला, तेव्हां त्यास तें **तुकाराम**बुवांपुढें ठेवण्याविषयीं दृष्टांत झाला. **तुकाराम**-बुवांची निरपेक्षबुद्धि सावकारास माहीत होती. त्यानें नारळ कोरून त्यांत उत्तम मोत्यें भरून बंद करून **तुकाराम**बुवांपुढें ठेविला. त्याच दिवशीं धरणेकरी ब्राह्मण आला त्यास व त्यानें अव्हेर केल्यामुळें त्याच्या मागून आलेला ब्राह्मण **कोंडोबा** यास प्रसाद म्हणून **तुकाराम**बुवांनीं दिलेला नारळ हाच होय.

तुकारामबुवांस दूरदूरचे लोक व ब्राह्मणही मानूं लागले व त्यांस नमस्कार करूं लागले हें कांहीं विद्वान ब्राह्मणांस सहन होईना. पुण्याजवळ **वाघोली** नांवाचें गांव आहे. तेथें **रामेश्वर**भट्ट नांवाचे व्युत्पन्न व वजनदार शास्त्री रहात होते, त्यांनीं दिवाणांत अशी तक्रार केली कीं, **देहूस** **तुकाराम** नांवाचा कोणी शूद्र जातीचा मनुष्य साधु म्हणून नांवाजलेला आहे. तो हरिकीर्तन करितो व त्यांत श्रुतिस्मृतींतील वचनें लोकांस उपदेशितो. शूद्रानें असें करणें धर्मबाह्य आहे, करितां आपण धर्मरक्षक आहां, त्याचा बंदोबस्त करावा. दिवाणांनीं **तुकाराम**बुवांच्या निरपेक्ष साधुवृत्तीकडे फारसें लक्ष्य न देतां; देहूच्या ग्रामाधिकाऱ्यांस **तुकाराम**बुवांस एकदम हद्दपार करण्याचा हुकूम पाठविला. तो अकस्मित हुकूम पाहून ग्रामाधिकाऱ्यांस मोठें आश्चर्य वाटलें. त्यांनीं **तुकाराम**बुवांस तो हुकूम कळविला. तेव्हां हें कृत्य कोणाचें असावें ह्याविषयीं त्यांनीं शोध चालविला. शोधाअंतीं हें वाघोलीच्या **रामेश्वर**-भट्टांचें कृत्य आहे, असें त्यांस समजून आल्यावरून ते त्यांच्या भेटीस वाघोलीस गेले. **तुकाराम**बुवा त्यांच्या घरीं पोहोंचले त्यावेळीं ते स्नानसंध्येंत होते. त्यांची स्नानसंध्या आटोपल्यावर **तुकाराम**बुवांनीं त्यांची गांठ घेतली व तेथेंच कीर्तनास आरंभ केला. कीर्तनांत श्रुति प्रमाण वचनें **तुकाराम**बुवांच्या तोंडातून निघतांना ऐकून **रामेश्वर**भट्टास संताप आला व त्यांनीं त्यांस असें सांगितलें कीं, 'हीं वेदांतील वचनें त्वां लोकांस उपदेशावीं व कवित्व करावें. असा तूं शूद्र असल्यामुळें तुला अधिकार नाहीं हा अधिकार ब्राह्मणांचा आहे. तुझ्या ह्या उपदेशानें तूं व तुझें कीर्तन ऐकणारे रौरव नरकांत जातील. तूं अतःपर कवित्व करूं नको.' यावर **तुकाराम**बुवांनीं त्यांस नम्रपणानें विचारलें कीं, 'यापुढें मी कवित्व करणार नाहीं व कीर्तनही करणार नाहीं, पण आजपर्यंत केलेल्या कवित्वाची काय वाट? तेव्हां **रामेश्वर**भट्ट ह्मणाले, 'तें कवित्व नदींत बुडवून टाक'. **तुकाराम**बुवा 'ठीक आहे' ह्मणून तेथून निघाले व देहूस येऊन त्यांनीं आपल्या **अभंगाच्या वह्या** एका कागदांत गुंडाळून व त्यांस दगड बांधून इंद्रायणीचे **डोहांत टाकून दिल्या.** त्या वेळीं **तुकाराम**बुवांस अतिशय वाईट वाटलें व ते विठोबाच्या मूर्तिसमोर उभे राहून हात जोडून ह्मणाले. 'पांडुरंगा आजपर्यंत तुझ्याच आज्ञेवरून

मी कवित्व केलें व आज तेंच पाण्यांत बुडविण्याचा मजवर प्रसंग आला, असो तुझी इच्छा.' ह्या कृत्यामुळें **तुकाराम**बुवा अतिशय उद्विग्न झाले व त्यांतच त्यांचे शत्रु त्यांजकडे येऊन 'मागें तुम्ही वडिलांच्या वेळचीं खतें बुडवून प्रपंच बुडविला व आतां आपलें कवित्व बुडवून परमार्थही बुडविला. धड प्रपंच ना परमार्थ अशी तुमची स्थिति झाली. आतां हें जिणें काय कामाचें?' असें टोचून बोलूं लागले. हीं दुरुत्तरें ऐकून **तुकाराम**बुवांस अत्यंत दुःख झालें व ते अन्नपाणी वर्ज्य करून देवळासमोर वृंदावनांत एक शिळा होती तीवर पडून विठ्ठलाची करुणा भाकूं लागले. त्या प्रसंगीं त्यांनीं वीस अभंग (४२३२–४२५१) केले आहेत. तेरा दिवसपर्यंत त्यांनीं पाणी देखील तोंडांत घेतलें नाहीं किंवा ज्या कुशीवर पडले होते त्या कुशीवरून दुसरीवर वळले नाहींत. ह्यामुळें त्यांचें शरीर कृश झालें व त्यांचा प्राण डोळ्यांत उरला. ते जिवंत आहेत हें फक्त श्वासोच्छ्वासावरून व तोंडावाटें नामस्मरणाचा ध्वनी निघत होता त्यावरून समजत होतें. त्यांची ही स्थिति पाहून भाविक लोकांस व त्यांच्या शिष्यांस फार वाईट वाटलें. ह्याप्रमाणें तेरा दिवस लोटल्यावर रात्रीं **तुकाराम**बुवांच्या भक्तांस असा दृष्टांत झाला कीं, '**तुकाराम**बुवांचें कवित्व मीं पाण्यांत रक्षण केलें आहे. **उद्ईक वह्या पाण्यावर येतील,** करितां तुम्ही पहांटेस जाऊन त्या काढून आणाव्या.' हा दृष्टांत होतांच ते भाविक लोक पहांटेस च इंद्रायणीच्या डोहावर आले व पहातात तों **वह्या जशाच्या तशा कोरड्या पाण्यावर तरंगत आहेत.** हा चमत्कार पाहून त्यांनीं पांडुरंगाचा व **तुकाराम**बुवांचा जयजयकार करून त्या **वह्या वर काढिल्या** व सद्गदित अंतःकरणानें **तुकाराम**बुवांजवळ येऊन ते त्यास अश्रुपूरित नेत्रांनीं म्हणाले: 'हे महाभाग्य पुरुषा, प्रेमळ भगवद्भक्ता, ऊठ, डोळे उघडून पहा. ह्या **तुझ्या वह्या** इतके दिवस **पांडुरंगानें** पाण्यांत रक्षण करून आज तुला **आणून दिल्या आहेत**.' हें ऐकून **तुकाराम**बुवा खाडकन् उठून बसले व आपल्या वह्या पाहून त्यांचे नेत्र पाण्यांनीं भरून आले. त्यांनीं ह्या प्रसंगीं ईश्वराचे स्तुतिपर सात (४२५२–४२५८) अभंग करून विठ्ठलाचें मोठ्या प्रेमानें स्तवन केलें व नंतर सर्व मंडळी घरीं आली.

ही वह्या-तारल्याची बातमी चोहोंकडे पसरली व **तुकाराम**बुवांची कीर्ति वाढून भाविक लोक आस्थेनें लांबून त्यांच्या दर्शनास येऊं लागले. परंतु त्यांचा द्वेष करणारे शास्त्री, ब्राह्मण वगैरे दुरभिमानी कुटाळ लोकांस ती ऐकून अतिशय वाईट वाटलें. हें वर्तमान ऐकून **रामेश्वर**भट्टाची तळव्याची आग मस्तकास गेली असेल, पण काय करितो? नाइलाज झाला. असो. **तुकाराम**बुवांस छळणारे हे **रामेश्वर**भट्ट एकदां सोमवार द्वादशी पाहून आपल्या दोघां शिष्यांसह पुण्यास नागेश्वराच्या दर्शनास आले. तेथें जवळच **अनगडशा** नांवाच्या सिद्ध पुरुषाचा मठ होता. त्यांतील विहिरीचें पाणी स्वच्छ पाहून **रामेश्वर**भट्ट मागें पुढें विचार न करितां त्या विहिरींत स्नानाकरितां उतरले. स्नान झाल्याबरोबर त्यांच्या अंगाचा इतका दाह झाला कीं, त्यांच्या शिष्यांनीं दुसरीकडच्या पाण्याच्या घागरीच्या घागरी आणून त्यांच्या अंगावर ओतल्या तरी त्यास चैन पडेना. त्यांचा जीव अगदीं कासावीस होऊं लागला, तेव्हां

त्या सिद्धांच्या आळीतून आपण विहिरींत आंघोळ केली व पाणी खराब केलें म्हणून त्याचा शाप लागला असेल, करितां त्यास शरण जावें असा त्यांच्या शिष्यांनीं बुद्धिवाद सांगितला, परंतु 'मी विप्रवर त्या हीनजाति अवलियास शरण जाऊं काय!' असें उत्तर देऊन त्यांनीं आळंदीस ज्ञानदेवाचे दर्शनास जाण्याचा आपला उद्देश शिष्यांस कळविला. शिष्यांनीं त्यांचे अंगावर ओले कपडे टाकून व वर झाऱ्यांनीं पाण्याची सारखी धार धरून त्यांस आळंदीस नेलें. तेथें [illegible] गळती बांधून आरण निंबाखालीं अनुष्ठानास बसले. कांहीं दिवसांनीं त्यास ज्ञानदेवांनीं स्वप्नांत येऊन असें सांगितलें कीं, भगवद्भक्त तुकाराम यांची निंदा व छळ केल्यामुळें तुला असा दाह झाला आहे, त्यास शरण जा. इंद्रायणींतून तुकारामबुवांच्या कवित्वाच्या वह्या कोरड्या वर निघाल्याची बातमी रामेश्वरभट्टांच्या कानीं येऊन त्यास पश्चात्ताप होऊं लागला होताच, त्यांतच हें स्वप्न पडलें; तेव्हां रामेश्वरभट्ट अतिशय लज्जित व खिन्न होऊन त्यांनीं भीत भीत तुकारामबुवास स्तुतिपर पत्र आपल्या शिष्याच्या हातीं पाठवून आपल्या अपराधाची क्षमा मागितली. तुकारामबुवांनीं तें पत्र साद्यंत वाचून पाहिलें व तें घेऊन येणाऱ्या शिष्याच्या तोंडून सर्व हकीकत ऐकली. रामेश्वरभट्टास पूर्ण पश्चात्ताप झालेला पाहून त्यांनीं एक अभंग लिहून शिष्याजवळ दिला (१३५०) शिष्यांनीं तो अभंग आळंदीस जाऊन रामेश्वरभट्टास दिला. तेणेंकरून त्यांच्या अंगाचा दाह शांत झाला असें महिपतीनीं आपल्या ग्रंथांत सांगितलें आहे. रामेश्वरभट्टाच्या ह्या हकीकतींतील चमत्काराचा भाग एकीकडे ठेवून विचार केला तरी देखील रामेश्वरभट्टांनीं वह्या बुडविण्यास सांगून तुकारामबुवास जें दुःख दिलें, त्याबद्दल त्यांचें मन त्यांस खात असलें पाहिजे व त्यामुळें त्यांस बिलकूल चैन न पडल्यामुळें त्यांनीं शेवटीं तुकारामबुवांची क्षमा मागितली व तुकाराम महाराजांनीं एका अभंगांत त्यांस जो उपदेश केला, त्यामुळें त्यांचें समाधान झालें असावें ही गोष्ट निर्विवाद आहे. तुकारामबुवांच्या अभंगानें रामेश्वरभट्टांचा दाह शांत झाल्यावर ते आळंदीहून तुकाराममहाराजांच्या भेटीस निघाले व तुकारामबुवाही देहूहून रामेश्वरभट्टांस भेटण्याकरितां निघाले. दोघांची गांठ वाटेंत पडली. त्यावेळीं रामेश्वरभट्टांनीं अतिशय पश्चात्ताप प्रदर्शित करून तुकाराममहाराजांची समक्ष क्षमा मागितली. ते निरभिमानी साधु तुकाराम महाराज, उलट रामेश्वरभट्टांसच 'मी हीनजाति पामर आहें, मजवर कृपा असावी' असें रामेश्वरभट्टांस बोलले. रामेश्वरभट्ट, तुकारामबुवांचा हा निरभिमानीपणा पाहून अतिशय लीन झाले व 'आपल्या अनुग्रहानें मला अनुभव झाला आहे, आतां मी आपला समागम सोडून घरीं जाणार नाहीं.' असें बोलून, कुल व विद्याभिमान, बायको, मुलें, संसार, प्रतिष्ठा वगैरे सर्वांचा त्याग करून व तुकारामबुवांचे शिष्यत्व पतकरून त्यांच्याजवळच राहिले. गंगाधरपंत मवाळ व संताजी हे तुकारामबुवांचे पुढें जसे त्यांचेजवळ राहिले होते तसेच पुढें रामेश्वरभट्टही राहिले. तुकारामबुवांचा धाकटा भाऊ कान्होबा हाही तुकारामबुवांचा शिष्य

बनून त्यांचेजवळ राहिला. शिवाय **धोंडभट** पुराणिक, **शिवाजी** कासार लोहगांवकर, **नावजी** माळी वगैरे दुसरे दहा मिळून **तुकाराम**बुवांचे चवदा **पट्टशिष्य** होते.

रामेश्वरभट्टांसारखे मोठे कर्मठ ब्राह्मण व मानी शास्त्री देखील **तुकाराम**-महाराजांचे शिष्य होऊन त्यांच्याजवळ राहिले, त्यामुळें त्यांच्या साधुत्वाविषयीं चोहोंकडे अधिकच कीर्ति पसरली व आसपासच्या गांवचे लोक मोठ्या प्रेमानें आदरानें व समारंभानें **तुकाराम**बुवांस त्यांच्या शिष्यमंडळीसह आपल्या गांवीं नेऊन त्यांचीं कीर्तनें वगैरे करवून त्यांचा उपदेश ग्रहण करूं लागले. लोहगांवकरांनीं त्यांस बरेच दिवस आपल्या गांवीं ठेवून घेतलें होतें. त्यावेळीं प्रत्येकानें आपल्या घरीं त्यांचें कीर्तन करून दिवसा आनंदानें समाराधना करावी असा क्रम चालला होता. **तुकाराम**बुवांच्या प्रेमळ उपदेशानें व निरपेक्ष साधुवृत्तीनें लोहगांवचे बहुतेक लोकांचा त्यांच्यावर अतिशय भाव जमला, परंतु तेथें **शिवाजी** नांवाचा एक कांसार (जो पुढें **तुकाराम** महाराजांचा शिष्य होऊन त्यांचे जवळच राहिला) महा दुर्जन होता. त्यास कीर्तनास बोलावून आणण्यासाठीं **तुकाराम**महाराजांनीं पुष्कळ वेळां मनुष्यें पाठविलीं परंतु प्रत्येक वेळीं, त्यानें माणसाच्या तोंडावर त्यांची निंदा व हेळणा करून आपण कीर्तनास आला नाहीं. त्याच सुमारास एक ब्राह्मण, कर्ज झाल्यामुळें आळंदीस धरणें घेऊन बसला होता. त्यास **तुकाराम**बुवांकडे जाण्याविषयीं दृष्टांत झाल्यावरून तो लोहगांवीं आला. **तुकाराम**बुवांनीं गांवांतून वर्गणी करवून त्यास कांहीं ऐवज देवविला. परंतु तेवढ्यानें ब्राह्मणाचें कर्ज फिटण्यासारखें नव्हतें. म्हणून **तुकाराम**बुवांनीं तांब्यावर सडा घांसून सोनें करून त्यास दिलें, त्यामुळें तो कर्जमुक्त होऊन श्रीमान झाला. अशी बातमी उठल्यावरून **शिवाजी** कांसार **तुकाराम**बुवांच्या भजनीं लागला. त्यालाही कालेंकरून द्रव्य मिळालें व **तुकाराम**बुवांच्या सांगण्यावरून त्यानें अन्नदानें केलीं व एक विहीर बांधिली. हिलाच कांसारविहीर म्हणतात. कांहीं काळानें **शिवाजी** कांसारास विरक्ति प्राप्त होऊन तोही घरदार, संसार, बायको वगैरे सोडून **तुकाराम**बुवांच्या जवळ राहिला. त्याच्या बायकोस अर्थात हें आवडलें नाहीं. तिनें **तुकाराम**बुवांनींच आपल्या नवऱ्यास नादीं लाविलें असें समजून एके दिवशीं आपल्या घरीं त्यांस जेवणास बोलावून स्नानाचे वेळीं ते जोत्यावर बसले असतां त्यांचे अंगावर कढत पाणी ओतिलें. त्यामुळें **तुका-राम**बुवांचें आंग भाजलें; त्याबद्दल त्यांनीं एक अभंग केला आहे ([illegible]) मागाहून तिलाही पश्चाताप होऊन ती **तुकाराम**बुवांच्या उपदेशानें भक्ति-मार्गास लागली.

लोहगांवास वर सांगितल्याप्रमाणें प्रत्यहीं कीर्तन व उपदेश चालला असतां, एके दिवशीं कांहीं संन्यासी त्यांच्या कीर्तनास घेऊन बसले. **तुकाराम**बुवांनीं त्या दिवशीं जपतपादि कर्ममार्गाचें कांहीं प्रयोजन नसून फक्त सद्भावपूर्वक ईश्वराचें नामस्मरण केलें असतां मोक्षप्राप्ति होते. तेव्हां हा सोपा मार्ग स्वीका-रून लोकांनीं भक्तिमार्गास लागावें. इतर बडाटोपांत पडूं नये. असा मोठ्या

[illegible]नीं उपदेश केला. तो ऐकून संन्याशास विषाद वाटला व त्यानीं पुण्यास शाहाजीचे कारभारी, दादोजी कोंडदेव मोकाशी यांजकडे अशी फिर्याद केली कीं, तुकाराम [illegible] वेदोक्त [illegible] निषेध करून लोकांस नाम-महात्म्याचा उपदेश करीत आहे, यामुळें वैदिक धर्माचा उच्छेद [illegible] संभव आहे, [illegible] करावें. दादोजी [illegible] तुकाराम-बुवांची योग्यता चांगली माहीत होती. त्यानीं "तुकाराम [illegible] धून आणितों, तुमचा त्यांचा [illegible] होऊं द्या व जो बाधून होईल त्यास शासन [illegible]" असें त्या संन्याशास सांगितलें. त्यास तें मान्य [illegible] दादोजी कोंडदेवानें तुकाराम [illegible] बोलावणें पाठविलें. तुकाराम[illegible] आपल्या ब्राह्मणादि [illegible] पुण्यास येऊन संगमावर उतरले. तुकाराम [illegible] कीर्ति पुण्याच्या लोकांस [illegible] माहीत [illegible] तुकाराम[illegible] संगमावर [illegible] तुकाराम [illegible] लागले दादोजी कोंडदेवही त्यांच्या भेटीस निघाला [illegible] निषेध [illegible]. दादोजी कोंडदेवानें त्यांचा अशी [illegible] कीं, मी तुकाराम-बुवांस गांवांत घेऊन येतों. नंतर तुम्ही त्यांची [illegible]. [illegible] त्यांची समजूत करून दादोजी कोंडदेव तुकाराम [illegible] मोठ्या आदरानें गांवांत आणिलें. [illegible] तयारी होऊन तुकाराम[illegible] कीर्तनास उभे राहिले. लोकांची अतिशय गर्दी झाली होती, [illegible] आले होते. त्यानीं तुकाराम [illegible] प्रेमळ [illegible] [illegible] ऐकून त्यांची विरक्त व तदाकार वृत्ति पाहून ते तटस्थ झाले व त्यांचे प्रतिपादन यथार्थ असून या [illegible] होणार आहे, अशी त्यांची खात्री होऊन ते विनम्र झाले. हें पाहून दादोजी कोंडदेव त्यास म्हणाला कीं, तुम्ही अशा [illegible] विरोध केला म्हणून तुम्हांस गाढवावर बसवून [illegible] द्यावी. परंतु तुकाराम-बुवांनीं मध्यस्थी [illegible] त्यास पुन्हा असें न [illegible] सोडून देण्यांत आलें.

• चिंचवडचे चिंतामणी देव [illegible] त्यांच्या-ही कानीं तुकाराम [illegible] कीर्ति [illegible] त्यांनीं त्यास [illegible] योग्यता [illegible] बोलाविलें. चिंचवडास देवांचे घरीं तुकाराम [illegible] गेले त्यावेळीं देव [illegible] आटपून ध्यानस्थ होते. त्या [illegible] लक्ष [illegible] पाणी प्यावें किंवा नाहीं [illegible] होतें. तुकाराम [illegible] त्यांच्या समोर उभे [illegible] देवांचें ध्यान [illegible] होतें उघडून पाहिलें, तों पुढें तुकाराम [illegible] उभे आहेत. तुकारामबुवांनीं त्यांस [illegible] देवांनीं [illegible] आहे म्हणून विचारिलें, [illegible] पाणी प्यावें किंवा नाहीं [illegible] असें तुकारामबुवांनीं सांगितलें. तें ऐकून [illegible], पण तत्काळ तें न [illegible] त्यांनीं तुकाराम-बुवांचा आदर सत्कार केला व त्यास [illegible] सांगितलें.

तुकारामबुवा व **देव** समोरासमोर जेवावयास बसले असतां, **तुकाराम**बु-
वांनीं आणखी दोन पानें मांडावयास सांगून आपापल्या आराध्य दैवतांस
बोलावण्याविषयीं देवांस विनंति केली. देवांस तें **तुकाराम**बुवांचें म्हणणें
मोठें चमत्कारिक वाटलें व त्यांनीं असें होणें अशक्य आहे असें **तुकाराम**-
बुवांस सांगितलें. **तुकाराम**बुवांनीं त्यावेळीं विठोबास व गणपतीस स्मरण
करून त्यांस तेथें आणून आपल्या पंक्तीस जेवविलें; अशी आख्यायिका आहे.
पुढें **देवांनीं** **तुकाराम**बुवांचें कीर्तन करविलें; तें ऐकून **तुकाराम**बुवांच्या
थोर योग्यतेविषयीं त्यांची खात्री झाली. तेव्हांपासून ते **तुकाराम**बुवांस
पूज्य मानून त्यांस वेळोवेळीं चिंचवडास आणून त्यांचें कीर्तन करवीत असत.

जीवमात्राविषयीं ऐक्यभाव **तुकाराम**बुवांचे ठिकाणीं कसा बाणला होता
हें पुढील एकदोन उदाहरणांवरून दिसून येण्यासारखें आहे. एकदां **तुकाराम**-
बुवांच्या अंगावर अतिशय डांस बसून त्यांस अतिशय पीडा होत होती, तरी
त्यांस उडवून लावण्यासाठीं हात देखील उचलला नाहीं. कांहीं वेळानें त्यांच्या
ओळखीच्या एका मनुष्याच्या नजरेस त्यांची ती दशा पडून त्यानें ते डांस
हांकलून लाविले व **तुकाराम**बुवांस त्यांच्या पीडेपासून मुक्त केलें. एकदां एके
ठिकाणीं कांहीं पक्षी दाणे टिपीत असतां **तुकाराम**बुवा तिकडून जाऊं लागले
त्यांस भिऊन ते पक्षी उडून गेले. हें पाहून **तुकाराम**बुवा अतिशय दुःखी
झाले व माझ्यामध्यें असा कोणता दोष आहे कीं, त्याच्या भीतीनें पाखरांनीं
उडून जावें? (४४१३) हा असला दोष माझा मधून निघून जाऊन पुन्हा
पक्षी मला न भितां आपलें भक्ष्य खाऊं लागतील तोंपर्यंत मी येथून हलणार
नाहीं, असा हट्ट धरून **तुकाराम**बुवा तेथेंच विठ्ठलाचें स्मरण करीत उभे
राहिले. कांहीं वेळानें पक्षी येऊन दाणा टिपून खाऊं लागले, तेव्हां ते तेथून
पुढें चालते झाले. याप्रमाणें अनेक चमत्कार महिपतींनीं आपल्या ग्रंथांत
वर्णन केले आहेत.

तुकारामबुवा लोहगांवीं असतांना कोणी एक कोळी त्यांच्या कीर्तनास
अत्यंत लुब्ध झाला तो इतका कीं, त्याचा एकुलता एक मुलगा एके दिवशीं
आजारी असतांना त्याची प्राणोत्क्रमणाची वेळ आली. तरी तो कीर्तनास
गेला. त्याच्या बायकोस त्याबद्दल अतिशय राग वाटला. तो गेला तिक-
तीमध्यंच मुलास घेऊन कीर्तनामध्यें आली, तोंच त्या मुलाचा प्राण निघून
गेला. तें पाहून ती अतिशय आक्रोश करूं लागली व त्या दुःखामध्यें नव-
ऱ्यास व **तुकाराम**बुवांसही शिव्या देऊं लागली. तिचा आक्रोश ऐकून
तुकारामबुवांस तिची दया आली व तिचें मूल जिवंत व्हावें म्हणून मोठ्या
कळवळ्यानें विठ्ठलाची प्रार्थना चालविली. त्या प्रसंगीं त्यांनीं 'देवा, मी
जिवास चेतना देणें आपल्यास अशक्य नाहीं. आपल्या सामर्थ्याविषयीं
पुष्कळ गोष्टी ऐकिल्या आहेत. मग आतांच तें खरें करून कां दाखवीत नाहीं'
अशा अर्थाचा अभंग (४४०६) केला आहे. कांहीं वेळानें तें मूल जिवंत
झालें व सर्वजण **तुकाराम**महाराजांचा गौरव करूं लागले. हा [illegible]

सांगितलेला काळ तुकारामबोवांचा शिष्य शिवाजी काळाचेच असावा की काय ह्याबद्दल शंका येते.

असो. तुकारामबोवांच्या वह्या पाण्यावर तरल्या वगैरे [illegible] अद्भुत चमत्कार शिवाजी महाराजांनी कानीं ऐकल्यावर त्यांना तुकाराम- बुवांचें दर्शन घेण्याची इच्छा झाली. त्यांच्या ठिकाणीं [illegible] अभिमान वसत होता त्यामुळें त्यांनी [illegible] उपक्रम चालविला होता. व ह्या वेळीं अगदीं तरुण असून त्यास [illegible] दर्शनें घेऊन त्यांशी तशा संवादून करण्याची फार उत्सुकता होती. त्यांनी कित्येक सा- धूंचीं दर्शनें घेऊन त्यांचे निर्वाह, महोत्सव, अन्नछत्रें वगैरे सर्व चालावें म्हणून त्यास [illegible] दिल्हीं होतीं. तुकाराम[illegible] अशीच काहीं संभावना करावी ह्या [illegible] वगैरे [illegible] त्यांनिशीं [illegible] पत्र देऊन त्यांस आमंत्रण पाठविलें. तुकाराम बुवा या वेळीं लोहगांवीं होते, त्यांनी तें पत्र वाचून [illegible], घोडे [illegible] आमंत्रणाविषयीं अत्यंत निरपेक्षता दाखवून त्यांचा अव्हेर केला व शिवाजी महाराजांस [illegible] म्हणून [illegible] (१ [illegible]) त्यांत त्यांनीं ' रामदास स्वामींचे ठिकाणीं दृढ भाव ठेवा, आम्ही व ते एकच आहों. [illegible] सुमये मनोरथ सिद्धीस जातें असा नेमानेम आहे, म्हणून तेथेंच चित्त ठेवा. ' अशा अर्थाचा उपदेश केला आहे.

तुकारामबुवांची ही निरपेक्ष वृत्ति पाहून शिवाजी महाराजांस त्यांस भेटण्याची [illegible] उत्कट इच्छा झाली. ते वस्त्रें, अलंकार, सुवर्ण, पूजा- साहित्य, होन, मोहरा वगैरे नजराणा बरोबर घेऊन लोहगांवीं तुकाराम बुवास भेटण्यास आले. [illegible] लोकांचा भाव पाहून तुकारामबुवा बहुतकरून [illegible] फार रहात असत. तेथें दुपारीं [illegible] व दिवसा गोपाळकाला असा क्रम चालू होता. शिवाजी [illegible] तुका- रामबुवांस प्रणामादि [illegible] पाहून आपल्या [illegible] [illegible] हात न लावितां व मोहरा नाहींत [illegible] ठेवल्या. त्या प्रसंगीं तुकाराम [illegible] चार अभंग ([illegible]) करून त्यांत ' हें द्रव्य आम्हांला [illegible] आहे. [illegible] हात आ- मचा देवा व मायबाप आहे. [illegible] आमच्या [illegible] आहे. आम्हांस येथें संपत्ति, सत्ता, व शांति वगैरे सर्व कांहीं अनुकूल आहे. आम्हांस संतोष होईल असें काहीं करावयाचें आपल्यास वाटत [illegible], [illegible] नाम [illegible] व रामदासा[illegible] चित्त देवा. म्हणजे [illegible] आहे ' [illegible] असें सांगितलें. हें ऐकून शिवाजी महाराजांस [illegible] तुकाराम महारा- जांस नजर केलेले द्रव्य [illegible] वांटून टाकिलें. त्या दिवशीं रात्रीं शिवाजी महाराज तेथेंच [illegible] राहिले होते. त्या दिव- शींच्या कीर्तनास [illegible] आला होता. तुकारामबुवांनी ' विठ्ठल हाच ह्या जगाचा [illegible]. [illegible], [illegible], [illegible], सत्ता, मित्र,

संपत्ति, धन, मान वगैरे सर्व कांहीं आहे, त्याचें चिंतन करा, ह्मणजे भवसागर पार तरून जाल ' हा विषयावर कीर्तन केलें. कीर्तनांतील रंग, श्रोत्यांची एकाग्रता व प्रेम, तुकारामबुवांची विठ्ठलाचे ठिकाणीं निस्सीम भक्ति, व हृदयांत ठसणारा उपदेश ऐकून शिवाजी महाराज अगदीं तल्लीन होऊन गेले. इहलोकचीं सुखें व भक्तिजन्य आनंद यांची तुलना कधींही व्हावयाची नाहीं. असे विचार मनांत येऊन त्यांच्या मनांत वैराग्य उत्पन्न झालें व ते सकाळीं [illegible] तुकारामबुवांचें दर्शन घेऊन व राजभूषणें काढून ठेवून अरण्यांत एकांतांत जाऊन बसलें. प्रधान वगैरे मंडळी आपल्याकडे येण्याची मनाई केली. दिवसा एकांतांत ईश्वरचिंतन करावें व रात्रीं तुकारामबुवांचें कीर्तन ऐकावें, असा क्रम त्यांनीं धरिला. प्रधान मंडळाकडून ही बातमी शिवाजी महाराजांच्या मातुश्री जिजाई ईस समजतांच ती पालखींत बसून देहूस तत्काळ आली, व तुकाराम महाराजांस विनम्र भावानें दंडवत करून व डोळ्यांत आसवें आणून त्यांची प्रार्थना केली कीं, महाराज, माझ्या पोटीं हा एकुलताएक पुत्र असून, त्याच्याही पोटीं कांहीं संतान नाहीं, तेव्हां हा राज्यभार कोणी चालवावा, व आमचें व प्रजेचें यवनांपासून रक्षण कोणीं करावें. तुकारामबुवांनी जिजाबाईची ही करुणापर स्थिति पाहून आश्वासन दिलें कीं, रात्रीं कीर्तनास महाराज आले असतां, त्यांस दोन गोष्टी सांगेन; तुम्हीं स्वस्थ असावें. रात्रीं शिवाजी महाराज कीर्तनास आले असतां, त्यांनीं श्रीमद्भगवद्गीतेंतील कर्मयोगावर निरूपण चालविलें. मनुष्यानें, आपण ज्या कुळांत जन्मलों, त्या कुळाचा धर्म (कर्तव्यकर्म) सोडूं नये. जसें ब्राह्मणानें आपल्या ब्रह्मकर्माप्रमाणें तसें क्षत्रियानें आपल्या क्षत्रियधर्माप्रमाणें वागलें पाहिजे. आपलें क्षत्रियकर्म नीतीनें [illegible] त्यांतच ईश्वर चिंतन केलें म्हणजे जन्माचें सार्थक होईल. असा तऱ्हेचा उपदेश ऐकून तुकारामबुवांच्या मनांतील उद्देश शिवाजी महाराजांस समजला व त्यांनीं अश्रुपूर्ण नेत्रांनीं त्यांस दंडवत घालून आपल्या [illegible] स्वीकार केला. शिवाजी महाराजांचें मन पुन्हां राज्यकारभारांत गुंतलें; त्यामुळें जिजाबाई ईस आनंद होऊन ती कृतज्ञतापूर्वक तुकाराम बुवांच्या पायां पडली. नंतर आणखी चार दिवस राहून भजनकीर्तन श्रवण करून [illegible] ण्यास निघाली; निरोप घेतेवेळीं शिवाजी महाराजांनीं ' राज्य टिकवावयाचें असल्यास भाकर व पोटीं पुत्र व्हावयाचा असल्यास नारळ आपला प्रसाद द्यावा ' अशी विनंति केल्यावरून तुकारामबुवांनीं भाकर व नारळ त्यांच्या पदरांत घालून त्यांस वाटेस लाविलें.

पुढें शिवाजी महाराजांची तुकारामबुवांवर इतकी भक्ति बसली कीं, त्यांचें कीर्तन ऐकण्याची व दर्शन घेण्याची संधि मिळाली कीं, ते दवडीत नसत. एकदां तुकारामबुवा पुण्यास येऊन त्यांचीं नित्य कीर्तनें चालली होतीं, त्यावेळीं शिवाजी महाराज सिंहगडावर होते. तेथून रात्रीं त्यांनीं कीर्तनास यावें व पहांटे परत गडावर निघून जावें असा क्रम ठेविला होता. ही बातमी चाकणच्या ठाण्यावर असलेल्या मोंगल सरदारास लागल्यावरून त्यानें

शिवाजी महाराजांवर पाळत ठेविली. एके दिवशीं एकादशीस **तुकाराम** महाराजांचें कीर्तन एका वाण्याच्या घरीं व्हावयाचें होतें. **शिवाजी** महाराज एकादशी असल्यामुळें अवश्य कीर्तनास येतील हें जाणून त्या सरदारानें दोन हजार पठाण **शिवाजी** महाराजास अकस्मित पकडण्यासाठीं चाकणाहून रवाना केले. ते रात्रीं कीर्तनास **शिवाजी** महाराज येऊन कीर्तन अगदीं रंगांत आलें असतां पुण्यास येऊन थडकले. पठाण छापा घालण्याकरितां आले ही बातमी कीर्तनाचे ठिकाणीं पोंचतांच एकच गडबड झाली व कीर्तनाचा भंग झाला. तें पाहून **तुकाराम** महाराजांस अतिशय वाईट वाटलें व ईश्वरावर लक्ष्य ठेविलें असतां कांहीं भय नाहीं असें लोकांस एका अभंगांत सांगून हरीकीर्तनांत व्यत्यय आल्याबद्दल पांडुरंगाची करुणापर स्तुति आरंभिली याप्रसंगीं तीन अभंग केले आहेत. (४४०३–४४०५) **शिवाजी** महाराज जात्या शूर, धाडसी व भाविक असल्यामुळें, त्यांनीं एकादशीचें कीर्तन सोडून हलावयाचें नाहीं असा निश्चय करून ते स्वस्थ चित्तानें बसले. इकडे पठाणांनीं वाड्यास वेढा घातला व चोहोंकडची नाकेबंदी केली. प्रसंग मोठा बिकट येऊन गुजला होता तरी आंत कीर्तनाचा व नामघोषाचा सारखा गजर चालला होता. पठाणांस आतां **शिवाजी** खास हातीं लागणार म्हणून आनंद झाला होता व ते वाड्यांत शिरण्याच्या अगदीं तयारींत होते. इतक्यांत शिवाजी महाराजांसारखा एक पुरुष घोड्यावर बसून भरधांव घोडा फेंकीत समोरून निघून जात आहे, असा त्यांस भास होऊन ते वाड्याचा वेढा उठवून गडबडीनें त्याच्या मागें लागले. हा घोडेस्वार पठाण मागें लागले असतां, थेट गावांबाहेर निघून जाऊन दाट जंगलामध्यें शिरला. पठाणांस तें बिकट जंगल व उंचसखल पायवाटा माहीत नसल्यामुळें, त्यांचें स्वाराच्या मागें लागतां लागतां फार हाल व नुकसान झालें. इतक्यांत चंद्र मावळून गाढ अंधेर पडला, तेव्हां तर त्यांची अतिशय त्रेधा उडाली. अंधारांत पुढें न दिसल्यामुळें जंगलांतील झाडांवर कित्येकांची डोकीं आपटून त्यांचा कपालमोक्ष झाला व खड्या गोट्यास व झाडांच्या बुंध्यास आडखळून तेथेंच निचेष्टित पडले. साऱ्या जंगलांत पठाण पसरले होते, परंतु त्यांस त्या घोडेस्वाराचा पत्ता लागला नाहीं. हा घोडेस्वार शिवाजीच असून तो त्या जंगलांतून कोठें तरी डोंगरांत निसटून गेला. आतां त्याला शोधणें व्यर्थ आहे असा विचार करून त्या पठाणांनीं चाकणचा रस्ता धरिला. ह्याप्रमाणें हें भयंकर संकट पांडुरंगानें परस्परेंच टाळलें म्हणून कीर्तन संपल्यावर सर्व मंडळींनें ईश्वराचें अनन्य भावानें आभार मानून स्तवन केलें व **शिवाजी** महाराज **तुकाराम**बुवांची आज्ञा घेऊन सुरक्षितपणें सिंहगडांस जाऊन पोंचले.

ह्या गोष्टीसंबंधानें महिपतीनें आपल्या भक्तविजय ग्रंथांत **शिवाजी**-महाराज लोहगांवीं **तुकाराम**बुवांच्या भेटीस आले त्यावेळच्या हकीकतीची व पुण्याच्या हकीकतीची भेसळ केली आहे, परंतु त्यानंतरच्या भक्तलीलामृत ग्रंथांत या चुकीची दुरुस्ती करून या गोष्टी निराळ्या काळीं व स्थळीं घडल्या असें सांगितलें आहे. ह्या गोष्टींतील वेषधारी शिवाजीसंबंधानें आलिकडील विद्वान

चरित्रकार असा आक्षेप घेतात कीं, हा वेषधारी शिवाजी पांडुरंग नसून त्याच्या
धाडसी, शूर व स्वामिनिष्ठ सेवकांपैकींच कोणी असावा व त्यानेंच शिवाजीचा
पोषाख अंगावर चढवून पठाणांस चकविण्याचें धाडस केलें असावें. असे धाडसी
व स्वामिनिष्ठ नोकर शिवाजीचे पदरीं पुष्कळ होते. तेव्हां पांडुरंगानें शिवाजी
महाराजांचा वेष घेऊन पठाणास आडमार्गास लाविलें. असल्या पौराणिक
लापणिकेवर भरंवसा ठेवण्यापेक्षां वरील तर्कच सयुक्तिक आहे, असें अलिकडील
शिक्षित तार्किकांचें मत आहे. परंतु ज्या लापणिकेनें भाविक लोकांस ईश्वराच्या
आगाध लीलेचें कौतुक वाटतें व त्यांची त्याच्यावरील श्रद्धा व भक्ति वाढते त्या
लापणिकेच्या सत्यतेविषयीं आपल्या कपोल कल्पित तर्कानें लोकांमध्यें संशय
उत्पन्न करण्यापासून लोकांना धार्मिक उन्नतीच्या बाजूनें कांहीं फायदा होत
नाहीं व आपल्यासही कांहीं लाभ होत नाहीं म्हणून असल्या वादांत पडण्यांत
कांहीं अर्थ नाहीं. असें आमचें मत आहे. निबंधमालेंत (अंक ६५ पृष्ठ २३-२४)
तर तुकाराम महाराज व शिवाजी यांच्या भेटीविषयींच संशय घेतला आहे.
आणि ह्या संशयाला सबळ पुरावा काय तर, शिवाजीचा जन्म शके १५४९ त
झाला व तुकाराम माहाराजांच्या प्रयाणकाळीं त्यांचें वय अवघें २२ वर्षांचें
होतें. ह्या वयांत शिवाजीला कारकून घोडे व द्रव्यवगैरे नजराणा पाठविण्याचें
सामर्थ्य आलें कोठून ! परंतु ह्या अक्षेपकांस हें माहीत असलें पाहिजे कीं,
शिवाजीनें अगदीं अल्पवयांतच तोरणा किल्ला घेतला व [illegible] द्रव्य
सांपडलें. शिवाय शके १५७० पर्यंत म्हणजे त्याच्या वयाच्या २१।२२ वर्षांच्या
वयाच्या सुमारास राजगड, सिंहगड, पुरंदर, रायगड, पन्हाळा, विशाळगड,
रांगणा वगैरे किल्ले, चाकणचें ठाणें, सुपें, कल्याण, राजापुर वगैरे प्रांत, शहरें व
वरील किल्याखालचा मुलूख त्याच्या ताब्यांत आलेला असून [illegible]
३००० हजार स्वार व १०००० पायदळ इतकी फौज होती. येवढें सामर्थ्य
ज्यास आलें होतें त्याच्याजवळ कारकून, घोडा व [illegible] तुकारामबु-
वास नजर पाठविण्यास मिळणार नाहीत हें म्हणणें संभवनीय [illegible]
असें कीं, शिवाजी व रामदासस्वामी यांची भेट झाल्यानंतर [illegible]
म्हणजे दोन तीन वर्षांतच तुकारामबुवा स्वर्गास गेले. यावरून शिवाजी
महाराजांच्या व तुकारामबुवांच्या भेटीचा काल जवळ जवळ [illegible]
आहे; त्याविषयीं शंका घेण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. असो.

तुकाराम महाराजांचा काल हा महाराष्ट्रांतील धर्मसंस्थापनेचाच काल होता,
असें म्हटलें असतां हरकत नाहीं. यावेळीं मुसलमानांनीं सर्व महाराष्ट्र व्यापिला
असून विजापूर, गोंवळकोंडा व अहमदनगर येथें त्यांचीं प्रबळ राज्यें स्थापन
झालीं होतीं व त्यांची सत्ता कर्नाटकापर्यंत जाऊन पोहोंचली होती. दक्षिणे-
तील पुरातन राजघराणीं बहुतकरून नष्ट झालीं होतीं. हिंदुधर्म [illegible]
च्या अमलाखालीं ते वागवितील तसें वागणें भाग झालें होतें. त्यांचा कैवारी
व पुरस्कर्ता त्यावेळीं कोणी उरला नव्हता. मोठे मोठे शूर मराठे सरदार मुसल-
मानांच्या नोकरींतच भूषण मानून त्यांच्या कामगिरींत इनाम व शौर्य गाज-
विणें हेंच आपलें कर्तव्य समजत होते. मुसलमानी राज्यांत [illegible]

नसल्यामुळें 'बळी तो कान [illegible]' अशी स्थिति झाली [illegible] नेहमीं बंडें, खान्या, लुटालूट वगैरे चालू असून त्यांत प्रजेवर [illegible] जुलूम होऊन तिची [illegible] असे. लोकांचें जीवित व [illegible] सुरक्षित नसे. त्यांतच [illegible] व सत्तेनें धुंद झालेले [illegible] समजून [illegible] मुसलमान [illegible] हहास [illegible] बाबतींत हिंदूंना [illegible] छळ मांडिला होता. त्यांचें [illegible] त्यांनें [illegible] आर्थ अशी बाहेर [illegible] घडत होती. देवळें पाडून त्या जागीं मशिदी [illegible], मूर्ति भ्रष्ट करून फोडण्याचा, प्रसिद्ध ठिकाणीं व [illegible] निर्दयपणें गोवध [illegible], ब्राह्मणांस व इतर हिंदूंसही [illegible] धरून [illegible] त्यांना नाना-[illegible] देण्याचा क्रम सपाट्यानें चालला होता. त्यावेळीं [illegible] 'दे माय [illegible]' असें होऊन गेलें होतें. [illegible] ह्या [illegible] धर्मछळामुळें अतिशय [illegible] गेलें होतें व अशा वेळीं [illegible] निष्ठा व प्रीति त्यांच्या [illegible] उत्पन्न करून [illegible] निस्सीम प्रेम व जूट [illegible] निरपेक्ष महात्मे व [illegible] मोठ्या [illegible], [illegible] व [illegible] शत्रूंच्या तोंडावर [illegible] शौर्य [illegible] निर्माण होण्याची अवश्य-कताच होती. [illegible] अशा [illegible] व [illegible] त्या काळीं जन्म होऊन ते आपलीं [illegible] कर्तव्यें [illegible] बजावीत होते. एक-नाथस्वामी याच [illegible] पहिल्या पादांत होऊन गेले व हे [illegible] व [illegible] झाले. त्या [illegible] रामदास, [illegible] तुका-राम महाराज यांच्या सारख्या महा निरपेक्ष व अगाध उपकार करणाऱ्या विभूतींचे जन्म झाले. जयराम [illegible], [illegible], रघुनाथ [illegible], रंगनाथ [illegible] व त्यांचे बंधु आनंद [illegible] हीकर, आनंदमूर्ति [illegible] मानी [illegible] त्र्यंबकनारायण [illegible], [illegible] अचलपुरी [illegible] बोधले [illegible], [illegible] केशव [illegible], [illegible] परमानंद [illegible], [illegible] मोरया [illegible], निवराज [illegible] [illegible], [illegible] वामनस्वामी, [illegible] शेख महंमद [illegible] महा-राष्ट्रांत [illegible] हिंदु धर्माचें रक्षण, लोकांस उपदेशून धर्मश्रद्धा व ईश्वरभक्ति त्यांच्या [illegible] होते, व इकडे [illegible] प्रतापगुणें श्री शिवाजी महाराज व त्यांचे [illegible] नायमंडळ (सरदार, [illegible] वगैरे) आपल्या [illegible] प्रभाव [illegible] दाखवून हिंदुधर्माचें रक्षण करून त्यांच्या [illegible] हिंदुस्थान. शाहीस आपल्या [illegible] [illegible] होते. ह्या सर्व [illegible], आराध्य दैवत, [illegible] होते [illegible] त्या सर्वांचें [illegible], वाचिक व [illegible] पूज्य क्षेत्र श्री पंढरपूर हें होतें व तेथील श्रीविठोबा [illegible] होता. दुष्काळ [illegible] सर्व [illegible] वगैरे [illegible] भाविक लोक [illegible], [illegible], [illegible] वगैरे

भक्तीचा सोहळा मोठ्या, समारंभानें, प्रेमानें, एकदिलानें व आपपर भाव विसरून करीत असत. हा सोहळा तशाच प्रेमानें व अगत्यानें अजूनही चालू आहे व ज्यांच्या नशिबीं हा सोहळा पाहाण्याचें कर्मधर्मसंयोगानें आलें असेल त्याच्या हृदयांत भक्तीभावाचा उमाळा येऊन त्यांची वृत्ति तल्लीन झाल्या वांचून राहिली नसेल. असो. **तुकाराम** महाराजांचा दरसाल आषाढी कार्तिकीला पंढरीच्या वारीला जाण्याचा नियम असे व तेथें वरील संतमंडळीची भेट होऊन त्यांच्या भजन कीर्तनाचा लाभ सर्वांना होत असे. ब्राह्मणाविषयीं **तुकाराम**बुवांची पूज्यबुद्धि होतीच, त्यांतून **रामदास** स्वामींची कीर्ति त्यांच्या कानीं आलीच होती, परंतु **रामदास**स्वामी पंढरीस येत नसल्यामुळें भेटीचा योग त्यांस आला नाहीं. **शिवाजी** महाराजांच्या मनांत **तुकाराम**बुवांविषयीं पूज्यभाव उत्पन्न होऊन त्यांनीं त्यांस बोलावणें पाठविलें त्यावेळीं त्यांनीं **शिवाजी** महाराजांस **रामदास**स्वामींचे ठिकाणीं निष्ठा ठेवण्याविषयीं उपदेशपर पत्र पाठविलें होतें हें वाचकांच्या स्मरणांत असेलच त्यावरून **रामदास** स्वामीविषयीं **तुकाराम**बुवांचे मनांत पूज्यभाव सतत होता हें स्पष्ट दिसतें. **रामदास**स्वामींच्या भेटीचा योग **तुकाराम**बुवांस पहिल्यानें पंढरीसच आला त्यावेळीं त्यांनीं **तुकाराम**बुवांचें कीर्तन तीन प्रहरपर्यंत ऐकिलें, त्यावरून त्यांची योग्यता ध्यानांत आली. तेथें त्यांच्या व इतर संतांच्याही भेटी झाल्या. तेथला तो भक्तिप्रेम, निष्कलंक ऐक्यभाव, संसाराच्या व्यापाविषयीं विस्मृति वगैरे प्रकार पाहून **रामदास**स्वामींना अतिशय संतोष झाला व त्यांचें मन त्याठिकाणीं रमलें. संतांनीं आग्रह केल्यावरून **रामदास**स्वामींनींही तेथें एक दिवस कीर्तन केलें. ह्याप्रमाणें साधुसंतांच्या भेटी, भजन कीर्तन वगैरे सोहळा पौर्णिमेपर्यंत झाल्यावर पौर्णिमेस गोपाळकाला झाला. त्यासमयीं **जयराम**स्वामिनीं **श्रीकृष्णाची**, **निंबराज**बुवांनीं **यशोदेची** व **तुकाराम**बुवांनीं पेंद्याची भूमिका घेतली होती, **श्रीकृष्णाच्या** बाललीलेचे प्रसंग **निंबराज** बुवांनीं करून दाखविले त्या प्रसंगाचे **तुकाराम**बुवांनीं स्वतः रचलेले अभंग त्यावेळीं म्हटले. ह्याप्रमाणें सोहळा संपल्यावर संतमंडळी व यात्रा आपापल्या ठिकाणीं गेली. **रामदास** स्वामींस पूर्वी पंढरीची आवड नव्हती व त्यांस संतमंडळी जेव्हां **विठोबा**च्या दर्शनास बोलावीत तेव्हां 'श्रीरामाचें ठिकाणीं माझें मन जडलें असल्यामुळें इतर कोठेंही जावेंसें वाटत नाहीं' असें तें उत्तर देत असत. परंतु ह्या एकाच प्रसंगानें त्यांच्या मनास पालट पडला व द्वैतभाव नष्ट होऊन अभिमानाचा नाश होण्यास पंढरीसारखें दुसरें क्षेत्र नाहीं असा ह्यांचा ग्रह झाला. प्रथम त्यांनीं **विठोबा**चें दर्शन घेतलें तेव्हां 'हे मनमोहना, मेघशामा रामा, धनुष्यबाण टाकून देऊन येथें विटेवर कटीवर कर ठेवून कां उभा आहेस!' असे उद्गार काढिले व दोन दिवसांनीं कीर्तन केलें त्यांत प्रेमभावानें 'माझें मनास विटेवरी। विठ्ठल चरणीं निरंतरी। जो जो पंढरीसी गेला। तेणें कलीकाळ जिंतिला। **रामदास** ह्मणे पंढरी। नाना साधनेंविण तारी ॥ १ ॥' ह्या व या अर्थाचे अभंग म्हटले. शेवटीं जातेवेळीं 'न विसंबिजे न विसंबिजे। आमुतें पांडुरंगा न विसंबिजे ॥' हें मागणें मागितलें. व "यात्रा सफळ

जाहलों एकी । पुसि पाहतन्या अनेकीं ॥ दृष्टें [illegible] आकाश [illegible] देव सावकाश ॥ भक्त भिन्न ऐसीं कांहीं । [illegible] मोडिलेंसें [illegible] ॥ आदि अंतीं कोणीकडे । देव तिकडे तिकडे ॥ असे उद्गार काढून स्वामींनीं प्रयाण केलें.

पुढें कथा करीत रामदास[illegible] [illegible] असत. तेथें [illegible] भेटी होत. एका कार्तिकी [illegible] रामदास[illegible] गेले होते. त्यावेळेस **शिवाजी** महाराजही प्रधान मंडळासह तेथें आले. त्यासमयीं [illegible] जोध्या व त्यांच्या संतम भेटी झाल्या. तुकाराम[illegible] कीर्तन झालें. [illegible] रामदास[illegible] केलें. [illegible] **शिवाजी** महाराजां- नीं महापूजा केली. तिसरे प्रहरीं रामदास[illegible] शिष्यांस आत्माराम हें त्यांचा दासबोध ग्रंथ वाचून त्याचा अर्थ [illegible] काहीं कु- त्सित लोक आक्षेप घेत व त्यांतील काहीं वचनें निराधार आहेत असें म्हणत असत. [illegible] मानच्या [illegible] त्यांचें निरसन आणि त्यांच्या बंधाच्या शंकांचें निराकरण रामदास[illegible] [illegible] [illegible] करविलें असें सांगतात.

शिवाजी [illegible] मोठा उत्सव [illegible] केला होता. तेथें सर्व [illegible] बोलावून ब्राह्मण भोजन घालावें असा त्यांनीं आपला इरादा **रामदास**[illegible] चाफळ येथें जाऊन कळविला व त्यांस प्रथम आमंत्रण केलें. स्वामींनीं तें मान्य करून सर्व संतजनांस आमंत्रणें पाठविलीं. **तुकाराम**[illegible] आमंत्रण पाठवावें असें स्वामींनीं **शिवाजी**[illegible] [illegible], तेव्हां पूर्वी कारकून घोडे वगैरे पाठवून मी त्यांस बोलावणें केलें होतें, त्यावेळीं ते आले नाहींत व मी [illegible] त्यांच्या दर्शनास गेलों असतां, पुढें द्रव्य नजर ठेवलें त्याचाही त्यांनीं स्वीकार केला नाहीं. त्यावरून ते आताही येतील किंवा नाहीं याबद्दल शंका वाटते ! असें ते बोलले. त्यावरून ' मी येथें आलों आहें असें सांगून पाठवावें म्हणजे ते येतील ' असें **रामदास** स्वामींनीं सांगितलें व त्याप्रमाणें **शिवाजी**[illegible] पालखी [illegible] त्यांस [illegible] पाठविलें. **तुकाराम** [illegible] आमंत्रण स्वीकारून लागलीच निघाले. कारकुनांनीं पालखींत [illegible] विनंती केली. परंतु ते नमन पायीं चालत [illegible] आले. **रामदास**[illegible] पहातांच त्यांनीं साष्टांग [illegible] [illegible] [illegible] वगैरे [illegible] अभंग म्हटला. सर्व संत मंडळी [illegible] आनंदाचा [illegible] व त्यांनीं **रामदास**[illegible] काहीं [illegible]. [illegible] त्यांनीं [illegible]. [illegible] त्यांस विडा व [illegible] देऊन [illegible] सर्व संत मंडळींचें [illegible]. रात्रीं कीर्तनास आरंभ झाला. समर्थांच्या [illegible] पहिलें त्यांनें **शिवाजी** महाराजांनीं पायांत घुंगरू बांधून नृत्य करीत **रामदास**स्वामींचे व इतर अभंग, श्लोक, पदें वगैरे म्हणत कीर्तन केलें. नंतर स्वामींच्या शिष्यिणी वेणूबाई, आक्काबाई व बाहिणाबाई यांच्याकडून त्यांनीं कीर्तन करविलें. नंतर **वामनस्वामींचें** कीर्तन होऊन त्या रात्रीचा समारंभ आटोपला. **दुसरें दिवशीं**

तिसरे प्रहरपासून कीर्तनास आरंभ होऊन प्रथम **निंबराज** [illegible] देवणकर **एक-नाथ**स्वामींचे सांप्रदायी यांनीं त्यांचे अभंग गाऊन कीर्तन केलें. [illegible] संध्यावंदनादि विधि आटोपल्यावर पुन्हा कीर्तनास आरंभ होऊन पहिल्यानें **रंगनाथ**स्वामींनीं व त्यांच्यामागून **जयराम**स्वामींनीं कीर्तन झालें. नंतर **राम-दास**स्वामींचे शिष्य **कल्याण**, **परशराम** व **शिवराम** यांनीं थोडा वेळ कीर्तनें झालीं. शेवटीं समर्थांच्या आग्रहावरून **तुकाराम** हे कीर्तनास उभे राहिले. **तुकाराम**बुवांच्या कीर्तनानें सर्वांचीं अंतःकरणें प्रेमपूर्ण तल्लीन झालीं व सर्वजण नाचूं लागले. **तुकाराम**बुवांनीं कीर्तन नेहमीं ऐकावें असे उद्गार **रामदास**स्वामींच्या व इतर संत मंडळींच्या मुखांवाटे त्यावेळीं निघाले. नंतर तिसरे रात्रीं **रामदास**स्वामींनीं कीर्तन झालें. याप्रमाणें दिवसा [illegible] व रात्रीं कीर्तन असा क्रम महिनाभर चालला होता. [illegible] गणती झाल्यावर समारंभ पुरा झाला. नंतर **शिवाजी**महाराजांनीं समारंभास आलेल्या सर्व साधुसंतांची पादप्रक्षालनपूर्वक पूजा करून ब्राह्मणांस दक्षिणा वाटिली व सर्वांस वस्त्रें दिलीं. **तुकाराम**बुवांची पूजा करितेवेळीं **शिवाजी** [illegible] होन मोहोरा वगैरे आणविल्या होत्या. **तुकाराम** [illegible] कोणास न कळत निघून गेले. तेणेंकरून **शिवाजी** [illegible] त्यावेळीं **तुकाराम**बुवांस चार गांवांची सनद करून देण्याचा **शिवाजी** महाराजांचा हेतु होता. **रामदास** स्वामींनीं '[illegible] राज्य [illegible] तृणवत आहे, महासिद्धींसी हाणुनी लाथा । निष्काम [illegible] । त्यासी मुक्ति नावडती चित्ता । तेथें प्राकृता काय पाड ।' असें सांगून **शिवाजी** महा-राजांची समजूत केली. पूर्वींच करून ठेवलेली चार गांवांची सनद **शिवाजी** महाराजांनीं **तुकाराम**बुवांचे वंशजांस करून दिली. परंतु हल्लीं तीनच गांवें त्यांच्या वंशजांकडे चालत आहेत असें समजतें. हीं तीन गांवें म्हणजे एक खुद्द देहू जमाबंदी रु० २३११, दुसरें किन्हई जमाबंदी रु० [illegible] व तिसरें एलवाडी जमाबंदी रु० १२०० हीं होत. या गांवांचे वसूली वगैरे संबंधाचे खर्च वजा जातां निवळ उत्पन्न अनुक्रमें रु० [illegible], [illegible] व [illegible] रु० आहे. या गांवांपैकीं एलवाडीचें उत्पन्न **तुकाराम**बुवांचे थोरले मुलगे महादेव व विठोबा यांच्या वंशजांकडे, देहूचें **तुकाराम**बुवांचे धाकटे मुलगे नारायण-बुवा यांच्या वंशजांकडे व किन्हईचें देवाच्या सेवेकडेस लावून दिलेलें आहे, असें कळतें. असो.

ह्या सज्जनगडावरील समारंभानंतर **तुकाराम** महाराज लवकरच स्वर्गास गेले असें दिसतें. त्यांच्या स्वर्गारोहणाविषयीं हकीकत [illegible] पंढरी-च्या वारीविषयीं त्यांच्या ठिकाणीं किती दृढ प्रेम वसत होतें यांविषयीं थोडेंसें सांगतों. **तुकाराम** महाराज पंढरीच्या आषाढी [illegible] वारीला कधीं चुकत नसत. एकदां एका वारीला **तुकाराम** [illegible] आजारी होते. त्यांना इतक्या लांब पायांनीं चालत जाण्याची मुळींच शक्ति राहिली नव्हती. मनाला पंढरीला जाण्याचा ओढा लागलेला असल्यामुळें त्यांचा जीव फार तळमळे, परंतु इलाज नव्हता. इतक्यांत त्यांच्या सहवासानें मनांत

भक्ति वाढविल्यामुळे चवदाशे लोक पंढरीच्या वारीला आळंदीहून [illegible] आले. तुकाराम [illegible] पाहून काय [illegible] व ह्या [illegible] आपल्याला पंढरीचे दर्शन होत नाही हे मनांत [illegible] त्यांना [illegible] वाटले. त्यांनी [illegible] आपली दुर्बल [illegible] प्रेम वर्णन करून [illegible] अभंगांचें ([illegible]) पत्र [illegible] दिले व सद्गदित अंतःकरणानें तें विठ्ठलास पाठवून [illegible]. वारकरी पत्र घेऊन जात असतांना तुकाराम [illegible] महानच होते. तुकारामा [illegible] मागें परतेना. [illegible] आज आपण [illegible] अंतरलों हे मनांत [illegible] व डोळ्या-वाटे आसवांचा प्रवाह. तुकाराम [illegible] वारकऱ्यांच्यानेंही पुढें [illegible] तुकाराम [illegible] व प्रेम पाहून सद्गदित होत व [illegible]. [illegible] मोठ्या कष्टानें निरोप घेऊन वारकरी पुढें चालले [illegible] त्यांनीं आपल्या मनाच्या [illegible] आपली [illegible] (१३२०-१३३८) पंढरीस [illegible] पत्र पंढरीनाथ वाचून [illegible] व [illegible] पुन्हा देहूस आले. [illegible] तुकाराम [illegible] आपल्याला ज्या ठिकाणीं [illegible] होते, त्याच ठिकाणीं [illegible]. [illegible] वारकऱ्यांस पाहतांच तुकारामबुवांस [illegible] आनंद [illegible] त्यांनीं त्यांस साष्टांग दंडवत घातला. सर्वांस आलिंगन [illegible] पुन्हा पुन्हा [illegible] लागले. [illegible] १३३९-१३३६ अभंग केले. [illegible] समाधान झालें.

तुकारामबुवांचें औदासिन्य व त्याग.

तुकारामबुवांची [illegible] वाटली. [illegible] अनुतापाचीही वाटले. भाविक लोक त्यांना आदरानें आपल्या गांवीं आणीत व [illegible] कीर्तनें [illegible]. [illegible] कोठें कोठें नगर त्यांना [illegible] भोजन [illegible] भाविक लोकांची गर्दी [illegible] अन्नाहार वगैरे अन्न सेवन करण्याचा त्यांचा [illegible] व [illegible] आशेच्या [illegible] आपण [illegible] त्यांना भीति वाटूं लागली व त्यांना ह्या [illegible] आला. [illegible] उदास [illegible] लागलेल्या लोकांचा [illegible] लागले. [illegible] दुसऱ्या [illegible] सांगत. ते [illegible] करावें कीं, [illegible] त्यांनीं [illegible] दूर

झाल्यास अभंगांतच द्यावें असा क्रम धरिला. त्यांनीं विठ्ठल नामस्मरणावांचून इतर बोलणें बोलावयाचें सोडून दिलें अल्पाहार करावा, निद्रा थोडी घ्यावी व रात्रंदिवस नामसंकीर्तन करावें. कीर्तनांत ते, ' पांडुरंगा तुझ्या नामस्मरणांत अंतर येऊं देणें यासारखें घातक पाप दुसरें कोणतेंच नाहीं, याकरितां आयुष्य कमी कर, परंतु गात्रांस शिथिलता येऊं देऊं नको ' असें अलिकडे प्रतिपादन करूं लागले. त्यांना जणूं आपला अंतकाल नजीक आला हें समजलें होतें. अशा तऱ्हेचा त्यांच्या वृत्तींत पालट पडत चालला. सर्वांत लोहगांवाच्या लोकांची त्यांच्यावर विशेष भक्ति बसली होती व ते वारंवार त्यांस आपल्या गांवीं नेऊन त्यांना कित्येक महिनेपर्यंत ठेवून घेत असत. तेथें त्यांचा मुक्काम असे, तेव्हां रात्रंदिवस ईश्वरनामस्मरण, भजन, कीर्तन वगैरे भक्तीचे प्रकार चालत असत. ह्यामुळें तेथील लोकांमध्यें धर्म व नीति दृढ बाणली होती. ईश्वर कृपेनें त्यांचे व्यवहारही चांगले चालून त्यांची सांपात्तिक स्थिति चांगली सुधारली होती. आनंद व भगवद्भक्तीविषयीं प्रेम लोहगांवीं पूर्ण नांदत होते व त्यामुळें **तुकाराम**बुवांसही इतर ठिकाणापेक्षां तेथें राहणें अधिक प्रिय वाटत असे. त्यांच्या देहावसानापूर्वीं ते तेथेंच होते, भजन कीर्तनाचा महिनाभर सारखा सपाटा होता. परंतु हे सुखसोहाळे त्यांना फार दिवस लाभावयाचे नव्हते. एके वेळीं **तुकाराम**महाराज तेथें असतांनाच परचक्र येऊन लोहगांवकरांची सर्व संपात्ति लुटली गेली, त्यांचे फार हाल झाले व ते निराश्रित अनाथ बनले. ही त्यांची स्थिति पाहून **तुकाराम**बुवांस अतिशय वाईट वाटलें. व त्यांची उदासीनवृत्ति अधिक वाढली. **तुकाराम**महाराजांच्या उपदेशामुळें लोहगांवकरांचा संपत्तिविषयींचा लोभ कमी झाला होता, ह्यामुळें, त्यांस आपलें सर्वस्व गेल्यामुळें फारसें वाईट वाटलें नाहीं. परंतु पुढें काय करावें ह्याबद्दल मात्र त्यांना अतिशय काळजी वाटून ते उद्विग्न झाले होते. **तुकाराम**-बुवांनीं आपल्या वैराग्यपर अभंगांनीं त्यांचें सांत्वन केलें, परंतु ह्यांची स्वतांची वृत्ति फारच उदासीन झाली व ते मृत्युलोकच्या वस्तीस अगदींच कंटाळले. ' पांडुरंगा एकदांचें आतां येथून ने ' अशी ते देवाची प्रार्थना करूं लागले. लोहगांवकर तर **तुकाराम**बुवांच्या उपदेशानें विरक्त बनलेच होते, पण त्यांचें सर्वस्व लुटलें गेल्यामुळें त्यांची विरक्ति अधिकच वाढली व त्यांच्यापैकीं कित्येक **तुकाराम**महाराजांच्या नेहमीं सहवासांत राहून त्यांचें भजन व कीर्तन ऐकावें ह्या हेतूनें त्यांच्या बरोबर देहूस येऊन राहिले. पुढें कांहीं दिवसांनीं फाल्गुनांतील उत्सव आला, त्यावेळीं इतर गांवचेही कांहीं लोक तेथें आले. ह्या समयीं **तुकाराम**बुवा अतिशय विरक्त झालेले दिसत होते. त्यांनीं फाल्गुन वद्य १ ला सर्व रात्रभर कीर्तन केलें. कीर्तनसमयीं विठ्ठलाचे ठिकाणीं त्यांचें इतकें प्रेम जडलें होतें कीं, त्यांस देहभान देखील राहिलें नव्हतें. आज वैकुंठास जाण्याची पुष्कळ दिवसांची आपली आवडती इच्छा पूर्ण करण्याकरितां **पांडुरंग** आपल्या समोर उभे आहेत. आपल्यास नेण्याकरितां विमान आलें असून **देवगण** आपली वाट पहात आहेत. अशा तऱ्हेचा दृढ भास त्यांना झाला. वैकुंठपुरीला जाण्याची आपली सर्व तयारी झाली व तेथलें

अक्षय मुक्त [illegible] आपली पायकी व भक्तमंडळी येईल तर बरें, असें मनांत घेऊन त्यांनीं त्याप्रमाणें सर्वांस [illegible]. अलीकडे तुकारामबुवा कांहीं जावयाचें आल्याम ' वैकुंठास जातों ' म्हणून [illegible], त्याप्रमाणेंच आम्ही कांहीं [illegible] भाग असतील असें जिजाईनें ' मी पांच महिन्यांची गरोदर आहें, मनांत घरीं पोरवडा आहे, मी कशी येऊं ? ' म्हणून सांगून पाठविलें. त्यावरून तुकारामबुवांनीं ' घरीच द्वारचे [illegible] भजा, बाइलांना माळा देऊन सांगा ' अशा आशयाचा अभंग म्हणून सर्वांचा निरोप घेतला व देवाला नमस्कार करून नामघोष करीत ते [illegible] बाहेर पडले. तुकाराम [illegible] असें [illegible] बरील आशय व त्यांची त्या वेळची वृत्ति पाहून, ' महाराज खाच [illegible] जात आहेत, पुन्हा परत येण्याचा त्यांचा इरादा दिसत नाहीं, आतां [illegible] त्यांचा नित्य सहवास अंतरणार ' हें मनांत घेऊन सर्वांना अतिशय वाईट वाटलें. त्यांच्यावर निस्सीम प्रेम करणाऱ्या त्यांच्या [illegible] डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या. तुकारामबुवा हा मंडळीसह भजन करीत [illegible] कांहीं आले [illegible] त्यांनीं निर्वाणाचे [illegible] ([illegible]) अभंग म्हटले. ह्या अभंगांतील निर्वाण व वैराग्य यांवरील तुकारामबुवांचे [illegible] उद्गार ऐकून मंडळीस अतिशय गहिंवर आला व कित्येक कोमल्या मनाचे भाविक लोक स्फुंदस्फुंदून रडूं लागले. रामेश्वरभट [illegible] विनंति करून त्यांचे पाय धरून त्यांनीं ह्या लोकच्या [illegible] आणीं [illegible] करावी. अशी कांहीं मंडळी विचार करीत आहे, तोंच तुकाराम [illegible] अदृश्य झाले. तुकारामबुवा नाहींसे झाले हें पाहून एकच आकांत झाला. [illegible] दुःखित होऊन शोक करूं लागला. ही बातमी ऐकून जिजाई [illegible] धांवत आली व ' मी त्यांच्या समागमें [illegible] तर बरें झालें असतें ' असें म्हणून [illegible] ओरडून ऊर बडवून घेऊं लागली. कांहीं वेळानें सर्वांना [illegible] ऐकून हा महापुरुष कदाचित् आपली करुणा येऊन परत येईल [illegible] गेलें, तेथेंच [illegible] राहिले. पुढें [illegible] जिजाईसह घरीं गेले. रामेश्वरभट, [illegible], [illegible], गंगाजी [illegible] [illegible] ' महाराज तुकाराम देवा नाम घ्यावें [illegible] ' [illegible] संधी नाहीं. त्या वेळीं [illegible] करून तुकारामाच्या निर्याणासंबंधीं [illegible] ([illegible]) अभंग केले. त्याप्रमाणें ही मंडळी पंचमीपर्यंत निर्याणाची [illegible]. पंचमीचे दिवशीं सकाळीं तुकाराम [illegible] राख व गोदडी वरून आली पडली. त्यावरून तुकाराम [illegible] गेले अशी मंडळींची [illegible] व हा [illegible] निरोप पाठविला असें समजून [illegible] घरीं परतले. नंतर तुकारामबुवांची प्रयाणतिथि कोणती [illegible] ज्या दिवशीं त्यांची गोदडी व राख [illegible], [illegible] दिवशीं तुकाराम [illegible] गेले असा रामेश्वरभटांनीं निश्चय [illegible] दिवशीं त्यांच्या प्रयाणाभिमानानें ब्राह्मण-

भोजन वगैरे घालून दोन दिवस कीर्तन झालें व सप्तमीला लळीत करून मंडळीनें उत्सव पुरा केला. ह्याप्रमाणें फाल्गुन व० ५ शके १५७२ रोजीं **तुकाराम**बुवा आपल्या देहाचें सार्थक करून स्वर्गवासी झाले.

तुकारामबुवांच्या प्रयाणकाळीं **जिजाई** पांच महिन्यांची गरोदर होती हें मागें सांगितलेंच आहे. ती योग्यकाळीं प्रसूत होऊन तीस मुलगा झाला. त्याचें नांव **नारायण** असें ठेविलें. तो पुढें धर्मनिष्ठ निपजला. त्याच्या सात्विक व धार्मिक वृत्तीमुळें त्याचे दोघे वडील बंधु **महादेव** व **विठोबा** त्याच्या आज्ञेंत वागत असत. तो वंशपरंपरा चालत आलेला भक्तिमार्ग म्हणजे पांडुरंगाची पूजा अर्चा, नामस्मरण, भजन व कीर्तन करीत असे. त्यास **तुकाराम**बुवांचे अभंग पाठ असत. एकदां **शिवाजी** महाराज देहूस आले असतां **नारायण**बुवांची वृत्ति पाहून फार संतुष्ट झाले व त्यांनीं पूर्वी संकेत केल्याप्रमाणें, **तुकाराम**बुवांचा अतिक्रम पुढें चालवावा ह्मणून देहू, किन्हई व एलवाडी ह्या गांवांची सनद त्यांस करून दिली. **नारायण**बुवांनीं ह्या वैभवाचा कांहीं दिवस उपभोग घेतल्यानंतर त्यांस वैराग्य प्राप्त झाले व त्यांनीं सर्व संपत्ति ब्राह्मणांस दान करून आपण द्वारकेस निघून गेले. नंतर तेथून ते महायात्रेस निघून गेले. त्यांनीं अकरा कावडी गंगाजळ आणून रामेश्वराची पूजा केली. त्यांचें सर्व आयुष्य याप्रमाणें भगवद्भक्तींत व तीर्थयात्रेंत गेलें. त्यांनीं आपल्या वडील भावाच्या थोरल्या बायकोचा मुलगा **उद्धव**बुवा यास दत्तक घेतलें. **उद्धव**बुवांचे पणतु **सदानंद**बुवा व त्यांचे तिघे पुत्र **नारायण**बुवा, (यांजकडेच हल्लीं पूजा अर्चा वगैरे मानपान आहे.) **रामचंद्र**बुवा व **गंगाराम**बुवा हे होत पैकीं **रामचंद्र**बुवा व **गंगाराम**बुवा हे हल्लीं मयत आहेत. यांस संतान मुलींच झालें नाहीं. **रामचंद्र**बुवांचे पोटींही कांहीं संतान नाहीं. धाकटे **गंगाराम**बुवा यांस मात्र एकच मुलगा आहे. त्याचें नांव **विष्णु**बुवा. हेच पुढें पूजाअर्चादि मानपानाचे अधिकारी होणार **विष्णु**बुवाला तुकारामादि साधुपुरुषांचे अभंग, पदें वगैरेचें साधारण पाठांतर असून ते कीर्तनही करीत असतात. त्यांनीं अधिक अभ्यास करून भक्तिमार्ग वाढविण्याचा आपल्या वडिलांचा कुलधर्म चालवून त्यांचें नांव राखावें अशी आमची त्यांस विनंति आहे.

तुकारामबुवांच्या पाठीमागून त्यांच्या वंशजांपैकीं कोणी एक पुरुष भाऊबंदकीच्या तंट्यामुळें पंढरपुरास जाऊन शेंदोडशें वर्षांपूर्वी राहिला होता. त्याचे वंशज हल्लीं पंढरपुरास असून त्यांनीं आपल्या वडिलांचा सांप्रदाय स्वतंत्रपणें तिकडे चालविला आहे. त्याचप्रमाणें ग्वाल्हेरकडेही कोणी पुरुष फुटून निघून गेला होता. त्यांचेही वंशज हल्लीं तिकडे हयात असून आपल्या कुळांतील भक्तिमार्गाचा प्रसार त्यांनीं तिकडे केला आहे. त्यांचे तिकडे बरेच अनुयायी व शिष्य असून कांहीं मंडळी पंढरीच्या आषाढी कार्तिकीच्या वारीला येत असते.

उपसंहार.

वरील थोडक्यावरून **तुकाराम**बुवांस परमेश्वराच्या भक्तिमार्गाची दिशा कशी लागली, संसारांतील अनेक दुःखांनी व अडचणींनीं त्यांच्या अंगीं वैराग्य कसें बाणत गेलें, लौकिक व्यवहाराविषयीं ते किती उदासीन होते, त्यांनीं ईश्वरविषयक ज्ञान कसें संपादन केलें व तें त्यांच्या प्रेमळ व सात्त्विक अंतःकरणांत किती दृढतेनें ठसलें होतें [illegible] वाचकांस बोध होईल. त्यांचे वडील **बोल्होबा** व आई **कनकाई** [illegible] असून त्यांना [illegible] व भजन [illegible] होता. त्यांच्या प्रेमळ सद्-भावानें **तुकाराम**बुवांस भगवद्भक्तीची दिशा लागली. त्यांनीं अल्पवयापा-सून भजन करावें [illegible] **तुकाराम**बुवांनीं त्यांच्यापासून बराच भक्तिपूर्वक अभंग म्हणावे व **विठ्ठल**नामाचा [illegible]. आईबापांपासून हा ठेवा त्यांना लहानपणापासून मिळाला होता [illegible] व करून त्यांनीं [illegible] मनांत मा-[illegible] प्रेम व [illegible] आहे. [illegible] बाप वारले [illegible] त्यांना बहुतकरून भावा [illegible] दुःखाने व [illegible] [illegible] शब्द [illegible] त्यांनीं आपल्या [illegible] वाणीनें [illegible] आईबापांना [illegible] व [illegible] त्यांचें [illegible] [illegible] आणि [illegible] [illegible] [illegible] [illegible] आप [illegible] [illegible] या [illegible] आईबापांनीं [illegible] [illegible] भावा [illegible] त्यांनें [illegible]. असो. **तुकाराम**बुवांस या-[illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible], [illegible] [illegible] बी [illegible] त्यांनीं [illegible] [illegible] [illegible] [illegible] केलीं, [illegible] सामान्य व्यवहारांत सामान्य लोकांशीं कसें [illegible] वागावें लागतें, आपल्या [illegible] लोकांशीं कसें ममत्व धरावें लागतें, [illegible] पडलें तरी [illegible] कसें निभावून न्यावें लागतें [illegible] आपल्या मित्राशीं [illegible] कसें ममत्वानें व [illegible] वागावें लागतें, [illegible] गोष्टी त्यांना [illegible] करून आल्या आणि त्या केवळ आपल्या व आपल्या कुटुंबांतील माणसांच्या पोटापाण्यासाठीं व

सुखासाठीं इतरांच्या सुखदुःखाविषयीं बिलकुल विचार व परवा न करितां करणें, हें त्यांच्या सत्यनिष्ठ दयाळू, धीर व उदार स्वभावास मुळींच अनुकूल असें नव्हतें. पुढें थोड्या अंतरानें आईबाप वारले व त्यांच्या मागून एक वर्षानीं थोरल्या भावाची बायकोही वारली, तेव्हां या मृत्युलोकचीं वस्ती किती अनिश्चित व क्षणभंगुर आहे आणि असें असून आपल्या सुखासाठीं इतरांच्या अडचणीकडे व दुःखाकडे लक्ष्य न देतां पैसा मिळविण्याची हांव धरून [illegible] व निष्ठुरपणाचे व्यवहार करणें किती वेडेपणाचें व अज्ञानपणाचें आहे, वगैरे तशा प्रसंगीं साहजिकपणेंच सर्वांच्या मनांत येणाऱ्या वैराग्यपर विचारांनीं त्यांच्या स्वभावांत भर पडून ते व्यवहाराविषयीं उदासीन झाले. वडील बंधु सावजी संसारांत लक्ष न घालतां विरक्त बनून देशांतरास निघून गेला. त्यामुळें आईबाप निवर्तल्यावर सर्वांच्याच पोषणाचा बोजा तुकारामजींवर पडला, परंतु जगांतील व्यवहार करण्यास ते समर्थ झाल्यामुळें ते आपल्या स्वभावाप्रमाणें करूं लागले. लोकांस जिन्नस देऊन त्यावर नफा मिळविणें [illegible] त्यास नाडणें व त्यांच्याकडील पैसे वसूल करण्यासाठीं त्यांजवर सक्ती करणें म्हणजे त्यांच्या स्थितीविषयीं निष्ठुरता व बेपरवाई दाखविणें असा समजुतीनें ते धंदा करूं लागले, तेव्हां त्यांस त्यांत किफायत ती कशी होणार ! त्या त्या धंद्यांत [illegible] अंगावर येऊन ते बुडाले त्यांत मोठेसें नवल नाहीं. वडिलांनीं बराच संचय करून ठेविला असल्यामुळें तुकारामजींस [illegible] [illegible] लागत असे तरी त्यांस कांहीं दिवस कुटुंबपोषणाची अडचण पडली नाहीं. परंतु त्या संचयांत रोजगार धंद्यानें भर न घालतां तुकारामजी [illegible] आपल्या दयाळू व उदार स्वभावास अनुसरून त्यांतूनच [illegible] गरीबगुरिबांस मदत करूं लागले. तेव्हां तो संचय किती दिवस पुरणार ! खर्चाच्या मानानें [illegible] होत नव्हतें तेव्हां सर्व नाहींसें झालें. धंदा करण्यासाठीं [illegible] नाहीं व कुटुंबांतील माणसांचे अन्नवस्त्रावांचून हाल होऊं लागले. हे हाल अर्थात् तुकारामबुवांस पहावेनात. कांहीं तरी धंदा करून प्रपंच चालविला पाहिजे असें ह्या वेळापासून त्यांच्या मनांत वागत होतें, असें लोकांचें कर्ज काढून त्यांनीं जे अनेक धंदे केले त्यांवरून दिसून येतें, परंतु अनेक धंद्यांत, व्यवहारासंबंधीं तुकारामबुवांची [illegible] समजूत व त्यांचा दयाळू व सत्यनिष्ठ स्वभावाचा त्यांच्या मनावर अतिशय पगडा असल्यामुळें त्यांस नुकसानच येत गेलें. धंद्यासाठीं व [illegible] केलेलें कर्ज फेडण्यास कांहीं साधन दिसेना तेव्हां सावकारांनीं त्यांवर फिर्याद केली व त्यांचें दिवाळें निघालें. अशा प्रसंगीं त्यांच्या आप्तइष्टांनीं त्यांना कांहीं आधार दिला, परंतु वाडवडिलांच्या कालांत त्यांना जो मान होता तो मुळींच राहिला नाहीं. जिकडे तिकडे त्यांची छी: थू: झाली व घराबाहेर तोंड काढावयास जागा राहिली नाहीं. तुकारामबुवांची व्यवहाराविषयींची कल्पना व थोर स्वभाव साधुत्वास त्यांची गणना होण्यास योग्य होता. जगिक व्यवहारांत तो सुखकारक नव्हता. तथापि आपल्या मनास वाटणाऱ्या व न्याय वाटणाऱ्या गोष्टी जगांत संसारिक बनून वागावयाचें असल्यास किती निरुपयोगी आहेत व त्यांच्या अनुरोधानें वागलें असतां जगांत कशी छि: थू: व

कांतिर्न होते त्याबद्दल **तुकाराम**बुवांस जरी पूर्ण अनुभव आला होता, तरी आपला संसार चालून कुटुंबांतील माणसांस खूष व्हावें ह्या सबब इच्छेच्या दृष्टाबाळीं [illegible] झगडा करून इतर लोक जसे वागतात, त्याप्रमाणेंच आपल्यासही वागणें भाग आहे असें **तुकाराम**बुवांच्या कधींही मनांत आलें नाहीं. आपल्या मुलाबाळांस दुखणें येऊन होते असलीं तरी [illegible] लक्ष देण्याचें कारण नाहीं असा ईश्वराचा हेतु नाहीं. [illegible] आपलें हाल झालें तरी दुसऱ्याला सुख होईल असेंच [illegible] इच्छा दिसते, हें **तुकाराम**[illegible] आलेल्या विपत्तीबद्दल कांहीं दुःख वाटलें [illegible] राकडे आपलें ध्यान [illegible] आनंद मानिला आहे. **तुकाराम**बुवांना [illegible] स्वभाव यांचा फायदा घेऊन लोकांनीं [illegible] नाहीं व त्याच्याकडून आपलीं [illegible] वर्षांतील एक दोन गोष्टींवरून दिसून येतें. **तुकाराम**[illegible] मतलबीपणाविषयीं कांहींच [illegible] येत नाहीं. त्यांनीं आपल्या अभंगांत [illegible] आहे, त्यावरून त्यांचें मनःस्थितीचें [illegible], परदुःखाविषयीं कळवळा वगैरे सर्व [illegible] होत्या, परंतु अशा तऱ्हेनें वागणाऱ्या [illegible] त्यांची कींव येत असे व अशा [illegible] भक्तिमार्गाकडे [illegible] त्यांचा नेहमीं [illegible] **जिजाई** आपल्यावर एकनिष्ठ प्रेम करणारी आहे, हें **तुकाराम**[illegible] ते तिच्या रागाच्या [illegible] संसाराविषयींचा ओझा सोडून [illegible] म्हणून त्यांनीं तिला पुष्कळ वेळां बोध केला, परंतु [illegible] पाहून त्यांना फार वाईट वाटत असे. हें त्यांच्या अभंगांतील उद्गारावरून दिसतें. त्यांनीं ग्रंथावलोकन व एकांत मनन करून आपल्या इंद्रियांवर [illegible] काम, क्रोध, मद, मत्सरादि यांचा [illegible] शरीरांतील [illegible] करण्याचें त्यांनीं [illegible] आहे. **मंबाजी** व **रामेश्वरभट्ट** हे [illegible], परंतु [illegible] त्यांस [illegible] **तुकाराम**[illegible] निंदकपणानें [illegible] त्यांचीं गूढ उमगण्याचा [illegible] आपल्या लोभानें [illegible] **तुकाराम**[illegible] निंदेस व निंदकसाधूंनां [illegible] पाहून त्यास [illegible].

तुकारामबुवांचा योग्यता लोकांस कळल्यावर त्यांचा फारसा छळ नाहीं. लोकांस त्यांची [illegible] पाहून हजारों लोक त्यांचे

झाले व ठिकठिकाणीं मोठ्या आदरानें त्यांची समाराधना होऊन ते भगवद्भजन व कीर्तन करून लोकांना भक्तिमार्गास लावण्यांत निमग्न होऊन गेले. त्यांनीं संसार सोडिला नव्हता तथापि कुटुंब पोषणाची काळजी मात्र त्यांनीं केव्हांच सोडून दिली होती. सर्वांच्या निर्वाहाची काळजी वाहणारा तोच एक परमेश्वर आहे, तोच सर्वांना अन्नपाणी पुरवितो. आपली काळजी व्यर्थ आहे, अशा दृढ समजुतीनें त्यांनीं आपल्या बायकोच्या व मुलाबाळांच्या पोटाची काळजी केली नाहीं. अन्नाच्छादनासाठीं काळजी करणें व्यर्थ आहे अशाविषयीं त्यांनीं कित्येक अभंग केले आहेत. **तुकाराम**बुवांची साधुवृत्ति पाहून **शिवाजी** महाराजांनीं त्यांस पुष्कळ द्रव्य नजर केलें होतें व त्यांस कांहीं गावें इनाम करून देण्याची त्यांनीं तयारी केली होती, परंतु **तुकाराम**-बुवांनीं त्यांचा मुळींच स्वीकार केला नाहीं, ह्यावरून ते किती निरपेक्ष होते हें कळून येण्यासारखें आहे.

तुकारामबुवांच्या अंगीं कवित्व व वक्तृत्व हे गुण अलौकिक होते. त्यांची कविता साधी, व चटकन मनांत उपदेश ठसविणारी अशी आहे. थोड्या शब्दांत पुष्कळ अर्थगांभीर्य आणण्याची हातोटी त्यांना उत्तम साधली होती अथवा ईश्वर साक्षात्कारानेंच त्यांच्याकडून कवित्व झालें तेव्हां त्यांत अर्थगांभीर्य व प्रसाद यांची उणीव कोठून असणार? त्यांच्या सहज बोलण्यांत मूल्यवान उपदेश भरलेला आढळून येतो. त्यांनीं आपल्या अभंगांत भक्तिप्रेम, नीति, सदुपदेश व ढोंगपरिस्फोट यांचेंच बहुतकरून विवेचन केलें आहे. त्यांस निर्गुण परब्रह्माची पूर्ण ओळख झाली असून सगुण भक्तीमध्येंच विशेष गोडी व महत्व आहे असें त्यांचें मत होतें. असें त्यांच्या कित्येक अभंगांवरून स्पष्ट दिसतें. कर्मर्गाविषयीं त्यांना विशेष प्रीति नव्हती. सगुण मूर्तीची पूजा, नामस्मरण, भजन ध्यान हाच भक्तिमार्ग विशेष श्रेयस्कर आहे असें त्यांचें मत होतें. ह्या मताणें त्यांनीं आजन्म **पंढरी**च्या **विठोबा**ची भक्ति केली. ऐहिक सुखाविषयीं नीं निरीच्छ राहून त्यांनीं आपलें लक्ष पूर्णपणें ईश्वराकडे लाविलें होतें. त्यांच्या उपदेशाप्रमाणें अत्यंत शुद्ध असल्यामुळें लोकांवर त्यांच्या चांगला परिणाम झाला. त्यांच्या अंगीं वक्तृत्वशक्ति फारच होती. दोन चारदां त्यांचें कीर्तन कोणीं ऐकिलें ह्मणजे भक्तिप्रेमाचा होऊन कोणासही विरक्ति उत्पन्न झाल्यावांचून रहात नसे, हे **शिवाजी** राज राजभूषणांचा त्याग करून अरण्यांत एकांतांत जाऊन बसले होते, यावरून व आणखी कित्येक उदाहरणांवरून दिसून येतें. तथापि ईश्वरप्राप्तीसाठीं संसाराचा त्याग करून अरण्य सेवन करावें असें त्यांनीं प्रतिपादन केलें नाहीं. संसारांतील सुखदुःखानें मनास आनंद व खेद न होऊं देतां, नेहमीं नामस्मरण व चिंतन करावें, नीतीनें वागावें व कर्ता करविता समर्थ एक ईश्वरच आहे असा पूर्ण भरंवसा ठेवून निरभिमान व निर्विकल्प स्थितीमध्यें असावें यांतच ऐहिक व परमार्थिक सुख आहे, असें त्यांनीं आपल्या अभंगांत सांगितलें आहे. ह्या महापुरुषाचे अभंग स्वानुभवस्फूर्तीनें रचलेले असल्यामुळें [illegible] भरलेली आहे हे अभंग भक्तिपूर्वक

जो वाचील व मनन करील त्याचें मन भक्तिमार्गाकडे वळल्यावांचून कधींही राहावयाचें नाहीं. ह्या भगवद्भक्तानें इतर साधुवैराग्याप्रमाणें जगाची काळजी करणें व कोणी केवळ आत्मोन्नतीच्या दृष्टीनें अरण्यांतील एकांत ठिकाणीं सामान्य लोकांत सोशिकतेनें व निरपेक्षतेनें राहून त्यांची धार्मिक उन्नति करण्यांत आपलें आयुष्य वेंचिलें. ह्या त्यांनीं आपल्या उपकारास करून ठेविला आहे. आणि त्यांनीं उपदेशिलेल्या भक्तिमार्गा सेवन करून लोकांनीं व सदाचरणानें ह्या जगांत आपण आपला अथवा इतरांचा काळ कोणत्याही स्थितींत आनंदानें कंठिला आपण त्या उपकाराचें उतराई होऊं. तुकारामबुवा कायाब्रह्म करून सोडून गेल्यास आज सुमारें अडीचशें वर्षांवर दिवस होऊन गेले, त आपल्या कीर्तीनें व अभंगवाणीनें ह्या जगांत अमरच आहेत. त्यांनीं केला भक्तिमार्ग आजपर्यंत चालत आला आहे व पुढेंही चालत राहील त्यांनीच [illegible] वरकरणी भाव नाहींसा होऊन सर्व भक्तिप्रेम व सांचा [illegible] वृद्धि होत जाईल, तसेंच त्यांच्या आत्म्यास समाधान होईल हें लक्षांत वागवून भजन कीर्तन आषाढी कार्तिकीची वारी वगैरे भक्ति मार्गाचें [illegible] समस्त जनांनीं वागावें व तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीचें नित्य श्रवण, पठण व मनन करावें ही विनंति करून हा लेख आटोपितों.

तुकारामकृत अभंगांची गाथा.

भाग पहिला.

मंगलाचरण.



॥ १ ॥

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ॥ १ ॥
तुळसीहार गळां कासे पीतांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥ २ ॥
मकरकुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणि विराजित ॥ ३ ॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥

॥ २ ॥

राजस सुकुमार मदनाचा पुतळा । रविशशिकळा लोपलिया ॥ १ ॥
कस्तुरीमळवट चंदनाची उटी । रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ २ ॥
मुकुट कुंडलें श्रीमुख शोभलें । सुखाचें ओतलें सकळ ही ॥ ३ ॥
कासे सोनसळा पांघरे पाटोळा । घननीळ सांवळा बाइयांनो ॥ ४ ॥
सकळ ही तुम्ही व्हा गे एकीसवा । तुका म्हणे जीवा धीर नाहीं ॥ ५ ॥

॥ ३ ॥

गरुडाचें वारिकें कासे पीतांबर । सांवळें मनोहर कैं देखेन ॥ १ ॥
बरवया बरवंटा घनमेघ सांवळा । वैजयंती माळा गळां शोभे ॥ २ ॥
मुगुट माथां कोटि सूर्यांचा झळाळ । कौस्तुभ निर्मळ शोभे कंठीं ॥ ३ ॥
ओतीव श्रीमुख सुखाचें सकळ । वामांगीं वेल्हाळ रखुमा देवी ॥ ४ ॥
उद्धव अक्रूर उभे दोहींकडे । वर्णिती पवाडे सनकादिक ॥ ५ ॥
तुका म्हणे नव्हे आणिकां सारिखा । तोचि माझा सखा पांडुरंग ॥ ६ ॥

॥ ४ ॥

धणी न पुरे गुण गातां । रूप दृष्टी न्याहाळितां ॥१॥ बरवा बरवा । पांडुरंग । कांति सांवळी सुरंग ॥२॥ सर्व मंगळाचें सार । मुख सिद्धींचें भांडार ॥३॥ तुका म्हणे सुखा । अंतपार नाहीं लेखा ॥४॥

॥ ५ ॥

राहो आतां हेंचि ध्यान । डोळां मन लंपटो ॥१॥ कोंडुकोंडूनि भरीन । जीवें देहभावें पूजीन ॥२॥ होईल येणें कळसा आलें । विसावलें अंतरीं ॥३॥ तुका म्हणे गोजिरिया । विठोबा पायां पडों या ॥४॥

॥ ६ ॥

आवडे हें रूप गोजिरें सगुण । पाहतां लोचन सुखावले ॥ १ ॥
आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहें । जों मी तुज पाहें पांडुरंगा ॥ २ ॥
लांचावलें मन लागलीसे गोडी । तें जीवें न सोडी ऐसें झालें ॥ ३
तुका म्हणे आम्ही मागावी लडिवाळी । पुरवावी आळी मायबापें

॥ ७ ॥

गरुडावरि बैसोनि येतो जगजेठी । त्याचे चरणीं मिठी घालूं चला १
सांवळें रूपडें देखिलें लोचनीं । शंख चक्र दोन्ही शोभताहे ॥ २ ॥
पीतांबर झळके हेंचि त्याची खूण । वाकी कणगुण [illegible] ॥ ३॥
गरुडाचा चपेटा येत असे नेटें । कस्तुरीमळवट शोभताहे ॥ ४ ॥
पदक एकावळी शोभताहे कंठीं । तुका म्हणे मिठी घालूं चला ॥५॥

॥ ८ ॥

गुणा आला विटेवरी । पितांबरधारी सुंदर ॥१॥ [illegible] ठायीं । मन पायीं राहो हें ॥३॥ निवारोन जाय माया । [illegible] छाया जयाची ॥३॥ तुका म्हणे समाधान । हे चरण सुकुमार ॥४॥

॥ ९ ॥

स्वामी तूंचि कैसा न पडसी डोळां । सुंदर सांवळा घनश्याम ॥१॥
चतुर्भुज माळा कंठें एकावळी । कस्तुरी निढळीं [illegible] ॥ २ ॥
शंख चक्र गदा कंठें वैजयंती । कुंडलें तळपती श्रवणीं [illegible] ॥ ३
तुका म्हणे स्वामी आतां दावी पाय । पांडुरंग माय [illegible] ॥ ४ ॥

॥ १० ॥

धरोनियां फरश करीं । भक्तजनांच्या विघ्नें वारी ॥१॥ ऐसा गजानन महाराजा । त्याचे चरणीं हालो लागो माझा ॥२॥ शेंदुर शमी बहुप्रिय ज्याला । तुरा दुर्वांचा शोभला ॥३॥ उंदिर असे ज्याचें वहन । माथां जडितमुकुट पूर्ण ॥४॥ नागयज्ञोपवीत कंठें । शुभ्र वस्त्र शोभित साजिरें ॥५॥ भावमोदक हरामधि । तुका भावें हे पूजा करी ॥६॥

पौराणिक अभंग.

बाळक्रीडा



॥ ११ ॥

देवा आदिदेवा जगत्रयजीवा । परियेसीं केशवा विनंती माझी ॥१॥
माझी वाणी तुझे वर्णी गुण नाम । ऐसें देईं प्रेम कांहीं कळा ॥२॥
कळा तुजपाशीं आमुचें जीवन । उचित करून देईं आम्हां ॥ ३ ॥
आम्हां शरणागतां तुझाचि आधार । तूं तव सागर कृपासिंधु ॥४॥
सिंधु पायवाट होय तुझ्या नामें । जळती महा कर्में दुस्तरें तीं ॥५॥
तीं फळें उत्तमें तुझा निजध्यास । नाहीं गर्भवास सेविलिया ॥ ६ ॥
सेविलिया रामकृष्ण नारायण । नाहीं त्या बंधन संसाराचें ॥ ७ ॥
संसार तो काय तृणवतमय । अग्नि स्पर्शी भाग क्षणमात्रें ॥ ८ ॥
क्षणमात्रें जाळी दोषांचिया राशी । निंद्य उत्तमासी वंद्य करी ॥९॥
करी ऐसें स्मरण आपलें आपण । पतितपावन दीनानाथें ॥ १० ॥
नाथ अनाथांचा पति गोपिकांचा । पुरवीं निजांचा मनोरथ ॥११॥
चित्तीं जें धरावें तुका ह्मणे दासीं । पुरविता होसी मनोरथ ॥ १२ ॥

॥ १२ ॥

मनोरथ जैसे गोकुळींच्या जना । पुरवावी वासना तयापरी ॥ १ ॥
कृपा करावया अवतार केला । अविनाश आला आकारासी ॥ २ ॥
क्षीण झाला वसुदेवदेवकीस । वधी बाळें कंस दुराचारी ॥ ३ ॥
दुराचारियासी नाहीं भूतदया । आपपर तया पापपुण्य ॥ ४ ॥
पुण्यकाळें त्यांचा राहिलासे उभा । देवकीच्या गर्भा देव आले ॥ ५॥
गर्भासी तयांच्या आला नारायण । तुटलें बंधन आपेंआप ॥ ६ ॥
आपेंआप बेड्या तुटल्या शृंखळा । दाराच्या आगळा किलिया कोंडे ॥७॥

कोंडमार केला होता बहु दिस । सोडवी निमिष न लगतां ॥ ८ ॥
नकळे तो त्यासीं सांगितला भाव । आपणासी ठाव नंदाघरीं ॥ ९ ॥
नंदाघरीं जातां येतां वसुदेवा । नाहीं जाला गोवा सर्व देव ॥ १० ॥
सर्व देव तया आड नये कांहीं । तुका म्हणे नाहीं भय चिंता ॥ ११ ॥

॥ १३ ॥

चिंता ते पळाली गोकुळाबाहेरी । प्रवेश भीतरी केला देवें ॥ १ ॥
देव आला घरा नंदाचिया गांवा । धन्य त्याच्या दैवा दैव आलें ॥२॥
आलें अविनाश धरूनि आकार । दैत्यांचा संहार करावया ॥ ३ ॥
करावया भक्तजनांचें पाळण । आले रामकृष्ण गोकुळासी ॥ ४ ॥
गोकुळीं आनंद प्रगटलें सुख । निर्भर हे लोक घरोघरीं ॥ ५ ॥
घरोघरीं जाला लक्षुमीचा वास । दैन्यदारिद्र्यास त्रास आला ॥ ६ ॥
आला नारायण तयांच्या अंतरा । दया क्षमा नरां नारीलोकां ॥७॥
लोकां गोकुळीच्या झालें ब्रह्मज्ञान । कळियावांचून जपतपें ॥ ८ ॥
जपतपें कांय करावीं साधनें । जंव नारायणें कृपा केली ॥ ९ ॥
केलीं नारायणें आपुलीं अंकित । तोचि त्यांचें हित सर्व जाणे ॥१०॥
सर्व जाणे एक विष्णु साच खरा । आणीक दुसरा नाहीं नाहीं ॥११॥
नाहीं भक्तां दुजें तिहीं त्रिभुवनीं । एका चक्रपाणीवांचूनिया ॥१२॥
याच्या सुखसंगें घेती गर्भवास । तुका म्हणे आस त्यजूनिया ॥१३॥

॥ १४ ॥

यांच्या पूर्वपुण्या कोण लेखा करी । जिहीं तो मुरारी खेळविला ॥१॥
खेळविला जिहीं अंतर्बाह्यसुखें । मेळवूनि मुखें चुंबन दिलें ॥ २ ॥
दिलें त्यांसी सुख अंतरींचें देवें । जिहीं एका भावें जाणितला ॥३॥
जाणितला तिहीं कामातुर नारी । कृष्ण भोगावरी चित्त त्यांचें ॥४॥
त्यांचें कृष्णीं तन मन जालें रत । गृह पति सुत विसरल्या ॥५ ॥
विष तयां जालें धन मान जन । वसविती वन एकांतीं त्या ॥ ६ ॥
एकांतीं त्या जाती हरिसी घेउनी । भोगइच्छाधणी फेडावया ॥७॥
वयाच्या संपन्ना तैसा त्यांकारणें । अंतरींचा देणें इच्छाभोग ॥८॥
भोग त्याग नाहीं दोन्ही जयापासीं । तुका म्हणे जैसी स्फटिक शिळा ९

॥ १५ ॥

शिळा स्फटिकाची न पालटे भेदें ।दाऊनिया छंदें जैसी तैसी ॥ १ ॥
जैसा केला तैसा होय क्षणक्षणा । फेडावी वासना भक्तिभावें ॥२॥
फेडावया आला अवघियांची धणी । गोपाळ गौळणी मायबापा ॥३॥
मायबापा सोडविलें बंदीहुनी । चाणूर मर्दनी कंसादिक ॥ ४ ॥
दिक नाहीं देणें अरिमित्रां एक । पूतना कंटक मुक्त केली ॥ ५ ॥

मुक्त केला मामा कंस महाद्वेषी । बाळहत्या राशी पातकांच्या ॥६॥
पाप कोठें राहे हरी आठवितां । भक्ती द्वेषें चिंता जैसा तैसा ॥७॥
साक्षी तयापाशीं पूर्वील कर्मांच्या । बांधला मैत्रेच्या अहंगें देव ॥८॥
देव भोळा भावें भक्ता पाठोपाठी । उच्छिष्टाचा करी मार्गामार्गे ॥९॥
सांगाया कैवाडा तुका म्हणे त्यासी । भांडे तो सर्वांसी पातकांच्या १०

॥ १६ ॥

चारी वेद ज्याची कीर्ति वाखाणितां । बांधिला तो हातीं गौळणीच्या ॥१॥
गौळणीच्या गळां बांधिला धारणी । पायीं चक्रपाणी लागे तया ॥२॥
तयाचिया शिरे चाळवाया लोणी । त्रिगुणी पाळणी शिरे माझा ॥ ३ ॥
माझी शिराणीची नवनीत सांडे । कथाचि तें आहे जैसें तैसें ॥ ४ ॥
जैसा तैसा आहे अक्षरालाहाचा । म्हणऊनि चोरी सर्वांपडे ॥ ५ ॥
सर्वांपर तया कारणें स्वरूप । चाउग चाभार नमोनारायण ॥ ६ ॥
धर्म जाणती त्या पकल्या एकटा । बसतील याचा निराभरा ॥ ७ ॥
निर्वाण राहिल्या निःसंग होऊनी । निश्चळ त्या ध्यानीं कृष्णध्यान ८
न ये क्षणभंग सागरांत ध्यानीं । भावें तो गौळणी भाविका त्या ९ ॥
भाविका तयांसी येतो काकुळती । ब्राह्मण्या मस्ती नमपदे ॥१०॥
नल्गे येथावीं टाळी धनानांचें । तुका म्हणे भावें चाड एका ॥ ११ ॥

॥ १७ ॥

जोड अनन्यासी धरी नारायण । आपणासमान करी सेवा ॥ १ ॥
सेवक होती शत्रु यमाचिये घरीं । आनरथा धर्मा नाहीं म्हणूण ॥ २ ॥
सर्वपदें इंद्रचंद्रब्रह्मादिकां । अभिमानें एका तिळमात्रें ॥ ३ ॥
तिळमात्र जरी होय अभिमान । मेरु तो समान भारें देवा ॥ ४ ॥
भार पृथ्वीचा वाहिला सकळ । जड होती मळ दुष्ट लोक ॥ ५ ॥
दुष्ट अभाग्य जे निष्ठुर मानसी । केली हे तयांसी यमपुरी ॥ ६ ॥
यमदूत त्यासी करिती यातना । नाहीं नारायणा भजले जे ॥ ७ ॥
जे नाहीं भजले एका भावें हरी । तया दंड करी यमधर्म ॥ ८ ॥
यमधर्म म्हणे तया दोषियांसी । कां रे केशवासी चुकलेती ॥ ९ ॥
चुकलेती कथा पुराणश्रवण । होते तुम्हां कान डोळे मुख ॥ १० ॥
कान डोळे मुख संतांची संगति । न धराच चित्तीं सांगितलें ॥११॥
सांगितलें संतीं तुम्हा उगवूनी । गर्भासी येऊनी यमदंड ॥ १२ ॥
दंड आम्ही राजे म्हणे यमधर्म । देवा होय श्रम दुर्जनांचा ॥ १३ ॥
दुर्जनांचा येणें करूनी संहार । पूर्ण अवतार रामकृष्ण ॥ १४ ॥
रामकृष्णनामें रंगले जे नर । तुका म्हणे घर वैकुंठी त्या ॥ १५ ॥

॥ १८ ॥

वैकुंठींच्या लोकां दुर्लभ हरिजन । तया नारायण समागमें ॥ १ ॥
समागम त्यांचा धरिला अनंतें । जिहीं [illegible] ॥ २ ॥
समर्थें तीं गाती हरीचे पवाडे । [illegible] ॥ ३ ॥
रामकृष्णें केलें कौतुक गोकुळीं । गोपाळांचे मेळीं गाई चारी ॥४॥
गाई चारी मोहोरी पांवा वाहे पाठीं । [illegible]
काय गौळियांच्या होत्या पुण्यराशी । आणीक त्या शिंगी गाई पशु ६
सुख तें अनुपम लुटिलें सकळीं । गोपिका गोपाळीं [illegible] ॥ ७ ॥
घणीवरी त्यासी स्वांगिनली मात । [illegible] ॥ ८ ॥
परी याचें तुम्ही [illegible] । दुर्गम जो [illegible] ॥ ९ ॥
शिंके [illegible] वाहेरी । [illegible] ॥ १० ॥
तोंडाकडे [illegible] कवतुकें । शिव्या देतां [illegible] ॥ ११ ॥
हांसतसे शिव्या देतां त्या गौळणी । मरतां [illegible] ॥ १२
तो जें [illegible] दिसे उत्तम । तुका म्हणे [illegible] ॥ १३ ॥

॥ १९ ॥

वर्म दावी सोपें भाविकां गोपाळां । [illegible] ॥ १ ॥
मान देतो आधीं मागतील ठाव । [illegible] ॥ २ ॥
मानतो ते मंत्र [illegible] । [illegible] ॥ ३ ॥
वळें घोंगडिया घालूनियां तळीं । [illegible] ॥ ४ ॥
तिहीं लोकांसी जो दुर्लभ चिंतना । तो धांवे [illegible] ॥ ५ ॥
त्यांच्या वचनाचीं पुष्पें वाहे शिरीं । नैवेद्य त्यांकरी [illegible] ॥ ६ ॥
त्यांचिये मुखींचें [illegible] । [illegible] ॥ ७ ॥
वरी माथां गुंफे [illegible] । [illegible] ॥ ८ ॥
उडे नाचतील [illegible] हरी । देहभाव [illegible] ॥ ९ ॥
विसरली वरी देहाची भावना । तेथें नारायणा [illegible] ॥ १० ॥
पूजा भाविकांची न कळतां घ्यावी । [illegible] ॥ ११ ॥
ठाव पावावया हिंडे मागें मागें । तुका म्हणे [illegible] ॥ १२ ॥

॥ २० ॥

भक्तजनां दिलें निजसुख देवें । गोपिका त्या भावें आलिंगिल्या ॥ १ ॥
आलिंगिल्या गोपी गुणवंता नारी । त्यांच्या अन्मानतरी हरि म्हणी २
कवळिया त्यांचें करी समाधान । करविता आपण क्रिया कुरी ॥ ३ ॥
क्रिया करी तुम्हां न वजे पासुनी । [illegible] गोपिकांसी ॥ ४ ॥
गोपिकांसी म्हणे वैकुंठीचा पति । तुम्ही माझ्या चित्तीं सर्व भावें ५
भाव जैसा माझ्या ठायीं तुम्ही धरा । तैसाचि मी करा तुम्हांलागीं ६

तुम्हां कळों द्या हा माझा स्वभाव । तुमच्याचि जीव तुम्हां ग्वाही ७॥
ग्वाही तुम्हां आम्हां असे नारायण । आपुलीच आण वाहतसे ॥ ८ ॥
सत्य बोलें देव भक्तिभाव जैसा । अनुभवें रसा आणूनियां ॥ ९ ॥
यासी पुराणीं ते वेगळाल्या भावें । एकीचें हें आन नाहीं एकी १०॥
एकी क्रिया नाहीं आणिकांचा भाव । पृथक हा देव त्यांना तैसे ११
तैसें कळों येथें जो मी कोठें नाहीं।अवघियांच्या ठायीं जैसा तैसा १२
जैसा मनोरथ जये चित्तीं काम । तैसा मेघश्याम पुरवितो ॥ १३ ॥
पुरविले मनोरथ गोपिकांचे । आणीक लोकांचे गोकुळींच्या ॥१४॥
गोकुळींच्या लोकां लागवल्या छंद । वेधला गोविंद त्यांचे चित्तीं१५
चित्तें ही चोरूनि घेतलीं सकळां । आवडी गोपाळावरी तया ॥१६॥
तयाची आवड वैकुंठनायका । गर्भीं सकळिक विसरोनी ॥ १७ ॥
निंदा स्तुति कोणी न करी कोणाची।नाठवे या देहाची शुद्धि कोणा १८
कोणाचे नाठव कन्या पुत्र माया । देव म्हणोनि तया चिंतन देतीं१९
देतां या टाकून भ्रतारांचीं घरें । लाज ना अंतरीं आठवेना ॥२०॥
नाहीं कोणा धाक कोणासी कोणाचा । तुका म्हणे त्यांचा काया मनें २१

॥ २१ ॥

मनें हरिरूपीं गुंतल्या वासना । उदास या तनु गोपी त्यांच्या ॥१॥
त्यांच्या भ्रतारांनीं धरूनियां रूपें । त्यांच्या घरीं त्यांपें भोग करी २
करी कवतुक त्यांचें तयापरी । एका दिसे हरि एका लेंक ॥ ३ ॥
एक भाव नाहीं सकळांच्या चित्तीं । म्हणऊनि प्रीति तैसें रूप ॥४॥
रूप याचें आहे अवघेंचि एक । परि कवतुक दाखविलें ॥ ५ ॥
लेंकरूं न कळे स्थूल कीं लहान । खेळे नारायण कवतुकें ॥ ६ ॥
कवतुक केलें सोंग बहुरूप । तुका म्हणे बाप जगाचा हा ॥ ७ ॥

॥ २२ ॥

जगाचा हा बाप दाखविलें सोंग । मारी त्यांना जाय मागायाचे ॥१॥
मागायाचा तिनें उगारिली काठी । भुवनें त्या पोटीं चौदा देखे ॥२॥
देखे भयानक झांकियेले डोळे । मागुता तो खेळे तियेपुढें ॥ ३ ॥
पुढें रिघोनियां घाली गळां कव । कळों नेदी माव मायावंत ॥ ४ ॥
मायावंत विश्वरूप काय जाणे । माझें माझें म्हणे बाळ देवा ॥ ५ ॥
बाळपणीं रिठा रगडिला दाढे । मारियेले गाढे दानवना ॥ ६ ॥
गळां बांधूनी उखळासी दावें । उन्मळी त्या भावें यमलार्जुन ॥७॥
न कळे गुमान जगाचा जीवन । घातलें मोहन गौळियांसी ॥ ८ ॥
शिंकीं उतरूनी खाय नवनीत । न कळे बहुत होय तरी ॥ ९ ॥
तरी दुधें दहीं भरले रांजण । खाय तें सकळ खावी दुणी ॥ १० ॥

दुणी जाले त्याचा मानिती संतोष । दुभत्याची आस धरुनियां ११
आशाबद्धा देव असोनी जवळी । नेणती ते काळीं स्वार्थापुढें १२॥
मुळें याच देव नकळे तयांसी । चित्त आशापाशीं गोविंयेलें ॥१३॥
लेंकरूं आमचें म्हणे दसवंती । नंदाचिये चित्तीं तोचि भाव ॥१४॥
भाव जाणावया चरित्र दाखवी । घुसळितां रवी डेरियांत ॥१५॥
डेरियांत लोणी खादलें रिघोनि । पाहे तों जननी हातीं लागे ॥१६॥
हातीं धरूनियां काढिला बाहेरी । देखोनियां करी चाळ माता ॥१७
सिकवी विचार नेणे त्याची गती । होता कोणंगीत डेरियांत ॥१८॥
यासी पुत्रलोभें नकळे हा भाव । कळों नेदी माव देव त्यांसी ॥१९॥
तयांसी मायामोहजाळ घालीं फांसा । देव आपणासा करीना तो २०॥
नेदी भाव राहो लोभिकांचे चित्तीं । जाणतांचि होती आंधळीं ती २१
आंधळींतीं तुका म्हणे संसारीं । जिहीं नाहीं हरी ओळखिला २२॥

॥ २३ ॥

ओळखी तयांसी होय एका भावें । दुसरिया देवें न पाविजे ॥ १ ॥
न पाविजे कदा उन्मत्त जालिया । दंभ तोचि वाया नागवण ॥ २ ॥
वनवास देवा कारणें एकांत । करावी हीं व्रततपें याग ॥ ३ ॥
व्रत याग यांसी फळलीं बहुतें । होतीं या संचितें गोरांयांचीं ॥४॥
यांसी देवें तारियेलें न कळतां । मागील अनंता ठायें होतें ॥ ५ ॥
होतें तें द्यावया आला नारायण । मायबापां ऋण गौळियांचें ॥ ६ ॥
गौळियांचें सुख दुर्लभ आणिकां । नाहीं ब्रह्मादिकां तुका म्हणे ॥७॥

॥ २४ ॥

नेणतियांसाठीं नेणता लहान । थिकोनी भोजन मागे माये ॥ १ ॥
माया दोनी यास बाप नारायणा । सारखी भावना तयावरी ॥ २ ॥
तयावरी त्यांचा समचित्त भाव । देवकीवसुदेव नंद दोघे ॥ ३ ॥
घेउनिया एके ठायीं अवतार । एकीं केला थोर वाढवूनी ॥ ४ ॥
उणा पुरा यासी नाहीं कोणी ठाव । सारिखाची देव अर्थियांसी ५॥
यासी दोनी ठाव सारिखे अनंता । आधील मागुता वाढला जो ॥६॥
वाढला तो सेवाभक्तिचिया गुणें । उपचार मिष्टान्नें करुनिया ॥ ७ ॥
करूनी सायास मेळविलें धन । तेंही कृष्णार्पण केलें तिहीं ॥ ८ ॥
कृष्णासी सकळ गाई घोडे हैसी । समर्पिल्या दासी जीवेंभावें ॥९॥
जीवेंभावें त्याची करितीते सेवा । न निसंघती गोवा क्षणभरी ।१०॥
क्षणभरी होतां वेगळा तयास । होती कासावीस प्राण त्यांचे॥ ११ ॥
त्यांचे ध्यानीं मनीं सर्वसावें हरि । देह काम करी चित्त त्यापें १२॥
त्याचेंचि चिंतन कृष्ण कोठें गेला । कृष्ण हा जेविला नाहीं कृष्ण १३

कृष्ण आला घरा कृष्ण गेला द्वारा । कृष्ण हा सोयिरा भेटी कृष्ण १४
कृष्ण गातां ओंव्या दळणीं कांडणीं । कृष्ण हा भोजनीं पाचारिती १५
कृष्ण तयां ध्यानीं आसनीं शयनीं । कृष्ण देखे स्वप्नीं कृष्णरूप ॥१६॥
कृष्ण त्यांस दिसे आभास दुश्चिता । धन्य मातापिता तुका म्हणे १७॥

॥ २५ ॥

कृष्ण हा परिवारी कृष्ण हा व्यवहारी । कृष्ण ध्या या नारी आणिकां म्हणे
म्हणे कृष्णाविण कैसें तुम्हां गमे । बिळ हा करमे वांयाविण ॥ २ ॥
वांयाविण तुम्ही पिटितां बाबटी । ध्यावें जगजेठी क्षणभरी ॥ ३ ॥
क्षणभरी याच्या सुखाचा सोहळा । पाहा एकवेळा घेऊनिया ॥ ४ ॥
याचें सुख तुम्हां कळलियावरी । मग दारोदारीं न फिराल ॥ ५ ॥
लटिकें हें तुम्हां वाटेल सकळां । एका कृष्णाविणें अवघेंचि ॥ ६ ॥
अवघ्यांचा तुम्हां टाकाल सांगात । घेऊनी अनंत जाल राना ॥ ७ ॥
मायबापें तुम्हांस आणीक बोलिले । मग हें लागलें हरिध्यान ॥ ८ ॥
न करा हा मग या जीवा वेगळा । टाकाल बाळा आणिकांहीं ॥९॥
आणिकांहीं तुम्हां येती काकुळती । जवळी इच्छिती क्षण बैसों १०॥
बैसों चला पाहों गोपाळाचें सुख । एकी एक सुख सांगतील ॥११॥
त्यांचे अंग पेंगे ध्यान रसरंगा । संग त्या धरिती नित्य बाळा ॥१२॥
बाळा एकी घरा घेऊनियां जाती । नाहीं त्या परती तुका म्हणे ॥ १३॥

॥ २६ ॥

तुका म्हणे पुन्हा न येती मागुत्या । कृष्णासी खेळतां दिवस गमे ॥१॥
दिवस राती कांहीं नाठवे तयांसी । पाहातां मुखासी कृष्णाचिया २
याच्या मुखीं मन डोळ्यांची वीट । राहिले हे नीट तारकेचि ॥३॥
तारकेसी राहिलें सकळ शरीर । इंद्रियें व्यापार विसरलीं ॥ ४ ॥
विसरल्या तान भूक घरदार । नाहीं हा विचार असों कोठें ॥ ५॥
कोठें असों कोण आला वेळ काळ । नाठवे सकळ विसरल्या ॥६॥
विसरल्या आहीं कोणी ये आनंद्या । वर्णाही न्हाहुल्या एक झाल्या ७
एक झाल्या तेव्हां कृष्णाचिया सुखें । निःशंक सानुकें खेळतील ८
खेळती सानुकें कृष्णाच्या सहित । नाहीं आशंकित चित्त त्यांचें ९॥
चित्तीं तो गोविंद लटिकें दूषण । करिती हे जन करितील ॥ १० ॥
जन करी तैसा खेळतील खेळ । अवघा गोपाळ करूनिया ॥ ११ ॥
करिती आपला अवघा गोविंद । जना साच फळ लटिका त्या ।
त्यांनीं केला हरि सासुरें माहेर । वेधू हे
भावना राहिली एकाचिया ठायीं । तुक

॥ २७ ॥

गोविंद भ्रतार गोविंद मूळहारी । नामें भेद परि एकचि तो ॥ १ ॥
एकाचीच नामें ठेवियेलीं दोनी । कल्पितील मनीं यावें जावें ॥ २ ॥
जावें यावें तिहीं घरींचिया घरीं । तेथींची सिदोरी तेथें व्याची ३ ॥
विचारितां दिसे येणें जाणें खोटें । दाविती गोमटें लोकां ऐसें ॥ ४ ॥
लोक करूनियां साच वर्तताती । तैशा त्या खेळती लटिक्याची ५ ॥
लटिकीं करिती मंगळदायकें । लटिकींच एकें एकां व्याही ॥ ६ ॥
व्याही भाई हरि सोयरा जावई । अवघियांच्या ठायीं केला एक ७ ॥
एकाशींच पावें जें कांहीं करिती । उपचार संपत्ति नाना भोग ॥ ८ ॥
भोग देती सर्व एका नारायणा । लटिक्या भावना व्याही भाई ९ ॥
लटिकाची त्यांनीं केला संवसार । जाणती साचार वेगळा त्या १० ॥
त्यांनीं मृत्तिकेचे करूनी अवघे । खेळतील दोघे पुरुषनारी ॥ ११ ॥
पुरुषनारी त्यांनीं ठेवियेलीं नांवें । कवतुक भावें विचरती ॥ १२ ॥
विचरती जैसें साच भावें लोक । तैसें नाहीं सुख खेळतीया १३ ॥
यांनीं जाणितलें आपआपणया । लटिकें हें वाया खेळतों तें ॥ १४ ॥
खेळतों ते आम्ही नव्हो नारीनर । म्हणोनी विकार नाहीं तयां १५ ॥
तयां ठावें आहे आम्ही अवघीं एक । म्हणोनी निःशंक खेळतील १६
तयां ठावें नाहीं हरिचिया गुणें । आम्ही कोणकोणें काय खेळों १७
काय खातो आम्ही कासया सांगातें । कैसें हें लागतें नेणों मुखीं १८
मुखीं चवी नाहीं वरी अंगीं लाज । वर्ण याती काज न धरिती १९
न धरिती कांहीं संकोच त्या मना । हांसतां या जना नाइकती २०
नाइकती बोल आणिकांचे कानीं । हरि चित्तीं मनीं बैसलासे २१ ॥
बैसलासे हरि जयांचिये चित्तीं । तयां नावडती मायबाप ॥ २२ ॥
मायबापें त्यांचीं नेती पाचारूनी । बळें परि मनीं हरि वसे ॥ २३ ॥
वसतील बाळा आपुलाले घरीं । ध्यान त्या अंतरीं गोविंदाचें ॥ २४ ॥
गोविंदाचें ध्यान निजलिया जाग्या । आणीक याउग्या न बोलती २५
न बोलती निजलिया हरिविण । जागृति स्वप्न एक जालें ॥ २६ ॥
एकविध सुख घेती नित्य बाळा । भ्रमर परिमळा लागीं जैसा २७ ॥
तैसा त्यांचा भाव घेतला त्यांपरी । तुका म्हणे हरि बाळलीला २८ ॥

॥ २८ ॥

लीलाविग्रही तो लेववी खाववी । यशोदा बैसवी मांडीवरी ॥ १ ॥
मांडीवरी भार पुष्पाचिये परी । बैसोनिया करी स्तनपान ॥ २ ॥
नभाचाही साक्षी पाताळापरता । कुर्वाळिते माता हातें त्यासी ॥ ३ ॥
हातें कुर्वाळूनी मुखीं घाली घास । पुरे म्हणे तीस पोट धालें ॥ ४ ॥

पोट धालें मग देतसे ढेंकर । भक्तीचें तें फार तुळसी दळ ॥ ५ ॥
तुळसीदळ भावें साहित देवा पाणी । फार तें त्याहुनि क्षीरसागरा ६
क्षीराचा कांटाळा असे एक वेळ । भक्तीचें तें जळ गोड देवा ॥ ७ ॥
देवा भक्त जिवाहुनी आवडती । सकळहि प्रीति त्यांच्याठायीं ८ ॥
त्यांचा हा अंकित सर्व भावें हरि । तुका ह्मणे करी सर्व काज ॥९॥

॥ २९ ॥

जयेवेळीं चोरूनिया नेलीं वत्सें । तयालागीं तैसें होणें लागे ॥ १ ॥
लागे दोहीं ठायीं करावें पाळण । जगाचा जीवन मायबाप ॥ २ ॥
माय जाल्यावरी अवघ्या वत्सांची । घरीं वत्सें जींचीं तैसा झाला ३
झाला तैसा जैसें घरींचे गोपाळ । आणिक सकळ मोहरी पांवे ४ ॥
मोहरी पांवे सिंगें वाहिल्या काहाळा। देखिला सोहळा ब्रह्मादिकीं ५
ब्रह्मादिकां सुख स्वर्गींहि नाहीं । तैसें दोहीं ठायीं वोसंडलें ॥ ६ ॥
वोसंडल्या क्षीर अमुप त्या गाई । जैसी ज्याची आई तैसा जाला ७
लाघव कळलें ब्रह्मयासी याचें । परब्रह्म साचें अवतरलें ॥ ८ ॥
तरले हे जन सकळही आतां । ऐसें तो विधाता बोलियेला ॥ ९ ॥
लागला हे स्तुति करूं अनंताची । चतुर्मुख वाची भक्तिस्तोत्र १० ॥
भक्तिकाजें देवें केला अवतार । पृथिवीचा भार फेडावया ॥ ११ ॥
पृथिवी दाटिली होती या असुरीं । नास व्हावे वरी भार तये १२ ॥
तया काकुलती आपल्या दासांची । तयालागीं वेंचो सर्वस्वही १३
स्वहित दासांचें करावयालागीं । अव्यक्त हे जगीं व्यक्ती आलें १४॥
लेखा कोण करी त्यांचिया पुण्याचा । जयांसवें वाचा बोले हरी १५
हरी नाममात्रें पातकांच्या रासी । तो आला घरासी गौळियांच्या॥
गौळियें अवघीं झालीं कृष्णमय । नामें लोकत्रय तरतील ॥ १७ ॥
तरतील नामें कृष्णाचिया दोषी । बहुत ज्यांपाशीं होइल पाप १८॥
पाप ऐसें नाहीं कृष्णनामें राहे । धन्य तोचि पाहे कृष्णमुख ॥१९॥
मुख माझें काय जो मी वर्णूं पार । मग नमस्कार घाली ब्रह्मा २० ॥
ब्रह्मा नमस्कार घाली गोधनासी । कळला तयासी हाचि देव २१ ॥
देवाचि अवघा जालासे सकळ । गाई हा गोपाळ वत्सें तेथें ॥ २२ ॥
तेथें पाहाणें जें आणीक दुसरें । मूर्ख त्या अंतरें दुजा नाहीं ॥२३॥
दुजा भाव तुका ह्मणे जया चित्तीं । रवरव भोगिती कुंभपाक २४॥

॥ ३० ॥

कुंभपाकें लागे तयासी भोगणें । अवघाचि नेणे देव ऐसा ॥ १
देव ऐसा ठावा नाहीं जया जना । तयासी यातना यम करी ॥२॥
कळला हा देव तया साच खरा । गाई वत्सें घरा धाडी ब्रह्मा ३ ॥

ब्रह्मादिकां ऐसा देव अगोचर । कैसा त्याचा पार जाणवेल ॥ ४ ॥
जाणवेल देव गौळियांच्या भावें । तुका ह्मणे व्हावें संचित हें ॥ ५ ॥

॥ ३१ ॥

संचित उत्तम भूमि कसूनिया । जाऊं नेणे वांया परि त्यांचें ॥ १ ॥
त्यांचिया पिकासी आलीया घुमरी । आल्या गाईवरी आणिक गाई ॥ २ ॥
गाई दवडूनी घालिती बाहेरी । तंव म्हणे हरी बांधा त्याही ॥ ३ ॥
त्याही तुम्ही बांधा तुमच्या सारिख्या । भोवंडा पारिख्या बाह्यांतूनी ॥ ४ ॥
पारिख्या न येती कोणाचिया घरा । सूत्रधारी खरा नारायण ॥ ५ ॥
नारायण नांदे जयाचिये ठायीं । सहज तेथें नाहीं घालमेली ॥ ६ ॥
मेली हीं शहाणीं करितां सायास । नाहीं सुखलेश तुका म्हणे ॥ ७ ॥

॥ ३२ ॥

तुका म्हणे सुख घेतलें गोपाळीं । नाचती कांबळीं करूनी ध्वजा ॥ १ ॥
करूनिया टिरी आपल्या मांदळ । वाजविती टाळ दगडांचे ॥ २ ॥
दगडाचे टाळ कोण त्यांचा नाद । गीत गातां छंद ताल नाहीं ॥ ३ ॥
ताल नाहीं गातां नाचतां गोपाळां । घननीळ सांवळा तयांमध्यें ॥ ४ ॥
मध्यें जयां हरि सुख तें आगळें । देह भाव काळें नाहीं तयां ॥ ५ ॥
तयांसी आळंगी आपुलिया करीं । जाती भूमीवरी लोटांगणीं ॥ ६ ॥
निजभाव देखे जयांचिये अंगीं । तुका म्हणे संगीं क्रीडे तया ॥ ७ ॥

॥ ३३ ॥

तयांसवें करी काला दहींभात । सिदोऱ्या अनंत मेळवूनी ॥ १ ॥
मेळवूनी अवघियांचे एके ठायीं । मागें पुढें कांहीं उरों नेदी ॥ २ ॥
नेदी चोरी करूं जाणे अंतरींचें । आपलें ही साचें यावें तेथें ॥ ३ ॥
द्यावा दहीं भात आपले प्रकार । तयांचा व्यवहार मोडावया ॥ ४ ॥
वांटी सकळांसीं हातें आपुलिया । जैसें मागें तया तैसें द्यावें ॥ ५ ॥
द्यावें सांभाळूनी समतुक भावें । आणाहि खावें त्यांचें तुकें ॥ ६ ॥
तुकें सकळांचे गोविंदाचे हातीं । कोण कोणें गति भला बुरा ॥ ७ ॥
राखी त्यास तैसें आपलाल्या भावें । विचारूनी द्यावें जैसें तैसें ॥ ८ ॥
तैसें सुख नाहीं वैकुंठींच्या लोकां । तें दिलें भाविकां गोपाळांसी ॥ ९ ॥
गोपाळांचे मुखीं देऊनी कवळ । घांस मागे लाळ खाय त्यांची ॥ १० ॥
त्यांचिये मुखींचे काढूनियां घांस । झोंबता हातांस खाय बळें ॥ ११ ॥
बळें जयाचिया ठेंगणें सकळ । तयातें गोपाळ पाडितील ॥ १२ ॥
पाठीं उचलूनी वाहातील खांदीं । नाचतील मांदी मेळवूनी ॥ १३ ॥
मांदी मेळवूनी धणी दिली आह्मां । तुका ह्मणे जमा केल्या गाई ॥ १४ ॥

॥ ३४ ॥

केला पुढें हरि अस्तमाना दिसा । मागें त्यामागिसा थाट चाले ॥१॥
थाट चाले गाई गोपाळांची धूम । पुढें कृष्ण राम तयां सोयी ॥२॥
सोयी लागलिया तयांची अनंतीं । न बोलाविता येती मागें तया ॥३॥
तयाचिये चित्तीं बैसला अनंत । घेती नित्यानित्य तेंचि सुख ॥४॥
सुख नाहीं कोणा हरीच्या वियोगें । तुका ह्मणे युगें घडी जाय ॥५॥

॥ ३५ ॥

जाय फाकोनियां निवडोनी गाई । आपलाली सोयी घराचिये ॥१॥
घराचिये सोयी अंतरला देव । गोपाळांचा जीव गोविंदापें ॥२॥
गोविंदें वेधिलें तुका ह्मणे मन । वियोगें ही ध्यान संयोगाचें ॥३॥

॥ ३६ ॥

संयोग सकळां असे सर्वकाळ । क्षुधित गोपाळ आला दिसे ॥१॥
गोपाळ गुणाचा ह्मणे गुणमय । निंबलोण मायें उतरिलें ॥२॥
उतरूनी हातें धरी हनुवटी । ओवाळूनी दिठी सांडियेली ॥३॥
दिठी घाली माता विश्वाच्या जनका । भक्तीचिया सुखा गोडावला ॥४॥
लहान हा थोर जीवजंतु भूतें । आपण दैवतें आला देवी ॥५॥
देवी हिरण्यासुर मुंजिया खेचर । लहानहि थोर देव हरि ॥६॥
हरि तुका ह्मणे अवघा एकला । परि हा धाकुला भक्तीसाठीं ॥७॥

॥ ३७ ॥

भक्तीसाठीं केली यशोदेसी आळी । थिंकोनियां चोळी डोळे देव ॥१॥
देव गिळूनियां धरिलें मौन । माये ह्मणे कोण येथें दुजें ॥२॥
दुजें येथें कोणी नाहीं कृष्णाविण । निकतें आणोन पुसे देवा ॥३॥
देवापाशीं पुसे देव काय झाला । हांसें आलें बोलायाचें हरि ॥४॥
यांचें मी जवळीं देव तो नेणतां । लटिकें मानितां साच खरें ॥५॥
लटिकें तें साच साच तें लटिकें । नेणतां लोभिकें आशाबद्ध ॥६॥
सांग ह्मणे माय येरू वासी तोंड । तंव तें ब्रह्मांड देखे माजी ॥७॥
माजी जया चंद्र सूर्य तारांगणें । तो भक्तांकारणें बाळलीळा ॥८॥
लीळा कोण जाणे याचें महिमान । जगाचें जीवन देवादिदेव ॥९॥
देवें कवतुक दाखविलें तयां । लागती तें पायां मायबाप ॥१०॥
मायबाप ह्मणे हाचि देव खरा । आणीक पसारा लटिका तो ॥११॥
तोहि त्यांचा देव दिला नारायणें । माझें हें करणें तोहि मीच ॥१२॥
मीच ह्मणउनी जें जें जेथें ध्यानी । तेथें मी श्रीपति भोगिता तें ॥१३॥
तें मज वेगळें मी तया निराळा । नाहीं या सकळा ब्रह्मांडांत ॥१४॥
वर्तमाना तैसें भविष्य तयाचें । फळ देतां साचें मीच एक ॥१५॥

मीच एक खरा बोले नारायण । दाविलें निर्वाण निजदासां ॥१६॥
निजदासां खूण दाविली निरुती । तुका म्हणे भूतीं नारायण १७ ॥

॥ ३८ ॥

नारायण भूतीं न कळे जयासीं । तयां गर्भवासीं येणें जाणें ॥ १ ॥
येणें जाणें होय भूतांच्या मत्सरें । न कळतां खरें देव ऐसा ॥ २ ॥
देव ऐसा जया कळला सकळ । गेली तळमळ हेतबुद्धि ॥ ३ ॥
बुद्धीचा पालट नव्हे कोणे काळीं । हरि जळीं स्थळीं तयां निर्धी४
चित्त तें निर्मळ जैसें नवनीत । जाणिजे अनंत तयामाजि ॥ ५ ॥
तयामाजि हरि जाणिजे त्या भावें । आपलें परावें सारिखेंचि ॥६॥
चिंतनें तयाच्या तरती आणीक । जो हें सकळीक देव देखे ॥ ७ ॥
देव देखे तोही देव कैसा नव्हे । उरला संदेह काय त्यासी ॥ ८ ॥
काया वाचा मनें पुजावे वैष्णव । म्हणऊनी भाव धरुनिया ॥९॥
यांसी कवतुक दाखविलें रानीं । वोणवा गिळुनी गोपाळांसी १०॥
गोपाळांसी डोळे झांकविले हाते । धरिलें अनंतें विश्वरूप ॥ ११ ॥
पसरूनी मुख गिळियेले ज्वाळ । पाहाती गोपाळ बोटां सांदी १२॥
सांधि झारूनिया पाहिलें अनंता । म्हणती ते आतां कळलासी १३॥
कळला हा तुझा देह नव्हे देवा । गिळिला वोणवा आणीक तो १४
तो तयां कळला आरुपा गोपाळां । दुर्गम सकळां साधनांसी १५॥
सीण उरे तुका म्हणे साधनाचा । भाविकांसी साचा भाव दावी १६॥

॥ ३९ ॥

भाव दावी शुद्ध देखोनिया चित्त । आपल्या अंकित निजदासां ॥१॥
सांगे गोपाळांसी काय पुण्य होतें । वांचलों जळतें आगी हातीं २॥
आजी आम्हां येथें राखियेलें देवें । नाहीं तरी जीवें न वांचतों ॥ ३ ॥
न वांचत्या गाई जळतों सकळें । पूर्वपुण्यबळें वांचविलें ॥ ४ ॥
पूर्वपुण्य होतें तुमाचिये गांठीं । बोले जगजेठी गोपाळांसी ॥ ५ ॥
गोपाळांसी म्हणे वैकुंठनायक । भले तुम्ही एक पुण्यवंत ॥ ६ ॥
करी तुका म्हणे करविता आपण । द्यावें थोरपण सेवकांसी ॥ ७॥

॥ ४० ॥

काय आम्हां चाळविसी वायांविण । म्हणती दुर्जन देखिलासी ॥१॥
लावूनियां डोळे नव्हतों दुश्चित्त । तुज परचित्त भाव होती ॥ २ ॥
होती दृष्टि आंत उघडी आमची । बाहेरी ते वायांचि फुंकी झाकूं ३
जालासी थोरला थोरल्या तोंडाचा । गिळियेला वाचा धूर आगी ४
आगी खातो ऐसा आमचा सांगाती । आनंदें नाचती भोंवताली ५
भोंवतीं आपणा मिळविलीं देवें । तुका म्हणे ठावें नाहीं त्यास ॥ ६ ॥

॥ ४१ ॥

नाहीं त्याची शंका वैकुंठनायका । नेणती ते एकाविण दुजा ॥१॥
आणोनियां सर्वे येऊं नेदी हरि । नर्कवादी दुरी दुराविले ॥ २ ॥
वादियांशीं भेद निंदा अहंकार । देऊनियां दूर दुराविले ॥ ३ ॥
दुराविले दूर आशावंत देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥ ४ ॥
चित्तीं द्रव्यदारा पुत्रादि संपत्ति । समान ते होती पशु नर ॥ ५ ॥
नरक साधिला विसरोनि देवा । बुडाले ते भवा नदी माजी ॥ ६ ॥
जिहीं हरिसंग केला संतमार्गी । तुका म्हणे खरी खेप त्यांची ॥७॥

॥ ४२ ॥

खेळीमेळीं आले घरा गोपीनाथ । गोपाळांसहित मातेपाशीं ॥ १ ॥
मातेपाशीं एक नवल सांगती । जाली होती राती ओणव्याची ॥२॥
ओंवाळिलें निंब करुनी आरती । पुसे दुणावली गोपाळांसी ॥ ३ ॥
पुसे पडताळुनी मागुती मागुती । गोपाळ सांगती कवतुक ॥ ४ ॥
कवतुक कानीं आइकतां त्यांचें । बोलतां ये वाचे वीट नये ॥ ५ ॥
नयन गुंतले श्रीमुख पाहतां । न साहे लवतां आड पातें. ॥ ६ ॥
तेव्हां कवतुक कळों आलें कांहीं । हळहळ दोहीं मायबापां ॥ ७ ॥
हळहळ त्यांचें पुण्य जालें थोर । वाटलें हें जाड निमिषाचें ॥८॥
निमिष हें तेथें नाहीं शंक कैसें । जाणिवा प्रकाशें गोविंदाच्या ९॥
दावी तुका म्हणे देव ज्या आपणा । पालटे तें क्षणामाजी एका १०॥

॥ ४३ ॥

काय आतां थोरी करणें लेंकरें । जगाचा हा गुरु मायबाप ॥१॥
माय याची यासी राहिली व्यापून । कळों नये क्षण एक होतां २॥
क्षण एक होतां विसरली त्यासी । माझें माझें ऐसें करी बाळा ॥३॥
करी कवतुक कळों नेदी कोणा । योजूनी कारणा तेंचि खेळे ॥४॥
तें सुख लुटिलें सर्वांनी या घरीं । तुका म्हणे परी आपुलाल्या ॥५॥

॥ ४४ ॥

आपुलाल्यापरी करितील सेवा । गीत गाती देवा खेळवूनी ॥ १ ॥
खेळ मांडियेला यमुने पाबळीं । यारे चेंडुफळी खेळूं आतां ॥ २ ॥
आणविल्या डांगी वगमुणा काठी । वेंगोनिया यांदी गडिया गडी ३॥
गडी अंध पाहे आपणासमान । नाहीं नारायण म्हणे दुजा ॥ ४ ॥
जाणोनी गोविंदें सकळांचा भाव । तयांसी उपाव तोचि सांगे ५॥
सांगे सकळांसी व्हा रे एकीकडे । चेंडू राखा गडे तुम्ही माझा ६॥
मज हा न लगे आणीक सांगाती । राखावी बहुतीं हाक माझी ७॥
माझे हाके हाक मेळवा सकळ । नव जा वेगळ एकमेकां ॥ ८ ॥

एका समतुकें अवघेचि रहा । जाईल तो पहा धरा चेंडू ॥ ९ ॥
चेंडू धरा ऐसें सांगतो सकळां । आपण निराळा एकलाचि ॥१०॥
चिंतूनियां चेंडू हाणे ऊर्ध्वमुखें । ठेलीं सकळीक पाहातचि ॥ ११ ॥
पाहातचि ठेलीं न चलतां कांहीं । येरू लवलाही ह्मणे धरा ॥ १२ ॥
धरावा तयानें त्याचें बळ ज्यासी । येरां आणिकांसी लाग नव्हे १३॥
नव्हे काम बळ बुद्धि नाहीं त्याचें । न धरवे निचें उंचाविण ॥ १४ ॥
विचारीं पडले देखोनी गोपाळ । या ह्मणे सकळ मजमागें ॥ १५ ॥
मार्ग देवाविण न दिसे आणिका । चतुर होत का बहुत जन ॥ १६॥
चतुर चिंतिती बहुत मारग । हरि जाय लाग पाहोनिया ॥ १७ ॥
यामागें जे गेले गोविंदा गोपाळ । ते नेले सीतळ पंथें ठाया ॥१८ ॥
पंथ जे चुकले आपले मतीचे । तयांमागें त्यांचे तेचि हाल ॥ १९ ॥
हाल दोघां एक मोहरां मागिलां । चालतां चुकला वाट पंथ २० ॥
पंथ पुढिलासी चालतां न कळे । मागिलांनीं डोळे उघडावे ॥ २१ ॥
वयाचा प्रबोध विचार ज्या नाहीं । समान तो देहीं बाळकांसी २२॥
शिकविलें हित नाइके जो कानीं । त्यामागें भल्यांनीं जाऊं नये २३॥
नये तेंचि करी श्रेष्ठांचिया मना । मूर्ख एक जाणा तोचि नाश २४॥
रानभरी जाले न कळे मारग । मग तो श्रीरंग आठविला ॥ २५ ॥
लाज सांडूनिया मारिती हाका । कळलें नायका वैकुंठींच्या २६॥
चारी वेद ज्याची कीर्ति वाखाणिती । तया अति प्रीति गोपाळांची २७
गोपाळांचा धांवा आइकिला कानीं । सोयी चक्रपाणि पाळविलें २८॥
सोयी धरूनिया आले हरिपाशीं । लहान थोरांशी सांभाळिलें २९॥
सांभाळिलें तुका ह्मणे सकळांही । सुखी जाले तेही हरिमुखें ॥३०॥

॥ ४५ ॥

मुखें सांगे त्यांसी पैल चेंडू पहा । उदकांत डोहाचिये माथां ॥ १॥
माथां कळंबाचे अवघडा ठायीं । दाविवेला डोहीं जळामाजी ॥२॥
जळांत पाहतां आडतीया दृष्टि । ह्मणे जगजेठी ऐसें नव्हे ॥ ३ ॥
नव्हे साच चेंडू छाया दिसे आंत । खरा तेथें चित्त लावा वरी ४॥
वरी देखियेला अवघ्यांनीं डोळां । ह्मणती गोपाळा आतां कैसें ॥५॥
कैसें करूनिया उतरावा खालीं । देखोनिया भ्यालीं अवघीं डोहो ६॥
डोहो बहु खोल काळया भीतरी । सरलीं माघारीं अवघीं जणें ७॥
जयाचें कारण तयासीच ठावें । पुसे त्याच्या भावें त्यास हरि ॥८॥
त्यासी नारायण ह्मणे राहा तळीं । चढे वनमाळी झाडावरी ॥९॥
वरी जातां हरि पाहाती गोपाळ । ह्मणती सकळ आम्ही नेणों ॥१०॥
नेणों ह्मणती हें करितोसी काई । आह्मां तुह्मी आई देईल शिव्या ११

आपुलिया कानां ठेवूनियां हात । सकळीं निमित्य टाळियेलें ॥१२॥
निमित्याकारणें रचिलें कारण । गेला नारायण खांदीवरी ॥१३॥
खांदीवरी पाव ठेवियेला देवें । पाडावा त्या भावें चेंडू तळीं ॥१४॥
तळील नेणती तुका म्हणे भाव । अंतरींचा देव जाणों नेदी ॥१५॥

॥ ४६ ॥

नेदी कळों केल्याविण तें कारण । दाखवी आणून अनुभवा ॥ १ ॥
न पुरेसा हात घाली चेंडूकडे । ह्मणितलें गडे सांभाळावें ॥ २ ॥
सांभाळ करिता सकळां जीवांचा । गोपाळांसी वाचा ह्मणे बरें ॥ ३ ॥
बरें विचारूनी करावें कारण । ह्मणे नारायण बऱ्या बरें ॥ ४ ॥
बरें ह्मणऊनी तयांकडे पाहे । सोडविला जाय चेंडू तळां ॥ ५ ॥
तयासवें उडी घातली अनंतें । गोपाळ रडत येती घरा ॥ ६ ॥
येतां त्यांचा लोकीं देखिला कोल्हाळ । सामोरीं सकळ आलीं पुढें ॥ ७ ॥
पुसती ते मात आपआपल्यासी । हरिदुःखें त्यांसी न बोलवे ॥ ८ ॥
न बोलवे हरि बुडालासें मुखें । कुटितील दुःखें उर माथे ॥ ९ ॥
मायबापें तुका ह्मणे न देखती । ऐसें दुःख चित्तीं गोपाळांच्या ॥ १० ॥

॥ ४७ ॥

गोपाळा उभडु नावरे दुःखाचा । कुंठित हे वाचा जाली त्यांची ॥ १ ॥
जालें काय ऐसें न कळे कोणासी । ह्मणती तुह्मांपाशीं देव होता ॥ २ ॥
देवासवें दुःख न पवते ऐसें । कांहीं अनारिसें दिसे आजी ॥ ३ ॥
आजी दिसे हरि फांकला यांपाशी । ह्मणऊनी ऐशी परी जाली ॥ ४ ॥
जाणविल्याविण कैसें कळे त्यांसी । शाहाणे तयासी कळों आलें ॥ ५ ॥
कळों आलें तिहीं फुंद शांत केला । ठायींचाच त्याला थोडा होता ॥ ६ ॥
होता तो विचार सांगितला जना । गोपाळ शहाणा होता त्यानें ॥ ७ ॥
सांगे आतां हरी तुह्मां आह्मां नाहीं । बुडाला तो डोहीं यमुनेच्या ॥८॥
यासी अवकाश नव्हेचि पुसतां । जालिया अनंता कोणपरी ॥ ९ ॥
परी त्या दुःखाची काय सांगों आतां । तुका ह्मणे माता लोकपाळा ॥१०॥

॥ ४८ ॥

पाषाण फुटती तें दुःख देखोनी । करितां गौळणी शोक लोकां ॥१॥
काय ऐसें पाप होतें आम्हांपाशीं । बोलती एकांशी एक एका ॥२॥
एकाचिये डोळां असूं बाह्यात्कारीं । नाहीं तीं अंतरीं जळतील ॥३॥
जळतीलें एकें अंतर्बाह्यात्कारें । टाकिलीं लेंकुरें कडियेहूनी ॥४॥
निवांतचि एकें राहिलीं निश्चित । बाहेरी ना आंत जीव त्यांचे
त्यांचे जीव वरी आले त्या सकळां । एका त्या गोपाळावांचूनिया ॥६॥
वांचणें तें आतां खोटें संवसारीं । नव्हे भेटी जरी हरीसवें ॥७॥

सर्वे घेऊनिया चालली गोपाळां । अवघींच बाळा नर नारी ॥८॥
नर नारी नाहीं मनुष्याचें नांव । गोकुळ हें गांव सांडियेलें ॥९॥
सांडियेलीं अन्नें संपदा सकळ । चित्तीं तो गोपाळ भरूनी जाती ॥१०
तिरीं माना घालूनियां उभ्या गाई । तटस्थ या डोहीं यमुनेच्या ११॥
यमुनेच्या तिरीं झाडें वृक्ष वल्ली । दुःखें कोमाइलीं कृष्णाचिया १२
यांचें त्यांचें दुःख एक जालें तिरीं । मग शोक करी मायबाप ।१३॥
मायबाप तुका ह्मणे सहोदर । तोंवरीच तीर न पवतां ॥ १४ ॥

॥ ४९. ॥

तीर देखोनियां यमुनेचें जळ । कांठींच कोल्हाळ करितानी ॥ १ ॥
कंईवाड नव्हे घालावया उडी । आपणासी ओढी भय मागें ॥२ ॥
मागें सरे माय पाऊलापाऊलीं । आपलेंच घाली धाकें अंग ॥ ३ ॥
अंग राखोनिया माय खेद करी । अंतरींचें हरी जाणवलें ॥ ४ ॥
जाणवलें मग देवें दिली बुडी । तुका ह्मणे कुडी भावना हे ॥ ५ ॥

॥ ५० ॥

भावनेच्या मुळें अंतरला देव । शिरला संदेह भयें पोटीं ॥ १ ॥
पोटीं होतें मागें जीव द्यावा ऐसें । बोलिल्या सरिसें न करवे ॥२ ॥
न करवे त्याग जीवाचा या नाश । नारायण त्यास अंतरला ॥ ३ ॥
अंतरला बहु बोलतां वाउगें । अंतरींच्या त्यागेंविण गोष्टी ॥ ४ ॥
गोष्टी सकळांच्या आइकिल्या देवें । कोण कोण्याभावें रडती तीं ॥ ५ ॥
तीं गेलीं घरास आपल्या सकळ गोधनें गोपाळ लोक माग ॥ ६ ॥
मायबापांची तो ऐसी जाली गति । तुका ह्मणे अंनीं कळों आलें ॥७॥

॥ ५१ ॥

आला त्यांचा भाव देवाचिया मना । अंतरीं कारणासाठीं होता ॥ १ ॥
होता भाव त्यांचा पाहोनी निराळा । नव्हता पाताळा गेला आधीं ॥२ ॥
आधीं पाठीमोरीं जालीं तीं सकळें । मग या गोपाळें बुडी दिली ॥३॥
दिली हाक त्याणें जाऊनी पाताळा । जागविलें काळा भुजंगासी ॥४॥
भुजंग हा होता निजला मंदिरीं । निर्भर अंतरीं गर्वनिधि ॥ ५ ॥
गर्व हरावया आला नारायण । मिस या करून चेंडुवाचें ॥ ६ ॥
चेंडुवाचें मिसें काळया नाथावा । तुका ह्मणे देवा कारण हें ॥७॥

॥ ५२ ॥

काळयाचे मागे चेंडु पत्नीपाशीं । तेजःपुंज राशी देखियेला ॥ १ ॥
लावण्यपुतळा मुखप्रभाराशी । कोटि रवि शशी उगवले ॥ २ ॥
उगवला खांब कर्दळीचा गाभा । श्रीवें वांकी नभा देखे पायीं ॥ ३ ॥
पाहिला सकळ तिनें न्याहाळूनी । कोण या जननी विसरली ॥ ४ ॥

विसरु हा तीस कैसा याचा जाला । जीवाहूनी वाला दिसतसे ॥ ५ ॥
दिसतसें रूप गोजिरें लहान । पाहातां लोचन सुखावले ॥ ६ ॥
पाहिलें परतोनी काळा दुष्टाकडे । मग ह्मणे कुडें जालें आतां ॥ ७ ॥
आतां हा उठोनी खाईल या बाळा । देईल वेल्हाळा माय जीव ॥ ८ ॥
जीव याचा कैसा वांचे म्हणे नारी । मोहिली अंतरीं हरिरूपें ॥ ९ ॥
रूपें अनंताचीं अनंतप्रकार । नकळे साचार तुका ह्मणे ॥ १० ॥

॥ ५३ ॥

ह्मणे चेंडू कोणे आणिला या ठाया । आलों पुरवाया कोड त्याचें ॥ १ ॥
त्याचें आइकोन निष्ठुर वचन । भयाभीत मन जालें तिचें ॥ २ ॥
तिची चित्तवृत्ति होती देवावरी । आधीं ते माघारी फिरली वेंगीं
वेगीं मन गेलें भ्रताराचें सोयी । विघ्न आलें कांहीं आह्मांवरी ॥ ४ ॥
वरी उदकास अंत नाहीं पार । अक्षोभ सागर भरलासे ॥ ५ ॥
संचार करूनी कोण्या वाटे आला । ठायींच देखिला अवचिता ॥ ६ ॥
अवचिता नेणो येथें उगवला । दिसे तो धाकुला बोल मोठे ॥ ७ ॥
मोठ्यानें बोलतो भय नाहीं मनीं । केला उठवूनी काळ जागा ॥ ८ ॥
जागविला काळसर्प तये वेळीं । उठिला कल्लोळीं विषाचिये ॥ ९ ॥
यमुनेच्या डोहावरी आला ऊत । काळया कृतांत धुधुकारें ॥ १० ॥
कारणें ज्या येथें आला नारायण । जालें दरुषण दोघांमध्यें ॥ ११ ॥
दोघांमध्यें झालें बोल परस्परें । प्रसंग उत्तरें युद्धाचिया ॥ १२ ॥
चिंतावला चित्तीं तोंडें बोलें काळ । करीन सकळ ग्रास तुझा ॥ १३ ॥
जाला सावकाश झेंप घाली वरी । तंव हाणे हरि मुष्टिघातें ॥ १४ ॥
तेणें काळें त्यासी दिसे काळ तैसा । हरावया जैसा जीव आला ॥ १५ ॥
आठवलें काळा हाकारिलें गोत । मिळालीं बहुत नागकुळें ॥ १६ ॥
कल्हारीं संधांनीं वेष्टियेला हरी । अवघा विखारी व्यापियेला ॥ १७ ॥
यांस तुका ह्मणे नाहीं भक्ताविण । गरुडाचें चिंतन केलें मनीं ॥ १८ ॥

॥ ५४ ॥

निजदास उभा तात्काळ पायापें । स्वामी देखे सर्पें वेष्टियेला ॥ १ ॥
लहानथोरें होतीं मिळालीं अपारें । त्याच्या धुधुकारें निवारलीं ॥ २ ॥
निघतां आपटी धरूनी धावांमधीं । एकाचेंचि वधी माथें पायें ॥ ३ ॥
एकीं जीव दिले येतांच त्या धाकें । येतील तीं एकें काकुलती ॥ ४ ॥
यथेष्ट भक्षिलीं पोट धाये वरी । तंव ह्मणे हरी पुरे आतां ॥ ५ ॥
आतां करूं काम आलों जयासाठीं । हरि घाली मिठी काळयासी ॥ ६ ॥
यासी नाथूनिया नाकीं दिली दोरी । चेंडू भार शिरीं कमळांचा ॥ ७ ॥
चालविला वरी बैसे नारायण । गरुडा आलंगून बहुडविलें ॥ ८ ॥

विसरू न पडे संवगड्या गाई । यमुनेच्या डोहीं लक्ष त्यांचें ॥ ९ ॥
त्यांच्या गोष्टी कांठीं बैसोनी सांगती । बुडाला दाविती येथें हरि
हरीचें चिंतन करितां आठव । तुका ह्मणे देव आला वरी ॥ ११ ॥

॥ ५५ ॥

अवचित त्यांनीं देखिला भुजंग । पळतील मग हाउ आला ॥ १ ॥
आला घेऊनियां यमुने बाहेरी । पालवितो करीं गडियांसी ॥ २ ॥
गडियांसी ह्मणे वैकुंठनायक । या रे सकळीक मजपाशीं ॥ ३ ॥
मजपाशीं तुह्मां भय काय करी । जवळी या दुरी जाऊं नका ॥ ४ ॥
कानीं आइकिले गोविंदाचे बोल । ह्मणती नवल चला पाहों ॥ ५ ॥
पाहों आले हरी जवळ सकळ । गोविंद गोपाळ आलिंगिले ॥ ६ ॥
आल्या गाई वरी घालितील माना । वोरसले स्तना क्षीर लोटे ॥ ७ ॥
लोटती सकळें एकावरी एक । होऊनी पृथक कुर्वाळली ॥ ८ ॥
कुर्वाळलीं आनंदें घेती चारापाणी । तिहीं चक्रपाणी देखियेला ॥ ९ ॥
त्यांचपाशीं होता परी केली मात्र । न कळे संदेह पडलिया ॥ १० ॥
याति वृक्ष वल्ली होत्या कोमेलिया । त्यांसी कृष्णें काया दिव्य दिली ॥ ११ ॥
दिलें गोविंदें त्या पदा नाहीं नाश । तुका ह्मणे आस निरसली ॥ १२ ॥

॥ ५६ ॥

आस निरसली गोविंदाचे भेटी । संवसारा तुटी पुढिलीया ॥ १ ॥
पुढें पाठविलें गोविंदें गोपाळां । देऊनी चपळां हातीं गुढी ॥ २ ॥
हाका आरोळिया देऊनी नाचती । एक सादविती हरि आला ॥ ३ ॥
आरंभीं पडिलीं होतीं तया घरीं । संकीर्ण त्या नारी नरलोक ॥ ४ ॥
लोकां भूक तान नाहीं निद्रा डोळां । रूप वेळोवेळां आठविती ॥ ५ ॥
आहाकटा मग करिती गेलिया । आधीं ठावा तयां नाहीं कोणा ॥ ६ ॥
आधीं चुकी मग घडे आठवण । तुका ह्मणे जन परिचयें ॥ ७ ॥

॥ ५७ ॥

जननी हे ह्मणे आहा काय जालें । शरीर रक्षिलें काय काजें ॥ १ ॥
कार्य काज आतां हरिविण जिणें । नित्य दुःख कोणें सोसावें हें ॥ २ ॥
हें दुःख न सरे हरि न भेटे तों । त्यामागेंचि जातों एका वेळे ॥ ३ ॥
एकवेळ जरी देखतें मी आतां । तरी जीवापरता न करितें ॥ ४ ॥
करितां हे मात हरीचें चिंतन । शुभ तो शकुन तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ५८ ॥

शुभ मात तिहीं आणिली गोपाळीं । चेंडू वनमाळी घेउनी आले ॥ १ ॥
आली द्वारा देखे हरुषाची गुढी । सांगितली पुढी हरुषें मात ॥ २ ॥
हरुषली माता केलें निंबलोण । गोपाळां वरून कुरवंडी ॥ ३ ॥

गोपाळां भोंवतें मिळालें गोकुळ । अवघीं सकळ लहान थोरें ॥ ४ ॥
थोर सुख जालें ते काळीं आनंद । सांगति गोविंद घरीं आला ॥ ५ ॥
आले घरीं बैसोनिया नारायण । काळया नाथून वहन केलें ॥ ६ ॥
नगराबाहेरी निघाले आनंदें । लावूनिया वाद्यें नाना घोष ॥ ७ ॥
नारायणापुढें गोपाळ चालती । आनंदें नाचती गाती गीत ॥ ८ ॥
तंव तो देखिला वैकुंठींचा पति । लोटांगणीं जाती सकळही ॥ ९ ॥
सकळही एका भावें आलिंगिलें । अवघियां आले अवघे हरि ॥ १० ॥
हरि आलिंगनें हरिरूप जालीं । आप विसरलीं आपणास ॥ ११ ॥
सकळांसी सुख एक दिलें देवें । मायबाप भावें लोकपाळा ॥ १२ ॥
मायबाप देवा नाहीं लोकपाळ । सारिखीं सकळ तुका ह्मणे ॥ १३ ॥

॥ ५९ ॥

नेणें वर्णधर्म जीं आलीं सामोरीं । अवघींच हरी आलिंगिलीं ॥ १ ॥
हरि लोकपाळ आले नगरांत । सकळांसहित मायबाप ॥ २ ॥
पारणें तयांचें जालें एका वेळे । देखिलें सांवळें परब्रह्म ॥ ३ ॥
ब्रह्मानंदें लोक सकळ नाचती । गुढिया उभविती घरोघरीं ॥ ४ ॥
घरोघरीं सुख आनंद सोहळा । सडे रंगमाळा चौक दारीं ॥ ५ ॥
दारीं वृंदावनें तुळसीचीं बनें । रामकृष्ण गाणें नारायण ॥ ६ ॥
नारायण तिहीं पूजिला बहुतीं । नाना पुष्पयाती करूनिया ॥ ७ ॥
यांचें ऋण नाहीं फिटलें मागील । पुढें ओढवलें जोडिलें हीं ॥ ८ ॥
हीं नव्हतीं कधीं या देवा वेगळीं । केला वनमाळी सेवाऋणी ॥ ९ ॥
सेवाऋणें तुका ह्मणे रूपधारी । भक्तांचा कैवारी नारायण ॥ १० ॥

॥ ६० ॥

नारायण आले निजमंदिरासी । जाले या लोकांसी बहुडविणें ॥ १ ॥
बहुडविलें बहु केलें समाधान । विस्मरु तो क्षण नका माझा ॥ २ ॥
मात सांगितली सकळ वृत्तांत । केलें दंडवत सकळांनीं ॥ ३ ॥
सकळां भातुकें वांटिल्या साखरा । आपलाल्या घरा लोक गेले ॥ ४ ॥
लोक गेले कामा गाईपें गोपाळ । याग्ली सकळ लोभापाठीं ॥ ५ ॥
लोभ दावूनिया आपुला विसर । पाडितो कुमर धनआशा ॥ ६ ॥
आशेचे बांधले तुका ह्मणे जन । काय नारायण वेसा जाणे ॥ ७ ॥

॥ ६१ ॥

जाला कवतुक करितां रोकडें । आणीकही पुढें नारायण ॥ १ ॥
येऊनिया पुढें धरिला मारग । हरावया भाग इंद्रयाजीं ॥ २ ॥
इंद्रा वरी सूध नूए नेतां कोणी । घेतलें हिरोनी वाढें त्यांचें ॥ ३ ॥

हिरोनी घेतल्या कावडी सकळा । ह्मणती गोपाळ बरें नव्हे ॥ ४॥
नव्हे तेचि करी न भे कळिकाळा । तुका ह्मणे लीळा खेळे देव ॥५॥

॥ ६२ ॥

खेळ नव्हे बरा इंद्र कोपलिया । देव ह्मणे तया भीऊं नका ॥ १ ॥
नका धरूं भय धाक कांहीं मनीं । बोले चक्रपाणि गौळियांसी ॥ २ ॥
गौळियांसी धीर नाहीं या वचनें । आशंकित मनें वेडावलीं ॥३॥
वेडावलीं त्यांस न कळतां भाव । देवाआदिदेव नोळखतां ॥ ४ ॥
नोळखतां दुःखें वाहती शरीरीं । तुका ह्मणे वरी भारवाही ॥ ५ ॥

॥ ६३ ॥

भारवाही नोळखती या अनंता । जवळी असतां अंगसंगें ॥ १ ॥
अंगसंगें तया न कळे हा देव । कळोनी संदेह मागुताला ॥ २ ॥
मागुती पडती चिंतेचिये डोहीं । जयाची हे नाहीं बुद्धि स्थिर ॥ ३ ॥
बुद्धि स्थिर होऊं नेदी नारायण । आशाबद्ध जन लोभिकांची ॥ ४ ॥
लोभिका न साहे देवाचें करणें । तुका ह्मणे तेणें दुःखी होती ॥ ५ ॥

॥ ६४ ॥

दुःखी होती लोभें करावें तें काई । उडनील गाई ह्मणती आतां ॥ १ ॥
आणिकही कांहीं होईल अरिष्ट । नाइके हा धीट सांगितलें ॥ २ ॥
सांगों चला याच्या मायबापांपाशीं । निघाले घरासी देवा रागें ॥ ३ ॥
रागें काला देतां न घेती कवळ । टोकवी गोपाळ क्रोधियांसी ॥ ४ ॥
क्रोध देवावरी धरियेला राग । तुका ह्मणे भाग न लभती ॥ ६ ॥

॥ ६५ ॥

भाग त्यां सुखाचे वांकड्यां बोवड्यां । आपुलिया गड्यां भाविकांसी॥१
भारवाही गेले टाकूनी कावडी । नवनीत गोडी भाविकांसी ॥ २ ॥
काला करूनिया वांटिला सकळां । आनंदें गोपाळांमाजी खेळे ॥३॥
खेळेंमेळें दहीं दुध तूप खाती । भय नाहीं चित्तीं कवणाचें ॥ ४ ॥
कवणाचे चाले तुका ह्मणे बळ । जयासी गोपाळ साह्य झाला ॥५॥

॥ ६६ ॥

जाणवलें इंद्रा चरित्र सकळ । वांकुल्या गोपाळ दाविताती ॥ १ ॥
ताताडिया मेघां आज्ञा करी राव । गोकुळींचा ठाव उरो नेदा ॥२॥
नेदाविया गाई ह्मसी वाचो लोक । पुरा सकळीक सिळाधारीं ॥३॥
धाक नाहीं माझा गौळियांच्या पोरां । सकळीक मारा म्हणे मेघां॥४॥
म्हणविती देव आपणां तोंवरी । जंव नाहीं वरी कोपलों मी ॥ ५ ॥
मीपणें हा देव न कळेचि त्यांसी । अभिमानें रासी गर्वाचिया ॥६॥
अभिमानराशि जयाचिये ठायीं । तुका म्हणे तई देव दुरी ॥ ७ ॥

॥ ६७ ॥

देव त्यां फावला भाविकां गोपाळां । नाहीं तेथें कळा अभिमान ॥ १ ॥
नाडलीं आपल्या आपणाचि एकें । संदेहदायकें बहुफारें ॥ २ ॥
फारें चाळविलीं नेदी कळों भाव । देवाधिदेव विश्वंभर ॥ ३ ॥
विश्वासावांचूनी कळों नये खरा । अभक्तां अधिरां जैसा तैसा ॥ ४ ॥
जैसा भाव तैसा जवळी त्या दुरी । तुका ह्मणे हरि देतो घेतो ॥ ५ ॥

॥ ६८ ॥

तो या साच भावें न कळेचि इंद्रा । ह्मणउनी धारा घाली शिळा ॥ १ ॥
घाली धारा मेघ कडाडिला माथा । वरी अवचिता देखियेला ॥ २ ॥
देखती पाऊस वोळला गोपाळ । झाले हे सकळ विचारिती ॥ ३ ॥
विचार पडला विसरले खेळ । अन्याय गोपाळ ह्मणती केला ॥ ४ ॥
लागलेंसे गोड न कळे तें काळीं । भेणें वनमाळी आठविती ॥ ५ ॥
आतां काय कैसा करावा विचार । गोधनासी थार आपणिया ॥ ६ ॥
यांचिया विचारें होणार तें काई । तुका ह्मणे ठायीं वेडावलीं ॥ ७ ॥

॥ ६९ ॥

वेडावली काय करावें या काळीं । ह्मणे वनमाळी गोपाळांसी ॥ १ ॥
शिरीं धरूं गोवर्धन उचलूनी । म्हणे तुम्ही कोणी भिऊं नका ॥ २ ॥
नका सांडूं कोणी आपला आवांका । मारितां या हाका आरोळिया
आशंकित चित्तें न वाटे तें खरें । धाकेंच तें बरें म्हणती चला ४ ॥
चित्तीं धाक परि जवळी अनंत । तुका ह्मणे घात होऊं नेदी ॥ ५ ॥

॥ ७० ॥

नेदी दुःख देखों दासां नारायण । केली निवारण आल्या आधीं १ ॥
आधीं पुढें शुद्ध करावा मारग । दासांमागें मग सुखरूप ॥ २ ॥
पर्वतास हात लाविला अनंतें । तो जाय वरतें आपेंआप ॥ ३ ॥
आपल्याआपण उचलिला गिरी । गोपाळ हे करी निमित्यासी ॥ ४ ॥
निमित्य करूनी करावें कारण । करितां आपण कळों नेदी ॥ ५ ॥
दीनाचा कृपाळु पतितपावन । हें करी वचन साच खरें ॥ ६ ॥
सांगणें नलगे सुखदुःख दासा । तुका ह्मणे ऐसा कृपावंत ॥ ७ ॥

॥ ७१ ॥

कृपावंतें हाक दिली सकळिकां । माजियारे नका राहों कोणी ॥ १ ॥
निवाले या भेणें पाउसाच्या जन । देखे गोवर्धन उचलिला ॥ २ ॥
लाविले गोपाळ फेरीं चहूंकडे । हांसे पुढें रडे कोणी धाकें ॥ ३ ॥
धाकें हीं सकळ निघालीं भीतरी । उचलिला गिरी तयाखालीं ॥ ४ ॥
तयाखालीं गाई वत्सें आलीं लोक । पक्षी सकळीक जीवजाति ॥ ५ ॥

जिहीं ह्मणविलें हरिचे अंकित । जातीचे ते होत कोणी तरी ॥ ६ ॥
जाति कुळ नाहीं तयासी प्रमाण । अनन्यानन्य तुका ह्मणे ॥ ७ ॥

॥ ७२ ॥

त्यांसी राखे बळें आपुलें जे दास । कळिकाळासी वास पाहों नेदी १ ॥
पाउस न येतां केली यांची थार । लागला तुषार येऊं मग ॥ २ ॥
येऊनी दगड बैसतील गिरी । वरुषला धारीं शिळांचिये ॥ ३ ॥
शिळांचिये धारीं वरुषला आकांत । होता दिवस सात एक सरें ४ ॥
एक सरें गिरि धरिला गोपाळीं । होतो भाव बळी आह्मी ऐसे ॥ ५ ॥
ऐसें कळों आलें देवाचिया चित्ता । ह्मणे तुह्मी आतां हात सोडा ६ ॥
हांसती गोपाळ करूनी नवल । आइकोनी बोल गोविंदाचे ॥ ७ ॥
दाविती डोया गुडघे कोपर । पुढल ते भार उचलितां ॥ ८ ॥
भार आह्मांवरी घालूनी निराळा । राहिलासी डोळा चुकवूनी ॥ ९ ॥
निमित्य अंगुळी लावियेली वरी । पाहों कैसा गिरी धरितोसी ॥ १० ॥
शिणले हे होते ठायींच्या त्या भारें । लटिकेंचि खरें मानूनिया ॥ ११ ॥
यांनीं अंत पाहों आदरिला याचा । तुका ह्मणे वाचा वाचाळ ते ॥१२॥

॥ ७३ ॥

वाचाळ लटिके अभक्त जे खळ । आपुलें तें बळ वाखाणावें ॥ १ ॥
बळें हुंबरती सत्य त्या न कळे । नुघडती डोळे आंधळयांचे ॥ २ ॥
आसुडिल्या माना हात पाय नेटें । तंव भार बोटें उचलिला ॥ ३ ॥
लटिकाचि आह्मी सीण केला देवा । कळों आलें तेव्हां सकळांसी ४ ॥
आलें कळों तुका ह्मणे अनुभवें । मग अहंभावें सांडवलें ॥ ५ ॥

॥ ७४ ॥

सांडवले सकळांचे अभिमान । आणिले शरण लोटांगणीं ॥ १ ॥
लोटांगणीं आले होऊनियां दीन । मग नारायण म्हणे भलें ॥ २ ॥
भला आजी तुह्मी केला साच पण । गिरि गोवर्धन उचलिला ॥३॥
लागती चरणा सकळ ते काळीं । आह्मांमध्यें बळी तूंचि एक ॥४॥
एका तुजविण नयो आम्हीं कामा । कळों कृष्णा रामा आलें आजी
आजिवरी आह्मां होता अभिमान । नेणतां चरणमहिमा तुझा ॥ ६ ॥
तुझा पार आह्मी नेणों नारायणा । नखीं गोवर्धना राखियेलें ॥ ७ ॥
राखियेलें गोकुळ आम्हां सकळांसी । दगडांच्या राशी वरुषतां ॥ ८
वर्णावें तें काय तुझें माहिमान । धरितीं चरण सकळही ॥ ९ ॥
सकळही तहान विसरली भूक । सकळही सुख दिलें त्यांसी ॥ १०
त्यांसी कळो आला वैकुंठनायक । तुका म्हणे लोक निर्भर ते ॥ ११

॥ ७५ ॥

लोकां कळों आला देव आम्हांमधीं। टाकिली उपाधि तिहीं शंका१॥
शंका नाहीं थोरां लहानां जीवांसी। कळला हा हृषीकेशी मग॥२॥
मग मनीं झाले निर्भर सकळ। संगें लोकपाळ कृष्णाचिया ॥ ३ ॥
कृष्णाचिया ओंव्या गाणें गाती गीत। कृष्णमय चित्त झालें त्यांचें ४ ॥
त्यांसी ठाव नाहीं बाहेरील भाव। अंतरींच वाव सुख झालें ॥ ५ ॥
सुखें तया दीस न कळे हे राती। अखंड या ज्योती गोविंदाची ६ ॥
चिंतनीचे धालीं न लगे अन्नपाणी। तुका म्हणे मनीं समाधान ॥७॥

॥ ७६ ॥

समाधान त्यांचीं इंद्रियें सकळ। जयां तो गोपाळ समागमें ॥ १ ॥
गोविंदाचा जाला प्रकाश भीतरीं। मग त्या बाहेरी काय काज ॥ २ ॥
काज काम त्यांचे सरले व्यापार। नाहीं आपपर माझें तुझें ॥ ३ ॥
माया सकळांची सकळाही वरी। विषम तें हरि दिसो नेदी ॥ ४ ॥
दिसे तया आपपरावें सारिखें। तुका ह्मणे सुखें कृष्णाचिया ॥ ५ ॥

॥ ७७ ॥

कृष्णाचिया सुखें भूक नाहीं तान। सदा समाधान सकळांचें ॥१॥
कळलेंचि नाहीं झाले किती दिस। बाहेरील वास विचरलीं ॥२॥
विसरु कामाचा तुका ह्मणे झाला। उद्वेग राहिला जावें यावें ॥३॥

॥ ७८ ॥

जावें बाहेरी हा नाठवे विचार। नाहीं समाचार ठावा कांहीं ॥१॥
कांहीं न कळे तें कळों आलें देवा। मांडिला रिघावा कवतुक ॥२॥
कवतुकासाठीं भक्त देहावरी। आणिताहे हरी बोलावया ॥ ३ ॥
यासी नांव रूप नाहीं हा आकार। कळला साचार भक्तांमुखें ॥४॥
मुखें भक्तांचिया बोलतो आपण। अंगसंगें भिन्न नाहीं दोघे ॥ ५ ॥
दोघे वेगळाले लेखील जो कोणी। तयाचा मेदिनी बहु भार ॥६॥
तयासी घडलीं सकळही पापें। भक्तांचिया कोपें निंदा द्वेषें ॥ ७ ॥
द्वेषियाचा संग न घडावा कोणा। विष जेंवि प्राणा नाश करी ८॥
करितां आइके निंदा या संतांची। तया होती तेचि अधःपात ॥९॥
पतन उद्धार संगाचा महिमा। त्यजावें अधमा संत सेवीं ॥ १० ॥
संतसेवीं जोडे महा लाभ रासी। तुका ह्मणे यासी नाश नाहीं ११॥

॥ ७९ ॥

नाहीं नाश हरि आठवितां मुखें। जोडतील सुखें सकळही ॥ १ ॥
सकळही सुखें वोळलीं अंतरीं। मग त्याबाहेरी काय काज ॥ २ ॥
येऊं विसरलीं बाहेरी गोपाळें। तल्लीन सकळें कृष्णसुखें ॥ ३ ॥

सुख तें योगियां नाहीं समाधींत। दिलें गाई वत्स पशु जीवां ॥४॥
वारला पाऊस केव्हां नाहीं ठावा। तुका ह्मणे देवावांचूनीया ॥५॥

॥ ८० ॥

यांसी समाचार सांगतों सकळां। चलावें गोकुळा ह्मणे देव ॥ १ ॥
देव राखे तया आडलिया काळें। देव सुखफळें देतो दासां ॥ २ ॥
दासां दुःख देखों नेदी आपुलिया। निवारी आलिया न कळतां ॥३॥
नाहीं मेघ येतां जातां देखियेला। धारीं वरुषला शिळाचिये ॥४॥
एवढें भक्तांचें सांकडें अनंता। होय निवारिता तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ८१ ॥

कांकुलती एकें पाहाती बाहेरी। तया म्हणे हरि वोसरला ॥ १ ॥
वोसरला मेघ आला होता काळ। बाहेरी सकळ आले लोक ॥ २ ॥
कवतुक जालें ते काळीं आनंद। कळला गोविंद साच भावें ॥ ३ ॥
भावें तयापुढें नाचती सकळें। गातील मंगळें ओंव्या गीत ॥ ४ ॥
गीत गाती ओंव्या रामकृष्णावरी। गोपाळ मोहोरी वाहाती पांवे ॥५॥
वत्सें गाई पशु नाचती आनंदें। वेधलिया छंदें गोविंदाच्या ॥ ६ ॥
चित्त वेधियेलें गोविंदें जयाचें। कोण तें दैवाचें तयाहुनी ॥ ७ ॥
तयाहूनी कोणी नाहीं भाग्यवंत। अखंड सांगात गोविंदाचा ॥ ८ ॥
गोविंदाचा संग तुका म्हणे ध्यान। गोविंद ते जन गोकुळींचे ॥ ९ ॥

॥ ८२ ॥

गोकुळींची गति कोण जाणे परि। पाहों आला वरि इंद्रराव ॥ १ ॥
इंद्रापाशीं मेघ बोलती बडिवार। सकळ संहार करूनी आलों ॥ २ ॥
आतां जीव नाहीं सांगाया ते रानीं। पुरिलें पाषाणीं शिळाधारीं ॥ ३ ॥
रिता कोठें नाहीं राहो दिला ठाव। जल्पती तो भाव न कळतां ॥ ४ ॥
न कळतां देव बळें बुडवती। साच ते पावती अपमान ॥ ५ ॥
भाव न कळतां केली तोंडपिटी। इंद्र आला दृष्टी पाहावया ॥ ६ ॥
पाहतां तें आहे जैसें होतें तैसें। नाचती विशेष तुका म्हणे ॥ ७ ॥

॥ ८३ ॥

नाचतां देखिलीं गाई वत्सें जन। विस्मित होऊन इंद्र ठेला ॥ १ ॥
लागला पाऊस शिळाचिये धारीं। वांचलीं हीं परी कैसी येथें ॥ २ ॥
येथें आहे नारायण संदेह नाहीं। विघ्न केलें ठायीं निर्विघ्न तें ॥ ३ ॥
विचारितां उचलिला गोवर्धन। अवतार पूर्ण कळों आला ॥ ४ ॥
आला गौळियांच्या घरा नारायण। करितो स्तवन इंद्र त्यांचें ॥ ५ ॥
त्यांच्या पुण्या पार कोण करी लेखा। न कळे चतुर्मुखा ब्रह्मयासी ॥ ६
सीणतां जो ध्याना न ये एकवेळा। तो तया गोपाळां समागमें ॥७॥

समागमें गाई वत्सें पुण्यवंता । देह कुर्वाळितां अंगसंगें ॥ ८ ॥
संग जाला मायबापां लोकपाळां । आलिंगिती गळां कंठाकंठ ॥ ९ ॥
करिती हे झाले स्तुति सकळिक । देव इंद्रादिक गोविंदाची ॥ १० ॥
करिती वृष्टि पुष्पवर्षाव । देवा आलिंगुन पूजियेला ॥ ११ ॥
पुष्पांजुळी मंत्र घोष जयजयकार । दुमदुमी अंबर तेणें नादें ॥ १२ ॥
नामाचा गजर गंधर्वांचीं गाणीं । आनंद भुवनीं न माये तो ॥ १३ ॥
तो सुखसोहळा अनुपम्य रासी । गोकुळीं देवासी दोहीं भागीं ॥ १४
दोहींठायीं सुख दिलें नारायणें । गेला दुरपणें वैरभाव ॥ १५ ॥
भावना भेदाची जाय उठाउठी । तुका म्हणे भेटी गोविंदाचे ॥ १६ ॥

॥ ८४ ॥

गोविंदाचें नाम गोड घेतां वाचे । तेथें हे कैचे वैरभाव ॥ १ ॥
भावें नमस्कार मानले सकळीं । लोटांगणें तळीं साष्टांगें ॥ २ ॥
वरी हातवाटे उभारिली देवें । कळलीया भावें [illegible] ॥ ३ ॥
सकळही वरी [illegible] कथळा । चालावें गोपाळीं म्हणे घरा ॥ ४ ॥
राहिलों हीं नाचों गोविंदाच्या बोलें । पडलीया डोलें छंदें हो तों ५
छंद तो नाचरे आपणा आपला । आनंदाचा आला होता त्यांसी ६ ॥
त्यांच्या तुका म्हणे आनंद सकळ । देखणें गोपाळ समागमें ॥ ७ ॥

॥ ८५ ॥

समागमें असे हरि नेणतां त्या । नेदी जाऊं वांयां ओळखीसी ॥ १ ॥
ओळखी मायबा केली नारायणें । गोपाळ गोधनें सकळही ॥ २ ॥
सकळांही जन आले गोकुळासी । आनंद मानसीं सकळांच्या ॥ ३ ॥
सकळांचा केला अंगीकार देवें । न कळतां भावें वांचवी त्यां ॥ ४ ॥
त्यां आला निर्धार हरि आम्हांपाशीं । निश्चिंत मानसीं निर्भय ५ ॥
निर्भय हे जन गोकुळींचे लोक । केले सकळिक नारायणें ॥ ६ ॥
नारायण भय येऊं नेदी त्यांसी । तुका म्हणे [illegible] अनुसरा त्या ७ ॥

॥ ८६ ॥

ऐसें चरित्र केलें नारायणें । सांगतां गायनें [illegible] ॥ १ ॥
हें सोंग सारिलें या रूपें अनंतें । पुढें ही बहुतें करणें आहे ॥ २ ॥
आहे तुका म्हणे धर्मसंस्थापनें । केला नारायणें अवतार ॥ ३ ॥

॥ ८७ ॥

अवतार केला संहाराया दुष्ट । करिती हे नष्ट परपीडा ॥ १ ॥
परपीडा करी दैत्य कंसराव । पुढें तोही भाव आरंभिला ॥ २
लाविलें लाघव पाहोनिया संधि । सकळांही वधी दुष्टजना ॥
दुष्टजन परपीडक जे कोणी । ते या चक्रपाणी न साहती ॥ ४ ॥

न साहावे दुःख भक्तांचें या देवा । अवतार घ्यावा लागे रूप ५ ॥
रूप हें चांगलें राम कृष्ण नाम । हरे भवभ्रम उच्चारितां ॥ ६ ॥
उच्चारितां नाम कंस वैरभावें । हरोनियां जीवें कृष्ण केला ॥ ७ ॥
कृष्णरूप त्यासी दिसे अवघें जन । पाहे तों आपण कृष्ण झाला ८॥
पाहिलें दर्पणीं आधिल्या मुखासी । चतुर्भुज त्यासी तोचि झाला ९
झालीं कृष्णरूप कन्या पुत्र भाज । तुका ह्मणे राज्य सैन्य जन १०॥

॥ ८८ ॥

सैन्य जन हांसे राया झालें काई । वासपे तो ठायीं आपणासी ॥१॥
आपणा आपण जयास तीं तैशीं । वैरभाव ज्यांसी भक्ति नाहीं २॥
नाहीं या वा त्याचा भाव एकविध । ह्मणऊनी छंद वेगळाले ॥ ३ ॥
वैसा...भावें ते तया हांसती । तयास दिसती अवघीं हरि ४ ॥
हरिला कंसाचा जीवभाव देवें । द्वेषाचिया भावें तुका ह्मणे ॥५॥

॥ ८९ ॥

द्वेषाचिया ध्यानें हरिरूप झाले । भाव हरपले देहादिक ॥ १ ॥
देहादिक कर्मे अभिमान वाढे । तया कंसा जोडे नारायण ॥ २ ॥
नारायण जोडे एकविध भावें । तुका ह्मणे जीवें जाणे लागे ॥ ३ ॥

॥ ९० ॥

जीवभाव त्याचा गेला अभिमान । ह्मणऊनी जन हांसे कंसा ॥ १ ॥
सावध करितां नये देहावरी । देखोनियां दुरी पळे जन ॥ २ ॥
जन वन हरि झालासे आपण । मग हे लोचन झांकियेले ॥ ३ ॥
झांकुनी लोचन मौन्येंचि राहिला । नाहीं आतां बोलायाचें काम ४
बोलायासी दुजें नाहीं हें उरलें । जन कृष्ण झालें स्वयें रूप ॥ ५ ॥
रूप पालटलें गुण नाम यांत । तुका ह्मण भूतीं देव झाला ॥ ६ ॥

॥ ९१ ॥

झालों स्वयें कृष्ण आठव हा चित्तीं । भेदें भयवृत्ति उरली आहे ॥१॥
उरली आहे रूप नांव दिसे भिन्न । मी आणि हा कृष्ण आठवतो ॥२॥
तोंवरी हा देव नाहीं तयापासीं । आला दिसे त्यासी तोचि देव ॥३॥
देवरूप त्याची दिसे वरी काया । अंतरीं तो भयाभीत भेदें ॥ ४ ॥
भेदें तुका ह्मणे अंतरे गोविंद । साच विण छंद वांयां जाय ॥ ५ ॥

॥ ९२ ॥

वांयां तैसे बोल हरिशीं अंतर । केले होते चार भयभेदें ॥ १ ॥
भेदभय गेलें नोळखे आपणा । भेटी नारायणा कंसा झाली ॥ २ ॥
झाली भेटी कंसा हरीशीं निकट । सन्मुखचि नीट येरयेरां ॥ ३ ॥

येरयेरां भेटी गुळाच्या प्रसंगीं । त्याचें शस्त्र अंगीं हाणितलें ॥ ४ ॥
त्याचें वर्म होतें ठावें या अनंता । तुका ह्मणे सत्तानायक हा ॥ ५ ॥

॥ १३ ॥

नारायणें कंस चाणूर मर्दिला । राज्यीं स्थापिला उग्रसेन ॥ १ ॥
उग्रसेन स्थापियेला शरणागत । पुरविला अंत अभक्तांचा ॥ २ ॥
अवघेंचि केलें कारण अनंतें । आपुलिया हातें सकळही ॥ ३ ॥
सकळही केली आपुली आंकित । राहे गोपीनाथ मथुरेसी ॥ ४ ॥
मथुरेसी आला वैकुंठनायक । झालें सकळीक एक राज्य ॥ ५ ॥
राज्य दिलें उग्रसेना शरणागता । सोडविलीं मातापिता दोन्ही ॥ ६
सोडवणें धांव भक्तांच्या कैवारें । तुका ह्मणे करें शस्त्र धरी ॥ ७ ॥

॥ १४ ॥

धरी दोहीं ठायीं माय आणि बाप । देवकी वसुदेव नंद दोन्ही ॥ १ ॥
दोन्हा एक ठायीं [illegible] नारायणें । ना[illegible]विला तेणें आगु [illegible] २॥
ज्याला चाडला हा आ[illegible] आचरण । [illegible] ३ ॥
माय हा जगाचा बाप नारायण । दुजा कोण करा यत्न चहुंला ॥४॥
काण जाग याच भगवाचा भाव । करा नद्या माव तुका म्हणे ॥५॥

॥ १५ ॥

दीनाचा कृपाळु [illegible] काळ । एकला सकळ व्यापक हा ॥ १ ॥
हांसे बोले तया नव्हे हा अनंत । नये प[illegible] ह्मणे [illegible] ॥ २ ॥
यासी कळावया एक भक्तीभाव । दुजा नाहीं ठाव थांडोळितां ॥ ३ ॥
थांडोळितां श्रुति शास्त्रां निश्चय । तो करी संकेत गोपीसवें ॥४॥
गोपीकांची वाट पाहे कुंजवनीं । मागुता त्यांहांसी न देखतां ॥५॥
न देखतां त्यांसी उठे बैसे पाहे । वेडावला राहे वेळोवेळां ॥ ६ ॥
वेळोवेळां पंथ पाहे गोपिकांचा । तुका ह्मणे याचा नातुडे तो ॥७॥

॥ १६ ॥

तो बोले कोमळ निष्ठुर त्यांहांसीं । कोपतां गौळणी हास्य करी १ ॥
करावया हास्य भक्तांचें निर्लज्ज । कवतुकें रज माथां वंदी ॥ २ ॥
दिलें उग्रसेना मथुरेचें राज्य । सांगितलें काज करी त्याचें ॥ ३ ॥
त्यासी होतां कांहीं अरिष्ट निर्माण । निवारी आपण शरणागता ४ ॥
शरणागतां राखे सर्वभावें हरि । अवतार धरी तयांसाठीं ॥ ५ ॥
तयांसाठीं बाहे सुदर्शन गदा । उभा आहे सदा सांभाळीत ॥ ६ ॥
तळमळ नाहीं तुका ह्मणे चित्ता । भक्तांचा अनंता भार माथां ॥ ७ ॥

॥ १७ ॥

मारिले असुर तारिले मेदिनी । होते कोणा कोणी पीडीत ते ॥

ते हा नारायण पाठवी अघोरा। संतांच्या मत्सरा घातावरी ॥ २ ॥
वरिले ते दूतीं यमाचिये दंडीं। गुझारितां तोंडीं नारायण ॥ ३ ॥
नारायणनाम नावडे जयांसी। ते झाले मिरासी कुंभपाकीं ॥ ४ ॥
कुंभपाकीं सेल मान तो तयांचा। तुका ह्मणे वाचा संतनिंदा॥ ५ ॥

॥ ९८ ॥

वास नारायणें केला मथुरेसी। वधूनी दुष्टांसी तये ठायीं ॥ १ ॥
ठायीं पितियाचे मानी उग्रसेना। प्रतिपाळी जनांसहित लोकां २॥
लोकां दुःख नाहीं मागील आठव। देखियेला देव दृष्टी त्यांनीं ३ ॥
देखोनिया देवा विसरलीं कैसा। ठावा नाहीं ऐसा होता येथें ४ ॥
येथें दुजा कोणी नाहीं कृष्णाविणें। ऐसें वाटे मनें काया वाचा ५॥
काया वाचा मन कृष्णीं रत झालें। सकळां लागलें कृष्णध्यान ६॥
ध्यान गोविंदाचें लागलें या लोकां। निर्भर हे तुका ह्मणे चित्तीं ७॥

॥ ९९ ॥

चिंतिलीं पावलें जया कृष्णभेटी। पुरवीं ते आटी [illegible]यांविण ॥ १ ॥
वासना धरिती कृष्णाविणें कांहीं। सीण केला तिहीं [illegible]नांचा २॥
चाळविले डेंबे एक अहंकारें। भोग जन्मांतरें न चुकतो ॥ ३ ॥
न चुकती भोग तपें दानें व्रतें। एका त्या [illegible]वांचूनिया ॥ ४ ॥
चुकवूनी जन्म दाखवी आपणा। भजा नारायणा तुका म्हणे ॥ ५ ॥

॥ १०० ॥

भजल्या गोपिका सर्व भावें देवा। नाहीं चित्तीं ठेवा दुजा कांहीं ॥ १ ॥
दुजा छंद नाहीं तयांचिये मनीं। जागृति स्वप्नीं कृष्णध्यान ॥ २ ॥
ध्यान त्यां हरीचें हरीसी तयांचें। चित्त [illegible] त्यांचें तैसा भावें ॥ ३ ॥
भाग्यें पूर्वपुण्य आचरिलीं लोक। अवघे सकळीक मथुरेचे ॥ ४ ॥
मथुरेच लोक सुखी केले जन। तेथें नारायण राज्य करी ॥ ५ ॥
राज्य करी गोपियादवांसहित। क्रमिले बहुत काळ तेथें ॥ ६ ॥
तेथें दैत्यीं उपसर्ग केला लोकां। रचिली द्वारका तुका ह्मणे ॥ ७ ॥

॥ १०१ ॥

रचियेला गांव सागराचे पोटीं। जडोनी गोमटीं नानारत्नें ॥ १ ॥
रत्नें स्वर्णावर्णा सोनियाच्या भिंती। लागलीया ज्योति रविकळा २
कळा सकळही गोविंदाचे हातीं। मंदिरें निगुतीं उभारिलीं ॥ ३ ॥
उभारिलीं दुर्गें दारवंटे फांजी। कोटि चर्या माजी शोभलिया ॥ ४ ॥
शोभलें उत्तम गांव सागरांत। सकळांसहित आले हरि ॥ ५ ॥
आला नारायण द्वारका नगरा। उद्धार या शूरां मुगुटमणी ॥ ६ ॥
[illegible]नां याति समानाचि केली। ठणक धाकुलीं नारायणें ॥ ७ ॥

नारायणें दिलीं अक्षई मंदिरें । अभंग साचारें सकळांसी ॥ ८ ॥
सकळ ही धर्मशील पुण्यवंत । पवित्र विरक्त नारीनर ॥ ९ ॥
रचिलें तें देवें न मोडे कवणा । बळियांचा राणा नारायण ॥ १० ॥
बळबुद्धीनें तीं देवाच सारिखीं । तुका म्हणे मुखीं गाती ओंव्या ११

॥ १०२ ॥

गाती ओंव्या कामें करितां सकळें । हालवितां बाळें देवावरी ॥१॥
ऋद्धिसिद्धि दासी दारीं ओळंगती । सकळ संपत्ति सर्वां घरीं २॥
घरीं बैसलिया जोडलें निधान । करिती कीर्तन नरनारी ॥ ३ ॥
नारीनर लोक धन्य त्यांची याति । जयांसी संगति गोविंदाची॥४॥
गोविंदें गोविंद केले लोकपाळ । चिंतनें सकळ तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ १०३ ॥

कांहीं चिंता कोणा नाहीं कोणेविशीं । करी द्वारकेसी राज्य देव १॥
द्वारकेसी राज्य करी नारायण । दुष्ट संहारून धर्म पाळी ॥ २ ॥
पाळी देवआज्ञा ब्राह्मणांचा मान । अतीतपूजन वैष्णवांचें ॥ ३ ॥
अतीत अलिप्त अवघिया वेगळा । नाहीं हा गोपाळा अभिमान ४ ॥
अभिमान नाहीं तुका ह्मणे त्यासी । नेदी आणिकांसी धरूं देव ५ ॥

॥ १०४ ॥

धरियेलें रूप कृष्ण नाम बुंथी । परब्रह्म क्षितीं उतरलें ॥ १ ॥
उत्तम हें नाम राम कृष्ण जगीं । तरावयालागीं भवनदी ॥ २ ॥
दीनानाथ ब्रिदें रूळती चरणीं । वंदितील मुनि देव ऋषि ॥ ३ ॥
ऋषीं मुनीं भेटी दिली नारायणें । आणीक कारणें बहु केलीं ॥ ४ ॥
बहु कासावीस झाला भक्तांसाठीं । तुका ह्मणे आटी सोसियेली ५

॥ १०५ ॥

सोसियेली आटी गर्भवास फेरे । आयुधांचे भारे वागवितां ॥ १ ॥
वाहोनी सकळ आपुलिये माथां । भार दासां चिंता वाहों नेदी २॥
नेदी काळाचिये हातीं सेवकांसी । तुका ह्मणे ऐसी ब्रीदावळी ३ ॥

॥ १०६ ॥

ब्रीदावळी ज्याचे रुळते चरणीं । पाउलें मेदिनी सुखावे त्या॥ १ ॥
सुखावे मेदिनी कृष्णाचिये चाली । कुंकुमें शोभलीं होय रेखा २ ॥
होऊनी भ्रमर पाउलांचें सुख । घेती भक्त मुख लावूनिया ॥ ३ ॥
याचसाठीं धरियेला अवतार । सुख दिलें फार निज दासां ॥ ४ ॥
निजसुखें तुका ह्मणे भक्तां ठावें । तिहींच जाणावें भोगूं त्यासी ५ ॥

॥ १०७ ॥

भोगिला गोपिकां यादवां सकळां । गौळणी गोपाळां गाईवत्सां ॥१॥

गाती धणीवरी केला अंगसंग । पाहिला श्रीरंग डोळेभरी ॥ २ ॥
भक्ति नवविधा तयांसी घडली । अवघींच केलीं कृष्णरूप ॥ ३ ॥
रूप दाखविलें होतां भिन्न भाव । भक्त आणि देव भिन्न नाहीं ४ ॥
नाहीं राहों दिलें जातां निजधामा । तुका ह्मणे आह्मांसहित गेला ५

॥ १०८ ॥

गेला कोठें होता कोठूनियां आला । सहज व्यापला आहे नाहीं १॥
आहे साच भावें सकळव्यापक । नाहीं अभाविक लोकां कोठें ॥ २ ॥
कोठें नाहीं ऐसा नाहीं रिता ठाव । अनुभवी देव स्वयें झाले ॥ ३ ॥
जातों येतां आह्मी देवाचे सांगात । तुका ह्मणे गात देवनाम ॥ ४ ॥

॥ १०९ ॥

मना वाटे तैसीं बोलिलों वचनें । केली धीटपणें सलगी देवा ॥ १ ॥
वोंगी नाहीं शुद्ध याति एक ठाव । भक्ति नेणें भाव नाहीं मनीं २ ॥
नाहीं झालें ज्ञान पाहिलें अक्षर । मानी जैसे थोर थोरी नाहीं ॥३॥
नाहीं मनीं लाज धरिली आशंका । नाहीं भ्यालों लोकां चतुरांसी ४
चतुरांच्या राया मी तुझें अंकित । जालों शरणागत देवदेवा ॥५॥
देवा आतां करा सरतीं हीं वचनें । तुझ्या कृपादानें बोलिलों तीं ६
तुझें देणें तुझ्या समर्पूनी पायीं । झालों उतराई पांडुरंगा ॥ ७ ॥
रंकाहूनी रंक दास मी दासांचें । सामर्थ्य हें कैंचें बोलावया ॥ ८ ॥
बोलावया पुरे वाचा माझी कायी । तुका ह्मणे पायीं ठाव द्यावा९॥

॥ ११० ॥

च्यारी वेद ज्याची कीर्ति वाखाणिती । प्रत्यक्ष ये मूर्ति विठोबाची १
चहूं युगींचें हें साधन साधिलें । अनुभवा आलें आपुलिया ॥ २ ॥
एवढें करूनि आपण निराळा । प्रत्यक्ष हें डोळां दाखविलें ॥ ३ ॥
दावूनि सकळ प्रमाणांच्या युक्ति । जयजयकार करिती अवघे भक्त
भक्ति नवविधा पावलो सूत्रीं । जनार्दन नामाची संख्या झाली ५॥
नवसें ओंव्या आदरें वाचितां । त्याच्या मनोरथा कार्य सिद्धि ६ ॥
सीमा न करवे आणीक ही सुखा । तुका ह्मणे देखा पांडुरंगा ॥७॥

गौळणी.

॥ १११ ॥

मैं भुली घरजानी बाट । गोरस बेचन आयें हाट ॥ १ ॥
कान्हा रे मनमोहन लाल । सबही बिसरूं देखें गोपाल ॥ २ ॥
कांहा पग डारूं देख आनेरा । देखें तों सब वोहिन घेरा ॥ ३ ॥
ईं तो थकित भैर तुका । भागा रे सब मनका धोका ॥ ४ ॥

॥ ११२ ॥

हरिबिन रहियां न जाये जिहिरा । कबकी थाडी देखें राहा ॥ १ ॥
क्या मेरे लाल कवन चुकी भई । क्या मोहिपासिती बेर लगाई ॥ २ ॥
कोई सखी हरी जावे बुलावन । बार हि डारूं उसपर तन ॥ ३ ॥
तुका प्रभु कब देखें पाऊं । पासीं आऊं फेर न जाऊं ॥ ४ ॥

॥ ११३ ॥

भलो नंदजीको डिकरो । लाज राखीलीन हमारो ॥ १ ॥
आगळ आवो देवजी कान्हा । मैं घर छोडी आहे ह्याना ॥ २ ॥
उनसुं कहना नव्हे तो भला । खसम अहंकार दादुला ॥ ३ ॥
तुका प्रभु परबल हरी । छपी आहे हुं जगाथी न्यारी ॥ ४ ॥

॥ ११४ ॥

होतें बहुत हे दिवस मानसीं । आजी नवस हे फळले नवसीं ॥
व्हावी भेटी ते झाली गोविंदासीं । आतां सेवा करीन निश्चयेसीं वो १॥
स्थिर स्थिर मनाचि साहे करा । बहु कष्ट सोसिल्या येरझारा ॥
येथें आड मज न साहावे वारा । देऊनि कपाट आलें तें दुसरें वारा वो २
मूळ सत्ता हे सायासाची जोडी । नेदी वेगळें होऊं एकी घडी ॥
नाहीं लौकिक स्मरला आवडी । आतां येणें काळें या वो लोभें वेडी वो
उदयीं उदय साधिला अवकाश । निश्चिंतीनें निश्चिंती सावकाश ॥
धरियें गोडी बहुत आला रस । तुका ह्मणे हा मागुता नये दिवस वो ४

॥ ११५ ॥

स्वयें सुखाचे झाले अनुभव । एक एकीपाशीं सांगतील भाव ॥
अवघ्यां अवघा हा कैसा नवलाव । सर्वसाक्ष तेथेंचि त्यांचा जीव वो १
आपआपणाशीं करिती नवल । परि वादावाद न संडिती बोल ॥
एका मेघश्याम जलधर वोल । रसीं उताविळ हृदय सखोल वो ॥२॥
एक विषय तो सकळांचा हरि । त्याच्या आवडीनें आवडी इतरीं ॥
अंध बाहिर हे प्रेतलोकाचारी। त्यांची कीर्ती गाइली पुराणांतरीं वो ३
स्तुति पराधिया सुखें रुचिकर । प्रीतिपात्राच्या गौरवीं आदर ॥
परस्परें हे सादरासादर । योग सज्जनाच्या सुखा नाहीं पार वो ४
भक्तिवल्लभ न तुटे चराचरीं । आप्त अनाप्त हे ऐसी ठेवी उरी ॥
दुरी जवळी सूचिता ऐसें धरी । रंगा रंग। ऐसें होणें लागे हरी वो ५॥
तुका लाधला हे उच्छिष्ट भोजन । आला बाहेरी प्रेमें वोसंडून ॥
पडिलें कानीं त्या जीवाचें जतन।धरियेले एका भावें हृदयीं चरण वो ६

॥ ११६ ॥

आजी कां वो तूं दिससी दुश्चित्ती । ह्मणिये काम नलगे तुझ्या चित्तीं॥
दिलें ठेवूं तें विसरसी हातीं । नेणों काय बैसला हरि चित्तीं वो १॥
सरसर परती झालीस आतां भांड । कैसें दाखविसी जगासी या तोंड ।
व्याली माय ते लाजविली रांड । नाहीं थार दो ठायीं जाला खंड वो २॥
होतें तैसें तें उमटलें वरी । बाह्य संपादणी अंतरींची चोरी ॥
नाहीं मर्यादा निःसंग बावरी । मन हें गोविंदीं देह काम करी वो ॥ ३ ॥
नाहीं करीत उत्तर कोणासवें । पराधीन भोजन दिलें खावें ॥
नाहीं अचळ सावरावा ठावें । देखों उदासीन तुज गे देहभावें वो ॥ ४ ॥
कोठें नेणों हा फावला एकांत । सदा किलकिल भोंवतीं बहुत ॥
दोघे एकवट बोलावया मात । नाहीं लाज धरिली दिला हात वो ॥५॥
करी कवतुक खेळ खेळे कान्हा । दावी लाघव भांडवी सासुसूना ॥
परा भक्ति हे शुद्ध तुह्मी जाणा । तुका ह्मणे ऐसें कळों यावें जना वो ६

॥ ११७ ॥

भरिला उलंडूनी रिता करी घट । मीस पाणियाचें गोविंदाची चट॥
चाले झडझडां उसंडुनी वाट । पाहे पाळतूनी उभा तोचि नीट वो १
चाळा लावियेले गोप गोपीनाथें । जाणें आवडीचें रूप जेथें तेथें ॥
दावी बहुतांच्या बहुवेषपंथें । गुणातीतें खेळ मांडियेला येथें वो २ ॥
मनीं आवडे तें करावें उत्तर । कांहीं निमित्ताचा पाहोनी आधार ।
उगा राहें कां मारिसी कंकर । मात वाढविसी उत्तरा उत्तर वो ३ ॥
धरिली खोडी दे टाकोनिया मागें । नये विनोद हा कामा मजी संगें ॥
मिठी घालीन या जीवाचिया त्यागें।नाहीं ठाउकीं पाहिलीं तुह्मी सोंगें वो
सुख अंतरीचें बाह्य ठसठसी । ह्मणे विनोद हा काय सोंग यासी ।
तुज मज काय सोयरीक ऐसी । नंदानंद या थोरपण जासी वो ५॥
करी कारण तें कळों नेदी कोणा । सुख अंतरींचें बाह्य रंग जाणा ॥
मन मिनलें रे तुका ह्मणे मना । भोग अंतरींचा पावे नारायणा वो६॥

॥ ११८ ॥

आजी नवल मी आलें येणें रानें । भेटी अवचिती नंदाचिया कान्हें ॥
गोपी सांगती वो सकळही जनें । होतें संचित आणियेलें तेणें वो १ ॥
गेलें होऊनी न चले आतां कांहीं । साद घालितां जवळी दुजें नाहीं ॥
अंगीं जडला मग उरलें तें काई । आतां राखतां गुमान भलें बाईवो २॥
बहुत कामें मज नाहीं आराणूक । एक सारितां तों पुढें उभें एक ॥
आजी मी टाकोनी आलें सकळीक । तंव रचिलें आणीक कवतुक वो ३

चिंता करितां हरिली नारायणें । अंगसंगें मिनतां दोघेजणें ॥
सुखें निर्भर झालियें त्याच्या गुणें । तुका ह्मणे खुंटलें येणें जाणें वो ४

॥ ११९ ॥

नका कांहीं उपचार माझ्या शरीरा । करूं न साहावे मज बहु होतो उबारा । मनोजन्य व्यथा वेध जाला अंतरा । लवकरी आणा नंदाचिया कुमरा ॥ १ ॥ सखिया वोसिया तुह्मी प्राणवल्लभा । निवेदिला भाव आर्तभूत या लोभा । उमटली अंगीं वो सांवळी प्रभा । साच हे अवस्था कळे मज माझ्या क्षोभा ॥ २ ॥ नये कळों नेदावी हे दुजियासी मात । घडावा तयासी उत्कंठा एकांत । एकाएकीं साक्षी येथें आपुलें चित्त । कोण्या काळें होइल नेणें भाग्य उदित ॥ ३ ॥ स्वादलीन देहभान निद्रा खंडन । पाहिलें तटस्थ उन्मीलन लोचन । अवघें वोसाळून उरले ते चरण । तुका ह्मणे दर्शनापें आलें जीवन ॥ ४ ॥

॥ १२० ॥

पडिलो भूली धांवत सैराट । छंद गोविंदाच्या चोजवितें वाट ॥
मागें सांडानी सकळ बोभाट । वंदीं पदांबुजें ठेवूनी ललाट वो ॥ १ ॥
कोणी सांगा या गोविंदाची शुद्धि । होता वाहिला लपाला आतां खांदी
कोठें आड आली हे देहबुद्धि । धांवा आळवा करुणा कृपानिधी वो २
मागें बहुतांच्या अंतरला संग । सुखें जयाचिया नेणें केला त्याग ॥
पहिलें पाहतों तें हरपलें अंग । खुंटली वाट नाहींसें झालें जग वो ३
शोकें वियोग झाला सकळांचा । गेल्या शरण हा अन्याय आमुचा ॥
केला उद्धार घडल्या दोषांचा । झाला प्रगट स्वामी तुकयाचा वो ४ ॥

॥ १२१ ॥

कायु उगें कां करितोसि चोरी । किती सांगो तुज नाइकसी हरी ॥
पर परता तूं पळोनी जासी दुरी । अनाचार या लौकिका बाहेरी वो १
माया करुणा हे करितें बहुत । किती सोसूं या जनांचे आघात ॥
न पुरे अवसरु हेंचि नित्यानित्य । तूंचि सोडवीं करुनी स्थिर चित्त वो २
बहुत कामें मी गुंतलिये घरीं । जाती डोळां तूं चुकवूनि हरी ॥
करितां लाग न येसीचि पळभरी । नाहीं सायासाची उगी दिली उरी वो ३
तुज म्हणतियें मी न संगें अनंता । नको जाऊं या डोळियां परता ॥
नलगे आणिक तुजविण आतां । तुकया स्वामी कान्होबा गुणभरिता वो

॥ १२२ ॥

आलियें धांवती धांवती भेटी होईल म्हणून । तंव ते टळलें
वो माझा उरला सीण ॥ २ ॥

कैसा । हरिलागीं प्राण फुटे वो थोरी लागली आशा ॥२॥ लाविला उशीर बहुतीं बहु ओढिती ओढा । सांभाळितां सांग असांग दुःख पावल्यें पीडा ॥ ३ ॥ जळो आतां संसारु वो कई शेवट पुरे । तुकयाच्या स्वामी गोपाळालागीं जीव झुरे ॥ ४ ॥

॥ १२३ ॥

घाली कवाड टळली वाड राती । कामें व्यापिली कां पडिली दुश्चिती । कोणे लागला गे सदैवेचे हातीं । आजी शून्य शेजे नाहीं दिसे पति वो ॥ १ ॥ बोले दूतिकेशीं राधा हें वचन । मशीं लाघव दाखवी नारायण । ह्मणे कोमळ परी बहु गे निर्गुण । याशीं न बोलें कळला मज पूर्ण वो ॥ २ ॥ धाडिलें गरुडा आणिलें हनुमंता । तैं पाचारिलें होउनि ये वो सीता । लाजिनली रूप न ये पालटितां । झाला भीमकी आपण राम सीता वो ॥ ३ ॥ सत्यभामा दान करी नारदासी । तैं कळला वो मज हृषीकेशी । तुळे घालितां न ये कनक वो रासी । समतुकें एक पान तुळसी वो ॥ ४ ॥ मज भुली पडली केशापरी । आम्हां भोगूनी ह्मणे मी ब्रह्मचारी । दिली वाट यमुने माये खरी । तुह्मां आह्मां न कळे अद्यापवरी वो ॥ ५ ॥ जाण जीवींचें सकळ नारायण । असे व्यापूनी तो न दिसे लपून । राधा संबोधिली प्रीति आलिंगून।तुका ह्मणे येथें भावचि कारण वो६

॥ १२४ ॥

मिळोनी गौळणी देती यशोदे गाऱ्हाणीं । दहीं दूध तूप लोणी शिंकांहुनि कांहीं । मेळवूनी पोरें तेथें रिघे एकसरें । वेगीं आणोनी सामोरें तेथें लोणी खाय ॥२॥ हरि सोंकला वो हरि सोंकला वो । सोंकला तो वारी तुज लाज नाहीं तरी । आह्मां सांपडतां उरी तुज मज नाहीं ॥ २ ॥ तुज वाटतसे कोड यासी लागतसे गोड । काय हांसतेसी वेड तुज लागलें वो । आह्मी जाऊं तुजवरी पोरें चाळविल्या पोरी । काय सांगो भांडखोरी लाज वाटे आह्मां ॥३॥ मुख मळिण वदन उभा हाडातिये घोणे । तंव दसवंती ह्मणे आणा शीक लांवूं । थोर आणिला कांटाळा घरींदारीं लोकपाळां । डेरा रिघोनी गुसळा तेथें लोणी खाय ॥ ४ ॥ मिळोनी सकळा दावें लावुनियां गळां । केशा बांधिती उखळा तेथें राहे उभा । बरा सांपडलासी हरी आजिच्यानें करिसिल चोरी । डोळे घाळूनियां येरी येरीकडे हांसे ॥ ५ ॥ फांकल्या सकळा उपडूनियां उखळा । मोडी वृक्ष विमळार्जुन दोन्ही । उठिला गजर दसवंती नव्हे धीर । तुका ह्मणे नकयांचा दातार आळंगिला वेगीं ॥ ६ ॥

॥ १२५ ॥

बाळपणीं हरि । खेळे मथुरेमाझारी । पायीं घागरिया सरी । कडदोरा वांकी । मुख पाहे माता । सुख न माये चित्ता । धन्य मानवे संचिता । वोडवलें आजी ॥ १ ॥ बाळ चांगलें वो । ह्मणतां चांगलें वो । बोल लागे तया बोलें । जीवापरीस तें वाल्हें । मज आवडतें ॥ २ ॥ मिळोनिया याती । येती नारी कुमारी बहुती । नाहीं आठव त्या चित्तीं । देहभाव कांहीं । विसरल्या घरें । तान्हीं पारठीं लेंकुरें । धाक सांडोनिया येरें । तान भूक नाहीं ॥ ३ ॥ एकी असतील घरीं । चित्त तयापाशीं परी । वेगीं करोनि वोसरी । तेथें जाऊं पाहे । लाज सांडियेली वोज । नाहीं फजितीचें काज । सुख सांडोनिया सेज । तेथें धांव घाली ॥ ४ ॥ वेधियेल्या बाळा । नर नारी या सकळा । बाळा खेळती अबला । त्याही विसरल्या । कुमर कुमारी । नभाव हा शरीरीं । दृष्टी न फिरे माझारी । तया देखतां हे ॥ ५ ॥ वैरभाव नाहीं । आपपर कोणीं कांहीं । शोक मोह दुःखठायीं । तये निरसलीं । तुका ह्मणे सुखी । केलीं आपणासारिखीं । स्वामी माझा कवतुकीं । बाळवेषें खेळे ॥ ६ ॥

॥ १२६ ॥

गोरस घेऊनी सातें निघाल्या गौळणी । तंव ती कृष्णाची करणी काय करी तेथें । झाला पानसरा मिठी घातली पदरा । आधीं दान माझें सारा मग चाल्या पंथें ॥१॥ सर जाऊं दे रे सर जाऊं दे रे ॥ सर जाऊं दे परता । मुळीं भेटलासी आतां । नाट लागलें संचिता । खेपा खुंटलिया ॥२॥ आसुडी पदरा धरी आणीक दुसरा । येरी झोंबतील करा काय वेडा होसी । आलों गेलों बहु वेळां नेणों गोरा कीं सांवळा । सर परता गोवळा काय बोलतोसी ॥ ३ ॥ आह्मी येथें अधिकारी मागें केली तुह्मी चोरी । आतां कळलियावरी मागें केलें तयाचें । बोलिल्या ह्मणुनी आह्मी सासुरवासिनी । कां रे झोंबसी दुरूनी करी मात कांहीं ॥ ४ ॥ वांया परनारी कैशा धरिसी पदरीं । तयां कळलिया उरी तुज मज नाहीं । जडला जिव्हारीं फांकों नेदी तया नारी । जेथें वर्म तें धरी जाऊं पाहे तियेचें ॥ ५ ॥ तया हातीं सांपडल्या हाटीं पाटीं चुकाविल्या । कृष्णमिळणीं मिळाल्या त्याही न फिरती । तुका ह्मणे खंती वांया न धरावी चित्तीं । होतें तुमच्या संचितीं वोडवलें आजी ॥ ६ ॥

॥ १२७ ॥

हरी तुझी कांति रे सांवळी । मी रे गोरी चांगोली । [illegible]

दर्शनें होईल काळी । मग हें वाळी जन मज ॥ १ ॥ उगला राहे न करी चाळा । तुज किती सांगों रे गोवळा । तुझा खडबड कांवळा। अरे नंद्वाळा आलगटा ॥ २ ॥ तुझिये अंगीं घुरट घाणी । बहु खासी दुध तूप लोणी । घरिचें बाहेरील आणोनी । मी रे चांदणी सकुमार ॥ ३ ॥ मज ते हांसतील जन । धिःकारिती मज देखोन । अंगींचें तुझें देखोनी लक्षण । मग विटंबना होईल रे ॥ ४ ॥ तुज लाज भय शंका नाहीं । मज तंव सज्जन पिशुन व्याही । आणीक मात बोलूं कांहीं । कसी भीड नाहीं तुज माझी ॥ ५ ॥ वचन मोडी नेदी हात । कळलें न साहेची मात । तुकयास्वामी गोपीनाथ । जींवन्मुक्त करूनी भोगी ॥ ६ ॥

॥ १२८ ॥

सात पांच गौळणी आलिया मिळोनी यशोदे गाऱ्हाणें देती कैसें । काय द्यालीस पोर चोरटें सिरजोर जनावेगळें चि वैसें । दहीं दुध लोणी शिंकां नुरेचि कांहीं कवाड जैसाचें तैसें । चाळऊनी नाशिलीं कन्याकुमरें आमच्या सुनांसी लाविलें पिसें गे बाइये १॥ अझुनी तरी यासी सांगे घरव्या परी नाहीं तरी नाहीं उरी जीवे- साटी । मिळोनी सकळै जणी करूं वाग्वा सर्वां तुज मज होईल तुटी गे बाइये ॥ २ ॥ नेणें आपपर लौकिक वेव्हार भलते ठायीं भलतें करी । पाळतुनी घरीं आम्ही नसतां तेथें आपण संचार करी। सोगया चुंबन देतो आलिंगन आमच्या लोकें सेजाब्राजावरी । शिंकी कडाडा फोडी गोरसाचे डेरे धरितां न सांपडे करीं गे बाइये ॥३॥ आतां याची चाड नाहीं आह्मां भीड सांपडतां कोड पुरवूं मनींचें। सोसिलें वृद्ध दिस नव्हता केला निस म्हणवूनि पकुलतें तुमचें । चरण खांबीं जीवें बांधेन सरिसा जंव न चले कांहीं याचें । प्राण देतां न सोडी सर्वथा भलतें हो या जिवाचें गे बाइये ॥ ४ ॥ घेउनी जननी हातीं चक्रपाणी देतसे गौळणी वेळोवेळां । निष्ठुर वाद्‌झणीं बोलाल सकळा क्षोभ जाईल माझ्या बाळा । जेथें लागे हात वाढतें नवनीत अमृताच्या कल्लोळा । देखोनि तुकयास्वामी देश देहभाव विसरल्या सकळा गे बाइये ॥ ५ ॥

॥ १२९ ॥

विरहतापें फुंदे छंदें करिते जाती । हा गे तो गे सावधान स- वेंचि दुश्चिती । न सांभाळुनि अंग लोटी पाहे भोंवतीं । वेगळीच पडों पाहे कुळाहुनि याती ॥१॥ खुंटलीसी झाली येथें अवघियांची ॰ । आपुलीं परावीं कोण नेणें भोंवतीं । त्यांचे नांवें बोभे अहो

अहो श्रीपति । नवलाव हा येरां वाटोनिया हांसती ॥ २ ॥ बाहेरीच धांवे रानां न धरी च घर । न कळे बंधना झाला तेणें संचारा विसरूनी गेली सासुरें कीं माहेर । एका अवलोकी एका पडिला विसर ॥३॥ तुका ह्मणे तुम्ही अवघ्या राहा निश्चळा । न ये आतां येऊं येथें सर्वथा बळा । त्याचा त्याच्या मुखें अवघियांचा निर्वाळा॥ बहुतां मतें येथें तर्कवाद निराळा वो ॥ ४ ॥

॥ १३० ॥

ये रे कृष्णा खुणाविती खेळों भातुकें । मिळालिया बाळा एके ठायीं कवतुकें । कळों नेदी माया त्यांसीच ते ठाउकें । खेळतोसें दावी लक्षलक्ष्यापें मुकें ॥ १ ॥ अखंडित चटे त्यांनीं लावियेला कान्हा । आवडे तयाचे संकल्प वाहाती मना । काया वाचा मनें रूपीं गुंतल्या वासना । एकांताचें सुख जाती घेउनिया राना ॥२॥ अवघियांचा जाणें झाला मेळासा हरी । मिळोनिया जावें तेथें तयां भीतरी । कळों नेदी घरिंच्या करी गोवूनी चोरी । हातोहातीं नेती परपरत्या दुरी ॥ ३ ॥ आनंदें निर्भर आपणाशीं आपण । क्रीडतील बाळा त्यजिलें पारिखें जन । एकाएकीं नाहीं तेथें दुसरें भिन्न । तुका म्हणे एका नारायणावांचून ॥ ४ ॥

॥ १३१ ॥

खेळतां मुरारी जाय सरोवरा तिरीं । तंव नग्नाचि नारी तेथें देखियेल्या । मांडिलें विंदान ख्याल सुखाचें संधान । अंग लपवूनी मान पिलंगत चाले ॥ १ ॥ ख्याल मांडिला रे ख्याल मांडिला रे । पायां पडतां न सोडी नेदी साउलां रे ॥ २ ॥ साड्या साउलीं पातळें गोंडे कसाणिया चोळया । बुंथी घेउनी सकळा कळंबावरी पळे । त्यांदी चान्हुनिया करीं दृष्टि घालोनि सामोरी । बैसे पाला ओढी वरी खदखदां हांसे ॥ ३ ॥ आनंदें कल्लोळ बाळा खेळती सकळ देती उलटिया चपळ । एकी एकीहुनी हैस बेळ सुर काढी । एकी नागविनी कोंडीं । नाना परीच्या विकडी खेळ मांडियेला ॥ ४ ॥ एकी आलिया बाहेरी पाहे लुगडें तंव नारी । ह्मणे नाहीं नेलें चोंढी काय जाणों केव्हां । केला सकळीं हाकारा तंव आलिया बाहेरा । आतां म्हणतील घरां जावें कैशा परी ॥ ५ ॥ तंव हांसे बनमाळी वरी पाहोनी सकळीं । लाजे रिघालिया जळीं मागें पुढें हात । लाज राखावी गोपाळा आह्मांजणींची स[illegible] काय मागसी ये वेळा देऊं गुळवाटी ॥ ६ ॥ जोडोनिया क[illegible]या न[illegible] सकळी समोर । वांया न बोलावें फार बडबड कांहीं । भातुकें

भूषण नाहीं चाड नेघे धन । करा एक चित्त मन या गे मजपाशीं ॥ ७ ॥ एक एकीकडे पाहे लाज सांडुनिया राहे । ह्मणे चला आतां सये जाऊं तयापाशीं । जोडोनिया हात कैशा राहिल्या निवांत । तुका ह्मणे केली मात लाज राखिली तयांची ॥ ८ ॥

॥ १३२ ॥

धरिला पालव न सोडी माझा येणें। कांहीं करितां या नंदाचिया कान्हें। एकली न येतें मी ऐसें काय जाणें । कोठें भरलें अवघड या राणेंरे १ सोडी पालव जाऊं दे मज हरी । वेळ लागल्या रे कोपतील घरीं। सासू दारुण सासरा आहे भारी। तुज मज सांगतां नाहीं उरी रे २ सख्यावशिया होत्या मजपाशीं । तुज फांवलें रे फांकतां तयांसी । होतें अंतर तर सांपडतें कैसी । एकाएकीं अंगीं जडलासी रे ॥ ३ ॥ कैसी भागली हे करितां उत्तर । शक्ति मावळल्या आसुडितां कर। स्वामी तुकयाचा भोगिया चतुर।भोग भोगी त्यांचा राखे लोकाचारवो

॥ १३३ ॥

गाई गोपाळ यमुनेचे तटीं । येती पाणिया मिळोनि जगजेठी । चेंडू चौगुणा खेळती वाळवंटीं । चला चला ह्मणती पाहूं दृष्टी वो १ ऐशा गोपिका त्या कामातुरा नारी । चित्त विव्हळ ते देखावया हरी। मिस पाणियाचें करितील घरीं । बारा सोळा मिळोनी परस्परीं वो २ चिरें चोळिया त्या धुतां विसरती । उर्ध्व लक्ष लागलें कृष्णमूर्ती । कोणा नाठवे कोण कुळ याती । झालीं तटस्थ सकळां नेत्रपातीं वो ३ दंतधावनाचा मुखामाजी हात । वाद्यें वाजतीं नायकें जनमात । करी श्रवण कृष्णवेणुगीत । स्वामी तुकयाचा पुरवी मनोरथ वो ४

॥ १३४ ॥

कोठें मी तुझा धरूं गेलें संग । लावियेलें जग माझ्या पाठीं ॥ १ ॥ सर सर रे परता अवगुणाच्या गोवळा। नको लावूं चाळा खोटा येथें २ रूपाच्या लावण्यें नेली चित्तवृत्ति । न देखें भोंवतीं मी ते माझें ३ ॥ तुकयाचा स्वामी माझे जीवींच बैसला। बोलींच अबोला करूनिया ४

॥ १३५ ॥

गोड लागे परी सांगतांचि नये । बैसे मिठी सये आवडीची ॥ १ ॥ वेधलें वो येणें श्रीरंगरंगें । मी हे माझी अंग हारपलीं ॥ २ ॥ परतेचि ना दृष्टि बैसली ते ठायीं । विसावोनी पायीं ठेलें मन ॥३॥ तुकयाच्या स्वामीसवें झाली भेटी।तेव्हां झाली तुटी मागिलाची ४

॥ १३६ ॥

गाह्रावया माजी नभा । दिसे शोभा चांगली ॥ १ ॥ बैसला तो

माझे मनीं । नका कोणी लाजवूं ॥२॥ जीवा आवडे जीवाहूनी । नव्हे क्षण वेगळा ॥३॥ झालें विश्वंभरा ऐसी । तुकया दासी स्वामीची॥४॥

॥ १३७ ॥

कोणी एकी भुलली नारी । विकितां गोरस ह्मणे घ्या हरि ॥ १ ॥
देखिला डोळां बैसला मनीं । तोचि वदनीं उच्चारी ॥ २ ॥
आपुलियाचा विसर भोळा । गोविंद कळा कौतुकें ॥ ३ ॥
तुका ह्मणे हांसे जन । नाहीं कान ते ठायीं ॥ ४ ॥

॥ १३८ ॥

करूनी आइत सत्यभामा मंदिरीं । वाट पाहे टळोनी गेली रात्री । न येचि देव येती कामलहरी । पडिली दुश्चिती तैंव तो कवाड टिमकारी ॥ १ ॥ सर गा परता कळला तुझा भाव। कार्यापुरतें हें दाविसी लाघव । बोलतोसी तें अवघी तुझी माव । जाणोनी आलासी उजडतां समयो ॥ २ ॥ मीच वेडी तुजला बोल नाहीं । दानावेळे विटंबना झाली कायी। मागुनी सत्रासी भेटी दिली तई । विश्वासतें तुझ्या बोला अजुनी तरी॥ ३ ॥ भ्रम होता तो अवघा कळों आला । मानवत होतें मी भला भला । नष्टा क्रिया नाहीं मा तुझ्या बोला।तुकयाबंधु स्वामी कान ध्या कौसल्या४

॥ १३९ ॥

तंव तो हरि म्हणे निजांगने वो। लाइ नीच कां देसील ब्राह्मणे वो । मजपें दुजें आलें तें देव जाणे वो । शब्द काय हे बोलसी ते उणे वो ॥ १ ॥ पाहा मनीं विचारूनी आधीं वो। सांडूनि देह भ्रांति करीं स्थिर बुद्धि वो । तंट केलें हें माझें तुझें उपाधीं वो। उघडीं डोळे अजुनी तरी धरी शुद्धि वो ॥ २ ॥ कोठें तरी दुनियांत वर्तलें वो । स्त्रियांनीं भ्रतारा दाना दिलें वो । केला मी भला नव्हे तें सोसिलें वो । रुसतेसी तें उफराटें नवल झालें वो ॥ ३ ॥ काय सांग म्यां दैन्य केली कैसी वो । तुझ्या गर्वें आणाविलें हनुमंतासी वो । कष्टी केलें मज गरुडा भीमकीसी वो । तुकयाबंधु ह्मणे खरें खोटें नव्हे यासी वो ॥ ४ ॥

॥ १४० ॥

तंव ते ह्मणे ऐका हृषीकेशी वो । नवाजिलें तुह्मी ह्मणा आपणांसी वो । तरी कां वंचनुक सुमनासी वो । नट नाट्य बरें सैपाटूं जाणसी वो ॥ १ ॥ सर हो परता आतां हो हरी । ह्मणे सत्राजिताची कुमरी । जाणतें मी या [illegible] । गोवोंन करून ठकाविलें आजीवरी ॥ २ ॥ [illegible]

मनींची आर्त जन्मांतरीं व्हावा संग ॥ तों तों केलें पाठमोरें हें जग । ऐसें काय जाणें हे तुझे रंग ॥ ३ ॥ काय करूं या नागविलें कामें । लागलें तयास्तव इतुकें सोसावें । नाहीं तरी कां नव्हतीं ठावीं वर्मे । परद्वारीं ऐसा हाकलिती प्रसिद्ध नांवें ॥ ४ ॥ काय किती सांगावे तुझे गुण । न फुटे वाणी निष्ठुर ऐसा निर्गुण । आपपर न ह्मणसी माय बहीण । सासुसुनास लावूनी पाहासी भांडण ॥५॥ इतुकियावरी ह्मणे वैकुंठीचा राणा । होऊन गेलें तें नये आणूं मना । आतां न करीं तैसें करी क्रिया आणा । भक्तवत्सल ह्मणे तुकयाबंधु कान्हा ॥ ६ ॥

॥ १४१ ॥

कान्हो एकली रे एकली रे । तुजसवें चुकलें रे । भय वाटे वनीं मज अबळा धाकली रे ॥ १ ॥ निघतां घरीं आई बा वारी । तुजसवें कां आलियें हरी ॥ २ ॥ लोक वाटा सांगती खोटा । परी मी चटा लागलियें ॥ ३ ॥ पिकल्या बोरी झालिये सामोरी । जाणें कोठें राहिला हरी ॥ ४ ॥ आड खुंट झालिया जाळी । काय काय जाणों कान्हें मांडिली रळी ॥ ५ ॥ तुका ह्मणे जाऊं आलिया वाटा । पाहों हरी पायीं न मोडे कांटा ॥ ६ ॥

॥ १४२ ॥

क्याला मज आयो वारितेसी घरा । खेळतों सोकरा नंदाच्या मी ॥ १ ॥ बहु दिसां झाली यासी मज भेटी । आतां वाटे तुटी न करावी ॥ २ ॥ कोवळें बोलतो मना आवरतें । डोळियाचें पातें ढांपवेना ॥ ३ ॥ आजी सकळांसी आलें चोळूनिया । कां गो पाठी वांयां पुळाविली ४ ॥ तुमचें तें काय खोळंबलें काज । बल्या कां गो मज कोंडा घरीं ॥५॥ तुकयाचा धनी वैकुंठनायक । सरा कांहीं एक बोलतों मी ॥ ६ ॥

॥ १४३ ॥

आतां न ये मागें । मी आलें याच्या रागें । काय माझें जगें । कोपोनिया करावें ॥ १ ॥ कां गो कलित्या कोल्हाळ । तुम्ही भलत्याच सकळ । वेचाल ते बोल । झुटे होती बोलिले ॥ २ ॥ याचे भेटी माझें मन । स्वरूपीं ठाकले लोचन । वेगळें तें क्षण आतां होऊं नावरे ॥ ३ ॥ काज काम नको झालें । बीजें नावरे बोलिलें । याचिया भेदिलें । कामबाणीं अंतर ॥ ४ ॥ या वेगळें होणें । आतां जळो तैसें जिणें । घेतलें तें मनें । आतां मागें न फिरे ॥ ५ ॥ आतां ऐरी वार । माझी नका धरूं चार । तुकयाचा दातार । सेजे तो रळों ॥ ६ ॥

॥ १४४ ॥

हरिरता चपळा नारी । लागवरी न रिघती ॥ १ ॥ अवघ्या अंगें सर्वोत्तम । भोगी काम भोगता ॥ २ ॥ वाचा वाच्यत्वासी न ये । कोठें काय करावें ॥३॥ तुका ह्मणे देवा पेशा । देवपिशा उद्गारा ४॥

॥ १४५ ॥

गौळणी आल्या वाज । ह्मणती या गे राखों आज । सांपडवूनी माज । घरांत कोंडूं धरुनी । उघडें कवाड उभ्या काळोखाचे आड । साता पांचा एक भींड मौनेंचि ठेल्या ॥ १ ॥ नित्य सोंकचला नेदों । सांगों चित्त बोला । आतां सांपडतां याला । कोण सोडी जीवें ॥२॥ जाणोनिया हरी त्याच घरा आला चोरी । गडियां ठेवूनी बाहेरी पूर्वद्वारें शिरे । त्यांच्या भयाभीत चाले पिलंगत शोधनाले । पाहे तंव देखियेलें नवनीत पुढें ॥ ३ ॥ उतरोनी शिंकें । पाहे चाखोनिया निकें । गोड तेंचि एका एकें । हातीं लांबविलो । जाणे राखती तयांसी । तेथें अधिकचि नासी । माग लावी हात पुसी । चोरी जाणावया ॥ ४ ॥ जाणोनिया नारी मूळ वर्मद्वार धरी । मग कोंडू-नी भीतरीं । घरांत धरियेला । कां रें नागविसी माझे मुलीं लाग-लासी । आणवीन तुजपासीं । मागें खावलें तें ॥ ५ ॥ दोहीं संधीं बाहे । धरूनी नेती माते पाहे । काय नासी केली आहे । घरामाजी येणें । तुका ह्मणे मुख । त्याचे याळों नेदी दुःख । दसवंती कवतुक । करूनी रंजविल्या ॥ ६ ॥

॥ १४६ ॥

या हो या चला जाऊं सकळा । पाहों हा सोहळा आजि वृंदा-वनींचा ॥ १ ॥ वाइला गोपाळें वेणुनाद पडे कानीं । धीर नधरे मनीं चित्त झालें चंचळ ॥२॥ उरलें तें सांडा काम नका करूं गोवा । हाचि वेळ ठावी मज कृष्णभेटीची ॥ ३ ॥ नियताल्या बोळे याचें श्रीमुख पाहातां । बोलती तें आतां घरचीं सोसूं यांइट ॥ ४ ॥ कृष्णभेटी आड कांहीं नावडे आणीक । लाज तरी लोक मन झालें उदास ॥५॥ एका-एकीं चालियेल्या साद्रावीत सवें । तुका ह्मणे देवें रूपें केल्या तन्मय ॥६॥

॥ १४७ ॥

एकली राना गोविंदा सवें । गेलें ठावें तें झालें ॥ १ ॥ मज न ह्मणा न ह्मणा शिंदळी । नाहीं विषम जवळी आतळलें ॥ २ ॥ नवह-ती देखिली ऱ्यां वाट । ह्मणोनी हा धीट संग केला ॥ ३ ॥ भेणें मिठी दिधली गळां । सेजे जवळा द्वाळें ॥ ४ ॥ सकणी वरी यवो-

घर । साहाती करमुर सवें ॥५॥ आहेच मी गर्भीणपणें । हें सांगणें कां लागे ॥ ६ ॥ तुका ह्मणे शेवटा नेलें । संपादिलें उभयतां ॥ ७ ॥

॥ १४८ ॥

भोजनाच्या काळीं । कान्हें मांडियेली आळी । काला करी वनमाळी । अन्न एकवटा । देई निवडुनि । माते ह्मणे तो जननी । हात निपटुनी मेदिनी । वरी अंग घाली ॥१॥ कैसा आळी घेसी । नव्हे तेंचि करविसी । घेई दुसरें तयेसी । वारी ह्मणे नको ॥ २ ॥आतां काय करूं । नये यासी हाणूं मारूं । नव्हे वुझावितां स्थिरू । कांहीं कूरिता । हातेंचि केलें एके ठायीं । आतां निवडूनी खाई । आह्मां जाचितोसी काई । हरिसी ह्मणे माता ॥ ३ ॥ त्याचें तयाकुन । करवितां तुटे भान । तंव झालें समाधान । उठोनिया बैसे । माते बरें जाणविलें । अंग चोरूनी आपुलें । तोडियेलें एका बोलें । कैसें सुखदुःख ॥ ४ ॥ ताट पालवें झाकिलें । होतें तैसें तेथें केलें । भिन्नाभिन्न निवडिलें । अन्नें वेगळालीं । विस्मित जननी । भाव देखोनिया मनीं । ह्मणे नाहीं ऐसा कोणी । तुज सारिखा रे ॥ ५ ॥ हरुषली माये । सुख अंगीं नसमाये । कवळुनी बाहे । देती आलिंगन । आनंद भोजनीं । तेथें फिटलीसे धणी ।तुका ह्मणे कोणी । सांडा शेष मज ६ ॥

॥ १४९ ॥

कोंडिला गे माज । निरोधुनि द्वार । राखण तें बरें । येथें करा कारण ॥ १ ॥ हा गे हा गे हरि । करितां सांपडला चोरी । घाला गांठी धरी । जीवें माय त्रासाया ॥ २ ॥ तेंचि पुढें आड । तिचा लोभ तिला नाड । लावुनी चरफड । हात गोउनी पळावें ॥ ३ ॥ संशयाचें खिरडें । याचे निरसलें भेटी । घेतलीसे तुटी । आतां घेतां फावेल ॥ ४ ॥ तुका येतो काकुलती । वाउगिया सोड । यासीनिवाड । आम्ही भार वाहिका ॥ ५ ॥

॥ १५० ॥

कोणी सुना कोणी लेंकी । कोणी एकी सतंता ॥ १ ॥ अवघियांची जगनिंद । झाली धिंद सारखी ॥ २ ॥ अवघ्या अवघ्या चोरा । विनावरा मायबापा ॥३॥ तुका म्हणे करा सेवा । आलें जीवावर नगी ४॥

॥ १५१ ॥

जीव खादला दैवतें । माझा येणें महाभूतें । झोंबलें निरुतें । कांहीं कारितां न सुटे ॥ १ ॥ आतां करूं काय । न चले करितां उपाय । तुह्मां आह्मां सये ॥ विघडीविघडी केली ॥ २ ॥ बोलतां दुश्चिति मी वो पडियलें भ्रांति । आठव हा चित्तीं । न ये ह्मणतां मी माझें

॥ ३ ॥ भलतेंचि चावळे । जना अवघिया वेगळे । नाठवती बाळे ॥ आपपर सारिखें ॥ ४ ॥ नको बोलूं सये । मज वचन न साहे । बैसाल त्या राहें । उग्या वाचा खुंटोनी ॥ ५ ॥ तुह्मां आह्मां भेटी ॥ नाहीं झाली जीवेंसाठीं । तुका ह्मणे दृष्टि । पाहा जवळी आहे तो ॥६॥

॥ १५२॥

जैशा तुम्ही तुरी आंह्मां । तैशा राहा अंतरें ॥ १ ॥ नका येऊं देऊं आळ । अंगीं गोपाळ जडलासे ॥ २ ॥ अवघा हाचि राखा काळ । विकाळाच भोंवता ॥३॥ तुका ह्मणे मज ऐशा । होतां पिशा जगनिंद्य ॥४॥

॥ १५३ ॥

येथील जे एक घडी । तये जोडी पार नाहीं ॥१॥ किती त्यांचा सासुरवास । कैंचा रस हा तेथें ॥२॥ अवघे दिवस गेले कामा । नाहीं जन्मा खंडण ॥३॥ तुका ह्मणे रतल्या जनीं । सोडा ह्मणी कानोबा ४

॥ १५४ ॥

आलिंगन कंठाकंठीं । पडे मिठी सर्वांगें ॥ १ ॥ न घडे मागें परतें मन । नारायण संभोगी ॥ २ ॥वचनासी वचन मिळे । रिघती डोळे डोळियांत ॥ ३ ॥ तुका ह्मणे अंतर्ध्यानीं । जीव जीवनीं विराल्या ४॥

॥ १५५ ॥

विषमाची शंका वाटे । सारिखें भेटे तरी सुख ॥ १ ॥ ह्मणऊनि चोरिलें जना । आल्या रानां एकांतीं ॥ २ ॥ दुजियासी कळों नये । जया सोय नाहीं हे ॥ ३ ॥ तुका ह्मणे मोकळें मन । नारायण भोगासी ४

॥ १५६ ॥

उदासीन पावल्या वेगीं । अंगा अंगीं जडलिया ॥१॥ वैटाळिला भोंवता हरि । मयूरफेरी नाचती ॥२॥ मना आले करिती चार । त्या फार हा एकला ॥३॥ तुका म्हणे नारायणीं । निरंजनीं मानाविल्या॥४॥

॥ १५७ ॥

सोडियेल्या गांठी । दरुषणें कृष्णभेटी ॥१॥ करिती नारी अक्षवाणें । जीवभाव देती वाणें ॥ २ ॥ उपजल्या काळें । रूपें मोहिलीं सकळें ॥ ३ ॥ तुका तेथें बारी । एकी आडोनी दुसरी ॥ ४ ॥

॥ १५८ ॥

मुख डोळां पाहे । तैशीच ते उभी राहे ॥ १ ॥ केल्याविण नव्हे हातीं । धरोनी आरती परती ॥ २ ॥ न धरिती मनीं । कांहीं संकोच दाटणी ॥ ३ ॥ तुका म्हणे देवें । ओस केल्या देहभावें ॥ ४ ॥

काला.

॥ १५९ ॥

मेळवूनी सकळ गोपाळ । कांहीं करिती विचार ॥१॥ चला जाऊं चोरूं लोणी । आजी घेऊं चंद्रधणी । वेळ लावियेला अझूनी एका करितां गडे हो ॥२॥ वाट काढिली गोविंदीं । मागें गोपाळांची मांदी ॥३॥ अवघाचि वावरे । कळों नेदी कोणा फिरे ॥ ४ ॥ घर पाहोनि एकांताचें । नवविधा नवनीताचें ॥५॥ रिघे आपण भीतरीं । पुरवी माथुलिच्या हरी ॥६॥ बोलों नेदी ह्मणे स्थीर । खुणा दावी खा रे क्षीर ॥ ७ ॥ जोगावल्यावरी । तुका करितो चाकरी ॥ ८ ॥

॥ १६० ॥

योल तर या रे लागें । अवघे माझ्या मागें मागें ॥ १ ॥ आजी देतों पोटभरी । पुरे म्हणाल तोंवरी ॥ २ ॥ हळूहळू चला । कोणी कोणाशीं न बोला ॥ ३ ॥ तुका म्हणे सांडा घाटे । तेणें नका भरूं पोटें ॥ ४ ॥

॥ १६१ ॥

शिंकें लावियेलें दुरी । होतों तिघांचे मी वरी ॥१॥ तुह्मी व्हारे दोहीं-कडे । मुख पसरूनी गडे ॥ २ ॥ वाहती त्या धारा । घ्यारे दोहींच्या कोंपरा ॥ ३ ॥ तुका ह्मणे हातीं टांका । अधिक उणें नेदी एका ॥ ४ ॥

॥ १६२ ॥

पळाले ते भ्याड । त्यांसी येथें झाला नाड ॥ १ ॥ धीट घेती धणीवरी शिंकीं उतरितो हरी ॥ २ ॥ आपुलिया मतीं । पडलीं विचारीं तीं रितीं ॥ ३ ॥ तुका लागे घ्यारे पायां । कैं पावाल या ठाया ॥ ४ ॥

॥ १६३ ॥

धालें मग पोट । केला गड्यांनीं बोभाट ॥ १ ॥ ये रे ये रे नारा-यणा । बोलों अबोलण्या खुणा ॥ २॥ खांद्यावरी भार । तीं शिणती बहु फार ॥ ३ तुकयाच्या दातारें । नेलीं सुखी केलीं पोरें ॥ ४ ॥

॥ १६४ ॥

पाहाती गौळणी । तंव पाळथी दुधाणी ॥ १ ॥ ह्मणती नंदाचि-या पोरें । आजी चोरी केली खरें ॥ २ ॥ त्याविण हे नासी । नव्हे दुसरिया ऐसी ॥३॥ सवें तुका मेळा । त्याने अगुणा आणिला ॥ ४ ॥

॥ १६५ ॥

आतां ऐसें करूं । दोघां धरूनिया मारूं ॥ १ ॥ मग टाकिती हे खोडी । तोंडीं लागली ते गोडी ॥ २ ॥ कोंडूं घरामधीं । न बोलोनी जागो बुद्धी ॥ ३ ॥ बोलाविती देवा । तुका गडियांचा मेळावा ४ ॥

॥ १६६ ॥

सोडियेल्या गाई नवलक्ष गोपाळीं । सर्वं वनमाळीं चालियेला ॥ १ ॥
सुदिनसुवेळीं भाग्याच्या उदयीं । चरावया गाई वनामाजी ॥ २ ॥
गाईगोपाळांच्या संगें चाले हरि । क्रीडा नानापरि खेळताती ॥ ३ ॥
काठी कांबळीया मोहरिया पांवा । सिदोरी गांठिया खांद्यावरी ॥ ४ ॥
गोधनें सवंगडे खेळे नानापरि । आले भीमातीरीं वेणूनादा ॥ ५ ॥
तेथें उभा ठेला गोपाळांसहित । सिदोरिया सोडीत बैसे तेथें ॥ ६ ॥
तुका ह्मणे ज्यांनीं आणिल्या भाकरी । नेऊनिया हरीपुढें देती ॥ ७ ॥

॥ १६७ ॥

माझे गडी कोण कोण । निवडा भिन्न यांतुनि ॥ १ ॥ आपआपणामध्यें मिळों । एक खेळों एकाशीं ॥ २ ॥ घाबरियांच्या मोडू काड्या । धाडा भ्याडां वळतिया ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवापाशीं विटाळशी नसावी ॥ ४ ॥

॥ १६८ ॥

झेला रे झेला बरवेवर झेला । हातींचें गमावी तो पाठीसी खाय टोला ॥ १ ॥ त्रिगुणांचा चेंडू हातें अुगारी निगाला । वरिलिया मुखें मन लावी तेथें डोळा ॥ २ ॥ आगळा होऊनि धरी वरत्रिया वरी । चपळ तो जिंके गांळ्या ठके येरझारी ॥ ३ ॥ हातीं सांपडलें उभें बैसों नेदी कोणी । सोरी मागें सोरी घेती आणवें करुनी ॥ ४ ॥ डाई पडिलिया सोसी दुःखाचे डोंगर । पाठीवरी भार भोंवताही उभा फेर ॥ ५ ॥ तुका ह्मणे सुख पाहे तयांचें आगळें । जिंकितो हरीसी कोणी एका तरी काळें ॥ ६ ॥

॥ १६९ ॥

अझुनि कां थीर पोरा न ह्मणसी फिर । धरुनिया धीर लावी वुर निघाला ॥ १ ॥ मोकळा होतासी कां रे पडिलासी डाई । वरिलांची भार आतां उतरेसा नाहीं ॥ २ ॥ मेळवूनि मेळा एकाएकीं दिली मिठी । कवळिलें एका बहु वेसांचिलीं पाठीं ॥ ३ ॥ तळील तें वरी वरील तें येतें तळा । न सुटे तोंवरी येथें गुंतलिया खेळा ॥ ४ ॥ सांडितां ठाव पुढें सईल धरी हात । चढेल तो पडेल पैसी एका रे मात ॥ ५ ॥ तुका ह्मणे किती आवरावे हात पाय । न खेळावें तोंच बरें वरी न ये डाय ॥ ६ ॥

॥ १७० ॥

गडी गेले रडी । कान्हो नेदीस तूं चढी ॥ १ ॥ आह्मी न खेळों न खेळों । आला भाव तुझा कळों ॥ २ ॥ न साहवे भार । बहु उशीर ॥ ३ ॥ तुका आला रागें । येऊं नेदी मागें मागें ॥ ४

॥ १७१ ॥

यारे करूं गाई । जमा निजलेती काई । वोभाटानें आई । घरा गेल्या मारील ॥ १ ॥ घाला घालारे कुकारे । ज्याची तेणेंचि मोहरे । एवढेंचि पुरे । केलियानें सावध ॥ २ ॥ नेणोनिया खेळा । समय समयाच्या वेळा । दुश्चिताजवळा । मिळालेती दुश्चित ॥३॥ तुका ह्मणे शीक । न धरितां लागे भीक । धरा सकळीक । मनेरी धांवा वळातियाट

॥ १७२ ॥

एकमेकीं घेती थडका । पाडी धडका देऊनी ॥ १ ॥ एकमेकां पाठीवरी । बैसोनी करिती टवाळी ॥ २ ॥ हात हात हाणे टाही । पळतां घाई चुकविती ॥ ३ ॥ तुका म्हणे लपणी चपणी । एका हाणी पाठीवरी ॥ ४ ॥

॥ १७३ ॥

चला वळूं गाई । दूर अंतरल्या भाई ॥ १ ॥ खेळ खेळतां झाला शीण । कोण करी वणवण ॥ २ ॥ गाई हकारी कान्हया । म्हणोनि लागती ते पायां ॥ ३ ॥ तुका म्हणे धावें । नामसंकीर्तन बरवें ॥४॥

॥ १७४ ॥

चला वळुं गाई । बैसों जेऊं एके ठायीं ॥ १ ॥ बहु केली वणवण । पायपिटी झाला सिण ॥ २ ॥ खांदी भार पोटीं भूक । काय खेळायाचें सुख ॥ ३ ॥ तुका ह्मणे धांवें । मग अवघें बरवें ॥ ४ ॥

॥ १७५ ॥

अवघे गोपाळ ह्मणती या रे करूं काला । काय काय कोणाची सिदोरी ते पाहों द्या मला । नका कांहीं मागें ठेवूं रे पुढें खरेंच बोला । वंची वंचला तोचि रे येथें भोंवडा त्याला ॥ १ ॥ घेतल्यावांचून झाडा रे नेदी आपुलें कांहीं । एकां एक ग्वाही बहुत देती मोकळें नाहीं । तांक सांडी येर येर रे काला भात भाकरी दहीं । खाले घेतों मध्यें बैसला नाहीं आणवीत तें ही ॥ २ ॥ एका नाहीं धीर तांतडी दिल्या सोडोनी मोटा । एक सोडितील गांठी रे एक चालती वाटा । एक उभा भार वाहोनी पाहे उगाचि खोटा । एक ते करूनि आराले आतां ऐसेंचि घाटा ॥ ३ ॥ एकीं शिराळल्या गाई रे एक वळल्या देती । एकांच्या फांकल्या वोढाळा फेरे भोंवतीं घेती । एकें चाराचारा गुंतलीं नाहीं जीवन चित्तीं । एक एका चला ह्मणती एक हुंबरी घेती ॥ ४ ॥ एकीं एकें वाटा लाविलीं भोळीं नेणतीं मुलें । आपण घरींच गुंतले माळा नासिलीं फुलें । गांठींचें तें सोडूं नावडे खाय आइतें दिलें । सांपडलें वेठी । गोढी रे भार वाहतां मेलें ॥ ५ ॥ एक ते माया गुंतले घरीं बहुत

काम । वार्ता ही नाहीं तयाची तया कांहींच ठावें । जैसें होतें शिळें संचित तैसें लागलें खावें । हातोहातीं गेलें वेचुनी मग पडिलें ठावें ॥६॥ एकीं हातीं पायीं पटे रे अंगीं लाविल्या राखा । एक ते सोलिव बोडके केली सपाट शिखा । एकने आळसी तळीं रे वरी वाढिल्या कांखा । सिदोरी बांधून बुद्धि रे केला अवघ्या वाखा ॥७॥ तुका म्हणे आतां कान्होबा आम्हां वांटोनी खावें । आहे नाहीं आम्हांपाशीं तें तुज अवघेंचि ठावें । मोकलिलां तुम्हीं शरण आह्मीं कवणासी जावें । कृपावंतें कृपा केली रे पोट भरे तों खावें ॥८॥

॥ १७६ ॥

काम सारूनी सकळ । आले अवघे गोपाळ । आली आतां वेळ । ह्मणती आणा सिदोऱ्या ॥ १ ॥ देती आपुलाल्या झाडा । गाई बैसविल्या वाडां । दोंदिल बोबडा । वांकड्याच्या हरि मेळीं ॥ २ ॥ आपुलालेये आवडी । मुदा बांधल्या परवडी । निवडूनि गोडी । हरि मेळवी त्यांत तें ॥ ३ ॥ भार वागविल्या खांदीं । नव्हती मिळाली तों मांदी । सकळांचे संदी । ओझीं अवघीं उतरलीं ॥ ४ ॥ मागे जो तांतडी । त्यासी रागा येती गडी । तुझी कारे कुडी । येथें मिथ्या भावना ॥ ५ ॥ एक एकाच्या संवादें । कैसे धाले ब्रह्मानंदें । तुका ह्मणे पदें । यारे वंदू हरीचीं ॥ ६ ॥

॥ १७७ ॥

यमुने पावळीं । गडियां बोले वनमाळी । आणा सिदोऱ्या सकळीं । काला करूं आजी । अवघे एके ठायीं । करूनी स्वाद त्याचा पाहीं । मजपाशीं आहे तेंही । तुम्हांमाजी देतों ॥१॥ ह्मणती बरवें गोपाळ । ह्मणती बरवें गोपाळ । वाहाती सकळ । मोहरी पावे आनंदें ॥ खडकीं सोडियेल्या मोटा । अवघा केला एकवटा । काला करूनिया वांटा । गडियां देतो हरि ॥ २ ॥ एकापुढें एक । गाळी हात पसरी मुख । गोळा पांवे तया सुख । अधिकचि वाटे । ह्मणती गोड झालें । ह्मणती गोड झालें । नाहीं पोट आमुचें धालें । आणिक देई ॥ ३ ॥ हात नेतो मुखापाशीं । येर आशा तोंड वासी । माय आपण तयासी । दावी वांकुलिया । देऊनिया मिठी । एके लागतील पाठीं । धरूनी काढितील ओठीं । मुखामाजी खाती ॥ ४ ॥ ह्मणती ठकडा रे कान्हा । लावी घांसा भरी राणा । ढुम करितो शहाणा । पाठोवाठीं तयाच्या । अवघियांचे माय । कवळ कृष्णा माझी माय । सुरवर ह्मणती हाय हाय । सुखा अंतरलों ॥ ५ ॥ एक एका मारी । ढुंगा पाठी तोंडावरी । गोळा न [illegible] । [illegible]रि ।

ह्मणे पुरे आतां । येतो काकुलती । गोळा न साहावे श्रीपति । ह्मणे खेळों आतां नीती । सांगों आदरिलें ॥ ६ ॥ आनंदाचे फेरी । माजी घालुनिया हरि । एक घालिती हुंबरी । वाती सिंगें पावें । वांकडे बोबडे । खुडे मुडे एक लुडे । कृष्णा आवडली पुढें । बहु भाविक ते ॥ ७ ॥ करी कवतुक । त्यांचें देखोनिया मुख । हरिसी वाटतसे सुख । खद्खदां हांसे । एक एकाचे उच्छिष्ट । खातां न मानिति वीट । केलीं लाजतां ही धीट । आपुलिया संगें ॥ ८ ॥ नाहीं गेली ज्याची भूक । त्याचें पसरवितो मुख । अवघिया देतो सुख । सारिखेंची हरि । ह्मणती भला भला हरी । तुझी संगति रे बरी । आतां चाळविसी तरी । नवजों आणिकां सवें ॥ ९ ॥ गाई विसरल्या चार । पक्षी श्वापदांचे भार । झाले यमुनेचें स्थिर । जळ वाहों ठेलें । देव पाहाती सकळ । मुखें घोटूनिया लाळ । धन्य ह्मणती गोपाळ । धिग झालों आम्ही ॥ १० ॥ ह्मणती कैसें करावें । ह्मणती कैसें करावें । यमुनाजळीं व्हावें । मत्स्य शेष घ्यावया । सुरवरांचे थाट । भरले यमुनेचें तट । तंव अधिकचि हांट । मटमटां वाजवी ॥ ११ ॥ आनंदें गोपा सहित । क्रिडा करी गोपीनाथ । ह्मणे यमुनेंत हात । नका धुऊं कोणी । ह्मणती जाणें जीवींचें । लाजे त्यास येथें कैचें । शेष या कृष्णाचें । लाभे थोरिवे ॥१२॥ धन्य दिवस काळ । आजी फावला गोपाळ । ह्मणती धालों रे सकळ । तुझियानि हातें । मानवले गडी । एक एकांचि आवडी । दहीं खादलें परवडी । धणीवरी आजी ॥ १३ ॥ तुझा संग बरवा । नित्य आम्हां द्यावा । ऐसें करूनी जीवा । नित्य देवा चालावें । तंव ह्मणे वनमाळी । घ्यारे काठिया कांबळी । आतां जाऊं खेळीमेळीं । गाई चारावया ॥१४॥ तुका ह्मणे प्रेमें धालीं । कोणा न स्मरावें चाली । गाई गोपाळांसी केली । आपणया सरी । आजी आला आनंदु । न वर्णवे ब्रह्मानंदु । चाले परमानंदु । सर्वे आह्मांसहित ॥१५॥

॥ १७८ ॥

बैसवूनी फेरी । गडियां मध्यभागीं हरी । अवघियांचें करी । समाधान सारिखें ॥१॥ पाहे तो देखे समोर । भोगी अवघे प्रकार । हरुषें झेली कर । कवळ मुखीं देती ते ॥२॥ बोल बोलतिया सवें । देतील तें तेंचि घ्यावें । एक एका ठावें येर येरा अदृश्य ३ तुका ह्मणे देवा । बहु आवडीचा हेवा । कोणाचिया जीवा । वाटों नेदी विषम ४

॥ १७९ ॥

"अवघिया दिला गोर । मजकरे पाहीना" ॥१॥ फुंदे गोपाळ डोळे

चोळी । ढुंगा थापली हाणे तोंडा ॥२॥ आवडती थोर मोठे । मी रे पोरटें दैन्यवाणें ॥३॥ तुका ह्मणे जाणों भाव । जीवींचा देव बुझावी ॥४॥

॥ १८० ॥

हा गे माझे हातीं । पाहा कवळ सांगातीं ॥१॥ देवें दिला वांटों भाग । कराल तरी करा लाग ॥२॥ घालें ऐसें पोट । वरी करूनि बोभाट ॥ ३ ॥ तुका ह्मणे घरीं । मग कैच्या या परी ॥ ४ ॥

॥ १८१ ॥

अवघेंचि गोड झालें । मागिलये भरी आलें ॥ १ ॥ साह्य झाला पांडुरंग । दिला अभ्यंतरीं संग ॥२॥ थडिये पावतां तो वाव । मागें वाहावतां ठाव ॥ ३ ॥ तुका ह्मणे गेलें । स्वप्नींचें जागे झालें ॥ ४ ॥

॥ १८२ ॥

ज्यां जैसी आवडी त्यां तैसा विभाग । देत पांडुरंग तृप्ति झाली ॥१॥ मुखींचें उच्छिष्ट हिरोनिया खातां । विस्मित विधाता देखोनियां ॥२॥ दिलें जें गोपाळां तें नाहीं कोणासी । विस्मित मानसीं सुरवर ॥३॥ देव ऋषि मुनि सिद्ध हे चारण । शिव मरुद्गण चंद्र सूर्य ॥ ४ ॥ तुका ह्मणे आले सकळही सुरवर । आनंदें निर्भर पहावया ॥ ५ ॥

॥ १८३ ॥

घ्या रे भोंकरें भाकरी । दहीं भाताची सिदोरी । ताक सांडा दुरी । असेल तें तयापें १ येथें द्यावें तैसें घ्यावें । थोडें परि निरें व्हावें । सांगतों रे ठावें । असो धारे सकळां २ माझें आहे तैसें पाहे । नाहीं तरी घरा जाये । चोरोनिया माये । नवनीत आणावें ३ तुका ह्मणे घरीं । माझे कोणी नाहीं हरी । नका करूं दुरी । मज पायां वेगळें ४

॥ १८४ ॥

आळे सुरवर नानापक्षी झाले । सकळ अवतरले श्वापदवेषें ॥ १ ॥ श्वानखररूपी होऊनिया आले । उच्छिष्ट कवळ वेचिताती ॥ २ ॥ होऊनिया दीन हात पसरिती । मागोनिया घेती उष्टावळी ॥ ३ ॥ अभिमान आड घालोनी बाहेरी । तयां ह्मणे हरि घ्या रे धणी ॥४॥ तुका ह्मणे धणी लाधली अपार । तया सुखा पार काय सांगों ॥५

॥ १८५ ॥

काल्याचिये आसे । देव जळीं झाले मासे । पुसोनिया हातें सांगातें हात ॥१॥ लाजे त्यासी वांटा नाहीं । जाणे अंतरींचें दान होतां कांहीं । होऊं नेदी वेगळें ॥२॥ उपाय अपाय याव खोटें निवाडितां कुडें । जोडूनिया [illegible]

सावकाशें । जया फावेल

॥ १८६ ॥

आजी ओस अमरावती । काला पहावया येती । देव विसरती । देहभाव आपुला ॥१॥ आनंद नसमाये मेदिनी । चारा विसरल्या पाणी । तटस्थ त्या ध्यानीं । गाई झाल्या श्वापदें ॥ २ ॥ जें देवांचें दैवत । उभें असे या रंगांत । गोपाळांसहित । क्रीडा करी कान्होबा ॥ ३ ॥ तया सुखाची शिराणी । तींच पाउलें मेदिनीं । तुका ह्मणे मुनी । धुंडितां न लभती ॥ ४ ॥

॥ १८७ ॥

चला बाई पांडुरंग पाहूं वाळवंटीं । मांडियेला काला भोंवतीं गोपाळांची दाटी ॥१॥ आनंदें कवळ देती एकामुखीं एक । न ह्मणती सान थोर अवघीं सकळीक ॥ २ ॥ हमामा हुंबरी पांवा वाजविती मोहरी । घेतलासे फेर माजी घालुनिया हरी ॥ ३ ॥ लुब्धल्या नारी नर अवघ्या पशुयाती । विसरलीं देहभाव शंका नाहीं चित्तीं ॥ ४ ॥ पुष्पांचा वरुषाव झाली आरतियांची दाटी । तुळसी गुंफोनिया माळा घालितील कंठीं ॥ ५ ॥ यादवांचा राणा गोपीमनोहर कान्हा । तुका ह्मणे सुख वाटे देखोनिया मना ॥ ६ ॥

॥ १८८ ॥

कंठीं धरिला कृष्णमणी । अवघा जनीं प्रकाश ॥ १ ॥ काला वांटूं एकमेकां । वैष्णव निका संभ्रम ॥ २ ॥ वाकुलिया ब्रह्मादिकां । उत्तम लोकां दाखवूं ॥३॥ तुका ह्मणे भूमंडळीं । आम्ही बळी वीर गाढे ॥४॥

॥ १८९ ॥

उपजोनिया पुढती येऊं । काला खाऊं दहींभात ॥ १ ॥ वैकुंठीं तों ऐसें नाहीं । कवळ कांहीं काल्याचे ॥ २ ॥ एकमेकां देऊं मुखीं । सुखीं घालूं हुंबरी ॥३॥ तुका ह्मणे वाळवंट । बरवें नीट उत्तम ॥ ४ ॥

॥ १९० ॥

हेचि अनुवाद सदा सर्वकाळ । करुनिया गोपाळ काला सेवूं ॥१॥ वोरसलें कामधेनूचें दुभतें । संपूर्ण आइतें गगनभरी ॥ २ ॥ संत सनकादिक गोमट्या परवडी । विभाग आवडी इच्छेचिये ॥३॥ तुका ह्मणे मधीं घालूं नारायण । मग नव्हे सीण कोणा खेळें ॥ ४ ॥

॥ १९१ ॥

आतां जेऊं हेंचि जेऊं । सवें घेऊं सिदोरी ॥ १ ॥ हरिनामाचा खिचडा काला । प्रेमें मोहिला साधनें ॥ २ ॥ चवीं चवीं घेऊं घास । ब्रह्मरस आवडी ॥३॥ तुका ह्मणे गोड लागे । तों तों मागे रसना ॥४॥

॥ १९२ ॥

कवळाचिया सुखें । परब्रह्म झालें गोरखें । हात गोवूनि खाय मुखें । बोटासांदीं लोणचें १ कोण जाणे तेथें । कोण लाभ कां तें । ब्रह्मादिकां दुर्लभ २ घाली हमामा हुंबरी । पांवा वाजवी मोहरी । गोपाळांचे फेरी । हरिछंदें नाचतसे ३ काय नव्हतें त्या घरीं खावया । रिघे लोणी चोरावया । तुका ह्मणे सर्व तया । आह्मीही सोंकलों ॥ ४ ॥

॥ १९३ ॥

अवघें अवघीकडे । दिलें पाहे मजकडे । अशा संवगडे । सहित शोरी लागली १ कां रे धरिला अबोला । माझा वांटा देई मला । निर्दोगीचा केला । झाडा आतां निवडेना २ भूक लागली अनंता । कां रे नेणसी जाणतां । भागलों वळितां । गाई सर्वा ओढाळा ३ तुका करुणा भाकी हरि पाहे गोळा टाकी । घेता जाला सुखी । भीतरी वांटी आणिकां ४

॥ १९४ ॥

आह्मी गोवळी रानटें । नव्हों जनांतील धीटें ॥ १ ॥ सिदोरीचा कर्र काला । एक वांटिनों एकाला ॥२॥ खेळों आपआपणाशीं । आमचीं तीं आह्मांपाशीं ॥३॥ ह्मणे मिळाले नेणते । तुका कान्होया भोंवते ॥४॥

॥ १९५ ॥

कांरे गमाविल्या गाई । आली वळती तुह्मी जाई । मागें आलें काई । एका तें कां नेणसी १ केलास फजित । मागें पुढें ही बहुत । लाज नाहीं नित्य । नित्य दंड पावतां २ वोला खोडा खीळ गाढी । पेल कोण तये काढी । धांवले का पाडी । तुह्मी आधीं वोढाळा ३ चाले चाल चोखें । मी ही येतों तुजसवें । तुका ह्मणे जंव । तेथें नाहीं पावली ४

॥ १९६ ॥

कान्होबा तुह्मी आम्हीच गडे । कोणाकडे जाऊं नेदूं ॥ १ ॥
वाहीन तुह्मी भारशिदोरी । वळतीवरी येऊं नेदीं ॥ २ ॥
ढवळे गाईचे दूध काढूं । एकएकल्या ठोंबे मारूं ॥ ३ ॥
तुका ह्मणे टोकवूं त्यांला । जे तुझ्या बोला मानीत ना ॥ ४ ॥

॥ १९७ ॥

बहु काळीं बहु काळीं । आह्मी देवाचीं गोवळीं ॥ १ ॥ नाहीं विट वेतों भातें । जेऊं बैसऊं सांगातें ॥२॥ बहु काळें बहु काळें । माझें पांघरे कांबळें ॥३॥ तुका म्हणे नाहीं नाहीं । त्याचें आमचेसें काही ॥ ४

॥ १९८ ॥

बहु बरा बहु बरा । या

साटीं। घेतली कान्होबाची पाठी ॥२॥ बरवा बरवा दिसे। समागम याचा निमिषें ॥३॥ पुढती पुढती तुका। सोंकला सोंकवितों लोकां ॥४॥

॥ १९९ ॥

घेती पाण्यासी हुंबरी। त्यांचें समाधान करी ॥ १ ॥ पेशी गोपाळांची सवे। जाती तिकडे मागें धांवे ॥ २ ॥ स्थिरावली गंगा। पांगविली ह्मणे उगा ॥३॥ मोहरी पावा काठी। तुका ह्मणे याजसाठीं ॥ ४ ॥

॥ २०० ॥

वळी त्या गाई धांवे घरा। आमच्या करी येरझारा ॥ १ ॥ नांव घेतां तो जवळी। बहु भला कान्हो बळी ॥२॥ नेदी पडों उणें पुरें। ह्मणे अवघेंचि बरें॥ ३ ॥ तुका ह्मणे चित्ता। वाटे न व्हावा परता ॥ ४ ॥

॥ २०१ ॥

म्हणती घालों धणीवरी। आतां नलगे शिदोरी। नये क्षणभरी। आतां यासी विसंबो॥ १ ॥ चाल चाल रे कान्होबा। खेळ मांडूं रानीं। बैसवूं गोठणीं। गाई जमा करूनी ॥२॥ नलगे जावें घरा। चुकलिया येरझारा। सज्जन सोयरा। मायबाप तूं आम्हां ॥३॥ तुका ह्मणे धालें पोट। आतां कशाचा बोभाट। पहाणें ते वाट। मागें पुढें राहिली॥४॥

॥ २०२ ॥

तुझिये संगतीं। झाली आमुचि निश्चिती ॥ १ ॥ नाहीं देखिलें तें मिळे। भोग सुखाचे सोहळे ॥२॥ घरीं ताकाचें सरोवर। येथें नवनीताचे पूर ॥३॥ तुका ह्मणे आतां। आह्मी न वजों दवडितां ॥४॥

॥ २०३ ॥

कामें पीडिलों माया। बहु मारी नाहीं दया ॥१॥ तुझ्या राहिलों आधारें। झालें अवघेंचि बरें ॥२॥ तुझे लागलों संगती। आतां येतों काकुळती ॥३॥ तुका ह्मणे तुझ्या भिडा। कान्होबा हे गेली पीडा ॥४॥

॥ २०४ ॥

ब्रह्मादिकां न कळे खोळ। ते हे आकळ धरियेली ॥१॥ मोहरी पांवा वाहे काठी। धांवे पाठी गाईचे ॥२॥ उच्छिष्ट जें न लभे देवां। तें हें सदैवां गोवळ्यां ॥३॥ तुका ह्मणे जोड झाली। ते हे माउली आमुची ॥४॥

॥ २०५ ॥

कान्होबा तूं आलगट। नाहीं लाज बहु धीट। पाहिलें वाईट। बोलोनिया वोखटें ॥१॥ परि तूं न संडिसी खोडी। करिसी केली घडीघडी। पाडिसी रोकडी। तुटी माये आम्हांसी ॥ २ ॥ तूं ठायींचा गोवळ। अविचारी अनर्गळ। चोरटा शिंदळ। ऐसा पिटूं डांगोरा

॥ ३ ॥ जरी तुझी आई । आम्ही घालूं सर्वां ठायीं । तुका ह्मणे तें-
ही । तुज वाटे भूषण ॥ ४ ॥

॥ २०६ ॥

नेणों वेळा काळ । घालों तुझ्यानें सकळ ॥ १ ॥ नाहीं नाहीं रे
कान्होबा भय आह्मांपाशीं । वळूनी पुरविसी गाई पोटा खावया॥२॥
तुजपाशीं भयें । हें तों बोलों परी नये ॥ ३ ॥ तुका ह्मणे बोल ।
आह्मां अनुभवें फोल ॥ ४ ॥

॥ २०७ ॥

पाहातां गोवळी । काय त्यांची उष्टावळी ॥ १ ॥ करिती नामाचें
चिंतन । गडी कान्होबाचें ध्यान २ आली धावी डाई । धांवे वळि-
त्या मागें गाई ॥३॥ एके ठायीं काला । तुका ह्मणे भाविकाला ॥ ४॥

॥ २०८ ॥

ते काय पवाडे नाहीं म्यां ऐकिले । गोपाळ रक्षिले वनांतरीं ॥ १ ॥
मावेचा वोणवा होऊनी राक्षस । लागला वनास चहूंकडे ॥ २ ॥
गगनासी ज्वाळा लागती तुंबळ । गोधनें गोपाळ वेडावलीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे तेथें पळावया वाट । नाहीं वा निपट ऐसें झालें ॥ ४ ॥

॥ २०९ ॥

धडकला अग्नि आह्मा येती वरी । गोपाळ श्रीहरी विनाविती ॥ १ ॥
अरे कृष्णा काय विचार करावा । आला रे वोणवा जळों आतां ॥२॥
अरे कृष्णा तुझें नाम बळिवंत । होय कृपावंत राख आतां ॥ ३ ॥
तुका ह्मणे अरे कृष्णा नारायणा । गोपाळा करुणा भाकितील ॥४॥

॥ २१० ॥

अरे कृष्णा आम्ही तुझे निजगडी । नवनीत आवडी देत होतों ॥१॥
अरे कृष्णा आतां राखें कैसें तरी । संकटां भीतरीं पडियेलों ॥ २ ॥
वरूषला इंद्र जेव्हां शिळाधारीं । गोवर्धन गिरी उचलिला ॥ ३ ॥
तुका म्हणे तुझे पवाडे गोपाळ । वर्णिती सकळ नारायणा ॥ ४ ॥

॥ २११ ॥

अरे कृष्णा तुवां कालिया नाथिला । दाढे रगडिला रिठासुर ॥ १ ॥
अरे कृष्णा तुवां पुतना शोषिली । दुर्बुद्धि कळली अंतरींची ॥२॥
गोपाळ करुणा ऐसी नानापरी । भाकिती श्रीहरी तुजपुढें ॥ ३ ॥
तुझें नाम कामधेनु करुणेची । तुका ह्मणे त्यांची आली कृपा ॥४॥

॥ २१२ ॥

चहूंकडूनिया येती ते कल्लोळ । सभोंवते ज्वाळ जवळां आले ॥ १ ॥
सकुमार मूर्ति श्रीकृष्ण धाकुटी । घोंगडी आणि काठी खांद्यावरी १

लहान लेकरूं होतें तें सगुण । विक्राळ वदन पसरिलें ॥ ३ ॥
जाभाड तें एक गगनीं लागलें । एक तें ठेविलें भूमीवरी ॥ ४ ॥
तये वेळीं अवघे गोपाळही भ्याले । तुकेंही लपालें भिऊनिया ॥५॥

॥ २१३ ॥

पैल आली आगी कान्हो काय रे करावें । न कळे तें कैसें आजी वांचों आम्ही जीवें ॥ १ ॥ धांव रे हरी सांपडलों संधी । वोणव्याचे मधीं बुद्धि कांहीं करावी ॥ २ ॥ अवचितां जाळ येतां देखियेला वरी । परतोनी पाहतां आधीं होतों पाठमोरी ॥३॥ सभोंवता फेर रीग न होय पळतां । तुका ह्मणे जाणसी तें करावें अनंता ॥४॥

॥ २१४ ॥

भिऊं नका बोले झांकूनिया राहा डोळे । चालवील देव धाक नाहीं येणें वेळे ॥१॥ बाप रे हा देवांचाही देव । कळों नेदी माव काय करी करवी ते ॥२॥ पसरूनी मुख विश्वरूप खाय जाळ । सारूनिया संधि अवघे पहाती गोपाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे आह्मी मागें भ्यालों वायांवीण । कळों आलें आतां या सांगातें नाहीं शिण ॥४॥

॥ २१५ ॥

श्रीमुख वोणवा गिळीत चालिलें । भ्यासुर वासिलें वदनांबुज १ ॥
विक्राळ त्या दाढा भ्यानें पाहावेना । धांउनी रसना ज्वाळ गिळी॥२॥
जिव्हा लांब धांवे गोळा करी ज्वाळ । मोटें मुखकमळ त्यांत घाली
तुका म्हणे अवघा वोणवा गिळीला । आनंद जाहला गोपाळांसी॥४॥

॥ २१६ ॥

गोपाळ प्रीतीनें कैसे विनविती । विक्राळ श्रीपति होऊं नको ॥ १ ॥
नको रे बा कृष्णा धरूं ऐसें रूप । आह्मां चळकांप सुटलासे ॥ २ ॥
होई बा धाकुटा श्यामचतुर्भुज । बैसोनिया गुज सुखें बोलों ॥ ३ ॥
वोणव्याच्या रागें गिळिशील आह्मां । तुका मेघश्यामा पायां लागे॥४॥

॥ २१७ ॥

सांडियलें रूप विक्राळ भ्यासुर । झालें सकुमार कोडिसवाणें ॥१॥
श्याम चतुर्भुज मुकुट कुंडलें । सुंदर दंडलें नव बाळ ॥ २ ॥
गोपाळ म्हणती कैसें रे बा कृष्णा । रूप नारायणा धरियेलें ॥ ३ ॥
कैसा वाढलासी विक्राळ झालासी । गटगटा ज्वाळांसी गिळियेलें॥४॥
तुका म्हणे भाव पुसती गोपाळ । अनाथवत्सल म्हणोनिया ॥ ५ ॥

॥ २१८ ॥

बा रे कृष्णा तुझें मुख कीं कोमळ । कैसे येवढे ज्वाळ ग्रासियेले ॥१॥
बा रे कृष्णा तुझी जिव्हां कीं कोंवळी । होईल पोळली नारायणा ॥ २ ॥

बैसें कृष्णा तुझें पाहूं मुखकमळ । असेल पोळलें कोणे ठायीं ॥ ३ ॥
घोंगडिया खालीं घालूनिया तळीं । वरी वनमाळी बैसविती ॥ ४ ॥
तुका ह्मणे भावें आकळिला देव । कृपासिंधुराव त्रैलोक्याचा ॥ ५ ॥

॥ २१९ ॥

एक म्हणती मुख वासी नारायणा । पाहों दे वदना डोळेभरी ॥१॥
वासूनिया मुख पाहाती सकळ । अवघे गोपाळ व्योमाकार ॥ २ ॥
ह्मणती गोपाळ बेटे हो हा देव । स्वरुपाचा ठाव न कळे याच्या ॥३॥
तुका ह्मणे अवघे विठोबाभोंवते । मिळाले नेणते लहानथोर ॥४॥

॥ २२० ॥

एक म्हणती कृष्णा वासिलें त्वां मुख । तेव्हां थोर धाक पडिला आम्हां
गिळों लागलासी अग्नीचे कल्लोळ । आह्मी चळचळां कांपतसों ॥ २ ॥
ज्वाळांबरोबरी गिळशील आह्मां । ऐसें मेघश्यामा भय वाटे ॥३॥
तुका म्हणे ऐसे भाग्याचे गोपाळ । फुटक कपाळ अमुचेंचि ॥४॥

॥ २२१ ॥

गोपाळांचें कैसें केलें समाधान । देऊनि आलिंगन निवविलें ॥ १ ॥
ज्वाळांबरोबरी तुह्मां कां प्राशीन । अवतार घेणें तुम्हांसाटीं ॥ २ ॥
निर्गुण निर्भय मी सर्वांनिराळा । प्रकृति वेगळा गुणातीत ॥ ३ ॥
चिन्मय चिद्रूप अवघें चिदाकार । तुका ह्मणे पार नेणे ब्रह्मा ॥ ४ ॥

॥ २२२ ॥

नेणती तयांसी साच भाव दावी हरी । लाज नाहीं नाचे पांवा वाजवी मोहरी ॥ १ ॥ चला रे याच्या पायां लागों आतां । राखिले जळतां महा आगीपासूनी ॥ २ ॥ कैसी रे कान्होबा एवढी गिळियेली आगी । न देखों पोळला तुज तोंडीं कोठें अंगीं ॥३॥ तुका ह्मणे कां रे तुम्ही करितां नवल । आमची सिदोरी खातो त्याचें आलें बळ ॥४

॥ २२३ ॥

त्यांनीं धणीवरी संग केला हरीसवें । देऊनी आपुलें सांचि ठेविलें तें खावें ॥१॥ न ठेवी आभार प्रेमाचा भुकेला । बहु दिवस संग हाचि निर्धार त्याला ॥२॥ कान्होबा तूं जेवीं घासोघासीं आळविती । आनंद गोपाळें त्यांची बहु देवा प्रीति ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां आऊं आपुलिया घरा । तोंय वांचविलें ऐसें सांगों रे दातारा ॥ ४ ॥

॥ २२४ ॥

गोपाळ म्हणती कान्होबा या रे कांहीं मागों । आपुलाले आह्मी जीवींचीं तया आवडी सांगों । एक म्हणती उगेरे उगे मागोंचि लागों ।

निजों नका कोणी घरीं रे आजी अवघेचि जागों ॥ १ ॥ जाणोनि नेणता हरि रे मध्यें उगाचि बैसे । नाइकोनी बोल आइके कोण कोणाचें कैसें । एक एकाच्या संवादा जाणे न मिळेचि ऐसें । पोटींचें होटा आणवी देतो तयांसी तैसें ॥ २ ॥ एक म्हणती बहु रे आम्ही पीडिलों माया । नेदी दहींभातसिदोरी ताक घालिती पिया । तापलों वळितां गोधनें नाहीं जीवन छाया । आतां मागों पोटभरीरे याच्या लागोनी पायां ॥ ३ ॥ एक ह्मणती अरे तुमचें पोट तें किती । मागों गाई ह्मैशी घोडे रे धन संपत्ति हस्ति । देव गडी कान्हो आमुचा आम्हां काय विपत्ति । कन्याकुमरें दासी रे बाजावरी सुपती ॥ ४ ॥ एक म्हणती बेटे हो कोण करी जतन । गाढव तैसेचि घोडे रे कोण तयाचा मान । लागे भवरोग वाहतां खांदीं चवघे जण । हातीं काठ्या डोया बोडक्या हिंडो मोकळे रानं ॥ ५ ॥ एक ह्मणती रानीं रे बहु सावजें फार । फाडफाडूं खाती डोळे रे पाय नेतील कर । राखोनि राखे आ ना ऐसा कइचा शूर । बैसोनी राहों घरीं रे कोण करी हे चार ॥६॥ घरीं बैसलिया बहुतें बहु सांगती काम । रिकामें कोणासि नावडे ऐसें आम्हासी ठावें । चौघांमध्यें बरें दिसेसें तेथें नेमक व्हावें । लपोनी खेळतां सहज भले गडियासवें ॥ ७ ॥ एक म्हणती गडी ते भले मिळती मता । केली तयावरी चाली रे बरी आपुली सत्ता । नसावे ते तेथें तैसे रे खेळ हाणिती लाता । रडी एकाएकीं गेलिया गोंधळ उडती लाता ॥ ८ ॥ एक म्हणती खेळतां उगीं राहतीं पोरें । ऐसें काय घडों शके रे कोणी लहान थोरें । अवघा येती रागा रे एक म्हणती बरें । संगें वाढे कलह करावा एकाएकींच बरें ॥ ९ ॥ एक म्हणती एकला रे तूं जासील कोठें । सांडी मांडी हें वाउगें तुझे बोलाचि खोटें । ठायीं राहा उगे ठायींच कां रे सिणसी वाटे । अवघियांची सिदोरी तुझे वरी भरली मोटे ॥१०॥ तुका म्हणे अरे काहण्या काय सांगाल गोष्टी । चाटावे तुमचे बोल रे भुका लागल्या पोटीं । जागा करूं या रे कान्होबा मागों कवळ ताटीं । धाले गडी तुका ढेकर देती विठ्ठल कंठीं ११॥

॥ २२५ ॥

धन्य त्या गोळणी इंद्राच्या पूजनीं । नैवेद्य हिरोनी खातो कृष्ण १ ॥ अरे कृष्णा इंद्र अमर इच्छिती । कोण तयांप्रति येईल आतां ॥ २ ॥ तुका ह्मणे देव दाखवी चिदान । नैवेद्य खाऊन हांसो लागे ॥ ३ ॥

॥ २२६ ॥

तुम्ही गोपी बाळा मज कैसा नेणा । इंद्र अमरगणा स्थापिले केला॥१॥
इंद्र चंद्र सूर्य ब्रह्मा तिन्ही लोक । माझे सकळीक यमधर्म ॥ २ ॥
मजपासूनिया झाले जीव शीव । देवांचा ही देव मीच्च कृष्ण ॥ ३ ॥
तुका ह्मणे त्यांसी बोले नारायण । व्यर्थ मी पाषाण जन्मा आलों॥४॥

॥ २२७ ॥

गौळणी बांधिती धारणासी गळा । खेळे त्या गोपाळांमाजी ब्रह्म ॥ १ ॥
धांवोनिया मागे यशोदे भोजन । हिंडे रानोरान गाईपाठीं ॥ २ ॥
तुका ह्मणे सर्व कळा ज्याचे अंगीं । भोळेपणालागीं भीक मागे ॥३॥

॥ २२८ ॥

धन्य ते गोधने कांबळी काष्टिका । मोहरी पांवा निका ब्रीद बांकी॥१॥
धन्य तें गोकुळ धन्य तें गोपाळ । नरनारी सकळ धन्य झाल्या ॥ २ ॥
धन्य ते देवकी जसवंती दोहींचे । वसुदेवनंदाचें भाग्य झालें ॥ ३ ॥
धन्य त्या गोपिका सोळा सहस्त्र बाळा । यादवां सकळां धन्य झालें॥४॥
धन्य ह्मणे तुका जन्मा तीच्चि आलीं । हरिरंगीं रंगलीं सर्व भावें ॥ ५ ॥

॥ २२९ ॥

हुंबरती गाये तयांकडे कान । कैवल्य निधान देउनी ठाके ॥ १ ॥
गोपाळांची पूजा उच्छिष्ट कवळी । तेणें वनमाळी सुखावला ॥ २ ॥
चोरोनिया खाये दूध दहीं लोणी । भावें चक्रपाणि गोंविला तो ॥ ३ ॥
निष्काम तो झाला कामासी लंपट । गोपिकांची वाट पाहात बैसे ॥४॥
जगदानी इच्छी तुळसीपत्र दळ । भावाचा सकळ विकिला तो ॥ ५ ॥
तुका ह्मणे हेंचि चैतन्य सांवळें । व्यापूनी निराळें राहिलेंसे ॥ ६ ॥

॥ २३० ॥

आचरती कर्में । तेथें काळें धर्माधर्में ॥ १ ॥ खेळे गौळियांसवें । करिती तें त्यांचें साहावें ॥ २ ॥ यज्ञमुखें ग्रास । मंत्रपूजनीं उदास ॥ ३ ॥ तुका ह्मणे चोरी । योगियांही सर्व करी ॥ ४ ॥

॥ २३१ ॥

एकाचिया घाट्या टोकें । एका फिके उपचार ॥ १ ॥ ऐसी सवे गोवळिया । भाव तया पाहियेला ॥ २ ॥ एकाचें तें उच्छिष्ट खाय । एका जाय ठकवूनि ॥ ३ ॥ तुका ह्मणे बहु सोपें । बहु रूपें अनंत ॥ ४ ॥

॥ २३२ ॥

फिरविलीं दोन्ही । कन्या आणि चक्रपाणी ॥ १ ॥ झाला अ आनंद । अवतरले गोविंद ॥ २ ॥ तुटलीं बंधनें । वसुदेव देवकीचा दर्शनें ॥ ३ ॥ गोकुळासी आले । ब्रह्म अव्यक्त सांवळें ॥ ४ ॥ बैद

दसवंती । धन्य देखिले श्रीपति ॥ ५ ॥ निशीं जन्मकाळ । आले अष्टमी गोपाळ ॥ ६ ॥ आनंदली मही । भार गेला सकळही ॥ ७ ॥ तुका ह्मण कंसा । आट भोविला वोळसा ॥ ८ ॥

॥ २३३ ॥

कृष्ण गोकुळीं जन्मला । दुष्टां चळकांप सुटला १ होतां कृष्णाचा अवतार । आनंद करिती घरोघर २ सदा नाम वाचे गाती । प्रेमें आनंदें नाचती ३ तुका ह्मणे हरती दोष । आनंदानें करिती घोष ४

॥ २३४ ॥

गोकुळींच्या सुखा । अंतपार नाहीं लेखा ॥ १ ॥ बाळकृष्ण नंदा घरीं । आनंदल्या नरनारी ॥ २ ॥ गुढिया तोरणें । करिती कथा गाती गाणें ॥३॥ तुका ह्मणे छंदें । येणें वेधिलीं गोविंदें ॥४॥

॥ २३५ ॥

अनंत ब्रह्मांडें उदरीं । हरि हा बाळक नंदा घरीं ॥ १ ॥ नवल केव्हडें केव्हडें । नकळे कान्होबाचें कोडें ॥ २ ॥ पृथ्वी जेणें तृप्त केली । त्यासी यशोदा भोजन घाली ॥ ३ ॥ विश्वव्यापक कमळापति । त्यासी गौळणी कडिये घेती ॥ ४ ॥ तुका ह्मणे नटधारी । भोग भोगून ब्रह्मचारी ॥ ५ ॥

॥ २३६ ॥

विटंबला भट । दिला पाठीवरी पाट ॥ १ ॥ खोटें जाणोनी अंतर । न साहेचि विश्वंभर ॥ २ ॥ तेंचि करी दान । जैसें आइके वचन ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवें । पूतना शोषियेली जीवें ॥ ४ ॥

॥ २३७ ॥

देखिलासी माती खातां । दावियानें बांधी माता ॥१॥ जाळी घेउनि कांबळी काठी । गाई वळी वेणू पाठीं ॥ २ ॥ मोठें भावार्थाचें बळ । द्वेष झाला त्याचें बाळ ॥३॥ तुका म्हणे भक्तासाठीं । देव धांवे पाठोवाटीं ॥४

॥ २३८ ॥

अधिकांचा मजला कांटाळा । तुम्हां गोपाळां संगती ॥१॥ काय नाहीं तुह्मांपाशीं । सकळांविशीं संपन्न ॥२॥ उद्योगाचा नेघे भार । लागल्या सार पुरतें ॥ ३ ॥ तुका म्हणे अधीर जिणें । नारायणें न करावें ॥४॥

॥ २३९ ॥

गाईन ते लीळा चारित्र पवाडे । राखिले संवगडे सहित गाई ॥ १ ॥ चोरिलें नवनीत बांधविला गळा । जे तुम्हीं गोपाळा छंद केले ॥२॥ मोहिल्या गोपिका पांवयाच्या छंदें । केली ते गोविंदें क्रीडा गाऊं ३॥ ा लाडे दाविलें कौतुक । तें या आणूं सुख अंतरासी ॥ ४ ॥

निर्दाळिले दुष्ट भक्तां प्रतिपाळी। ऐसा म्हणों बळी आमुचा स्वामी॥५
तुका म्हणे सरसी असो येणें बोधें। जाणोनी संबंधें सर्वकाळ ॥६॥

॥ २४० ॥

झालों आतां एके ठायीं। न वंचू कांहीं एकमेकां ॥१॥ मस्ती हे गे देऊनि मोट। कटकट काशाची॥२॥ सोडोनिया गांठी गांठी। काय आहे यांत तें॥३॥ तुका ह्मणे झालों निराळा। आतां गोपाळा देऊं बोभा॥४॥

॥ २४१ ॥

बोळलीचा दोहूं पान्हा। मज कान्हा सांगितला ॥ १ ॥ घ्या जी हें गे क्षीर हातीं। निगुतीनें वाढावें ॥ २ ॥ सांगितलें केलें काम। नव्हे धर्म सत्तेचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे नवें जुनें। ऐसें कोणें सोसावें ॥ ४ ॥

॥ २४२ ॥

येईल तें घेईन भागा। नव्हे जोगा कुसरिया ॥ १ ॥ आवडी ते तुम्ही जाणा। बहु गुणांसारिखी॥२॥ मज नेणती दांगचर्मी। मगें हरी नसलिया॥३॥ तुका ह्मणे रावया देवा। करीन सेवा सांगितली॥ ४ ॥

॥ २४३ ॥

अंतरली खुटी भेटी। भय धरूनिया पोटीं। म्हणतां जगजेठी। धांवे करुणा उत्तरीं ॥ १ ॥ बाप बळिया शिरोमणी। उतावीळ या वचनीं। पडलिया कानीं। धांवा न करी आळस ॥ २ ॥ बळ तुम्ही शरणागता। स्वामी वाहों नेदी चिंता। आइतेंचि दाता। पगनीस बैसवी ॥ ३ ॥ वाहे खांदीं पावची घरा। त्याच्या करी येरझारा। बोबड्या उत्तरा। स्वामी तुकया मानवे ॥ ४ ॥

॥ २४४ ॥

तुजसवें येतों हरी आह्मां लाज नाहीं तरी। उचलिला गिरी चांगतई वांचलों ॥ १ ॥ मोडा आतां खेळ गाई गेल्या झाला वेळ। फांकल्या ओढाळ नाहीं तोंचि आवरा ॥ २ ॥ कांग देवें यमुनेसी वांचलों बुडतां। निल्लाजिरीं आम्ही नाहीं भय धाक या अनंता ॥ ३ ॥ खानों आगी माती आतां पुरे हा सांगाती। भोंवतां भोंवेल आह्मां वाटला हें चित्तीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे उगे नाहीं तुजसवें। ब्राह्मणिया दुरी छंद भोळिया भावें ॥ ५ ॥

॥ २४५ ॥

नको आह्मांसवें गोपाळा। येऊं ओढाळा तुझ्या गाई ॥ १ ॥ कोण धांवे त्यांच्या लागें। मागें मागें येरझारी ॥ २ ॥ न बैसती एके ठायीं। धांवती दाही दाहा वाटा ॥ ३ ॥ तुका ह्मणे तूं राख मनेरी। मग त्या येरी आम्ही जाणों ॥ ४ ॥

॥ २४६ ॥

मागायास गेलों सिदोरी । तुझ्या मायाघरीं गांजियेलों ॥ १ ॥
तुजविणें ते नेदी कोणा । सांगतां खुणा जिवें गेलों ॥ २ ॥
वांयांविण केली येरझार । आतां पुरे घर तुझी माया ॥ ३ ॥
तुका ह्मणे तूं आम्हां वेगळा । राहें गोपाळा म्हणऊनी ॥ ४ ॥

॥ २४७ ॥

काकुलती येतो हरी । क्षणभरी निवडितां ॥ १ ॥
तुमची मज लागली सवे । ठायींचे नव्हों नवे गडी ॥ २ ॥
आणीक बोलाविती फार । बहु थोर नावडती ॥ ३ ॥
भाविकें त्यांची आवडी मोठी । तुका ह्मणे मिठी घाली जिवें ॥४॥

॥ २४८ ॥

वरता वेंघोनी घातली उडी । कळंबाबुडीं यमुनेसी ॥ १ ॥
हरि बुडाला बोंब घाला । घरचीं त्यांला ठावा नाहीं ॥ २ ॥
भवनदीचा न कळे पार । कालिया माजी थोर विखार ॥ ३ ॥
तुका ह्मणे काय वाउग्या हाका । हातींचा गमावुनिया थिंका ॥४॥

॥ २४९ ॥

अवघीं मिळोनि कोल्हाळ केला । आतां होता ह्मणती गेला ॥ १ ॥
आपलिय रडती भावें । जयासवें जयापरी ॥ २ ॥
चुकलों आम्ही खेळतां खेळ । गेला गोपाळ हातींचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे धांवती थडी । न घली उडी आंत कोणी ॥ ४ ॥

॥ २५० ॥

म्यालीं जिवा चुकलीं देवा । नाहीं डावा जवळी तो ॥ १ ॥
आहाकटा करिती हाय । हात डोकें पिटिती पाय ॥ २ ॥
जवळी होतां न कळे आम्हां । गेल्या सीमा नाहीं दुःखा ॥ ३ ॥
तुका ह्मणे हा लाघवी मोठा । पाहे खोटा खरा भाव ॥ ४ ॥

॥ २५१ ॥

काळिया नाथुनी आला वरी । पैल हरी दाखविती ॥ १ ॥
दुसरिया भावें न कळे कोणा । होय नव्हेसा संदेह मना ॥ २ ॥
रूपा भिन्न पालट झाला । गोरें सांवळेंसा पैं देखिला ॥ ३ ॥
आश्वासीत आला करें । तुका खरें ह्मणे देव ॥ ४ ॥

॥ २५२ ॥

हरि गोपाळासवें सकळां । भेटे गळ्या गळा मेळवूनी ॥ १ ॥
भाविकें त्याची आवडी मोठी । सांगे गोष्टी जीवींचिया ॥ २ ॥

योगियांच्या ध्याना नये । भाकरी त्यांच्या चोरुनी खाय ॥ ३ ॥
तुका ह्मणे असे शहाणिया दुरी । बोबडिया दास हाका मारी ॥४॥

॥ २५३ ॥

धाव कान्होबा गेलया गाई । न ह्मणे मी कोण ही काई ॥ १ ॥
आपुलियांचें वचन देवा । गोड सेवा करितसे ॥ २ ॥
मागतां आधीं द्यावा डाव । बळिया मी तो नाहीं भाव ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसा सेवा । अनुरागें जीवें भावें ॥ ४ ॥

॥ २५४ ॥

आणिक काय थोडीं । परि तीं फार खोटीं कुडीं ॥ १ ॥ सदा मोकळींच गुरें । होती फजीत तीं पोरें ॥२॥ सदा घालिती हुंबरी । एक एकांचें न करी ॥३॥ तुका ह्मणे खरीं । माय वेळोवेळां मारी ॥४॥

॥ २५५ ॥

बहुतांचे संगती । बहु पावलों फजिती ॥ १ ॥ बरें केलें नंदबाळें । मागिलांचें तोंड काळें ॥२॥ माझा करितील तंटा । लपती आलिया बोभाटा ॥ ३ ॥ तुका ह्मणे काई । किती ह्मणों बाप आई ॥ ४ ॥

॥ २५६ ॥

झाली झडपणी खडतर देवता । संचरली आतां निघों नये ॥ १ ॥
मज उपचार झणी आतां करा । न साहे दुसरा भार कांहीं ॥ २ ॥
नेऊनिया घाला चंद्रभागे तिरीं । जीवा नाहीं उरी कांहीं आतां ॥३॥
तुका ह्मणे कळों आलें वर्तमान । माझें तों वचन आक्रंदलें ॥ ४ ॥

खेळावरील रूपकें.

टिपरी ॥ २५७ ॥

खेळ मांडियेला वाळवंटीं घाई । नाचती वैष्णव भाई रे । क्रोध अभिमान केला पावटणी । एक एका लागती पायीं रे ॥१॥ नाचती आनंदकल्लोळीं । पवित्र गाणें नामावळी रे । कळिकाळावरि घातलीसे कास । एक एकाहूनी बळी रे ॥२॥ गोपीचंदन उटी तुळशीच्या माळा । हार मिरवती गळां रे । टाळ-मृदंग घाई पुष्पवरुषाव । अनुपम्य सुखसोहळा रे ॥३॥ लुब्धलीं नादीं लागली समाधी । मूढ जन नर नारी लोकां रे । पंडित ज्ञानी योगी महानुभाव । एकचि सिद्धसाधकां रे ॥४॥ वर्णाभिमान विसरली याति । एकएकां लोटांगणीं जाती रे । निर्मळ चित्तें झालीं नवनीतें । पाषाणा पाझर सुटती रे ॥५॥

होतो जयजयकार गर्जत अंबर । मातले वैष्णव वीर रे ।
तुका ह्मणे सोपी केली पायवाट । उतरावया भवसागर रे ॥६॥

॥ २५८ ॥

एके घांई खेळतां न पडसी डाई । दुचाळयानें ठकसील भाई रे ।
त्रिगुणांचे फेरी थोरकष्टी होसी । या चांघांची तरी धरी सोई रे ॥१॥
खेळ खेळोंनिया निराळाचि राहीं । सांडीं या विषयाची घाई रे ।
तेणेंचि खेळें बळवंत होसी । ऐसें सत्य जाणें माझ्या भाई रे ॥२॥
शिंपियाचा पोर एक खेळिया नामा । तेणें विठ्ठल बसवंत केला रे ।
आपुल्या संवगडिया शिकवुनी घांई । तेणें सतत फड जागविला रे ।
एक घांई खेळतां तो न चुकेचि कोठें । तया संत जन मानवले रे ॥३॥
ज्ञानदेव मुक्ताबाई वटेश्वर चांगा । सोपाना आनंद खेळती रे ।
कान्हो गोवारी त्यांनीं बसवंत केला । आपण भोंवतीं नाचती रे ।
सकळीकां मिळोनी एकीच घांई । त्याच्या ब्रह्मादिक लागती पायीं रे ॥४॥
रामा बसवंत कबिर खेळिया । जोडा बरवा मिळाला रे ।
पांच संवगडिया एकचि घांई । तेथें नाद बरवा उमटला रे ।
ब्रह्मादिक सुरवर मिळोनिया त्यांनीं । तोही खेळिया निवडिला रे ॥५॥
ब्राह्मणाचा पोर एक खेळिया भला । तेणें जन खेळकर केला रे ।
जनार्दन बसवंत करूनिया तेणें । वैष्णवांचा मेळ मेळविला रे ।
एकचि घांई खेळतां खेळतां । आपणचि बसवंत झाला रे ॥६॥
आणीक खेळिये होऊनिया गेले । वर्णावया वाचा मज नाहीं रे ।
तुका ह्मणे गडे हो हुशारूनी खेळा । पुढिलाची धरूनिया सोई रे ।
एकाचि घांई खेळतां जो चुकला । तो पडेल संसारडाई रे ॥७॥

॥ २५९ ॥

बाराही सोळा गडियांचा मेळा । सतरावा बसवंत खेळिया रे ।
जातिस पद्र राखों जेणें टिपरिया घाई । अनुहातें वाये मांदळा रे ॥१॥
नाचत पंढरियें जाऊं रे खेळिया । विठ्ठलरखुमाई पाहूं रे ॥२॥
सा चहूं वेगळा आठराही निराळा । गाऊं वाजवूं एक चाळा रे ।
विसरतीं पक्षी चारा घेणें पाणी । तारुण्य देहभाव बाळा रे ॥३॥
आनंद तेथींचा मुकियासी वाचा । बहिर ऐकती कानीं रे ।
आंधळ्यासी डोळे पांगळ्यासी पाय । तुका ह्मणे वृद्ध होती तरणे रे ॥४॥

॥ २६० ॥

दोन्ही टिपरीं एकचि नाद । सगुण निर्गुण नाहीं भेद रे ।
कुसरी अंगें मोडितील परी । मेळविती एका एक छंदें रे ॥ १ ॥
कांहींच नवजे वांया रे । खेळिया एकचि बसवंत अवघिया रे ।

सम विषम तेथें होऊन नेदी । जाणऊनी आगळिया रे ॥ २ ॥
संत महंत सिद्ध खेळतील घाई । तेच्च सांभाळी माझ्या भाई रे ।
हात राखोन हाणिती टिपऱ्या । टिपरें मिळोनि जाय त्याची सोई रे ॥ ३ ॥
विताळाचें अवघें जाईल वांया । काय ते शृंगारुनी काया रे ।
निवडुनी बाहेर काढिती निराळा । जो न मिळे संतांचिया घाई रे ॥४॥
प्रकाराचें काज नाहीं सोडी लाज । निःशंक होऊनिया खेळे रे ।
नेणतीं नेणतींच एकें पावलीं मान । खेळ विठ्ठल नामाचिया बळें रे ॥५॥
रोमांच गुढिया डोलविती अंगें । भावबळें खेळविती सोंगें रे ।
तुका ह्मणे कंठ सद्गदित दाटे । या विठोबाच्या अंगसंगें रे ॥६॥

॥ २६१ ॥

या रे गडे हो धरूं घाई जाणतां हो नेणतां । नाम गाऊं टाळी वाहूं आपुलिया हिता ॥ १ ॥ फावलें तें घ्यारे आतां प्रेमदाता पांडुरंग । आजी दिवस सोनियाचा वोळला रंग ॥ २ ॥ हिंडतो रानोरान भुजंग ते कांट्यावन । सुख तयांहून आह्मां गातां नाचतां रे ॥ ३ ॥ तुका ह्मणे ब्रह्मादिकां सांवळें दुर्लभ सुखा । आजी येथें आलें फुका नाम मुखा कीर्तनीं ॥ ४ ॥

॥ २६२ ॥

भीमातीरीं एक वसविलें नगर । त्याचें नांव पंढरपूर रे ॥
तेथील मोकासी चार भुजा त्यासी । बाईला सोळा हजार रे ॥१॥
नाचत जाऊं त्याच्या गांवा रे खेळिया । देव देईल विसांवा रे ॥
पुढें गेले ते निवांत झाले । घाणेतील त्यांची सीमा रे ॥ २ ॥
बळिया आगळा पाळी लोकपाळों । धीग नाहीं कळिकाळा रे ॥
पुंडलीक पाटील केली कुळवाडी । तो झाला भवडुःखा वेगळा रे ॥ ३ ॥
संतसज्जनीं मांडिलीं दुकानें । जें ज्या पाहिजे तें आहे रे ॥
भुक्तिमुक्ती फुकाच साठीं । *कोणी तयाकडे न पाहे रे ॥ ४ ॥
दोन्हीच हाट भरले घनदाट । अपार मिळाले वारकरी रे ॥
नवजों ह्मणती आह्मी वैकुंठा । जिहीं देखिली पंढरी रे ॥ ५ ॥
बहुत दिवस होती मज आस । आजी घडलें सायासीं रे ॥
तुका ह्मणे होय तुमचेनी पुण्यें । भेटी तया पायासी रे ॥ ६ ॥

॥ २६३ ॥

पंढरी चोहटा मांडियेला खेळ । वैष्णव मिळोनी सकळ रे ।
टाळ टिपरी मांदळे एक नाद रे । झाला बसवंत देवकीचा बाळ रे ॥ १ ॥
चला तें कवतुक भाई रे । पाहों डोळां कानीं गुंतलेती काई रे ।
भाग्यवंत कोणी गेले सांगाती । ऐसें सुख त्रिभुवनीं नाहीं रे ॥ २ ॥

आनंदाचे वाद सुखाचे संवाद । एक एका दाखविती छंद रे । साही अठरा चारी घालूनिया घाई । नाचती फेरी टाळशुद्ध रे ॥३॥ भक्तीचीं भूषणें मुद्रा आभरणें । शोभती चंदनाच्या उट्या रे । सत्त्व सुंदर कास घालूनि कुसरी । गर्जती नाम बोभाटीं रे ॥४॥ हरि हर ब्रह्मा तीर्थांसहित भीमा । देव कोटी तेहतीस रे । विस्मित होऊनि ठाकले सकळ जन । अमरावती केली ओस रे ५॥ वाणितील थोरी वैकुंठींचि परी । नपवे पंढरीची सरी रे । तुकयाचा दास ह्मणे नका आळस करूं । सांगतों नरनारींस रे ॥६॥

विटूदांडू ॥ २६४ ॥

लागा विटूदांडू । आणीक कांहीं खेळ मांडूं ॥ १ ॥ बहु अंगा आले डाव । स्थिर नाहीं कोठें पाव ॥ २ ॥ कोली हाणे टोला । झाली तेणें तो गोंविला ॥ ३ ॥ एकमेकां हाका मारी । सेल जाळी एक धरी ॥ ४ ॥ राजी आलें नांव । फेरा न चुकेचि धांव ॥ ५ ॥ पुढें एक पाटी । एक एकें दोघा आटी ॥ ६ ॥ एका सोस पोटीं । एक धांवे हात पिटी ॥७॥ तुका ह्मणे आतां । खेळ मोडावा परता ॥८॥

मृदंगपाट्या ॥ २६५ ॥

मागें पुढें पाहें सांभाळूनी दोनी ठाय । चुकावूनी जाय गडी वाचे गाडियासी ॥१॥ मुरडे देटा दोहीं तोंडा गाडियां सावध करी । भेटतियालागीं तया हाल तुजवरी ॥ २ ॥ गाडिया गडी वांटूनी देई । ज्याचा सांडी तेचि ठायीं ॥ ३ ॥ अगल्या घलें करील काय । तुज देणें लागे जाय ॥ ४ ॥ नेतां नेतां पाउला करी । सांपडे तो तेथें धरी ॥ ५ ॥ जिंकोनी डाव करी । टाहो सत्ता आणिकांवरी ॥ ६ ॥ सांपडोनी डाई बहु । काळ गुंतलासी ॥ ७ ॥ यळिया मग फळी । फोडी न धरितां त्यांसी ॥ चुकांशी जो जाय मिळोनी अंगीं जाय । गुंतलासी काय तुका ह्मणे अज्ञानी ॥ ९ ॥

॥ २६६ ॥

पाहा रे तमासा तुमचा नव्हे येथें लाग । देईन तो भाग आलियाचा बाहेरी ॥१॥ जागा रे गोपाळांनो ठायीं ठायीं जागा । चाहुलीनें भागा दूर मजपासूनी ॥२॥ न रिघतां ठाव आह्मां ठावा पाकतियां । भयातीत वांया तेथें काय चांचपा ॥३॥ तुका ह्मणे हातां चढे जिवाचिये साटीं । भिटक्या देतां गोड मग लागते शेवटीं ॥ ४ ॥

॥ २६७ ॥

डाई घालूनियां पोरें । त्याचीं गुरें चुकविलीं ॥१॥ खेळ खेळतां फोडि-

ल्या डोया । आपण होय निराळा २ मारिती माया घेती जीवा । नाहीं कींव अन्यायें ॥३॥ तुका कान्होबा मागें । तया अंगें कळों आलें॥४॥

सुतुतू ॥ २६८ ॥

जीवाशिवाच्या मांडुनि हाला । अहं सोहं दोन्ही भेटती मला ॥१॥ घाली सुतुतू फिरोनी पाही आपणासी । पाही पळिया तो मागिला तुटी पुढिलासी ॥ २ ॥ खेळिया तो हाल सांभाळी । धुम घाली तो पडे पाताळीं ॥ ३ ॥ बळिया गांव्या तोचि खेळे । दम पुरे तो वेळो-वेळां खेळे ॥ ४ ॥ हातीं पडे तोचि ढांग । दम पुरे तो खेळिया चांग ॥ ५ ॥ मागें पुढें पाहे तो जिंके । हातीं पडे तोचि आधार फिके ॥ ६ ॥ आपल्या बळें खेळे रे भाई । गडियाची सांडोनी सोई ॥७॥ तुका ह्मणे मी खेळिया नव्हें । जिकडे पडे त्याची सवें ॥ ८ ॥

हाल ॥ २६९. ॥

यमुने तटीं मांडिला खेळ । ह्मणे गोपाळ गडियांसी ॥ १ ॥ हाल मांडा हाल मांडा । वाउगी सांडा मोकळी ॥ २ ॥ नावें ठेवूनि वांटा गडी । न वजे रडी मज कोणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे कान्हो तिळतांदुळ्या । जिंके तो करी आपुला मेळया ४

॥ २७० ॥

बळें डाई न पडे हरी । बुद्धि करी शाहाणा तो ॥ १ ॥ मोकळे देवा खेळों यावें । सम भावें सांपडाया ॥ २ ॥ येतो जातो वेळोवेळां । न कळे कळा सांपडती ॥ ३ ॥ तुका म्हणे धरा त्यांच्या ठायीं । मिठी जीवीं पायीं घालोनियां ॥४॥

हुंबरी ॥ २७१ ॥

तुह्मीं कोण घाली हुंबरी । साही पांगल्या अठरा चारी ॥१॥ सहस्र मुखावरी हरी । शेष शिणविलें ॥२॥ कंदुकासवें घातली उडी । नाथिला कालिया देऊनि बुडी ॥ ३ ॥ अशुद्ध पीतां करुणा नाहीं । तुवां माउशी ही मारियेली ॥ ४ ॥ रावणाचें घर बुडविलें सारें । त्याची गांडा रोरें मारियेलीं ॥ ५ ॥ जाणों तो ठावा आहेसी आह्मां । तुवां आपुला मामा मारियेला ॥६॥ यासीं खेळतां नाहीं थोरू । तुकया स्वामी सारंगधरू ॥७॥

हमामा ॥ २७२ ॥

मशीं पोरा घे रे वार । तुझें बुजीन खालील द्वार ॥१॥ पोरा हमामा रे हमामा रे ॥२॥ मशीं हमामा तूं घालीं । पोरा वरी सांभाळी खालीं ॥ ३॥ तरीच मशीं बोल । पोरा जिव्हाळ्याची ओल ॥४॥ मशीं घेतां भाप । जीवा मीतूंपणा नाहीं ॥५॥ मज सवें

पाळणा ॥ २८१ ॥

जननिया बाळका रे घातलें पाळणा । पंचतत्त्वीं जडियेल्या चारतिया चहूं कोणा । अखंड जडियेल्या तया ढाळ अंगणा । वैखरी धरूनी हातीं भाव दावी खेळणा ॥ १ ॥ निर्जी रे निर्जी आतां । ह्मणोनि परिये दे माता । खेळतां कष्टलासी बाळा तूं रे नेणतां । निर्जी रे निर्जी आतां ॥ २ ॥ खेळतां बाहेरी रे मुला लोकांच्या सवें । वागुल काळतोंडा नाहीं नेतो तें ठावें । खेळतां दुश्चित्ता रे देखोनी तें न्यावें । ह्मणोनि सांगे तुज शीघ्र वचन पाळावें ॥३॥ संचित मागें तुज शुद्ध होतें सांगाती । तेणें तुज वांचविलें वेरझारिया हातीं । आणीक नेलीं मागें काय जाणों तीं किती । आलासी येथवरी थोर पुण्यें बहुतीं ॥ ४ ॥ खेळतां शुक देवा तो रे लागला पाठीं । लपाला वरुषें बारा तये मातेचे पोटीं । रिघतां बाहेरी रे पळे घेऊनी कासोटी । तोचि परी झाली स्वामी भेणें रिघे कपाटीं ५ खेळतां चक्रवर्ती जनका लागला धाक । पडिला अग्निमार्जी पाव जळत एक । भरलासे कांपे अंगीं सुख नाठवे दुःख । आपपर तेंही नाहीं देहभाव सकळीक ॥ ६ ॥ सिबीया चक्रवर्ती कव पडिली अवचिती । धीट तो न भे तया मास कापिलें हातीं । टाकिलें तयावरी खुणें गोंविला अंतीं । पावला मायबाप हिरोनि घेतला हातीं ॥७॥ बांधला अजामेळा वेश्यागणिका कैसी । मारिली हाक धाकें कळलें मायबापासी । घातली धांव नेटें वेगीं पावला त्यासी । हिरोनि नेलीं दोघे आपणयां तीं पासीं ॥८॥ धरूनी आठवू रे बाळा राहे निश्चळ । खेळतां दुश्चिता रे नको जाऊं बरळ । टोंकताहे तुजलागीं दिवस लेखूनी काळ । मग नेदी आठवूं रे नेलीं घालीं पडळ ॥९॥ ऐसी तीं कृपावंतें बाळा मोहिलें चित्त । सुस्वरें कंठ गाय मधुर आणि संगीत । तेणें तेंचि चित्त राहे होऊनियां निवांत । पावती तुका म्हणे नाहीं विश्वास ते घात ॥ १० ॥

आशीर्वाद ॥ २८२ ॥

आशिर्वाद तया जाती । आवडी चित्तीं देवाची ॥ १ ॥ कल्याण तें असे क्षेम । वाढो प्रेम आगळें ॥२॥ भक्तिभाग्य गांठीं धन । त्या नमन जीवासी ॥३॥ तुका म्हणे हरिचे दास । तेथें आस सकळ ॥४॥

॥ २८३ ॥

तया साठीं वेचूं वाणी । आइकों कानीं वारता ॥ १ ॥ क्षेम माझे हरिजन । समाधान पुसतां त्यां ॥२॥ परद्रींचे जे सांगाती । त्यांची याती न विचारीं ॥३॥ तुका म्हणे धैर्यवंत । निर्मळ चित्तें सरवीं तीं ॥४॥

॥ २८४ ॥

अभय उत्तर संतीं केलें दान । जालें समाधान चित्त तेणें ॥ १ ॥ आतां प्रेमरसें न घडे खंडण । द्यावें कृपादान नारायणा ॥ २ ॥ आलें जें उचित देह विभागासी । तेणें पायापाशीं उभीं असों ॥ ३ ॥ तुका म्हणे करीं पूजन वैखरी । बोबडा उत्तरीं गातों गीत ॥ ४ ॥

॥ २८५ ॥

असो मंत्रहीन क्रीया । नका चर्या विचारूं ॥ १ ॥ सेवेमध्यें जमा धरा । कृपा करा शेवटीं ॥२॥ विचारूनि ठाया ठाव । येथें भाव राहिला ॥३॥ आतां तुकयापाशीं हेवा । नाहीं देवा तांतडी ॥ ४ ॥

॥ २८६ ॥

जीवेंसाटीं यत्नभाव । त्याची नाव बळकट ॥ १ ॥ पैल तीरा आतां कांहीं । संदेह नाहीं भवनदी ॥ २ ॥ विश्वासाची धन्य जाती । तेथें वस्ती देवाची ॥३॥ तुका म्हणे भोळियांचा । देव साचा अंकित ॥४॥

ललित ॥ २८७ ॥

आजी दिवस झाला । धन्य सोनियाचा भला ॥ १ ॥ जालें संतांचे पंगती । बरवें भोजन निगुती ॥२ रामकृष्णनामें । बरवीं मोहियेलीं प्रेमें ॥ ३ ॥ तुका म्हणे आला । रुची रसाळ हा काला ॥ ४ ॥

॥ २८८ ॥

तुम्ही तरी सांगा कांहीं । आम्हांविशीं रखुमाबाई ॥१॥ कांहीं उरलें तें ठायीं । वेगीं पाठवूनी देई ॥२॥ टोकत बैसलों देवा । उच्छीनसें आसा एका ३ प्रेम देउनि बहुडा झाला । तुका म्हणे विठ्ठल बोला ४

॥ २८९ ॥

वाट पाहें बाहे निढळीं ठेवुनियां हात । पंढरीचे वाटे दृष्टि लागलें चित्त ॥१॥ कई येतां देखें माझा मायबाप । घटिका योग दिवस जाती धरूनियां माप ॥२॥ डावा डोळा लवे उजवी स्फुरतें बाहे । मन उतावीळ भाव सांडुनियां देहे ॥३॥ सुखसेजे गोड चित्तीं नलगे आणीक । नाठवे घर दार तान पळाली भूक ॥४॥ तुका म्हणे धन्य दिवस ऐसा तो कोण । पंढरीचे वाटे येतां मूळ देखेन ॥५॥

॥ २९० ॥

तुझें दास्य करूं आणिकां मागों खावया । धिग् झालें जिणें माझें पंढरीराया ॥१॥ काय गा विठोबा तुज आतां म्हणावें । शुभाशुभ गोड तुम्हां थोरांच्या दैवें ॥ २ ॥ संसाराचा धाक निरंतर आह्मांसी । मरण भलें परि काय अवकळा ऐसी ॥३॥ तुझे शरणागत शरण जाऊं आणिकांसी । तुका ह्मणे कवणा लाज हे कां नेणसी ॥४॥

॥ २९१ ॥

पुरविली आळी । जे जे केली ते ते काळीं ॥ १ ॥ माय तरी ऐसी सांगा । कृपाळुवा पांडुरंगा ॥ २ ॥ घेतलें उतरी । उचलोनी कडियेवरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे घांस । मुखीं घाली ब्रह्मरस ॥ ४ ॥

॥ २९२ ॥

कथेची सामग्री । देह अवसानावरी ॥ १ ॥ नको जाऊं देऊं भंगा। गात्रें माझी पांडुरंगा ॥२॥ आयुष्य करी उणें । परि मज आवडो कीर्तन ॥ ३ ॥ तुका म्हणे हानी । या वेगळी मना नाणीं ॥ ४ ॥

॥ २९३ ॥

गळित झाली काया । हेंचि ललित पंढरीराया ॥ १ ॥ आलें अवसानापासीं । रूप राहिलें मानसीं ॥ २ ॥ वाइला कळस । तेथें स्थिरावला रस ॥३॥ तुका म्हणे गोड झालें । नारायणीं पोट धालें ॥४॥

॥ २९४ ॥

रत्नजडित सिंहासन । वरी बैसले आपण ॥१॥ कुंन्चे ढळती दोहीं बाहीं । जवळी रखुमाई राही ॥२॥ नाना उपचारीं । सिद्धि वोळगती कामारी ॥३॥ हातीं घेऊनी पादुका। उभा बंदिजन तुका ॥४॥

॥ २९५ ॥

हिरा शोभला कोंदणीं । जडित माणिकांची खाणी ॥ १ ॥ तैसा दिसे नारायण । मुख सुखाचें मंडण २ कोटिचंद्रलीळा । पूर्णिमेच्या पूर्ण कळा ३ तुका म्हणे दृष्टि धाये । परतोनि माघारी ते नये ॥ ४ ॥

॥ २९६ ॥

पतित पतित । परि मी त्रिवाचा पतित ॥ १ ॥ परि तूं आपुलिया सत्ता । मज करावें सरता ॥ २ ॥ नाहीं चित्तशुद्धि । स्थिर पायांपाशीं बुद्धि ॥ ३ ॥ अपराधाच्या केलों । तुका ह्मणे किती बोलों ॥ ४ ॥

॥ २९७ ॥

उभारिला हात । जगीं जाणविली मात ॥१॥ देव बैसले सिंहासनीं । आल्या याचकाची धनी ॥ २ ॥ एकाच्या कैवाडें । उगवे बहुतांचें कोडें ॥ ३ ॥ दोहीं ठायीं तुका । नाहीं पडो देत चुका ॥ ४ ॥

॥ २९८ ॥

देव ते संत देव ते संत । निमित्य त्या प्रतिमा ॥ १ ॥ असो ध्यावें सत्य ठावें । मी तों भावें सांगतों ॥ २ ॥ निराकारी ओस दिशा । येथें इच्छा पुरतसे ॥३॥ तुका ह्मणे रोकडें केणें । सेवितां येणें भूक जाय॥४॥

॥ २९९ ॥

न कळे माव मुनि मागे एकी अंतुरी । साठी संवत्सर जन्म त्या उदरीं ।

कैसा आकळे वो माये चपळ वो । त्रिभुवनव्यापक हरि सकळ वो २॥ हनुमंता भेटी गर्व हरिला दोहींचा । गरुडा विटंबना रुपा सत्यभामेच्या द्रौपदीचा भेद पुरविला समयीं । ऋषि फळवनीं देंठ लाविते ठायींथ अर्जुनाच्या रथीं कपि स्तंभीं ठेविला।दोहीं पैजा तेथें गर्व हरिला दादुला भावभक्ति सत्त्वगुण झाला दुर्जना।तुका म्हणे सकळां छंदें खेळे आपणा

॥ ३०० ॥

उद्धारा कृपाळा अगा देवांच्या देवा । तुजसवें पण आतां आमुचा दावा ॥ १ ॥ कैसा जासी सांग आतां मजपासूनी । केलें वाताहात दिलें संसारा पाणी ॥ २ ॥ अवघीं आवरूनी तुझे लाविलीं पाठीं । आतां त्या विसर सोहंकोहंच्या गोष्टी ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां चरणीं घातली मिठी । पडिली ते पडो तुह्मां आह्मांसी तुटी ॥ ४ ॥

॥ ३०१ ॥

झाली होती काया । बहु मळिन देवराया ॥ १ ॥ तुझ्या उजळलीं नामें । चित्त प्रक्षाळिलें प्रेमें ॥२॥ अनुतापें झाला झाडा । प्रारब्धानीं केला तोडा ॥३॥ तुका म्हणे देह पायीं । ठेवुनि झालों उतराई ४

॥ ३०२ ॥

आजी आनंदु रे एकी परमानंदु रे । जया श्रुति नेति नेति ह्मणती गोविंदु रे ॥ १ ॥ विठोबाचीं वेडीं आह्मां आनंदु सदा । गाऊं नाचों वाहूं टाळी रंजवूं गोविंदा ॥२॥ सदा सण सांत आह्मां नित्य दिवाळी । आनंदें निर्भर आमचा कैवारी बळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं जन्ममरणांचा धाक । संत सनकादिक तें आमुचें कवतुक ४

॥ ३०३ ॥

प्राणिया एक बीजमंत्र उच्चारीं । प्रतिदिनीं रामकृष्ण ह्मणतां मुरारि ॥ १ ॥ हेंचि साधन रे तुज सर्व सिद्धीचें । नाम उच्चारीं रे गोपाळाचें वाचे ॥ २ ॥ उपास पारणें नलगे वन सेवन । नलगे धूम्रपान पंचाग्निसाधन ॥ ३ ॥ फुकाचें मुखाचें कांहीं न वेचे भांडार । कोटी यज्ञांपरिस तुका ह्मणे हें सार ॥ ४ ॥

॥ ३०४ ॥

विठ्ठल कीर्तनाचे अंतीं । जय जय हरी जे ह्मणती ॥१॥ तेंचि सुकृताचें फळ । वाचा रामनामें निर्मळ ॥ २ ॥ बैसोनी हरिकथेसी । होय सावध चित्तासी ॥३॥ तुका ह्मणे त्याचा जन्म । सुफळ झाला भवभ्रम ॥४॥

॥ ३०५ ॥

न चलवे पंथ वचन नसतां पालवीं । शरीर पिटंबिलें घातें भीक मागावी ॥ १ ॥ न करीं रे तैसें आपआपणां । नित्य रामराम तुह्मी सकळ

ह्मणा ॥ २ ॥ राम ह्मणवितां रांडा पोरें निरविशी । पडसी यमा-हातीं जाचविती चौऱ्यांशी ॥ ३ ॥ मुखीं नाहीं नाम तोंही आत्म-हत्यारा । तुका ह्मणे लाज नाहीं तया गव्हारा ॥ ४ ॥

॥ ३०६ ॥

थडियेसी निघतां पाषाणाच्या सांगडी। बुडतां मध्यमार्गी तेथें कोण घाली उडी ॥१॥ न करीं रे तैसें आपआपणिया। पतंग जाय वांया जीवें ज्योती घालूनियां ॥ २ ॥ सावधपणें सोमल वाटी भरोनियां प्याला। मरणाअंतीं वैद्य बोलावितो गहिला ॥३॥ तुका ह्मणे करीरे ठायींचाचि विचार । जंव नाहीं पातला यमाचा किंकर ॥ ४ ॥

॥ ३०७ ॥

आली लळिताची वेळ। असा सावध सकळ ॥१॥ लाहो करा वेगीं स्मरा। टाळी वाहोनि विश्वंभरा ॥ २ ॥ जालिया अवसान। न सांपडती चरण ॥३॥ तुकया बंधु ह्मणे थोडे। अवघें उरली आहे पुढें ॥४॥

रूपकें.

डांका ॥ ३०८ ॥

चौक भरियेला आसनीं। पाचारिली कुळस्वामिनी। वैकुंठवा-सिनी। ये धांवोनी झडकरी ॥ १ ॥ रंगा येई वो विठाई सांवळिये डोळसे। तुझें श्रीमुख साजिरें तें मी केधवां देखेन ॥ २ ॥ रजतम-धुपारती। पंचप्राणांची आरती। अवघी सारोनी आइती। ये धांवती झडकरी ॥३॥ मन मारोनियां मेढा मुठीं। आशा मनसा तृष्णा सुटी। भक्तिभाव नैवेद्य ताटीं। भरोनी केला हाकारा ॥ ४ ॥ डांका अनुहात गजरें। येउनि अंगासी संचरे। आपुला घेउनि पुरस्कार। अरोग्य करी तुकयासी ॥ ५ ॥

॥ ३०९ ॥

साच माझा देव्हारा। भाक ठेवी भाव खरा। त्रिगुणांचा फुल-वरा। आणा विनंति सांगतों ॥ १ ॥ माझें दैवत हें रंगीं। नाचे वैष्णवांच्या संगीं। भरलें मग अंगीं। निवाड करी दोहींचा ॥ २ ॥ तुझें आहे तुजपाशीं। परि तूं जागा चुकलासी। चिवडुनिया नाशी। तुझ्या घरच्यांनीं केली ॥ ३ ॥ आतां न पडे ठावें। वांचूनिया माझ्या देवें। अंधकार व्हावें। नासु ठाव शोधावा ॥ ४ ॥ आंध-ळ्यासी डोळे। देते पांगुळासी पाय। वांझा पुत्र फळे। नवस पुर-विते विठाई ॥ ५ ॥ उगविलीं कोडीं। मागें किस्येकांचीं बापुडीं। तुका ह्मणे घडी। नलगे नवस द्या आधीं ॥ ६ ॥

॥ ३१० ॥

विनंती घातली अवधारीं । मज देई वो अभय करीं । पीडिलों खेचरीं । आणीक वारी नांवांची ॥१॥ रंगा येई वो एकला । रंग वोढवला । हरिनाम उठिला । गजर केला हाकारा ॥२॥ देवांचि दैवतें । तुज नमिलें आदिनाथें । ये वो कृपावंते । भोगा माझ्या धांवत ॥३॥ न लवीं आतां वेळ । आइत सारिली सकळ । तुका ह्मणे कुळ । आमुचिये दैवतें ॥४॥

॥ ३११ ॥

माझा देव्हारा साचा । नाहीं आणीक कोणाचा । त्रिभुवनीं यात्रा । ठसा नलगे पुसावें ॥१॥ या रे लोटांगणीं । कांहीं करा विनवणी । करील झाडणी । भूत काढी संसार ॥२॥ पडिले विषयाचे गोंधळीं । ते त्रिगुण आकळी । हरिनाम आरोळी । कानीं पडतां ते उठी ॥३॥ घेतला अहंकारें । काम क्रोध या मत्सरें । पळती प्रेमभरें । अवघे ठाव सांडुनी ॥४॥ घेतलासे पुरा । माया ममता आसरा । अवघ्या एक सरा । पळती रंग देखोनी ॥५॥ तुका ह्मणे घाव । भाव । फिटल मनींचा संदेह । आणीक न लगे ठाव । कांहीं कोठें हिंडावें ॥ ६ ॥

॥ ३१२ ॥

पुढें येते देवी । तिची जती चालों द्यावी । मागील झाडावी । झाडा मान आसडी ॥ १ ॥ एकवीरा आली अंगा । आतां निवारील रोगा । माझ्या भक्तापाशीं सांगा । पूजा भावें करावी ॥ २ ॥ मेंढा मारावा लोवाळ । पूजा पावली सकळ । तुह्मीं केलें बळ । मग मी ठायीं न पडे ॥ ३ ॥ तुका ह्मणे मुळीं । लागली ते आली कुळीं । वंदुनी सकळी । जीवेंभावें ओवाळा ॥ ४ ॥

॥ ३१३ ॥

अवघ्या ज्येष्ठा देवी कोण पूजनाचा ठाव । भक्तांचि भाव कोठें नाहींसें झालें ॥१॥ दिसे सारिखें सारिखें परि तें कारणां पारिखें । तळीं गेलें देखें वरी टोलें न साहातां ॥ २ ॥ पट एका शिरीं येथें विधीनें त्या येरी । बसकोळ्या घागरी डेरे रांजण गाडगीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे माना येथें कोणी रुसावेना । आपुलाल्या स्थानीं जेथें त्याचि शोभल्या ॥ ४ ॥

॥ ३१४ ॥

खेचर खडतर काळ कांपती असुर । नांदे भीमातीर । पंढरपूर पाटणीं ॥ १ ॥ आतां करीं कां रे हाकारा । सहस्रनामें एकसरा । दुर्वाडिते खेचरा । अंगसंगें धरूनी ॥ २ ॥ सीते झाली सडपणी । राहाणें वासुगीच्या वनीं । पावली जननी । झोंडि मोकळीया केशी

॥ ३ ॥ लाविलें कावरें । प्रल्हादा हैसासुरें । आली एकसरें । दांत खात रंगासी ॥ ४ ॥ वसुदेवाचीं बाळें । सात खादलीं ज्या काळें । आली भोगवेळे । तया कारणें तेथें ॥ ५ ॥ पांडवें बापुडीं । वांज केलीं फिरती वेडीं । धांवोनिया काढी । अंगसंगें त्राहाटविलीं ॥६॥ नामाचें चिंतन । तेथें धांवते आपण । न विचारितां हीण । भाव देखे जयाचा ॥ ७ ॥ कुळींची कुळदेवता । तुका ह्मणे आह्मां माता । काय भय भूतां । काळ यमदुतांचें ॥ ८ ॥

॥ ३१५ ॥

देवि देव झाले भोग सरले यावरी । सांगाया दुसरी पेसी नाहीं उरली ॥१॥ हरिनाम देवनाम तुम्ही गाऊनिया जागा । पॅठवणी मागा नका ठेवूं लिगाड ॥२॥ शेवटीं सुताळी बरवी वाजवावी डांक । ताळा घाली एक सरलियाचे शेवटीं ॥३॥ गुंडाळा देव्हारा मान नेती मानकरी । तुका ह्मणे बरीं आजी कोडीं उगविलीं ॥४॥

गोंधळ ॥ ३१६ ॥

राजस सुंदर बाळा । पाहों आलिया सकळा वो ॥ विंचीं विबोनि ठेली । माझी परब्रह्म वेल्हाळा वो ॥ कोटि रविशशि जिच्या । आंगीचिया लिळा वो ॥ १ ॥ राजस विठाबाई । माझें ध्यान तुझें पायीं वो ॥ त्यजूनिया चौघांसी । लावी आपुलिये सोई वो ॥ २ ॥ सकुमार साजिरी । कैसीं पाउलें गोजिरीं वो ॥ कंठीं तुळसीमाळा । उभी भीवरेच्या तिरीं वो ॥ दंत हिरया ज्योति । शंखचक्र मिरवे करीं वो ॥ ३ ॥ निर्गुण निराकार । वेदां न कळेचि आकार वो ॥ शेषादिक श्रमले । श्रुतीं न कळे तुझा पार वो ॥ उभारोनी बाहे । भक्तां देत अभयकर वो ॥ ४ ॥ येऊनी पंढरपुरा । अवतरली सारंगधरा वो ॥ देखोनी भक्तिभाव । वोरसली अमृत धारा वो ॥ देऊनी प्रेमपान्हा । तुकया स्वामीनें किंकरा वो ॥ ५ ॥

॥ ३१७ ॥

सुदिन सुवेळ । तुझा मांडिला गोंधळ वो ॥ पंचप्राण दिवटे । दोन्हीं नेत्रांचे हिलाल वो ॥ १ ॥ पंढरपुरनिवासे । तुझे रंगीं नाचत असे वो ॥ नवस पुरवीं माझा । मनींची जाणोनिया इच्छा वो ॥२॥ मांडिला देव्हारा । तुझा त्रिभुवना माझारी वो ॥ चौक साधियेला । नाभिकळस ठेविला वरी वो ॥ ३ ॥ बैसली देवता । पुढें वैष्णवांचें गाणें वो ॥ उद्गारें गर्जती । कंठीं तुळशीचीं भूषणें वो ॥ ४ ॥ स्वानंदाचे ताटीं । धूप दीप पंचारती वो ॥ वोवाळिली माता । विठाबाई पंचभूतीं वो ॥ ५ ॥ तुझें तुज पावलें । माझा नवस पुरवीं आतां वो ॥ तुका ह्मणे राखे । आपुलिया शरणांगता वो ॥ ६ ॥

॥ ३१८ ॥

सुंदर मुख साजिरें । कुंडलें मनोहर गोमटीं वो ॥ नागर नागखोपा । केशर कस्तुरी मळवटीं वो ॥ विशाळ व्यंकट नेत्र । वैजंती तळपे कंठीं वो ॥ कास पितांबराची । चंदन सुगंध साजे उटी वो ॥ १ ॥ अतिबरवंटा बाळा । आली सुलक्षणा गोंधळा वो ॥ राजस तेजोराशी । मिरवी शिरोमणी वेल्हाळा वो ॥ कोटि रविशशिप्रभा । तेजें लोपल्या सकळा वो ॥ न कळे ब्रह्मादिकां । अनुपम्य इची लीळा वो ॥ २ ॥ सावळी सकुमार । गोरी भुजा शोभती चाऱ्ही वो ॥ सखोल वक्षस्थळ । सुढाल पदक झळके वरी वो ॥ कटीं क्षुद्र घंटिका । शब्द करिताती माधुरी वो ॥ गर्जत चरणीं वाकी । अभिनव संगीत नृत्य करी वो ॥३॥ अष्टांगीं मंडित काय । वर्णाची रूपठेवणी वो ॥ शोधिव शुद्ध रसाची । ओतिली लावण्यखाणी वो ॥ सर्वकळा संपन्न । मंजुळ बोले हास्यवदनीं वो ॥ बहु रूपें नटली । आदिशक्ति नारायणी वो ॥ ४ ॥ घटस्थापना केली । पंढरपुरमहानगरीं वो ॥ अस्मानी मंडप दिला । तिन्ही ताळांवरी वो ॥ आरंभिला गोंधळ । इनें चंद्रभागेतिरीं वो ॥ आली भक्तिकाजा । कृष्णाबाई योगेश्वरी वो ॥५॥ तेहतीस कोटि देव । चामुंडा अष्ट कोटि भैरव वो ॥ आरत्या कुरवंड्या । करिती पुष्पांचा वरुषाव वो ॥ नारद तुंबर गायन । ब्रह्मानंदें करिती गंधर्व वो ॥ वंदी चरण रज । तेथें तुकयाचा बांधव वो ॥ ६ ॥

॥ ३१९ ॥

एक वाई तुज वो कांहीं सांगतें शकून । निजलिया भुर होसी जागें ह्मणऊन ॥ १ ॥ मान्य माझें केलें सांगतें एका बोलें । न येतां हे भलें कळों कोणा लोकांसी ॥ २ ॥ सांगतें गुण जीवींचीं खुण ऐक माझी मात । बैस एका भावें माझे हातीं दे वो हात ॥ ३ ॥ बरवा घरचार तुज सांपडला ठाव । फळ नाहीं पोटीं येथें दिसे खोटा भाव ॥ ४ ॥ आहे तुझे हातीं एका नवस्याचें फळ । अवघा करीं साह्य चहूं अठरांच्या बळें ॥ ५ ॥ करीं लागपाठ चित्त वित्त वको पाहीं । अवई तो चुडा तुज भोगावील नाहीं ॥ ६ ॥ कुळींची हे मुळी तुझे लागलीसे देवी । पडिला विसर नेदी फळ नाहीं ठावी ॥ ७ ॥ तुका ह्मणे नांद सुखें धरीं आठवण । माझे येतील कोणी त्यांचा राख बहु मान ॥ ८ ॥

दसरा ॥ ३२० ॥

पवित्र सुदिन उत्तम दिवस दसरा । सांपडला तो साधा आजि मुहूर्त बरा । गर्जा जयजयकार हरि हृदयीं धरा । आळस नका करूं लहाना

सांगतो थोरां ॥१॥ या हो या हो बाईयांनो निघाले हरी । सिलंगणा घेऊनी वेगीं आरत्या करीं । ओवाळूं श्रीमुख वंदूं पाउलें शिरीं । आह्मां दैव आलें येथें घरिंच्या घरीं ॥२॥ अक्षय मुहूर्त औटामध्यें साध तें । मग येरी गर्जे जैसें तैसें होत जातें । ह्मणोनि मागं पुढें कोणीं न पहावें येथें । सांडा परतें काम जाऊं हरी सांगातें ॥३॥ बहुतां बहुतां रीतीं चित्तीं धरा हे मनीं । नका गई करूं आइकाल ज्या कानीं । मग हें सुख कधीं न देखाल स्वप्नीं । उरेल हायहाय मागें होईल काहाणी ॥ ४ ॥ ऐसियास वंचिती त्यांच्या अभाग्या पार । नाहीं नाहीं नाहीं सत्य जाणा निर्धार । मग हे वेळ घटिका न ये अजरामर । कळलें असों द्या मग पडतील विचार ॥५॥ जयासांठीं ब्रह्मादिक झालेती पिसे । उच्छिष्टा कारणें देव जळीं झाले मासे । अर्ध्दांगीं विश्वमाता लक्ष्मुमी वसे । तो हा तुकया बंधु म्हणे आलें अनायासें ॥६॥

वाघ्या ॥ ३२१ ॥

अनंत जुगाचा देव्हारा । निजबोधांचा घुमारा । अवचित भरला वारा । या मल्लारी देवाचा ॥ १ ॥ शुद्धसत्वाचा कवडा मोठा । बोधबिरडें बांधला गांठा । गळां वैराग्याचा पट्टा । वाटा दावूं भक्तीच्या ॥ २ ॥ हृदय कोटंबा सांगातें । घोळ वाजवूं अनुहातें । ज्ञानभंडाराचें पोतें । रितें नव्हे कल्पांतीं ॥ ३ ॥ लक्ष चौऱ्यांशी घरें चारी । या जन्माची केली वारी । प्रसन्न झाला देव मल्लारी । सोहंभावीं राहिलों ॥४॥ या देवाचें भरतां वारें । अंगीं प्रेमाचें फेंफरें । गुरूगुरू करी वेडे चारें । पाहा तुकें भुंकाविलें ॥ ५ ॥

सौऱ्या ॥ ३२२ ॥

वेसन गेलें निष्काम झालें नर नव्हे नारी । आपल्या तुटी पारख्या भेटी सौरियांचे फेरी १ त्याच्या वेद लागला छंद हरि गोविंद वेळोवेळां । आपुलेमागें हांसत रागें सावलें घालिती गळां २ जन वेषा भीतें तोंडा आमुच्या भांडपणा । कर कटीं भीमा तटीं पंढरीचा राणा ३ वेगळ्या याति पडिलों खंतीं अवघ्या प...। भावें । टाकियेली चाड देहभावें जिवें शिवें ४ सकळांमधीं आगळी बुद्धि तिची करूं सेवा । वाय तुंबामुंढासवें भक्ती नाचों भावा ५ म्हणे तुका टाक रुका नाचों निर्लज्जा । बहु झालें सुख कामें चुकलों या काजा ६

॥ ३२३ ॥

आणिका उपदेशूं नेणें नाचों आपण । मुंढा वांया मारगेली वायां हांसे जन ॥१॥ तैसा नव्हे चाळा आवरीं मन डोळा । पुढिलांच्या कळा कवतुक जाणोनी ॥२॥ बाहिरल्या वेषें आंत जैसें तैसें । बा-

कलें तों बरें पोट भरे तेणें वेषें ॥ ३ ॥ तुका म्हणे केला तरी करीं शुद्ध भाव । नाहीं तरी जासी वायां हा ना तोसा ठाव ॥ ४ ॥

॥ ३२४ ॥

टाक रुका चाल रांडे कां गे केली गोवी । पुसोनियां आलें डाव म्हणोनी देतें सीवी ॥१॥ आतां येणें छंदें नाचों विनोदें । नाहीं या गोविंदें माझें मजसी केलें ॥२॥ कोरडे ते बोल कां गे वेचितेसी वांया । वर्तें करूनी दावीं तुझ्या मुळींच्या ठाया ॥३॥ याजसाठीं डौर म्यां धरियेला हातीं । तुका म्हणे तुम्ही गांठी सोडायाची संतीं॥४

॥ ३२५ ॥

मोकळी गुंते रिती कुंथे नाहीं भार द्यावें । धडआडा बैसली ओझा घेतली आपुल्या भावें ॥ १ ॥ ऐका बाई लाज नाहीं आणिकां त्या गरतीची । समाधानी उंच स्थानीं जाणे सेवा पतीची ॥२॥ न बोलतां करी चिंता न मारितां पळे । दादुला सेजे नाचे निजे जगझोडीचे चाळे ॥३॥ देखत अंध बहिर कानीं बोल बोलतां मुकें । तुका म्हणे पतन सोयरीं ऐसीं जालीं एकें ॥ ४ ॥

॥ ३२६ ॥

सातें चला काजळ घाला तेल फणी करा । दिवाणद्वारीं बैसले पारीं नाचों फेर धरा ॥१॥ या साहेबाचें झालें देणें वेळोवेळा नलगे येणें । आतां हातीं काशासाठीं हिंडो पाठी तुकानें ॥ २ ॥अवघ्या जणीं मुंढा धणी नाचों एकें घाई । सरसावलें सुख कैसा चाळा एके ठायीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे बोळगों एका तोंड चिंता माया । देऊं उद्गार आतां जाऊं मुळींचिया ठाया ॥ ४ ॥

॥ ३२७ ॥

सौरी सुर आलें दूर डौर घेतला हातीं । माया मोह सांडवलें तीही लोकीं झालें सरती ॥ १ ॥ चाल विठाबाई अवघी पांज देई । न धरीं गुज कांहीं वाळवंटीं सांपडतां ॥ २ ॥ हिंडोनी चौऱ्यांशी घरें आलें तुझ्या दारा । एक्या रुक्यासाठीं आन्वयलें संसारा ॥ ३ ॥ लाज मेली शंका गेली नाचों महाद्वारीं । भ्रांति सायलें फिटोनि गेलें आतां कैंची उरी ॥ ४ ॥ झालें भांडी जगा सांडी नाहीं भीड चाड । घालीन चरणीं मिठी पुरवीन जीवींचें तें कोड ॥ ५ ॥ तुका ह्मणे रुका करी संसारतुटी । आतां तुम्हां आम्हां कैसी झाली जीवें साटी॥६॥

॥ ३२८ ॥

नम सपाट वेसनकाट निःसंग झालें सौरी । कुडपीयेला देवा आतां येऊं नेदीं दुसरी ॥१॥ गाऊं रघुरामा हेंचि उरलें आम्हां । नाहीं जीवतमा वित्तगोतासहित ॥ २ ॥ डाव झाला रिता झाकूनि काय

आतां । कोणासवें लाज कोण दुजे पाहता ॥ ३ ॥ सौरीयांचा संग आम्हां दुरावलें जग । भिन्न झालें सुख भाव पालटला रंग ॥ ४ ॥ लाज भय ह्मणी नाहीं तजियेलीं दोन्ही । फिराविला वेष नव्हों कोणाचींच कोणी ॥ ५ ॥ तुका ह्मणे हा आह्मां वेष दिला जेणें । जना प्रचित सर्वे असों एकपणें ॥ ६ ॥

॥ ३२९ ॥

नव्हे नरनारी संवसारीं अंतरलों । निर्लज्ज निष्काम जना वेगळेचि ठेलों ॥१॥ चाल रघुरामा ने आपुल्या गांवा । तुजविण आम्हां कोण सोयरा सांगाती ॥२॥ जनवाद लोकनिंद्य पिशुनाचे चेरे । सांडूं तुजसाठीं अंतरलीं सहोदरें ॥३॥ बहुतां पाठीं निरोप हाटीं पाठविला तुज । तुका म्हणे आतां सांडुनि लौकिक लाज ॥४॥

॥ ३३० ॥

नीट पाट करूनी थाट दावीतसे तोरा । आपणाकडे पाहो कोणी निघाली बाजारा ॥ १ ॥ ते सौरी नव्हे निकी भक्तीविण फिकी ॥ २ ॥ चांग भांग करूनी सोंग दावी माळा मुद्री । रुक्याची आस धरूनी हालवी ती फुदी ॥ ३ ॥ थोरे घरीं करी फेरी तेथें नाचे बरी । जेथें निघे रुका तेथें हालवी दिरी ॥ ४ ॥ आंत मांग बाहेर चांग सौरी ती नव्हे तेग । तुका दास नटतसे न करी त्याचा संग ॥ ५ ॥

॥ ३३१ ॥

चाल माझ्या राघो डोंगरीं दिवा लागो ॥ १ ॥ घर केलें दार केलें घरीं नाहीं वरो । सेजारणी पापिणीचीं पांच पोरें मरो ॥ २ ॥ घरीं पांच पोरें तीं मजहुनि आहेत थोरें । पांचाच्या बळें खाइलीं बावन कुळें ॥ ३ ॥ घर केलें दार केलें दुकान केला मोटा । पाटाची राणी धांगडधिंगा तिचा मोटा ॥ ४ ॥ दुकान केला मोटा तर पदरीं रुका खोटा । हिजडा म्हणसी जोगी तर सोळा सहस्र भोगी । तुका म्हणे वेगीं तर हरि म्हणा जगीं ॥५॥

॥ ३३२ ॥

जन्मा आलिया गेलिया परी भक्ति नाहीं केलीं । माझें माझें म्हणोनियां गुंतगुंतों मेलीं ॥ १ ॥ येथें कांहीं नाहीं लभ गुरूच्या पायीं । चाल रांडे टाकीं रुका नको करूं बोल । गुरुविण मार्ग नाहीं करिसी तें फोल ॥ २ ॥ खाउनी जेउनी लेउनी नेसुनी म्हणती आम्ही बऱ्या । साधु संत घरा आल्या होतीं पाठमोऱ्या ॥ ३ ॥ वाचोनी पढोनी झाले शाहणे म्हणती आम्ही संत । परनारी देखोनी त्यांचें चंचळ झालें चित्त ॥ ४ ॥ टिळा टोपी

घालूनी माळा ह्मणती आह्मी साधु। दयाधर्म चित्तीं नाहीं ते जाणावे भोंदु ॥ ५ ॥ कलियुगीं घरोघरीं। संत झाले फार। वीतिभरी पोटासाठीं हिंडती दारोदार ॥ ६ ॥ संत म्हणती केली निंदा निंदा नव्हे भाई। तुका असे अनन्य भावें शरण संतां पायीं ७॥

विराण्या ॥ ३३३ ॥

वाळो जन मज म्हणोत शिंदळी। परि हा वनमाळी न विसंबें ॥१॥
सांडुनी लौकिक झालिये उदास। नाहीं भय आस जीवित्वाची ॥२॥
नाइकें वचन बोलतां या लोकां। ह्मणे झालों तुका हरिरता ॥ ३ ॥

॥ ३३४ ॥

आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा। ह्मणोनी व्यभिचारा टेकलियें ॥१॥
रात्रंदिस मज पाहिजे जवळी। क्षण त्यानिराळी न गमे घडी ॥ २ ॥
नाम गोष्टी माझी सोय सांडा आतां। रातलें अनंता तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ३३५ ॥

हाचि नेम आतां न फिरे माघारी। बैसलें शेजारीं गोविंदाचे ॥ १ ॥
घररिघी झालें पट्टराणी बळें। वरिलें सांवळें परब्रह्म ॥ २ ॥
बळियाचा अंगसंग झाला आतां। नाहीं भय चिंता तुका ह्मणे ॥३॥

॥ ३३६ ॥

नाहीं काम माझें काज तुह्मांसवें। होतें गुम ठावें केलें आतां ॥ १ ॥
व्यभिचार माझा पडिला ठाउका। न सरती लोकांमाजीं झालें ॥२॥
न धरावा लोभ कांहीं मजविशीं। झालें देवापिशी तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ३३७ ॥

विसरलें कुळ आपुला आचार। पति भावे दीर घरा सोय ॥ १ ॥
सांडिला लौकिक लाज भय चिंता। रातलें अनंता चित्त माझें २॥
मज आतां कोणी आळवाल झणी। तुका म्हणे कानीं बधिर झालें ३

॥ ३३८ ॥

न देखें न बोलें नाइकें आणिक। बैसला हा एक हरि चित्तीं ॥ १ ॥
सासुरें माहेर मज नाहीं कोणी। एक केलें दोन्ही मिळोनियां ॥२॥
आळ आला होता आम्हीं भांडखोरी। तुका म्हणे खरी केली मात ३

॥ ३३९ ॥

दुजा ऐसा कोण बळी आहे आतां। हरि या अनंतापासूनियां ॥१॥
बळियाच्या आह्मी झालों बळिवंता। करूं सर्व सत्ता सर्वांवरी॥२॥
तुका म्हणे आह्मी जिवाच्या उदारा। झालों प्रीतिकरा गोविंदासी३

॥ ३४० ॥

क्षणभरी आम्ही सोसिलें वाईट। साधिलें अवीट निजसुख ॥ १ ॥
सांडीमांडी मागें केल्या बरोबरी। अधिकाचि परी दुःखाचिया २॥
तुका म्हणे येणें जाणें नाहीं आतां। राहिलों अनंताचिये पायीं ३॥

॥ ३४१ ॥

आम्हां आम्ही आतां वडील धाकुटी । नाहीं पाठीं पोटीं कोणी दुजे१
फावला एकांत एकविध भाव । हरी आम्हांसवें सर्व भोगी ॥ २ ॥
तुका म्हणे अंगसंग एके ठायीं । असों जेथें नाहीं दुजे कोणी ॥ ३ ॥

॥ ३४२ ॥

सर्व सुख आम्ही भोगूं सर्व काळ । तोडियेलें जाळ मोहपाश ॥१॥
याचसाठीं सांडियेले भरतारा । रातलों या पर पुरुषाशीं ॥ २ ॥
तुका म्हणे आतां गर्भ नये धरूं । औषध जें करूं फळ नव्हे ॥ ३ ॥

॥ ३४३ ॥

एका जीवें आतां जिणें झालें दोहीं । वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आह्मां नाहीं वेगळीक । पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥
तुका म्हणे झालें सायासाचें फळ । सरली ते वेळ काळ दोन्ही ॥३॥

॥ ३४४ ॥

हासों रुसों आतां वाढवूं आवडी । अंतरींची गोडी अवीट ते ॥१॥
सेवासुखें करूं विनोदवचन । आह्मी नारायण एकाएकीं ॥ २ ॥
तुका म्हणे आम्ही झालों उदासीन । आपुल्या आधीन केला पति३

॥ ३४५ ॥

मजसवें आतां येऊं नका कोणी । सासुरवासिनी बाइयांनो ॥ १ ॥
न साहवे तुह्मां या जनाची कूट । बोलती वाईट ओखटें तें ॥ २ ॥
तुका म्हणे झालों उदास मोकळ्या । विचरों गोवळ्यासवें आम्ही ३

॥ ३४६ ॥

शिकविलें तुम्ही तें राहे तोंवरी । मज आणि हरी वियोग तो ॥ १ ॥
प्रसंगीं या नाहीं देहाची भावना । तेथें या वचना कोण मानी ॥ २ ॥
तुका ह्मणे चित्तीं बैसला अनंत । दिसों नेदी नित्य अनित्य तें ॥ ३ ॥

॥ ३४७ ॥

सांगतों तें तुम्ही आइकावें कानीं । आमुचे नाचणीं नाचूं नका ॥१॥
जोंवरी या तुह्मां मागिलांची आस । तोंवरी उदास होऊं नका ॥२॥
तुका ह्मणे काय वांयाविण धिंद । पति ना गोविंद दोन्ही नाहीं ॥३॥

॥ ३४८ ॥

आजीवरी तुह्मां आह्मां नेणपणें । कौतुकें खेळणें संग होता ॥ १ ॥
आतां अनावर झालों अगुणाची । करूं नये तेंचि करीं सुखें ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां बुडविलीं दोन्हीं । कुळें एक मनीं नारायण ॥ ३ ॥

॥ ३४९ ॥

सासुरियां वीट आला भरतारा । इकडे माहेरा स्वभावोंचि ॥ १ ॥

सांडवर कोणी न धरिती हातीं । प्रारब्धाची गति भोगूं आतां ॥२॥
न व्हावी ते झाली आमुची भंडाई । तुका ह्मणे काई लाजों आतां ३॥

॥ ३५० ॥

मरणाही आधीं राहिलों मरोनी । मग केलें मनीं होतें तैसें ॥ १ ॥
आतां तुह्मी पाहा आमुचें नवल । नका वेचूं बोल वांयाविण ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी भयाभीत नारी । कैसी संग सरी तुह्मां आह्मां ॥३॥

॥ ३५१ ॥

परपुरुषाचें सुख भोगे तरी । उतरोनी करीं घ्यावें सीस ॥ १ ॥
संवसारा आगी आपुलेनि हातें । लावूनी मागुतें पाहूं नये ॥ २ ॥
तुका ह्मणे व्हावें तयापरी धीट । पतंग हा नीट दीपावरी ॥ ३ ॥

॥ ३५२ ॥

अइकाला परी ऐसें नव्हे बाई । न सांडावी सोई भ्रतारान्ची ॥ १ ॥
नव्हे आराणूक लौकिकापासून । आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥
तुका ह्मणे मन कराल कठीण । त्या या निवडोन मजपाशीं ॥ ३ ॥

॥ ३५३ ॥

आहाच वाहाच आंत बरी दोन्ही । न लगा गडणी आह्मां तैशा ॥१॥
भेऊं नये तेथें भेडसावूं कोणा । आवरूनी मना बंद द्यावा ॥ २ ॥
तुका ह्मणे कांहीं अभ्यासावांचूनी । नव्हे हे करणी भलतीच ॥३॥

॥ ३५४ ॥

बहुतांच्या आह्मी न मिळों मतासी । कोणी कैसी कैसी भावनेच्या १
विचार करितां वांया जाय काळ । लटिकेंचि मूळ फजितीचें ॥२॥
तुका ह्मणे तुह्मी करा घटापटा । नका जाऊं वाटा आमुचिया ॥ ३ ॥

॥ ३५५ ॥

त्याचें सुख नाहीं आलें अनुभवा । कठीण हें जिवा तोंचिवरी १
मागिलांचें दुःख लागों नेदी अंगा । अंतर हें संगा नेदी पुढें ॥२॥
तुका म्हणे सर्वविशीं हा संपन्न । जाणती महिमान श्रुति ऐसें ।३॥

॥ ३५६ ॥

न राहे रसना बोलतां आवडी । पायीं दिली बुडी माझ्या मनें १
मानेल त्या तुम्ही आइका स्वभावें । मी तों माझ्या भावें अनुसरलें २
तुका म्हणे तुम्ही फिरावें बहुतीं । माझी तों हे गति झाली आतां ३

॥ ३५७ ॥

न बोलतां तुम्हां कळों न ये गुज । ह्मणऊनी लाज सांडियेली ॥१॥
आतां तुम्हां पुढें जोडितसें हात । नका कोणी अंत पाहों माझा॥२॥
तुका म्हणे आम्ही बैसलों शेजारी । करील तें हरी पाहों आतां॥३॥

गावगुंड ॥ ३५८ ॥

आम्हीं झालों गांवगुंड। अवघ्या पुंड भूतांसी ॥ १ ॥ दुसरें तें खेळों आलें। एका बोलें तो मियां ॥ २ ॥ अवघियांचा येऊं लाग। नेदूं अंग शिवाया ॥३॥ तुका म्हणे खुंटुं नाद। जिंतुं वाद सर्तीनें ॥४॥

जोगी ॥ ३५९ ॥

जग जोगी जग जोगी। जागजागे बोलती ॥१॥ जागता जगदेव। राखा कांहीं भाव २ अवघा क्षेत्रपाळ। पूजावा सकळ ॥३॥ पूजापत्र कांहीं। फळ पुष्प तोय ॥४॥ बहुतां दिसां फेरा। आला या नगरा ॥५॥ नका घेऊं भार। धर्म तोचि सार ६ तुका मागे दान। द्यावें जी अनन्य ७

सरवदा ॥ ३६० ॥

एका गा ए भाई। सरवदा सांगतो काई। येथें नाडेल माई। दोघां पुत्रांची। ते करिती तिची विटंबना। अवघ्या प्रसिद्ध जना। एक न मारितां शाहाणा। तो जाणा सुख न पवे ॥ १ ॥ आणीक ऐका गा ए। सरवदा सांगतो काय। खरें बोले तो जाय। नरकामध्यें अधोगती। हें चौघांच्या मुखें। मना आणावें सुखें। अवघीं चुकती दुःखें। खोटें बोला नरनारी ॥ २ ॥ आणीक नाडेल एक जाण। सरवदा बोलतो वचन। जागे माझें चित्त ह्मणोन। पडिलें खान तया घरीं। ह्मणोन न ह्मणा माझें कांहीं। निजीं निजा सुखें ठायीं। यत्न होईल तई। चोराठायीं विश्वास ॥ ३ ॥ आणीक एकी परी। सरवदा सांगतो थोरी। दुःख पावेल नारी। पतिव्रता यामधीं। पांचांनीं दिधली हातीं। म्हणोनि न मनाची निश्चिती। परपुरुषीं होय रती। सुखगती ते पावे ॥४॥ आणीक एकी परी। सरवदा सांगतो ते करीं। दान देतां जो वारी। नव्हे भला भला तो। तुका म्हणे आई। येथें नांच काई। सांगसी तें ठायीं। मरो रांडेचें ५

दरवेस ॥ ३६१ ॥

अल्ला करे सो होय बाबा करतारका सिरताज। गाऊ बछरे तिस चलावे यारी बाघो न सात ॥१॥ ख्याल मेरा साहेबका बाबा हुवा करतार। व्हांटें आघे चढे पीठ आपे हुवा असवार ॥ २ ॥ जिकिर करो अल्लाकी बाबा सबल्यां अंदर भेस। कहे तुका जो नर बुझे सोहि भया दरवेस ॥ ३ ॥

मलंग ॥ ३६२ ॥

नजर करे सो हि जिके बाबा दुरथी तमासा देख। लकडी फांसा लेकर बैठा आगले ठकण भेख ॥ १ ॥ काहे भुला एक देखत आंखो मार तडांगो बाजार ॥ २ ॥ दमरी चमरी जो नर भुला।

सोत आघो हि लत खाय ॥ ३ ॥ नहि बुलायत किसे बाबा आप हि मत जाय । कहे तुका उस असाके संग फिरफिर गोते खाय ॥४॥

डांईफोडा ॥ ३६३ ॥

तम भज्याय ते बुरा जिकीर ते करे सीर काटे ऊर कुटे ताहां झडकरे ॥१॥ ताहां एक तु ही ताहां एक तु ही। ताहां एक तु ही रे बाबा हम तुम नहीं ॥२॥ दिदार देखो भले नही किशे गलाने कोये। सच्चा नही पकड सके झुटा झुटे रोये ॥३॥ किसे कहे मेरा किन्हो संत लिया भास । नहीं मेलो मिले जीवना झुटा किया नास ॥४॥ सुनो भाई कैसा तो ही होय तैसा होय । बाट खाना अल्ला कहना एकवार तो ही ॥ ५ ॥ भला लिया भेक मुंडे आपना नफा देख। कहे तुका सो ही सखा हाक अल्ला एक ॥ ६ ॥

वैद्यगोळी ॥ ३६४ ॥

अल्ला देवे अल्ला दिलावे अल्ला दारू अल्ला खिलावे । अल्ला बिगर नही कोय अल्ला करे सोहि होय ॥ १ ॥ मर्द होये वो खडा फीर नामर्दकुं नही धीर । आपने दिलकुं करना खुसी तीन दामकी क्या खुमासी ॥२॥ सब रसोंका किया मार भजनगोली एक हि सार। इमान तो सब ही सच्चा थोडी तो भी लेकर ज्या ॥ ३ ॥ जिन्हो पास नीत सोय वोहि बसकरी तिरोवे। सांतो पांचो मार चलावे उतार सो पीछे खावे ॥ ४ ॥ सब ज्वानी निकल जावे पीछे गधडी मटी खावे। गांवढळ सो क्या लेवे हमवर्नी भरी नही घोवे॥५॥ मेरी दारू जिन्हे खाया दिदार दरगा सोही पाया । तल्हे मुंडी घाल जावे बिगारी सोवे क्या लेवे ॥ ६ ॥ बजारका बुझे भाव वो हि पुसता आवे ठाव । फुकट बाटु कहे तुका लेवे सो हि लेवो सच्चा ७

मुंढा. ॥ ३६५ ॥

संबाल यारा उपर तले दोन्हों मारकी चोट । नजर करे सोही राखे पश्वा जावे लूट ॥१॥ प्यार खुदाई प्यार खुदाई प्यार खुदाई । प्यार खुदाई रे बाबा जिकिर खुदाई ॥२॥ उडे कुदे तुंग नचावे आगल भूलन प्यार । लडबड खडबड कोहिकांकु चलायत भार ॥ ३ ॥ कहे तुका सुनो लोकत हम जिन्होंके सात । मिलाये तो उसे देना तो ही चढावे हात ॥ ४ ॥

॥ ३६६ ॥

सब संबाल ग्याने लौंडे खडा केऊं गुंग । मादिरथी मला हुवा भुकि पाडी भंग ॥१॥ आपसकुं संबाल आपसकुं संबाल । मुंढे खुब राख बाल । सुथिवोहि बोल नहीं तो करूंगा हाल ॥ २ ॥ हातकका तो

पीछे नहीं मुदल बिसर जाय। फिरते नही लाज रंडी गधे गोते खाय३
जिन्हो खातिर इतनां होता सो नही तुज बेफाम। उच्चा जोरो लिया
तुंबा तुंबा बुरा काम ॥४॥ निकल जावे चिकल जोरा मुंढे दिलदारी।
जबानोकी छोड दे बात फिर एक तारी ॥५॥ कहे तुका फिसल रुका
मेरेको तो दान देख। पकड धका गांडगुढघी मार चलाऊं आलेख॥६॥

॥ ३६७ ॥

आवल नाम आल्ला बडा लेते भूल न जाये। इलाम त्याकालजमु-
परताही तुंब बजाये ॥१॥ आल्ला एक तुं नबी एक तुं ॥ २ ॥ काटते
सिर पावों हात नही जीव डराये। आगले देखो पिछे बुझो आपे
हुजुर आये ॥ ३ ॥ सब सबरी नचाव म्याने खडा अपनी सात।
हात पावों रखते जबाब नही आगली बात ॥४॥ सुनो भाई बजार
नही सबहि नर चलावे। नन्हा बडा नहीं कोय एक ठोर मिलावे॥५॥
एक तार नहीं प्यार जीवनकी आस । कहे तुका सोहि मुंढा रा-
खलिये पायेनपास ॥ ६ ॥

कोडें ॥ ३६८ ॥

कोडें रें कोडें ऐका रे कोडें। उगवूनि फार राहे गुंफोनियां थोडें
॥१॥ पुसतसे सांगा मी हें माझें ऐसें काई। रुसूं नका नुगवे तो म्हणे
आपुली आई ॥ २ ॥ सांगतों हें मूळ कांहीं न धरावी खंती। झालें
जीवों मेलें मरों प्रारब्धा हातीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे अभिमान सांडवा
सकळीं। नका अंगावरी वांया येऊं देऊं कळी ॥ ४ ॥

॥ ३६९ ॥

नुगवे तें उगवून सांगितलें भाई। घालूनिया ताळा आतां शुद्ध
राखा घाई ॥ १ ॥ आतां कांहीं नाहीं राहिलें। म्यां आपणा आपण
पाहिलें ॥ २ ॥ कमाईस मोल येथें नका रीस मानूं। निवडूं नये
मज कोणा येथें वानूं ॥ ३ ॥ तुका म्हणे पदोपदीं कान्हो वनमाळी।
जयजत मग सेवटिला एक वेळीं ॥ ४ ॥

जोहार ॥ ३७० ॥

मायमाप जोहार जी जोहार। सारा साधावया आलों वेसकर ॥१॥
मागील पुढील करा झाडा। नाहीं तरी खोडा घालिती जी ॥ २ ॥
फांकूं नका रुजू झालियावांचून। सांगा जी कोण धरिती धन्या ॥३॥
आजी मायमाप करा तडामोडी। उद्यां कोण घडी राहेना हो ॥४॥
तुका ह्मणे कांहीं न चले ते बोली। अखरतें सालीं झाडा घेती ॥ ५ ॥

॥ ३७१ ॥

येऊं द्या जी कांहीं वेसकरास। आंतून बाहेर बोजेचा बास ॥१॥

जों यावें तों हातचि रिता नाहीं । कधीं तरी कांहीं यावें घ्यावें ॥२॥ तुका ह्मणे उद्या लावीन मनेरा । जे हे दारोदारीं भोंवतीं फिरा ॥३॥

कावडे ॥ ३७२ ॥

आहा आहा रे भाई । प्रथम नमूं तो विनायक । ठेवूनि गुरुचरणीं मस्तक । वदेल प्रसादिक वाणी । हरिहरांचे पवाडे ॥ १ ॥ माझी ऐसी ब्रीदावळी । दास दासत्वें आगळी । पान्हेरीनें मार्ग मळी । जीवन घ्या रे कापडी हो ॥ २ ॥ जें शितळाहुनी शितळ । पातळाहुनी पातळ । प्रेमामृत रसाळ । तें सेवा अहो भाग्याचे ॥३॥ जिंकाल तरी जिंका रे अभिमान । दवडाल तरी दवडा लज्जा आणि मान । धराल ते धरा शंभूचे चरण । दावाल पण ऐसा दावा तो ॥ ४ ॥ काळा घेऊं नेदी वाव । आला तो राखे घावडाय । शुद्ध सत्वीं राखोनी भाव । म्हणा महादेव हरिहर वाणी गर्जो या ॥ ५ ॥ पराविया नारी माउली समान । परधनीं बाटों नेदी मन । जीविंत्व तें तृणासमान । स्वामीकाजीं जाण शूर ह्मणों तया ॥ ६ ॥ शक्ति वेचाविया परउपकारा । खोटें खोट्याचा पसारा । सत्य तें भवनदीचा तारा । आळस तो न करा येथें अहो सांगतों ॥ ७ ॥ व्रत करा एकादशी सोमवार । कथा पूजन हरिजागर । पुण्य तें असे गातां नाचतां बहु फार । पुन्हा बोलिला संसार नाहीं नाहीं सत्यत्वें ॥ ८ ॥ संग संतांचा करितां बरवा । उत्तमोत्तम कीर्तीचा ठेवा । पंथ तो सुपंथें चालावा । उगवा वासना लिगाड ॥ ९ ॥ तुका बोल वितो कावडी । प्रवृत्ति निवृत्ति चोखडी । पुढती पुढती अधिक गोडी । भरुनि कळस भजन आवडी केशवदास नटतसे ॥ १० ॥

॥ ३७३ ॥

आहा आहा रे भाई । हें अन्नदानाचें सत्र । पव्हे घातली सर्वत्र । पंथीं अवघे पंथ मात्र । इच्छाभोजनाचें आर्त पुरवावया ॥१॥ यावें तेणें घ्यावें । न सरसें केलें सर्वांशिवें । पात्र शुद्ध पाहिजे बरवें । मंगळभावें सकळ हरि ह्मणारे ॥ २ ॥ नव्हे हें कांहीं मोकळें एकी चौघांचिया वेगळें । नेदी नावों मनाचिया बळें । अणु अणोरणीया आगळें । महदि महदा साक्षित्वें हरि म्हणा रे ॥३॥ हे हरि नामाची आंबिली । जगा पोटभरी केली । यिथ्यांनि कल्पतरूची साउली । सकळां वर्णां सेवितां भली । म्हणा हर हर महादेव ॥४॥ तुका हरिदास तराळ । अवघे हाकारी सकळ । या रे बंदू शिखरातळ । चैत्रमास पर्वकाळ महादेव दर्शनें ॥ ५ ॥

॥ ३७४ ॥

आहा आहा रे भाई । नमो उदासीन झाले देहभावा । आळविती

देवा तया नमो ॥१॥ नमो तीर्थपंथें चालती तयांसी । येती बोळ-विती त्यांसी नमो ॥२॥ नमो तयां संतवचनीं विश्वास । नमो भावें दास्य गुरूचें त्या ॥३॥ नमो तया मातापित्यांचें पाळण । नमो त्या वचन सत्य वदे ॥४॥ नमा तया जाणे आणिकांचें सुखदुःख । राखे तान भूक तया नमो ॥ ५ ॥ परोपकारी नमो पुण्यवंता । नमो त्या दमिल्या इंद्रियासी ॥ ६ ॥ तुका ह्मणे नमो हरिचिया दासा । तेथें सर्व इच्छा पुरलीसे ॥ ७ ॥

॥ ३७५ ॥

आहा आहा रे भाई । तयावरी माझी ब्रीदावळी । भ्रष्ट ये कळीं क्रियाहीन ॥१॥ थुंका थुंका रे त्याच्या तोंडावरी । वाणिली ते ते थोरी दवडा वाया बाहेरी ॥२॥ बाइलेचा दास पित्रांस उदास । भीक भिकाऱ्यास नये दारा ॥३॥ विद्याबळें वाद करूनियां छळी । आणिकांसीं फळी मांडोनियां ॥४॥ गांवींचिया देवा नाहीं दंडवत । ब्राह्मण अतीत घडेचिना ५ सर्वकाळ करि संताचिया निंदा । स्वप्नीं तो गोविंद आठवीना ॥ ६ ॥ खालेमध्यें धन पोटासी बंधन । नेणे पैसा दानधर्म कांहीं ७ तुका म्हणे नटे दावूनिया सोंग । लवों नेदी अंग भक्तीभावें ८

॥ ३७६ ॥

आहा रे भाई । गंगा नव्हे जळ । वृक्ष नव्हे वड पिंपळ । तुळसी रुद्राक्ष नव्हे माळ । श्रेष्ठ तनु देवाचिया ॥१॥ समुद्र नदी नव्हे पैगा । पाषाण म्हणों नये लिंगा । संत नव्हती जगा । माणसा त्या सारिखे ॥२॥ काठी म्हणों नये वेतु । अन्न म्हणों नये सांतु । राम राम हे मातु । नये म्हणों शब्द हे ॥३॥ चंद्र सूर्य नव्हती तारांगणें । मेरु तो नव्हे पर्वतासमान । शेष वासुकी नव्हे सर्प जाण । विखाराच्या सारिखे ॥४॥ गरुड नव्हे पाखरूं । ढोर नव्हे नंदिकेश्वरु । झाड नव्हे कल्पतरु । कामधेनु गाय न म्हणावी ॥५॥ कूर्म नव्हे कासव । डुकर नव्हे वराह । ब्रह्मा नव्हे जीव । स्त्री नव्हे लक्ष्मी ६ गवाक्ष नव्हे हाड । पाटाव नव्हे कापड । परीस नव्हे दगड । सगुण ते ईश्वरीचे ॥७॥ सोनें नव्हे धातु । मीठ नव्हे रेतु । नाहीं नाहीं चर्मातु । कृष्णाजिन व्याघ्रांबर ॥८॥ मुक्ता फळें नव्हेती गारा । सव्यापेशा नव्हे हिरा । जीव नव्हे सोइरा । बोळवीजे स्वइच्छेनें९ मांय नव्हे द्वारावती । रणसोड नव्हे मूर्ति । तीर्थ नव्हे गोमती । मोक्ष घडे दर्शनें ॥१०॥ कृष्ण नव्हे भोगी । शंकर नव्हे जोगी । तुका पांडुरंगीं । हा प्रसाद लाधला ११

वासुदेव ॥ ३७७ ॥

मनु राजा एक देहपुरी । असे नांदतु त्यासी दोघी नारी । पुत्रसंपन्न भारी । तेणें कृपा केली आम्हांवरी गा ॥ १॥ ह्मणऊनी

आलों या देशा । होतों नाहीं तरी भुललों दिशा । दाता तोची मज भेटला इच्छा । येउनि मारग दाविला सरिसा गा ॥२॥ सर्व घेउनि चौघेजण । आला कुमर सुलक्षण । कडे मुकलूनि कांदयण । ऐका आणिलीं तीं कोण कोण गा ॥ ३ ॥ पुढें भक्तिनें धरिलें हातीं । मागें ज्ञान वैराग्य धर्म येती । स्थिर केलीं जीं आचपळें होतीं । सिद्ध आणुनि लाविती पंथीं गा ॥ ४ ॥ केले उपकार सांगों काय । बाप न करी ऐसी माय । धर्में त्याच्या हे देखियेले पाय । दिलें अभय दान अक्षय गा ॥५॥ होतों पीडत हिंडतां गांव । पोट भरे ना रहावया ठाव । तो येणें अवघा संदेह । ह्मणे फेडियेला तुकयाचा बांधव गा ॥६

॥ ३७८ ॥

गातों वासुदेव मी ऐका । चित्त ठेवुनि ठायीं भाव एका । डोळे झांकुनि रात्र करूं नका । काळ करितो घेघलाचे लेखा गा ॥१॥ राम राम स्मरा आधीं । लाहो करा गांठ घाला मूळबंदीं । सांडा वाउगिया उपाधी । लक्ष लावुनि राहा गोविंदीं गा ॥२॥ अल्प आयुष्य मानवी देह । शत गणिलें तें अर्ध रात्र खाय । पुढें बाल्यत्व पीडा रोग क्षय । काय भजनासी उरलें तें पाहें गा ॥३॥ क्षणभंगुर नाहीं भरंवसा । व्हा रे सावध सोडा माया आशा । कांहीं नच्हले मग गळा पडेल फांसा । पुढें हुशार थोर आहे ओळसा गा ॥ ४ ॥ कांहीं थोडें बहुत लागपाठ । करा भक्तिभाव धरा बळकट । तन मन ध्यान द्या लावुनिया नीट । जरी करणें असेल गोड शेवट गा ॥ ५ ॥ विनवितों सकळां जना । कर जोडुनि थोरा लहाना । दान इतुकेंचि द्या मज दीना । ह्मणे तुकया बंधु राम ह्मणा गा ॥६॥

॥ ३७९ ॥

गेले टळले पहार तीन । काय निदसुरा निजलेति अज्ञान । जागा होउनि कांहीं करा दान । नका झाकूं ऐकोनी लोचन गा ॥ १ ॥ हरे राम कृष्णा । वासुदेव जाणावितसे जना । चिपळ्या टाळ हातीं विणा । मुखीं घोष नारायणा गा ॥२॥ जें टाकेल कोणी कांहीं । फळ पुष्प अथवा तोयी । द्या परी मीस घेऊं नका भाई । पुढें विन्मुख होतां बरें नाहीं गा ॥३॥ देवाकारणें भाव तस्मात । द्यावें नलगे फारसें वित्त । झालें एक तिळ तरी बहुत । तेवढ्यासाठीं नका करूं घातहात गा ॥ ४ ॥ आलों येथवरी बहु सायासें । करितां दान हेंचि मागतसें । नका भार घेऊं करूं निरास । धर्म सारफळ संसारास गा ॥ ५ ॥ आतां मागुता येईल फेरा । हें तों न घडे या नगरा । ह्मणे तुकयाबंधु भाव धरा । ओळखी नाहीं तरी आक सबोरा गा ॥६

॥ ३८० ॥

राम नाम दोनी अक्षरें । सुलभ आणि सोपारें । जागा मागि-लिया पाहारें । सेवटींचें गोड तेंचि खरें गा ॥ १ ॥ रामकृष्ण वासुदेवा । जाणवी जनासी वाजवी चिपाळिया । टाळ घागऱ्या घोष रामकृष्णवासुदेवा २ गाय वासुदेव वासुदेवा । भिन्न नाहीं आणिका नांवा । दान जाणोनिया करी हावा । न ठेवीं उरीं कांहीं ठेवा गा ॥ ३ ॥ एक वेळा जाणविती । धरूनियां राहा चित्तीं । नेत्रे भार सांडीं कामा हातीं । नीज घेऊनीया फिरती गा ॥ ४ ॥ सुपात्रीं सर्व भाव । मी तों सर्व वासुदेव । जाणती कृपाळु संत महानुभाव । जंया भिन्न भेद नाहीं ठाव गा ५ शूर दान जीवें उदार । नाहीं वासु-देवीं विसर । कीर्ति वाढे चराचर । तुका ह्मणे तया नमस्कार गा ॥ ६

॥ ३८१ ॥

बोल बोले अबोले । जागे बाहेर आंत निजेले । कैसें घरांत घरकुल केलें । नेणों अंधार ना उजेडलें गा ॥ १ ॥ वासुदेव करितो फेरा । वाडियांत बाहेर दारा । कोणी कांहीं तरी दान पुण्य करा । जाब न द्याल तरी जातों माघारा गा ॥२॥ हातीं टाळ दिंडी मुखीं नाम गाणें । गजर होतो बहु मोठ्यानें । नाहीं निवडिलीं थोर-लहानें । नका निजों भिकेच्या भेणें गा ॥ ३ ॥ मी वासुदेव त-त्वता । कळों येईल विचारितां । आहे ठाउका सभाग्य संतां । नाहीं दुजा आणीक मागता गा ॥ ४ ॥ काय जागाचि निजलासी । सुनें जागवूनि दारापासीं । तुझ्या हितासाठीं करी वसवसी । भेटी न घेसी वासुदेवासी गा ॥ ५ ॥ ऐसें जागविलें अवघें जन । होतें संचित तिहीं केलें दान । तुका म्हणे दुबळीं कोण कोण । गेलीं वासुदेवा विसरून गा ॥ ६ ॥

॥ ३८२ ॥

रामकृष्ण गीती गात । टाळ चिपळ्या वाजवीत । छंद आपुलिया नाचत । नीज घेऊनी फिरत गा ॥ १ ॥ जनीं वनीं अवघा देव । वासनेचा पुसावा ठाव । मग वोळगतो वासुदेव । ऐसा मनीं वसूं द्यावा भाव गा ॥ २ ॥ निज नामाची थोर आवडी । वासुदेवासी लागली गोडी । मुखीं नाम उच्चारी घडोघडीं । ऐसी करा हे वा-सुदेव जोडी गा ॥ ३ ॥ अवघा सारूनी शेवट झाला । प्रयत्न न चले कांहीं केला । जागा होई सांडुनि झोपेला । दान देई वासुदे-वाला गा ॥४॥ तुका म्हणे रे धन्य त्याचें जिणें । जींहीं घातलें वासु-देवा दान । तया नलगे येणें जाणें । झालें वासुदेवीं राहणें गा ॥ ५ ॥

पांगुळ. ॥ ३८३ ॥

पांगुळ झालों देवा । नाहीं हात ना पाय । बैसलों अगाचरी । सैराट तें जाय । खेटितां कुप कांटी । खुंट दरडी न पाहे । आधार नाहीं कोणि । मज बाप ना माये ॥१॥ दाते हो दान करा । जातें पंढरपुरा । न्या मज तेथवरी अनाथाच्या सोयरा ॥२॥ हिंडतां गव्हांचे गा । शिणलों येरझारीं । न मिळेचि दाता कोणी । जन्म दुःख निवारी । कीर्ति हे संतां मुखीं । तोचि दाखवा हरी । पांगुळां पाय देतो । नांदे पंढरपुरीं ॥३॥ या पोटाकारणें गा । झालों पांगिला जना । न सरेचि मायबाप । भिके नाहीं खंडणा । पुढारा ह्मणती एक । तया नाहीं करुणा । श्वान हे लागे पाठीं । आशा बहु दारुणा ॥४॥ काय मी चुकलों गा । मागें नेणवेचि कांहीं । न कळेचि पापपुण्य । येथें आठव नाहीं । मी माझी भुललों गा । दीप पतंगासोई । त्या मज जीवदान । संत महानुभाव कांहीं ॥ ५ ॥ दुरोनि आलों मी गा । दुःख झालें दारूण । यावया येथवरी । होतें हेंचि कारण । दुर्लभ भेटी तुम्हां । पायीं झालें दरुषन । विनवितो तुका संतां । दोन्ही कर जोडून ॥६॥

॥ ३८४ ॥

देश वेष नव्हे माझा । सहज फिरत आलों । करूं सत्ता कवणावरी । कोठें स्थिर राहिलों । पाय डोळे ह्मणतां माझे । तिहीं कैसा मोकलिलों । परदेशी नाहीं कोणी । अंध पांगुळ झालों ॥ १ ॥ आतां माझी करी चिंता । दान देईं भगवंता । पाठी पोटीं नाहीं कोणी । निरवीं सज्जन संतां ॥२॥ चालतां वाट पुढें । भय वाटतें चित्तीं । बहुत जणें गेलीं । नाहीं आलीं मागुती । न देखें काय झालें । कानें तरी ऐकती । बैसलों संधिमार्गी । नुज धरूनि चित्तीं ॥३॥ भाकितों करुणा गा । जैसा सांडिला ठाव । न भरे पोट कधीं । नाहीं निश्चळ पाव । हिंडतां भागलों गा । लक्ष चौऱ्यांशीं गांव । धरूनी राहिलों गा । हाचि वसता ठाव ॥४॥ परतंत्रा काय आतां । कोण आणी अवचिता । तैशीच झाली कीर्ति । तया मज बहुतां । ह्मणऊनी मारिं हाका । सांयी पावे पुण्यवंता । लागली भूक थोरी । तोचि कृपाळु दाता ॥५॥ संचित सांडवलें । कांहीं होतें तें जवळी । भिन्न गोत पुत माया । मुद्ली हे लागावळी । निष्काम झालों देवा । होतें माझे कपाळीं । तुका ह्मणे तूंचि आतां । माझा सर्वस्वें बळी ॥ ६ ॥

आंधळा ॥ ३८५ ॥

देखत होतों आधीं । मागें पुढें सकळ । मग हे दृष्टि गेली । वरी आलें पडळ । तिमिर कोंदलेंसें । वाढे वाढतां प्रबळ । भीत मी

झालों देवा । काय जाल्याचें फळ ॥ १ ॥ आतां मज दृष्टि देईं । पांडुरंगा मायबापा । शरण आलों आतां । निवारूनिया पापा । अंजन लेववूनी । करी मारग सोपा । जाईन सिद्धपंथें । अवघ्या चुकतील खेपा ॥ २ ॥ होतसे खेद चित्ता । कांहीं नाठवे विचार । जात होतों जनामागें । तोही सांडिला आधार । हा ना तोसा ठाव झाला । अवघा पडिला अंधार । फिरलीं माझीं मज । कोणी न देती आधार ॥ ३ ॥ जंववरी चळण गा । तोंवरी ह्मणती माझा । मानिती लहान थोर । देहसुखाच्या काजा । इंद्रियें मावळलीं । आला बागुल आजा । कैसा विपरीत झाला । तोचि देह नव्हे दुजा ॥ ४ ॥ गुंतलों या संवसारें । कैसा झालोंसे अंध । मी माझें वाढवूनी । मायातृष्णेचा बाध । स्वहित न दिसेचि । केला आपुला वध । लागले काळ पाठीं । सवें काम हे क्रोध ॥ ५ ॥ लागती चालतां गा । गुणदोषाच्या ठेसा । सांडिली वाट मार्ग । झालों निराळा कैसा । पाहातों वाट तुझी । थोर करूनी आशा । तुका ह्मणे वैद्यराजा । पंढरीच्या निवासा ॥ ६ ॥

॥ ३८६ ॥

सहज मी आंधळा गा । निजनिराकार पंथें । वृत्ति हे निवृत्ति झाली । जन न दिसे तेथें । मी माझें हारपलें । ठायीं जेथींच्या तेथें । अदृश्य तेंचि झालें । कांहीं दृश्य जें होतें ॥ १ ॥ सुखी मी निजलों गा । शून्य सारूनी तेथें । त्रिकुटशिखरीं गा । दान मिळे आइतें ॥ २ ॥ टाकिली पात्र झोळी । धर्म अधर्म आशा । कोल्हाळ चुकविला । त्रिगुणांचा ओळसा । न मागे मा भीक आतां । हाचि झाला भरंवसा । ओळली सत्रावी गा । तिनें पुरविली इच्छा ॥ ३ ॥ उर्ध्व-मुखें आळविला । सोहं शब्दाचा नाद । अरूप जागविला । दाता घेऊनी छंद । घेऊनी आला दान । निजतत्व निजबोध । स्वरूपीं मेळविलें । नांव ठेविला भेद ॥ ४ ॥ शब्द हा वहुसार । उपकाराची राशी । ह्मणोनि चालविला । मार्गे येतील त्यासी । मागोनि आली वाट । सिद्ध ओळीची तैसी । तरले तरले गा । आणिक ही विश्वासी ॥ ५ ॥ वर्म तें एक आहे । दृढ धरावा भाव । जाणीव नागवण । लागो नेदी ते ठाव । ह्मणोनि संग टाकी । सेवी अद्वैत भाव । तुका ह्मणे हाचि संतीं । मार्ग केला उपाव ॥ ६ ॥

॥ ३८७ ॥

आंधळ्या पांगळ्यांचा । एक विठोबा दाता । प्रसवला विश्व तोचि । सर्व होय जाणता । घडी मोडी हेळामात्रें । पापपुण्य

संचिता । भवदुःख कोण वारी । तुजवांचुनि चिंता ॥ १ ॥ धर्म गा जागो तुझा । तूंचि कृपाळु राजा । जाणसी जिवींचे गा । न सांगतां सहजा ॥ २ ॥ घातली लोळणी गा । पुंडलीकें वाळवंटीं । पंढरी पुण्य ठाव । नीरे भीवरे तटीं । न देखें दुसरें गा । झाली अदृश्य-दृष्टि । बोळला प्रेमदाता । केली अमृतवृष्टि ॥ ३ ॥ आणीक उपमन्यु । एक बाळ धाकुटें । न देखे न चलवे । जना चालते वाटे । घातली लोळणी गा । हरिनाम बोभाटें । पावला त्याकारणें । धांव घातली नेटें ॥ ४ ॥ बैसोनी खोळी शुक । राहे गर्भी आंधळा । शीणला येर-झारी । दुःख आठवी वेळा । मागील सोसिलें तें । ना मी म्हणे गोपाळा । पावला त्याकारणें । लाज राखिली कळा ॥ ५ ॥ न देखि जो या जना । तया दावी आपणा । धगळा सुखदुःखा । मांडी नाठवी धना । आपपर तेंही नाहीं । बंधुवर्ग सज्जना । तुकया तेचि परी । झाली पावे नारायणा ॥ ६ ॥

॥ ३८८ ॥

भगवंता तुज कारणें । मेलों जीतांचि कर्मी । निष्काम बुद्धि ठेली । चळण नाहीं तयासी । न चलती हात पाय । दृष्टि फिरली कर्मी जाणतां न देखों गा । क्षर आणि अक्षरासी ॥१॥ थिओवा दान दे गा । तुझ्या सारिखें नामा । कीर्ति हे वाखाणिली । थोर वाढली सीमा ॥२॥ भुक्ति मुक्ति तूंचि एक । होसि भिकारियांचा दाता । म्हणोनि मांडली । शोक भय लज्जा चिंता । सर्वस्वें त्याग केला । धांव घातली आतां । कृपावान देईं देवा । येऊनि सामोरा आतां ॥३॥ संसारसागर गा । भवदुःखाचें मूळ । जनवाद अंथरुण । माजी केलें इंगळ । इंद्रियें वज्रघातें । तपे उष्ण धरी जाळ । सोसिलें काय करूं । भूमि हे वां डाळ ॥४॥ निर्हा लोकीं तुझें नाम । वृक्ष पल्लव शाखा । मेघलों थोर खोडा । भाव धरूनी टेका । जाणवी नरनारी । जागो धर्म लोकां । पावती पुण्यवंत । सोई आमुच्या हाका ॥५॥ नाठवे आपपर । आतां काय या करूं । सारिखा दोहींमध्या । हारपला विचारु । घातलो योगक्षेम । तुज आपुला भारु । तुकया शरणागतां । देईं अभयकरु ॥६॥

एकाखडी.

॥ ३८९ ॥

करावा कैवाड । नाहीं तरी आला नाड ॥ १ ॥ स्मरा पंढरीचा देव । मनीं धरोनियां भाव ॥ २ ॥ अवघिलें काळें । उगवा जव-ळाहे आळें ॥ ३ ॥ गजर नामाचा । करा लवलाहे वाचा ॥ ४ ॥

बरटी चक्रफेरा । जन्ममृत्यूचा भोंवरा ॥ ५ ॥ नानाहव्यासांची जोडी । तृष्णा करी देशधडी ॥ ६ ॥ चरणीं ठेवा चित्त । ह्मणवा देवाचे अंकित ॥ ७ ॥ छंद नानापरी । कळा न पविजे हरी ॥ ८ ॥ जगाचा जनिता । भुक्तिमुक्तींचाही दाता ॥ ९ ॥ ह्मणी माझें माझें । भार वागविसी ओझें ॥ १० ॥ यांची कां रे गेली बुद्धि । नाहीं तरायाची शुद्धि ॥११॥ टणक धाकुलीं । अवघीं सरती विठ्ठलीं ॥१२ ठसा त्रिभुवनीं । उदार हा शिरोमणी ॥ १३ ॥ डगमगी तो वांया जाय । धीर नाहीं गोता खाय ॥ १४ ॥ ढळों नये जरी । लाभ घरींचिया घरीं ॥ १५ ॥ नाहीं ऐसें राहे । कांहीं नास्तिवंत देहे ॥१६॥ तरणा भाग्यवंत । नटे हरिकीर्तनांत ॥ १७ ॥ थडी टाकी पैलतीर । बाहे ठोके होय वीर ॥ १८ ॥ दया तिचें नांव । अहंकार जाय जंव ॥ १९ ॥ धनधान्य हेवा । नाडे कुटुंबाची सेवा ॥ २० ॥ नाम गोविंदाचें । घ्या रे हेंचि भाग्य साचें ॥ २१ ॥ परउपकारा । वेंचा शक्ति निंदा वारा ॥ २२ ॥ फळ भोग इच्छा । देव आहे जैसा तैसा ॥ २३ ॥ बरवा ऐसा छंद । वाचे गोविंद गोविंद ॥ २४ ॥ भविष्याचे माथां । भजन न द्यावें सर्वथा ॥ २५ ॥ माग लागला न संडी । आळसें माती घाली तोंडीं ॥ २६ ॥ यश कीर्ति मान । तरी जोडे नारायण ॥ २७ ॥ रवि लोपे तेजें । जरी हारपे हें दुजें ॥२८॥ ळकार लाविला । असतां नसतांचि उगला ॥२९॥ वासनेची धाडी । बंद खोड्या नाड्या बेडी ॥ ३० ॥ सरतें न कळे । काय झांकियेले डोळे ॥ ३१ ॥ खंती ते न धरा । होणें गाढव कुतरा ॥३२॥ सायासाच्या जोडी । पिकें काढियेल्या पेडी ॥ ३३ ॥ हातीं हित आहे । पारे न करिसी पाहें ॥ ३४ ॥ अळंकार लेणें । ल्यारे तुळसी मुद्रा भूषणें ॥३५॥ ख्याति केली विष्णुदासीं । तुका ह्मणे पाहा कैसी ॥३६॥

ओव्या.

॥ ३९० ॥

पांडुरंगा करूं प्रथम नमन । दुसरें चरणा संतांचिया ॥ १ ॥
त्याच्या कृपादानें कथेचा विस्तारू । बायाजीसद्गुरुदास तुका ॥ २ ॥
काय माझी वाणी मानेल संतांसीं । रंजवूं चित्तासी आपुलिया ॥३॥
या मनासी लागो हरिनामाचा छंद । आवडी गोविंद गावयासी ॥४
सीण झाला मज संसारसंभ्रमें । सीतळ या नामें झाली काया ॥ ५ ॥
या सुखा उपमा नाहीं द्यावयासी । आलों आकारासी निर्विकार ६
नित्य धांवे तेथें नामाचा गजर । घोष जयजयकार आईकतां ॥७॥

तांतडी ते काय हरिगुण गाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥ ८ ॥
मूळ नरकाचें राज्य मदें माते । अंतरे बहुत देव दुरी ॥ ९ ॥
दुरी अंतरला नामनिंदकासी । जैसें गोचिडासी क्षीर राहे ॥ १० ॥
हे वाट गोमटी वैकुंठासी जातां । रामकृष्णकथा दिंडी ध्वजा ॥११
जाणते तयांनीं सांगितलें करा । अहंतेसी वारा आड्रनिया ॥ १२ ॥
यांसी आहे ठावें परि अंध होती । विषयाशीं बैती वाटे जना ॥१३॥
नाहीं त्या सुटलीं द्रव्य लोभ माया । भस्म दंड छाया तरुवराची १४
चित्त ज्याचें पुत्रपत्नीबंधूवरी । सुटेल हा परि कैसा जाणा ॥ १५ ॥
जाणते नेणते करा हरिकथा । तराल सर्वथा भाक माझी ॥ १६ ॥
माझी मज असे घडली प्रचित । नसेल पतित ऐसा कोणी ॥ १७ ॥
कोणी तरी कांहीं केलें आचरण । मज या कीर्तनेवीण नाहीं ॥ १८ ॥
नाहीं भय भक्ता तराया पोटाचें । देवासि तयाचें करणें लागे ॥१९॥
लागे पाठोवाटी पाहे पायांकडे । पीतांबरें खडे वाट झाडी ॥ २० ॥
डिंकोनियां काय राहिले हे लोक । हेचि कवतुक वाटे मज ॥ २१ ॥
जयानें तारिले पाषाण सागरीं । तो ध्यारे अंतरीं स्वामी माझा ॥२२॥
माझिया जीवाची केली सोडवण।ऐसा नारायण कृपाळु हा ॥ २३ ॥
हाचि माझा नेम हाचि माझा धर्म।नित्य वाचे नाम विठोबाचें ॥२४॥
चेतवला अग्नि तापत्रयज्वाळ । तो करी शीतळ रामनामें ॥ २५ ॥
मना एक करी दृढ चित्तीं धरी । तारील श्रीहरि मायबाप ॥ २६ ॥
बाप हा कृपाळु भक्तां भाविकांसी । घरीं होय दासी कामारी त्या २७
त्याचा भार माथां चालवी आपुला । जिहीं त्या दिधला सर्व भाव२८
भावेंविण जाणा नाहीं त्याची प्राप्ति। पुराणें बोलती ऐसी मात ॥२९॥
मात त्याची जया आवडे जीवासी । तया गर्भवासी नाहीं येणें ॥३०॥
यावें विष्णुदासीं तरीच गर्भवासीं । उद्धार लोकांसी पूज्य होती ३१
होती आवडते जीवाचे ताईत । त्यां घडी अच्युत न विसंबे ॥ ३२ ॥
भेदाभेद नाहीं चिंता दुःख कांहीं । वैकुंठ त्या ठायीं सदा वसे ॥३३॥
वसे तेथें देव सदा सर्वकाळ । करिती निर्मळ नामघोष ॥ ३४ ॥
संपदा तयांची न सरे कल्पांतीं । मेळविला भक्तीं देवलाभ ॥ ३५ ॥
लाभ तया झाला संसारा येऊनी । भगवंत ऋणी भक्तीं केला ॥३६
लागलेंसे पिसें काय मूढ जना । काय नारायणा विसरलीं ॥ ३७ ॥
विसरलीं तयां थोर झाली हानी । पचतील खाणी चौऱ्यासीच्या॥३८
शिकवितां तरी नाहीं कोणा लाज । लागलीसे भाज धन गोड॥३९॥
गोड एक आहे अविट गोविंद । आणिक ते छंद नाशिवंत ॥ ४० ॥
तळमळ त्याची कांहीं तरी करा । कां रे निदसुरा बुडावया ॥ ४१ ॥

या जनासी भय यमाचें कां नाहीं । सांडियेलीं तिहीं एकराज्यें ॥ ४२ ॥
जेणें अग्निमाजीं घातला हे पाव । नेणता तो राव जनक होता ॥ ४३ ॥
तान भूक जिहीं साहिलें आघात । तया पाय हात काय नाहीं । ४४ ॥
नाहीं ऐसा तिहीं केला संवसार । दुःखाचे डोंगर तोडावया ॥ ४५ ॥
याची जन्में घडे देवाचें भजन । आणिक हें ज्ञान नाहीं कोठें ॥ ४६ ॥
नाहीं पुढें कोठें घ्यावया विसांवा । फिरोनिया गांवा आल्याविण ४७
विनविता दिवस बहुत लागती । म्हणुनिया चित्तीं देव धरा ॥४८॥
धरा पाय तुम्ही संतांचे जीवेंसी । वियोग देवाशीं तया नाहीं ॥४९॥
नाहीं चाड देवा आणीक सुखाची । आवडी नामाची त्याची तया ५०
त्याचींच उच्छिष्ट बोलतों उत्तरें । सांगितलें खरें व्यासादिकीं ॥५१॥
व्यासा सांगितलें भक्ति हेंचि सार । तरावया पार भवसिंधु ॥ ५२ ॥
तरावया जना केलें भागवत । गोवळ गोपी भक्त माता पिता ॥५३॥
तारूनिया खरें नेली एकसरें । निमित्त उत्तरें ऋषीचिया ॥ ५४ ॥
यासी वर्म ठावें भक्त तरावया । जननी बाळ माया राखे तान्हें ५५
तान्हेलें भुकेलें म्हणे वेळोवेळां । न मागतां लळा जाणोनियां ॥५६॥
जाणोनियां वर्म देठ लाबियेला । द्रौपदीच्या बोलासवें धांवे ॥५७॥
धांवे सवेताने धेनु जैसी वत्सा । भक्तांलागीं तैसा नारायण ॥ ५८॥
नारायण व्हावा हे हांव जया जीवा । धन्य त्याच्या दैवा पार नाहीं५९
पार नाहीं सुखा तें दिलें तयासी । अखंड वाचेसी रामराम ॥६०॥
रामनाम दोनी उत्तम अक्षरें । भवानीशंकरें उपदेशिली ॥ ६१ ॥
उपदेश करी विश्वनाथ कानीं । वाराणशी प्राणी मध्यें मरे ॥ ६२॥
मरणाचे अंतीं राम म्हणे जरी । न लगे यमपुरी जावें तया ॥६३॥
तयासी उत्तम ठावपै वैकुंठीं । वसे नाम कंठीं सर्वकाळ ॥ ६४ ॥
सर्वकाळ वसे वैष्णवांचे घरीं । नसे क्षणभरी स्थिर कोठें ॥ ६५ ॥
कोठें नका पाहों करा हरिकथा । तेथें अवचिता सांपडेल ॥ ६६ ॥
सांपडे हा देव भाविकांचे हातीं । शाहाणे मरती तरी नाहीं ॥६७॥
नाहीं भक्ति भली केलियावांचूनी । अहंता पापिणी नागवण ॥६८॥
नागवला म्हणे देव मी आपणा । लाभ दिला जना ठकला तो ॥६९॥
तोचि देव येर नव्हे ऐसें कांहीं । जनार्दन ठायीं चहूं खाणी ॥७०॥
खाणी भरूनियां राहिलासे आंत । बोलावया मात ठाव नाहीं ॥७१॥
ठाव नाहीं रिता कोणी देवाविण । ऐसी ते सज्जनसंतवाणी ॥७२॥
वाणी बोलूनियां गेले एक पुढें । तयासी वांकडें जातां ठके ॥७३॥
ठकला नाहीं अर्थ ठाउका वेदांचा । होऊनी भेदाचा दास ठेला ७४
दास ठेला पोट अर्थ दंभासाठीं । म्हणउनि तुटी देवासवें ॥ ७५ ॥

सर्वे देव द्विजातीही दुराविला । आणिकांचा आला कोण पाड ७६
पाड करूनिया नागविले फार । पंडित व्यवहार खळवादी ॥ ७७ ॥
वादका निंदका देवाचें दर्शन । नव्हे झाला पूर्ण षडकर्मी ॥ ७८ ॥
षडकर्मी हीन रामनाम कंठीं । तयासवें भेटी सत्य देवा ॥ ७९ ॥
देवासी आवडे भाविक जो भोळा । शुद्ध त्या चांडाळा करनि मानी ८०
मानियेला नाहीं उधार या बोला । नाम घेतां मला युक्ति थोडी ८१
युक्ति थोडी मज दुर्बळाची वाचा । प्रताप नामाचा बोलावया ८२
बोलतां पांगल्या श्रुति नेति नेति । खुंटलिया युक्ति पुढें त्यांच्या ८३॥
त्यांचा पार पुढें न कळेचि जातां । पाउलें देखतां ब्रह्मादिकां ॥८४॥
काय भक्तिपिसें लागलें देवासी । इच्छा ज्याची जैसी तैसा होय ८५
होय हा सगुण निर्गुण आवडी । भक्तिप्रिय गोडी फेडावया ॥८६॥
मायबापा बाळ बोले लाडें कोडें । करनी वांकुडें मुख तैसें ॥ ८७॥
तैसें याचकाचें समाधानदाता । होय हा राखता सत्वकाळीं ८८॥
सत्वकाळीं कामा न येती आयुधें । सोयरीं संबंधें सैन्यलोक ॥८९॥
सैन्यलोक तया दाखवी प्रताप । लोटला हा कोप कोपावरी ॥९०॥
कोपा मरण नाहीं शांत होय त्यासी । प्रमाण भल्यासी सत्वगुण ९१
सत्वरजतम आपण नासती । करितां या भक्ति विठोबाची ॥९२॥
चित्त रंगलिया चैतन्यचि होय । तेथें उणें काय निजसुखा ॥९३॥
सुखाचा सागर आहे विटेवरी । कृपादान करी तोचि एक ॥ ९४ ॥
एक चित्त धरूं विठोबाचे पायीं । तेथें उणें कांहीं एक आम्हां ९५
आम्हांसी विश्वास त्याचिया नामाचा । म्हणउनि वाचा घोष करूं ९६
करूं हरिकथा सुखाची समाधि । आणिकाची बुद्धि दुष्ट नासे ९७
नासे संवसार लोकमोहो माया । शरण आलां या विठोबासी ९८॥
शिकविलें मज मूढा संतजनीं । दृढ या वचनीं राहिलोंसें ॥९९॥
राहिलोंसें दृढ विठोबाचे पायीं । तुका म्हणे कांहीं नव्हे आतां १००

॥ ३०१ ॥

गाईन ओंविया पंढरीचा देव । आमुचा तो जीव पांडुरंग ॥ १ ॥
रंगलें हें चित्त माझें तया पायीं । म्हणुनिया घेई हाचि लाहो ॥२॥
लाहो करीन मी हाचि संवसारीं । राम कृष्ण हरि नारायण ॥ ३ ॥
नारायण नाम घालितां तुकासी । न येती या रासी तपतीर्थें ॥ ४ ॥
तीर्थें मार्या रज वंदिती संतांचे । जे गाती हरीचे गुणवाद ॥ ५ ॥
गुणवाद ज्याचे गातां पूज्य झाले । वाडियार बोले कोण त्यांचा ॥६॥
त्याचा पार नाहीं कळला वेदांसी । आणीक ही ऋषि विचारितां ॥७
विचारितां तैसा होय त्यांच्या भावें । निजसुख ठावें नाहीं कोणा ॥८॥

कोणा कवतुक न कळे हे माव । निजलिया जीव करी धंदा ॥ ९ ॥
करूनि कवतुक खेळे हाचि लीळा । व्यापूनि वेगळा पाहातसे ॥ १० ॥
शेवटीं आपण वेगळाची खरा । सोंग हा पसारा नट केला ॥ ११ ॥
लावियेला चाळा मीपणें हें जन । भोग तया कोण भोगवितो ॥ १२ ॥
विषयीं गुंतलीं विसरलीं तुज । कन्या पुत्र भाज धनलोभें ॥ १३ ॥
लोभें गिळी फांसा आमिषाचे आशा । सांपडोनी मासा तळमळी १४
तळतळ त्याची तरीच शमेल । जरी हा विठ्ठल आठविती ॥ १५ ॥
आठवे तरी देव संतांच्या सांगातें । किंवा हें संचित जन्मांतर १६
जन्मांन्तरें तीन भोगितां कळती । केलें ते पावती करितां पुढें ॥ १७ ॥
पुढें जाणोनिया करावें संचित । पूजावे अतीत देव द्विज ॥ १८ ॥
जन्म तुटे ऐसें नव्हे तुह्मां जना । पुढिल्या पावना धर्म करा ॥ १९ ॥
करा जप तप अनुष्ठान याग । संतीं हे मारग स्थापियेले ॥ २० ॥
लावियेलीं कर्में शुद्ध आचरणें । कोणा एका जन्में केले पावे ॥ २१ ॥
पावलें सत्वर निष्काम उदार । जिंकिली अपार वासना हे ॥ २२ ॥
वासनेचें मूळ छेदिल्यावांचून । तरलोंसें कोणी न ह्मणावें ॥ २३ ॥
न म्हणावें झाला पंडित वाचक । करुनि मंत्रघोष अक्षरांचा २४ ॥
चाळविलीं एकें तेचि आवडीनें । लोक दंभमानें देहसुखें ॥ २५ ॥
सुख तरीच घडे भजनाचें सार । वाचे निरंतर रामराम ॥ २६ ॥
राम हा उच्चार तरीच बैसे वाचे । अनंता जन्मांचें पुण्य होय २७ ॥
पुण्य ऐसें काय रामनामापुढें । काय ते बापुडे यागयज्ञ ॥ २८ ॥
यागयज्ञ तप संसारदायकें । न तुटती एके नामेंविण ॥ २९ ॥
नामेंविण भवसिंधु पावे पार । ऐसा हा विचार नाहीं दुजा ॥ ३० ॥
जाणती हे भक्तराज महामुनि । नाम सुखधणी अमृताची ॥ ३१ ॥
अमृताचें सार निज तत्त्व बीज । गुह्याचें तें गुज रामनाम ॥ ३२ ॥
नामें असंख्यात तारिले अपार । पुराणीं हें सार प्रसिद्ध हे ॥ ३३ ॥
हेंचि सुख आम्ही घेऊं सर्वकाळ । करूनी निर्मळ हरिकथा ॥ ३४ ॥
कथाकाळीं लागे सकळा समाधि । तात्काळ हे बुद्धि दुष्ट नासे ३५
नासे लोभ मोहो आशा तृष्णा माया । गातां गुण तया विठोबाचे ३६
विठोबाचे गुण मज आवडती । आणीक हे चित्तीं नलगे कांहीं ३७
कांहीं कोणी नका सांगों हा उपाव । माझ्या मनीं भाव नाहीं दुजा ३८
जाणोनियां आह्मी दिला जिवभाव । दृढ याचे पाय धरियेले ॥ ३९ ॥
धरियेले आतां न सोडीं जीवेसीं । केला हा शेवटीं निरधार ॥ ४० ॥
निरधार आह्मी राहिलों या नेटीं । संसार तुटी करूनिया ॥ ४१ ॥
येणें अंगीकार केला पांडुरंगें । रंगविलों रंगें आपुलिया ॥ ४२ ॥

आपुली पाखर घालूनिया वरी । आह्मांसी तो करी यत्न देव ॥४३॥
देव राखे तया आणिकांचें काय । करितां उपाय चाले तेथें ॥४४॥
तेथें नाहीं रिघ कळिकाळासी येतां । दास ह्मणवितां विठोबाचे ॥४५॥
विठोबाचे आह्मी लाडके डिंगर । कांपती असुर काळ धाके ॥ ४६ ॥
धाक तिहीं लोकीं जयाचा दरारा । स्मरण हें करा त्याचें तुह्मी ॥४७॥
तुह्मी निदसुर नका राहूं कोणी । चुकवा जाचणी गर्भवास ॥ ४८ ॥
गर्भवासदुःख यमाचें दंडण । थोर होय शिण येतां जातां ॥ ४९ ॥
तान भूक पीडा जीतां हे आघात । मेल्या यमदूत जाच करी ॥५०॥
जाच करिती हे ह्मणसी कोणा ठायें । नरकीं कौरवें बुडी दिली ॥५१॥
बुडी दिली कुंभपाकीं दुर्योधनें । दाविना लाजेनें मुख धर्मा ॥ ५२ ॥
धर्म हा कृपाळु असासे जवळी । बैसला पाताळीं वरी नये ॥ ५३ ॥
न ये वरी कांहीं करितां उपाव । भोगवितो देव ज्याचें त्यासी ॥ ५४ ॥
त्यांसी अभिमान गर्व या देहाचा । नुच्चारिती वाचा नारायण ॥ ५५ ॥
नारायण जे विसरले संवसारीं । तयांसी अघोरीं वास सत्य ॥ ५६ ॥
सत्य मानूनिया संतांच्या वचना । जा रे नारायणा शरण तुम्ही ॥५७॥
तुम्ही मानूं नका कोणी हा विश्वास । पुत्र पत्नी आस धन वित्त ॥५८॥
धन वित्त लोभ माया मोहपाश । मांडियेले फांसे यमदूतीं ॥ ५९ ॥
दूतीं याच्या मुखा केलेंसे कुडण । वाचे नारायण येऊं नेदी ॥६०॥
नेदी शुद्धबुद्धि आतळों चित्तासी । नाना कर्मे त्यासी दुरावली ॥६१॥
दुराविलीं एकें जाणतींच फार । निंदा अहंकार वादभेद ॥ ६२ ॥
वादभेद निंदा हे फंद काळाचे । गोवितील वाचे रिकामिक ॥ ६३ ॥
रिकामिक देहा होय नव्हे मना । चिंतेचिया घाणा जुंपियेले ॥ ६४ ॥
शेवटीं हे गळा लाऊनियां दोरी । सांभाळीये करीं वासनेच्या ॥६५॥
वासनेचा संग होय अंतकाळीं । तरी तपोबळी जन्म धरी ॥ ६६ ॥
धरुनिया देव राहतील चित्तीं । आर्धांचिया गति आठवावा ॥६७॥
आठवावा देव मरणाचे काळीं । म्हणउनि बळी जीव दिला ॥६८॥
दिले टाकूनिया भोग ऐश्वर्यो । खाती वनांतरीं कंदमुळें ॥ ६९ ॥
मुळें सुखाचिया देव अंतरला । अल्पासाठीं नेला अधोगति ॥ ७० ॥
गति हे उत्तम व्हावया उपाव । आहे धरा पाय विठोबाचे ॥ ७१ ॥
विठोबाचे पायीं राहिलिया भावें । न लगे कोठें जावें वनांतरा ७२
तरती दुबळीं विठोबाच्या नांवें । संचित ज्या सर्वे नाहीं शुद्ध ७३
शुद्ध तरायाचें काय तें नवल । ह्मणतां विठ्ठल वेळोवेळां ॥ ७४ ॥
वेळकाळ नाहीं कवणाचे हातीं । न कळे हे गति भविष्याची ॥७५॥
भविष्य न सुटे भोगिल्यावांचूनि । संचित जाणोनी शुद्ध करा ७६

करावे सायास आपुल्या हिताचे । येथें आलियाचें मनुष्यपण ७७
मनुष्यपण तरी साधी नारायण । नाहीं तरी हीन पशुहूनी ॥७८॥
पशु पाप पुण्य काय ते जाणती । मनुष्या या रीति ठाउकिया ७९
ठाउके हें असे पाप पुण्य लोकां । देखतील एका भोगितिया ॥८०॥
भोगतील एक दुःख संवसारीं । काय सांगों परी वेगळाल्या ॥८१॥
ल्यावें खावें बरें असावें सदैव । हेचि करी हांव संवसारीं ॥८२॥
संवसारें जन गिळिले सकळ । भोगतील फळें गर्भवासा ॥ ८३ ॥
वासनेचें मूळ छेदिल्यावांचून । नव्हे या खंडन गर्भवास ॥ ८४ ॥
सायास केलियावांचूनी तें नाहीं। भविष्यावरी कांहीं घालूं नये८५
नये बळें धड घालूं कांठ्यावरी । जाये जीवें घरी सर्प हातीं ॥८६॥
हातीं आहे हित करील तयासी । ह्मणउनि ऋषीं सांगितलें ॥८७॥
सांगती या लोकां फजित करूनी । आपण जे कोणी तरले ते ॥८८॥
तेणें वाळवंटीं उभारिला कर । कृपेचा सागर पांडुरंग ॥ ८९ ॥
गंगा चरणीं करी पातकांची धुनी । पाउलें तीं मनीं चिंतिलिया ९०
चिंतनें जयाच्या तरती पाषाण । उद्धरिले चरण लावूनिया ॥ ९१ ॥
लावूनिया टाळी नलगे बैसावें । प्रेमसुख घ्यावें संतसंगें ॥ ९२ ॥
संतसंगें कथा करावें कीर्तन । सुखाचें साधन रामनाम ॥ ९३ ॥
मग कोठें देव जाऊं न सके दुरी । बैसोनी भीतरी राहे कंठीं ॥९४॥
राहे व्यापुनिया सकळ शरीर । आपुला विसर पडो नेदी ॥ ९५ ॥
नेदी दुःख देखों आपुलिया दासा । वारी गर्भवासा यमदूता ॥९६॥
तान भूक त्यासी वाहों नेदी चिंता । दुश्चित हे घेतां नाम होती ॥९७॥
होती जीव त्यांचे सकळ ही जंत । परि ते अंकित संचिताचे ९८ ॥
चेवले जे कोणी देहअभिमानें । त्यासी नारायणें कृपा केली ॥९९॥
कृपाळु हा देव अनाथाकोंवसा। आम्ही त्याच्या आशा लागलोंसें १००
लावियेले आसे येणें पांडुरंगें । तुका ह्मणे संगें संतांचिया ॥ १०१ ॥

त्रोटक चरित्र व त्रोटक प्रकरणें.

शिवावर अभंग ॥ ३९२ ॥

काय धर्म नीत । तुम्हां शिकवावें हित ॥ १ ॥ अवघें रचियेलें हेळा । लीळा ब्रह्मांड सकळा ॥ २ ॥ नाम महादेव । येथें निवडला भाव ॥ ३ ॥ तुका म्हणे वेळे । माझें तुम्हां कां न कळे ॥ ४ ॥

॥ ३९३ ॥

मांडावें तें गोड । पुरे सकळ ही कोड ॥ १ ॥ ऐसा धणींचा या मोळा । ठावा निकटां जवळां ॥ २ ॥ हाक देतां दारीं । येती जवळी सामोरीं ॥ ३ ॥ तुका म्हणे शिवें । मागितलें हातीं द्यावें ॥ ४ ॥

रामचरित्र ॥ ३०४ ॥



पैल आला राम रावणासी सांगती। काय निद्रसुरा निजलासी भूपति ॥ १ ॥ अवघे लंकेमाजी झाले रामाचे दूत। व्यापिलें सर्वत्र बाहेरी भीतरी आंत ॥ २ ॥ अवघे अंगलग तुझे वधियेले वीर। होई शरणागत किंवा युद्धासी सादर ॥ ३ ॥ तुका म्हणे एकाच्या भावें रामासी भेटी। करूनी घेई आतां याया संवंधेशीं तुटी ॥ ४ ॥

॥ ३०५ ॥

समरंगणा आला। रामें रावण देखिला ॥१॥ कैसे भीडतील दोन्ही। नांव सारूनिया रणीं ॥२॥ प्रेमसुखाचें संधान। बाणें निवारती बाण ॥३॥ तुकयास्वामी रघुनाथ। वर्म जाणोनी केली मात ॥ ४ ॥

॥ ३०६ ॥

रामरूप केली। रामें कौसल्या माउली ॥१॥ राम वाल्मिका मानसीं। ध्यानीं चिंतनीं जयासी २ राम होय त्यासी। मंदिर नाहीं अवकाशा ३॥ अयोध्येचे लोक। राम झाले सकळीक ॥ ४ ॥ रामरूप झाले कपि ५ रावणेशीं लंका। राम आपण झाला देखा ॥६॥ ऐसा नित्य राम ध्याय। तुका वंदी त्याचे पाय ॥ ७ ॥

सीताशोक. ॥ ३०७ ॥

[illegible] वनीं सीता शोक करी। कांहो अंतरले रघुनाथ दुरी। येऊनि गुंफेमाजी दुष्टें केली चोरी। कांहो मज अवघड लंकापुरी ॥१॥ सांगा वो त्रिजटे सखिये ऐसी मात। देईल कां नेत्री भेटी रघुनाथ। मन उतावीळ झाला दुरी पंथ। राहों न शके प्राण माझा कुडी आंत २॥

काय दुष्ट आचरण होतें म्यां केलें। तीर्थ व्रत होतें कवणाचें भंगिलें। गाईवत्सा पत्नीपुरुषा विघडिलें। न कळे वो संचित चरण अंतरले ३ नाडियेलें आशा मृगकांति सोनें। धाडिलें रघुनाथा पाठिलागे तेणें। उल्लंघिली आज्ञा माव काय मी जाणें। देखुनो सूना ट घेउनि आलें सुनें ४ नाहीं मूळ मारग लाग अणीका सोये। एकाविण नामें रघुनाथाच्या माये उपटी पक्षिया एक देउनि पाये। उदकवेळ्यामध्यें तेथें चाले काये ५। जनकाची नंदिनी दुःखें ग्लानी थोरी। चुकली कुरंगिणी मेळा तैशापरी। संमोखीत्रिजटास्थिरस्थिरवोकरी। घेईल तुकयास्वामीराम लंकापुरी ६

॥ ३९८ ॥

केला रावणाचा वध अवघा तोडिला संबंध ॥ १ ॥ लंकाराज्य बिभीषणा। केली चिरकाळ स्थापना ॥ २ ॥ औदार्याची सीमा। काय वर्णूं रघुरामा ॥ ३ ॥ तुका म्हणे माझा दाता। रामें सोडविली सीता ॥ ४ ॥

॥ ३९९ ॥

रामा वनवास। तेणें वसे सर्व देश ॥ १ ॥ केलें नामाचें जतन। समर्थ तो नव्हे भिन्न ॥ २ ॥ वनांतरीं रडे। ऐसे पुराणीं पवाडे ॥ ३ ॥ तुका म्हणे ऋषिनेम। ऐसा कळोनी कां भ्रम ॥ ४ ॥

॥ ४०० ॥

रामराम उत्तम अक्षरें। कंठीं धरिलीं आपण शंकरें ॥ १ ॥
कैसीं तारक उत्तम तिहीं लोकां। हळाहळ शीतळ केलें शिवा देखा २॥
हाचि मंत्र उपदेश भवानी। तिच्या चुकल्या गर्भादियोनि ॥ ३ ॥
जुनाट नागर नीच नवें। तुका ह्मणे म्यां धरिलें जीवें भावें ॥ ४ ॥

॥ ४०१ ॥

साही शास्त्रां अतिदुरी। तो परमात्मा श्रीहरि। तो दशरथाचे घरीं। क्रीडतो राम ॥ १ ॥ शिवाचें निजध्येय। वाल्मिकाचें निजगुह्य। तो भिल्लटीचीं फळें खाय। श्रीराम तो ॥ २ ॥ योगियांचे मनीं। नातुडे चिंतनीं। तो वानरांचे कानीं। गोष्टी सांगे ॥ ३ ॥ चरणें शिळा उद्धरी। नामें गणिका तारी। तो कोळिया घरीं। पाहुणा राम ॥ ४ ॥ क्षणएक सुरवरा। नातुडे नमस्कारा। तो रिसां आणि वानरां। क्षेम दे राम ॥ ५ ॥ राम सांवळा सगुण। राम योगियांचें ध्यान। राम राजीवलोचन। तुका चरण वंदितो ॥ ६ ॥

॥ ४०२ ॥

अहील्या जेणें तारिली रामें। गणिका परलोका नेली नामें ॥ १ ॥
रामहरे रघुराजहरे। रामहरे महाराजहरे ॥ २ ॥ कंठ शीतळ जपतां शूळपाणी। राम जपे अविनाथ भवानी ॥ ३ ॥ तारक मंत्र श्रवण

काशी । नाम जपतां वाल्मीक ऋषि ॥ ४ ॥ नाम जपे बीजमंत्र नळा । सिंधु तरती ज्याच्या प्रतापें शिळा ॥ ५ ॥ नाम जपे जीवन मुनिजना । तुकयास्वामी रघुनंदना ॥ ६ ॥

॥ ४०३ ॥

तारी ऐसे जड । उदकावरी जो दगड ॥१॥ तो हा न करी तें काई कां रे लीन न व्हा पायीं ॥२॥ शिळा होती मनुष्य झाली । ज्याच्या चरणाचे चालीं ॥३॥ वानरां हातीं लंका । घेयविली म्हणे तुका ॥४॥

॥ ४०४ ॥

मी तों अल्पमतिहीन । काय वर्णूं तुझे गुण । उदकीं तारिले पाषाण । हें महिमान नामाचें ॥१॥ नाम चांगलें चांगलें । माझे कंठीं राहो भलें । कपिकुळ उद्धरिलें । मुक्त केले राक्षसां ॥२॥ द्रोणागिरी कपि हातीं । आणविला सीतापति । थोर केली ख्याति । भक्तभेद्रीसमर्थी ॥३॥ शिळा होती मनुष्य झाली । थोर कीर्ति वाखाणिली । लंका दहन केली । हनुमंत कासानें ॥ ४ ॥ राम जानकी जीवन । योगियांचें निजध्यान । राम राजीवलोचन । तुका चरण वंदितो ॥ ५ ॥

॥ ४०५ ॥

राम म्हणतां तरे जाणता नेणता । हो का यातिभलता कुळहीन ॥१॥ राम म्हणतां न लगे आणीक सायास । केले महादोष तेही जळती २ राम ह्मणे तया जवळ नये भूत । कैंचा यमदूत ह्मणतां राम ॥ ३ ॥ राम ह्मणतां तरे भवसिंधुपार । चुके येरझार ह्मणतां राम ॥ ४ ॥ तुका ह्मणे हें सुखाचें साधन । सेवीं अमृतपान एका भावें ॥ ५ ॥

॥ ४०६ ॥

राम ह्मणतां रामचि होइजे । पदीं बैसोन पदवी नेइजे ॥ १ ॥ ऐसें सुख वचनीं आहे । विश्वासें अनुभव पाहे ॥२॥ रामरसाचिया चवी । आन रस रुचती केवीं ३ तुका ह्मणे चाखोनी सांगें । मज अनुभव आहे अंगें ४

॥ ४०७ ॥

राम म्हणे ग्रासोग्रासीं । तोचि जेविला उपवासी ॥१॥ धन्य धन्य ते शरीर । तीर्थाव्रतांचें माहेर ॥२॥ राम म्हणे करितां धंदा । सुख-समाधि त्या सदा ॥३॥ राम म्हणे वाट चाली । यज्ञ पाउलापाउलीं ॥४॥ राम म्हणे भोगीं त्यागीं । कर्म न लिंपे त्या अंगीं ॥५॥ ऐसा राम जपे नित्य । तुका म्हणे तो जीवन्मुक्त ॥ ६ ॥

॥ ४०८ ॥

आनंदले लोक नरनारी परिवार । शंखभेरीतुरें वाद्यांचे गजर १ आनंद झाला अयोध्येसी आले रघुनाथ । अवघा जयजयकार

आळंगिला भरत ॥ २ ॥ करिती अक्षवाणें ओंवाळिती रघुवीरा। लक्ष्मीसहित लक्ष्मण दुसरा ॥ ३ ॥ झालें रामराज्य आनंदलीं सकळें। तुका म्हणे गाईवत्सें नरनारी बाळें ॥ ४ ॥

॥ ४०९ ॥

झालें रामराज्य काय उणें आम्हांसी। धरणी धरी पीक गाई बोलल्या हैसी ॥१॥ राम वेळोवेळां आम्ही गाऊं ओंवियें। दळितां कांडितां जेवितां गे बाइये॥ २ ॥ स्वप्नींही दुःख कोणीं न देखे डोळां। नामाच्या गजरें भय सुटलें काळा ॥३ ॥ तुका म्हणे रामें सुख दिधलें आपुलें। तयां गर्भवासा येणें जाणें खुंटलें ॥ ४ ॥

हनुमंत स्तुति ॥ ४१० ॥

केली सीताशुद्धि। मूळ रामायणा आधीं ॥१॥ ऐसा प्रतापी गहन। सुरां सकळ मोहन ॥२॥ जाऊनी पाताळा। केली देवीची अवकळा ३ राम लक्षुमण। नेले आणिले चोरून ॥ ४ ॥ जोडूनिया कर। उभा सन्मुख समोर ॥५॥ तुका म्हणे जपें। वायुसुता जाती पापें ६॥

॥ ४११ ॥

हनुमंत महाबळी। रावणाची दाढी जाळी ॥ १ ॥ तया माझा नमस्कार। वारंवार निरंतर ॥ २ ॥ करोनी उड्डाण। केलें लंकेचें शोधन ॥ ३ ॥ जाळियेली लंका। धन्य धन्य म्हणे तुका ॥ ४ ॥

॥ ४१२ ॥

काम घातला बांदोडी। काळ केला देशधडी ॥ १ ॥ तया माझें दंडवत। कपिकुळीं हनुमंत ॥२॥ शरीर वज्रापेसें। कवळी ब्रह्मांड जो पुच्छें ॥३॥ रामरायाच्या सेवका। शरण आलों म्हणे तुका ४॥

॥ ४१३ ॥

शरण शरण हनुमंता। तुज आलों रामदूता ॥ १ ॥ काय भक्तीच्या त्या वाटा। मज दावाव्या सुभटा ॥२॥ शूर आणि धीर। स्वामिकाजीं तूं सादर॥३॥ तुका म्हणे रुद्रा। अंजनीचिया कुमरा४

भावसामर्थ्य ॥ ४१४ ॥

ब्रह्मयाचे वेद शंखासुरें नेले। त्यासाठीं धरिलें मत्स्यरूप ॥ १ ॥ तेणें आत्मा नव्हता नेला ब्रह्मांडासी। काय ब्रह्मयासी नव्हते ज्ञान॥२॥ परि तेणें धांवा केला आवडीनें। झाले नारायण कृपासिंधु ॥ ३ ॥ तुका ह्मणे विठोबा मी नामधारक। पोसणें सेवक भेटी देई ॥ ४ ॥

॥ ४१५ ॥

देवीं आणि दैत्यीं सिंधु घुसळिला। भार पृथ्वीस झाला साहावेना॥१॥ झालासी कासव धरिली पाठीवरी। चिंता तुज हरी सकळांची ॥२॥

तये काळीं देव करिताती स्तुति । कृपाळु श्रीपति म्हणोनिया ॥३॥
तुका ह्मणे ऐसे उद्दंड पवाडे । ज्यासी सहस्र तोंडें सिणला तोही ॥४॥

॥ ४१६ ॥

हिरण्याक्ष दैत्य मातला जे काळीं । वरदानें बळी शंकराच्या ॥ १ ॥
इंद्रपदराज्य घेतलें हिरोनी । देवा चक्रपाणी म्हणती धांव ॥ २ ॥
तईं पांडुरंगा शूकर झालेती । तया दैत्यपती मारियेलें ॥ ३ ॥
तुका ह्मणे ज्यांचीं राज्यें त्यांसी दिलीं । ऐसी तूं माउली पांडुरंगा ॥४॥

॥ ४१७ ॥

प्रल्हादाकारणें नरसिंह झालासी । त्याचिया बोलासी सत्य केलें ॥१॥
राम कृष्ण गोविंद नारायण हरि । गर्जे राजद्वारीं भक्तराज ॥ २ ॥
विठ्ठल माधव मुकुंद केशव । तेणें दैत्यराव दचकला ॥ ३ ॥
तुका म्हणे तयाकारणें सगुण । भक्ताचें वचन सत्य केलें ॥ ४ ॥

॥ ४१८ ॥

नामाचें सामर्थ्य कां रे दवडिसी । कां रे विसरसी पवाडे हे ॥ १ ॥
खणखणां हाणती खर्गे प्रल्हादासी । न रुपे आंगासी किंचितही २ ॥
राम कृष्ण हरि ऐसी मारी हांक । तेणें पडे धाक कळिकाळासी ॥ ३ ॥
असों द्या सामर्थ्यें ऐसीया कीर्तीच्यीं । आवडी तुक्याची भेटी देईं ॥४॥

॥ ४१९ ॥

वाटीभर विष दिलें प्रल्हादासी । निर्भय मानसीं तुझ्या बळें ॥ १ ॥
भोक्ता नारायण केलें तें प्राशन । प्रतापें जीवन झालें तुझ्या ॥ २ ॥
नामाच्या चिंतनें विषाचें तें आप । जाहालें देवत नारायणा ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसे तुझे बडिवार । शिणला फणीवर वर्णवेना ॥ ४ ॥

॥ ४२० ॥

अग्निकुंडामाजीं घातला प्रल्हाद । तरी तो गोविंद विसरेना ॥ १ ॥
पितियासी ह्मणे व्यापक श्रीहरि । नांदतो मुरारी सर्वां ठायीं ॥२॥
अग्निरूपें माझा सखा नारायण । प्रल्हाद गर्जून हांक मारी ॥ ३ ॥
तुका ह्मणे अग्नि जाहला शीतळ । प्रताप सबळ विठो तुझा ॥ ४ ॥

॥ ४२१ ॥

कोपोनियां पिता बोले प्रल्हादासी सांग हृषीकेशी कोठें आहे ॥ १ ॥
येरु म्हणे काष्टीं पाषाणीं सकळीं । आहे वनमाळी जेथें तेथें ॥ २ ॥
खांबावरी लात मारिली दुर्जनें । खांबीं नारायण म्हणतांचि ॥ ३ ॥
तुका म्हणे कैसा खांब कडाडिला । ब्रह्मा दचकला सत्यलोकीं ॥४॥

॥ ४२२ ॥

डळमळिला मेरु आणि तो मांदार । पाताळीं फणिवर डोई झाडी१
लोपे तेजें सूर्य आणीक हा चंद्र । कांपतसे इंद्र थरथरां ॥ २ ॥

ऐसें रूप उग्र हरीनें धरीलें । दैत्या मारियेलें मांडीवरी ॥ ३ ॥
तुका म्हणे भक्ताकारणें श्रीहरि । बहु दुराचारी निर्दाळिले ॥ ४॥

॥ ४२३ ॥

बहुत कृपाळू दीनाचा दयाळू । जगीं भक्तवत्सलू नाम तुझें ॥ १ ॥
मानियेला चित्तीं बळीचा उपकार। अझूनी त्याचें द्वार राखशील२
काय त्याच्या भेणें बैसलासी द्वारीं । नाहीं तुज हरी कृपा बहु ३॥
तुका म्हणे भक्तजनाची ममता । तुह्मांसी अनंता अलौकिक ॥ ४ ॥

॥ ४२४ ॥

पांडुरंगा तुझे काय वाणूं गुण । पवाडे हे धन्य जगीं तुझे ॥ १ ॥
दंडिलें दुर्वासा सुरा असुरानें । तो आला गाऱ्हाणें सांगावया २ ॥
बळीचिये द्वारीं तुह्मी बैसलेति । दुर्वास विनंती करी भावें ॥ ३ ॥
तुका ह्मणे कृपासागरा श्रीहरी । तुह्मी भक्तांवरी प्रेमछाया ॥ ४ ॥

॥ ४२५ ॥

दुर्वासया स्वामी गुंतलों भाकेसी । पुसा जा बळीसी निरोप द्यावा १
त्याचे आज्ञेविण आम्हां येतां नये । द्वारपाळ राहे होउनिया ॥ २ ॥
पुसे दुर्वासया बळीसी जाऊनी । येरू ह्मणे ह्मणी बोलों नका ॥ ३ ॥
तुका ह्मणे केला अन्यत्राचा त्याग। तेव्हां पांडुरंग सखा झाला ॥४॥

॥ ४२६ ॥

बळी म्हणे आजी दुर्वासया स्वामी । मागों नका तुम्ही नारायण ॥१॥
बहुतां प्रयासीं जोडला श्रीहरी । बैसविला द्वारीं राखावया ॥ २ ॥
पातला दुर्वास मग हो तेथूनी । चिंतातुर मनीं उद्वेगला ॥ ३ ॥
काय तूं एकाचा आहेसी अंकित । होई कृपावंत तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ४२७ ॥

त्रैलोकींचा नाथ सकळांचा आधार। बळीचें तुवां घर धरियेलें ॥१॥
आह्मां मोकलिलें कोणां निरविलें। कोणा हातीं दिले तिन्ही लोक २
अनाथांचा बंधु दासांचा कैवारी । ब्रिदें तुझीं हरी जाती वांया ३॥
तुका ह्मणे ऐसें बोलिला दुर्वास । वाटला संतोष पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ४२८ ॥

बोलिले ते देवऋषी दुर्वासया । जाय पुसावया मागत्यानें ॥ १ ॥
मागुता दुर्वास पुसे बलिराया । निरोप जावया देई देवा ॥ २ ॥
बळी म्हणे त्यासी जाय मी न म्हणें। जाईल नारायण लागलाची ३
मजपाशीं राहे कोठें तरी जाय । तुका म्हणे पाय न सोडी मी ॥४॥

॥ ४२९ ॥

दुर्वासें निरोप आणिला ये रीती । मग वाढलेती नारायण ॥ १ ॥
ठेविलें चरण बळीचिये द्वारीं । शिर अंगावरी लांबविलें ॥ २ ॥

पाडियेलें द्वार द्वारावतियेसी । वरी हृषीकेशी निघालेती ॥ ३ ॥
तेथूनिया नाम पडिलें द्वारका । वैकुंठनायका तुका म्हणे ॥ ४ ॥

॥ ४३० ॥

मुरु कुश दोन्ही मारिले असुर । दुर्वास ऋषीश्वर सुखी केला ॥१॥
मारियेला मुरु ह्मणोनी मुरारी । नाम तुझें हरि पडियेलें ॥ २ ॥
पूर्वींहुनी ऐसा भक्तप्रतिपाळ । केला त्वां सांभाळ नारायणा ॥ ३ ॥
तुका ह्मणे येचि वेळे काय झालें । कां सोंग धरिलें मोहनाचें ॥४॥

॥ ४३१ ॥

व्यभिचारिणी गणिका कुंटणी । विश्वासचि मनीं राघोबाच्या ॥१॥
ऐसी ही पापिणी वाहिली विमानीं । अचळ भुवनीं ठेवियेली ॥ २ ॥
पतितपावन तिहीं लोकीं ठसा । कृपाळु कोंवसा अनाथांचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे भरा विठोबाची सोय । आणिक उपाय नेणों किती ॥४॥

॥ ४३२ ॥

गजेंद्र तो हस्ती सहस्र वरुषें । जळामाजी नक्रें पीडियेला ॥ १ ॥
सुहृदीं सांडिलें कोणी नाहीं साहे । अंतीं वाट पाहे विठो तुझी ॥२॥
कृपेच्या सागरा माझ्या नारायणा । तया दोघांजणां तारियेलें ॥३॥
तुका ह्मणे नेलें वाहनीं विमानीं । मीही आइकोनी विश्वासलों ॥४॥

॥ ४३३ ॥

दामाजीपंताची रसद गुदरली । लज्जा सांभाळिली देवरायें ॥ १ ॥
तयाचें चरित्र परिसा हो सादर । करितों नमस्कार संतजनां ॥ २ ॥
मंगळवेढा असे वस्ति कुटुंबेसी । व्यापारी सर्वांसी मान्य सदा ॥३॥
कर्म काय करी ठाणाचा हवाला । तों कांहीं पडला कठिण काळ ४॥
धान्याचीं भांडारें होतीं तीं फोडिलीं । पंढरी रक्षिली दुष्काळांत ५
दुबळीं अनाथें तींही वांचविलीं । राष्ट्रांत ते झाली कीर्ति मोठी ॥६॥
मुजुम करीत होता कानडा ब्राह्मण । फिर्याद लिहून पाठविली ॥७॥
अविंदाचें राज्यीं बेदरीं असतां । कागद पाहतां तलब केली ॥ ८ ॥
दामाजीपंतासी धरोनी चालविलें । इकडे या विठ्ठलें मात केली ॥९॥
विकते धारणे सवाईचें मोल । धान्याचें सकळ द्रव्य केलें ॥ १० ॥
दामाजीपंताच्या नांवें अर्जदास्त । लिहून खलेती मुद्रा केली ॥११॥
विठो पाडेवार भक्तां साह्य झाला । बेदरासी गेला रायापासीं १२
जोहार मायबाप, पुसती कोठील । तंव तो म्हणे स्थळ मंगळवेढें १३
दामाजीपंतांनीं रसद पाठविली । खलेती ओतिली अर्जदास्त १४॥
देखोनिया राजा संतोष पावला । म्हणे व्यर्थ त्याला तलब केली १५
काय तुझें नांव पुसती यंत्रधारी । तो म्हणे बेगारी विठा कीं जी १६

पावल्याचा जाब द्यावा मायबाप। करोनि घेतों माप म्हणती ते १७
पावल्याचा जाब दिधला लिहून। तसरीफ देऊन पाठविला ॥१८॥
छत्री घोडा शिबिका आभरणांसहित। दिला सर्व दूत पाठवूनी १९
वाटे चुकामुक झाली याची त्यांची। ते आले तैसेची मंगळवेढा २०
दामाजीपंतासी वेद्रासी नेलें। राजा म्हणे झालें कवतुक ॥ २१ ॥
काल गेला विठा बेगारी देऊन। तसरीफ देऊन जाब दिला २२॥
काय तुमचें काज सांगा जी सत्वर। बोलाजी निर्धार वचनाचा २३
कैंचा विठा कोण पाठविला कधीं। काढोनिया आधीं जाब दिला २४
पाहातांचि जाब हृदय फुटलें। नयन निडारले राजा देखे ॥२५॥
सांवळें सकुमार रूप मनोहर। माथां तेणें भार वाहियेला ॥ २६ ॥
दामाजीपंतासी रायें सन्मानिलें। तो म्हणे आपुलें कर्म नव्हे २७॥
आतां तुमची सेवा पुरे जी स्वामिया। शिणविलें सखया विठोबासी
निरोप घेऊनी आला स्वस्थळासी। उदास सर्वांसीं होतां झाला २९.
दामाजीपंतांनीं सेविली पंढरी। ऐसा त्याचा हरि निकटवृत्ति ३०
तुका ह्मणे विठो अनाथ कैवारी। नुपेक्षी हा हरि दासाळाणी ३१॥

सेतावर अभंग ॥ ४३४ ॥

सेत करा रे फुकाचें। नाम विठोबारायाचें ॥१॥ नाहीं वेठी जेवा सारा। जाहाती नाहीं म्हणियारा ॥२॥ सारिक नाहीं रे दुसरा। धनी सारा तुझा तूं ॥३॥ जपतप नांगरणी। न लगे आटी दुनवणी ४ कर्म कुळवणी। नलगे धर्मपाळी दोन्ही ॥ ५ ॥ ज्ञान तांभारी ती फणी। नलगे करावी पेरणी ॥ ६ ॥ बीज नलगे मंचिनाचें। पीक पिकलें ठायींचें ॥७॥ नाहीं यमाचें चोरटें। विठ्ठल पागोऱ्याचे तेटें ॥८॥ पीक न वजे हा भरंवसा। करी उद्योग तो पिसा ॥९॥ सराय सर्व काळ। वांया न वजे घटिकापळ ॥१०॥ प्रेम पिकलें अपार। नाहीं सांठवावया थार ॥११॥ ऐसी जोडी जो चुकला। तुका म्हणे धिग त्याला ॥१२॥

॥ ४३५ ॥

वोणव्या सोंकरीं। सेत खादलें पाखरीं ॥१॥ तैसा खाऊं नको दगा। निदसुरा राहुनी जागा ॥२॥ चोरासवें वाट। चालोनि केलें तळपट ॥३॥ डोळे झांकूनी राती। कूपीं पडे दिवसा जोती ॥४॥ पोसी वांझ गाय। तेथें कैंची दूध साय ॥५॥ फुटकी सांगडी। तुका म्हणे न पवे थडी ॥६॥

॥ ४३६ ॥

सेत आलें सुगी सांभाळावे चारी कोन। पिक आलें परी केलें पाहिजे जतन ॥१॥ सोंकरीं सोंकरीं विसावा तोंवरीं। नको खाऊं

उभें आहे तों ॥ २ ॥ गोफणेसी गुंडा घाली पाखोन्याच्या मेटें । पळती हाहाकारें अवघीं पाखरांचीं थाटें ॥ ३ ॥ फेरघूनी भागटी राहे जागा पालटुनी । पडलिया मानी मळ बुद्धि व्हावी दोन्ही ॥ ४ ॥ खळें दाणे विश्व सुखी करी होता राशी । साची साठ- नीया ज्याचे भाग देई त्यासी ॥ ५ ॥ तुका म्हणे मग नाहीं आपुलें कारण । निज आलें हातां भुस सांडिलें निकण ॥ ६ ॥

घोंगडीचें अभंग. ॥ ४३७ ॥

ठकिलें काळा मारिली दडी । दिली कुडी टाकोनियां ॥ १ ॥
पांघुरलों बहु काळें । घोंगडें बळें सांडवलें ॥ २ ॥
नये पैसा लाग वरी । परतें दुरी लपालें ॥ ३ ॥
तुका म्हणे आड सेवा । लाविला देवा भांडतां ॥ ४ ॥

॥ ४३८ ॥

घोंगडियांचा पालट केला । मुलांमुलां आपुल्यांत ॥ १ ॥
कान्होबा तो मीच दिसे । लाविलें पिसें सवंगडियां ॥ २ ॥
तो बोले मी उगाच बैसें । अनारिसें न दिसे ॥ ३ ॥
तुका म्हणे दिलें सांग । नेदी व्यंग जाऊं देऊं ॥ ४ ॥

॥ ४३९ ॥

खेळों लागलों सुरकवडी । माझी घोंगडी हारपली ॥ १ ॥
कान्होबाचे पडिलों गळां । देई गोपाळा देई झाडा ॥ २ ॥
मी तों हागे उघडा झालों । अवघ्या आलों बाहेरी ॥ ३ ॥
तुका म्हणे बुद्धि काची । नाहीं ठायींची मजपाशीं ॥ ४ ॥

॥ ४४० ॥

घोंगडियांची एक राशी । त्याच्यापाशीं मेळी होय ॥ १ ॥
मागियाचा भाग द्यावा । केला गोवा उगवूं या ॥ २ ॥
व्हावें दिसे निसंतान । घेईन आन भुजापाशीं ॥ ३ ॥
तुका म्हणे लहान मोठा । सांडा ताठा हा देवा ॥ ४ ॥

॥ ४४१ ॥

नाहीं तुझें उगा पडेन गळां । पुढें गोपाळा जाऊं नको ॥ १ ॥
चाहाड तुझे दाविन घरीं । सोडण्या उरी नाहीं गेम्मा ॥ २ ॥
तुम्हां आम्हां पडदा होता । खरा आतां नागवीं ॥ ३ ॥
तुका म्हणे उरली गोष्टी । पडली मिठी न सुटे ॥ ४ ॥

॥ ४४२ ॥

तुम्हां आम्हां उरी तोंवरी । अनाचारी आहे तैसी ॥ १ ॥
माझें घोंगडें टाकून देईं । एके ठायीं मग असो ॥ २ ॥

विरोधानें पडे तुटी । कपट पोटीं नसावें ॥ ३ ॥
तुका ह्मणे तूं जाणता हरी । मज बेव्हारीं बोलविसी ॥ ४ ॥

॥ ४४३ ॥

मुळींचा तुह्मां लागला चाळा । तो गोपाळा न संडा ॥ १ ॥
द्यावें त्याचें देणेंचि नाहीं । येचि वाही देखतसां ॥ २ ॥
माझी तरी घोंगडी मोठी । गांठींची लंगोटी सोडीस ना ॥ ३ ॥
तुका ह्मणे त्यां सांडिली आशा । हुंगिला फांसा येथूनियां ॥ ४ ॥

॥ ४४४ ॥

घोंगडियास घातली मिठी । न सोडी साटी केली जीवें ॥ १ ॥
हां गे चोर धरा धांवा कोणी । घरांत रहाटे बहु कोणी ॥ २ ॥
नोळखवे त्यां धरिला हातीं । देहा दीप साच लाविली वाती ॥ ३ ॥
न पवे धांवणें मारितो हांका । जनाचारी तुका नागवला ॥ ४ ॥

॥ ४४५ ॥

आतां मी देवा पांघरों काई । भिकेचें तेंहि उरेचि ना ॥ १ ॥
सदैव दुबळें नेणे चोर । देखोनि सुनाट फोडितो घर ॥ २ ॥
नाहीं मजपाशीं फुटकी फोडी । पांचांनीं घोंगडी दिधली होती ॥ ३ ॥
तुका ह्मणे जना वेगळें झालें । एकचि नेलें एकल्यानें ॥ ४ ॥

॥ ४४६ ॥

मी माझें करीत होतों जतन । भीतरल्या चोरें घेतलें खान ॥ १ ॥
मज आल्याविण आधींच होता । मज न कळतां मजमाजी ॥ २ ॥
घोंगडें नेलें घोंगडें नेलें । उघडें केलें उघडेंचि ॥ ३ ॥
तुका ह्मणे चोरटाचि झाला साव । सहजेंचि न्याय नाहीं येथें ॥ ४ ॥

॥ ४४७ ॥

घोंगडें नेलें सांगों मी कोणा । दुबळें माझें नाणीतीं मन ॥ १ ॥
पुढें तें मज न मिळे आतां । जवळी सत्ता दाम नाहीं ॥ २ ॥
शेटे महाजन ऐका कोणी । घोंगडियाची करा शोधणी ॥ ३ ॥
घोंगडियाचा करा बोभाट । तुका म्हणे जंव भरला हाट ॥ ४ ॥

॥ ४४८ ॥

माझें घोंगडें पडिलें ठायीं । माग तया पायीं सांपडला ॥ १ ॥
चोर तो भला चोर तो भला । पाठिसी घातला पुंडलिकें ॥ २ ॥
चोर कुठारी एकेचि ठायीं । वेगळें पाहावें नलगेचि कांहीं ॥ ३ ॥
आणिकांचींही चोरलीं आधीं । माझें तयामधीं मेळविलें ॥ ४ ॥
आपल्या आपण शोधिलें तिहीं । करीन मीही तेंचि परी ॥ ५ ॥
तुका ह्मणे माझें हितचि झालें । फाटकें जाऊनि धडकें आलें ॥ ६ ॥

शाक्तावर ॥ ४४९ ॥

टवकारूनी दृष्टी लावुनिया रंग । दावी झगमग डोळयापुढें ॥ १ ॥
ह्मणती शिष्यासी लागली समाधि । लटकीची उपाधि झकविती ॥२॥
दीपाचिये ज्योति कोंडियेलें तेज । उपदेश सांजरात्रीमाजी ॥ ३ ॥
रांगोळिया चौक शृंगारोनी ओजा । आवरण पूजा यंत्र करी ॥ ४ ॥
पडदा लावोनिया दीप चहूं कोनीं । बैसोनि आसनीं मुद्रा दावी ॥ ५ ॥
नैवेद्यासी ह्मणे करावें पक्वान्न । पात्रासी दिव्यान्न परवडी ॥ ६ ॥
झाला उपदेश कवळ घ्या रे मुखीं । आपोशन शेखीं बुडविलें ।७॥
पाषांड करोनि मांडिली जीविका । बुडवी भाविका लोकांप्रती ॥ ८ ॥
कायावाचामनें सोडवी संकल्प । गुरु गुरु जप प्रतिपादी ॥ ९ ॥
शुद्ध परमार्थ बुडविला तेणें । गुरुत्वभूषणें भोग भोगी ॥ १०॥
विधीचा ही लोप बुडविला वेद । शास्त्रांचा हि बोध हरविला ॥ ११ ॥
योगाची धारणा नाहीं प्राणायाम । सांडी यम नेम नित्यादिक ॥ १२ ॥
वैराग्याचा लोप हरिभजनीं विक्षेप । वाढविलें पाप मतिलंडें ॥१३॥
तुका ह्मणे गेलें गुरुत्व गुखाडी । पूर्वजांसी धाडी नरकवासा ॥ १४ ॥

॥ ४५० ॥

शाक्त गधडा जये देशीं । तेथें राशी पापाच्या ॥ १ ॥ सुकृताचा उदो केला । गोंधळ घाला इंद्रियें ॥२॥ क्रोधरूपें वसे काम । तिचें नाम जपतसे ॥ ३ ॥ मद्यभक्षण मांगिण याती । विटाळ चित्तीं सांठविला ४ ॥ स्तवूनिया पुजी रांड । न लजे भांड दाढीसी ॥ ५ ॥ तुका ह्मणे भगवती । नेईल अंतीं आपणापें ॥ ६ ॥

॥ ४५१ ॥

राजा प्रजा द्वाड देश । शाक्त वास करिती तो ।१। अधर्माचें उभड पीक । धर्म रंक ते गांवीं ॥ २ ॥ न पिके भूमि कांपे भारें। मेघ वारे पितील ॥३॥ तुका म्हणे अवघीं दुःखें । येती सुखें वस्तीसी ॥४॥

॥ ४५२ ॥

ऐसें कलियुगाच्या मुळें । झालें धर्माचें वाटोळें ॥ १ ॥ सांडुनिया रामराम । ब्राम्हण म्हणती दोमदोम ॥२॥ शिवों नये तीं निळीं । वस्त्रें पांघरती काळीं ॥३॥ तुका म्हणे वृत्ति । सांडुति गदा मागत जाती ॥४॥

॥ ४५३ ॥

अवघ्या पापें घडला एक । उपासक शक्तीचा ॥ १ ॥ त्याचा विटाळ नको अंगा । पांडुरंगा माझिया ॥२॥ काम क्रोध मद्या अंगीं । रंगला रंगीं अवगुणी ३ करितां पाप न धरी शंका । म्हणे तुका कोणीही ॥४॥

॥ ४५४ ॥

वारितां बळें धरितां हातीं । जुलुमें जाती नरकामधीं ॥ १ ॥ रंडी-

दासाप्रति कांहीं । उपदेश तोही चालेना॥२॥जन्म केला वाताहात । थोर घात ये ठायीं ३ तुका ह्मणे पंढरीनाथा । तुझी कथा दुषिती ॥ ४ ॥

॥ ४५५ ॥

शाक्तांची शूकरी माय । विष्टा खाय बिदीची ॥१॥ तिची त्या पडली स्वते । मागे धावें म्हणोनी ॥२॥ शाक्तांची गाढवी माय । भुंकत जाय वेसदारा ३ तुका म्हणे शिंदळीच्चे । बोलतां वाचे निंद्य ते ॥ ४ ॥

॥ ४५६ ॥

हरिहर सांडूनी देव । धरिती भाव क्षुल्लकीं १ ऐका त्यांची विटंबना । देवपणा भक्तांची २ अंगीं कवडे घाली गळां । परडी कळाहीन हातीं ३ गळां गांठा हिंडे दारीं । मनुष्य परी कुतरीं तीं ॥४॥ माथां सेंदुर दांत खाती । जेंगट हातीं सटवीचें ॥५॥ पूजिती विकट दोंद । पशु सोंड गजाची ॥ ६॥ ऐशा छंदें चुकलीं वाटा । भाव खोटा भजन ॥७॥ तुका म्हणे विष्णुशिवा । वांचुनि देवा भजती ते ॥ ८ ॥

॥ ४५७ ॥

कांद्यासाठीं झालें ज्ञान । तेणें जन नाडिलें ॥१॥ काम क्रोध वुत्र-वुत्री । भुंके पुची व्याळीची ॥२॥ पूजेलागीं द्रव्य मागे । काय सांगे शिष्यातें ॥३॥ तुका म्हणे कैंचें ब्रह्म । अवघा भ्रम विषयांचा ॥४॥

॥ ४५८ ॥

सांडुनिया पंढरीराव । कवणातें म्हणो देव ॥१॥ बहु लाज वाटे चित्ता । आणिकांतें देव म्हणतां ॥२॥ सांडुनिया हिरा । कोणे वेचाव्या त्या गारा ३ तुका म्हणे हरिहर । ऐशी सांडूनिया धुर ॥३॥

॥ ४५९ ॥

बहुत गेलीं वांया । न भजतां पंढरीराया ॥१॥ करिती कामिकांची सेवा । लाथा मागोन खाल्या देवा ॥२॥ अवघियांचा धनी । त्यासी गेलीं विसरोनी ॥३॥ तुका म्हणे अंतीं । पडती यमाचिये हातीं ॥४॥

॥ ४६० ॥

असो आतां ऐसा धंदा । तुज गोविंदा आठवूं ॥१॥ रक्षितां तूं होसी जरी । तरि काय येरी करावें ॥२॥ काया वाचा मन पायीं । राहे ठायीं करूं तें ॥ ३ ॥ तुका म्हणे गाइन गीती । रूप चित्तीं धरूनियां ॥४॥

॥ ४६१ ॥

नाहीं आम्ही विष्णुदास । करीत आस कोणाची ॥ १ ॥ कां हे नष्ट करिती निंदा । नेणो सदा आमुचि २ असो भलत्या ठायीं मनें । समाधानें आपुल्या ॥३॥ तुका म्हणे करूं सेवा । तुझी देवा धंदा तो ॥ ४ ॥

पाईक ॥ ४६२ ॥

पाईक म्हणे ज्योतिला सिद्धांत । शूर धरी मात वचन चित्तीं ॥ १ ॥

पाइकीवांचुन नव्हे कधीं सुख । प्रजांमध्यें दुःख न सहे पीडा ॥ २ ॥
तरि व्हावें पाईक जिवाचे उदार । सकळ त्यांचा भार स्वामी वाहे ३॥
पाइकीचें सुख जया नाहीं ठावें । धिग त्यांनीं जावें वायांविण ॥४॥
तुका म्हणे एका क्षणाचा करार । पाईक अपार सुख भोगी ॥ ५ ॥

॥ ४६३ ॥

पाईकीचें सुख पाईकासी ठावें । म्हणोनियां जीवें केली साटी ॥१॥
येतां गोळ्या बाण साहिले भडमार । वर्षतां अपार वृष्टि वरी ॥ २ ॥
स्वामीपुढें व्हावें पडतां भांडण । मग त्या मंडण शोभा दावी ॥ ३ ॥
पाईकांनीं सुख भोगिलें अपार । शूर आणि धीर अंतर्बाही ॥ ४ ॥
तुका म्हणे या सिद्धांताच्या खुणा । जाणे तो शहाणा करितो भोगी ५

॥ ४६४ ॥

पाईक तो जाणे पाइकीचा भाव । लाग पगे ठाव चोरवाट ॥ १ ॥
आपणां राखोनी ठकावें आणीक । घ्यावें सकळीक हरूनिया ॥ २ ॥
येऊं नेदी लाग लागों नेदी माग । पाईक त्या जग स्वामी मानी॥३॥
ऐसें जन केलें पाइकें पाइक । जया कोणी भीक न घालिती ॥ ४ ॥
तुका ह्मणे ऐसे जयाचे पाईक । बळिया तो नाईक त्रैलोकींचा ॥५॥

॥ ४६५ ॥

पाईकांनीं पंथ चालविल्या वाटा । पारख्याचा सांटा मोडोनिया ।१॥
पारखिये ठायीं घेऊनियां खाण । आपुलें तें जन राखियेलें ॥ २ ॥
आधारेंविण जे बोलतां चावळे । आपुलें तें कळे नव्हे ऐसें ॥ ३ ॥
सांडितां मारग मारिती पाईक । आणिकांसी शीक लागावया ॥ ४ ॥
तुका म्हणे विश्वा घेऊनी विश्वास । पाईक तयास सुख देती ॥५॥

॥ ४६६ ॥

पाईक तो प्रजा राखोनिया कुळ । पारखिया मूळ छेदी दुष्टा ॥ १ ॥
तो एक पाईक पाईकां नाईक । भाव सकळीक स्वामिकाजीं ॥ २ ॥
तृणवत तनु सोनें ज्या पाषाण । पाईक त्या भिन्न नाहीं स्वामी ॥ ३ ॥
विश्वासावांचूनी पाईकासी मोल । नाहीं मिथ्या बोल बोलिलिया ।४।
तुका म्हणे नये स्वामी उणेपण । पाईक जतन करी त्यासी ॥ ५ ॥

॥ ४६७ ॥

धनी ज्या पाईका मानितो आपण । तया भितें जन सकळीक ॥ १ ॥
जिवाचे उदार शोभती पाईक । मिरवती नाईक मुगुटमणि ॥ २ ॥
आपुलिया सत्ता स्वामीचें वैभव । भोगिती गौरव सकळ सुख॥३॥
कमाईची हीणें पडलीं उदंड । नाहीं तया खंड येती जाती ॥ ४ ॥
तुका ह्मणे तरी पाईकीच भली । थोडीबहुत केली स्वामीसेवा॥५॥

॥ ४६८ ॥

पाईकपणें खरा मुशारा । पाईक तो खरा पाइकीनें ॥ १ ॥
पाईक तो जाणे मारितें अंग । पाइकासी भंग नाहीं तया ॥ २ ॥
एक दोहीं घरीं घेतलें खाणें । पाईक तो पणें निवडला ॥ ३ ॥
करूनी कारण स्वामी यश द्यावें । पाईक त्या नांवें खरेपण ॥ ४ ॥
तुका ह्मणे ठाव पाईका निराळा । नाहीं स्वामी स्थळा गेल्याविण ॥५॥

॥ ४६९ ॥

उंच नीच कैसी पाईकाची बोली । कोण गांढे बळी निवडिलें ॥१॥
स्वामिकार्जी एक सर्वस्वें तत्पर । एक ते कुचर आशाबद्ध ॥ २ ॥
प्रसंगावांचूनी आणिती अविर्भाव । पाईक तो नांव मिरवी वांया ३
गणतीचे एक उंच नीच फार । तयांमध्यें शूर विरळा थोडे ॥ ४ ॥
तुका म्हणे स्वामी जाणे त्यांचा मान । पाईक पाहोन मोल करी ५॥

॥ ४७० ॥

एकाच स्वामीचे पाईक सकळ । जैसें तैसें बळ मोल तया ॥ १ ॥
स्वामिपदीं एकां ठाव उंच स्थळीं । एक तीं निराळीं जवळी दुरी २
हीन कमाईचा हीन आन ठाव । उंचा सर्व भाव उंच पद ॥ ३ ॥
पाईकपणें तो सर्वत्र सरता । चांगा तरी परता गांढ्या ठाव ॥ ४ ॥
तुका म्हणे मरण आहे या सकळां । भेणें अवकळा अभयें मोल ५॥

॥ ४७१ ॥

प्रजी तो पाईक ओळीचा नाईक । पोटासाठीं एक जैशीं तैशीं ॥१॥
आगळें पाऊल आणिकांसि तरी । पळतां माघारीं तोंडजेती ॥ २॥
पाठीवरी घाय म्हणती फटमर । धडा अंग शूर मान पावे ॥ ४ ॥
घेईल दरवडा देहा तो पाईक । मारी मकळीक सर्व हरी ॥ ४ ॥
तुका म्हणे नव्हे बोलाचें कारण । कमाईचा पग सिद्धी पावे ॥५॥

॥ ४७२ ॥

जातीचा पाईक ओळखे पाईका । आदरें तो एका त्याचे ठायीं ॥ १ ॥
धरितील पोटासाठीं हतियेरें । कळती ती खरें वेठीचींसी ॥ २ ॥
जातीचें तें असें खरें घायडाय । पारखिया काय पाशीं लोपे ॥ ३॥
तुका म्हणे नमूं देव म्हूण जना । जालियांच्या खुणा जाणतसों ॥ ४ ॥

श्लोकरूपी बोध ॥ ४७३ ॥

तुजवांचुनी मागणें काय कोणा । महीमंडळीं विश्वव्यापकजना।
जीवभावना पुरवूं कोण जाणे । तुजवांचुनी होत कां रावराणे ॥१॥
नसे मोक्षदाता तिहींमाजिं लोकां । भवतारकु तुजवांचूनि एका ।
मनीं मानसीं चिंतितां रूपनाम । पळे पाप ताप भयें नासे काम

॥ २ ॥ हरी नाम हें साच तुझें पुराणीं । हरी हातिचें काळगर्भादि-योनी । करूं मुखवाणी कैसी देशधडी । तुजवांचुनी वाणितां व्यर्थ गोडी ॥ ३ ॥ भवभंजना व्यापका लोक तिन्ही । तुज वाणितां श्रमला शेषफणी ।.असो भावें जीव तुझ्या सर्व पायीं । दुजें मागणें आणिक व्यर्थ कांई ॥ ४ ॥ दिनानाथ हे साक्ष तुझी जनासी दिनें तारिलीं पातकी थोर दोषी । तुका राहिला पायिं तो राख देवा । असें मागतसे तुझी चरणसेवा ॥ ५ ॥

॥ ४७४ ॥

उभीं भीवरेच्या तीरा राहिलाहे । असे सन्मुख दक्षिणे मूख वाहे । महापातकांसी पळ कांप थोर । केसे गर्जनी घोष हे नाम-वीर ॥ १ ॥ गुणगंभीर हा धीर हास्यमुख । वदे वदनीं अमृत सर्व-सूख । लागलें मुनिवरां हें गोड चित्तीं । देहभावना तुटलियागि खंती ॥ २ ॥ ठसा घातला ये भूमिमाजी थोर । इच्छादाना हा याच-यासी उदार । जया बोळगती सिद्धि सर्वठायीं । तुझें नाम हें चांगलें गे विठाई ॥ ३ ॥ असे उघडा हा विटेवरि उभा । कटसूत्र हे धकनी भक्तिलोभा । पुढें वाट दावी भवसागराची । विठो माउली हे सिद्धसाधकांची ॥४॥ करावे गुहा भरा पंथ आधीं । जया पार नाहीं सुखा तेंच साधी । ह्मणे तुका पंढरीस सर्व आलें । असे विश्व हें जीवनें त्याचि झालें ॥ ५ ॥

॥ ४७५ ॥

धना गुंतलें चित्त माझें मुरारी । मन घेउनी हिंडवी दारोदारीं । मरे हिंडतां न पुरे यासि कांहीं । मही ढेंगणी परि नें तृप्त नाहीं ॥१॥ न दिसे शुद्ध पाहतां निजमती । पुढें पडिलों इंद्रियां थोर घातीं । जिवा नास त्या संगती दंड बेडी । हरी शीघ्र या दुष्टसंगासि तोडी ॥२॥ अशीं आणिकें काय सांगों अनंता । मोहो पापिणी दुष्ट मायाममता । क्रोध काम यातना थोर करी । तुजवांचुनी सोडवी कोण हरि ३ ॥ निज देखतां निज हे दुरि जाये । निद्रा आळस दंभ या भीन आहे । तया वसित देहीं नको देऊं देवा । तुजवांचुनी आणिक नास्ति हेवा ४ करीं घात पात शंका लाज थोरी । असे सत्य भाव बहु भान्ति दुरी । नको मोकलूं दीनबंधु अनाथा । तुका वीनवी ठेवुनि पायिं माथा ॥५॥

॥ ४७६ ॥

पैल सांवळें तेज पुंजाळ कैसें । शिरीं मुगुटीं साजिरें मोरपीसें १॥ हरे त्यासि रे देखतां ताप माया । भजा रे भजा यादवा योगिराया ॥२॥ जया कामिनी लुब्धल्या सहस्रसोळा । सुकुमार हा गोपिका दिव्य

बाळा । शोभे मध्यभागीं कळा चंद्रकोटी । रुपा मीनली साजिरी माळ कंठीं ॥२॥ असे यादवा श्रेष्ठ हा चक्रपाणी । जया वंदिती कोटि तेहतीस तीन्ही । महाकाळ हे कांपती दैत्य ज्यासी । पाहा सांवळें रूप हें पापनासी ॥३॥ कसीं पाउलें साजिरीं कुंकुमाचीं कसी वीट हे लाधली दैवाची । जया चिंतितां अग्नि हा शांति नीवे । धरा मानसीं आपला देहभाव ॥४॥ मुनी देखतां मूख हें चित्त ध्याय । देह मांडला भाव हा बापमाय । तुक्या लागलें मानसीं देवपीसें । चित्त चोरटें सांवळें रूप कैसें ॥ ५ ॥

॥ ४७७ ॥

असे नांदतु हा हरी सर्वजीवीं । असे व्यापुनी अग्नि हा काष्ठ तेवीं । घटीं बिंबलें बिंब हें ठायिंठायीं । तया संगती नासु हा त्यासि नाहीं ॥१॥ तन वाटितां क्षीर हें होत नाहीं । पशू भक्षितां पालटे तेंचि देहीं । तया वर्म तो जाणता एक आहे । असे व्यापक व्यापुनी अंतर्बाहे ॥२॥ फळ कर्दळीं सेवटीं येत आहे । असें शोधितां पोकळीमाजि काये । धीर नाहीं तें वाउगें धीग झालें । फळ पुष्प ना यत्न ते व्यर्थ गेले ॥३॥ असें नाम हें दर्पणें सिद्ध केलें । असें बिंब तें या मळा आड ठेलें । कसें शुद्ध नाहीं दिसे माजि रूप । नका वाढवूं सीण हा पुण्यपाप ॥ ४ ॥ करा वर्म ठावें नका सोंग वांया । तुका वीनवीतो पडों काय पायां । तुज पुत्र दारा धन वासना हे । मग ऊरलें शेवटीं काय पाहें ॥ ५ ॥

॥ ४७८ ॥

मना सांडि हे वासना दुष्ट खोडी । मती मानसीं एक हे व्यर्थ गोडी । असे हीत माझें तुज कांहीं एक । धरीं विठ्ठलीं प्रेम हें पायिं सूख ॥ १ ॥ ऐसा सर्वभावें तुज शरण आलों । देह दुःख हें भोगितां फार भ्यालों । भवतारिते दूसरें नाहीं कोणी । गुरू होत कां देव तेहेतीस तिन्ही ॥२॥ जना वासना हे धना थोरि आहे । तुज लागली संगती तेचि सोये । करी सर्व संगीं परित्यागु ठायीं । तुका वीनवीतो मस्तक ठेवोनि पायीं ॥ ३ ॥

॥ ४७९ ॥

ऐका संतजन उत्तरें माझे बोबडे बोल । करीं लाड तुह्मांपुढें हो कोणी ह्मणी कोपाल ॥ १ ॥ उपाय साधन आइका कोण गति अवगति । दृढ बैसोनी सादर तुह्मी धरावें चित्तीं ॥ २ ॥ धर्म तयासी घडे रे ज्याचे स्वाधीन भाज । कर्म तयासी जोडे रे भीत नाहीं लाज ॥ ३ ॥ पुण्य तें जाणा रे भाइनो परोपकाराचें । परपीडा पर

निंदा रे खरे पाप तयाचें ॥ ४ ॥ लाभ तयासी झाला रे मुखीं देव उच्चारी । प्रपंचापाठीं गुंतला रे हानी तयासीच थोरी ॥ ५ ॥ सुख तें जाणा रे भाइनो संतसमागम । दुःख तें जाणा रे भाइनो सम तेथें विषम ॥ ६ ॥ साधन तयासी साधे रे ज्याची स्वाधीन बुद्धि पराधीनासी आहे घात रे थोर जाण संबंधी ॥ ७ ॥ मान पावे तो आगळा मुख्य इंद्रियें राखे । अपमानी तो अधररसस्वाद चाखे ॥ ८॥ जाणता तयासी बोलिजे जाणे समाधान । नेणता तयासी बोलिजे वाद करी भूषण ॥९॥ भला तोचि एक जाणा रे गयावर्जन करी । बुरा धन नष्ट मेळवी परद्वार जो करी ॥ १० ॥ आचारी अन्न काढी रे गाई अतितभाग । अनाचारी करी भोजन ग्वाही नसतां संग ११ स्वहित तेणेंचि केलें रे भूतीं देखिला देव । अनहित तयाचें झालें रे आणी अहंभाव ॥ १२ ॥ धन्य जन्मा तेचि आले रे एक हरीचे दास । धिग ते विषयीं गुंतले केला आयुष्य नास ॥ १३ ॥ जो हरी तोचि एक जाणा रे जाणे सिद्धलक्षणें । वेडसर तो भुले रे वरदळभूषणें ॥१४॥ बाळे गाढा तोचि जाणा रे भक्ति दृढ शरीरीं । गांव्या तयासी बोलिजे एक भाव न धरी ॥ १५ ॥ खोल तो वचन गुरूचें जो गिळूनी बैसे । उथळ धीर नाहीं अंगीं रे म्हणे होईल कैसें ॥ १६ ॥ उदार तो जीवभाव रे ठेवी देवाचे पायीं । कृपण तयासी बोलिजे पडे उपाधिडाईं ॥१७॥ चांगलेंपण तेंचि रे ज्याचें अंतर शुद्ध । ओंगळ मळीन अंतरीं वाणी वाहे दुर्गंध ॥ १८ ॥ गोड तोचि एक आहे रे सार विठ्ठलनाम । कडु तो संसार रे लक्षचौ-र्‍याशीं जन्म ॥ १ ॥ तुका म्हणे मना धरीं रे संतसंगतिसोई । न-लगे कांहीं करावें राहे विठ्ठलपायीं ॥ २० ॥

नाट ॥ ४८० ॥

प्रथमारंभीं लंबोदर । सकळ सिद्धीचा दातार । चतुर्भुज फरश-धर । न कळे पार वार्णिता ॥ १ ॥ तो देव नटला गौरीबाळ । पायीं बांधोनी घागऱ्या घोळ । नारदतुंबर सहित मेळ । सुटला पळ वि-घ्नासी ॥ २ ॥ नटारंभीं थाटियला रंग । भुजा नाचवी हालवी अंग । सेंदुरविलेपनें चांग । मुगुटीं नाग मिरविला ॥ ३ ॥ जया मानवती देव ऋषिमुनि । पाहातां न पुरे डोळियां धणी । असुर जयाच्या चरणीं । आदि अवसानीं तोचि एक ॥ ४ ॥ सकळां सिद्धींचा दातार । जयाच्या रूपा नाहीं पार । तुका ह्मणे आमुचा दातार । भवसागर तारील हा ॥ ५ ॥

॥ ४८१ ॥

प्रथम नमन तुज एकदंता । रंगीं रसाळ वोढवीं कथा । मति सौरस करीं प्रबळता । जेणें फिटे आतां अंधकार १ तुझिये कृपेचें भरितें । आणीक काय राहिलें तेथें । मारग सिद्धाच्यानि पंथें । पाव-विसी तेथें तूंचि एक २ आरंभा आदि तुझें वंदन । सकळ करितां कारण । देव ऋषिमुनि आदिकरुन । ग्रंथ पुराण निर्माणी ३ काय वर्णूं तुझी गति । एवढी कैंची मज मति । दीनानाथ तूज ह्मणती । करीं सत्य वचन हेंचि आपुलें ४ मज वाहावतां मायेच्या पुरीं । बुडतां डोहीं भवसागरीं।तुजंवांचुनि कोण तारी।पाव झडकरी तुका ह्मणे॥५॥

॥ ४८२ ॥

श्रीअनंता मधुसूदना । पद्मनाभा नारायणा । जगव्यापका जना-र्दना । आनंदघना अविनाशा ॥१॥ सकळदेवाधिदेवा । कृपाळुवा जी केशवा । महानंदा महानुभावा । सदाशिवा सहजरूपा ॥ २ ॥ चक्रधरा विश्वंभरा । गरुडध्वजा करुणाकरा । सहस्रपादा सहस्र-करा । क्षीरसागरा शेषशयना ॥ ३ ॥ कमलनयना कमलापति । कामिनीमोहना मदनमूर्ति । भवतारका धरित्या क्षिती । वामनमूर्ति त्रिविक्रमा ॥४॥ अगा ये सगुणा निर्गुणा । जगज्जनीत्या जगज्जी-वना । वसुदेवदेवकीनंदना । बाळरांगणा बाळकृष्णा ॥ ५ ॥ तुका आला लोटांगणीं । मज ठाव द्यावा चरणीं । हेचि करीतसें विन-वणी । भवबंधनीं सोडवावें ॥ ६ ॥

॥ ४८३ ॥

अगा ये मधुसूदना माधवा । अगा ये कमळापति यादवा । अगा श्रीधरा केशवा । अगा बांधवा द्रौपदीच्या ॥१॥ अगा विश्वव्यापका जनार्दना । गोकुळवासी गोपिकारमणा । अगा गुणनिधि गुण-निधाना । अगा मर्दना कंसाचिया ॥२॥ अगा सर्वोत्तमा सर्वेश्वरा। गुणातीता विश्वंभरा । अगा निर्गुण निराकारा । अगा आधारा दीनांचिया ३ अगा उपमन्युसहाकारा । अगा शयना फणिवरा । अगा काळकृतांत असुरा । अगा अपारा अलक्षा ४ अगा वैकुंठनिवासा । अगा अयोध्यापति राजहंसा । अगा ये पंढरीनिवासा । अगा सर्वेशा सहजरूपा ५ अगा परमात्मा परमपुरुषा । अगा अव्यया जगदीशा । अगा कृपाळुवा आपुल्या । तोडी भवपाशा तुका ह्मणे ॥ ६ ॥

॥ ४८४ ॥

अगा ए सांवळ्या सगुणा । गुणनिधिनाम नारायणा । आमची परिसा विज्ञापना । सांभाळी दिना आपुलिया १ बहु या उदराचें

कष्ट । आह्मांसी केलें कर्मभ्रष्ट । तुमची चुकविली वाट । करीं वटवट या निमित्तें २ झालों पांगिला जनासी । संसारान्त्री आंदणी दासी । नकळे कधीं सोडविशी । दृढपाशीं बहु बांधलों ३ येथें तों नये आठव कांहीं । विसावा तो क्षण एक नाहीं । पडिलों आणिके प्रवाहीं । हित तों कांहीं दिसेचिना ॥४॥ जीवित्व वेचिलें वियोगें । हिंडतां प्रवास-वाउगें । कांहीं व्याधि पीडा रोगें । केलिया भोगें नडालोडी ५ माझा मींच झालों शत्रु । कैंचा पुत्र दारा कैंचा मित्रु । कासया घातला पसरु । अहो जगद्गुरु तुका ह्मणे ॥ ६ ॥

॥ ४८५ ॥

क्षीराब्धिवासा शेषशयना । लीलाविग्रहा गोपिकारमणा । स-गुणस्वरूप भक्तभूषणा । गुणनिधाना गुणरूपा ॥ १ ॥ अनंत अव-तार धरितिया । अखंडस्वरूपा करुणालया । अमरपालका देवराया । हरीं भवभया भक्तांचिया ॥ २ ॥ सर्वव्यापका सर्वातीता । गजेंद्र-रक्षका वैकुंठनाथा । भोळ्या भक्तांसी सौख्यदाता । तुजविण सर्वथा असेचिना ॥ ३ ॥ चित्तचालका चैतन्यघना । भक्तकैवारी असुर-मर्दना । भक्ताभिमानी नारायणा । जगज्जीवना पांडुरंगा ॥४॥ ब्रह्मादि-कांचा निजजनिता । सकळकारण अकर्ता । अणुरेणु व्याप्यभरिता । पावन पतिता तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ४८६ ॥

वासुदेवा दीनानाथा । कमललोचना श्रीअच्युता । निजभक्तांसी सौख्यदाता । तुजवीणें सर्वथा असेचिना ॥ १ ॥ विठ्ठला अनंता विश्वपति । विराटस्वरूपा वामनमूर्ति । ब्रह्मादिकर्ता वैकुंठपति । अगम्यस्थिति वेदशास्त्रा ॥ २ ॥ अद्वैतअखंडभरिता । विश्वबाहु अपरिमिता । विश्वचक्षु विश्वदेवता । आदिपिता ब्रह्मयाचा ॥३॥ भक्ताधीना भवभयभंगा । परमपुरुषा पांडुरंगा । अनादि अविनाश अंतरंगा । संगा असंगा वेगळाचि ॥ ४ ॥ हें विराटस्वरूप भोळिया भक्तांसी । सर्वथा न कळे हृषीकेशी । सगुणरूप धरनी त्यांसी । लावीं भजनासी तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ४८७ ॥

देवा तूं आमचा कृपाळ । भक्तप्रतिपाळ दीनदयाळ । माय तूं माउली स्नेहाळ । भार सकळ चालविसी ॥ १ ॥ तुज लागली सकळ चिंता । राखणें लागे वांकडें जातां । पुढती निरविसी संतां । नव्हे विसंबतां धीर तुज ॥२॥ आह्मां भय चिंता नाहीं धाक । जन्म मरण कांहीं एक । जाला इहलोकीं परलोक । आलें सकळ वैकुंठ ॥ ३ ॥

न कळे दिवस राती । अखंड लागलीसे ज्योति । आनंदलहरीची गति । वर्णूं किती तया सुखा ॥४॥ तुझिया नामाचीं भूषणें । तीं ये मज लेवविलीं लेणें । तुका ह्मणे तुझिया गुणें । काय तें उणें एक आह्मां ॥५॥

॥ ४८८ ॥

देवा तूं कृपाकरुणासिंधु । होसी मायबाप आमचा बंधु । जीवनसिद्धि साधनासिंधु । तोडिसी भवबंधु काळपाश ॥१॥ शरणागत वज्रपंजर । अभयदाना तूं उदार । सकळां देवा तूं अगोचर । होसी अविकार अविनाश ॥२॥ भागलीं स्तुति करितां फार । तेथें मी काय तें गव्हार । जाणावया तुझा हा विचार । नको अंतर देऊं आतां ॥३॥ नेणें भाव परि म्हणवी तुझा । नेणें भक्ति परि करितों पूजा । आपुल्या नामाचिया काजा । तुज केशीराजा लागे धांवणें ॥ ४ ॥ तुझिया बळें पंढरीनाथा । झालों निर्भर तुटली व्यथा । घातला भार तुझिया माथां । न भीं सर्वथा तुका म्हणे ॥ ५ ॥

॥ ४८९ ॥

ऐसी हे गर्जवूं वैखरी । केशव मुकुंद मुरारी । राम कृष्ण नामें बरीं । हरी हरी दोष सकळ ॥ १ ॥ जनार्दना जगजीवना । विराटस्वरूपा वामना । महदादि मधुसूदना । भवबंधना तोडितिया ॥ २ ॥ चक्रपाणी गदाधरा । असुरमर्दना वीर्यवीरा । सकळमुगुटमणि शूरा । अहो दातारा जगदानिया ॥३॥ मदनमूर्ति मनमोहना । गोपाळगोपिकारमना । नटनाट्यकौशल्य कान्हा । अहो संपन्ना सर्वगुणें ॥४॥ गुणवंता आणि निर्गुणा । सर्वसाक्षी आणि सर्वजाणा । करोनी अकर्ता आपणा । नेदी अभिमाना आतळों ॥५॥ कामयानें घडे याची सेवा । काय एक समर्पावें या देवा । वश्य तो नव्हे वांचूनी भावा । पाय जीवावेगळे न करी तुका ॥ ६ ॥

॥ ४९० ॥

विठ्ठल भीमातीरवासी । विठ्ठल पंढरीनिवासी । विठ्ठल पुंडलिकापासीं । कृपादानाविसीं उदार ॥१॥ विठ्ठल स्मरणा कोंवळा । विठ्ठल गौरवीं आगळा । आधार ब्रह्मांडा सकळा । विठ्ठल लीलाविग्रही ॥२॥ उभाच्चि परि न मानी सीण । नाहीं उद्धरितां भिन्न । समर्थाचे घरीं एकच्चि अन्न । आर्तभूता क्षणोद्धरण। सांभाळी ॥३॥ रुचीचे प्रकार । आणिताती आदरें । कोठें ही न पडे अंतर । थोरां थोर धाकुट्यां धाकुटा ॥४॥ करितां बळ धरितां नये । झांकितां डोळे मनेंच होय । आपुल्या उद्देशाची सोय । जाणे हृदयनिवासी ॥ ५ ॥ पान्हा तरी आल्या अंतर तेथें । तों नाहीं भरिलें रितें । करितां सेवन आइतें । तुका चित्तें चित्त मेळवूनी ॥ ६ ॥

॥ ४९१ ॥

विठ्ठल आमचें जीवन । आगमनिगमाचें स्थान । विठ्ठल सिद्धीचें साधन । विठ्ठल ध्यान विसावा ॥१॥ विठ्ठल कुळींचें दैवत । विठ्ठल वित्त गोत चित्त । विठ्ठल पुण्य पुरुषार्थ । आवडे मात विठ्ठलाची ॥ २ ॥ विठ्ठल विस्तारला जनीं । सप्तही पाताळें भरूनी । विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं । विठ्ठल मुनिमानसीं ॥ ३ ॥ विठ्ठल जीवाचा जिव्हाळा । विठ्ठल कृपेचा कोंवळा । विठ्ठल प्रेमाचा पुतळा । लाविियेले चाळा विश्व विठ्ठलें ॥ ४ ॥ विठ्ठल बाप माय चुलता । विठ्ठल भगिनी आणि भ्राता । विठ्ठलेंविण चाड नाहीं गोता । तुका म्हणे आतां नाहीं दुसरें ॥ ५ ॥

॥ ४९२ ॥

तुळसी माळा घालुनी कंठीं । उभा विटेवरी जगजेठी । अवलोकोनी पुंडलीका दृष्टी । असे भीमातटीं पंढरीराय ॥ १ ॥ भुक्तिमुक्ति जयाच्या कामारी । रिद्धिसिद्धि वोळगनी द्वारीं । सुदर्शन घरटी करीं । काळ कांपे दुरी धाकें तया ॥ २ ॥ जगज्जननी असे वाम भागीं । भीमकी शोभली अर्धांगीं । जैसी विद्युल्लता झमके मेघीं । दरुषणें भंगी महा दोष ॥ ३ ॥ सुखसागर परमानंदु । गोपी गोपाळां गोधनां छंदु । पक्षिश्वापदां जयाचा वेधु । वाहे गोविंदु पावा छंदें ॥ ४ ॥ मुगुटमंडित चतुर्भुजा । मनमोहन गरुडध्वजा । तुका ह्मणे स्वामी माझा । पावे भक्तकाजा लवलाहीं ॥ ५ ॥

॥ ४९३ ॥

सेंदरीं हें देवी दैवतें । कोण तीं पुजी भूतें केतें । आपुल्या पोटा जीं रडतें । मागती शितें अवदान ॥१॥ आपुलें इच्छे आणिकां पीडी । काय तें देईल बराडी । कळो ही आली तयाची जोडी । अल्प रोकडी बुद्धि अधरा ॥२॥ दासीचा पाहुणेर उसीनें । धणी देईल आपुल्या हातें । करुणाभाषण उचितें । हें तों रितें सतत शक्तिहीन ॥३॥ काय तें थिल्लरीचें पाणी । ओंठ न भिजे न फिटे धणी । सीण तरी जाणी अवसानीं । क्षोभे पुरश्चरणीं दिलें फळ ॥४॥ विलेपनें बुजविलें तोंड । भार खोल वाहाती उदंड । करविती आपणया दंड । वेसियास भांड ह्मणे देव तो ॥५॥ तैसा नव्हे नारायण । जगव्यापक जनार्दन । तुका ह्मणे त्याचें करा चिंतन । चरण येती सकळें ॥६॥

॥ ४९४ ॥

बरवें झालें आलों जन्मासी । जोड जोडिली मनुष्य देहा ऐसी । महालाभाची उत्तम रासी । जेणें सर्व सुखासी पात्र होईजे ॥१॥ दिली

इंद्रियें हात पाय कान । डोळे मुख बोलावया वचन । जेणें तूं जोडसी नारायण । नासे जीवपण भवरोग ॥२॥ तिळेंतिळ पुण्य सांच पडे । तरि हें बहुतां जन्मीं जोडे । नाम तुझें वाचेसी आतुडे । समागम घडे संतांचा ॥३॥ ऐसिये पावविलों ठायीं । आतां मी काई होऊं उतराई । येवढा जीव ठेवीन पायीं । तूं माझे आई पांडुरंगे ॥४॥ फेडियेला डोळियांचा कवळ । धुतला गुणदोषांचा मळ । लावूनी स्तनीं केलों सितळ । निजाविलों बाळ निजस्थानीं ॥५॥ नाहीं या आनंदासी जोडा । सांगतां गोष्टी लागती गोडा । आला आकारा आमुच्या चाडा । तुका ह्मणे भिडा भक्ताचिया ॥६॥

॥ ४९५ ॥

बरें झालें आजीवरी । नाहीं पडिलों मृत्यूचे आहारीं । वांचोन आलों पथवरी । उरलें तें हरी तुम्हां समर्पण ॥१॥ दिला या काळें अवकाश । नाहीं पावलें आयुष्यनाश । कार्या कारण उरलें शेष । गेलें तें भूस जावो परतें ॥ २ ॥ बुडणें खोटें पावतां थडी । स्वप्नीं झाली ओढाओढी । नासली जागृतीची घडी । साच जोडी शेवटीं गोड घास ॥ ३ ॥ तुम्हांसी पावविली हांक । तेणें निरसला धाक । तुमचें भातें हें कवतुक । जे शरणागत लोक रक्षावे ॥४॥ रवीच्या नांवें निशीचा नाश । उदय होतांचि प्रकाश । आतां कैंचा आम्हां दोष । तूं जगदीश कैवारी ॥५॥ आतां जळो देह सुख दंभ मान । न करी याचें साधन । तूं जगदीश नारायण । आलों शरण तुका म्हणे ६

॥ ४९६ ॥

मागुता हाचि जन्म पावसी । भोगिलें सुखदुःख जाणसी । हे तों न घडे रे सायासीं । कां रे अंध होसी जाणोनिया ॥ १ ॥ लक्ष चौऱ्याशी न चुके फेरा । गर्भवासी यातना थोरा । येऊनी पडती संदेहपुरा । वोळसा थोर मायाजाळीं ॥२॥ पशु काय पापपुण्य जाणती । उत्तम मध्यम भोग भोगिती । कांहीं एक उपजतां मरती । बाहिरीं अंध होती पांगुळ मुकीं ॥३॥ नरदेह निधान लागलें हातीं । उत्तम सार उत्तम गति । होईन देवाचि म्हणती ते होती । तरि कां चित्तीं न धरावें ॥४॥ क्षण एक मन स्थिर करूनी । सावध होई डोळे उघडोनी । पाहे वेद बोलिले पुराणीं । तुका विनवणी करीतसे ॥ ५ ॥

॥ ४९७ ॥

जंव हें सकळ सिद्ध आहे । हात चालावया पाय । तंव तूं आपुलें स्वहित पाहे । तीर्थयात्रे जाये चुको नको ॥ जंव काळ असे दुरी ठेला । तंव तूं हरिगुण गाये आइक वहिला । मनीं भाव धरूनी

भला । न वंचे त्याला चुको नको ॥ २ ॥ जोडोनी धन न घाली माती । ब्रह्मवृंदें पूजन यती । सत्य आचरण दया भूतीं । करी सांगाती चुको नको ॥ ३ ॥ दशा यौवन बाणली अंगीं । पांगिला नव्हे विषयसंगीं । काम क्रोध लोभ मोह त्यागी । राहे संतसंगीं चुको नको ॥४॥ मग तेथें न चले कांहीं । सत्ता संपदा राहेल ठायींच्या ठायीं । पुढें संचित जाईल ग्वाही । तुका ह्मणे तेही यमआज्ञा ॥ ५ ॥

॥ ४९८ ॥

शरीर दुःखाचें कोठार । शरीर रोगाचें भांडार । शरीर दुर्गंधीची थारा । नाहीं अपवित्र शरीरा ऐसें । शरीर उत्तम चांगलें । शरीर सुखाचें घोंसुलें । शरीरें साध्य होय केलें । शरीरें साधलें परब्रह्म ॥ २ ॥ शरीर विटाळाचें आळें । मायामोहपाश जाळें । पतन शरीराच्या मुळें । शरीर काळें व्यापिलें ॥ ३ ॥ शरीर सकळ ही शुद्ध । शरीर निर्धाचाही निध । शरीरें तुटे भवबंध । वसे मध्यें भोगी देव शरीरा ॥ ४ ॥ शरीर अविद्येचा बांधा । शरीर अवगुणांचा रांधा । शरीरीं वसे बहुत बाधा । नाहीं गुणसुधा एक शरीरीं ॥ ५ ॥ शरीरा सुख नेदावा भोग । न द्यावें दुःख न करी त्याग । नव्हे वोखटें ना चांग । तुका ह्मणे वेग करी हरिभजनीं ॥ ६ ॥

॥ ४९९ ॥

बहुत जाचलों संसारीं । वसे गर्भीं मातेच्या उदरीं । लक्ष चौऱ्याशी योनिद्वारीं । झालों भिकारी याचक ॥१॥ जिणें पराधीन आणिकां हातीं । दृढ पाशीं बांधलों संचितीं । प्रारब्ध क्रियमाण सांगाती । भोवंडिती सत्ता आपुलिया ॥२॥ न भरे पोट नाहीं विसांवा । नाही नेम ठाव गांवा । नाहीं सत्ता न फिरे ऐसी देवा । लाही जीवा खापरीं तडफडी ॥३॥ काळ बहुत गेले ऐसिया रीती । आणीक पुढेंही नेणों किती । खंडणा नाहीं पुनरावृत्ति । मज कल्पांतीं तरी वेगळें ॥४॥ ऐसें दुःख कोण हरील माझें । कोणा भार घालूं आपुलें ओझें । भवसिंधु तारक नाम तुझें । धांवसी काजें आडलिया ॥५॥ आतां धांव घाली नारायणा । मजकारणें रंका दीना । गुण न विचारी अवगुणा । तुका करुणा भाकीतसे ॥६॥

॥ ५०० ॥

संसारसिंधु हा दुस्तर । नुलंघवे उलंघितां पार । बहुत वाहाविलें दूर । न लगेचि तीर पैल थडी ॥१॥ किती जन्म झाला फेरा । गणित नाहीं जी दातारा । पडिलों आवर्तीं भोवरा । बहुता थोरा वोळसिया ॥२॥ वाढलों परि नेणती बुद्धि । नाहीं परतली धरिली

शुद्धि । मग म्यां विचारावें कधीं । ऐसी संधि सांडुनिया ॥ ३ ॥ अनेक खाणी आहार निद्रा । भयमैथुनाचाचि थारा । बालत्व तारुण्य जरा । प्रधान पुरा भोग तेथें ॥४॥ ऐसीं उलंघुनी आलों स्थळें । बहु भोवंडिलों काळें । आतां हें उगवावें जाळें । उजेडाचे बळें दिवसाच्या ॥५॥ सांडीन या संसाराची वाट । बहु येणें भोगविलें कष्ट । दावी सत्य ऐसें नष्ट । तुका म्हणे भ्रष्ट झालों देवद्रोही ॥ ६ ॥

॥ ५०१ ॥

विषयओढीं भुललें जीव । आतां यांची कोण करील कींव । नुपजे नारायणीं भाव । पावोनी ठाव नरदेह ॥१॥ कोण सुख धरोनी संसारीं । पडोनी काळाचे आहारीं । माप या लागलें शरीरीं । झालियावरी सळे वोढिती ॥२॥ बापुडीं होतील शेवटीं । आयुष्याचे झालिया तुटी । भोगिले मागें पुढें ही कोटी । होईल भेटी जन्मासी ॥३॥ जुंतिलें घाणा बांधोनि डोळे । मागें जोडी आर तेणेंही पोळे । चालिलों किती तें न कळे । दुःखें आरंबळे भूक तान ॥४॥ एवढें जयाचें निमित्त । प्रारब्ध क्रियमाण संचित । तें हें देव मानूनी अनित्य । न करिती नित्य नामस्मरण ५ तुका म्हणे न वेंचतां मोल । तो हा यासी महाग विठ्ठल । वेंचितां फुकाचेचि बोल । केवढें खोल अभागिया ६ ॥

॥ ५०२ ॥

इतकें करीं भलत्या परी । परद्रव्य परनारी । सांडुनी अभिलाष अंतरीं । वर्ते वेव्हारीं सुखरूप ॥ १ ॥ न करी दंभाचा सायास । शांती राहे बहुवस । जिव्हे सेवी सुगंधरस । न करी आळस रामनामीं ॥ २ ॥ जनमित्र होईं सकळांचां । अशुभ न बोलावी वाचा । संग न धरावा दुर्जनाचा । करी संतांचा सायास ॥ ३ ॥ करिसी देवाविन आस । अवघी होईल निरास । तृष्णा वाढविसी बहुवस । कधीं सुखास न पवसी ॥४॥ धरूनी विश्वास करी धीर । करितां देव हाचि निर्धार । तयाचा वाहे योगक्षेमभार । नाहीं अंतर तुका ह्मणे ॥ ५

॥ ५०३ ॥

कैसी करूं तुझी सेवा । ऐसें सांगावें जी देवा । कैसा आणूं अनुभवा । होती ठावा कैशापरी ॥ १ ॥ कर्मभ्रष्ट माझें मन । नेणें जप तप अनुष्ठान । नाहीं इंद्रियांसी दमन । नव्हे मन एकविध ॥ २ ॥ नेणें यातीचा आचार । नेणें भक्तीचा विचार । मज नाहीं संतांचा आधार । नाहीं स्थिर बुद्धि माझी ॥३॥ न सुटे मायाजाळ । नाहीं वैराग्याचें बळ । न जिंकवती सबळ । काम क्रोध शरीरीं ॥ ४ ॥ आतां राख कैसें तरी । मज नुपेक्षावें हरी । तुझीं ब्रीदें चराचरीं । तैसीं साच करीं तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ५०४ ॥

काय आह्मी भक्ति करणें कैसी । काय एक व्हावें तुह्मांसी । अवघा भरोनी उरलासी । वाणीं खाणीं रसीं रूपीं गंधीं १ कसें करूं इंद्रियां बंधन । पुण्यपापाचें खंडण । काय मन करूं आचरण । काय तुजविण उरलें तें २ काय डोळे झांकूनियां पाहूं । मंत्रजप काय ध्याऊं । कवणे ठायीं धरूनी भाव । काय तें वाव तुजविण ३ काय हिंडों कवण दिशा । कवणे ठायीं पाय ठेवूं कैसा । काय तूं नव्हेसी न कळे ऐसा । काय मी कैसा पाहों आतां ४ तुझिया नामाची सकळ । पूजा अर्चन मंत्र माळ । धूप दीप नैवेद्य फळ तांबूल । घेऊं पुष्पांजुळ तुका ह्मणे ५

॥ ५०५ ॥

आले हो संसारा तुह्मी एक करा । मुक्तिमारग हळुचि धरा । काळदंड कुंभयातना थोरा । कां रे अघोरा द्यावसी ना ॥१॥ नाहीं त्या यमासी करुणा । बाहेर काढितां कुडी प्राणा । ओढाळ सांपडे जैं धान्या । चोर यातना धरिजेला ॥२॥ नाहीं दिलें पावेल कैसा चालतां पंथ तेणें वळसा । नसेल ठाउकें ऐकतो कैसा । नेती बंद जैसा धरोनिया ॥३॥ क्षण एक नागीवा पायीं । न चलवे तया करितां कांहीं । ओढिती कांटवणा सोई । आग्निस्तंभी बाही कवटाळविती ॥४॥ देखोनि अंगे कांपती । नये नदीमाजी चालविती । लागे ठाव न लगे बुडविती । वरि मारिती यमदंड ॥५॥ तानभूक न साहवे वेळ । तो राखिती कितीएक काळ । पिंड पाळुनी कैसा सीतळ । तो तप्तभूमीं ज्वाळ लोळविती ॥६॥ ह्मणउनी करा कांहीं सायास । व्हावेल तर व्हारे उदास । करवेल तर करा नामघोष । सेवा भक्तिरस तुका ह्मणे ॥७॥

॥ ५०६ ॥

हेंचि भवरोगाचें औषध । जन्म जरा तुटे व्याध । आणीक कांहीं नव्हे बाध । करील वध षड्वर्गा ॥ १ ॥ सांवळें रूप ल्यावें डोळां । सा चौ अठरांचा गोळा । पद्र लागों नेदी खळा । नाममंत्र माळा विष्णुसहस्र ॥ २ ॥ भोजना न द्यावें अन्न । जेणें चुके अनुपान । तरीच घेतल्याचा गुण । होईल जाण सत्य भाव ॥ ३ ॥ नये निघों आपुलिया घरा । बाहेर लागों नये वारा । बहु बोलणें तें सारा । संग दुसरा वर्जावा ॥ ४ ॥ पासि तें एक घ्यावें वरी । नवनीताची होईल परी । होईल गुसळिलें तें नियारी । सार भीतरी नाहीं तया ॥ ५ ॥ न्हाये अनुतापीं पांघरे दिशा । स्वेद निघों दे अवघी आशा । होसील मागें होतासी तैसा । तुका ह्मणे दशा भोगी वैराग्य ॥ ६ ॥

॥ ५०७ ॥

अवघ्या दशा येणें साधती । मुख्य उपासना सगुणभक्ति । प्रगटे हृदयींची मुर्ति । भावशुद्धि जाणोनिया ॥१॥ बीज आणि फळ हरीचें नाम । सकळ पुण्य सकळ धर्म । सकळां कळांचे हें वर्म । निवारी श्रम सकळही ॥२॥ जेथें कीर्तन हें नामघोष । करिती निर्लज्ज हरीचे दास । सकळ वोथंवले रस । तुटती पाश भवबंधाचे ॥ ३ ॥ येती अंगा वसती लक्षणें । अंतरीं देवें धरिलें ठाणें । आपणाचि येती तयाचे गुण । जाणें येणें खुंटे वस्तीचें ॥ ४ ॥ न लगे सांडावा आश्रम । उपजले कुळींचे धर्म । आणीक न करावे श्रम । एक पुरे नाम विठोबाचें ॥ ५ ॥ वेदपुरुष नारायण । योगियांचें ब्रह्म शून्य । मुक्त आतमा परिपूर्ण । तुका ह्मणे सगुण भोळ्या आह्मां ॥ ६ ॥

॥ ५०८ ॥

होतों तें चिंतीत मानसीं । नवस फळले नवसीं । जोडिते नारायणा ऐसी । अविट ज्यासी नाश नाहीं ॥ १ ॥ धरिले जिवीं न सोडीं पाय । आलें या जिवित्वाचें काय । कैं हे पाविजेती ठाय । लाविली सोय संचितानें ॥ २ ॥ मज तों पडियेली होती भुली । चित्ताची अपसव्य चाली । होती मृगजळें गोवी केली । दृष्टि उघडली बरें झालें ॥३॥ आतां हा सिद्धि पावो भाव । मध्यें चांचलें न व्हावा जीव । ऐसी तुम्हां भाकीतसे कीव । कृपाळुवा जगदानिया ॥४॥ कळों येतें आपुले बुद्धि । ऐसें तों न घडते कधीं । केवढे आघात ते मधीं । लज्जा रिद्धी उभी आड ठाके ॥ ५ ॥ कृपा या केली संतजनीं । माझी अळंकारिली वाणी । प्रीति हे लाविली कीर्तनीं । तुका चरणीं लोळतसे ॥ ६ ॥

॥ ५०९ ॥

बरवा झाला वेवसाव । पावलों चिंतिलाचि ठाव । दृढ पायीं राहिला भाव । पावला जीव विश्रांति ॥१॥ बरवा फळला शकुन । अवघा निवारिला सीण । तुमचें झालिया दरूषण । जन्ममरण नाहीं आतां ॥२॥ बरवें झालें आलों या ठाया । होतें संचित ठायींचा पाया । देहभाव पालटलीं काया । पडली छाया ब्रह्मींची ॥३॥ जोडिलें हें नसरे धन । अविनाश आनंदघन । अमूर्तमूर्ति मधुसूदन । समचरण देखियेले ॥४॥ जुनाट जुगादिचें नाणें । बहुता काळाचें ठेवणें । लोपलें होतें पारिखेपणें । ठावचळण चुकविला ॥५॥ आतां या जीवाचियासाठीं । नसुटे पडलीया मिठी । तुका ह्मणे सीणलों जगजेठी । नलवीं दिठी दुसऱ्याची ॥६॥

॥ ५१० ॥

चांगलें नाम गोमटें रूप। निवती डोळे हरती ताप। विठ्ठल विठ्ठल हा जप। प्रगट स्वरूप अति सार ॥१॥ शस्त्र हें निर्वाणींचा बाण। निकट समय अवसान। कोठें योजेल दशदान। खंडी नारायण दुःख चिंतनें ॥२॥ सकळ श्रेष्ठांचें मत। पावे सिद्धी पाववी अनंत। ह्मणोनि व्हावे शरणागत। आहे उचित एवढेंचि ॥३॥ ह्मणोनी रुसलों संसारा। सर्प विखार हा पांढरा। तुजशीं अंतर रे दातारा। याचि दावेदारानिमित्त ॥४॥ येणें मज भोगविल्या खाणी। नसता छंद लाविला मनीं। भाजलों मी माझे भ्रमणीं। झाली बोडणी विटंबना ॥५॥ पावलों केलियाचा दंड। खाणी भोगिल्या उदंड। आतां केला पाहिजे खंड। तुका दंडवत घाली देवा ॥६॥

॥ ५११ ॥

ताप हें हरण श्रीमुखें। हरी भवरोगा ऐसें दुःख। अवलोकितां उपजे सुख। उभें सन्मुख दृष्टीपुढें ॥१॥ न पुरे डोळियांची धणी। सखोल कृपेचीच खाणी। स्तवितां न पुरे वेदवाणी। तो हा समचरणीं कृपानिधि ॥२॥ रामकृष्ण ध्यान वामननारसिंही। उग्र आणि सौम्य कांहींच नाहीं। सांपडे भरलीये वाही। भाव शुद्ध पाही याचे भातुकें ॥३॥ गुणगंभीर चतुर सुजाण। शूर धीर उदार नारायण। व्यापक तरी त्रिभुवन। मनमोहन लावण्य हें ॥४॥ ठाण हें साजिरें सुंदर। अविनाश अविकार। अनंत आणि अपार। तो हा कटी कर धरिताहे ॥५॥ जयाची वाणी सुमनमाळा। परमामृत जिव्हाळा। अनंता अंगीं अनंत कळा। तुका जवळा चरणसेवक ॥६॥

॥ ५१२ ॥

अखंडक्षीराब्धी भरितें आलें। अध्यात्मविद्येचें भांडार उघडिलें। सूर्यकोटीस तेज फांकलें। ध्यानीं प्रगटलें भक्तांचिया ॥ १ ॥ अनादि ब्रह्मज्ञानाचें गुज। श्रवणीं अवचित पडिलें सहज। परम निर्वाणाचें बीज। गुंडाळिलें निज सर्व भाग्यें ॥ २ ॥ मंत्र महामंत्र मंगळनिधि। सत्संग दर्शन प्रगटलें आधी। वैराग्यविवेकाची बुद्धि। नामामृतासिद्धी साधिलें तें ॥ ३ ॥ क्षमा दया शांतीचे निजसुख। सच्चित्सुखें बोलिला पुंडलीक। अनंतसुखाचा हारिख। उगवला देख पंढरिये ॥ ४ ॥ नेणें भवभक्तीची निरपेक्षता। नेणें भूतदयेची ममता। तुका ह्मणे पंढरीनाथा। संग साधुसंतां देई आतां ॥ ५ ॥

॥ ५१३ ॥

हरि तैसे हरिचे दास। नाहीं तया भय मोह चिंता आस।

होऊनि राहाती उदास । वळकट कांस भक्तीची ॥ १ ॥ धरूनी पाय त्यजिलें अन्न । नलगे मान मृत्तिका धन । कंठी नामामृताचें पान । नलगे आन ऐसें झालें ॥ २ ॥ वाव तरी उदंडच पोटीं । धीर सिंधु ऐसे जगजेठी । कामक्रोधा न सुटे मिठी । गिन्हे तरी वेठीं राबविती ॥ ३ ॥ बळें तरी नागवती काळा । लीन तरी सकळांच्या तळा । उदार देहासी सकळां । जाणोनी कळा सर्व नेणते ॥ ४ ॥ संसार तो तयांचा दास । मोक्ष तो पाहानसे वास । रिद्धिसिद्धि देशवटा त्रास । न शिवती यास वैष्णवजन ॥ ५ ॥ जन्ममृत्युस्वप्नांसारिखें । आप त्यां न दिसे पारखें । तुका म्हणे अखंडित सुखें । वाणी वदे मुखें प्रेमामृताची ॥ ६ ॥

॥ ५१४ ॥

मज ते हांसतील संत । जींहीं देखिलेती मूर्तिमंत । म्हणोनी उद्वेगलें चित्त । आहाच भक्त ऐसा दिसे ॥ १ ॥ ध्यानीं म्यां वर्णावेती कैसें । पुढें एकीं स्तुति केली असे । तेथूनी जीव निघत नसे । ऐसिये आसे लागलोंसें ॥ २ ॥ कासया पाडिला जी धडा । उगाचि वेडा आणि वांकडा । आह्मां लेकरांशी पीडा । एक मार्गे जोडा दुसऱ्याचा ॥ ३ ॥ सांगा कोणाचा अन्याय । ऐसें मी धरितसें पाय । तूं तंव समचि सकळां माय । काय अन्याय एक माझा ॥ ४ ॥ नये हा जरी कारणा । तरी कां व्यालेती नारायणा । वचन द्यावें जी वचना । मज अज्ञाना समजावी ॥ ५ ॥ बहुत दिवस केला बोभाट । पाहातां श्रमलों ते वाट ॥ तुका ह्मणे विस्तारलें ताट । काय वीट आला नेणों स्वामी ॥ ६ ॥

॥ ५१५ ॥

कां हो माझा मानियेला भार । ऐसा दिसतसे फार । अनंत पावविलीं उद्धार । नव्हेचि थार मज शेवटीं ॥ १ ॥ पाप बळिवंत गाढें । तुज ही राहो सकतें पुढें । माणील कांहीं राहिलें ओढें । नवल केवढें देखियेलें ॥ २ ॥ काय मानिती संतजन । तुमचें हीनत्ववचन । कीं वृद्ध झाला नारायण । नचले पण आधील तो ॥ ३ ॥ आतां न करावी चोरी । बहुत न धरावें दुरी । पडदा काय घरच्या घरीं । धरिलें दुरी तेव्हां धरिलें ॥ ४ ॥ नको चाळवूं अनंता । कासया होतोसी नेणता । काय तूं नाहीं धरीत सत्ता । तुका ह्मणे आतां होईं प्रगट ॥ ५ ॥

॥ ५१६ ॥

दास्य करी दासांचें । उणें न साहे तयांचें । वाढिलें ठायींचें ।

भाणें टाकोनियां धांवे ॥ १ ॥ ऐसा कृपेचा सागर । विटे उभा कटीं कर । सर्वस्वें उदार । भक्तांलागीं प्रगटे ॥ २ ॥ हृदयीं श्री-वत्सलांछन । मिरवी भक्तांचें भूषण । नाहीं तयाचा सीण । सुख धरिलें लातेचें ॥ ३ ॥ सत्यभामा दान करी । उज्जुर नाहीं अंगी-कारी । सेवकाच्या शिरीं । धरूनी चाले पादुका ॥४॥ राखे द्वार-वंटा बळीचा । सारथी झाला अर्जुनाचा । दास सेवकांचा । होय साचा अंकित ॥ ५ ॥ भिडे न बोलवे पुंडलीकाशीं । उभा मर्यादा पाठीशीं । तुका ह्मणे ऐसी । कां रे न भजा माउली ॥ ६ ॥

॥ ५१७ ॥

चांगला तरी पूर्णकाम । गोड तरी याचेंचि नाम । दयाळू तरी अवघा धर्म । भला तरी दासा श्रम होऊं नेदी ॥१॥ उदार तरी ल-क्ष्मीयेसी । झुंझार तरी कळिकाळासी । चतुर तरी गुणांचीच रासी । जाणतां तयासी तो एक ॥२॥ जुनाट तरी बहु काळा । न कळे ज-याची लीळा । नेणता गोवळीं गोवळा । लाघवी अबला भुलवणा ॥३॥ गांव्या तरी भावाचा अंकित । वराडी तरी उच्छिष्टाची प्रीत । ओंगळ तरी कुब्जेशीं रत । भ्याड अनंत बहु पापा ॥४॥ खेळतो येणेंचि खे-ळावा । नट तो येणेंचि आवगावा । लपोनी जीवीं न कळे जीवा । धरितां देवा नातुडसी ॥५॥ उंच तरी बहुताचि उंच । नीच तरी बहु-ताचि नीच । तुका ह्मणे बोलिलों साच । नाहीं अह्मांच पूजा केली ॥६॥

॥ ५१८ ॥

अखंडकर्मा कर्मप्रकाशका । मजसाठीं कां रे झालासी मुका । धर्माधर्मप्रतिपाळका । सर्वचाळका सर्वातीता ॥ १ ॥ न देखसी वर्णाश्रममर्यादा । त्याचा सर्वस्वें करिसी कामधंदा । कधीं न लाजसी तूं गोविंदा । कां रे मुकुंदा बोल आतां ॥२॥ मत्स्यकूर्मादि अवतारांसाठीं । श्रमले असतील जगजेठी । करितां घडमोड सृष्टी । झालासी कष्टी काय जाणें ॥ ३ ॥ किती म्यां विनवावें श्रीपति । पुन्हा पुन्हा यावें काकुळती । पुरे आतां तुझी संगति । करुणामूर्ति काय झाले ॥४॥ काय म्यां तुजसी करावें आतां । कां रे कोपलासी पंढरीनाथा । सकळ दुःखनिवारिता । पायन पतिता तुका ह्मणे ॥५॥

॥ ५१९ ॥

तूंचि अनाथाचा दाता । दुःख मोह नासावया चिंता । शरण आलों तुज आतां । तारी कृपावंता मायबापा ॥ १ ॥ संतसंगति देई चरणसेवा । जेणें तुझा विसर न पडावा । हाच भाव माझिया जीवा । पुरवीं देवा मनोरथ ॥ २ ॥ मज भाव प्रेम देई कीर्ति ।

गुण नाम वर्णावया स्तुति । विघ्ना सोडवूनी हातीं । विनंति माझी परिसावी हे ॥ ३ ॥ आणीक कांहीं नाहीं मागणें । सुखसंपत्तिराज्यचाड धनें । सांकडे न पडे तुज जेणें । दुजे भक्तिविण मायबापा ॥ ४ ॥ जोडोनिया कर पायीं ठेवी माथा । तुका विनवी पंढरीनाथा । रंगीं वोढवावी रंगकथा । पुरवी देवा मनोरथा ॥५॥

॥ ५२० ॥

तुझिया पार नाहीं गुणां । माझी अल्प मति नारायणा । भवतारका सुजाणा । एक विज्ञापना पायापाशीं ॥ १ ॥ काय जाणावें म्यां दीनें । तुझिये भक्तीचीं लक्षणें । धड तें तोंड धुऊं नेणें । परि चिंतनें काळ सारीं ॥ २ ॥ न लवीं आणीक कांहीं पिसें । माझिया मना वायां जाय ऐसें । चालवीं आपुल्या प्रकाशें । हातीं सरिसें धरोनियां ॥ ३ ॥ तुज समर्पियेली काया । जीवेंभावें पंढरीराया । सांभाळी समविषम डाया । करी छाया कृपेची ॥ ४ ॥ चतुर तरी चतुरा राव । जाणता तरी जिवांचा जीव । न्यून तो कोण एक ठाव । आरूष भाव परि माझा ॥ ५ ॥ होतें तें माझें भांडवल । पायापें निवेदिलें बोल । आदरा ऐसें पाविजे मोल । तुका म्हणे साच फोल तूं जाणसी ॥ ६ ॥

॥ ५२१ ॥

बरवें झालें लागलों कारणीं । तुमचे राहिलों चरणीं । फेडीन संतसंगती धणी । गर्जइल गुणीं वैखरी ॥ १ ॥ न वंचे शरीर सेवेसी । काया वाचा आणि मनेसीं । झालों संताची आंदणी दासी । केला याविशीं निर्धार ॥ २ ॥ जीवनीं राखिला जिव्हाळा । झालों मी मजसीं निराळा । पंचभूतांचा पुतळा । सहज लीळा वर्ततसे ॥ ३ ॥ जयाचें जया होईल ठावें । लाहो या साधियेला भावें । ऐसें होतें राखियलें जीवें । येथूनी देवें भोवहुनी ॥ ४ ॥ आस निरसली ये खेपे । अवघे पंथ झाले सोपे । तुमचे दीनबंधु कृपें । दुसरें कांपे सत्ताधाके॥५॥ अंकिलेपणें आनंदरूप । आतळों नये पुण्य पाप । सारूनी ठेविले संकल्प । तुका ह्मणे आपेआप एकाएकीं ॥६॥

॥ ५२२ ॥

हातीचें न संडावें देवें । शरण आलों जीवें भावें । आपुलें ऐसें ह्मणावें । करितों जीवें निंबलोण ॥ १ ॥ बैसतां संतांचे संगतीं । कळों आलें कमळापति । आपुलीं कोणीच नव्हती । निश्चय चित्तीं दृढ झाला ॥ २ ॥ येती तुझिया भजना आड । दाविती प्रपंचाचें कोडें । कानिष्टीं रुचि ठेवूनि गोड । देखत नाड कळतसे ॥ ३ ॥

मरती मेलीं नेणों किती । तोचि लाभ तयाचे संगती । ह्मणोनि येतों काकुलती । धीर तो चित्तीं दृढ घावा ॥ ४ ॥ सुखें निंदोत हे जन । न करीं तयांशीं वचन । आदिपिता तूं नारायण । जोडी चरण तुमचे ते ॥५॥ आपलें आपण न करूं हित । करूं हें प्रमाण संचित । तरी मी नष्टांचि पतित । तुका ह्मणे मज संत हांसती ॥६॥

॥ ५२३ ॥

न पवे सान्निध वाटते चिंता । वरिया शत्रुतांची सत्ता । गुंतोब पडत जातो गुंता । कर्मा बळिवंता सांपडलों ॥ १ ॥ बहु भार प-डियेला शिरीं । मी हें माझे मजवरी । उघड्या नागविलों चोरीं । घरिंच्याघरीं जाण जाणता ॥ २ ॥ तुज मागणें इतुलें आतां । मज या निरवावें संतां । झाला कण्ठस्फोट आठवितां । उदास आतां न करावें ॥ ३ ॥ अति हा निकट समय । मग स्या करावें तें काय । दिवस गेलिया ठाकईल छाय । उरईल हाय रात्रीकाळीं ॥ ४ ॥ होईल संचिताची सत्ता । अंगा येईल पराधीनता । ठाव तो न दिसे लपतां । बहुत चिंता प्रवर्तली ॥ ५ ॥ ऐसी या संकटाचे संधी । धांव घालावी कृपानिधि । तुका म्हणे माझी बळबुद्धि । सकळ सिद्धि पाय तुझे ॥ ६॥

॥ ५२४ ॥

सर्व सुखाचिया आशा जन्म गेला । क्षण मुक्ती यत्न नाहीं केला । हिंडतां दिशा शिणि पावला । माया वेष्टिला जीव माझा ॥ १ ॥ माझे स्वहित नेणती कोणी । कांहीं न करितां मजवांचूनी । सज्जन तव सुखमांडणी । नेणती कोणी आदि अंत ॥ २ ॥ काय सांगो गर्भीची यातना । मज भोगितां नारायणा । मांस मळमूत्र जाणा । तुज क्षणक्षणा ध्यान असे ॥३॥ मज चालतां प्रयाण काळीं । असतां न दिसती जवळी । मृत्तिके मृत्तिका कवळी । एकले मेळीं संचिताचे ॥ ४ ॥ आतां मज ऐसें करी गा देवा । कांहीं घडे तुझी चरणसेवा । तुका विनवीतसे केशवा । चालवी दावा संसारें ॥ ५ ॥

॥ ५२५ ॥

तरि स्यां आळवावें कोणा । कोण पुरवील वासना । तुजवांचुनी नारायणा । लावी स्तना कृपावंते ॥१॥ आपुला न विचारी सीण । न धरीं अंगसंगें भिन्न । अंगिकारिलें राखे दीन । देई जीवदान आवडीनें ॥२॥ माझिया मनासी हे आस । नित्य सेवावा ब्रह्मरस । अखंड चर-णींचा वास । पुरवीं आस याचकाची ॥३॥ माझिया संचिताचा ठेवा । तेणें हे वाट दाविली देवा । एकल्या आदराचा हेवा । मागे सेवादान

आवडीनें ॥४॥ आळवीन करुणावचनीं । आणीक गोड नलगे मनीं निद्रा जागृति आणि स्वप्नीं । धरिलें ध्यानीं मनीं रूप ॥५॥ आतां भेट न भेटतां आहे । किंवा नाहीं ऐसें विचारूनी पाहे । लागला झरा अखंड आहे । तुका ह्मणे साहे केलें अंतरीं ॥६॥

॥ ५२६ ॥

कोण सुख धरोनी संसारीं । राहों सांग मज वा हरी । अवघ्या नाशिवंता परी । थिता दुरी तूंही अंतरसी ॥ १ ॥ प्रथम केला गर्भी वास । काय ते सांगावे सायास । दुःख भोगिलें नव ही मास । आलों जन्मास येथवरी ॥ २ ॥ बाळपण गेलें नेणतां । तारुण्यदशे विषयव्यथा । वृद्धपणीं प्रवर्तली चिंता । मरें मागुता जन्म धरीं ॥३॥ क्षण एक तोंही नाहीं विसावा । लक्ष चौऱ्याशीं घेतल्या धांवा । भोंवंडिती पाठीं लागल्या हांवा । लागो आगी नांवा माझ्या मी-पणा ॥ ४ ॥ आतां पुरे ऐसी भरोवरी । रंक होऊनी राहेन द्वारीं । तुझा दास मी दीन कामारी । तुका ह्मणे करी कृपा आतां ॥ ५ ।

॥ ५२७ ॥

काय मी उद्धार पावेन । काय कृपा करील नारायण । ऐसें तुह्मी सांगा संतजन । करा समाधान चित्त माझें ॥१॥ काय हें खंडईल कर्म । पारुषतील धर्माधर्म । कासयानें तें कळे वर्म । ह्मणऊनी श्रम वाटतसे ॥२॥ काय हो स्थिर राहेल बुद्धी । कांहीं अरिष्ट न येल मधीं । धरीली जाईल ते शुद्धी । शेवट कधीं तो मज न कळे ॥३॥ काय ऐसें पुण्य होईल गांठीं । घालीन पायीं देवाचे मिठी । मज तो कुरवाळील जगजेठी । दाटईन कंठीं सद्गदित ॥ ४ ॥ काय हे निवतील डोळे । सुख तें देखोनी सोहळे । संचित कैसें तें न कळे । होतील डोहळे वासनेसी ॥ ५ ॥ ऐसी चिंता करी सदा सर्व-काळ । रात्री दिवस हेचि तळमळ । तुका ह्मणे नाहीं आपुलें बळ । जेणें फळ पावे निश्चयेसी ॥ ६ ॥

॥ ५२८ ॥

माझा तंव खुंटला उपाव । जेणें तुझे आतुडती पाव । करूं भक्ति तरि नाहीं भाव । नाहीं हातीं जीव कवणेविशीं ॥ १ ॥ धर्म करूं तरि नाहीं चित्त । दान देऊं तरि नाहीं वित्त । नेणें पुजों ब्राह्मण अतीत । नाहीं भूतदया पोटा हातीं ॥२॥ नेणें गुरुदास्य संतसेवन। जप तप अनुष्ठान । नव्हे वैराग्य वनसेवन । नव्हे दमन इंद्रियांसी ॥३॥ तीर्थ करूं तरि मन नये सवें । व्रत करूं तरि विधि नेणें स्वभावें । देव जरि आहे ह्मणों मजसवें । तरि आपपरावें न वंचे ४

म्हणोनि झालों शरणागत । तुझा दास मी अंकित । यास कांहीं नलगे संचित । झालों निश्चित तुका म्हणे ॥ ५ ॥

॥ ५२९ ॥

न बोलसी तेंही कळलें देवा । लाजसी आपुलिया नांवा । तुज मी नाहीं घालीत गोवा । भीड केशवा कासयाची ॥ १ ॥ उतरी आपुला हा पार । मजशीं बोलोनी उत्तर । माझा तुज नव्हे अंगीकार । मग विचार करीन मी ॥ २ ॥ दात्या आणि मागत्यासी । धर्मनीति तरी बोलिली ऐसी । यथानशक्ति टाकेल तैसी । बाधी दोघांसी विन्मुखता ॥ ३ ॥ म्हणोनी करितों मी आस । तुझिया वचनाची वास । धीर हा करूनी सायास । न टळे नेमास आपुलिया ॥ ४ ॥ तुझें म्यां घेतल्यावांचून । नवजे येथूनी वचन । हाचि माझा नेम सत्य जाण । आहे नाहीं म्हण तुका म्हणे ॥ ५ ॥

॥ ५३० ॥

ऐक पांडुरंगा एक मात । कांहीं बोलणें आहे एकांत । आम्हां जरी तारील संचित । तरी उचित काय तुझें ॥ १ ॥ उसनें फेडितां धर्म तो कोण । काय तया मानवेल जन । काय गा मिरवूनी भूषण । वाया थोरपण जनामध्यें ॥ २ ॥ अन्न जरी न मिळे तयासी देणें । आगांतुक पात्र उचित दान । उपकार तरी धनमंत्रीपणें । जरी देणें घेणें नाहीं आशा ॥ ३ ॥ शूर तो तयासी बोलिजे जाणा । पाठीशीं घालूनी राखे दीना । पार पुण्या नाहीं त्या भूषणा । ऐक नारायणा वचन हें ॥ ४ ॥ आतां पुढें बोलणें तें काई । मज तारिसी तरीच सही । वचन आपुलें सिद्धी नेई । तुका म्हणे तई मज कळसी ॥ ५ ॥

॥ ५३१ ॥

सुख या संतसमागमें । नित्य दुणावे तुझिया नामें । दहन होती सकळ कर्में । सर्वकाळ प्रेमें डुल्लतसों ॥ १ ॥ म्हणोनी नाहीं कांहीं चिंता । तूंचि आमुचा मातापिता । बहिणी बंधु आणि चुलता । आणिकां गोता सर्वां ठायीं ॥ २ ॥ ऐसा हा कळला निर्धार । माझा तुज न पडे विसर । असली देऊनिया धीर । बाह्य अभ्यंतर मजजवळी ॥ ३ ॥ दुःख तें कैसें नये स्वप्नासी । भुक्तिमुक्ति झाल्या कामारी दासी । त्यांचें धर्म तूं आम्हांपाशीं । सुखें राहिलासी प्रेमाचिया ॥ ४ ॥ जेथें तुझ्या कीर्तनाचा घोष । जळती पापें पळती दोष । काय तें उणें आम्हां आनंदास । सेवूं ब्रह्मरस तुका म्हणे ॥ ५ ॥

॥ ५३२ ॥

अल्प भाव अल्प मति । अल्प आयुष्य नाहीं हातीं । अपराधाची वोळिलों मूर्ति । अहो वेदमूर्ति पॆरियेसा ॥ १ ॥ किती दोषा देऊं परिहार । गुणदोषें मळिलें अंतर । आदि वर्तमान भविष्याकार । गेला अंतपार ऐसें नाहीं ॥ २ ॥ विविध कर्म चौऱ्याशी फेरा । त्रिविध भोग या शरीरा । कर्मकोठार पांजरा । जन्मजरा मरण सांठवण ॥ ३ ॥ जीवा नाहीं कुडीचें लाहातें । ये भिन्न पंचभूतें । रचतें खचतें संचितें । असार रितें फलकट ॥ ४ ॥ पुत्र पत्नी सहोदर । मायबाप गोताचा पसर । मिळतां काष्टें लोटतां पूर । आदळी दूर होती खल्लाळीं ॥५॥ म्हणोनी नासावें अज्ञान । इतुलें करीं कृपादान । कृपाळू तूं जनार्दन । धरूनी चरण तुका विनवी॥६॥

॥ ५३३ ॥

मी तंव अनाथ अपराधी । कर्महीन मतिमंदबुद्धि । तुज म्यां आठविलें नाहीं कधीं । वाचे कृपानिधि मायबापा ॥ १ ॥ नाहीं ऐकिलें गाइलें गीत । धरिली लाज सांडिलें हित । नावडे पुराणा बैसले संत । केली बहुत परनिंदा ॥ २ ॥ केला करविला नाहीं उपकार । नाहीं दया आली पिडितां पर । करूं नये तो केला व्यापार वाहिला भार कुटुंबाचा ॥ ३ ॥ नाहीं केलें तीर्थांचें भ्रमण । पाळिला पिंड करचरण । नाहीं संतसेवा घडलें दान । पूजावलोकन मूर्तीचें४ असंगसंगें घडले अन्याय । बहुत अधर्म उपाय । न कळे हित करावें तें काय । नये बोलूं आठवूं तें ॥ ५ ॥ आपआपणया घातकर । शत्रु झालों मी दावेदार । तूं तंव कृपेचा सागर । उतरीं पार तुका म्हणे॥६॥

॥ ५३४ ॥

जेणें हा जीव दिला दान । तयाचें करीन चिंतन । जगज्जीवन नारायण । गाईन गुण तयाचे ॥ १ ॥ जो या उभा भीवरेच्या तिरीं । कट धरुनिया करीं । पाउलें समचि साजिरीं । अंतरीं धरोनी राहेन २ जो या असुरांचा काळ । भक्तजन प्रतिपाळ । खेळे हीं लाघवें सकळ । तयाच्या भाळ पायांवरी ॥ ३ ॥ जो या गोपाळांच्या मेळीं । खेळ खेळे वनमाळी । रसातळा नेला बळी । राहे पाताळीं स्वामी माझा ॥ ४ ॥ जो हा लावण्य पुतळा । जयाचे अंगीं सकळ कळा । जयाचे गळां वैजयंती माळा । तया वेळोवेळां दंडवत ॥ ५ ॥ जयाचें नाम पापनासी । लक्ष्मी ऐसी जयाची दासी । तो हा तेजःपुंज रासी । सर्वभावें त्यासी तुका शरण ॥ ६ ॥

॥ ५३५ ॥

आतां येणें बळें पंढरीनाथ । जवळी राहिला तिष्ठत । पाहतां न कळे जयाचा अंत । तोचि हृदयांत घालूं आतां ॥ १ ॥ विसरोनी आपुला देहपणभाव । नामेंचि भुलविला पंढरीराव । न विचारी याती कुळ नांव । लागावयां पाव संतांचे ॥ २ ॥ बरें वर्म आलें आमुचिया हातां । हिंडावें धुंडावें न लगतां । होय अविनाश सहाकारी दाता । चतुर्भुज संतां परिधाके ॥ ३ ॥ होय आवडी साने थोर । रूप सुंदर मनोहर । भक्तिप्रिय लोभापर । करी आदर याचकपणें ॥ ४ ॥ तें वर्म आलें आमुच्या हातां । म्हणोनी शरण निघालों संतां । तुका म्हणे पंढरीनाथा । न सोडीं आतां जीवेंभावें ५

॥ ५३६ ॥

आतां माझा नेणो परतो भाव । विसावोनि पायीं ठेविला जीव । सकळां लाभांचा हा ठाव । ऐसा वाव झाला चित्ताठायीं ॥ १ ॥ भांडवल गांठीं तरि विश्वास । झालों तों झालों निश्चयें दास । न पाहें मागील ते वास । पुढती सोस सेवेचाचि ॥ २ ॥ आहे तें निवेदिलें सर्व । मी हें माझें मोडियेला गर्व । अकाळीं काळ अवघे पर्व । झाला भरंवसा कृपें लाभाचा ॥ ३ ॥ वेव्हारीं वेव्हारा अनंत । नाहीं यावांचुनी जाणत । तरी हें समाधान चित्त । लाभ हानि नाहीं येत अंतरा ॥ ४ ॥ करूनी नातळो संसारा । अंग भिन्न राखिला पसारा । कळवळा तो जीवनीं खरा । बीजाचा थारा दुरी आघात ॥ ५ ॥ बहु मतापासुनि निराळा । होऊनी राहिलों सोंवळा । बैसला रूपाचा कळवळा । तुका म्हणे डोळां लेईलों तें ॥ ६ ॥

॥ ५३७ ॥

आतां धर्माधर्मीं कांहीं उचित । माझें विचारावें हित । तुज मी ठाउका पतित । शरणांगत परि झालों ॥१॥ येथें राया रंका एकी सरीं । नाहीं भिन्नाभिन्न तुमच्या घरीं । पावलों पाया भलत्यापरी । मग बाहेरी न घालवें ॥२॥ ऐसें हें चालत आलें मागें । नाहीं मी बोलत वाउगें । आपुलिया पडिल्या प्रसंगें । कीर्ति हे जगें वाणिजेते ॥३॥ घालोनिया माथा बैसलों भार । सांडिला लौकीक वेव्हार । आधीं हे विचारिली थार । अविनाशपर पद ऐसें ॥४॥ येथें एक वर्म पाहिजे धीर । परि म्यां लेखिलें असार । देह हें नाशिवंत जाणार । धरिलें सार नाम तुझें ॥५॥ केली आराणूक सकळां हातीं । धरावें धरिलें तें चित्तीं । तुका ह्मणे सांगितलें संतीं । देईं अंतीं । ठाव मज देवा ॥६॥

॥ ५३८ ॥

आतां तुज कळेल तें करीं । तारिसी तरी तारी मारी। जवळी अथवा दुरी धरी । घाली संसारीं अथवा नको ॥ १ ॥ शरण आलों नेणतपणें । भाव आणि भक्ति कांहींच नेणें । मतिमंद सर्वज्ञानें । बहु रंक उणें रंकाहुनी ॥२॥ मन स्थिर नाहीं माझिये हातीं । इंद्रियें धांवतां नावरती । सकळ खुंटलिया युक्ति । शांति निवृत्ति जवळी नाहीं ॥३॥ सकळ निवेदिला भाव । तुझिये पायीं ठेविला जीव । आतां करी कळे तो उपाव । तूंचि सर्व ठाव माझा देवा ॥ ४ ॥ राहिलों धरूनि विश्वास । आधार नेटीं तुझी कास । आणिक नेणें मी सायास । तुका म्हणे यास तुझें उचित ॥ ५ ॥

॥ ५३९ ॥

आतां मी न पडे सायासीं । संसारदुःखाचिये पाशीं । शरण रिघेन संतांसी । ठाव पायापाशीं मागेन त्यां ॥ १ ॥ न कळे संचित होतें काय । कोण्या पुण्यें तुझे लाधले पाय । आतां मज न विसंबे माय । मोकलूनी धाय विनवीतसें ॥ २ ॥ बहुत जाचलों संसारें । मोहमायाजाळाच्या विखारें । त्रिगुण येतील लहरें । तेणें दुःखें थोरें आक्रंदलों ॥ ३ ॥ आणीक दुःखें सांगों मी किती । सकळ संसारस्थिति । न साहे पाषाण फुटती । भय कांप चित्तीं भरलासे ॥ ४ ॥ आतां मज न साहवे सर्वथा । संसारगंधीची हे वार्ता । झालों वेडा असोनी जाणता । पावे अनंता तुका म्हणे ॥ ५ ॥

॥ ५४० ॥

आतां मज धरवावी शुद्धि । येथूनी परतवावी बुद्धि । घ्यावें सोडवूनी कृपानिधि । सांपडलों संधीं काळचक्रीं ॥ १ ॥ करिसील तरी नव्हे काई । राईचा डोंगर पर्वत राई । आपुले करुणेची खाई । करी वो आई मजवरी ॥२॥ मागील काळ अज्ञानपणें । सरला स्वभावें त्या गुणें । नेणें आयुष्य झालें उणें । पुढील पेणें अंतरलें ॥३॥ आतां मज वाटतसे भय । दिवसेंदिवस चालत जाय । येथें म्यां येउनी केलें काय । नाहीं तुझें पाय आठविले ॥ ४ ॥ करूनी अपराध क्षमा । होतील केले पुरुषोत्तमा । आपुले नामीं द्यावा प्रेमा । सोडवी भ्रमापासूनिया ॥५॥ हृदय वसो तुमच्या गुणीं । ठाव हा पायांपें चरणीं । करूं हा रस सेवन वाणी । फिटे तों धणी तुका ह्मणे ॥ ६ ॥

॥ ५४१ ॥

आतां पावेन सकळ सुखें । खादलें कदा तें न देखें । अवघें सरलें पारिखें । सकळ देखें माहियेरें ॥ १ ॥ जवळी विठ्ठलरखुमाई ।

बहिणी बंधु बाप आई । सकळ गोताचीच साई । पारिखें कांई ऐसें नेणिजे ॥ २॥ जगदाकारीं झाली सत्ता । वारोनी गेली पराधीनता। अवघें आपुलेंचि आतां । लाज आणि चिंता दुऱ्हावली ॥ ३॥ वावरे इच्छा वसे घरीं । आपुले सत्तेचे माहेरीं । करवी तैसें आपण करी । भीड न धरीं चुकल्याची ॥ ४ ॥ सोसिला होता सासुरवास । बहुतांचा बहुत दिवस । बहु कामें पुरविला सोस। आतां उदास आपुल्यातें ॥ ५ ॥ करिती कवतुक लाडें । मज बोलविती कोडें । मायबाप उत्तरें गोडें । बोले बोबडें पुढें तुका ॥ ६ ॥

दोहरे ॥ ५४२ ॥

तुका बस्तर बिचारा क्या करे रे । अंतर भगवान होय । भीतर मैला कब मिटे रे । मरे उपर धोय ॥ १ ॥ रामराम कहे मन । औरसुं नहिं काज । बहुत उतारे पार । आखे राखो तुकाकी लाज ॥ २ ॥ लोभींके चित धन बैठे । कामिनीं चित काम । मानाके चित पुत बैठे । तुकाके मन राम ॥३॥ तुका पंखियहिन्न मानूं । वोई जनावर बाग । असंतनकुं संत न मानूं । जे घमंकुं दाग ॥४॥ तुका राम बहुत मिठा रे । भर राखो शरीर । तनकी करूं नावरि । उतारूं पैल तीर ॥५॥ संतत पन्हयां लें खडा । राहुं ठाकुरद्वार । चलत पाछे हुं फिरों । रज उडत लेऊं सीर ॥६॥ तुका प्रभु बडो न मनू न मानूं बडो । जिसपास बहु दाम । बलिहारि उस मुखकी । जिसतीं निकसे राम ॥७॥ राम कहे सो मुख भला रे । बिनरामसें बीख । आव न जानूं रमते बेरों । जब काल लगावे सीख ॥८॥ राम कहे सो मुख भलारे । खाये खीर खांड । हरिबिन मुखमो धूल परी रे । क्या जनी उस रांड ॥ ९ ॥ कहे तुका मैं सबदा बेचूं । लेवेके तन हार । मिठा साधु संतजन रे । मुरखके सिर मार ॥१०॥ तुका दास तिनका रे । रामभजन निरास । क्या बिचारे पंडित करो रे । हात पसारे आस ॥११॥ तुका प्रीत रामसुं । तैसी मिठी राख । पतंग जाय दिपिपर रे । करे तनकी खाक ॥१२॥ कहे तुका जग भुला रे । कह्या न मानत कोय । हात परे जब कालके । मारत फोरत डोय ॥१३॥ तुका सुरा नहिं सबदका रे । जब कमाई न होय । चोट साहे घनाकि रे । हिरा नीबरे तोय ॥१४॥ तुका सुरा बहुत कहावे । लडत बिरला कोय । एक पावे उंच पदवी । एक खोसां जोय ॥१५॥ तुका मान्या पेटका । और न जाने कोय । जपता कछु रामनाम । हरिभगतनकी सोय ॥ १६ ॥ तुका सज्जन तिनसुं कहिये । जिथनी प्रेम दुनाये ।

दुर्जन तेरा मुख काला । थीता प्रेम घटाये ॥ १७ ॥ काफर सोही आपण बुझे । आला दुनियां भर । कहे तुका तुझे सुनो रे भाई । हिरदा जिन्होंका कठोर ॥ १८ ॥ भीस्त नई पावे मालथी । पढिया लोक रिझाय । निचा जथें कमतरिण । सो ही सो फल खाये १९ ॥ फल पाया तो सुख भया । किन्हेसूं न करे बे वाद । बान न देखे मिरगा । चित मिलाया नाद ॥ २० ॥ तुका दास रामका । मनमे एक हि भाव । तो न पालटू आव । ये हि तन जाय ॥ २१ ॥ तुका रामसुं चित बांध राखूं । तैसा आपनी हात । धेनु बछरा छोर जावे । प्रेम न छुटे सात ॥ २२ ॥ चितसुं शित जब मिले । तब तनु थंडा होंय । तुका मिलना जिन्होसुं । ऐसा बिरला कोये ॥ २३ ॥ चित मिले तो सब मिले । नहिं तो फुकट संग । पानी पथर येक ठारे । कोर न भिजे अंग ॥ २४ ॥ तुका मिलना तो भला । मनसुं मन मिल जाय । उपर उपर माटि घसनि । उनकि कोन बराय ॥ २५ ॥ तुका कुटुंब छोरे रे । लरके जोरों सिर मुंडाय । जबथे इच्छा नहिं मुई । तब तूं किया काय ॥२६॥ तुका इच्छा मीट नई तो । काहा करे जट खाक । मथीया गोला डारदिया तो । नहिं मिले फेरन ताक ॥ २७ ॥ ब्रीद मेरे साईयाको । तुका चलावे पास । सुरा सोहि लरे हमसें । छोरे तनकी आस ॥ २८ ॥ कहे तुका भला भया । हुवा संतका दास । क्या जानूं केते मरता । न मिटती मनकी आस ॥ २९ ॥ तुका और मिठाई क्या करूं रे । पाले विकारपिंड । राम कहावे सो भलि रुखी । माखन खीर खांड ॥ ३० ॥

तुकारामकृत अभंगांची गाथा.

भाग दुसरा.

एकविध अभंग.



॥ ५४३ ॥

भाग्यें ऐशी झाली जोडी। आतां घडी विसंबेना ॥१॥ विटेवरी समचरण। संतीं खूण सांगितली ॥२॥ अवघें आतां काम सारूं। हाचि करूं कैवाड ॥३॥ तुका ह्मणे खंडूं खेपा। पुढें पापापुण्याच्या ॥४॥

॥ ५४४ ॥

आमच्या हें आलें भागा। जिव्हार या जगाचें ॥१॥ धरूनिया ठेलों जीवें। वळकट भावें एकविध ॥२॥ आणूनिया केला रूपा। उभा सोपा जवळी ॥३॥ तुका ह्मणे अंकित केला। खालीं आला वचनें ४

॥ ५४५ ॥

येथें आड कांहीं न साहे आणिक। प्रमाण तें एक हेंचि झालें ॥ १ ॥ गाऊं नाचों टाळी वाऊं गीत छंदें। डोलवूं विनोदें अंग तेणें ॥२॥ मथुनिया सार काढिला बाहेरी। उपाधि ते येरी निवडिली ॥ ३ ॥ तुका ह्मणे जगा लाविली शिराणीं। सेवितां हे धणी होत नाहीं ॥४॥

॥ ५४६ ॥

जैसा तैसा आतां। मज प्रमाण अनंता ॥ १ ॥ पायां पडणें न संडीं। पोटीं तेंच वर तोंडीं ॥२॥ एका भावें चाड। आहे तैसें अंतीं गोड ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मां। टळणेंचि नाहीं नेमा ॥ ४ ॥

॥ ५४७ ॥

आह्मी पहा कैसीं एकतत्व झालों । राखणें लागलों वासनेसी ॥ १ ॥
तुह्मांविण कांहीं नावडावें जीवा । केला तोचि देवा केला पण ॥ २ ॥
वर्म नेणों परि वृत्ति भंगों नेदूं । वंदिलेंचि वंदूं आवडीनें ॥ ३ ॥
तुका ह्मणे कळे नामाचें जीवन । वारताही भिन्न नेणों आतां ॥ ४ ॥

॥ ५४८ ॥

गोपिचंदनमुद्रा धरणें । आह्मां लेणें वैष्णवां ॥ १॥ मिरवूं अळंकार लेणें । हीं भूषणें स्वामीचीं ॥ २ ॥ विकला तो सेवे जीव । एक्या भावें एकविध ॥ ३ ॥ तुका ह्मणे शूर झालों । बाहेर आलों संसारा ॥ ४ ॥

॥ ५४९ ॥

माझी भक्ती भोळी । एकविध भावबळी ॥ १ ॥ मी का पडेन निराळा । ऐसा सांडूनि सोहळा ॥ २ ॥ आतां अनारिसा । येथें न व्हावें सहसा ॥३॥ तुका म्हणे जोडुनि पाय । पुढें उगा उभा राहे॥४॥

॥ ५५० ॥

आह्मां भाविकांची जाती । एकविध जी श्रीपती । अळंकारयुक्ति । सरो तेथें शकेचि ना ॥ १ ॥ जाणे माउली त्या खुणा । क्षोभ उपजों नेदी मना । शांतवूनि स्तना । लावी अहो कृपाळे ॥ २ ॥ तुज अवघें होऊं येतें । मज वाटों नये चित्तें । उपासने परतें । नये कांहीं आवडों ॥ ३ ॥ करूं रूपाची कल्पना । मुखीं नाम उच्चारणा । तुका म्हणे जना । जल स्थल देखतां ॥ ४ ॥

॥ ५५१ ॥

आह्मां एकविधा पुण्य सर्वकाळ । चरण सकळ स्वामीचे ते ॥ १ ॥
चित्ताचे संकल्प राहिले चळण । आज्ञा ते प्रमाण करूनी असों ॥ २ ॥
दुजियापासून परतलें मन । केलें द्यावें दान होईल तें ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां पुरला नवस । एकाविण ओस सकळही ॥ ४ ॥

॥ ५५२ ॥

एकविध आह्मी न धरूं पालट । न संडूं ते वाट सांपडली ॥ १ ॥
ह्मणवूनि केला पाहिजे सांभाळ । माझें बुद्धीबळ पाय तुझे ॥ २ ॥
बहुत बोलतां न कळे प्रकार । अंतरा अंतर साक्ष असे ॥ ३ ॥
तुका म्हणे आगा जीवींच्या जीवना । तूंचि नारायणा साक्षी माझा॥४॥

॥ ५५३ ॥

नाहीं वागवीत जाणिवेचें ओझें । स्वामिसेवा काज निर्धारु हा ॥१॥
आज्ञा ते प्रमाण हा मनीं निर्धार । येणें फिटे भार निश्चयेसी ॥ २ ॥
आळी करें आह्मी एकविध चित्तें । तैसें होऊं येतें मायबापें ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझी ये जातीची सेवा । घातलासे देवावरी भार ॥ ४ ॥

॥ ५५४ ॥

परपीडक तो आह्मा दावेदार। विश्वीं विश्वंभर ह्मणऊनि ॥ १ ॥
दंडूं त्यागूं बळें नावलोकूं डोळा। राखूं तो चांडाळा पैसा दुरि ॥२॥
अनाचार कांहीं न साहे अवगुण। बहु होय मन कासावीस ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझी एकविध सेवा। विमुख ते देवा वाळी चित्तें ॥ ४ ॥

॥ ५५५ ॥

लौकिकापुरती नव्हे माझी सेवा। अनन्य केशवा दास तुझा ॥ १ ॥
ह्मणऊनि करीं पायांसवें आळी। आणिक वेगळी नेणें परि ॥ २ ॥
एकविध आह्मी स्वामीसेवेसाटीं। वरि तोचि पोटीं एकभाव ॥ ३ ॥
तुका ह्मणे करी सांगितलें काम। तुह्मां धर्माधर्म ठावे देवा ॥ ४ ॥

॥ ५५६ ॥

धीर तो कारण एकविध भाव। पतिव्रते नाहो सर्वभावें ॥ १ ॥
चातक हे जळ न पाहती दृष्टी। वाट पाहे कंठीं प्राणमेघा ॥ २ ॥
सूर्यविकासिनि नेघे चंद्रामृत। वाट पाहे अस्तउदयाची ॥ ३ ॥
धेनु येऊं नेदी जवळी आणिकां। आपुल्या बाळकाविण वत्सा ॥ ४ ॥
तुका ह्मणे नेम प्राणासवें साटीं। तरीच या गोष्टी विठोबाची ॥ ५ ॥

॥ ५५७ ॥

पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती। सर्व भावें पति ध्यानीं मनीं ॥१॥
तैसें माझें मन एकविध झालें। नावडे विठ्ठलेविणे दुजें ॥ २ ॥
सूर्यविकासिनी नेघे चंद्रकळा। गाय ते कोकिळा वसंतेसी ॥ ३ ॥
तुका म्हणे बाळ मातेपुढें नाचे। बोल आणिकाचे नावडती ॥ ४ ॥

॥ ५५८ ॥

आणिकांची स्तुति आम्हा ब्रह्महत्या। एकावांचूनि त्या पांडुरंगा ॥१॥
आम्हा विष्णुदासां एकविध भाव। न म्हणों या देव आणिकांसि ॥२॥
शतखंड माझी होईल रसना। जरी या वचना पालटेन ॥ ३ ॥
तुका म्हणे मज आणिका संकल्पें। अवघींच पापें घडतील ॥ ४ ॥

॥ ५५९ ॥

पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण। आम्हां नारायण तैशापरी ॥ १ ॥
सर्व भावें लोभ्या आवडे हें धन। आम्हां नारायण तैशापरी ॥२॥
तुका म्हणे एकविध झालें मन। विठ्ठलावांचून नेणें दुजें ॥ ३ ॥

॥ ५६० ॥

काय करूं आन दैवतें। एकाविण पंढरीनाथे ॥ १ ॥ सरिता मिळाली सागरीं। आणिकां नांवा कैची उरी ॥२॥ अनेक दीपींचा प्रकाश सूर्य उगवतां नाश ३ तुका म्हणे नेणें दुजें। एकाविण पंढरीराजे ॥४॥

॥ ५६१ ॥

माझी आतां सत्ता आहे । तुम्हां पायां हे वरती ॥ १ ॥ एकाविण नेणें दुजा । पंढरीराजा सर्वांगें २ पुरवावी केली आळी । जे जे काळीं मागेन तें ॥ ३ ॥ तुका म्हणे सुटसी कैसा । धरूनि दिशा राहिलों ॥ ४ ॥

॥ ५६२ ॥

आणीक दुसरें मज नाहीं आतां । नेमिलें या चित्तापासुनिया ॥१॥ पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं । जागृतीं स्वप्नीं पांडुरंग ॥ २ ॥ पडिलें वळण इंद्रियां सकळां । भाव तो निराळा नाहीं दुजा ॥ ३ ॥ तुका म्हणे नेत्रीं केली ओळखण । तटस्थ तें ध्यान विटेवरी ॥ ४ ॥

॥ ५६३ ॥

न पूजीं आणिकां देवां न करीं त्यांची सेवा । न मनीं या केशवाविण दुजें ॥ १ ॥ काय उणें झालें मज तयापायीं । तें मी मागों काई कवणासी ॥ २ ॥ आणिकांची कीर्ति नाइके न बोले । चाड या विठ्ठलेंविण नाहीं ॥ ३ ॥ न पाहें लोचनीं श्रीमुखावांचूनि । पंढरी सांडूनि न वजे कोठें ॥ ४ ॥ न करीं कांहीं आस मुक्तीचे सायास । न भें संसारास येतां जातां ॥ ५ ॥ तुका म्हणे कांहीं व्हावें ऐसें जीवा । नाहीं या केशवाविण दुजें ॥ ६ ॥

॥ ५६४ ॥

कोणाचिया न पडों छंदा । गोविंदासी आळवूं ॥ १ ॥ बहुतांचीं बहु मतें । अवघें रितें पोकळ ॥ २ ॥ घटापटा ढवळी मन । होय सीण न करूं तें ॥३॥ तुका म्हणे पांडुरंग । भरूं भाग आला तो ॥ ४ ॥

॥ ५६५ ॥

न करी पठन घोष अक्षरांचा । बीजमंत्र आमुचा पांडुरंग ॥ १ ॥ सर्वकाळ नामचिंतन मानसीं । समाधान मनासी समाधि हे ॥२॥ न करी भ्रमण न रिघें कपाटीं । जाईन तेथें दाटी. वैष्णवांची ॥३॥ अनु नेणें कांहीं न वजे तपासी । न्हाचें दिंडीपाशीं जागरणीं ॥४॥ उपवास व्रत न करीं पारणें । रामकृष्ण म्हणे नारायण ॥ ५ ॥ आणिकांची सेवा स्तुती नेणें वाणूं । तुका म्हणे आनु दुजें नाहीं ॥६॥

॥ ५६६ ॥

आणोनिया मना । अवघ्या धांडोळिल्या खुणा । देखिला तो राणा । पंढरपूरनिवासी ॥ १ ॥ यासी अनुसरल्या काय । घडे ऐसें वाया जाय । देखिले ते पाय । सम जीवीं राहाती ॥ २ ॥ तो देखावा हा विध । चिंतनें तें कार्य सिद्ध । आणिकां संबंध । नाहीं पर्वकाळासी ॥ ३ ॥ तुका म्हणे खळ । होती क्षणेंचि निर्मळ । जाऊनिया मळ । वाळवंटीं नाचती ॥ ४ ॥

॥ ५६७ ॥

तूं माझा मायबाप सकळ वित्त गोत। तूंचि माझें हित करिता देवा ॥ १ ॥
तूंचि माझा देव तूंचि माझा जीव। तूंचि माझा भाव पांडुरंगा ॥ २ ॥
तूंचि माझा आचार तूंचि माझा विचार। तूंचि सर्व भार चालविसी ॥ ३ ॥
सर्व भावें मज तूं होसी प्रमाण। ऐसी तुझी आण वाहतसें ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुज विकला जीवभाव। कळे तो उपाव करीं आतां ॥ ५ ॥

॥ ५६८ ॥

तूं आह्मां सोयरा सज्जन सांगाती। तुजलागीं प्रीति चालो सदा ॥ १ ॥
तूं माझा जिव्हाळा जीवाचा जिवलग। होसी अंतरंग अंतरींचा ॥ २ ॥
गणगोत मित्र तूं माझें जीवन। अनन्य शरण तुझ्या पायीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे सर्वगुणें तुझा दास। आवडे अभ्यास सदा तुझा ॥ ४ ॥

॥ ५६९ ॥

काय नव्हेसी तूं एक। देखों कासया पृथक ॥ १ ॥ मुंग्या केलें मुंगळे। नटनाट्य तुझे चाळे ॥ २ ॥ झाली तरी मर्यादा। किंवा अमावें गोविंदा ॥ ३ ॥ तुका म्हणे साचा। कोठें जासी हृदयींचा ॥ ४ ॥

॥ ५७० ॥

असोत हे बोल। अवघें तूंचि भांडवल ॥ १ ॥ माझा मायबाप देव। सज्जन सोयरा केशव ॥ २ ॥ गाळियले भेद। सांगितले वादा-वाद ॥ ३ ॥ तुका म्हणे मधीं। आतां न पडे उपाधि ॥ ४ ॥

॥ ५७१ ॥

आमुची विश्रांति। तुमचे चरण कमळापती ॥ १ ॥ पुढती पुढती नमन। घालुनिया लोटांगण ॥ २ ॥ हेंचि एक जाणें। काया वाचा आणि मनें ॥ ३ ॥ नीच जनालोकां। ताळिले पायरीस तुका ॥ ४ ॥

॥ ५७२ ॥

विश्वासिया नाहीं लागत सायास। रंग अनायासें अंगा येतो ॥ १ ॥
लेंकराच्या हातें घास मागे माता। थोरथोरांनि चित्ता सुख पावे ॥ २ ॥
गौरव त्या मानी आरुषा वचनीं। भूषण ते वाणी मिरवणी ॥ ३ ॥
तुका म्हणे आहे सकळही साक्षी। माझा कई पक्षी पांडुरंग ॥ ४ ॥

॥ ५७३ ॥

शिव शक्ति आणि सूर्य गणपति। एकचि म्हणती विष्णुसहीं ॥ १ ॥
हिरा गार दोनी मानिती समान। राजस भजनें वाया जाती ॥ २ ॥
अन्य देवतांसी देव म्हणऊन। तामस जीवन नर्को योग्या ॥ ३ ॥
वाया जायासाठीं केलासे हव्यास। अन्य देवतास देवपण ॥ ४ ॥
आपुलिया मुखें सांगतसे धणी। नव्हे माझी वाणी पदरींची ॥ ५ ॥
धन्य ते वैष्णव भजती केशव। सात्विक हे जीव मोक्षा योग्य ॥ ६ ॥
तुका म्हणे मोक्ष नाहीं कोणापासी। एका गोविंदासी शरण व्हावें ॥ ७ ॥

॥ ५७४ ॥

बहुत असती मागें सुखी केलीं । अनाथा माउली जिवांची तूं ॥१॥
माझिया संकटा न धरी आळस । लावूनिया कास पार पावी ॥ २ ॥
कृपावंता करा ज्याचा अंगिकार । तया संवसार नाहीं पुन्हा ॥ ३ ॥
विचारितां नाहीं दुजा बळिवंत । ऐसा सर्वगत व्यापी कोणी ॥ ४ ॥
ह्मणउनि दिला मुळीं जीव भाव । देह केला वाव समाधिस्थ ॥ ५ ॥
तुका ह्मणे नाहीं जाणत आणिक । तुजविण एक पांडुरंगा ॥ ६ ॥

॥ ५७५ ॥

काय माझें नेती वाईट ह्मणोन । करूं समाधान कशासाठीं ॥ १ ॥
काय मज लोक नेती परलोका । जातां कोणा एका निवारेल ॥२॥
न म्हणे कोणासी उत्तम वाईट । सुखें माझी कूट खावो मागें ॥३॥
सर्व माझा भार असे पांडुरंगा । काय माझें जगासवें काज ॥ ४ ॥
तुका म्हणे माझें सर्वही साधन । नामसंकीर्तन विठोबाचें ॥ ५ ॥

॥ ५७६ ॥

रुसलों आम्हीं आपुलिया संसारा । तेथें जनाचारा काय पाड ॥१॥
आह्मां इष्ट मित्र सज्जन सोयरे । नाहीं या दुसरे देवाविण ॥ २ ॥
दुराविले बंधु सखे सहोदर । आणीक विचार काय तेथें ॥ ३ ॥
उपाधिवचन नाइकती कान । त्रासलें हें मन बहु माझें ॥ ४ ॥
तुका म्हणे करा होईल ते दया । सुख दुःख वाया न धरावें ॥५॥

॥ ५७७ ॥

दूध दहीं ताक पशूचें पाळण । त्यामध्यें कारण घृतसार ॥ १ ॥
हेंचि वर्म आह्मां भाविकांचें हातीं म्हणऊनि चित्तीं धरिला राम॥२॥
लोहो कफ गारा अग्नीचिया काजे। येऱ्हवीं तें ओझें कोण वाहे॥३॥
तुका ह्मणे खोरी पाहारा जतन । जोंवरी हे धन हातीं लागे ॥ ४ ॥

॥ ५७८ ॥

रवीचा प्रकाश । तोचि निशी घडे नाश । झाल्या बहुवस । तरि त्या काय दीपिका १ आतां हाचि वसो जीवीं । माझ्या अंतरीं गोसावी । होऊं येती ठावीं । काय वर्में याच्यानें २ सर्व असतां धणी । आड येऊं न सके कोणी । नलगे विनवणी । पृथकाची करावी ३ जन्माचिया गति । येणें अवघ्या खुंटती । कारण ते प्रीती । तुका ह्मणे जवळी ४

॥ ५७९ ॥

न कळे जी भक्ती काय करूं सेवा । संकोचोनि देवा राहिलोंसें ॥१॥
जोडोनिया कर राहिलों निवांत । पायांपाशीं चित्त ठेउनिया ॥२॥
दिशाभुली करीं स्थळीं प्रदक्षणा । भ्रमें नारायणा कष्टविलें ॥ ३ ॥
तुका म्हणे झालों आज्ञेचा पाळक । जीवनासी एक ठाव केला ॥४॥

॥ ५८० ॥

करावा वर्षाव । तृषाक्रांत झाला जीव ॥ १ ॥ पाहें आकाशाची वास । जाणता तूं जगनिवास ॥ २ ॥ संयोगें विस्तार । वाढी लागे तो अंकूर ॥३॥ तुका ह्मणे फळे । चरणांबुजें तीं सकळें ॥४॥

॥ ५८१ ॥

भेद तुटलियावरी । आह्मी तुमचींच हो हरी ॥ १ ॥ आतां पाळावे पाळावे । आह्मां लडिवाळांचे लळे ॥ २ ॥ आणिकांची देवा । नाहीं जाणतची सेवा ॥ ३ ॥ तुका म्हणे हेवा । माझा हेत पायीं देवा ॥४॥

॥ ५८२ ॥

तपाचें सायास । नलगे घेणें वनवास ॥ १ ॥ ऐसें कळलें आम्हां एक । झालों नामाचे धारक ॥ २ ॥ जाळी महाकर्मे । दावी निज-सुख धर्मे ॥ ३ ॥ तुका म्हणे येणें । कलिकाळ तें ठेंगणें ॥ ४ ॥

॥ ५८३ ॥

मी दास तयाचा जया चाड नाहीं । सुखदुःख दोहींविरहित जो १
राहिलासे उभा भींवरेच्या तीरीं । कट दोहीं करीं धरोनिया ॥२॥
नवल काई तरी पाचारितां पावे । न स्मरित धांवे भक्तिकाजा ३
सर्व भार माझा त्यासी आहे चिंता । तोचि माझा दाता स्वहिताचा ४
तुका म्हणे त्यास गाईन मी गीतीं । आणिक तें चित्तीं न धरीं कांहीं ५

॥ ५८४ ॥

बहु फिरलों ठायाठाव । कोठें भाव पुरेचि ना ॥ १ ॥ समाधान तों पावलों । उरलों बोलों यावरि ॥२॥ घे गा देवा आशीर्वाद । आमुच्या नांद भाग्यानें ॥३॥ तुका म्हणे जेवूं आधीं । खवखव मधीं साराावी ४

॥ ५८५ ॥

खरें भांडवल सांपडलें गांठीं । जेणें नये तुटी उदमासी ॥ १ ॥
सवंगाचें केणें सांपडलें घरीं । भरूनि वैखरी सांठविलें ॥ २ ॥
देतां घेतां लाभ होतसे सकळां । सदैवा दुबळा भाव तैसा ॥ ३ ॥
फडा आलिया तो नवजे निरास । जरि कांहीं त्यास न कळतां ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां झालीसे निश्चिंती । आणीक तें चित्तीं न धरूं दुजे ५

॥ ५८६ ॥

ध्याइन तुझें रूप गाइन तुझें नाम । आणीक न करी काम जिव्हामुखें १
पाहिन तुझे पाय ठेविन मी डोय । पृथक तें काय न करीं मनीं २
तुझेचि गुणवाद आईकेन कानीं । आणिकांची वाणी पुरे आतां ३
करिन सेवा करीं चालेन मी पायीं । आणीक नवजे ठायीं तुजविण ४
तुका ह्मणे जीव ठेविन मी पायीं । आणिक तो कांहीं देऊं कोणा ५

॥ ५८७ ॥

तुका वेडा अविचार । करी बडबड फार ॥१॥ नित्य वाचे हाचि छंद । राम कृष्ण हरि गोविंद ॥२॥ धरीं पांडुरंगीं भाव । आणीक

नेणें दुजा देव ॥३॥ गुरूज्ञान सर्वां ठायीं । दुजें न विचारी कांहीं ४ बोल नाइके कोणाचे । कथे नागवाचि नाचे ५ संग उपचारें कांटाळे । सुखें भलते ठायीं लोळे ॥ ६ ॥ कांहीं उपदेशिलें नेणें । वाचे विठ्ठल विठ्ठल म्हणे ॥७॥ केला बहुतीं फजित । तरी हेंचि करी नित्य॥८॥ अहो पंडित जन । तुका टाकावा थुंकोन ॥ ९ ॥

॥ ५८८ ॥

तुझा शरणागत । जन्मोजन्मींचा अंकित ॥१॥ आणीक कांहीं नेणें हेवा । तुजवांचूनि केशवा ॥२॥ हेंचि माझें गाणें । तुझें नामसंकीर्तन ॥ ३ ॥ तुझ्या नामाचीं भूषणें । तुका ह्मणे ल्यालों लेणें ॥४॥

॥ ५८९ ॥

हेंचि माझें तप हेंचि माझें दान । हेंचि अनुष्ठान नाम तुझें ॥ १ ॥
हेंचि माझें तीर्थ हेंचि माझें व्रत । सत्य हें सुकृत नाम तुझें ॥ २ ॥
हाचि माझा धर्म हेंचि माझें कर्म । हाचि नित्यनेम नाम तुझें ॥३॥
हाचि माझा योग हाचि माझा यज्ञ । हेंचि जपध्यान नाम तुझें॥४॥
हेंचि माझें ज्ञान श्रवण मनन । हेंचि निजध्यासन नाम तुझें ॥५॥
हाचि कुळाचार हाचि कुळधर्म । हाचि नित्यनेम नाम तुझें ॥ ६ ॥
हा माझा आचार हा माझा विचार । हा माझा निर्धार नाम तुझें
तुका म्हणे दुजें सांगायासि नाहीं । नामेंविण कांहीं धनवित्त ॥८॥

॥ ५९० ॥

तुझ्या नामाची आवडी । आह्मी विठो तुझीं वेडीं ॥ १ ॥ आतां नवजों आणिकां ठाया । गाऊं गीत लागों पायां ॥ २ ॥ काय वैकुंठ बापुडें । तुझ्या प्रेमसुखापुढें ॥ ३ ॥ संतसमागम मेळ । प्रेमसुखाचा सुकाळ ॥४॥ तुका ह्मणे तुझ्या पायीं । जन्ममरणा ठाव नाहीं ॥ ५ ॥

॥ ५९१ ॥

जप तप ध्यान नलगे धारणा । विठ्ठलकीर्तनामाजी उभा ॥ १ ॥
राहे माझ्या मना दृढ या वचनीं । आणिक तें मनीं न धरावें ॥२॥
कीर्तनसमाधि साधन तें मुद्रा । रहातील धारा धरोनिया ॥ ३ ॥
तुका म्हणे मुक्ति हरिदासांच्या घरीं । वोळगती चारी ऋद्धिसिद्धि

॥ ५९२ ॥

काय ते विरक्ति न कळे आह्मां । जाणों एका नामा विठोबाच्या ॥ १ ॥ नाचेन मी सुखें वैष्णवाचे मेळीं । टाळ घोळीं आनंदें या ॥ २ ॥ शांति क्षमा दया ते मी काय जाणे । गोविंद कीर्तनेंवांचूनिया ॥ ३ ॥ कासया एकांत सेवूं तया वना । आनंद तो जनामाजी असे ॥ ४ ॥ कासया उदास असो देहावरी । अमृतसागरीं बुडोनिया ॥ ५ ॥ तुका म्हणे आम्हा आहे भरंवसा । विठ्ठल सरिसा चालतसे ॥ ६ ॥

॥ ५९३ ॥

बाळ मायेवीण क्षणभरि न राहे । न देखतां होये कासाविस ॥१॥
आणिक उदंड बुझाविती जरी । छंद त्या अंतरीं माउलीचा ॥ २ ॥
नावडती तया बोल आणिकाचे । देखोनिया नाचे माय दृष्टी ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझी विठ्ठल माउली । आणिकांचे बोलीं चाड नाहीं ॥४॥

॥ ५९४ ॥

पाहों ग्रंथ तरी आयुष्य नाहीं हातीं । नाहीं ऐशी मती अर्थ कळे ॥१॥
होईल तें हो या विठोच्या नांवें । अर्पिलें तें भावें जीवीं धरूं ॥२॥
एखादा अंगासी येईल प्रकार । विचारितां फार युक्ति वाढे ॥३॥
तुका म्हणे आळी करितां गोमटी । मायबापा पोटीं येते दया ॥ ४ ॥

॥ ५९५ ॥

सिद्धीचा दास नव्हें श्रुतीचा अंकिला । होईन विठ्ठला सर्व तुझा ॥१॥
सर्व काळ सुख आमच्या मानसीं । राहिलें जयासी नाश नाहीं ॥२॥
नेणें पुण्य पाप न पाहें लोचनीं । आणिकावांचूनि पांडुरंगा ॥ ३ ॥
न करी आस मुक्तीचे सायास । भक्तिप्रेमरस सांडुनिय ॥ ४ ॥
गर्भवासीं धाक नाहीं येतां जातां । हृदयीं राहतां नाम तुझें ॥ ५ ॥
तुका म्हणे झालों तुझाचि अंकिला । न भें मी विठ्ठला कळिकाळासी

॥ ५९६ ॥

ह्मणे विठ्ठल ब्रह्म नव्हे । त्याचे बोल नाइकावे ॥ १ ॥ मग तो होका कोणी एक । आदि करोनि ब्रह्मादिक ॥ २ ॥ नाहीं विठ्ठल जया ठावा ॥ तोही डोळां न पाहावा ३ तुका म्हणे नाहीं । त्याची भीड मज कांहीं ४

॥ ५९७ ॥

जयाचिये वाचे नये हा विठ्ठल । त्याचे मज बोल नावडती ॥ १ ॥
शत्रु तो म्यां केला न ह्मणे आपुला । जो विन्मुख विठ्ठला सर्वभावें २
जयासी नावडे विठोबाचें नाम । तो जाणा अधम तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ५९८ ॥

विठ्ठलावांचोनि ब्रह्म जे बोलती । वचन तें संतीं मानूं नये ॥१॥
विठ्ठलावांचूनी जे जे उपासना । अवघाचि जाणा संभ्रम तो ॥२॥
विठ्ठलावांचूनि सांगतील गोष्टी । वाया तें हिंपुटी होत जाणा ॥३॥
विठ्ठलावांचूनि जें कांहीं जाणती । तितुल्या वित्पत्ति वाउगीया ॥४॥
तुका म्हणे एक विठ्ठलचि खरा । येर तो पसारा वाउगाचि ॥ ५ ॥

॥ ५९९ ॥

येथें बोलोनिया काय । व्हावा गुरु तरि जाय ॥ १ ॥ मज न साहे वांकडें । ये विठ्ठलकथे पुढें ॥ २ ॥ ऐकोनी मरसी वृथा । जंव आहेसि तूं जिता ॥ ३ ॥ दुरमतीची चाड । तेणें न करावी बडबड ॥ ४ ॥ पुसेल कोणी त्यास । जा रे करी उपदेश ॥ ५ ॥ आह्मी

विठ्ठलाचे वीर । फोडूं कळिकाळाचें शीर ६ घेऊं पुढती जन्म । वाणूं कीर्ति मुखें नाम ॥७॥ तुका ह्मणे मुक्ती । नाहीं आसचि ये चित्तीं ॥ ८ ॥

॥ ६०० ॥

माझिया जीवाचा मज निरधार । न करीं उत्तर जनासवें ॥ १ ॥
आपुलें कारण साधो जी विचार । करावा हा धीर धरूनिया ॥ २ ॥
काय कराविया आणिका या युक्ति । काय नव्हे भक्ति विठोबाची
एक पुढें गेले वाट दावूनिया । मारग तो वाया कोण सांडी ॥ ४ ॥
तुका म्हणे माझी विठोबासी चिंता । भेईना सर्वथा न घडे तें ॥५॥

॥ ६०१ ॥

हेंचि सर्वसुख जपावा विठ्ठल । न दवडावा पळ क्षण वाया ॥१॥
हेंचि एक सर्व साधनांचें मूळ । आतुडे गोपाळ येणें पंथें ॥ २ ॥
न लगती कांहीं तपांचिया रासी । करणें वाराणसी नाना तीर्थें ॥३॥
कल्पना हे तिळ देहीं अभिमान । नये नारायण जवळी त्यांच्या ॥४॥
तुका ह्मणे नामें देव नेदी भेटी । ह्मणे त्याचे होंटीं कुष्ठ होय ॥ ५ ॥

॥ ६०२ ॥

आणीक कोणाचा न करीं मी संग । जेणें होय भंग माझ्या चित्ता ॥ १ ॥
विठ्ठलावांचूनि आणीक जे वाणी । नाइकें मी कानीं आपुलिया ॥ २ ॥
समाधानासाठीं बोलावी हे मात । परि माझें चित्त नाहीं कोठें ॥ ३ ॥
जिवाहुनि मज तेचि आवडती । आवडे ज्या चित्तीं पांडुरंग ॥ ४ ॥
तुका ह्मणे माझें तोचि जाणे हित । आणिकांच्या चित्त नेदी बोला ॥५॥

॥ ६०३ ॥

नव्हे जाखाई जोखाई । मायराणी मेसाबाई ॥१॥ बळिया माझा पंढरीराव । जो या देवांचाही देव ॥२॥ रंडी चंडी शक्ति । मद्यमांसातें भक्षिती ॥३॥ बहिरव खंडेराव । रोटीसुटीसाठीं देव ॥४॥ गणोबा विक्राळ । लाडुमोदकांचा काळ ॥५॥ मुंजा ह्मसासुरें । हें तों कोण लेखी पोरें ॥६॥ वेताळें फेताळें । जळो त्यांचें तोंड काळें ॥ ७ ॥ तुका म्हणे चित्तीं । धरा रखुमाईचा पती ॥८॥

॥ ६०४ ॥

माझें अंतरींचें तोचि जाणे एक । वैकुंठनायक पांडुरंग ॥ १ ॥
जीवभाव त्याचे ठेवियेला पायीं । मज चिंता नाहीं कवणेविशीं ॥२॥
सुखसमारंभें संतसमागमें । गाऊं वाचे नाम विठोबाचें ॥ ३ ॥
गातां पुण्य होय आइकतां लाभ । संवसार बंद तुटतील ॥ ४ ॥
तुका म्हणे जीव तयासी विकिला । आणीक विठ्ठलाविण नेणें ॥५॥

॥ ६०५ ॥

आणीक कांहीं मज नावडे हे मात । एक पंढरीनाथावांचूनिया ॥१॥
त्याचीच कथा आवडे कीर्तन । तें मज श्रवण गोड लागे ॥२॥
तुका म्हणे संत म्हणोत मळतें । विठ्ठलापरतें न मानी कांहीं ॥३॥

॥ ६०६ ॥

कोण वेची वाणी । आतां क्षुल्लकाकारणीं ॥ १ ॥ आतां हेंचि काम करूं । विठ्ठल हृदयांत धरूं ॥ २॥ नेदावेया वृत्ति । आतां उठोंचि बहुति ॥ ३ ॥ उपदेश लोकां । करूनी वेडा होतो तुका ॥ ४ ॥

॥ ६०७ ॥

विठ्ठल विठ्ठल मंत्र सोपा । करी पापा निर्मूळ ॥१॥ भाग्यवंता छंद मनीं । कोड कानीं ऐकती ॥२॥ विठ्ठल हें दैवत भोळें । चाड काळें न धरावी ॥३॥ तुका म्हणे भलते याती । विठ्ठल चित्तीं शुद्ध ते ४

॥ ६०८ ॥

विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी । विठ्ठल तोंडीं उच्चारा ॥१॥ विठ्ठल अवघ्या भांडवला । विठ्ठल बोला विठ्ठल ॥२॥ विठ्ठल नाद विठ्ठल भेद । विठ्ठल छंद विठ्ठल ३ विठ्ठल सुखा विठ्ठल दुःखा । तुकया मुखा विठ्ठल ॥४॥

॥ ६०९ ॥

विठ्ठल हा चित्तीं । गोड लागे गातां गीतीं ॥ १ ॥ आम्हां विठ्ठल जीवन । टाळ चिपूळिया धन ॥ २ ॥ विठ्ठल विठ्ठल वाणी । अमृत हे संजिवनी ॥३॥ रंगला या रंगें । तुका विठ्ठल सर्वांगें ॥ ४ ॥

॥ ६१० ॥

विठ्ठल आमुचा निजांचा । सज्जन सोयरा जीवाचा ॥१॥ मायबाप चुलता बंधु । अवघा तुजशीं संबंधु ॥२॥ उभयकुळीं साक्ष । तूंचि माझा मातुळपक्ष ॥३॥ समर्पिली काया । तुका म्हणे पंढरीराया ४

॥ ६११ ॥

विठ्ठल सोयरा सज्जन सांगाती । विठ्ठल हा चित्तीं बैसलासे ॥ १ ॥
विठ्ठलें हें अंग व्यापिली हे काया । विठ्ठल हे छाया माझी मज ॥ २॥
बैसला विठ्ठल जिव्हेचिया माथां । न वदे अन्यथा आन दुजें ॥ ३ ॥
सकळ इंद्रियां मन एक प्रधान । तेंही करी ध्यान विठोबाचें ॥ ४ ॥
तुका ह्मणे या विठ्ठलासी आतां । नये विसंबतां माझें मज ॥ ५ ॥

॥ ६१२ ॥

विठ्ठल गीतीं गावा विठ्ठल चित्तीं ध्यावा ॥ विठ्ठल उभा पहावा विटेवरी १
अनाथाचा बंधु विठ्ठल कृपासिंधु । तोडी भवबंधु यमपाश ॥ २ ॥
तोचि शरणागतां हा विठ्ठल मुक्तिदाता । विठ्ठल या संतां समागमें ३
विठ्ठल गुणनिधि विठ्ठल सर्व सिद्धि । लागली समाधि विठ्ठलनामें ४
विठ्ठलाचें नाम घेतां झालें सुख । गोडावलें मुख तुका म्हणे ॥ ५ ॥

॥ ६१३ ॥

विठ्ठल गीतीं विठ्ठल चित्तीं । विठ्ठल विश्रांति भोग जया ॥ १ ॥
विठ्ठल आसनीं विठ्ठल शयनीं । विठ्ठल भोजनीं ग्रासोग्रासीं ॥ २ ॥
विठ्ठल जागृतिस्वप्नसुषुप्ति । आन दुजें नेणती विठ्ठलेंविण ॥ ३ ॥

भूषण अळंकार सुखाचा प्रकार। विठ्ठलीं निर्धार जया नरा ॥ ४ ॥
तुका म्हणे तेही विठ्ठलाचि झाले। संकल्प मुराले दुजेपण ॥ ५ ॥

॥ ६१४ ॥

जीवींचा जिव्हाळा। पाहों आपुलिया डोळां ॥ १ ॥ आम्हां विठ्ठल एक देव। येर अवघेचि वाव ॥ २ ॥ पुंडलिकाचे पाठीं। उभा हात ठेउनि कटीं ॥३॥ तुका म्हणे चित्तीं। वाहूं रखुमाईचा पती ॥४॥

॥ ६१५ ॥

एक धरिला चित्तीं। आम्ही रखुमाईचा पती ॥१॥ तेणें झालें अवघें काम। निवारला भवश्रम ॥ २ ॥ परद्रव्य परनारी। झाली विषाचिया परी ॥ ३ ॥ तुका म्हणे फार। नाहीं लागला व्यवहार ॥ ४ ॥

॥ ६१६ ॥

आह्मां अवघें भांडवल। येथें विठ्ठल एकला ॥ १ ॥ कायावाचामनोभावें। येथें जीवें वेचलों ॥ २ ॥ परतें कांहीं नेणें दुजें। तत्त्वबीज पाऊलें ॥ ३ ॥ तुका म्हणे संतसंगें। येणें रंगें रंगलों ॥ ४ ॥

॥ ६१७॥

आह्मां हेंचि भांडवल। म्हणों विठ्ठल विठ्ठल ॥ १ ॥ सुखें तरों भवनदी। संगें वैष्णवांची मांदी ॥ २ ॥ बाखराचें वाण। सांडूं हें जेवूं जेवण ॥ ३ ॥ नलगे वारंवार। तुका म्हणे वेरझार ॥ ४ ॥

॥ ६१८ ॥

आणीक मात माझ्या नावडे जीवासी। काय करूं यासी पांडुरंगा १
मुखा तेंचि गोड श्रवणां आवडी। चित्त माझें ओढी तुझे पायीं २
जये पदीं नाहीं विठ्ठलाचें नाम। मज होती श्रम आइकतां ॥ ३ ॥
आणिकाचें मज म्हणवितां लाज। वाटे हें सहज न बोलावें ॥ ४ ॥
तुका म्हणे मज तूंच आवडसी। सर्व भावेंविसीं पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ ६१९ ॥

आम्ही नामाचे धारक। नेणों प्रकार आणीक। सर्व भावें एक। विठ्ठलचि प्रमाण ॥१॥ नलगे जाणावें नेणावें। गावें आनंदें नाचावें। प्रेमसुख घ्यावें। वैष्णवांचे संगती २ भावबळें घालूं कास। लज्जा चिंता दवडूं आस। पायीं निजध्यास। म्हणों दास विष्णूचे ॥ ३ ॥ भय नाहीं जन्म घेतां। मोक्षसुखा हाणों लाता। तुका म्हणे सत्ता। निकट करूं सेवेची ॥ ४ ॥

॥ ६२० ॥

एक गावें आम्ही विठोबाचें नाम। आणिकांपें काम नाहीं आतां १
[illegible] वाटा सूक्ष्म दुस्तर। केला राज्यभार चाले ऐसा ॥ २ ॥
मृदंग टाळश्रुतिघोष। सेवूं ब्रह्मरस आवडीनें ॥ ३ ॥
[illegible]म्हणे महापातकी पतित। होती जीवन्मुक्त हेळामात्रें ॥ ४ ॥

॥ ६२१ ॥

आह्मांसी तो नाहीं आणीक प्रमाण । नामासी कारण विठोबाच्या१
घालुनिया कास करितों कैवाड । वागों नेदी आड कळिकाळासी २
अबद्ध वांकडें जैसें तैशा परी । वाचे हरि हरि उच्चारावे ॥ ३ ॥
तुका म्हणे आह्मां सांपडलें निज । सकळ हें बीज पुराणाचें ॥ ४ ॥

॥ ६२२ ॥

देवाचिये पायीं वेचों सर्व शक्ती । होतील विपत्ति ज्या ज्या कांहीं १
नेघे माझी वाचा पुढें कांहीं वाव । आणि दुजे भाव बोलायाचे २
मनाची वांटणी चित्ताचा विक्षेप । राहो हा अनुताप आहे तैसा ३
तुका म्हणे घेई विठ्ठलाचा छंद । आनंदाचा कंद विस्तारेल ॥४॥

॥ ६२३ ॥

माझी सर्व चिंता आहे विठोबासी । मी त्याच्या पायासी न विसंबे १
विसरतां रूप क्षण एक चित्तीं । जिवलग मूर्ती सावळी ते ॥ २ ॥
विसरतां हरी क्षण एक घडी । अंतरली जोडी लक्षलाभ ॥३॥
तुका म्हणे माझ्या विठोबाचे पायें । संजिवनी आहे हृदयामाजीं ॥४॥

॥ ६२४ ॥

मज अभयदान देई तूं दातारा । कृपेच्या सागरा मायबापा ॥१॥
देहभाव तुझ्या ठेवियेला पायीं । आणीक मी कांहीं दुजें नेणें ॥२॥
सेवा भक्तिहीन नेणता पतित । आतां माझें हित तुझ्या पायीं ॥३॥
तुका म्हणे माझें सर्वही साधन । नामसंकीर्तन विठोबाचें ॥ ४ ॥

॥ ६२५ ॥

करीन कोल्हाळ । आतां हाचि सर्वकाळ ॥ १ ॥ आतां येवो माझे आई । देई भातुके विठाई ॥२॥ उपायासी नाम । दिलें याचें पुढें क्षेम ॥ ३ ॥ बीज आणि फळ । हेंचि तुका म्हणे मूळ ॥ ४ ॥

॥ ६२६ ॥

आवडीच्या ऐसें झालें । मुखा आलें हरिनाम ॥१॥ आतां घेऊं धणीवरि । मागें उरी नुरे तों ॥२॥ साटवण मना ऐसी । पुढें रासी अमुप ॥३॥ तुका म्हणे कारण झालें । विठ्ठल या तीं अक्षरीं ॥४॥

॥ ६२७ ॥

जतन करीन जीवें । शुद्धभावें करूनी ॥ १ ॥ विठ्ठल विठ्ठल हें धन । जीवन अंतकाळींचें ॥ २ ॥ वर्दळ हें संचित सारूं । बरवा करूं उदिम हा ॥ ३ ॥ तुका म्हणे हृदयपेटी । ये संपुटीं सांठवूं ॥ ४ ॥

॥ ६२८ ॥

यथाविधि पूजा करी । सामोग्री तोंवरि हे नाहीं ॥१॥ आतां माझा सर्व भार । तूं दातार चालविला ॥२॥ मंगळ तें तुह्मी जाणा । नारायणा काय तें ॥३॥ तुका म्हणे समर्पिला । तुज विठ्ठला देहभाव ॥४॥

॥ ६२९ ॥

येणें बोधें आम्ही असों सर्वकाळ । करूनि निर्मळ हरिकथा ॥१॥
आम्ही भूमीवरी एकपै दैवाचे । निधान हें वाचे सांपडलें ॥२॥
तरतील कुळें दोन्ही उभयतां । गातां आइकतां सुखरूप ॥३॥
न चळे हा मंत्र न म्हणों यातीकुळ । नलगे काळ वेळ विचारावी ॥४॥
तुका म्हणे माझा विठ्ठल विसांवा । सांठवीन हांवा हृदयांत ॥५॥

॥ ३३० ॥

सुखाची वसति झाली माझे जीवीं । तुमच्या गोसावी कृपादानें १
रूप वेळोवेळां आठवीं अंतरीं । बैसोनि जिव्हारीं राहिलें तें ॥२॥
विसावलें मन विटलें प्रपंचा । गोडावली वाचा येणें रसें ॥३॥
तुका म्हणे कांहीं नाठवेसें केलें । दुसरें विठ्ठलें मज आतां ॥४॥

॥ ६३१ ॥

काम क्रोध आम्हीं वाहिले विठ्ठलीं । आवडी धरिली पायांसवें ॥१॥
आतां कोण पाहे मागें परतोनि । गेला हारपोनि देहभाव ॥ २ ॥
रिद्धिसिद्धि सुखें हाणितल्या लाता । तेथें या प्राकृता कोण मानी ॥३॥
तुका म्हणे आम्ही विठोबाचे दास । करूनि ठेलों ग्रास ब्रह्मांडाचा४

॥ ६३२ ॥

माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपणचि देव होय गुरु ॥ १ ॥
पढिये देहभाव पुरवितो वासना । अंतीं तें आपणापाशीं न्यावें ॥२॥
मागें पुढें उभा राहे सांभाळीत । आलिया आघात निवारावे ॥ ३ ॥
योगक्षेम त्याचें जाणे जडभारीं । वाट दावी करीं धरूनिया ॥४॥
तुका म्हणे नाहीं विश्वास ज्या मनीं । पहावें पुराणीं विचारूनी ॥५॥

॥ ६३३ ॥

काय उणें आह्मां विठोबाचे पायीं । नाहीं ऐसें काइ येथें एक ॥ १ ॥
नव्हे भोंवतालें ठायीं वांटूं मन । वराडी करून दारोदारीं ॥ २ ॥
कोण बळी माझ्या विठोबा वेगळा । आणीक आगळा दुजा सांगा ॥३॥
तुका म्हणे मोक्ष विठोबाचे गांवीं । फुकाचीं लुटावीं भांडारें तीं ॥४॥

॥ ६३४ ॥

जैसा अधिकार । तैसें बोलावें उत्तर ॥१॥ काय वाउगी घसघस । आम्ही विठोबाचे दास ॥२॥ आम्ही जाणों एका देवा । जैसी तैसी करूं सेवा ॥ ३ ॥ तुका म्हणे भावें । माझें पुढें पडेल ठावें ॥ ४ ॥

॥ ६३५ ॥

आह्मां विष्णुदासां हेंचि भांडवल । अवघा विठ्ठल धन वित्त ॥१॥
वाणी नाहीं घ्यावें आपुलिया हातें । करोनिया चित्तें समाधान ॥२॥
तुका म्हणे द्रव्य मेळविलें मागें । हें तो कोणासंगें आलें नाहीं ॥३॥

॥ ६३६ ॥

आम्ही विठ्ठलाचे दास झालों आतां । न चले हे सत्ता आणिकांची
नावरे तयासी ऐसें नाहीं दुजें । करितां पंढरिराजे काय नव्हे ॥२॥
कोठें तुज ठाव घ्यावयासी धावा । मना तूं विसावा घेई आतां ॥३॥
इंद्रियाची वोढी मोडिला व्यापार । ज्या अंगें संचार चाली तुज ॥४॥
तुका म्हणे आम्ही जिंकोनिया काळ । बैसलों निश्चळ होऊनिया ॥५॥

॥ ६३७ ॥

सकळ धर्म मज विठोबाचें नाम । आणीक तें वर्म नेणें कांहीं ॥ १ ॥
काय जाणों संतां निरविलें देवें । करिती या भावें कृपा मज ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा कोणा अधिकार । तो मज विचार कळों यावा ॥३॥

॥ ६३८ ॥

माझें आराधन । पंढरपुरींचें निधान ॥ १ ॥ तया एकाविण दुजें ।
कांहीं नेणें पंढरीराजे ॥ २ ॥ दास विठ्ठलाचा । अंकित अंकिला
ठायींचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां । नव्हे पालट सर्वथा ॥ ४ ॥

॥ ६३९ ॥

माझी विठ्ठल माउली । प्रेमपान्हा पान्हायली ॥ १ ॥ कुर्वाळुनि
लावी स्तनीं । नवजे दुरी जवळूनि ॥ २ ॥ केली पुरवी आळी ।
नव्हे निष्ठुर कोंवळी ॥३॥ तुका ह्मणे घांस । मुखीं घाली ब्रह्मरस ॥ ४ ॥

॥ ६४० ॥

जळतें संचित । ऐसी आहे धर्म नीत ॥ १ ॥ माझ्या विठोबाचे
पाय । वेळोवेळां मनीं ध्याय ॥ २ ॥ नेदी कर्म घडो । कोठें आड-
राणें पडो ॥ ३ ॥ तुका ह्मणे मळ । राहो नेदी ताप जाळ ॥ ४ ॥

॥ ६४१ ॥

माझें मज द्यावें । नाहीं करवीत नवें ॥ १ ॥ सहस्रनामाचें रूपडें ।
भक्त कैवारी चोखडें ॥२॥ साक्षीविण बोलें । तरी मज पाहिजे
दंडिलें ॥ ३ ॥ तुका म्हणे माल । माझा खरा हा विठ्ठल ॥ ४ ॥

॥ ६४२ ॥

सुख वाटे परी वर्म । धर्माधर्म न कळे ॥१॥ गायनाचें एवढें जाणें ।
विठ्ठल ह्मणे निर्लज्ज ॥ २ ॥ अवघें माझें हेंचि धन । साधनही
सकळ ॥३॥ तुका ह्मणे पायां पडे । तुमच्या कोडें संतांच्या ॥ ४ ॥

॥ ६४३ ॥

येउनि संसारीं । मी तो एक जाणें हरी ॥१॥ नेणें आणिक कांहीं
धंदा । नित्य ध्यातसे गोविंदा ॥२॥ कामक्रोधलोभस्वार्थ । अवघा
माझा पंढरिनाथ ॥३॥ तुका ह्मणे एक । धणी विठ्ठल मी सेवक ॥४॥

॥ ६४४ ॥

रुची रुची घेऊं गोडी । प्रेमसुखें झाली जोडी ॥ १ ॥ काळ जाऊं

नेदूं वायां । चिंतूं विठोबाच्या पायां ॥२॥ करूं भजन भोजन । धणी घेऊं नारायण ॥३॥ तुका ह्मणे जीव धाला । होय तुझ्यानें विठ्ठला ४॥

॥ ६४५ ॥

आनंद अद्वय नित्य निरामय । जे कां नित्य ध्येय योगियांचें ॥ १ ॥
ते हे समचरण साजिरे विटेवरी । पहा भीमातीरीं विठ्ठलरूप ॥ २ ॥
पुराणासी वाढ श्रुति नेणती पार । तें झालें साकार पुंडलीका ॥ ३ ॥
तुका ह्मणे ज्यातें सनकादिक ध्यात । तें आमुचें कुळदैवत पांडुरंगा ॥४॥

॥ ६४६ ॥

अद्वयचि द्वय झालेंचि कारण । धरिलें नारायणें भक्तिसुख ॥१॥
अपरोक्ष आकार झाला चतुर्भुज । एकतत्त्व बीज भिन्न नाहीं ॥२॥
शून्य निरसूनि राहिलें निर्मळ । तें दिसे केवळ विटेवरी ॥ ३ ॥
सुखें घ्यावें नाम वदनाही चाड । सरिता वापी आड एक पाणी ४।
तुका म्हणे मीच आहे तेणें सुखें । भेद नाहीं मुखें नाम गातों ॥५।

भेटीचे अभंग.

॥ ६४७ ॥

कर कटावरी तुळसीच्या माळा । ऐसें रूप डोळां दावीं हरी ॥ १ ॥
ठेविले चरण दोन्ही विटेवरी । ऐसें रूप हरी दावी डोळां ॥ २ ॥
कटीं पीतांबर कास मिरवली । दाखवी वहिली ऐसी मूर्ती ॥३॥
गरुडपारावरी उभा राहिलासी । आठवे मानसीं तेंचि रूप ॥ ४ ॥
झुरोनि पांजरा होऊं पाहे आतां । येईं पंढरीनाथा भेटावया ॥ ५ ॥
तुका ह्मणे माझी पुरवावी आस । विनंती उदास करूं नये ॥ ६ ॥

॥ ६४८ ॥

वाटुली पाहातां सिणले डोळुले । दाविसी पाउलें कें वो डोळां ॥१॥
तूं माय माउली कृपेची साउली । विठ्ठले पाहिली वास तुझी ॥२॥
का बा मोकलिलें कोणा निरविलें । कठिण कैसें झालें हृदय तुझें ३
तुका ह्मणे माझ्या आसावल्या बाह्या । तुज क्षेम द्याया पांडुरंगा ॥४॥

॥ ६४९ ॥

भक्तप्रतिपाळे दीन वो वत्सले । विठ्ठले कृपाळे होसी माये ॥ १ ॥
पडिला विसर माझा काय गुणें । कपाळ हें उणें काय करूं ॥२॥
तुका ह्मणे माझें जाळूनि संचित । करी वो उचित भेट देईं ॥ ३ ॥

॥ ६५० ॥

तुजविण मज कोण वो सोयरें । आणीक दुसरें पांडुरंगा १ लागलीसे आस पाहे तुझी वास । रात्री वो दिवस लेखी बोटें ॥ २ ॥ काम गोड मज नलगे हा धंदा । तुका म्हणे सदा हेंचि ध्यान ॥ ३ ॥

॥ ६५१ ॥

नलगे हें मज तुझें ब्रह्मज्ञान। गोजिरें सगुण रूप पुरें ॥ १ ॥ लागला उशीर पतितपावना। विसरोनि वचना गेलासि या ॥ २ ॥ जाळोनि संसार बैसलों अंगणीं। तुझें नाहीं मनी मानसींही ॥ ३ ॥ तुका म्हणे नको रागेजु विठ्ठला। उठीं देईं मला भेटी आतां ॥४॥

॥ ६५२ ॥

धांव घाली आई। आतां पाहातेसी काई ॥१॥ धीर नाहीं माझे पोटीं। झालों वियोगें हिंपुटी ॥ २ ॥ करावें सीतळ। बहु झाली हळहळ ॥ ३ ॥ तुका म्हणे डोई। कधीं ठेवीन हे पायीं ॥ ४ ॥

॥ ६५३ ॥

दर्शनाची आस। आतां न साहे उदास ॥ १ ॥ जीव आला पायापाशीं। येथें असे कलिवरेसीं ॥ २ ॥ कांहींचि नाठवे। ठायीं बैसलें नुठवे ॥ ३ ॥ जीव असतां पाही। तुका ठकावला ठायीं ॥ ४ ॥

॥ ६५४ ॥

कान्हया रे जगजेठी। देई भेटी एकवेळे ॥१॥ काय मोकलिलें वनीं सावजांनीं वेढिलें ॥ २ ॥ येथवरी होता संग। अंगें अंग लपविलें ॥ ३ ॥ तुका म्हणे पाहिलें मागें। एवढ्या वेगें अंतरला ॥ ४ ॥

॥ ६५५ ॥

जये ठायीं आवडी ठेली। मज ते बोली न संडे ॥१॥ पुरवावें जीवींचें कोड। भेटी गोड तुज मज ॥२॥ आणिलें तें येथवरी। रूप दुरी न करावें ॥३॥ तुका म्हणे नारायणा। सेवाहीना धिग वृत्ति ॥४॥

॥ ६५६ ॥

आर्त माझ्या बहु पोटीं। व्हावी भेटी पायाशीं ॥ १ ॥ यासी तुह्मी कृपावंता। माझी चिंता असों द्या ॥२॥ तळमळ करी चित्त। अखंडित वियोगें ॥३॥ तुका म्हणे पंढरी नाथा। जाणे व्यथा अंतरींची ॥४॥

॥ ६५७ ॥

मन उताविळ। झालें न राहे निश्चळ ॥१॥ दे रे भेटी पंढरिराया। उभारोनि चारी बाह्या ॥२॥ सर्वांग तळमळी। हात पाय रोमावळी ॥ ३ ॥ तुकया बंधु ह्मणे कान्हा। भूक लागली नयना ॥ ४ ॥

॥ ६५८ ॥

भेटीची आवडी उताविळ मन। लागलेंसें ध्यान जीवीं जीवा ॥१॥ आतां आवडीचा पुरवावा सोहळा। येऊनी गोपाळा क्षेम देईं ॥२॥ नेत्र उन्मळित राहिलें ताटस्त। गंगा आश्रुपात वहावली ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही करा साचपणा। मुळींच्या वचना आपुलिया ॥४॥

॥ ६५९ ॥

मी तव बैसलों धरूनियां ध्यास। न करीं उदास पांडुरंगा ॥ १ ॥ नको आतां मज दवडूं श्रीहरी। मागाया भिकारी झालों दास ॥२॥

भुकेलों कृपेच्या वचनाकारणें। आशा नारायणें पुरवावी ॥ ३ ॥
तुका म्हणे येऊनिया देई भेटी। कुरवाळुनी पोटीं धरी मज ॥४॥

॥ ६६० ॥

धरूनि हें आलों जीवीं। भेटी व्हावी विठोबासी ॥ १ ॥ संकल्प तो नाहीं दुजा। महाराजा विनवितो ॥ २ ॥ पायांवरी ठेविन भाळ। येणें सकळ पावलें ॥३॥ तुका म्हणे डोळेभरी। पाहिन हरी श्रीमुख ॥४

॥ ६६१ ॥

भेटीलागी पंढरिनाथा। जीवीं लागली तळमळ व्यथा ॥ १ ॥
कैं कृपा करिसी नेणें। मज दीनाचें धांवणें ॥ २ ॥ सीणलें माझें मन। वाट पाहातां लोचन ३ तुका म्हणे भूक। तुझें पहावया मुख ॥४

॥ ६६२ ॥

भेटीवांचोनिया दुजें नाहीं चित्तीं। येणें काकुलती याजसाठीं ॥१॥
भेटोनिया बोले आवडीचें गुज। आनंदाच्या भोजें जेवूं संगें ॥२॥
मायलेंकराशीं नाहीं दुजी परि। जेवूं बरोबरी बैसोनिया ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसें अंतरींचें आर्त। यावें जी त्वरित नारायणा ॥४॥

॥ ६६३ ॥

कन्या सासुऱ्यासि जाये। मागें परतोनी पाहे ॥ १ ॥ तैसें झालें माझ्या जिवा। कधीं भेटसी केशवा ॥ २ ॥ चुकलिया माये। बाळ हुरू हुरू पाहे ॥३॥ जीवना वेगळी मासोळी। तैसा तुका तळमळी ४

॥ ६६४ ॥

कीर्तन ऐकावया भुलले श्रवण। श्रीमुख लोचन देखावया ॥ १ ॥
उदित हें भाग्य होईल कोणे काळीं। चित्त तळमळी म्हणऊनि ॥२॥
उतावीळ बाह्या भेटिलागी दंड। लोटांगणीं धड जावयासी ॥ ३ ॥
तुका म्हणे माथा ठेवीन चरणीं। होतील पारणी इंद्रियांची ॥ ४ ॥

॥ ६६५ ॥

देवा बोलें आतां बोला। त्वां कां धरिला अबोला ॥ १ ॥ भेऊं नको देई भेटी। तूं कां पडिलासी संकटीं ॥ २ ॥ तुझ्या जीवींचें मी जाणें। ह्मणसी मुक्ती आह्मां देणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे नलगे कांहीं। चित्त राहो तुझे पायीं ॥ ४ ॥

॥ ६६६ ॥

कां हो येथें काळ आला आम्हां आड। तुम्हांपाशीं नाड करावया१
कां हो विचाराचें पडिलें सांकडें। काय ऐसें कोडें उपजलें ॥ २ ॥
कां हो उपजेना द्यावी ऐशी भेटी। काय द्वैत पोटीं धरिलें देवा ३
पाप फार किंवा झालासी दुर्बळ। मागिल तें बळ नाहीं आतां ॥४॥
काय झालें देणें निघालें दिवाळें। कीं बांधलासि बळें ऋणपायीं ५
तुका ह्मणे कां रे ऐसी केली गोवी। तुझी माझी ठेवी निवडुनिय ६

॥ ६६७ ॥

पंढरीची वाट पाहें निरंतर । निढळावरी कर ठेवूनिया ॥ १ ॥
जातिया निरोप पाठवीं माहेरा । कां मज सासुरा सांडियेलें ॥२॥
पैल कोण दिसे गरुडाचे वारिकें । विठ्ठलासारिकें चतुर्भुज ॥ ३ ॥
तुका म्हणे धीर नाहीं माझ्या जीवा । भेटशी केधवां पांडुरंगा॥४॥

॥ ६६८ ॥

काय तुझें वेचे मज भेटी देतां । वचन बोलतां एक दोन ॥ १ ॥
काय तुझें रूप घेतों मी चोरोनि । त्या भेणें लपोनि राहिलासी॥२॥
काय तुझें आह्मां करावें वैकुंठ । भेवों नको भेट आतां मज ॥ ३ ॥
तुका म्हणे तुझी नलगे दसोडी । परि आहे आवडी दर्शनाची ४॥

॥ ६६९ ॥

वाट पाहें हरि कां नये आझूनि । निष्ठुर कां मनीं धरियेलें ॥ १ ॥
काय करूं धीर होत नाहीं जीवा । काय आड ठेवा उभा ठेला ॥२॥
नाहीं माझा धांवा पडियेला कानीं । कोठें चक्रपाणी गुंतलेती ॥३॥
नाहीं आलें कळों अंतरा अंतर । कृपावंत फार ऐकतों ॥ ४ ॥
बहुता दिसांचें राहिलें भातुकें । नाहीं कवतुकें कुरवाळिलें ॥ ५ ॥
तुका ह्मणे देईं एकवेळा भेटी । शीतळ हें पोटीं होईल मग ॥ ६ ॥

॥ ६७० ॥

ये गा महाविष्णु अनंतभुजाच्या । आह्मां अनाथांच्या माहेरा ये ॥ १ ॥
भेटावया तुज ओढे माझा जीव । एकवेळा पाय दावी डोळां ॥२॥
आणीक हें आर्त नाहीं नारायणा । ओढे हे वासना भेटावया ॥३॥
वाटे चित्तीं काय करावा विचार । चरण सुंदर पाहावया ॥ ४ ॥
तुका म्हणे माझें पुरवीं मनोरथ । येईं गा संवरीत पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ ६७१ ॥

पहावा नयनीं विठ्ठलचि एक । कांहीं तरी सार्थक संसाराचें ॥१॥
कोठें पाहों तुज कां गा लपालासी । कांहीं बोल मशीं नारायणा २॥
वाटे उदास मज दाही दिशा । तुजाविण हृषीकेशा वांचोनिया ३
नको नेऊं मज आपणा वेगळें । बहुत कळवळें तुजलागीं ॥ ४ ॥
तुका म्हणे भेटी देईं नारायणा । घडी कंठवेना तुजाविण ॥ ५ ॥

॥ ६७२ ॥

नव्हे निष्ठावंत तुझा काम केला । सेवेविण मोल मागतसें ॥ १ ॥
न घडे भजन शुद्ध भावनिष्ठा । आपुल्या अदृष्टावरी बोल ॥ २ ॥
पूर्वीं झाले भक्त असंख्य विरक्त । काम क्रोध अहंते निर्दाळिलें ३॥
ऐसी अंगवण नाहीं मज देवा । करीतसें हेवा भेटावयाचा ॥ ४ ॥
कृपा करोनिया पुरवी असोसी । आपुल्या ओदासी राखावया ॥५॥
तुका म्हणे एक बाळक अज्ञाते । त्यासी हे पोसिने मायबापें ॥ ६ ॥

॥ ६७३ ॥

बा रे पांडुरंगा केव्हां येशी भेटी । जाहालों हिंपुटी तुजवीण ॥१॥
तुजवीण सखे न वटे मज कोणी । वाटतें चरणीं घालूं मिठी ॥२॥
ओवाळावी काया चरणांवरोनी । केव्हां चक्रपाणी भेटशील ॥ ३ ॥
तुका म्हणे माझी पुरवी आवडी । वेगीं घाली उडी नारायणा ॥४॥

॥ ६७४ ॥

अपराध झाले जरी असंख्यात । तरी कृपावंत नाम तुझें ॥ १ ॥
तुझें लडिवाळ तुज कृपा यावी । म्यां वाट पाहावी कवणाची ॥२॥
मायबाप माझा रुक्मादेवीवर । हा दृढ निर्धार अंतरींचा ॥ ३ ॥
तुका म्हणे कोणे गोष्टीचें संकट । न घाली मज भेट नारायणा ४॥

॥ ६७५ ॥

नाहीं बळ योग अभ्यास कराया । न कळे ते क्रिया साधनाची १॥
तुझिये भेटीचें प्रेम अंतरंगीं । नाहीं बळ अंगीं भजनाचें ॥ २ ॥
काय पांडुरंगा करूं बा विचार । झुरतें अंतर भेटावया ॥ ३ ॥
तुका म्हणे सांगा वडिलपणें बुद्धी । तुजविण दयानिधी पुसों कोणा ४

॥ ६७६ ॥

माझिया तो जीवें घेतला हा सोस । पाहें तुझी वास भेटावया ॥ १ ॥
मातेविण बाळ न मनी आणिकां । सर्वकाळ धोका स्तनपाना ॥ २ ॥
वोसंगा निघाल्यावांचूनि न राहे । त्याचें आर्त माय पुरवीते ॥ ३ ॥
तुका ह्मणे माते भक्तां तूं कृपाळ । गिळियेले जाळ वनांतरीं ॥ ४ ॥

॥ ६७७ ॥

न लगती मज शब्दब्रह्मज्ञान । तुझिया दर्शनावांचूनिया ॥ १ ॥
म्हणऊनि तुझें करितों चिंतन । नावडे वचन आणिकांचें ॥ २ ॥
काय ते महत्वीं करावी मान्यता । तुज न देखतां पांडुरंगा ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज भेटल्यावांचूनि । न राहें त्याहूनि होइन वेडा ॥ ४ ॥

॥ ६७८ ॥

हाचि माझा नेम धरिला हो धंदा । यावरि गोविंदा भेटी द्यावी ॥१॥
हाचि माझा ध्यास सदासर्वकाळ । न्यावयासी मूळ येसी कधीं ॥२॥
डोळियांची भूक पाहतां श्रीमुख । आलिंगनें सुख निवती भुजा ॥ ३
बहु चित्त ओढे तयाचिये सोई । पुरला हा कांहीं नवस नेणें ॥ ४ ॥
बहुबहु काळ झालों कासावीस । वाहिलें बहुवस कलेवर ॥ ५ ॥
तुका ह्मणे आतां पाडावें हें ओझें । पांडुरंगा माझें यावरि ॥ ६ ॥

॥ ६७९ ॥

स्वामीसी संकट पडे जे गोष्टीचें । काय त्या प्रेमाचें सुख मज ॥ १ ॥
दुखवीना चित्त तुझें नारायणा । कांहींच मागेना तुजपाशीं ॥ २ ॥

रिद्धि सिद्धि मोक्ष संपत्ति विलास । सोडियेली आस यांची जीवें ॥ ३
तुका ह्मणे एके वेळे देई भेटी । वोरसोनि पोटीं आलिंगावें ॥ ४ ॥

॥ ६८० ॥

नेणपणे नाहीं केला हा बोभाट । आतां आली वाट कळों खरी ॥१॥
आतां बहु शीघ्र यावे लवकरी । वाट पाहे हरी भेटी देई ॥ २ ॥
समर्थाच्या बाळा करुणेचें भाषण । तरी त्याची कोण नांदणूक ॥३॥
तुका ह्मणे बहु बोलिले बाडिवार । पडिलें अंतर लौकिकीं ते ॥ ४ ॥

॥ ६८१ ॥

भेटीलागीं जीवा लागलीसे आस । पाहे रात्रंदिवस वाट तुझी ॥ १ ॥
पूर्णिमेचा चंद्रमा चकोरा जीवन । तैसें माझें मन वाट पाहे ॥ २ ॥
दिवाळीचे मूळा लेंकी आसावली । पाहाते वाटुली पंढरीची ३ ॥
भुकेलिया बाळ अति शोक करी । वाट पाहे परि माउलीची ॥ ४ ॥
तुका ह्मणे मज लागलीसे भूक । धांवूनि श्रीमुख दावी देवा ॥ ५ ॥

॥ ६८२ ॥

आमुचीं जिवलगें सज्जन सोयरीं । नांदतील तीरीं भिवरेच्या ॥१॥
तींच माझ्या चित्तीं वसती दिवसराती । भेटावया खंती वाटतसे२
संपदा सोहळे सर्व सुख वसे । वैकुंठीं जें नसे सुरवरासी ॥ ३ ॥
ज्याच्या नामें पाप दुःख नाहीं भय । विठ्ठल बाप माय रखमाबाई४
माझा जीव जातो अमृत ते कळा । कंठीं वेळोवेळा ध्यात असें ॥५॥
तुका ह्मणे वाट पाहातां शिणले । त्या पथें डोळुले पंढरींच्या ॥६॥

॥ ६८३ ॥

लोकमान देहसुख । संपत्ति उपभोग अनेक । विटंबना दुःख । तुझिया भेटिवांचूनि ॥१॥ तरि मज ये भेट ये भेट । काय ठाकलासी नीट । थोर पुण्यें वीट । तुज दैवेंचि लाधली ॥ २ ॥ काय ब्रह्मज्ञान करूं कोरडें । रितें मावेचें मापाडें । भेटीविण कुडें । तुझिया अवघे मज वाटे ॥ ३ ॥ आत्मस्थितीचा विचार । काय करूं हा उद्धार । न देखतां धीर । चतुर्भुज मज नाहीं ॥ ४ ॥ रिद्धिसिद्धि काय करूं । अथवा अगम विचारु । भेटीविण भारु । तुझिया वाटे मज यांचा ५
तुजवांचूनि कांहीं व्हावें । ऐसें नको माझिया जीवें । तुका ह्मणे द्यावें । दरुषण पायांचें ॥ ६ ॥

॥ ६८४ ॥

मातेविण बाळा । आणीक न माने सोहळा ॥१॥ तैसें झालें माझ्या चित्ता । तुजविण पंढरिनाथा ॥ २ ॥ वाट पाहे मेघा बिंदू । नेघे चातक सरिता सिंधू ॥३॥ सारसांसी निशीं । ध्यान रवीच्या प्रकाशीं ४

जीवनाविण मत्स्य । जैसें धेनूलागी वत्स ॥५॥ पतिव्रते जिणें । भ्रताराच्या वर्तमानें ॥६॥ कृपणाचें धन । लोभ्यालागीं जैसें मन ॥७॥ तुका ह्मणे काय । तुजविण प्राण राहे ॥ ८ ॥

॥ ६८५ ॥

सर्वभावें आलों तुजचि शरण । कायावाचामनसहित देवा ॥ १ ॥
आणीक दुसरें नये माझ्या मना । राहिली वासना तुझ्या पायीं २
माझिये जीवीचें कांहीं जडभारी । तुजविण वारी कोण दुजे ॥३॥
तुझे आम्ही दास आमुचा तूं ऋणी । चालत दुरूनी आले मागें ४
तुका ह्मणे आतां घेतलें धरणें । हिशोबाकारणें भेटी देई ॥ ५ ॥

॥ ६८६ ॥

दंभें कीर्ति पोट भरे मानी जन । स्वहित कारण नव्हे कांहीं ॥ १ ॥
अंतरती तुझे पाय मज दुरी । धरितां ये थोरी जाणिवेची ॥ २ ॥
पिंडाच्या पाळणें धांवती विकार । मजदावेदार मजमाजी ॥ ३ ॥
कैसा करूं घात आपुला आपण । धरूनि गुमान लोकलाज ॥ ४ ॥
तुका ह्मणे मज दावी तो सोहळा । देखें पाय डोळां तुझे देवा ॥५॥

॥ ६८७ ॥

डोळियां पाझर कंठ माझा दाटे । येऊं देई भेटे पांडुरंगे ॥ १ ॥
बहु दिस टाकिलें निरास कां केलें । कोठें वो गुंतलें चित्त तुझें २
बहु धंदा तुज नाहीं वो आठव । राहिलासे जीव माझा कंठीं ॥ ३ ॥
पंढरीस जाती वारकरी संतां । निरोप बहुतां हातीं धाडीं ॥ ४ ॥
तुजविण कोण सांवा धांवा करी । ये वो झडकरी पांडुरंगे ॥ ५ ॥
काय तुझी वाट पाहों कोठवरी । कृपाळुवा परी विसरलासी ॥६॥
एक वेळे माझा धरूनि आठव । तुका म्हणे येवो न्यावयासी ॥ ७ ॥

॥ ६८८ ॥

कोण्या काळें येईल मना । नारायणा तुमचिया ॥१॥ माझा करणें अंगीकार । सर्व भार फेडूनी ॥२॥ लागली हे तळमळ चित्ता । तरी दुश्चिता संसारीं ॥३॥ मुखाचीच पाहें वास । मागें दोष सांभाळीं ॥४॥ इच्छा पूर्ण झाल्याविण । कैसा सीण वारेल ॥५॥ लाहो काया-मनें वाचा । देवा साच्या भेटीचा ॥ ६ ॥ कांटाळा तो न धरावा । तुह्मी देवा दासांचा ७ तुका म्हणे माझे वेळे । न कळे कां हें उफराटें ८

॥ ६८९ ॥

वेगडाचा रंग राहे कोण काळ । अंगें हें पितळ न देखतां ॥ १ ॥
माझें चित्त मज जवळीच गोही । तुझी मज नाहीं भेटी येसें ॥२॥
दासीसुतां नाहीं पितियाचा ठाव । अवघेंचि वाव सोंग त्याचें ३।
तुका म्हणे माझी केली विटंबना । अनुभवें जना येईल कळों ॥४॥

॥ ६९० ॥

अनाथाचा सखा ऐकिला प्रताप । होशी कृपावंत मजवरी ॥ १ ॥ माझिया गा चित्ता करी शिकवण । जेणें तुझे चरण जोडतील ॥२॥ जोडुनिया कर येतो काकुलती । रखुमाईच्या पती कृपावंता ॥३॥ हरूषें निर्भर करी माझें मन । दाखवी चरण पांडुरंगा ॥ ४ ॥ तुझे भेटीवीण जन्म गेला वांया । भजन कराया शक्ति नाहीं ॥ ५ ॥ न घडे तुझी सेवा न घडे पूजन । जन्मोनि निष्कारण जाऊं पाहे ६॥ तुका ह्मणे हरी करावें या काय । भजनाशी साह्य होई बापा ॥७॥

॥ ६९१ ॥

कटावरी कर कासया ठेविले । जननी विठ्ठले जीवलगे ॥ १ ॥ शंख चक्र गदा कमळमंडित । आयुधें मंडित कृष्णाबाई ॥ २ ॥ क्षण एक धीर होत नाहीं चित्ता । केव्हां पंढरीनाथा भेटशील ॥ ३ ॥ तुका ह्मणे हेंचि करीं देई क्षेमा । तईच विश्रामा पावईन ॥ ४ ॥

॥ ६९२ ॥

तुमची तों भेटी नव्हे ऐसी झाली । कोरडीच बोली ब्रह्मज्ञान ॥ १ ॥ आतां न बोलावें ऐसें वाटे देवा । संग न करावा कोणांसवें ॥ २ ॥ तुह्मां निमित्यासी सांपडलें अंग । नेदावा हा संग विचारिलें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी राहिली वासना । आवडी दर्शनाचीच होती ४॥

॥ ६९३ ॥

तुझा म्हणवून तुज नेणें । ऐसें काय माझें जिणें ॥ १ ॥ तरि मज कोणाचा आधार । करोनिया राहों धीर २ काय शब्दची ऐकिला । भेटी नसतां गा विठ्ठला ३ तुका ह्मणे आतां । अभय देई पंढरीनाथा ४

॥ ६९४ ॥

आपुलिया ऐसें करी । संग धरी ज्याचा हो ॥१॥ ह्मणउनि परपरते । वरवरते पळतसें ॥२॥ लोभिक तें लोभा लावी । बांधल्या गोवी वांचूनी ॥३॥ तुका म्हणे नामगोठी । पुरे भेटी तुझी देवा ॥४॥

॥ ६९५ ॥

मोक्ष तुमचा देवा । तुह्मी दुर्लभ तो ठेवा ॥ १ ॥ मज भक्तीची आवडी । नाहीं अंतरीं ते गाडी ॥ २ ॥ आपुल्या प्रकारा । करा जतन दातारा ॥३॥ तुका म्हणे भेटी । पुरे एकचि शेवटीं ॥ ४ ॥

देवाशीं सलगीचीं भाषणें.

॥ ६९६ ॥

नमो विश्वरूपा विष्णु मायबापा । अपारा अमुपा पांडुरंगा ॥ १ ॥ विनवितों रंक दास मी सेवक । वचन तें एक आइकावें ॥ २ ॥ तुझी स्तुति वेद करितां भागला । निवांतचि ठेला नेति नेति ॥ ३ ॥

ऋषि मुनि बहु सिद्ध कविजन । वर्णितां ते गुण न सरती ॥ ४ ॥
तुका म्हणे तेथें काय माझी वाणी । जे तुझी वाखाणी कीर्ति देवा ५

॥ ६९७ ॥

तुजऐसा कोणी न देखें उदार । अभयदानशूर पांडुरंगा ॥ १ ॥
शरण येती त्यांचे न विचारिसी दोष । न मागतां त्यांस आढळ देसी २
धांवसील आडणी ऐकोनिया धांवा । कैवारें देवा भक्तांचिया ॥ ३ ॥
दोष त्यांचे जाळी कल्पकोटिवरी । नामासाठीं हरि आपुलिया ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुज वाणूं कैशा परी । एक मुख हरी आयुष्य थोडें ॥ ५ ॥

॥ ६९८ ॥

उदार कृपाळ अनाथांचा नाथ । ऐकसी मात शरणागतां ॥ १ ॥
सर्व भार माथां चालविसी त्यांचा । अनुसरलीं वाचा काया मनें ॥ २ ॥
पाचारितां उभा राहासी जवळी । पाहिजे ते काळीं पुरवावें ॥ ३ ॥
चालतां ही पंथ सांभाळिसी वाटे । वारिसील कांटे खडे हातें ॥ ४ ॥
तुका ह्मणे चिंता नाहीं तुझ्या दासां । तूं त्यांचा कोंवसा सर्वभावें ॥ ५

॥ ६९९ ॥

यथार्थवादें तुज न वर्णवे कदा । बोलतों ते निंदा करितों तुझी ॥ १ ॥
वेदश्रुति तुज नेणती कोणी । चोवीस ठेंगणी धांडोळितां ॥ २ ॥
आतां मज क्षमा करावे ते देवा । सलगी ते केशवा बोलियेलों ॥ ३ ॥
सगुण कीं साकार निर्गुण कीं निराकार । न कळे हा पार वेदां श्रुतीं ४
तो आह्मी भावें केलासी लहान । ठेवूनिया नांवें पाचारितों ॥ ५ ॥
सहस्रमुखें शेष सीणला स्तवितां । पार न कळतां ब्रह्मा ठेला ॥ ६ ॥
तेथें माझी देडबुद्धि ते काई । थोर मी अन्यायी तुका ह्मणे ॥ ७ ॥

॥ ७०० ॥

एक प्रेमगुज ऐकें जगजेठी । आठवली गोष्टी सांगतसें ॥ १ ॥
एक मृग दोन्ही पाडसांसहित । आनंदें चरत होतीं वनीं ॥ २ ॥
अवचिता तेथें पारधी पातला । घेउनिया आला श्वानें दोन्ही ॥ ३ ॥
एकीकडे त्यानें चिरिल्या वाघुरा । ठेविलें श्वानपुत्रा एकीकडे ॥ ४ ॥
एकीकडे तेणें वोणवा लाविला । आपण राहिला एकीकडे ॥ ५ ॥
चहूंकडोनिया मृगें वेढियेलीं । स्मरों तीं लागलीं नाम तुझें ॥ ६ ॥
रामा कृष्णा हरी गोविंदा केशवा । देवांचिया देवा पावें आतां ॥ ७ ॥
कोण रक्षी आतां ऐशिये संकटीं । बापा जगजेठी तुजविण ॥ ८ ॥
आइकोनि तुम्ही तयांचीं वचनें । कृपाअंतःकरणें कळवळिलां ॥ ९ ॥
आज्ञा तये काळीं केली पर्जन्यासी । वेगीं पावकासी विझवावें ॥ १० ॥
ससें एक तेथें उठवुनी पळविलें । तया पाठीं गेलीं श्वानें दोन्ही ११

मृगें चमकोनी सत्वर चाललीं। गोविंदें रक्षिलीं म्हणोनिया ॥१२॥
ऐसा तूं कृपाळु दयाळु आहेसी। आपुल्या भक्तांसी जीवलग ॥१३॥
ऐसी तुझी कीर्ति जीवीं आवडती। रखुमाईच्या पती तुका ह्मणे १४

॥ ७०१ ॥

सुख वाटे तुझे वर्णितां पवाडे। प्रेम मिठी पडे वदनासीं ॥ १ ॥
व्याले दोन्ही पक्षी एका वृक्षावरी। आला दुराचारी पारधी तो २
वृक्षाचिया माथां सोडिला ससाणा। धनुष्यासि बाणा लावियेलें ३
तये काळीं तुज पक्षी आठविती। धांवे गा श्रीपती मायबापा ॥४॥
उडोनिया जातां ससाणा मारील। बैसतां विंधील पारधी तो ॥५॥
ऐकोनिया धांवा तया पक्षियांचा। धरिला सर्पाचा वेश वेगीं ॥६॥
डंखोनि पारधी भूमीसी पाडिला। बाण तो लागला ससाण्यासी७
ऐसा तूं कृपाळु आपुलिया दासा। होशील कोंवसा संकटींचा ॥८॥
तुका म्हणे तुझी कीर्ति त्रिभुवनीं। वेदाचिये वाणी वर्णवेना ॥९॥

॥ ७०२ ॥

काय तुझी थोरी वर्णूं मी पामर। होसी दयाकर कृपासिंधु ॥ १ ॥
तुज ऐसी दया नाहीं आणिकांसी। ऐसें हृषीकेशी नवल एक ॥२॥
कुरुक्षेत्र भूमीवरी पक्षी व्याले। तृणामाजीं केलें कोठें त्यांनीं ॥३॥
अकस्मात तेथें रणखांब रोविला। युद्धाचा नेमिला ठाव तेथें ॥ ४ ॥
कौरव पांडव दळभार दोन्ही। झुंजावया रणीं आले तेथें ॥ ५ ॥
तये काळीं तुज पक्षी आठवीती। पाव बा श्रीपती ह्मणोनिया ॥ ६ ॥
हस्ती घोडे रथ तेथें धांवतील। पाषाण होतील शतचूर्ण ॥ ७ ॥
ऐशिये आकांतीं वांचों कैसे परी। धांव बा श्रीहरी लवलाहे ॥ ८ ॥
टाकोनिया पिलीं कैसें जावें आतां। पावे जगन्नाथा लवलाहीं ॥९॥
आली तिये काळीं कृपा तुझ्या चित्ता। अनाथांच्या नाथा नारायणा१०
एका गजाचिया कंठीं घंटा होती। पाडिली अवचिती तयांवरी ११
अठरा दिवस तेथें द्वंद्वयुद्ध झालें। वारा ऊन लागलें नाहीं तया१२
झुंज झाल्यावरी दाविलें अर्जुना। तुह्मीं नारायणा पक्षियांसी॥१३॥
पाहे आपुलिया दासां म्यां रक्षिलें। रणीं वांचविलें कैशा परी१४॥
ऐसी तुज माया आपुल्या भक्तांची। माउली आमुची तुका ह्मणे१५

॥ ७०३ ॥

अनंताचे मुखीं होसील गाइला। अमुप विठ्ठला दास तुझा ॥ १ ॥
माझें कोठें आलें होईल विचारा। तरीच अव्हेरा योग्य झालों ॥२॥
सर्व काळ तुम्ही असा जी संपन्न। चतुरा नारायण शिरोमणि ॥३॥
तुका ह्मणे ऐसे कलियुगींचे जीव। तरी नये कीव बहुपापी ॥ ४ ॥

॥ ७०४ ॥

अनंताच्या ऐकों कीर्ति। ज्याच्या चित्तीं हरिनाम ॥१॥ उलंघूनि गेले सिंधू । हा भवबंधू तोडोनिया ॥२॥ आतां हळुहळु तोचि वाही। चालों कांहीं अधिकारें ॥ ३ ॥ खुडूनिया गेले नावा । नाहीं हेवा खोळंबला ४ नलगे मोल द्यावा रुका । भावें एका कारण ॥ ५ ॥ भीमातिरीं थडवा केला । उठा चला लवलाहे ॥ ६ ॥ तुका म्हणे पाहतों वाट । उभा नीट पाउलीं ॥ ७ ॥

॥ ७०५ ॥

ऐसा हा लौकिक कदा राखवेना । पतितपावना देवराया ॥ १ ॥
संसार करितां म्हणती हा दोषी । टाकितां आळसी पोटपोसा ॥२॥
आचार करितां ह्मणती हा पसारा । न करितां नरा निंदिताती ॥३॥
संतसंग करितां ह्मणती हा उपदेशी । येरा अभाग्यासी ज्ञान नाहीं ४
धन नाहीं त्यासि ठायींचा करंटा । समर्थासि ताठा लाविताती ॥५॥
बहु बोलों जातां म्हणती हा वाचाळ । न बोलतां सकळ ह्मणती गर्वी
भेटिसि नवजातां ह्मणती हा निष्ठुर । येतां जातां घर बुडविलें ॥ ७ ॥
लग्न करूं जातां ह्मणती हा मातला । न करितां झाला नपुंसक ॥ ८ ॥
निपुत्रिका ह्मणती पहा हो चांडाळ । पातकाचें मूळ पोरवडा ॥९॥
लोक जैसा ओक धरितां धरवेना । अभक्ता जिरेना संतसंग ॥ १० ॥
तुका ह्मणे आतां ऐका वचन । त्यजुनिया जन भक्ति करा ॥ ११ ॥

॥ ७०६ ॥

उदारा कृपाळा पतितपावना । ब्रिदें नारायणा साच तुझीं ॥ १ ॥
वर्णिलासी जैसा जाणतां नेणतां । तैसा तूं अनंता साच होसी ॥२॥
दैत्यां काळ भक्तां मेघश्याममूर्ती । चतुर्भुज हातीं शंख चक्र ॥३॥
काम इच्छा तयां तैसा होसी रार्णी । यशोदेच्या स्तनीं पान करी ४
होऊनि सकळ कांहींच न होसी । तुका ह्मणे यासी वेद ग्वाही ॥२॥

॥ ७०७ ॥

गजेंद्र पशु आसें मोकलिला । तो तुज स्मरला पांडुरंगा ॥ १ ॥
त्यासाठीं गरुड सांडुनि धांवसी । माया झळंबसी दिनानाथा ॥२॥
धेनु वत्सावरी झेंप घाली जैसी । तैसें गजेंद्रासी सोडविलें ॥ ३ ॥
तुका ह्मणे ब्रीद बांधलें यासाठीं । भक्तांसी संकटीं रक्षावया ॥४॥

॥ ७०८ ॥

जन हें सुखाचें दिल्याघेतल्याचें । अंत हें काळींचें नाहीं कोणी॥ ॥
झाल्या हीन शक्ति नाकडोळे गळती । सांडोनिया पळती रांडापोरें२
बाईल ह्मणे खर मरता तरी बरें । नासिलें हें घर थुंकोनिया ॥ ३॥
तुका ह्मणे माझीं नव्हतील कोणी । तुज चक्रपाणी वांचूनिया ॥४॥

॥ ७०९ ॥

मी तों बहु सुखी आनंदभरिता । आहें साधुसंतां मेळीं सदा ॥१॥
कांहीं व्हावें ऐसें नाहीं माझ्या जीवा । आणीक केशवा तुजविण २
नलगे वैकुंठ मोक्ष सायुज्यता । सुख वाटे घेतां जन्म ऐसें ॥ ३ ॥
मृत्युलोकीं कोण धरिल वासना । पावावया जनासवें दुःख ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुझा दास ऐसें लोकां । कांहीं सकळिकां कळों यावें॥५॥

॥ ७१० ॥

आपुलें गांवींचें न देखेसें झालें । परदेसी एकलें किती कंठूं ॥ १ ॥
ह्मणऊनि पाहें मूळ येतां वाटे । जीवलग भेटे कोणी तरी ॥ २ ॥
पाहतां अवघ्या दिसतील दिशा । सकळही वोसा दृष्टीपुढें ॥ ३ ॥
तुका ह्मणे कोणी न सांगे वारता । तुझी वाटे चिंता पांडुरंगा ॥४॥

॥ ७११ ॥

आवडी धरूनि करूं गेलों लाड । भक्ति प्रेमकोड न पुरेचि ॥ १ ॥
ह्मणऊनि जीव ठेला आसावोनि । खेद होतो मनीं बहुसाल ॥ २ ॥
वेठीऐसें वाटे निर्फळ कारण । शीतळ होऊन खोडावलों ॥ ३ ॥
तुका ह्मणे सरतें नव्हेचि पायांपें । बळ केलें पापें नव्हेचि भेटी॥४॥

॥ ७१२ ॥

लागों नेदी बोल पायां तुझ्या हरी । जीव जावो परि न करीं आण१
परनारी मज रखुमाईसमान । वमनाहूनि धन नीच मानी ॥ २ ॥
तुका ह्मणे याची लाज नसे कोणा । सहाकारी दीना ज्याची तया३

॥ ७१३ ॥

काय मागें आह्मी गुंतलों काशानीं । पुढें वाहों मनीं धाक देवा १॥
कीर्ति चराचरी आहे तैसी आहे । भेटोनिया काय द्यावें आह्मां २
घेउनी धरणें बैसती उपवासी । हट आह्मांपासीं नाहीं तैसा ॥ ३ ॥
तातडी तयांनीं केली विटंबना । आम्हां नारायणा काय उणें ॥४॥
नाहीं मुक्तिचाड वास वैकुंठींचा । जीवभाव आमुचा देऊं तुज ॥५॥
तुका ह्मणे काय मानेल तें आतां । तूं घेई अनंता सर्व माझें ॥ ६ ॥

॥ ७१४ ॥

पाठवाल तेथें गर्जेन पवाडे । कार्यी देहाकडे नावलोकीं ॥ १ ॥
ह्मणउनि मागें कंठींचा सारस । पावतील नाश विघ्नें पुढें ॥ २ ॥
कृपेच्या कटाक्षें न भें कळिकाळा । येतां येत बळा शक्तीपुढें ॥ ३ ॥
तुका म्हणे गुढी आणीन पायांपें । जगा होइल सोपें नाम तुझें ॥४॥

॥ ७१५ ॥

आपण चाळक बुद्धीच्या संचारा । आह्मांसी वेव्हारा पात्र केलें॥१॥

काय झालें तरी नेघा तुह्मी भार । आणीक कोणा थोर म्हणों सांगा २
पंचभूतें तंव चर्माचिया मोटा । येथें खरा खोटा कोण भाव ॥३॥
तुका म्हणे नाहीं बोलावया जागा । कां देवा वाउगा श्रम करूं ॥४॥

॥ ७१६ ॥

बोलिलेंचि बोलें पडपडताळूनि । उपजत मनीं नाहीं शंका ॥ १ ॥
बहुतांची माय बहुत कृपाळ । साहोनि कोल्हाळ बुझाविसी ॥ २ ॥
बहुतांच्या भावें वांटिसी भातुकें । बहु कवतुकें खेळविसी ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें जाणतसों वर्म । करणें तो श्रम न वजे वांया ॥४॥

॥ ७१७ ॥

मज त्याची भीड नुलंघवे देवा । जो म्हणे केशवा दास तुझा ॥१॥
मज आवडती बहु तैसे जन । करिती कीर्तन कथा तुझी ॥ २ ॥
सांडुनिया लाज नाचेन त्यांपुढें । आइकती कोडें नाम तुझें ॥ ३ ॥
नलगे उपचार होईन भिकारी । वैष्णवांच्या घरीं उष्टावळी ॥ ४ ॥
तुका म्हणे जाणों उचित अनुचित । विचरूनि हित तेंचि करूं ५॥

॥ ७१८ ॥

तरी भलें वांया गेलों । जन्मा आलों मागुता । ह्मणऊनि ठेलों दास । सावकाश निर्भयें ॥ १ ॥ उणें पुरें काय माझें । त्याचें ओझें तुम्हांसी ॥ २ ॥ सांभाळावें तें म्यां काई । अवो आई विठ्ठले । भागें जया जाइन स्थळा । तुज गोपाळा विसरेना ॥३॥ आपलें म्यां एकसरें । करुनि बरें घेतलें । तुका ह्मणे नारायणा । आतां जाणा आपुलें ॥४॥

॥ ७१९ ॥

आहे तें सकळ प्रारब्धा हातीं । यावें काकुलती यासी आतां ॥ १ ॥
ऐसा माझ्या मनें सांगितला भाव । तोंवरीच देव दुजा नाहीं ॥२॥
अवघियांची जेव्हां सारावी करकर । भावबळें थार धरूं येसी ॥३॥
तुका म्हणे तुज ठेवावें पुजून । आणीक तो गुण नाहीं येथें ॥ ४ ॥

॥ ७२० ॥

आद्धलिया जना होसी सहाकारी । अंधळिया करीं काठी तूंची ॥१॥
आडिले गांजिले पीडिले संसारीं । त्यांचा तूं कैवारी नारायणा ॥२॥
प्रल्हाद महासंकटीं रक्षिला । तुम्ही अपंगिला नानापरी ॥ ३ ॥
आपुलेंची अंग तुम्ही वोडविलें । त्याचें निवारिलें महा दुःखें ॥ ४ ॥
तुका म्हणे तुझे कृपे पार नाहीं । माझे विठाबाई जननीये ॥ ५ ॥

॥ ७२१ ॥

कोण जन्मता कवण जन्मविता । न कळे कृपावंता माव तुझी ॥१॥
कवण हा दाता कवण हा मागता । न कळे कृपावंता माव तुझी ॥२॥

वण भोगता कवण भोगविता । न कळे कृपावंता माव तुझी ॥३
वण तें रूप कवण अरूपता । न कळे कृपावंता माव तुझी ॥ ४ ॥
वीं ठायीं तूंचि सर्वही झालासी । तुका म्हणे यासी दुजें नाहीं ॥५॥

॥ ७२२ ॥

न मानवलें वरी बम्ह्यात्कारी । तैसा मी अंतरीं नाहीं झालों ॥१॥
णउनी पंढरीनाथा वाटतसे चिंता । प्रगट बोलतां लाज वाटे २
तां ब्रह्मरूप झालें अवघें जन । ते माझे अवगुण न देखती ॥ ३ ॥
का ह्मणे मी तों आपणांसी ठावा । आहें बरा देवा जैसा तैसा ॥४॥

॥ ७२३ ॥

ोरटें सुनें मारिलें टाळे । केउं करी परि न संडी चाळे ॥ १ ॥
सें एक दुराचारी गा देवा । आपुलिया जीवा घात करी ॥ २ ॥
ाक गेलें तरि लाज ना विचार । हिंडे फजितखोर दारोदारीं ॥३॥
का ह्मणे कर्म बळीवंत गाढें । नेदी तया पुढें मागें सरों ॥ ४ ॥

॥ ७२४ ॥

ाम्हां आपुलें नावडे संचित । चरफडी चित्त कळवळ्यानें ॥ १ ॥
कळतां झाला खोळंबा मारगा । जगीं झालों जगा बहुरूपी ॥२॥
ळों आलें बरें उघडले डोळे । कर्णधार मिळे तरि बरें ॥ ३ ॥
का म्हणे व्हाल ऐकत करुणा । तरि नारायणा उडी घाला ॥४॥

॥ ७२५ ॥

णवितों दास न करितां सेवा । लंडपणें देवा पोट भरीं ॥ १ ॥
ोटें कोठें सरे तुझे पायांपाशीं । अंतर जाणसी पांडुरंगा ॥ २ ॥
ाचरण खोटें आपणासी ठावें । लटिकें बोलावें दुसरें तें ॥ ३ ॥
का म्हणे ऐसा आहें अपराधी । असो कृपानिधी तुह्मां ठावा ॥४॥

॥ ७२६ ॥

थें पाहें तेथें कांडिती भूस । चिपाडें चोखूनि पहाती रस ॥ १ ॥
ाय सांगों देवा भुलले जीव । बहु यांची येतसे कींव ॥ २ ॥
ाठीचें मोटळें लटिकेंची फुगे । पेणिया जाऊनि भिक्षा मागे ॥ ३ ॥
का म्हणे कां उगेचि खोल । जवळी दाखवी आपणा बोल ॥ ४ ॥

॥ ७२७ ॥

लें लोक नाहीं सांडीत वोळखी । हे तों झाली देखी दुसऱ्याची १
सो आतां यासी काय चाले बळ । आपुलें कपाळ वोढवलें ॥२॥
मर्थासि काय कोणें हें ह्मणावें । आपुलिया जावें भोगावरी ॥३॥
का ह्मणे तुह्मां बोल नाहीं देवा । नाहीं केली सेवा मनोभावें ॥४॥

॥ ७२८ ॥

जन तरी देखे गुंतलें प्रपंचें । स्मरण तें त्याचें त्यासी नाहीं ॥ १ ॥
म्हणउनि मागें परतलें मन । घालणीचें रान देखोनिया ॥ २ ॥
इंद्रियांचा गाजे गोंधळ ये ठायीं । फोडीतसे डोई अहंकार ॥ ३ ॥
तुका ह्मणे देवा वासनेच्या आटें । केलीं तळपटें बहुतांचीं ॥ ४ ॥

॥ ७२९ ॥

काय तुझे उपकार पांडुरंगा । सांगों मी या जगामाजीं आतां ॥१॥
जतन हें माझें करूनि संचित । दिलें अवचित आणूनिया ॥ २ ॥
घडल्या दोषांचे न घलीच भरी । आली यास थोरी कृपा देवा ३
नव्हतें ठाउकें आइकिलें नाहीं । न मागतां पाहीं दान दिलें ॥ ४ ॥
तुका म्हणे याच्या उपकारासाठीं । नाहीं माझे गांठीं कांहीं एक ५

॥ ७३० ॥

पाखांड्यांनीं पाठी पुरविला दुमाला । तेथें मी विठ्ठला काय बोलूं १
कांद्याचा खाणार चोजवी कस्तुरी । आपण भिकारी अर्थ नेणें ॥२॥
न कळे तें मज पुसती छळूनी । लागतां चरणीं न सोडती ॥ ३ ॥
तुझ्या पायांविण दुजें नेणें कांहीं । तूंचि सर्वांठायीं एक मज ॥४ ॥
तुका म्हणे खीळ पडो त्यांच्या तोंडा । किती बोलों भांडा वादकांशीं ५

॥ ७३१ ॥

कोणाच्या आधारें करूं मी विचार । कोण देईल धीर माझ्या जीवा
शास्त्रज्ञ पंडित नव्हें मी वाचक । यातिशुद्ध एकाठाव नाहीं ॥ २ ॥
कलियुगीं बहु कुशळ हे जन । छळितील गुण तुझे गातां ॥ ३ ॥
मज हा संदेह झाला दोहीं सवा । भजन करूं देवा किंवा नको॥४॥
तुका म्हणे आतां दुरावितां जन । किंवा हें मरण भलें दोन्ही ॥५ ॥

॥ ७३२ ॥

तुजविण वाणी आणिकांची थोरी । तरी माझी हरी जिव्हा झडो १
तुजविण चित्ता आवडे आणीक । तरी हा मस्तक भंगो माझा ॥२॥
नेत्रीं आणिकांसि पाहीन आवडी । जावो तेचि घडी चांडाळ हे २॥
कथामृत पान न करिती श्रवण । काय प्रयोजन मग यांचें ॥ ३ ॥
तुका म्हणे काय वांचून कारण । तुज एक क्षण विसंबतां ॥ ५ ॥

॥ ७३३ ॥

चित्त घेऊनियां तूं काय देशी । ऐसें मजपाशीं सांग आधीं ॥ १ ॥
तरिच पंढरिराया करिन साटोवाटी । नेघे जया तुटी येईल तें ॥२॥
रिद्धिसिद्धि कांहीं दाविसी अभिलाशें । नाहीं मज आस मुक्तीचीही ३
तुका म्हणे माझें तुझें घडे तर । भक्तीचा भाव रे देणें घेणें ॥ ४ ॥

॥ ७३४ ॥

तुज काय करूं मज एक सार । अमृत नागर नाम तुझें ॥ १ ॥
काय येणें उणें आम्हां तयापोटीं । गोवितां हे कंठीं कामधेनु ॥ २॥
नोळखे तानुलें माय ऐसी कोण । वोरसे देखून शोक त्याचा ॥३॥
जो नाहीं देखिला याचक नयनीं । तो पावे घेउनि लज्जा दान॥४॥
नामासाठीं प्राण सांडियेला रणीं । शूर ते भांडणीं न फिरती ॥ ५॥
तुका ह्मणे आह्मी गातां गीतीं भला । भेटुनि विठ्ठला काय चाड॥६॥

॥ ७३५ ॥

तुझी कीर्ति सांगों तुजपुढें जरी । ब्रह्मांडींही हरी माईना ते ॥ १ ॥
मेरूची लेखणी सागराची शाई । कागद हा मही न पुरेचि ॥ २ ॥
अनंत अपार आपंगिले भक्त । माझेंचि संचित ओढवेना ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुम्हां बोल नाहीं देवा । पामरें म्यां सेवा केली नाहीं॥४॥

॥ ७३६ ॥

यमधर्म आणिक ब्रह्मादिक देव । त्यांचा पूर्ण भाव तुझे पायीं ॥१॥
करिती स्मरण पार्वतीशंकर । तेथें मी किंकर कोणीकडे ॥ २ ॥
सहस्रमुखेंसी घोष फणिवराचा । मज किंकराचा पाड काय ॥३॥
चंद्र सूर्य आणि सर्व तारांगणें । करिती भ्रमण प्रदक्षिणा ॥ ४ ॥
तुका ह्मणे त्यांसी स्वरूप कळेना । तेथें मज दीना कोण पुसे ॥५॥

॥ ७३७ ॥

विठोबाचे पायीं जीव म्यां ठेविला । भक्तिभावें केला देव ऋणी॥१॥
देव माझा ऋणी आहे सहाकारी । परस्परें वारी भवभय ॥ २ ॥
भवभयडोहीं बुडों नेदी पाहीं । धरूनिया बाहीं तारी मज ॥ ३ ॥
तारियेले दास पडिल्या संकटीं । विष केलें पोटीं अमृतमय ॥ ४ ॥
अमृतातें सेवीतसे नामरसा । तोडियेला फांसा बंधनाचा ॥ ५ ॥
बंधनाचा फांसा आम्हीं कांहीं नेणों । पाय तुझे जाणों पद्मनाभा ॥६॥
पद्मनाभा नाभिकमळीं ब्रह्मादिक । त्रैलोक्यनायक ह्मणविसी ॥ ७॥
ह्मणविसी देवा दासांचा अंकित । मनाचा संकेत पाहोनिया ॥ ८॥
पाहोनिया दृढ निश्चय तयाचा । तोचि दास साचा जवळीक ॥९॥
जवळीक झाली ब्रह्मीं सुखावले । मार्ग दाखविले मूढा जना ॥१०॥
मूढा जनामाजी दास तुझा मूढ । कास तुझी दृढ धरियेली ॥११॥
धरियेले तुझे पाय रे विठ्ठला । तुका सुखी झाला तुझ्या नामें ॥१२॥

॥ ७३८ ॥

पापाचीं संचितें देहासी दंडणा । तुज नारायणा बोल नाहीं ॥ १ ॥
पेरी कडू जिरें मागे अमृतफळें । अर्का वृक्षा केळें कैसीं येती ॥२॥

मान भलेपण नाहीं फुकासाठीं । जयावरि गांठी झीज साहे ॥ ३ ॥
तुका ह्मणे हें तूं सर्वही जाणसी । मज अधिरासी धीर नाहीं ॥ ४ ॥

॥ ७५३ ॥

माझा तों स्वभाव आहे अनावर । तुज देतां भार कांहीं नव्हे ॥ १ ॥
ऐसें कळों आलें मज नारायणा । जागृतीहि स्वप्ना ताळ नाहीं ॥२॥
संपादिला तो हा अवघा बाह्य रंग । तुझा नाहीं संग अभ्यंतरीं ॥३॥
तुका ह्मणे सत्या नाहीं पाठी पोट । असोनि निघोट काय जाती ॥४॥

॥ ७५४ ॥

आवडी धरोनी आलेती आकारा । केला हा पसारा याजसाठीं॥१॥
तें मी तुझें नाम गाईन आवडी । क्षण एक घडी विसंबेना ॥ २ ॥
वर्म जाणावें हा मुख्यधर्मसार । अवघे प्रकार तथापासीं ॥ ३ ॥
वेगळ्या विचारें वेगळाले भाव । धरायासी ठाव बहु नाहीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे घालूं इच्छेचिये पोटीं । कवळुनी धाकुटी मूर्ति जीवें॥५॥

॥ ७५५ ॥

पहावया तुझा जरी बोलें अंत । तरि माझे जात डोळे देवा ॥ १ ॥
स्तंभीं तुज नाहीं घातलें प्रल्हादें । आपुल्या आनंदें अवतार ॥ २ ॥
भक्ताचिया काजा झालासी सगुण । तुज नाहीं गुण रूप नाम ॥ ३ ॥
ऐसा कोण देवा अधम यातीचा । निर्धार हा साचा नाहीं तुझा॥४॥
तुका ह्मणे बोलें कवतुकें गोष्टी । नेदी येऊं पोटीं राग देवा ॥ ५ ॥

॥ ७५६ ॥

जरी तुझा मज नसता आधार । कैसा हा संसार दुऱ्हावता ॥ १ ॥
ऐसा बळी कोण होईल पुरता । जो हे वारी चिंता आशापाश॥२॥
मायामोहफांसा लोकलाजबेडी । तुजविण तोडी कोण एक ॥ ३ ॥
हें तों मज कळों आलें अनुभवें । बरें माझ्या जीवें पांडुरंगा ॥ ४ ॥
तुका ह्मणे यास तूंचि माझा ग्वाही । परी भाव नाहीं जना लोकां॥५॥

॥ ७५७ ॥

येऊनि संसारा काय हित केलें । आयुष्य नासिलें शिश्नोदरा ॥ १ ॥
विषय सेवितां कोण तृप्त झाला । इंधनीं निवाला अग्नि कांठें ॥२॥
देखोनि मृगजळ भांबावलीं वेडीं । विचाराची थडी न टाकिती॥३॥
ऐसिया जीवांसी सोय न लाविसी । निष्ठुर कां होसी कृपाळुवा॥४॥
तुका ह्मणे देवा अगाध पैं थोरी । सर्वांचे अंतरीं पुरलासी ॥ ५ ॥

॥ ७५८ ॥

संसाराचें ओझें वाहाता वाहविता । तुजविण अनंता नाहीं कोणी॥१॥
गीतेमाजी शब्द दुंदुभीचा गाजे । योगक्षेमकाज करणें त्याचें ॥२॥
चतुर्भुजा करीं वारू श्रृंगारावे । सारथ्य करावें अर्जुनाचें ॥ ३ ॥
श्वपच अंत्यज भक्तिस्नेहें झाला । अचळपदीं केला ध्रुव तुका ॥४॥

॥ ७५९ ॥

फिरविलें देऊळ जगामाजी ख्याति । नामदेवा हातीं दुध प्याला॥१॥
भरियेली हुंडी नरसी मेहत्याची । धनाजीजाटाचीं सेतें पेरी ॥२॥
मिराबाईसाठीं घेतो विषप्याला । दामाजीचा झाला पाडेवार ॥३॥
कबिराचे मागीं विणूं लागे सेले । उठविलें मूल कुंभाराचें ॥ ४ ॥
आतां तुह्मी दया करा पंढरिराया । तुका विनवी पायां वेळोवेळां॥५

॥ ७६० ॥

न कळे महिमा वेद मौनावले । जेथें पांगुळले मनपवन ॥ १ ॥
चंद्र सूर्य ज्याचें तेज वागविती । तेथें माझी मती कोणीकडे ॥ २॥
काय म्यां वाणावें तुझ्या थोरपणा । सहस्रवदना वर्णवेना ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मी बाळ तूं माउली । कृपेची साउली करी देवा॥४॥

॥ ७६१ ॥

दारिद्रानें विप्र पीडिला अपार । तया पोटीं पोर एक असे ॥ १ ॥
बाहेरी मिष्टान्न मिळे एके दिशीं । घेऊनी छंदासी त्याचि बैसे ॥२॥
क्षुधाकाळीं रडे देखिलें तें मागे । कांहीं केल्या नेघे दुजें कांहीं॥३॥
सहज कौतुकें बोले बापमाये । देवापाशीं आहे मागशी तें ॥ ४ ॥
तेव्हां तुजलागीं स्मरे नारायणा । जीवींच्या जीवना पांडुरंगा॥५॥
लागली हे क्षुधा जात असे प्राण । काय हें निर्वाण पाहातोसी॥६॥
ब्रह्मांड नायक विश्वाचा पाळक । वश तिन्ही लोक पोसितोसी७।
प्राण हा उत्कर्ष जाहला विव्हळ । तेव्हां तो कृपाळ धांव घाली८।
सांडुनि वैकुंठ धांव घाली तई । आळंगिला बाहीं कृपावंतें ॥ ९ ॥
तुका ह्मणे दिला क्षीराचा सागर । राहे निरंतर तयापाशीं ॥ १० ॥

॥ ७६२ ॥

हीनवर बीजवर दोघी त्या गडणी । अखंड कहाणी संसाराची॥१॥
माझा पति बहु लहानचि आहे । खेळावया जाय पोरांसवें ॥ २ ॥
माझें दुःख जरी ऐकशील सई । ह्मातारा तो बाई खोकतसे ॥ ३ ॥
खेळे सांजवरी बाहेरी तो राहे । वाट मी वो पाहें सेजेवरी ॥ ४ ॥
पूर्व पुण्य माझें नाहीं बाई नीट । बहु होती कष्ट सांगों काई ॥ ५ ॥
जवळ मी जातें अंगा अंग लावूं । नेदी जवळ येऊं कांटाळतो ॥ ६ ॥
पूर्व सुकृताचा हाचि बाई ठेवा । तुका ह्मणे देवा काय बोल॥७॥

॥ ७६३ ॥

कैसी करूं आतां सांग तुझी सेवा । शब्दज्ञानें देवा नाश केला॥१॥
आतां तुझें वर्म न कळे अनंता । तुज न संगता बुडूं पाहे ॥ २ ॥
संध्या स्नान केलीं आचाराची नासी । काय तयापाशीं ह्मणती एक३
बुडविली भक्ति ह्मणती पाषाण । पिंडाचें पाळण स्थापुनिया ॥४ ॥

न करावी कथा ह्मणती एकादशी । भजनाची नासी मांडियेली॥५॥
न जावें देउळा ह्मणती देवघरीं। बुडविलें या परी तुका ह्मणे ॥ ६ ॥

॥ ७६४ ॥

कैसें करूं ध्यान कैसा पाहों तुज । वर्म दावी मज याचकासी १ ॥
कैसी भक्ति करूं सांग तुझी सेवा । कोण्या भावें देवा आतुडसी २
कैसी कीर्ति वाणूं कैसा लक्षा आणूं। जाणूं हा कवणु कैसा तुज ३
कैसा गाऊं गीतीं कैसा ध्याऊं चित्तीं। कैसी स्थिती मती दावी मज४
तुका म्हणे जैसें दास केल देवा । तैसें हें अनुभवा आणी मज ५॥

॥ ७६५ ॥

वाट दावी त्याचें गेलें काय । नागवला जो वारितां जाय ॥ १ ॥
ऐसीं मार्गें ठकलीं किती । सांगतां खाती विषगोळा ॥ २ ॥
विचारोनि पाहे त्यास । नवजे जीवें नव्हे नास ॥ ३ ॥
तुका ह्मणे जो रुसला जीवा । तयासी केशव काय चाले ॥ ४ ॥

॥ ७६६ ॥

मिळे हरिदासांची दाटी । रीग न होय शेवटीं ॥ १ ॥ तेथें काय म्यां करावें । माझें कोणें आइकावें ॥ २ ॥ कैसें तुज लाजवावें । भक्त ह्मणोनिया भावें ॥ ३ ॥ नाचतां नये ताळी । मज वाजवितां टाळी ॥ ४ ॥ अति मंडित भूषणें । शरीर माझें दैन्यवाणें ॥ ५ ॥ तुका ह्मणे कमळापति । मज न द्यावें त्यां हातीं ॥ ६ ॥

॥ ७६७ ॥

मिथ्या आहे सर्व अवघें हें मायिक। न कळे विवेक मज कांहीं १॥
सर्व बाजागिरी वाटती ही खरी । पाहातां येथें उरी कांहीं नाहीं २
आतां मज दुःख वाटतें अंतरीं । उपाय झडकरी सांग कांहीं ॥३॥
पुढें कोण गति न कळे सर्वथा । तुझे पायीं माथा ठेवियेला ॥ ४ ॥
करणें तें करी सुखें आतां हरी । तुज म्यां निर्धारीं धरियेलें ॥ ५॥
स्वहित तें काय न कळे सर्वथा । तारीं तूं अनंता तुका म्हणे ॥६॥

॥ ७६८ ॥

गणेश सारजा करिती गायना । आणि देवांगना रंभे ऐशा ॥ १ ॥
तेथें मानवांही विनवावें तें काय।सुरवर पाय वंदिती जेथें ॥ २ ॥
ज्याच्या गायनासी तटस्थ शंकर । त्याहि परि पार न कळे तुझा ३
तुका ह्मणे आह्मी किंकर ते किती । इंद्रादिकांहि मति नागविली ४॥

॥ ७६९ ॥

न बोलावें ऐसें जनासी उत्तर । करितों विचार बहु वेळा ॥ १ ॥
कोण पाय आड ठाकतें येऊन । पालटी तो गुण अंतरींचा ॥ २ ॥
संसारा हातीं सोडवूनि गळा । हे कां अवकळा येती पुढें ॥ ३ ॥
तुका म्हणे सेये घडे अंतराय । यास करूं काय पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ७७० ॥

आतां हें उचित माझें जना हातीं। पाहिजे फजितो केली कांहीं १॥
मग मी तुमचे न सोडीं चरण। त्रासोनिया मन येईल ठाया ॥ २ ॥
वाउगे वाणीचा न धरीं कांटाळा। ऐसी कां चांडाळा बुद्धि मज ३
तुका म्हणे जरि माथां बैसे घाव। तरि मग वाव नेघे पुढें ॥ ४ ॥

॥ ७७१ ॥

मज नष्टा माया मोह नाहीं लोभ। अधिक तो क्षोभ आदराचा १॥
धिग हें शरीर अनउपकार। न मनी आभार उपकाराचा ॥ २ ॥
मजहून नष्ट आहे ऐसा कोण। नावडे मिष्टान्न बहुमोल ॥ ३ ॥
न दिसेचि मज आपलेसे गुण। संचित तें कोण जाणे मागें ॥ ४ ॥
तुका ह्मणे माझें देखोनिया काई। पांडुरंगा पायीं राखियेलें ॥ ५ ॥

॥ ७७२ ॥

त्रासला हा जीव संसारीच्या सुखा। तुजविण सखा नाहीं कोणी १
ऐसें माझे मनीं वाटे नारायणा। घालावी चरणावरी मिठी ॥ २ ॥
कई तें सुंदर देखोनि रूपडें। आवडीच्या कोडें आळंगीन ॥ ३ ॥
नाहीं पूर्व पुण्य मज पामरासी। ह्मणोनि पायांसी अंतरलों ॥ ४ ॥
अलभ्य लाभ कैचा संचितावेगळा। विनवी गोपाळा दास तुका ५

॥ ७७३ ॥

करूनी चिंतन खेळों भोंवतालें। चित्त येथें आलें पायांपाशीं ॥ १ ॥
येथें नाहीं खोटा चालत परिहार। जाणसी अंतर पांडुरंगा ॥ २ ॥
सुखदुःखें तुज देऊनी सकळ। नाहीं ऐसा काळ केला आह्मी ॥३॥
तुका ह्मणे झाला देहाचा विसर। नाहीं आतां पर आप दोन्ही ॥४॥

॥ ७७४ ॥

सुराणीचीं झालों लाडिकीं एकलीं। वडील धाकुलीं आह्मी देवा ॥१॥
ह्मणऊनि कांहीं न घडे अव्हेर। गोमटें उत्तर भातुकेंही ॥ २ ॥
कांहीं एक नाहीं वंचिलें वेगळें। मुळींचिया मुळें स्थिरावलें ॥ ३ ॥
लेवविलीं अंगीं आपुलीं भूषणें। अळंकार लेणें सकळही ॥ ४ ॥
सारितां न सरे अमुप भांडार। धना अंतपार नाहीं लेखा ॥ ५ ॥
तुका ह्मणे आह्मी आळवूं आवडी। ह्मणऊनी जोडी दाखविली ॥६॥

॥ ७७५ ॥

नाहीं सरो येत कोरड्या उत्तरीं। जिव्हाळ्याची बरी ओल ठायीं ॥१॥
आपुलिया हिता मागनिसी कारण। सत्या नारायण साह्य असो ॥२॥
निर्वाणीं निवाड होतो आगी मुखें। तप्त लोह सुखें धरितां हातीं ॥३॥
तुका ह्मणे नेम न टळतां बरें। खऱ्यासीचि खरें ऐसें नांव ॥ ४ ॥

॥ ७७६ ॥

आलों उल्लंघुनि दुःखाचे पर्वत। पायांपाशीं हित तुमच्या तरी ॥ १ ॥

न देखेल दासा दुःखी होतें मन । कठिणें कठिण वाटतसे ॥ २ ॥
नव्हे सांडी परि वाटतें निरास । न ये माझा दिस संकल्पाचा ॥३॥
तुका ह्मणे तुह्मीं सदैव जी देवा । माझ्या हाचि जीवा एक ठाव ॥४॥

॥ ७७७ ॥

नामाचा महिमा बोलिलों उत्कर्षे । अंगा कांहीं रस न येचि तो १॥
कैसें समाधान राहे पांडुरंगा । नलगेचि अंगा आणी कांहीं ॥ २ ॥
लाभाचिये अंगीं सोस कवतुकें । फिक्याचें तें फिकें देवसाव ३॥
तुका म्हणे करा आपुला महिमा । नका जाऊं धर्मावरि माझ्या ४॥

॥ ७७८ ॥

वैराग्याचा अंगीं झालासे संचार । इच्छी वनांतर सेवावया ॥ १ ॥
कां जी याचें करूं नये समाधान । वियोगानें मन शिणतसे ॥ २ ॥
नयेचि न्यावया पंढरीचें मूळ । न देवेचि माळ कं चीही ॥ ३ ॥
तुका ह्मणे झालें अप्रीतीचें जीणें । लाजिर हें वाणें सेवा करी ॥४॥

॥ ७७९ ॥

ह्मणउनि काय जीऊं भक्तपणें । जायाचीं भूषणें अळंकार ॥ १ ॥
आपुल्या कष्टाची करूनिया जोडी । मिरवीन उघडी इच्छावसें २
तुके तरि तुकीं खऱ्याचें उत्तम । मुलाम्याचा भ्रम कोठवरि ॥ ३ ॥
तुका ह्मणे पुढें आणि मागें फांस । पावें पेसा नाश न करी देवा ॥४॥

॥ ७८० ॥

सोंवळा होऊं तों वोंवळें जडलें । सांडीमांडी बोल तोंडीं बीजीं ॥१॥
एकसरी केली कळिवरें साटी । आतां नका तुटी पायांमधें ॥ २ ॥
संकल्पीं विकल्प पापाचा सुकाळ । रज्जुसर्प मूळ मरणाचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे हें तूं ब्रह्मांड चाळिता । मी कां करूं चिंता पांडुरंगा ॥४॥

॥ ७८१ ॥

कोणी एकाचिया पोरें ली आळी । ठावो नाहीं पोळी मागे देखी १
बुझाविलें हातीं देउनी खापर । छंद करकर वारयेली ॥ २ ॥
तैसें नको करूं मज कृपावंता । काय नाहीं सत्ता तुझे हातीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे मायबापाचें उचित । करावें हें हित बाळकाचें ॥ ४ ॥

॥ ७८२ ॥

काय करूं आतां धरूनिया भीड । निःशंक हें तोंड वाजविलें ॥१॥
नव्हे जगीं कोणी मुकियाचा जाण । सार्थक लाजोनि नव्हे हित ॥२॥
आलें तें उत्तर बोलें स्वामीसवें । धीट नीट जीवें होऊनिया ॥ ३ ॥
तुका ह्मणे मना समर्थाशीं गांठी । घालावी हे मांडी थापटूनी ॥४॥

॥ ७८३ ॥

यासाठीं करितों निष्ठुर भाषण । आहेसी तूं जाण सर्वदाता ॥ १ ॥
ऐसें दुःख कोण आहे निवारिता। तो मी जाऊं आतां शरण त्यासी २

बैसलासी केणें करुनि एक घरीं । नाहीं येथें उरी दुसऱ्याची ॥३॥
तुका ह्मणे आलें अवघें पायांपें । आतां मायबापें नुपेक्षावें ॥ ४ ॥

॥ ७८४ ॥

चालें दंडवत घाली नारायणा । आपुल्या कल्याणा लागूनिया ॥१॥
बैसविला पदीं पुत्र राज्य करी । पिता वाहे शिरीं आज्ञा त्याची २
तुका ह्मणे आहे ठायींचाचि मान । आतां अनुमान कायसा तो ॥३॥

॥ ७८५ ॥

न कळसी ज्ञाना न कळसी ध्याना । न कळसी दर्शना धुंडाळितां १
न कळसी आगमा न कळसी निगमा । न बोलवे सीमा वेदां पार २
तुका ह्मणे तुझा नाहीं अंतपार । ह्मणोनि विचार पडिला मज ३

॥ ७८६ ॥

माउलीसी सांगे कोण । प्रेम वाढवी तान्हें ॥१॥ अंतरींचा कळवळा । करीतसे प्रतिपाळा ॥२॥ मायबापाची उपमा । तुज देऊं मेघश्यामा ॥३॥ तेही साजेना पाहातां । जीवलगा पंढरिनाथा ॥४॥ माय पाळी संसारीं । परलोकीं राहे दुरी ॥५॥ तैसा नव्हेसी अनंता । काळावरी तुझी सत्ता ॥६॥ तुका ह्मणे नारायणा । तुह्मां बहुत करुणा ॥७॥

॥ ७८७ ॥

धर्म रक्षावया अवतार घेसी । आपुल्या पाळिसी भक्तजना ॥ १ ॥
अंबऋषीसाठीं जन्म शोसियेले । दुष्ट निर्दाळिले किती एक ॥ २ ॥
धन्य तुज कृपासिंधु ह्मणतील । आपुला तूं बोल साच करी ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज वर्णितीं पुराणें । होय नारायण दयासिंधु ॥ ४ ॥

॥ ७८८ ॥

आजामीळ अंत मरणासी आला । तोंवरि स्मरला नाहीं तुज ॥१॥
प्राण जातेवेळे ह्मणे नारायण । त्यासाठीं विमान पाठविलें ॥ २ ॥
बहुत कृपाळु होसी जगन्नाथा । त्रैलोक्यसमर्था सोइरिया ॥ ३ ॥
तुका ह्मणे भक्तकाज तूं कैवारी । तुज साही चारी वर्णिताती ॥४॥

॥ ७८९ ॥

मी त्यांसी अनन्य तीं कोणा असती । ऐसें तंव चित्तीं विचारावें १
आहे तो विचार आपणयापाशीं । कळा बिंबाऐसी प्रतिबिंबीं ॥ २ ॥
शुभ शकून तो शुभ लाभें फळे । पुढील तें कळे अनुभवें ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा असेल आठव । तैसा माझा भाव तुझ्या पायीं ४

॥ ७९० ॥

बडे अळंकार दैन्याचिये कांती । उत्तमा विपत्ति संघ घडे ॥ १ ॥
एकाविण एक अशोभ दातारा । कृपेच्या सागरा पांडुरंगा ॥ २ ॥
वांधूं नेणे तया पुढील आइतें । केलें तें सोइतें वाया जाय ॥ ३ ॥
तुका ह्मणे चिंतामणि शेली गळा । पावे अवकळा ह्मणऊनी ॥ ४ ॥

॥ ७९१ ॥

वदे वाणी परि दुर्लभ अनुभव । चालीचाचि वाहो बहुतेक ॥ १ ॥
आह्मी ऐसें कैसें राहावें निश्चळ । पाठिलागा काळ जितितसे ॥२॥
वाढावितां पोट दंभाचे पसारे । येतील माघारे मुदला तोटे ॥ ३ ॥
तुका ह्मणे बरें जागविता मना । तुमच्या नारायणा अभयें करें ॥४॥

॥ ७९२ ॥

आइक नारायणा वचन माझें खरें । सांगतों निर्धारें तुज पासीं १॥
नाहीं भाव मज पडिली लोकलाज । राहिलेंसें काज तुझे पायीं २॥
जरि तुज कांहीं करणें उचित । तारीं तूं पतित तुका म्हणे ॥ ३ ॥

॥ ७९३ ॥

दुःख वाटे ऐसी ऐकोनिया गोष्टी । जेणें घडे तुटी तुझ्या पायीं १ ॥
येतो कळवळा देखोनिया घात । करितों फजित नाइकती ॥ २ ॥
काय करूं देवा ऐसी नाहीं शक्ति । दंडुनि पुढती वाटे लावूं ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज दावूं नको ऐसे । दृष्टीपुढें पिसे पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ७९४ ॥

तुज ऐसा कोण उदाराची रासी । आपुलेंचि देसी पद दासा ॥ १ ॥
शुद्ध हीन कांहीं न पाहासी कुळ । करिसी निर्मळ वास देहीं ॥ २ ॥
भावें हें कदान्न खासी त्याचे घरीं । अभक्तांच्या परी नावडती ॥३॥
नवजासी जेथें दुरी दवडितां । न येसी जो चित्ता योगियांच्या ॥४॥
तुका ह्मणे ऐसीं ब्रिदें तुझीं खरीं । बोलतील चारी वेद मुखें ॥ ५ ॥

॥ ७९५ ॥

उगेंचि हें मन राहतें निश्चळ । तरि कां तळमळ साट होती ॥ १ ॥
काय तुमचीं नेणों कवतुक विंदानें । सर्वोत्तमपणें खेळतसां ॥ २ ॥
नानाछंदें आम्हां नाचवावें जीवां । वाढवाव्या हांवा मळल्यापुढें ३
तुका ह्मणे तुम्ही आपुली प्रतिष्ठा । वाढवावया चेष्टा करीतसां ॥४॥

॥ ७९६ ॥

तुह्मी साच नुपेक्षाल हा भरंवसा । मज जाणतसा अधीरसें ॥ १ ॥
कासया घातला लांबणी उद्धार । ठेवा करकर वारूनिया ॥ २ ॥
सुटों नये ऐसें कळलें निरुतें । कां घ्यावें मागुतें आळवूनि ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुह्मी सभाग्य जी देवा । माझा तुम्हां केवा काय आला ४

॥ ७९७ ॥

काय आम्हीं आतां पोटचि भरावें । जग चाळवावें भक्त म्हूण ॥१॥
ऐसा तरि एक सांगा जी विचार । बहु होतों फार कासावीस ॥२॥
काय कवित्वाची घालूनिया रुढी । करूं जोडाजोडी अक्षरांची ॥३॥
तुका ह्मणे काय गुंपोनि दुकाना । राहों नारायणा करूनी घात ॥४॥

॥ ७९८ ॥

जनीं जनार्दन ऐकतों हे मात । कैसा तो वृत्तांत न कळे आह्मां ॥१॥
जन्म जरा मरण कवण भोगी भोग । व्याधि नाना रोग सुखदुःखें २
पापपुण्य शुद्धाशुद्ध आचरणें । हीं कोणांकारणें कवणें केलीं ॥ ३ ॥
आम्हां मरणनाश तूं तव अविनाश । कैसा हा विश्वास साच मानूं ४
तुका ह्मणे तूंचि निवडी हे गुढार । दाखवी साचार तेंचि मज ॥५॥

॥ ७९९ ॥

आश्चर्य या वाटे नसत्या छंदाचें । कैसें दिलें साचें करोनिया ॥ १ ॥
दुजियासी तंव अकळ हा भाव । करावा तो जीव साक्षी येथें ॥२॥
एकीं अनेकत्व अनेकीं एकत्व । प्रकृतिस्वभाव प्रमाणेंचि ॥ ३ ॥
तुका ह्मणे करूं उगवूं जाणसी । कुशळ येविशीं तुह्मी देवा ॥ ४ ॥

॥ ८०० ।

पापपुण्यसुखदुःखाचीं मंडळें । एक एका वेळे डाव घेती ॥ १ ॥
कवतुक डोळां पाहिलें सकळ । नाचवितो काळ जीवासी तो ॥२॥
स्वर्गाचिया भोगें सरतां नरक । मागें पुढें एक एक दोन्ही ॥ ३ ॥
तुका ह्मणे भय उपजलें मना । घेई नारायणा कडिये मज ॥ ४ ॥

॥ ८०१ ॥

तोंडें बोलावें तें तरी वाटे खरें । जीव येरयेरें वंचिजे ना ॥ १ ॥
हें तुह्मां सांगणें काय उगवूनि । जावें समजोनि पांडुरंगा ॥ २ ॥
जेविल्याची खूण वाढित्या अंतरीं । प्रीतीनें हे धरी चाली तेथें ३
तुका ह्मणे बहु परीचे आदर । अत्यंत वेव्हार संपादणी ॥ ४ ॥

॥ ८०२ ॥

खुंटोनिया दोरी आपणियांपाशीं । वावडी आकाशीं मोकलिली १
आपुलिया आहे मालासी जतन । गाहाणाचे ऋण बुडों नेणें ॥२॥
बीज नेलें तेथें येईल अंकुर । जतन तें सार करा याची ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझी निश्चिंतीची सेवा । वेगळें नाहीं देवा उरो दिलें ४

॥ ८०३ ॥

कोणतें कारण राहिलें यामुळें । जें म्यां तुज बळें कष्टवावें ॥ १ ॥
नाहीं जात जीव नाहीं होत हानी । सहज तें मनीं आठवलें ॥ २ ॥
नाहीं कांहीं चिंता मरतों उपवासी । अथवा त्या ह्मैसी गाई व्हाव्या ३
हें तों तुज कळों येतसे अंतरीं । लापणीक वरी साच भाव ॥ ४ ॥
तुका ह्मणे देवा नासिवंतासाठीं । पायांसवें तुटी करिती तुझ्या ॥५॥

॥ ८०४ ॥

मनवाचातीत तुझें हें स्वरूप । म्हणोनिया माप भक्ति केलें ॥ १ ॥
भक्तीचिया मापें मोजितों अनंता । इतरानें तत्वतां न मोजवे ॥ २ ॥

योग याग तपें देहाचिया योगें । ज्ञानाचिया लागें न सांपडसी ॥३॥
तुका म्हणे आह्मी भोळयाभाव सेवा । घ्यावी जी केशवा करितें ऐसी४
॥ ८०५ ॥
कायावाचामन ठेविलें गाहाण । घेतलें तुझें रिण जोडीलागीं ॥ १ ॥
अवघें आलें आंत पोटां पाडिलें थीतें । सारूनि निश्चित झालों देवा२
द्यावयासी आतां नाहीं तोळा मासा । आधील मवेशा तुज ठावी ३
तुझ्या रिणें गेले बहुत बांधोनि । झाले मजह्नानि थोरथोर ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुझे खतीं जें गुंतल । करूनी आपुलें घेई देवा ॥ ५ ॥
॥ ८०६ ॥
जरा कर्णमूळीं सांगों आली गोष्टी । मृत्याचिये भेटी जवळी आली १
आतां माझ्या मना होई सावधान । ॐपुण्याची जाण कायामाजि २
शेवटीचि घडी बुडतां नलगे वेळ । साधाया तो काळ जवळी आला ३
तुका म्हणे चिंती कुळींची देवता । धरावा भोंवता शब्द मिथ्या ४
॥ ८०७ ॥
न गमेसी झाली दिवसरजनी । राहिलों लाजोनी न बोलावें ॥ १ ॥
रुचिविण काय शब्द वाऱ्या माप । अनादरें कोप येत असे ॥ २ ॥
आपुलिया रडे आपुलेंचि मन । दाटे समाधान पावतसे ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुम्ही असा जी जाणते । काय करूं रितें वादावाद ॥४॥
॥ ८०८ ॥
दुर्बळाचे हातीं सांपडलें धन । करितां जतन नये त्यासी ॥ १ ॥
तैसी परि मज झाली नारायणा । योगक्षेम जाणा तुम्ही आतां २
खातां लेतां नये मिरवितां वरि । राजा दंड करी जनराग ॥ ३ ॥
तुका म्हणे मग तळमळ उरे । देखिलें तें झुरे पाहावया ॥ ४ ॥
॥ ८०९ ॥
लोक फार वाखा अमंगळ झाला । त्याचा त्याग केला पांडुरंगा १
विषया वंचलों मीपणा मुकलों । शरण तुज आलों पांडुरंगा २
घर दार अवघीं त्यजिलीं नारायणा । जीवींच्या जीवना पांडुरंगा ३
तुका ह्मणे पडिलों पुंडलिकापाशीं । धांव हृषीकेशी आलिंगी मज ४
॥ ८१० ॥
तुज करितां नव्हे ऐसें कांहीं नाहीं । डोंगराची राई रंक राणा ॥१॥
अशुभाचे शुभ करितां तुज कांहीं । अवघड नाहीं पांडुरंगा २
सोळा सहस्र नारी ब्रह्मचारी कैसा । निरहारी दुर्वासा नवल नव्हे ३
पंचभ्रतारांची द्रौपदी ते सती । करितां पितृशांति पुण्य धर्मा ४
दशरथा पातकें ब्रह्महत्ये ऐसीं । नवल त्याचे कुशीं जन्म तुझा ५॥
मुनेश्वरा नाहीं दोष अणुमात्र । मांडवितां सुत्र वध होती ॥ ६ ॥
तुका ह्मणे माझे दोष ते कायी । सरता तुझे पायीं झालों देवा ॥७॥

॥ ८११ ॥

सत्यत्वेंशीं घेणें भक्तीचा अनुभव । स्वामीचा गौरव इच्छीतसें॥१॥
मग तें अवीट न भंगे साचारें । पावलें विस्तारें फिरो नेणें ॥२॥
वाणी वदे त्याचा कोणासी विश्वास । अभयें करें दास सत्य तई ३
तुका म्हणे आधीं न करीं तांतडी । पायीं झाली जोडी तेणें शुद्ध ४

॥ ८१२ ॥

समर्थाचा ठाव संचलाचि असे । दुर्बळाची आस पुढें करी ॥ १ ॥
घावलें हें घेईन पदरीं तें दान । एकांत भोजन करूं दाऊं ॥ २ ॥
नलगे पाहावी उचिताची वेळ । अयाचित काळ साधला तो ॥३॥
तुका म्हणे पोट धालिया उपरी । गौरवा उत्तरीं पूजूं देवा ॥ ४ ॥

॥ ८१३ ॥

घ्यावी तरी घ्यावी उदंडचि सेवा । द्यावें तरी देवा उदंडचि ॥१॥
ऐसीं कैंचीं आह्मी पुरतीं भांडवलें । आल्या करीं बोलें समाधान २
व्हावें तरी व्हावें बहुताचि दुरी । आलिया अंतरीं वसवावें ॥ ३ ॥
तुका म्हणे तुझें सख्यत्व आपणीं । अससील ऋणी आवडीचा ॥४॥

॥ ८१४ ॥

नाहीं होत भार घातल्या उदास । पुरवावी आस सकळ ही ॥१॥
ऐसा नाहीं मज एकाचा अनुभव । धरिला तो भाव उद्धरील ॥२॥
उतावीळ असे शरणागतकाजें । धांवा केशीराजे आइकतां ॥ ३ ॥
तुका म्हणे हित चिंतन भरंवसा । नेदी गर्भवासा येऊं देव ॥ ४ ॥

॥ ८१५ ॥

उद्वेगाचे बहु फांकती मारग । नव्हे ऐसें अंग माझें होतें ॥ १ ॥
आतां कोण यासी करणें विचार । तो देखा साचार पांडुरंगा ॥२॥
मज तो अत्यंत दर्शनाची आस । झाला तरी हो नाश जीवित्वाचा ३।
तुका ह्मणे आहे वचनाची उरी । करितों तोंवरि विज्ञापना ॥ ४ ॥

॥ ८१६ ॥

काय मी अन्यायी तें घाला पालवीं । आणीक वाट दावी चालावया १
माग पाहोनिया जातों तेच सोयी । नवजावें कायी कोणा सांगा २
धोपट मारग लागलासे गाढा । मज काय पीडा करा तुह्मी ॥ ३ ॥
वारितांही भय कोण धरी धाक । परी तुह्मां एक सांगतों मी ॥ ४॥
तुका म्हणे शूर दोहीं पक्षीं भला । मरतां मुक्त झाला मान पावे ५

॥ ८१७ ॥

माझी आतां लोक सुखें निंदा करूं । ह्मणती विचारू सांडियेला १
कारण होय तो करावा विचार । काय भीड भार करूं देवा ॥ २ ॥
तुका म्हणे काय करूं लापनिक । जनाचार सुख नाशिवंत ॥ ३ ॥

॥ ८१८ ॥

लाजोनिया काळें राहिलें लिखित । नेदितांही चित्त समाधान ॥१॥
कैसें सुख वाटे वचनांचे तुटी । प्रीतिविणें भेटी रुचि नेदी ॥ २ ॥
एकाचिये भेटी एकाचा कोंपर । मावेचा पदर कळों येतो ॥ ३ ॥
होत्या आपल्या त्या वेचूनिया शक्ती । पुढें झालों युक्ति कळाहीन ४
तुका म्हणे तुम्ही समर्थ जी देवा । दुर्बळाची सेवा कोठें पावे ॥५॥

॥ ८१९ ॥

शेवट तो होतो तुझियानें गोड । ह्मणऊनि चाड धरीतसों ॥ १ ॥
देऊं भोगाभोग कलिवराचा भार । साहों तुज थार त्याचमध्यों ॥२॥.
तुझ्या बळें कांहीं खटपट काम । वाढवावा श्रम नलगे तो ॥ ३ ॥
तुका म्हणे आह्मी चेंपलों या भारें । तुमचें तें खरें देवपण ॥ ४ ॥

॥ ८२० ॥

आवडी न पुरे मायबापापासीं । घडों का येविसीं सर्कईल ॥ १ ॥
होईल नेमलें आपुलिया काळें । आलीयाच्या बळें आग्रो उरे ॥ २ ॥
जाणविलें तेथें थोडें एकवेळा । सकळ ही कळा सर्वोत्तमीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे निवेदिलें गुह्य गुज । आतां तुझी तुज सकळ चिंता ॥४॥

॥ ८२१ ॥

तुम्हांसी न कळे सांगा काय एक । कासया संकल्प वागवूं मी ॥१॥
आहे तेथें सत्ता ठेविलें स्थापूनि । प्रमाणेंचि वाणी वदे आज्ञा ॥२॥
कृपा झाली मग नलगे अंगसंग । निजध्यासें रंग चढता राहे ॥३॥
तुका ह्मणे मागें बोलिलों तें वाव । आतां हाचि भाव दृढ झाला ॥४॥

॥ ८२२ ॥

काय उरली ते करूं विनवणी । वेचलों वचनीं पांडुरंगा ॥ १ ॥
अव्हेरलों आतां कैचें नामरूप । आदर निरोप तरि तो नाहीं ॥ २ ॥
माझा मायबाप ये गेलों सलगी । तों हे तुम्हां जगीं सोयरिका ३
तुका ह्मणे आतां जोडोनिया हात । करी दंडवत ठायींचाठायीं ॥४॥

॥ ८२३ ॥

भांडवल माझें लटिक्याचे गांठीं । उदीम तो तुटी यावी हाचि ॥१॥
कैसी तुझी वाट पाहों कोणा तोंडें । भोंवती फिरे भांड गर्भवास २
चहूं खणीचिया रंगलोंसें संगें । सुष्ट दुष्ट अंग धरूनिया ॥ ३ ॥
बहुतांचे बहु पालटलों सळे । बहु आला काळें रंग अंगा ॥ ४ ॥
उकलूनि नये दावितां अंतर । घडीचा पदर सारूनिया ॥ ५ ॥
तुका ह्मणे करी गोवळें यासाठीं । आपल्या पालटीं संगें देवा ॥६॥

॥ ८२४ ॥

माझे विषयीं तुज पडतो विसर । नको धरूं दूर पांडुरंगा ॥ १ ॥
तुझा ह्मणवितों हेचि लाज तुला । आतां झणी मला विसरेसी ॥२॥
तुका ह्मणे तुझी माझी नाहीं उरी । आतां केली खरी देवराया ॥३॥

॥ ८२५ ॥

मज कांहीं सीण न व्हावा यासाठीं । कृपा तुह्मां पोटीं उपजली ॥१॥
होतें तैसें केलें आपलें उचित । शिकविलें हित बहु बरें ॥ २ ॥
आह्मी न मानावी कोणाची आशंका । तुह्मां भय लोकां आहे मनीं ३
तुका ह्मणे आतां संचिताचा ठेवा । वोडवला घ्यावा जैसा तैसा ४

॥ ८२६ ॥

लेखिलें कावित्व माझे सहज बोल । नलगेचि ओल जिव्हाळयाची १
नयेचि उत्तर कांहीं परतोनि । झालों नारायणीं न सरतें ॥ २ ॥
लाजिरवाणी कां वदली हे वाचा ॥ नव्हेच ठायींचा मननशीळ ॥३॥
तुका ह्मणे फळ नव्हेचि सायासा । पंढरीनिवासा काय झालें ॥४॥

॥ ८२७ ॥

आतां सोडवणें न या नारायणा । तरि मी न वंचें जाणा काळा हातीं १
ऐसें सांगोनिया झालों उतराई । आणीक तें काई माझे हातीं ॥ २ ॥
केलियाचें माप नये सेवटाशी । करितील नाशी अंतराय ॥ ३ ॥
तुका ह्मणे भय वाटतसे जीवा । धांवणिया धांवा लवकरी ॥ ४ ॥

॥ ८२८ ॥

ऐके पांडुरंगा वचन माझें एक । झालों मी सेवक दास तुझा ॥ १ ॥
कळे तैसा आतां करावा उद्धार । खुंटला विचार माझा पुढें ॥ २ ॥
दंभ मान माझा करूं पाहे घात । झालियाही थीत कारणाचा ॥३॥
हीन बुद्धि माझी अधम हे याती । अहंकार चित्तीं वसों पाहे ॥४॥
तुका ह्मणे मज विघडतां क्षण । नलगे जतन करी देवा ॥ ५ ॥

॥ ८२९ ॥

कवतुकवाणी बोलतसें लाडें । आरुष वांकडें करुनि मुख ॥ १ ॥
दुजेपणीं भाव नाहीं हे आशंका । जननीबाळकामध्यें भेद ॥ २ ॥
सलगी दुरूनि जवळी पाचारूं । धांवोनिया करूं अंगसंग ॥ ३ ॥
धरूनि पालव मागतों भातुकें । आवडीचें निकें प्रेमसुख ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुज आमचीच गोडी । ऐसी हे आवडी कळों आली ५

॥ ८३० ॥

बोलिलिया गुणीं नाहीं पाविजेत । देवा नाहीं होत हित तेथें ॥ १ ॥
कवतुक तुझें नवल यावरि । घेशील तें शिरीं काय नव्हे ॥ २ ॥
नाहीं मिळों येत संचिताच्या मता । पुराणीं पाहतां अघटित ॥ ३ ॥
तुका ह्मणे पायीं निरोपिला भाव । न्याल तैसा जावो सिद्धी देवा ४

॥ ८३१ ॥

ठेवुनि इमान राहिलों चरणीं । म्हणउनि धणी कृपा करी ॥ १ ॥
आम्हांसी भांडार करणें जतन । आलें गेलें कोण उंच निच ॥ २ ॥
करूनि सांभाळी राहिला निराळा । एक एक वेळा आज्ञा केली ॥३॥
तुका ह्मणे योग्यायोग्य विनीत । देवा नाहीं चित्त येथें देणें ॥ ४ ॥

॥ ८३२ ॥

अनुतापयुक्त गेलिया अभिमान । विसरूं वचन मागिलांचा ॥ १ ॥
त्याचे पाय माझे लागोत कपाळीं । भोग उष्टावळी धन्य काळ ॥२॥
षड उर्मी जिहीं हाणितल्या लाता । शरण या संता आल्या वेगीं ३
तुका ह्मणे जाती वोळे लवकरी । ठायींचि अंतरीं शुद्ध होती ॥ ४ ॥

॥ ८३३ ॥

वाढवावा पुढें आणीक प्रकार । एकाचि तें फार रुचि नेदी ॥ १ ॥
निंच नवें लेणें देह हा पवाडा । पालट रोकडा वरावरी ॥ २ ॥
दिसे शोभिवंत सेवेनें सेवक । स्वामीची तें लोकत्रयीं कीर्ति ॥३॥
तुका ह्मणे आजी पाववा संतोष । करूनि कीर्तिघोष नाचईन ॥४॥

॥ ८३४ ॥

मागील विसर होईल सकळ । केली तळमळ दुःखाची ते ॥ १ ॥
दोहींचें अहिक्य घालीं गडसंदीं । स्थिरावेल बुद्धि पायांपाशीं ॥२॥
अहाच यां केलों देहपरिचारें । तुमचें तें खरें वाटों नये ॥ ३ ॥
तुका ह्मणे व्हावें लवकरी उदार । मी आहें सादर प्रतिग्रहासी ॥४॥

॥ ८३५ ॥

काय त्या दिवस उचिताचा आला । मागील जो केला श्रम होता १
ठेवियेला पूर्ण करूनि संकेत । तयापाशीं चित्त लागलेंसे ॥ २ ॥
जाणसी गे माते लेंकरांचे लाड । नये पडों आड निष्ठुरता ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मीं करावें वचन । तुह्मांसी जतन करणें तें ॥ ४ ॥

॥ ८३६ ॥

पहा हो देवा कैसें जन । भिन्न भिन्न संचितें ॥ १ ॥ एक नाहीं एका ऐसे । दावी कैसें शुद्ध हीन २ पंचभूतें एकी रासी । सूत्रें कैशीं ओळखावीं ३ तुका म्हणे जो जे जाती । त्याची स्थिति तैशी ते ४

॥ ८३७ ॥

बरवी नामावळी । तुझी महादोषा होळी ॥ १ ॥ झालें आह्मांसी जीवन । धणीवरि हें सेवन २ सोपें आणि गोड । किती अमृ-ताहीं वाड ॥३॥ तुका म्हणे अच्युता । आमचा कल्पतरु दाता ४॥

॥ ८३८ ॥

आगी लागो तया सुखा । जेणें हरि नये मुखा ॥ १ ॥ मज होत कां विपत्ति । पांडुरंग राहो चित्तीं ॥ २ ॥ जळो तें समूळ । धन संपत्ति उत्तम कुळ ३ तुका म्हणे देवा । जेणें घडे तुझी सेवा ॥ ४ ॥

॥ ८३९ ॥

पुरुषा हातीं कंकणचुडा । नवल दोडा वृत्तिया १ पाहा कैसी विटंबणा । नारायणा देखिली २ जळो ऐसी ब्रिदावळी । माटवो-ळीपणाची ३ तुका ह्मणे पाहों डोळां । अवकळा नये हे ॥ ४॥

॥ ८४० ॥

धन्य बा ह्या ऐशा नारी । घरीं दारीं नांदती ॥ १ ॥ चोरूनिया तुज- पाशीं । येतां त्यांसी न कळतां ॥ २ ॥ दोन्हीं ठायीं समाधान । सम कठिण बहुतचि ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीवासाठीं । दुर्लभ भेटी ते देवा ॥४॥

॥ ८४१ ॥

काय लवणकणिकेविण । एके क्षीण सागर ॥ १ ॥ मां हे येवढी अड- चणी । नारायणीं मजविण ॥ २ ॥ कुबेर आटाहासे जोडी । काय कवडी कारणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे काचमणि । कोण गणी भांडारीं ॥४॥

॥ ८४२ ॥

चरणाचा महिमा । हा तो तुझ्या पुरुषोत्तमा ॥ १ ॥ अंध पारखी माणिकें । बोलविशी स्पष्ट मुकें ॥ २ ॥ काय नाहीं सत्ता । हातीं तुझ्या पंढरीनाथा ॥ ३ ॥ तुका ह्मणे मूढा । मज चेष्टविलें जडा ॥४॥

॥ ८४३ ॥

पावतों ताडन । तरी हें मोकलितों जन ॥ १ ॥ मग मी ओढवितों दुःखें । देवा सावकाश मुखें ॥ २ ॥ होती अप्रतिष्ठा । होतों वरपडा कष्टा ॥ ३ ॥ तुका ह्मणे मान । होतां उत्तम खंडन ॥ ४ ॥

॥ ८४४ ॥

केशीं दिसों वरी । आम्ही आळवितां हरि ॥ १ ॥ नाहीं सोंग आळं- कार । दास झाला संवसार ॥ २ ॥ दुःख आम्हां नाहीं चिंता । हरिचे दास म्हणवितां ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । ऐसीं झालों करितां सेवा ॥४॥

॥ ८४५ ॥

माझे माथां तुझा हात । तुझे पायीं माझें चित्त ॥ १ ॥ ऐसी पडियेली गांठी । शरीरसंबंधाची मिठी ॥ २ ॥ येरयेरांपाशीं । सांपडोन गेलों ऐशीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे सेवा । माझी कृपा तुझी देवा ॥ ४ ॥

॥ ८४६ ॥

मागायाची नाहीं इच्छा । जो मी ऐसा संकोचों ॥ १ ॥ लटिकियाची न करूं स्तुति । इच्छा चित्तीं धरूनि ॥ २ ॥ हिशोबें तें आलें घ्यावें । हें तों ठावें सकळांसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे स्वामिसेवा । येथें देवा कासाची ॥ ४ ॥

॥ ८४७ ॥

आम्ही बोलों तें तुज कळे । एक दोहीं ठायीं खेळे ॥ १ ॥ काय परि- हाराचें काम । जाणे अंतरींचें राम ॥ २ ॥ कळोनिया काय चाड । माझी लोकांसी बडबड ॥ ३ ॥ कारण सर्व एका । अवघें आहे ह्मणे तुका ॥ ४ ॥

॥ ८४८ ॥

कौतुकाची सृष्टी । कौतुकेंच केलें कष्टी ॥ १ ॥ मोडे तरी भलें खेळ । फांके फांकल्या कोल्हाळ ॥ २ ॥ जाणणियासाठीं । भय सामावलें पोटीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे चेता । होणें तें तूंच आइता ॥ ४ ॥

॥ ८४९ ॥

मूळ कारण सत्ता । नाहीं मिळत उचिता ॥ १ ॥ घडे कासयानें सेवा । सांग ब्रह्मांडाच्या जीवा ॥ २ ॥ सागर सागरीं । सामावेची कैंची थोरी ॥३॥ तुका म्हणे भावें । शरण ह्मणवितां बरवें ॥ ४ ॥

॥ ८५० ॥

मोहरोनी चित्ता । आणूं हळूचि वरि हिता ॥ १ ॥ तों हे पडती आघात । खोडी काढिती पंडित ॥ २ ॥ संसारा भेणें । कांहीं उसंती तों पेणें ॥३॥ एखादिया भावें । तुका म्हणे जवळी यावें॥४॥

॥ ८५१ ॥

तुझें नाम पंढरिनाथा । भावेंविण नये हाता १ दाहा नये विसां नये । पंनासां साठीं नये २ शतां नये सहस्रां नये । लक्ष कोटी-लागीं नये ३ तुका म्हणे पंढरिनाथा । भावेंविण नये हाता ॥ ४ ॥

॥ ८५२ ॥

कोण आमचीं योगतपें । करूं बापें जाणावीं ॥१॥ गीत संतसंगें गाऊं । उभीं ठाऊं जागरणीं ॥ २ ॥ आमुचा तो नव्हे लाग । करूं त्याग जावया ॥ ३ ॥ तुका ह्मणे इंद्रियांसी । येचि रसीं रगडूं ॥ ४ ॥

॥ ८५३ ॥

लाडें भाकितों करुणा । तूं रे उदारांचा राणा ॥ १ ॥ करिशी आमुचा सांभाळ । तूं रे माउली स्नेहाळ ॥ २ ॥ नाहीं चिंता रे आम्हांशी । तूंचि भार चालविशी ॥ ३ ॥ आह्मी झालों उदासीन । तूंचि करिशी जतन ॥ ४ ॥ आह्मां नाहीं जीवनास । तूंचि पुरविशी घास ॥ ५ ॥ तुका ह्मणे भलतें सवें । जातां मागें मागें धांवें ॥ ६ ॥

॥ ८५४ ॥

आम्हां हें सकळ । तुझ्या पायांचेंचि बळ ॥१॥ करूं अमृताचें पान । दुजें नेणें कांहीं आन ॥ २ ॥ जयाचा जो भोग । सुख दुःख पीडा रोग ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । तुझे पायीं माझा ठेवा ॥ ४ ॥

॥ ८५५ ॥

जाणतों समये । परि मत कामा नये ॥ १ ॥ तुम्हीं सांगावें तें बरें । देवा सकळ विचारें ॥ २ ॥ फुकाचिये पुसी । चिंता नाहीं होते ऐसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे आहे । धर पाय मज साहे ॥ ४ ॥

॥ ८५६ ॥

बैसलों तों कडियेवरी । नव्हें दुरी वेगळा ॥ १ ॥ घडलें हें बहुता दिसां । आतां इच्छा पुरवीन ॥ २ ॥ बहु होता झाला सीण । नाहीं क्षण विसांवा ॥३॥ दुःखी केलें मी तूं पणें । जवळी नेणें होतें तें ॥४॥ पाहात जे होतों वास । तेचि आस पुरविली ॥ ५ ॥ तुका ह्मणे मायबापा । झणी कोपा विठ्ठला ॥ ६ ॥

॥ ८५७ ॥

तुज पाहातां सामोरी । दृष्टि न फिरे माघारी ॥ १ ॥ माझें चित्त तुझ्या पायां । मिठी पडली पंढरिराया ॥२॥ नव्हे सारिता निराळें । लवण मेळवितां जळें ॥३॥ तुका ह्मणे बळी । जीव दिला पायांतळीं ४

॥ ८५८ ॥

कळों आलें तुझें जिणें । देवा तूं माझें पोषणें १ वाट पाहासी आठवाची । सत्ता सतंत कईंची २ बोलावितां यावें रूपा । सदा निर्गुणींचि लपा ३ तुका ह्मणे तूं परदेशी । येथें आम्हां अंगेजिसी ॥ ४ ॥

॥ ८५९ ॥

किडा अन्नाचें माणूस । त्याचा म्हणविल्या दास ॥ १ ॥ तेंही त्यासी । उपेक्षीना । बोल आपुला सांडीना ॥२॥ तो तूं नराचा नरेंद्र । तुजपासूनि इंद्र चंद्र ॥३॥ तुका ह्मणे विश्वंभर । तुज वर्णी फणीवर ॥ ४ ॥

॥ ८६० ॥

तुझे ह्मणों आह्मां । मग उणें पुरुषोत्तमा ॥ १ ॥ ऐसा धर्म काय । आमृतानें मृत्यु होय ॥ २ ॥ कल्पवृक्षा तळीं । गांठी बांधलिया झोळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे परीस । सांपडल्या उपवास ॥ ४ ॥

॥ ८६१ ॥

तुझें रूप पाहतां देवा । सुख झालें माझ्या जीवा ॥ १ ॥ हें तों वाचे बोलवेना । काय सांगों नारायणा ॥२॥ जन्मोजन्मींचें सुकृत - तुझे पायीं रमे चित्त ॥ ३ ॥ जरी योगाचा अभ्यास । तेव्हां तुझा निजध्यास ॥ ४ ॥ तुका ह्मणे भक्त । गोड गाऊं हरिचें गीत ॥ ५ ॥

॥ ८६२ ॥

बैसो आतां मनीं । आलें तैसेंचि वदनीं ॥ १ ॥ मग अवघेंचि गोड । पुरे सकळही कोड ॥ २ ॥ बाहेरील भाव । तैसा अंतरींहि वाव ॥ २ ॥ तुका ह्मणे माणि । शोभा दाखवी कोंदणीं ॥ ४ ॥

॥ ८६३ ॥

माझें परिसावें गाऱ्हाणें । चित्त द्यावें नारायणें ॥ १ ॥ माझे हृदयींचें वर्म । देवा जाणशी तूं कर्म ॥ २ ॥ सबाह्यअंतरसाक्ष । ऐसा वेदीं केला पक्ष ॥३॥ तुका ह्मणे नेणां । काय सांगों नारायणा ॥४॥

॥ ८६४ ॥

ठाव तुह्मांपाशीं । झाला आतां हृषीकेशी ॥ १ ॥ नलगे जागावें सतत । येथें स्वभावें हे नीत ॥ २ ॥ चोरट्यासी थारा । येथें कैंचा जी दातारा ॥ ३ ॥ तुका ह्मणे मनें । आह्मां झालें समाधान ॥ ४ ॥

॥ ८६५ ॥

बोलविसी तरी । तुझ्या येईल उत्तरीं ॥ १ ॥ कांहीं कोड कवतुकें । हातीं द्यावया भातुकें ॥ २ ॥ बोलविसी तैसें । करीन सेवन सरिसें ॥३॥ तुका ह्मणे देवा । माझें चळण तुज सवा ॥ ४ ॥

॥ ८६६ ॥

प्रीती करी सत्ता । बाळा भीती मातापिता ॥१॥ काय चाले त्यासीं बळ । आळी करिता कोल्हाळ ॥ २ ॥ पदरीं घाली मिठी । खेदी मागें पुढें लोटी ॥३॥ बोले मना आलें । तुका साहिला विठ्ठलें ॥४॥

॥ ८६७ ॥

मागें चिंता होती आस । केला नास या काळें ॥ १ ॥ तुह्मी आह्मां उदासीन । भिन्नभिन्न वारिलें ॥ २ ॥ मोहजाळें दुःख वाढे । वाढे वाढे त्यास तें ॥३॥ तुका ह्मणे कोण देवा । आतां हेवा वाढवी ॥४॥

॥ ८६८ ॥

आपणाचि व्हाल साहे । कसियाला हे धांवणी १ भाकिली ते उरली कींव । आहे जीव जीवपणें २ आहाच्च कैंचा बीजा मोड । प्रीती कोड वांचूनि ३ तुका ह्मणे देडिन काया । याल तया धांवणिया ४

॥ ८६९ ॥

राहे उभा वादावादीं । तरी फंदी सांपडे ॥ १ ॥ लव्हाळ्यासी कोठें बळ । करिल जळ आपुलें ॥ २ ॥ कठिणासी बळजोरा । नम्र पीडा देखेना ॥३॥ तुका ह्मणे सर्वरसीं । मिळे त्यासी गोत तें ॥४॥

॥ ८७० ॥

असाल ते तुम्ही असा । आह्मी सहसा निवडों ना १ अनुसरलों एका चित्तें । हातोंहातें गिवसीत २ गुणदोष काशासाठीं । तुमचे पोटीं वागवूं ३ तुका ह्मणे दुजें आतां । कोठें चित्ता आतळों ४

॥ ८७१ ॥

तूं माझा कोंवसा । परी न कळे या धर्मां ॥१॥ कूट खाती मागें पुढें । जाती निरयगांवा पुढें ॥२॥ मज ह्मणतसी कवी । निषेधुनि पापी जीवीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे पांडुरंगा । आता कोण लेखी जगा ॥ ४ ॥

॥ ८७२ ॥

कोठें देवा बोलों । तुह्मां भीड घालूं गेलों ॥ ॥ करावया स्वहिताची । भांडवलाची टांचणी ॥ २ ॥ दुर्बळा मागतां । त्याच्या प्रवर्तला घाता ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं । मज कळलें ऐसें कांहीं ॥ ४ ॥

॥ ८७३ ॥

वाया जाय ऐसा । आतां उगवावा फांसा ॥१॥ माझें परिसावें गार्‍हाणें । सुखदुःखांचीं वचनें ॥२॥ हाचि आम्हां ठाव । पायीं निरोपाया भाव ॥ ३ ॥ तुका ह्मणे जार । तुझा तुज देवा भार ॥ ४ ॥

॥ ८७४ ॥

विनवी जे ऐसें कांहीं । उरलें नाहीं यावरि ॥१॥ आतां असो पंढरीनाथा । पायीं माथा तुमचिये ॥ २ ॥ मागें मागियेली युक्ती । कांहीं होती जवळी ते ३ निराशेची न करी आस । तुका दास माघारी ४

॥ ८७५ ॥

हा तों नव्हता दीन । टाळायाचा ऐसा क्षण ॥१॥ कांजी नेणों राखा हात । कैसें देखावें रडत ॥ २ ॥ दावूनिया आस । दूर पळवितां कास ॥ ३ ॥ तुका ह्मणे धांव । घेतां न पुरेचि हांव ॥ ४ ॥

॥ ८७६ ॥

तुम्हां उद्धरणें फार । मज दुसरी नाहीं थार १ आतां जैसें तैसें सोसा । काय करणें हृषीकेशा २ बरें न दिसेल ओळी । एका अन्न एका गाळी ३ लावितो आभार । तुका विसरलेती फार ४

॥ ८७७ ॥

हेचि वादकाची कळा । नाहीं येऊं देत बळा १ धीर करावा करावा । तरी तो आहे आम्हां देवा ॥ २ ॥ रिघावें पोटांत । पायां पडोन घ्यावा अंत ३ तुका ह्मणे वरि । गोडा आणावा उत्तरीं ॥ ४ ॥

॥ ८७८ ॥

द्याल ऐसें दिसे । तुमचे साचपण इच्छे ॥ १ ॥ म्हणऊनि न भंगे निर्धार । केले लोचनें सादर ॥ २ ॥ मुखाचीच वास । पुरला पाहे अवकाश ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळे । काय लाभ कोणे वेळे ॥ ४ ॥

॥ ८७९ ॥

लावूनि कोलित । माझा करितील घात ॥ १ ॥ ऐसे बहुतांचे संधी । सांपडलों खोळेमधीं ॥२॥ पाहातील उणें । तेथें देती अनुमोदनें ॥३॥ तुका ह्मणे रिघे । पुढें नाहीं झाले धींदे ॥ ४ ॥

॥ ८८० ॥

करूं स्तुती तरि ते निंदा । तुम्ही जाणा हे गोविंदा ॥ १ ॥ आम्हा लडिवाळांचे बोल । करा कवतुकें नवल ॥ २ ॥ बोबड्या उत्तरीं । तुम्हा रंजवितों हरी ॥३॥ मागतों भातुकें । तुका ह्मणे कवतुकें ॥४॥

॥ ८८१ ॥

हा गे हाचि आतां लाहो । माझा अहो विठ्ठला ॥ १ ॥ दंडवत दंडवत । वेगळी मात न बोलें ॥ २ ॥ वेगळाल्या कोठें भागें । लाग लागें लावावा ॥ ३ ॥ तुका ह्मणे केल्या जमा । वृत्तितमा भाजूनि ॥ ४ ॥

॥ ८८२ ॥

तुझें मजपाशीं मन । माझी तेथें भूक तान ॥ १ ॥ जिव्हा रते एके ठायीं । दुजें बोलायाचें काइ ॥ २ ॥ माझिया कवतुकें । उभा पहासी भातुकें ॥ ३ ॥ तुका ह्मणे साचें । तेथें मागील कईचें ॥ ४ ॥

॥ ८८३ ॥

तुह्मा आह्मा सरी । येथें कईच्या या परी ॥ १ ॥ स्वामिसेवा अलंकार । नाहीं आवडिये थार ॥ २ ॥ खुंटलिया वाचा । मग हा आनंद कइचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे कोडें । आह्मी नाचों तुजपुढें ॥४॥

॥ ८८४ ॥

आवडी कां ठेवूं । बैसोनिया संगें जेवूं ॥ १ ॥ मागें नको ठेवूं उरी । माझी आण तुजवरी ॥ २ ॥ देखिले प्रकार । त्याचे पाहेन साचार ॥ ३ ॥ तुका ह्मणे बाळीं । केली चाहाडी सकळीं ॥ ४ ॥

॥ ७८५ ॥

देवों कपाट । कीं कोणें काळें राखों वाट १ काय येईल तें शिरीं । आज्ञा धरूनिया करीं २ करूं कळे तैसी मात । किंवा राखावा एकांत ३ तुका ह्मणे जागों । किंवा कोणा नेदूं वागों ॥४॥

॥ ८८६ ॥

वांयां ऐसा जन्म गेला । हें विठ्ठला दुःख वाटे १ नाहीं सरता झालों पायीं । तुह्मी जई न पुसा २ कां मी जीतों संवसारीं । अद्यापवरी भूमिभार ३ तुका ह्मणे पंढरीनाथा । सबळ व्यथा भवरोग ॥ ४ ॥

॥ ८८७ ॥

कार्यच कारण । तृष्णा पावविते सीण ॥ १ ॥ काय करूनि ऐसा संग । सोसेंचि तूं पांडुरंग ॥ २ ॥ रूपीं नाहीं गोडी । हांवे हांवे ऊर फोडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे पडे भरी । ऐशा वरदळाचे थोरी ॥ ४ ॥

॥ ८८८ ॥

जावें हीनपणें । कासयाच्या प्रयोजनें ॥ १ ॥ प्रारब्धीं संसार । बरी हिमातीची थार ॥ २ ॥ होणार ते कांहीं । येथें अवकळा नाहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवें । कृपा केलिया बरवें ॥ ४ ॥

॥ ८८९ ॥

पाठी लागे तया दवडी दुरी । घाली बाहेरी संवसारा ॥ १ ॥ येउनि दडें तुमच्या पायीं । धांवें तंई छो म्हणा ॥२॥ पारखियाचा त्रास पडे । खडबडे उठी तें ३ तुका ह्मणे लाविला धाक । नेदी ताक खाऊं कोणा ४

॥ ८९० ॥

सोळा सहस्र होऊं येतें । भरलें रितें आह्मापें ॥ १ ॥ ऐसें तुह्मा ठायाठाव । देव म्हूण संपादे ॥ २ ॥ कैची त्रिगामध्यें चिर । मना वरें आलें तें ॥३॥ तुका ह्मणे पांडुरंगा । अंगसंगा भिन्नपरा ॥ ४ ॥

॥ ८९१ ॥

लागों दिलें अंगा । ऐसें कांगा संनिध ॥ १ ॥ कोण्या पापें उदयो केला । तो देखिला प्रळय ॥ २ ॥ न देखवे पिडला सर्प । दया दर्प विषाचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे भलें । मज तों न वजे साहिलें ॥ ४ ॥

॥ ८९२ ॥

नवजावा तो काळ वाया । मुख्य दया हे देवा ॥ १ ॥ ह्मणऊनि जैसें तैसें । रहणी असे पायांचे ॥ २ ॥ मोकळें हें मन कष्ट । करी नष्ट दुर्जन ॥३॥ तुका ह्मणे कांहीं नेणें । नवजे येणें परी वाया ॥४॥

॥ ८९३ ॥

आइकिली मात । पुरविले मनोरथ ॥ १ ॥ प्रेम वाढविलें देवा । बरवी घेऊनिया सेवा ॥ २ ॥ केली विनवणी । तैसी पुरविली धणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे काया । रसा कुरोंडी वरोनिया ॥ ४ ॥

॥ ८९४ ॥

निघालें तें अगीहूनि । आतां झणी आतळे ॥ १ ॥ पळवा परपरतें दुरी । आतां हरी येथूनि ॥२॥ धरिलें तैसें श्रुत करा हो । येथें आहो प्रपंचीं ॥३॥ अबोल्यानें ठेला तुका । भिऊनि लोकां निराळा ॥४॥

॥ ८९५ ॥

भाग सीण गेला । माझा सकळ विठ्ठला १ तुझा म्हणवितो दास । केली उच्छिष्टाची आस २ राहिली तळमळ । तई पासूनि सकळ ३ तुका म्हणे धालें । पोट ऐसें कळों आलें ॥ ४ ॥

॥ ८९६ ॥

तुम्ही आम्ही भले आतां । झालों चिंता काशाची ॥ १ ॥ आपुलाले आलों स्थळीं । मौन्य कळी वाढेना ॥ २ ॥ सहज मनीं होतें । तें उचितें घडलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे नसतें अंगा । येत संगा सारिखे ॥४॥

॥ ८९७ ॥

बहु देवा बरें झालें । नसतें गेलें सोवळें ॥ १ ॥ धोवटाशी पडिली गांठीं । जगजेठीप्रसादें ॥ २ ॥ गादल्याचा झाला झाडा । गेली पीडा विकल्प ॥ ३ ॥ तुका ह्मणे वराबरी । निर्मळ करी निर्मळा ॥ ४ ॥

॥ ८९८ ॥

सर्व संगीं विट आला । तूं एकला आवडसी ॥ १ ॥ दिली आतां पायीं मिठी । जगजेठी न सोडी २ बहु झालों खेदक्षीण । येणें सीण तो नासे ३ तुका ह्मणे गंगे वास । बहु त्या आस स्थळाची ॥ ४ ॥

॥ ८९९ ॥

फावलें तुह्मां मागें । नवतों लागें पावलों ॥ १ ॥ आलों आतां उभा राहे । जवळी पाहे सन्मुख । २ ॥ घरीं होती गोवी झाली । कामें बोली न घडेचि ॥ ३ । तुका ह्मणे धडफुडा । झालों झाडा देईं देवा ४

॥ ९०१ ॥

मी तें मी तूं तें तूं । कुंकुड हें लाडसी ॥ १ ॥ वचनाची पडो तुटी । पोटींचें पोटीं राखावें ॥२॥ तेथिलि तेथें येथील येथें । वेगळ्या कुंथे कोण भारें ॥३॥ याचें यास त्याचें त्यास । तुक्यानें कास घातली ४

॥ ९०३ ॥

तुझा संग पुरे संग पुरे । संगति पुरे विठोबा ॥१॥ आपल्या सारिखें करिसी दासां । भिकारीसा जग जाणे ॥ २ ॥ रूपा नाहीं ठाव नांवा । तैसें आमुचें करिसी देवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे तोयें आपुलें भेंडोळें । करिसी वाटोळें माझें तैसें ॥ ४ ॥

॥ ९०३ ॥

नको दुष्टसंग । पडे भजनामध्यीं भंग ॥ १ ॥ काय विचार देखिला । सांग माझा तो विठ्ठला ॥ २ ॥ तुज निषेधितां । मज न साहे सर्वथा ॥३॥ एका माझ्या जीवें । वाद करूं कोणासवें ॥ ४ ॥ तुझे वर्णूं गुण । कीं हे राखों दुष्टजन ॥५॥ काय करूं एका । मुखें सांग ह्मणे नका ॥६

॥ ९०४ ॥

नवजता घरा । आह्मी कोणाच्या दातारा ॥ १ ॥ कां हे छळूं येती लोक । दाट बळेंचि कंटक ॥ २ ॥ नाहीं आह्मी खात । कांहीं कोणाचें लागत ॥ ३ ॥ कळे तैसी सेवा । तुका ह्मणे करूं देवा ॥ ४ ॥

॥ ९० ॥

होऊनि कृपाळ । भार घेतला सकळ ॥ १ ॥ तूंचि चालविसी माझें । भार सकळही ओझें ॥ २ ॥ देह तुझ्या पायीं । ठेवुनि झालों उरराई ॥ ३ ॥ कायावाचामनें । तुका ह्मणे दुजें नेणें ॥ ४ ॥

॥ ९०६ ॥

भला म्हणे जन । परि नाहीं समाधान ॥ १ ॥ माझें तळमळी चित्त । अंतरले दिसे हित ॥२॥ कृपेचा आधार । नाहीं देंस झाला भार २ तुका म्हणे कृपे । अंतराय कोण्या पापें ॥ ४ ॥

॥ ९०७ ॥

शिकविले बोल । बोले तैसी नाहीं ओल ॥ १ ॥ आतां देवा संदेह नाहीं । वाया गेलों यासी कांहीं ॥ २ ॥ एकांताचा वास । नाहीं संकल्पाचा नास ॥३॥ बुद्धि नाहीं स्थिर । तुका म्हणे शब्दा धीर ॥४॥

॥ ९०८ ॥

काळावरी सत्ता । ऐशा करितो वारता ॥१॥ तो मी हीनाकृति सांडें । देवा तुम्हें काळतोंडें ॥ २ ॥ मानूनी भरंवसा । होतों दासा मी पैसा ॥ ३ ॥ तुका ह्मणे मान । गेलों वाढवूं थोरपण ॥ ४ ॥

॥ ९०९ ॥

कळों येतें तरि कां नव्हे । पडती गोवे भ्रमाचे ॥ १ ॥ जाणतांचि होतो घात । परिसा मत देवा हें ॥ २ ॥ आंधिसामार्टी फांसा मान । पाडी धनइच्छा ते ॥३॥ तुका म्हणे होणार खोटें । कर्म मोटें वळिवंत ४॥

॥ ९१० ॥

विश्वव्यापी माया । तिनें झाकुळिलें छाया ॥१॥ सत्य गेलें भोळ्यावारी । अविद्येची चाली थोरी ॥२॥ आपुलेंचि मन । करी आपणां बंधन ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । तुम्हीं कोडीं हीं उगवा ॥ ४ ॥

॥ ९११ ॥

एक नेणतां नाडलीं । एका जाणिवेची भुली ॥ १ ॥ बोलों नेणें मुकें । वेडें वाचाळ काय निकें ॥ २ ॥ दोहीं सवा नाड । विहिर एकीकडे आड ॥ ३ ॥ तुका म्हणे कर्म । तुझें कळों नेदी वर्म ॥ ४ ॥

॥ ९१२ ॥

आम्ही देव तुह्मी देव । मध्यें भेद अधीक ॥१॥ कैवाडाच्या धांवा लागे । मागें मागें विठ्ठले ॥ २ ॥ भेडसाविलें हाकें नादें । बोलखी भेदें मोडिली ॥३॥ तुका ह्मणे उभा राहे । मागें पाहे परतोनि ॥४॥

॥ ९१३ ॥

पुरली धांव कडिये घेई । पुढें पायीं न चलवी ॥ १ ॥ कृपाळुवे पांडुरंगे । अंगसंगे जिवलगे ॥२॥ अवघी निवारावी भूक । अवघ्या दुःख जन्माचें ॥३॥ तुका ह्मणे बोलवेना । लावी स्तना ईश्वरे ॥४॥

॥ ९१४ ॥

काय माता विसरे बाळा । कळवळा प्रीतीचा ॥ १ ॥ आवडीनें गळां मिठी । घाली उठी बैसवी २ लावूं धांवे मुख स्तना । नये मना निराळें ३ भावंडाचें भातें दावी । आपुलें लावी त्यास जी ॥४॥ माझें थोडें त्याचें फार । उत्तर हें वाढवी ५ तुका ह्मणे नारायणा । तुह्मी जाणा बुझावूं ६

॥ ९१५ ॥

आळवितां बाळें । मातेतें सुख आगळें ॥ १ ॥ द्यावें आवडी भातुकें । पाहे निवे कवतुकें ॥२॥ लेववूनि अळंकार । दृष्टी करावी सादर ३ आपुलिये पदीं । बैसवूनि कोडें वंदी ॥४॥ नेदी लागों दिठी । उचलोनि लावी कंठीं ॥५॥ तुका ह्मणे लाभा । वारी घ्यावे पद्मनाभा ॥६॥

॥ ९१६ ॥

अवघ्या उपचारा । एक मनाचि दातारा ॥ १ ॥ घ्यावी घ्यावी हेचि सेवा । माझी दुर्बळाची देवा ॥ २ ॥ अवघियाचा ठाव । पायांवरि जीवभाव ॥ ३ ॥ चित्ताचें आसन । तुका करितो कीर्तन ॥ ४ ॥

॥ ९१७ ॥

नीचपण बरवें देवा । न चले कोणाचाही दावा ॥१॥ महा पुरें झाडें जाती । तेथें लव्हाळे राहाती ॥ २ ॥ येतां सिंधुच्या लहरी । नम्र होतां जाती वरि ॥३॥ तुका ह्मणे कळ । पाय धरिल्या न चले बळ ४

॥ ९१८ ॥

आहे तरि सत्ता । ऐशा करितों वारता ॥ १ ॥ अंगसंगाचीं उत्तरें । सलगीसेवेनें लेंकरें ॥ २ ॥ तरी निकटवासें । असों आशंकेच्या नासें ॥ ३ ॥ तुका ह्मणे रुची । येथें भिन्नता कैची ॥ ४ ॥

॥ ९१९ ॥

वर्म तरी आह्मां दावा । काय देवा जाणें मी ॥ १ ॥ बहुतां रंगीं हीन झालों । तरि आलों शरण ॥२॥ घाल जरि तुह्मी धीर । होईल स्थिर मन ठायीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे सत्ताबळें । लडिवाळें राखावीं ४

॥ ९२० ॥

अनाथांची तुह्मां दया । पंढरीराया येतसे ॥ १ ॥ ऐसी ऐकोनिया

कीर्ति । बहु विश्रांति पावलों ॥ २ ॥ अनाथांच्या धावा घरा । नामें करा कुडावा ॥३॥ तुका ह्मणे सवघड हित । ठेवूं चित्त पायां पे ॥४॥

॥ ९२१ ॥

लोह चुंबकाच्या बळें । उभें राहिलें निराळें ॥ १ ॥ तैसा तूंचि आह्माठायीं । खेळतोसी अंतर्बाहीं ॥ २ ॥ भक्ष अग्नीचा तो दोरा । त्यासि वांचवी मोहरा ३ तुका ह्मणे अघीलपणें । नेलीं लाकडें चंदनें ४

॥ ९२२ ॥

नाहीं तुंकळलों अन्ना । परि या मान जनार्दना ॥१॥ देव केला सकळसाक्षी । काळीं आणि शुद्धपक्षीं ॥२॥ भोगी भोगविनां । बाळासवें तोचि पिता ॥३॥ कर्म अकर्म जळालें । प्रौढ तुका तें उरलें ॥ ४ ॥

॥ ९२३ ॥

जें जें मना वाटे गोड । तें तें कोड पुरविसी १ आतां तूंचि साह्यकारी । अवघ्यापरी झालाशी ॥ २ ॥ नाहीं सायासाचें काम । घेतां नाम आवडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे सर्व सांगे । पांडुरंगे दयाळे ॥ ४ ॥

॥ ९२४ ॥

न खंडी अवगुण । वर्में मानीतसे सिण ॥१॥ भोग देतां करिती काई फुटतां यमदंडें डोई ॥ २ ॥ पापपुण्यझाडा । देतां तेथें मोठी पीडा ॥ ३ ॥ तुका ह्मणे बोला । माझ्या सिणती विठ्ठला ॥ ४ ॥

॥ ९२५ ॥

आह्मां केलें गुणवंत । तें उचित राखावें ॥ १ ॥ तुह्मांसी तों चाड नाहीं । आणिकां कांहीं सुखदुःखा ॥ २ ॥ दासांचें तों देखों नये । उणें काय होईल तें ॥३॥ तुका ह्मणे विश्वंभरा । दृष्टि करा सामोरी ४

॥ ९२६ ॥

माता कापी गळा । तेथें कोण राखी बाळा ॥ १ ॥ हें कां नेणा नारायणा । मज चाळवितां दीना ॥२॥ नागवी घांवणें । तेथें साह्य व्हावें कोणें ॥३॥ राजा सर्व हरी । तेथें दुजा कोण वारी ॥४॥ तुझ्या केल्याविण । नव्हे स्थिर वश मन ५ तुका ह्मणे हरी । सूत्र तुह्मां हातीं दोरी ६

॥ ९२७ ॥

वेद नेले शंखासुरें । केलें ब्रह्मानें गाऱ्हाणें ॥ १ ॥ धांव धांव झडकरी । ऐसें कृपाळुवा हरी ॥२॥ गजेंद्र नाडियें गांजिला । तेणें तुझा धांवा केला ॥३॥ तुका ह्मणे पद्मनाभा । जेथें पाहे तेथें उभा ॥ ४ ॥

॥ ९२८ ॥

भागल्यांचा तूं विसावा । करीं नांवा निंबलोण ॥ १ ॥ परमानंदा पुरुषोत्तमा । हरी या श्रमापासूनि ॥२॥ अनाथांचा अंगीकार । करितां भार न मानिसी ३ तुका ह्मणे इच्छा पुरे । ऐसे धुरे गे विठ्ठले ॥४॥

॥ ९२९ ॥

ह्मणवितों दास । मज एवढीच आस ॥ १ ॥ परी तें अंगीं नाहीं

वर्म । करीं आपला तूं धर्म ॥ २ ॥ बडबडितां तोंडें । रितें भावेविण घेंडें ॥ ३ ॥ तुका ह्मणे बरा । दावूं जाणतों पसारा ॥ ४ ॥

॥ ९३० ॥

उरलें तें भक्तिसुख । डोळां मुख पाहावें १ अंतरींचें कां हो नेणा । नारायणा माझिये ॥ २ ॥ पुरवा तैसी केली आळी । बळी जगदानिया ३ हातीं घेउनि चोरा भातें । दावा रितें बाळका ॥ ४ ॥ साजत हें थोरपण । नाहीं त्रिण वत्सला ॥ ५ ॥ शाहणे तरी लाड दावी । बाळ जेवी मातेसी ६ तुका ह्मणे पांडुरंगा । ऐसें पैं गा आहे हें ७

॥ ९३१ ॥

देव गावा ध्यावा ऐसें झालें । परदेशी नाहीं उगलें । वडील आणि धाकुलें । नाहीं ऐसें झालें दुसरें तें ॥ १ ॥ नाहीं लागत मुळीहूनि । सुहृद जन आणि जननी । लागल्या लागें त्यागें सांडुनि । लोभीये मांडणी संयोगाची ॥ २ ॥ शिव बाटला जीवदशे । बहुत ओतत आले ठसे । हीन झाले भूषणाचें इच्छे । निवडती कैसे गुणागुण ॥ ३ ॥ आतां हें हुतांश तों बरें । अवघे एकच मोहरें । पिटिलियाविण नव्हे खरें । निवडे बरें जातिशुद्ध ॥ ४ ॥ तुका उताविळ याजसाठीं । आहे तें निवेदीन पोटीं । आवडी द्यावी जी येथें लाटी । तुझी जगजेठी कीर्ति वाखाणीन ॥ ५ ॥

॥ ९३२ ॥

प्रीतीच्या भांडणा नाहीं शिरपाव । वचनाचेचि भाव निष्ठुरता॥१॥ जीणें तरि एका जीवें उभयता । पुत्राचिया पिता दुखवे दुःखें ॥२॥ काय जाणे तुटों मायेचें लिगाड । विषम तें आड उरों नेणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मज करुणा उत्तरें । करितां विश्वंभरें पाविजेल ॥ ४ ॥

॥ ९३३ ॥

नव्हों सभाधीट । समोर बोलाया नीट । एकलीं एकट । दुजें नाहीं देखिलें ॥ १ ॥ आतां अवघें तुह्मी जाणा । तुमचें माझें नारायणा । येईल करुणा । तेचि पहा तुह्मांसी ॥ २ ॥ ताळ नाहीं माझे बुद्धि । धरली न धरवे शुद्धि । आतां बळ कधीं । कोण्या जन्में निवाड ॥ ३ ॥ आतां शेवटींचें । उत्तर तें हेंचि साचें । शरण आलें त्याचें । तुका ह्मणे सांभाळा ॥ ४ ॥

देवापाशीं मागणें.

॥ ९३४ ॥

अद्वैतीं तों माझें नाहीं समाधान । गोड हे चरणसेवा तुझी ॥ १ ॥ करूनी उचित देई हेंचि दान । आवडे कीर्तन नाम तुझें ॥ २ ॥

देवभक्तपण सुखाचा सोहळा । ठेवूनि निराळा दावी मज ॥ ३ ॥
तुका ह्मणे आहे तुझें हें सकळ । कोणी एके काळें देइं मज ॥ ४ ॥

॥ ९३५ ॥

समचरणदृष्टि विटेवरी साजरी । तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥
आणीक नलगे मायिक पदार्थ । तेथें माझें आर्त्त नको देवा ॥ २ ॥
ब्रह्मादिक पदें दुःखाची शिराणी । तेथें दुश्चित्त झणी जडो देसी ३
तुका ह्मणे त्याचें कळलें आह्मां वर्म । जे जे कर्मधर्म नाशिवंत ॥ ४ ॥

॥ ९३६ ॥

सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती । रखुमाईच्या पती सोयरिया १
गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्व काळ ॥ २ ॥
विठो माऊलिये हाचि वर देईं । संचरोनि राहीं हृदयामाजी ॥३॥
तुका ह्मणे कांहीं न मागे आणिक । तुझे पायीं सुख सर्व आहे॥४॥

॥ ९३७ ॥

नामपाठ मुक्ताफळांच्या ओवणी । हें सुख सगुणीं अभिनव ॥ १ ॥
तरी आह्मी झालों उदास निर्गुणा । भक्तांचिया मना मोक्ष नये॥२॥
द्यावें घ्यावें ऐसा येथें उरे भाव । काय ठाया ठाव पुसोनिया ॥३॥
तुका ह्मणे आतां अभयदान करा । ह्मणा विश्वंभरा दिलें ऐसें ॥४॥

॥ ९३८ ॥

समर्थाचे सेवे कोठें नाहीं घात । पाहो नये अंत पांडुरंगा ॥ १ ॥
आहे तैसी नीत विचारावी बरी । येऊनी भीतरी वास करा॥ २ ॥
निढळ राखिलें तरी भयाभीत । हर्षामर्ष चित्त पावतसे ॥ ३ ॥
तुका ह्मणे तरी कळेल निवाड । दर्शनाची चाड शुभकीर्ति ॥ ४ ॥

॥ ९३९ ॥

वारंवार हाचि न पडावा विसर । वसावें अंतर तुमच्या गुणीं ॥१॥
इच्छेचा ये दाता तूं एक समर्थ । अगा कृपावंता मायबापा॥ २ ॥
लाभाचिये वोढी उतावीळ मन । त्यापरि चिंतन चरणाचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे जीवीं जीवन ओलावा । पांडुरंगे द्यावा शीघ्र आतां ॥४॥

॥ ९४० ॥

पावलें पावलें तुझें आह्मा सर्व । दुजा नको भाव होऊं देऊं ॥ १ ॥
जेथें तेथें देखें तुझेंचि पाउलें । त्रिभुवन संचलें विठ्ठला गा ॥ २ ॥
भेदाभेद मतें भ्रमाचे संवाद । आह्मां नको वाद त्याशीं देऊं ॥ ३ ॥
तुका ह्मणे अणु तुजविण नाहीं । नभाहुनि पाही वाढ आहे ॥ ४ ॥

॥ ९४१ ॥

वाळूनिया जन सांडी मज दुरी । करिशील हरी ऐसें कधीं ॥ १ ॥
आठवीन पाय धरूनि अनुताप । वाहे जळ झोंप नाहीं डोळां ॥ २ ॥

नावडती जीवा आणीक प्रकार । आवडी ते फार एकांताची ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसी धरितों वासना । होईं नारायणा साह्य मज ॥ ४ ॥
॥ ९४२ ॥
होईल तो भोग भोगीन आपुला । न घालीं विठ्ठला भार तुज ॥१॥
तुम्हांपासाव हें इच्छीतसें दान । अंतरींचें ध्यान मुखीं नाम ॥२॥
नयें काकुलती गर्भवासासाठीं । न धरीं हें पोटीं भय कांहीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज उदंड एवढें । न वांचावें पुढें मायबापा ॥ ४ ॥
॥ ९४३ ॥
कानडीनें केला मऱ्हाटा भ्रतार । एकाचें उत्तर एका नये ॥ १ ॥
तैसें मज नको करूं कमळापति । देईं या संगति सज्जनांची ॥ २ ॥
तिनें पाचारिलें इल बा म्हणोन । येरु पळे आण झाली आतां ॥३॥
तुका ह्मणे येरा येरा जें विच्छिन्न । तेथें वाढे सीण सुखा पोटीं ॥४॥
॥ ९४४ ॥
नाम आठवितां सद्गदित कंठीं । प्रेम वाढे पोटीं ऐसें करीं ॥ १ ॥
रोमांच जीवन आनंदाश्रु नेत्रीं । अष्टांग ही गात्रीं प्रेम तुझें ॥ २ ॥
सर्व ही शरीर वेचो या कीर्तनीं । गाऊं निशिदिनीं नाम तुझें ॥ ३ ॥
तुका ह्मणे दुजें न करीं कल्पांतीं । सर्वदा विश्रांति संतां पायीं ॥४॥
॥ ९४५ ॥
अनाथ परदेशी हिन दीन भोळें । उगलेंचि लोळें तुझे रंगीं ॥ १ ॥
आपुलें ह्मणावें मज नुपेक्षावें । प्रेमसुख द्यावें मायाबापा ॥ २ ॥
कासवीचे परी दृष्टी पाहे मज । विज्ञानीं उमज दाखुनिया ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझा झालों शरणागत । काया याचा चित्त दुजें नाहीं ४
॥ ९४६ ॥
स्वगोत्रींचा पुत्र परगोत्रीं अर्पिला । विभागा मुकला पितृधना ॥१॥
तैसें मजलागीं न धरावें दुरी । नव्हे परगोत्री पोटींचाचि ॥ २ ॥
सुतकासी त्याचे नाहीं प्रयोजन । जानिता ह्मणोनि तीन दिवस ॥ ३
तुका ह्मणे नाहीं ठावें हें कोणासीं । पुसावें वेदांसी देती ग्वाही ॥४॥
॥ ८४७ ॥
मागत्याची कोठें घडते निरास । लेंकरा उदास नाहीं होतें ॥ १ ॥
कासया मी होऊं उतावीळ जीवीं । जाणता गोसावी सर्व आहे २
झाला तरी वेळ कवतुकासाठीं । निर्दया तों पोटीं उपजेना ॥ ३ ॥
तुका ह्मणे त्यासी ठाउकें उचित । होईल संकेत नेमियेला ॥ ४ ॥
॥ ९४८ ॥
कां जी तुह्मी ऐसें नव्हा कृपावंत । निवे माझें चित्त ठायींच्या ठायीं १
कांहीं शम नये विषम अंतरा । शांतीचा तो बरा ऐसा योग ॥ २ ॥

दुःखी होतों पंचभूतांच्या विकारें । जडत्वें दातारें राखावीं तीं ॥३॥
तुका ह्मणे मोडा अहंकाराची मान । धरितों चरण ह्मणऊनि ॥ ४ ॥

॥ ९४९ ॥

येतील अंतरा शिष्टाचे अनुभव । तळमळी जीव तया सुखा ॥ १ ॥
आतां माझा जीव घेउनिया बळी । बैसवावें ओळी संतांचिये ॥२॥
विस्तारिली वाचा फळेंविण वेल । कोरडेचि बोल फोस वांझे ॥३॥
तुका ह्मणे आलों निर्वाणाच वरी । राहों नेदीं उरी नारायणा ॥४॥

॥ ९५० ॥

सांवळें सुंदर रूप मनोहर । राहों निरंतर हृदयीं माझे ॥ १ ॥
आणीक कांहीं इच्छा आह्मां नाहीं चाड । तुझें नाम गोड पांडुरंगे २
जन्मोजन्मीं ऐसें मागितलें तुज । आह्मांसी सहज द्यावें आतां ॥३॥
तुका ह्मणे तुज ऐसे दयाळ । धुंडितां सकळ नाहीं आम्हां ॥ ४ ॥

॥ ९५१ ॥

मोक्षाचें आह्मांशी नाहीं अवघड । तो असे उघड गांठोळीस ॥ १ ॥
भक्तीचे सोहळे होतील जीवासी । नवल तेविशीं पुरवितां ॥ २ ॥
ज्याचें त्यासी देणें कोण तें उचित । मानूनिया हित घेतों सुखें ॥३॥
तुका ह्मणे सुखें देई संवसार । आवडीसी थार करी माझे ॥ ४ ॥

॥ ९५२ ॥

पहा ते पांडव अखंड वनवासी । परि त्या देवाशी आठविती ॥१॥
प्रल्हादाशी पिता करितो जाचणी । परि तो स्मरे मनीं नारायण २
सुदामा ब्राह्मण दरिद्रें पीडिला । नाहीं विसरला पांडुरंगा ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझा न पडावा विसर । दुःखाचे डोंगर झाले तरी ॥४॥

॥ ९५३ ॥

नाहीं तुज कांहीं मागत संपत्ती । आठवण चित्तीं असो द्यावी ॥१॥
सरलिया भोग येईन शेवटीं । पायापें या भेटी अनुसंधानें ॥ २ ॥
आतां मजसाठीं याल आकारास । रोकडी हे आस नाहीं देवा ॥३॥
तुका ह्मणे मुखीं असो तुझें नाम । देईल तो श्रम देवो काळ ॥ ४ ॥

॥ ९५४ ॥

डगमगी मन निराशेच्या गुणें । हें तों नारायणें सांतवीजे ॥ १ ॥
धीरे तूं गंभीर जीवन जगाचें । जळो विभागाचे आत्रीतत्या ॥ २ ॥
भेईल जीव हें देखोनि कठिण । केला जातो सीण तो तो वाया ॥ ३ ॥
तुका ह्मणे आवश्यक हें वचन । पाळावेंचि दान समयो आहे ॥ ४ ॥

॥ ९५५ ॥

इच्छेपाशीं आलों फिरोनि मागुता । स्वामीसेवकता आवडीचे ॥१॥
द्यावें लवकरी मागितलें दान । मुळींचें जतन करूनि असें ॥ २ ॥

उपाय हे करीं एकाचि वचना । दावूनिया खुणा ठाया येतों ॥ ३ ॥
तुका ह्मणे गांठी किती तुज पाशीं । जगाच्या तोंडिसी चिंतनानें ४

॥ ९५६ ॥

काय करूं मज नागविलें आळसें । बहुत या सोसें पीडा केली ॥१॥
हिरोनिया नेला मुखींचा उच्चार । पडिलें अंतर जवळीच ॥ २ ॥
द्वैताचिया कैसा सांपडलों हातीं । बहुत करती ओढाओढी ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां आपुलिया सवें । न्यावें मज देवें सोडवूनि ॥४॥

॥ ९५७ ॥

लडिंवाळ म्हणोनी निष्ठुर न बोला । परी सांभाळिला लागे घात॥१॥
बहु वागवीत आणिलें दुरूनि । दासांची पोसनी बहु आहे ॥२॥
नाहीं लागों दिला आघाताचा वारा । निष्ठुर उत्तरा कोमेजतो ॥३॥
तुका ह्मणे तुह्मी कृपावंत हरि । शांतवा उत्तरीं अमृताच्या ॥ ४ ॥

॥ ९५८ ॥

जेणें माझें चित्त राहे तुझ्या पायीं । अखंड तें देई प्रेमसुख ॥ १ ॥
देहभाव राख दीन करूनिया । जनाचारीं वाया जाय तैसा ॥ २ ॥
द्रव्य दारा नको मानाची आवडी । कवणेविशीं गोडी प्रपंचाची ३
तुझें नाम माझें धरूनिया चित्त । एकांत लोकांत सदा राहो ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुझे जडोनिया पायीं । झालों उतराई पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ ९५९ ॥

माझे हातीं आहे करावें चिंतन । तुह्मी कृपादान प्रेम द्यावें ॥ १ ॥
मागतिया भांडवल आळवण । नामाची जतन दातियासी ॥ २ ॥
बाळक धांवोनि आड रिघे स्तनीं । घालावा जननी कृपे पान्हा ॥३॥
तुका म्हणे करी कासवीचे परी । आहे सूत्रदोरी तुझे हातीं ॥ ४ ॥

॥ ९६० ॥

पाप ताप माझे गुणदोष निवारीं । कृष्णा विष्णु हरी नारायणा ॥१॥
काम क्रोध वैरी घालोनी बाहेरी । तूं राहे अंतरीं पांडुरंगा ॥ २ ॥
करिशील तरी नव्हे काई एक । निर्मिलें त्रैलोक्य हेळमात्रें ॥ ३ ॥
समर्थासी काय आम्हीं शिकवावें । तुका म्हणे यावें पांडुरंगा, ॥४॥

॥ ९६१ ॥

बहुजन्मा शेवटीं स्वामी तुझी भेटी । बहु मोह पोटीं थोर झाला १
बहु पुरें पाहिलीं बहु दिशा शोधिली । बहु चिंता वाहिली कुंभराची ४
बहु काळ गेले अनुचित केलें । बहु नाहीं गाइलें नाम तुझें ॥ ३ ॥
ऐसा मी अपराधी अगा कृपानिधि । बहु संतां संनिधि ठेवी तुका ४

॥ ९६२ ॥

पक्षीयांचे घरीं नाहीं सामुगरी । त्यांची चिंता करी नारायण ॥ १ ॥
अजगर जनावर वारुळांत राहे । त्याजकडे पाहे पांडुरंग ॥ २ ॥

चातक हा पक्षी नेघे भूमिजळ । त्यासाठीं घननीळ नित्य वर्षे ॥३॥
तुका ह्मणे आम्ही पिप्पलिकांची जात । पुरवी मनोरथ पांडुरंगा ४

॥ ९६३ ॥

नको विद्या वयसा आयुष्य फारसें । नाहीं मज पिसें मुक्तीचेंही १॥
रामकृष्ण ह्मणतां जावो माझा प्राण । हेंचि कृपादान मागतसें ॥ २ ॥
नको धन मान न वाढो संतान । मुखीं नारायण प्राण जावा ॥ ३ ॥
तुका ह्मणे दीन काकुलती येतो । तुज निरवितों पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ९६४ ॥

कोरडिया गोष्टी नावडती मना । नाहीं ब्रह्मज्ञानाविण चाड ॥ १ ॥
दाखवी आपुलें सगुण रूपडें । वंदीन मी कोडें पाय तुझे ॥ २ ॥
नलगे तो मोक्ष मज सायुज्यता । नावडे हे वार्ता शून्याकारी ॥३॥
तुका ह्मणे चाड धरीन श्रीमुखें । येशील कवतुकें जवळीक ॥ ४ ॥

॥ ९६५ ॥

समर्थ या नांवें दिनांचा कृपाळ । हें तंव सकळ स्वामीअंगीं ॥ १ ॥
मज काय लागे करणें विनवणी । विदित चरणीं सकळ आहे ॥२॥
दयासिंधु तुम्हां भांडवल दया । सिंचावें आतां या कृपापीयूषें ३॥
तुका ह्मणे अवो पंढरीनिवासे । बहु जीव आसे लागलासे ॥ ४ ॥

॥ ९६६ ॥

राम कृष्ण गोविंद नारायण हरी । केशवा मुरारी पांडुरंगा ॥ १ ॥
लक्ष्मीनिवासा पाहे दीनबंधु । तुझा लागो छंदु सदा मज ॥ २ ॥
तुझे नामीं प्रेम देईं अखंडित । नेणें तप व्रत दान कांहीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझें हेंचि गा मागणें । अखंडही गाणें नाम तुझें ॥ ४ ॥

॥ ९६७ ॥

अमृताचीं फळें अमृताची वेली । तेचि पुढें चाली बीजाचीही ॥१॥
ऐसियांचा संग देईं नारायणा । बोलावा वचना जयाचिया ॥ २ ॥
उत्तम सेवन सितळ कंठासी । पुष्टी कांती तैसी दिसे वरी ॥ ३ ॥
तुका ह्मणे तैसें होइजेत संगें । वास लागे अंगें चंदनाच्या ॥ ४ ॥

॥ ९६८ ॥

नर नारी बाळें अवघा नारायण । ऐसें माझें मन करी देवा ॥ १ ॥
न यो काम क्रोध द्वेष निंदा द्वंद्व । अवघा गोविंद निःसंदेह ॥ २ ॥
असावें म्यां सदा विषयीं विरक्त । काया वाचा चित्त तुझे पायीं ३
करोनिया साह्य पुरवी मनोरथ । व्हावे कृपावंत तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ९६९ ॥

ऐसें सत्य माझ्या येईल अंतरा । तरि मज करा कृपा देवा ॥ १ ॥
वचनांसारिखें तळमळी चित्त । बाहेरि तो आंत होइल भाव ॥ २ ॥

तरि मज ठाव द्यावा पायांपाशीं । सत्यत्वें जाणशी दास खरा ॥३॥
तुका ह्मणे सत्य निकट सेवकें । तरिच भातुकें प्रेम द्यावें ॥ ४ ॥

॥ ९७० ॥

ऋणाच्या परिहारा झालों वोळगणा । द्यावी नारायणा वासलाती १
झालों उतराई शरीरसंकल्पें । चुको द्यावीं पापें सकळही ॥ २ ॥
आजिवरी होतों धरूनि जिवासी । व्याजें कासाविसी बहुत केलें ३
तुका ह्मणे मना आणिला म्यां भाव । तुमचा तेथें ठाव आहे देवा ॥४॥

॥ ९७१ ॥

आवडी न पुरे सेवितां न सरे । पडियेली धुरेसवें गांठी ॥ १ ॥
न पुरे हा जन्म हें सुख सांठितां । पुढतीही आतां हेंचि मागों ॥२॥
मारगाचि चिंता पालखी बैसतां । नाहीं उसंतिता कोसपेणी ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझी विठ्ठल माउली । जाणे ते लागली भूक तान ॥४॥

॥ ९७२ ॥

सेवीन उच्छिष्ट लोळेन अंगणीं । वैष्णवा चरणीं होईन जोडा ॥१॥
ऐसें जन्म आतां मज देई देवा । आवडी हे जीवा सर्व काळ ॥२॥
त्यांचे चरणरज येती अंगावरी । वंदीत ते शिरीं जाइन मागें ॥३॥
तुका ह्मणे येथें राहिलासे भाव । सकळही वाव जाणोनिया ॥४॥

॥ ९७३ ॥

नावडावें जन नावडावा मान । करूनि प्रमाण तूंचि होई ॥ १ ॥
सोडवूनि देहसंबंध व्यसनें । ऐसी नारायणें कृपा कीजे ॥ २ ॥
नाठडावें रूप नावडावे रस । अवघी राहो आस पायांपाशीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां आपुलिया सत्ता । करूनि अनंता टेवा ऐसें ॥४॥

॥ ९७४ ॥

आतां काढाकाढी करी गा पंढरीराया । नाहीं तरी वाया गेलों दास१
जाणतां बैसलों दगडाचे नांवें । तिचा तो स्वभाव प्राण घ्यावा ॥२॥
मनाचा संकल्प इंद्रियांची ओढी । पतनाची जोडी वरी हांव ॥३॥
तुका म्हणे झाली अंधळ्याची परी । आतां मज हरी वाट दावी ४॥

॥ ९७५ ॥

लाज वाटे पुढें तोंड दाखवितां । परि जाऊं आतां कोणापाशीं ।१॥
चुकलिया काम मागतों मुरारा । लाज फजितखोरा नाहीं मज॥२॥
पाय सोडुनिया फिरतों बासर । स्वामिसेवे चोर होऊनिया ॥ ३ ॥
तुका म्हणे मज पाहिजे दंडिलें । पुढें हें घडलें न पाहिजे ॥ ४ ॥

॥ ९७६ ॥

आह्मां वैष्णवांचा कुळधर्म कुळींचा । विश्वास नामाचा एका भावें १
तरीच हरिचे दास म्हणवितां श्लाघीजे । निर्वासना कीजे चित्त आधीं

गाऊं नाचूं प्रेमें आनंदें कीर्तनीं । भुक्ति मुक्ति दोन्ही न मागों तुज३
तुका म्हणे देवा ऐसीयांची सेवा । द्यावी जी केशवा जन्मोजन्मीं ४

॥ ९७७ ॥

मातेची अवस्था काय जाणे बाळ । तिसी तो सकळ चिंता त्याची१
ऐसा परस्परें आहे हा विचार । भोपळ्याचा तारा दगडासी ॥ २ ॥
भुजंग पोटाळी चंदनाचें अंग । जिवे परि संग नव्हे तैसा ॥ ३ ॥
तुका ह्मणे करी परिसाचे परी । मज ठेवा सरी लोखंडाचे ॥ ४ ॥

॥ ९७८ ॥

किती तुजपाशीं देऊं परिहार । जाणसी अंतर पांडुरंगा ॥ १ ॥
आतां माझे हातीं देई माझे हित । करी माझें चित्त समाधान ॥२॥
राग आला तरी कापूं नये मान । बाळा मायेविण कोण दुजे ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसा होईल लौकिक । मागे बाळ भीक समर्थाचें ॥४॥

॥ ९७९ ॥

पोट धालें मग नलगे परती । झालिया निश्चिती खेळ गोड ॥ १ ॥
आपुलिया हातें देई वो कवळ । विठ्ठल शीतळ जीवनवरी ॥ २ ॥
घराचा विसर होईल आनंद । नाचेन मी छंदें प्रेमाचिया ॥ ३ ॥
तुका ह्मणे तोंच वरी करकर । मग हें उत्तर खंडईल ॥ ४ ॥

॥ ९८० ॥

सारीन तें आतां एकाचि भोजनें । वारीन मागणें वेळोवेळां ॥ १ ॥
सेवटींचा घास गोड करी माते । अगे कृपावंते पांडुरंगे ॥ २ ॥
वंचूं नये आतां कांहींच प्रकार । धाकल्याचें थोर झाल्यावरी ॥३॥
तुका ह्मणे आतां बहु चाळवावें । कांहीं नेदी ठावें उरो मागें ॥ ४ ॥

॥ ९८१ ॥

नाहीं तुम्हां कांहीं लाविलें मागणें । कांटाळयाच्या भेणें त्रासलेती१
एखादिये परी टाळावी करकर । हा नका विचार देखो कांहीं ॥२॥
पायाच्या वियोगें प्राणासवसाटी । नेघेवेसी तुटी झाली आतां ॥३॥
तुका ह्मणे तुम्हां मागणें तें आतां । हेंचि कृपावंता चरणीं वास॥४॥

॥ ९८२ ॥

तुझें नाम माझे मुखीं असो देवा । विनावितो राघवा दास तुझा ॥१॥
तुझ्या नामबळें तरले पतित । म्हणोनि माझें चित्त तुझे पायीं ॥२॥
तुका ह्मणे तुझें नाम हें सादर । गातां निरंतर सुख वाटे ॥ ३ ॥

॥ ९८३ ॥

नको देऊं देवा पोटीं हें संतान । मायाजाळें जाण नाठवसी ॥ १ ॥
नको देऊं देवा द्रव्य आणि भाग्य । तो एक उद्वेग होय जीवा ॥२॥
तुका ह्मणे करी फकिराचे परी । रात्रंदिवस हरि येईल वाचे ॥३॥

॥ ९८४ ॥

नको मज ताठा नको अभिमान । तुजवांचूनि क्षीण होतो जीव ॥१॥

दुर्धर हे माया न होय सुटका । वैकुंठनायका सोडवी मज ॥ २ ॥
तुका ह्मणे तुझें झालिया दर्शन । मग निवारण होईल सर्व ॥ ३ ॥

॥ ९८५ ॥

हरी तुझें नाम गाईन अखंड । याविण पाखंड नेणें कांहीं ॥ १ ॥
अंतरीं विश्वास अखंड नामाचा । कायामनेंवाचा देईं हेंचि ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां देईं संतसंग । तुझे नामीं रंग भरो मना ॥ ३ ॥

॥ ९८६ ॥

आतां तरी मज सांगा साच भावें । काय म्यां करावें ऐसें देवा॥१॥
चुकावया कर्म नव्हतें कारण । केला होय सीण अवघाचि ॥२॥
तुका ह्मणे नको पाहूं निरवाण । देईं कृपादान याचकासी ॥ ३ ॥

॥ ९८७ ॥

मागणें तें एक तुजप्रति आहे । देशी तरि पाहे पांडुरंगा ॥ १ ॥
या संतासी निरवीं हेंचि मज देईं । आणिक दुजें कांहीं न मागें तुज २
तुका ह्मणे आतां उदार तूं होईं । मज ठेवी पायीं संतांचिया ॥ ३ ॥

॥ ९८८ ॥

कासयासी व्यर्थ घातलें संसारीं । होतें तैसें जरी तुझें चित्तीं ॥१॥
तुझिये भेटीची थोर असे आस । दिसोनी निरास आली मज ॥२॥
आतां काय जिणें झालें निरर्थक । वैकुंठनायक भेटेचि ना ॥ ३ ॥
आडलासी काय कृपेच्या सागरा । रखुमादेवीवरा सोइरिया ॥४॥
तुका ह्मणे देईं चरणाची सेवा । नुपेक्षी केशवा मायबापा ॥५॥

॥ ९८९ ॥

हेंचि सुख पुढें मागतों आगळें । आनंदाचीं फळें सेवादान ॥ १ ॥
जन्मजन्मांतरीं तुझाचि अंकिला । करूनि विठ्ठला दास ठेवीं ॥ २ ॥
दुजा भाव आड येऊं नेदीं चित्ता । करावा अनंता नाश त्याचा ३॥
अभय देऊनि करावें सादर । क्षण तो विसर पडो नेदीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे आम्ही जे जे इच्छा करूं । ते ते कल्पतरू पुरविसी ॥५॥

॥ ९९० ॥

एकांतीचें सुख देईं मज देवा । आघात या जिवा चुकवूनि ॥ १ ॥
ध्यानीं रूप वाचे नाम निरंतर । आपुला विसर पडो नेदीं ॥ २ ॥
मायबाळा भेटी सुखाची आवडी । तैशी मज गोडी देईं देवा ३ ॥
कीर्ति ऐकोनिया झालों शरणांगत । दासाचें तूं हित करितोसी ४॥
तुका ह्मणे मी तो दीन पापराशी । घालावें पाठीशीं मायबापा ५ ॥

॥ ९९१ ॥

आतां तुज मज नाहीं दुजेपण । दाखवी चरण पांडुरंगा ॥ १ ॥
तुज रूप रेखा नाम गुण नाहीं । एक स्थान पाही गांव सिंव ॥२॥
नावडे संगती तुज दुजयाची। आपुल्या भक्तांची प्रीति तुम्हां ॥३॥

परि आम्हांसाठीं होसील सगुण । स्तंभासी फोडून जयापरि ॥४॥
तुका ह्मणे तैसें तुज काय उणें। देई दर्शन चरणांचें ॥ ५ ॥

॥ ९९२ ॥

येणें मुखें तुझे वर्णी गुण नाम । तेंचि मज प्रेम देई देवा ॥ १ ॥
डोळे भरूनिया पाहें तुझें मुख । तेंचि मज सुख देई देवा ॥ २ ॥
कान भरोनिया ऐके तुझी कीर्ति । ते मज विश्रांती देई देवा ॥ ३ ॥
वाहें रंगीं टाळी नाचेन उदास। हें देई हातांस पायां बळ ॥ ४ ॥
तुका ह्मणे माझा सकळ देहभाव । आणीक नको ठाव चिंतू यासी५

॥ ९९३ ॥

पांडुरंगा कांहीं आइकावी मात । न करावें मुक्त आतां मज ॥ १ ॥
जन्मांतरें मज ऐशीं देई देवा । जेणें चरणसेवा घडे तुझी ॥ २ ॥
वाखाणीन कीर्ति आपुलिया मुखें । नाचेन मी सुखें तुजपुढें ॥ ३ ॥
करुनिकामारी दास दीनाहुनी । आपुला अंगणीं ठाव मज ॥ ४ ॥
तुका ह्मणे आह्मी मृत्युलोकीं भले । तुझेचि अंकिले पांडुरंगा ॥५॥

॥ ९९४ ॥

त्राहे त्राहे त्राहे सोडवी अनंता । लागो दे ममता तुझे पायीं ॥१॥
एकचि मागणें देई तुझी गोडी । नलगे आवडी आणिकाची ॥ २ ॥
तुझें नाम गुण वर्णीन पवाडे । आवडीच्या कोडें नाचों रंगीं ॥ ३ ॥
बापा विठ्ठलराया हेंचि देई दान । जोडती चरण जेणें तुझे ॥ ४ ॥
आवडीसारिखें मागितलें जरी । तुका ह्मणे करी समाधान ॥ ५ ॥

॥ ९९५ ॥

अभयदान मज देई गा उदारा । कृपेच्या सागरा पांडुरंगा ॥ १ ॥
देहभाव तुझ्या ठेवियेला पायीं ॥ आणीक मी कांहीं नेणें दुजें ॥२॥
सेवा भक्ति भाव नेणें मी पातित । आतां माझें हित तुझ्या पायीं ३
अवघा निरोपिला तुज देहभाव । आतां मज पाव पांडुरंगा ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुझें नाम दिनानाथ । तें मज उचित करी आतां ॥ ५ ॥

॥ ९९६ ॥

पापाची वासना नको दावूं डोळां । त्याहूनि अंधळा बराच मी १ ॥
निंदेचें श्रवण नको माझे कानीं । बधिर करोनी ठेवी देवा ॥ २ ॥
अपवित्र वाणी नको माझ्या मुखा । त्याजहुनि मुका बराच मी ३
नको मज कधीं परस्त्रीसंगति । जनांतून माती उठतां भली ॥ ४ ॥
तुका ह्मणे मज अवघ्याचा कांटाळा । तूं एक गोपाळ आवडसी ५॥

॥ ९९७ ॥

माय बाप बंधु सोयरा सांगाती । तूंचि माझी प्रीति गण गोत ॥१॥
शरण आलीं त्यांचीं वारिलीं दुरितें । तारिले पतित असंख्यात २॥

इतर कोण जाणे पावले विश्रांति । न येतां तुजप्रति शरणागत ३ ॥
तयामध्यें मज ठेवीं नारायणा । लक्ष्मीरमणा सोइरिया ॥ ४ ॥
तुका ह्मणे देई दर्शनाचा लाभ । जे पाय दुर्लभ ब्रह्मादिका ॥ ५ ॥

॥ ९९८ ॥

काय देह घालूं करवती कर्मरी । ठाकूं भितरी अग्नीमाजी ॥ १ ॥
काय सेवूं वन शीत ऊष्ण तान । साहों कीं मोहन धरुनी बैसें ॥ २ ॥
काय लावूं अंगीं भस्म उधळण । हिंडूं देश कोण खुट चारी ॥ ३ ॥
काय त्यजूं अन्न करूनि उपास । काय करूं नास जीवित्वाचा ४ ॥
तुका म्हणे काय करावा उपाव । ऐसा देई भाव पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ ९९९ ॥

आमुची कृपाळु तूं होशी माउली । विठ्ठले साउली शरणागता १॥
प्रेमपान्हा स्तनीं सदा सर्वकाळ । दृष्टि हे निर्मळ अमृताची ॥ २ ॥
भूक तान दुःख वाटों नेदी सीण । अंतरींचा गुण जाणोनिया ३ ॥
आशा तृष्णा माया चिंता दवडी दुरी । ठाव आम्हा करी खेळावया ४
तुका म्हणे लावी संताचा सांगात । तेथें पवे हात कळिकाळाचा ५॥

॥ १००० ॥

मानावया जग व्हावी द्रव्यमाया । नाहीं हे माझिया जीवा चाड १॥
तुझ्या पायांसाटीं केली आराणूक । आतां कांहीं एक नको दुजें २ ॥
करूनिया कृपा करी अंगिकार । न लावी उशीर आतां देवा ॥ ३ ॥
नव्हे साच कांहीं कळों आलें मना । म्हणोनि वासना आवरिली ४॥
तुका म्हणे आतां मनोरथ सिद्धी । माझे कृपानिधी पाववावे ॥ ५ ॥

॥ १००१ ॥

तरि कां नेणते होते मागें ऋषि । तींहीं या जनासी दुराविलें ॥१॥
बोळगती जया अष्ट महासिद्धी । ते या जनबुद्धी नातळती ॥ २ ॥
कंदमुळें पाला धातूच्या पोषणा । खातील वास राना तरीं केला ३
लावुनिया नेत्र उगेचि बैसले । न बोलत ठेले मौन्यमुद्रे ॥ ४ ॥
तुका ह्मणे ऐसें करी माझ्या चित्ता । दुरावी अनंता जन दुरी ५ ॥

॥ १००२ ॥

नलगे देवा तुझें आम्हांसी वैकुंठ । सायुज्याचा पट नलगे मज १ ॥
देई तुझें नाम मज सर्वकाळीं । मागणें वनमाळी हेंचि तुज ॥ २ ॥
नारद तुंबर उद्धव प्रल्हाद । बळी रुक्मांगद नाम ध्याती ॥ ३ ॥
सिद्ध मुनिगण गंधर्व किन्नर । करिताती गजर रामनामें ॥ ४ ॥
तुका ह्मणे हरी देई तुझें नाम । अखंडित प्रेम हेंचि द्यावें ॥ ५ ॥

॥ १००३ ॥

विश्वास धरूनि राहिलों निवांत । ठेवूनिया चित्त तुझे पायीं ॥१॥
तरावें बुडावें तुझिया वचनें । निर्धार हा मनें केला माझ्या ॥ २ ॥

न कळे हें मज साच चाळविलें । देसी तें उगलें घेइन देवा ॥३॥
मागणें तें सरे ऐसें करी देवा । नाहीं तरी सेवा सांगा पुढें ॥ ४ ॥
करावें कांहीं कीं पाहावें उगलें । तुका ह्मणे बोले पांडुरंगा ॥ ५ ॥
॥ १००४ ॥

कृपाळु ह्मणोनि बोलती पुराणें । निर्धार वचनें यांचीं मज ॥ १ ॥
आणीक उपाय नेणेंचि मी कांहीं । तुझें वर्म ठायीं पडे तैसें ॥ २ ॥
नये धड कांहीं बोलतां वचन । रिघालों शरण सर्वभावें ॥ ३ ॥
कृपा करिसी तरी थोडें तुज काम । माझा तरि श्रम बहु हरे ॥४॥
तुका ह्मणे मज दाखवी श्रीमुख । हरेल या भूक डोळियांची ॥५॥
॥ १००५ ॥

भावबळें कैसा झालासी लहान । मागें संतीं ध्यान वर्णियेलें ॥१॥
तें मज उचित करूनिया देवा । दाखवी केशवा मायबापा ॥ २ ॥
पाहोनिया डोळां बोलेन मी गोष्टी । आलिंगूनि मिठी देइन पायीं ३
चरणीं दृष्टि उभा राहेन समोर । जोडोनिया कर पुढें दोन्ही ॥ ४ ॥
तुका ह्मणे उत्कंठित हे वासना । पुरवी नारायणा आर्त माझें ॥ ५ ॥
॥ १००६ ॥

आत्मस्थिति मज नको हा विचार । देई निरंतर चरणसेवा ॥१॥
जन्मोजन्मीं तुझा दास पुरुषोत्तमा । होचि गोडी माझ्या देई जीवा२
काय सायुज्यता मुक्ति होचि गोड । देव भक्त कोड तेथें नाहीं ३॥
काय तें निर्गुण पाहों कैशा परी । वर्णूं तुझी हरी कीर्ती कैशी ४ ॥
गोड चरणसेवा देवभक्तपणें । मज देवा झणें दुराविसी ॥ ५ ॥
जाणिवेपासूनि सोडवी माझ्या जीवा । देई चरणसेवा निरंतर ६॥
तुका म्हणे गोडा गोड नलगे प्रीति । सेवेविण चित्तीं सार नाहीं ७॥
॥ १००७ ॥

कुळींचें दैवत ज्याचें पंढरीनाथ । होईन दासीसुत त्याचे घरीं ॥१॥
शुद्ध यातिकुळवर्मा चाड नाहीं । करी भलते ठायीं दास तुझा २॥
पंढरीशी कोणी जाती वारकरी । होईन त्याचे घरीं पशुयाति ३ ॥
विठ्ठलचिंतन दिवसरात्रीं ध्यान । होईन पायातन त्याचे पायीं ४ ॥
तुळसीवृंदावन जयाचे अंगणीं । होईन केरसुणी त्याचे घरीं ॥ ५ ॥
तुका ह्मणे हाचि भाव माझ्या चित्तीं । नाहीं आणिका गति चाड मज६
॥ १००८ ॥

पढियंतें आम्हीं तुजपाशीं मागावें । जीवींचें सांगावें हितगुज ॥१॥
पाळशील लळे दीन वो वत्सले । विठ्ठले कृपाळे जननिये ॥ २ ॥
जीव भाव तुझ्या ठेवियेला पायीं । तूंचि सर्वां ठायीं एक आह्मां ३॥
दुजियाचा संग लागो नेदी वारा । नाहीं जात घरा आणिकांच्या ४

सर्व सत्ता एकी आहे तुजपाशीं । ठावें आहे देसी मागेन तें ॥ ५ ॥
ह्मणऊनि पुढें मांडियेली आळी । थिंकोनिया चोळी डोळे तुका ६ ॥

॥ १००९ ॥

अगा करुणाकरा करितसें धांवा । या मज सोडवा लवकरी ॥ १ ॥
ऐकोनिया माझीं करूणेचीं वचनें । व्हावें नारायणे उतावीळ ॥२॥
मागें पुढें अवघा दिसे रिता ठाव । ठेवूनि पायीं भाव वाट पाहें ३
उशीर तो आतां न पाहिजे केला । अहोजी विठ्ठला मायबापा ॥४॥
उरलें तें एक हेंचि मज आतां । अवघें विचारितां शून्य झालें ॥ ५ ॥
तुका ह्मणे आतां करी कृपा दान । पाउलें समान दावी डोळां ॥ ६ ॥

॥ १०१० ॥

मागता भिकारी झालों तुझे द्वारीं । देई मज हरी कृपादान ॥ १ ॥
प्रेम प्रीति नाम उचित करावें । भावें संचारावें हृदयामाजी ॥ २ ॥
सर्वभावें शरण आलों पांडुरंगा । कृपाळु तूं जगामाजी एक ॥ ३ ॥
तापत्रयें माझी तापविली काया । शीतळ व्हावया पाय तुझे ॥ ४ ॥
संबंधीं जनवाद पीडिलों परोपरी । अंतरलों दुरी तुजसी तेणें ॥ ५ ॥
तुका ह्मणे आतां तुझा शरणागत । करावें सनाथ मायबापा ॥ ६ ॥

॥ १०११ ॥

न ह्मणे कवणा सिद्ध साधक गव्हार । अवघा विश्वंभर वांचूनिया १
ऐसें माझे बुद्धि काया वाचा मन । लावी तुझें ध्यान पांडुरंगा ॥२॥
गातां प्रेमगुण शंका माझ्या मनीं । नाचतां रंगणीं नाठवावी ॥ ३ ॥
देई चरणसेवा भूतांचें भजन । वर्णां अभिमान सांडवूनि ॥ ४ ॥
आशापाश माझी तोडी माया चिंता । तुजविण व्यथा नको कांहीं ५
तुका ह्मणे सर्व भाव तुझे पायीं । राहे ऐसें देई प्रेम देवा ॥ ६ ॥

॥ १०१२ ॥

आतां केशीराजा हेचि विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥
देह असो माझा भलतिये ठायीं । चित्त तुझ्या पायीं असों द्यावें २॥
काळाचें खंडन घडावें चिंतन । धनामानजनविन्मुख तो ॥ ३ ॥
कफवातपित्त देहअवसानीं । ठेवावीं वारूनि दुरितें हीं ॥ ४ ॥
सावध तों माझीं इंद्रियें सकळें । दिली एक वेळे हाक आधीं ५॥
तुका ह्मणे तूं या सकळांचा जनिता । येथें ऐकता सकळांसी ॥६॥

॥ १०१३ ॥

देवा आतां ऐसा करी उपकार । देहाचा विसर पाडी मज ॥ १ ॥
तरीच हा जीव सुख पावे माझा । बरें केशीराजा कळों आलें २॥
ठाव देई चित्ता राखे पायांपाशीं । सकळ वृत्तींसी अखंडित ॥३॥
आस भय चिंता लाज काम क्रोध । तोडावा संबंध यांचा माझा ४

मागणें तें एक हेंचि आहे आतां । नाम मुखीं संतसंग देई ॥ ५ ॥
तुका ह्मणे नको वरपंग देवा । घ्यावी माझी सेवा भावशुद्ध ॥ ६ ॥

॥ १०१४ ॥

आला भागासी तो करी व्यवसाव । परि राहो भाव तुझ्या पायीं १
काय चाले तुम्हीं बांधलें दातारा । वाहिलिया भारा उसंतितों ॥२॥
शरीर तें करी शरीराचे धर्म । नको देऊं वर्म चुकों मना ॥ ३ ॥
चळण फिरवी ठाव बहुवस । न घडो आळस चिंतनाचा ॥ ४ ॥
इंद्रियें करोत आपुले व्यापार । आवडीसी थार देई पायीं ॥ ५ ॥
तुका ह्मणे नको देऊं काळा हातीं । येतों काकुलती ह्मणऊनि ॥६॥

॥ १०१५ ॥

चाल घरा उभा राहे नारायणा । ठेवूं दे चरणावरि माथा ॥ १ ॥
वेळोवेळां देई क्षेम आलिंगन । वरी अवलोकन कृपादृष्टी ॥ २ ॥
प्रक्षाळूं दे पाय बैसे माजघरीं । चित्त स्थिर करी पांडुरंगा ॥ ३ ॥
आहे त्या संचितें करवीन भोजन । काय न जेवून करिसी आतां ४
करुणाकरें नाहीं कळों दिलें वर्म । दुरी होतां भ्रम कोण वारी ५॥
तुका ह्मणे आतां आवडीच्या सत्ता । बोलिलों अनंता करवीन तें ६॥

॥ १०१६ ॥

नरस्तुति आणि कथेचा विकरा । हें नको दातारा घडों देऊं ॥ १ ॥
येसिये कृपेची भाकितों करुणा । आहेसि तूं राणा उदाराचा ॥२॥
पराविया नारी आणि परधना । नको देऊं मनावरी येऊं ॥ ३ ॥
भूतांचा मत्सर आणि संतनिंदा । हें नको गोविंदा घडों देऊं ॥४॥
देहअभिमान नको देऊं शरीरीं । चढों कांहीं परी एक देऊं ॥ ५ ॥
तुका ह्मणे तुझ्या पायांचा विसर । नको वारंवार पडों देऊं ॥ ६ ॥

॥ १०१७ ॥

तुझें नाम मुखीं न घेतां आवडी । जिव्हा तेचि घडी झडो माझी १॥
हें मज देई हें मज देई । आणिक दुजे कांहीं न मगे तुज ॥ २ ॥
बहिर कान तुझी कीर्ति नाइकतां । पाय न देखतां जात डोळे ॥३॥
मना तुझें ध्यान नाहीं नित्य काळ । धिग तें चांडाळ जळो जळो ४॥
हातपाय तेणें पंथें न चालतां । जावोत अनंता गळोनिया ॥ ५ ॥
तुजविण जिणें नाहीं मज चाड । तुका ह्मणे गोड नाम तुझें ॥ ६ ॥

॥ १०१८ ॥

अखंड जया तुझी प्रीति । मज दे तयांचि संगति । मग मी कमळापति । तुज नाणी कांटाळा ॥१॥ पडून राहेन तये ठायीं । उगाचि संतांचिये पायीं । न मगे नेघे कांहीं । तुझी आणगा विठोबा ॥२॥

तुम्ही आम्ही पीडों जेनें । दोन्ही वारती एकानें । बैसलों धरणें । हाका देत दाराशीं ॥३॥ तुका ह्मणे या बोला । चित्त द्यावें बा विठ्ठला । न पाहिजे केला । अवघा माझा आव्हेर ॥ ४ ॥

॥ १०१९ ॥

तुझ्या रूपें माझी काया । भरों द्यावी पंढरीराया । दर्पणींची छाया एका रूपें भिन्नत्व ॥१॥ सुख पडिलें साठवण । सत्ता वेचे शनैः शनै । आडचणींचे कोन । चारी मार्ग उगवलें ॥२॥ वसो डोळ्यांची बाहुली । कवळें भिन्न छाया आली कृष्णांजनें चाली । नव्हे परती माघारी ॥३॥ जीव ठसावला शिवें । मना आलें तेथें जावें । फांटा पडिला नांवें । तुका ह्मणे खंडलें ॥ ४ ॥

॥ १०२० ॥

होईन खडे गोटे चरण रज साने मोटे । पंढरीचे वाटे संतचरणीं लागेन ॥ १ ॥ आणीक काय दुजें म्यां मागणें तुजपाशीं । अविट तें सुख भय नास नाहीं ज्यासी ॥२॥ होईन मोच्रे वाहणा पायीं सकळां संतजनां । मांजर सुकर सुणा जवळी शेष घ्यावया ३ सांडोवा पायरी वाहळ बावी गंगातिरीं । होईन तयावरी संतसज्जन चालती ॥ ४ ॥ लागें संता पायीं ऐसा ठेवी भलते ठायीं । तुका ह्मणे देई धाक नाहीं जन्माचा ॥ ५ ॥

॥ १०२१ ॥

उद्धवअक्रूराशी । आणीक व्यासआंबऋषी । रुक्मांगदप्रल्हादाशीं । दाविलें तें दाखवी ॥ १ ॥ तरि मी पाहेन पाहेन । तुझे श्रीमुखचरण । उताविळ मन । तयाकारणें तेथें ॥ २ ॥ जनकश्रुत देवा करीं । कैसा शोभलासी हरी । विदुराच्या घरीं । कण्या धरी कवतुकें ॥ ३ ॥ पांडवा अकांतीं । तेथें पावसी स्मरती । घातलें द्रौपदी । लागीं बिरडें चोळीचें ॥ ४ ॥ करी गोपीचें कवतुक । गाईगोपाळांसी सुख । दावी तेंचि मुख । दृष्टी माझ्या आपुलें ॥५॥ तरि तूं अनाथाचा दाता । मागतिया शरणागता । तुका ह्मणे आतां । कोड पुरवी हें माझें ॥ ६ ॥

॥ १०२२ ॥

हेंचि माझे चित्तीं । राहो भाव प्रीति । विठ्ठल सुषुप्तीं । जागृति स्वप्नीं ॥१॥ आणिक नाहीं तुज मागणें । राज्यचाड संपत्ति धन । जिव्हे सुख तेणें । घेतां देहीं नाम तुझें ॥ २ ॥ तुझें रूप सर्वांठायीं । देखें ऐसें प्रेम देई । ठेवावा हा पायीं । अनुभव चित्ताचा ॥ ३ ॥ जन्ममरणाचा बाध । समूळनि तुटे कंद । लागो हाचि छंद । हरि गोविंद वाचेसी ॥ ४ ॥ काया पालटे दरुषणें । अवघें कोंदाटे

चैतन्य । जीवशिवा खंडण । होय तरे चिंतिता ॥ ५ ॥ तुका ह्मणे याचि भावें । आह्मी घालों तुझ्या नांवें । सुखें होत जन्में । भलते याती भलतैशीं ॥ ६ ॥

॥ १०२३ ॥

जळो माझी ऐसी बुद्धी । मज घाली तुजमधीं । आवडी हे विधि । निषेधींची चांगली ॥ १ ॥ तूं स्वामी मी सेवक । उंच पद निंच एक । ऐसें करावें कौतुक । नको करूं खंडणा ॥ २ ॥ जळ न खाती जळा । वृक्ष आपुलिया फळा । भोक्ता निराळा । तेणें गोडी निवडिली ॥ ३ ॥ हिरा शोभला कोंदणें । अळंकारीं मिरवे सोंनें । एक असतां तेणें । काय दुजें जाणावें ॥ ४ ॥ उष्णें छाये सुख वाटे । बाळें माते पान्हा फुटे । एका एक भेटे । कोण सुख त्या काळीं ॥ ५ ॥ तुका ह्मणे हित । हेंचि मानी माझें चित्त । नव्हे आतां मुक्त । ऐसा झाला भरवसा ॥ ६ ॥

॥ १०२४ ॥

माझें मज आतां न देखें निरसतां ह्मणऊन आधार केला । संसाराची आस सांडुनि लौकिक जीवभाव तुज दिला । नव्हतीं माझीं कोणी मी कवणांचा अर्थ मोहो सांडवला । तारी मारी करी भलतें दातारा होऊन तुझा आतां ठेलों रे ॥ १ ॥ असो माझें कोडें तुज हें सांकडें मी असेन निवाडें सुखरूप । बाळकासी चिंता काय पोटवेथा जया शिरीं मायबाप ॥ २ ॥ पापपुण्यें श्रुति आटिल्या शास्त्रांस न लगेचि ठाव । विधिनिषेधें गोविलीं पुराणें वेदांसी तो अहंभाव । ओंकाराचें मूळ व्यापिलें माया तेथें न धरेच भाव । ह्मणऊन काबाड सांडिलें उपसतां धरिलें तुझेंचि नांव ॥ ३ ॥ तनमनइंद्रियें ठेवूनि राहिलों सर्व आशा तुझे पायीं । तप तीर्थ दान करवूं कवणा हातीं आधीन तें मज काई । आहिक्यें परत्रें चाड नाहीं सर्वथा जन्म सदा मज देई । मायामोहपाश करीं विष तैसें तुका ह्मणे माझ्या ठायीं ॥ ४ ॥

॥ १०२५ ॥

संसारापासूनी कैसें सोडविशी । न कळे हृषीकेशी काय जालों । करितां न सरे अधिक वाड पाहीं । तृष्णा देशधडी केलों । भक्तिभजनभाव यांसी नाहीं ठाव । चरणीं तुझ्या अंतरलों । मग पुढें रीग न पुरेचि पाहतां । अवघा अवघीं वेष्टिलों ॥ १ ॥ आतां माझी लाज राखे नारायणा । हीन दीन लीन याचकाची । करितां न कळे कांहीं असतील गुण दोष । करी होळी संचिताची ॥ २ ॥

इंद्रियें द्वारें मन धांवे सैरें । नांगवेचि करितांचि कांहीं । हात पाय कान मुख लिंगस्थान । नेत्र घ्राण द्वारें पाहीं । जया जैसी सोय तया तैसें होय । क्षण एक स्थिर नाहीं । करिती ताड.तोडी ऐसी यांची खोडी । न चले माझें यांस कांहीं ॥ ३ ॥ शरीरसंबंधु पुत्र पत्नी बंधु । धन लोभ मायावंत । जन लोकपाळ मैत्र हे सकळ । सोयरीं सज्जनें बहुतें । नाना कर्म डाय करिती उपाय । बुडावया घातपातें । तुका ह्मणे हरी राखे भलत्या परी । आह्मी तुझीं शरणागतें४

॥ १०२६ ॥

मागणें तें एक तुज । देईं विचारोनि मज ॥ १ ॥ नको दुर्जनाचा संग । क्षणक्षणा चित्तभंग ॥ २ ॥ जन्म घेईन मी नाना । बहु सोसीन यातना ॥ ३ ॥ रंक होईन दीनांचा । घायें देहपात साचा ॥ ४ ॥ तुका ह्मणे हेंचि आतां । देईं देईं तूं सर्वथा ५

॥ १७२७ ॥

दुडीवरी दुडी । चाले मोकळी गुजरी ॥ १ ॥ ध्यान लागो ऐसें हरी । तुझे चरणीं तैशापरी ॥ २ आवंतण्याची आस । जैसी लागे दुर्बळास ॥ ३ ॥ लोभ्या कळांतराची आस । बोटें मोजी दिवस मास ॥ ४ ॥ तुका ह्मणे पंढरीनाथा । मजला आणिक नको व्यथा ५

॥ १०२८ ॥

काय बोलों सांगा । याउपरी पांडुरंगा ॥ १ ॥ कांहीं आधारावांचून । पुढें न चले वचन ॥ २ ॥ वाढे ऐसा रस । कांहीं करावा सौरस ३ भक्तिभाग्यसीमा । द्यावा जोडोनिया प्रेमा ॥४॥ कोरड्या उत्तरीं । नका गौरवूं वैखरी ॥५॥ करी विज्ञापना । तुका प्रसादाची दाना ॥६॥

॥ १०२९ ॥

भोगियेल्या नारी । परी तो बाळब्रह्मचारी ॥१॥ ऐसी ज्याचे अंगीं कळा । पार न कळे वेदाला ॥२॥ बळीबळी थोरथोर । मोडोनिया केले चूर ॥३॥ वांकडी कुबज्यी । सरसी आणियेली वोजा ॥ ४ ॥ मल्ल रगडिला पायीं । गज झुगारिला बाहीं ॥ ५ ॥ जिवें मारियेला मामा । धांवे भक्ताचिया कामा ॥ ६ ॥ तुका ह्मणे पूर्ण । दावी भक्तीचीं विंदानें ॥ ७ ॥

॥ १०३० ॥

तुझें पाय माझें भाऊ । एकलता सर्वकाळ ॥१॥ हेंचि देईं विठाबाई । पांडुरंगे माझे आई ॥ २ ॥ नाहीं मोक्ष मुक्ति चाड । तुझी सेवा लागे गोड ॥ ३ ॥ सदा संग सज्जनांचा । नको वियोग पंढरीचा ॥ ४ ॥ नित्य चंद्रभागे स्नान । करी क्षेत्रप्रदक्षण ॥ ५ ॥ पुंड-

लिक पाहोनि दृष्टि । हर्षें नाचों वाळवंटीं ॥ ६ ॥ तुका ह्मणे पांडु-रंगा । तुझें स्वरूप चंद्रभागा ॥ ७ ॥

॥ १०३१ ॥

विनवितों सेवटीं । आहे तैसें माझे पोटीं ॥ १ ॥ कंठीं राहावें राहावें । हेंचि मागतसे भावें ॥२॥ पुरली वासना । तेणें होइल नारा-यणा ॥ ३ ॥ तुका ह्मणे जो देहाडा । तोचि वर्णीन पवाडा ॥ ४ ॥

॥ १०३२ ॥

राहाणें तें पायांपाशीं । आणिका रसीं विटोनि ॥ १ ॥ ऐसा धीर देईं मना । नारायणा विनवितों ॥२॥ अंतरीं तों तुझा वास । आणिकां नासु कारणां ॥ ३ ॥ तुका ह्मणे शेवटींचें । वाटे साचें राखावें ॥ ४ ॥

॥ १०३३ ॥

चिंतनाची जोडी । हाचि लाभ घडोघडी ॥ १ ॥ तुह्मी वसूनि अंतरीं । मज जागवा निर्धारी २ जेथें जेथें जाय मन । आड घाला सुदर्शन ॥ ३ ॥ तुका ह्मणे भोजें । नाचें हो ऐसें न लजें ॥ ४ ॥

॥ १०३४ ॥

आळस पाडी विषयकामीं । शक्ती देईं तुझ्या नामीं १ हेचि विनवणी विनवणी । विनविली धरा मनीं २ आणिक वचना मुकी वाणी । तुम-च्या गजों द्यावी गुणीं ३ तुका ह्मणे पाय डोळा । पाहे एरवी अंधळा ४

॥ १०३५ ॥

देव वसे चित्तीं । त्याची घडावी संगती ॥१॥ ऐसें आवडतें मना । देवा पुरवावी वासना ॥२॥ संत जनासवें भेटी । नहो अंग-संगें तुटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे जिणें । भलें संतसंघट्टणें ॥ ४ ॥

॥ १०३६ ॥

माप ह्मणे मी मवितें । भरी धणी ठेवी रितें ॥ १ ॥ देवा अभिमान नको । माझेठायीं देऊं सको ॥ २ ॥ देशीं चाले सिका । रितें कोण लेखी रंका ३ हातीं सूत्रदोरी । तुका ह्मणे त्याची थोरी ॥४॥

॥ १०३७ ॥

माझ्या मना लागो चाळा । पाहावयां विठ्ठल डोळां ॥ १ ॥ आणीक नाहीं चाड । नलगे संसार हा गोड ॥२॥ तरिच फळ जन्मा आलों । सरता पांडुरंगीं झालों ३ तुका ह्मणे देवा । देईं चरणांची सेवा ॥४॥

॥ १०३८ ॥

विधवेसी एक सुत । अहर्निशीं तेथें चित्त ॥ १ ॥ तैसा तूं मज एकला । नको मोकलूं विठ्ठला ॥ २ ॥ सुपुत्रालागीं बाप । अवघे तेथेंचि संकल्प ॥३॥ तुका ह्मणे चित्तीं । पतिव्रते जैसा पति ॥ ४ ॥

॥ १०३९ ॥

ज्याचें जैसें भावी मन । त्यासी देणें दरुषण ॥ १ ॥ पुरवूं जाणे

मनींची खूण । समाधान करोनी ॥ २ ॥ आपणियातें प्रगट करी । छाया बरी कृपेची ॥३॥ तुका ह्मणे केलें दान । मन उन्मन हरिनामीं ४

॥ १०४० ॥

हेंचि मागणें विठाबाई । पायीं ठेवूनिया डोई ॥ १ ॥ शांति दया अंतःकरणीं । रंगो रामनामीं वाणी ॥२॥ मूळ द्वंद्वाचें विघडो । निजानंदीं वृत्ति जडो ॥३॥ तुका ह्मणे हरी । आतां आपुलेंसें करी ॥ ४ ॥

॥ १०४१ ॥

अगा पंढरीराया । वेगीं येई तूं सावया ॥१॥ दीनबंधु तुझें नाम । देई आपुलें आह्मां प्रेम ॥२॥ जीवनकळा तूं विश्वाची । तूंचि माउली अनाथाची ॥३॥ तुका ह्मणे पुंडलीका । ठेवी मस्तकीं पादुका ४

॥ १०४२ ॥

आतां द्यावें अभयदान । जीवन ये कृपेचें ॥ १ ॥ उभारोनि बाहो देवा । हात ठेवा मस्तकीं ॥ २ ॥ नाभी नाभी या उत्तरें । करुणाकरें सांतवीजे ३ तुका ह्मणे केली आस । तो हा दिस फळाचा ४॥

॥ १०४३ ॥

शेवटींची हे विनंती । पाय चित्तीं राहावे ॥ १ ॥ ऐसें करा कृपा दान । तुम्हां मन सन्निध ॥ २ ॥ भाग्याविण कैंची भेटी । नव्हे तुटी चिंतनें ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळसा आलें । हें विठ्ठलें परिसावें ॥ ४ ॥

॥ १०४४ ॥

वोढविलें अंग । आतां करूनि घ्यावें सांग ॥ १ ॥ काय पूजा ते मी नेणें । जाणावें जी सर्व जाणें ॥२॥ पोटा आलें बाळ । त्याचें जाणावें सकळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरी । वाहवें जी कडियेवरी ॥ ४ ॥

॥ १०४५ ॥

जिकडे पाहे तिकडे देव । ऐसा भाव दे कांहीं ॥ १ ॥ काय केलों एकदेशीं । गुणदोषीं संपन्न ॥२॥ पडे तेथें तुझ्या पायां । करी वायां न वजें तें ३ तुका ह्मणे विषमें सारी । ठाणें धरी जिवासी ४॥

॥ १०४६ ॥

जिकडे जाय तिकडे सवें । आतां यावें यावरी ॥१॥ माझ्या अवघ्या भांडवला । तूं एकला झालासी ॥२॥ आतां दुजें धरा झणी । पायांहूनि वेगळे ॥३॥ तुका ह्मणे आतां देवा । नका गोवा यावरी ॥४॥

॥ १०४७ ॥

आतां बरें झालें । माझें मज कळों आलें ॥१॥ खोटा ऐसा संसार । मज पायीं द्यावा थार ॥ २ उघडले डोळे । भोग देतां काळीं कळे ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीवा । होतां तडातोडी देवा ॥ ४ ॥

॥ १०४८ ॥

केलियाचें दान । करा आपुलें जतन ॥ १ ॥ माझी बुद्धि स्थिर

देवा । नाहीं विषयांचा हेवा ॥ २ ॥ भाव अंतराय । अंतीं अंतरती पाय ॥ ३ ॥ तुका ह्मणे जोडी । आदी अंतीं राहो गोडी ॥४॥

॥ १०४९ ॥

पाहें तिकडे दिशा ओस । अवघी आस पायां पें ॥१॥ मनचि साच होईल कई । प्रेम देई भेटोनि ॥२॥ सर्वांपरी पांगुळ असें । न कळे कैसें तें तुम्हां ॥३॥ तुका ह्मणे कृपावंता । तूं तों दाता दीनाचा ॥४॥

॥ १०५० ॥

जेणें होय हित । तें तूं जाणसी उचित ॥ १ ॥ मज नको लावूं तैसें । वाया जायें ऐसें पिसें ॥२॥ धरितोसि सत्ता । होसी सकळ जाणता ॥ ३ ॥ चतुराच्या राया । अंगीकारावें तुकया ॥ ४ ॥

॥ १०५१ ॥

करूनि विनवणी । माथा ठेवितों चरणीं ॥ १ ॥ होतें तेंचि असों द्यावें । रूप सौम्यचि बरवें ॥ २ ॥ भया भेणें तुमचा ठाव । तुमच्या कोपें कोठें जावें ॥ ३ ॥ तुका पाया लागे । दान समुदाय मागे ॥ ४ ॥

॥ १०५२ ॥

वर्तता बासर । काय करावें शरीर ॥ १ ॥ ठेवा नेमून नेमून । माझें तुमचे पायीं मन ॥ २ ॥ नेदाविया वृत्ती । कोठें फांकोंचि श्रीपती ॥ ३ ॥ तुका ह्मणे भले । जन्मा येऊनिया झालें ॥ ४ ॥

॥ १०५३ ॥

दुर्बुद्धि ते मना । कदा नुपजो नारायणा ॥ १ ॥ आतां मज ऐसें करी । तुझे पाय चित्तीं धरीं ॥ २ ॥ उपजला भावो । तुमचे कृपें सिद्धी जावो ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां । लाभ नाहीं या परता ॥४॥

॥ १०५४ ॥

अहो कृपावंता । होई बुद्धीचा ये दाता ॥ १ ॥ जेणें पाविजे उद्धार । होय तुझे पायीं थार ॥ २ ॥ वदवी हे वाचा । भाव पांडुरंगीं साचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । माझे अंतर वसवा ॥ ४ ॥

॥ १०५५ ॥

निर्धाराचें अवघें गोड । वाटे कोड कौतुक ॥१॥ बैसलिया भाव पायीं । बरा तई नाचेन ॥ २ ॥ स्वामी कळे सावधान । तरि मन उल्हासे ॥ ३ ॥ तुका ह्मणे आश्वासावें । प्रेम द्यावें विठ्ठलें ॥ ४ ॥

॥ १०५६ ॥

माझे पाय तुझी डोई । ऐसें करीगा भाक देई ॥ १ ॥ पाहतां दिसे उफराटें । घडे तरी भाग्य मोठें ॥ २ ॥ बहु साधन मोलाचें । यासी जोडा दुजें कैचें ३ नका आनुमानूं विठ्ठला । तुका ह्मणे धडा झाला ४

॥ १०५७ ॥

एक आतां तुह्मी करा । मज दातारा सत्तेनें ॥ १ ॥ विश्वास तो

पायांवरी । ठेवुनि हरी राहिलों २ जाणताचि दुजें नाहीं । आणिक कांहीं प्रकार ॥३॥ तुका ह्मणे शरण आलों । काय बोलों विनवितों ॥४॥

॥ १०५८ ॥

तुजवरी ज्याचें मन । दरुशन दे त्याचें ॥१॥ कैसा जाती शुद्ध भाव । हात पाव ना वृत्ती ॥२॥ अवघियांचा करूनि मेळा । तुज डोळा रोंखिलें॥ ३ ॥ तुका म्हणे तुज आड । लपोनि कोड दावी देवा ॥४॥

॥ १०५९ ॥

प्राण समर्पिला आह्मी । आतां उशीर कां स्वामी ॥ १ ॥ माझें फेडावें उसणें । भार न मना या ऋणें ॥२॥ झाला कंटस्फोट । जवळी पातलों निकट ॥ ३ ॥ तुका ह्मणे सेवा । कैशी बरी वाटे देवा ॥ ४ ॥

॥ १०६० ॥

आतां माझ्या मायबापा । तूं या पापा प्रायश्चित्त ॥ १ ॥ फजित ये केले खळ । तो विटाळ निवारी ॥ २ ॥ प्रेम आतां पाजी रस । करी वास अंतरीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे पांडुरंगा । जिवलगा माझिया ॥ ४ ॥

॥ १०६१ ॥

धर्माची तूं मूर्ति । पाप पुण्य तुझे हातीं ॥ १ ॥ मज सोडवी दातारा । कर्मापासूनि दुस्तरा ॥२॥ करिसी अंगीकार । तरी काय माझा भार ॥३॥ जिवींच्या जिवना । तुका ह्मणे नारायणा ॥ ४ ॥

॥ १०६२ ॥

मज दास करी त्यांचा । संतदासांच्या दासांचा ॥ १ ॥ मग होत कल्पवरी । सुखें गर्भवास हरी ॥२॥ नीच वृत्ति काम । परी मुखीं तुझें नाम ॥ ३ ॥ तुका ह्मणे सेवे । माझे संकल्प वेंचावे ॥ ४ ॥

॥ १०६३ ॥

बोलायाचा त्याशीं । नको संबंध मानशीं ॥ १ ॥ जया घडली संतनिंदा । तुज विसरूनि गोविंदा ॥ २ ॥ जळो त्याचें तोंड । नको दृष्टीपुढें भांड ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । तया दुरी मज ठेवा ॥ ४ ॥

॥ १०६४ ॥

काय दिनकरा । केला कोंबड्यानें खरा ॥ १ ॥ कां हो ऐसा संत ठेवा । भार माझे माथां देवा २ आडविलें तरि दासी । कां मरती उपवासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे हातीं । कळा सकळ अनंतीं ॥ ४ ॥

॥ १०६५ ॥

अधमाची यारी । रंग पतंगाचे परी ॥ १ ॥ विटे न लगतां क्षण । मोल जाय वायाविण ॥ २ ॥ सर्पाचिया परी । विषें भरला कल्हारीं ॥३॥ तुका ह्मणे देवा । मज ह्मणी ऐसे दावा ॥ ४ ॥

॥ १०६६ ॥

काय कळे बाळा । बाप सदैव दुबळा ॥ १ ॥ आहे नाहीं हें न

कळे । हातीं काय कोण्या वेळे ॥ २ ॥ देखिलें तें दृष्टी । मागे घालूनिया मिठी ॥३॥ तुका ह्मणे भावें । माझ्यामज समजावें ॥४॥

॥ १०६७ ॥

नसे तरी मनीं नसो । परी वाचे तरी वसो ॥ १ ॥ देह पडो या चिंतनें । विठ्ठलनामसंकीर्तनें ॥२॥ दंभस्थिती भलत्या भावें । मज हरिजन ह्मणावें ३ तुका ह्मणे काळें तरी । मज सांभाळील हरी ४

॥ १०६८ ॥

पुढिलाचें इच्छी फळ । नाहीं बळ तें अंगीं ॥ १ ॥ संत गेले तया ठाया । देवराया पाववी ॥ २ ॥ ज्येष्ठांचीं कां आम्हां जोडी । परवडी न लभों ॥३॥ तुका ह्मणे करी कोड । पुरवीं लाड आमुचा ॥४॥

॥ १०६९ ॥

आली सलगी पायांपाशीं । होइल तैशी करीन ॥ १ ॥ आणीक आम्हीं कोठें जावें । येथें जीवें वेचलों २ अवघ्या निरोपणा भाव । हाचि ठाव उरलासे ॥३॥ तुका ह्मणे पाळी लळे । कृपाळुवे विठ्ठले ॥४॥

॥ १०७० ॥

ठाकलोंसे द्वारीं । उभा याचक भीकारी ॥ १ ॥ मज भीक कांहीं देवा । प्रेमभातुकें पाठवा ॥ २ ॥ याचकाचा भार । घेऊं नये येरद्वार ॥ ३ ॥ तुका ह्मणे दान । सेवा घेतल्यावांचून ॥ ४ ॥

॥ १०७१ ॥

लक्ष्मीवल्लभा । दिनानाथा पद्मनाभा ॥ १ ॥ सुख वसे तुझे पायीं । मज ठेवीं तेचि ठायीं ॥ २ ॥ माझी अल्प हे वासना । तूं तो उदाराचा राणा ॥ ३ ॥ तुका ह्मणे भोगें । पीडा केली धांव वेगें ॥ ४ ॥

॥ १०७२ ॥

वायां जातां देवा । नेणें भक्ती करूं सेवा ॥ १ ॥ आतां जोडोनिया हात । उभा राहिलों निवांत ॥ २ ॥ करावें तें काय । न कळे अवलोकिलों पाय ॥ ३ तुका ह्मणे दान । दिलें पदरीं घेईन ॥ ४ ॥

॥ १०६३ ॥

तुज मागणें तें देवा । आह्मां तुझी चरणसेवा ॥ १ ॥ आन नेघों देसी तरी । रिद्धि सिद्धि मुक्ति चारी ॥२॥ संतसंगति सर्वकाळ । थोर प्रेमाचा सुकाळ ॥ ३॥ तुका ह्मणे नाम । तेणें पुरे माझें काम ॥ ४ ॥

॥ १०७४ ॥

काय नव्हे करितां तुज । आतां राखे माझी लाज ॥ १ ॥ मी तों अपराधाची राशी । शिखा अंगुष्ट तों पाशीं ॥२॥ त्राहे त्राहे त्राहे । मज कृपादृष्टी पाहे ३ तुका ह्मणे देवा । सत्य घ्यावी आतां सेवा ४॥

॥ १०७५ ॥

मी तों दिनाहूनि दीन । माझा तूज अभिमान ॥१॥ मी तों आलों

शरणागत । माझें करावें स्वहित २ दिनानाथा कृपाळुवा । सांभाळावें आपुल्या नांवा ३ तुका ह्मणे आतां । भलें नव्हे मोकलितां ।४।

॥ १०७६ ॥

न बोलसी करा वाचा । उपाधीचा संबंध ॥ १ ॥ एका तुमच्या नामाविण । अवघा सीण कळतसे ॥ २ ॥ संकल्पाचे ओढी मन । पापपुण्य समचि ॥३॥ तुंकां ह्मणे नारायणीं । पावो वाणी विसांवा ४

॥ १०७७ ॥

कृपा करूनी देवा । मज साच तें दाखवा ॥ १ ॥ तुम्ही दयावंत कैसे । कीर्ति जगामाजी वसे ॥२॥ पाहोनिया डोळां । हातीं ओढवाल काळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । माझा करावा कुठावा ॥ ४ ॥

॥ १०७८ ॥

तान्हेल्याची धणी । फिटे गंगा नव्हे उणी ॥ १ ॥ माझे मनोरथ सिद्धी । पाववावे कृपानिधी ॥ २ ॥ तूं तो उदाराचा राणा । माझी अल्पचि वासना ॥ ३ ॥ कृपादृष्टी पाहें । तुका ह्मणे होई साह्ये ॥४॥

॥ १०७९ ॥

सद्गदित कंठ दाटो । येणें फुटो हृदय । १ ॥ चिंतनाचा एक लाहो । तुमच्या अहो विठ्ठला ॥२॥ नेत्रीं जळ वाहो सदा । आनंदाचे रोमांच ॥ ३ । तुका ह्मणे कृपादान । इच्छी मन हे जोडी ॥४॥

॥ १०८० ॥

लहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा ॥ १ ॥ ऐरावत रत्न थोर । तया अंकुशाचा मार २ ज्याचे अंगीं मोठेपण । तया यातना कठीण ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाण । व्हावें लहनाहुनि लहान ॥ ४ ॥

॥ १०८१ ॥

पाहातोसी काय । आतां पुढें करी पाय ॥ १ ॥ वरि ठेवूं दे मस्तक । ठेलों जोडूनि हस्तक ॥२॥ बरवें करी सम । नको भंगो देऊं प्रेम ३ तुका ह्मणे चला । पुढती सामोरे विठ्ठला ॥ ४ ॥

॥ १०८२ ॥

हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥ गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥ २ ॥ नलगे मुक्ति धन संपदा । संत संग देई सदा ३ तुका ह्मणे गर्भवासीं । सुखें घालावें आह्मांसी ४

॥ १०८३ ॥

करूं जातां सन्निधान । क्षणिं जन पालटे ॥ १ ॥ आतां गोमटे ते पाय । तुझे माय विठ्ठले ॥ २ ॥ हरिदासांचा समागम । अंगीं प्रेम विसावे ॥३॥ तुका ह्मणे हेंचि मन । इच्छादान मागतसे ॥४॥

॥ १०८४ ॥

आतां मज देवा । इचे हातींचें सोडवा ॥ १ ॥ पाठी लागलीसे लासी । इच्छा जिते जैसी तैसी ॥ २ ॥ फेडा आतां पांग । अंगीं लपवुनी अंग ॥ ३ ॥ दुजें नेणे तुका । कांहीं तुह्मासी टाउका ॥४॥

॥ १०८५ ॥

तुझे पोटीं ठाव । व्हावा ऐसा माझा भाव ॥ १ ॥ करीं वासनेसारिखें । प्राण फुटे येणें दुःखें ॥ २ ॥ अहंकार खोटे । वाटे श्वापदांचे थाटे ॥ ३ ॥ तुका ह्मणे आई । हातीं धरूनि संग देई ॥ ४ ॥

॥ १०८६ ॥

तुजविण देवा । कोणा ह्मणे माझी जिव्हा ॥ १ ॥ तरि हे हो कां शतखंड । पडो झडोनिया रांड ॥ २ ॥ कांहीं इच्छेसाठीं । करील वळवळ करंटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे कर । कटीं तयाचा विसर ॥४॥

॥ १०८७ ॥

आतां बरें झालें । सकाळींच कळों आलें ॥ १ ॥ मज न ठेवीं इहलोकीं । आलों तेव्हां झाली चुकी ॥२॥ युगमहिमा ठावा । नव्हता ऐसा पुढें देवा ॥३॥ तुका म्हणे ठेवीं । भोगासाठीं निरयगांवीं ॥४॥

॥ १०८८ ॥

हरिदासाचिये घरीं । मज उपजवा जन्मांतरीं ॥ १ ॥ ह्मणसी कांहीं मागा । हेंचि देगा पांडुरंगा ॥ २ ॥ संतां लोटांगणीं । जातां लाजों नको मनीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे अंगीं । शक्ती देई नाचे रंगीं ॥ ४ ॥

॥ १०८९ ॥

रंगीं रंगें नारायणा । उभा करितां कीर्तना ॥ १ ॥ हातीं घेऊनिया वीणा । कटीं राहे नारायणा ॥ २ ॥ देखिलीसे मूर्ति । माझ्या हृदयाची विश्रांति ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । देई कीर्तनाचा हेवा ॥ ४ ॥

॥ १०९० ॥

जन्मोजन्मीं दास । व्हावें हेंचि माझी आस ॥ १ ॥ पंढरीचा वारकरी । वारी चुकों नेदी हरी ॥ २ ॥ संतसमागम । अंगीं स्थिरावलें प्रेम ॥ ३ ॥ स्नान चंद्रभागे । तुका ह्मणे हेंचि मागें ॥ ४ ॥

॥ १०९१ ॥

अहो कृपावंता । होई बुद्धीचा ये दाता ॥ १ ॥ जेणें पाविजे उद्धार । होय तुझे पायीं थार ॥ २ ॥ वदवी हे वाचा । भाव पांडुरंगीं साचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । माझें अंतर वसवा ॥ ४ ॥

॥ १०९२ ॥

सगळियाचा सोस मनीं । लाजोनिया राहिलों ॥ १ ॥ आवडीनें बोलाविलों । येथें तें तों लपावें ॥ २ ॥ माझें तेंचि मज घ्यावें । होतें भावें जोडिलें ॥३॥ तुका ह्मणे विश्वंभरा । आळीकरा बुझावा ॥४॥

॥ १०९३ ॥

देवा ऐसा शिष्य देई । ब्रह्मज्ञानी निपुण पाहीं ॥ १ ॥ जो का भावाचा आगळा । भक्तिप्रेमाचा पुतळा ॥ २ ॥ ऐशा युक्ति ज्याला बाणे । तेथें वैराग्याचें ठाणें ॥ ३ ॥ ऐसा झाला हो शरीरीं । तुका लिंबलोण करी ॥ ४ ॥

॥ १०९४ ॥

कृपा करावी भगवंतें । ऐसा शिष्य द्यावा मातें ॥ १ ॥ माझें व्रत जो चालवी । त्यासि द्यावें त्वां पालवी ॥ २ ॥ व्हावा ब्रह्मज्ञानी गुंडा । तिहीं लोकीं ज्याचा झेंडा ॥ ३ ॥ तुका तुका हाका मारी । माझ्या विठोबाच्या द्वारीं ॥ ४ ॥

॥ १०९५ ॥

जाणों नेणों काय । चित्तीं धरूं तुझे पाय ॥ १ ॥ आतां हेंचि वर्म । गाऊं धरूनिया प्रेम ॥ २ ॥ काय सांडूं मांडूं । भावें हृदयींच कोंडूं ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । जन्मोजन्मीं मागे सेवा ॥ ४ ॥

॥ १०९६ ॥

काय ऐसा सांगा । धर्म मज पांडुरंगा ॥ १ ॥ तुझे पायीं पावे ऐसा । जेणें उगवे हा फांसा ॥ २ ॥ करीं कृपादान । तैसें बोलवीं वचन ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । माझें हृदय वसवा ॥ ४ ॥

॥ १०९७ ॥

आतां देवा मोकलिलें । तुह्मा भलें दिसेना ॥ १ ॥ आतां नाहीं जीव भाव । उरला ठाव वेगळा २ सांभाळुन घ्यावें देवा । आपणासवा यावरि ॥३॥ तुका ह्मणे नग्नभाज ॥ तरि ते लाज स्वामीसी ॥४॥

॥ १०९८ ॥

आतां पंढरीराया । माझ्या निरसावें भया ॥ १ ॥ मनीं राहिली आशंका । स्वामिभयाची सेवका ॥ २ ॥ ठेवा माथां हात । कांहीं बोला अभयमात ॥ ३ ॥ तुका म्हणे लाडें । खेळें ऐसें करा पुढें४॥

॥ १०९९ ॥

आतां माझ्या भावा । अंतराय नको देवा ॥ १ ॥ आलें भागा तें करितों । तुझें नाम उच्चारितों ॥ २ ॥ दृढ माझें मन । येथें राखावें बांधोन ॥ ३ ॥ तुका म्हणे वाटे । नको फुटों देऊं फांटे॥४॥

॥ ११०० ॥

कैसें भलें देवा अनुभवा कां नये । उशीर तो काय तुह्मांपाशीं १ आहे तें मागतों दिसतें जवळी । केल्यामध्यें कळि कोण साध्य २ नाहीं सांडीत मी सेवेची मर्यादा । लाविला तो धंदा नित्य करीं ३॥ तुका ह्मणे हात आंवरिला गुंती । माझे तंव चित्तीं नाहीं दुजें ४॥

देवाशीं प्रेमाचें भांडण.

॥ ११०१ ॥

बरें आह्मां कळों आलें देवपण । आतां गुज कोण राखे तुझें ॥१॥
मारिलें कां मज सांग आजिवरी । आतां सरोवरी तुज मज ॥ २ ॥
जें आम्ही बोलों तें आहे तुझ्या अंगीं। देईन प्रसंगीं आजि शिव्या ३
निला।जिरा तुज नाहीं याति कुळ । चोरटा शिंदळ ठावा जना ॥४॥
खासी घोंडे माती जीव जंत झाडें । एकलें उघडें परदेसी ॥ ५ ॥
बाढच कुतरा ऐसा मज ठावा । बईल तूं देवा भार वाही ॥ ६ ॥
लटिका तूं मागें वहुतांसी ठाया । आलें अनुभवा माझ्या तेंहीं ७ ॥
तुका ह्मणे मज खवळिलें भांडा । आतां धीर तोंडा न धरवे ॥८॥

॥ ११०२ ॥

आम्ही पतित म्हणोनि तुज आलों शरण । करितों चिंतन दिवस रात्रीं ॥१॥ नाहीं तरी मज काय होती चाड । धरावया भीड तुह्मी चित्तीं ॥२॥ आम्हां न तारावें तुह्मी काय करावें । सांगीजेजी भावें नारायणा ॥ ३ ॥ अन्याय कोणाचा अंगीकार करणें । तया हातीं देणें लाज तेचि ॥ ४ ॥ काय तें शूरत्व मिरवूनि बोलणें । जनामाजी दावणें बळरया ॥ ५ ॥ पोह्या अन्नछत्र घालूनिया घरीं। दंडितो बाहेरी आलियासी ॥६॥ नव्हे कीर्त कांहीं न मानेचि लोकां। काय विटंबणा तैसी तैसी ॥७॥ प्रत्यक्षासी काय द्यावें गा प्रमाण पाहतां दर्पण साक्ष काई ॥८॥ तुका ह्मणे तरी आह्मां कां न कळे । तरलों अथवा आम्ही नाहीं ॥ ९ ॥

॥ ११०३ ॥

देवासी पैं भांडों एकचित्त करूनी । आह्मांसी सज्जनीं सांगितलें ॥ १ ॥ आह्मां काय आतां देवें आडोपरी । भेटी नेदी तरी सुखें नेदो ॥ २ ॥ तोचि नांदो सदा हरि पैं वैकुंठीं । आह्मां देशावटी देवो सुखें ॥ ३ ॥ देवें अभिमान चित्तांत धरिला । तरी तो एकला राहो आतां ॥ ४ ॥ चित्तीं धरोनि नाम असों सुखें येथें । हर्षें गाउं गीत गोविंदाचें ॥ ५ ॥ तुका ह्मणे सर्व देवाची नवाई । आह्मी सुखें पाहीं डुलतसों ॥ ६ ॥

॥ ११०४ ॥

निष्ठुरा उत्तरीं न धरावा राग । आहे लागभाग ठायींचाचि॥१॥
तूं माझी जननी तूं माझा जनिता। रखुमाईच्या कांता पांडुरंगा ॥२॥
मुळींच्या ठेवण्या आहे अधिकार । दुरावोनि दूर गेलों होतों ॥ ३ ॥
पाठींच्या आठवा पडिला विसर । कांहीं आला भार माथां तेणें॥४॥

राखिला होता बहु चौघां चार । साक्षीनें वेव्हार निवाडिला ॥ ५ ॥
तुका ह्मणे कांहीं बोलणें न लगे । आतां पांडुरंगे तूं भी ऐसें ॥ ६ ॥

॥ ११०५ ॥

पांडुरंगे प हा खादलीसे रडी । परि नामशेंडी धरिली आह्मी ॥१॥
आतां संतांनीं करावी पंचाइत । कोण हा फजितखोर येथें ॥ २ ॥
कोणाचा अन्याय येथें आहे स्वामी । गर्जतसों आह्मी पातकीही ३॥
याचें पावनपण सोडवाजि तुह्मी । पतितपावन आह्मी आहों खरे ॥
आम्ही तंव आहों अन्यायी सर्वथा । याची पावन कथा कैसी आहे ५
तुका म्हणे आह्मी मेलों तरी जाणा । परि तुमच्या चरणा न सोडावें ६॥

॥ ११०६ ॥

ऐसा मी अपार पार नाहीं अंत । परि कृपावंत भाविकांचा ॥ १ ॥
दुर्जनां चांडाळां करीं निर्दाळण । करीं संरक्षण अंकितांचें ॥ २ ॥
भक्त माझे सखे जिवलग सांगाती । सर्वांग त्याप्रती वोडवीन ॥३॥
पीतांबरछाया करीन त्यावरी । सदा त्यांचे घरीं दारीं उभा ॥ ४ ॥
माझे भक्त मज सदा जे रातले । त्यांघरीं घेतलें धरणें म्यां ॥ ५ ॥
कोठें हें वचन ठेविलें ये वेळे । तुका ह्मणे डोळे झांकियलें ॥६॥

॥ ११०७ ॥

आमचा तूं ऋणी ठायींचाचि देवा । मागावया ठेवा आलों दारा १
वर्म तुझें आह्मां सांपडलें हातीं । धरियेले चित्तीं दृढ पाय ॥ २ ॥
बैसलों धरणें कोंडोनिया द्वारीं । आंतूनि बाहेरी येओं नेदी ॥ ३ ॥
तुज मज सरी होईल या विचारें । जळो भांडखोरें निलाजिरीं ॥४॥
भांडवल माझें मिरविसी जनीं । सहस्र वोवणी नाममाळा ॥ ५ ॥
तुका ह्मणे आह्मी केली जिवें साठीं । तुह्मां आह्मां तुटी घालूं आतां ६॥

॥ ११०८ ॥

नव्हो आतां जीवीं कपटवसती । मग काकुळती कोणा यावें ॥ १ ॥
सत्याचिये मापें गांठीं नये नाड । आदि अंत गोड नारायण ॥ २ ॥
चोखटिया नाहीं विटाळाचा अघात । साच तें साचांत सांचा पडे ॥३॥
विचारिली वाट उसंत सीतळ । बुद्धीपुढें बळ तृणतुल्य ॥ ४ ॥
आहाराच्या घांसें पचोनिया जिरे । वासना ही उरे उर्वरीत ॥५॥
तुका म्हणे ताळा घालावा वचनीं । तूं माझी जननी पांडुरंगे ॥ ६ ॥

॥ ११०९ ॥

जेणें तुज झालें रूप आणि नांव । पतित ये दैव तुझें आम्हीं ॥ १ ॥
नाहीं तरी तुज कोण हें पुसतें । निराकारी तेथें एकाएकीं ॥ २ ॥
अंधारें दीपातें आणियेली शोभा । माणिकासी प्रभा कोंदणाची ३॥
धन्वंतरी रोगें आणिला उजेडा । सुखी काय चाडा जाणावें तें ४॥

अमृतासी मोल विषाचिये गुणें । पितळ तरी सोनें उंच निंच ५ ॥
तुका ह्मणे आह्मी असोनिया जाण । तुज देवपण आणियेलें ॥ ६ ॥

॥ १११० ॥

ऐसें कोणी करी लागो तुह्मी सोय । माझे वि[illegible]ाई जननिये ॥ १ ॥
पतितपावन म्हणविशी जरी । आवरण करीं तरी माझें ॥ २ ॥
नाहीं तरी ब्रीद टाकीं सांडुनिया । न धरिर्मा माया जरी माझी ३
बोलिला तो बोल करावा साचार । तरि लोक बरें म्हणतील ॥ ४ ॥
करावा संसार लोक लाजे भेणें । वचनासी उणें येऊं नेदी ॥ ५ ॥
तुह्मां आह्मां तैसें नाहीं ह्मणे तुका । होशील तूं सखा जीवलग ॥६॥

॥ ११११ ॥

कासया लागला यासी चाराचार । मुळींचा वेव्हार निवडिला १
ग्वाही बहुतांची घालुनिया परि । महजर करीं आहे माझ्या ॥२॥
तुह्मां वेगळे लागे आपल्याच ठायीं । होतें करूनि तेंही माझें मी ३
भांडण शेवटीं झालें एकवट । आतां कटकट करूं नये ॥ ४ ॥
ठेविला ठेवा तो आला माझ्या हाता । आतां नाहीं सत्ता तुज देवा ५
तुका म्हणे वांयांविण खटपटा । राहिलों मी वांटा घेऊनिया ॥ ६ ॥

॥ १११२ ॥

ऐसें काय उणें झालें तुज देवा । भावेंविण सेवा घेसी माझी ॥ १ ॥
काय मज द्यावा नलगे मुशारा । पाहावें दातारा विचारूनि ॥ २ ॥
करितों पाखांडें जोडुन अक्षरें । नव्हे ज्ञान खरें भक्तिरस ॥ ३ ॥
गुणवाद तुझे न बोलवे वाणी । आणिका छळणी वाद सांगे ॥४ ॥
तरी आतां मज राखे तुझे पायीं । देखसील कांहीं प्रेमरस ॥ ५ ॥
तुका ह्मणे तुज हांसतील लोक । निष्काम सेवक ह्मणोनिया ॥६ ॥

॥ १११३ ॥

धरूनि पालव असुडीन करें । मग काय बरें दिसे लोकीं ॥ १ ॥
काय तें विचारा ठायींचें आपणा । को हा नारायणा अवकाश ॥२॥
अंतर पायांसी तोंवरी या गोष्टी । पडिलिया मिठी ह[illegible] नेदी ॥३॥
रुसलेती तरी होईल बुझावणी । तांतडी करूनि साधावें हें ॥४॥
सांपडलिया आधीं कारणासी ठाव । येथें करूं भाव दृढ आतां ५॥
तुका म्हणे तुझे ठाउके बोभाट । मग खटपट चुकली ते ॥ ६ ॥

॥ १११४ ॥

तुझें ह्मणवितां काय नाश जाला । ऐके बा विठ्ठला कीर्ती तुझी १॥
परी तुज नाहीं आमुचे उपकार । नामरूपा थार केलियाचे ॥ २ ॥
[illegible]ळीं संसार केला देशधडी । [illegible] आवडी ममतेची ॥ ३ ॥

लोभ दंभ काम क्रोध अहंकार । यांसीं नाहीं थार ऐसें केलें ॥४॥
मृत्तिका पाषाण तैसें केलें धन । आतां ते कोण पर नेणों ॥ ५ ॥
तुका म्हणे झालों देहासी उदार । आणीक विचार काय तेथें ६ ॥

॥ १११५ ॥

कोण पर्वकाळ पहासील तीथ। होतें माझें चित्त कासाविस ॥१॥
पाठवीं भातुकें प्रेमें झडकरी । नको राखा उरी पांडुरंगा ॥ २ ॥
न धरावा कोप मजवरी कांहीं । अवगुणी अन्याया म्हणोनिया ॥३॥
काय रडवीसी नेणतिया पोरां । जाणतिया थोरां याचिपरी ॥ ४ ॥
काय उभी कर ठेवुनिया कटीं । बुझावी धाकुटीं लडिवाळें ॥ ५ ॥
तुका ह्मणे आतां पदरासी पिळा । घालिन निराळा नव्हे मग ॥६॥

॥ १११६ ॥

कैसा कृपाळु हें न कळसी देवा । न बोलसी सेवा घेसी माझी १॥
काय ऐसें बळ आहे तुजपाशीं । पाहों हा रिघसी कोणा आड २॥
पाडियेला ठायीं तुझा थारा मारा । अवघा दातारा ल्पसी तो ३
आतां तुह्मां आह्मां उरी तोंचि बरें । काय हीं उत्तरें वाढवूनि ४ ॥
तुका म्हणे मज साह्य झाले संत । म्हणऊनि मात फावली हे ॥५॥

॥ १११७ ॥

दोष करूनि आम्ही पतित सिद्ध झालों । पावन मागों आलों ब्रीद तुझें ॥१॥ आतां पतिता तारावें कीं ब्रीद हें सोडावें । यांत जें पुरवे तेंची सांगा ॥ २ ॥ उद्धार तुमच्यानें नव्हे हो श्रीहरि । सोडा झडकरी ब्रीद आतां ॥३॥ तें ब्रीद घेउनी हिंडों दारोदारीं । सांगूं तुझी हरि कीर्ति जगा ॥४॥ देवें हारविलें ब्रीद हें सोडिलें । पतितें जिंकिलें आम्हीं देवा ॥५॥ तुका म्हणे आम्हीं उठलों दैन्य-वरि । विचारा श्रीहरी तुम्ही आतां ॥ ६ ॥

॥ १११८ ॥

आम्ही नरका जातां काय येईल तुझ्या हाता । ऐसा तूं अनंता विचारीपां ॥ १ ॥ तुज शरण आलियाचें काय हेंचि फळ । विचारा दयाळ कृपानिधी ॥२॥ तुझें पावनपण न चले आह्मासी । ऐसें हृषीकेशी कळों आलें ॥ ३ ॥ आह्मी दुःख पावों जन्ममरण व्यथा । काय तुझ्या हाता येत असे ॥ ४ ॥ तुका ह्मणे तुह्मी खादली हो रडी । आह्मी धरली शेंडी नाम तुझें ॥ ५ ॥

॥ १११९ ॥

आतां सांडूं तरी हातीं ना पदरीं । सर्वां सहोदरीं मोकलिलों ॥१॥
जनाचारामध्यें उडाला मातेरा । झालों निलाजिरा ह्मणऊनि ॥२॥
कोणाचिया दारा जावेनासें झालें । म्यांच विटंबिलें आपणासी ३॥

आतां कोण करी माझा अंगीकार । कळलें निष्ठुर झालासी तूं ॥४॥
तुका म्हणे माझी मांडिली निरास । करितों जीवा नास तुजसाठीं ॥५॥

॥ ११३२ ॥

जाय परतें काय आणिला कांटाळा । बोला एक वेळा ऐसें तरी ॥ १ ॥
कां हो केली तुह्मी निष्ठुरता देवा । मानेना हे सेवा करितों ते ॥ २ ॥
भाग्यवंत त्यांसी सांगितल्या गोष्टी । तें नाहीं अदृष्टीं आमुचिया ॥३॥
तुज ऐसा स्वामी असोनि मस्तकीं । होतसे या चुकी संचिताची ॥४॥
तुका ह्मणे तुह्मापासूनि अंतर । न पडे नाहीं स्थिर बुद्धि माझी ॥५॥

॥ ११३३ ॥

परिस काय धातु सोनें न करितु । फेडितो निभ्रांतु लोहपांगु ॥१॥
काय तयाहुनि झालासी बापुडें । फेडितां सांकडें माझें एक ॥२॥
कल्पतरु कोड पुरवितो रोकडा । चिंतामणि खडा चिंतिलें तें ॥३॥
चंदनांच्या वासें वसतां चंदन । होती काष्ठ आन वृक्षयाति ॥ ४ ॥
काय त्याचें उणें झालें त्यासी देतां । विचारी अनंता तुका ह्मणे ॥५॥

॥ ११३४ ॥

गोवळोकीं कांहीं लावियेलें पिसें । काय सांगो ऐसें तुजपासीं ॥१॥
तोंड काळें केलें फिरविलें मज । नाहीं धरिली लाज पांडुरंगा ॥२॥
काय तुजपाशीं सांगों हें गाऱ्हाणें । मग काय जिणें तुझें माझें ॥३॥
कोणासाठीं आतां करावा संसार । केली वारावार आपणचि ॥४॥
तुका ह्मणे आह्मी मोडिला घरचार । धरियेला धीर तुझ्या पायीं ॥५॥

॥ ११३५ ॥

तुझा ह्मणउनि झालों उतराई । त्याचें वर्म काई ते मी नेणें ॥ १ ॥
हातीं धरोनिया दावी मज वाट । पुढें कोण नीट तेंचि देवा ॥२॥
देवभक्तपण करावें जतन । दोन्हीं पक्षीं जाण तूंचि बळी ॥ ३ ॥
अभिमानें तुज लागली हे लाज । शरणागता काज करावया ॥४॥
तुका ह्मणे बहु नेणता मी फार । ह्मणऊनि विचार जाणविला ५॥

॥ ११३६ ॥

निष्ठुर मी झालों अतिवादागुणें । हें कां नारायणें नेणिजेल ॥ १ ॥
सांडियेली तुम्ही गोत परिसोय । फोडविली डोय कर्मा हातीं २॥
सांपडुनि संदी केली जीवेंसाठीं । घ्यावयासी तुटी कारण हें ॥३॥
तुका ह्मणे तुज काय ह्मणो उणें । नाहीं अभिमानें चाड देवा ॥४॥

॥ ११३७ ॥

करितां विचार सांपडलें वर्म । समूळ निश्रम परिहाराचें ॥ १ ॥
मज घेऊनिया आपणासी द्यावें । साटीं जीवें भावें नारायणा ॥२॥
उरी नाहीं मग पडदा कां आला । स्वमुखेंचि भला करितां वाद ॥३॥
तुका ह्मणे माझें खरें देणें घेणें । तुह्मी साक्षी जाणें अंतरींचें ॥४॥

॥ ११३८ ॥

नाहीं तरी आतां कैचा अनुभव । झालासी तूं देव वरघेणा ॥ १ ॥
जेथें तेथें देखें लांचाचा पर्वत । घ्यावें तरि चित्त समाधान ॥ २ ॥
आधीं वरी हात या नांवें उदार । उरूण्याचे उपकार फिटाफीट॥३॥
तुका ह्मणे जैसी तैसी करूं सेवा । सामर्थ्यानें देवा पायांपाशीं ४॥

॥ ११३९ ॥

आह्मी ह्मणों कोणी नाहीं तुज आड । दिसतोसी भ्याड पांडुरंगा१॥
हा गे माझ्या भोगें केलासी परता । विश्वंभरीं सत्ता नाहीं ऐसी२॥
आह्मी तुज असों देऊनि आधार । नाम वारंवार उच्चारितों ॥३॥
तुका ह्मणे मज धरियेलें बळें । पंचभूतीं खळें करूनिया ॥ ४ ॥

॥ ११४० ॥

उपजल्या काळें शुभ कां शकुन । आतां आवगेन राहिलेति ॥ १ ॥
नाहीं मागतली वचनाची जोडी । निष्काम रोकडी वरिवरि ॥२॥
सत्याविण काय उगीच लांबणी । कारियाची वाणी येर भूस ॥३॥
तुका ह्मणे ऐसी कोणा चाळवणी । न विचारा मनीं पांडुरंगा ॥४॥

॥ ११४१ ॥

तुम्हां आह्मांसवें न पडावी गांठी । आलेति जगजेठी कळों आतां१॥
किती म्हणों आतां वाइटा वाइट । शिवों नये वीट आल्यावरी २॥
बोलिल्याची आतां हेचि पराचित । भीड भार थीत बुडवीला ॥३॥
तुका ह्मणे आली रोकडी प्रचिती । झांकणें तें किती कोठें देवा ४॥

॥ ११४२ ॥

काय तुज मागें नाहीं जाणवलें । माझें नाहीं केलें हित कांहीं ॥१॥
डोळे झांकुनिया हासी अबोलणा । तेव्हां नारायणा आतां कैसा २॥
न कळे उचित न सांगतां स्पष्ट । ऐसा क्रियानष्ट काय जाणे ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझा घात तुम्हां ठावा । तरि कां आधीं देवा वारूं नये४

॥ ११४३ ॥

कामक्रोध माझे लाधियेले पाठीं । बहुत हिंपुटी झालों देवा ॥ १ ॥
आवरितां तुझे तुज नावरती । थोर वाटे चित्तीं आश्चर्य हें ॥ २ ॥
तुझिया विनोदें आह्मां प्राणसाटीं । भयभीत पोटीं सदा दुःखी३॥
तुका ह्मणे माझ्या कपाळाचा गुण । तुला हांसे कोण समर्थासी ४॥

॥ ११४४ ॥

पंचाग्निसाधन करूं धुम्रपान । काय तीर्थाटन करूं सांग ॥ १ ॥
सांग कोणे देशीं आहे तुझें गांव । येऊनियां धांव येऊं तेथें ॥ २ ॥
सांग कांहीं वृत्त कोण करूं व्रत । जेणें कृपावंत होसील तू ॥ ३ ॥
वाटत शेवटीं झालासी निष्ठुर । न देसी उत्तर तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ११४५ ॥

उपजों मरों हे तों आमची मिरासी । हें तूं निवारिसी तरी थोर ॥१॥
उभा राहीं करीं खरा खोटा वाद । आह्मी झालों निंद्य लंडीपणें ॥२॥
उभयतां आहे करणें समान । तुह्मां ऐसा ह्मणे मीही देवा ॥३॥
तुका ह्मणे हातीं सांपडलें वर्म । अवघाचि भ्रम फेडिन आतां ॥४॥

॥ ११४६ ॥

तुझें नाम मुखीं तयासी विपत्ति । आश्चर्य हें चित्तीं वाटतसे ॥१॥
काय जाणों देवा होसील निजला । नेणों जी विठ्ठला मायबापा ॥२॥
भवबंधनाचे तुटतील फांसे । तें कां येथें असे अव्हेरिलें ॥३॥
तुका ह्मणे माझें दचकलें मन । वाटे वायाविण श्रम केला ॥४॥

॥ ११४७ ॥

आह्मी बळकट झालों फिराउनी । तुमच्या वचनीं तुह्मां गोऊं ॥१॥
झालें तेव्हां झालें मागील तें मागें । आतां वर्म लागे ठायीं झालीं ॥२॥
तोडावया अवघ्या चेष्टांचा संबंध । शुद्धापाशीं शुद्ध बुद्ध व्हावें ॥३॥
तुका ह्मणे आह्मां आतमत्वाची सोय । आपणचि होय तैसाचि तूं ४॥

॥ ११४८ ॥

क्षर अक्षर हे तुमचे विभाग । काऱ्यानें जग दूरी धरा ॥ १ ॥
तैसें आह्मी नेणों पालटांच कांहीं । त्यागित्याची नाहीं मागें चाड २
प्रतिपादितां तूं समविषमाचा । प्रसाद तो याचा पापपुण्य ॥ ३ ॥
तुका म्हणे तुह्मां नाना अवगणी । लागे संपादणी लटिक्याची ॥४॥

॥ ११४९ ॥

निर्गुणाचे घ्यावें गुणासी दर्शन । एकाएकीं भिन्न भेद घडे ॥ १ ॥
तुह्मां आह्मां आतां न पडे यावरी । आहों तोंच वरी जेथें तेथें ॥२॥
आपणापासुनी नसावें अंतर । वेचिलें उत्तर ह्मणउनी ॥ ३ ॥
तुका ह्मणे अंगा आली कठिणता । आमच्या अनंता तुह्मां ऐसी ॥४॥

॥ ११५० ॥

सेवकासी आज्ञा निरोपासी काम । स्वामीचे ते धर्म स्वामी जाणे १
मनाचिये मुळीं रहावें बैसोन । आकर्षावे गुण पायांपाशीं ॥ २ ॥
भेटीचे तांतडी करितसें लाहो । ओंगळाचा देहो ऐसें वाटे ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझें करावें कारण । आपुलें जतन ब्रीद करा ॥ ४ ॥

॥ ११५१ ॥

आह्मी भाविकें हे काय जाणों खोडी । आडकोनि ग्रौढी चिनाविलें १॥
नाहीं ऐसें येथें जालेती असतां । वाढविली चिंता अधिक सोसें २॥
न कळेचि आधीं करितां विचार । न धरितां धीर आहाच्छता ॥३॥
तुका म्हणे आतां वचनें वचन । वाढल तीक्षण बुद्धि झाली ४

॥ ११५२ ॥

नये ऐसें बोलों कठिण उत्तरें । सलगी लेंकुरें केली पुढें॥ १ ॥
अपराध कीजे घडला तो क्षमा । शिकवा उत्तमा आमुचिया ॥२॥
धरूं धावे आगी पोळेल तें नेणे । ओढिलिया होणें माते बाळा ३॥
तुका ह्मणे भार ज्याचा जार त्यासी। प्रवीण येविशीं असा तुम्ही ४

॥ ११५३ ॥

पापी ह्मणों तरि आठवितों पाय । दोष बळी काय तयाहूनि ॥१॥
ऐशा विचाराची घालूनि कोंडणी । काय चक्रपाणी पहातोशी २॥
एकवेळ जेणें पुत्राच्या उद्देशें । घेतल्याचें कैसें नेलें दुःख ॥ ३ ॥
तुका ह्मणे अहो वैकुंठनायका । चिंता कां सेवका तुमाचिया ॥४॥

॥ ११५४ ॥

कवणाशीं भांडों कवण माझें साहे । कोण मज आहे तुजविण १ ॥
धरिलें उदास दुरदुरांतरें । सांडी एकसरें केली माझी ॥ २ ॥
आइकोन माझे नाइकसी बोल । देखोनिया खोळ बुंथी घेसी ॥३॥
तुका ह्मणे एका गांवींची वसती । ह्मणऊनि खंती वाटे देवा ॥४॥

॥ ११५५ ॥

तरले ते मागें आपुलिया सत्ता । कमाई अनंता करूनिया ॥ १ ॥
उसणें फेडितां धर्म तेथें कोण । ते तुज अनन्य तुह्मी त्यांसी ॥२॥
मज ऐसा कोण सांगा वाया गेला । तो तुह्मी तारिला पांडुरंगा३॥
तुका ह्मणे नामासारिखी करणी । न देखें हें मनीं समजावें ॥ ४ ॥

॥ ११५६ ॥

तुज जाणें तान्हे नाहीं पांडुरंगा । कां जी मज सांगा उपेक्षिलें ॥१॥
तुज ठावें होतें पातकी मी खरा। आधींच कां थारा दिधला पायीं२॥
अंक तो पडिला हरिचा मी दास । भेद पंगतीस करूं नये ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मी जिंतिलें तें खरें । आतां उणें पुरें तुह्मां अंगीं ॥४॥

॥ ११५७ ॥

विनवितों तरी आणितोसि परी । याचकानें थोरी दातयाची ॥ १ ॥
आमुचेही कांहीं असो द्या उपकार। एकल्यानें थोर कैंचे तुह्मी ॥ २ ॥
नयावीजी कांहीं बहु साल सेवा । गौरव ते देवा यत्न कीजे ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं आमुची मिरासी। असावेंसी ऐसीं दुबळींचि ॥ ४ ॥

॥ ११५८ ॥

सेवकें करावें सांगितलें काम । सिक्याचा तो धर्म स्वामी राखे॥१॥
काय देवा नेणों आलें गांडेपण । तुह्मी शक्तिहीन झालें दिसां ॥२॥
विष्णुदास आह्मी निर्भर ज्या बळें । ते दिसे या काळें अव्हेरिलें॥३॥
तुका ह्मणे मूळ पाठवा लौकरी । किंवा करूं हरी काय सांगा ॥ ४ ॥

॥ ११५९ ॥

करावा उद्धार हें तुह्मां उचित । आह्मी केली नीत कळली ते ॥ १ ॥
पाववील हाक धांवा ह्मणऊन । करावें जतन ज्याचे तेणें ॥ २ ॥
दुश्चितासी बोल ठेवायासी ठाव । ऐसा आह्मी भाव जाणतसों ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझें कायावाचामन । दुसरें तें ध्यान करित नाहीं ॥ ४ ॥

॥ ११६० ॥

आतां नको चुकों आपुल्या उचिता । उदारा या कांता रखुमाईच्या १
आचरावे दोष हें आह्मां विहित । तारावे पतित तुमचे ते ॥ २ ॥
आह्मी तों आपुलें केलेसें जतन । घडो तुह्मांकडून घडेल तें ॥ ३ ॥
तुका ह्मणे विठो चतुराच्या राया । आहे तें कासया मोडों देसी ४ ॥

॥ ११६१ ॥

आदि वर्तमान जाणसी भविष्य । मागें पुढें नीस संचिताचा ॥ १ ॥
आतां काय देऊं पायांपें परिहार । जाणा तो विचार करा देवा ॥ २ ॥
आपुलें तें येथें काय चाले केलें । जोडावे ते भले हात पुढें ॥ ३ ॥
तुका ह्मणे फिके बोल माझे वारा । कराल दातारा होईल तें ॥ ४ ॥

॥ ११६२ ॥

स्वप्नीचें हें धन हातीं ना पदरीं । प्रत्यक्ष कां हरि होऊं नये ॥ १ ॥
आजुनि कां करा चाळवाचाळवी । सावकाशें द्यावी सत्य भेटी ॥ २ ॥
बोलोनिया फेडा जीवींचि काजळी । पाहेन कोमळीं चरणांबुजें ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझ्या जीवींचिया जीवा । सारूनिया ठेवा पडदा आतां ४

॥ ११६३ ॥

आपुल्या आपण उगवा लिगाड । काय माझें जड करुन घ्याल ॥ १ ॥
उद्धाराशी काय उधाराचें काम । वाढवूंचि श्रम नये देवा ॥ २ ॥
करा आतां मजसाठीं वाड पोट । ठाव नाहीं तंट झाले लोकीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे बाकी झडलियावरी । न पडें व्यवहारीं संचिताचे ॥ ४ ॥

॥ ११६४ ॥

पुढिलांचे सोयी माझ्या मना चाली । मताची आणिली नाहीं बुद्धी १
केलासी तो उभा आजिवरी संतीं । धरविलें हातीं कट देवा ॥ २ ॥
आहे तेंची मागों नाहीं खोटा चाळा । नये येऊं बाळा लेंकरासीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझा साक्षीचा व्यवहार । कृपण जी थोर परी तुह्मी ॥ ४ ॥

॥ ११६५ ॥

काया वाचा मनें श्रीमुखाची वास । आणीक उदास विचारासी १
काय आतां मोक्ष करावा जी देवा । तुमचिया गोवा दर्शनासी २
केलिया नेमासी उभे ठाडे व्हावें । नेमलें तें भावें पालटेना ॥ ३ ॥
तुका ह्मणे जों जों कराल उशीर । तों तों मज फार रडवील ॥ ४ ॥

॥ ११६६ ॥

आतां अवश्यक करणें समाधान। पाहिलें निर्वाण न पाहिजे ॥१॥
केलें तरी आतां सुशोभ्य करावें। दिसतें बरवें संतांमधीं ॥२॥
नाहीं भक्तराजी ठेविला उद्धार। नामाचा आकार त्यांचियानें ॥३॥
तुका ह्मणे माझ्या वडिलांचें ठेवणें। गोप्य नारायणें न करावें ॥४॥

॥ ११६७ ॥

समर्थपणें हे करा संपादणी। नसतेंचि मनीं धरिल्याची ॥ १ ॥
दुसऱ्याचें येथें नाहीं चालों येत। तरी मी निवांत वाट पाहें ॥ २ ॥
खोटियाचें खरें खरियाचें खोटें। मानलें गोमटें तुह्मांसी तें ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुह्मांसवें करितां वाद। होईजे तें निंद्य जनीं देवा ॥४॥

॥ ११६८ ॥

आइकिली कीर्ति संतांच्या वदनीं। तरि हें टाकोनि आलों स्थळ १
मागिला पुढिला करावें सारिखें। पालटों पारिखें नये देवा ॥२॥
आह्मांसी विश्वास नामाचा आधार। तुटतां हे थार उरी नाहीं ॥३॥
तुका ह्मणे येथें नसावेंचि दुजें। विनंती पंढरिराजे परिसावी हे ॥४॥

॥ ११६९ ॥

केचें भांडवल खरा ह्मातीं भाव। कळवळयानें माव दावीतसें ॥१॥
आतां माझा अंत नको सर्वजाणा। पाहों नारायणा निवडूनि ॥२॥
संतांचें उच्छिष्ट मागिले पंगती। करावें संगती लागे ऐसें ॥३॥
तुका ह्मणे आलों दावूनि विश्वास। संचित तें नास पावे ऐसें ॥४॥

॥ ११७० ॥

न व्हावा तो बरा मुळींच संबंध। विश्वासिकां वध बोलिलासे १॥
आतां माझें हित काय तें विचारा। सत्यत्वें दातारा पांडुरंगा २ ॥
नाहीं भाव परी ह्मणवितों दास। नका देऊं यास उणें येऊं ॥ ३ ॥
तुका ह्मणे कां हो उद्धरितां दीन। मानीतसां सीण मायबापा ४ ॥

॥ ११७१ ॥

कासया वांचूनि झालों भूमी भार। तुझ्यापायीं थार नाहीं तरी १
जातां भलें काय डोळियांचें काम। जंव पुरुषोत्तम न देखती ॥२॥
काय सुख पेंव श्वापदांचें धांव। नित्य तुझें नांव नुच्चारितां ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां पांडुरंगाविण। न वांचतां क्षण जीव भला ॥४॥

॥ ११७२ ॥

तुह्मांसाठीं आह्मां आपुला विसर। करितां अव्हेर कैसें दिसे ॥ १ ॥
विचाराजी आतां ठायींचें हे देवा। आह्मां नये हेवा वाढवितां ॥२॥
आलों टाकोनिया सुखाचीं वसती। पुढें माझ्या युक्ति खुंटलिया ३
तुका ह्मणे झाला सकळ वृत्तांत। केला प्रणिपात ह्मणऊनि ॥ ४ ॥

॥ ११७३ ॥

जेथें माझी दृष्टि राहिली बैसोन । तेथेंचि हें मन गुंडाळतें ॥ १ ॥
टाळावी ते पीडा आपुल्यापासून । दिठावलें अन्न ओकवितें ॥ २ ॥
तुह्मांसी कां कोडें कोणेही विशीचें । नवलाव याचें वाटतसे ॥ ३ ॥
तुका ह्मणे वेगीं उभारा जी कर । कीर्त मुखें थोर गर्जईन ॥ ४ ॥

॥ ११७४ ॥

नव्हें मी आहाच आशेचें बांधलें । जें हें टोंकविलें नारायणा ॥ १ ॥
अंतर तें तुम्हां बरें कळों येतें । वेव्हार उचितें चाळवीजे ॥ २ ॥
मनें कल्पिलें आवरितां पाप । संकल्पीं विकल्प याचि नांवें ॥ ३ ॥
तुका ह्मणे आम्हां न सोसे जळजळ । शिजल्यावरी जाळ कड खोटा ४

॥ ११७५ ॥

तुझिया विनोदें आम्हांसी मरण । सोशियेला सीण बहु फेरे ॥ १ ॥
आतां आपणचि येसीं तें करीन । नाम हें धरीन तुझें कंठीं ॥ २ ॥
वियोगेंचि आलों उसंतीत वनें । संकल्प हे मनें वाहोनिया ॥ ३ ॥
तुका म्हणे वर्म सांपडलें सोपें । गोवियेलों पापें पुण्यें होतों ॥ ४ ॥

॥ ११७६ ॥

धरूनिया मनीं बोलिलों संकल्प । होसी तरी बाप सिद्धी पाव ॥ १ ॥
उत्कंठा हे आजी झाली माझे पोटीं । मोकलिली गोष्टी टाळाटाळ २
माझा मज असे ठाउका निर्धार । उपाधि उत्तर न साहे पैं ॥ ३ ॥
तुका म्हणे जरी दिली आठवण । तरि अभिमान धरीं याचा ॥ ४ ॥

॥ ११७७ ॥

ऐका जी देवा माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥
सन्निध पातलों सांडुनिया शंका । सन्मुखचि एकाएकीं पुढें ॥ २ ॥
जाणविलें कोठें पावे पायांपाशीं । केली या जिवाशीं साटीं म्हूण ३
तुका ह्मणे माझे हातीं या उद्धार । करीं करकर म्हणवूनि ॥ ४ ॥

॥ ११७८ ॥

आतां गुण दोष काय विचारिसी । मी तो आहें रासी पातकांची ॥ १ ॥
पतितपावनासवें समागम । आपुलाला धर्म चालवीजे ॥ २ ॥
घनघायें भेटी लोखंड परिसा । तरी अनारिसा न पालटे ॥ ३ ॥
तुका ह्मणे माती कोण पुसे फुका । कस्तुरीच्या तुका समागमें ॥ ४ ॥

॥ ११७९ ॥

सांडावी हे भीड अधमाचे चाळे । मद्यपी बरळे भलत्या छंदें ॥ १ ॥
ऐसे तंव तुह्मी नाहीं जी दिसत । कां हें अनुचित वदलेत ॥ २ ॥
फांटा झाला त्यासी नाहीं वोढा वारा । वेरसाचि खरा हाटो गुण ३
तुका ह्मणे नाहीं ज्याच्या बापा ताळा । तो देखे विटाळा संतां अंगीं ४

॥ ११८० ॥

करावा उद्धार किंवा द्यावी हारी । एका बोला स्थिरी राहें देवा १
निरसनें माझा होईल संदेह । अवघेंचि आहे मूळ पायीं ॥२॥
राहिलों चिकटून कांहींचि न कळे । कोणा नेणों काळें उदय भाग्य ३
तुका ह्मणे बहु उद्वेगला जीव । भाकीतसें कीव देवराया ॥ ४ ॥

॥ ११८१ ॥

काशासाठीं आह्मी जाळिला संसार । न करा विचार ऐसा देवा १
कैसें नेणों तुह्मां करवतें उदास । माझा प्रेमरस भंगावया ॥ २ ॥
समर्पूनि ठेलों देह हा सकळ । धरितां विटाळ न लजा माझा ३
तुका ह्मणे अवघी मोकलूनि आस । फिरतों उदास कोणासाठीं ४

॥ ११८२ ॥

झड मारोनिया बैसलों पंगती । उठवितां फजिती दातयाची ॥ १ ॥
काय तें उचित तुम्हां कां न कळे । कांहो झांका डोळे पांडुरंगा ॥२॥
घेईन इच्छेनें मागोनि सकळ । नाहीं नव्हे काळ बोलायाचा ॥३॥
तुका ह्मणे झालों माना अधिकारी । नाहीं लोक परी लाज देवा ॥४॥

॥ ११८३ ॥

काय तें सामर्थ्य न चले या काळें । काय झालां बळें शक्तिहीण ॥१॥
माझिया संचितें आणिलासी हरी । झालें तुजवरी वरिष्ठ तें ॥२॥
काय गमाविली सुदर्शन गदा । त्या भेणें गोविंदा लाजतसां ॥३॥
तुका ह्मणे काय ब्रिदाचें तें काम । सांडी परतें नाम दिनानाथा ॥४॥

॥ ११८४ ॥

करावा कांठाळा नव्हे हें उचित । अर्धीच कां प्रीत लावियेली ॥ १ ॥
जाणतसां तुम्हीं रूपाचें लाघव । आपुलाले जीव घेतें ऐसा ॥ २ ॥
काय म्हणऊनि आलेती आकारा । आम्हां उजगरा करावया ॥३॥
तुका ह्मणे भीड होती आजिवरी । आतां देवा उरी कोण ठेवी ॥४॥

॥ ११८५ ॥

संदेह निरसे तरि रुचिकर । फिक्यासी आदर चवी नाहीं ॥ १ ॥
आतां नको मज खोट्यानें फटवूं । कोठें येऊं जाऊं वेळोवेळां ॥२॥
गेला तरि काय जीवाचें सांकडें । वांचउनि पुढें काय काज ॥ ३ ॥
तुका ह्मणे कसीं निवडा जी बरें । केलीं तैसीं पोरें आळी पायीं ॥४॥

॥ ११८६ ॥

काय उणें झालें तुज समर्थासी । ऐसा मजपाशीं कोण दोष ॥ १ ॥
जो तूं माझा न करिसी अंगीकार । सांगेन वेव्हार संतांमधीं ॥ २ ॥
तुजविण रत आणिकांचे ठायीं । ऐसें कोण ग्वाही दावीं मज ॥३॥
तुका ह्मणे काय धरुनी गुमान । सांग उगवून पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ११८७ ॥

प्रीतिभंग माझा केला पांडुरंगा । भक्तिरस सांगा कां जी तुम्ही १॥
म्हणउनि कांहीं न ठेवींचि उरी । आलों वर्मावरी एकाएकीं ॥ २॥
न देखोंचि कांहीं परती माघारी । उरली ते उरी नाहीं मुळीं ॥३॥
तुका म्हणे आला अंतरासी खंड । तरि माझें तोंड खवळिलें ॥४॥

॥ ११८८ ॥

आहे तेंचि आम्ही मागों तुजपाशीं । नव्हों तुज ऐशीं क्रियानष्टें १॥
न बोलावीं वर्में तोंच बरें दिसे । प्रकट ते कैसे गुण करूं ॥ २ ॥
एका ऐसें एका द्यावयाचा मोळा । कां तुह्मा गोपाळा नाहीं ऐसा ३
तुका म्हणे लोकां नाहीं कळों आलें। करावें आपुलें जतन तों ॥४॥

॥ ११८९ ॥

तुह्मां होईल देवा पडला विसर। आह्मीं ते उत्तर यत्न केले ॥ १ ॥
पतितपावन ब्रीदें मिरविसीं । याचा काय देसी झाडा सांग ॥ २॥
आहाच मीं नव्हें अर्थाचें भुकेले । भलत्या एका बोलें वारेन तें ॥३॥
तुका ह्मणे देह देईन सांडणें । सहित अभिमानें ओवाळूनि ॥ ४ ॥

॥ ११९० ॥

मज ऐसें कोण उद्धरिलें सांगा । ब्रीदें पांडुरंगा बोलतसां ॥ १ ॥
हातींच्या कांकणां कासया आरसा । उरलों मी जैसा तैसा आहें २
धन्वंतरी हरी रोग्याचिये वेथे । तें तों कांहीं येथें न देखिजे ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं अनुभव अंगें । वचन वाउगें कोण मानी ॥ ४ ॥

॥ ११९१ ॥

कळों नये तोंचि चुकावितां बरें । मग पाठमोरें काय काज ॥ १ ॥
धरिलेति आतां द्या जी माझा डाव । सांपडतां भाव ऐसा आहे ॥२॥
होतासी अंतरें झाकिलिया डोळीं । तो मी हा न्याहाळीं धरुनी दृष्टी ३
तुका ह्मणे तुज रडीचीच खोडी । अहाच बराडी तो मी नव्हें ॥४॥

॥ ११९२ ॥

आमुचिया भावें तुज देवपण । तें कां विसरोन राहिलासी ॥ १ ॥
समर्थासी नाहीं उपकार स्मरण । दिल्या आठवण वांचोनिया ॥२॥
चळण वळण सेवकाच्या बळें । निर्गुणाचे मुळें सांभाळावें ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां आलों खंडावरी । प्रेम देउनि हरी बुझवावें ॥ ४ ॥

॥ ११९३ ॥

जे दोष घडले न फिटे करितां कांहीं । सरते तुझ्या पायीं झाले तैसे १
माझा कां हो करूं नये अंगीकार । झालेती निष्ठुर पांडुरंगा ॥ २ ॥
यातिहीन नये ऐको ज्या वेद । तया दिलें पद वैकुंठींचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे कां रे एकाचा आभार । घेसी माथां भार वाहोनिया ॥४॥

॥ ११९४ ॥

ह्मणऊनी दास नव्हे ऐसा झालों । अनुभवें बोलों स्वामीपुढें ॥ १ ॥
कां नाहीं वचन प्रतिउत्तराचें । मीच माझ्या वेचें अट्टाहासें ॥ २ ॥
कासयानें गोडी उपजावा विश्वास । प्रीती कांहीं रस वांचुनिया ३॥
तुका ह्मणे अगा चतुरा शिरोमणी । विचारावें मनीं केशीराजा ॥४॥

॥ ११९५ ॥

नाहीं उल्लंघिलें कोणाचें वचन । मज कां नारायण दुरी झाला ॥१॥
अशंकितें मनें करीं आळवण । नाहीं समाधान निश्चितीचें ॥ २ ॥
दासाचा विसर हें तों अनुचित । असे सर्व नीत पायांपाशीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुह्मा लाज येत नाहीं । आह्मा चिंताडोहीं बुडावितां ॥४॥

॥ ११९६ ॥

धिग जिणें त्याचा स्वामी हीनवर । मरण तें वर भलें मग ॥ १ ॥
आइका जी देवा ऐसी आहे नीत । काय तें उचित सांभाळावें ॥२॥
देशोदेशीं धाक जयाच्या उत्तरें । तयाचे कुतरें परि भले ॥ ३ ॥
तुका ह्मणे हें कां सुचलें उत्तर । जाणोनी अंतर ओळखावें ॥ ४ ॥

॥ ११९७ ॥

उचित तें काय जाणावें दुर्बळें । थोरिवेचें काळें तोंड देवा ॥ १ ॥
देतों हाका कोणी नायकती द्वारीं । ओस कोणी घरीं नाहीं ऐसें २ ॥
आलिया अतीता शब्द समाधान । करितां वचन काय वेंचे ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुह्मा साजे हें श्रीहरी । आह्मी निलाजरीं नाहीं ऐसीं ॥४॥

॥ ११९८ ॥

जगीं मान्य केलें हा तुझा देकार । कीं कांहीं विचार आहे पुढें ॥१॥
करितों कवित्व जोडितों अक्षरें । येणें काय पुरें झालें माझें ॥ २ ॥
तोंवरि हे माझी न सरे करकर । जो नव्हे विचार तुझ्या मुखें ॥३॥
तुका ह्मणे तुज पुंडलिकाची आण । जरी कांहीं वचन करिसी मज ४

॥ ११९९ ॥

काय तुमाचिया सेवे न वेचते,गांठोळी । मोहें टाळाटाळी करीतसां १
चतुराच्या राया आहो पांडुरंगा । ऐसें तरी सांगा निवडूनि ॥२॥
कोण तुम्हां सुख असे या कौतुकें । भोगितां अनेकें दुःखें आम्हीं ३
तुका ह्मणे काय झालासी निर्गुण । आम्हा येथें कोण सोडवील॥४॥

॥ १२०० ॥

आमच्या कपाळें तुज ऐसी बुद्धि । धरावी ते शुद्धी योगा नये ॥१॥
काय या राहिलें विनोदावांचून । आपुलिया भिन्न केलें आम्हा ॥२॥
कोठें मूर्तिमंत दावीं पुण्यपाप । काशासी संकल्प वाहाविसी ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां आवरावा चेडा । लटिकीच पीडा पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ १२०१ ॥

बहुता करूनि चाळवाचाळवी । किती तुह्मी गोवी करीतसा ॥ १ ॥
लागटपणें मी आलों येथवरी । चाड ते दुसरी न धरूनि ॥ २ ॥
दुजियाचा तव तुम्हांसी कंटाळा । राहासी निराळा एकाएकीं ॥३॥
तुका ह्मणे आतां यावरी गोविंदा । मजशीं विनोदा येऊं नये ॥ ४ ॥

॥ १२०२ ॥

तुम्ही बैसलेती निर्गुणाचे खोळे । आम्हां कां हे डोळे कान दिले ॥१॥
नायकवे तुझी अपकीर्ति देवा । अव्हेरिली सेवा न देखवे ॥ २ ॥
आपुले पोटीं तो राखियेला वाव । आम्हांसी कां भाव अल्प दिला ३
तुका ह्मणे दुःखी ऐसें हें कळो द्या । पुढिलिया धंद्या मन नेघे ॥ ४ ॥

॥ १२०३ ॥

निष्ठुर यासाठीं करितों भाषण । आहेसी तूं सर्व जाण दाता ॥ १ ॥
ऐसें कोण दुःख आहे निवारिता । तो मी जाऊं आतां शरण त्यासी२
बैसलासी कैणें करूनि एक घरीं । नाहीं येथें उरी दुसऱ्याची ॥ ३ ॥
तुका ह्मणे आलें अवघेंचि पायापें । आतां मायबापें उपेक्षावें ॥ ४ ॥

॥ १२०४ ॥

उचिताचा भाग होतो राखोनीया । दिसती ते वाया कष्ट गेले ॥१॥
वचनाची कांहीं राहेचि ना रुचि । खळा ऐसें वाची कुची जालें२॥
विश्वासानें माझें बुडविलें घर । करविला धीर येथवरी ॥ ३ ॥
तुका ह्मणे शेकीं थार नाहीं बुड । कैसें तुह्मी कोड पुरविलें ॥ ४ ॥

॥ १२०५ ॥

ताकें कृपण तो जेवूं काय घाली । आहाच ते चालीवरुनि कळे१॥
काय तुम्हां वेचे घातलें सांकडें । माझें आलें कोडें आजिवरि २॥
सेवेविण आह्मी न लिंपों हे काया । झाला देवराया निर्धार हा३॥
तुका ह्मणे तुझीं राखावया ब्रीदें । येणें अनुवादें कारियासी ॥ ४ ॥

॥ १२०६ ॥

वृत्तीवरि आह्मा येणें काशासाठीं । एवढी हे अटी सोसावया॥१॥
जाणतेसां परी नेणते जी देवा । भ्रमचि बरवा राखावा तो ॥ २ ॥
मोडुनि क्षरलों अभेदाची मूस । तुम्हा कां आळस वोडवला ॥३॥
तुका ह्मणे होई लवकरि उदार । लांबणीचें फार काम नाहीं ॥४॥

॥ १२०७ ॥

सुलभ कीर्तनें दिलें ठसावूनि । करितां धरणी उरी कोण ॥ १ ॥
आतां न टळावे केलिया नेमासी । उदाराचा होसी हीन काय ॥२॥
एका नेमें कोठें दुसरा पालट । पादर तो धीट ह्मणती त्यासी॥३॥
तुका ह्मणे किती बोलसील उणें । एकाच वचनें खंड करीं ॥ ४ ॥

॥ १२०८ ॥

देऊनिया प्रेम मागितलें चित्त । झाली फिटाफिट तुह्मा आह्मा १॥
काशानें उदार तुह्मासी म्हणावें । एक नेसी भावें एक देसी ॥ २॥
देऊनिया थोडें नेसील हें फार । कुंठिसी विचार अवघियांचा॥३॥
तुका ह्मणे आम्हा भांडवल चित्त । देउनी दुश्चित पाडियेलें ॥४॥

॥ १२०९ ॥

काय तुह्मी ऐसी वेंचते गांठोळी । माझी टाळाटाळी करीतसां ॥ १॥
चतुराच्या राया अहो पांडुरंगा । ऐसें तरि सांगा निवडूनि ॥ २ ॥
कोण तुह्मा सुख असे या कवतुकें । भोगितां अनेकें दुःखें आम्ही३
तुका ह्मणे काय झालासी निर्गुण । आह्मां येथें कोण सोडवील॥४॥

॥ १२१० ॥

बौध्यअवतार माझिया अदृष्टा । मौन्य मुखें निष्ठा धरियेली ॥ १ ॥
लोकांचियेसाठीं शाम चतुर्भुज । संतांसवें गुण बोलतसां ॥ २ ॥
आलें कलियुग माझिया संचिता । डोळां हाकलितां न पडेसी॥३॥
म्यांच तुझें काय केलें नारायणा । कां नये करुणा तुका ह्मणे ॥४॥

॥ १२११ ॥

तुजच पासाव झालोंसें निर्माण । असावें तें भिन्न कासयानें ॥ १ ॥
पहावा जी ठायीं करूनि विचार । न्यून कोठें फार असेचि ना २॥
ठेविलिये ठायीं आज्ञेचें पाळण । करूनि जतन राहिलोंसें ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां बोलतसें स्पष्ट । झालों क्रियानष्ट तुह्मापेसा॥४॥

॥ १२१२ ॥

ऐसें कां झालें तें मजही न कळे । कीर्तनाचे रळेपळे जगीं ॥ १ ॥
कैसें तुह्मां देवा वाटतसे बरें । संतांचीं उत्तरें लाजविलीं ॥ २ ॥
भाविका कंटक करिताती पीडा । हा तंव रोकडा अनुभव ॥ ३ ॥
तुका म्हणे नाम निर्वाणीचा वाण । याचा अभिमान नाहीं तुम्हा ४

॥ १२१३ ॥

सांगावें तें बरें असतें हें पोटीं । दुःख देतें खोटी बुद्धि मग ॥ १ ॥
आपला आपण करावा वेव्हार । जिंकोनि अंतर मन ग्वाहीं ॥ २ ॥
नाहीं मागें येत बोलिलें वचन । पावावा तो सीण वरा मग ॥ ३ ॥
तुका म्हणे बहु म्यालों खटपटे । आतां देवा खोटे शब्द पुरे ॥४॥

॥ १२१४ ॥

कां हो तुम्ही माझी वदविली वाणी । नेदा हे निवडुनि पांडुरंगा १
आणीक म्यां कोणां पुसावा विचार । समुळीं संसार दुराविला २॥
स्वामिसेवा म्हूण घेतली पदरीं । सांगितलें करीं कारण तें ॥ ३ ॥
तुका म्हणे नाहीं शिकविलें जेणें । तो याच्या वचनें उगा राहे ४॥

॥ १२१५ ॥

माझा तुम्ही देवा केला अंगिकार । हें मज साचार कैसें कळे ॥१॥
कांहो कांहीं माझ्या नये अनुभवा । विचारितां देवा आहे तैसा॥२॥
लौकिकाचा मज लाविसी आभार । शिरोरत्नभार दुःखाचा हा ३
तुका म्हणे नाहीं पालट अंतरीं । तेथें दिसे हरी ठकाठकी ॥ ४ ॥

॥ १२१६ ॥

केलें तरी आतां साचचि करावें । विचारिलें द्यावें कृपादान ॥ १ ॥
संकल्पासी नाहीं बोलिले विकल्प । तुम्हां पुण्यपाप कळे देवा॥२॥
उदार शक्ति तंव तुमची भूमंडळीं । ऐसी ब्रीदावळी गर्जतसे ॥३॥
तुका म्हणे अहो रखुमादेवीवरा । उपरोध कां धरा माझा आतां॥४॥

॥ १२१७ ॥

माझी मज जाती आवरली देवा । नव्हता या गोवा इंद्रियांचा १॥
कासया मी तुझा म्हणवितों दास । असतों उदास सर्व भावें ॥२॥
भयाचिये भेणें धरियली कास । न पुरतां आस काय थोरी ॥ ३ ॥
तुका म्हणे आपआपुलीं जतन । कैचें थोरपण मग तुझा ॥ ४ ॥

॥ १२१८ ॥

निर्दयासी तुम्ही करितां दंडण । तुमचें गाऱ्हाणें कोठें द्यावें ॥ १ ॥
भाकितों करुणा ऐकतां कान । उगलेंचि मौन्य धरिलें ऐसें ॥ २ ॥
दीनपणें पाहें पाय भिडावोनि । मंजुळा वचनीं विनवितसें ॥ ३ ॥
तुका ह्मणे गांठी मनाची उकला । काय जी विठ्ठला पाहातसा ॥४॥

॥ १२१९ ॥

आमुचे ठाउके तुम्हा गर्भवास । बळिवंत दोष केले भोग ॥ १ ॥
काय हा सांगावा नसतां नवलाव । मैंदपणें भाव भुलवणेचा ॥ २ ॥
एका पळवूनि एका पाठी लावा । कवतुक देवा पाहावया ॥ ३ ॥
तुका ह्मणे जेणें ऐसें चेतविलें । त्याच्यानें उगलें कैसें नव्हे ॥४॥

॥ १२२० ॥

द्या जी माझा विचारोनिया विभाग । न खंडे हा लाग आहाचपणें १
किती नेणो तुह्मा साहाते कटकट । आम्हीच वाईट निवडलों ते २॥
करितां कलह जिवाचियेसाठीं । हे तुह्मा वोखटी ढाळ देवा ॥३॥
तुका ह्मणे धीर कारण आपला । तुह्मी तो विठ्ठला मायातीत ॥४॥

॥ १२२१ ॥

आलिया अतीता ह्मणतसा पुढारें । आपुलें रोकडें सत्त्व जाय ॥१॥
काय त्याचा भार घेऊनि मस्तकीं । हीनकर्मी लोकीं म्हणावया ॥२॥
दारीं हाका कैसें करवतें भोजन । रुचा तरि अन्न कैसें देतें ॥३॥
तुका ह्मणे ध्वज उभारिला कर । ते शक्ति उदार काय झाली ॥४॥

॥ १२२२ ॥

येणें झाला तुमचे पोतडीचा झाडा । केलासी उघडा पांडुरंगा॥१॥
भरूनिया घरीं राहिलों वाखती । आपुली निश्चिती आपल्यापें २
आतां काय उरी उरली ते सांगा । आणिलेति जगाचिये साक्षी३॥
तुका ह्मणे कोठें पाहों जासी आतां । माझी झाली सत्ता तुम्हांवरी४॥

॥ १२२३ ॥

नाहीं भ्यालों तरी पावलों या ठाया । तुम्हा आळवाया जवळिके१॥
सत्ताबळें आतां मागेन भोजन । केलें तें चिंतन आजिवरी ॥ २ ॥
नवनीतासाठीं खादला हा जीव । थोड्यासाठीं कीव कोण करी३॥
तुका ह्मणे ताक नलगे हे घाटे । पांडुरंगा खोटें चाळवण ॥ ४ ॥

॥ १२२४ ॥

हरि तूं निष्ठुर निर्गुण । नाहीं माया बहु कठिण । नव्हे तें करिसी आन । कवणें नाहीं केलें तें ॥ १ ॥ घेऊनि हरिश्चंद्राचें वैभव । राज्य घोडे भाग्य सर्व । पुत्र पत्नी जीव । डोंबाघरीं वोपविलीं २॥ नळा दमयंतीचा योग । विघडिला त्यांचा संग । ऐसें जाणे जग । पुराणेंही बोलती ॥ ३ ॥ राजा शिबी चक्रवर्ती । कृपाळु दयाळु भूतीं । तुळविलें अंतीं । तुळें मास तयाचें ॥ ४ ॥ कर्ण भिडतां समरंगणीं । बाणीं व्यापियेला रणीं । मागसी पाडोनी । तेथें दांत तयाचे ॥ ५ ॥ बळी सर्वस्वें उदार । जेणें उभारिला कर । करुनि काहार । तो पाताळीं घातला ॥ ६ ॥ श्रियाळाच्या घरीं । धरणें मांडिलें मुरारी । मारविलें करीं । त्याचें बाळ त्या हातीं ॥ ७ ॥ तुज भावें जे भजती । त्यांच्या संसारा हे गति । ठाव नाहीं पुढती । तुका ह्मणे करिसी तें ॥ ८ ॥

॥ १२२५ ॥

आह्मी भाव जाणों देवा । न कळती तुझिया भावा । गणिकेचा कुढावा । पतना न्यावा दशरथ ॥ १ ॥ तरी म्यां काय गा करावें । कोण्या रीती तुज पावे । न संगतां ठावे । तुझाचिण न पडे ॥ २ ॥ दोनी फांकलिया वाटा । गोवी केली घटापटा । नव्हे धीर फाटा । आड रानें भरती ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझे डोळे । तुझे देखती हे चाळे । आतां येणें वेळे । चरण जीवें न सोडीं ॥ ४ ॥

॥ १२२६ ॥

दुर्बळाचें कोण । ऐके घालुनिया मन । राहिलें कारण । तयावांचूनि काय तें ॥ १ ॥ कळों आलें अनुभवें । पांडुरंगा माझ्या जीवें । न सांगतां ठावे । पडे चर्या देखोनि ॥ २ ॥ काम क्रोध माझ्या देहीं । भेदाभेद गेले नाहीं । होतें तेथें काहीं । तुज कृपा

कारिता ॥ ३ ॥ हें तो नव्हे उचित । उपेक्षावें शरणागत । तुका ह्मणे रीत । तुमची आज्ञा न कळे ॥ ४ ॥

॥ १२२७ ॥

आह्मी शक्तिहीनें । कैसें कराल तें नेणें । लिगाडाच्या गुणें । खोळंबला राहिलों ॥ १ ॥ माझें मज देई देवा । असे ठेविला तो ठेवा । नाहीं करीत हेवा । कांहीं अधिक आगळा ॥ २ ॥ नाहीं गळां पडलों झोंड । तुमचें तेंचि माझें तोंड । चौघां चार खंड । लांबणी हे अनुचित ॥ ३ ॥ नाहीं येत बळा । आतां तुम्हासी गोपाळा । तुका म्हणे गळा । उगवा पायां लागतों ॥ ४ ॥

॥ १२२८ ॥

कां हो वाढवितां देवा । मज घरीं समजावा । केवढा हो गोवा । फार केलें थोडयाचें ॥ १ ॥ ठेवीन पायांवरी डोई । यासी तुमचें वेचे काई । झालों उतराई । जाणा एकएकाचे ॥ २ ॥ निवाड आपणियांपाशीं । असोन कां व्हावें अपेसी । होती गांठी तैसी । सोडूनिया ठेविली ॥ ३ ॥ तुका ह्मणे गोड । होतें झालिया निवाड । दर्शनेंही चाड । आवडीच वाढेल ॥ ४ ॥

॥ १२२९ ॥

जडलों अंगाअंगीं । मग ठेवीं प्रसंगीं । कांहीं उरी जोगी । लोकीं आहे पुरती १ ठेवीं निवारुनि आधीं । अवकाश तोचि बुद्धी । सांपडली संधी । मग बळ कोणासी ॥ २ ॥ गळा बांधोन पायीं । हालो नेदी ठायींचा ठायीं । निवाड तो तई । अवकळा केलिया ॥३॥ तुका म्हणे ठावे । तुम्ही असा जी बरवे । बोभाटाची सत्रें । मुळींहुनी विठोबा ४

॥ १२३० ॥

वेरझारीं झाला सीण । बहू केलें खेदक्षीण । भांडणासी दिन । आजी येथें फावला ॥१॥ आतां काय भीड भार धरूनियां लोकाचार । बुडवूनि वेव्हार । सरोबरी करावी ॥ २ ॥ आलें बहुतांच्या मना । कां रे न होसी शाहाणा । मुळींच्या वचना । आह्मी जागों आपुल्या ॥ ३ ॥ तुका ह्मणे चौघांमधीं । तुज नेलें होतें आधीं । आतां नाहीं मधीं । उरी कांहीं राहिली ॥ ४ ॥

॥ १२३१ ॥

पाहा किती आले । शरण समानचि केले । नाहीं विचारिले । गुण दोष कोणाचे ॥ १ ॥ मज सेवटींचा द्यावा । ठाव तयांचिये देवा । नाहीं करीत हेवा । कांहीं थोरपणाचा ॥२॥ नाहीं पाहिला आचार । कुळगोत्रांचा विचार । फेडूं आला भार । मग न म्हणे दगड ॥३॥ तुका म्हणे सर्व जाणा । तुझ्या आल्यावरि मना । केला तो उगाणा । घडल्या महादोषांचा ॥ ४ ॥

॥ १२३२ ॥

प्रीतीचा कलहे पदरासी घाली पीळ । सरो नेदी बाळ मागें पुढें पित्यासी ॥ १ ॥ काय लागे त्यासी बळ हेडावितां कोण काळ । गोवितें सबळ जाळीं स्नेहसूत्राचीं ॥ २ ॥ सलगी दिला लाड बोले तें तें वाटे गोड । करी बुझावोनि कोड हातीं देऊनि भातुकें ॥ ३ ॥ तुका ह्मणे बोल कोणा हें कां नेणां नारायणा । सलगीच्या वचन कैचें उपजे विषम ॥ ४ ॥

॥ १२३३ ॥

अनुभव तो नाहीं आमुचिया दर्शनें । अइकिलें कानें वदे वाणी । जेविल्याचा कैसा अनुभव अंतरीं । ह्मणतां मांडे पुरी काय होतें ॥ १ ॥ नाहीं नाहीं गेली तळमळ दातारा । कां जी हरिहरा चाळविलें ॥ २ ॥ पत्रीं कुशलता भेटी अन अनादर । काय तें उत्तर येइल मानूं । अंतरीं सबाह्यीं कां नाहीं सारिखें । धरूनि पारिखें वर्ततसां ॥ ३ ॥ आलों आलों ऐसी दाऊनिया आस । वाहीं बुडतयास काय द्यावें । तुका ह्मणे अहो चतुरा शिरोमणि । किती माझी वाणी तुह्मी कोठें ॥ ४ ॥

॥ १२३४ ॥

अमर तूं खरा । नव्हे कैसा मी दातारा ॥ १ ॥ चाल जाऊं संतापुढें । वाद सांगेन निवाडे ॥ २ ॥ तुज नांव जर नाहीं । तर माझें दाव काई ॥ ३ ॥ तुज रूप नाहीं । तर माझें दाव काई ॥ ४ ॥ खेळसी तूं लीळा । तेथें मी काय वेगळा ॥ ५ ॥ साच तूं लटिका । तैसा मीही म्हणे तुका ॥ ६ ॥

॥ १२३५ ॥

आतां बरें घरिच्याघरीं । आतली उरी आपणापें ॥ १ ॥ वाइट बरें न पडे दृष्टि । मग कष्टी होइजेना ॥ २ ॥ बोलों जातां वाढे बोल । वाया फोल खटपट ॥ ३ ॥ काकुलती यावें देवा । तों तों सेवा इच्छितो ॥ ४ ॥ हिशोबाचे खटखटे । चढे तुटे घडेना ॥ ५ ॥ तुका म्हणे कळों आलें । दुसरे भले तो नव्हे ॥ ६ ॥

॥ १२३६ ॥

दावूनिया कोणा कांहीं । तेचि वाहीं चाळविलीं ॥ १ ॥ तैसें नको करूं देवा । शुद्धभावा माझिया ॥ २ ॥ रिद्धिसिद्धी ऐसीं आड । येती नाड नागवूं ॥ ३ ॥ उदकाऐसी दावुनि ओढी । उर फोडी झळई ॥ ४ ॥ दर्पणींचे दिलें धन । दिसे पण चरफड ॥ ५ ॥ तुका म्हणे पायासाठीं । करितो आटी कळों द्या ॥ ६ ॥

॥ १२३७ ॥

झालों द्वारपाळ । तुझें राखिलें सकळ ॥ १ ॥ नाहीं लागों दिलें अंगा । आड ठाकलों मी जगा ॥ २ ॥ करूनिया नीति । दिल्याप्रमाणें चालती ॥३॥ हातीं दंड काठी । उभा जिवाचिये साठीं ॥४॥ बळ बुद्धी युक्ती । तुज दिल्या सर्व शक्ती ॥ ५ ॥ तुका ह्मणे खरा । आतां घेईन मुशारा ॥ ६ ॥

॥ १२३८ ॥

आपण काय सादर । विशीं आह्मां कां निष्ठुर ॥ १ ॥ केलें भक्त तैसें देई । तुझें प्रेम माझ्याठायीं ॥२॥ काय पंगतीस कोंडा । एकांतासी साकरमांडा ॥३॥ काय एकपण । पोतां घालूनि गांठी खूण ॥४॥ काय द्यावें तैसें । तया आपण अनारिसें ॥ ५ ॥ तुका ह्मणे संधीं । आतां तोडूं भेद बुद्धी ॥ ६ ॥

॥ १२३९ ॥

भक्तिऋण घेतलें माझें । चरण गाहाण आहेत तुझे ॥ १ ॥ प्रेमव्याज देई हरी । माझा हिशेब लवकरी करीं ॥ २ ॥ माझें मी न सोडीं धन । नित्य करितों कीर्तन ॥३॥ तुझे नामीं आहे खत । सुखें करीं पंचाईत ४ तुका ह्मणे गुरुडध्वजा । यासी साक्ष श्रीगुरुराजा ५॥

॥ १२४० ॥

नाहीं देणें घेणें । गोवी केली अभिमानें ॥ १ ॥ आतां कां हो निवडूं नेदां । पांडुरंगा येवढा धंदा ॥ २ ॥ पांचांमधीं जावें । थोड्यासाठीं फजित व्हावें ॥३॥ तुज ऐसीं नाहीं । पांडुरंगा आह्मी कांहीं ४ टाकूं तो वेव्हार । तुज बहु करकर ५ तुका ह्मणे आतां । निवडूं संतां देखतां ॥६॥

॥ १२४१ ॥

चित्त तुझ्या पायीं । ठेवुनि झालों उतराई ॥१॥ परि तूं खोटा केशीराजा । अंतपार न कळे तुझा ॥२॥ आह्मी सर्वस्वें उदार । तुज देऊनिया धीर ३ इंद्रियांची होळी । संवसार दिला बळी ४ न पडे विसर । तुझा आह्मा निरंतर ५ प्रेम एकासाटीं । तुका ह्मणे न वेचे गांठीं ॥६॥

॥ १२४२ ॥

देवा तुज मज पण । पाहों आगळा तो कोण ॥१॥ तरी साच मी पतित । तूंचि खोटा दिनानाथ ॥ २ ॥ ग्वाही साधुसंत जन । करुनि अंगीं लावीन ॥ ३ ॥ आह्मी धरिले भेदाभेद । तुज नव्हे त्याचा छेद ॥ ४ ॥ न चले कांहीं तुझें त्यास । आह्मी बळकाविले दोष ॥ ५ ॥ दिशा भरल्या माझ्या मनें । लपालासी त्याच्या भेणें ॥ ६॥ तुका ह्मणे चित्त । करी तुझी माझी नीत ॥ ७ ॥

॥ १२४३ ॥

बैसलोंसें दारीं । धरणें कोंडोनि भिकारी ॥ १ ॥ आतां कोठें

हालों नेदी । बरी सांपडली संदी ॥ २ ॥ किती वेरझारा । मागें घातलिया घरा ॥ ३ ॥ माझें मज नारायणा । देतां कां रे नये मना ॥ ४ ॥ भांडावें तें किती । बहु सोसिली फजिती ॥ ५ ॥ तुका ह्मणे नाहीं । लाज तुझे अंगीं कांहीं ॥ ६ ॥

॥ १२४४ ॥

संसाराच्या भेणें । पळों न लाहेसें केलें ॥ १ ॥ जेथें तेथें आपण आहे । आह्मी करावें तें काये ॥ २ ॥ एकांतीसी ठाव । तिहीं लोकीं नाहीं वाव ॥ ३ ॥ गांवा जातां ऐसें । नलगे ह्मणावें तें कैसें ॥ ४ ॥ स्वप्नाचे परी । जागा पाहे तंव घरीं ॥ ५ ॥ तुका ह्मणे काये । तुझें घेतलें म्यां आहे ॥ ६ ॥

॥ १२४५ ॥

तुझा भरंवसा आह्मा । फार होता पुरुषोत्तमा ॥ १ ॥ भवसागर संकटीं । तारिशील जगजेठी ॥ २ ॥ नाम आदित्याचे झाड । त्याचा न पडे उजेड ॥ ३ ॥ सिलंगणीचें सोनें । त्यासी गाहाण ठेवी कोण ॥ ४ ॥ तुका ह्मणे देवा । ब्रीद सोडुनिया ठेवा ॥ ५ ॥

॥ १२४६ ॥

माझीं मेलीं बहुवरि । तूं का जैसा तैसा हरी ॥ १ ॥ विठो कैसा वांचलासि । आतां सांग मजपाशीं ॥ २ ॥ तुज देखतांचि माझा । बाप गेला आजा पणजा ॥ ३ ॥ आह्मा लागलासे पाठीं । बालत्व तारुण्य काठी ॥ ४ ॥ तुज फावलें तें मागें । कोणी नसतां वादी लागें ५ तुका ह्मणे तुझ्या अंगीं । मज देखिल लागलीं अवघीं६॥

॥ १२४७ ॥

केला पण सांडी । ऐसीयासी ह्मणती लंडी ॥ १ ॥ जातां पहा विचारून । समर्थासी बोले कोण ॥२॥ आपला निवाड । आपणचि करितां गोड ॥३॥ तुह्मीं आह्मीं देवा । बोलिला बोल सिद्धी न्यावा ॥ ४ ॥ असे धुरे उणें । मागें सरे, तुका म्हणे ॥ ५ ॥

॥ १२४८ ॥

आह्मां गांजी जन । तरि कां मेला नारायण ॥ १ ॥ झालो पोरटीं निढळें । ठाव नाहीं बुड आळें ॥ २ ॥ आह्मीं जना भ्यावें । तरि कां न लाजिजे देवें ॥ ३॥ तुका ह्मणे देश । झाला देवाविण ओस ॥४॥

॥ १२४९ ॥

न व्हावें ते झालें । तुह्मां आम्हासी लागलें ॥ १ ॥ आतां हालमाकलमें भांडोनिया काढूं वर्मे ॥ २ ॥ पाटोळ्यासवेंसाटीं । दिली रगट्याची गांठीं ॥३॥ तुका ह्मणे हरी । आणूनिया करिन सरी ॥४॥

॥ १२५० ॥

आपुले वरदळ नेदा । एवढी गोविंदा कृपणता ॥ १ ॥ यावर बा तुमचा मोळा । हा गोपाळा कळेना ॥२॥ सेवा तरी घेतां सांग । चोरिलें अंग सहावेना ॥३॥ तुका जरि क्रियानष्ट । तरी कां कष्ट घेतसा ४॥

॥ १२५१ ॥

आळणी ऐसें कळों आलें । त्यासी भलें मौनचि ॥ १ ॥ नये कांहीं वेचूं वाणी । वेडे घाणीसांगातें ॥२॥ वेगळें देहभावा । भ्रम जीवा माजिरा ॥३॥ तुका ह्मणे कवतुक केलें । किंवा भलें दवडितां ॥४॥

॥ १२५२ ॥

लटिका देव म्हणतां ऐसा संदेहसा वाटतसें १ ऐसें आलें अनुभवा। मजही सेवा करितां ॥ २ ॥ शून्याकारी बहु मोळा । मैं डोळा हे पवाडे ॥ ३ ॥ तुका म्हणे ताळी नाहीं । एके ठायीं चपलत्वें ॥ ४ ॥

॥ १२५३ ॥

जैशा साठीं तैसें व्हावें । हें बरवें कळलेंसे ॥ १ ॥ उदास तूं नारायणा । मीही ह्मणा तुह्मीच ॥२॥ ठका महाठका जोडा । जो धडफुडा लागासी ॥३॥ एकांगीच भांडे तुका । नाहीं धोका जीवित्वें ४॥

॥ १२५४ ॥

आपुलें मागतां । काय नाहीं आम्हा सत्ता ॥ १ ॥ परि या लौकिकाकारणें । उरीं ठेविलें बोलणें ॥२॥ येचि आतां घडी । करूं बैसों तेचि फडी ॥३॥ तुका ह्मणे करितों तुला । ठाव नाहींसा विठ्ठला ॥ ४ ॥

॥ १२५५ ॥

तुजशीं संबंधचि खोटा । परता परता रे थोटा ॥१॥ देवा तुझें काय घ्यावें । आपआपणां ठकावें ॥ २ ॥ जेथें मुदल न ये हातां । व्याज मरावें लेखितां ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसा । त्रिभुवनीं तुझा ठसा ॥ ४ ॥

॥ १२५६ ॥

मागतां विभाग । कोठें लपाल जी मग ॥१॥ संत साक्षी या वचना । त्यांसी ठाउकिया खुणा ॥ २ ॥ होईन धरणेकरी । मग मी रिघों नेदी बाहेरी ॥३॥ तुका ह्मणे मी अक्षर । तुज देवपणाचा भार ॥४॥

॥ १२५७ ॥

बहु होता भला । परि ये रांडेनें नासिला ॥ १ ॥ बहु शिकला रंग चाळे । खरें खोटें इच्चे वेळे ॥२॥ नव्हतें आळवितें कोणी । इनें केला ज ऋणी ॥३॥ ज्याचें त्यासी नेदी देऊं । तुका ह्मणे धांवे खाऊं ॥४॥

॥ १२५८ ॥

मज संतांचा आधार । तूं एकलें निर्विकार ॥ १ ॥ पहा विचारूनि देवा । नको आम्हांसवें दावा ॥ २ ॥ तुज बोल न बोलवे । आम्हां भांडायाची सवे ॥ ३ ॥ तुका ह्मणे तरी । ऐक्यभावें नुरे उरी ॥ ४ ॥

॥ १२५९ ॥

आम्हीं याची केली सांडी। कोठें तोंडीं लागावें ॥ १ ॥ आहे तैसा असो आतां। चितें चिंता वाढते ॥२॥ बोलिल्याचा मानी सीण। भिन्न भिन्न रहावें ॥३॥ तुका ह्मणे आम्हांपाशीं। धीरा ऐसी जतन ॥४॥

॥ १२६० ॥

धोंड्यासवें आदळितां फुटे डोकें। तो तों त्याच्या दुःखें घामेजेना १ इंगळासी सन्निधान अतित्याई। क्षेम देतां काई सुख वाटे ॥ २ ॥ तुका ह्मणे आम्हांसवें जी रुसला। तयाचा अबोला आकाशासीं॥३॥

॥ १२६१ ॥

मजशीं पुरें न पडे वादें। सुख दोहींच्या संवादें ॥ १ ॥ तूंचि आगळा काशानें। शिर काय पायांविणें ॥२॥ वाहों तुझा भार। दुःख साहोनि अपार ॥३॥ तुका ह्मणे नाहीं भेद। देवा करूं नये वाद ४ ॥

॥ १२६२ ॥

केली सलगी तोंडपिटी। आह्मी लडिवाळें धाकुटीं ॥ १ ॥ न बोलावें तेंचि आलें। देवा पाहिजे साहिलें ॥ २॥ अवघ्यामध्यें एक वेडें। तेंचि खेळविती कोडें ३ तुका ह्मणे मायबापा। मजवरि कोपों नका ४

॥ १२६३ ॥

आतां न करीं सोस। सेवीन हा ब्रह्मरस ॥ १ ॥ सुखें सेवीन अमृत। ब्रह्मपदींचें निश्चित ॥ २ ॥ तुमचा निज ठेवा। आह्मां पाडियेला ठावा ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवराया। आतां लपालेती वाया ॥ ४ ॥

॥ १२६४ ॥

नेघें तुझें नाम। न करीं सांगितलें काम ॥ १ ॥ वाढे वचनें वचन। दोष उच्चारितां गुण ॥ २ ॥ आतां तुझ्या घरा। कोण करी येरझारा ॥ ३ ॥ तुका ह्मणे ठायीं। मजपाशीं काय नाहीं ॥ ४ ॥

॥ १२६५ ॥

नाहीं खंड झाला। माझा तुमचा विठ्ठला ॥ १ ॥ कैसें कैसें हो दुश्चित। आहे चौघांपाशीं नीत ॥ २ ॥ मुळींचें लिहिलें। मज आतां सांपडलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मज। न लगे बोलणें सहज ॥४॥

॥ १२६६ ॥

ठाव नाहीं बुड। घरें वसविसी कुड ॥ १ ॥ भलते ठायीं तुझा वास। सदा परवी उदास ॥२॥ जागा ना निजेला। होशी धाला ना भुकेला ॥ ३ ॥ न पुसतां भले। तुका म्हणे बुझे बोलें ॥ ४ ॥

॥ १२६७ ॥

ऐसाचि तो गोवा। न पाहिजे केला देवा ॥ १ ॥ बहु आली दुरिवरी। ओढत हे भरोवरी ॥ २ ॥ आम्हांसी न कळे। तुह्मी झाकूं नये डोळे ॥ ३ ॥ तुका म्हणे संगें। असों एक एका अंगें ॥ ४ ॥

॥ १२६८ ॥

मागतियाचे दोनिच कर। अमित भांडार दातियाचें ॥१॥ काय करूं अभिमान। करीन आपुलें जतन ॥२॥ देऊनिया जीव। बळी साधिला हा ठाव ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा। जुन्हाट हे माझी सेवा ॥ ४ ॥

॥ १२६९ ॥

माझे लेखीं देव मेला। असो त्याला असेल ॥१॥ गोष्टी न करीं नांव नेघें। गेलों दोघे खंडोनी ॥ २ ॥ स्तुतिसमवेत निंदा। केला धंदा उदंड ॥ ३ ॥ तुका ह्मणे निवांत ठेलों। वेचित आलों जीवित्व ॥ ४ ॥

॥ १२७० ॥

दारीं परोवरी। कुडीं कवाडीं मी घरीं ॥ १ ॥ तुमच्या लागलों पोषणा। अवघे ठायीं नारायणा ॥२॥ नेदी खावूं जेवूं। हातींतोंडीचेंही घेऊं ॥३॥ तुका ह्मणे अंगीं। जडलों ठायींचा सलगी ॥ ४ ॥

॥ १२७१ ॥

नव्हों आम्ही आजिकालींचीं। काचीं कुचीं चाळवणी ॥१॥ एके ठायीं मूळडाळ। ठावा सकळ आहेसी ॥२॥ तुमचें आमचें तें कांहीं। भिन्न नाहीं वांटलें ॥३॥ तुका ह्मणे जेथें असें। तेथें दिसे तुमचासा ॥ ४ ॥

॥ १२७२ ॥

भुकें नाहीं अन्न। मेल्यावरी पिंडदान ॥ १ ॥ हे तों चाळवाचाळवी। केलें आपणचि जेवी ॥ २ ॥ नैवेद्याचा आळ। वेचे टाकणीं सकळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे जड। मज न राखावें दगड ॥४॥

॥ १२७३ ॥

होईल तरी पुसापुसी। उत्तर त्यासी योजावें ॥ १ ॥ तोंवरि मी पुढें कांहीं। आपुलें नाहीं घालीत ॥ २ ॥ जाणोनिया अंतर देव। जेव्हां भेव फेडील ३ तुका ह्मणे धरिला हातीं। करील खंती वेगळें४

॥ १२७४ ॥

असो आतां किती। तुज यावें काकुलती ॥ १ ॥ माझें प्रारब्ध हें गाढें। तूं बापुडें तया पुढें ॥ २ ॥ सोडवीन आतां। ब्रीदें तुझीं पंढरीनाथा ॥ ३ ॥ तुका ह्मणे बळी। तो गांढ्याचे कान पिळी ॥ ४ ॥

॥ १२७५ ॥

आह्मी तुझ्या दासीं। जरि जावें पतनासी ॥ १ ॥ तरि हें दिसे विपरीत। कोठें बोलिली हे नीत ॥ २ ॥ तुझें नाम कंठीं। आह्मां संसार आटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे काळ। करी आह्मांसी विटाळ४॥

॥ १२७६ ॥

लाजती पुराणें। वेदां येऊं पाहे उणें ॥ १ ॥ आह्मी नामाचे धारक। किविलवाणी दिसों रंक ॥ २ ॥ बोलिले ते संतीं। बोल याविण जाती ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा। रोकडी हे मोडे सेवा४॥

॥ १२७७ ॥

शोकवावा म्यां देहे । ऐसें नेणों पोटीं आहे ॥ १ ॥ तरीच नेदा जी उत्तर । दुःखी राखिलें अंतर ॥ २ ॥ जावें वनांतरा । येणें उद्देशें दातारा ॥ ३ ॥ तुका ह्मणे गिरी । मज सेववावी दरी ॥४॥

॥ १२७८ ॥

कां हो आलें नेणों भागा । पांडुरंगा माझिया ॥१॥ उफराटी तुह्मां चाली । क्रिया गेली सत्याची ॥ २ ॥ साक्षी हेंगे माझें मन । आर्त कोण होतें तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे सगर्थपणें । काय नेणें करीतसां॥४॥

॥ १२७९ ॥

तुह्मी कांटाळला तरी । आह्मां न सोडणें हरी ॥ १ ॥ जावें कवणिया ठाया । सांगा विनवितों पाया ॥२॥ केली जिवा साटीं । आतां सुखें लागा पाठी ॥३॥ तुका ह्मणे ठाव । न सोडणें हाचि भाव ॥४॥

॥ १२८० ॥

आम्ही पतीत तूं पावन । हें तों पूर्वापर जाण ॥ १ ॥ नवें करूं जुनें । सांभाळावें ज्याचें तेणें ॥ २ ॥ मिरासीचा ठाव । राखा करूनि उपाव ॥ ३ ॥ वादें मारी हाका । देवा आइकवी तुका ॥ ४ ॥

॥ १२८१ ॥

तुम्हांसी हें अवघें ठावें । किती द्यावें स्मरण ॥ १ ॥ कां बा तुह्मी ऐसें नेणें । निष्ठुरपणें टाळित असां ॥२॥ आळवितां मायबापा । नये कृपा अझूनि ॥३॥ तुका म्हणे जगदीशा । काय असा निजेले ॥४॥

॥ १२८२ ॥

आतां चक्रधरा । झणीं आह्मासी अव्हेरा ॥ १ ॥ तुमचीं म्हणविल्यावरी । जैसीं तैसीं तरी हरी ॥२॥ काळ आम्हां खाय । तरी तुझें नांव जाय ॥३॥ तुका ह्मणे देवा । आतां पण सिद्धी न्यावा ॥ ४ ॥

॥ १२८३ ॥

काय करूं कर्माकर्म । बरें सांपडलें वर्म ॥ १ ॥ होसी नामाची सारिखा । समजाविली नाहीं लेखा ॥२॥ नाहीं वेचावेच झाला । उरला आहेसी संचला ॥३॥ तुका ह्मणे माझें । काय होईल तुम्हां ओझें ॥ ४ ॥

॥ १२८४ ॥

कैवल्याच्या तुम्हां घरीं । रासी हरी उदंड ॥ १ ॥ मजसाठीं कां जी वाणी । नव्हो धणी विभागा ॥२॥ सर्वा गुणीं सपुरता । ऐसा पिता असोनी ॥३॥ तुका ह्मणे पांडुरंगा । झालों सांगा सन्मुख ॥४॥

॥ १२८५ ॥

काय करावें तें आतां । झालें नयेसें बोलतां ॥ १ ॥ नाहीं दोघांचिये हातीं । गांठीं घालावी एकांतीं ॥२ ॥ होय आपुलें काज । तो हे भीड सांडूं लाज ॥३॥ तुका ह्मणे देवा । आधीं निवडूं हा गोवा ॥४॥

॥ १२८६ ॥

कृपेचा ओलावा। दिसे वेगळाचि देवा ॥ १ ॥ मी हें इच्छितसें साचें। न लगे फुकटसाई काचें ॥ २ ॥ जेणें जाय कळसा। पाय उत्तम तो तैसा ॥३॥ तुका म्हणे घरीं। तुझ्या अवघिया परी ॥४॥

॥ १२८७ ॥

करिसी लाघवें। तूं हें खेळसी आघवें ॥ १ ॥ केला अहंकार आड। आम्हां जगासी हा नाड ॥२॥ येथें भुतें यावें। दावूं लपूंही जाणावें ॥३॥ तुका म्हणे हो श्रीपती। आतां चाळवाल किती ४॥

॥ १२८८ ॥

नाहीं मागितला। तुह्मां मान म्यां विठ्ठला ॥ १ ॥ जे हे करविली फजिती। माझी एवढी जना हातीं ॥ २ ॥ नाहीं केला पोटें। पुढें घालूनि बोभाटे ३ तुका ह्मणे धरूनि हात। नाहीं नेलें दिवाणांत ४॥

॥ १२८९ ॥

कां जी वाढविलें। न लगतां हें उगलें ॥ १ ॥ आतां मानितां कांटाळा। भोंवतीं मिळालिया बाळा ॥ २ ॥ लावूनिया सवे। पळतां दिसाल बरवे ॥३॥ तुका म्हणे बापा। येतां न कळाचि रूपा ॥४॥

॥ १२९० ॥

मज नाहीं धीर। तुह्मी न करा अंगीकार ॥१॥ ऐसे पडिले विषम। बळी देवाहूनि कर्म ॥ २ ॥ चालों नेणें वाट। केल्या न पवे बोभाट ॥ ३ ॥ वेचों नेणे जीवें। तुका उदास धरिला देवें ॥ ४ ॥

॥ १२९१ ॥

अंतरीचें जाणां। तरि कां येऊं दिलें मना ॥१॥ तुमची करावी म्यां सेवा। आतां अव्हेरितां देवा ॥२॥ नव्हती मोडामोडी। केली मागें तेचि घडी ॥३॥ तुका म्हणे दिला ठाव। पायीं लागों दिला भाव ४

॥ १२९२ ॥

रायाचे सेवक। सेवटींचें पीडी रंक ॥१॥ हा तो हिणाव कवणा। कां हो नेणां नारायणा ॥ २ ॥ परिसेंसी भेटी। नव्हे लोहोपणा तुटी ॥ ३ ॥ तुझें नाम कंठीं। तुक्या काळासवें भेटी ॥ ४ ॥

॥ १२९३ ॥

विष्णुदासां भोग। जरी आम्हां पीडी रोग ॥१॥ तरि हें दिसे लाजिरवाणें। काय तुम्हांसी सांगणें ॥२॥ आम्हां काळें खावें। बोलिलें तें वाया जावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे दास। आम्ही भोगूं गर्भवास ॥ ४ ॥

॥ १२९४ ॥

तुह्मां न पडे वेच। माझा सरेल संकोच ॥१॥ फुकासाटीं जोडे यश। येथें कां करा आळस ॥ २ ॥ कृपेचें भुकेलें। होय जीवदान केलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे शिकविलें। माझें ऐकावें विठ्ठलें ॥ ४ ॥

॥ १२९५ ॥

जैसीं तैसीं तरी । शरणागतें तुम्हीं हरी ॥ १ ॥ आतां न पाहिजे केलें । ब्रीद लटिकें आपुलें ॥ २ ॥ शुद्ध नाहीं चित्त । परी म्हणवितो भक्त ॥ ३ ॥ मज कोण पुसे रंका । नाम सांगे तुझें तुका ॥ ४ ॥

॥ १२९६ ॥

समर्थाचें बाळ किविलवाणें दिसे । तरी कोणा हांसे जन देवा ॥ १ ॥ अवगुणी जरी झालें तें वोंगळ । करावा सांभाळ लागे त्याचा ॥ २ ॥ तुका ह्मणे तैसा मी एक पतित । परि मुद्रांकित झालों तुझा ॥ ३ ॥

॥ १२९७ ॥

आगिलें शेवटा । आतां कामा नये फांटा ॥ १ ॥ मज आपुलेंसें म्हणा । उपरि या नारायणा ॥ २ ॥ वेचियेली वाणी । युक्ती अवघी चरणीं ॥ ३ ॥ तुका धरी पाय । क्षमा करवूनि अन्याय॥४॥

॥ १२९८ ॥

सातां पांचा तरीं वचनां सेवटीं । निरोप कां भेटी एक तरी ॥१॥ कां नेणें निष्ठुर केलें नारायणा । न देखें हें मना येतां कांहीं ॥ २ ॥ तुका ह्मणे ऐसा न देखें निवाड । कडू किंवा गोड फळ पोटीं॥३॥

॥ १२९९ ॥

नाहीं माथां भार । तुम्ही घेत हा विचार ॥ १ ॥ जाणोनिया ऐसें केलें । दुरिल अंगेसी लाविलें ॥२॥ आतां बोलावें आवडीं । नाम घ्यावें घडी घडी ॥३॥ तुका म्हणे दुरी । देवा खोटी ऐसी उरी४॥

॥ १३०० ॥

नसतों केंविलवाणें । कांहीं तुमच्या कृपादानें ॥ १ ॥ हेचि तयाची ओळखी । धालें टवटवित मुखीं ॥ २ ॥ वाया जात नाहीं । वचन प्रीतीचें तें कांहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । सत्य येतें अनुभवा ॥ ४ ॥

॥ १३०१ ॥

मुखाकडे वास । पाहे करुनिया आस ॥१॥ आतां होईल ते शिरीं । मनोगत आज्ञा धरीं ॥ २ ॥ तुम्हीं अंगीकार । केला पाहिजे तो सार ॥ ३ ॥ तुका ह्मणे दारीं । उभे याचक मी हरी ॥ ४ ॥

॥ १३०२ ॥

आतां मज तारीं । वचन हें साच करीं ॥ १ ॥ तुझें नाम दिनानाथ । ब्रिदावळी जगविख्यात ॥२॥ कोण लेखीं माझ्या दोषा । तुझा त्रिभुवनीं ठसा ॥ ३ ॥ वाया जातां मज । तुका ह्मणे तुम्हां लाज ॥ ४ ॥

॥ १३०३ ॥

ऐसें कोण पाप बळी । जें जवळी येऊं नेदी ॥१॥ तुम्हां तंव होईल ठावें । नेदावें कां कळों हें ॥२॥ कोण झाला अंतराय । कां ते पाय अंतरले ॥४॥ तुका ह्मणे निमित्याचा । आला सुचा अनुभव ॥ ४ ॥

॥ १३०४ ॥

कां जी धरिलें नाम । तुम्ही असोनि निष्काम ॥१॥ कोणां सांगतसां ज्ञान । ठकाठकीचें लक्षण ॥२॥ अवडीनें नाचें । आहे तरी पुढें साचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे प्रेम । नाहीं भंगायाचें काम ॥ ४ ॥

॥ १३०५ ॥

कामधेनूचें वासरूं । खाया न मिळे काय करूं ॥ १ ॥ ऐसें आह्मां मांडियेलें । विठो त्वां कां सांडियेलें ॥२॥ बैसोनि कल्पद्रुमातळीं । पोटासाठीं तळमळी ३ तुका म्हणे नारायणा । बरें लोकीं हें दिसेना ४

॥ १३०६ ॥

आम्ही आर्तभूत जिवीं । तुम्ही गोसावी तो उदास ॥ १ ॥ वादावाद समर्थाशीं । काशानशीं करावा ॥२॥ आम्ही मरों वेरझारीं । स्वामी घरीं बैसले ॥३॥ तुका म्हणे करितां वाद । कांहीं भेद कळेना ॥४॥

॥ १३०७ ॥

लाज ना विचार । बाजारी तूं भांडखोर ॥ १ ॥ ऐसें ज्यानें व्हावें । त्याची गांठीं तुजसवें ॥ २ ॥ फोडिसी लंगोटी । घेसी सकळांसी तुटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे चोरा । तुला आप ना दुसरा ॥ ४ ॥

॥ १३०८ ॥

दाउनिया आस । केला बहुतांचा नास ॥ १ ॥ थोंटा झोंडा शिरोमणी । भेटलासी नागवणी ॥२॥ सुखाचें उत्तर । नाहीं मुदलासी थार ॥ ३ ॥ तुका म्हणे काय । तुझें ब्याचें उरे हाय ॥ ४ ॥

॥ १३०९ ॥

लटिकाची केला । सोंग पसारा दाविला ॥१॥ अवघा बुडलासी ऋणें । बहुतांचें देणें घेणें ॥२॥ लावियेला चाळा । बहु दावूनि पुतळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे हात । आम्ही अवरिली मात ॥ ४ ॥

॥ १३१० ॥

व्यवहार तो खोटा । आतां नव जों तुझ्या वाटा ॥ १ ॥ एका नाम नाहीं ताळा । केली सहस्रांची माळा ॥ २ ॥ पाहों जातां घाई । खेळसील लपडाई ॥३॥ तुका ह्मणे चोर । बहु करितोसी फार ॥४॥

॥ १३११ ॥

मिटवण्याचे धनी । तुम्ही व्यवसाय जनीं ॥ १ ॥ कोण पडे ये लिगाडीं । केलीं तैसीं उगवा कोडीं ॥ २ ॥ केलें सांगितलें काम । दिले पाळूनिया धर्म ॥३॥ तुका ह्मणे आतां । असो तुमचें तुमचे माथां ॥४॥

॥ १३१२ ॥

तूं पांढरा स्फटिक मणी । करिसी आणिकां त्यांहुनि ॥ १ ॥ ह्मणोनि तुझ्या दारा । न येत ठकती दातारा २ तुझी ठावी नांदणूक । अवघा बुडविला लोक ३ तुका ह्मणे ज्याचें घेसी । त्यासी हेंचि दाखविसी ४

॥ १३१३ ॥

नवां नवसांचीं । झालों तुम्हासी वाणीचीं ॥१॥ कोण तुझें नाम घेतें । देवा पिंडदान देते ॥ २ ॥ कोण होतें मागें पुढें । दुजें बोलाया रोकडे ॥ ३ ॥ तुका ह्मणे पांडुरंगा । कोणा घेतोसि वो संगा ॥ ४ ॥

॥ १३१४ ॥

संसाराची कोण गोडी । दिली जोडी करूनि ॥ १ ॥ निष्ठुर तूं बहु देवा । पुरे हेवा न ह्मणवी ॥ २ ॥ पाहोनिया कर्म डोळां । निराळा तो वर्जीना ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुज माझें । ह्मणतां ओझें फुकट॥४॥

॥ १३१५ ॥

नव्हेसी तूं लासी । माया आणिकां त्या पेसी ॥ १ ॥ जे हे वाया जाती बोल । होती निर्फळाचि फोल ॥ २ ॥ नव्हेसी दुबळा । कांहीं नाहीं तें जवळा ॥३॥ तुका ह्मणे खोटी । कांही नव्हेसी करंटी॥४॥

॥ १३१६ ॥

आह्मां बोल लावा । तुह्मां अनुचित हें देवा ॥ १ ॥ पेसें सांगा कां ब्यालेती । काय नाहीं तुह्मां हातीं ॥ २ ॥ आतां धरा दुरी । वाया वडवडाया थोरी ॥३॥ तुका ह्मणे ठायीं । पेसें विचारावें कांहीं॥४॥

॥ १३१७ ॥

तुझें नामीं दीनानाथा । आह्मी उघडा घातला माथा ॥१॥ आतां न धरावें दुरी । बोल येईल ब्रीदावरी २ पतित होतों पेसा ठावा । आधीं कां न विचारावा ३ तुका म्हणे तुझे पायीं । आम्ही मिरास केली पाहीं४

॥ १३१८ ॥

मरोनिया गेली माया । मग तया कोण पुसे ॥ १ ॥ पोरटियांची वाद कोणा । पेसा जाणा प्रवाहो २ निढळास निढळ जोडा । होय कोडा कवतुका ॥३॥ तुका ह्मणे देवापेशी । आह्मों सरशीं आपण ४ ॥

॥ १३१९ ॥

आतां दोघांमध्यें काय । उरलें होय वाणीजेसें ॥१॥ निष्ठुर हें केलें मन । समाधान न करूनि ॥२॥ झुरावें तें तेथींच्या परी । घरिच्या घरीं अवघिया ॥३॥ तुका ह्मणे देवपण । गुंडाळून असोंदे ॥ ४ ॥

॥ १३२० ॥

आतां येथें खरें । नये फिरतां माघारें १ होय तैसी हो आबाळी । देहनिमित्य या बळी २ तुम्हांसवें गांठी । देवा जीवाचिये साटीं ॥ ३ ॥ तुका नव्हे लंड । करूं चौघांमध्यें खंड ॥ ४ ॥

॥ १३२१ ॥

पेसा तंव मोळा । तुमचा नसेल गोपाळा १ मागल्याची टाळाटाळी २ झिज्या ओढोनि कपाळीं । नसेल ना नवें । पेसें धरियेलें देवें ३ तुका ह्मणे झाला । उशीर नाहीं तो विठ्ठला ॥ ४ ॥

॥ १३२२ ॥

माझ्या कपाळाच्या गुणें । किंवा सरलेंसे नेणें १ नये वचन बाहेरी । उभे तिष्ठतसें द्वारीं २ काय सांगायास वेचे । रीतें आरंभीं ठायींचे ३ तुका ह्मणे किती । भीड धरावी पुढती १

॥ १३२३ ॥

अहो पुरुषोत्तमा । तुह्मां कशाची उपमा १ सतंत तो नाहीं बुद्धी । नाळवितां नाहीं शुद्धी २ जागविलें तरी । तुह्मां व्यक्तियेनें हरी ३ तुका ह्मणे देवा । तुह्मां नित्य दिस नवा ॥ ४ ॥

॥ १३२४ ॥

बहु धीर केला । जाण न होसी विठ्ठला ॥१॥ आतां धरीन पद्रीं । करीन तुज मज सरी ॥२॥ झालों जीवासी उदार । उभा राहिलों समोर ॥ ३ ॥ तुका विनवी संतां । ऐसें सांगा पंढरीनाथा ॥ ४ ॥

॥ १३२५ ॥

झाला जीवासी उदार । त्यासी काय भीडभार १ करीन अडक्या धोंगडें । उभें बाजारीं उघडें २ जों जों धरिली भीड । तों तों बहु केली चीड ३ तुका म्हणे मूळ । तुझें उच्चारीन कुळ ४

॥ १३२६ ॥

घेतां आणिकांचा जीव । तेव्हां कींव कराना १ आपलें तें वरद्ळ नेदा । हे गोविंदा कृपणता २ सेवा तरी इच्छा सांग । चोरिलें अंग साहेना ३ तुका म्हणे अरे धन्या । निसंतान्या विठोबा ४

॥ १३२७ ॥

नामासारिखी करणी । हे तों न दिसे त्रिभुवनीं ॥ १ ॥ सिलंगणीचें सोनें । ठेवूं नये तें गहाण ॥२॥ आदित्याचीं झाडें । काय त्यांचा उजड पडे ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । ब्रिदें सोडोनिया ठेवा ॥ ४ ॥

॥ १३२८ ॥

सांपडला संदीं । मग बळिया पडे फंदी ॥ ॥ ऐसी कोणी वाहे वेळ । हातीं काळाच्या सकळ ॥२॥ दाता मागे दान । जाय याचका शरण ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेणां । काय सांगों नारायणा ॥ ४ ॥

॥ १३२९ ॥

शोधिसील मूळें । त्याचें करीसी वाटोळें ॥१॥ ऐसे संतांचे बोभाट । तुझे बहु झाले तंट २ लौकिका बाहेरी । घाली रोंखी जया धरी ॥ ३ ॥ तुका म्हणे गुण । तुझा लागलिया शून्य ॥ ४ ॥

॥ १३३० ॥

रामा अयोध्येच्या राया । दिनानाथा रे सखया ॥१॥ पाप ताप विघ्न हरीं । दिनानाथा सुख करीं ॥२॥ भिळटीचिया रे उच्छिष्टा । स्विकारिसी रे तूं भ्रष्टा ॥ ३ ॥ मी तों सलगीचें मूल । तुका ह्मणे तूं सखोल ४

॥ १३३१ ॥

मानामान किती । तुझ्या क्षुल्लका संपत्ती ॥ १ ॥ जारे चाळवीं बापुडीं । कोणी धरिती ते गोडी २ रिद्धिसिद्धि देसी । आम्हीं चुंभळीं नव्हों तैसीं ३ तुका म्हणे ठका । ऐसें नागविलें लोकां ॥ ४ ॥

॥ १३३२ ॥

वटवट केली । न विचारितां मना आली ॥ १ ॥ मज कराल तें क्षमा । कैसें नेणों पुरुषोत्तमा ॥ २ ॥ उचित न कळे । जिव्हा भलतेंचि बरळे ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । लौकिकाची चाड नाहीं ॥ ४ ॥

॥ १३३३ ॥

वारिलें लिगाड । बहु दिसांचें हें जाड ॥ १ ॥ न बोलवें ऐसें केलें । कांहीं वाउगें तितुलें ॥ २ ॥ झाला चौघांचार । गेला खंडोनि वेव्हार ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । करीन ते घ्यावी सेवा ॥ ४ ॥

॥ १३३४ ॥

हें का आम्हां सेवा दान । देखों सीण विषमाचा ॥ १ ॥ सांभाळा जी ब्रीदावळी । तुम्ही कां कलीसारिखे २ शरणागत वेच्या हातीं । हे निश्चिती देखिली ३ तुका ह्मणे इच्छीं भेटी । पाय पोटीं उफराटे ४॥

॥ १३३५ ॥

येइल तुझ्या नामा । लाज ह्मणों पुरुषोत्तमा ॥ १ ॥ धीर राहिलों धरूनि । त्रास उपजला मनीं ॥ २ ॥ जगा कथा नांव । निराशेनें नुपजे भाव ॥ ३ ॥ तुह्मी साक्ष कीं गा । तुका ह्मणे पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ १३३६ ॥

हें तों वाटलें आश्चर्य । तुह्मां धरवला धीर ॥ १ ॥ माझा फुटतसे प्राण । धांवा धांवा ह्मणऊन ॥ २ ॥ काय नेणों दिशा । झाल्या तुह्मांविण ओशा ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांगा । नाइकिजे पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ १३३७ ॥

सरे ऐसें ज्याचें दान । त्याचे कोण उपकार ॥ १ ॥ नको वाढूं ऐसें काचें । देवो साचें विठ्ठला ॥ २ ॥ रडत मागे सांडी पोर । ते काय थोर माउली ॥ ३ ॥ तुका ह्मणे कीर्ति वाढे । धर्म गाढे ते ऐसे ॥ ४ ॥

॥ १३३८ ॥

वाढविलें कांगा । तुह्मीं एवढें पांडुरंगा ॥ १ ॥ काय होती मज चाड । एवढी कराया बडबड ॥ २ ॥ ब्रह्मसंतर्पण । लोकीं करावें कीर्तन ॥ ३ ॥ निमित्याचा धनी । तुका ह्मणे नेणे कोणी ॥ ४ ॥

॥ १३३९ ॥

ठायींची ओळखी । येइल टाकूं टाका सुखीं ॥ १ ॥ तुमचा जाईल इमान । माझे कपाळीं पतन ॥ २ ॥ ठेविला तो ठेवा । अभिलाषें बुडवावा ॥ ३ ॥ मनीं न विचारा । तुका म्हणे हे दातारा ॥ ४ ॥

॥ १३४० ॥

शकुनानें लाभ हानि । येथूनिच्च कळतसे ॥१॥ भयारूढ झालें मन । आतां कोण विश्वास ॥ २ ॥ प्रीत कळे आलिंगनीं । संपादनीं अत्यंत ॥ ३ ॥ तुका ह्मणे मोकलिलें । कळों आलें बरवें हें ॥ ४ ॥

॥ १३४१ ॥

बुडतां आवरीं । मज भवाचे सागरीं ॥१॥ नको मानूं भार । पाहीं दोषांचे डोंगर ॥ २ ॥ आहे तें सांभाळीं । तुझी कैसी ब्रिदावळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे दोषी । मी तो पातकांची राशी ॥ ४ ॥

॥ १३४२ ॥

झाड कल्पतरु । न करी याचकां आव्हेरु ॥ १ ॥ तुम्ही सर्वां सर्वोत्तम । ऐसे विसरतां नाम २ परिसा तुमचें देणें । तो त्या जाणे अभिमानें ॥३॥ गाऱ्हाण्यानें तुका । गर्जे मारुनिया हाका ॥ ४ ॥

॥ १३४३ ॥

घालूनिया कास । बळें आलों मागायास ॥ १ ॥ प्रेमें देईं पाठवूनि । पांडुरंगा सेवाऋणी ॥ २ ॥ होईं रे शहाणा । कळों नेदावें या जना ३ तुका ह्मणे पायीं । जडलों मग उरलें काई ॥ ४ ॥

॥ १३४४ ॥

केवढा तो अहंकार । माझा तुह्मां नव्हे दूर ॥ १ ॥ आतां कोण पडे पायां । तुमच्या अहो पंढरिराया ॥२॥ कां जी कृपेनें कृपण । वेंचत असे ऐसें धन ॥३॥ तुका ह्मणे देवें । दुजियाचें पोतें न्यावें ॥ ४ ॥

॥ १३४५ ॥

विठ्ठला विठ्ठला । कंठ आळावितां फुटला ॥ १ ॥ कां रे कृपाळु न होसी । काय झाले मजविसी २ झाल्या वेरझारा । जन्म बहुतांच्या फेरा ॥ ३ ॥ तुका ह्मणे नष्टा । अबोलण्या तुझ्या चेष्टा ॥ ४ ॥

॥ १३४६ ॥

आतां धरितों पदरीं । तुज मज करीन सरी ॥ १ ॥ झालों जीवासी उदार उभा ठाकलों समोर ॥ २ ॥ तुका विनवीतसे संतां । ऐसें सांगा पंढरीनाथा ॥ ३ ॥

॥ १३४७ ॥

आह्मांपाशीं याचें बळ । कोण काळवरी तो १ धरूनि ठेलों जीवेंसाठीं । होय भेटी तोंवरी ॥ २ ॥ लागलों तो फिरे न पाठीं । पडिल्या गाठीं वांचूनि ॥ ३ ॥ तुका ह्मणे अवकाशें तुमच्या ऐसें होवया ॥ ४ ॥

॥ १३४८ ॥

जीवींचें कां नेणां । परि हे आवडी नारायणा ॥ १ ॥ वाढवावें हें उत्तर । कांहीं लाज करकर ॥ २ ॥ कोठें वाया गेले । शब्द उत्तम चांगले ३ तुका म्हणे बाळा । असतात पर्यया खेळा ॥ ४ ॥

॥ १३४९ ॥

समर्थाचें बाळ पांघरे वाकळ । हसती सकळ लोक कोणा ॥ १ ॥ समर्थासी लाज आपुल्या नांवाची । शरण आल्याची लागे चिंता२ जरी तुज कांहीं होईल उचित । तरि हा पतित तारीं तुका ॥ ३ ॥

॥ १३५० ॥

कासया हो माझा राखिला लौकिक । निवाड कां एक केला नाहीं १ मग तळमळ न करितें मन । झालें तें कारण कळों येतें ॥ २ ॥ तुका ह्मणे केला पाहिजे निवाड । वैद्यासी ते भीड मरण रोग ।३॥

॥ १३५१ ॥

आशाबद्ध बहु असे निलाजिरे । होय ह्मणे धीरें फळ टोकें ॥ १ ॥ कारणापें चित्त न पाहे अपमान । चित्त समाधान लाभासाठीं ॥२॥ तुका ह्मणे हातें लोटिलें न कळे । झांकितसें डोळे पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ १३५२ ॥

नव्हे मी शाहाणा । तरी ह्मणे नारायणा ॥ १ ॥ तुह्मां बोलवाया कांहीं । येच भरलोंसे वाहीं ॥ २ ॥ आणावेति रूपा । कोपलेती तरी कोपा ॥ ३ ॥ कळोनि आवडी । तुका ह्मणे जाते घडी ॥ ४ ॥

॥ १३५३ ॥

पायांपासीं चित्त । तेणें भेटी अखंडीत ॥१॥ असे खेळे भलते ठायीं । प्रेमसूत्रदोरी पायीं ॥२॥ केलेंसें जतन । मुळीं काय तें वचन ॥३॥ तुका ह्मणे सर्वजाणा । ठायीं विचारावें मना ॥ ४ ॥

॥ १३५४ ॥

नव्हें परि ह्मणवीं दास । कांहीं निमित्तास मूळ केलें ॥ १ ॥ तुमचा तो धर्म कोण । हा आपण विचारा ॥२॥ नाहीं शुद्ध आचरण । परि चरण चिंतीतो ॥३॥ तुका ह्मणे पांडुरंगा । ऐसें कां गा नेणा हें ४

॥ १३५५ ॥

आह्मीं घ्यावें तुझें नाम । तुह्मीं आह्मां द्यावें प्रेम ॥ १ ॥ ऐसें निवडिलें मुळीं । संतीं बैसोनि सकळीं ॥ २ ॥ माझी डोई पायांवरी । तुह्मीं न धरावी दुरी ३ तुका ह्मणे केला । खंड दोघांचा विठ्ठला । ४॥

॥ १३५६ ॥

असो मागें झालें । पुढें गोड तें चांगलें ॥ १ ॥ आतां माझे मनीं । कांहीं अपराध न मनीं ॥ २ ॥ नेदीं अवसान । करितां नामाचें चिंतन ॥ ३ ॥ तुका ह्मणे बोलें । तुज आधींच गोंविलें ॥ ४ ॥

॥ १३५७ ॥

भाव धरिला चरणीं ह्मणवितो दास । अहिर्निशीं ध्यास करितसें १ करितसें ध्यास हृदयीं सकळ । भाव तो सबळ धरियेला ॥ २ ॥ धरिले निश्चळ न सोडीं ते पाय । तुका ह्मणे सोय करीं माझी ॥३॥

॥ १३५- ॥

उचिताचा दाता । कृपावंता तूं अनंता ॥ १ ॥ कां रे न घलिसी धांव । तुझें उच्चारितां नांव ॥२॥ काय बळयुक्ति । नाहीं तुझे अंगीं शक्ति ॥ ३ ॥ तुका ह्मणे तूं विश्वंभर । ओस माझें कां अंतर ॥ ४ ॥

॥ १३५९ ॥

वेडें वांकडें गाईन । परि मी तुझा ह्मणवीन ॥१॥ मज तारीं दिना नाथा । ब्रीद साच करी आतां २ केल्या अपराधांच्या राशी । ह्मण- ऊनि आलों तुजपाशीं ३ तुका म्हणे मज तारीं । सांडीं ब्रीद नाहीं तरी ४

॥ १३६० ॥

अंधळयाची काठी । हिरोनिया कडा लोटी ॥ १ ॥ हे कां देखण्या उचित । लाभ किंवा कांहीं हित ॥ २ ॥ साकर म्हणोनि माती । चाळवूनि द्यावी हातीं ॥३॥ तुका ह्मणे वाटे । देवा पसरावे सराटे ४

॥ १३६१ ॥

माझ्या वडिलांची मिरासी गा देवा । तुझी चरणसेवा पांडुरंगा १ ॥ उपवास पारणे राखिला दारवंटा । केला भोगवटा आम्हालागीं २॥ वंशपरंपरा दास मी अंकित । तुका मोकलीत लाज कोणा ॥ ३ ॥

॥ १३६२ ॥

कळों आलें ऐसें आतां । नाहीं सत्ता तुह्मांसी ॥ १ ॥ तरी वीर्य नाहीं नामा । जातो प्रेमा खंडत ॥२॥ आड ऐसें येतें पाप । वाढे ताप आगळा ॥३॥ तुका ह्मणे गुण झाला । हा विठ्ठला हीन शक्ति ॥ ४ ॥

॥ १३६३ ॥

आम्ही जाणों तुझा भाव । दृढ धरियेले पाव ॥ १ ॥ फांकों नेदीं चुकवितां । नेघों थोडें बहु देतां ॥ २ ॥ बहुतां दिसांचें लिगाड । आलें होत होत जड ॥३॥ तुका ह्मणे आतां । ने घों सर्वस्वही देतां ४

॥ १३६४ ॥

ऋण वैर हत्या । हें तो न सुटे न देतां ॥१॥ हें कां नेणां पांडुरंगा । तुह्मी सांगतसां जगा ॥ २ ॥ माझा संबंध तो किती । चुकवा लो- कांची फजिती ॥३॥ तुका ह्मणे याचि साठीं । मज घेतां नये तुटी ४

॥ १३६५ ॥

दोष पळती कीर्तनें । तुझ्या नामसंकीर्तनें ॥ १ ॥ हें कां करूं आद- रिलें । खोटें वचन आपुलें ॥ २ ॥ तुह्मी पापा भीतां । आह्मां उप- जावया चिंता ॥३॥ तुका ह्मणे सेवा । कळिकाळा जिंकी देवा ॥४॥

॥ १३६६ ॥

जरि मी नव्हतों पतित । तरि तूं पावन कैंचा तेथ ॥ १ ॥ म्हणोनि माझें नांव आधीं । मग तूं पावन कृपानिधी २ लोहो महिमा न परिसा ३ नाहीं तरी दगड तैसा ३ तुका ह्मणे याचकभावें । कल्पतरु मान पावे ४

॥ १३६७ ॥

तुमचा तुह्मीं केला गोवा। आतां चुकवितां देवा १ कैसें सरे चाळवणें। केलें काशाला शाहाणे ॥२॥ कासया हो रूपा। नांव आलेंति गा बापा ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां। न सरे हवाले घालितां ॥ ४ ॥

॥ १३६८ ॥

याचि हाका तुझे द्वारीं। सदा देखो ऋणकरी ॥ १ ॥ सदा करिती खंड दंड। देवा बहु गा तूं लंड ॥२॥ सुखे गोंविसी भोजना। लपवूनिया आपणां ॥३॥ एकें एक बुझाविसी। तुका ह्मणे ठक होसी ४

॥ १३६९ ॥

कांगा धर्म केला। असोन सत्तेचा आपुला ॥ १ ॥ उभाउभीं पाय जोडी। आतां फांकों नेदी घडी ॥२॥ नको सोडूं ठाव। आतां घेऊं नेदी वाव ॥ ३ ॥ तुका म्हणे इच्छा। तैसा करीन सरिसा ॥ ४ ॥

॥ १३७० ॥

नव्हों गांढे आळसी। जो तूं आम्हा पुढें जासी ॥ १ ॥ अरे दिले आम्हां हातीं। वर्म वेवादाचें संतीं ॥ २ ॥ धरोनिया वाट। झालों शिरोमणि थोंट ॥३॥ तुका म्हणे देवा। वाद करीन खरी सेवा॥४॥

॥ १३७१ ॥

करितां वेरझारा। उभा न राहासी वेव्हारा ॥ १ ॥ हे तों झोंडाईचे चाळे। काय पोटीं तें न कळे ॥२॥ आरोगुनी मुग। बैसलासी जैसा बग ॥ ३ ॥ तुका म्हणे किती। बुडविलीं आळवितीं ॥ ४ ॥

॥ १३७२ ॥

तुझ्याठायीं ओस। दोन्हीं पुण्य आणि दोष ॥ १ ॥ झडलें उरलें किती। आम्ही धरियेलें चित्तीं ॥२॥ कळलासी नष्टा। यातिक्रियाकर्मभ्रष्टा ॥ ३ ॥ तुका म्हणे बोला। नाहीं ताळा गा विठ्ठला ॥ ४ ॥

॥ १३७३ ॥

आम्हीं भांडों तुजसवें। वर्मीं धरूं जालें ठावें ॥ १ ॥ होसी सरड बेडूक। वाघ गांढ्याही पाईक २ बळ करी तया भ्यावें। पायां लागे तया घ्यावें ३ तुका म्हणे दूर परता। नर नारी ना तूं भूता ॥४॥

॥ १३७४ ॥

कां रे न पवसी धांवण्या। अंगराख्या नारायणा ॥१॥ अंगीं असोनिया बळ। होसी खट्याळ नाट्याळ ॥ २ ॥ आह्मां नरका जातां। काय येइल तुझ्या हातां ३ तुका म्हणे कान्हा। क्रियानष्टा नारायणा ४

॥ १३७५ ॥

नव्हे भिडा हें कारण। जाणे करूं ऐसें जन ॥ १ ॥ जों जों धरावा लौकिक। रडवितोसी आणीक २ चाल जाऊं संतांपुढें। ते हे निवडिती रोकडें ॥३॥ तुका म्हणे तूं निर्लज्ज। आह्मां रोकडी गरज ४

॥ १३७६ ॥

आह्मी देतों हाका । कां रे झालासी तूं मुका ॥ १ ॥ न बोलसी नारायणा । कळलासी क्रियाहीना ॥२॥ आधीं करूं चौघाचार। मग सांडूं भीडभार ॥३॥ तुका ह्मणे सेवटीं । तुह्मां आह्मां घालूं तुटी ४

॥ १३७७ ॥

काय साहतोसी फुका । माझा बुडविला रुका ॥ १ ॥ रीण घराचें पांगिलें । तें न सुटे कांहीं केलें ॥२॥ चौघांचिया मतें । आधीं खरें केलें होतें ॥३॥ तुका म्हणे यावरी । आतां भीड कोण धरी ॥ ४ ॥

॥ १३७८ ॥

पतित मिरासी । ते म्यां धरिली जीवेंसी ॥१॥ आतां बळिया सांग कोण । ग्वाही तुझें माझें मन ॥२॥ पावनाचा ठसा । दावीं मज तुझा कैसा ॥३॥ तुका ह्मणे वाव झालें । रोख पाहिजे दाविलें ॥४॥

॥ १३७९ ॥

भांडावें तो हित । ठायीं पडतें उचित ॥१॥ नये खंडों देऊं वाद । आह्मां भांडवल भेद ॥ २ ॥ शब्दसारसें भेटी । नये पडों देऊं तुटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे आळस । तोचि कारणांचा नाश ॥ ४ ॥

॥ १३८० ॥

तुज नाहीं शक्ति । काम घेसी आह्मां हातीं ॥१॥ ऐसें अनुभव पाहीं । उरलें बोलिजेसें नाहीं ॥२॥ लपोनिया आड । आह्मां तुझा कैवाड ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुजसाठीं । आह्मां संसारेंसी तुटी ॥ ४ ॥

॥ १३८१ ॥

पाटवणें पडणें पायां । उद्धार वाया काशाचा १ घडलें तें भेटीसवें । दिसेल बरवें सकळां हो ॥ २ ॥ न घडतां दृष्टादृष्टी । काय गोष्टी कोरड्या ॥३॥ अबोल्यानें असे तुका । अंतर ऐका साक्षीतें ॥ ४ ॥

॥ १३८२ ॥

आह्मी झालों एकविध । सुद्या सुदें असावें ॥ १ ॥ यावरी तुमचा मोळा । तो गोपाळा अकळ ॥२॥ घेतलें तें उसणें द्यावें । कांहीं भावें विशेषें ॥ ३ ॥ तुका ह्मणे क्रियानष्ट । तरी कष्ट घेतसां ॥ ४ ॥

॥ १३८३ ॥

पराधीन माझें करूनियां जीणें । सांडी काय गुणें केली देवा ॥ १ ॥ उदार हे कीर्ति असे जगामाजी । कां तें ऐसें आजि पालटिलें ॥ २ ॥ आळवितां परी न पुरेचि रीग । उचित तो त्याग नाहीं तुम्हां ॥ ३ ॥ तुका ह्मणे कां बा मुळींच व्यालासी । ऐसें कां नेणसी पांडुरंगा ॥४॥

॥ १३८४ ॥

मजसवें नको चेष्टा । नव्हे साळी कांहीं कोष्टा ॥१॥ बैस सांडोनि दिमाख । जाय काळें करीं मुख ॥ २ ॥ येथें न सरे चार । हीण [illegible]णीक वेव्हार ॥३॥ तुका विष्णुदास । रस जाणतो नीरस ॥४॥

॥ १३८५ ॥

बोलतों निकुरें । नव्हेत सलगीचीं उत्तरें ॥१॥ माझें संतापलें मन । परपीडा ऐकोन ॥ २ ॥ अंगावरि आलें । तोंवरि जाईल सोसिलें ॥ ३ ॥ तुज भक्तांची आण देवा । जरि तुका येथें ठेवा ॥ ४ ॥

॥ १३८६ ॥

दंड अन्यायाचा माथां । देखोनि करावा सर्वथा ॥ १ ॥ नये उगे बहुतां घाटूं । शिसें सोनियांत आटूं ॥२॥ पापपुण्यासाठीं । नीत केली आतां खोटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । दोष कोणाचा तो दावा ॥४ ॥

॥ १३८७ ॥

जाणसी उचित । पांडुरंगा धर्मनीत ॥ १ ॥ तरि म्यां बोलावें तें काई । सरे ऐसें तुझे पायीं ॥ २ ॥ पालटती क्षण । संचितप्रारब्ध-क्रियमाण ॥ ३ ॥ तुका ह्मणे सत्ता । होसी सकळ करिता ॥ ४ ॥

॥ १३८८ ॥

भवसिंधूचें हेंचि तारूं । मज विचारूं पाहातां ॥ १ ॥ चित्तीं तुझे धरिन पाय । सुख काय तें तेथें ॥ २ ॥ माझ्या खुणा मनापाशीं । तें या रसीं बुडालें ॥३॥ तुका ह्मणे वर्म आलें । हातां भलें हें माझ्या ४

॥ १३८९ ॥

आश्चर्य तें एक झालें । मना आलें माझिया ॥१॥ मढ्यापाशीं करुणा केली । तैसी गेली वृथा हे ॥२॥ न याचा तो कैसा राग । खोटें मग देखोनि ॥३॥ तुका ह्मणे कैंचा बोला । शोध विठ्ठला माझिया ॥४॥

॥ १३९० ॥

मी याचक तूं दाता । काय सत्य पाहों आतां ॥१॥ म्यां तों पसरिला हात । करीं आपुलें उचित ॥२॥ आह्मीं ध्यावें नाम । तुह्मां समाधान काम ॥३॥ तुका ह्मणे देवराजा । वाद खंडी तुझा माझा ॥४॥

॥ १३९१ ॥

बहुतां रीती काकुलती । आलों चित्तीं न धराच ॥१॥ आतां काशा-साठीं देवा । मिथ्या हेवा वाढवूं ॥२॥ तुह्मां आह्मां झाली तुटी । आतां भेटी चिंतनें ॥३॥ तुका ह्मणे लाजिरवाणें अधीर जिणें इच्छेचें ॥४॥

करुणापर अभंग.

॥ १३९२ ॥

संसारतापें तापलों मी देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥ १ ॥ ह्मणऊनि तुझे आठविले पाय । ये वो माझे माय पांडुरंगे ॥ २ ॥ बहुतां जन्मींचा झालों भारवाही । सुटिजे हें नाहीं वर्म ठावें ॥३॥ वेढियेलों चोरीं अंतर्बाह्यात्कारीं । कणव न करी कोणी माझी ॥४॥

बहु पांगविलों बहु वागविलों । बहु दिवस झालों कासाविस ॥५॥
तुका ह्मणे आतां धांव घालीं वेगीं । ब्रीद तुझें जगीं दीनानाथा ॥६॥

॥ १३९३ ॥

सर्प भुलोन गुंतला नादा । गारुडिये फांदा घातलासे । हिंडवुनि पोट भरी दारोदारी । कोंडुनि पेटारी असेरया ॥ १ ॥ तैसी परी मज झाली पांडुरंगा । गुंतलों तो मी गा सोडीं आतां । माझें मज कांहीं न चलेसे झालें । कृपा तुज न करितां ॥ २ ॥ आमिसें मीन लावियला गळीं । भक्ष तो गिळी ह्मणउनिया । काढूनि बाहेरी प्राण घेऊं पाहे । तेथें बाप माये कवण रया ॥ ३ ॥ पक्षी पिलयां पातलें आशा । देखोनिया फांसा गुंते बळें । मरण नेणें माया धांवोनि वोसरे । जीवित्व ना जालीं बाळें ॥ ४ ॥ गोडपणें मासी गुंतली लिगाडीं । सांपडे फडफडी अधिकाधिक । तुका ह्मणे प्राण घेतला आशा । पंढरीनिवासा धांव घालीं ॥ ५ ॥

॥ १३९४ ॥

सुटायाचा कांहीं पाहातों उपाय । तों हे देखें पाय गोंवियेले ॥ १ ॥
ऐसिया दुःखाचे सांपडलों संदी । हरपली बुद्धि बळ माझें ॥ २ ॥
प्रारब्ध क्रियमाण संचिताचें । वोढत ठायींचें आलें साचें ॥ ३ ॥
विधिनिषेधाचे सांपडलों चपे । एकें एक लोपे निवडेना ॥ ४ ॥
सारावें तें वाढे त्याचियाचि अंगें । तृष्णेचिया संगें दुःखी झालों ५
तुका ह्मणे आतां करीं सोडवण । सर्वशक्तिहीन झालों देवा ॥ ६ ॥

॥ १३९५ ॥

भय वाटे पर । न सुटे हा संसार ॥ १ ॥ ऐसा पडिलों कांचणी । करीं धांवा ह्मणउनी ॥ २ ॥ विचारितों कांहीं । तों हें मन हातीं नाहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । येथें न पुरे रिघावा ॥ ४ ॥

॥ १३९६ ॥

अंतरींचा भाव जाणोनिया गुज । तैसें केलें काज पांडुरंगा ॥ १ ॥
घातलें वचन न पडेचि खालीं । तूं आह्मां माउली अनाथांची ॥२॥
मज याचकाची पुरवावी आशा । पंढरीनिवासा मायबापा ॥ ३ ॥
नाशिली आशंका माझिया जीवाची । उरली भेदाची होती कांहीं ४
तुका ह्मणे आतां केलों मी निर्भर । गाईन अपार गुण तुझे ॥ ५ ॥

॥ १३९७ ॥

बोलविसी तैसें आणीं अनुभवा । नाहीं तरी देवा विटंबना ॥ १ ॥
मिठेविण काय करावें मिष्टान्न । शव जीवेविण शृंगारिलें ॥ २ ॥
संपादणीविण विटंबिलें सोंग । गुणेविण चांग रूपहीन ॥ ३ ॥

कन्यापुत्रेंविण मंगळदायकें। वेचिलें हें फिकें द्रव्य तरी ॥ ४ ॥
तुका ह्मणे तैसी होते मज परी। न देखे अंतरीं प्रेमभाव ॥ ५ ॥

॥ १३९८ ॥

श्वाना दिली सवे। पायांभोंवतें तें भोंवें ॥ १ ॥ तैसी जाली मज
परी। वसे निकट सेजारीं ॥ २ ॥ जेवितां जवळी। येऊनिया पुच्छ
घोळी ॥ ३ ॥ कोपेल तो धनी। तुका ह्मणे नेणें मनीं ॥ ४ ॥

॥ १३९९ ॥

मुखें बोलावें तें जीवींचें जाणसी। विदित पायापाशीं सर्व आहे १
आतां येथि भलें भाकावी करुणा। विनियोग तो जाणा तुम्ही त्याचा२
आपलें तो येथें केलें नव्हे कांहीं। साधनाच्या वाहीं पडों नये ॥३॥
तुका ह्मणे देह दिला पिंडदान। वेळोवेळां कोण चिंता करी ॥ ४ ॥

॥ १४०० ॥

कवतुकवाणें बोलों बोबडया वचनें ॥ १ ॥ हें तों नसावें अंतरीं।
आह्मां धरायाचें दुरी ॥ २ ॥ स्तुति तैशी निंदा। स्वाना समाचि
गोविंदा ॥ ३ ॥ तुका म्हणे बोलें। मज तुम्हीं शिकाविलें ॥ ४ ॥

॥ १४०१ ॥

जन पूजी याचा मज कां आभार। हा तुह्मी विचार जाणा देवा १
पत्र कोण मानी वंदितील सिक्का। गौरव सेवका त्याचि मुळें ॥२॥
मी मीपणें होतों जनामधीं आधीं। कोणें दिलें कधीं काय तेव्हां ३॥
आतां तूं भोगितां सर्व नारायणा। नको आह्मां दीना पीडा करूं ४
आपुलिया हातें देशील मुशारा। तुका ह्मणे खरा तोचि आम्हां ५

॥ १४०२ ॥

पाळिलों पोसिलों जन्मजन्मांतरीं। वागविलों करीं धरोनिया ॥ १ ॥
आतां काय माझा घडेल अव्हेर। मागें बहु दूर वागविलें ॥ २ ॥
नेदी वारा अंगीं लागों आघाताचा। घेतला ठायींचा भार माथा ३
तुका ह्मणे बोल करितों आवडी। अविट तेचि गोडी अंतरींची ४॥

॥ १४०३ ॥

मजपुढें नाहीं आणीक बोलता। ऐसें कांहीं चित्ता वाटतसे ॥ १ ॥
याचा कांहीं तुह्मीं देखावा परिहार। सर्वज्ञ उदार पांडुरंगा ॥ २ ॥
कामक्रोधें नाहीं सांडिलें आसन। राहिले असोन देहामध्यें ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां झालों उतराई। कळो यावें पायीं निरोपिलें ॥४॥

॥ १४०४ ॥

काळावरी घालूं तरि तो सरिसा। न पुरतां इच्छा दास कसे ॥१॥
आतां नाहीं कांहीं उशिराचें काम। न खंडावें प्रेम नारायणा ॥ २ ॥
देणें लागे मग विलंब कां आड। गोड तरी गोड आदि अंत ॥ ३ ॥
तुका म्हणे होईल दर्शन निश्चिती। गाईन ते गीतीं ध्यान मन ॥ ४ ॥

॥ १४०५ ॥

काय माझा पण होईल लटिका । ब्रिदावळी लोकां दाविली ते ॥१॥
तरी करूनिया देई माझी आळी । येऊनि कुरवाळी पांडुरंग ॥ २ ॥
आणीक म्यां कोणा म्हणावें हातीं । नये काकुलती दुजियासी ३
तुका म्हणे मज येथेंचि ओळखी । होईन तो सुखी पायांनींच ॥ ४ ॥

॥ १४०६ ॥

नको माझें मानूं आहाच ते शब्द । कळवळयाचा वाद करितसें १
कासयानें बळ करूं पायापाशीं । आकाची ते दासीं करुणा आम्ही २
काय मज चाड असे या लौकिकें । परी असे निकें अनुभवाचें ॥३॥
लांचावल्यासाठीं वचनाचा आळी । टकळयानें घोळी जवळी मन ४
वाटतसे आस पुरविसी ऐसें । तरि अंगीं पिसें लावियेलें ॥ ५ ॥
तुका म्हणे माझी येथेंचि आवडी । श्रीमुखाची जोडी इच्छीतसें ॥६॥

॥ १४०७ ॥

तांतडीनें आह्मां धीरचि न कळे । पाळावे हे लळे लवलाहीं ॥ १ ॥
नका कांहीं पाहों सावकाशीं देवा । करा एक हेवा तुमचा माझा२
बोरसाचा हेवा सांभाळावी प्रीत । नाहीं राहों येत अंगीं सदा ३॥
तुका ह्मणे मज नका गोवूं खेळा । भोजनाची वेळा राखियेली ॥४॥

॥ १४०८ ॥

इच्छिती तयांसी व्हावें जी अरूप । आह्मांसी स्वरूपस्थिती चाड १
आतां नव्हे माझा भाव अनारिसा । पाउलांनीं इच्छा गोवियेली २
लेंकरासी कोठें जाणत्याची परी । करूं येते दुरी धरावया ॥ ३ ॥
लागली न सुटे नामाची आवडी । माझी भावजोडी भंगूं नका ४॥
घेसील वेढे मुक्तीच्या अभिलासें । चाळवीं जा पिसे ब्रह्मज्ञानी ५॥
तुका ह्मणे माझा कोठें भक्तिरस । पाडावया ओस चाळविसी ॥६॥

॥ १४०९ ॥

जालिया दर्शन करीन मी सेवा । आणीकही देवा नलगे दुजें ॥१॥
प्रारब्धा आधीन अन्न आच्छादन । स्थिर करोनि मन ठेवीं पायीं२
ये गा ये गा येगा कृपाळुवा हरी । विनवीं अभ्यंतरीं देउनि भेटी २
आसावलें मन जीवनाचे ओढी । नामरूपें गोडी लावियेली ॥ ४ ॥
काय तुह्मांपाशीं नाहीं भांडवल । माझे मिथ्या बोल जाती ऐसे ५॥
काय लोखंडाचे पाहे गुण दोष । शिवोनि परिस सोनें करी ॥ ६ ॥
तुका ह्मणे माझें अवघें असों द्यावें । आपुलें करावें ब्रीद साच॥७॥

॥ १४१० ॥

नव्हा दास मज ह्मणती अंकित । अवघे सकळिक लहान थोर॥१॥
आतां लाग करावें जतन । तुझें थोरपण तुज देवा ॥ २ ॥

होउनी निर्भर राहिलों निश्चिंत । पावनपतित नाम तुझें ॥ ३ ॥
करितां तुज होय डोंगराची राई । न लगतां कांहीं पात्या पातें ॥४॥
तुका ह्मणे तुज काय ते आशंका । तारितां मशका मज दीना ॥५॥

॥ १४११ ॥

भलते जन्मीं मज घालिशील तरी । न सोडीं मी हरी नाम तुझें ॥१॥
सुख दुःख तुज देईन भोगितां । मग मज चिंता कासयाची ॥ २ ॥
तुझा दास म्हणवीन मी अंकिला । भोगितां विठ्ठला गर्भवास ॥ ३ ॥
कासया मी तुज भाकितों करुणा । तारीं नारायणा म्हणऊनि ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुज येऊं पाहे उणें । तारिसील तेणें आम्हां तया ॥ ५ ॥

॥ १४१२ ॥

आणीक पांखांडें असती उदंडें । तळमळिती पिंडें आपुलिया ॥ १ ॥
त्याचिया बोलाचा नाहीं विश्वास । घातलीसे कास तुझ्या नामीं २
दृढ एक चित्तें झालों या जीवासी । लाज सर्वविशीं तुम्हांसी हे॥३॥
पीडों नेदों पशु आपुले अंकित । आहे जें उचित तैसें करा ॥ ४ ॥
तुका ह्मणे किती भाकावी करुणा । कोप नारायणा येईल तुम्हां ॥५॥

॥ १४१३ ॥

जेथें जातों तेथें पडतो मतोळा । न देखिजे डोळा लाभ कांहीं ॥१॥
कपाळीची रेखा असती उत्तम । तरि कां हा श्रम पावतों मी ॥ २ ॥
नठहेचि तुम्हांस माझा अंगिकार । थीता संसार अंतरला ॥ ३ ॥
भोग तंव झाला खरा भोगावा तो । भांडवल नेतो आयुष्य काळ ४
कोठें तुझी कीर्ति आइकिली देवा । मुकतों कां जीवा तुका ह्मणे ॥५॥

॥ १४१४ ॥

न घडे मायबापें बाळकाचा घात । आपणांदेखत होऊं नेदी ॥ १ ॥
का मी मनीं चिंता वाहूं भय धाक । काय नव्हे एक करितां तुज ॥२॥
वर्म जाणे त्याच्या हिताचें उपाय । तान भूक वाहे काडिये खांदीं ॥३॥
तुका ह्मणे तूं गा कृपावंत भारी । ऐसें मज हरी कळों आलें ॥ ४ ॥

॥ १४१५ ॥

नलगे मायेसी बाळें निरवावें । आपुल्या स्वभावें ओढे त्यासी ॥ १ ॥
मज कां लागला करणें विचार । ज्याचा जार भार त्याचे माथां ॥२॥
गोड धड त्यासी ठेवी न मागतां । समाधान खातां नेदी मना ॥ ३ ॥
खेळतां गुंतलें उमगूनी आणी । बैसोनिया स्तनीं लावी बळें ॥ ४ ॥
त्याच्या दुःखेंपणें आपण खापरीं । लाही तळीं वरी होय जैसी ॥५॥
तुका ह्मणे देह विसरे आपुला । आघात तो त्याला लागो नेदी ॥ ६ ॥

॥ १४१६ ॥

हातीं धरिलियाची लाज । देवा असोंदे गा तुज ॥ १ ॥ आहे अमंगळ

दुर्बळ। होई दीन तूं दयाळ ॥ २ ॥ बाळ शेंबडें मातेसी। काय नावडे तियेसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाणे। करीन देहाचें सांडणें ॥ ४ ॥

॥ १४१७ ॥

आम्हासाठीं अवतार। मत्स्यकूर्मादि सूकर ॥ १ ॥ मोहें धांवें घाली पान्हा। नांव घेतां पंढरी राणा ॥ २ ॥ कोठें न दिसे पाहतां। उडी घाली अवचिता ॥ ३ ॥ सुख ठेवी आम्हांसाठीं। दुःख आपणची घोंटी ॥ ४ ॥ आम्हां घाली पाठीकडे। आपण कळिकाळाशीं भिडे ॥५॥ तुका ह्मणे कृपानिधी। आम्हां उतरीं नावेमधीं ॥ ६ ॥

॥ १४१८ ॥

न करीं तुमची सेवा। बापुडें मी पण देवा। बोलिलों तो पाववा। पण सिद्धी सकळ ॥ १ ॥ आणीक काय तुम्हां काम। आम्हां नेदा तरी प्रेम। कैसे धर्माधर्म। निश्चयेसी राहती ॥ २ ॥ आम्ही वेचलों शरीरें। तुम्ही बीज पेरा खरें। संयोगाचें बरें। गोड होतें उभयतां ॥३॥ एका हातें टाळी। कोठें वाजते निराळी। झाला तरी बळी। स्वामीविण शोभेना ॥४॥ रूपा यावेंजी अनंता। धरीन पुटाची त्या सत्ता। होईन सरता। संतांमाजी पावणा ॥५॥ ठेविलें उधारा। वरी काय तो पातेरा। तुका ह्मणे बरा। रोकडाचि निवाड ॥ ६ ॥

॥ १४१९ ॥

देह तंव आहे प्रारब्धा आधीन। याचा मी कां सीण वाहूं भार १॥ सरो माझा काळ तुझिया चिंतनें कायावाचामनें इच्छीतसें ॥ २ ॥ लाभ तो न दिसे याह्वनि दुसरा। आणीक दातारा येणें जन्में ३॥ तुका ह्मणे आलों सोसीत संकटें। मी माझें बोखटें आहे देवा ४॥

॥ १४२० ॥

तुझी माझी आहे जुनी सोयरीक। आधीं बंधु लेक मग जाले ॥१॥ वाटेकरी म्हूण न पुसती आतां। परि आहे सत्ता करीन ते ॥ २ ॥ लेकीचें लेकरूं नातु जाल्यावरी। मंगळाही दुरि अंतरलों ॥ ३ ॥ बाइलेचा भाऊ पिसुन सोयरा। म्हणउनि करा विनोद हा ॥ ४ ॥ आकुळीं तों करूं नये तेंचि केलें। न बोलावें भलें तेंचि आतां ५॥ न म्हणसी लेंकी माउसी बहिणी। आम्हां केलें धणी पापाचे ६ बहु पांचांजणीं केली विटंबना। नये दाऊं जना तोंड ऐसें ॥ ७ ॥ तुका ह्मणे आधि मूळ तेंच धरूं। मागील तें करूं उरी आतां ॥८॥

॥ १४२१ ॥

कोण तो उपाव करूं भेटावया। जाळावी हे काया ऐसें वाटे ॥१॥ सोडोनियां गांव जाऊं वनांतरा। रुक्मादेवीवरा पाहावया ॥ २ ॥

करूं उपवास शोधूं हें शरीर । न धरवे धीर नारायणा ॥ ३ ॥
जाती आयुष्याचे दिवस हे चारी । मग केव्हां हरी भेटशील ॥४॥
तुका ह्मणे कांहीं सांगा विचारोनी । विठो तुझे मनीं असेल तें ॥५॥

॥ १४२२ ॥

तुज दिलें आतां करीं यत्न याचा । जीवभाव वाचा काया मनें ॥१॥
भागलों दातारा सीण झाला भारी । आतां मज तारीं शरणागता २॥
नेणतां सोशिली तयाची आटणी । नव्हतांही कोणी कांहीं माझीं ३॥
वर्म नेणें दिशा हिंडती मोकट । इंद्रियें सुनाट दाही दिशा ॥ ४ ॥
येरझारी फेरा शिणलों सायासीं । आतां हृषीकेशी अंगिकारीं ॥५॥
तुका ह्मणे मन इंद्रियांचे सोई । धांवे यासी काई करूं आतां ॥ ६॥

॥ १४२३ ॥

नेणे गति काय कवण अधोगति । मानिली निश्चिती तुझ्या पायीं १॥
कर्म धर्म कोण नेणें हा उपाव । तुझ्या पायीं भाव ठेवियेला ॥ २ ॥
नेणें निरसूं पाप पुण्य नेणें काय । ह्मणऊनि पाय धरिले तुझे ॥३॥
वेडा मी अविचार न कळे विचार । तुज माझा भार पांडुरंगा॥४॥
तुका ह्मणे तुज करितां नव्हे काय । माझा तो उपाय कवण तेथें ५॥

॥ १४२४ ॥

नाहीं आलें भक्ति सुख अनुभवा । तो मी ज्ञान देवा काय करूं ॥१॥
नसावें जी तुम्ही कांहीं निश्चितीनें । माझिया वचनें अभेदाच्या॥२॥
एकाएकीं मन नेदी समाधान । देखिल्या चरण वांचूनिया ॥३॥
तुका ह्मणे वाचा गुणीं लांचावली । न राहे उगली मौन्य मज ॥४॥

॥ १४२५ ॥

न कळतां काय करावा उपाय । जेणें राहे भाव तुझ्या पायीं ॥१॥
येऊनिया वास करिसी हृदयीं । ऐसें घडे कई कासयानें ॥ २ ॥
साच भावें तुझें चिंतन मानसीं । राहे हें करिसी कै गा देवा ॥३॥
लटिकें हें माझें करूनिया दुरी । साच तूं अंतरीं येउनि राहें ॥४ ॥
तुका ह्मजे मज राखावे पतिता । आपुलिया सत्ता पांडुरंगा ॥५॥

॥ १४२६ ॥

नाहीं जप तप जीवाची आटणी । मनासी दाटणी नाहीं केली ॥१॥
निजलिया ठायीं पोकारिला धांवा । सांकडें तें देवा निवारावें २॥
नाहीं आणुनिया समर्पिलें जळ । सेवा ते केवळ चिंतनाची ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मी वेंचिलीं उत्तरें । घेतलीं उदारें साच भावें ॥ ४॥

॥ १४२७ ॥

पुढिलिया सुखें निंब देतां भले । बहुत वारलें होय दुःख ॥ १ ॥
हें तों वर्म असे माउलीचे हातीं । हाणी मारी प्रीती हितासाठीं २॥

खेळतां विसरे भूक तान घर । धरूनिया कर आणी बळें ॥ ३ ॥
तुका ह्मणे पाळी तोंडिचिया घांसें । उदार सर्वस्वें सर्वकाळ ॥४॥

॥ १४२८ ॥

मार्ग चुकले विदेशी एकले । तयावरी झाले दिशाभुली ॥ १ ॥
हातीं धरूनिया पाववीले घरा । त्याच्या उपकारा काय द्यावें ॥२॥
तैसा मी कुडकुडा होतों केशीराजा । सेवा न घडे लाजा ह्मणऊनि३
सांडियेला गर्भ उबगोनि माउली । नाहीं संभाळिली भूमि शुद्ध ४
उष्ण तान भूक एवढीये अकांतीं । वोसंगा लाविती काय ह्मणिजे ५
खांद्यावरी शूळ मरणाचे वाटे । अन्यायहि मोठे साच केले ॥ ६ ॥
हातींचें हिरोनि घातला पाठीसी । तुका ह्मणे ऐसी परी झाली ॥७॥

॥ १४२९ ॥

ऐसें भाग्य कई लाहातां होईन । अवघे देखें जन ब्रह्मरूप ॥ १ ॥
मग तया सुखा अंत नाहीं पार । आनंदे सागर हेलावती ॥ २ ॥
शांति क्षमा दया मूर्तिमंत अंगीं । परावृत्त संगीं कामादिकां ॥ ३ ॥
विवेकासहित वैराग्याचें बळ । धग्दगितो ज्वाळ अग्नि जैसा ॥४ ॥
भक्ति नवविधा भावशुद्ध बरी । अलंकारावरी मुगुटमणि ॥ ५ ॥
तुका ह्मणे माझी पुरवा वासना । कोण नारायणा तुजविण ॥ ६ ॥

॥ १४३० ॥

आळीकरा कोठें साहातें कठीण । आपुला ते प्राण देऊं पाहे ॥ १ ॥
सांभाळावें मायबापें कृपादृष्टी । पीडितां तो दृष्टी देखों नये ॥ २ ॥
अंतरलों मागें संवसारा हातीं । पायांपें सरती झालों नाहीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुम्हीं विचाराजी देवा । ठेवाल तें ठेवा कोण परी ॥४॥

॥ १४३१ ॥

न पाहें माघारें आतां परतोनि । संसारापासूनि विटला जीव ॥१॥
सामोरें येऊनि कवळीं दातारा । काळाचा हाकारा न साहावे २॥
सावधान चित्त होईल आधारें । खेळतांही बरें वाटईल ॥ ३ ॥
तुका ह्मणे कंठ दाटला या सोसें । न पवेचि कैसें जवळी हें ॥ ४ ॥

॥ १४३२ ॥

करितां विचार । तो हा दृढ संसार । ब्रह्मादिकां पार । नुलंघवे सामर्थ्यें १ शरण शरण नारायणा । मज अंगिकारीं दीना । आलें तें वचना । पासीं माझ्या सामर्थ्य ।२॥ पाटीवरी मोळी । तोचि कळवा पायीं तळीं । सांपडला जाळीं । मत्स्य झाला तो न्याय ॥ ३ ॥ आतां करीन तांतडी । लाभाची ते याच जोडी । तुका ह्मणे ओढी । पायां सोई मनाची ॥ ४ ॥

॥ १४३३ ॥

सिणलों दातारा करितां वेरझारा। आतां सोडवी संसारापासोनिया १
न सुटेचि बाकी नव्हे झाडापाडा। घातलोंसे खोडा हाडांचिया २
मायबापें माझीं जीवाचीं सांगाती। तीं देतील हातीं काळाचिया ३
पडताळूनि सुरी बैसली शेजारीं। यमफासा करीं घेऊनिया ४
पाठीं पोटीं एकें लागलीं सरसीं। नेती नरकापाशीं ओढूनिया ५
जन साह्यभूत असे या सकळां। मी एक निराळा परदेशी ६
कोणां काकुलती नाहीं कोणे परी। तुजविण हरी कृपाळुवा ७
तुका ह्मणे मज तुझाचि भरंवसा। ह्मणऊनि आशा मोकलिली ८

॥ १४३४ ॥

स्त्रीपुत्रांदिकीं राहिला आदर। विषयीं पडिभर अतिशय ॥ १ ॥
आतां सोडवणें धांवा नारायणा। मज हे वासना अनावर ॥ २ ॥
येउनिया आड ठाके लोकलाज। तें हें दिसे काज अंतरलें ॥ ३ ॥
तुका ह्मणे आम्हां जेथें जेथें गोवा। तेथें तुह्मीं देवा सांभाळावें ४

॥ १४३५ ॥

बहु या प्रपंचें भोगविल्या खाणी। टाकोनिया मनीं ठेविला सीण १
आतां पायांपाशीं लपवावें देवा। नको पाहूं सेवा भक्ती माझी २
बहु भय वाटे एकाच्या बोभाटें। आली घायवटे फिरोनिया ॥ ३॥
तुका ह्मणे सिगे भरूं आलें माप। वियोग संताप झाला तुझा ४

॥ १४३६ ॥

आजिवरी होतों संसाराचे हातीं। आतां ऐसें चित्तीं उपजलें ॥१॥
तुला शरणागत व्हावें नारायणा। अंगीकारा दीना आपुलिया २॥
विसरलों काम याजसाठीं धंदा। सकळ गोविंदा माझें तुझें ॥ ३॥
तुका ह्मणे विज्ञापना परिसावी। आवडी हे जीवीं झाली तैसी ४॥

॥ १४३७ ॥

कैसा तो देखीला होसील गोपाळीं। पुण्यवंती डोळीं नारायणा १॥
तेणें लोभें जीव झालासे बराडी। आह्मी ऐसी जोडी कई लाभों २
असेल तें कैसें दर्शनाचें सुख। अनुभवे श्रीमुख अनुभवितां ॥३॥
तुका ह्मणे वाटे देसी आलिंगन। अवस्था ते क्षणक्षणा होते ॥ ४ ॥

॥ १४३८ ॥

आतां मी अनन्य येथें अधिकारी। होइन कोणे परी नेणें देवा ॥ १ ॥
पुराणींचा अर्थ आणितां मनास। होतो कासाविस जीव माझा २॥
इंद्रियांचे आह्मी पांगिलों अंकित। त्यांच्या संगें चित्त रंगलें तें ३॥
एकाचेंही जेथें न घडे दमन। अवघीं नेमून कैसीं राखों ॥ ४ ॥
तुका ह्मणे जरी मोकलिसी आतां। तरी मी अनंता वाया गेलों ॥५॥

॥ १४३९ ॥

अवघ्या पातकांची मी एक राशी । अवघा तूं होशी सर्वोत्तम ॥१॥
जैसा तैसा लागे करणें अंगिकार । माझा सर्व भार चालविणें २ ॥
अवघेंची मज गिळियेलें काळें । अवघींच बळें तुझे अंगीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां खुंटला उपाय । अवघेचि पाय तुझे मज ॥ ४ ॥

॥ १४४० ॥

ज्ञानियांचे घरीं चोजवितां देव । तेथें अहंभाव पाठी लागे ॥ १ ॥
ह्मणउनिया अवघे सांडिले उपाय । धरियेले पाय दृढ तुझे ॥२॥
वेदपरायण पंडित वाचक । न मिळती एक एकांमधीं ॥ ३ ॥
पाहों गेलों भाव कैसी आत्मनिष्ठा । तेथें देखें चेष्टा विपरीत ॥४॥
आपुलिया नाहीं निवाले जे अंगें । एकी करती रागें गुरुगुरु ॥५॥
तुका ह्मणे मज कोणाचा पांगिला । नको बा विठ्ठला करूं आता ६॥

॥ १४४१ ॥

मेल्यावरि मोक्ष संसारसंबंध । आरालिया बद्ध ठेवा आह्मा ॥ १ ॥
वागवित संदेह राहों कोठवरी । मग काय थोरी सेवकाची ॥ २ ॥
गाणें गीत आह्मा नाचणें आनंदें । प्रेम कोठें भेदें अंगा येतें ॥ ३ ॥
तुका ह्मणे किती सांगावे दृष्टांत । नसतां तूं अनंत सानुकूल ॥४॥

॥ १४४२ ॥

साखरेचें नाम घेतां कळे गोडी । तैसी आह्मां जोडी वैष्णवांची ॥१॥
मोक्ष गांठी असे ठेविला बांधोनी । सोस तो भजनीं आवडीचा२॥
भोजनाची चिंता माय वाहे बाळा । आह्मां तरी खेळावरि चित्त ३
तुका ह्मणे आह्मीं देहउपकारें । गाऊं निरंतर नाचों लागों ॥ ४ ॥

॥ १४४३ ॥

किती विवंचना करीतसें जीवीं । मन धांवडवी दाही दिशा ॥ १ ॥
कोणा एका भावें तुम्ही अंगीकार । करावा विचार याच साठीं ॥२॥
इतर ते आतां लाभ तुच्छ झाले । अनुभवा आले गुणागुण ॥ ३ ॥
तुका ह्मणे लागो अखंड समाधि । जावें प्रेमबोधीं बुडोनिया ॥ ४ ॥

॥ १४४४ ॥

मोलाचें आयुष्य वेचतसे सेवे । गुंगवतां गोवे खेद होतो ॥ १ ॥
उगवूं आलेति तुम्ही नारायणा । परिहार या सिणा निमिषांत ॥२॥
लिगाडाचे मासी न्यायें झाली परी । उरली ते उरी नाहीं कांहीं ॥३॥
तुका ह्मणे लाहो साधीं वाचाबळें । ओढियेलों काळें धांव घाली ४॥

॥ १४४५ ॥

नव्हें मी स्वतंत्र अंगाचा पाईक । जो हे सकळिक सत्ता वारूं ॥१॥
तुह्मां आळवावें पाउला पाउलीं । कृपेची साउली करीं मज ॥२॥

शक्तिहीन तरी झालों शरणागत । आपुला वृत्तांत जाणोनिया ३॥
तुका ह्मणे भवाभेणें धरिले पाय । आणीक उपाय नेणों कांहीं ॥४॥
॥ १४४६ ॥
ओस झाल्या दिशा मज भिंगुळवाणें । जीवलग नेणे मज कोणी १
भय वाटे देखें श्वापदांचे भार । नव्हे मज धीर पांडुरंगा ॥ २ ॥
अंधकारापुढें न चलवे वाट । लागतील खुंट कांटे अंगा ॥ ३ ॥
एकला निःसंग फांकती मारग । भितों नव्हे लाग चालावया ॥४॥
तुका ह्मणे वाट दावूनि सद्गुरु । राहिला हा दुरू पांडुरंग ॥ ५ ॥
॥ १४४७ ॥
एका एक वर्में लावूनिया अंगीं । ठेवितों प्रसंगीं सांभाळीन ॥ १ ॥
नेघावा जी तुम्ही वाव बहु फार । धरूनि अंतर ठायाठाव ॥ २ ॥
वेव्हारें आलें तें समानाचि होतें । बळ नाहीं येथें चालों येत ॥३॥
तुका ह्मणे आतां निवाडाच साटीं । संसारें तुटी करूनि ठेलों ॥ ४ ॥
॥ १४४८ ॥
कांहीं एक तरी असावा आधार । कासयानें धीर उपजावा ॥ १ ॥
म्हणविल्यासाठीं कैसें पडे रुजू । धणी नाहीं उजू सन्मुख तो ॥२॥
वेंचल्या दिसांचा कोणावरी लेखा । घालावा हा सुखासुखा आम्हीं ३
नाहीं मनोगत तोंवरि हे देवा । तुका ह्मणे सेवा नेघीजे तो ॥ ४ ॥
॥ १४४९ ॥
शिकल्या शब्दाचें उत्पादितों ज्ञान । दरपणींचें धन उपर वाया ॥१॥
अनुभव कई होईल भोगितां । सांकडें तें आतां हेंचि आलें ॥ २ ॥
गायें नाचें करीं शरीराचे धर्म । बीजकळा वर्म तुमचें दान ॥ ३ ॥
तुका ह्मणे केला उशीर न साहे । घाल तरी आहे सर्व सिद्ध ॥ ४ ॥
॥ १४५० ॥
नाहीं गुणदोष लिंपों देत अंगीं । झाडितां प्रसंगीं बराबरी ॥ १ ॥
निकटवासिया आळवितों धांवा । तेथूनिया देवा सोडवूनी ॥ २ ॥
उमटे अंतरीं तें करूं प्रगट । कळीनें बोभाटा धांव घालीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे तरि वांचलों या काळें । समर्थाचे बळें सुखी असों ॥ ४ ॥
॥ १४५१ ॥
तुम्ही माझा देवा करिजे अंगिकार । हा नाहीं विचार मजपाशीं ॥१॥
आतां दोहीं पक्षीं लागलें लंछन । देवभक्तपण लाजविलें ॥ २ ॥
एकांतीं एकलें न राहे निश्चळ । न राहेचि पळ मन ठायीं ॥ ३ ॥
पायीं महत्वाची पडिली शृंखळा । बांधविला गळा स्नेहा हातीं ४
शरीर सोकलें देखिलिया सुखा । कदाच हें मुखा मान्य नाहीं ॥५॥
तुका ह्मणे झाला अवगुणांचा थारा । वाढली हे निद्रा आळस बहु ६

॥ १४५२ ॥

तुजविण तिळभरी रिता ठाव । नाहीं ऐसें विश्व बोलतसे ॥ १ ॥
बोलियेले योगी मुनी साधु संत । आहेसी या आंत सर्वांठायीं ॥२॥
मी तया विश्वासें आलों शरणांगत । पूर्वींचें अपत्य आहें तुझें ॥ ३ ॥
अनंत ब्रह्मांडें भरोनि उरलासी । मजला झालासी कोठें नाहीं ॥४॥
अंतपार नाहीं माझिया रूपासी । काय सेवकासी भेट देऊं ॥ ५ ॥
ऐसें विचारिलें म्हणोनी न येशी । सांग हृषीकेशी मायबापा ॥ ६ ॥
तुका ह्मणे काय करवा उपाय । जेणें तुझे पाय आतुडती ॥ ७ ॥

॥ १४५३ ॥

अवघा वेंचलों इंद्रियांचे ओढी । झालें तें ते घडी निरोपिलें ॥ १ ॥
असावा जी ठावा सेवेसी विचार । आपुला म्यां भार उतरिला॥२॥
कायावाचा मनें तोचि निजध्यास । येथें झालों ओस भक्तिभावें ३
तुका ह्मणे करूं येईल धांवणें । तरि नारायणें सांभाळावें ॥ ४ ॥

॥ १४५४ ॥

काम क्रोध माझे जीताती शरीरीं । कोवळें तें वरी बोलतसे ॥ १ ॥
कैसा मी सरतां झालों तुझ्या पायीं । पांडुरंगा कांहीं न कळे हें ॥२॥
पुराणींची ग्वाही वदतील संत । तैसें नाहीं चित्त शुद्ध झालें ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज आणूनि अनुभवा । दाखवीं हें देवा साच खरें ॥ ४ ॥

॥ १४५५ ॥

मन माझें चपळ न राहे निश्चळ । घडी एकी पळ स्थिर नाहीं ॥ १ ॥
आतां तूं उदास नव्हे नारायणा । धांवे मज दीना गांजियेलें ॥ २ ॥
धांव घालीं पुढें इंद्रियांचे ओढी । केलें तडातोडी चित्त माझें ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझा न चले सायास । राहिलों हे आस धरुनी तुझी ॥४॥

॥ १४५६ ॥

नित्य या मनासी करितों विचार । तो हें अनावर विषयलोभी ॥ १ ॥
आतां मज राखें आपुलिया बळें । न देखें हें जाळें उगवतां ॥ २ ॥
सांपडलों गळीं नाहीं त्याची सत्ता । उगळी मागुता घेतला तो ॥३॥
तुका ह्मणे मी तो अज्ञानाचें आहें । परि तुझी पाहें वास देवा ॥ ४ ॥

॥ १४५७ ॥

तुमचे स्तुतियोग्य कोठें माझी वाणी । मस्तक चरणीं ठेवितसें ॥ १ ॥
भक्तिभाग्य तरी नेदीं तुळसीदळ । जोडुनि अंजुळ उभा असें ॥ २ ॥
कैचें भाग्य ऐसें पाविजे संन्निध । नेणे पाळूं विध करुणा भाकीं ॥३॥
संतांचे शेवटीं उच्छिष्टाची आस । करूनिया वास पहातसें ॥ ४ ॥
करीं इच्छा मज म्हणोत आपुलें । एखादिया बोलें निमित्याच्या ॥५॥
तुका ह्मणे शरण आलों हें साधन । करितों चिंतन रात्रदिवस ॥ ६ ॥

॥ १४५८ ॥

वारंवार तुज द्यावया आठव । आइक तो भाव माझा कैसा ॥ १ ॥
गेले मग नये फिरोन दिवस । पुढिलांची आस गणित नाहीं ॥ २ ॥
गुणां अवगुणांचे पडती आघात । तेणें होय चित्त कासाविस ॥३॥
कांहीं एक तुझा न देखों आधार । म्हणऊनि धीर नाहीं जीवा ॥४॥
तुका ह्मणे तूं ब्रह्मांडाचा जीव । तरी कां आम्ही कींव भाकीतसों ॥५॥

॥ १४५९ ॥

मी तो सर्वभावें अनधिकारी । होइल कैसी परी नेणों देवा ॥ १ ॥
पुराणींचे अर्थ आणितां मनास । होय कासाविस जीव माझा ॥२॥
इंद्रियांची आम्ही पांगिलों अंकितें । त्यांचे संगें चित्त रंगलेंसे ॥ ३ ॥
एकाचेंही मज न घडे दमन । अवघीं नेमून कैसीं राखों ॥ ४ ॥
तुका ह्मणे जरी मोकलिशीं आतां । तरी मी अनंता वाया गेलों ॥५॥

॥ १४६० ॥

माझे मज कळों येती अवगुण । काय करूं मन अनावर ॥ १ ॥
आतां आड उभा राहें नारायणा । दयासिंधुपणा साच करीं ॥ २ ॥
वाचा वदे परी करणें कठीण । इंद्रियां अधीन झालों देवा ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझा जैसा तैसा दास । न धरीं उदास मायबापा ॥ ४ ॥

॥ १४६१ ॥

काय पुण्य ऐसें आहे मजपाशीं । तांतडी धांवसी पांडुरंगा ॥ १ ॥
काय ऐसा भक्त वाया गेलों थोर । तूं मज समोर होसी वेगा २ ॥
काय कष्ट माझे देखिली चाकरी । तो तूं झडकरी पाचारिशी ३ ॥
कोण मी नांवाचा थोर गेलों मोटा । अपराधी करंटा नारायणा ४॥
तुका ह्मणे नाहीं ठाउकें संचित । येणें जन्महित नाहीं केलें ॥ ५ ॥

॥ १४६२ ॥

जन्मांतरीं शुद्ध नाहीं आचरण । यालागीं चरण अंतरले ॥ १ ॥
वोडवलें संचित येणें जन्में पाहतां । आतां पंढरिनाथा कृपा करीं२
पतितपावन ब्रिद साच करीं देवा । यालागीं कुढावा करीं माझा३
अपराधी पातकी दुष्ट दुराचारी । आहाळलों भारी संवसारें ॥४॥
कामक्रोध आदि कल्पनेच्या त्रासें । तुज न पवें ऐसें झालें देवा ५॥
हा ना तोसा ठाव झाला पांडुरंगा । नयेचि उपेगा काय करूं ॥ ६ ॥
आपुलिया नांवा धांवणिया धांवें । लवकरी यावें तुका ह्मणे ॥ ७ ॥

॥ १४६३ ॥

कनवाळू कृपाळू भक्तालागीं मोही । गजेंद्राचा धांवा तुवां केला विठाई ॥ १ ॥ पांडुरंगे ये वो पांडुरंगे । जीवाचे जिवलगे येइवो पांडुरंगे ॥ २ ॥ भक्तांच्या कैवारें कष्टलीस विठ्ठले । आंब-

ऋषीकारणें जन्म दाहा घेतले ॥ ३ ॥ प्रल्हादाकारणें स्तंभीं अवतार केला । विदारूनि दैत्य प्रेमपान्हा पाजिला ॥ ४ ॥ उपमन्याकारणें कैसी धांवसी लवलाही । पाजी प्रेमपान्हा क्षीरसागराठायीं ॥ ५ ॥ कौरवें पांचाळी सभेमाजी आणिली । वस्त्रहरणीं वस्त्रें कैसी झाली माउली ॥ ६ ॥ दुर्वास पातला धर्मा छळावया वनीं । धांवसी लवलाही शाखादेठ घेऊनि ॥ ७ ॥ कृपाळु माउली भुक्तिमुक्ति भांडार । करीं माझा अंगीकार तुका ह्मणे विठ्ठले ॥ ८ ॥

॥ १४६४ ॥

तुजकरितां होतें आनाचें आन । तारिले पाषाण उदकीं देवा ॥ १ ॥ कां नये कैवार करूं अंगीकार । माझा बहु भार जड झाला ॥ २ ॥ चुकलासी ह्मणों तरी जीवांचाही जीव । रिता नाहीं ठाव उरों दिला ३ तुका ह्मणे ऐसें काय सत्ताबळ । माझे परी कृपाळ आहां तुह्मी ॥ ४ ॥

॥ १४६५ ॥

येईं वो येईं वो येईं धांवोनिया । विलंब कां वाया लाविला कृपाळे ॥ १ ॥ विठाबाई विश्वंभरे भवच्छेदके । कोठें गुंतलीस अगे विश्वव्यापके ॥ २ ॥ न करीं न करीं न करीं आतां आळस अव्हेरु । व्हावया प्रगट कैचें दुरी अंतरु ॥ ३ ॥ नेघे नेघे नेघे माझी वाचा विसांवा । तुका ह्मणे हांवा हांवा हांवा साधावा ॥ ४ ॥

॥ १४६६ ॥

संताचे उपदेश आमुचे मस्तकीं । नाहीं मृत्यलोकीं राहाणें मा ॥ १ ॥ ह्मणऊनि बहु तळमळी चित्त । येईं वो धांवत पांडुरंगे ॥ २ ॥ उपजली चिंता लागला उशीर । होत नाहीं धीर निढळ वाटे ॥ ३ ॥ तुका ह्मणे पोटीं रिझालेंसें भय । करूं आतां काय ऐसें झालें ॥ ४ ॥

॥ १४६७ ॥

माये मोकलिलें कोठें जावें बाळें । आपुलिया बळें न धंवे तें ॥ १ ॥ रुसोनिया पळे सांडुनिया ताट । मागें पाहे वाट यावें ऐसी ॥ २ ॥ भांडवल आह्मां आळी करावी हे । आपणची माये धांवशील ॥ ३ ॥ तुका ह्मणे आळी करुनिया निकी । देसील भातुकीं बुझाऊनि ॥ ४ ॥

॥ १४६८ ॥

क्षणक्षणां जीवा वाटतसे खंती । आठवती चित्तीं पाय देवा ॥ १ ॥ येईं वो येईं वो येईं लवलाही । आलिंगुनि बाहीं क्षेम देईं ॥ २ ॥ उतावीळ मन पंथ अवलोकी । आठवे ते चुकी काय झाली ॥ ३ ॥ तुका म्हणे माझ्या जीवींच्या जीवना । घाला नारायणा उडी वेगीं ४

॥ १४६९ ॥

धरूनिया सोई परतलें मन । अनुलक्षीं चरण करूनिया ॥ १ ॥ येईं पांडुरंगे मेईं सांभाळूनि । करुणावचनीं आळवितों ॥ २ ॥

बुद्धि झाली साह्य परि नाहीं बळ । अवलोकितों जळ वाहे नेत्रीं ३ ॥
न चलती पाय गळित झाली काया । म्हणऊनि दया येऊं द्यावी ४ ॥
दिशेच्या करितों वारियासीं मात । जोडुनिया हात वाट पाहें ॥ ५ ॥
तुका म्हणे वेग करावा सत्वर । पावावया तीर भवनदीचें ॥ ६ ॥

॥ १४७० ॥

उदार तूं हरी । ऐसी कीर्ति चराचरीं । अनंत हे थोरी । गर्जताती पवाडे ॥१॥ तुझे पायीं माझा भाव । पुसी जन्ममरणां ठाव । देवाचा तूं देव । स्वामी सकळां ब्रह्मांडा २ मागणें तें तुज मागों । जीवभाव तुज सांगों । लागों तरी लागों । पायां तुमच्या दातारा ३ दिसों देसी कींविळवाणें । तरी तुजचि हें उणें । तुका म्हणे जिणें । माझें तुज आधीन ४॥

॥ १४७१ ॥

धांव धांव गरुडध्वजा । आम्हां आनाथांच्या काजा ॥ १ ॥ बहु झालों कासावीस । म्हणोनि पाहें तुझी वास ॥ २ ॥ पाहें पाहें त्या मारगें । कोणी येतें माझ्या लागें ॥ ३ ॥ असोनिया ऐसा । तुज सारिखा कोंवसा ॥४॥ न लावावा उशीर । नेणों कां हो केला धीर ॥ ५ ॥ तुका ह्मणे चाली । नको चालू धांव घालीं ॥ ६ ॥

॥ १४७२ ॥

स्वामित्वाचीं वर्मैं असोनि जवळी । वाहों जावे मोळी गुणासवें १ ॥
काबाडापासूनि सोडवा दातारा । कांहीं नका भारा पात्र करूं ॥ २ ॥
धनवंत्याचिये अंगीं सत्ताबळ । व्याधि ते सकळ तोडावया ॥३॥
तुका ह्मणे आलें मोड्यासी कोंपट । सांडोव्याची वाट विसरावी ४॥

॥ १४७३ ॥

आमुचें दंडवत पायांवरी डोई । व्हावे उतराई ठेवूनिया ॥ १ ॥
कराल तें काय नव्हे जी विठ्ठला । चित्त द्यावें बोला बोबडिया२॥
तुका ह्मणे आम्ही लडिवाळें अनाथें । ह्मणोनि दीनानाथें सांभाळावें ३

॥ १४७४ ॥

येई गे विठ्ठले विश्वजिवनकले । सुंदर घननीळे पांडुरंगे ॥ १ ॥
येई गे विठ्ठले करुणाकल्लोळे । जीव कळवळे भेटावया ॥ २ ॥
नलगती गोड आणीक उत्तरें । तुझें प्रेम झुरे भेटावया ॥ ३ ॥
तुका ह्मणे धांव घालीं कृष्णाबाई । क्षेम चहूंबाही देईं मज ॥ ४ ॥

॥ १४७५ ॥

करोनि स्नानविधि आणि देवधर्म । क्रिया नित्य नेम तुजसाठीं॥१॥
तुजलागी दानें तुजलागी तीर्थें । सकळही व्रतें तुजलागी ॥ २ ॥
सकळ चित्तवृत्ति दिवस आणि राती । आवडशी प्रीती नारायणा३॥
तुका ह्मणे याहो पवित्राच्या राया । प्राणविसाविया पांडुरंगा ॥४॥

॥ १४७६ ॥

सुकलिया कोमां अत्यंत जळधर । तेणेंच प्रकार न्याय असे ॥ १ ॥
न चले पाउलीं सांडीं गरुडासन । मनाचें हो मन त्वरेलागीं ॥२॥
तुका ह्मणे भूक न साहवे बाळा । जीवनांची कळा ओढलीसे ॥३॥

॥ १४७७ ॥

आरुषा वचनीं मातेची आवडी । ह्मणऊनि तांतडी घेती नाहीं१॥
काय होइल माझें मांडिलें कवतुक । आदराची भूक रडारोवी॥२॥
लपोनिया करी चुकुर माउली । नाहीं होती केली निष्ठा सांडी ३॥
तुका ह्मणे करी पारखीं वचनें । भेवउनि तान्हें आळवावें ॥ ४ ॥

॥ १४७८ ॥

बाप करी जोडी लेंकराचे ओढी । आपुली करवंडी वाळवूनी ॥१॥
एकाएकीं केला मिरासीचा धनी । कडिये वागवूनि भार खांदीं२॥
लेववूनी पाहे डोळा अलंकार । ठेवा दावी थोर करूनिया ॥ ३ ॥
तुका ह्मणे नेदी गांजूं आणिकांसी । उदार जीवासी आपुलिया ॥४॥

॥ १४७९ ॥

असोनि न कीजे अलिप्त अहंकारें । उगीच या भारें कुंथाकुंथी॥१॥
धांवा सोडवणे वेगीं लवकरी । मी तों झालों हरी शक्तिहीन॥२॥
भ्रमल्यानें दिसे बांधल्याचे परी । माझें मजवरी वाहोनिया ॥ ३ ॥
तुका ह्मणे धांव घेतलीसे सोई । आतां पुढें येई लवकरी ॥ ४ ॥

॥ १४८० ॥

काय पाहातोसी कृपेच्या सागरा । नराच्या नरेंद्रा पांडुरंगा ॥१ ॥
नामाचा प्रताप ब्रिदाचा बडिवार । करावा साचार नारायणा॥२॥
कलीमाजी देव बौद्धरूप झाला । जगाचिया बोला लागूं नका॥३॥
माय पुत्रा काय मारूं पाहे कळी । जगाची ढवाळी काय काज४॥
तुका ह्मणे या हो कृपेच्या सागरा । रुकुमादेवीवरा मायबापा॥५॥

॥ १४८१ ॥

अनाथाचा सखा ऐकिला प्रताप । होसी कृपावंत मजवरी ॥ १ ॥
माझिया गा चित्ता करीं शिकवण । जेणें तुझे चरण जोडतील॥२॥
जोडोनिया कर येतों काकुलती । रकुमाईच्या पति कृपावंता ॥ ३॥
हरुषें निर्भर करीं माझें मन । दाखवीं चरण पांडुरंगा ॥ ४ ॥
तुझे भेटीविण जन्म गेला वाया । भजन कराया शक्ति नाहीं॥ ५ ॥
न घडे तुझी सेवा न घडे पूजन। जन्मोनि निष्कारण जाऊं पाहे ६॥
तुका ह्मणे हरी करावें या काय । भजनासी साह्य होई बापा ॥७॥

॥ १४८२ ॥

उपजोनी मरों किती वेळोवेळा। कोणा कळवळा येत माझा॥ १ ॥
ह्मणवुनी धावा करीं काकुलती । यावें बा श्रीपती सोडवाया ॥२॥

बहुत या काळें केलो भयाभीत । येतो गिवसीत पाठीलागीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुह्मी दावितां स्वरूप । माझें कांहीं पाप निरसतें ॥ ४ ॥

॥ १४८३ ॥

मायबापापुढें लाडिकें लेकरूं । तैसे बोल करूं कवतुकें ॥ १ ॥
कृपावंता घालीं प्रेमपान्हा रस । वोळली वोरस पांडुरंग ॥ २ ॥
नाहीं धीर खुंटी जवळी हुंबरे । ठायींच पाखर कवळिते ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज होऊं नेदी सीण । कळों नेदी भिन्न आहे ऐसें ॥४॥

॥ १४८४ ॥

कृपावंता दुजें नाहीं तुम्हां पोटीं । लाडे बोलें गोठी सुख माते ॥ १ ॥
घेवोनि भातुकें लागशील पाठी । लाविशील ओंठीं ब्रह्मरस ॥ २ ॥
आपुलिये पांख घालिसी पाखर । उदार मजवर कृपाळू तूं ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मांकारणें गोविंदा । वागविसी गदा सुदर्शन ॥ ४ ॥

॥ १४८५ ॥

आतां नये बोलों अव्हेराची मात । बाळावरी चित्त असों द्यावें ॥१॥
तुज कां सांगणें लागे हा प्रकार । परी हें उत्तर आवडीचें ॥ २ ॥
न वंचीं वो कांहीं एकही प्रकार । आपणा अंतर नका मज ॥ ३ ॥
तुका ह्मणे मोहो राखावा सतत । नये पोहों अंत पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ १४८६ ॥

मायबापापुढें लेंकराची आळी । आणीक हे पाळी कोण लळे ॥ १ ॥
सांभाळा जी माझीं विषमें अनंता । जवळी असतां अव्हेर कां २ ॥
आणिकांची चाले सत्ता आह्मावरी । तुमची ते थोरी काय मग ३ ॥
तुका ह्मणे आलों दुरोनि जवळी । आतां टाळाटाळी करूं नये ४ ॥

॥ १४८७ ॥

तुझा विसर नको माझिया जीवा । क्षण एक केशवा मायबापा १ ॥
जावो राहो देह आतां येचि घडी । कायसी आवडी याची मज २॥
कुश्चिळ इंद्रियें आपुलिया गुणें । यांचिया पाळणें कोण हित ॥ ३ ॥
पुत्र पत्नी बंधु सोयरीं खाणोरीं । यांचा कोण धरी संग आतां ४ ॥
पेंड हा उसना आणिला पांचांचा । सेकीं लागे ज्याचा त्यासी देणें ५
तुका ह्मणे नाहीं आणिक सोइरें । तुजविण दुसरें पांडुरंगा ॥ ६ ॥

॥ १४८८ ॥

कृपावंता कोप न धरावा चित्तीं । छळूं वक्रोक्ति स्तुती करूं ॥ १ ॥
आम्ही तुझा पार काय जाणों देवा । नेणों कैसी सेवा करावी ते २
अनंता अरूपा अलक्षा अच्युता । निर्गुण साचिता सर्वोत्तमा ॥३॥
चांगलीं हीं नामें घेतलीं ठेवूनि । झालासी लहान भक्तिकाजा ॥४॥
तुका ह्मणे तुझ्या पायांवरी सदा । मस्तक गोविंदा असो माझा ५

॥ १४८९ ॥

आम्ही जाणावे ते काई तुझें वर्म कोणे ठायीं । अंतपार नाहीं ऐसें श्रुति बोलती १ होई मज तैसा मज तैसा साना सकुमार हृषी-केशा । पुरवीं माझी आशा भुजा चारी दाखवीं ॥ २ ॥ खालता सप्तही पाताळा वरता स्वर्गाहूनि ढिसाळा । तो मी मशक डोळां कैसा पाहों आपुल्या ॥ ३ ॥ मज असे हा भरंवसा पढिये होसी तयां तैसा । पंढरीनिवासा तुका म्हणे गा विठोबा ॥ ४ ॥

॥ १४९० ॥

तुम्हा आम्हा जंव झालिया समान । तेथें कोणा कोण सम मानी १॥
उरी तो राहिलें गोमटें गौरव । ओढे माझा जीव पायांपाशीं ॥२ ॥
नेणपणें आम्ही आळवूं ओरसें । बोलावितों रसें शब्दरत्नें ॥ ३ ॥
तुका म्हणे लळे पाळीवो विठ्ठले । कां हे उरविले भेदाभेद ॥ ४ ॥

॥ १४९१ ॥

तुज घालोनिया पूजितों संपुष्टीं । परि तुझ्या पोटीं चौदा भुवनें ।१॥
तुज नाचऊनि दाखवूं कौतुका । परि रूप रेखा नाहीं तुज ॥ २ ॥
तुजलागी आह्मीं गात असों गीत । परि तूं अतीत शब्दाहूनि ॥३॥
तुजलागी आह्मीं घातियेल्या माळा । परि तूं वेगळा कर्तृत्वासी ।४॥
तुका ह्मणे आतां होऊनि परमित । माझें कांहीं हित विचारावें ॥५॥

॥ १४९२॥

कई ऐसी दशा येईल माझ्या अंगा । चित्त पांडुरंगा झुरतसे ॥१॥
नाठवुनि देह पायांचें चिंतन । अवसान तें क्षण नाहीं मध्यें ॥ २ ॥
काय ऐसा पात्र होईन लाभासी । कई हृषीकेशी तुष्टतील ॥ ३ ॥
तुका म्हणे धन्य मानीन संचित । घेईन नित्या नित्य प्रेमसुख ॥४॥

॥ १४९३ ॥

कां जी आम्हा होतें दोषांचें दर्शन । तुज समर्पून देहभाव ॥ १ ॥
पांडुरंगा कृपाळुवा दयावंता । धरसील सत्ता सकळही ॥ २ ॥
कां जी आह्मांवरि आणिकांची सत्ता । तुह्मांसी असतां जवळिकें३॥
तुका ह्मणे पायीं केलें निवेदन । उचित तें दान करीं सत्ता ॥ ४ ॥

॥ १४९४ ॥

निश्चितीनें होतों करुनिया सेवा । कां जी मन देवा उद्वेगिलें ॥ १ ॥
अनंत उठती चित्ताचे तरंग । करावा हा त्याग वाटतसे ॥ २ ॥
कोण तुह्मांविण मनाचा चाळक । तुजे सांगा एक नारायणा ॥ ३ ॥
तुका म्हणे माझा मांडिला विनोद । करवूं नेणे छंद कराल काई ४

॥ १४९५ ॥

हिरोनिया नेला मुखींचा उच्चार । पाडिलें अंतर जवळीच ॥ १ ॥
द्वैताचिये कैसा पाडियेलों हातीं । बहुत करिती ओढाओढी ॥२॥
काय करूं मज नागविलें आळसें । बहुत या सोसें पीडा केली ॥३॥
तुका म्हणे आतां अपुलिया सेवा । करूनिया देवा राखें मज ॥४॥

॥ १४९६ ॥

मौन कां धरिलें विश्वाच्या जीवना । उत्तर वचना देईं माझ्या ॥१॥
तूं माझें संचित तूंचि पूर्वपुण्य । तूं माझें प्राचीन पांडुरंगा ॥ २ ॥
तूं माझें सत्कर्म तूं माझा स्वधर्म । तूंचि नित्यनेम नारायणा ॥३॥
कृपावचनाची वाट पाहातसें । करुणा वोरसें बोल कांहीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे प्रेमळाच्या प्रियोत्तमा । बोल सर्वोत्तमा मजसवें ॥ ५ ॥

॥ १४९७ ॥

पेणावलें ढोर मार खाय पाठीं । बैसलें तें नुठी तेथूनिया ॥ १ ॥
तैसी माझ्या मना परी झाली देवा । धांवें अहंभावा सांडीवलों २॥
कडां घालीं उडी मागिलांच्या भेणें । पडणें मरणें न कळेचि ॥३॥
तुका ह्मणे झालों त्यापरी दुःखित । असें बोलावीत पांडुरंगा ॥४॥

॥ १४९८ ॥

कोठें गुंतलासी कोणाच्या धांवया । आली देवराया निद्रा तुज १॥
कोठें गुंतलासी भक्तिप्रेमसुखें । न सुटती सुखें गोपिकांचीं ॥ २ ॥
काय पडिलें तुज कोणाचें संकट । दुरी पंथ वाट न चालवे ॥ ३ ॥
काय माझे तुज गुण दोष दिसती । ह्मणोनि श्रीपती कोपलासी४॥
काय झालें सांग माझिया कपाळा । उरला जीव डोळां तुका ह्मणे५॥

॥ १४९९ ॥

कोठें गुंतलासी योगीयाचे ध्यानीं । आनंदकीर्तनीं पंढरीच्या ॥१ ॥
काय काज कोठें पडलीसे गुंती । कानीं न पडती बोल माझे ॥२ ॥
काय शेषशयनीं सुखनिद्रा आली । सांग कां सांडिली तुह्मी देवा॥३॥
तुका ह्मणे कोठें गुंतलेती सांगा । किती पांडुरंगा वाट पाहूं ॥ ४ ॥

॥ १५०० ॥

विठ्ठला रे तूं उदाराचा राव । विठ्ठला तूं जीव या जगाचा ॥ १ ॥
विठ्ठला रे तूं उदाराची रासी । विठ्ठला तुजपाशीं सकळसिद्धी ॥२॥
विठ्ठला रे तुझें नाम बहु गोड । विठ्ठला रे कोड पुरविसी ॥ ३ ॥
विठ्ठला रे तुझें श्रीमुख चांगलें । विठ्ठला लागलें ध्यान मनीं ॥ ४ ॥
विठ्ठला रे वाचे बोला बहुरस । विठ्ठला रे सोस घेतला जीवें ॥५॥
विठ्ठला रे शोक करीतसे तुका । विठ्ठला तूं ये का झडकरी ॥ ६ ॥

॥ १५०१ ॥

सत्य तूं सत्य तूं सत्य तूं विठ्ठला । कांगा हा दाविला जगदाकार१॥

सांभाळी सांभाळी आपुली हे माया। आह्मांसी कां भयाभीत केलें२॥
रूप नाहीं त्यासी ठेवियेलें नाम। लटिकाची श्रम वाढविला ॥ ३ ॥
तुका ह्मणे का गा झालासी चतुर। होतासी निष्ठुर निर्विकार ॥४॥

॥ १५०२ ॥

पाहें मजकडे भरोनिया दृष्टी। बहुत हिंपुटीं झालों माते ॥ १ ॥
करावेंसें वाटे जीवा स्तनपान। नव्हे हें वचन शृंगारिक ॥ २ ॥
सत्यासाठीं माझी शब्दविवंचना। जोडिल्या वचनाचें तें नव्हे॥३॥
तुका ह्मणे माझी कळवळ्याची कींव। भागलासे जीव कर्तव्यानें४॥

॥ १५०३ ॥

काय करूं जीव होतो कासावीस। कोंडलिये दिसे गर्भाचिना ॥१॥
पडिलें हें दिसे ब्रह्मांडचि वोस। दाटोनि उच्छ्वास राहातसे॥२॥
तुका ह्मणे अगा सर्वजाणतिया। विश्वंभरें काया निवत्याची ॥ ३ ॥

॥ १५०४ ॥

जीव जायवरी सांडी करी माता। हें तो आश्चर्यता बाळकाची॥१॥
दुर्बळ कीं नाहीं आइकत कानीं। काय नारायणीं न्यून झालें ॥२॥
क्षणक्षणा माझा न घ्यावा सांभाळ। अभाग्याचा काळ ऐसा आला३॥
तुका ह्मणे नाहीं वचनासी रुचि। फळ कर्टवाचि तें तें होय ॥ ४ ॥

॥ १५०५ ॥

तुज ह्मणतील कृपेचा सागर। तरि कां केला धीर पांडुरंगा ॥ १ ॥
आझुनि कां नये तुज माझी दया। काय देवराया पाहातोसि ॥२॥
आळवितों जैसें पाडस कुरंगिणी। पीडिलिया वनीं तानभूक ॥ ३ ॥
प्रेमरस पान्हा पाजीं माझे आई। धांवें वो विठाई वोरसोनि॥ ४ ॥
तुका ह्मणे माझें कोण हरी दुःख। तुजविण एक पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ १५०६ ॥

पडियेलों वनीं थोर चिंतवनीं। उशीर कां अझुनि लावियेला ॥१॥
येई गा विठ्ठला येईं गा विठ्ठला। प्राण हा फुटला आळवितां ॥२॥
काय तुज नाहीं लौकिकाची शंका। आपुल्या बाळका मोकलिता ३
तुका ह्मणे बहु खंती वाटे जीवा। धरियेलें देवा दुरी दिसे ॥४॥

॥ १५०७॥

तरी आह्मी तुझी धरियेली कास। नाहीं कोणी दास वाया गेला १॥
अगा पंढरीशा उभा विटेवरी। येई लवकरी धांवें नेटें ॥ २ ॥
पालवितों तुज उभी करोनि बाहे। कृपावंता पाहे मजकडे ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज बहु कान डोळे। कां हे माझे वेळे ऐसी परी ॥ ४ ॥

॥ १५०८ ॥

मज नाहीं तुझ्या ज्ञानाची ते चाड। घेतां वाटे गोड नाम तुझें ॥ १ ॥
नेणतें लेंकरूं आवडीचें तान्हें। बोलतों वचनें आवडीनें ॥ २ ॥

भक्ती नेणें कांहीं वैराग्य तें नाहीं । घातला विठाई भार तुज ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाचें निर्लज्ज होऊनि । नाहीं माझे मनीं दुजा भाव ॥४॥

॥ १५०९ ॥

आवडेल तैसें तुज आळवीन । वाटे समाधान जीवा तैसें ॥ १ ॥
नाहीं येथें कांहीं लौकिकाची चाड । तुजविण गोड देवराया ॥२॥
पुरवीं मनोरथ अंतरींचे आर्त । धायेवरि गीत गाय तुझें ॥ ३ ॥
तुका ह्मणे लेंकी आळवी माहेरा । गाऊं या संसारा तुज तैसें ॥४॥

॥ १५१० ॥

माझें मुख नामीं रंगो सर्वकाळ । गोविंद गोपाळ राम कृष्ण ॥ १ ॥
अबद्ध चांगलें गाऊं भलतैसें । कळलें हें जैसें मायबापा ॥ २ ॥
तुका ह्मणे मज नलगे वांकडें । मी तुझें बोबडें बाळ तान्हें ॥ ३ ॥

॥ १५११ ॥

क्षुधार्थी अन्नें दुष्काळें पीडिलें । मिष्टान्न देखिलें तेणें जैसें ॥ १ ॥
तैसें तुझे पायीं लाचावलें मन । झुरे माझा प्राण भेटावयां ॥ २ ॥
मांजरें देखिला लोणियाचा गोळा । लावूनिया डोळा बैसलेंसे॥३॥
तुका ह्मणे आतां झडी घालूं पाहें । पांडुरंगे माये तुझे पायीं ॥ ४ ॥

॥ १५१२ ॥

जेणें माझें हित होईल तो उपाव । करिसील भाव जाणोनिया ॥१॥
मज नाहीं सुख दुःख तया खंती । भावना हे चित्तीं नाना छंदें ॥२॥
तोडीं हे संबंध तोडीं आशापाश । मज हो सायास न करितां ॥३॥
तुका ह्मणे मी तो राहिलों निश्चित । कवळोनि एकांत सुख तुझें॥४॥

॥ १५१३ ॥

जे जे कांहीं मज होईल वासना । ते ते नारायणा व्हावें तुह्मी ॥१॥
काय भाव एक निवडूं निराळा । जाणसी तूं कळा अंतरींची ॥ २ ॥
तुजविण मज कोण आहे सखा । जें सांगों आणिकां जीवभाव॥३॥
अवघे पिशुन झाले असे जन । अपपर कोण नाठवे हें ॥ ४ ॥
तुका ह्मणे तूंचि जीवांचें जीवन । माझें समाधान तुझे हातीं ॥ ५ ॥

॥ १५१४ ॥

तुझा ह्मणोनिया दिसतों गा दीन । हाचि अभिमान सरे तुझा ॥१॥
अज्ञान बाळका कोपली जननी । तयासि निर्वाणीं कोण पावे ॥२॥
तैसा विठो तुजविण परदेशी । नको या दुःखासी गोवूं मज ॥३॥
तुका ह्मणे मज सर्व तुझी आशा । अगा जगदीशा पांडुरंगा ॥४॥

॥ १५१५ ॥

आतां माझ्या दुःखा कोण हो सांगाती । रखुमाईचा पति पावेचि ना॥१॥
काय विधात्यानें घातलीसे रेखा । सुटका या दुःखा न होयचि॥२॥
तुका ह्मणे माझी विसरूं नको चिंता । अगा पंढरीनाथा पाव वेगीं ॥३॥

॥ १५१६ ॥

तुझें नाम गाया नसे पैंडवळा । गाऊं कळवळा प्रेमाचिया ॥ १ ॥
येईल आवडी जैसी अंतरींची । तैसी नामाची कीर्ति गाऊं ॥ २ ॥
माझें मुख नामीं रंगो सर्वकाळ । गोविंद गोपाळ राम कृष्ण ॥ ३ ॥
अबद्ध चांगलें गाऊं जैसें तैसें । बाहे बाळ जैसें मायबापा ॥ ४ ॥
तुका ह्मणे मज न लावीं वांकडें । मी तुझें बोबडें बाळ तान्हें ॥५॥

॥ १५१७ ॥

तुझें प्रेम माझ्या हृदयीं आवडी । चरण न सोडीं पांडुरंगा ॥ १ ॥
कासया सिणविसी थोरिवाकारणें । काय तुझें उणें होईल देवा॥२॥
चातकाची चिंता हरली जळधरें । काय त्याचें सरे थोरपण ॥ ३ ॥
चंद्र चकोरांचा पुरवी सोहळा । काय त्याची कळा न्यून होय ॥ ४ ॥
तुका ह्मणे मज अनाथा सांभाळीं । हृदयकमळीं स्थिर राहे ॥ ५ ॥

॥ १५१८ ॥

पावलों ही देह कागतालिन्यायें । न घडे उपायें घडों आलें ॥ १ ॥
आतां माझीं खंडीं देहदेहांतरें । अभय दातारें देऊनिया ॥ २ ॥
अंधळयाचे पाठीं धनाची चरवी । अघटित तेंवी घडों आलें ॥ ३ ॥
तुका ह्मणे योग घडला बरवा । आतां कास देवा न सोडीं मी ॥४॥

॥ १५१९ ॥

कांगा कोणी न ह्मणे पंढरीची आई । बोलाविते पाही चाल नेटें ॥ १ ॥
तेव्हां माझ्या मना होईल समाधान । जाइल सर्व शीण जन्मांतरींचा २
तुका ह्मणे माझी होशील माउली । वोरसोनि घाली प्रेमपान्हा ॥३॥

॥ १५२० ॥

सांग पांडुरंगा मज हा उपाव । जेणें तुझे पाव आतुडती ॥ १ ॥
न कळे हा निर्धार ब्रह्मादिकां पार । कायसा विचार माझा तेथें॥२॥
तुका ह्मणे आतां धरूनिया धीर । राहूं कोठवर मायबापा ॥ ३ ॥

॥ १५२१ ॥

काय फार जरी झालों मी शहाणा । तरी नारायणा नातुडसी ॥१॥
काय झालें जरी मानी मज जन । परि नातुडति चरण तुझे देवा २॥
काय झालें जरी झालों उदासीन । परि वर्म भिन्न तुझें देवा ॥ ३ ॥
काय झालें जरी केले म्यां सायास । ह्मणवितों दास भक्त तुझा ४॥
तुका ह्मणे तुज दाविल्यावांचून । तुझें वर्म कोण जाणे देवा ॥ ॥५॥

॥ १५२२ ॥

पांडुरंगा कृपाळुवा दयावंता । धरिसील सत्ता सकळही ॥ १ ॥
कां जी आह्मांवरी आणिकांची सत्ता । तुह्मासी असतां जवळिक २
तुका ह्मणे पायीं केलें निवेदन । उचित हें दान करीं आतां ॥ ३ ॥

॥ १५२३ ॥

संतांचा पढीया वो कैशापरि लाहो । नामाचा आठवो कैसा राहे १

होचि थोर चिंता लागली मनासी । निजतां निद्रेसी नलगे डोळा २
जेवितां जेवणीं नलगे गोड धड । वाटतें काबाड विषयसुख ॥ ३ ॥
ऐसिया संकटीं पाव कृपानिधि । लावी संतपदीं प्रेमभावें ॥ ४ ॥
तुका ह्मणे आह्मी नेणों कांहीं हित । तुजविण अनाथ पांडुरंगा ॥५॥

॥ १५२४ ॥

जेणें तुझी कास भावें धरियेली । त्याची नाहीं केली सांडी देवा १॥
काय माझा भोग आहे तो न कळे । सुखें तुह्मी डोळे झांका देवा २॥
राव रंक तुह्मां सारिखेचि जाणा । नाहीं थोर साना तुह्मांपाशीं ॥३॥
तुका ह्मणे तुह्मीं आपंगिलें भक्तां । माझिया संचिता कृपा नये ॥४॥

॥ १५२५ ॥

सर्वांपरी तुझे गुण गा उत्तम । तुझे ठायीं प्रेम राहो माझें ॥ १ ॥
माउलीपरीस आहेसी उदार । तरि कां निष्ठुर मन केलें ॥ २ ॥
गजेंद्राकारणें केलें त्वां धांवणें । तरि कां निर्वाण पाहातोसी ॥ ३ ॥
प्रल्हादा संकटीं रक्षिलें त्वां देवा । तरि कां केशवा सांडी केली ४ ॥
अन्यायी अजामेळ तो झाला पावन । ऐसें हें पुराण हाका मारी ॥५॥
तुका ह्मणे माझे थोर अपराध । नाम करी छेद क्षणमात्रें ॥ ६ ॥

॥ १५२६ ॥

बहु क्लेशी झालों या हो नरदेहीं । कृपादृष्टी पाहीं पांडुरंगा ॥ १ ॥
पांडुरंगा सर्वदेवांचिया देवा । घ्यावी माझी सेवा दीनानाथा ॥२॥
दीनानाथ ब्रिद त्रिभुवनीं तुझें । मायबापा ओझें उतरावें ॥ ३ ॥
उतरीं सत्वर पैलथडी नेईं । पूर्णसुख देईं पायांपाशीं ॥ ४ ॥
पायांपाशीं मज ठेवीं निरंतर । आशा तुझी फार दिवस केली ५॥
केली आस तुझी वाट मी पाहातों । निशिदिनीं ध्यातों नाम तुझें ६
नाम तुझें गोड स्वभक्तां आवडे । भक्तांलागीं कडे खांदा घेसी ॥७॥
घेसी खांद्यावरी खेळविसी लोभें । पाउल तें शोभे विटेवरी ॥ ८ ॥
विटेवरी उभा देखिलासी डोळां । मनाचा सोहळा पुरविसी ॥९॥
पुरवीं सत्वर त्रैलोक्यस्वामिया । मिठी घाली पायां तुका भावें॥१०॥

॥ १५२७ ॥

तुज केलिया नव्हे ऐसें काई । डोंगराची राई क्षणमात्रें ॥ १ ॥
मज या लोकांचा न साहे आघात । देखणें प्रचित जीव घेती ॥२॥
सहज विनोदें बोलियेलों गोष्टी । आरंभीं तो पोटीं न धरावी ॥ ३ ॥
दीनरूप मज करावें नेणतां । याहुनी अनंता आहे तैसा ॥ ४ ॥
तुका ह्मणे जेणें मज तूं भोगसी । तें करीं जनासी चाड नाहीं ॥५॥

॥ १५२८ ॥

होचि वेळा देवा नका मागें घेऊं । तुह्मांविण जाऊं शरण कोणा १॥

नारायणा ये रे पाहें विचारून । तुजविण कोण आहे मज ॥ २ ॥
रात्र दिवस तुज आठवूनि आहें । पाहातोसी काये सत्व माझें ॥३॥
तुका ह्मणे किती येऊं काकुलती । कांहीं माया चित्तीं येऊं द्यावी४

॥ १५२९ ॥

आणीक कोणापुढें वासूं मुख सांग । माझें अंतरंग कोण जाणे॥१॥
पाहें तुजकडे येऊनी जाऊनी । पांडुरंगा मनीं विचारावें ॥ २ ॥
भय चिंता अवघे उद्योग सांडिले । आठवुनी पाउलें असें तुझीं ३॥
नका विसरूं मज वैकुंठनायका । विनवीतसे तुका बंदीजन ॥ ४ ॥

॥ १५३० ॥

कुरंगी पाडस चुकलेंसें वनीं । फुटे दुःखेंकरोनि हृदय त्याचें ॥१॥
तैसा परदेशी झालों तुजविण । नको हो निर्वाण पाहूं माझें ॥ २ ॥
अपराधाच्या कोटि घालीं सर्व पोटीं । नको या शेवटीं उपेक्षूं गा३
तुका ह्मणे असो द्यावी माझी चिंता । कृपाळु अनंता पांडुरंगा ॥४॥

॥ १५३१ ॥

उदार कृपाळ पतितपावना । ब्रिदें नारायणा जाती वाया ॥ १ ॥
वर्णिताती श्रुति नेणे तुझा पार । राहे मौनाकार नेति ऐसें ॥ २ ॥
तेथें माझा धांवा पावे कोणीकडे । अदृष्ट हें पुढें वोढवलें ॥ ३ ॥
कोण ऐसा भक्त लाधला भाग्यासी । आठवण ऐसी द्यावी तुज ४॥
तुका ह्मणे नको पाहों माझा अंत । जाणोनि हे मात उडी घालीं ५

॥ १५३२ ॥

आतां मोकलावें नव्हे हें उचित । तरी कृपावंत ह्मणवावें ॥ १ ॥
पूर्वी भक्त झाले सर्व अपंगिले । नाहीं उपेक्षिले तुह्मीं कोणी ॥ २ ॥
माझिया वेळेसी कां गा लपालासी । विश्व पोसितोसी लपोनिया३
करावी ह्मणावी सर्वांभूतीं दया । तरी भेटावया येईन मी ॥ ४ ॥
तरी माझे हातीं देई मनबुद्धि । जरि दयानिधि येशील तूं ॥ ५ ॥
तुका ह्मणे तूंचि अवघा सूत्रधारी । माझी सत्ता हरी काय आहे६॥

॥ १५३३ ॥

माझें कोण आहे तुजविण देवा । मुकुंदा केशवा नारायणा ॥ १ ॥
वाट पाहातसें कृपेच्या सागरा । गोपीमनोहरा पांडुरंगा ॥ २ ॥
साच करीं हरी आपुली ब्रीदावळी । कृपेनें सांभाळीं महाराजा॥३॥
क्षमा करीं सर्व अपराध माझा । लडिवाळ मीं तुझा पांडुरंगा ॥४॥
साह्य होसी तरी जाती साही वैरी । मग सुखें अंतरीं ध्यान तुझें५॥
कृपा करोनि देई दया क्षमा शांती । तेणें तुझी भक्ति लाभईल ॥६॥
माझें हें सामर्थ्य नव्हे नारायणा । जरी कांहीं करुणा येईल तुज७॥
तुका ह्मणे मज कैसें आपंगाजी । आपुलेंसें कराजी पांडुरंगा ॥ ८ ॥

॥ १५३४ ॥

आधीं कां मज लावियेली सवे । आतां न राहावे तुजवीण ॥ १ ॥
पहिलेंचि तोंडक कां गा नाहीं केलें । आतां उपेक्षिलें न सोडीं मी॥२॥
कृपेच्या सागरा न पाहे निर्वाण । झालों तुजवीण कासावीस ॥३॥
तुका ह्मणे कोठें गुंतलेती हरी । येईं झडकरी पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ १५३५ ॥

पूर्वीं बहुतांचे केले प्रतिपाळ । तें मज सकळ श्रुत आहे ॥ १ ॥
अज अविनाश निर्गुण निरामय । विचारिलें काय त्यांचे वेळे ॥ २ ॥
तयांचिये वेळे होशी कृपावंत । माझाचि कां अंत पाहातोसी ३ ॥
नारद प्रल्हाद उपमन्यु धुरू । त्यांचा अंगीकार कैसा केला ॥ ४ ॥
अंबऋषीसाठीं गर्भवास झाले । कांगा मोकलिलें कृपासिंधु ॥५॥
धर्माचें उच्छिष्ट अर्जुनाचीं घोडीं । आणीक सांकडीं कितीएक ६॥
झालासी लुगडीं तया द्रौपदीचीं । न ये कां आमुची कृपा कांहीं७॥
तुका ह्मणे कांगा झालाशी कठीण । माझा भाग सीण कोण जाण८॥

॥ १५३६ ॥

आतां हें सेवटीं असो पायांवरी । वदती वैखरी वागपुष्प ॥ १ ॥
नुपेक्षावें आह्मां दीना पांडुरंगा । कृपादानीं जगामाजी तुह्मी ॥२॥
बोळवुनी देह सांडियेली शुद्ध । तोडियेले भेद जीव शिव ॥ ३ ॥
तुका ह्मणे मन तुमचे चरणीं । एवढी आयणी पुरवावी ॥ ४ ॥

॥ १५३७ ॥

सन्मुखचि तुह्मीं सांगावी जी सेवा । ऐसे माझे देवा मनोरथ ॥१॥
नेघों आह्मी कांहीं चित्तवित्त घरें । आपल्या उदारें जीवावरी॥२॥
बोल परस्परें वाढवावें सुख । पाहावें श्रीमुख डोळेभरी ॥ ३ ॥
तुका ह्मणे सत्य बोलतों वचन । करूनी चरण साक्ष तुझे ॥ ४ ॥

॥ १५३८ ॥

काय तुज कैसें जाणवेल देवा । आणावें अनुभवा कैशा परी ॥१॥
सगुण निर्गुण थोर कीं लहान । न कळे अनुमान मज तुझा ॥ २ ॥
कोण तो निर्धार करूं हा विचार । भवसिंधु पार तरावया ॥ ३ ॥
तुका ह्मणे कैसे पाय आतुडती । न पडे श्रीपती वर्म ठावें ॥ ४ ॥

॥ १५३९ ॥

माझ्या इंद्रियांसीं लागलें भांडण । म्हणतील कान रसना धाली १
करिती तळमळ हस्त पाद भाळ । नेत्रांसी दुकाळ पडिला थोर ॥२॥
गुण गाय मुख आइकती कान । आमचें कारण तैसें नव्हे ॥ ३ ॥
दरुषणें फिटे सकळांचा पांग । जेथें ज्याचा भाग घेईल तें ॥ ४ ॥
तुका ह्मणे ऐसें करीं नारायणा । माझी हे वासना ऐसी आहे ॥५॥

॥ १५४० ॥

व्हावया भिकारी हें आम्हां कारण। अंतरोनि जन जावें दुरी ॥ १ ॥
संबंध तुटावा शब्दाचाही स्पर्श। म्हणउनि आस मोकलिली ॥ २ ॥
तुका ह्मणे दुःखें उबगला जीव। म्हणऊनी कीव भाकी देवा ॥ ३ ॥

॥ १५४१ ॥

थोडे तुम्ही मागें होती उद्धरिले। मज ऐसे गेले वाया जीव ॥ १ ॥
आतां याचा कांहीं न मानावा भार। कृपेचा सागर आहेसी तूं ॥२॥
तुज आळवितां पापाची वसति। राहे अंगीं किती बळ त्याचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे उदकीं तारिले दगड। तैसा मीही जड एक देवा ॥ ४ ॥

॥ १५४२ ॥

कोठें आतां आम्ही वेचावी हे वाणी। कोण मना आणी जाणोनिया १
न करावी सांडी आतां टाळाटाळी। देईन ये काळीं होइल माजी॥२॥
घरोघरीं झाल्या ज्ञानाचिया गोष्टी। सत्यासत्वें गांठी न पडावी ॥३॥
तुका ह्मणे आम्हां भाकितां करुणा। भलताचि शाहाणा शोध काढी ४

॥ १५४३ ॥

अनंता जीवांचीं तोडिलीं बंधनें। मजहि येणें काळें कृपा कीजे॥१॥
अनंत पवाडे तुझे विश्वंभरा। भक्तकरुणाकरा नारायणा ॥ २ ॥
अंतरीचें कळो देईं गुह्य गुज। अंतरीं तें बीज राखईन ॥ ३ ॥
समदृष्टी तुझी पाहेन पाउलें। धरीन संचलें हृदयांत ॥ ४ ॥
तेणें या चित्ताची राहेल तळमळ। होतील शीतळ सकळ गात्रें ५॥
तुका ह्मणे शांति करील प्रवेश। मग नव्हे नाश अखंड तो ॥ ६ ॥

॥ १५४४ ॥

कोणाचें चिंतन करूं ऐशा काळें। पायांच्निया बळें कंठीतसें ॥ १ ॥
पाहातसें वाट येईंगा विठ्ठला। मज कां हा केला परदेश ॥ २ ॥
बहुतांचे सत्ते झालों कासावीस। जाय रात्र दिस वेगियांच्या ३॥
तुका ह्मणे बैसें मनाचिये मुळीं। तरीच हीं जाळीं उगवतीं ॥ ४ ॥

॥ १५४५ ॥

कई तो दिवस देखेन मी डोळां। कल्याण मंगळामंगळाचें ॥ १ ॥
आयुष्याच्या शेवटीं पायांसवें भेटी। कळिवरें तुटी झाल्या त्वरें २॥
सरो हें संचित पदरींचा गोवा। उताविळ देवा मन झालें ॥ ३ ॥
पाउलापाउलीं करितां विचार। अनंत विकार चित्ता अंगीं ॥ ४ ॥
ह्मणउनि भयाभीत होतो जीव। भाकितसे कींव आटाहासें ॥ ५ ॥
दुःखाच्या उत्तरीं आळविले पाय। पाहणें तो काय आजून अंत ६॥
तुका ह्मणे होइल आइकिलें कानीं। तरी चक्रपाणी धाव घाला ७॥

॥ १५४६ ॥

आइका माझीं कवतुक उत्तरें। देउनी सादरें चित्त देवा ॥ १ ॥

वोरसें आवडी आलों पायापासीं । होय तें मनेसीं सुख कीजे ॥२॥
तुमचें न भंगे सर्वोत्तमपण । करितां समाधान लेंकरांचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे जरी बोलतों बोबडें । तरी वाडेकोडें कवतुक ॥ ४ ॥

॥ १५४७ ॥

आशाबद्ध आह्मी भाकितसों कींव । तत्पर हा जीव कार्यापाशीं १॥
प्रतिउत्तराची पाहतसें वाट । करूनि बोभाट महाद्वारीं ॥ २ ॥
आपुलिया उचितें करूनिया ठेवीं । संबंध गोसावी तोडोनिया ३ ॥
तुका ह्मणे एक झालिया निवाड । कोण बडबड करी मग ॥ ४ ॥

॥ १५४८ ॥

तुझिया दासाचा हीन झालों दास । न धरीं उदास मायबापा ॥१॥
तुजविण प्राण कैसा राहों पाहे । वियोग न साहे क्षणभरी ॥ २ ॥
आणिक माझ्या जीवें मोकलिली आस । पाहे तुझी वास पांडुरंगा ३॥
सर्वभावें तुज आणिला उचित । राहिलों निश्चिंत तुझे पायीं ॥४॥
तुका ह्मणे तुज असो माझा भार। बोलतों मी फार काय जाणें ५॥

॥ १५४९ ॥

कां हो पांडुरंगा न करा धांवणें । तरि मज कोणें सोडवावें ॥ १ ॥
तुझा ह्मणऊनि आणिकापें उभा । राहों हे तो शोभा नेदी आतां २
काळें पुरविली पाठी दुरवरी । पुढें पायां धीरी राहों नेदी ॥ ३ ॥
नको आणूं माझें संचित मनासीं । पावन आहेसी पतितां तूं ॥४॥
तुका ह्मणे चाले आणिकांची सत्ता । तुज आळवितां नवल हें ॥५॥

॥ १५५० ॥

आतां पाहाशील काय माझा अंत । आलों शरणागत तुज देवा १॥
करीं अंगीकार राखें पायांपाशीं । ह्मणी दिसों देशी कीविलवाणें २
नाहीं आइकिली मागें ऐसी मात । जे त्वां शरणागत उपेक्षिले ॥३॥
तुका ह्मणे आतां धरीं अभिमान । आहेसी तूं दानशूर दाता ॥४॥

॥ १५५१ ॥

सकळ तुझे पायीं मानिला विश्वास । न करीं उदास आतां मज १॥
वाचे गातां गोड आइकतां कानीं । पाहतां लोचनीं मूर्ती तुझी॥२॥
मन स्थिर माझें झालेंसे निश्चळ । वारिलीं सकळ आशापाश ॥३॥
जन्मजराव्याधि निवारलें दुःख । वोसंडलें सुख प्रेम धरी ॥ ४ ॥
तुका ह्मणे मज झाला हा निर्धार । आतां वाया फार काय बोलों ५

॥ १५५२ ॥

भागलों मी आतां आपुल्या स्वभावें। कृपा करोनि देवें आश्वासीजे १
देउनि आलिंगन प्रीतीच्या पडिभरें। अंगें हीं दातारें निववावीं ॥ २ ॥
अमृताची दृष्टी घालूनिया वरी। शीतळ हा करीं जीव माझा ॥ ३ ॥
घेईं उचलूनि पुसें तानभूक । पुसीं माझें मुख पीतांबरें ॥ ४ ॥

बुझावोनि माझी धरीं हनुवटी । ओवाळुनी दिठी करूनी सांडीं ॥५॥
तुका ह्मणे बापा अहो विश्वंभरा । आतां कृपा करा ऐसी कांहीं ॥ ६ ॥

॥ १५५३ ॥

पूर्वींहूनि बहु भक्त सांभाळिले । नाहीं अव्हेरिले दास कोणी ॥ १ ॥
जे जे शरण आले ते ते आपंगिले । पवाडे विठ्ठले ऐसे तुझे ॥ २ ॥
मिरवे चरणीं ऐसीये गोष्टीचें । भक्त सांभाळाचें ब्रीद ऐसें ॥ ३ ॥
तुका ह्मणे आम्हांसाठीं येणें रूपा । माझ्या मायबापा पांडुरंगा ॥४॥

॥ १५५४ ॥

दर्दुराचें पिलूं ह्मणे रामराम । नाहीं उदक उष्ण होऊं दिलें ॥ १ ॥
कर्दमाजी बाळ करी तळमळ । गोविंद गोपाळ पावे वेगीं ॥ २ ॥
आज्ञा तये काळीं केली पावकासी । झणी पिलीयासी तापवीसी ॥३॥
तुका ह्मणे तुझे ऐसे हे पवाडे । वर्णितां निवाडे सुख वाटे ॥ ४ ॥

॥ १५५५ ॥

येउनी जाउनी पाहें तुजकडे । पडिल्या सांकडें नारायणा ॥ १ ॥
आणीक कोणाचा मज नाहीं आधार । तुजवरि भार जीवेंभावें ॥२॥
निष्ठुर अथवा होईं तूं कृपाळ । तुज सर्वकाळ विसरेना ॥ ३ ॥
आपुलें वचन राहावें सांभाळून । तुह्मां आम्हां जाण पडिपाडु ४
ज्याच्या वचनासी अंतर पडेल । बोल तो होईल तयाकडे ॥ ५ ॥
तुह्मां आम्हां तैसें नाहीं ह्मणे तुका । होशील तूं सखा जीवलग ६ ॥

॥ १५५६ ॥

तेव्हां घालें पोट बैसलों पंगती । आतां आह्मां भुक्तिपांग काई॥१॥
धांवा केला आतां येईं वो धांवोन । येथें कांई करणें न लगे संदेह२
गायनाचा आतां कोठें उरला काळ । आनंदें सकळ भरी आलें॥३॥
देवाच्या सख्यत्वें विषमासी ठाव । मध्यें कोठें वाव राहों सके॥४॥
तेव्हां झाली अवघी बाधा वाताहात । प्रेम हृदयांत प्रवेशलें ॥५॥
तुका ह्मणे आह्मी जिंतिला भरवसा । देव कोठें दासा मोकलितो ६॥

॥ १५५७ ॥

शरण आलें त्यासी न दावी हे पाठी । ऐका जगजेठी विज्ञापना १॥
आळविती तयांसी उत्तर झडकरी । द्यावें परिसा हरि विज्ञापना २
गांजिलयाचे करावें धांवणें । विनंती नारायणें परिसावी हे ॥ ३ ॥
भागलियाचा होईं रे विसांवा । परिसावी देवा विज्ञापना ॥ ४ ॥
अंकिताचा भार वागवावा माथां । परिसावी अनंता विज्ञापना ५॥
तुका ह्मणे आह्मां विसरावें ना देवा । परिसावी केशवा विज्ञापना ६

॥ १५५८ ॥

जीवनावांचूनी तळमळी मासा । प्रकार हा तैसा होतो जीवा ॥१॥

न संपडे झालें भूमिगत धन । चरफडी मन तयापरी ॥ २ ॥
मातेचा वियोग झालिया हो बाळा । संशय तो कळवळा जाणा देवा ३
सांगावे ते किती तुम्हांसी प्रकार । सकळांचें सार पाय दावीं ॥४॥
येचि चिंते माझा करपला भीतर । कां नेणों विसर पडिला माझा ॥५॥
तुका ह्मणे तूं हें जाणसी सकळ । यावरी कृपाळ होई देवा ॥ ६ ॥
॥ १५५९ ॥
बाळ मातेपाशीं सांगे तानभूक । उपायाचें दुःख काय जाणे ॥ १ ॥
तयापरी करीं पाळण हें माझें । घेऊनिया ओझें सकळ भार ॥ २ ॥
कासया गुणदोष आणिसील मना । सर्व नारायणा अपराधी ॥ ३ ॥
सेवाहीन दीन पातकांची रासी । आतां विचारिसी काय ऐसें ॥४॥
जेणें काळें पायीं अनुसरलें चित्त । निर्धार हें हित झालें ऐसें ॥ ५ ॥
तुका ह्मणे तुम्ही तारिलें बहुतां । माझी कांहीं चिंता असों द्यावी ॥६॥
॥ १५६० ॥
मागें शरणागत तारिले बहुत । ह्मणती दीनानाथ तुज देवा ॥ १ ॥
पाहिले अपराध नाहीं याती कुळ । तारिला अजामेळ गणिका भिल्ली२
अढळपदीं बाळ बैसविला धुरु । क्षीराचा सागरु उपमन्या ॥ ३ ॥
गजेंद्रपशु नाडिला जळचरें । भवसिंधुपार उतरिला ॥ ४ ॥
प्रल्हाद अग्नींत राखिला जळांत । विषाचें अमृत तुझ्या नामें ॥ ५॥
पांडवां संकट पडतां जडभारी । त्यांचा तूं कैवारी नारायणा ॥६॥
तुका ह्मणे तूं या अनाथाचा नाथ । ऐकोनिया मात शरण आलों७॥
॥ १५६१ ॥
ऐसा माझा कोण आहे भीड भार । नांवाचा मी फार वाया गेलों१॥
काय सेवा रुजू आहे सत्ताबळ । तें मज राऊळ कृपा करी ॥ २ ॥
काय याती शुद्ध आहे कुळ कर्म । तेणें पडे वर्म तुझे ठायीं ॥ ३ ॥
कोण तपोनिधि दानधर्मशीळ । अंगीं एक बळ आहे सत्ता ॥ ४ ॥
तुका ह्मणे वाया झालों भूमीभार । होईल विचार काय नेणों ॥५॥
॥ १५६२ ॥
साच मज काय कळों नये देवा । काय तुझी सेवा काय नव्हे ॥ १ ॥
करावें तें बरें जेणें समाधान । सेवावें हें वन न बोलावें ॥ २ ॥
शुद्ध माझा भाव होईल तुझे पायीं । तरीच हें देई निवडूनी ॥३॥
उचित अनुचित कळों आली गोष्टी । तुझे कृपादृष्टी पांडुरंगा ॥४॥
तुका ह्मणे मज पायांसवें चाड । सांगसी तें गोड आहे मज ॥ ५ ॥
॥ १५६३ ॥
करिसी कीं न करिसी माझा अंगिकार । हा मज विचार पडिला देवा १
देसी कीं न देसी पायांचें दर्शन । ह्मणऊनी मन स्थिर नाहीं ॥२॥

बोलसी कीं न बोलसी मजसवें देवा । ह्मणोनिया जीवा भय वाटे ३
होईल कीं न होय तुज माझा आठव । पडिला संदेह हाचि मज ४॥
तुका ह्मणे मी तो कमाईचें हीण । ह्मणऊनी सीण करी देवा ॥ ५॥

॥ १५६४ ॥

तुझा शरणागत झालों मी अंकित । करीं माझें हित पांडुरंगा ॥ १॥
पतितपावन तुझी ब्रीदावळी । ते आतां सांभाळी मायबापा २॥
अनाथाचा नाथ बोलतील संत । ऐकोनिया मात विश्वासलों ॥३॥
न करावी निरास न धरावें उदास । देईं याचकास कृपादान ॥४॥
तुका ह्मणे मी तो पातकांची रासी । देईं पायापाशीं ठाव देवा ५॥

॥ १५६५ ॥

नको ब्रह्मज्ञान आत्मस्थितिभाव । मी भक्त तूं देव ऐसें करीं ॥ १ ॥
दावीं रूप मज गोपिकारमणा । ठेवीन चरणांवरी माथा ॥ २ ॥
पाहीन श्रीमुख देईन आलिंगन । जीवें निंबलोण उतरीन ॥ ३ ॥
पुसतां सांगेन हितगुज मात । बैसोनि एकांत सुखगोष्टी ॥ ४ ॥
तुका ह्मणे यासी न लावी उशीर । माझें अभ्यंतर जाणोनिया ॥ ५॥

॥ १५६६ ॥

तुझा दास ऐसा म्हणती लोकपाळ । म्हणऊनी सांभाळ करीं माझा १
अनाथाचा नाथ पतितपावन । हें आतां जतन करीं नाम ॥ २ ॥
माझे गुणदोष पाहतां न लगे अंत । ऐसें माझें चित्त मज ग्वाही ३॥
नेणें तुझी कैसी करावी हे सेवा । जाणसी तूं देवा अंतरींचें ॥ ४ ॥
तुका ह्मणे तूं या कृपेचा सिंधु । तोडीं भवबंधु माझा देवा ॥ ५ ॥

॥ १५६७ ॥

इतुलें करीं देवा ऐकें हें वचन । समूळ अभिमान जाळीं माझा ॥१॥
इतुलें करीं देवा ऐकें हे गोष्टी । सर्व समदृष्टी तुज देखें ॥ २ ॥
इतुलें करीं देवा विनवितों तुज । संतचरणरज वंदीं माथां ॥ ३ ॥
इतुलें करीं देवा ऐकें हे मात । हृदयीं पंढरीनाथ दिवसरात्रीं ॥४॥
भलतिया भावें तारीं पंढरीनाथा । तुका ह्मणे आतां शरण आलों ५

॥ १५६८ ॥

कोण आह्मां पुसे सिणलें भागलें । तुजविण उगलें पांडुरंगा ॥ १ ॥
कोणापाशीं आम्हीं सांगावें सुखदुःख । कोण तानभूक निवारील २
कोण या तापाचा करील परिहार । उतरील पार कोण दुजा ॥ ३ ॥
कोणापें इच्छेचें मागावें भातुकें । कोण कवतुकें बुझावील ॥ ४ ॥
कोणावरी आह्मीं करावी हे सत्ता । होईल साहाता कोण दुजा ॥५॥
तुका ह्मणे अगा स्वामी सर्वजाणा । दंडवत चरणा तुमच्या देवा ६

॥ १५६९ ॥

[illegible] करूं लोक दंभ मान । दाखवीं चरण तुझे मज ॥ १ ॥

मज आतां ऐसें नको करूं देवा । तुझा दास जावा वांयाविण ॥२॥
होइल थोरपण जाणीवेचा भार । दुरावेन दूर तुझ्या पायीं ॥ ३ ॥
अंतरींचा भाव काय कळे लोकां । एक मानी एकां देखोवेखीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुझे पाय आतुडती । ते मज विपत्ति गोड देवा ॥ ५ ॥

॥ १५७० ॥

मज पाहातां हें लटिकें सकळ । कोठें मायाजाळ दावीं देवा ॥ १ ॥
कोणाचा कोणाशीं न धरे संबंध । आहे शुद्धबुद्ध ठायींचे ठायीं२॥
काढा जी आपुलें मोह बुंथी जाळें । नका लावूं बळें वेड आह्मां ॥३॥
जीव शिव कांहीं ठेवियेलीं नांवें । सत्य तुह्मां ठावें असोनिया ॥४॥
सेवेच्या अभिलाषें न धराचि विचार । आह्मां दारोदार हिंडविलें५॥
आहे तैसें आतां कळलियावरी । परतें सांडा दुरी दुजेपण ॥ ६ ॥
तुका ह्मणे काय छायेचा अभिलाष । हंस पावे नाश तारांगणीं ७॥

॥ १५७१ ॥

जाला तुम्ही माझें जाणतें मापण । येणें माझा खुण मांडियेली ॥ १ ॥
खादलें पचे तरिच तें हित । ओकलिया थीत पिंड पीडी ॥ २ ॥
तरि भलें भोगे जोडिलें तें धन । पडिलिया खानें जीवनासी ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज तारीं गा विठ्ठला । नेणतांचि भला दास तुझा ॥ ४ ॥

॥ १५७२ ॥

वेदपुरुष तरि नेति कां वचन । निवडूनि भिन्न दाखविलें ॥ १ ॥
तुझीं कर्मैं तूंचि दावूनि अनंता । होतोसि नेणता कोण्यागुणें ॥२॥
यज्ञाचा भोक्ता तरि कां नव्हे सांग । उणें पडतां अंगक्षोभ घडे ॥ ३ ॥
वससी तूं या भूतांचे अंतरीं । तरि कां भेद हरी दाखियेला ॥ ४ ॥
तपतीर्थाटणें तुझें मूर्तिदान । तरि कां अभिमान आड येतो ॥ ५ ॥
आतां क्षमा कीजे विनवितो तुका । देऊनिया हाका उभा द्वारीं ॥६॥

॥ १५७३ ॥

लेंकराची आळी न पुरवी कैसी । काय तयापाशीं उणें झालें ॥ १ ॥
आम्हां लाडिवाळां नाहीं तें प्रमाण । कांहीं ब्रह्मज्ञान आत्मस्थिति २॥
वचनाचा घेईन अनुभव पदरीं । जींहीं जनाचारीं मिरविलें ॥ ३ ॥
तुका म्हणे माझी भोळिवेची आटी । दावीन शेवटीं कौतुक हें ॥४॥

॥ १५७४ ॥

आमची कां नये तुह्मासी करुणा । किती नारायणा आळवावें ॥१॥
काय जाणा तुह्मी दुर्बळाचें जिणें । वैभवाच्या गुणें आपुलिया २॥
देती घेती करिती खटपटा आणिकें । निराळा कौतुकें पाहोनिया ३
दिवस बोटीं आह्मीं धरियेलें माप । वाहातों संकल्प स्वहिताचा ४
तुका ह्मणे मग देसी कोण्या काळें । चुकुर दुर्बळें होतों आह्मी॥५॥

॥ १५७५ ॥

आळवितां कंठ शोकला भीतर । आयुष्य वेचे धीर नाहीं मना १॥
अझून कां नये हें तुझ्या अंतरा । दिनाच्या माहेरा पांडुरंगा ॥ २ ॥
धन दिसे डोळा दगडाचे परी । भोग ते शरीरीं विष झाले ॥ ३ ॥
चुकलों काय तें मज क्षमा करीं । आलिंगूनि हरी प्रेम द्यावें ॥ ४ ॥
अवस्था राहिली रूपाची अंतरीं । बाहेर भीतरी सर्व काळ ॥ ५ ॥
तुका ह्मणे माझे सकळ उपाय । पांडुरंगा पाय तुझे आतां ॥ ६ ॥

॥ १५७६ ॥

तुज न करितां काय नव्हे एक । हे तों सकळिक संतवाणी ॥ १ ॥
घेईं माझा भार करी कइवार । उतरीं हा पार भवसिंधु ॥ २ ॥
उचित अनुचित पापपुण्यकाला । हा तों नये मला निवडितां ॥३॥
कुंठित राहिली बोलतां बोलतां । पार न पवतां वाणी पुढें ॥ ४ ॥
पुसतांही कोणा न कळे हें गुज । राखें आतां लाज पांडुरंगा ॥५॥
तुका ह्मणे बहु पाहिलें या जीवें । वर्म झालें जी ठावें नाम तुझें ६॥

॥ १५७७ ॥

आतां होई माझे बुद्धीचा जनिता । अवरावें चित्ता पांडुरंगा ॥ १ ॥
येथूनिया कोठें नवजे बाहेरी । ऐसें मज धरीं सत्ताबळें ॥ २ ॥
अनावर गुण बहुतां जातींचे । न बोलावें वाचे ऐसें करीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे हित कोणिये जातीचें । तुज ठावें साचें नारायणा ॥४॥

॥ १५७८ ॥

पोटीं शूळ अंगीं उटी चंदनाची । आवडी सुखाची कोण तया १॥
तैसें मज कांगा केलें पंढरिराया । लौकिक हा वाया वाढविला २॥
ज्वरिलियापुढें वाढिलीं मिष्टान्नें । काय चवी तेणें घ्यावी त्यांची ३॥
तुका ह्मणे मढें शृंगारिलें वरी । तोंचि झाली परी मज देवा ॥ ४ ॥

॥ १५७९ ॥

तळमळी चित्त दर्शनाची आशा । बहु जगदीशा करुणा केली ॥१॥
वचनींच संत पावले स्वरूप । माझें नेदी पाप योगा येऊं ॥ २ ॥
वेठीऐसा करीं भक्तिवेवसाव । न पवेचि जीव समाधान ॥ ३ ॥
तुका ह्मणे कईं देसील विसावा । पांडुरंग धावा घेतें मन ॥ ४ ॥

॥ १५८० ॥

दाटे कंठ लागे डोळियां पाझर । गुणाची अपार वृष्टि वरी ॥ १ ॥
तेणें सुखें छंदें घेईन सोहळा । होऊनि निराळा पापपुण्यां ॥ २ ॥
तुझ्या मोहें पडो मागील विसर । आलापें सुस्वर करिन कंठ ॥३॥
तुका ह्मणे येथें पाहिजे सौरस । तुह्मांविण रस गोड नव्हे ॥ ४ ॥

॥ १५८१ ॥

कासया या लोभें केलें आर्तभूत । सांगा माझें चित्त नारायणा १॥

चातकाचे परी एकाचि निर्धार । लक्षभेदी तीर फिरों नेणे ॥ २ ॥
सांवळें रूपडें चतुर्भूज मूर्ति । कृष्णनाम चित्तीं संकल्प हा ॥ ३ ॥
तुका ह्मणे करीं आवडीची ठाव । नको माझा भाव भंगों देऊं ॥४॥

॥ १५८२ ॥

शृंगारिक माझीं नव्हतीं उत्तरें । आळवितों खरे अवस्थे या ॥ १॥
न घलावा मधीं कामाचा विलंब । तुह्मी तो स्वयंभ करुणामूर्ति२॥
तुका ह्मणे केलें सन्मुख वदन । देखतां चरण पोटाळीन ॥ ३ ॥

॥ १५८३ ॥

कां हो देवा कांहीं न बोलाचि गोष्टी । कां मज हिंपुटी करीतसा१॥
कंठीं प्राण पाहें वचनांची आस । तों दिसे उदास धरिलें ऐसें ॥२॥
येणें काळें बुंथी घेतलीसे खोल । कां नये विटाळ होऊं माझा ॥३॥
लाज वाटे मज ह्मणवितां देवाचा न पुसती फुकाचा तुका ह्मणे४॥

॥ १५८४ ॥

प्रीतींचिया बोला नाहीं पेचपाड । भलतैसें गोड करूनि घेई ॥ १॥
तैसें विठ्ठलराया तुज मज आहे । आवडीनें गायें नाम तुझें ॥ २ ॥
वेडे वांकडे बाळकाचे बोल । करिती नवल मायबाप ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज येवो माझी दया । जीवींच्या सखया जिवलगा ४॥

॥ १५८५ ॥

मोल वेचूनिया धुंडिती सेवका । आह्मी तरी फुका मागों बळें॥१॥
नसतां जवळी हित फार करूं । जीव भाव धरूं तुझ्या पायीं ॥२॥
नेदूं भोग आह्मी आपुल्या शरीरा । तुह्मांसी दातारा व्हावें म्हूण ३
कीर्ति तुझी करूं आपुचे सायास । तूं का रे उदास पांडुरंगा ॥४॥
तुका ह्मणे तुज काय मागों आह्मी । फुकाचे कां नाम ह्मणसीना ५

॥ १५८६ ॥

पतित मी पापी शरण आलों तुज । राखीं माझी लाज पांडुरंगा १॥
तारियेले भक्त न कळे तुझा अंत । थोर मी पतित पांडुरंगा ॥ २ ॥
द्रौपदी बहिणी वैरीं गांजियेली । आपणा ऐसी केली पांडुरंगा ३॥
प्रल्हादाकारणें स्तंभीं अवतार । माझा कां विसर पांडुरंगा ॥ ४ ॥
सुदामा ब्राह्मण दरिद्रें पीडिला । आपणा ऐसा केला पांडुरंगा ॥५॥
तुका ह्मणे तुज शरण निजभावें । पाप निर्दाळावें पांडुरंगा ॥ ६ ॥

॥ १५८७ ॥

तुजलागीं माझा जीव झाला पिसा । अवलोकितों दिशा पांडुरंगा१
सांडिला व्यवहार माया लोकाचार । छंद निरंतर हाचि मनीं २॥
आइकिलें कानीं तें रूप लोचन । देखावया सीण करिताती ॥ ३ ॥
प्राण हा विकळ होय कासावीस । जीवनाविण मत्स्य तयापरी ४॥
तुका ह्मणे आतां कोण तो उपाव । करूं तुझे पाव आतुडे तो ॥५॥

॥ १५८८ ॥

मागें बहुतां जनां राखिलें आडणी । धांवसी निर्वाणी नाम घेतां१॥
ऐसें ठावें झालें मज बरव्या परी । ह्मणऊनि करीं धांवा तुझा २ ॥
माझेविशीं तुज पडिला विसरु । आतां काय करूं पांडुरंगा ॥ ३ ॥
अजुनि कां नये तुह्मांसी करुणा । दुरि नारायणा धरिलें मज ॥४॥
तुका ह्मणे जीव जाऊं पाहे माझा । आतां केशीराजा घाली उडी५

॥ १५८९ ॥

एकवेळ करी या दुःखावेगळें । दुरितांचें जाळें उगवूनि ॥ १ ॥
आठवीन पाय हा माझा नवस । रात्रीही दिवस पांडुरंगा ॥ २ ॥
बहु दूरवरी भोगवीलें भोग । आतां पांडुरंगा सोडवावें ॥ ३ ॥
तुका ह्मणे काया करीन कुरवंडी । ओंवाळूनि सांडीं मस्तक हें ४॥

॥ १५९० ॥

आणीक ऱ्यां कोणा यावें काकुलती । कोण कामा येती अंतकाळीं१
तूं वो माझी सखी होसी पांडुरंगे । लवकरी ये गे वाट पाहें ॥ २ ॥
काया वाचा मनें हेंचि आस करीं । पाउलें गोजिरीं चिंतीतसें ३॥
तुका ह्मणे माझी पुरवी हे आस । घालीं ब्रह्मरस भोजन हें ॥ ४ ॥

॥ १५९१ ॥

कराल तें काय नव्हे जी विठ्ठला । चित्त द्यावें बोला बोबडिया १ ॥
सोडवूनि घ्यावें काळचक्रा हातीं । बहुत विपत्ति भोगविल्या ॥२॥
जालें जीवों नेदी मारिलेंची मरे । प्रारब्ध तें उरे मागुतालें ॥ ३ ॥
तुका ह्मणे दुजा खुंटला उपाय । ह्मणऊनि पाय आठविले ॥ ४ ॥

॥ १५९२ ॥

तुझिया पाळणा ओढे माझें मन । गेलों विसरोन देहभाव ॥ १ ॥
लागला पालट फेडणें उसणें । येणेंचि प्रमाणें पांडुरंगा ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा जीव जैसा ओढे । तैसाचि तिकडे पाहिजेल ॥३॥

॥ १५९३ ॥

जन्म मृत्यु फार झाले माझ्या जीवा । ऐक माझा धांवा पांडुरंगा१
सिणलों बहुत करितां येरझारा । रखुमाईच्या वरा पावें वेगीं २ ॥
तुका ह्मणे तूं गा पतितपावन । घेई माझा सीण जन्मांतर ॥ ३ ॥

॥ १५९४ ॥

प्रीति नाहीं राया वर्जिली ते कांता । परी तिची सत्ता जगावरी ॥१॥
तैसे दंभी झालों तरी तुझे भक्त । वास यमदूत न पाहाती ॥ २ ॥
राजयाचा पुत्र अपराधी देखा । तो काय आणिकां दंडवेल ॥ ३ ॥
बाहातरी खोडी परी देवमण कंठीं । तैसा जगजेठी ह्मणे तुका ॥४॥

॥ १५९५ ॥

जैसी तैसी तरि वाणी । मना आणी माउली ॥ १ ॥ लेंकरांच्या स्नेहें

गोड । करी कोड त्या गुणें ॥ २ ॥ मागें पुढें रिघे पोटीं । साहे खेटी करीतें ॥ ३ ॥ तुका विनवी पांडुरंगा । ऐसें पैं गा आहे हें ॥ ४ ॥

॥ १५९६ ॥

म्हणऊनि धरिले पाय । अवो माय विठ्ठले ॥ १ ॥ आपुलेंचि करूनि घ्यावें । आश्वासावें ना भीसें ॥२॥ वाढली ते तळमळ चित्ता । शम आतां करावी ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीवीं वसे । मज नसे वेगळी ॥ ४ ॥

॥ १५९७ ॥

बाळ माते लातेवरी । मारी तेणें संतोषे ॥१॥ सुख वसे चित्ता अंगीं । तें हें रंगीं मिळालें ॥ २ ॥ भक्षी त्याचा जीवमाग । आला भाग तो बरा ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऋणानुबंधें । सांगे सुदें सकळां ॥ ४ ॥

॥ १५९८ ॥

पांडुरंगे पांडुरंगे । माझे गंगे माउलिये ॥ १ ॥ पान्हा घालीं प्रेमधारा । पूर शीरा लोटों दे ॥ २ ॥ अंगें अंग मेळउनी । करीं धणी फेडाया ॥ ३ ॥ तुका ह्मणे घेईन उड्या । सांडिन कुड्या भावना ॥ ४ ॥

॥ १५९९ ॥

जाणतें लेकरूं । माता लागे दुरी धरूं ॥ १ ॥ तैसें न करीं कृपावंतें । पांडुरंगे माझे माते ॥२॥ नाहीं मुक्तफळा । भेटी मागुती त्या जळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे लोणी । ताक सांडी निवडुनि ॥ ४ ॥

॥ १६०० ॥

बाळाचें जीवन । माता जाणें भूक तान ॥ १ ॥ काय करूं विनवणी । असो मस्तक चरणीं ॥ २ ॥ ठेविलियें ठायीं । चित्त ठेवूनि असे पायीं ३ करितो हे सेवा । चिंतन सर्वा ठायीं देवा ४ न्यून तेंचि पुरें । घ्यावें करोनि दातारें ५ तुका ह्मणे बुद्धि । अल्प असे अपराधी ६॥

॥ १६०१ ॥

बैसों पाठमोरी । मना वाटे तैसें करीं ॥ १ ॥ परि तूं जाणसी आवडी । बाळा बहुतांची परवडी ॥ २ ॥ आपुलाल्या इच्छा । मागों जया व्हावें जैशा ॥३॥ तुका ह्मणे आई । नव्हसी उदास विठाई ॥४॥

॥ १६०२ ॥

गरुडाचे पायीं । ठेवीं वेळोवेळां डोई ॥ १ ॥ वेगीं आणावा तो हरी । मज दीनातें उद्धरी ॥२॥ पाय लक्ष्मीच्या हातीं । तिशीं यावें काकुलती ॥ ३ ॥ तुका ह्मणे शेषा । जागे करा हृषीकेशा ॥ ४ ॥

॥ १६०३ ॥

गंगा गेली सिंधुपाशीं । जरी तो ठाव नेदी तिशीं ॥ १ ॥ तिनें जावें कवण्या ठाया । मज सांगा पंढरिराया ॥ २ ॥ जळ क्षोभलें जलचरा । माता बाळा नेदी थारा ॥ ३ ॥ तुका ह्मणे आलों शरण । देवा त्वां कां धरिलें मौन ॥ ४ ॥

॥ १६०४ ॥

तुझा ह्मणविलों दास । केली उच्छिष्टाची आस ॥ १ ॥ मुखीं घालावा कवळ । जरी तूं होशील कृपाळ ॥ २ ॥ सीण भाग माझा पुसें । तुका ह्मणे न करीं हांसें ॥ ३ ॥

॥ १६०५ ॥

आपुलेंसें करुनी घ्यावें । आश्वासावें नामीसें ॥ १ ॥ ह्मणउनि धरिले पाय । आवो माय विठ्ठले ॥ २ ॥ कळलासे सीण चित्ता । शम आतां करावा ॥३॥ तुका ह्मणे जीवीं वसे । मज नसे वेगळा ४

॥ १६०६ ॥

आळस आला अंगा । धांव घालीं पांडुरंगा १ सोसूं शरीराचे भाव । पडती अवगुणांचे घाव २ करावीं व्यसनें । दुरी येउनि नारायणें३॥ जवळील दुरी । झालों देवा धरीं करीं ४ ह्मणउनि देवा । वेळोवेळां करीं धावा ॥ ५ ॥ तुका ह्मणे पांडुरंगा दुरी धरूं नका अंगा ॥ ६ ॥

॥ १६०७ ॥

आश्वासावे दास । तरी घडे तो विश्वास ॥ १ ॥ नाहीं चुकत चाकरी । फुटे लाडक्याचे थोरी ॥ २ ॥ स्वामीच्या उत्तरें । सुख वाटे अभयें करें ॥ ३ ॥ न मगे परि भातें । तुका ह्मणे निढळ वाटे४

॥ १६०८ ॥

आतां पाविजेल घरा । या दातारा संगतीं ॥ १ ॥ पायावरि ठेवूं माथा । सर्वथा हा नुपेक्षी ॥ २॥ येथून तेथवरि आतां । नाहीं सत्ता आणिकांची ३ तुका ह्मणे चक्रपाणी । शिरोमणी बळियांचा ४

॥ १६०९ ॥

हेंचि वारंवार । पडताळुनी उत्तर ॥ १ ॥ करितों पायांसी विनंती । नुपेक्षावें कमळापती ॥ २ ॥ गंगोदकें गंगे । अर्घ्य द्यावें पांडुरंगे ॥ ३ ॥ जोडोनिया हात । करी तुका प्रणिपात ॥ ४ ॥

॥ १६१० ॥

आपण तों असा । समर्थ जी हृषीकेशा ॥ १ ॥ करा करा बुझावणी । काय विलंब वचनीं ॥ २ ॥ हेंगे ऐसें ह्मणा । उठुनि लागेन चरणा ॥ ३ ॥ घेउनिया सुखें । नाचेल तुका कवतुकें ॥ ४ ॥

॥ १६११ ॥

तुझे दारींचा कुतरा । नको मोकलूं दातारा ॥ १ ॥ धरणें घेतलें दारांत । नको धरून उटवूं हात २ बहु झालो लंड । पायीं घातली मुरकुंड ॥ ३ ॥ तुका ह्मणे जगजीवना । ब्रीद राखीं नारायणा ॥४॥

॥ १६१२ ॥

शरण शरण नारायणा । मज अंगीकारा दीना ॥ १ ॥ भावें आलों लोटांगणीं । रुळें तुमचे चरणीं २ सांडियेली काया । वरी ओंवाळुनी पायां ॥ ३ ॥ तुका ह्मणे शिर । ठेवियलें पायावर ॥ ४ ॥

॥ १६१३ ॥

उच्चारूं यासाठीं । आह्मी नाम तुझें कंठीं ॥ १ ॥ येसी धांवत धांवत । माउलिये कृपावंते ॥ २ ॥ पाय चित्तीं धरूं । क्रीडा भलते ठायीं करूं ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझे गंगे । प्रेमभरित पांडुरंगे ॥ ४ ॥

॥ १६१४ ॥

यावें माहेरास । हेच सर्वकाळ आस ॥ १ ॥ घ्यावी उच्छिष्टाची धणी । तीर्थ इच्छी पायवणी ॥२॥ भोग उभा आड । आहे तोंवरीच नाड ॥३॥ तुका म्हणे देवें । माझें सिद्धी पाववावें ॥ ४ ॥

॥ १६१५ ॥

असो खटपट । आतां वाउगे बोभाट ॥ १ ॥ परिसा हे विनवणी असो मस्तक चरणीं ॥ २ ॥ अपराध करा । क्षमा घडले दातारा ३ तुका ह्मणे वेथा । तुह्मा कळे पंढरिनाथा ॥ ४ ॥

॥ १६१६ ॥

बहु जन्मांतरें फेरे । केले येरे सोडवीं ॥ १ ॥ आळवितों करुणा-करे । विश्वंभरे दयाळे ॥२॥ वहावतों मायापुरीं । येथें करीं कुडावा ॥ ३ ॥ तुका ह्मणे दुजा कोण । ऐसा सीण निवारी ॥ ४ ॥

॥ १६१७ ॥

द्वारपाळ विनंती करी । उभे द्वारीं राउळा ॥ १ ॥ आपुलिया शरणागता । वाहों चिंता नेदावी ॥ २ ॥ वचना या चित्त द्यावें । असो ठावें तुह्मांसी ॥३॥ तुका ह्मणे कृपासिंधू । दीनबंधू केशवा ४॥

॥ १६१८ ॥

उशीर कां केला । कृपाळुवा जी विठ्ठला ॥ १ ॥ मज दिलें कोणा हातीं । काय मानिली निश्चिंती ॥ २ ॥ कोठवरी धरूं धीर । आतां मन करूं स्थिर ॥३॥ तुका ह्मणे जीव । ऐसी भाकितसे कींव ॥४॥

॥ १६१९ ॥

कोण दुजें हरी सीण । शरण दीन आल्याचा ॥ १ ॥ तुह्मांविण जग-दीशा । उदार ऐसा त्रिभुवनीं ॥ २ ॥ कोण ऐसें वारी पाप । हरि ताप जन्माचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे धांव घाली । कोण चाली मनाची ४

॥ १६२० ॥

धांवा शीघ्रवत । किंवा घ्यावें दंडवत ॥१॥ तुमचा जातो बडिवार । आम्ही होतों हीनवर ॥ २ ॥ न धरावा धीर । धांवा नका चालों स्थिर ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाणी । माझी लाजली जी गुणीं ॥ ४ ॥

॥ १६२१ ॥

न करीं उदास । माझी पुरवावी आस ॥ १ ॥ ऐका ऐका नारायणा । माझी परिसा विज्ञापना ॥ २ ॥ मायबाप बंधुजन । तूंचि सोयरा सज्जन ॥३॥ तुका ह्मणे तुजविरहित । कोण करील माझें हित ॥ ४ ॥

॥ १६२२ ॥

आतां काशासाटीं दुरी । अंतर उरी राखिली ॥ १ ॥ करीं लवकरी मूळ । लहानें तीळ मुळींचिया ॥ २ ॥ दोन्हीं ठायां उद्वेगवाणें । दरुषणें निश्चिती ॥ ३ ॥ तुका ह्मणे वेग व्हावा । ऐसी जीवा उत्कंठा ॥ ४ ॥

॥ १६२३ ॥

उसंतिल्या कर्मवाटा । बहु मोठा अघात ॥ १ ॥ शीघ्र यावें शीघ्र यावें । हातीं न्यावें धरूनि ॥ २ ॥ भागलों या खटपटें । घटपटें करितां ॥ ३ ॥ तुका ह्मणे कृपावंता । माझी चिंता खंडावी ॥ ४ ॥

॥ १६२४ ॥

आतां तळमळ । केली पाहिजे सीतळ ॥ १ ॥ करील तें पाहें देव । पायीं ठेवूनिया भाव ॥ २ ॥ तोचि अन्नदाता । नाहीं आणिकांची सत्ता ॥ ३ ॥ तुका ह्मणे दासा । नुपेक्षील हा भरंवसा ॥ ४ ॥

॥ १६२५ ॥

मज अनाथाकारणें । करीं येणें केशवा ॥ १ ॥ जीव झुरे तुजसाठीं । वाट पोटीं पहातसें ॥ २ ॥ चित्त रंगलें चरणीं । तुजवांचूनि न राहे ॥ ३ ॥ तुका ह्मणे कृपावंता । माझी चिंता असावी ॥ ४ ॥

॥ १६२६ ॥

जोडिले अंजुळ । असें दान उतावीळ ॥ १ ॥ पहा पहा कृपादृष्टी । आणा अनुभवा गोष्टी ॥ २ ॥ तूं धनी मी सेवक । आइक्य तें एका एक ॥ ३ ॥ करितों विनंती । तुका सन्मुख पुढती ॥ ४ ॥

॥ १६२७ ॥

पदोपदीं पायां पडणें । करुणा जाण भाकावी ॥ १ ॥ ये गा ये गा विसांविया । करुणा दयासागरा ॥ २ ॥ जोडोनिया करकमळ । नेत्र जळ भरोनि ॥ ३ ॥ तुका उभा दान पात्र । पुरवीं आर्त विठोबा ॥ ४ ॥

॥ १६२८ ॥

हेंचि जतन करा दान । धरुनि चरण राहिलों ते ॥ १ ॥ घ्यावी माझ्या हातें सेवा । होचि देवा विनवणी ॥ २ ॥ आणीक कांहीं न घाली भार बहु फार सांकडें ॥ ३ ॥ तुका तुमचा ह्मणवी दास । त्याची आस पुरवावी ॥ ४ ॥

॥ १६२९ ॥

आह्मी उतराई । भाव निरोपूनि पायीं ॥ १ ॥ तुह्मी पुरवावी आळी । करावी ते लडिवाळी ॥ २ ॥ आमुचा हा नेम । तुह्मां उचित हा धर्म ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । जाणों सांगितली सेवा ॥ ४ ॥

॥ १६३० ॥

आतां दुसरें नाहीं वनीं । निरंजनीं पडिलों ॥ १ ॥ तुमचीच पाहें वास अवघी आस निरसली ॥ २ ॥ मागिलांचा मोडला माग । घडला त्याग अरुची ३ तुका ह्मणे करुणाकरा । तूं सोयरा दीनांचा ॥ ४ ॥

॥ १६३१ ॥

आतां आहे नाहीं । न कळे आळी करा कांहीं ॥ १ ॥ देसी पुरवुनी इच्छा । आतां पंढरीनिवासा ॥ २ ॥ नेणें भाग सीण । दुजें कांहीं तुह्मांविण ॥३॥ आतां नव्हे दुरी । तुका पायीं मिठी मारी ४

॥ १६३२ ॥

समर्थाची धरिली कास । आतां नाश काशाचा ॥ १ ॥ धांवे पावें करीन लाहो । तुमचा आहो विठ्ठला ॥२॥ नलगे मज पाहाणें दिशा । हाकेसरिसा ओढसी ३ तुका ह्मणे नव्हे धीर । तुह्मां स्थिर दयेनें ४॥

॥ १६३३ ॥

येणें पांगे पायांपाशीं । निश्चयेसी राहेन ॥ १ ॥ सांगितली करीन सेवा । सकळ देवा दास्यत्व ॥ २ ॥ बंधनाची तुटली बेडी । हेंचि जोडी मग आह्मां ॥३॥ तुका ह्मणे नव्हे क्षण । पायांविण वेगळा ४॥

॥ १६३४ ॥

माझे जड भारी । आतां अवघें तुम्हांवरी ॥ १ ॥ झालों अंकित अंकिला । तुमच्या मुकलों मागिला ॥२॥ करितों जें काम । माझी सेवा तुझें नाम ॥३॥ तुका पायां लागे । कांहीं नेदी ना न मागे॥४॥

॥ १६३५ ॥

झालों तंव साचें । दास राहवणें काचें ॥ १ ॥ हें कां मिळतें उचित। तुह्मी नेणा कृपावंत ॥२॥ सिंहाचीं तीं पिलें । जाय घेऊनिया कोल्हें ॥ ३ ॥ तुका ह्मणे नास । आह्मां ह्मणविलिया दास ॥ ४ ॥

॥ १६३६ ॥

इंद्रियांचीं दीनें । आम्ही केलों नारायणें ॥ १ ॥ ह्मणऊनि ऐसें सोसीं । काय सांगों कोणापाशीं ॥२॥ नाहीं अंगीं बळ । त्याग करीसा सकळ ॥३॥ तुका ह्मणे मोठें । प्रारब्ध होतें खोटें ॥ ४ ॥

॥ १६३७ ॥

पसरूनि राहिलों बाहो । सोयी अहो तुमचीये ॥ १ ॥ आतां यावें लागवेगें । पांडुरंगे धांवत ॥२॥ बैसायाची इच्छा कडे । चाली खडे रूपताती ॥३॥ तुका ह्मणे कृपाळुवा । करीन सेवा लागली ॥ ४ ॥

॥ १६३८ ॥

दर्शनाचें आर्त जीवा । बहु देवा राहिलें ॥ १ ॥ आतां जाणसी तें करीं । विश्वंभरीं काय उणें ॥ २ ॥ येथें जरी उरे चिंता । कोण दाता याहूनी ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाणवलें । आह्मां भलें एवढेंच४॥

॥ १६३९ ॥

बुद्धिहीन जडजीवा । नको देवा उपेक्षूं ॥ १ ॥ परिसावी विज्ञापना । आम्हां दीना दासांची ॥२॥ चिंतूनिया आले पाय । त्यांसी काय वंचना ॥ ३ ॥ तुका म्हणे पुरुषोत्तमा । करीं क्षमा अपराध४॥

॥ १६४० ॥

बहु वाटे भये । माझे उडी घाला द्ये ॥ १ ॥ फांसा गुंतलों लिगाडीं । न चले बळ चरफडी ॥ २ ॥ कुंठितचि युक्ति । माझ्या झाल्या सर्व शक्ति ॥३॥ तुका म्हणे देवा । काममोहें केला गोवा ४

॥ १६४१ ॥

आणिक कांहीं नेणें । असें पायांच्या चिंतनें ॥ १ ॥ माझा न व्हावा विसर । नाहीं आणीक आधार ॥ २ ॥ भांडवल सेवा । हाचि ठेवियेला ठेवा ॥ ३ ॥ करीं मानभावा । तुका विनंती करीं देवा ॥ ४ ॥

॥ १६४२ ॥

काय जाणों वेद् । आम्ही आगमाचे भेद् ॥ १ ॥ एक रूप तुझें मनीं । धरूनि राहिलों चिंतनीं ॥ २ ॥ कोठें अधिकार । नाहीं रानट विचार ॥ ३ ॥ तुका ह्मणे दीना । नुपेक्षावें नारायणा ॥ ४ ॥

॥ १६४३ ॥

जोडोनिया कर । उभा राहिलों समोर ॥ १ ॥ हेंचि माझें भांडवल । जाणें कारण विठ्ठल ॥ २ ॥ भाकितों करुणा । आतां नुपेक्षावें दीना ॥ ३ ॥ तुका ह्मणे डोई । ठेवीं वेळोवेळा पायीं ॥ ४ ॥

॥ १६४४ ॥

उमटे तें ठायीं । तुझे निरोपाचें पायीं ॥ १ ॥ आह्मीं करावें चिंतन । तुझें नामसंकीर्तन ॥ २ ॥ भोजन भोजनाच्या काळीं । मागों करूनिया आळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे माथां । भार तुझ्या पंढरिनाथा ४॥

॥ १६४५ ॥

जेणें वेळ लागे । ऐसें सांडीं पांडुरंगे ॥ १ ॥ कंठ कंठा मिळों देईं । माझा वोरस तूं घेईं ॥२॥ नको पितांबर । सांवरूं हे अलंकार ॥ ३ ॥ टाकीं वो भातुकें । लौकिकाचीं कवतुकें ४ हातां पायां नको । कांहीं वेगळाले राखों ॥५॥ तुका ह्मणे यावरी । मग सुखें अलंकारीं ॥ ६ ॥

॥ १६४६ ॥

क्षेम देयाला हो । स्फुरताती दंड बाहो ॥ १ ॥ आतां झडझडां चालें । देईं उचलूनि पाउलें ॥ २ ॥ सांडी हंसगती । बहु उत्कंठा हे चित्तीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे आई । श्रीरंगे विठाबाई ॥ ४ ॥

॥ १६४७ ॥

पंढरीच्या राया । माझें दंडवत पायां ॥ १ ॥ तुमचे कृपेचें पोषणें । माझा समाचार घेणें ॥ २ ॥ नाम धरियलें कंठीं । असें आर्तभूत पोटीं ॥ ३ ॥ जीवींचें तें जाणा । तुका ह्मणे नारायणा ॥ ४ ॥

॥ १६४८ ॥

पतितपावना । दिनानाथा नारायणा ॥ १ ॥ तुझें रूप माझे मनीं । राहो नाम जपो वाणी ॥ २ ॥ ब्रह्मांडनायका । भक्तजनाच्या पाळका ॥ ३ ॥ जीवांचिया जीवा । तुका ह्मणे देवदेवा ॥ ४ ॥

॥ १६४९ ॥

धेनु चरे वनांतरीं । चित्त बाळकापें घरीं ॥ १ ॥ तैसें करीं वो माझे आई । ठाव देउनि राखें पायीं ॥ २ ॥ काढितां तळमळी । जिवना-वेगळी मासोळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे कुडी । जीवाप्राणाची आवडी ॥४॥

॥ १६५० ॥

आळवीन स्वरें । कैशा मधुरा उत्तरें ॥ १ ॥ ये वो येई वो पांडुरंगे । प्रेमपान्हा मज दे गे ॥ २ ॥ पसरूनि चोंची । वचनें ही करुणेचीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे बळी । आम्ही लडिवाळें आळीं ॥ ४ ॥

॥ १६५१ ॥

सकळिकांचें समाधान । नव्हे देखिल्यावांचून ॥ १ ॥ रूप दाखवीं रे आतां । सहस्रभुजांच्या मंडिता ॥ २ ॥ शंखचक्रपद्मगदा । गरुडासहित ये गोविंदा ॥३॥ तुका म्हणे कान्हा । भूक लागली नयनां॥४

॥ १६५२ ॥

येगा येगा पांडुरंगा । घेई उचलुनि वोसंगा ॥१॥ ऐसी असोनिया वेसी । दिसतों मी परदेसी ॥ २ उगवूनि गोवा । सोडवूनि न्यावें देवा ॥ ३ ॥ तुज आड कांहीं । बळ करी ऐसें नाहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे हृषीकेशी । काय उशीर लविलासी ॥ ५ ॥

॥ १६५३ ॥

अल्प माझी मती । म्हणोनि येतो काकुळती ॥ १ ॥ मज दाखवा दाखवा । तुमची पाउलें केशवा २ धीर माझ्या मना । नाहीं नाहीं नारायणा ॥ ३ ॥ तुका म्हणे दया । मज करा अभागिया ॥ ४ ॥

॥ १६५४ ॥

कोणें साक्षीविण । केलें उद्धारा भजन ॥ १ ॥ ऐसें सांगा जी दातारा । माझी भक्ति परंपरा ॥ २ ॥ कोणें नाहीं केली आळी । ब्रह्मज्ञानाहूनि वेगळी ॥ ३ ॥ कोणाचें तो कोड । नाहीं पुरविला लाड ॥ ४ ॥ कोणाच्या उद्धारा । केला विलंब माघारा ॥ ५ ॥ तुका ह्मणे भिन्न । कांहो बोलें साक्षीविण ॥ ६ ॥

॥ १६५५ ॥

माझें जीवन तुझे पाय । कृपाळू तूं माझी माय ॥ १ ॥ नेदीं दिसों किविलवाणें । पांडुरंगा तुझें तान्हें २ जन्ममरण तुजसाटीं । आणीक नेणें दुजी गोष्टी ३ तुका ह्मणे तुजविण । कोण हरिल माझा सीण४

॥ १६५६ ॥

तुजवांचून कोणा शरण । जाऊं आतां कर जोडून ॥ १ ॥ कोण करील माझें साहे । चित्तीं विचारूनी पाहें २ तूं तंव कृपेचा सागर । दीनबंधु जगदोद्धार ३ तुका ह्मणे निका । भवसिंधुतारक नौका ४

॥ १६५७ ॥

काय आम्हीं केलें ऐसें । नुद्धरीं जैसें सांगावें ॥१॥ हरण कोल्हें वै-

कुंठवासी । कोण त्यासी अधिकार ॥२॥ गजा नाक्या सरोवरीं । नाहीं हरी विचारिलें ३ तुका ह्मणे गणिका नष्ट । माझे कष्ट त्याहूनि ४

॥ १६५८ ॥

काय न्यून आहे सांगा । पांडुरंगा तुम्हांपें ॥१॥ आमुची तो न पुरे इच्छा । पिता ऐसा मस्तकीं ॥२॥ कैसी तुम्हां होय सांडी । करुणा तोंडीं उच्चारें ३ आश्चर्यचि करी तुका । हे नायका वैकुंठीचिया ४॥

॥ १६५९ ॥

न पवीजे तया ठाया । आलों काया क्लेशेसीं ॥१॥ आतां माझें आणीं मना । नारायणा ओजेचें ॥ २ ॥ बहु रिणें पिडिलों फार । परिहार करावा ॥ ३ ॥ तुका ह्मणे निर्बळशक्ति । काकुलती म्हुण येतों ॥ ४ ॥

॥ १६६० ॥

कळों येतें वर्म । तरी न पावतों श्रम ॥ १ ॥ तुम्हां शिरीं होता भार । आम्हां कैचा संचार ॥ २ ॥ होतें अभयदान । तरी स्थिर होतें मन ॥ ३ ॥ तुका ह्मणे पाहें । ऐसी वाट उभा आहें ॥ ४ ॥

॥ १६६१ ॥

तुम्ही तो सदैव । अधीरपणें माझी हांव ॥ १ ॥ जळो आशेचें तें जिणें । टोंकतसों दीनपणें ॥२॥ येथूनि सोडवा । आतां अनुभवेंसी देवा ॥ ३ ॥ तुका म्हणे झालें । एक मग हें निमालें ॥ ४ ॥

॥ १६६२ ॥

धावा केला धांवा । श्रम होऊं नेदीं जीवा ॥ १ ॥ वर्षें अमृताच्या धारा । घेईं वोसंगा लेंकरा ॥ २ ॥ उशीर तो आतां । न करावा हेच चिंता ॥ ३ ॥ तुका म्हणे त्वरें । वेग करीं विश्वंभरें ॥ ४ ॥

॥ १६६३ ॥

घालिती पव्हया । वाटे अनाथाच्या दया ॥१॥ तैसें कां हें नये करूं । पांडुरंगा आम्हां तारूं २ रोगियासी काढा । देउनि वारिताती पीडा ३ बुडत्यासाठीं उडी । घालिताती काय जोडी ४ झाडिताती कांटे । पुढें मागिलांचे वाटे ॥५॥ तुकों म्हणे भार । घेती भागल्यांचा फार ॥६॥

॥ १६६४ ॥

शिकवूनि हित । सोयी लावावे हे नीत ॥१॥ त्याग करूं नये खरें । ऐसें विचारावें बरें ॥२॥ तुमचिया तोंडें । धर्माधर्मचि खंडें ॥ ३ ॥ मजसाठीं देवा । कां हो लपविला हेवा ४ झाला सावधान । त्यासी घालावें भोजन ५ तुका म्हणे पिता । वरी बाळाच्या तो हिता ॥ ६ ॥

॥ १६६५ ॥

कां जी माझे जीवीं । आळस ठेविला गोसावी ॥ १ ॥ येवढा घात आणीक काय । चिंतनासी अंतराय ॥ २ ॥ देहआत्म बंदी । केला घात कुबुद्धी ॥ ३ ॥ तुका ह्मणे मन । कळवळी वाटे सीण ॥ ४ ॥

॥ १६६६ ॥

आतां घेई माझें । भार सकळही ओझें ॥ १ ॥ काय करिसी होई वाट । आलों पोटासी दगड ॥ २ ॥ तूंचि डोळे वाती । होई दीपक सांगाती ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । विचाराया चाड नाहीं ॥ ४ ॥

॥ १६६७ ॥

वाहावतों पुरीं । आतां उचित तें करी ॥ १ ॥ माझी शक्ति नारायणा । कींव भाकावी करुणा ॥२॥ आह्मां ओढी काळ । तुझें क्षीण झालें बळ ॥३॥ तुका ह्मणे गोडी । जीवा मातेचिया ओढी ॥ ४ ॥

॥ १६६८ ॥

तूं श्रीयेचा पति । माझी बहु हीन याती ॥ १ ॥ दोघे असों एके ठायीं । माझा माथा तुझे पायीं ॥ २ ॥ माझ्या दीनपणा पार । नाहीं बहु तूं उदार ॥३॥ तुका म्हणे पांडुरंगा । मी ओहोळ तूं गंगा ॥४॥

॥ १६६९ ॥

नाहीं तुम्ही केला । अंगीकार तो विठ्ठला ॥ १ ॥ सोंगें न पवीजे थडी । माजी फुटकी सांगडी ॥ २ ॥ प्रेम नाहीं अंगीं । भले म्हणविलें जगीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । मज वाया कां चाळवा ॥ ४ ॥

॥ १६७० ॥

संत मानितील मज । तेणें वाटतसे लाज ॥ १ ॥ तुह्मी कृपा केली नाहीं । चित्त माझें मज ग्वाही ॥ २ ॥ गोविलों थोरिवा । दुःख वाटतसे जीवा ॥३॥ तुका म्हणे माया । आवरा हे पंढरिराया ॥४॥

॥ १६७१ ॥

संत पंढरीस जाती । निरोप धाडी तया हातीं ॥१॥ माझा न पडावा विसर । तुका विनवितो किंकर ॥२॥ केरसुणी महाद्वारीं । ते मी असें निरंतरीं ॥ ३ ॥ तुमचे पायीं पाइतन । मोचे माझें तन मन ॥ ४ ॥ तांबुलाची पिकधरणी । ते मी असें मुख पसरूनि ॥५॥ तुमची विष्ठा पंढरीराया । ते सारसुखी माझी काया ॥६॥ लागती पादुका । ते मी तळील मृत्तिका ॥७॥ तुका म्हणे पंढरिनाथा । दुजें न धरावें सर्वथा ॥ ८ ॥

॥ १६७२ ॥

केला तैसा अंगिकार । माझा भार चालवी १ होऊं अंतराय बुद्धी । कृपानिधी नेदावी२आम्ही तरी जडजीव । कैंचा भाव पुरता३ अनन्यभावें घ्यावी सेवा । आज्ञा देवा घडेसी ४ तुझीं आह्मी शरणागतें । कृपावंतें रक्षीजे५तुका ह्मणे भाकूं कींव । असों जीव जड आम्ही६॥

॥ १६७३ ॥

स्मरणाचे वेळे । व्हावें सावधान न कळे ॥ १ ॥ पडिलों विषयांचे

ओढी । कोणी न दिसेसें काढी ॥ २ ॥ भांडवल माझें । वेच झालें भूमी ओझें ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळे । तूंचि धांवे ऐसे वेळे ॥ ४ ॥

॥ १६७४ ॥

नेणो करूं सेवा । पांडुरंगा कृपाळुवा ॥१॥ धांवें बुडतों मी काढी । सत्ता आपुलिया ओढी ॥ २ ॥ क्रियाकर्महीन । झालों इंद्रियां अधीन ॥ ३ ॥ तुका विनंती करी । वेळोवेळां पाय धरी ॥ ४ ॥

॥ १६७५ ॥

पापाची मी राशी । सेवाचोर पायांपाशीं ॥ १ ॥ करा दंड नारायणा । माझ्या मानाची खंडणा ॥ २ ॥ जना हातीं सेवा । घेतों लंडपणें देवा ३ देव ना संसार । तुका दोहींकडे चोर ॥ ४ ॥

॥ १६७६ ॥

हातीं धरूं जावें । तेणें परतोंचि व्हावें ॥ १ ॥ ऐसा कां हो आला वांटा । हीन भाग्याचा करंटा ॥ २ ॥ देव ना संसार । दोहीं ठायीं नाहीं थार ॥ ३ ॥ तुका ह्मणे पीक । भूमी नेदी न मिळे भीक ४ ॥

॥ १६७७ ॥

झालों आतां दास । माझे तोडोनिया पाश ॥१॥ ठाय द्यावा पायापाशीं । मी तों पातकाची राशी ॥ २ ॥ सकळही गोवा । माझा उगवूनि देवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे भय । करा जवळी तें नये ॥ ४ ॥

॥ १६७८ ॥

बहुखेदक्षीण । आलों सोसुनिया वन ॥ १ ॥ विठोबा विसांविया विसांविया । पडों देई गा पायां २ बहुतां काकुलती आलों सोसिली फजिती ॥ ३ ॥ केली तुजसाठीं । तुका ह्मणे येवढी आटी ॥ ४ ॥

॥ १६७९ ॥

गातों भाव नाहीं अंगीं । भूषण करावया जगीं १ परि तूं पतितपावन । करीं साच हें वचन ॥२॥ मुखें ह्मणवितों दास । चित्तीं माया लोभ आस ३ तुका ह्मणे दावी वेश । तैसा अंतरीं नाहीं लेश ४ ॥

॥ १६८० ॥

करा नारायणा । माझ्या दुःखाची खंडणा ॥१॥ वृत्ति राखा पायांपाशीं । वस्ती धरूनि मानसीं ॥२॥ पाळोनिया लळा । आतां पाववावें फळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे दीनें । त्यांचा हरतिया सीण ॥ ४ ॥

॥ १६८१ ॥

क्रियामतिहीन । एक मी गा तुझें दीन ॥१॥ देवा करावा सांभाळ । वारीं माझी तळमळ ॥ २ ॥ नको माझे ठायीं । गुणदोष घालूं कांहीं ॥ ३ ॥ अपराधाच्या कोटी । तुका ह्मणे घाला पोटीं ॥ ४ ॥

॥ १६८२ ॥

तुझे थोर थोर । भक्त करिती विचार ॥ १ ॥ जपतपादि साधनें ।

मज चिंतवेना मनें ॥ २ ॥ करुणावचनें । म्यां भाकावी तुह्मां दीनें ॥ ३ ॥ तुका ह्मणे घेई । माझें थोडें फार ठायीं ॥ ४ ॥

॥ १६८३ ॥

न संडवे अन्न । मज न सेववे वन ॥ १ ॥ म्हणउनी नारायणा । कींव भाकितों करुणा ॥ २ ॥ नाहीं अधिकार । कांहीं घोकाया अक्षर ॥ ३ ॥ तुका ह्मणे थोडें । आयुष्य वेंचे अवघें कोडें ॥ ४ ॥

॥ १६८४ ॥

आयुष्य गेलें वायाविण । थोर झाली नागवण ॥ १ ॥ आतां धांवे धांवे तरी । काय पहातोसि हरी ॥ २ ॥ माझें तुझें याचि गति । दिवस गेले तोंडीं माती ॥ ३ ॥ मन वाव घेऊं नेदी । बुडवूं पाहे भवनदी ॥ ४ ॥ पडिला विषयाचा घाला । तेणें नागविलें मला ॥ ५ ॥ शरण आलों आतां धांवें । तुका ह्मणे मज पावें ॥ ६ ॥

॥ १६८५ ॥

झाली तडातोडी । अवघीं पडिलों उघडीं ॥ १ ॥ नव्हों कोणाचींच कांहीं । तुझे भरलिया वाहीं ॥ २ ॥ पारुषला संवसार । मोडिली वैसण्याची थार ॥ ३ ॥ आतां ह्मणे तुका । देवा अंतरें राखों नका ॥ ४ ॥

॥ १६८६ ॥

सांगों देवा नेणा काय । बोलाची ये आवडी ॥ १ ॥ वाया मज चुकुर करा । विश्वंभरा विनोदें ॥ २ ॥ आवडीच्या करा ऐसें । अंतर्वासें जाणतसां ॥ ३ ॥ तुका ह्मणे समाधानें । होईन मनें मोकळा ॥ ४ ॥

॥ १६८७ ॥

भीमातिरीचा नाटक । यानें लावियेलें चेटक ॥ १ ॥ मन बुद्धि झाली ठक । नेणे संसाराची टुक ॥ २ ॥ कैसी प्रासंगीक वाणी । प्रत्युत्तर कडसणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे मोठा ठक । जेथें तेथें उभा ठाके ॥ ४ ॥

॥ १६८८ ॥

देह प्रारब्धा शिरीं । असोन करी उद्वेग ॥ १ ॥ धांव घाली नारायणा । माझ्या मना जागवी ॥ २ ॥ ऐसी चुकोनियां वर्मे । पीडा भ्रमें पावलों ॥ ३ ॥ तुका ह्मणे केंचा भोग । नव्हे रोग अंगींचा ॥ ४ ॥

॥ १६८९ ॥

आतां न ह्मणे मी माझें । नेघें भार कांहीं ओझें ॥ १ ॥ तूंचि तारिता मारिता । कळों आलासी निरुता ॥ २ ॥ अवघा तूंचि जनार्दन । संत बोलती वचन ३ तुका ह्मणे पांडुरंगा । तुझ्या रिगालों वोसंगा ॥ ४ ॥

॥ १६९० ॥

विठ्ठल माझी माय । आम्हां सुखा उणें काय ॥ १ ॥ घेतों अमृताची धणी । प्रेम वोसंडलें स्तनीं ॥ २ ॥ क्रीडों वैष्णवांच्या मेळीं । करूं आनंदाच्या जळीं ३ तुका ह्मणे कृपावंत । ठेवी आह्मांपाशीं चित्त ॥ ४ ॥

॥ १६९१ ॥

हेंचि माझें धन । तुमचे वंदावे चरण ॥१॥ येणें मार्गे असो जीत । एवढें समर्पूनी चित्त ॥ २ ॥ सांभाळिलें देवा । मज अनाथा जी जीवा ॥ ३ ॥ जोडूनियां कर । तुका विनावितो किंकर ॥ ४ ॥

॥ १६९२ ॥

स्वामिसेवा गोड । माते बाळकाचें कोड ॥१॥ जें जें मागावें भातुकें । तें तें पुरवी कौतुकें ॥ २ ॥ खेळविलें कोडें । हरुषें बोले कीं बोबडें ॥ ३ ॥ तुका ह्मणे लाड । तेथें पुरे माझें कोड ॥ ४ ॥

॥ १६९३ ॥

कोड आवडीचें । पुरवीना बाळकाचें ॥१॥ तेव्हां कैसी ते माउली । जाणा काशासाठीं व्याली ॥ २ ॥ वत्साचिये आसे । धेनु धांवेना वोरसें ॥ ३ ॥ तुका ह्मणे घरीं । बाळ टाकिलें वामरीं ॥ ४ ॥

॥ १६९४ ॥

माये लेंकरांत भिन्न । नाहीं उत्तरांचा सीण ॥१॥ धाडी धाडी वो भातुकें । रंजविल्याचें कौतुकें ॥२॥ करुनि नवल । याचे बोलिलों ते बोल ॥ ३ ॥ तुका ह्मणे माते । पांडुरंगे कृपावंते ॥ ४ ॥

॥ १६९५ ॥

प्रीतीचा तो कळवळा । जिव्हाळाचि वेगळा ॥१॥ बहु नेदी रडों माता । दुश्चित होतां धीर नव्हे ॥२॥ वरी वरी तोंडापुरतें । मोहोरी तें कळतसे ॥३॥ जाणोनिया नेणता तुका । नव्हे लोकांसारिखा ॥४॥

॥ १६९६ ॥

मागितल्यास आस करा । उरी धरा कांहींनाहीं ॥ १ ॥ ह्मणऊनि सारिली आस । होती यास मूळ तें ॥ २ ॥ माझ्या मोहें तुज पान्हा । लोटे स्तना वोरस ॥३॥ तुका ह्मणे आळवणें । माझ्या देणें उत्तर ॥४॥

॥ १६९७ ॥

चालवणें काय । ऐसें अगे माझे माय ॥ १ ॥ धांव पाव लवलाहें । कंठीं प्राण वाट पाहे ॥२॥ पसरूनि कर । तुज चालिलों समोर ३ देसील विसांवा । तुका ह्मणे ऐसा द्यावा ॥ ४ ॥

॥ १६९८ ॥

आपुल्या महिमानें । धातु परिसें केलें सोनें ॥ १ ॥ तैसें न मनीं माझें आतां । गुणदोष पंढरीनाथा ॥ २ ॥ गांवाखालील वोहोळ । गंगा न मनी अमंगळ ३ तुका ह्मणे माती । केली कस्तुरीनें सरती ४

॥ १६९९ ॥

उपजलें मनीं । हे तों स्वामीची करणी १ होईल प्रसादाचें दान । तरि हें कवतुक पाहेन २ येइल अभय जरि । तरि हे आज्ञा वंदीन शिरीं ३ भक्तिप्रयोजना । प्रयोजावें वंदीजना ४ यश स्वामीचिये शिरीं । दास्य करावें किंकरीं ५ तुका ह्मणे आळीकरा । त्यासी योजावें उत्तरा६

॥ १७०० ॥

गातों नाचतों आनंदें । टाळघागरीयाच्या छंदें १ तुझी तुज पुढें देवा । नेणों भाव कैसी सेवा ॥२॥ नेणों ताळ घात मात । भलतें सवां पाय हात ॥ ३ ॥ लाज नाहीं शंका । प्रेम घालाह्मणे तुका ४

॥ १७०१ ॥

बुद्धिहीना उपदेश । तें तें विष अमृतीं १ हुंगो नये गोन्हावाडी ॥ तेथें जोडी विटाळ २ अळसियाचें अंतर कुडें । जैसें मढें निष्काम ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐशा हातीं । मज श्रीपती वांचवा ॥ ४ ॥

॥ १७०२ ॥

आपुलया आह्मी पुसिलें नाहीं । तुज कांहीं कारणें ॥१॥ मागें मागें धांवत आलों । कांहीं बोलों यासाठीं ॥२॥ बहुत दिस होतें मनीं । घ्यावी धणी एकांतीं ३ तुका ह्मणे उभा राहे । कान्हो पाहे मजकडे ४

॥ १७०३ ॥

अवघिया चाडा कुंठित करूनि । लावी आपुलीच गोडी ॥ आशा मनसा तृष्णा कल्पना । करूनिया देशधडी ॥ मातूंपणापासव गुंतलों । मिथ्या संकल्प तो माझा तोडी ॥ तुझिया चरणीं माझे दोन्ही पक्ष । अवघी करुनि दाखवी पिंडी रे रे ॥ १ ॥ माझें साच काय केलें मृगजळें । वर्णा याती कुळ अभिमान ॥ कुमारी भातुकें खेळती कवतुकें । काय त्याचें साचपण ॥२॥ वेगळाल्या भावें चित्ता तडातोडी । केलों देशधडी मायाजाळें ॥ गोत वित्त माय बाप बहिणी सुत । बंधुवर्ग माझीं बाळें ॥ एका एक न धरी संबंध पुरलिया । पातलिया जवळी काळें ॥ जाणोनिया त्याग सर्वस्वें केला । सांभाळीं आपुलें जाळें ॥३॥ एका जवळी धरी आणिका अंतरीं । तीं काय सोयरीं नव्हतीं माझीं ॥ एकाचें पाळण एकासी भांडण । चाड कव णिये काजीं ॥ अधिक असे उणें कवण कवण्या गुणें । हे माव माव न कळेचि तुझी ॥ ह्मणोनि चिंतनीं राहिलों श्रीपती । तुका ह्मणे भाक माझी ॥४॥

॥ १७०४ ॥

माझिया संचिता । दृढ देखोनि बळिवंता । पळसी पंढरिनाथा । भेणें आतां तयाच्या ॥ १ ॥ तरि मज कळलासी । नव्हता भेटी जाणीवेसी । एक संपादिसी । मान करिसी लोकांत ॥ २ ॥ तरि हें प्रारब्ध जी गाढें । कांहीं न चले तयापुढें । काय तुज म्यां कोडें । रे सांकडें घालावें ॥ ३ ॥ भोगाधीपति क्रियमाण । तें तुज नागवे अझून । तरि कां वायाविण । तुज म्यां सीण करावा ॥ ४ ॥ तुज नव्हता माझें कांहीं । परि मी न संडीं भक्तिसोई । ही कां भलतें

ठायीं । कुळीं जन्म भलतैसा ॥५॥ तूं भितोसि माझिया दोषा । कांहीं मागणें ते आशा । तुका ह्मणे ऐसा । कांहीं न धरी संकोच ॥ ६ ॥

॥ १७०५ ॥

कांहीं बोलिलों बोबडें । मायबापा तुम्हांपुढें । सलगी लाडें कोडें । मज क्षमा करावी ॥ १ ॥ काय जाणावा महिमा । तुमचा म्यां पुरुषोत्तमा । आवडीनें सीमा । सांडविली मज हातीं ॥ २ ॥ घडे अवज्ञा सख्यत्वें । बाळें बापासी न भ्यावें । काय म्यां सांगावें । आहे ठावें तुह्मासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । प्रेम लोभ न संडावा । पाळिला पाळावा । लळा पुढती आगळा ॥ ४ ॥

॥ १७०६ ॥

ह्मणऊनि काकुळती । येतों पुढतां पुढती । तुह्मां असे हातीं । कमळापती भांडार ॥ १ ॥ फेडूं आलेती दारिद्र्य । तरी नलगे उशीर । पुरे अभयकर । ठाया ठाव रंकाशी ॥२॥ कोठें न घाली धांव । याजसाटीं त्यजिली हाँव । घेऊं नेदी वाव । मना केला विरोध ॥३॥ कारणांच्या गुणें । वेळ काळ तोही नेणें । तुमच्या कीर्तनें । तुका तुह्मां जागवी ॥ ४ ॥

॥ १७०७ ॥

जों जों ध्यावा सोस । माझें वारी गर्भवास । लटिकयाचा दोष, अधिक जडे अंगेसीं ॥ १ ॥ आतां आहे तैसें असो । अनुताप अंगीं वसो । येवढेंचि नसो । माझें आणि परावें ॥ २ ॥ जागा झालेपणें । काय नासावें स्वप्न । शब्दाचिया शिणें । कष्ट मिथ्या मानावे ॥३॥ छाये माकड विटे । धांवे कूपीं काय भेटे । तुका ह्मणे फुटे । डोई गुढघे कोंपर ४

॥ १७०८ ॥

माझें चित्त तुझे पायीं । राहे ऐसें करीं कांहीं । धरोनिया बाहीं । भव हा तारीं दातारा ॥ १ ॥ चतुरा तूं शिरोमणी । गुणलावण्याची खाणी । मुगुट सकळां मणि । धन्य तूंचि विठोबा ॥ २ ॥ करी या तिमिराचा नाश । उदय होउनि प्रकाश । तोडी आशापाश । करी वास हृदयीं ॥ ३ ॥ पाहें गुंतलों नेणतां । तुज असो माझी चिंता । तुका ठेवी माथा । पायीं आतां राखावें ॥ ४ ॥

॥ १७०९ ॥

काय करूं आतां या मना । न संडी विषयवासना । प्रार्थितांही राहेना । आदरें पतना नेऊं पाहे १ आतां धांवें धांवें गा श्रीहरी । गेलों वांया नाहीं तरी । न दिसे कोणी आवरी । आणीक दुजा तयासी ॥२॥ न राहे एके ठायीं एकी घडी । चित्त तडतडा तोडी । भरलें विषयभोवंडी । घालूं पाहे उडी भवडोहीं ॥ ३ ॥ आशा तृष्णा कल्पना पापिणी । घात मांडला माझा यांणीं । तुका ह्मणे चक्रपाणी । काय अझोनि पहातोसी ॥ ४ ॥

॥ १७१० ॥

याती हीन मती हीन कर्म हीन माझें । सर्व लज्जा सांडोनिया शरण आलों तुज ॥ १ ॥ येई गा तूं मायबापा पंढरीच्या राया । तुजविण सीण वाटे क्षीण झाली काया ॥ २ ॥ दिनानाथ दीनबंधु नाम तुम्हा साजे । पतितपावन नाम ऐसी ब्रीदावळी गाजे ॥३॥ विटेवरी नीट उभा कटावरी कर । तुका ह्मणे हेंचि आम्हां ध्यान निरंतर ४

॥ १७११ ॥

अधिक कोंडितां चरफडी । भलतीकडे घाली उडी ॥१॥ काय करूं या मना आतां । कां विसरतें पंढरीनाथा ॥ २ ॥ करी संसाराची चिंता । वेळोवेळां मागुती ॥ ३ ॥ भजन नावडे श्रवण । धांवे विषय अवलोकून ॥४॥ बहुत चंचळ चपळ । जातां येतां नलगे वेळ ॥५॥ किती राखों दोन्ही काळ । निजलिया जागे वेळ ॥ ६ ॥ मज राखे आतां । तुका ह्मणे पंढरीनाथा ॥ ७ ॥

॥ १७१२ ॥

चित्त गुंतलें प्रपंचें । झालें वेडें ममतेचें १ आतां सोडवी पांडुरंगा । आलें निवारीं तें अंगा ॥ २ ॥ गुंतली चावटी । नामीं रूपीं झाली तुटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे चाली । पुढें वाट खोळंबली ॥ ४ ॥

॥ १७१३ ॥

काय करूं जी दातारा । कांहीं न पुरे संसारा ॥१॥ झाली माकडाची परी । येतों तळा जातों वरी ॥ २ ॥ घाली भलते ठायीं हात । होती शिव्या बैसे लात ॥३॥ आदि अंतीं तुका । सांगे न कळे झाला चुका४॥

॥ १७१४ ॥

प्रपंच वोसरो । चित्त तुझे पायीं मुरो ॥ १ ॥ ऐसें करीं गा पांडुरंगा । शुद्ध रंगवावें रंगा ॥२॥ पुरे पुरे आतां । नको दुजियाची सत्ता ॥ ३ ॥ लटिकें तें फेडा । तुका ह्मणे जाय पीडा ॥ ४ ॥

॥ १७१५ ॥

आधार तो व्हावा । ऐसी आस करी देवा ॥ १ ॥ तुम्हांपाशीं काय उणें । काय वेचे समाधानें ॥ २ ॥ सेवेच्या अभिलाषें । मन बहु झालें पिसें ॥३॥ अरे भक्तपराधीना । तुका ह्मणे नारायणा ॥ ४ ॥

॥ १७१६ ॥

जन्मा आलियाचा लाभ । पद्मनाभ दरुशन ॥ १ ॥ पाठी-लागा येतो काळ । तूं कृपाळ माउली ॥ २ ॥ कोण्या उपायें हें घडे । भव आंगडें सुटकेचें॥३॥ बहु उसंतीत आलों । तया भ्यालों स्थळाशीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे तूं जननी । ये निर्वाणीं विठ्ठले ॥ ५ ॥

स्थितीपर अभंग.

[देवाशीं उद्गार.]

॥ १७१७ ॥

असा जी सांवळें । आह्मां तैसेंचि निराळें १ आह्मीं नयों तुमच्या वाटा । काय लटिकाची ताठा २ चिंतनाचि पुरे । काय सलगी सवें धुरे ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । नका नावडे ते सेवा ॥ ४ ॥

॥ १७१८ ॥

अवघाच अन्यायी । तेथें एकल्याचें काई १ आतां अवघें एकवेळे । जळोनि सरो तें निराळें ॥ २ ॥ काय माझें बरें । एवढेंच राखों बरें ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां । परिहार नलगे चित्ता ॥ ४ ॥

॥ १७१९ ॥

अपराधी ह्मणोनि येतों काकुलती । नाहीं तरी होती काय चाड १॥ येईल तारूं तरी तारा जी देवा । नाहीं तरी सेवा घ्या वो भार २॥ कासया मी आतां वेंचूं हें शरीर । आहें बारगीर जाई जनें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मन करूनि मोकळें । आहें साळेढाळें उदार मी ॥ ४ ॥

॥ १७२० ॥

अनुभव ऐसा । मज लागला सरिसा ॥१॥ पाठी बैसली सेजारीं । नव्हे शांत कोणे परी ॥ २ ॥ कोठें नलगे जावें । कांहीं घालावया ठावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे कोटी । दुःखाच्याच तये पोटीं ॥ ४ ॥

॥ १७२१ ॥

अनुभवें कळों येतें पांडुरंगा । रुसावें तें कां गा तुह्मांवरी ॥ १ ॥ आवरितां चित्त नावरे दुर्जन । घात करी मन माझें मज ॥ २ ॥ अंतरीं संसार भक्ति बाह्यात्कार । ह्मणोनि अंतर तुझ्या पायीं ॥३॥ तुका ह्मणे काय करूं नेणें वर्म । आलें तैसें कर्म सोसूं पुढें ॥ ४ ॥

॥ १७२२ ॥

अनाथा जीवन । आह्मां तुमचे चरण । करूनि सांठवण । धरी येलें हृदयीं ॥ १ ॥ पुष्ट झाली अंगकांति । आनंद नसमाये चित्तीं । कवतुकें प्रीती । गाऊं नाचों उल्हासें ॥२॥ करुणाउत्तरीं । करूं आळवण हरी । जाऊं नेदूं दुरी । प्रेमप्रीतिपडिभरें ३ मोहो माने करी गोवा। ऐसें आहे जी केशवा । तुका ह्मणे सेवा । आणीक नाहीं जाणत ४

॥ १७२३ ॥

असोत हे तुझे प्रकार सकळ । काय खळखळ करावी हे ॥ १ ॥ आमुचें स्वहित जाणतसों आम्ही । तुझें वर्म नामीं आहे तुझ्या २॥ विचारितां आयुष्य जातें वायांविण । । रोज नागवण पडतसे ॥३॥

राहेन मी तुझे पाय आठवूनी । आणीक तें मनीं येऊं नेदी ॥ ४ ॥ तुका ह्मणे तेथें येसी अनायासें । थोर तुज पिसें कीर्तनाचें ॥ ५ ॥

॥ १७२४ ॥

अवचित या तुमच्या पायां । देवराया पावलों ॥ १ ॥ बरवें झालें देशाउर । आल्या दूर सारिखें ॥२॥ राहोनिया जातों ठाया । आलियाची निशाणी ॥३॥ तुका ह्मणे चरणसेवा । जोडी देवा लाधलों॥४॥

॥ १७२५ ॥

अनाथाचा नाथ पतितपावन । दीनाचें रक्षण करीतसे ॥ १ ॥ ऐसें जाणोनिया नामीं विश्वासलों । भीमातीरा आलों धांवतचि॥२॥ स्नान हें करितां त्रिताप निवाले । महाद्वारा आलें मन माझें ॥ ३ ॥ तेथें अनुमात्र रीग नव्हे याचा । परतलों साचा तेथूनिया ॥ ४ ॥ पुंडलिकापाशीं येऊनि पुसिलें । चिन्मय दाटलें जनार्दन ॥ ५ ॥ तुका ह्मणे आतां दुजा धर्म नाहीं । बाप तरी आई तोचि विठो॥६॥

॥ १७२६ ॥

आतां येणें पडिपाडें । रस सेवूं हा निवाडें । मुंगी गेली गोडें । ठेविलिये अडचणी ॥१॥ तैसें होय माझ्या जीवा । चरण न सोडी केशवा । विषयबुद्धि हेवा । वोस पडो सकळ ॥ २ ॥ भुकेलिया श्वाना । गांठ पडे सवें अन्ना । भुंकों पाहे प्राणा । परि तोंडींची न सोडीं ॥ ३ ॥ काय जिंकियेलें मन । जीवित्व कामातुरा तृण । मागे अभिचारिण । भक्ती तुका ये जाती ॥ ४ ॥

॥ १७२७ ॥

आतां कोठें धांवे मन । तुझे चरण देखिलिया ॥ १ ॥ भाग गेला सीण गेला । अवघा झाला आनंद ॥ २ ॥ प्रेमरसें बैसली मिठी । आवडी लाठी मुखासी ३ तुका ह्मणे आह्मां जोगें। विठ्ठल घोगें खरें माप४

॥ १७२८ ॥

आतां आह्मां हेंचि काम । वाचे स्मरों रामराम ॥ १ ॥ ऐसी मोलाची हे घडी । धरूं पायांची आवडी ॥ २ ॥ अमृताची खाणी । तये ठायीं वेचूं वाणी ॥३॥ तुका ह्मणे पांडुरंगा । माझ्या जीवींच्या जिवलगा ४

॥ १७२९ ॥

आहें तैसा आतां आहें ठायीं बरा । ठेविलों दातारा उचितें त्या ॥१॥ वचनाचा भार पडिलिया शिरीं । झालें मग भारी उतरेना ॥ २ ॥ अबोल्याची सवे लावुनिया मना । फाकों नेदूं गुणा ऐसें करूं ॥३॥ तुका ह्मणे आह्मां गोवळ्याचा संग । राखतें तें अंग जाणतसों ४

॥ १७३० ॥

आळी करावी ते कळतें बाळका । बुझवावें हें कां नेणां तुह्मी ॥ १ ॥ निवाड तो तेथें असे पायांपाशीं । तुह्मां आह्मांविशीं एकेठायीं ॥२॥

आणीक तों आह्मी न देखोंसें झालें । जाणावें शिणलें भागलेसें ॥३॥ तुका ह्मणे तुह्मां लागतें सांगावें । अंतरीचें ठावें काय नाहीं ॥ ४ ॥

॥ १७३१ ॥

आपुलिये टाकीं । करीन कांहीं तरी एकी ॥ १ ॥ करीन पायांशीं ओळखी । करिसी तें करी सुखी ॥२॥ कायाक्लेशगंगाजळ । समर्पीन तुळसीदळ ३ तुका ह्मणे देवा । कर जोडीन ते सेवा ॥ ४ ॥

॥ १७३२ ॥

आतां तुझें नाम गात असें गीतीं । म्हणोनि मानिती लोक मज ॥१॥
अन्नवस्त्रचिंता नाहीं या पोटाची । वारिली देहाचि थोर पीडा २ ॥
सज्जन संबंधी तुटली उपाधी । रोकडी या बंदीं सुटलोंसें ॥ ३ ॥
घ्यावा द्यावा कोणें करावा सायास । गेले आशापाश वारोनिया ४
तुका ह्मणे तुज कळेल तें आतां । क ा जी अनंता मायबापा ॥ ५ ॥

॥ १७३३ ॥

आतां मीं पतित ऐसा साच भावें । कळों अनुभवें आलें देवा ॥१॥
काय करावें तें रोकडेंचि करी । राहिली हे उरी नाहीं दोघां २ ॥
येर येरा दृष्टी द्यावया उत्तरा । यासी काय करा गोही आतां ॥ ३ ॥
तुका ह्मणे मेलों सांगतसांगतां । तेंचि आलें आतां कळों तुम्हां ४॥

॥ १७३४ ॥

आतां भय नाहीं ऐसें वाटे जीवा । घडलिया सेवा समर्थाची ॥१॥
आतां माझ्या मनें धरावा निर्धार । चिंतनीं अंतर न पडावें ॥ २ ॥
येथें नाहीं झाली कोणाची निरास । आल्या याचकास कृपेविशीं ३
तुका ह्मणे येथें नाहीं दुजी परी । राया रंका सरी देवा पायीं ४॥

॥ १७३५ ॥

आतां सर्वभावें हा माझा निर्धार । न करीं विचार आणिकांसीं १॥
सर्वभावें नाम गाईन आवडी । सर्व माझी जोडी पाय तुझे ॥ २ ॥
लोटांगण तुझ्या घालीन अगणीं । पाहीन भरोनि डोळे मुख ॥ ३ ॥
निर्लज्ज होऊनि नाचेन रंगणीं । येऊं नेदी मनीं शंका कांहीं ॥ ४ ॥
अंकित अंकिला दास तुझा देवा । संकल्प हा जीवा तुका ह्मणे ५

॥ १७३६ ॥

आतां येथें झाली जीवासवें साटी । होतें तैसें पोटीं फळ आलें ॥१॥
आतां धरिले ते न सोडी चरण । सांपडलें धन निजठेवा ॥ २ ॥
आतां हा आळस असो परता दुरी। नेदावी ते उरी उरों कांहीं ३॥
आतां याचा मज न व्हावा विसर । भरोनी अंतर राहो रूप ॥ ४॥
आतां लोकलाज नयो येथें आड । बहु झालें गोड ब्रह्मरस ॥ ५ ॥
तुका ह्मणे आतां जन्म हा सफळ । अंतरीं गोपाळ स्थिरावला ६ ॥

॥ १७३७ ॥

आतां आह्मां हेंचि काम । वाचे गाऊं तुझें नाम । वाळुवंटी टाळी प्रेम । सुखें आनंदें नाचावें ॥ १ ॥ अवघी झाली आराणूक । मागें पुढें सकळिक । त्रिपुटीचें दुःख । प्रारब्ध सारिलें ॥ २ ॥ गोदा-तटें निर्मळें । देव देवांचीं देवळें । संत महंत मेळें । दिवस जाय सुखाचा ॥३॥ तुका ह्मणे पंढरीनाथा । आणिक नाहीं मज चिंता । योगक्षेम माथां भार तुझ्या घातला ॥ ४ ॥

॥ १७३८ ॥

आता गाऊं तुज ओविया मंगळीं । करूं गदारोळी हरिकथा ॥ १ ॥ होसि निवारिता आमुचें सकळ । भय तळमळ पापपुण्य ॥ २ ॥ भोगिले ते भोग लावूं तुझे अंगीं । अलिप्त या जगीं होउनि राहों ३ तुका ह्मणे आह्मी लाडिकीं लेंकुरें । न राहों अंतरें पायांविण ॥ ४ ॥

॥ १७३९ ॥

आम्ही सर्वकाळ कैचीं सावधान । व्यवसायें मन अभ्यासलें ॥ १ ॥ तरी ह्मणा मोट ठेविली चरणीं । केलों गुणागुणीं कासावीस ॥ २ ॥ याचे कानसुलीं मारीतसे हाका । मज घालूं नका आतां मधीं ३ ॥ तुका ह्मणे निद्रा जागृति सुषुप्ति । तुम्ही हो श्रीपती साक्षी येथें ४॥

॥ १७४० ॥

आम्हीं असों निश्चितीनें । एक्या गुणें तुमचिया ॥ १ ॥ दुराचारी तरले नामें । घेतां प्रेमें ह्मणोनि २ नाहीं तुम्हां धांव घेतां । कृपावंता आळस ॥ ३ ॥ तुका ह्मणे विसरूं काई । तुज वो आई विठ्ठले ॥ ४ ॥

॥ १७४१ ॥

आम्हांसी सांगाती । होतो अराले ते होती ॥ १ ॥ येतो आइकतां हाक । दोन मिळोन ह्मणती एक २ आणिकां उत्तरीं । नसे गोविली वैखरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे बोल । खूण पहाती विठ्ठल ॥ ४ ॥

॥ १७४२ ॥

आह्मां घरीं धन शब्दांचींच रत्नें । शब्दांचींच वस्त्रें यत्न करूं ॥ १ ॥ शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन । शब्दें वांटूं धन जनलोकां ॥२॥ तुका ह्मणे पहा शब्दचि हा देव । शब्देंचि गौरव पूजा करूं ॥ ३ ॥

॥ १७४३ ॥

आह्मांसीं सकळ । तुझ्या नामाचेंचि बळ ॥ १ ॥ करूं अमृताचें पान । दुजे नेणो काहीं आन ॥ २ ॥ जयाचा जो भोग । सुख दुःख पीडा रोग ॥३॥ तुका ह्मणे देवा । तुझे पायीं माझा हेवा ॥४॥

॥ १७४४ ॥

आह्मां सर्वभावें हेंचि काम । न विसंबावें तुझें नाम १ नलगे करावी हे चिंता । तरणें करणें काय आतां २ आसनीं भोजनीं शयनीं । दुजें नाहीं ध्यानीं मनीं ३ तुका ह्मणे कृपानिधी । माझी तोडिली उपाधी ४॥

॥ १७४५ ॥

आह्मी मागों ऐसें नाहीं तुजपाशीं । जरी तूं भोतोसि पांडुरंगा १ ॥
पाहे विचारूनि आहे तुज ठावें । आम्ही घालों नांवें तुझ्या एका २
ऋद्धिसिद्धि तुझें मुख्य भांडवल । हें तों आह्मां फोल अक्षीपुढें ३
तुका ह्मणे जाऊं वैकुंठा चालत । बैसोनि निवांत सुख भोगूं ॥ ४ ॥

॥ १७४६ ॥

आम्ही रामाचे राऊत । वीर झुंझार बहुत १ मनपवनतुरंग । हातीं नामाची फिरंग २ वारू चालवूं चहूंखुरीं । घाला घालूं यमपुरीं ॥३॥ तुका म्हणे पेणें । आह्मां वैकुंठासी जाणें ॥ ४ ॥

॥ १७४७ ॥

आह्मां हेंचि काम । वाचे गाऊं तुझें नाम ॥१॥ आयुष्य मोलाची हे घडी । धरूं पायांची आवडी ॥ २ ॥ अमृताची खाणी । याचे ठायीं घेचूं वाणी ॥३॥ तुका ह्मणे पांडुरंगा । माझ्या जिवाच्या जिवलगा॥४॥

॥ १७४८ ॥

उतरलों पार । सत्य झाला हा निर्धार ॥ १॥ तुझें नाम धरिलें कंठीं । केली संसाराची तुटी ॥ २ ॥ आतां नव्हे बाधा । कोणेविशीं कांहीं कदा ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । आतां उरलें ऐसें नाहीं ॥ ४ ॥

॥ १७४९ ॥

उपासा सेवटीं अन्नासवें भेटी । तैसी माझी मिठी पडो पायां ॥१ ॥
पुरवी वासना साच सर्वजाणा । आह्मां नारायणा अंकिताची ॥ २ ॥
बहुदस पुत्रामातेसवें भेटी । तैसा दाटो पोटीं प्रीतिउभ ॥ ३ ॥
तुका ह्मणे धन कृपणा सोइरें । यापरि दुसरें नहो आतां ॥ ४ ॥

॥ १७५० ॥

एक वेळे तरी जाईन माहेरा । बहुजन्म फेरा झालयावरी ॥ १ ॥
चित्ता हे बैसली अविट आवडी । पालट ती घडी नेघे एकी ॥२॥
करावें तें करी कारण शरीर । अंतरीं त्या धीर जीवनाचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे तरी होईल विलंब । परी माझा लाभ खरा झाला ॥४॥

॥ १७५१ ॥

एकाकेली हातोफळी । ठाया बळी पावले ते ॥१॥ आह्मां देवा शक्तिहीनें । भाकूं तेणें करुणा ॥२॥ पावणी केला काळ । जया बळ होतें तें ॥३॥ तुका ह्मणे वीर्यावीर । संतधीर समुद्र ॥ ४ ॥

॥ १७५२ ॥

ऐसा सर्व भाव तुज निरोपिला । तूं मज एकला सर्वभावें ॥ १ ॥
अंतरींची कां हे नेणसील गोष्टी । परि सुखासाटीं बोलावया २ ॥
सर्व माझा भार तुज चालवणें । तेथें म्यां बोलणें काय एक ॥ ३ ॥
स्वभावें स्वहित हिताचें कारण । कौतुक करून निवाडसी ॥ ४ ॥
तुका ह्मणे तूं हें जाणसी गा देवा । आमुच्या स्वभावा अंतरींच्या ५

॥ १७५३ ॥

कइंचें कारण । तृष्णा वाढविते सीण ॥ १ ॥ काय करूनि ऐसा संग । सोसेंचि तूं पांडुरंग ॥ २ ॥ रूपीं नाहीं गोडी । हावें हावें उर फोडी ३ तुका न पडे भरी । ऐशा वरदळाचे थोरी ॥ ४ ॥

॥ १७५४ ॥

करीं ऐसें जागे । वेळोवेळां पायां लागें ॥ १ ॥ प्रेम झोंबे कंठीं । देह धरणिये लोटी ॥ २ ॥ राहे लोकाचार । पडे अवघा विसर ॥ ३ ॥ तुका ह्मणे ध्यावें । तुज व्यभिचारभावें ॥ ४ ॥

॥ १७५५ ॥

कपट कांहीं एक । नेणें भुलवायाचे लोक ॥ १ ॥ तुमचें करितों कीर्तन । गातों उत्तम ते गुण ॥ २ ॥ दाऊं नेणें जडीबुटी । चमत्कार उठाउठी ॥ ३ ॥ नाहीं शिष्यशाखा । सांगों अयाचित लोकां ॥ ४ ॥ नव्हे मठपति । नाहीं चाहुरांची वृत्ति ॥ ५ ॥ नाहीं देवार्चन । असे मांडिलें दुकान ॥ ६ ॥ नाहीं वेताळ प्रसन्न । कांहीं सांगों खाण खूण ॥ ७ ॥ नव्हे पुराणिक । करणें सांगणें आणीक ॥ ८ ॥ नेणें वाद घटा पटा । करितां पंडित करंटा ॥ ९ ॥ नाहीं जाळीत भणदीं । उदो ह्मणोनि आनंदी १० नाहीं हालवीत माळ । भोंवतें मेळवुनि गाबाळ ११ आगमीचें कुडें नेणें । स्तंभन मोहन उच्चारणें १२ नव्हे यांच्या ऐसा । तुका निरयवासी पिसा ॥१३॥

॥ १७५६ ॥

कमोदिनी काय जाणे तो परिमळ । भ्रमर सकळ भोगितसे ॥ १ ॥ तैसें तुज ठावें नाहीं तुझें नाम । आह्मीच तें प्रेमसुख जाणों ॥ २ ॥ मातें तृण बाळा दुधाची ते गोडी । ज्याची नये जोडी त्यासी कामा ३ तुका म्हणे मुक्ताफळ शिंपी पोटीं । नाहीं त्याची भेटी भोग तिये ४

॥ १७५७ ॥

कराल तें करा । हातें आपुल्या दातारा ॥ १ ॥ बळियाचीं आह्मी बाळें । असों निर्भर या सळें ॥ २ ॥ आतां कोठें काळ । मधीं रिघेल ओंगळ ॥३॥ तुका ह्मणे पंढरीराया । थापटितों ठोक बाह्या ॥ ४ ॥

॥ १७५८ ॥

करीं धंदा परि आवडती पाय । प्रीती सांगों काय नेणां देवा ॥१॥ रूप डोळां देखें सदा सर्वकाळ । संपादितों आळ प्रपंचाचा ॥ २ ॥ नेमून ठेविली काया हे कारणीं । आमुचि हे वाणी गुण वदे ॥३॥ मनासीं उत्कंठा दर्शनाचा हेवा । नाहीं लोभ जीवा धन धान्य ४॥ उसंतितों पंथ वेठीचिया परी । जीवनसूत्र दोरीपाशीं ओढ ॥ ५ ॥ तुका ह्मणे ऐसें करितों निर्वाण । जीव तुह्मां भिन्न नाहीं माझा ६॥

॥ १७५९ ॥

करूनि राहों जरी आत्माचि प्रमाण । निश्चळ नव्हे मन काय करूं १
जेवलिया विण काशाचे ढेंकर । शब्दाचे प्रकार शब्दचि ते ॥ २ ॥
पुरे पुरे आतां तुमचें ब्रह्मज्ञान । आह्मासी चरण न सोडणें ॥ ३ ॥
विरोधें विरोध वाढे पुढतापुढती । वासनेचे हातीं गर्भवास ॥४॥
सांडीमांडीअंगीं वसे पुण्यपाप । बंधन संकल्प याचि नांवें ॥ ५ ॥
तुका ह्मणे नाहीं मुक्तता मोकळी । ऐसा कोण बळी निरसी देह ६

॥ १७६० ॥

कळस वाहियेला शिरीं । सहस्रनामें पूजा करीं ॥ १ ॥ पीक पिकलें पिकलें । घन दाटोनिया आलें ॥ २ ॥ शेवटचें दान । भागा आला नारायणा ॥ ३ ॥ तुका ह्मणे पोट । भरलें वारला बोभाट ॥ ४ ॥

॥ १७६१ ॥

कळेल हें तैसें गाईन मी तुज । जनासवें काज काय माझें ॥ १ ॥
करीन मी स्तुती आपुले आवडी । जैसी माझ्या गोडी वाटे जीवा२॥
होऊनि निर्भर नाचेन मी छंदें । आपुल्या आनंदें करूनिया ॥ ३ ॥
काय करूं कळा युक्ती या कुसरी । जाणिवेच्या परी सकाळिका ४॥
तुका ह्मणे माझें जयासवें काज । भोळा तो सहज पांडुरंग ॥ ५ ॥

॥ १७६२ ॥

काम क्रोध पडले पर्वत । राहिला अनंत पलीकडे ॥ १ ॥
नुलंघवे मज न सांपडे वाट । दुस्तर हा घाट वैरियांचा ॥२ ॥
आतां कैंचा मज सखा नारायण । गेला अंतरोन पांडुरंग ॥ ३ ॥
तुका ह्मणे व्यर्थ मोलाचें शरीर । गेलें हा विचार कळों आला ४॥

॥ १७६३ ॥

काय मागावें कवणासी । ज्यासी मागों तो मजपाशीं ॥ १ ॥ जरी मागों पद इंद्राचें । तरी शाश्वत नाहीं त्याचें ॥ २ ॥ जरी मागों ध्रुवपद । तरी त्यासी येथील छंद ॥ ३ ॥ स्वर्गभोग मागों पूर्ण । पुण्य सरल्या मागुती येणें ॥ ४ ॥ आयुष्य मागों चिरंजीव । जीवा मरण नाहीं स्वभावें ५ तुका ह्मणे एक मागें । एकपणा नाहीं भंग ६॥

॥ १७६४ ॥

काय ऐसी वेळ । वोडवली अमंगळ ॥१॥ आजि दुखवलें मन । कथाकाळीं झाला सीण ॥ २ ॥ पापाचिया गुणें । त्यांचिया वेळे दर्शनें ॥ ३ ॥ तुका ह्मणे कानीं । घालूं आले दुष्टवाणी ॥ ४ ॥

॥ १७६५ ॥

काय मज एवढा भार । हे वेव्हार चालवाया ॥ १ ॥ उकल तो जाणे धणी । भोजनीं कारण ॥ २ ॥ चिंता ज्याची तया शिरीं । लेंकरीं तें खेळावें ॥३॥ तुका ह्मणे सेवट झाला । देव या बोला भोगिता ॥४॥

॥ १७६६ ॥

काय सांगों तुझ्या चरणांच्या सुखा । अनुभव ठाउका नाहीं तुज १
बोलतां हें कैसें वाटे खरेपण । अमृताचे गुण अमृतासी ॥ २ ॥
आह्मी एकएका ग्वाही मायपुतें । जाणों तें निरुतें सुख दोघे ॥३॥
तुका ह्मणे आह्मां मोक्षाचा कांटाळा । कां तुह्मी गोपाळा नेणा ऐसें ४

॥ १७६७ ॥

काय पुण्यराशी । गेल्या भेदूनि आकाशीं ॥ १ ॥ तुह्मी झालेति कृपाळ । माझा केला जी सांभाळ ॥ २ ॥ काय बोललें संचित । ऐसें नेणें अगणित ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेणें । काय केलें नारायणें ॥ ४ ॥

॥ १७६८ ॥

काय ऐसा जन्म जावा वायाविण । कांहीं तरी ऋण असो माथां १
कोणे तरी काळें होईल आठव । नाहीं जरी भाव भार खरा ॥ २ ॥
शता एका तरी जन्माच्या शेवटीं । कृपाळुवा पोटीं येईल दया ३॥
तुका ह्मणे नाहीं फांकों तरी देत । सर्वांचें उचित सांपडलें ॥ ४ ॥

॥ १७६९ ॥

कायें करुनी करीं धंदा । चित्त गोविंदा तुझे पायीं १ ऐशा संकल्पाची संधि । माझे बुद्धि धीर देवा २ कुटुंबाचा तुम्हां भार । मज व्यवहारनिमित्त ३ तुका ह्मणे करितां काम । हृदयीं नाम धरीन ४

॥ १७७० ॥

कासया गा मज घातलें संसारीं । चित्त पायांवरी नाहीं तुझ्या १॥
कासया गा मज घातलें या जन्मा । नाहीं तुझा प्रेमा नित्य नवा २ ॥
नामाविण माझी वाचा अमंगळ । ऐसा कां चांडाळ निर्मियलों ॥३॥
तुका ह्मणे माझी जळो जळो काया । विठ्ठला सखया वांचूनिया ४ ॥

॥ १७७१ ॥

कांहीं जडभारी । पडतां ते अवसरीं ॥ १ ॥ तुज आठवावे पाया । आम्हीं मोकलूनि धाया ॥ २ ॥ तान पीडी भूक । शीत उष्ण वाटे दुःख ॥ ३ ॥ तुका ह्मणे लाड । तेथें पुरे माझें कोड ॥ ४ ॥

॥ १७७२ ॥

कोठें भोग उरला आतां । आठवितां तुज मज ॥ १ ॥ आड कांहीं नये दुजें । फळ बीजें आणिलें ॥ २ ॥ उद्वेग ते वायाविण । कैंचा सीण चिंतनें ॥३॥ तुका ह्मणे गेला भ्रम । तुमच्या धर्में पायांच्या ४

॥ १७७३ ॥

कोठें देवा आलें अंगा थोरपण । बरें होतें दीन होतों तरी ॥ १ ॥
साधन ते सेवा संतांची उत्तम । आवडीनें नाम गाईजे तें ॥ २ ॥
न पुसतें कोणी कोठें ही असतां । समाधान चित्ताचिया सुखें ॥३॥
तुका ह्मणे जन अव्हेरितें मज । तरी केशीराज सांभाळिता ॥ ४ ॥

॥ १७७४ ॥

खावें ल्यावें द्यावें । जमाखर्च तुझ्या नांवें ॥ १ ॥ आतां चुकली खटपट । झाड्यापाड्याचा बोभाट ॥२॥ आहे नाहीं त्याचें । आम्हां काम सांगायाचें ३ तुका ह्मणे चिंता । भार वाही त्याचे माथां ४ ॥

॥ १७७५ ॥

गाऊं नेणें कळा कुसरी । कान धरोनि ह्मणें हरी ॥ १ ॥ माझ्या बोबडिया बोला । चित्त द्यावें बा विठ्ठला ॥२॥ मज हंसतील लोक । परि मी गाईन निःशंक ॥ ३ ॥ तुझे नामीं मी निर्लज्ज । काय जनासवें काज ४ तुका ह्मणे माझी विनंती । तुम्ही परिसा कमळापती ५॥

॥ १७७६ ॥

घेईन मी जन्म याजसाठीं देवा । तुझी चरणसेवा साधावया ॥ १ ॥ हरिनामकीर्तन संतांचें पूजन । घालूं लोटांगण महाद्वारीं ॥ २ ॥ आनंदें निर्भर असों भलते ठायीं । सुखदुःखा नाहीं चाड आह्मां ३॥ आणीक सायास न करीं न धरीं आस । होईन उदास सर्व भावें ॥४॥ मोक्ष आह्मां घरीं कामारी ते दासी । होय सांगों तैसी तुका ह्मणे ॥५॥

॥ १७७७ ॥

चंदनाच्या वासें धरितील नाक । नावडे कनक न घडे हें ॥ १ ॥ साकरेची गोडी सारिखी सकळां । थोरां मोठ्यां बाळां धाकुटिया २ तुका ह्मणे माझें चित्त शुद्ध होतें । तरि कां निंदिते जन मज ॥ ३ ॥

॥ १७७८ ॥

चित्तीं तुझे पाय डोळां रूपाचें ध्यान । अखंड मुखीं नाम तुमचे वर्णावे गुण ॥ १ ॥ हेंचि एक तुह्मां मागतों मी दातारा । उचित तें करा भाव जाणूनि खरा ॥ २ ॥ खुंटलें जाणीव कांहीं बोलणें आतां । कळो येईल तैसी करा बाळाची चिंता ॥३॥ तुका ह्मणे आतां नका देऊं अंतर । न कळे पुढें काय कैसा होईल विचार ॥ ४ ॥

॥ १७७९ ॥

जन्मोजन्मींचें संचित । भेटी झाली अकस्मात ॥१॥ आतां सोडितां सुटेना । तंतु प्रीतीचा तुटेना ॥२॥ माझें चित्त तुझ्या पायां । मिठी पडिली पंढरीराया ॥३॥ तुका ह्मणे अंतीं । तुझी माझी एक गति ४॥

॥ १७८० ॥

जरि न भरे पोट । तरि सेवूं दरकूट ॥ १ ॥ परि न घालूं तुज भार । हाचि आमुचा निर्धार ॥ २ ॥ तुझें नाम अमोलिक । नेणती [illegible]ादिक ॥ ३ ॥ ऐसें नाम तुझें खरें । तुका ह्मणे भासे पुरें ॥४॥

॥ १७८१ ॥

जाणावें तें काय नेणावें तें काय । ध्यावे तुझे पाय हेंचि सार ॥१॥ करावें तें काय न करावें तें काय । ध्यावे तुझे पाय हेंचि सार २॥

बोलावें तें काय न बोलावें तें काय । ध्यावे तुझे पाय हेंचि सार ३
जावें तें कोठें न जावें तें आतां । बरवें आठवितां नाम तुझें ॥ ४ ॥
तुका ह्मणे तूं करिसी तें सोरें । पुण्यें होती पापें आमुच्या मतें ५॥

॥ १७८२ ॥

झाला हा डांगोरा । सुखीं लहानाचे थोरा ॥ १ ॥ नागावलों जना-
चारीं । कोणी बैसों नेदी दारीं ॥ २ ॥ संचिताचा ठेवा । आतां
आला तैसा घ्यावा ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवें । ह्मणों केलें हें बरवें ४॥

॥ १७८३ ॥

झालें समाधान । तुमचे धरिले चरण ॥१॥ आतां उठावेंसें मना ।
येत नाहीं नारायणा ॥ २ ॥ सुखाडिकपणें । येथें सांपडलें केणें २
तुका ह्मणे भाग । गेला निवारला लाग ॥ ३ ॥

॥ १७८४ ॥

झालों बळिवंत । होऊनिया शरणागत ॥१॥ केला घरांत रिघावा ।
ठायीं पाडियेला ठेवा ॥ २ ॥ हातां चढे धन । ऐसें रचिलें
कारण ॥ ३ ॥ तुका ह्मणे मिठी । पायीं देउनि केली सुटी ॥ ४ ॥

॥ १७८५ ॥

झालों निर्भर मानसीं । ह्मणऊनि कळलासी ॥ १ ॥ तुझे ह्मणविती
त्यांस । भय चिंता नाहीं आस २ चुकविती पाश । गर्भवास यातना ३
तुझें जाणोनिया वर्म । कंठीं धारियेलें नाम ॥ ४ ॥ तुका ह्मणे तेणें
सुखें । विसरलों जन्मदुःखें ॥ ५ ॥

॥ १७८६ ॥

जीवन उपाय । वैद्यराणी तुझे पाय ॥१॥ ते मी नाठवीं घडि घडी ।
ह्मणोनिया चरफडीं ॥ २ ॥ तुटे भवरोग । जेथें सर्व सुखें भोग ३॥
तुका ह्मणे चिटे । धरियेले जे गोमटें ॥ ४ ॥

॥ १७८७ ॥

जेथें देखें तेथें तुझींच पाउलें । विश्व अवघें कोंदाटलें ॥ रूप गुण
नाम अवघा मेघश्याम । वेगळें तें काय उरलें ॥ जातां लोटांगणीं
अवघीच मेदिनी । सकळ देव पाट झालें ॥ सदा सर्वकाळ सुदिन
सुवेळ । चित्त प्रेमें असे धालें ॥ १ ॥ अवघा आम्हां तूंच झालासी
देवा । संसार हेवा कामधंदा ॥ नलगे जाणें कोठें कांहींच करणें ।
मुखीं नाम ध्यान सदा ॥ २ ॥ वाचा बोले ते तुझेचि गुणवाद ।
मंत्रजप कथा स्तुति ॥ भोजन सारूं ठायीं फळ तांबोल कांहीं ।
पूजा नैवेद्य तुज होती ॥ चालतां प्रदक्षिणा निद्रा लोटांगण । दंड-
वत तुजप्रति ॥ देखों न दृष्टी पररूपें गोष्टी । अवघ्या तुझ्या मूर्ति ॥३॥
झाल्या तीर्थरूप बावी नदी कूप । अवघें गंगाजळ झालें ॥ महाल
मंदिरें माड्या तनघरें । झोपड्या अवघे देव देवाइलें ॥ ऐकें कानीं

त्या हरिनामध्वनी । नाना शब्द होत जाले ॥ तुका ह्मणे आह्मी या विठोबाचे दास । सदा प्रेम सुखें धाले ॥ ४ ॥

॥ १७८८ ॥

जो मानी तो देईल काई । न मनी तो नेईल काई ॥१॥ आह्मां विठ्ठल सर्वभूतीं । राहो चित्तीं भलतैसा २ आधीन तें जना काई । जल्पे वायाविण ठायीं ३ वंदी निंदी तुज तो गा । तुका ह्मणे पांडुरंगा ४॥

॥ १७८९ ॥

तरिच हा जीव संसारी उदास । धरिला विश्वास तुह्मां सोई ॥१॥ एके जातीविण नाहीं कळवळा । ओढली गोपाळा सूत्रदोरी ॥ २ ॥ फुटतसे प्राण क्षणांच्या विसरें । हें तो परस्परें सारिखेंचि ॥ ३ ॥ तुका ह्मणे चित्तीं राखिला अनुभव । तेणें हा संदेह निवारला ॥४॥

॥ १७९० ॥

तरी हांव केली अमुपा व्यापारें । व्हावें एकसरें धनवंत ॥ १ ॥ झालों हरिदास शूरत्वाचे नेमें । झालीं ठावीं वर्मे पुढिलांचीं ॥ २ ॥ जनावेगळें हें असे अभिन्नव । बळी दिला जीव ह्मणऊनि ॥ ३ ॥ तुका ह्मणे तरी लागलों विल्हेसी । चालतिया दिसीं स्वामी ऋणी४

॥ १७९१ ॥

तुजविण कोणा । शरण जाऊं नारायणा ॥ १ ॥ ऐसा न देखें मी कोणी । दुजा तिहीं त्रिभुवनीं ॥२॥ पाहिलीं पुराणें । धांडोळिलीं दरुषणें ॥ ३ ॥ एका ह्मणे ठायीं । जडुन ठेलों तुझ्या पायीं ॥ ४ ॥

॥ १७९२ ॥

तुजविण कांहीं । स्थिर राहे ऐसें नाहीं ॥ १ ॥ कळों आलें बहुता रीती । पांडुरंगा माझ्या चित्तीं ॥ २ ॥ मोकलिली आस सर्वभावें झालों दास ॥ ३ ॥ तुका ह्मणे तूंचि खरा । येर वाउगा पसारा ४॥

॥ १७९३ ॥

तुजविण चाड आणिकांची कांहीं । धरीन हें नाहीं तुज ठावें ॥१॥ तरणउपाय योगक्षेम माझा । ठेवियेला तुझ्या पायीं देवा ॥ २ ॥ कोण मज आळी काय हे तांतडी । सोनियाची घडी जाय दिस ३ तुझिया नामाचें ल्यालोसें भूषण । कृपा संतजन करितील ॥ ३ ॥ तुका ह्मणे झाला आनंदाचा वास । हृदया या नास नव्हे कधीं ५॥

॥ १७९४ ॥

तुज दिला देह । आजुनि वागवितों भय । ऐसा विश्वासघातकी । घडली कळतां हे चुकी ॥ २ ॥ बोलतों जें तोंडें । नाहीं अनुभविलें लंडें ॥ ३ ॥ दंड लाहे केला । तुका ह्मणे जी विठ्ठला ॥ ४ ॥

॥ १७९५ ॥

तुज पाहावें हे धरितों वासना । परि आचरणा नाहीं ठाव ॥ १ ॥

करिसी कैवार आपुलिया सत्ता । तरिच देखतां होईन पाय ॥ २ ॥
बाहिरल्या वेषें उत्तम दंडिलें । भीतरी मुंडलें नाहीं तैसें ॥ ३ ॥
तुका ह्मणे वाया गेलोंच मी आहें । जरि तुह्मी साहे न व्हा देवा ॥४॥

॥ १७९६ ॥

तुमच्या पाळणा ओढतसें मन । गेलों विसरोन आपणासी ॥ १ ॥
लागेल पालटें फेडावें उसणें । येणेंचि प्रमाणें पांडुरंगा ॥ २ ॥
तुमचे आवडी संबंधाचा त्याग । घेतला ये लाग जगनिंदेचा ॥३॥
तुका ह्मणे जैसा माझा जीव ओढे । तैसेंचि तिकडे पाहिजेल ॥४॥

॥ १७९७ ॥

तुझें वर्म ठावें । माझ्या पाडियेलें भावें ॥ १ ॥ रूप कासवाचे परी । धरुनि राहिलों अंतरीं ॥ २ ॥ नेदी होऊं तुटी । मेळवीन दृष्टा-दृष्टी ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । चिंतन ते तुझी सेवा ॥ ४ ॥

॥ १७९८ ॥

तुझें वर्म हातीं । दिलें सांगोनिया संतीं ॥१॥ मुखीं नाम धरीन कंठीं । अवघा सांटवीन पोटीं ॥२॥ नवविधा वेढिन आधीं । सांपडलासी भावासंधी ॥३॥ तुका ह्मणे बळिये गाढे । कळिकाळ पायां पडे ॥४॥

॥ १७९९ ॥

तुझें वर्म आह्मां कळों आलें सुखें । संतांचिया मुखें पांडुरंगा ॥१॥
अवघाचि नट वाउगा पसारा । चेईला तो खरा तूंचि एक ॥ २ ॥
ह्मणउनि देहबुद्धि नासिवंता । नातळे या चित्ता नेदावया ॥ ३ ॥
सोय हे लागली पुढिलांची वाट । पावले जे नीट तुजपाशीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे नाहीं कोणासवें काज । बोलायाचें मज अंतरींचें ॥ ५ ॥

॥ १८०० ॥

तुझें नाम गाऊं आतां । तुझ्या रंगीं नाचों था था ॥१॥ तुझ्या नामाचा विश्वास । आह्मां कैंचा गर्भवास ॥२॥ तुझे नामीं विसर पडे । तरी कोटी हत्या घडे ॥३॥ नाम घ्या रे कोणी फुका । भावें सांगतसे तुका ४

॥ १८०१ ॥

तुह्मीं जावें निजमंदिरा । आह्मी जातों आपुल्या घरा ॥ १ ॥
विठोबा लोभ असों देईं । आह्मी असों तुमचे पाईं ॥ २ ॥
चित्त करी सेवा । आह्मी जातों आपुल्या गांवा ॥ ३ ॥
तुका ह्मणे दिशा भुललों । फिरोन पायांपाशीं आलों ॥ ४ ॥

॥ १८०२ ॥

तूं माझी माउली तूं माझी साउली । पाहातों वाटुली पांडुरंगे ॥१॥
तूं मज एकला वडील धाकुला । तूं मज आपुला सोइरा जीव ॥२॥
तुका ह्मणे जीव तुजपाशीं असे । तुझियानें ओस सर्व दिशा ॥३॥

नाहीं वेळ नाहीं पंडितांचा धाक । होत कां वाचक वेद[illegible]
पुराणींही कोठें न मिळे पाहातां । तैशीं या अनंता ठेवूं [illegible]
आ[illegible]लिया मना उपजे आनंद । तैसे करूं छंद कथाक[illegible]
तुका ह्मणे आह्मी आनंदेंचि धालों । आनंदचि ल्यालों अ[illegible]

॥ १८१९ ॥

न लगावी दिठी । माझी तुझे मुखवटी ॥ १ ॥ आधीं पाउले[illegible]
ते मी पाहेन तें भलें ॥ २ ॥ देईन हे काया । वरि सां[illegible]
डाया ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । बहु आवडसी जीवा [illegible]

॥ १८२० ॥

नव्हे कांहीं कवणाचा । भाव जाणवला साचा ॥ १ ॥ ह्मणो[illegible]
पायीं । जीव ठेविला निश्चयीं ॥ २ ॥ शरीर जायाचें कोंपट[illegible]
काय खटपट ॥ ३ ॥ तुका ह्मणे वायाविण । देवा कळों आला[illegible]

॥ १८२१ ॥

नव्हतें तें कळों आलें । तरी बोलें अबोला ॥ १ ॥ तुज मज[illegible]
तुटी । एके भेटीपासुनि ॥ २ ॥ आतां याची न धरीं चाड । क[illegible]
कवतुकें ॥ ३ ॥ तुका ह्मणे यावें जावें । एका भावें ख[illegible]

॥ १८२२ ॥

न व्हावें तें झालें देखियेले पाय । आतां फिरूं का[illegible] ॥ १ ॥ [illegible]
बहु दिस होतों करीत हे आस । तें आलें सा[illegible] [illegible] ॥ २ ॥
कोठवरि जिणें संसाराच्या आशा । उबगों हा [illegible]ुनिया ॥ ३ ॥
बुडालीं तयांचा मूळ ना मारग । [illegible] तो [illegible] [illegible]डुनिया ॥ ४ ॥
पुढें उल्लंघितां दुःखाचे डोंगर । [illegible] अंतपार गर्भवासा ॥ ५ ॥
तुका ह्मणे कास धरीन पीतांबरीं । तूं [illegible]सागरीं तारूं देवा ६ ॥

॥ १८२३ ॥

नसतांचि दाऊनि भेव । केला जीव हिंपुटीं ॥ १ ॥ झालों तेव्हां
कळलें जगा । वाउगा आकांत ॥ २ ॥ गंवसिलों मागें पुढें । लाग
लागे पावला ॥ ३ ॥ तुका ह्मणे केली आयणी । सलगीच्यांनीं सन्मुख ४

॥ १८२४ ॥

न होय निग्रह देहासी दंडण । न वजे भूकतान सहावली ॥ १ ॥
तरि नित्य नित्य करीं आळवण । माझा अभिमान असों द्यावा ॥ २ ॥
नाहीं विटाळिलें कायावाचामन । संकल्पासी भिन्न असेंचि या ॥ ३ ॥
तुका ह्मणे भवसागरीं उतार । करावया आधार इच्छीतसें ॥ ४ ॥

॥ १८२५ ॥

नाम घेतां मन निवे । जिव्हे अमृताचि स्रवे । होताती बरवे । ऐसे
शकुन लाभाचे ॥ १ ॥ मन रंगलें रंगलें । तुझ्या चरणीं स्थिरावलें ।
केलिया विठ्ठलें । ऐसी कृपा जाणावी ॥ २ ॥ झालें भोजनसें दिसें ।

[illegible] पडोनि ठेला इच्छे । घालियाच्या ऐसे अंगा येती उद्गार ३॥ [illegible] भेटी आलें सुखा । निध सांपडला मुखा । तुका ह्मणे लेखा । [illegible]तां नाहीं आनंदा ॥ ४ ॥

॥ १८२६ ॥

[illegible]धती परि न मोडे विकार । बहु हीं दुस्तर विषयद्वारें ॥ १ ॥
[illegible]तिति तुम्ही भरोनि अंतरीं । होतों तदाकारी निर्विषयची ॥२॥
[illegible]विया साक्षी असत[illegible]वळी । वचनें मोकळीं सरत नाहीं ॥३॥
[illegible] ह्मणे ताळा मेळवणी[illegible] विनंती पायांपाशीं हेचि करीं ॥४॥

॥ [illegible]२७ ॥

[illegible] संसाराची चाड । गाऊं हरिचें नाम गोड १ हो कां प्राणा-[illegible] घात । परि हा न सोडीं अनंत २ जन्मोजन्मीं हाचि धंदा । [illegible] राहो सदा ३ तुका म्हणे भाव । तो हा जाणा पंढरिराव ४॥

॥ १८२८ ॥

[illegible] वाटे भय । करावें तें काय न कळतां ॥ १ ॥
[illegible] समानचि झालें । कामक्रोध केले पावटणी ॥ २ ॥
[illegible] अनंता । नामाचिया सत्ताबळें तुझ्या ॥ ३ ॥
म[illegible] ऐसा । स्वामी करी शिरसा पाळावे ते४
[illegible] पाय । वचनाची पाहे वास एका ॥५॥

॥ १८२९ ॥

[illegible] नाहीं हा सुस्वर । घालूं तुज भार पांडुरंगा ॥ १ ॥
नेण[illegible] घात मात । तुझे पायीं चित्त ठेवीं देवा ॥ २ ॥
तुका [illegible] नाहीं जना । तुज नारायणा वांचूनिया ॥ ३ ॥

॥ १८३० ॥

नेणती वेद [illegible] । आह्मां भाविकां वाचोनि ॥ १ ॥ रूप आवडे आह्मासी । [illegible] तुज घालूं हृदयांत ॥ ३ ॥ तुका [illegible]

॥ १८३१ ॥

परि आतां माझी परिसावी विनंति [illegible] पांडुरंगा१॥
चुकलिया बाळा न मारावें जीवें । हित तें करावें मायबापीं ॥२॥
तुका ह्मणे तुझा ह्मणतात मज । आतां आहे लाज हेचि तुह्मा ॥३॥

॥ १८३२ ॥

पवित्र होईन चरित्रउच्चारें । रूपाच्या आधारें गोजिरिया ॥ १ ॥
आपुरती बुद्धि पुण्य नाहीं गांठीं । पायीं घालीं मिठी पाहें डोळां २
गाईन ओविया शिष्टांच्या आधारें । सारीन विचारें आयुष्या या ३
तुका ह्मणे तुझें नाम नारायणा । ठेवीन मी मना आपुलिया ॥ ४ ॥

॥ १८३३ ॥

पाठीलागा काळ येतसे या लागें । मी माझें वाउगें मेंढीऐसें ॥ १ ॥

आतां अगी लागो ऐसिया वेव्हारा । तूं माझा सोइरा पांडुरंगा
वागविला माथां नसताचि भार । नव्हे तें साचार जाणील तो
तुका ह्मणे केलें जवळील दुरी । मृगजळ वरी आड आलें ।

॥ १८३४ ॥

पाहें प्रसादाची [illegible] । झालें धुवोनिया ताट ॥ १ ॥ शेष घे
जाईन । तुमचें झालें [illegible] ॥ २ ॥ [illegible] । तुम्हां
नियां देवा ॥ ३ ॥ तुका [illegible] । [illegible] निवांत

॥ १८३५ ॥

प्रारब्धा हातीं जन । सुख शीण [illegible] ॥१॥ [illegible] धाया
संग । अंगें अंग [illegible] ॥२॥ [illegible] । त्यागें
बहु सुख ॥३॥ तुका ह्मणे जीव भ्याला । अवघ्या [illegible] बाहेरि

॥ १८३६ ॥

प्रेम जडलें तुझे पायीं । आणीक न सुचे मजला कांहीं
रात्रीदिवस तुझें ध्यान । तेंचि माझें अनुष्ठान ॥
नामापरतें नेणें दुजें । ऐसें कळलें मजला निज ॥
तुका म्हणे अंतकाळीं । आम्हां सोडवीं [illegible]काळीं ॥ ४ ॥

॥ १८३७ ॥

बरवें ऐसें आलें मना । नारायणा या काळें ॥१॥ देव आह्मा प्राण-
सखा । झालें दुःखा खंडण ॥ २ ॥ जन्मांतरिंच्या पुण्यरासी होत्या
त्यांसी फळ आलें ॥३॥ तुका म्हणे निज ठेवा होईल देवा लाधलों४

॥ १८३८ ॥

बरा देवा कुणबी केलों । नाहीं तरि दंभें असतों मेलों १ भलें केलें देव-
राया । नाचे तुका लागे पायां ॥ २ ॥ विद्या असती कांहीं । तरी पडतों
अपायीं ३ सेवा चुकतों संताची । नागवण हे फुकाची ४ गर्व होता ताठा,
जातों यमपंथें वाटा ५ तुका म्हणे थोरपणें । नरक होती अभिमानें ॥६॥

॥ १८३९ ॥

बराडियाची आवडी पुरे । जया झुरे साठीं तें १ तैसें झालें माझ्या
मना । तुटी चरणावरूनि ॥ २ ॥ भागलिया पेणें पावे । विसांवे ते
ठाकणीं ॥ ३ ॥ तुका म्हणे छाया भेटे । बरें वाटे तापे त्या ॥ ४ ॥

॥ १८४० ॥

बहु उतावीळ भक्तीचिया काजा । होसी केशीराजा मायबापा ॥१॥
तुझ्या पायीं मज जालासे विश्वास । ह्मणोनिया आस मोकलिली२॥
ऋषि मुनि सिद्ध साधक अपार । कळला विचार त्यांसी तुझा ॥३॥
नाहीं नास तें सुख दिलें तयांस । झालें जे उदास सर्वभावें ॥ ४ ॥
तुका ह्मणे सुख न माये मानसीं । धरिलें जीवेंसी पाय तुझे ॥ ५ ॥

॥ १८४१ ॥

बळिवंत कर्म । करी आपुला तो धर्म ॥१॥ पुढें घालूनिया सत्ता । न्यावें पतना पतिता ॥ २ ॥ आचरणें खोटीं । केली सलताती पोटीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । नाहीं भजन केली सेवा ॥ ४ ॥

॥ १८४२ ॥

बहु दूरवरी । वेठी ओझें होतें शिरीं ॥ १ ॥ आतां उतरला भार । तुम्हीं केला अंगीकार ॥ २ ॥ बहु काकुलती । आलों असे मार्गे किती ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । आजि सफळ झाली सेवा ॥ ४ ॥

॥ १८४३ ॥

बहुजन्में सोस केला । त्याचा झाला परिणाम ॥ १ ॥ विठ्ठलसें नाम कंठीं । आवडी पोटीं संचितें ॥ २ ॥ येथुन तेथवरी आतां । नलगे चिंता करावी ॥ ३॥ तु[illegible] मन । हेंचि दान शकुनाचें ॥४॥

॥ १८४४ ॥

बाळ माते निष्ठुर होये । परि ते स्नेह करीत आहे ॥ १ ॥ तैसा तूं गा पुरुषोत्तमा । घडी न विसंबसि आम्हां ॥ २ ॥ नेणती भो-गळी । कडे घेतां अंग घाली ॥ ३ ॥ भूक साहे ताहान । त्याचें राखे समाधान ॥ ४ ॥ त्याच्या दुःखें धाय । आपला जीव देऊं पाहे ॥ ५ ॥ नांवें घाली उडी । तुका ह्मणे प्राण काढी ॥ ६ ॥

॥ १८४५ ॥

बाप मेला न कळतां । नव्हती संसाराची चिंता ॥१॥ विठो तुझें माझें राज्य । नाहीं दुसऱ्याचें काज ॥ २ ॥ बाईल मेली मुक्त झाली । देवें माया सोडविली ॥ ३ ॥ पोरें मेलीं बरें झालें । देवें माया विरहित केलें ॥४॥ माता मेली मज देखतां । तुका ह्मणे हरली चिंता ॥ ५ ॥

॥ १८४६ ॥

बैसूं खेळूं जेवूं । तेथें नाम तुझें गाऊं ॥ १ ॥ रामकृष्णनाममाळा । घालूं ओवुनिया गळां ॥ २ ॥ विश्वास हा धरूं । नाम बळकट करूं ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां । आम्हां जीवन शरणागता ॥ ४ ॥

॥ १८४७ ॥

बोलोनिया काय दावूं । तुम्ही जीऊ जगाचे ॥१॥ हेंचि आतां माझी सेवा । चिंतन देवा करितों ॥२॥ विरक्तासी देह तुच्छ । नाहीं आस काशाची ॥३॥ तुका ह्मणे पायापाशीं । येइन ऐसी वासना ॥ ४ ॥

॥ १८४८ ॥

मज कोणी कांहीं करी । उमटे तुमचे अंतरीं ॥ १ ॥ त्याला वाढ-विलें म्हूण । मज सुख तुज सीण ॥ २ ॥ माझें पोट धालें । तुझें अंगीं उमटलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे खेळें । तेथें तुमचिया बळें ॥ ४ ॥

॥ १८४९ ॥

मज माझा उपदेश । आणिकां नये याचा रीस ॥ १ ॥ तुम्ही अवघें

पांडुरंग । मीच दुष्ट सकळ चांग ॥ २ ॥ तुमचा मी शरणागत । कांहीं करा माझें हित ३ तुका पाय धरी । मी हें माझें दूर करीं ४

॥ १८५० ॥

मतिविण काय वर्णूं तुझें ध्यान । जेथें पडिलें मौन वेदश्रुति ॥ १ ॥
करूनि गोजिरा आपुलिये मति । धरियेलें चित्तीं चरणकमळ ॥ २
सुखाचें ओतिलें पाहों तें श्रीमुख । तेणें हरे भूक तान माझी ॥ ३ ॥
रसना गोडावली ओव्या गातां गीत । पावलेंसे चित्त समाधान ४॥
तुका ह्मणे माझी दृष्टि चरणांवरी । पाउलें गोजिरीं कुंकुमाचीं ५ ॥

॥ १८५१ ॥

माझा घात पात अथवा हित फार । अवघा विचार तुझ्या हातीं ॥१॥
ठेवुनि जीव भाव तुझ्या ठायीं चित्त । राहिलों निवांत पांडुरंगा २॥
चित्ताचा चाळक बुद्धीचा जनिता । काय नाहीं सत्ता तुझे हातीं ३
तुका ह्मणे काय करिसी ते पाहीन । ठेविसी राहीन सुखें तेथें ४ ॥

॥ १८५२ ॥

माझिया जीवाशीं हेचि पैं विश्रांति । तुझे पाय चित्तीं पांडुरंगा १॥
भांडवल गांठी आलें सपुरतें । समाधान चित्तें मानियेलें ॥ २ ॥
उद्दंड उच्चारें घातला पसरु । रूपावरी भरु आवडीचा ॥ ३ ॥
तुका म्हणे मज भक्तीची आवडी । अभेदीं तांतडी नाहीं म्हूण ४ ॥

॥ १८५३ ॥

माझे तो स्वभाव मज अनावर । तुजही देतां भार कांहीं नव्हे ॥१॥
ऐसें कळों आलें मज नारायणा । जागृती स्वपना ताळ नाहीं ॥ २ ॥
संपादितों तो हा अवघा बाह्य रंग । तुझा नाहीं संग अभ्यंतरीं॥३॥
तुका ह्मणे सत्या नाहीं पाठी पोट । असतें निघोंट एकी जाती॥४॥

॥ १८५४ ॥

माझे तो फुकाचे कायेचेचि कष्ट । नव्हे क्रियानष्ट तुम्हां ऐसा ॥१॥
कांहींच न वंचीं आजीच्या प्रसंगीं । सकळाही अंगीं करीन पूजा२॥
द्यावें कांहीं तुम्हीं हे तो नाहीं आस । असों या उदास देहभावें३॥
तुका ह्मणे माझी मावळली खंती । समाधान चित्तीं सर्वकाळ ॥४॥

॥ १८५५ ॥

माझें मन पाहे कसून । चित्त न ढळे तुजपासून ॥१॥ कापुनि देईन शिर । पहा कृपण कीं उदार ॥ २ ॥ मजवरि घालीं पण । परि मी न सोडी चरण ॥ ३ ॥ तुका म्हणे अंतीं । तुजवांचूनि नाहीं गति४

॥ १८५६ ॥

माझें मागणें तें किती । दाता लक्ष्मीचा पति १ जाणे तान्हेल्याची तान । पीतां गंगा नव्हे न्यून २ कल्पतरू झाला देता । तेथें पोटाचा मागता ३ तुका म्हणे संतत ध्याता । परब्रह्मची आलें हातां ॥ ४ ॥

॥ १८५७ ॥

म्हणवितों दास ते नाहीं करणी । आंत वरी दोन्ही भिन्न भाव १॥
गातों नाचतों तें दाखवितों जना । प्रेम नारायणा नाहीं अंगीं ॥२॥
पाविजे तें वर्म न कळेचि कांहीं । बुडालों या डोहीं दंभाचिया ३॥
भांडवल काळें हातोहातीं नेलें । माप या लागलें आयुष्यासि ॥४॥
तुका म्हणे वाया गेलों ऐसें दिसें । होईल या हांसें लौकिकाचें ५॥

॥ १८५८ ॥

याजसाठीं वनांतरा । जातों सांडुनिया घरा ॥ १ ॥ माझें दिठावेल प्रेम । बुद्धि होईल निष्काम ॥ २ ॥ अद्वैताची वाणी । नाहीं ऐकत मी कानीं ॥३॥ तुका म्हणे अहंब्रह्म । आड येऊं नेदी भ्रम ॥ ४ ॥

॥ १८५९ ॥

यातिहीन मज काय तो अभिमान । मानी तुज जन नारायणा ॥१॥
काय सुख मज तयाची हे खंती । आपुलाला घेती गुणभाव ॥ २ ॥
द्रव्यामुळें माथां वाहियेली चिंधी । होन जनामधीं होता गांठीं ३॥
तुका म्हणे जन वंदितो वेगळा । मजसी दुर्बळा काय चाड ॥ ४ ॥

॥ १८६० ॥

राम कृष्ण ऐसीं उच्चारितां नामें । नाचेन मी प्रेमें संतांपुढें ॥ १ ॥
काय घडेल तें घडो ये सेवटीं । लाभ आणि तुटी देव जाणे ॥ २ ॥
चिंता-मोह आशा ठेवुनि निराळीं । देईन हा बळी जीव पायीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे कांहीं उरों नेदी उरी । सांडीन हे थोरी ओवाळोनी ॥४॥

॥ १८६१ ॥

रात्री दिवस आम्हां युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ॥ १ ॥
जीवाही अगोज पडती अघात । येऊनिया नित्य नित्य करी ॥ २ ॥
तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळें । अवघीयांचें काळें केलें तोंड ॥३॥

॥ १८६२ ॥

राहो येचि ठायीं । माझा भाव तुझे पायीं ॥ १ ॥ करीन नामाचें चिंतन । जाऊं नेदीं कोठें मन ॥ २॥ देईन ये रसीं । आतां बुडी सर्व-विशीं ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । साटी करोनिया जीवा ॥ ४ ॥

॥ १८६३ ॥

रोजकीर्दी जमा धरुनी सकळ । खतविला काळ बराबरी ॥ १ ॥
नाहीं होत झाड्यापाड्याचें लिगाड । हुजराती ते गोड सेवा रुजू२॥
चोरासाठीं रद्‌बद्‌ल आटाहास । जळो जिणें दास्य बहुतांचें ३॥
सावधान तुका निर्भर मानसीं । साळझाड्यापाशीं गुंपों नेणे ॥४॥

॥ १८६४ ॥

लाज वाटे मज मानिती हे लोक । हें तो नाहीं एक माझे अंगीं १॥
मोजुनि झिजलों मापाचिया परी । जाळावी ते थोरी लाभाविण २॥

कोमळ कंटक तीक्ष्ण अगरीं । पोचट ते वरी अंगकांति ॥ ३ ॥ चित्रींचें लेप शृंगारिलें निकें । जीवेंविण फिकें रूप त्याचें ॥ ४ ॥ तुका म्हणे दिसें वाया गेलों देवा । अनुभव ठावा नाहीं तेणें ॥५॥

॥ १८६५ ॥

लोक म्हणती मज देव । हा तो अधर्म उपाव ॥१॥ आतां कळेल तें करीं । सीस तुझे हातीं सुरी ॥२॥ अधिकार नाहीं । पूजा करिती तैसा कांहीं ॥३॥ मन जाणे पापा । तुका ह्मणे मायबापा ॥ ४ ॥

॥ १८६६ ॥

लोखंडाचे न पाहे दोष । शिवोन परीस सोनें करी ॥ १ ॥ जैसी तैसी तरी वाणी । मना आणी माउली ॥ २ ॥ लेकराचे स्नेहें गोड । करी कोड त्यागुणें ॥३॥ मागें पुढें रिघे लोटी । साहे खेटी करी तें ४ तुका विनवी पांडुरंगा । ऐसें सांगा आहे हें ॥ ५ ॥

॥ १८६७ ॥

वाचेच्या चापल्यें बहु जालों कुशल । नाहीं बीजमूळ हातां आलें १ म्हणोनि पंढरिराया दुःखी होतें मन । अंतरींचे कोण जाणे माझें २ पूज्य जालों अंगा आला अभिमान । पुढील कारण खोळंबलें ॥ ३ ॥ तुका म्हणे खूण न कळेचि निरुती । सांपडलों हातीं अहंकाराचे ४

॥ १८६८ ॥

वायाविण वाढविला हा लौकिक । आणिला लटिक वाद दोघां १॥ नाहीं ऐसा झाला देव माझ्या मतें । भुकेलें जेवितें काय जाणें॥२॥ शब्दज्ञानें गौरविली हे वैखरी । साच तें अंतरीं बिबेचि ना ॥ ३ ॥ झालों परदेशी गेले दोन्हीं ठाव । संसार ना पाय तुझे देवा ॥ ४ ॥ तुका ह्मणे मागें कळों येतें ऐसें । न घेतों हें पिसें लावूनिया ॥ ५ ॥

॥ १८६९ ॥

विठ्ठल सोयरा सज्जन विसांवा । जाईन त्याच्या गांवा भेटावया १ सीण भाग त्यासी सांगेन आपुला । तो माझा बापुला सर्व जाणे२ माय माउलिया बंधुवर्गा जापा । भाकीन करुणा सकळिकांसी ॥३॥ संत महंत सिद्ध महानुभाव मुनि । जीवभाव जाऊनि सांगेन त्या४ माझिये माहेरीं सुखा काय उणें । नलगे येणें जाणें तुका ह्मणे ॥५॥

॥ १८७० ॥

विभ्रंशिली बुद्धि देहांतीं जवळी । काळाची अवकाळीं वायचाळा १ पालटलें जैसें देठ सांडी पान । पिकलें आपण तयापरी ॥ २ ॥ न मारितां हीन बुद्धि दुःख पावी । माजलगाची गोवी तयापरी ३॥ तुका ह्मणे गळ लागलिया मत्स्या । तळमळेचा तैसा लवलाहो ४॥

॥ १८७१ ॥

व्यापक हा विश्वंभर । चराचर याचेनी ॥१॥ पंढरिराव विटेवरी ।

त्याचीं घरीं पाउलें ॥ २॥ अवघियांचा हाचि ठाव । देवोदेवीं सकळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे न करीं सोस । भेदें दोष उफराटे ॥ ४ ॥

॥ १८७२ ॥

शिणलेती सेवका देऊनि इच्छादान । केला अभिमानें अंगीकार १॥ अहो दीनानाथा आनंदमूर्ती । तुह्मांसी शोभतीं ब्रीदें ऐसीं ॥ २ ॥ बहुतांनीं निरविलें बहुतां प्रकारीं । सकळां ठायीं हरी पुरविती ३॥ तुका ह्मणे आगा कुटुंबवत्सला । कोण तुझी लीला जाणे ऐसी ४॥

॥ १८७३ ॥

शूद्रवंशीं जन्मलों । ह्मणोनि दंभें मोकलिलों ॥१॥ अरे तूंचि माझा आतां । मायबाप पंढरीनाथा ॥ २ ॥ घोकाया अक्षर । मज नाहीं अधिकार ॥ ३ ॥ सर्वभावें दीन । तुका ह्मणे यातिहीन ॥ ४ ॥

॥ १८७४ ॥

सकळ सत्ताधारी । व्हावें ऐसें काय हरी ॥ १ ॥ परी या कृपेच्या वोरसें । कुढावयाचेंचि पिसें ॥ २ ॥ अंगें सर्वोत्तम । अवघाचि पूर्णकाम ॥ ३ ॥ तुका ह्मणे दाता । तरि हा जीव दान देतां ॥ ४ ॥

॥ १८७५ ॥

संगतीनें होतो पंगतीचा लाभ । अशोभीं अनुभव अलिजेतें ॥ १ ॥ जैसी तैसी असों पुढिलांचे सोई । धरिती हातीं पायीं आचारियें२॥ उपकारी नाहीं देखत आपदा । पुढिलांची सदा दया चित्तीं ॥ ३॥ तुका ह्मणे तरी सज्जनाची कीर्ति । पुरवावी आर्ति निर्बळांची ॥४॥

॥ १८७६ ॥

संगें वाढे सीण न घडे भजन । त्रिविध हें जन बहु देवा ॥ १ ॥ याचिमुळें आला संगाचा कांटाळा । दिसताती डोळां नानाछंद२॥ एकविध भाव राहावया ठाव । नेदी हा संदेह राहों चित्तीं ॥ ३ ॥ शब्दज्ञानी हित नेणती आपुलें । आणीक देखिलें नावडे त्या ॥ ४ ॥ तुका ह्मणे आतां एकलेंचि भलें । बैसोनि उगलें राहावें तें ॥ ५ ॥

॥ १८७७ ॥

सत्ताबळें येतो मागतां विभाग । लाजावया लाग निमित्त करूं १॥ तुझीं ऐशीं मुखें करूं उच्चारण । बोले नारायण सांपडवूं ॥ २ ॥ आसेविण नाहीं उपजत मोहो । तरिच हा गोहो न पडे फंदीं ॥३॥ तुका ह्मणे आतां व्हावें याजऐसें । सरिसे सरिसें समागेम ॥ ४ ॥

॥ १८७८ ॥

सत्य तो आवडे । विकल्पानें भाव उडे ॥१॥ आम्ही तुमच्या कृपादानें । जाणों शुद्ध मंद सोनें ॥ २ ॥ आला भोग अंगा । न लावूं उशीर त्या त्यागा ॥३ ॥ तुका ह्मणे देवा । भजन ते तुझी सेवा ४॥

॥ १८७९ ॥

सर्वात्मकपण। माझें हिरोनि नेतो कोण ॥१॥ मनीं भक्ताची आवडी। हेवा व्हावी ऐशी जोडी ॥ २ ॥ घेईन जन्मांतरें। हेंचि करावया खरें ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा। ऋणी करूनि ठेवूं सेवा ॥ ४ ॥

॥ १८८० ॥

सांभाळिलों प्रीती गळां। भुके वेळा जाणोनिया ॥ १ ॥ तुमचें मी केशिराजा। सुनें या काजा पाळिलों ॥२॥ आलें गेलें कळे वाट। कोण निटा वाकुडिया ३ तुका ह्मणे आलें वारी। दुरितें दुरी नातळतां ४

॥ १८८१ ॥

· सांडोनिया दों अक्षरां। काय करूं हा पसारा। विधिनिषेधाचा भारा। तेणें दातारा नातुडसी ॥ १ ॥ ह्मणोनि बोबड्या उत्तरीं। वाचे जपें निरंतरीं। नाम तुझें हरी। भवसागरीं तारूं तें ॥ २ ॥ सर्वमय ऐसें वेदांचें वचन। श्रुति गर्जती पुराणें। नाहीं आणीक ध्यान। साधनें मज चाड ॥ ३ ॥ शेवटीं ब्रह्मार्पण। याचि मंत्राचें कारण। काना मात्रा वायाविण। तुका ह्मणे बिंदुलीं ॥ ४ ॥

॥ १८८२ ॥

स्त्रिया पुत्र कलत्र हे तंव मायावंत। शेवटींचा अंत नाहीं कोणी ॥१॥ यमाचिये हातीं बांधोनिया देती। भूषणेंही घेती काढूनिया ॥ २ ॥ ऐसिया चोरांचा कैसा हा विश्वास। धरिली तुझी कास तुका ह्मणे ३

॥ १८८३ ॥

सुख सुखा भेटे। मग तोडिल्या न तुटे ॥ १ ॥ रविरश्मिकळा। नये घालितां पैं डोळां ॥ २ ॥ दुरि तें जवळी। स्नेहें आकाश कवळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे चित्त। माझें पायीं आखंडित ॥ ४ ॥

॥ १८८४ ॥

सुनियांची आवडी देवा। घेत सेवा नाहीं कांहीं ॥ १ ॥ शिकविलें जवळी बैसों। जेथें असों तेथेंचि ॥२॥ नेदी दुजें बोलों करूं। गुरुगुरु ते साहे ॥३॥ तुका ह्मणे कुर्वाळितां। अंगें सत्ता संगाची ४॥

॥ १८८५ ॥

सुनियांचा हाचि भाव। आपला ठाव राखावा ॥ १ ॥ दुजियाचा येऊं वारा। नेदूं घरावरी येऊं ॥२॥ केली याची फाडाफाडी। तडामोडी क्षेत्राची ॥३॥ पातेजत नाहीं लोकां। तुका देवावांचूनि ॥४॥

॥ १८८६ ॥

सेवट तो भला। माझा बहु गोड झाला ॥१॥ आलों निजांच्या माहेरा। भेटों रखुमाईचा वरा ॥२॥ परिहार झाला। अवघ्या दुःखाचा मागिल्या ॥३॥ तुका ह्मणे वाणी। गेली आतां घेऊं धणी ॥४॥

॥ १८८७ ॥

स्मशानीं आह्मां न्याहालीचें सुख। या नांवें कौतुक तुमची कृपा १॥

नाहीं तरी वाया अवघेंचि निर्फळ । शब्द ते पोकळ बडबड ॥२॥ झाडें झुडें जीव सोइरे पाषाण । होती तई दान तुह्मीं केलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां पाहे अनुभव घेऊनि हातीं सीव पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ १८८८ ॥

स्मामीचें हें देणें । येथें पावलों दर्षनें ॥ १ ॥ करूं आवडीनें वाद । तुमच्या सुखाचा संवाद ॥ २ ॥ कळावया वर्म । हा तो पायांचाचि धर्म ॥ ३ ॥ तुका ह्मणे सिद्धी । हेचि पाववावी बुद्धी ॥४॥

॥ १८८९ ॥

हागतांही खोडी । चळण मोडवितें काढी ॥ १ ॥ ऐसें अनावर गुण । आवरावे काय म्हूण ॥ २ ॥ नाहीं जरी संग । तरी बडबडवितीं रंग ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । तुमचि न घडेचि सेवा ॥४॥

॥ १८९० ॥

हीन माझी याति । वरि स्तुती केली संती ॥ १ ॥ अंगीं वसू पाहे गर्व । माझे हरावया सर्व ॥ २ ॥ मी एक जाणता । ऐसें वाटतसे चित्ता ३ राख राख गेलों वाया । तुका ह्मणे पंढरीराया ४

॥ १८९१ ॥

होईन भिकारी । पंढरीचा वारकरी ॥१॥ हाचि माझा नेम धर्म । मुखीं विठोबाचे नाम ॥२॥ हेचि माझी उपासना । लागे संतांच्या चरणा ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । करीन ते भोळी सेवा ॥ ४ ॥

जनाशीं उद्गार.

॥ १८९२ ॥

अचळ न चळे ऐसें जालें मन । धरूनि निज खुण राहिलोंसें ॥ १ ॥
आवडी बैसली गुणांची अंतरीं । करूं धणीवरी सेवन तें ॥ २ ॥
एकविध भाव नव्हे अभावना । आणिकया गुणां न मिळवे ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझे पडिलें आहारीं । ध्यान विटेवरी ठाकलें तें ॥ ४ ॥

॥ १८९३ ॥

अनुभवाचे रस देऊं आर्तभूतां । सोडूं चोजवितां पुढें पोतीं ॥ १ ॥
देवाचा प्रसाद रत्नाच्या ओवणी । शोभतील गुणीं आपुलिया २॥
आधीं भाव सार शुद्ध ते भूमिका । बीज आणि पिका चिंता नाहीं३
तुका ह्मणे ज्याचें नाम गुणवंत । तें नाहीं लागत पसरावें ॥ ४ ॥

॥ १८९४ ॥

अनुभवा आलें । माझे चित्तीचें क्षरलें ॥ १ ॥ असे जवळी अंतरे । फिरे आवडीच्या फेरें ॥ २ ॥ खादलेंचि वाटे । खावें भेटलेंचि भेटे ॥ ३ ॥ तुका ह्मणे उभें । आम्ही राखियेलें लोभें ॥ ४ ॥

॥ १८९५ ॥

अभयाचें स्थळ । तें हें एक अचळ ॥ १ ॥ तरि धरिला विश्वास ।

ठेलों होउनिया दास ॥ २ ॥ पुरली आवडी । पायीं लागलीसे गोडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे कंठीं नाम । अंगीं भरलेंसें प्रेम ॥ ४ ॥

॥ १८९६ ॥

असो खळ ऐसे फार । अ.ह्मां त्यांचे उपकार ॥१॥ करिती पातकांचीं धुणीं । मोल न घेतां साबणीं ॥२॥ फुकाचे मजूर । ओझें वागविती मार ३ पार उतरुन ह्मणे तुका। आह्मा आपण जाती नरका ४

॥ १८९७ ॥

असोत लोकांचे बोल शिरावरीं । माझी मज बरी विठाबाई ॥ १ ॥
आपंगिलें मज आहे ते कृपाळु । बहुत कनवाळु अंतरींची ॥ २ ॥
वेदशास्त्रें जिसी वर्णिती पुराणें । तिचें मी पोसणें लडिवाळ ॥३॥
जिचें नाम कामधेनु कल्पतरू । तिचें मी लेंकरूं तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ १८९८ ॥

अवचिताचि हातीं ठेवा । दिला सेवा न करितां ॥१॥ भाग्य फळलें झाली भेटी । नेघे तुटी यावरी ॥ २॥ दैन्य गेलें हरली चिंता । सदैव आतां यावरी ॥३॥ तुका ह्मणे वांटा झाला । बोला बोलीं देवासीं ४ ॥

॥ १८९९ ॥

आपुल्यांचा करीन मोळा । माझ्या कुळाचारांचा ॥१॥ अवघियांचे वंदिन पाय । ठायाठाय न देखें ॥२॥ नेदीं तुटों समाधान । थोर जन सकळ ॥३॥ तुका ह्मणे झाडा होय । तो हे सोय न संडीं ॥४॥

॥ १९०० ॥

आतां आम्हां भय नाहीं बा कोणाचें । बळ विठोबाचें जालें असे १॥
धीर दिला आह्मां येणें पांडुरंगें । न पांगों या पांगें संसाराच्या ॥२॥
तुका ह्मणे माझा कैवारी हा देव । नाहीं भय भेव त्याच्या संगें ३॥

॥ १९०१ ॥

आतां काय खावें कोणीकडे जावें । गांवांत राहावें कोण्या बळें ॥१॥
कोपला पाटील गांवींचे हे लोक । आतां मज भीक कोण घाली ॥२॥
आतां येणें चवी सांडिली म्हणती । निवाडा करिती दिवाणांत ॥३॥
भल्या लोकांपासीं सांगितली मात । केला माझा घात दुर्बळाचा ४ ॥
तुका ह्मणे याचा संग नव्हे भला । शोधीत विठ्ठला जाऊं आतां ॥५॥

॥ १९०२ ॥

आतां कांहीं सोस न करीं आणीक । धरीन तें एक हेंचि दृढ ॥ १ ॥
जेणें भवसिंधु उतरिजे पार । तुटे हा दुस्तर गर्भवास ॥ २ ॥
जोडीन तें आतां देवाचे चरण । अविनाश धन परमार्थ ॥ ३ ॥
तुका ह्मणे बरा जोडला हा देह । मनुष्यपणें इहलोका आलों ॥४॥

॥ १९०३ ॥

आतां चुकलें बंधन । गेलें विसरोनि दान । आपुलें तें वाण । साव-

काश विकावें ॥ १ ॥ लाभ जोडला अनंत । घरीं सापडलें वित्त । हातोंहातीं थीत । उरों तळ नल्हाची ॥ २॥ होतें गोविलें विसारें । माप जालें एकसरें । होतें होरे वारें । तोंचि लाहो साधिला ॥ ३ ॥ करावया जतन । तुका ह्मणे निजधन । केला नारायण । साह्य नेदी विसंबों ॥ ४ ॥

॥ १९०४ ॥

आतां देह अवसान । हें जतन तोंवरी ॥१॥ गाऊं नाचूं गदारोळे । जिंकों बळें संसार ॥ २ ॥ याचि जीऊं अभिमानें । सेवाधन बळकट ॥ ३ ॥ तुका ह्मणे न सरें मागें । होईन लागें आगळा ॥ ४ ॥

॥ १९०५ ॥

आतां वाटों नेदी आपुलें हें मन । न सोडी चरण विठोबाचे ॥१॥ दुजियाचा संग लागों नेदी वारा । आपुल्या शरीरावरूनिया ॥ २ ॥ यावें जावें आम्हीं देवाचे सांगातें । मागूनी हेंचि करित आलों ॥३॥ काय वाया गेलों तो करूं उद्वेग । उभा पांडुरंग मागें पुढें ॥ ४ ॥ तुका ह्मणे प्रेम मागतों आगळें । येथें भोगूं फळें वैकुंठींचीं ॥ ५ ॥

॥ १९०६ ॥

आतां पुढें मना । चाली झाली नारायणा ॥ १ ॥ येथें राहिलें राहिलें । कैसें गुंतोनि उगलें ॥ २ ॥ भोवतें भोंवनी । आलिया झाली धणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे रंगे । रंगे रंगलों पांडुरंगें ॥ ४ ॥

॥ १९०७ ॥

आतां होइन धरणेकरी । भीतरीच कोंडीन ॥ १ ॥ नाहीं केली जीवें-साटीं । तों कां गोष्टी रुचे ते ॥ २ ॥ आधीं निर्धार तो सार । मग भार सोसीन ॥ ३ ॥ तुका ह्मणे खाऊं जेवूं । नेदूं होऊं वेगळा ॥ ४ ॥

॥ १९०८ ॥

आधी नाहीं कळों आला हा उपाय । नाहीं तरी काय चुकी होती १ घालितों पायांसी मिठी एकसरें । नेदीं तो दुसरें आड येऊं ॥ २ ॥ कायसा पडतों लटिक्याचे भरी । नव्हता का शिरीं भार घेतों ३॥ संसाराचा हाट फिरतो दुकान । भरोवरी धन मेळवितो ॥ ४ ॥ तुका ह्मणे कां हे घेतों गर्भवास । कां या होतों दास कुटुंबाचा ५

॥ १९०९ ॥

आनंदाचा कंद गाइयेला गीतीं । पाहियेला चित्तीं देवराव १ देवराव तोही आहे निश्चयेसीं । अखंड नामासी बोलावितो २ बोलवितो मज कृपा तो करूनि । तुका ह्मणे मनीं धरा भाव ॥ ३ ॥

॥ १९१० ॥

आनंदें एकांतीं प्रेमें वोसंडत । घेऊं अगणित प्रेमसुख ॥ १ ॥ गोप्य धन नये वारा लागों यास । पाहों [illegible]

झणी दृष्टि लागे आवडीच्या रसा । सेवूं जिरे तैसा आ रणासी ३॥
तुका ह्मणे हें बहु सकुमार । न साहावे भार वचनाचा ॥ ४ ॥

॥ १९११ ॥

आपुला तो देह आह्मां उपेक्षीत । कोठें जाऊं हित सांगों कोणा १॥
कोणा नाहीं दक्ष करितां संसार। आह्मीं हा विचार वमन केला २
नाहीं या धरीत जीवित्वाचि चाड। कोठें करूं कोड आणिकांचें ३॥
तुका ह्मणे असो चिंतोनिया देवा । मी माझें हा हेवा सारूनिया ॥४॥

॥ १९१२ ॥

आपुलाला लाहो करूं । केणें भरूं हा विठ्ठल ॥ १ ॥ भाग्य पावलों या ठाया । आतां काया कुरवंडी २ पुढती कोठें घडे ऐसें । बहुतां दिसें फावलें ॥३॥ तुका ह्मणे जाली जोडी । चरण घडी न विसंबें ४॥

॥ १९१३ ॥

आजि शिवला मांग । म झें विटाळलें आंग ॥१॥ यासी घेऊं प्रायश्चित्त । विठ्ठल विठ्ठल हृदयांत ॥ २॥ झाली क्रोधासी भेटी । तोंडावाटे नर्क लोटी ३ अनुतापीं न्हाऊं । तुका ह्मणे रवी पाहूं ॥ ४ ॥

॥ १९१४ ॥

आपुला विचार करीन जीवाशीं । काय या जनाशीं चाड मज ॥१॥
आपुलें स्वहित जाणती सकळ । निरोधितां बळ दुःख वाटे ॥ २ ॥
आइको नाइको कथा कोणी तरी । जाऊनिया घरीं निजो सुखें ३ ॥
माझी कोण वोज जाला हा शेवट । देखोनिया वाट आणिकां लावूं ४
तुका ह्मणे भाकूं आपुली करुणा। जयाची वासना तया फळे ॥ ५ ॥

॥ १९१५ ॥

आमुची जोडी ते देवाचे चरण । करावें चिंतन विठोबाचें ॥ १ ॥
लागेल तरी कोणी घ्यावें धणीवरी । आमुपचि परि आवडीच्या २
उभारिला कर प्रसिद्ध या जग । करूं केला त्याग मागें पुढें ॥ ३ ॥
तुका ह्मणे होय दरिद्र विच्छिन्न । ऐसें देऊं दान एकवेळा ॥ ४ ॥

॥ १९१६ ॥

आवडी भोजन प्रकार परवडी । भिन्न भिन्न गोडी एका रसा ॥१॥
भोगित्या पंगती लाधलों प्रसाद । तींही नाहीं भेद राखियेला ॥ २ ॥
पाकसिद्धि स्वहस्तकें विनियोग । आवडीचे भाग सिद्ध केले ॥३॥
तुका ह्मणे आला उच्छिष्ट प्रसाद । तेणें हा आनंद माझ्या जीवा ४

॥ १९१७ ॥

आम्हां अळंकार मुद्रांचे शृंगार । तुळसीचे हार वाहूं कंठीं ॥ १ ॥
लाडिके डिंगर पंढरिरायाचे । निरंतर वाचे नामघोष ॥ २ ॥
आम्हां आणिकांची चाड चित्तीं नाहीं। सर्व सुख पायीं विठोबाच्या३
तुका ह्मणे आम्हीं नेघोंचि या मुक्ती। एकाविण चित्तीं दुजें नाहीं ॥४॥

॥ १९१८ ॥

आह्मां आवडे नांव घेतां । तोही पिता संतोषे ॥१॥ उभयतां एकचित्त । तरी प्रीत वाढली ॥२॥ आह्मी शोभों निकटवासें । अनारिसें न दिसे ॥३॥ तुका ह्मणे पांडुरंगे । अवघीं अंगें निवालीं ॥४॥

॥ १९१९ ॥

आह्मां कथा आवश्यक । येर संपादूं लौकिक ॥१॥ जैसी तैसी माय बरी । मानिल्या त्या माना येरी ॥२॥ व्यालीचा कळवळा । जीव बहुत कोंवळा ॥३॥ कवतुकें वावरें । तुका ह्मणे या आधारें ॥ ४ ॥

॥ १९२० ॥

आह्मां भय धाक कोणाचा रे पाहें । काळ मशाक काय मानव हे ॥१॥ आह्मांसी ते काय चिंता या पोटाची । माउली आमुची पांडुरंगा॥२॥ काय करावी हे कोणाची मान्यता । करितां अनंता कोण वारी ॥३॥ नाहीं शीण आह्मां झालें कवतुक । पुनीत हे लोक करावया ॥ ४ ॥ तुका ह्मणे खातों आनंदाचे लाडू । नका चरफडूं घ्यारे तुम्ही ॥५॥

॥ १९२१ ॥

आह्मां वैष्णवांचा । नेम काया मनें वाचा ॥ १ ॥ धीर धरूं जिवासाठीं । येऊं नेदूं लाभा तुटी ॥ २ ॥ उचित समय । लाज निवारावें भय ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळा । जाणों नेम नाहीं बाळा ॥ ४ ॥

॥ १९२२ ॥

आह्मां हरिच्या दासां कांहीं । भय नाहीं त्रैलोकीं ॥ १ ॥ देव उभा मागें पुढें । उगवी कोडें संकट ॥२॥ जैसा केला तैसा होय । धांवे सोय धरोनि ॥३॥ तुका ह्मणे असों सुखें । गाऊं मुखें विठोबा ॥४॥

॥ १९२३ ॥

आह्मी आइते जेवणार । नलगे सोसावे डोंगर । सुखाचा वेव्हार । तेणेंचि वाढलें १ ठेवा जोडला मिरासी । ठाव झाला पायांपाशीं । नव्हे आणिकांसी । रीघ्र तेथें यावया ॥ २ बळी दिला जीवभाव । नेणें आणिकांचें नांव । धरिला एकभाव । तो विश्वास फळला ३॥ तुका ह्मणे झालों बळी । आह्मी निकट जवळी । बोलिलों तें पाळीं । वचन स्वामी आमचें ॥ ४ ॥

॥ १९२४ ॥

आम्ही जातों आपुल्या गांवा । आमचा रामराम घ्यावा ॥१॥ तुमची आमची हेचि भेटी । येथूनिया जन्मतुटी २ आतां असों द्यावी दया । तुमच्या लागतसें पायां ॥ ३ ॥ येतां निजधामीं कोणी । विठ्ठल विठ्ठल बोला वाणी ४ रामकृष्ण मुखीं बोला । तुका जातो वैकुंठाला ५॥

॥ १९२५ ॥

आह्मीं भाग्याचे भाग्याचे । आह्मां तांबे भोपळ्याचे ॥ १ ॥ लोकां

घरीं गाई ह्मैसी । आह्मां घरीं उंदिरघुसी २ लोकां घरीं तांबे थाळे । आह्मां घरीं परळ काळे ॥३॥ लोकां घरीं हत्ती घोडे । आह्मां आधो- डीचे जोडे ४ तुका ह्मणे आह्मी सुडके । आह्मां देखोनि काळ धाके ५

॥ १८२६ ॥

आह्मी वीर झुंझार । करूं जमदाढे मार । थापटिलें भार । मोड जाला दोषांचा ॥ १ ॥ जाला हाहाकार । हांकीत झुंझार । शंख- चक्राचे शृंगार । कंठीं हार तुळसीचे ॥ २ ॥ रामनामांकित बाण । गोपी लाविला चंदन । झळकती निशाण । गरुडटके पताका ॥३॥ तुका ह्मणे काळ । झालों जिंकोनि निश्चळ । पावला सकळ । भोग आम्हां आमचा ॥ ४ ॥

॥ १९२७ ॥

आह्मी सदैव सुडके । जवळीं येतां चोर धाके । जाऊं पुडी भिकें कुतरीं घर राखती ॥१॥ नांदणूका ऐसी सांगा । नाहीं तरी वाया भागा । थोरपण अंगा । तरी ऐसें आणावें ॥ २ ॥ अक्षय साचार । केलें सायासांनीं घर । परंडसिहार । दुजा भार न साहती ॥३॥ धन कण घरोघरीं । पोट भरे भिकेवरी । जतन तीं करी । कोण गुरें वासरें ॥ ४ ॥ जाली सकळ निश्चिंती । भांडवल शेण माती । झळझळीत भिंती । वृंदावनें तुळसीचीं ॥५॥ तुका ह्मणे देवा । अवघा निरसविला हेवा । कुटुंबाची सेवा । तोचि करी आमुच्या ॥ ६ ॥

॥ १९२८ ॥

आम्ही हरिचे संगडे । जुने ठायींचे वेडे बागडे । हातीं धरुनी कडे । पाटीसवें वागविलों ॥१॥ म्हणोनि भिन्न भेद नाहीं । देवा आम्हां एक- देहीं । नाहीं झालों कहीं । एका एक वेगळे ॥२॥ निद्रा करितां होतों पायीं । सवेंचि लंका घेतली तई । वानरें गोवळ गाई । सवें चारित फिरतसों ॥ ३ ॥ आम्हां नामाचें चिंतन । राम कृष्ण नारायण । तुका ह्मणे क्षण । खातां जेवितां न विसंबों ॥ ४ ॥

॥ १९२९ ॥

आम्ही हरिचे हरिचे । शूर कळिकाळा यमाचे ॥ १ ॥ नामघोष बाण साचे । भाले तुळसी मंजीरीचे ॥२॥ आम्ही हरिचे हरिचे दास । कलिकाळावरी घालूं कास ॥ ३ ॥ आम्ही हरिचे हरिचे दूत । पुढें प- ळती यमदूत ॥४॥ तुका ह्मणे आम्हांवरी । सुदर्शन घरटी करी ॥५॥

॥ १९३० ॥

इहलोकीं आह्मां भूषण अवकळा । भोपळा वाकळा अन्नभिक्षा १ ॥ निमाली संपदा भयाविरहित । सर्वकाळ चित्त समाधान ॥ २ ॥

छिद्राचा आश्रम उंदीरकुळवाडी । धन नाम जोडी देवाची तें ॥३॥ तुका ह्मणे एक शेवटीं राहाणें । वर्ततो या जना विरहित ॥ ४ ॥

॥ १९३१ ॥

इहलोकींचा हा देहे । देव इच्छिताती पाहे ॥१॥ धन्य आह्मी जन्मा आलों । दास विठोबाचे झालों ॥२॥ आयुष्याच्या या साधनें । सच्चिदानंद पदवी घेणें ३ तुका म्हणे पाठवणी । करूं स्वर्गीची निशाणी ४

॥ १९३२ ॥

उखतें आयुष्य जायाचें कालिवर । अवघें वोडंबर विषयाचें ॥ १ ॥ कोणासी हा लागे पुसणें विचार । मनेंचि सादर करूं आतां ॥२ ॥ उत्पत्ति प्रळय पडिलें दळण । पाकाचें भोजन बीज वाढे ॥ ३ ॥ तुका म्हणे जाऊं अभयांच्या ठायां । रिघों देवराया शरण वेगीं ४॥

॥ १९३३ ॥

उभे चंद्रभागे तारीं । कट धरोनिया करीं । पाउलें गोजिरीं । विटेवरी शोभलीं ॥ १ ॥ त्याचा छंद माझ्या जीवा । काया वाचा मनें हेवा । सांचतांचा ठेवा । जोडी हातीं लागली ॥ २ ॥ रूप डोळियां आवडे । कीर्ति श्रवणीं पवाडे । मस्तक नावडे । उठों पायांवरोनि ॥ ३ ॥ तुका म्हणे नाम । ज्याचें नासी क्रोध काम । हरि भवश्रम । उच्चारितां वाचेसी ॥ ४ ॥

॥ १९३४ ॥

उपजोनिया मरे । परि हेंचि वाटे बरें ॥१॥ नाहीं आवडीसी पार । न ह्मणवे झालें फार ॥ २ ॥ अमृताची खाणी । उघडली नव्हे धणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे पचे । विठ्ठल हें मुखा रुचे ॥ ४ ॥

॥ १९३५ ॥

उलंघिली लाज । तेणें साधियेलें काज ॥ १ ॥ सुखें नाचे पैलतीरीं । गेलों भवाचे सागरीं ॥ २ ॥ नामाची सांगडी । सुखें बांधली आवडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे लोकां । उरली वाचा मारीं हाका ॥ ४ ॥

॥ १९३६ ॥

एक भाव चित्तीं । तरी न लगे कांहीं युक्ती ॥ १ ॥ कळों आलें जीवें । मज माझियाची भावें ॥ २ ॥ आठवचि पुरे । सुख अवघें मोहोरें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मन । पुजा इच्छी नारायण ॥ ४ ॥

॥ १९३७ ॥

एका ऐसें एक होतें कोणाकाळें । समर्थाच्या बळें काय नव्हे ॥१॥ घालूनि बैसलों मिरासीस पाया । जिंकों देवराया संदेह नाहीं ॥२॥ केला तो न संडीं आतां कइवाड । वारीन हे आड कामक्रोध ॥३॥ तुका ह्मणे जालों आळसाची धाडी । नव्हती आली जोडी कळों सांच ४

॥ १९३८ ॥

एकांतीं लोकांतीं करूं गदारोळ । लेश तोही मळ नाहीं येथें ॥ १ ॥
घ्यावें द्यावें आम्हीं आपुलिया सत्ता । न देखों पुसता दुजा कोणी २॥
भांडाराची किली माझे हातीं आहे । पाहिजे तो पाहे वान येथें ॥३॥
तुका ह्मणे आम्हां विश्वासाच्या बळें । ठेविलें मोकळें देवें येथें ॥४॥

॥ १९३९ ॥

एकविध वृत्ति न राहे अंतरीं । स्मरणींच हरी विस्मृति हे ॥ १ ॥
कैसा हा नवलाव वाटतो अनुभवें । मज माझ्या जीवें साक्षित्वेसी २
न राहे निश्चळ जागवितां मन । किती क्षणेंक्षण सावरावें ॥ ३ ॥
तुका ह्मणे बहु केलें वेवसावें । तेणें रंगें जीव रंगलासे ॥ ४ ॥

॥ १९४० ॥

ऐसा दुस्तर भवसागर । नेणों कैसा उतरूं पार ॥ १ ॥ कामक्रोधादि सावजें थोर । दिसताती भयंकर २ मायाममतेचे भोंवर । घेती भयानक फेरे ॥३॥ वासनेच्या लहरी येती । उद्योग हेलकावे वसती ४ तरावया एक युक्ति असे । तुका नामनावेमध्यीं बैसे ॥५॥

॥ १९४१ ॥

ऐसीं वर्मे आम्हां असोनियां हातीं । कां होऊं नेणतीं दिशाभुली १॥
पोटाळुनी पाय कवळीन उभा । कृपे पद्मनाभा हालों नेदीं ॥ २ ॥
आपुलें इच्छेसी घालीन संपुष्टीं । श्रीमुख तें दृष्टी न्याहाळीन ॥३॥
तुका म्हणे बहु सांडियेलीं मतें । आपुल्या पुरतें धरुनी ठेलों ४ ॥

॥ १९४२ ॥

ऐसीं ठावीं वर्मे । तरी सांडवलों भ्रमें ॥१॥ सुखें नाचतों कीर्तनीं । नाहीं आशंकित मनीं २ ऐसें आलें हाता । बळ तरी गेली चिंता ३ सुख येथें झालें तरी । नाहीं आणिकांची उरी ॥४॥ ऐसें केलें देवें । पुढें कांहींचि न व्हावें ५ तुका ह्मणे मन । आतां झालें समाधान ६

॥ १९४३ ॥

कई मात माझे ऐकती कान । बोलतां वचन संता मुखीं ॥ १ ॥
केला पांडुरंगें तुझा अंगिकार । मग होइल धीर माझ्या जीवा २ ॥
ह्मणऊनि मुख अवलोकितों पाय । हेचि मज आहे थोरी आशा ३
माझिया मनाचा हाचि पै विश्वास । न करीं सायास साधनांचे ४
तुका ह्मणे मज होईल भरंवसा । तरलों मी ऐसा साच भावें ॥५॥

॥ १९४४ ॥

करितों कवित्व म्हणाल हें कोणी । नव्हे माझी वाणी पदरींची ॥१॥
माझीये युक्तीचा नव्हे हा प्रकार । मज विश्वंभर बोलवितो ॥२॥
काय मी पामर जाणे अर्थभेद । वदवी गोविंद तेंचि वदें ॥ ३ ॥

निमित्त मापासी बैसविलों आहें । मी तो कांहीं नव्हे स्वामिसत्ता ॥४॥
तुका ह्मणे आहें पाइकचि खरा । वागविलों मुद्रा नामाची हे ॥ ५ ॥

॥ १९४५ ॥

करूं तैसें पाठांतर । करुणाकर भाषण ॥१॥ जोंही केला मूर्तिमंत । ऐसा संतप्रसाद ॥ २ ॥ सोज्ज्वळ केल्या वाटा । आइत्या नीटा मागील ॥३ ॥ तुका म्हणे घेऊं धांवा । करूं हांवा नै जोडी ॥ ४ ॥

॥ १९४६ ॥

करूं याची कथा नामाचा गजर । आह्मा संसार काय करी ॥ १ ॥
ह्मणवूं हरिचे दास लेऊं तीं भूषणें । कांपे तयाभेणें कळिकाळ ॥२॥
आशा भय लाज आड नये चिंता । ऐसी तया सत्ता समर्थाची ३॥
तुका ह्मणे करूं ऐसीयांचा संग । जेणें नव्हे भंग चिंतनाचा ॥ ४ ॥

॥ १९४७ ॥

कल्याण या आशीर्वादें । जाती द्वंद्वें नासोनि ॥ १ ॥ आश्वासिलें नारायणें । प्रेमदानें अंतरींच्या ॥२॥ गेली निवारोनि आतां । सकळ चिंता यावरी ॥३॥ तुका म्हणे गातां गीत । आलें हित सामोरें ४॥

॥ १९४८ ॥

काग बग रिठा मारिले बाळपणीं । अघासुर प्राणी बुडविली १॥
तो मज दावा तो मज दावा । नंदानंदन जीवा आवडे तो ॥ २ ॥
गोवर्धन गिरी उचलिला करीं । गोकुळ भीतरी राखियेलें ॥ ३ ॥
वधुनि भौमासुरा आणिल्या गोपांगना । राज्य उग्रसेना मथुरेचें ४॥
पांडव जोहरीं राखिले कुसरी । विवराभीतरीं चालविले ॥ ५ ॥
तुका ह्मणे हा तो भक्तांचा कृपाळ। दुष्ट जना काळ नारायणा ॥६॥

॥ १९४९ ॥

काय उणें मज पांडुरंगा पायीं । रिद्धिसिद्धि ठायीं ओळगती ॥१॥
कोण पाहे सुखा नासिवंताकडे । तृष्णेचें बापुडें नव्हों आम्ही २ ॥
स्वर्गसुखें आम्हीं केली पावटणी । पापपुण्यें दोन्ही उलंडिलीं ॥३॥
तुका म्हणे घरीं आणिलें वैकुंठ । वसविली पेठ वैष्णवांची ॥ ४ ॥

॥ १९५० ॥

काय कृपेविण घालावें सांकडें । निश्चिती निवाडे कोण्या एका १॥
आह्मी तैसीं पुढें असों दीनपणें । वेंचुनि वचनें करुणेचीं ॥ २ ॥
धरुनि भय आतां काय वाहों चिंता । काय करूं आतां आमपणा ३
तुका म्हणे आम्ही भावहीन जीव । म्हणउनी देव दुरे दुरी ॥ ४ ॥

॥ १९५१ ॥

काय शरीरापें काम । कृपा साधावया प्रेम । उचिताचे धर्म । मागा आले ते करूं ॥१॥ देईन हाक नारायणा । तें तो नाकळे बंधना । पंढरीचा राणा । आइकोन धांवेल ॥ २ ॥ सातांपांचांचें गोडें ।

प्रारब्धें आकारलें । आतां हें संचलें । असो भोग सांभाळीं ॥ ३ ॥ फावली ते बरवी संधि । समाधान करूं बुद्धी । तुका म्हणे मधीं । कोठें नेघे विसावा ॥ ४ ॥

॥ १९५२ ॥

काळाचे ही काळ । आम्ही विठोबाचे लडिवाळ ॥ १ ॥ करूं सत्ता सर्वां ठायीं । वसों निकटवासें पायीं ॥२॥ ऐसी कोणाची वैखरी । वदे आमुचे समोरी ३ तुका म्हणे बाण । हातीं हरिनाम तीक्ष्ण ४

॥ १९५३ ॥

कासया गुणदोष पाहों आणिकांचे । मज काय त्यांचे उणें असे १॥ काय पापपुण्यें पाहों आणिकांचें । मज काय त्यांचे उणें असे ॥२॥ नष्टदुष्टपण कवणाचें वाणूं । तयाहून अणु अधिक माझें ॥ ३ ॥ कुचर खोटा मज कोण असे आगळा । तो मी पाहों डोळा आपुलिये४ तुका म्हणे मी भांडवलें पुरता । तुजसी पंढरीनाथा लावियेलें ५॥

॥ ९५४ ॥

किती एका दिवशीं । बुद्धी जाली होती ऐसी ॥ १ ॥ कांहीं करावें स्वहित । तों हें न घडे उचित २ अवलंबुनी भीक । लाज सांडिली लौकिक ॥ ३ ॥ तुका म्हणे दीन । जालों मनुष्यपणा हीन ॥ ४ ॥

॥ १९५५ ॥

कितीवेळां जन्मा यावें । नित्य व्हावें फजीत ॥१॥ म्हणऊनि जीव भ्याला । शरण गेला विठोबासी ॥२॥ प्रारब्ध पाठी गाढें । न सरे पुढें चालता ॥३॥ तुका म्हणे रोकडी हे । होती पाहें फजीती ॥४॥

॥ १९५६ ॥

कुरवंडी करीन काया । वरोनि पायां गोजिरिया ॥ १ ॥ बैसलें तें रूप डोळा । मन चाळा लागलें ॥ २॥ पुरतें न सरवे दुरी । आवडी पुरी बैसली ३ तुका म्हणे विसावलों । येथें धालों धणीवरि ॥४॥

॥ १९५७ ॥

केलें शकुनें प्रयाण । आतां मागें फिरे कोण ॥ १ ॥ होय तैसें होय आतां । देह बळी काय चिंता ॥ २ ॥ पडिलें पालवीं । त्याचा धाक वाहे जीवीं ॥ ३ ॥ तुका म्हणे जीणें । देव काय हीनपणें ४ ॥

॥ १९५८ ॥

कोण सांगायास । गेलें होतें देशोदेश ॥ १ ॥ नेलें वाऱ्या हातीं माप । समर्थ तो माझा बाप ॥२॥ कोणाची हे सत्ता । झाली वाचा वदविता ॥ ३ ॥ तुका म्हणे या निश्चयें माझें निरसलें भय ॥ ४ ॥

॥ १९५९ ॥

कोणापाशीं आतां सांगों मी बोभाट । कधीं खटपट सरेल हे ॥१॥ कोणा आराणूक होईल कोणे काळीं । आपुलालीं जाळीं उगवूनि२

माझा येणें दुःखें फुटतसे प्राण । न कळतां अन सुखी असे ॥ ३ ॥
भोगा आधीं मनें मानिलासे त्रास । पाहे लपायास ठाव कोठें ॥४॥
तुका ह्मणे देतों देवाचें गाऱ्हाणें । माझें ऋण येणें सोसियेलें ॥५॥

॥ १९६० ॥

कोणी निंदा कोणी वंदा । आह्मां स्वहिताचा धंदा १ काय तुह्मांसी गरज । आम्ही भजूं पंढरिराज २ तुम्हांसारिखें चालावें तेव्हां स्वहिता मुकावें ॥३॥ तुका ह्मणे हो कां कांहीं । गळ दिला विठ्ठलपायीं ॥४॥

॥ १९६१ ॥

कोणे गांवीं आहे सांगा हा विठ्ठल । जरी ठावा असेल तुह्मां कोणा१
लागतसें पाया येतों लोटांगणीं । मात तरी कोणी सांगा याची २॥
गुण रूप याचे वाणिती या संता । मज क्षेम देतां सुख वाटे ॥ ३ ॥
सर्वस्वें हा जीव ठेवीन चरणीं । पांडुरंग कोणी दावी तया ॥ ४ ॥
तुका ह्मणे गाईवत्सा तडातोडी । तैसी जाते घडी एकी मज ॥५॥

॥ १९६२ ॥

कृष्ण माझी माता कृष्ण माझा पिता । बहिणी बंधु चुलता कृष्ण माझा
कृष्ण माझा गुरु कृष्ण माझें तारूं । उतरी पैलपारु भवनदीची ॥२॥
कृष्ण माझें मन कृष्ण माझें जन । सोईरा सज्जन कृष्ण माझा ॥३॥
तुका ह्मणे माझा श्रीकृष्ण विसावा । वाटे न करावा परता जीवा ४॥

॥ १९६३ ॥

कृपेचे सागर हेचि साधुजन । तींही कृपादान केलें मज ॥ १ ॥
बोबडे वाणीचा केला अंगीकार । तेणें माझा स्थिर केला जीव २॥
तेणें सुखें मन स्थिर झालें ठायीं । संतीं दिला पायीं ठाव मज ॥३॥
नाभी नाभी ऐसें बोलिले वचन । तें माझें कल्याण सर्वस्वहि ॥४॥
तुका ह्मणे झालों आनंदनिर्भर । नाम निरंतर घोष करूं ॥ ५ ॥

॥ १९६४ ॥

खरें नानवटे निक्षेपीचें जुनें । काढिलें ठेवणें समर्थाचें ॥ १ ॥
मजुराच्या हातें मापाचा उकल । मी तो येथें फोल सत्ता त्याची ॥२॥
कुलालाच्या हातें घटाच्या उत्पत्ति । पाठवी त्या जाती पाकस्थळा ३॥
तुका ह्मणे जीवन तें नारायणीं । प्रभा जाते कीर्णी प्रकाशाची ४॥

॥ १९६५ ॥

खेळतों ते खेळ पायांच्या प्रसादें । नव्हतीं हीं छंदें नासिवंतें ॥ १ ॥
माझा मायबाप उभा विटेवरी । कवतुकें करी कृपादान ॥ २ ॥
प्रसादाची वाणी वदे तीं उत्तरें । नाहीं मतांतरें जोडियेलीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे रस वाढितीया अंगें । छाया पांडुरंगें केली वरी ॥ ४ ॥

॥ १९६६ ॥

खेळों मनासवें जीवाच्या संवादें । कौतुक विनोदें निरंजनीं ॥ १ ॥

पचीं पडिलें तें रुचे वेळोवेळां । होतसे डोहळा आवडीस ॥ २ ॥
एकांताचें सुख जडलें जिव्हारीं । वीट परिचारीं बरा आला ॥ ३॥
क्षमा ऐसी बुद्धि नव्हे आतां कदा । लंपट गोविंदा जालों पायीं ४॥
आणीक ते चिंता नलगे करावी । नित्य नित्य नवी आवडी हे ५ ॥
तुका ह्मणे घडा राहिला पडोन । पांडुरंगीं मन विसांवलें ॥ ६ ॥

॥ १९६७ ॥

गाऊं नेणें परी मी कांहीं गाईन । शरण जाईन पांडुरंगा ॥ १ ॥
ब्रह्मांडनायक मी त्याचा अंकित । काय यमदूत करिती काळ ॥२॥
वेदशा ज्याच्या नामें तारिली गणिका । अजामेळासारिखा पापरासी ३
चरणींच्या रजें आहिल्या तारिली । रूपवंत केली कुबजा दासी ॥४॥
पृथिवी तारिली पाताळाशीं जातां । तुका ह्मणे आतां आह्मी किती ५

॥ १९६८ ॥

गाढवाचें घोडें । आह्मी करूं दृष्टीपुढें ॥ १ ॥ चघळी वाहाणा । माघारिया वांडा सुना ॥ २ ॥ सोंगसंपादणी । तरि करूं शुद्ध वाणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे खळ । करूं समर्यी निर्मळ ॥ ४ ॥

॥ १९६९ ॥

गुणांची आवडी वाचेचा पसरु । पडिला विसरु सर्वरसा ॥ १ ॥
आदिमध्यअंतीं नाहीं अवसान । जीवनीं जीवन मिळोनि गेलें ॥२॥
रामकृष्णनाम माळा हे साजिरी । ओविली गोजिरी कंठाजोगी ३॥
तुका ह्मणे तनु जालीसे शीतळ । अवघी सकळ ब्रह्मानंदें ॥ ४ ॥

॥ १९७० ॥

घालूनि लोळणी पडिलों अंगणीं । सिंचा सिंचवणी तीर्थ वरि १॥
बोल्हावेल तनु होईल शीतळ । जाली हळहळ बहुतापें ॥ २ ॥
पावेन या ठाया कई जालें होतें । आलों अवचितें उष्टयावरि ॥ ३ ॥
तुका ह्मणे कोणी जाणवा राउळीं । येईल जवळी पांडुरंग ॥ ४ ॥

॥ १९७१ ॥

चतुर मी झालों आपुल्या मोंवता । भावेंविण रिता स्फुंद अंगीं १॥
आतां पुढें वाया जावें हें तें काई । कामक्रोधें ठायीं वास केला २॥
गुणदोष आले जगाचे अंतरा । भूताच्या मत्सरावरी बुद्धि ॥ ३ ॥
तुका ह्मणे करूं उपदेश लोकां । नाहीं झालों एका परता दोषा ४॥

॥ १९७२ ॥

चित्तीं धरीन मी पाऊलें सुकुमार । सकळ बिढार संपत्तीचें ॥१॥
कंठीं धरीन मी नाम अमृताची वल्ली । होईल राहिली शीतळ तनु २
पाहेन श्रीमुख साजिरें सुंदर । सकळां आगर लावण्याचें ॥ ३ ॥
करीन अंगसंग बाळकाचे परी । बैसेन तो वरी नुतरीं कडियें॥४॥
तुका ह्मणे हा केला तैसा होय । धरिली मनें सोय विठोबाची ५ ॥

॥ १९७३ ॥

चरणीं नमन सद्गुरूच्या पूर्ण । नित्य हरिगुण गाऊं सदा ॥ १ ॥
गोवर्धन जेणें नखीं हो धरिला । काळया नाथिला महाबळी ॥ २ ॥
ऐसे हरिगुण गातो वाचेवरी । पतितांसी तारी जनार्दन ॥ ३ ॥
तुका ह्मणे हेंचि सज्जना जीवन । वाचेसी स्मरण गोविंदाचें ॥ ४ ॥

॥ १९७४ ॥

चवदा भुवनें जयाचिये पोटीं । तोचि आह्मीं कंठीं सांठविला ॥१॥
काय एक उणें आमुचिये घरीं । बोळंगती द्वारीं रिद्धिसिद्धी ॥२॥
असुर जयानें घातले तोरडीं । तो आह्मांसि जोडी कर दोन्ही ॥३॥
रूप नाहीं रेखा जयासि आकार । आह्मीं तो साकार भक्तीं केला ४
अनंत ब्रह्मांडें जयाचिये अंगीं । समान तो मुंगी आह्मासाठीं ॥५॥
तुका ह्मणे आह्मी देवाहूनि बळी । झालों हे निराळीं ठेवुनि आशा ६

॥ १९७५ ॥

जननी हे जाणे बाळकाचें वर्म । सुखदुःख धर्म जें जें कांहीं ॥ १ ॥
अंधापुढें जेणें दिधला आधार । त्याचा हा विचार तोचि जाणे ॥२॥
शरणागता जेणें घातलें पाठीशीं । तो जाणे तेविशीं राखों तया ३ ॥
कासे लागे तया न लगती सायास । पोहणार त्यास पार पावी ॥४॥
तुका ह्मणे जीव विठ्ठलाचे हातीं । दिला त्याची गति तोचि जाणे ५॥

॥ १९७६ ॥

जरि हे आड येती लाज । कैसें काज साधतें ॥१॥ करणें केलें उठा-उठी । पायीं मिठी घातली ॥ २ ॥ समर्पिला जीव भाव । धरिला भाव अखंड ॥३॥ तुका ह्मणे आड कांहीं । काळ नाहीं घातला ॥४॥

॥ १९७७ ॥

जाऊं देवाचिया गांवा । देव देईल विसांवा ॥ १ ॥ देवा सांगों सुखदुःख । देव निवारील भूक ॥ २ ॥ घालूं देवासीच भार । देव सुखाचा सागर ॥ ३ ॥ राहों जवळी देवापाशीं । आतां जडोनि पायांसी ॥ ४ ॥ तुका ह्मणे आह्मी बाळें । या देवाचीं लडिवाळें ॥५॥

॥ १९७८ ॥

झालें भांडवल । अवघा पिकला विठ्ठल ॥ १ ॥ आतां वाणी काशा-साठीं । धीर धरावाच पोटीं ॥ २ ॥ आपुल्या संकोचें । म्हणऊनि तेथें टांचे ॥ ३ ॥ घेतों खऱ्या मापें । तुका देखोनिया सोपें ॥ ४ ॥

॥ १९७९ ॥

झालों बाळवंत । होउनिया शरणागत ॥ १ ॥ केला घरांत रिघा-वा । ठायीं पाडियेला ठेवा ॥ २ ॥ हाता चढे धन । ऐसें रचलें कारण ॥ ३ ॥ तुका ह्मणे मिठी । पायीं देऊनि केली लुटी ॥ ४ ॥

॥ १९८० ॥

जाली महा कर्मे । दावी निजसुख वर्मे ॥१॥ ऐसें कळलें आम्हां एक। झालों नामाचे धारक ॥२॥ तपाचे सायास । नलगे घ्यावा वनवास ॥३॥ तुका ह्मणे येणें । कळिकाळ हें ठेंगणें ॥४॥

॥ १९८१ ॥

जिव्हे झाला चळ । नेघे अवसान ते पळ ॥१॥ हेंचि वोसनावोनी उटी । देव सांठविला पोटीं ॥२॥ नाहीं ओढा वारा । पडिला प्रसंग तो बरा ॥३॥ तुका ह्मणे जाली । मज हे अनावरु बोली ॥४॥

॥ १९८२ ॥

जें गाती अखंड विठ्ठलाचें गीत । त्यांचे पायीं चित्त ठेवीन मी १॥ जयांसी आवडे विठ्ठलाचें नाम । ते माझे परम प्राणसखे ॥२॥ जयांसी विठ्ठल आवडे लोचनीं । त्यांचें पायवणी स्वीकारीन ॥३॥ विठ्ठलाशीं जींही दिला सर्व भाव । त्यांच्या पायींठाव मागईन ॥४॥ तुका ह्मणे रज होईन चरणींचा । म्हणविती त्यांचा हरिचे दास ५

॥ १९८३ ॥

जेथें लक्ष्मीचा वास । गंगा आली पाप नास ॥१॥ तें म्यां हृदयीं धरिलें । ताप हरण पाउलें ॥२॥ सेवा केली संतजनीं । सुखें राहिले लपोनी ॥३॥ तुका ह्मणे वांकी । भाट जाली तिहीं लोकीं ॥४॥

॥ १९८४ ॥

जेविले ते संत मागें उष्टावळी । अवघ्या पत्रावळी करुनि झाडा १ सोंवळया ओंवळया राहिलों निराळा। पासूनि सकळां अवघ्यां दुरी २ परें परतें मज न लगे सांगावें। हें तो देवें बरें शिकविलें ३ दुसऱ्यातें आम्ही नाहीं आतळत । जाणोनि संकेत उभा असे ४ येथें कोणी कांहीं न धरावी शंका । मज चाड एका भोजनाची ५ लांचावला तुका मारितसे झड । पुरविलें कोड नारायणें ६

॥ १९८५ ॥

ज्यानें आड यावें कांहीं । त्याचें नाहीं बळ आतां ॥१॥ मन येथें साह्य झालें । हरिच्या घालें गुणवादीं ॥२॥ चुकुर तो तो गेला काळ । झालें बळ संगाचें॥३॥ तुका ह्मणे करूं सत्ता । होईल आतां करूं तें ॥४॥

॥ १९८६ ॥

डोळां भरियलें रूप । चित्तीं पायांचा संकल्प ॥१॥ अवघी वातली वांटणी । प्रेम राहिलें कीर्तनीं ॥२॥ वाचा केली माप । राशी हरिनाम अनुप ॥३॥ भरूनिया भाग । तुका बैसला पांडुरंग ॥४॥

॥ १९८७ ॥

तपासी तें मन करूं पाहे घात । धरोनि सांगात इंद्रियांचा ॥१॥ ह्मणोनि कीर्तन आवडलें मज । सांडोनिया लाज हेंचि करी ॥२॥

पाहातां आत्मानिगमाचा ठाव । तेथें नाहीं भाव एकविध ॥ ३ ॥
तुका ह्मणे येथें नाहीं वो विकार । नाम एक सार विठोबाचें ॥४॥

॥ १९८८ ॥

तरीच म्यां हेवा । साटी करुनिया जीवा ॥ १ ॥ येथें बैसली धरणें । दृढ कायावाचामनें ॥ २ ॥ आवरिल्या वृत्ति । मन घेउनिया हातीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे जरा । बाहेर येऊं नेदीं घरा ॥ ४ ॥

॥ १९८९ ॥

तीर्थीची अपेक्षा स्थळीं वाढे धर्म । जाणावें तें वर्म बहु पुण्य ॥१॥
बहु बरी ऐसी भाविकांची जोडी । काळ नाहीं घडी जात वाया॥२
करूनी चिंतन करावें आणिकां । तो या झाला लोकां नाव जगीं ३
तुका ह्मणे ऐसे परउपकारी । त्यांच्या पायांवरी डोई माझी ॥ ४ ॥

॥ १९९० ॥

तोंवरि तोंवरि शोभतील गारा । जंव नाहीं हिरा प्रकाशला ॥ १ ॥
तोंवरि तोंवरि शोभती दीपिका । नुगवतां एका भास्करासी ॥२॥
तोंवरि तोंवरि सांगती संताचिया गोष्टी। जंव नाहीं भेटी तुकयासवें ३

॥ १९९१ ॥

दिनरजनी हाच धंदा । गोविंदाचे पवाडे ॥ १ ॥ संकलिपला देह देवा । सकळ हेवा तयेठायीं ॥ २ ॥ नाहीं अवसान घडी । सकळ जोडी इंद्रीयां ॥३॥ कीर्ति मुखें गर्जे तुका। करी लोकां सावध ४॥

॥ १९९२ ॥

देवकीनंदनें । केलें आपुलया चिंतनें ॥ १ ॥ मज आपुलिया ऐसें । मना लावूनिया पिसें ॥ २ ॥ गोवळे गोपाळा । केलें लावूनिया चाळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे संग । केला दुरि नव्हे मग ॥ ४ ॥

॥ १९९३ ॥

देव तिळीं आला । गोडें गोड जीव धाला ॥ १ ॥ साधला हा पर्वकाळ । गेला अंतरींचा मळ ॥ २ ॥ पापपुण्य गेलें । एका स्नानेंचि खंडिलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाणी । शुद्ध जनार्दनीं जनीं ॥ ४ ॥

॥ १९९४ ॥

देवाचें निर्माल्य कोण शिवे हातीं । संकल्पासी होती विकल्प ते१
वाहिलें देह हें देवा एकसरें । होईल तें बरें तेणें द्वारें ॥ २ ॥
होता भार त्याची निवारली खंती । येथें आतां रिती साटवण ३॥
तुका ह्मणे इच्छे पावविले कष्ट । ह्मणऊनि नष्ट दुरावली ॥ ४ ॥

॥ १९९५ ॥

देवावरिल भार । काढूं नये कांहीं पर ॥ १ ॥ तानभुके आठवण । घडे तें बरें चिंतन ॥ २ ॥ देखावी निश्चिती । तोचि अंतर श्रीपती ॥ ३ ॥ वैभव सकळ । तुका मानितो विटाळ ॥ ४ ॥

॥ १९९६ ॥

देवें जीव घाला । संसार तो कडू झाला ॥ १ ॥ तोचि येतील ढेंकर । आनंदाचे हरिहर ॥ २ ॥ वेधी आणिकांस । ऐसा जया अंगीं कस ॥ ३ ॥ तुका ह्मणे भूक । येणें न लगे आणीक ॥ ४ ॥

॥ १९९७ ॥

देहभाव आह्मी राहिलों ठेवूनि । निवांत चरणीं विठोबाच्या ॥१॥ आमुच्या हिताचा जाणोनि उपाव । तोचि पुढें देव करीतसे ॥२॥ म्हणउनी नाहीं सुख दुःख मनीं । ऐकिलिया कानीं वचनाचें ॥३॥ जालों मी निःसंग निवांत एकला । भार त्या विठ्ठला घालूनिया४॥ तुका ह्मणे जालों जयाचे अंकित । तोचि माझें हित सर्व जाणे॥५॥

॥ १९९८ ॥

दैन्य दुःख आह्मां न येती जवळी । दहन हे होळी होती दोष ॥१॥ सर्व सुखें येती मानें लोटांगणीं । कोण यांसी आणी दृष्टीपुढें ॥२॥ आमुची आवडी संतसमागम । आणीक त्या नाम विठोबाचें ॥३॥ आमचें मागणें मागों त्याची सेवा । मोक्षाची निर्दैवा कोणा चाड४ तुका ह्मणे पोटीं सांठविला देव । न्यून तो हा भाव कोण आह्मां ५

॥ १९९९ ॥

दोहीं बाहीं आम्हां वास । असों कास घालुनि ॥ १ ॥ बोल बोलों उभयतां । स्वामीसत्ता सेवेची ॥ २ ॥ एकसरें आज्ञा केली । असों चाली ते नीती ॥३॥ तुका ह्मणे जोहारितों । आहे होतों ते ठायीं ४

॥ २००० ॥

द्रव्याचा तो आम्ही धरितों विटाळ । तया पाठी काळ लाग करी १ करोनिया हेंचि राहिलों जीवन । एक नारायण नाम ऐसें ॥ २ ॥ तुका ह्मणे हेंचि करुनि जतन । आलिया हीं दान याचकासी ॥३॥

॥ २००१ ॥

धर्म रक्षयासाठीं । करणें आटी आम्हासी ॥ १ ॥ वाचा बोलों वेद-नीती । करूं संतीं केलें तें ॥२॥ न कळतां स्थिाते अंगीं । कर्म त्यागी लंड तो ॥ ३ ॥ तुका ह्मणे अधम त्यासी । भक्ति दूषी हरीची ॥ ४ ॥

॥ २००२ ॥

धर्माचें पाळण । करणें पांखांड खंडण ॥ १ ॥ हेंचि आम्हां करणें काम । बीज वाढवावें नाम ॥ २ ॥ तीक्ष्ण उत्तरें । हातीं घेउनि बाण फिरे ॥ ३ ॥ नाहीं भीड भार । तुका ह्मणे साना थोर ॥ ४ ॥

॥ २००३ ॥

धरावें तो भय । अंतरोनि जाती पाय ॥ १ ॥ झाल्या तुटी देवासवें । काय वांचोनि करावें ॥ २ ॥ कोणासी पारिखें । लेखूं आपणासा-रिखें ॥ ३ ॥ तुका ह्मणे असो । अथवा हें आतां नसो ॥ ४ ॥

॥ २००४ ॥

धरिलीं जीं होतीं चित्तीं । डोळां तेचि दिसती ॥ १ ॥ आलें आवडीशी फळ । जालें कारण सकळ ॥ २ ॥ घेईन भातुकें मागोनिया कवतुकें ॥ ३ ॥ तुका ह्मणे लाड । विठोबा पुरवील कोड ॥ ४ ॥

॥ २००५ ॥

धरोनि दोन्ही रूपें पाळणें संहार । करी कोप रुद्र दयाळ विष्णु ॥ १ ॥ जटाजूट एका मुगुट माथां शिरीं । कमळापति गौरिहर एक ॥ २ ॥ भस्मउद्धळण लक्ष्मीचा भोग । शंकर श्रीरंग उभयरूपीं ॥ ३ ॥ वैजयंती माळा वासुगीचा हार । लेणें अळंकार हरिहरा ॥ ४ ॥ कपाळ झोळी एका स्मशानींचा वास । एक जगन्निवास विश्वंभर ५ तुका ह्मणे मज उभयरूपीं एक । सारोनि संकल्प शरण आलों ६ ॥

॥ २००६ ॥

धन्य देह गांव पुण्यभूमि ठाव । तेथें नांदे देव पांडुरंग ॥ १ ॥ धन्य क्षेत्रवासी लोक ते दैवाचे । उच्चारिती वाचे नामघोष ॥ २ ॥ कर कटी उभा विश्वाचा जनिता । वामांगीं ते माता रखुमादेवी ३ गरुड पारीं उभा जोडुनिया कर । अश्वत्थ समोर उत्तरामुख ॥ ४ ॥ दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर । शोभे गंगानीर इंद्रायणी ॥ ५ ॥ लक्ष्मी नारायण बल्लाळाचें वन । तेथें अधिष्ठान सिद्धेश्वर ॥ ६ ॥ विघ्नराज द्वारीं बहिरव बाहेरी । हनुमंत शेजारीं सहित दोघे ॥ ७ ॥ तेथें दास तुका करितो कीर्तन । हृदयीं चरण विठोबाचे ॥ ८ ॥

॥ २००७ ॥

नका मजपाशीं । नदीं प्रपंचाचे विशीं ॥ १ ॥ आतां नाइकावो कानीं । मज देवाविण वाणी ॥ २ ॥ येउनिया रूपा । कोण पाहे पुण्यपापा ३ मागें आजिवरी । झालें माप नेलें चोरीं ॥ ४ ॥ सांडियेली पानें । पुढें पिका अवलोकन ॥ ५ ॥ पडों नेदी तुका । आड गुंफा कांहीं चुका ॥ ६ ॥

॥ २००८ ॥

नको ऐसें जालें अन्न । भूक तान ते गेली ॥ १ ॥ गोविंदाची आवडी जीवा । करीन सेवा धणीवरी ॥ २ ॥ राहिलें तें राहो काम । सकळ धर्म देहींचे ॥ ३ ॥ देह धरिल्या त्याचें फळ । आणीक काळ धन्य हा ॥ ४ ॥ जाऊं नेदीं करितां सोस । क्षमा दोष करवीन ॥ ५ ॥ तुका ह्मणे याजि पाटी । आतां साटी जीवाची ॥ ६ ॥

॥ २००९ ॥

न पडो आतां हाडीं घाव । मध्यें कांच नाशक ॥ १ ॥ करविली आत्महत्या । जीवा कां ह्या द्वंद्वाच्या २ आशापाशीं गुंतला गळा । तेणें कळाहीन जालों ॥ ३ ॥ तुका ह्मणे लावूं मुळीं । जीवकुळीं धारेसी ॥ ४ ॥

॥ २०१० ॥

नये पुसों आज्ञा केली एकसरें । आम्हांसी दुसरें आतां नाहीं॥१॥ ज्याचे तो बळिवंत सर्व निवारिता । आम्हां काय चिंता करणें लागे२ बुद्धीचा जनिता विश्वाचा व्यापक । काय नाहीं एक अंगीं तया ३॥ तुका ह्मणे मज होईल वारता । तरी काय सत्ता नाहीं हातीं ॥ ४ ॥

॥ २०११ ॥

नव्हती भेटी तोंचि बरें । होतां चोरें नाडिलें ॥ १ ॥ अवघियांचा केला झाडा । रिता वाडा खोंकर ॥ २ ॥ चिंतनाचें मूळ चित्त । नेलें वित्त हरूनि ॥ ३ ॥ तुका ह्मणे मूळा आलें । होतें केलें तैसेंचि ४॥

॥ २०१२ ॥

नव्हतों सावचित । तेणें अंतरलें हित ॥ १ ॥ पडिला नामाचा विसर वाढविला संसार ॥ २ ॥ लटिक्याचे पुरी । वाहोनिया गेलों दुरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाव । आम्हां सांपडला भाव ॥ ४ ॥

॥ २०१३ ॥

न संडावा ठाव । ऐसा निश्चयाचा भाव ॥ १ ॥ आतां पुरे पुन्हा यात्रा । हेंचि सारूनि सर्वत्रा ॥ २ ॥ संनिधचि सेवा । असों करूनिया देवा ॥ ३ ॥ आज्ञेच्या पाळणें । असें तुका संतां ह्मणे ॥ ४ ॥

॥ २०१४ ॥

नाचावेसें वाटे मना । छंद गुणा आधीन ॥ १ ॥ चेष्टविलीं माझीं गात्रें । सत्तासूत्रें हालतीं ॥ २ ॥ नामरूपें रंगा आलीं । तोचि चाली स्वभावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे पांडुरंगें । अंगें संगें कवाळलें ॥ ४ ॥

॥ २०१५ ॥

नाहीं दिलें कधीं कठिण उत्तर । तरी कां अंतर पडियेलें ॥ १ ॥ म्हणऊनि आतां वियोग न साहे । लांचावलें देहे सवद्दणें ॥ २ ॥ वेळोवेळां वाचे आठवितों नाम । अधिकचि प्रेम चढे घेतां ॥ ३ ॥ तुका ह्मणे पांडुरंगे जननिये । घेऊनि कडिये बुझाविलें ॥ ४ ॥

॥ २०१६ ॥

नाहीं मज कृपा केली पांडुरंगें । संताचिया संगे पोट भरीं ॥ १ ॥ चतुराचे सभे पंडित कुशळ । मी काय दुर्बळ विष्णुदास ॥ २ ॥ तुका ह्मणे नेणें करूं समाधान । धरिले चरण विटोबाचे ॥ ३ ॥

॥ २०१७ ॥

नाहीं म्यां वंचिला मंत्र कोणापाशीं । राहिलों जीवेंसीं धरूनिया १ विटेवरी भावें ठेवियेलें मन । पाउलें समान चिंतीतसें ॥ २ ॥ पावविलों पार धरिला विश्वास । घालूनिया कास बळकट ॥ ३ ॥ तुका ह्मणे मागें पावले उद्धार । तोंही हा आधार ठेविलासे ॥ ४ ॥

॥ २०१८ ॥

नाहीं त्रिभुवनीं सुख या समान । ह्मणऊनि मन स्थिरावलें ॥ १ ॥

धरियेलीं जीवीं पाउलें कोमळीं । कंठीं एकावळी नाममाळा ॥ २ ॥
शीतळ होऊनिया पावलों विश्रांती । न साहे पुढती घाली चित्ता ३
तुका ह्मणे झालें सकळ सोहळे । पुरविले डोहोळे पांडुरंगें ॥ ४ ॥

॥ २०१९ ॥

निरोधाचें मज न साहे वचन । बहु होतें मन कासावीस ॥ १ ॥
ह्मणऊनि जीवा न साहे संगति । बैसतां एकांतीं गोड वाटे ॥ २ ॥
देहाची भावना वासनेचा संग । नावडे उद्वेग आला यांचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे देव अंतरे यामुळें । आशामोहजाळें दुःख वाढे ॥ ४ ॥

॥ २०२० ॥

नेणें अर्थ कांहीं नव्हती माझे बोल । विनवितों कोपाल संत ह्मणी ॥१॥
नव्हती माझे बोल बोले पांडुरंग । असे अंगसंगें व्यापुनिया ॥२॥
मज मूढा शक्ति कैंचा हा विचार । निगमादिकां पार बोलावया ३
राम कृष्ण हरी मुकुंदा मुरारि । बोबड्या उत्तरीं हेंचि ध्यान ॥४॥
तुका ह्मणे गुरुकृपेचा आधार । पांडुरंगें भार घेतला माझा ॥५॥

॥ २०२१ ॥

नेणें जप तप अनुष्ठान याग । काळें तंव लाग घेतलासे ॥ १ ॥
रिघालों या भेणें देवाचे पाठीशीं । लागे त्याचें त्यासी सांभाळणें २
मापें पाप सळे चालिली चढती । झाली मग राती काय चाले ॥३॥
तुका ह्मणे चोरा हातीं जें वाचलें । लाभावरी आलें वारिलेंशु ॥४॥

॥ २०२२ ॥

न्यावयासी मूळ पाठवील कधीं । मज कृपानिधि पांडुरंग ॥ १ ॥
प्राण फुटे माझा त्याचिया वियोगें । घडी जाय युगें येकी येकी ॥२॥
त्याचिये गांवींची आवड ती जीवा । जीव हा सांडावा वोवाळुनी ३
दिनो दिन चिंता वाटते बहुत । नावडे संचित करावें हें ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां आहे तेंचि सरो । कोण करी भरोवरी मग ॥ ५ ॥

॥ २०२३ ॥

पडिलों भोवणीं । होतों बहु चिंतवणी ॥ १ ॥ होतों चुकलों मारग । लाहो केला लाग वेग ॥ २ ॥ इंद्रियाचे संदी । होतों सांपडलों बंदीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे बरें झालें । विठ्ठलसें वाचे आलें ॥ ४ ॥

॥ २०२४ ॥

पळीयंतें मागा पांडुरंगापाशीं । मज दुर्बळासी काय पीडा ॥ १ ॥
याचसाठीं दुराविला संसार । वाढे हे अपार माया तृष्णा ॥ २ ॥
कांहीं करितां कोठें नव्हे समाधान । विचारितां पुण्य तेंचि पाप ३
तुका म्हणे आतां निश्चळाचि भलें । तुज आठविलें पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ २०२५ ॥

पसरोनि मुखें । कैसे धालों बा हारीखें १ ब्रह्मादिकां दुर्लभ वांटा।

आह्मां फावला रानटा २ गोड लागे काय तरि । कृपावंत झाला हरी ॥३॥ उडती थेंबुटें । अमृताहुनी गोमटें ॥४॥ गोडाहुनी गोड । जिव्हा माचे वाटे कोड ॥५॥ खुणावुनी तुका । दावी वर्म बोलों नका ॥६॥

॥ २०२६ ॥

पाप पुण्य दोन्ही वाहती मारग । स्वर्गनर्क भोग यांची पेणी ॥१॥ एका आड एक नलगे पुसावें । जेविल्या देखावें मागें भूक ॥ १ ॥ रहाटीं पडिलें भरोनिया रितीं । होतील मागुतीं येतीं जातीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मी खेळतिया मधीं । नाहीं केली बुद्धि स्थिर पाहों ४

॥ २०२७ ॥

पाववावें ठाया । ऐसें सवें बोलों तया ॥ १ ॥ भावा ऐसी क्रिया राखे । खोट्या खोटेपणें वाखे ॥ २ ॥ न ठेवूं अंतर । कांहीं भेदाचा पदर ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीवें भावें । सत्य मानवीजे देवें ॥ ४ ॥

॥ २०२८ ॥

पावलों प्रसाद इच्छा केली तैसी । जालें या चित्तासीं समाधान १ माय बाप माझा उभा कृपादानी । विटे सम जोडोनि पादांबुजें ॥२॥ सांभाळासी येऊं नेदीच उणीव । अधिकार गौरव राखे तसें ॥ ३ ॥ तुका ह्मणे सर्व अंतर्बाह्य आहे । जया तैसा राहे कवळुनी ॥ ४ ॥

॥ २०२९ ॥

पाहतां श्रीमुख सुखावलें सुख । डोळियांची भूक न वजे माझ्या१॥ जिव्हे गोड तीन अक्षरांचा रस । अमृत जयास फिकें पुढें ॥ २ ॥ श्रवणीची वाट चोखाळली शुद्ध । गेले भेदाभेद वारोनिया ॥ ३ ॥ महामळें मन होतें जें गांदलें । शुद्ध चोखाळलें स्फटिक जैसें ॥४॥ तुका ह्मणे माझ्या जीवाचें जीवन । विठ्ठल निधान सांपडलें ॥ ५॥

॥ २०३० ॥

पाळियेले लळे । माझे विठ्ठले कृपाळे ॥ १ ॥ बहुजन्मांचें पोषणें । सरतें पायांपाशीं तेणें ॥ २ ॥ सवे दिली लागों । भातें आवडीचें मागों ॥ ३ ॥ तुका ह्मणे भिन्न । नाहीं दिसों दिलें क्षण ॥ ४ ॥

॥ २०३१ ॥

पाळिला विध तो आजि फळा आला । ऐसा हा कळला साच भाव १ नामाची आवडी लागलीसे चित्ता । पाय आठवितां सुख वाटे ॥२॥ धरिल्या देहाचें साधलें कारण । पुढिल्या खंडण गर्भवासा ॥ ३ ॥ तुका ह्मणे लाभ झाला एकसरे । आणिक दुसरें नाहीं आतां ॥४॥

॥ २०३२ ॥

पाळुनिया मोठे केले । त्यासी बोलें वोळखी ॥ १ ॥ जवळुनी नवजे दुरी । लाड करी कवतुक ॥२॥ खुण उभा विटेवरी । कटीं कर धरियेले ॥३॥ तुका ह्मणे घातली वरी । झुली थोरी मोलाची ॥४॥

॥ २०३३ ॥

पुसावेंसें हेंचि वाटे । जे जे भेटे तयासी ॥ १ ॥ देव कृपा करील मज । काय लाज राखील ॥२॥ अवघियांचा विसर झाला । हा राहिला उद्योग ॥३॥ तुका ह्मणे चिंता वाटे । कोण भेटे सांगेसें ॥४॥

॥ २०३४ ॥

पुष्ट कांति निवती डोळे । हे सोहळे श्रीरंगीं ॥ १ ॥ अंतर्बाहीं विलेपन । हें भूषण मिरवूं ॥ २ ॥ इच्छेऐसी आवड पुरे । विश्वंभरें जवळी ॥ ३ ॥ तुका करी नारायण । या या सेवन नामाचें ॥ ४ ॥

॥ २०३५ ॥

पोट धालें आतां जीवनीं आवडी । पुरवावे परवडी बहुतांचे ॥१॥
काय आंचवणा तातडीचें काम । मागील तीं श्रम न पववीं ॥२॥
वाढितिया पोटीं बहु असे वाव । सांभाळितां ठाव काय वेचे ॥३॥
दाविल्यावांचूनि नाहीं कळों येत । तेथेंही दुश्चित एकपण ॥ ४ ॥
नावेचा भार तो उदकाचे शिरीं । काय हळू भारी तये ठायीं ॥५॥
तुका ह्मणे गीतीं गाऊनि गोविंद । करूं ब्रह्मानंद एकसरें ॥ ६ ॥

॥ २०३६ ॥

प्रेमसूत्र दोरी । नेतो तिकडे जातो हरी ॥१॥ मनेंसहित वाचा काया । अवघें दिलें पंढरीराया ॥ २ ॥ सत्ता सकळ तया हातीं । माझी कींव काकुलती ॥३॥ तुका ह्मणे ठेवी तैसें । आम्ही राहों त्याचे इच्छे ॥४॥

॥ २०३७ ॥

बरवया बरवंट । विटे चरण सम नीट ॥१॥ ते म्यां हृदयीं धरिले । तापशमन पाउलें ॥ २ ॥ सकळ तीर्थां अधिष्ठान । करी लक्ष्मी संवाहन ॥ ३ ॥ तुका म्हणे अंतीं । ठाव मागितला संतीं ॥ ४ ॥

॥ २०३८ ॥

बरवें झालें आलों ज्याचें त्याचया घरा । चुकला पान्हेरा ओढाळांचा १
बहु केलें दुःखी त्यांचिया सांभाळें । आतां तोंड काळें तेणें लोभें २
त्याचिया अन्यायें भोगा माझें अंग । सकळ ही लाग द्यावा लागे ३
नाहीं कोठें स्थिर राहूं दिलें क्षण । आजिवरी सिण पावलों तो ४
वेगळाल्या खोडी केली तडातोडी । सांगावया घडी नाहीं सुख ५
निरवूनि तुका चालिला गोवारे । देवापाशीं भार सांडवूनि ६

॥ २०३९ ॥

बळिवंत आह्मी समर्थाचे दास । घातलिया कास कळिकाळासी १
तेथें मानसाचा कोण आला पाड । उलंघोनि जड गेलों आधीं २॥
संसाराचे बळी साधिलें निधान । मारिले दुर्जन षड्वर्ग ॥ ३ ॥
तुका ह्मणे एक उरला धरिता ठाव । येर केलें वाव तृणवत ॥ ४ ॥

॥ २०४० ॥

बळियाचे अंकित । आम्ही जालों बळिवंत ॥ १ ॥ लाताळिला संसार । केला षड्र्मींचा मार ॥ २ ॥ जन धन तन । केलें तृणाही समान ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां । आम्ही मुक्तीचिया माथां ॥ ४ ॥

॥ २०४१ ॥

बळें बाह्यात्कारें संपादिलें सोंग । नाहीं झाला त्याग अंतरींचा ॥१॥
ऐसें येतें नित्य माझ्या अनुभवा । मनासी हा ठावा समाचार ॥ २ ॥
जागृतीचा नाहीं अनुभव स्वप्नीं । जातों विसरुनि सकळ हें ॥ ३ ॥
प्रपंचाबाहेरि नाहीं आलें चित्त । केले करी नित्य वेवसाय ॥ ४ ॥
तुका ह्मणे मज भोरप्याचि परी । झालें सोंग वरी आंत तैसें ॥ ५ ॥

॥ २०४२ ॥

बहु कृपावंतें माझीं मायबापें । मी माझ्या संकल्पें अंतरलों ॥ १ ॥
संचितानें नाहीं चुकों दिली वाट । लाविलें अदृष्ट मजसवें ॥ २ ॥
आतां मी रुसतों न कळतां वर्म । परी ठावे धर्म सर्व देवा ॥ ३ ॥
तुका म्हणे उभा राहिला न बैसे । आमुची माय असे उद्वेग त्या ४॥

॥ २०४३ ॥

बहुजन्म केला लाग । तो हा भाग लाधलों ॥ १ ॥ जीव देईन हा बळी । करीन होळी संसारा ॥ २ ॥ गेलें मग नये हातां । पुढती चिंता वाटतसे ॥३॥ तुका ह्मणे तांतड करूं । पाय धरूं बळकट ४॥

॥ २०४४ ॥

बहु बरें एकाएकीं । संग चुकी करावा ॥ १ ॥ ऐसें बरें झालें ठावें । अनुभवें आपुल्या ॥ २ ॥ सांगावें तें काम मना । सलगी जना नेदावी ॥ ३ ॥ तुका ह्मणे निघे अगी । दुजे संगीं आतळतां ॥ ४ ॥

॥ २०४५ ॥

बाळ काय जाणे जीवनउपाय । मायबाप वाहे सर्व चिंता ॥ १ ॥
आइतें भोजन खेळणें अंतरीं । अंकिताचे शिरीं भार नाहीं ॥ २ ॥
आपुलें शरीर रक्षितां न कळे । सांभाळूनि लळे पाळी माय ॥ ३ ॥
तुका म्हणे माझा विठ्ठल जनिता । आमुची ते सत्ता तयावरी ४ ॥

॥ २०४६ ॥

बुद्धीचा जनिता लक्ष्मीचा पति । आठवितां चित्तीं काय नव्हे ॥१॥
आणिकां उपाया कोण वांटी मन । सुखाचें निधान पांडुरंग ॥ २ ॥
गीती गावों नाचों छंदें वाहों टाळी । वैष्णवाचे मेळीं सुखरूप ३ ॥
अनंत ब्रह्मांडें एक रोमावळी । आह्मी केला भोळीं भावें उभा ॥४॥
लटिका हा केला संवसारसिंधु । मोक्ष करा बंधु नाहीं पुढें ॥ ५ ॥
तुका ह्मणे ज्याच्या नामाचे अंकित । राहिलों निश्चिंत त्याच्या बळें ६

॥ २०४७ ॥
बैसोनिया खाऊं जोडी । ओढाओढी चुकवूनि ॥ १ ॥ ऐसें केलें नारायणें बरवें जिणें सुखाचें ॥२॥ घरीच्या घरीं भांडवल । नलगे बोल वेचावे ॥३॥ तुका ह्मणे आटाआटी । चुकली दाटी सकळ ॥४॥

॥ २०४८ ॥
बोलणें तें आह्मी बोलों उपयोगीं । पडिलें प्रसंगी काळऐसें ॥ १ ॥ जयामध्यें देव आदि मध्यें अंतीं । खोल पाया भिंती न खचेसी २॥ करणें तें आह्मी करूं एका वेळे । पुढिलिया बळें वाढी खुंटे ॥ ३ ॥ तुका ह्मणे असो आज्ञेचीं धारकें । म्हणऊनि एकें घायें सारूं ॥४॥

॥ २०४९ ॥
बोलविलें जेणें । तोचि त्याचें गुह्य जाणे ॥ १ ॥ मी काबाडाचा धनी । जेवूं मागावें थिकोनि ॥ २ ॥ मजुराच्या हातें । माप केलें झालें रितें ॥ ३ ॥ झाला पुरविता । पांडुरंग माझा पिता ॥ ४ ॥ मायबापासवें । बाळें कौतुकें खेळावें ॥ ५ ॥ जैसा करिती धंदा । तैसा पडोनिया छंदा ॥ ६ ॥ त्याच्या साच गाई ह्मैसी । येणें खेळावें मातीशीं ॥७॥ तुका ह्मणे बोल । माझा बोल तो विठ्ठल ॥ ८ ॥

॥ २०५० ॥
बोलाल या आतां आपुलयापुरतें । मज या अनंतें गोविियेलें ॥ १ ॥ झाडिला न सोडी हातींचा पालव । वेधी वेधें जीव वेधियेला ॥२॥ तुमचे ते शब्द कोरडिया गोष्टी । मज सर्वे मिठी अंगसंगें ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुह्मां होईल हे परी । अनुभव वरी येईल मग ॥ ४ ॥

॥ २०५१ ॥
बोले तैसा चाले । त्याचीं वंदीन पाउलें ॥१॥ अंगें झाडीन अंगण । त्याचें दास्यत्व करीन ॥२॥ त्याचा होईन किंकर । उभा ठाकेन जोडोनि कर ॥३॥ तुका ह्मणे चित्तीं देव । त्याचे चरणीं माझा भाव ४

॥ २०५२ ॥
बोलावे म्हूण हे बोलतों उपाय । प्रवाह हें जाय गंगाजळ ॥ १ ॥ भाग्ययोगें कोणां घडेल सेवन । कैंचे येथें जन अधिकारी ॥ २ ॥ मुखीं देतां घांस पळवितीं तोंडें । अंगींचिया भांडे असुखानें ॥३॥ तुका ह्मणे पूजा करितों देवाची । आपुलिया रुची मनाचिये ॥ ४ ॥

॥ २०५३ ॥
बोलावें तें आतां आम्ही अबोलणें । एकाचि वचनें सकळांसी ॥१॥ मेघवृष्टि कांहीं न विचारी ठाव । जैसा ज्याचा भाव त्यासी फळे २॥ तुका ह्मणे नाहीं समाधानें चाड । आपणाही नाड पुढीलांसीं ॥३॥

॥ २०५४ ॥
बंधनाचा तोडूं फांसा । देऊं आशा टाकोनि ॥ १ ॥ नाहीं तैंच घेतां

शिरीं । होईल दुरी निजपंथ ॥ २ ॥ नाथिलेंचि माझें तुझें । कोण ओझें वागवी ॥ ३ ॥ तुका ह्मणे अंतराय । देवीं काय जिणें तें ॥ ४ ॥

॥ २०५५ ॥

ब्रह्मादिक जया लाभासि ठेंगणें । बळिये आम्ही भले शरणागत १
कामनेच्या त्यागें भजनाचा लाभ । केला पद्मनाभ सेवाऋणि २ ॥
कामधेनुचिया क्षीरा पार नाहीं । इच्छेचिये वाही वरुषावें ॥ ३ ॥
बैसलिया ठायीं लागलें भरतें । त्रिपुटीवरतें भेदीं ऐसें ॥ ४ ॥
हारि नाहीं आम्हा विष्णुदासां जगीं । नारायण अंगीं विसावला ५
तुका ह्मणे बहु लाटे हें भोजन । नाहीं रिता कोण रहात राहें ६ ॥

॥ २०५६ ॥

भक्ति आम्ही केली सांडुनी उद्वेग । पावलों हें सांग सुख याचें १॥
सुख आम्हां झालें धरितां याचा संग । पळाले उद्वेग सांडूनिया २
तुका ह्मणे सुख बहु झालें जिवा । घडली या सेवा विठोबाची ३

॥ २०५७ ॥

भाग्यवंत आम्ही विष्णुदास जगीं । अभंग प्रसंगीं धैर्यवंत ॥ १ ॥
नाहीं तें पुरवीत आणुनि जवळी । गाउनी माउली गीत सुखें २
प्रीति अंगीं असे सदा सर्वकाळ । बोळलीं सकळ सुखें ठायीं ३ ॥
आपुल्या स्वभावें जैसे जेथें असों । तैसें तेथें दिसों साजिरेचि ४
वासनेचा कंद उपडिलें मूळ । दुरितें सकळ निवारिलीं ॥ ५ ॥
तुका ह्मणे भक्तजनांची माउली । करील साउली विठ्ठल आम्हां ६

॥ २०५८ ॥

भूत भविष्य कळों यावें वर्तमान। हें तों भाग्यहीन त्यांची जोडी १
आह्मीं विष्णुदासीं देव ध्यावा चित्तें । होणार तें होतें प्रारब्धें ॥२॥
जगरूढीसाठीं घातलें दुकान । जातो नारायण अंतरूनि ॥३ ॥
तुका ह्मणे हा हो प्रपंच गाढा । थोरली ते पीडा रिद्धिसिद्धि ॥४॥

॥ २०५९ ॥

भूतीं देव ह्मणोनि भेटतों या जना । नाहीं हे भावना नरनारी ॥१॥
जाणे भाव पांडुरंगा अंतरींचा । नलगे द्यावा साचा परिहार ॥२॥
दयेसाठीं केला उपाधि पसारा । जड जीवा तारा नाव कथा ॥३॥
तुका ह्मणे नाहीं पडत उपवास । फिरतसे आस धरोनिया ॥ ४ ॥

॥ २०६० ॥

भोळे भाविक हे जुनाट चांगलें । होय तैसें केलें भक्तिभावें ॥ १ ॥
ह्मणउनि चिंता नाहीं आह्मां दासां। न भ्यों गर्भवासा जन्म घेतां २
आपुलिया इच्छा करूं गदारोळ । भोगूं सर्वकाळ सर्व सुखें ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मां देवाची सांगात । नाहीं विसंबत येर येरां ॥४ ॥

॥ २०६१ ॥

मऊ मेणाहूनि आह्मी विष्णुदास । कठिण वज्रास भेदूं ऐसें ॥ १ ॥
मेले जित असों निजोनिया जागे । जो जो जें जें मागे तें तें देऊं २ ॥
भले तरि देऊं गांडीची लंगोटी । नाठ्याळाचे काठी देऊं माथां ३ ॥
मायबापाहूनि बहु मायावंत । करूं घातपात शत्रूहूनि ॥ ४ ॥
अमृत तें काय गोड आह्मांपुढें । विष तें बापुडें कडू किती ॥ ५ ॥
तुका ह्मणे आह्मी अवघेचि गोड । जया पुरे कोड त्याचेपरि ॥ ६ ॥

॥ २०६२ ॥

मन झालें भाट । कीर्ति मुखें घडघडाट । पडियेली वाट । येचि चाली स्वभावें ॥ १ ॥ बोलें देवाचे पवाडे । नित्य नवेचि रोकडे । ज्या परी आवडे । तैसा तैसा करूनि ॥ २ ॥ रोखीं रहावें समोर । पुढें मागें चाले भार । करावें उत्तर सेवा रुजू करोनि ॥ ३ ॥ पूर वर्षला देकारें । संतोषाच्या अभयें करें । अंगीच्या उत्तरें । तुकया स्वामी शृंगारी ॥ ४ ॥

॥ २०६३ ॥

मागणें तें मागों देवा । करूं भक्ती त्याची सेवा ॥१॥ काय उणें तया-पाशीं । रिद्धिसिद्धि ज्याच्या दासी ॥२॥ कायावाचामन । करूं देवा हें अर्पण ॥३॥ तुका ह्मणे विश्वंभर । ज्याच्यानें हें चराचर ॥४॥

॥ २०६४ ॥

मागें जैसा होता माझे अंगीं भाव । तैसा एक ठाव नाहीं आतां१॥
ऐसें ग्वाही माझें मन मजपाशीं । तुटी मुदलेंली दिसे पुढें ॥ २ ॥
पुढिलांचे मना आणी गुणदोष । पूज्य आपणांस करावया ॥ ३ ॥
तुका ह्मणे जाली कोंबड्याची परी । पुढेंचि उकरी लाभ नेणें ॥४॥

॥ २०६५ ॥

मागें बहुतां जन्मीं । हेंचि करित आलों आह्मी । भवताप श्रमीं । श्रमले जे निववूं त्यां ॥ १ ॥ गर्जों हरिचे पवाडे । मेळवूं वैष्णव बागडे । पाझर रोकडे । काढूं पाषाणामध्यें ॥ २ ॥ भाव शुद्ध नामावळी । हर्षें नाचूं पिटूं टाळी । घालूं पायां तळीं । कळिकाळ त्याबळें ॥ ३ ॥ कामक्रोध बंदीखाणी । तुका ह्मणे दिले दोन्ही । इंद्रियांचे धनी । आह्मी जालों गोसांवी ॥ ४ ॥

॥ २०६६ ॥

माझिये बुद्धीचा खुंटला उपाय । करिसील काय पाहेन तें ॥ १ ॥
सुत्रधारी तूं हें सकळचाळिता । कासया अनंता भार वाहों ॥ २ ॥
वाहिले संकल्प न पवती सिद्धी । येऊं देहबुद्धिवरि नये ॥ ३ ॥
तुका ह्मणे दुःखी करिती तरंग । चिंतूं पांडुरंग आवरून ॥ ४ ॥

॥ २०६७ ॥

सुखा मुखावाटा नयो हें वचन । व्हावें हें संतान द्रव्य कोणा ॥ १ ॥
फुकाचा विभाग पतनदुःखासी । दोहींमुळें त्यासी तेंचि साध्य २
नाइकावी निंदा स्तुति माझ्या कानें । सादर या मनें होऊनिया ॥३॥
तुका ह्मणे देव असाध्य यामुळें । आशामोहजाळें गुंतलिया ॥ ४ ॥

॥ २०६८ ॥

मायामोहजाळीं होतों सांपडला । परि या विठ्ठला कृपा आली १
काढूनि बाहेरि ठेविलों निराळा । कवतुक डोळां दाखविलें ॥ २ ॥
नाचे उडे माया करी कवतुक । नाशिवंत सुखें साच केलीं ॥ ३ ॥
रडे फुंदे दुःखें कुटितील माथा । एकासी रडतां तेंही मरे ॥ ४ ॥
तुका ह्मणे मज वाटतें नवल । मी माझें हे बोल ऐकोनिया ॥ ५ ॥

॥ २०६९ ॥

माया साक्षी आह्मी नेणों भीड भार । आप आणि वर नाहीं दोन्ही१॥
सत्याचियेसाठीं अवघाचि भर । नावडे व्यापार तुटीचा तो ॥ २ ॥
पोभाळितां चरे अंतरींचें दुःख । लांसे फांसें मुख उघडावें ॥ ३ ॥
तुका ह्मणे नव्हे स्फीतीचा हा ठाव । निवाड्यासी देव साक्षी केला४॥

॥ २०७० ॥

मुखीं विठ्ठलाचें नाम । मग कैंचा भवभ्रम ॥ १ ॥ चालतां बोलतां खातां । जेवितां निद्रा करितां ॥ २ ॥ सुखें असों संसारी । मग जवळीच हरि ॥ ३ ॥ मुक्तिवरील भक्ति जाण । अखंड मुखीं नारायण ॥ ४ ॥ मग देवभक्त जाला । तुका तुकीं उतरला ॥ ५ ॥

॥ २०७१ ॥

मुनि मुक्त जाले भेणें गर्भवासा । आह्मां विष्णुदासां सुलभ तो १॥
अवघाचि संसार केला ब्रह्मरूप । विठ्ठलस्वरूप ह्मणोनिया ॥ २ ॥
पुराणीं उपदेश साधन उद्भट । आह्मां सोपी वाट वैकुंठींची ॥ ३ ॥
तुका ह्मणे जना सकळांसहित । घेऊं अखंडित प्रेमसुख ॥ ४ ॥

॥ २०७२ ॥

मोक्षपद तुच्छ केलीं याकारणें । आह्मां जन्म घेणें युगायुगीं ॥ १ ॥
विटे ऐसें सुख नव्हे भक्तिरस । पुडतीपुडती आस सेवावें हें ॥२॥
देवा हातीं रूप धरवूं आकार । नेदूं निराकार होऊं त्यासी ३॥
तुका ह्मणे चित्त निवांत राहिलें । ध्याईं तीं पाउलें विटेवरि ॥ ४ ॥

॥ २०७३ ॥

ह्मणउनि खेळ मांडियेला ऐसा । नाहीं कोणी दिशा वर्जीयेली ॥१॥
माझिया गोतें हे वसले सकळ । न देखिजे मूळ विटाळाचें ॥ २ ॥
करूनि ओळखी दिली एकसरें । न देखों दुसरें विषमासी ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं काळापाशीं गोवा । स्थिति मति देवा वांचूनिया४॥

॥ २०७४ ॥

मृत्यु लोकीं आह्मा आवडती परि । नाहीं एका हरिनामेंविण ॥ १॥
विटलें हें चित्त प्रपंचापासूनि । वमन तें मनीं बैसलेंसे ॥ २ ॥
सोनें रूपें आह्मां मृत्तिके समान । माणिके पाषाण खडे तैसे ॥ ३ ॥
तुका ह्मणे तैशा दिसतील नारी । रिसाचियापरि आह्मांपुढें ॥ ४ ॥

॥ २०७५ ॥

याचिया आधारें राहिलों निश्चित । ठेवूनिया चित्त पायीं सुखें १
माझें सुख दुःख जाणे हित फार । घातलासे भार पांडुरंगा ॥ २ ॥
कृपेचीं पोसणीं ठायींचीं अंकिलीं । ह्मणउनि लागली यास चिंता३
मन राखे हातीं घेउनिया काठी । इंद्रियें तापटीं फांकों नेदी ॥ ४ ॥
तुका ह्मणे यासी अवघड नाहीं । शरणागता कांहीं रक्षावया ॥५॥

॥ २०७६ ॥

यासी सवे लागली जीवा । गोडी हेवा संगाचा॥ १॥ परतें न सरवे दुरी । क्षण हरीपासूनि ॥ २ ॥ झालें तरी काय तंट । आतां चट न संडे ॥ ३ ॥ तुका ह्मणे चक्रचाळे । वेड बळें लाविलें ॥ ४ ॥

॥ २०७७ ॥

याती मतिहिन रूपें लीन दीन । आणीक अवगुण जाणोनिया ॥१॥
केला त्या विठ्ठलें माझा अंगीकार । ऐसा हा विचार जाणोनिया २
जें कांहीं करितों तें माझें स्वहित । आली हे प्रचित कळों चित्ता ३
झालें सुख जीवा आनंद अपार । परमानंदें भार घेतला माझा ४॥
तुका ह्मणे यासी नांवाचा अभिमान । म्हणोनि शरण तारी बळें ५

॥ २०७८ ॥

येणें जाणें तरी । राहे देव कृपा करी ॥ १ ॥ ऐसें तंव पुण्य नाहीं । पाहातां माझे गांठी कांहीं ॥ २॥ भय निवारिता । कोण वेगळा अनंता ॥ ३ ॥ तुका ह्मणे वारे भोग । वारी तरी पांडुरंग ॥ ४ ॥

॥ २०७९ ॥

राम राज्य राम प्रजा लोकपाळ । एकचि सकळ दुजे नाहीं ॥ १ ॥
मंगळावाचूनि उमटेना वाणी । अखंडचि खाणी एकी रासी ॥ २ ॥
मोडलें हें स्वामी ठायाठाव सेवा । वाढवावा हेवा कोणच्या अंगें ३
तुका ह्मणे अवघें दुमदुमिलें देवें । उरलें तें गावें हेंचि आतां ॥ ४ ॥

॥ २०८० ॥

रिद्धिसिद्धी दासी कामधेनु घरीं । परि नाहीं भाकरी भक्षावया ॥१॥
लोडें बालिस्तें पलंग सुपति । परि नाहीं लंगोटी नेसावया ॥ २ ॥
पुसाल तरि आम्हां वैकुंठींचा वास । परि नाहीं राह्यास ठाव कोठें ३
तुका ह्मणे आम्ही राजे त्रैलोक्याचे । परि नाहीं कोणाचे उणें पुरें ४॥

॥ ८०८१ ॥

लटिकियाचिया आशा । होतों पडिलों वोळसा । होउनिया दोषा । पात्र मिथ्या अभिमानें ॥१॥ बरवी उघडली दृष्टी । नाहीं तरी होतों कष्टी । आक्रंदते सृष्टी । मात्र या चेष्टांनीं ॥२॥ मरणाची नाहीं शुद्धी । लोभीं प्रवर्तली बुद्धी । परती तों कधीं । घडेचिना माघारीं ३ सांचूनि मरे धन । लावी पोरांसी भांडण नाहीं नारायण । तुका ह्मणे स्मरीला ४

॥ २०८२ ॥

लावुनि काहाळा । सुखें करितों सोहळा ॥१॥ सादवीत गेलों जना । भय नाहीं सत्य जाणा ॥ २ ॥ गात नाचत विनोदें । टाळ घाग-र्‍यांच्या छंदें ॥ ३ ॥ तुका ह्मणे भेव । नाहीं पुढें येतो देव ॥ ४ ॥

॥ २०८३ ॥

लेंकरा आईतें पित्याची जतन । दावी निजधन सर्व जोडी ॥ १ ॥ तयापरि आमचा जालासे सांभाळ । देखिलाचि काळ नाहीं आह२ भुकेचे संनिध वसे स्तनपान । उपायाची भिन्न चिंता नाहीं ॥३॥ आळवूनि तुका उभा पैल थडी । घातली या उडी पांडुरंगें ॥ ४ ॥

॥ २०८४ ॥

वचनाचा अनुभव हातीं । बोलाविती देव मज॥१॥ परि हें न कळे अभाविकां । जडलोकां जिवांसी ॥ २ ॥ अमृत हे प्रसादिक । कृपा भीक स्वामीची ॥ ३ ॥ तुका ह्मणे वरावरी । जातों तरी सांगत ४॥

॥ २०८५ ॥

वचना फिरती अधम जन । नारायण तो नव्हे ॥१॥ केला आता अंगीकार । न मनी भार समर्थ ॥२॥ संसाराचा नाहीं पांग । देव सांग सकळ ॥३॥ तुका ह्मणे कीर्ति वाणूं । मध्यें नाणूं संकल्प॥४॥

॥ २०८६ ॥

वारकरी पायांपाशीं । आले त्यांसी विनविलें ॥ १ ॥ काय काय तें आइका । विसरों नका रंकासी ॥२॥ चिंतावोनि चिंता केली । हे रा-हिली अवस्था ३ तुका ह्मणे संसारा । रुसलों खरा यासाठीं ॥४॥

॥ २०८७ ॥

विठो सांपडावया हातीं । ठावी झाली एक गती । न धरीं भय चित्तीं । बळ किती तयाचें ॥ १ ॥ लागे आपणचि हातीं । किंव भाकावी काकुलती । करी मग चित्तीं । असेल तें तयाचें ॥ २ ॥ एकलिया भावबळें । कें सांपडे तो काळें । वैष्णवांच्या मेळें । उभा ठाके हाकेसी ॥ ३ ॥ बांधा माझिया जीवासी । तुका ह्मणे प्रेम-पाशीं । न सोडीं तयासी । सर्वस्वासी उदार ॥ ४ ॥

॥ २०८८ ॥

विश्वास तो देव । ह्मणुनि धरियेला भाव ॥ १ ॥ माझी वद-

वितो वाणी । ज्यानें धरिली धरणी ॥ २ ॥ जोडिलीं अक्षरें । नव्हती बुद्धीचीं उत्तरें ॥ ३ ॥ नाहीं केली आटी । कांहीं मानदंभासाठीं ॥ ४ कोणी भाग्यवंत । तया कळेल उचित ॥ ५ ॥ तुका ह्मणे झरा । आहे मुळींचाचि खरा ॥ ६ ॥

॥ २०८९ ॥

वेद अनंत बोलिला । अर्थ इतकाचि साधिला ॥ १ ॥ विठोबासी शरण जावें । निजनिष्ठे नाम गावें २ सकळशास्त्रांचा विचार । अंतीं इतकाचि निर्धार ३ अठरापुराणीं सिद्धांत । तुका ह्मणे हाचि हेत ४

॥ २०९० ॥

वेदाचा तो अर्थ आम्हासीच ठावा । येरांनीं वाहावा भार माथा १॥
खादल्याची गोडी देखिल्याची नाहीं । भार धन वाही मजुरीचें २ ॥
उपत्तिपाळण संहाराचें निज । जेणें नेलें बीज त्याचे हातीं ॥ ३ ॥
तुका म्हणे आलें आपणाची फळ । हातोहातीं मूळ सांपडलें ॥ ४ ॥

॥ २०९१ ॥

वोखटा तरी मी विटलों देहासी । पुरे आतां ऐसी जोडी पुन्हां १॥
किती मरमर सोसावीं पुढती । राहिलों संगती विठोबाचे ॥ २ ॥
आतां कोण याचा करील आदर । जावो कळिवर विटंबोनी ॥३॥
तुका ह्मणे आतां सांडी तोचि सांडीं । कोण फिरे लंडी यासी मागें ४

॥ २०९२ ॥

वृक्ष वल्ली आम्हां सोयरीं वनचरें । पक्षीही सुस्वरें आळविती॥१॥
येणें सुखें रुचे एकांताचा वास । नाहीं गुणदोष अंगा येत ॥ २ ॥
आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथें मन क्रीडा करी ॥ ३ ॥
कंथा कमंडलु देहउपचारा । जाणवितो वारा अवसरू ॥ ४ ॥
हरिकथा भोजन परवडी विस्तार । करोनि प्रकार सेवूं रुची ॥५॥
तुका म्हणे होय मनासीं संवाद । आपुलाचि वाद आपणांसी ॥६॥

॥ २०९३ ॥

शास्त्राचें जें सार वेदांची जो मूर्ति । तो आह्मां सांगाती प्राणसखा१
ह्मणउनी नाहीं आणिकांचा पांग । सर्व जालें सांग नामें एका ॥२॥
सगुण निर्गुण जयाचीं हीं अंगें । तोचि आह्मांसंगें क्रीडा करी ३॥
तुका ह्मणे आह्मी विधीचे जनिते । स्वयंभू आइते केले नव्हों ४ ॥

॥ २०९४ ॥

शिकवूनि बोल । केलें कवतुक नवल ॥ १ ॥ आपणियां रंजविलें । बापें माझिया विठ्ठलें ॥२॥ हातीं प्रेमाचें भातुकें । आह्मां देऊनिया निकें ॥ ३ ॥ तुका करी टाहो । पाहे रखुमाईचा नाहो ॥ ४ ॥

॥ २०९५ ॥

शीतळ साउली आमुची माउली । विठाई वोळली प्रेमपान्हा ॥१॥
जाऊनि वोसंगा रिघेन वोरसें । लागलें तें इच्छे पीइन वरी ॥ २ ॥
कृपा तनु माझी सांभाळी दुभोनि । अमृतसंजीवनी लोटलीसे ३॥
आनंदाचा ठाव झाला माझे चित्तीं । सागर तो किती उपमेसी ४॥
सैर जाये पडे तयेसी सांकडें । सांभाळीत पुढें मागें आस ॥ ५ ॥
तुका ह्मणे चिंता कैसी ते मी नेणें । लडिवाळ तान्हें विठाईचें ॥६॥

॥ २०९६ ॥

सद्गुरूचे चरणीं ठेविला मस्तक । देउनिया हस्तक उठविलें ॥ १ ॥
उठविलें मज देउनिया प्रेम । भावार्थें सप्रेम नमस्कारी ॥ २ ॥
नमस्कारीं त्याला सद्गुरुरायाला । तुका ह्मणे बोला नाम वाचे ३॥

॥ २०९७ ॥

सद्गुरूनें मज आशीर्वाद दिला । हरुष भरला हृदयीं माझे ॥ १ ॥
हृदयींचा भाव कळला गुरूसी । अनंदउल्हासी बोले मज ॥ २ ॥
बोले मज गुरुकृपा तो करुनि । तुका म्हणे मनीं आनंदलों ॥ ३ ॥

॥ २०९८ ॥

सत्तावर्तें मन । पाळी विठ्ठलाची आण ॥ १ ॥ आज्ञा वाहोनिया शिरीं । सांगितलें तेंचि करीं ॥२॥ सरलीसे धांव । नलगे वाढवावी हांव ॥ ३ ॥ आहे नाहीं त्याचें । तुका म्हणे कळे साचें ॥ ४ ॥

॥ २०९९ ॥

सर्व काळ डोळां बैसो नारायण । नयो अभिमान आड मध्यें ॥१॥
धाड पडो माझ्या थोरपणावरि । वाचे नरहरि उच्चारीन ॥ २ ॥
जळो अंतरींचें सर्व जाणपण । विवादवचन अहंतेचें ॥ ३ ॥
सकळा चरणीं गळित माझा जीव । तुका ह्मणे भाव एकविध ४ ॥

॥ २१०० ॥

सर्वकाळ माझे चित्तीं । हेचि खंती राहिली ॥ १ ॥ बैसलें तें रूप डोळां । वेळोवेळां आठवे ॥२॥ वेव्हाराची सरली मात । अखंडित अनुसंधान ॥ ३ ॥ तुका ह्मणे वेध झाला । अंगा आला श्रीरंग ४॥

॥ २१०१ ॥

सर्वविशीं आम्हीं हेचि जोडी केली । स्वामीची साधिली चरणसेवा १
पाहिलेंचि नाहीं मागें परतोनि । जिंकिला तो क्षणीं क्षण काळ ॥२॥
नाहीं पडों दिला विचाराचा गोवा । नाहीं पोटीं हेवा येऊं दिला ३॥
केला लाग वेगीं अवघीची तांतडी । भावना ते कुडी दुराविली ४
कोठें मग ऐसें होतें सावकाश । जळो नया आस वेव्हाराची ॥५॥
तुका ह्मणे लाभ घेतला पालवीं । आतां नाहीं गोवी कशाचीही ६॥

॥ २१०२ ॥

संतांचीं उच्छिष्टें बोलतों उत्तरें । काय म्यां गव्हारें जाणावें हें १॥ विठ्ठलाचें नाम घेतां नये शुद्ध । तेथें मज बोध काय कळे ॥ २ ॥ करितों कवतुक बोबड्या उत्तरीं । ह्मणी मजवरि कोप धरा ॥ ३ ॥ काय माझी याति मेणां हा विचार । काय मी तें फार बोलों नेणें४ तुका ह्मणे मज बोलवितो देव । अर्थ गुह्य भाव तोचि जाणे ॥५॥

॥ २१०३ ॥

संसाराच्या नांवें घालूनिया शून्य । वाढता हा पुण्य धर्म केला १॥ हरिभजनें हें धवळिलें जग । चुकविला लाग कळिकाळाचा ॥ २ ॥ कोणांही साधनांचा नलगेचि पाग। करणें केला त्याग देहबुद्धी ॥३॥ तुका ह्मणे सुख समाधि हरिकथा । नेणें भवव्यथा गाईल तो ॥४॥

॥ २१०४ ॥

संसार तो कोण लेखे । आह्मां सखे हरिजन ॥ १ ॥ काळ ब्रह्मानंदें सरे । आवडी उरे संचली ॥२॥ स्वप्नीं तेही नाहीं चिंता । रात्री जातां दिवस ३ तुका ह्मणे ब्रह्मरसें । होय सरिसें भोजन ॥ ४ ॥

॥ २१०५ ॥

साकरेच्या योगें वखें । राजा कागदातें देखे ॥ १ ॥ तैसें आम्हा मनुष्यपण । रामनाम कोण्यागुणें ॥ २ ॥ फिरंगीच्या योग करीं । राजा काष्ट हातीं धरी ॥३ ॥ रत्नकनक योगें लाख । कंठीं धरिती श्रीमंत लोक ॥४॥ देवा देव पाट । देव्हाऱ्यावरी बैसे स्पष्ट ॥ ५ ॥ ब्रह्मानंदयोगें तुका । पढीयंता सज्जन लोका ॥ ६ ॥

॥ २१०६ ॥

सांगों जाणती शकून। भूत भविष्य वर्तमान ॥१॥ त्यांचा आह्मासी कंटाळा । पाहों नावडती डोळा ॥ २ ॥ रिद्धिसिद्धींचे साधक । वाचासिद्ध होती एक ३ तुका म्हणे जाती। पुण्यक्षयें अधोगती ॥४॥

॥ २१०७ ॥

सावध झालों सावध झालों । हरिच्या आलों जागरणा ॥१॥ पळोनिया गेली झोंप । होतें पाप आड तें ॥ २ ॥ तेथें वैष्णवाचे भार । जयजयकार गर्जतसे ३ तुका ह्मणे तया ठाया । ओल छाया कृपेची४

॥ २१०८ ॥

सोसें सोसें मारूं हाका । होईल चुका ह्मणऊनि ॥ १ ॥ मागें पुढें क्षणभरी । नव्हे दुरी अंतर ॥२॥ नाम मुखीं बैसला चाळा । वेळोवेळा पडताळीं ॥३॥ तुका ह्मणे सुखी केलें। या विठ्ठलें बहुतसी ४॥

॥ २१०९ ॥

शिकविला तैसा पढों जाणे पुसा । कैंची साच दशा तैसी अंगीं १॥ स्वप्नींच्या सुखें नाहीं होत राजा । तैसा दिसे माझा अनुभव ॥२॥

कासया हा केला जिव्हे अळंकार । पायांसीं अंतर दिसतसें ॥ ३ ॥ दर्पणीचें धन हातीं ना पदरीं । डोळां दिसे परी सत्य बिये ॥४॥ आस केली तरी लाळचि घोटावी । ठकाठकी तेवीं दिसतसे ॥ ५॥ कवित्वें रसाळ वद्विली वाणी । साक्षही पुराणीं घडे ऐशी ॥६॥ तुका म्हणे गुरें राखोनि गोवारी । माझीं म्हणे परि लाभ नाहीं ७॥

॥ २११० ॥

सुकाळ हा दिवस रजनी । नित्य धणी नवीच ॥ १ ॥ करूण सेवूं नानापरी । राहे उरी गोडीनें ॥ २ ॥ सरे ऐसा नाहीं झरा । पंक्ती करा समवेत ३ तुका म्हणे बरवा पान्हा । कान्हाबाई माउलीचा ४

॥ २१११ ॥

सुखाचें ओतलें । दिसे श्रीमुख चांगलें ॥ १ ॥ मनें धरिला अभिलाष । मिठी घातली पायांस ॥२॥ होतां दृष्टादृष्टी । ताप गेला उठाउठी ॥ ३ ॥ तुका म्हणे झाला । लाभें लाभ दुणावला ॥ ४ ॥

॥ २११२ ॥

सुखें होतों कोठें घेतली सुती । बांधविला गळा आपुले हातीं ॥१॥ काय करूं बहु गुंतलों आतां । नये सरतां मागें पुढें ॥ २ ॥ होतें गांठीं तें सरलें येतां । आणीक माथां ऋण जालें ॥ ३ ॥ सोहकरलियाविण गमाविलें पिक । रांडापोरें भिके लावियेलीं ॥४॥ बहुतांचीं बहु घेतलीं घरें । न पडे पुरें कांहीं केल्या ॥ ५ ॥ तुका म्हणे कांहीं न धरावी आस । जावें हें सर्वस्व टाकोनिया ६॥

॥ २११३ ॥

स्मरतां कां घडे नास । विष्णूदास यावरी ॥ १ ॥ ऐसी सीमा जाली जगीं । तरी मी वेगीं अनुसरलों २ धरिलें तें निवडे आतां । न घडे चित्ता वेगळें ॥३॥ तुका म्हणे नाश नाहीं । पुराणेंही गर्जती ४

॥ २११४ ॥

हरिनामाचें करूनि तारूं । भवसिंधुपार उतरलों ॥ १ ॥ फावलें फावलें आतां । पायीं संतां विनटलों ॥ २ ॥ हरिनामाचा शस्त्र घोडा । संसार गाडा छेदिला ॥३॥ हरिनामाचें धनुष्यकांडें । विन्मुख तोंडें कळिकाळ ॥४॥ येणेंचि बळें सरते आम्हीं । हरिच्या नामीं लोकीं तिहीं ५ तुका म्हणे झालों साचे । श्रीविठ्ठलाचे डिंगर ६॥

॥ २११५ ॥

हा गे माझा अनुभव । भक्तिभाव भाग्याचा ॥ १ ॥ केला ऋणी नारायण । नव्हे क्षण वेगळा ॥ २ ॥ घालोनिया भार माथां । अवघी चिंता वारली ॥३॥ तुका म्हणे वचनासाठीं । नाम कंठीं धरियेलें ४

॥ २११६ ॥

हाचि परमानंद आलंगीन बाही । क्षेम देतां ठायीं द्वैत तुटे ॥ १ ॥

बोलायासि मात मन निवे हर्षे चित्त । दुणी वाढे प्रीत प्रेमसुख॥२॥
जनांत भूषण वैकुंठीं सरता । फावलें स्वहिता सर्वभावें ॥ ३ ॥
तुटला वेव्हार माया लोकाचार । समूळ संसार पारुषला ॥ ४ ॥
तुका म्हणे तो हा विठ्ठलाचि व्हावा । आणिकी या जीवा चाड नाहीं॥५॥

॥ २११७ ॥

हो कां नर अथवा नारी । ज्यांचा आवडता हरी ॥ १ ॥ ते मज विठोबासमान । नमूं आवडीनें प्राण ॥ २ ॥ ज्याचें अंतर निर्मळ । त्याचें सबाह्य कोमळ॥३॥तुका म्हणे भावें। जिव्हीं प्रेमें वोसंडावें ४

॥ २११८ ॥

होतें तैसें पायीं केलें विवेदन । अंतरलों दिन बहुत होतों ॥ १ ॥
संबोखुनी केलें समाधान चित्त । वोगरूनि भातें प्रेमरसे ॥ २ ॥
नामरत्नमणी करूनी भूषण । अलंकारमंडण माळा दिली ॥ ३ ॥
तुका म्हणे सुखें जालों निरामय । नामीं नामसोय निमग्नता ॥ ४ ॥

॥ २११९ ॥

होतों सांपडलों वेटी । जातां भेटी संसारा १ तों या वाटे कृपा केली । भेटी झाली विठोबासी ॥ २ ॥ होता भार माथां माझे । बहु ओझें अमुप ॥ ३ ॥ तुका ह्मणे केली चिंता । कोण दाता भेटेल ॥ ४ ॥

संतपर अभंग.

॥ २१२० ॥

श्रीसंतांचिया माथा चरणांवरी । साष्टांग हे करी दंडवत ॥ १ ॥
विश्रांती पावलों सांभाळ उत्तरीं । वाढलें अंतरीं प्रेमसुख ॥ २ ॥
डौरली हे काया कृपेच्या वोरसें । नव्हे अनारिसें उद्धरलों ॥ ३ ॥
तुका म्हणे मज न घडतां सेवा । पूर्वपुण्यठेवा वोढवला ॥ ४ ॥

॥ २१२१ ॥

अर्भकाचे सांटीं । पंतें हातीं धरिली पाटी ॥ १ ॥ तैसे संत जगीं । क्रिया करुनी दाविती अंगीं ॥२॥ बालकाचे चाली । माता जाणुनि पाउल घाली ॥ ३ ॥ तुका म्हणे नाव । जनासाठीं उदकीं ठाव ४॥

॥ २१२२ ॥

अवघा तो शकुन । हृदयीं देवाचे चरण ॥१॥ येथें नसतां वियोग । लाभा उणे काय मग । २॥ संग हरिच्या नामाचा । शुचिर्भूत सदा वाचा ॥३॥ तुका म्हणे हरिच्या दासा । शुभकाळ अवघ्या दिशा४

॥ २१२३ ॥

आह्मां सोयरे हरिजन । जनीं भाग्य निकंचन ॥ १ ॥ ज्याच्या धैर्या नाहीं भंग । भाव एकविध रंग ॥ २ ॥ भुके तान्हे चित्तीं । सदा देव आठविती ॥३॥ तुका ह्मणे धन । ज्याचें निज नारायण ॥ ४ ॥

॥ २१२४ ॥

अंगें अनुभव जाला मज । संतरजचरणाचा ॥१॥ सुखी जालों या सेवनें । दुःख नेणें यावरी ॥२॥ निर्माल्याचें तुळसीदळ । विष्णुजळ चरणींचें ॥३॥ तुका ह्मणे भवसार । करूनि फार मिश्रित ॥ ४ ॥

॥ २१२५ ॥

आले संत पाय ठेविती मस्तकीं । इहीं उभयलोकीं सरता केलों १ वंदीन पाउलें लोळेन चरणीं । आजि इच्छाधणी फिटईल ॥ २ ॥ अवघीं पूर्व पुण्यें जालीं सानुकूळ । अवघेचि मंगळ संतभेटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे कृतकृत्य जालों देवा । नेणें पार सेवा डोळां देखें ॥ ४ ॥

॥ २१२६ ॥

आह्मी नाचों तेणें सुखें । वाऊं टाळी गातों मुखें ॥ १ ॥ देव कृपेचा कोंवळा । शरणागता पाळी लळा ॥२॥ आह्मां जाला हा निर्धार । मागे तारिले अपार ॥३॥ तुका ह्मणे संतीं । वर्म दिलें आम्हां हातीं ४॥

॥ २१२७ ॥

आलिंगनें घडे । मोक्ष सायुज्यता जोडे ॥१॥ ऐसा संताचा महिमा। जाली बोलायाची सीमा ॥ २ ॥ तीर्थें पर्वकाळ । अवघीं पायांपें सकळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । त्यांची केली पावे सेवा ॥ ४ ॥

॥ २१२८ ॥

आजिचें हें मज तुम्हीं कृपादान । दिलें संतजन मायाबापीं ॥ १ ॥ आलीं मुखावाटा अमृत वचनें । उत्तीर्णता येणें नव्हे जन्में ॥ २ ॥ तुका म्हणे तुम्हीं उदार कृपाळ । शृंगारिता बाळ कवतुकें ॥ ३ ॥

॥ २१२९ ॥

आवडीची न पुरे धणी । प्रीत मनीं बैसली ॥१॥ नित्य नवा कळवळा । मायबाळामध्यें तो ॥ २ ॥ सुख सुखा भेटों आलें । होय वाल्हें पोटींचें ॥ ३ ॥ तुका म्हणे ब्रम्हानंदें । संतवृंदें चरणापें ४ ॥

॥ २१३० ॥

अग्निमाजी गेलें । अग्नि होऊन तेंच ठेलें ॥ १ ॥ काय उरलें तया पण । मागील तें नाम गुण २ लोह लागे परिस अंगीं । तोही भूषण जाला जगीं ॥ ३ ॥ सरिता ओहळा ओघा । गंगे मिळोनि जाल्या गंगा ॥ ४ ॥ चंदनाच्या वासें । तरु चंदन जाले स्पर्शें ॥ ५ ॥ तुका जडला संतां पायीं । दुजेपणा ठाव नाहीं ॥ ६ ॥

॥ २१३१ ॥

ऐशा भाग्यें जालों । तरी धन्य जन्मा आलों ॥ १ ॥ रुळें तळीले पायरी । संत पाय देती वरी ॥२॥ प्रेमामृतपान । होईल चरणरजें स्नान ॥ ३ ॥ तुका ह्मणे सुखें । तया हरतील दुःखें ॥ ४ ॥

॥ २१३२ ॥

एका हातीं टाळ एका हातीं चिपळिया । घालिती हुंबरी एक वाहाती टाळिया ॥ १ ॥ मातले वैष्णव नटती नाना छंदें । नाहीं चाड मोक्षपदें भजनीं आवडी ॥ २ ॥ हाका अरोळिया गीत वाद्यें सुख सोहळे । जाय ते न कळे केव्हां रजनी दिवस ॥ ३ ॥ तीर्थीं नाहीं चाड नलगे जावें वनांतरा । तुका ह्मणे हरिहरात्मकचि पृथ्वी ४॥

॥ २१३३ ॥

ब्रह्म सर्वगत सदा सम । जेथें आन नाहीं विषम । तया जाणती ते अति दुर्गम । तयांचि भेटी झालिया भाग्य परम ॥ १ ॥ ऐसे पेसियानें भेटती ते साधु । ज्याच्या दर्शनें तुटे भवबंधु । जे कां सच्चिदानंदीं नित्यानंदु । जे कां मोक्षसिद्धी तीर्थां वंद्यु ॥ २ ॥ भाव सर्वकारण मूळ बंदु । सदा समबुद्धि नास्तिकधभेदु । भूतकृपा मोडी द्वेषकंदु । शत्रु मित्र पुत्र सम करी बंधु ॥ ३ ॥ मन बुद्धि काया वाचा शुद्ध करीं । रूप सर्वत्र देखोनि नमस्कारीं । लघुता सर्वभावें अंगीकारीं । सांडीमांडी मीतूंपण ऐसो थोरी ॥४॥ अर्थ-कामचाड नाहीं चित्ता । मानामान मोह माया मिथ्या । वर्ते समा-धानी जाणोनि नेणता । साधु भेट देती तया अवचिता ॥ ५ ॥ मनीं दृढ धरीं विश्वास । नकरी सांडी मांडीचा सायास । साधु-दर्शन नित्यकाळ त्यास । तुका ह्मणे जो विटला जाणीवेस ॥ ६ ॥

॥ २१३४ ॥

ऐसा ज्याचा अनुभव । विश्व देव सत्यत्वें १ देव तया जवळी असे । पाप नाशे दर्शनें ॥ २ ॥ कामक्रोधा नाहीं चाली । भूतीं जाली समता ॥ ३ ॥ तुका ह्मणे भेदाभेद । गेले वाद खंडोन ॥ ४ ॥

॥ २१३५ ॥

उदकीं कालवी शेण मलमूत्र । तो होय पवित्र कासवानें ॥ १ ॥ उद्धाराशी ठाव नाहीं भाग्यहीना । विन्मुख चरणा संतांचिया २ दुखवी तो बुडे सांगडीचा तापा । अतिल्याई पापाचीच मूर्ति ॥३॥ तुका ह्मणे जेव्हां फिरते कपाळ । तरी अमंगळ योग होतो ॥ ४ ॥

॥ २१३६ ॥

उजळलें भाग्य आतां । अवघी चिंता वारली ॥ १ ॥ संतदर्शनें हा लाभ । पद्मनाभ जोडला ॥२॥ संपुष्ट हे हृदयपेटी करूनि पोटीं सांठवूं ॥३॥ तुका ह्मणे होता ठेवा । तो या भावा सांपडला ॥ ४ ॥

॥ २१३७ ॥

करणें तें देवा । हेचि एक पावे सेवा ॥१॥ अवघें घडे येणें सांग ।

भक्त देवाचें तें अंग ॥ २ ॥ हेंचि एक वर्म । काय बोलिला तो धर्म ॥ ३ ॥ तुका ह्मणे खरें । खरें त्रिवाचा उत्तरें ॥ ४ ॥

॥ २१३८ ॥

करितां या सुखा । अंतपार नाहीं लेखा १ माथां पडती संतपाय । सुख कैवल्य तें काय ॥ २ ॥ ऐसा लाभ नाहीं । दुजा विचारितां कांहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे गोड । तेथें पुरे माझें कोड ॥ ४ ॥

॥ २१३९ ॥

कां न वजावें बैसोनि कथे । ऐसें ऐका हो श्रोते । पांडुरंग तेथें । उभा असे तिष्ठत ॥१॥ ह्मणऊनि करी धीर । लक्ष लावूनि सादर । भवसिंधुपार । असेल ज्या तरणें ॥ २ ॥ कथे कांहीं अणुमात्र । बोलावें हा वृत्तांत । देवभक्तां चित्त । समरसीं खंडणा ॥ ३ ॥ कां वैष्णवा पुजावें । ऐका घेईल जो भावें । चरणरजा शिवें । चोडविला मस्तक ॥ ४ ॥ ऐसें जाणा रे निभ्रांत । देव वैष्णवांचा अंकित । अलिप्त अतीत । परमित त्यासाठीं ॥५॥ घालोनि लोळणी । तुका आला लोटांगणी । वंदी पायवणीं । संतचरणींचें माथां ॥६॥

॥ २१४० ॥

काय माझी संत पाहाती जाणीव । सर्व माझा भाव त्यांचे पायीं १ कारण सरतें करा पांडुरंगीं । भूषणाची जगीं काय चाड ॥ २ ॥ बोबड्या उत्तरीं ह्मणें हरिहरि । आणीक भीकारी नेणें दुजें ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुम्ही विठ्ठलाचे दास । करितों मी आस उच्छिष्टाची ४

॥ २१४१ ॥

काय वाणूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥ थोरींव सांडिली आपुली परिसें । नेणें सिवों कैसें लोखंडासी २ ॥ जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारें ३ ॥ भूतांची दया हे भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्त्रवतसे ॥ ५ ॥

॥ २१४२ ॥

काय सांगों आतां संतांचे उपकार । मज निरंतर जागविती ॥ १ ॥ काय द्यावें त्यांसीं व्हावें उतराई । ठेवितां हा पायीं जीव थोडा २ सहज बोलणें हित उपदेश । करूनि सायास शिकविती ॥ ३ ॥ तुका ह्मणे वत्स धेनुवेचा चित्तीं । तैसे मज येती सांभाळीत ॥ ४ ॥

॥ २१४३ ॥

कुळींची हे कुळदेवी । केली ठावी संतांनीं ॥१॥ बरवें झालें शरण गेलों । उगविलों संकटीं ॥ २ ॥ आणिला रूपाही बळें । करूनि खळें हरिदासीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे समागमें । नाचों प्रेमें लागलों ॥ ४ ॥

॥ २१४४ ॥

केला कईवाड संतांच्या आधारें । अनुभवें खरें कळों आलें ॥ १ ॥
काय जीवित्वाची धरूनिया आशा । व्हावें गर्भवासा पात्र भेणें ॥२॥
अबाळीनें जावें निश्चितीच्या ठायां । रांडा रोटा वाया करूं नये ॥३॥
तुका ह्मणे बळी देतां तें निधान । भिकेसाठीं कोण राज्य देतो ॥४॥

॥ २१४५ ॥

कोण त्याचा पार पावला धुंडितां । पुढें विचारितां विश्वंभरा ॥१॥
अणुरेणु सूक्ष्मस्थुळा पार नाहीं । श्रुती नेती त्याही खुंटलिया ॥२॥
फळांत कीटक येवढें आकाश । ऐसी तरुवरास अनेक किती ॥३॥
दाविलें अनंतें अर्जुनासि पोटीं । आणीक त्या सृष्टि कृष्णलोक ॥४॥
तुका ह्मणे लागा संतांचिया कासे । ठाव घेतां कैसे वांचा जीवें ॥५॥

॥ २१४६ ॥

कोणा पुण्या फळ आलें । आजि देखिलीं पाउलें ॥१॥ ऐसें नेणों नारायणा । संतीं सांभाळिलें दीना ॥ २ ॥ कोण लाभकाळ । दीन आजीचा मंगळ ॥३॥ तुका ह्मणे जाला । एवढा लाभ विठ्ठला ४ ॥

॥ २१४७ ॥

कोणा पुण्यें यांचा होईन सेवक । जींही इंद्रादिक दुराविले ॥ १ ॥
ऐसें वर्म मज दावीं नारायणा । अंतरींच्या खुणा प्रगटोनि ॥ २ ॥
बहु आवघड असे संतभेटी । तरि जगजेठी करुणा केली ॥ ३ ॥
तुका ह्मणे मग नये वृत्तीवरी । सुखाचे शेजारीं पहुडेन ॥ ४ ॥

॥ २१४८ ॥

कृपाळू सज्जन तुह्मी संत जन । हेंचि कृपादान तुमचें मज ॥ १ ॥
आठवण तुह्मी द्यावी पांडुरंगा । कीव माझी सांगा काकुलती ॥२॥
अनाथ अपराधी पतित आगळा । परि पायां वेगळा नका करूं ३॥
तुका ह्मणे तुम्ही निरविल्यावरी । मग मज हरी उपेक्षीना ॥ ४ ॥

॥ २१४९ ॥

खळा सदा क्षुद्रीं दृष्टी । करी कष्टी सज्जना ॥१॥ करिती आपुलाले परी । धणीवरी व्यापार ॥ २ ॥ दया संतां भांडवल । वेंची बोल उपकार ॥ ३ ॥ तुका ह्मणे आपुलालें । उसंतिलें ज्यांनीं तें ॥ ४ ॥

॥ २१५० ॥

गंगाजला पाहीं पाठी पोटी नाहीं । अवगुण तो कांहीं अमृतासी १
रवि दीप काळिमा काय जाणे हिरा । आणिकां तिमिरां नाश तेणें २
कर्पूरकांडणीं काय कोंडा कणी । सिंधू मिळवणीं काय चाले ॥३॥
परिस चिंतामणी आणिकांच्या गुणी । पालटे लागोनि नव्हे तैसा ४
तुका ह्मणे तैसे जाणा संतजन । सर्वत्र संपूर्ण गगन जैसें ॥ ५ ॥

॥ २१५१ ॥

चिंतनें सरे तो धन्य जाणा काळ । सकळ मंगळ मंगळाचे ॥ १ ॥
संसारसिंधु नाहीं हरिच्यादासा । गर्भ वास कैसा नेणती ते ॥२॥
जनवन ऐसें कृपेच्या सागरें । दाटला आभारें पांडुरंग ॥ ३ ॥
तुका ह्मणे देवा भक्तांचें बंधन । दाखविलें भिन्न परी एक ॥ ४ ॥

॥ २१५२ ॥

चिंता नाहीं गांवीं विष्णुदासांचिये । घोष जयजयकार सदा ॥१॥
नारायण घरीं सांठविलें धन । अवघेंची वाण तया पोटीं ॥ २ ॥
सवंग सकळां पुरे धणीवरी । सेवावया नारी नर बाळा ॥ ३ ॥
तुका ह्मणे येणें आनंदी आनंदु । गोविंदें गोविंदु पिकाविला ॥ ४ ॥

॥ २१५३ ॥

जन्मा आलों त्याचें । आजि फळ जालें साचें ॥ १ ॥ तुम्हीं सांभाळिलें संतीं । भय निरसली खंती ॥२॥ कृतकृत्य जालों । इच्छा केली ते पावलों ॥३॥ तुका ह्मणे काळ । आतां करूं न शके बळ ॥ ४ ॥

॥ २१५४ ॥

जिचें पीडे बाळ । प्राण तियेचा विकळ १ ऐसा मातेचा स्वभाव । सूत्र दोरी एक जीव ॥ २ ॥ सुखाची विश्रांति । उमटे मातेचिये चित्तीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे संत । तुह्मी बहु कृपावंत ॥ ४ ॥

॥ २१५५ ॥

झुंझार ते एक विष्णुदास जगीं । पापपुण्य अंगीं नातळे त्यां ॥ १ ॥
गोविंद आसनीं गोविंद शयनीं । गोविंद त्यां मनीं बैसलासे ॥ २ ॥
ऊर्ध्व पुंड्भाळीं कंठीं शोभे माळ । कांपिजे कळिकाळ तया भेणें ३॥
तुका ह्मणे शंखचक्रांचे शृंगार । नामामृतसार मुखामाजी ॥ ४ ॥

॥ २१५६ ॥

जे कां रंजले गांजले । त्यांसि ह्मणे जो आपुलें ॥ १ ॥ तोचि साधु वोळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥ २ ॥ मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ॥३॥ ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरि जो हृदयीं ॥४ ॥ दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥५॥ तुका ह्मणे सांगूं किती । तोचि भगवंताची मूर्ति ६ ॥

॥ २१५७ ॥

जें ज्याचें जेवण । तेंचि याचकासी दान ॥१॥ आतां जाऊं चोजवीत । जेथें बैसतील संत ॥ २ ॥ होतीं धालीं पोटें । मागें उरलीं उच्छिष्टें ॥ ३ ॥ तुका ह्मणे धांव । पुढें खुंटइल हांव ॥४ ॥

॥ २१५८ ॥

तीर्थाटणें एक तपें हुंबरती । नाथिलें धरिती अभिमान ॥ १ ॥
तैसे विष्णुदास नव्हती साबडे । एकाचिया पडे पायां एक ॥ २ ॥

अक्षरें आणिती अंगासी जाणीव । इच्छा ते गौरव पूज्य व्हावें ३ ॥
तुका ह्मणे विधिनिषेधाचे डोहीं । बुडाले त्यां नाहीं देव कधीं ४ ॥

॥ २१५९ ॥

तीर्थें फळती काळें जन्में आगळिया । संतदृष्टी पाया हेळामात्रें ॥१॥
सुखाचे सुगम वैष्णवांचे पाय । अंतरींचा जाय महाभेव ॥ २ ॥
काळेंही न सरे तपें समाधान । कथे मूढजन समाधिस्थ ॥ ३ ॥
उपमा द्यावया सांगतां आणीक । नाहीं तिन्ही लोक धुंडाळितां ४ ॥
तुका ह्मणे मी राहिलों येणें सुखें । संतसंगें दुःखें नासावया ॥ ५ ॥

॥ २१६० ॥

तुम्ही पाय संतीं । माझे ठेवियेले चित्तीं ॥ १ आतां बाधूं न शके काळ । जालीं विषम शीतळ ॥२॥ भय नाहीं मनीं । देव वसे घरीं रानीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे भये । आतां स्वप्नींही ते नये ॥ ४ ॥

॥ २१६१ ॥

तुम्ही संत मायबाप कृपावंत । काय मी पतित कीर्ती वाणूं ॥ १ ॥
आवतार तुह्मां धराया कारण । उद्धरावे जन जड जीव ॥ २ ॥
वाढावया सुख भक्ति भाव धर्म । कुळाचार नाम विठोबाचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे गुण चंदनाचे अंगीं । तैसे तुह्मी जगीं संतजन ॥ ४ ॥

॥ २१६२ ॥

तुह्मी साधु संत कैवल्यसागर । मोक्षाचें आगर तुह्मां घरीं ॥ १ ॥
तेथें मतिमंद काय बोलों वाणी । अमृताचे धणी पाणी कां घ्या ॥२॥
कोटि भानु तेजीं खद्योत बापुडें । तैसा तुह्मांपुढें काय बोलों ॥३॥
तुह्मी अवघे चिंतामणि कल्पतरूचीं वनें । त्यापुढें धांवणें मशकांनीं ४
वाराणशी क्षेत्र गंगा वाहे कोड । काय तेथें पाड कोंकणाचे ॥ ५ ॥
पल्लवाचा वारा हिमकरीं काय । गगनावरी छाय कोण करी ॥ ६ ॥
समुद्राची तृषा हरी ऐसा कोण । जगाची जी तान्ह निववितो ॥७॥
मेरूचा पाठार अवघी ते क्षिति । मशकाचे हातीं मुष्टि फावे ॥ ८ ॥
सिंहापुढें काय जंबूक आरोळी । मोतियांचे वोळी कांच काय ॥९॥
कापुरासी काय लावूनी उटावें । काय ओवाळावें दीपकासी ॥१०॥
तसे तुह्मी निरे ज्ञानाचे भरींव । तेथें स्यां बोलावें पाड काय ॥११॥
कृपानिधि तुह्मीं बोलाविलें बोला । सुखें न्याय केला तुमचा मी १२॥
अज्ञान मी वेडें म्हणवितों बाळ । माझा प्रतिपाळ करणें तुह्मां ॥१३॥
बोबडें बोलणें न धरावा कोप । क्षमा करा बाप कृपासिंधु ॥ १४ ॥
तुका ह्मणे तुह्मी संत बापमाय । भयें धरिले पाय कृपानिधि ॥१५॥

॥ २१६३ ॥

तेंच किती वारंवार । बोलों फार बोलिलें १ आतां माझें दंडवत ।

तुमच्या संत चरणांसी ॥२॥ आवडी ते नीच नवी । जाली जीवीं वसती ॥ ३ ॥ तुका ह्मणे बरवें जालें । घरा आलें बंदरीचें ॥ ४ ॥

॥ २१६४ ॥

ते माझे सोयरे सज्जन सांगाती । पाय आठविती विठोबाचे ॥ १ ॥ येरा मान विधि पाळनापुरतें । देवाचीं तीं भूतें ह्मणोनिया ॥ २ ॥ सर्वभावें जालों वैष्णवांचा दास । करीन त्यांच्या आस उच्छिष्टाची३ तुका ह्मणे जैसे उदास हरिदास । तैशी नाहीं आस आणिकांची ४

॥ २१६५ ॥

तृषाकाळीं उदकें भेटी । पडे मिठी आवडीची ॥१॥ ऐसियाचा हो कां संग । जिवलग संतांचा ॥ २ ॥ मिष्टान्नाचा योग भुके । ह्मणतां चुके पुरेसें ॥३॥ तुका ह्मणे माते बाळा । कळवळा भेटीचा ॥ ४ ॥

॥ २१६६ ॥

दसरा दिवाळी तोचि आह्मां सण । सखे संतजन भेटतील ॥ १ ॥ आमुप जोडल्या सुखाचिया राशी । पार या भाग्यासी न दिसे आतां२ धन्य दिवस आजी जाला सोनियाचा । पिकली हे वाचा रामनामें ३ तुका ह्मणे काय होऊं उतराई । जीव ठेवूं पायीं संतांचिये ॥ ४ ॥

॥ २१६७ ॥

दास झालों हरिदासांचा । बुद्धिकायामनेंवाचा १ तेथें प्रेमाचा सुकाळ । टाळमृदंगकल्लोळ । नासे दुष्टबुद्धि सकळ । समाधि हरि-कीर्तनीं ॥ २ ॥ ऐकता हरिकथा । भक्ति लागे त्या अभक्तां ॥ ३ ॥ देखोनि कीर्तनाचा रंग । कैसा उभा पांडुरंग ॥ ४ ॥ हें सुख ब्रह्मादिकां । नाहीं नाहीं ह्मणे तुका ॥ ५ ॥

॥ २१६८ ॥

दासां सर्व काळ । तेथें सुखाचा कल्लोळ ॥१॥ जेथें वसती हरिचे दास । पुण्य पिके पापा नास ॥ २ ॥ फिरे सुदर्शन । घेऊनिया नारायण ॥ ३ ॥ तुका ह्मणे घरीं । होय ह्मणियारा कामारी ॥४॥

॥ २१६९ ॥

देवाचा भक्त तो देवासीच गोड । आणिकांसी चाड नाहीं त्याची१ कवणाचा सोइरा नव्हेच सांगाती । अवघिया हातीं अंतरला ॥२॥ निष्काम वेडें ह्मणतील बापुडें । अवघिया सांकडें जाला कैसा ३॥ माझें ऐसें तया न ह्मणती कोणी । असे रानीं वनीं भलते ठायीं ४॥ प्रातःस्नान करी विभूतिचर्चन । देखोनिया जन निंदा करी ॥ ५ ॥ कंठी तुळसीमाळा बैसोनि निराळा । ह्मणती या चांडाळा काय जालें६ गातां शंका नाहीं बैसे भलते ठायीं । शिव्या देती आईबाप भाऊ७ घरीं बाइल ह्मणे कोठे ग्याली रांड । बरें होतें षंढ मरता तरी ॥८॥

जन्मोनि जाला अवघिया वेगळा । ह्मणोनि गोपाळा दुर्लभ तो ९ ॥
तुका ह्मणे जो संसारा रुसला । तेणेंचि टाकिला सिद्धपंथ ॥ १० ॥

॥ २१७० ॥

देवासी अवतार भक्तांसी संसार । दोहींचा विचार एकपणें ॥ १ ॥
भक्तांसी सोहळे देवाचिया अंगें । देव त्याच्या संगें सुख भोगी २
देवें भक्तां रूप दिलासे आकार । भक्तीं त्यांचा पार वाखाणिला ३
एका अंगीं दोन्हीं जालीं हीं निर्माण । देवभक्तपण स्वामीसेवा ४॥
तुका ह्मणे येथें नाहीं भिन्नभाव । भक्त तोचि देव देव भक्त ॥ ५ ॥

॥ २१७१ ॥

धन्य काळ संत भेटी । पायीं मिठी पडिली तो ॥ १ ॥ संदेहाची सुटली गांठी । झालों पोटीं शीतळ ॥२॥ भवनदीचा झाला तारा । या उतारा प्रसादें ३ तुका ह्मणे मंगल आतां । कोण दाता याहूनि ४॥

॥ २१७२ ॥

धन्य ते संसारीं । दयावंत जे अंतरीं ॥ १ ॥ येथें उपकारासाठीं । आलें घर ज्यां वैकुंठीं ॥ २ ॥ लोकिं वचन । नाहीं देहीं उदासीन ॥ ३ ॥ मधुरा वाणी ओटीं । तुका ह्मणे वाव पोटीं ॥ ४ ॥

॥ २१७३ ॥

धरावा तो बरा । ठाव वसतीचा थारा ॥ ॥ निजल्या जागविती । निज पुरवूनि देती ।२॥ एक वेवसाव । त्यांचा संग त्यांचा जीव ३ हितें केलें हित । ग्वाही एक एकां चित्त ॥ ४ ॥ विषमाचें कांहीं । आड तया एक नाहीं ॥५॥ तुका ह्मणे बरीं । घरा येतील त्यापरी ६॥

॥ २१७४ ॥

न करावी स्तुति माझी संतजनीं । होईल या वचनीं अभिमान १॥
भारें भवनदी जुतरवे पार । दुरावती दूर तुमचे पाय ॥ २ ॥
तुका ह्मणे गर्व पुरवील पाठी । होईल माझ्या तुटी विठोबाची ३॥

॥ २१७५ ॥

नमावे पाय हें माझें उचित । आशीर्वाद हित तुमाचिया ॥ १ ॥
कृपेचा वोरस न समाये पोटीं । म्हणोनि उफराटीं वचनें हीं ॥२॥
तुमची उष्टावळी हें माझें भोजन । झाडावें अंगण केरपुंजे ॥ ३ ॥
परि ऐसें पुण्य नाहीं माझे गांठीं । जेणें पडे मिठी पायांसवें ॥४॥
तुका ह्मणे राहे आठवण चित्तीं । ऐसी कृपा संतीं केली तुम्हीं ॥५॥

॥ २१७६ ॥

न लगे चंदना पुसावा परिमळ । वनस्पति मेळ हाकारूनी ॥ १ ॥
अंतरीचें धावें स्वभावें बाहेरी । धरितां ही परी आवरेना ॥ २ ॥
सूर्य नाहीं जागे करीतया जना । प्रकाश किरणा कर म्हूण ॥३॥
तुका ह्मणे मेघ नाचवी मयूरें । लपवितां खरें येत नाहीं ॥ ४ ॥

॥ २१७७ ॥

नाचे टाळी पिटी । प्रेमें अंग धरणी लोटी ॥ १ ॥ माझे सखे ते स-ज्जन । भोळे भाविक हरिजन ॥ २ ॥ न धरिती लाज । नाहीं जना-सवें काज ॥ ३ ॥ तुका ह्मणे दाटे । कंठ नेत्रीं जळ लोटे ॥ ४ ॥

॥ २१७८ ॥

नाहीं संतपण मिळत हें हाटीं । हिंडतां कपाटीं रानीं वनीं ॥ १ ॥ नये मोल देतां धनाचिया राशी । नाहीं तें आकाशीं पाताळीं तें २॥ तुका ह्मणे मिळे जिवाचिये साटीं । नाहीं तरी गोष्टी बोलूं नये ॥३॥

॥ २१७९ ॥

नाहीं साजत हा मोठा । मज अळंकार खोटा ॥१॥ असे तुमचा रजरेण । संतां पायींची वाहाण ॥ २ ॥ नाहीं स्वरूपीं ओळखी । भक्तिभाव करीं देखीं ॥ ३ ॥ नाहीं शून्याकारीं । अक्षर ओळखी अक्षरीं ॥ ४ ॥ नाहीं विवेक या ठायीं । आत्मा अनात्मा तें काई ॥ ५ ॥ कांहीं नव्हे तुका । पायां पडणें हें ऐका ॥ ६ ॥

॥ २१८० ॥

परमेष्टिपदा । तुच्छ मानिती सर्वदा ॥ १ ॥ हेंचि ज्याचें धन । सदा हरिचें स्मरण ॥२॥ इंद्रपदादिक भोग । भोग नव्हे तो भव-रोग ३ सार्वभौम राज्य । त्यासि कांहीं नाहीं काज ॥४॥ पाताळींचें आधिपत्य । ते तो मानिती विपत्य ॥ ५ ॥ योगसिद्धिसार । त्यासि वाटे तें असार ॥ ६ ॥ मोक्षायेयढं सुख । सुख नव्हेचि तें दुःख ७ तुका ह्मणे हरिविण । त्यासि अवघा वाटे सिण ॥ ८ ॥

॥ २१८१ ॥

पवित्र तो देह वाणी पुण्यवंत । जो वदे अच्युत सर्व काळ ॥ १ ॥
तयाच्या चिंतनें तरतील दोषी । जळतील रासी पातकाच्या ॥२॥
देव इच्छी रज चरणींची माती । धांवत चालती मागें मागें ॥ ३ ॥
काय त्या उरलें वेगळें आणीक । वैकुंठनायक जया कंठीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे देव भक्तांचा संगम । तेथें ओघ नाम त्रिवेणीचा ॥ ५ ॥

॥ २१८२ ॥

पाप ताप दैन्य जाय उठाउठीं । जालिया भेटी हरिदासांचि ॥ १ ॥
ऐसें बळ नाहीं आणिकांचे अंगीं तपें तीर्थें जगीं दानें व्रतें ॥ २ ॥
चरणींचें रज वंदी शूळ पाणी । नाचती कीर्तनीं त्यांचे माथां ॥३॥
भव तरावया उत्तम हे नाव । भिजों नेदी पाव हात कांहीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे मन जालें समाधान । देखिलया चरण वैष्णवांचे ॥ ५ ॥

॥ २१८३ ॥

पुण्य फळलें बहुता दिवसां । भाग्यउदयाचा ठसा । जालों स-न्मुख तो कैसा । संतचरण पावलों ॥ १ ॥ आजि फिटलें माझें

कोडें । बहुतां जन्माचें सांकडें । कोंदाटलें पुढें । परब्रह्म सांवळें २॥ आलिंगनें संतांचिया । दिव्य जाली माझी काया । मस्तक हा पायां । वरी त्यांच्या ठेवितों ॥ ३ ॥ तुका ह्मणे धन्य झालों । सुखें संता-चिया घालों । लोटांगणीं आलों । वैष्णव भार देखोनी ॥ ४ ॥

॥ २१८४ ॥

पुण्यवंत व्हावें । घेता सज्जनांचीं नांवें ॥१॥ नेघे माझे वाचे तुटी । महा लाभ फुकासाठीं ॥ २ ॥ विश्रांतीचा ठाव । पायीं संतांचिया भाव ॥ ३ ॥ तुका ह्मणे पापें । जाती संतांचिया जपें ॥ ४ ॥

॥ २१८५ ॥

पुनीत केलें विष्णुदासीं । संगें आपुलिया दोषी ॥ १ ॥ कोण पाहे तयांकडे । वीर विठ्ठलाचे गाढे । अशुभ त्यापुढें । शुभ होउ-निया ठाके ॥ २ ॥ प्रेमसुखाचिया रासी । पाप नाहीं ओखदासी ३ तुका ह्मणे त्यांनीं । केली वैकुंठ मेदिनी ॥ ४ ॥

॥ २१८६ ॥

पूजा समाधान । अतिशय वाढे सीण ॥ १ ॥ हें तो जाणां तुह्मी संत । आहे बोलिली ते नीत ॥२॥ पाहिजे तें केलें । सहज प्रसंगीं घडलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे माथा । पायीं ठेवीं तुह्मां संतां ॥ ४ ॥

॥ २१८७ ॥

पूजा पूज्यमान । कथे उभे हरिजन ॥ १ ॥ ज्याची कीर्ति वाखा-णिती । तेथें ओतली ते मूर्ती ॥ २ ॥ देहाचा विसर । केला आनंदें संचार ॥ ३ ॥ गेला अभिमान । लाज बोळविला मान ॥ ४ ॥ शोक मोह चिंता । याची नेणती ते वार्ता ॥ ५ ॥ तुका ह्मणे सखे । विठोबाचे ते सारिखे ॥ ६ ॥

॥ २१८८ ॥

प्रमाण हें त्याच्या बोला । देव भक्ताचा अंकिला ॥१॥ न पुसतां जातां नये । खालीं बैसतांही भिये ॥ २ ॥ अवघा त्याचा होत । जीव भावाही सहित ॥ ३ ॥ वदे उपचाराची वाणी । कांहीं माग ह्मणऊनि ॥४॥ उदासीनाच्या लागें । तुका ह्मणे धांवे मागें ॥ ५ ॥

॥ २१८९ ॥

प्रेम देवाचें देणें । देहभाव जाय जेणें । न करावी मनें । शुद्धी देशकाळाची ॥ १ ॥ मुक्त लज्जाविरहित । भाग्यवंत हरि-भक्त । झाले वोसंडत । नाम कीर्ति पवाडे ॥२॥ जोडी झाली अवि-नाश । जन्मोनि झाले हरिचे दास । त्यांस नव्हे गर्भवास । सौरस परब्रह्मीं ॥ ३ ॥ होचि वाहाती संकल्प । पुण्य प्रसंगाचे जप । तुका ह्मणे पाप । गांवीं नाहीं हरिजना ॥ ४ ॥

॥ २१९० ॥

बरवें देशावर झालें । काय बोले बोलावें ॥ १ ॥ लाभें लाभ दुणा-वला । जीव धाला दर्शनें ॥२॥ भाग्यें झाली संतभेटी आवडी पोटीं होती ते ॥ ३ ॥ तुका ह्मणे श्रम केला । अवघा आला फळासी ॥४॥

॥ २१९१ ॥

बोलिलों जैसें बोलविलें देवें । माझें तुह्मां ठावें जातिकुळ ॥ १ ॥
करा क्षमा कांहीं नका धरूं कोप । संत मायबाप दीनावरि ॥ २ ॥
वाचेचा चाळक झाला दावी वर्म । उचित ते धर्म मजपुढें ॥ ३ ॥
तुका ह्मणे घडे अपराध नेणता । द्यावा मज आतां ठाव पायीं ॥४॥

॥ २१९२ ॥

ब्रह्मज्ञान जरी कळे उठाउठी । तरि कां हिंपुटी वेदशास्त्रें ॥ १ ॥
शास्त्रांचें भांडण तप तीर्थाटण । पूर्वीचें भ्रमण याचसाठीं ॥ २ ॥
याचसाटीं जप याचसाटीं तप । व्यासेंही अमूप ग्रंथ केले ॥ ३ ॥
याजसाठीं संतपाय हे सेवावे । तरिच तरावें तुका म्हणे ॥ ४ ॥

॥ २१९३ ॥

भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास । गेले आशापाश निवारूनि ॥ १ ॥
विषय तो त्यांचा जाला नारायणा । नावडे धन जन माता पिता॥२
निर्वाणीं गोविंद असे मागें पुढें । कांहींच सांकडें पडों नेदी ॥३॥
तुका म्हणे सत्य कर्मा व्हावें साह्य । घातलिया भय नर्का जाणें ४॥

॥ २१९४ ॥

भक्तांचा महिमा भक्तचि जाणती । दुर्लभ या गति आणिकांसी ॥ १ ॥
जाणोनि नेणते झाले तेणें सुखें । न बोलोनि मुखें बोलताती ॥ २ ॥
अभेदूनि भेद राखियेला अंगीं । वाढावया जगीं प्रेमसुख ॥ ३ ॥
टाळ घोष कथा प्रेमाचा सुकाळ । मूढ लोकपाळ तरावया ॥ ४ ॥
तुका ह्मणे हें तो आहे तया ठावें । जींहीं एका भावें जाणीतलें ॥५॥

॥ २१९५ ॥

भक्तिसुखें जे मातले । ते कळिकाळा शूर झाले ॥१॥ हातीं बाण हरिनामाचे । वीर गर्जती विठ्ठलाचे ॥२॥ महा दोषा आला त्रास । जन्ममरणां केला नास ॥ ३॥ सहस्रनामाची आरोळी । एक एका-हूनि बळी ॥ ४ ॥ नाहीं आणिकांचा गुमान । ज्याचें अंकित त्यांवां-चून ॥५॥ तुका ह्मणे त्यांच्या घरीं । मोक्षसिद्धी या कामारी ॥ ६ ॥

॥ २१९६ ॥

भाग्यवंता ऐशी जोडी । परवडी संतांची ॥ १ ॥ धन घरीं पांडु-रंग । अभंग जें सरेना ॥ २ ॥ जनाविरहित हा लाभ । टाचे नभ सांटवण ॥ ३ ॥ तुका म्हणे विष्णुदासां । नाहीं आशा दुसरी ॥४॥

॥ २१९७ ॥

भार देखोनि वैष्णवांचे । दूत पळाले यमाचे ॥ १ ॥ आले आले वैष्णव वीर । काळ कांपती असुर ॥२॥ गरुडटकयाच्या भारें । भूमी गर्जे जयजयकारें ॥ ३ ॥ तुका ह्मणे काळ । पळे देखोयिया बळ ४

॥ २१९८ ॥

भाव बळे विष्णुदास । नाहीं नाश पावत ॥ १ ॥ योगभाग्य घरा येती । सर्व शक्ति चालत ॥ २ ॥ पित्याचें जें काय धन । पुत्रा कोण वंचील ॥ ३ ॥ तुका ह्मणे कडे बैसों । तेणें असों निर्भर ४ ॥

॥ २१९९ ॥

मनीं वसे त्याचें आवडे उत्तर । वाटे समाचार घ्यावा ऐसा ॥ १ ॥
जातीचें तें झुरे येर येरासाटीं । वियोगेंही तुटी नेघे कधीं ॥ २ ॥
भेटीची अपेक्षा वार्ता आदर । पुसे नव्हे धीर मागुताले ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझ्या जीवाचें जीवन । सोइरे हरिजन प्राणसखे ४ ॥

॥ २२०० ॥

माउलीची चाली लेंकराचे ओढी । तयालागी काढी प्राणें प्रीति १
ऐसी बाळिवंत आवडी जी देवा । संतमहानुभवा विनवितों ॥ २ ॥
मोहें मोहियेलें सर्वकाळ चित्त । विसरू तो घेत नाहीं क्षणें ॥ ३ ॥
तुका ह्मणे दिला प्रेमाचा वोरस । सांभाळिलें दास आपुले तें ४ ॥

॥ २२०१ ॥

माझिये जातीचें मज भेटो कोणी । आवडीची धणी फेडावया १॥
आवडे ज्या हरि अंतरापासूनि । ऐसियांचें मनी आर्त माझें ॥ २ ॥
तयालागी जीव होतो कासावीस । पाहातील वास नयन हे ॥ ३
सुफळ हा जन्म होईल तेथून । देतां आलिंगन वैष्णवांसी ॥ ४ ॥
तुका ह्मणे तोचि सुदिन सोहळा । गाऊं या गोपाळा धणीवरि ५॥

॥ २२०२ ॥

मातेचिये चित्तीं । अवघी बाळकाची व्याप्ति ॥१॥ देह विसरे आपुला । जवळी घेतां सीण गेला ॥२॥ दावी प्रेमभातें । आणि अंगावरी चढतें ॥ ३ ॥ तुका संतापुढें । पायीं झोंबे लाडें कोडें ॥ ४ ॥

॥ २२०३ ॥

माझीया मीपणावर पडो पाषाण । जळो हें भूषण नाम माझें ॥ पाप नाहीं पार दुःखाचे डोंगर । जालों ये भूमीसी ओझें ॥ १ ॥ काय विटंबना सांगों किती । पाषाण फुटती ऐसें दुःख ॥ नरनारी सकळ उत्तम चांडाळ । न पाहाती डोळा माझें मुख ॥ २ ॥ काया वाचा मनें अघटित करणें । चर्म चक्षु हात पाय ॥ निंदा द्वेष घात विश्वासीं व्यभिचार । आणीक सांगों किती काय ॥ ३ ॥ लक्ष्मीमदें मातें घडले बहुत दोष । पत्नी दोनी भेदाभेद ॥ पितृ-

वचन घडली अवज्ञा अविचार । कुटिल कुचर निंदा वाद ॥ ४ ॥
आणीक किती सांगों ते अवगुण । न वळे जिव्हा कांपे मन ॥
भूत दया उपकार नाहीं शब्दा धीर । विषयीं लंपट शब्दहीन ५॥
संत महानुभाव ऐका हें उत्तरें । अवगुण अविचारें वृद्धि पापा ।
तुका म्हणे सरते करा पांडुरंगीं । शरण आलों मायबापा ॥ ६ ॥

॥ २२०४ ॥

मायेवरी सत्ता आवडीची बाळा । संकोचोनि लळा प्रतिपाळी ॥१॥
अपराध माझे न मानावे मनीं । तुम्ही संतजनीं मायबापीं ॥ २ ॥
आरुषवचनें लेंकुराची आळी । साहोनि कवळीं मागुताली ॥ ३ ॥
तुका ह्मणे अंगीं काय नाहीं सत्ता । परि निष्ठुरता उपजेना ॥ ४ ॥

॥ २२०५ ॥

मुक्तिपांग नाही विष्णुचिया दासां । संसार तो कैसा न देखती १ ॥
बैसला गोविंद जडोनिया चित्तीं । आदि तेचि अंतीं अवसानीं ॥२॥
भोग नारायणा देऊनि निराळीं । ओंविया मंगळीं तेचि गाती ॥ ३ ॥
बळ बुद्धि त्यांची उपकारासाठीं । अमृत तें पोटीं सांठविलें ॥ ४ ॥
दयावंत तरी देवाच्च सारिखीं । आपुली पारखी नोळखती ॥ ५ ॥
तुका ह्मणे त्यांचा जीव तोचि देव । वैकुंठ तो ठाव वसती ते ॥ ६ ॥

॥ २२०६ ॥

मोकळें मन रसाळ वाणी । याचि गुणीं संपन्न ॥१॥ लक्ष्मी ते ऐशा नांवें । भाग्यें जावें तरि त्यांनीं ॥ २ ॥ नमन नम्रता अंगीं । नेघे रंगी पालट ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याच्या नांवें । घेतां व्हावें संतोषी ॥४॥

॥ २२०७ ॥

युक्ति तंव झाल्या कुंटित सकळा । उरली हे कळा जीवनाची १ ॥
संतचरणीं भावें ठेविलें मस्तक । जोडोनि हस्तक राहिलोंसें ॥२॥
[illegible] तेणें कांहींचि प्रकार । साक्षीतें अंतर अंतरासी ॥ ३ ॥
[illegible]ीं केलें कृपादान । तेणें समाधान राहिलेंसे ॥ ४ ॥

॥ २२०८ ॥

[illegible]वें लवें जाती । अभिमाना हातीं सांपडेना ॥ १ ॥
[illegible]णे विष्णुदासां साजे । तेथें भाव दुजे हारपति ॥ २ ॥
[illegible]दन नवविधा भक्ति । दया क्षमा शांति तया ठायीं ॥ ३ ॥
[illegible]वीं नाहीं दुःखाची वसती । अवघाचि भूति नारायण ॥४॥
अवघांचि झालें सोवळें ब्रह्मांड । विटाळाचें तोंड न देखती ॥ ५ ॥
तुका ह्मणे गाजे वैकुंठीं सोहळा । याही भूमंडाळमाजी कीर्ति ॥६॥

॥ २२०९ ॥

लेंकरा लेववी माता अळंकार । नाहीं अंतपार आवडीसी ॥ १ ॥

कृपेचें पोसणें तुमचें मी दीन । आजि संतजन मायबाप ॥ २ ॥
आरुष उत्तरीं संतोषे माउली । कवळुनि घाली हृदयांत ॥ ३ ॥
पोटीं आलें त्याचे नेणें गुणदोष । कल्याणचि असे असावी हें ॥४॥
मनाची ते चाली मोहाचिये सोई । ओघ गंगा काई परतो जाणे ५
तुका ह्मणे कोटें उदार मेघां शक्ति । माझी तृषा किती चातकाची॥६॥

॥ २२१० ॥

लेंकराचें हित । वाहे माउलीचें चित्त ॥ १ ॥ ऐशी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीति ॥ २ ॥ पोटीं भार वाहे । त्याचें सर्वस्वही साहे ॥३॥ तुका ह्मणे माझें । तैसें तुह्मां संतां ओझें ४

॥ २२११ ॥

वक्त्या आधीं मान । गंध अक्षता पूजन । श्रोता यति झाला जाण । तरी त्या नाहीं उचित ॥१॥ शीर सर्वांगा प्रमाण । यथाविधि कर चरण । धर्माचें पाळण । सकळीं सत्य करावें ॥२॥ पट्ट पुत्रा सांभाळी । पिता त्याची आज्ञा पाळी । प्रमाण सकळीं । ते मर्यादा करावी ॥ ३ ॥ वरासनीं पाषाण । तो न मानावा सामान्य । येर उपकरणें । सोनियाचीं परी नीच ॥४॥ सोनियाचा पैंजण । मुगुटमणि केला हीण । जयाचें कारण तयाठायीं अळंकार ॥ ५ ॥ सेवका स्वामीसाठीं मान । त्याचें नाम त्याचें धन । तुका म्हणे जाण । तुह्मी संत यद्‌र्थीं ॥ ६ ॥

॥ २२१२ ॥

वाट वैकुंठीं पहाती । भक्त कैं पा येथें येती । तयां जन्ममरणखंती । नाहीं चित्तीं परलोक ॥ १ ॥ धन्यधन्य हरिचे दास । तयां सुलभ गर्भवास । ब्रह्मादिक करिती आस । तीर्थी वास भेटीची २॥ कथाश्रवण व्हावयास । यमधर्मा थोर आस । पाहे रात्रदिवस । वाट कर जोडोनिया ॥३॥ रिद्धिसिद्धी न पाचारितां । त्या धुंडिती हरिभक्तां । मोक्षसायुज्यता । वाट पाहे भक्ताची ॥४॥ असती जेथें उभे ठेले । सदा प्रेमसुखें धाले । आणीकही उद्धरिले । महादोषी चांडाळ ॥५॥ सकळ करिती त्यांची आस । सर्वभावें ते उदास । धन्यभाग्य त्यांस । तुका ह्मणे दरुषणें ॥ ६ ॥

॥ २२१३ ॥

वैष्णवांसंगती सुख वाटे जीवा । आणीक मी देवा कांहीं नेणें ॥१॥
गायें नाचें उडें आपुलिया छंदें । मनाच्या आनंदें आवडीनें ॥२॥
लाज भय शंका दुराविला मान । न कळे साधन यापरतें ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां आपुल्या सायासें । आम्हा जगदीशें सांभाळावें ४

वचन घडली अवज्ञा अविचार । कुटिल कुचर निंदा वाद ॥ ४ ॥
आणीक किती सांगों ते अवगुण । न वळे जिव्हा कांपे मन ॥
भूत दया उपकार नाहीं शब्दा धीर । विषयीं लंपट शब्दहीन ५॥
संत महानुभाव ऐका हें उत्तरें । अवगुण अविचारें वृद्धि पापा ।
तुका म्हणे सरते करा पांडुरंगीं । शरण आलों मायबापा ॥ ६ ॥

॥ २२०४ ॥

मायेवरी सत्ता आवडीची बाळा । संकोचोनि ळळा प्रतिपाळी ॥१॥
अपराध माझे न मानावे मनीं । तुम्हीं संतजनीं मायबापीं ॥ २ ॥
आरुषवचनें लेंकुराची आळी । साहोनि कवळीं मागुताली ॥ ३ ॥
तुका ह्मणे अंगीं काय नाहीं सत्ता । परि निष्ठुरता उपजेना ॥ ४ ॥

॥ २२०५ ॥

मुक्तिपांग नाही विष्णुचिया दासां । संसार तो कैसा न देखती १ ॥
बैसला गोविंद जडोनिया चित्तीं । आदि तोचि अंतीं अवसानीं ॥२॥
भोग नारायणा देऊनि निराळीं । ओंविया मंगळीं तोचि गाती ॥ ३ ॥
बळ बुद्धि त्यांची उपकारासाठीं । अमृत तें पोटीं सांठविलें ॥ ४ ॥
दयावंत तरी देवाच सारिखीं । आपुली पारखी नोळखती ॥ ५ ॥
तुका ह्मणे त्यांचा जीव तोचि देव । वैकुंठ तो ठाव वसती ते ॥ ६ ॥

॥ २२०६ ॥

मोकळें मन रसाळ वाणी । याचि गुणी संपन्न ॥१॥ लक्ष्मी ते ऐशा नांवें । भाग्यें जावें तरि त्यांनीं ॥ २ ॥ नमन नम्रता अंगी । नेघे रंगी पालट ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याच्या नांवें । घेतां व्हावें संतोषी ॥४॥

॥ २२०७ ॥

युक्ति तंव झाल्या कुंटित सकळा । उरली हे कळा जीवनाची १ ॥
संतचरणीं भावें ठेविलें मस्तक । जोडोनि हस्तक राहिलोंसें ॥२॥
जाणपणें नेणें कांहींचि प्रकार । साक्षीतें अंतर अंतरासी ॥ ३ ॥
तुका म्हणे तुम्हीं केलें कृपादान । तेणें समाधान राहिलेंसे ॥ ४ ॥

॥ २२०८ ॥

लवविलें तया सवें लवें जाती । अभिमाना हातीं सांपडेना ॥ १ ॥
भोळिवेचें लेणें विष्णुदासां साजे । तेथें भाव दुजे हारपति ॥ २ ॥
अर्चन वंदन नवविधा भक्ति । दया क्षमा शांति तया ठायीं ॥ ३ ॥
तये गांवीं नाहीं दुःखाची वसती । अवघाचि भूति नारायण ॥४॥
अवघेंचि झालें सोवळें ब्रह्मांड । विटाळाचें तोंड न देखती ॥ ५ ॥
तुका ह्मणे गाजे वैकुंठीं सोहळा । याही भूमंडाळमाजी कीर्ति ॥६॥

॥ २२०९ ॥

लेंकरा लेववी माता अळंकार । नाहीं अंतपार आवडीसी ॥ १ ॥

कृपेचें पोसणें तुमचें मी दीन । अजि संतजन मायबाप ॥ २ ॥ आरुष उत्तरीं संतोषे माउली । कवळुनि घाली हृदयांत ॥ ३ ॥ पोटीं आलें त्याचे नेणें गुणदोष । कल्याणचि असे असावी हें ॥४॥ मनाची ते चाली मोहाचिये सोई । ओघ गंगा काई परतो जाणे ५ तुका ह्मणे कोटें उदार मेघां शक्ति । माझी तृषा किती चातकाची ॥६॥

॥ २२१० ॥

लेंकराचें हित । वाहे माउलीचें चित्त ॥ १ ॥ ऐशी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीति ॥ २ ॥ पोटीं भार वाहे । त्याचें सर्वस्वही साहे ॥३॥ तुका ह्मणे माझें । तैसें तुह्मां संतां ओझें ४

॥ २२११ ॥

वक्त्या आधीं मान । गंध अक्षता पूजन । श्रोता यति झाला जाण । तरी त्या नाहीं उचित ॥१॥ शीर सर्वांगा प्रमाण । यथाविधि कर चरण । धर्मांचें पाळण । सकळीं सत्य करावें ॥२॥ पट्ट पुत्रा सांभाळी । पिता त्याची आज्ञा पाळी । प्रमाण सकळीं । ते मर्यादा करावी ॥ ३ ॥ वरासनीं पाषाण । तो न मानावा सामान्य । येर उपकरणें । सोनियाचीं परी नीच ॥४॥ सोनियाचा पैंजण । मुगुटमणि केला हीण । जयाचें कारण तयाठायीं अळंकार ॥ ५ ॥ सेवका स्वामीसाठीं मान । त्याचें नाम त्याचें धन । तुका म्हणे जाण । तुह्मी संत यद्‌र्थीं ॥ ६ ॥

॥ २२१२ ॥

वाट वैकुंठीं पहाती । भक्त कैं पा येथें येती । तयां जन्ममरणखंती । नाहीं चित्तीं परलोक ॥ १ ॥ धन्यधन्य हरिचे दास । तयां सुलभ गर्भवास । ब्रह्मादिक करिती आस । तीर्थां वास भेटीची २॥ कथाश्रवण व्हावयास । यमधर्मा थोर आस । पाहे रात्रदिवस । वाट कर जोडोनिया ॥३॥ रिद्धिसिद्धी न पाचारितां । त्या धुंडिती हरिभक्तां । मोक्षसायुज्यता । वाट पाहे भक्ताची ॥४॥ असती जेथें उभे ठेले । सदा प्रेमसुखें धाले । आणीकही उद्धरिले । महादोषी चांडाळ ॥५॥ सकळ करिती त्यांची आस । सर्वभावें ते उदास । धन्यभाग्य त्यांस । तुका ह्मणे दरुषणें ॥ ६ ॥

॥ २२१३ ॥

वैष्णवांसंगती सुख वाटे जीवा । आणीक मी देवा कांहीं नेणें ॥१॥ गायें नाचें उडें आपुलिया छंदें । मनाच्या आनंदें आवडीनें ॥२॥ लाज भय शंका दुराविला मान । न कळे साधन यापरतें ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां आपुल्या सायासें । आम्हा जगदीशें सांभाळावें ४

॥ २२१४ ॥

वैष्णव तो जया । अवघी देवावरी माया ॥ १ ॥ नाहीं आणीक प्रमाण । तन धन तृण जन ॥ २ ॥ पडतां जड भारी । नेमा न टळे निर्धारीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे याती । हो का तयाची भलती ४॥

॥ २२१५ ॥

शुद्धबीजा पोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥ १ ॥ मुखीं अमृताची वाणी । देह देवाचे कारणीं ॥ २ ॥ सर्वांग निर्मळ । चित्त जैसें गंगाजळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाती । ताप दर्शनें विश्रांति ॥ ४ ॥

॥ २२१६ ॥

हींच त्यांचीं पंचभूतें । जीवन भातें प्रेमाचें ॥१॥ कळवळा धरिला संतीं । ते निगुती कैवाड ॥२॥ हाच काळ वर्तमान । साधन हीं संपत्ती ॥३॥ तुका ह्मणे दिवसरातीं । हें चि खाती अन्न ते ॥ ४ ॥

॥ २२१७ ॥

पड्सीं रांधिलें खापरीं घातलें । चोहटा ठेविलें मध्यरात्रीं ॥ १ ॥ त्यासी सदाचारी लोक न शिवती। श्वानासी निश्चिती फावलें तें २ तैसें दुष्टकर्म झालें हरिभक्ता । त्यागिली ममता विषयासक्ति ३ ॥ इहपरलोक उभय विटाळ । मानिती केवळ हरिचे दास ॥ ४ ॥ तुका ह्मणे देवा आवडे हे सेवा । अनुदिनीं व्हावा पूर्ण हेतु ॥ ५ ॥

॥ २२१८ ॥

सकळ चिंतामणी शरीर । जरी जाय अहंकार आशा समूळ ॥ निंदा हिंसा नाहीं कपट देहबुद्धि । निर्मळ स्फटिक जैसा ॥ १ ॥ मोक्षाचें तीर्थ न लगे वाराणसी । येती तयापासीं अवघीं जनें ॥ तीर्थासी तीर्थ झाला तोचि एक । मोक्ष तेणें दर्शनें ॥ २ ॥ मन शुद्ध तया काय करिसी माळा । मंडित सकळा भूषणांसी ॥ हरिच्या गुणें गर्जताती सदा । आनंद तया मानसीं ॥३॥ तन मन धन दिलें पुरुषोत्तमा । आशा नाहीं कवणाची ॥ तुका ह्मणे तो परिसाहूनि आगळा । काय महिमा वर्णूं त्याची ॥ ४ ॥

॥ २८१९ ॥

संसारसोहळे भोगितां सकळ । भक्तां त्याचें बळ विठोबाचें ॥ १ ॥ भय चिंता धाक न मानिती मनीं । भक्तां चक्रपाणि सांभाळीत २॥ पाप पुण्य त्यांचें धरूं न शके अंग । भक्तांसी श्रीरंग सर्व भावें ३॥ नव्हती ते मुक्त आवडे संसार । देव भक्तां भार सर्व वाहे ॥ ४ ॥ तुका ह्मणे देव भक्तां वेळाईत । भक्त ते निश्चिंत त्याचियानें ॥ ५ ॥

॥ २१२० ॥

संतचरणरज लागतां सहज । वासनेचें बीज जळोन जाय ॥ १ ॥

मग रामनामीं उपजे आवडी । सुख घडोघडी वाढो लागे ॥ २ ॥
कंठीं प्रेम दाटे नयनीं नीर लोटे । हृदयीं प्रगटे नामरूप ॥ ३ ॥
तुका ह्मणे साधन सुलभ गोमटें । परि उपतिष्ठे पूर्वपुण्यें ॥ ४ ॥

॥ २२२१ ॥

संतांच्या पादुका घेईन मोचे खांदीं । हातीं टाळ दिंडी नाचेन पुढें १॥
भजनविधि नेणें साधन उपाय । सकळ सिद्धि पाय हरिदासांचे २॥
ध्यानगति मति आसन समाधि । हरिनाम गोविंदीं प्रेमसुख ॥३॥
नेणता निर्लज्ज नेणें नादभेद । सुखें हा गोविंद गाऊं गीतीं ॥४॥
सर्व जोडी मज गोत आणि वित्त । तुका ह्मणे संतमहंतपाय ॥५॥

॥ २२२२ ॥

संतांनीं सरता केलों तैसेपरी । चंदनीं ते बोरी व्यापियेली ॥ १ ॥
गुण दोष याती न विचारितां कांहीं । ठाव दिला पायीं आपुलिया २
तुका ह्मणे आलें समर्थाच्या मना । तरि होय राणा रंक त्याचा ॥३॥

॥ २२२३ ॥

संकोचतो जीव महत्वाच्या भारें । दासत्वाचि बरें बहु वाटे ॥ १ ॥
कळावी जी माझी आवडी हे संतां । देणें तरि आतां हेंचि द्यावें २ ॥
तुमचे चरण पांवविलों सेवा । म्हणउनि हेवा हाचि करीं ॥ ३ ॥
विनवुनि तुका वंदितो चरण । लेखा रजरेण चरणींचा ॥ ४ ॥

॥ २२२४ ॥

संतपाउलें साजिरीं । गंगा आली आह्मांवरी ॥१॥ जेथें पडे रज-धुळी । तेथें करावी अंघोळी ॥२॥ स्वेतबंद वाराणसी । अवघीं तीर्थें तयापासीं ॥३॥ तुका ह्मणे धन्य झालों । संतसागरीं मिळालों ॥४॥

॥ २२२५ ॥

संत आले घरा । तों मी अभागी दातारा ॥ १ ॥ कासयानें पूजा करूं । चरण हृदयींच धरूं ॥२॥ काया कुरवंडी । करून ओंवाळून सांडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे भावें । हात जोडी असो ठावें ॥ ४ ॥

॥ २२२६ ॥

संत मारगी चालती । त्यांची लागो मज माती ॥१॥ काय करावीं साधनें । काय नव्हे एक तेणें ॥ २ ॥ शेष घेईन उच्छिष्ट । धाय धणीवरी पोट ॥३॥ तुका ह्मणे संतां पांयीं । जीव ठेविला निश्चयीं ४

॥ २२२७ ॥

संत गाती हरिकीर्तनीं । त्यांचें घेइन पायवणी ॥१॥ हेंचि तप तीर्थ माझें । आणीक मी नेणें दुजें ॥ २ ॥ काया कुरवंडी करीन । संत महंत ओवाळीन ॥ ३ ॥ संत महंत माझी पूजा । अनभाव नाहीं दुजा ॥४॥ तुका म्हणे नेणें कांहीं । अवघे आहे संतांपायीं ॥ ५ ॥

॥ २२२८ ॥

संतसेवेशीं अंग चोरी । दृष्टी न पडो तयावरी ॥ १ ॥ पेसियासी व्याली रांड । जळो जळो तिचें तोंड ॥२॥ संतचरणीं ठेवितां भाव । आपेआप भेटे देव ३ तुका ह्मणे संतसेवा । माझ्या पूर्वजांचा ठेवा ४

॥ २२२९ ॥

संतांसी क्षोभवी कोण्याही प्रकारें । त्याचें नव्हे बरें उभयलोकीं १ देवाचा तो वैरी शत्रु दावेदार । पृथ्वीही थार नेदी तया ॥ २ ॥ संतांपाशीं ज्याचा नुरेचि विश्वास । त्याचे जाले दोष बळिवंत ३॥ तुका ह्मणे क्षीर वासराच्या अंगें । किंवा धांवे लागे विषमें मारूं४

॥ २२३० ॥

संतसंगें याचा वास सर्वकाळ । संचला सकळ मूर्तिमंत ॥ १ ॥ घालूनिया काळ अवघा बाहेरी । त्यासीच अंतरीं वास दिला २ ॥ आपुलेंही जींही नाहीं उरो दिलें । चोजवितां भलें पेशीं स्थळें ३॥ तुका ह्मणे नाहीं झांकत परिमळ । चंदनाचें स्थळ चंदनाचि ॥४॥

॥ २२३१ ॥

संतांचिया पायीं हा माझा विश्वास । सर्वभावें दास झालों त्यांचा तेचि माझें हित करिती सकळ । जेणें हा गोपाळ कृपा करी ॥२॥ भागलिया मज वाहतील कडिये । त्यांचियानें जोडे सर्वसुख ॥३॥ तुका ह्मणे शेष घेईन आवडी । वचन न मोडी बोलिलों तें ॥४ ॥

॥ २२३२ ॥

संतांचे घरींचा दास मी कामारी । दारीं परोपरीं लोळतसें ॥१॥ चरणींचे रज लागती अंगास । तेणें बेताळीस उद्धरती ॥ २ ॥ उच्छिष्ट हें जमा करूनि पत्रावळी । घालीन कवळी मुखामाजी ३ तुका ह्मणे मी आणीक विचार । नेणें हेंचि सार मानीतसें ॥ ४ ॥

॥ २२३३ ॥

संतांसी तो नाहीं सन्मानाची चाड । परि पडे द्वाड अव्हेरितें १॥ म्हणऊनि तया न वजावें ठाया । होतसे घात या दुर्बळाचा ॥ २ ॥ भावहीना आड येतसे आशंका । उंचितासी चुका घालावया ३ ॥ तुका ह्मणे जया संकोच दर्शनें । तया ठाया जाणें अनुचित ॥ ४ ॥

॥ २२३४ ॥

संतांच्या धिःकारें अमंगळ जिणें । विश्वशत्रु तेणें सांडी परि ॥१॥ कुळ आणि रूप वाया संसार । गेला भरतार मोकलितां ॥ २ ॥ मूळ राखे तया फळा काय उणें । चतुर लक्षणें राखों जाणें ॥३॥ तुका ह्मणे सायास तो एके ठायीं । दीप हातीं तई अवघें बरें ॥४॥

॥ २२३५ ॥

संतां आवडे तो काळाचाही काळ । समर्थाचें बाळ जेवीं समर्थ १

परिसतां तेथें नाहीं एकेविणें । मोहें न पवे सीण ऐसें राखे ॥ २ ॥
केले अन्यायें ते सांडवी उपचारें । न देखें दुसरें नाश मूळ ॥ ३ ॥
तुका ह्मणे मुख्य कल्पतरु छाया । काय नाहीं दया तये ठायीं ॥४॥

॥ २२३६ ॥

संतांचें सुख झालें या देवा । म्हणउनि सेवा करी त्यांची ॥ १ ॥
तेथें माझा काय कोण तो विचार। वर्णावया पार महिमा त्यांचा २॥
निर्गुण आकार जाला गुणवंत । घाली दंडवत पूजोनियां ॥ ३ ॥
तीर्थें त्यांची इच्छा करिती नित्यकाळ। व्हावया निर्मळ आचरणांसी ४
अष्टमा सिद्धींच कोण आला पाड ।वागों नेदीं आड कोणी तया ५॥
तुका ह्मणे ते बळिया शिरोमणि। राहिले चरणीं निकटवासें ॥ ६ ॥

॥ २२३७ ॥

संतांचिया गांवीं प्रेमाचा सुकाळ । नाहीं तळमळ दुःखलेश ॥१॥
तेथें मी राहीन होऊनि याचक । घालितील भीक तेचि मज ॥२॥
संतांचिया गांवीं वरो भांडवल । अवघा विठ्ठल धन वित्त ॥३॥
संतांचें भोजन अमृताचें पान । करिती कीर्तन सर्वकाळ ॥ ४ ॥
संतांचा उदीम उपदेशाची पेंठ । प्रेमसुख साटीं घेती देती ॥ ५ ॥
तुका ह्मणे तेथें आणिक नाहीं परी । ह्मणोनि भिकारी झालों त्यांचा

॥ २२३८ ॥

संतांचा महिमा तो बहु दुर्गम । शाब्दिकांचें काम नाहीं येथें ॥१॥
बहु दुधड जरी झाली ह्मैस गाय । तरी होईल काय कामधेनु ॥२॥
तुका ह्मणे अंगें व्हावें तें आपण । तरीच महिमान येईल कळों ॥३॥

॥ २२३९ ॥

सर्वविशीं माझा त्रासलासे जीव । आतां कोण भाव निवडूं एक १॥
संसाराची मज न साहेचि वार्ता । आणीक ह्मणतां माझे कोणी ॥२॥
देहसुख कांहीं बोलिले उपचार । विषतें आदर वंद वाटे ॥ ३ ॥
उपाधि दाटणी प्रतिष्ठा गौरव । होय माझा जीव कासावीस ॥४॥
तुका ह्मणे कांहीं आणीक न साहे । आवडती पाय वैष्णवांचे ॥५॥

॥ २२४० ॥

सर्व सुखें आजी येथेंचि वोळलीं । संतांचीं देखिलीं चरणांबुजें ॥१॥
सर्वकाळ होतों आठवीत मनीं । फिटली ते धणी येणें काळें ॥ २ ॥
तुका ह्मणे वाचा राहिली कुंठित । पुढें झालें चित्त समाधान ॥३॥

॥ २२४१ ॥

सर्व भाग्यहीन । ऐसें सांभाळिलें दीन ॥१॥ पायीं संतांचे मस्तक । असों जडोनि हस्तक ॥ २ ॥ जाणें तरी सेवा । दीन दुर्बळाची देवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीव । समर्पून भाकी कींव ॥ ४ ॥

॥ २२४२ ॥

सांग त्वां कोणासी तारिलें । संतांवेगळें उद्धरिलें ॥ १ ॥ संत शब्द उपदेशी । मग तूं हो ह्मणशी ॥ २ ॥ तुका ह्मणे नाहीं तुझा उपकार । करूं संतांचा उच्चार ॥ ३ ॥

॥ २२४३ ॥

सांगतां ही नये सुख । कीर्ति मुख न पुरे ॥ १ ॥ आवडीनें सेवन करूं । जीवींचें धरूं जीवीं च ॥२॥ उपमा या देतां लाभा । काशा शोभा सारिखी ३ तुका ह्मणे नुचलीं डोई । ठेविली पायीं संतांचे ४॥

॥ २२४४ ॥

सुखवाटे येचि ठायीं । बहु पायीं संतांचे ॥१॥ ह्मणऊनि केला वास । नाहीं नास ते ठायीं ॥ २ ॥ न करवे हाली चाली । निवारिली चिंता हे ॥ ३ ॥ तुका ह्मणे निवे तनु । रजकणु लागतां ॥ ४ ॥

॥ २२४५ ॥

स्तुति करीं जैसा नाहीं अधिकार । न कळे विचार योग्यतेचा ॥ १ ॥
तुमचे मी दास संतांचें दुर्बळ । करुनि सांभाळ राखा पायीं ॥२॥
रामकृष्णहरि मंत्र उच्चारणा । आवडी चरणां विठोबाच्या ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुमचें सेवितों उच्छिष्ट । क्षमा करीं धीट होउनिया ॥४॥

॥ २२४६ ॥

सोलींव जें सुख अतिसुखाहुनी । उभें तें अंगणी वैष्णवांच्या ॥ १ ॥
वृंदावन सडे चौक रंग माळा । नाचे तो सोहोळा देखोनिया ॥२॥
भूषणमंडित सदा सर्व काळ । मुद्रा आणि माळ तुळसी कंठीं ॥ ३ ॥
नामओघ मुखीं अमृताचे सार । मस्तक पवित्र सहित रजें ॥ ४ ॥
तुका ह्मणे मोक्ष भक्ताचिया मना । नये हा वासना त्याची करी ५॥

॥ २२४७ ॥

हरिजनां प्राण विकली हे काया । अंकिला मी तयां घरीं झालों १
ह्मणियें सत्वर करीन सांगतां । घेईन मी देतां शेष त्यांचें ॥ २ ॥
आस करूनिया राहेन अंगणीं । उच्छिष्टाची धणी घ्यावयासी ३॥
चालतां ते मार्गी चरणींचे रज । उडती सहज घेइन आतां ॥ ४ ॥
दुरी त्यांपासूनि न वजे दवडितां । तुका ह्मणे लाता घेइन अंगीं ५

॥ २२४८ ॥

हिरा ठेवितां ऐरणीं वांचे मारितां जो घणीं ॥१॥ तोचि मोल पावे खरा । करणीचा होय चुरा ॥ २ ॥ मोहरा तोचि अंगें । सूत न जळे ज्याच्या संगें ३ तुका ह्मणे तोचि संत । सोसी जगाचे अघात ४

॥ २२४९ ॥

हिरा ठेवितां काळें गाहाण । मोल न तुटे दुकाळीं जाण ॥ १ ॥

तैसे संतजन पाहीं । विनटले श्रीहरिपायीं ॥ २ ॥ तुका ह्मणे तैसे भक्त । तयांसी जन हे निंदित ॥ ३ ॥

॥ २२५० ॥

हें तो एक संतांठायीं । लाभ पायीं उत्तम ॥ १ ॥ ह्मणवितां त्याचे दास । पुढें आस उरेना ॥ २ ॥ कृपादान केलें संतीं । कल्पांतींही सरेना ॥ ३ ॥ तुका ह्मणे संतसेवा । हाचि हेवा उत्तम ॥ ४ ॥

॥ २२५१ ॥

शेवटची विनवणी । संतजनीं परिसावी ॥ १ ॥ विसर तो न पडावा । माझा देवा तुम्हांसीं २ आतां फार बोलों काई । अवघें पाया विदित ॥३॥ तुका ह्मणे पडिलों पायां । करा छाया कृपेची४

कीर्तनपर अभंग.

॥ २२५२ ॥

अमंगळ वाणी । नये आयकों ते कानीं ॥ १ ॥ जो हे दूषी हरिची कथा । त्यासि क्षयरोगव्यथा ॥ २ ॥ याति वर्णश्रेष्ठ । परि तो चांडाळ पापिष्ट ॥ ३ ॥ तुका म्हणे पाप । माय नावडे ज्या बाप ॥४॥

॥ २२५३ ॥

अवीट हें क्षीर हरिकथा माउली । सेवितां सेविली वैष्णवजनीं १॥ अमृत राहिलें लाजोनि माघारें । येणें रसें थोरें ब्रह्मानंदें ॥ २ ॥ पतित पातकी पावनपंगती । चतुर्भुज होती देवाऐसे ॥ ३ ॥ सर्व सुखें तया मोहोरती ठाया । जेथें दाटणी या वैष्णवांची ॥४॥ निर्गुण हें सोंग धरिलें गुणवंत । धरूनिया प्रीत गाये नाचे ॥ ५ ॥ तुका म्हणे केली साधन गाळणी । सुलभ कीर्तनीं होउनी ठेला॥६॥

॥ २२५४ ॥

आणीक नका करूं चेष्टा । व्हाल कष्टा वरपडी ॥ १ ॥ सुखें करा हरिकथा । सर्वथा हे तारील ॥२॥ अनाथाचा नाथ देव । अनुभव सत्य हा ॥३॥ तुका ह्मणे बहुतां रीतीं । धरा चित्तीं सकळ ॥ ४ ॥

॥ २२५५ ॥

आनंदें कीर्तन कथा करी घोष । आवडीचा रस प्रेमसुखें ॥ १ ॥ मज या आवडे वैष्णवांचा संग । तेथें नाहीं लाग कळिकाळा ॥२॥ स्वल्प मंत्र वाचे बैसलासे निका । रामकृष्ण सखा नारायण ॥ ३ ॥ विचारितां दुजें वाटे मज लाज । उपदेशें काज आणिक नाहीं ४॥ तुका ह्मणे चित्त रंगलेसें ठायीं । माझें तुझ्या पायीं पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ २२५६ ॥

कथा करोनिया द्रव्य घेती देती । तया अधोगति नरकवास ॥ १ ॥ रवरव कुंभपाक भोगिती यातना । नये नारायणा करुणा त्यांची २

आसिखड्गधारा छेदिती सर्वांग । तप्तभूमी अंग लोळविती ॥ ३ ॥
तुका म्हणे तया नरक न चुकती । सांपडले हातीं यमाचिया ॥४॥

॥ २२५७ ॥

कथा करोनिया मोल ज्यापें घेती । तेही दोघे जाती नरकामध्यें १
ब्रह्म पूर्ण करा ब्रह्म पूर्ण करा । अखंडित स्मरा रामराम ॥ २ ॥
मधुरवाणीच्या नका पडूं भरी । जाल यमपुरीं भोगावया ॥ ३ ॥
तुका म्हणे करीं ब्रह्मांड ठेंगणें । हात पसरी जिणें धिग त्याचें ४॥

॥ २२५८ ॥

कथाकाळींची मर्यादा । सांगतों ते भावें वंदा । प्रीतीनें गोविंदा । होंचि एक आवडे ॥ १ ॥ टाळ वाद्य नृत्य गीत । अंतःकरणें प्रेमभरित । वाणिता तो कीर्त । तद्भावने लेखावा ॥ २ ॥ नये आळस मोडूं अंग । कथे कानवडें ढुंग । हेळणेचा रंग । दावी तो चांडाळ ॥ ३ ॥ तोंडीं विडा माने ताठा । थोरपणें घाली गेंठा । चित्त नेदी नामपाठा । गोष्टी लावी तो चांडाळ ॥ ४ ॥ कथे इच्छी मान । दावूनिया थोरपण । रजा संकोचन । लुगडीं सांवरी तो चांडाळ ॥ ५ ॥ आपण बैसे वाजेवरी । सामान्य हरिच्या दासां करी । तरि तो सुळावरी । वाहिजे निश्चयेसी ॥ ६ ॥ येतां न करी नमस्कार । कर जोडोनिया नम्र । न ह्मणतां थोर । आणिकां खेटी तो चांडाळ ॥ ७ ॥ तुका विनवी जना । कथे नाणावें अवगुणा । करा नारायणा । ऋणी समर्पक भावें ॥ ८ ॥

॥ २२५९ ॥

कथा देवाचें ध्यान । कथा साधन मंडण । कथे ऐसें पुण्य । आणीक नाहीं सर्वथा ॥१॥ ऐसा साच खरा भाव । कथेमाजी उभा देव २ मंत्र स्वल्प जना । उच्चारितां वाचे मना । म्हणतां नारायणा । क्षणें जळती महा दोष ॥ ३ ॥ भावें करितां कीर्तन । तरे तारी आणीक जन । भेटे नारायण । संदेह नाहीं ह्मणे तुका ॥ ४ ॥

॥ २२६० ॥

कथा दुःख हरी कथा मुक्त करी । कथा याचि बरी विठोबाची १॥
कथा पाप नासी उद्धरिले दोषी । समाधि कथेसी मूढजना ॥ २ ॥
कथा तप ध्यान कथा अनुष्ठान । अमृत हे पान हरिकथा ॥ ३ ॥
कथा मंत्र जप कथा हरि ताप । कथाकाळीं कांप कळिकाळासी ४॥
तुका ह्मणे कथा देवाचेंही ध्यान । समाधि लागोन उभा तेथें ॥५॥

॥ २२६१ ॥

कथेचा उलंघ तो अधमा अधम । नावडे ज्या नाम ओळखा तो १
कासया जीऊन झाला भूमी भार । अनउपकार माते कुंसी ॥ २ ॥

निद्रेचा आदर जागरणीं विट । त्याचे पोटीं कीट कुपथ्याचें ३ ॥
तुका ह्मणे दोन्ही बुडविलीं कुळें । ज्याचें तोंड काळें कथेमाजी ४

॥ २२६२ ॥

कथे बैसोनि सादरें । सुखचर्चा परस्परें । नवल काय तो उद्धरे । आणीक तरे सुगंधें ॥ १ ॥ पुण्य घेई रे फुकाचें । पाप दुष्ट वासनेचें । पेरिलिया बीजाचें । फळ घेई शेवटीं ॥ २ ॥ कथा विरस पाडी आळसें । छळणा करूनि मोडी रस । बुडवी आपणासरिसें । विटाळसें नावेसी ॥३॥ सज्जन चंदनाचिये परी । दुर्जन देशत्यागें दुरी । राहो म्हणे हरि । विनंती करी तुका हे ॥ ४ ॥

॥ २२६३ ॥

करावें कीर्तन । मुखें गावें हरिचे गुण ॥१॥ मग कांहीं नव्हे बाधा । काम दुर्जनाच्या क्रोधा ॥ २ ॥ शांतिखड्ग हातीं । काळासी ते नागविती ॥३॥ तुका म्हणे दाता सखा । ऐसा अनंता सारिखा ॥४॥

॥ २२६४ ॥

कथा त्रिवेणीसंगम । देव भक्त आणि नाम । तेथींचें उत्तम । चरणरज वंदितां १ जळती दोषांचे डोंगर । शुद्ध होती नरीनर । गती ऐकती सादर । जे पवित्र हरिकथा २ तीर्थे तया ठाया येती । पुनीत व्हावया । पर्वकाळ पायां । तळीं वसे वैष्णवां ३ अनुपम्य हा महिमा । नाहीं द्यावया उपमा । तुका ह्मणे ब्रह्मा । नेणे वर्णूं या सुखा ॥ ४ ॥

॥ २२६५ ॥

कथा हें भूषण जनामध्यें सार । तरले अपार बहुत येणें ॥ १ ॥
नीचिये कुळींचा उंचा वंद्य होय । हरीचे जो गाय गुणवाद ॥ २ ॥
देव त्याची माथां वंदीं पायधुळी । दीप झाला कुळीं वंशाचिये ३ ॥
त्याची निंदा करी त्याची कुष्ट वाणी । मुख संवदणी रजकाची ॥४॥
तुका ह्मणे नाहीं चोरीचा व्यापार । विठ्ठलाचें सार नाम ध्यावें ॥५॥

॥ २२६६ ॥

कीर्तन चांग कीर्तन चांग । होय अंग हरिरूप ॥ १ ॥ प्रेमेंछंदें नाचे डोले । हरपला देहभाव ॥ २ ॥ एकदेशीं जीवकळा । हा सकळां सोयरा ॥ ३ ॥ तुका ह्मणे उरला देव । गेला भेव त्या काळें ॥ ४ ॥

॥ २२६७ ॥

कीर्तनाचा विकरा मातेचें गमन । भाड खाई धन विटाळ तो ॥ १ ॥
हरिभक्ताची माता हे हरिगुणकीर्ति । इजवर पोट भरिती चांडाळ ते २
अंत्यज हा ऐसें कल्पांतीं करीना । भाड हे खाईना जननीची ॥ ३ ॥
तुका ह्मणे त्याचें दर्शनही खोटें । पूर्वजांसी नेटें नरका धाडी ॥४॥

॥ २२६८ ॥

कीर्तनाच्या सुखें सुखी होय देव । पंढरीचा राव संगीं आहे ॥ १ ॥

भक्त जाय सदा हरिकीर्ति गात । त्यासवें अनंत हिंडतसे ॥ २ ॥
त्रैलोक्य भ्रमण करीत नारद । त्यासवें गोविंद फिरतसे ॥ ३ ॥
नारद मंजुळ सुस्वरें गीत गाये । मार्गी चालताहे संगे हरि ॥ ४ ॥
तुका ह्मणे त्याला गोडी कीर्तनाची । नाहीं आणिकांची प्रीति ऐसी ५

॥ २२६९ ॥

खोंकरी आधण होय पाकसिद्धि । हें तों घडों कधीं शकेचि ना ॥१॥
खापराचे अंगीं घासितां परिस । न पालटे कीस काढिलिया ॥ २ ॥
पालथें घागरी रिचवितां जळ । तुका ह्मणे खळ तैसे कथे ॥ ३ ॥

॥ २२७० ॥

गायत्री विकोन पोट जे जाळिती । तया होय गति यमलोकीं ॥१॥
कन्येचा जे नर करिती विकरा । ते जाती अघोरा नरकपाता ॥२॥
नाम गाऊनिया द्रव्य जे मागती । नेणों तयां गति कैसी होय ॥३॥
कैसें होय त्यांचे तेच हो जाणती । आम्हासी संगती नलगे त्यांची ४
आमुचा सांगाती आहे तो श्रीहरि । नलगे दुराचारी तुका म्हणे॥५॥

॥ २२७१ ॥

जेथें कीर्तन करावें । तेथें अन्न न सेवावें ॥१॥ बुका लावूं नये भाळां माळ घालूं नये गळां ॥२॥ तट्टावृषभासी दाणा । तृण मागों नये जाणा ॥३॥ तुका म्हणे द्रव्य घेती । देती तेही नरका जाती ॥४॥

॥ २२७२ ॥

जळती कीर्तनें । दोष पळतील विघ्नें ॥ १ ॥ हांचि बळिवंत गाढे । आनंद करूं दिंडीपुढें ॥ २ ॥ कळि पापाची हे मूर्ति । नामखड्ग घेऊं हातीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाऊं । बळें दमामे हीं लावूं ॥ ४ ॥

॥ २१७३ ॥

टाळघोळ सुख नामांचा गजर । घोषें जयजयकार ब्रह्मानें
गरुडटके दिंडी पतकांचे भार । आनंद अपार ब्रह्मादिकां ॥ २ ॥
आनंदें वैष्णव जाती लोटांगणीं । एक एकाहूनि भद्रजाति ॥ ३ ॥
तेणें सुखें सुटे पाषाणा पाझर । नष्ट खळ नर शुद्ध होती ॥ ४ ॥
तुका ह्मणे सोपें वैकुंठासी जातां । रामकृष्ण कथा हेचि वाट ५ ॥

॥ २२७४ ॥

त्या हरिदासांची भेटी घेतां । नरका उभयतांसी जातां ॥१॥ मातेपरीस थोरी कथा । भाड घेतां न लाजे २ देतां घेतां नरकवासी । उभयतांसी रवरव ३ तुका ह्मणे नरकगांवा जाती हांवा घरोनि ॥४॥

॥ २२७५ ॥

दया क्षमा शांति । तेथें देवाचि वसति ॥१॥ पावे धांवोनिया घरा । राहे धरोनिया थारा ॥ २ ॥ कीर्तनाचे वाटे । झाडिया पेसा लोटे ॥ ३ ॥ तुका ह्मणे घडे । पूजा नामें देव जोडे ॥ ४ ॥

॥ २२७६ ॥

दीन आणि दुर्बळांसी । सुखरासी हरिकथा ॥ १ ॥ तारूं भवसागरींचें । उंचनीच अधिकार ॥ २ ॥ चरित्र तें उच्चारावें । केलें देवें गोकुळीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे आवडी धरीं । कृपा करी म्हणऊनी ॥ ४ ॥

॥ २२७७ ॥

धीर तो कारण । साह्य होतो नारायण । नेदी होऊं सीण । वाहों चिंता दासांसी ॥ १ ॥ सुखें करावें कीर्तन । हर्षें गावे हरिचे गुण । वारी सुदर्शन । आपणाचि कळिकाळ ॥ २ ॥ जीव वेची माता । बाळा जडभारी होतां । तो तों नव्हे दाता । प्राकृता यांसारिखा ॥ ३ ॥ हें तों माझ्या अनुभवें । अनुभवा आलें जीवें । तुका म्हणे सत्य व्हावें । आहाच नये कारणा ॥ ४ ॥

॥ २२७८ ॥

न राहे क्षण एक वैकुंठीं । क्षीरसागरीं त्रिपुटी । जाय तेथें दाटी । वैष्णवांची धांवोनि ॥ १ ॥ भाविक गे माये भोळें गुणाचें । आवडे तयाचें नाम घेतां तयासी ॥ २ ॥ जो नातुडे कवणेपरी । तपें दानें व्रतें थोरी । ह्मणतां वाचे हरी । राम कृष्ण गोविंदा ॥ ३ ॥ चौदा भुवनें जया पोटीं । तो राहे भक्तांचिये कंठीं । करूनिया साटी । चित्त प्रेम दोहींची ४ जया रूप ना आकार । धरी नाना अवतार । घेतलीं हजार । नांवें ठेवूनि आपणां ५ ऐसा भक्तांचा ऋणि । पाहातां आगमीं पुराणीं । नाहीं तुका ह्मणे ध्यानीं । तो कीर्तनीं नाचतसे ॥ ६ ॥

॥ २२७९ ॥

न लाहिजे जपें न लाहिजे तपें । आम्हांसी हें सोपें गीतीं गातां १
न करितां ध्यान न करितां धारणा । तो नाचे कीर्तनामाजी हरि ॥ २ ॥
जयासी नाहीं रूप आणि आकार । तोचि कटी कर उभा विटे ॥ ३ ॥
अनंत ब्रम्हांडें जयाचिया पोटीं । तो आम्हां संपुष्टीं भक्तिभावें ॥ ४ ॥
तुका ह्मणे वर्म जाणती लडिवाळें । जें होतीं निर्मळें अंतर्बाहीं ॥ ५ ॥

॥ २२८० ॥

न वजे वाया कांहीं ऐकतां हरिकथा । आपण करितां वाया न वजे १
न वजे वाया कांहीं देवळासी जातां । देवळासी पूजितां वाया न वजे २
न वजे वाया कांहीं केलिया तीर्थे । अथवा कां व्रत वाया न वजे ३
न वजे वाया झालें संतांचें दर्शन । शुद्ध आचरण वाया न वजे ४
तुका ह्मणे भाव असतां नसतां । सायास करितां वाया न वजे ॥ ५ ॥

॥ २२८१ ॥

नामाचें चिंतन प्रगट पसारा । असाल तें करा जेथें तेथें ॥ १ ॥
सोडवील माझा स्वामी निश्चयेसीं । प्रतिज्ञा हे दासीं केली आम्हीं २

गुण दोष नाहीं पाहात कीर्तनीं । प्रेमें चक्रपाणी वश्य होय ॥ ३ ॥
तुका म्हणे कडु वाटतो प्रपंच । रोकडे रोमांच कंठ दाटे ॥ ४ ॥

॥ २२८२ ॥

पानें जो खाईल बैसोनि कथेसी । घडेल तयासी गोहत्या ॥ १ ॥
तमाखू ओढोनि काढील जो धूर । बुडेल तें घर तेणें पापें ॥ २ ॥
कीर्तनीं बडबड करील जो कोणी । बेडुक होउनी येईल जन्मा ॥३॥
जयाचिये मनीं कथेचा कंटाळा । होती त्या चांडाळा बहु जाच ४
जाच होती पाठी उडती यमदंड । त्याचें काळें तोंड तुका ह्मणे ॥५॥

॥ २२८३ ॥

बरवें केलें माझ्या मनें । पंथें येणें निघालें ॥ १ ॥ अभयेंच जावें ठाया । देवराया प्रतापें ॥ २ ॥ साधनाचा नलगे पांग । अवघें सांग कीर्तन ॥ ३ ॥ तुका म्हणे सत्ता थोरी । कोण करी खोळंबा ॥ ४ ॥

॥ २२८४ ॥

बोलाचे गौरव । नव्हे माझा हा अनुभव ॥ १ ॥ माझी हरिकथा माउली । नव्हे आणिकांसी पांगिली ॥ २ ॥ त्याली वाढविलें । निजपदीं निजाविलें ॥ ३ ॥ दाटली वो रसें । त्रिभुवन ब्रह्मरसें ॥ ४ ॥ विष्णु जोडी कर । माथां रज वंदी हर ॥ ५ ॥ तुका ह्मणे बळ । तोरडी हा कळिकाळ ॥ ६ ॥

॥ २२८५ ॥

भाग्यालागीं लांचावलें । देवधर्म ते राहिले ॥ १ ॥ कथे जातां आळसे मन । प्रपंचाचें मोठें ज्ञान ॥ २ ॥ अखंडप्रीति जाया । नेणे भजनाच्या ठाया ॥ ३ ॥ कथाकीर्तन धनाचें । सर्वकाळ विषयीं नाचे ॥ ४ ॥ तुका ह्मणे पंढरीराया । ऐसे जन्मविले वाया ॥ ५ ॥

॥ २२८६ ॥

भावभक्तिवादें करावें कीर्तन । आशाबद्ध मन करूं नये ॥ १ ॥
अन्न पाणी धन द्रव्य नारायण । विठ्ठला वांचून बोलूं नये ॥ २ ॥
सप्रेम करावें देवाचें कीर्तन । भय द्या सोडून शरीराचें ॥ ३ ॥
तरी मग जोडे विठ्ठल निधान । केलिया कीर्तन सिद्धि पावे ॥ ४ ॥
देव जोडिलिया तया काय उणें । तुका ह्मणे मन धीट करा ॥ ५ ॥

॥ २२८७ ॥

भूमीवरी कोण ऐसा । गांजूं शके हरिच्या दासा ॥१॥ सुखें नाचा हो कीर्तनीं । जयजयकारें गर्जा वाणी ॥२॥ काळा सुटे पळ । जाती दुरितें सकळ ॥३॥ तुका म्हणे चित्तीं । साच माना हे निश्चिती ॥४॥

॥ २२८८ ॥

मुंगिचिया घरा कोण जाय मूळ । देखोनिया गूळ धांव घाली ॥१॥
याचकाविण काय खोळंबला दाता । तोचि धांवे हिता आपुलिया २

उदक अन्न काय ह्मणे मज खाय । भुकेला तो जाय चोजवीत ३॥ व्याधी पिडिला धांवे वैद्याचिया घरा। दुःखाच्या परिहारा आपुलिया तुका ह्मणे जया आपुलें स्वहित । करणें तोचि प्रीत धरी कथ ५॥

॥ २२८९ ॥

यम सांगे दूता। तुम्हां नाहीं तेथें सत्ता। जेथें होय कथा। सदा घोष नामाचा॥१॥ नका जाऊं तया गांवां । नामधारकाच्या शिवा । सुदर्शन यावा। घरटीं फिरे भोंवती २ चक्र गदा घेउनी हरि । उभा असे त्यांचे द्वारीं। लक्ष्मी कामारी । रिद्धिसिद्धी सहित ३ ते ब्रह्मिया-शिरोमणी।हरिभक्त ये मेदिनी । तुका ह्मणे कानीं यम सांगे दूतांचे४

॥ २२९० ॥

या रे नाचों अवघेजण । भावें प्रेमें परिपूर्ण ॥ १ ॥ गाऊं पंढरीचा राणा। क्षेम देउनि संतजना २ सुख फुकासाठीं । साधे हरि-नाम बोभाटीं ॥ ३ ॥ प्रेम वाटितो उदार । देतां नाहीं सानाथोर४ पापें पळालीं बापुडीं । काळ झाला देशधडी ॥ ५ ॥ तुका ह्मणे धन्य काळ । आजि प्रेमाचा सुकाळ ॥ ६ ॥

॥ २२९१ ॥

लटिकें तें ज्ञान लटिकें तें ध्यान । जरि हरिकीर्तन प्रिय नाहीं ॥१॥
लटिकोंच दंभ घातलें दुकान । चाळविलें जन पोटासाठीं ॥ २ ॥
लटिकेंचि केलें वेदपारायण । जरि नाहीं स्फुंदन प्रेम कथे ॥ ३ ॥
लटिकें तें तप लटिका तो जप । आळस निद्रा झोप कथाकाळीं ४
नाम नावडे तो करील बोहरी । नाहीं त्याची खरी चित्तशुद्धि ५॥
तुका ह्मणे ऐसी गर्जती पुराणें । शिष्टांचीं वचनें मागिलाही ॥ ६ ॥

॥ २२९२ ॥

लावूनिया पुष्टी पोर । आणि करकर कथेमाजी १ पडा पायां करा विनती । दवडा हातीं धरोनिया २ कुर्वाळुनि बैसे मोहें। प्रेम कां हें नासीतसे ॥३॥ तुका ह्मणे वाटे चित्त । करा फजित म्हणऊनि ४

॥ २२९३ ॥

विठ्ठल मुक्तिदाता । नव्हे मरो हें बोलतां १ मज न साहावें कानीं । विष उत्तर लागे मनीं २ हरिकथेसी धिक्कारी । शत्रु माझा तो वैरी ३ सुना काळातोंडा । जा या देवा ह्मणे धोंडा ४ अहं ह्मणे ब्रह्म । नेणे भक्तीचें तें वर्म ॥५॥ तुका ह्मणे क्षण । नको तयाचें दर्शन ॥ ६ ॥

॥ २२९४ ॥

सातादिवसांचा जरी झाला उपवासी। तरी कीर्तनासी टाकूं नये १
फुटो हा मस्तक तुटो हें शरीर । नामाचा गजर सोडूं नये ॥ २ ॥
शरीराचे होत दोन्ही तेही भाग । परि कीर्तनाचा रंग सांडों नये३
तुका ह्मणे ऐसा नामीं ज्या निर्धार । तेथें निरंतर देव असे ॥ ४ ॥

॥ २२९५ ॥

सांगतां दुर्लभ ज्ञानाचिया गोष्टी । अनुभव तो पोटीं कैचा घडे १॥
भजनाचे सोई जगा परिहार । नेणत्यां सादर चित्त कथे ॥ २ ॥
नाइकवे कानीं साधन उपाय । ऐकतो गाथे हरुषें गीत ॥ ३ ॥
नव्हे आराणूक जावयासी वना । वेध कामिमना हरिकथेचा ॥४॥
काळाच्या साधना कोणा अंगीं बळ । चिंतना मंगळ अष्टप्रहर५॥
तुका ह्मणे आम्ही खेळों भातुकुलें । विभागासी मुलें भोळीं येथें ६॥

॥ २२९६ ॥

सांडूनि कीर्तन न करीं आणीक काज । नाचेन निर्लज्ज तुझ्या रंगीं १
आवडीचें आर्त पुरवीं पंढरिराया । शरण तुझ्या पायां याचि लागी २
टाळी वाहूनिया विठ्ठल ह्मणेन । तेणें निवारीन भव श्रम ॥ ३ ॥
तुका ह्मणे देवा नुपेक्षावें आम्हां । न्यावें निजधामा आपुलिया ॥४॥

॥ २२९७ ॥

सोपें वर्म आम्हां सांगितलें संतीं । टाळ दिंडी हातीं घेउनि नाचा १
समाधीचें सुख सांडा ओवाळून । ऐसा या कीर्तन ब्रह्मरस ॥ २ ॥
पुढती घडे चढतें सेवन आगळें । भक्तिभाग्यबळें निर्भरता ॥ ३ ॥
उपजोंचि नये संदेह चित्तासी । मुक्ति चारी दासी हरिदासांच्या ४
तुका ह्मणे मन पावोनि विश्रांती । त्रिविध नासती ताप क्षणें ॥ ५ ॥

॥ २२९८ ॥

स्वर्गींचे अमर इच्छिताती देवा । मृत्युलोकीं व्हावा जन्म आम्हां १
नारायणनामें होऊं जीवन्मुक्त । कीर्तनीं अनंत गाऊं गीतीं ॥ २ ॥
वैकुंठींचे जन सदा चिंतिताती । कइं येथें येती हरिचे दास ॥ ३ ॥
यमधर्म वाट पाहे निरंतर । जोडोनिया कर तिष्ठतसे ॥ ४ ॥
तुका ह्मणे पाववया पैल पार । नाममंत्र सार भाविकासी ॥ ५ ॥

॥ २२९९ ॥

हरिकथेची आवडी देवा । करितो सेवा दासांची १ ह्मणोनि हिंडे मागें मागें । घरटी जागे घालितसे २ निर्लज्ज भोजें नाचत रंगीं । भरतें अंगीं प्रेमाचें ३ तुका ह्मणे विकलें देवें । आपण भावें संचसाटी ४॥

॥ २३०० ॥

होई आतां माझ्या भोगाचा भोगिता । सकळ अनंता शुभाशुभ १॥
आठवुनी पाय राहिलों हृदयीं । निवारली तई सकळ चिंता ॥२॥
अचळ न चळे देहाचें चळण । आहे हें वळण प्रारब्धेंचि ॥ ३ ॥
तुका ह्मणे जालें एकचि वचन । केलिया कीर्तन आराणूक ॥ ४ ॥

॥ २३०१ ॥

क्षुधा तृषा कांहीं सर्वथा नावडे । पहावया धांवे कोल्हाटासी ॥१॥
कथेसी साक्षेपें पाचारिला जरी । ह्मणे माझ्या घरीं कोणी नाहीं ॥२॥

बलात्कारें जरी आणिला कथेसी । निद्रा घे लोडेसी टेंकूनिया ३॥ तुका ह्मणे थुंका त्याच्या तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ४ ॥

॥ २३०२ ॥

संतांपायीं विन्मुख जाला । तो जरि संगति मागों आला ॥१॥ तरि त्याहुनि दुरी जावें । सुखें एकांतीं बैसावें २ आत्मचर्चा नाहीं जेथें । आगी लावुनि द्यावी तेथें ३ तुका ह्मणे नाहीं । चित्ता समाधान कांहीं ४

॥ २३०३ ॥

संतांची स्तुति ते दर्शनाच्या योगें । पडिल्या प्रसंगें ऐसी कीजे१॥ संकल्प ते सदा स्वामीचोचि चित्तीं । फांको नये वृत्ति अखंडित२ दास्यत्व तें असे एकविध नांवें । उरीं नये जीवें भिन्नत्वासी ॥३॥ निज बीजा येथें तुका अधिकारी । पाहिजे ते परी तये वेळे ॥ ४ ॥

नामपर अभंग.

॥ २३०४ ॥

नामसंकीर्तन साधन पैं सोपें । जळतील पापें जन्मांतरें ॥ १ ॥
नलगे सायास जावें वनांतरा । सुखें येतो घरा नारायण ॥ २ ॥
ठायींच बैसोनि करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ॥ ३ ॥
रामकृष्णहरि विठ्ठल केशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥ ४ ॥
याविण असतां आणकि साधन । वाहातसें आण विटोबाची ॥५॥
तुका ह्मणे सोपें आहे सर्वांह्नि । शाहाणा तो धणी घेतो येथें ६ ॥

॥ २३०५ ॥

नाम उच्चारितां कंठी । पुढें उभा जगजेठी ॥ १ ॥ ऐसें धरोनिया ध्यान। मनें करावें चिंतन २ ब्रह्मादिकांच्या ध्याना नये। तो हा कीर्तनाचे सोये ॥३॥ तुका ह्मणे सार घ्यावें । मनें हरिरूप पाहावें ॥४॥

॥ २३०६ ॥

नाम घेतां उठाउठीं । होय संसारासी तुटी ॥ १ ॥ ऐसा लाभ बांधा गांठी। विठ्ठल पायीं पडे मिठी २ नामापरतें साधन नाहीं । जें तूं करिशी आणिक कांहीं ३ हाकारोनि सांगे तुका। नाम घेतां राहों नका ४

॥ २३०७ ॥

नाम तारक भवसिंधु । विठ्ठल तारक भवसिंधु ॥१॥ नामधारक तया अरि मित्रु । समता त्यागुनिया क्रोधु ॥२॥ नामधारक तया। कदापि न घडे विषयाचा बाधु ॥३॥ ज्या नामें तरले शुकादिक । नारद संत मुनिजन साधु ॥ ४ ॥ जाणूनिया जे नसरें । ते नेणती जैसा गज अंधु ५ सहज तुकया । नामचि जपतां स्वरूपीं वेधु ६॥

॥ २३०८ ॥

नाम पावन पावन । त्याह्नुन पवित्र आहे कोण ॥१॥ शिव हाला-

हालें तापला । तोही नामें शीतळ जाला ॥ २ ॥ शिवास नामाचा आधार । केला कळिकाळ किंकर ॥३॥ मरण जालें काशीपुरीं । तेथें नामचि उद्धरी ४ तुका ह्मणे अवघीं चोरें । एक हरिनाम सोइरें ५

॥ २३०९ ॥

नामाचा डांगोरा फिरवीं घरोघरीं । ह्मणा हरी हरी सर्व भावें १॥
नामें हरती कर्में वैकुंठींची पै वस्ति । संनिध श्रीपति सदोदित२॥
नामाचा महिमा बहुतां कळला । नामें उद्धरिला अजामेळ ॥ ३ ॥
गजेंद्राची स्थिति पुराणीं बोलती । नामेंचि श्रीपति पावलासे ४॥
तुका ह्मणे नाम घेतां मुक्ति आहे । नामें सर्व पाहें आकळिलें ॥५॥

॥ २३१० ॥

नाम घेतां नलगे मोल । नाममंत्र नाहीं खोल ॥१॥ दोंचि अक्षरांचें काम । उच्चारावें राम राम ॥ २ ॥ नाहीं वर्णधर्मयाती । नामीं अवघींचि सरतीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाम । चैतन्य निजधाम ॥ ४ ॥

॥ २३११ ॥

नामें स्नानसंध्या केलें क्रियाकर्म । त्याचा भवश्रम निवारला ॥१॥
आणिकें दुरावली करितां खटपट । वाउगे बोभाट वर्माचिण ॥२॥
रामनामीं जींहीं धरिला विश्वास । तींही भवपाश तोडियेले ॥३॥
तुका ह्मणे केलें कळिकाळ ठेंगणें । नामसंकीर्तनें भाविकांनीं ॥४॥

॥ २३१२ ॥

हरि ह्मणतां गति पातकें नासती । कळिकाळ कांपती हरि ह्मणतां१
हरि ह्मणतां भुक्ति हरि ह्मणतां मुक्ति । चुके यातायाती हरि ह्मणतां २
तपें अनुष्ठानें न लगती साधनें । तुटती बंधनें हरि ह्मणतां ॥ ३ ॥
तुका ह्मणे भावें जपा हरिचें नाम । मग काळयम शरण तुह्मां ४ ॥

॥ २३१३ ॥

लागोनिया पायां विनवितों तुह्मांला । कर टाळी बोला मुखें नाम१
विठ्ठल विठ्ठल ह्मणा वेळोवेळां । हा सुखसोहळा स्वर्गीं नाहीं ॥ २ ॥
कृष्ण विष्णु हरि गोविंद गोपाळ । मार्ग हा प्रांजळ वैकुंठींचा ३ ॥
सकळांशीं येथें आहे अधिकार । कलयुगीं उद्धार हरिनामें ॥ ४ ॥
तुका ह्मणे नामापाशीं चारी मुक्ति । ऐसें बहुताग्रंथीं बोलियेलें ५॥

॥ २३१४ ॥

यालागीं आवडी ह्मणा राम कृष्ण । जोडा नारायण सर्वकाळ १ ॥
सोपें हें साधन लाभ येतो घरा । वाचेसी उच्चारा राम हरि ॥२॥
न लगती कष्ट नलगे सायास । करावा अभ्यास विठ्ठलाचा ॥ ३ ॥
नलगे तप तीर्थ करणें महादान । केल्या एक मन जोडे हरि ॥४॥
तुका म्हणे कांहीं न वेचितां धन । जोडे नारायण नामासाठीं ॥५॥

॥ २३१५ ॥

रामनामाचे पवाडे । अखंड ज्याची वाचा पढे ॥१॥ धन्य तो एक संसारीं । रामनाम जो उच्चारी २ रामनाम गर्जे वाचा। काळ आज्ञाधारक त्याचा ॥३॥ तुका ह्मणे रामनामीं। कृत्यकृत्य झालों आम्हीं ४॥

॥ २३१६ ॥

नाम घेतां वाया गेला। ऐसा कोणें आईकिला ॥१॥ सांगा विनवितों तुम्हांसी। संत महंत सिद्ध ऋषी ॥२॥ नामें तरला नाहीं कोण। ऐसा द्यावा निवडून ॥३॥ सलगीच्या उत्तरा। तुका ह्मणे क्षमा करा ॥४॥

॥ २३१७ ॥

सारासार विचार करा उठाउठी। नाम धरा कंठीं विठोबाचें ॥१॥ तयाच्या चिंतनें निरसेल संकट। तराल दुर्घट भवसिंधु ॥ २ ॥ जन्मोनिया कुळीं वाचे स्मरे राम। धरी हाचि नेम अहर्निशीं ॥३॥ तुका ह्मणे कोटी कुळें तीं पुनीत। भावें गातां गीत विठोबाचें ॥४॥

॥ २३१८ ॥

कामामध्यें काम। कांहीं म्हणा रामराम। जाइल भवश्रम सुख होईल दुःखाचें ॥१॥ कळों येईल अंतकाळीं प्राणप्रयाणाचे वेळीं। राहातीं निराळीं। रांडापोरें सकळ ॥ २ ॥ जीतां जीली जैसातैसा। पुढें आहे रे वोळसा। उगवुनि फांसा। काय करणें तें करीं ॥ ३ ॥ केलें होतें याचि जन्में। अवघें विठोबाच्या नामें। तुका ह्मणे कर्में। जाळोनिया तरसी ॥ ४ ॥

॥ २३१९ ॥

ब्राह्मणा न कळे आपुलें तें वर्म। गंवसे परब्रह्म नामें एका ॥ १ ॥ लहानथोरासी करितो प्रार्थना। दृढ नारायणा मनीं धरा ॥ २ ॥ सर्वांप्रति माझी हेचि असे विनंती। आठवा श्रीपती मनामाजी ३॥ केशव यारायण करितां आचमन। तेचि संध्या स्नान कर्म क्रिया ४ नामें करा नित्य भजन भोजन। ब्रह्मकर्म ध्यान याचे पायीं ॥ ५ ॥ तुका ह्मणे हेंचि निर्वाणीचें शस्त्र। म्हणोनि सर्वत्र स्मरा वेगीं ॥६॥

॥ २३२० ॥

जयजय म्हणा राम। हातें टाळी वाचे नाम ॥ १ ॥ आटाअटी नाहीं ज्यास। न वेचे मोल न पडे खांस २ आपण ह्मणे आणिकां हातीं। यज्ञादिकीं नये ते गति ॥३॥ आसन भोजन करितां काम। ध्यानसमाधि ह्मणतां राम ॥४॥ मंत्र जपा हाचि सार। वर्णां याती जयजयकार ॥ ५ ॥ म्हणतां राम ह्मणे तुका वेळोवेळां चुकों नका ६

॥ २३२१ ॥

कळे न कळे त्या धर्म। ऐका सांगतों रे वर्म। माझ्या विठो-

बाचें नाम । अट्टाहासें उच्चारा ॥१॥ तो या दाखवील वाटा । जया पाहिजे त्या नीटा । कृपावंत मोटा । पाहिजे तो कळवळा ॥ २ ॥ पुसतां चुका होतो वाटा । सर्वे बोलावा गोमटा । मोडों नेदी कांटा । घेऊं सांटा चोरासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे मोल । नलगे द्यावें वेचा बोल । विठ्ठल विठ्ठल । ऐसा छंद मानसीं ॥ ४ ॥

॥ २३२२ ॥

विठ्ठल विठ्ठल येणें छंदें । ब्रह्मानंदें गर्जावें ॥१॥ वाये टाळ टाळ्याटाळी । होय होळी विघ्नांची ॥२॥ विठ्ठल आदि अवसानीं । विठ्ठल मनीं स्मरावा ३ तुका ह्मणे विठ्ठलवाणी । वदा कानीं आईका ॥४॥

॥ २३२३ ॥

ऐसें पुढती मिळतां आतां । नाहीं सत्ता स्वतंत्र ॥१॥ ह्मणउनि फावलें तों घ्यावें । नाम गावें आवडी २ संचित प्रारब्ध गाढे । धांवें पुढें क्रियमाण ३ तुका ह्मणे घुबडा ऐसें । जन्म सरिसें शुकराचें४

॥ २३२४ ॥

तया घडले सकळ नेम । मुखीं विटोबाचें नाम १ कांहीं नलगे सिणावें । आणिक वेगळाल्या भावें २ वाचे उच्चारावें । रामकृष्ण गोविंदा ॥ ३ ॥ फळ पावाल अवलिळा । भोग वैकुंठ सोहळा ॥४॥ तुका ह्मणे त्याच्या नांवें । तोचि होईल स्वभावें ॥ ५ ॥

॥ २३२५ ॥

पडतां जड भारी । दासीं आठवावा हरी ॥१॥ मग तो होऊं नेदी सीण । आड घाली सुदर्शन ॥ २ ॥ नामाच्या चिंतनें । बारा वाटा पळती विघ्नें ॥ ३ ॥ तुका ह्मणे प्राण । करा देवासी अर्पण ॥ ४ ॥

॥ २३२६ ॥

जन्मा येउनि कां रे निदसुरा । जाये भेटी वरा रखुमाईच्या ॥ १ ॥ पाप ताप दैन्य जाईल सकळ । पावसी अढळ उत्तम तें ॥ २ ॥ संतमहंतसिद्धहरिदासदाटणी ।फिटती पारणीं इंद्रियांचीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे तेथें नामाचा गजर । फुकाची अपार लुटी घेई ॥ ४ ॥

॥ २३२७ ॥

उभाउभी फळ । अंगीं मंत्राचे या बळ ॥ १ ॥ म्हणा विठ्ठल विठ्ठल। गोड आणि स्वल्प बोल ॥ २ ॥ कळिकाळाची बाधा । नव्हे उच्चारितां सदा ३ तुका ह्मणे रोग । वारे भवा ऐसा भोग ॥ ४ ॥

॥ २३२८ ॥

ब्रह्मरस घेई काढा । जेणें पीडा वारेल ॥ १ ॥ पथ्य नाम विटोबाचें । आणीक वाचे न सेवी ॥२॥ भवरोगा ऐसें जाय । आणीक काय क्षुल्लकें ॥३॥ तुका ह्मणे नव्हे बाधा । अणीक कदा भूतांची४॥

॥ २३२९ ॥

भक्तिभाव आह्मी बांधिलासे गांठीं । सादावितों हाटीं घ्या रे कोणी१
सुखाचिया पेठें घातला दुकान । मांडियेले वान रामनाम ॥ २ ॥
सुखाचें फुकाचें सकळांचें सार । तरावया पार भवसिंधु ॥ ३ ॥
मागें भाग्यवंत जाले थोर थोर । तिहीं केला फार हाचि सांटा ४॥
खोटें कुडें तेथें नाहीं घातपात । तुका ह्मणे चित्त शुद्ध करीं ॥ ५॥

॥ २३३० ॥

स्वल्प वाट चला जाऊं । वाचे गाऊं विठ्ठल ॥ १ ॥ तुम्ही आह्मी खेळीमेळीं । गदारोळी आनंदें ॥ २ ॥ ध्वजा कुंचे गरुडटके । शृंगार निके करोनि ॥३॥ तुका ह्मणे हेंचि नीट । जवळी वाट वैकुंठा ॥ ४ ॥

॥ २३३१ ॥

संध्या कर्म ध्यान जप तप अनुष्ठान । अवघें घडे नाम उच्चारितां । न वेचे मोल कांहीं लगती न सायास । तरी कां आळस करिसी ह्मणी ॥१॥ ऐसें हें सार कां न घेसी फुकाचें । काय तुझें वेचे मोल तया ॥ २ ॥ पुत्रस्नेहें शोक करी अजामेळ । तंव तो कृपाळ जवळीं उ॥ । अनाथांच्या नाथें घातला विमानीं । नेला उचलूनि परलोका ३ अंतकाळीं गणिका पक्षियाच्या छंदें । राम राम पदें उच्चारिलें । तंव त्या दिनानाथा कृपा आली कैशी । त्यानें तियेसि वैकुंठा नेलें ४ अवचिता नाम आलिया हे गती । चिंततां चित्तीं जवळी असे । तुका ह्मणे भावें स्मरतां राम राम । कोण जाणे तये दशे ५

॥ २३३२ ॥

सरळीं हीं नामें उच्चारावीं सदा । हरि बा गोविंदा रामकृष्णा १॥
पुण्य पर्वकाळ तीर्थेंही सकळ । कथा सिंधुजळ न्हाऊं येती ॥ २ ॥
अवघेचि लाभ बैसलिया घरा । येती भाव धरा एके ठायीं ॥ ३ ॥
शेळ्या मेंढ्या गाई सेवा घेती म्हैसी । कामधेनु तैसी नव्हे एक ४
तुका म्हणे सुखें पाविजे अनंता । हें वर्म जाणतां सुलभचि ॥ ५ ॥

॥ २३३३ ॥

ऐसी जोडी करा राम कंठीं धरा । जेणें चुके फेरा गर्भवास ॥ १ ॥
नासिवंत आटी प्रियापुत्रधन । बीज ज्याचा सीण तेंचि फळ ॥२॥
नाव धड करा सहस्र नामांची । जे भवसिंधूची थडी पावे ॥ ३ ॥
तुका म्हणे काळा हाणा तोंडावरी । भाता भरा हरि रामबाणें ४ ॥

॥ २३३४ ॥

सेवा ते आवडी उच्चारावें नाम । भेदाभेदकाम निवारूनि ॥ १ ॥
नलगे हालावें चालावें बाहेरी । अवघेंचि घरीं बैसलिया ॥ २ ॥
देवाचींच नामें देवाचिये शिरीं । सर्व अळंकारीं समर्पावें ॥ ३ ॥
तुका म्हणे होय भावेंचि संतोषी । वसे नामापाशीं आपुलिया ४॥

॥ २३३५ ॥

रामकृष्णनाम मांडीं पावोळी । तेणें होईल होळी पापा धुनी ॥१॥ ऐसा मना छंद लावीं रे अभ्यास । जया नाहीं नाश ब्रह्मरसा २॥ जोडी तरी ऐसी करावी न सरे । पुढें आम उरे मागुताली ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसें धरा कांहीं मनीं । यातायाती खाणीं चुकतील ४॥

॥ २३३६ ॥

गाये नाचे वाहे टाळी । साधन कळी उत्तम हें ॥ १ ॥ काय जाणों तरले किती । नाव आइती या बैसा ॥२॥ सायासाचें नाहीं काम । घेतां नाम विठोबाचें ३ तुका ह्मणे निर्वाणीचें । शस्त्र साचें हें एक ४

॥ २३३७ ॥

नाशवंत देह नासेल हा जाणा । का रे उच्चाराना वाचे नाम ॥१॥ नामेंचि तारिले कोट्यान हे कोटी । नामें हे वैकुंठीं बैसविल ॥२॥ नामापरतें सार नाहीं त्रिभुवनीं । ते कां तुम्हीं मनीं आठवाना ३॥ तुका ह्मणे नाम वेदांसी आगळें । तें दिलें गोपाळें फुकासाठीं ॥४॥

॥ २३३८ ॥

अन्न तापलिया कायाचि होमे । तापत्रयें संतप्त होती ॥ संचित क्रियमाण प्रारब्ध तेथें । न चुके संसारस्थिति ॥ घटाटघटिका जैसी फिरतांचि राहिली । भरली जाली एकीरितीं ॥ साक्षी हा प्रपंच पंचाय अन्न । तेणें पावसील निजशांतीरे ॥ १ ॥ नारायण- नाम नारायणनाम । नित्य करीं काम जिव्हासुखें ॥ जन्मजरा व्याधि पापपुण्य तेथें । नासती सकळही दुःखेंरे ॥ २ ॥ शीत उष्ण वन सेवितां कपाट । आसनसमाधीं साधीं ॥ तप तीर्थ दान व्रत आचर- रण । यज्ञ नाना मन बुद्धी ॥ भोगाभोग तेथें न चुकती प्रकार । जन्मजरादुःखव्याधि ॥ साहोनि काम क्रोध अहंकार । आश्रमीं अविनाश साधींरे ॥ ३ ॥ घोकितां अक्षर अभिमानविधि । निषेध लागला पाठी ॥ वाद करितां निंदा घडती दोष । होत वज्रलेपो भविष्यति ॥ दूषणाचें मूळ भूषण तुका म्हणे । सांडीं मिथ्या ख्याती ॥ रिघोनि संतां शरण सर्वभावें । राहें भलतिया स्थितीरे ॥ ४ ॥

॥ २३३९ ॥

जवळी मुखापाशीं । असतां नेघे अहर्निशीं ॥ १ ॥ भवनिर्दाळण नाम । विठ्ठल विठ्ठल नासी काम ॥ २ ॥ सुखाचें शेजार । करू कां नावडे घर ॥ ३ ॥ तुका ह्मणे ठेवा । कां हा न करीच बरवा ॥ ४ ॥

॥ २३४० ॥

काय नव्हे केलें । एका चिंतितां विठ्ठलें ॥ १ ॥ सर्वसाधनांचें सार । भवसिंधु उतरी पार ॥ २ ॥ योग याग तपें । केली तयानें अमुपें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जपा । मंत्र त्रिअक्षरी सोपा ॥ ४ ॥

॥ २३४१ ॥

चाल केलासी मोकळा । बोल विठ्ठल वेळोवेळां ॥ १ ॥ तुज पापचि नाहीं ऐसें । नाम घेतां जवळीं वसे ॥२॥ पंच पातकांच्या कोडी । नामें जळतां न लगे घडी ॥ ३ ॥ केलीं मागें नका पाहों । तुज जमान आम्ही आहों ४ करीं तुज जीं करवतीं । आणिक नामें घेऊं किती ५ तुका म्हणे काळा । रीग नाहीं निघती ज्वाळा ॥६॥

॥ २३४२ ॥

युक्ताहार न लगे आणिक साधनें । अल्प नारायणें दाखविलें ॥१॥ कलियुगामाजी करावें कीर्तन । तेणें नारायण देईल भेटी ॥ २ ॥ न लगे लौकिक सांडावा वेव्हार । घ्यावें वनांतर भस्म दंड ॥ ३ ॥ तुका म्हणे मज आणिक उपाव । दिसती ते वाव नामेविण ॥ ४ ॥

॥ २३४३ ॥

फुकाचें तें लुटा सार । व्हा रे अमर सदैव ॥ १ ॥ नाहीं गर्भवास पुढती । डोंगर जळती दोषांचे २ उदंड भाव उदंड घ्यावें । नाम गावें आवडी ३ तुका म्हणे घरिच्या घरीं । देशा उरीं न सीणिजे ४॥

॥ २३४४ ॥

चारी वेद जयासाठीं । त्याचें नाम धरा कंठीं ॥ १ ॥ न करी आणीक साधन । कष्टसी कां वायाविण २ अठरा पुराणांचे पोटीं । नामाविण नाहीं गोष्टी ३ गीता जेणें उपदेशिली । ते ही विटेवरी माउली ॥ ४ ॥ तुका ह्मणे सार धरीं । वाचे हरिनाम उच्चारी ५ ॥

॥ २३४५ ॥

फळकट तो संसार । येथें सार भगवंत ॥१॥ ऐसें जागवितों मना । सरसें जनासहित ॥ २ ॥ अवघें निरसुनि काम । घ्यावें नाम विठोबाचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवाविण । केला शीण तो मिथ्या ॥ ४ ॥

॥ २३४६ ॥

न कळे तें कळों येईल उगलें । नामें या विठ्ठलें एकाचिया ॥ १ ॥
न दिसे तें दिसों येईल उगलें । नामें या विठ्ठलें एकाचिया ॥ २ ॥
न बोलों तें बोलों येईल उगलें । नामें या विठ्ठलें एकाचिया ॥ ३ ॥
न भेटे तें भेटों येईल आपण । करितां चिंतन विठोबाचें ॥ ४ ॥
अलभ्य तो लाभ होईल अपार । नाम निरंतर म्हणतां वाचे ॥ ५ ॥
तुका ह्मणे आसक्त जीव सर्वभावें । तरतील नांवें विठोबाच्या ॥६॥

॥ २३४७ ॥

गर्जत जावें नामावळी । प्रेमें टाळी वाहोनि ॥१॥ येणें सुखें पुढती धांवें । भेटी सवें गोपाळ ॥ २ ॥ लोटांगण घाला तळीं । वंदा धुळी संतांची ॥ ३ ॥ तुका ह्मणे विठ्ठल लाहो । ऐसा बाहो उभारा ॥४॥

॥ २३४८ ॥

उमटती वाणी । वाट नामाचिया ध्वनी ॥१॥ बरें सेवन उपकारा । द्यावें द्यावें या उत्तरा ॥ २ ॥ सरळ आणि मृद । कथा पाहावी ते ऊर्ध्व ॥ ३ ॥ गात जात तुका । ह्याचि उपदेश आइका ॥ ४ ॥

॥ २३४९ ॥

समुद्रवलयांकित पृथ्वीचें दान । करितां समान नये नामा ॥ १ ॥
म्हणऊनि कोणी न करावा आळस । म्हणा रात्रंदिवस रामराम २॥
सकळही शास्त्रें पठण करितां वेद । सरी नये गोविंदनामें एकें ३॥
सकळही तीर्थें प्रयाग काशी । करितां नामाशीं तुळेति ना ॥ ४ ॥
कर्वतीं कर्मरीं देहासी दंडण । करितां समान नये नामा ॥ ५ ॥
तुका ह्मणे ऐसा आहे श्रेष्ठाचार । नाम हेंचि सार विठोबाचें ॥ ६॥

॥ २३५० ॥

हित तें हें एक राम कंठीं राहे । नाठविती देहभाव देहीं ॥ १ ॥
ह्याचि एक धर्म निज बीजवर्म । हेंचि जाली कर्मं केलीं महा ॥२॥
चित्त राहे पायीं रूप बैसे डोळां । जीवें कळवळा आवडीचा ॥३॥
अखंड न खंडे अभंग न भंगे । तुका म्हणे गंगे मिळणी सिंधु ॥४॥

॥ २३५१ ॥

न पालटे एक । भोळा भक्ताचि भाविक ॥१॥ येरां नाश आहे पुढें । पुण्य सरतां उघडें ॥ २ ॥ नेणे गर्भवास । एक विष्णूचाचि दास ॥ ३ ॥ तुका ह्मणे खरें । नाम विठोबाचें बरें ॥ ४ ॥

॥ २३५२ ॥

काय देवें खातां घेतलें हातींचें । आलें हें तयाचें थोर भय ॥ १ ॥
ह्मणतां गजरें राम एकसरें । जळतीं पाप थोरें भयधाकें ॥ २ ॥
काय खोळंबले हात पाय अंग । नासिलें हें सांग रूप काय ॥ ३ ॥
कोण लोकीं सांग घातला बाहेरी । ह्मणतां हरि हरि तुका ह्मणे ४॥

॥ २३५३ ॥

अनेक दोषांचे काट । जे जे गादले निघोंट । होती हरिनामें चोखट । क्षण एक न लगतां ॥ १ ॥ तुह्मी हरि म्हणा हरि म्हणा । महादोषांचे छेदना ॥ २ ॥ अति प्रीतीचा बांधला । नष्ट चांडाळीं रतला । क्षण न लगतां नेला । वैकुंठासी हरि म्हणतां ॥३॥ अनंत दोषाचें मूळ । झालें वाल्मिका सबळ । झाला हरिनामें निर्मळ । गंगाजळ पैं जैसा ॥४॥ हरि ह्मणतां तरले । महादोषी गणिके नेले । कुंटणी भिल्ली उद्धरिलें । वैकुंठासी हरि ह्मणतां ॥ ५ ॥ हरिविण जन्म नको वाया । जैसी दर्पणींची छाया । म्हणोनि तुका लागे पायां । शरण तया हरिसी ॥ ६ ॥

॥ २३५४ ॥

न धरी प्रतिष्ठा कोणाचीही यम । म्हणतां कां रे राम लाजा ह्मणी १
सांपडे हातींचे मोडवील काळा । तो कां वेळोवेळां नये वाचे ॥२॥
कोण लोक जो हा सुटला तो एक । गेले कुंभपाक रवरवांत ॥३॥
तुका ह्मणे हित तो म्हणा विठ्ठल । न म्हणे तो भोगील केलें तें ४॥

॥ २३५५ ॥

झाडा चोरपोनि खाऊनिया पाला । आठवी विठ्ठला वेळोवेळां ॥१॥
वल्कलें नेसुनि चिंध्नीया वेढूनी । सांडी जवळूनी देहभान ॥ २ ।
लोकमान वमनासमान मानणें । एकांतीं राहणें विठोसाठीं ॥ ३ ॥
सहसा करूं नये प्रपंचीं सौजन्य । सेवावें अरण्य एकांतवास ४॥
ऐसा हा निर्धार करी जो मनाचा । तुका ह्मणे त्याचा पांग फिटे ५॥

॥ २३५६ ॥

झांकूनिया नेत्र काय जपतोसी । जो नाहीं मानसीं प्रेमभाव ॥ १ ॥
रामराम ह्मणा उघड मंत्र जाणा । चुकती यातना गर्भवास ॥ २ ॥
मंत्र यंत्र संध्या करिसी जडीबुटी । तेणें भूतसृष्टी पावसील ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐक सुंदर मंत्र एक । भवसिंधुतारक रामनाम ॥ ४ ॥

॥ २३५७ ॥

काय सुख आहे वाउगें बोलतां । ध्यातां पंढरीनाथा कष्ट नाहीं १
सर्वकाळ वाचे उच्चारितां हरि । तया सुखा सरी पाड नाहीं ॥ २ ॥
रामकृष्णरंगीं रसना रंगली । अमृताची उकळी नाम तुझें ॥ ३ ॥
तुका ह्मणे धन्य तयाचें वदन । जया नारायण ध्यानीं मनीं ॥ ४ ॥

॥ २३५८ ॥

संसारीं असतां हरिनाम घेसी । तरीच उद्धरसी पूर्वजेंसीं ॥ १ ॥
अवघींच इंद्रियें न येतील कामा । जिव्हे रामनामा उच्चारी वेगीं २
शरीरसंपत्ति नव्हे रे आपुली । भ्रांतीची साउली अवघी व्यर्थ ३
तुका म्हणे सार हरिनाम उच्चार । येऱ्हवीं येरझार हरीविण ॥४॥

॥ २३५९ ॥

गाबळाचे ग्रंथीं कां रे पडां सदा । मिथ्या भेदवादा वागवितां १
संसारगाबाळीं पडसी निखळ । झालासी तूं खळ तेणें मानें ॥ २ ॥
साधनसंकटीं गुंतसी कासया । व्यर्थ गा अपायामाजी गुंती ॥३॥
निर्मळ फुकाचें नाम गोविंदाचें । अनंतजन्माचे फेडी मळ ॥ ४ ॥
तुका म्हणे नको करूं कांहीं कष्ट । नाम वाचे स्पष्ट हरि बोले ५॥

॥ २३६० ॥

विठोबाचें नाम ज्याचे मुखीं नित्य । त्या देखिल्या पतित उद्धरती १
विठ्ठलविठ्ठल भावें ह्मणे वाचे । तरी तो काळाचे दांत ठेंची ॥ २ ॥

बहुत तारिले सांगों किती आतां । ऐसा कोणी दाता दुजा नाहीं ३ तुका ह्मणे त्यांही ऐकोनिया कीर्ती । धरिला एकांतीं हृदयामाजी ४

॥ २३६१ ॥

विचा केला ठोबा । ह्मणोनि नांव तो विठोबा ॥१॥ कां रे नेणां त्याचें नांव । काय वेदासि नाहीं ठाव ॥ २ ॥ शेष स्तुती प्रवर्त्तला । जिव्हा चिरूनि पलंग झाला ३ तुका ह्मणे सत्ता । ज्याची काळाचिये माथा ४

॥ २३६२ ॥

काळ सार्थक केला त्यांनीं । धरिला मनीं विठ्ठल ॥ १ ॥ नाम वाचे श्रवण कीर्ति । पाउलें चित्तीं समान २ कीर्तनाचा समारंभ । निर्दंभ सर्वदा ३ तुका ह्मणे स्वरूपसिद्धि । नित्य समाधि हरिनामीं ॥४॥

॥ २३६३ ॥

विटेवरी समचरण । तो हा रुक्मिणी रमण १ वेदशास्त्रामाहेर । केले दासां उपकार ॥ २ ॥ नामापाशीं चारी मुक्ति । पाहा हृदयीं प्रतिति ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळा । अंगीं जयाच्या सकळा ॥ ४ ॥

॥ २३६४ ॥

तरी कां पवाडे गर्जती पुराणें । असता नारायण शक्तिहीन ॥ १ ॥ कीर्तीविण नाहीं नामाचा डांगोरा । येर कां इतरां वाणीत ना २ ॥ तरीच म्हणा तो आहे चिरंजीव । केलियाचा जीव सुखीं गुण ३ चांगलेंपण हें निरुपमता अंगीं । आणलें श्रीरंगीं म्हणऊनी ॥ ४ ॥ तरीच हा थोर सांगितलें करी । अभिमान हरीपाशीं नाहीं ॥ ५ ॥ तुका म्हणे तरी करिती याची सेवा । देवापाशीं हेवा नाहीं कुडें ६

॥ २३६५ ॥

जन्मा येणें घडे पातकाचे मुळें । संचिताचें फळ आपुलिया ॥१॥ मग वायाविण दुःख वाहों नये । रुसोनिया काय देवावरी ॥ २ ॥ ठाउकाची आहे संसार दुःखाचा । चित्तीं सीण याचा वाहूं नये३॥ तुका ह्मणे त्याचें नाम आठवावें । तेणें विसरावें जन्मदुःख ॥ ४ ॥

॥ २३६६ ॥

नाम न वदे ज्याची वाचा । तो लेक दो बापांचा ॥१॥ हेंचि ओळख तयाची । खूण जाणा अभक्ताची ॥ २ ॥ ज्यासी विठ्ठल नाहीं ठावा । त्याचा संग न करावा ॥ ३ ॥ ठावा नाहीं पांडुरंग । जाणा जातीचा तो मांग ॥ ४ ॥ नाम न ह्मणे ज्याचें तोंड । तेंचि चर्मकाचें कुंड ॥५॥ तुका ह्मणे त्याच दिवशीं । रांड गेली महारापाशीं ॥६॥

॥ २३६७ ॥

नामाविण काय वाउगी चावट । वाया वटवट हरीविण ॥१॥ फुकटची सांगे लोकांचिया गोष्टी । राम जगजेठी वाचे नये ॥२॥ मेळवूनि चाट करी सुरापान । विषयांच्या गुणें मातलासे ३ बैसोनि टवाळी

करी दुजयाची । नाहीं गोविंदाची आठवण ॥४॥ बळें यम दांत खाय तयावरी । जंव भरे दोरी आयुष्याची ॥ ५ ॥ तुका ह्मणे तुला सोड-वील कोण । नाहीं नारायण आठविला ॥ ६ ॥

॥ २३६८ ॥

नामधारकासी नाहीं वर्णावर्ण । लोखंड प्रमाण नाना जात ॥ १ ॥
शस्त्र अथवा गोळे भलता प्रकार । परिसीं संस्कार सकळ हेम २॥
पर्जन्य वर्षतां जीवना वाहावट । तें समसकट गंगे मिळे ॥ ३ ॥
सर्व तें हें जाय गंगाचि होऊन । तैसा वर्णावर्ण नाहीं नामीं ॥ ४ ॥
महापुरीं जैसें जातसे उदक । मध्यें तें तारक नाव जैसी ॥ ५ ॥
तये नावेसंगें ब्राह्मण तरती । केवी ते बुडती अनामिक ॥ ६ ॥
नाना काष्ठजात पडतां हुताशनीं । ते जात होउनी एकरूप ॥ ७ ॥
तेथें निवडेना धुरे की चंदन । तैसा वर्णावर्ण नामीं नाहीं ॥ ८ ॥
पूर्वानुबोळख तेंचि पैं मरण । जरि पावे जीवन नामामृत ॥ ९ ॥
नामामृतें झालें मुळींचें स्मरण । सहज साधन तुका ह्मणे ॥ १० ॥

॥ २३६९ ॥

नाम दूषी त्याचें नको दरुषण । विष तें वचन वाटे मज ॥ १ ॥
अमंगळ वाणी नाइकवे कानीं । निंदेची पोहणी उठे तेथें ॥ २ ॥
काय सांच लभ्य त्याचिये वचनीं । कोणत्या पुराणीं दिली ग्वाही३
काय आड लावूं त्यांच्या तोंडासी । आतां या जिभेसी काय करूं४
तुका म्हणे संत न मानती त्यांस । घेऊं पाहे ग्रास यमदूत ॥ ५ ॥

॥ २३७० ॥

तुटे मायाजाळ विघडे भवसिंधू । जरि लागे छंदु हरिनामें ॥ १ ॥
येर कर्म धर्म करितां ये काळीं । माजी तरला बळी कोण सांगा २॥
न पढवे वेद नव्हे शास्त्रबोध । नामाचे प्रबंध पाठ करा ॥ ३ ॥
न साधवे योग न करवे वैराग्य । साधा भक्तिभाग्य संतसंगें ॥४॥
नव्हे अनुष्ठान न कळे ब्रह्मज्ञान । करावी सोपान कृष्णकथा ॥ ५ ॥
तुका ह्मणे वर्म दावियेलें संतीं । यापरता विश्रांति आणिक नाहीं ६

॥ २३७१ ॥

प्रपंचाची पीडा सोसीतो अघोरी । जया क्षणभरी नाम नये ॥१॥
नाम नाठवितो आत्मया रामाचें । धिग जिणें त्याचें भवा मूळ ॥ २ ॥
मूळ तें पापाचें आचरण तयाचें । नाहीं राघवाचें स्मरण त्या ॥ ३ ॥
स्मरण भजन नावडे जयासी । आंदणीया दासी यमदूतां ॥ ४ ॥
चिंतन रामाचें न करी तो दोषी । एकांत तयासीं बोलों नये । ५ ॥
नये त्याचा संग धरूं ह्मणे तुका । धरितां पातका वांटेकरी ॥ ६ ॥

॥ २३७२ ॥

ह्मणवितां हरी न ह्मणे तयाला । दरवडा पडिला देहामाजी ॥ १ ॥
आयुष्यधन त्याचें नेलें यमदूती । भुलविला निश्चिती कामरंगें ॥ २ ॥
नावडे ती कथा देउळासी जातां । प्रियधनसुता लक्ष तेथें ॥ ३ ॥
कोण नेतो तया घटिका दिवसा एका । कां रे ह्मणे तुका नागवसी ४

॥ २३७३ ॥

सांडुनि सुखाचा वांटा । मुक्ति मागे तो करंटा ॥१॥ कां रे न घ्यावे हे जन्म । काय वैकुंठा जाऊन ॥२॥ येथें मिळतो दहीं भात । नाहीं वैकुंठीं ते मात ३ तुका ह्मणे मुक्ति नलगे । राहीन संताचिया संगें ४ ।

॥ २३७४ ॥

मंत्र चळे पिसें लागतें सत्वर । अबद्ध ते फार तरले नामें ॥ १ ॥
अशौच तो बाधी आणिकां अक्षरां । नाम निदसुरां घेतां तरे ॥२॥
रागज्ञानघात चुकतां होय वेळ । नाम सर्वकाळ शुभदायक ॥ ३ ॥
आणिकां भजना बोलिला निषेध । नाम तें अभेद सकळां मुखीं ४॥
तुका ह्मणे तपें घालिती घालणी । वेश्या उद्धरूनि नेली नामें ॥५॥

॥ २३७५ ॥

वेदाचें गव्हर न कळे पाठकां । अधिकार लोकां नाहीं येरां ॥ १ ॥
विठोबाचें नाम सुलभ सोपारें । तारी एकसरें भवसिंधु ॥ २ ॥
जाणत्या असाध्य मंत्र तंत्र काळ । येर तो सकळ मूढ लोकां ॥ ३ ॥
तुका ह्मणे विधि निषेध लोपला । उच्छेद या झाला मारगाचा ॥४॥

॥ २३७६ ॥

वाचे विठ्ठल नाहीं । तोचि प्रेतरूप पाहीं ॥ १ ॥ धिग त्याचें ज्या लेपण । भार न साहे मेदिन ॥ २ ॥ न बैसे कीर्तनीं । गुण नाइके जो कानीं ॥ ३ ॥ जातां कांटाळे देउळा । तोचि सुना मुखकाळा ४ हरिभक्तीविण । त्याचें जळो शहाणपण ॥ ५ ॥ तुका ह्मणे तेणें । वंशा आणियेलें उणें ॥ ६ ॥

॥ २३७७ ॥

विठ्ठलनामाचा नाहीं ज्या विश्वास । तो वसे उदास नरकामध्यें १
तयासी बोलतां होईल विटाल । नव जाये तो जळस्नान करितां २
विठ्ठलनामाची नाहीं ज्या आवडी । त्याची काळ घडी लेखिताहे ३॥
तुका ह्मणे मज विठोची आण । जरी प्रतिवचन करिन त्यासी ४॥

॥ २३७८ ॥

नव्हे गुरुदास्य संसारिया । वैराग्य तरी भेणे कांपे विषयां । तैसें नाम नोव्हे पंढरीराया । जया सायास न लगती १ ह्मणोनि गोड सर्वभावें । आंघोळी न लगे तोंड धुवावें । अर्थचाड जोवें । नलगे भ्यावें संसारा ॥ २ ॥ कर्म तंव न पुरे संसारिक । धर्म तरी

फलदायक । नाम विठ्ठलाचें एक । नाशी दुःख भवाचें ॥ ३ ॥ न लगे सांडणें मांडणें । आगमनिगमाचें देखणें । अवघें तुका ह्मणे । विठ्ठलनामें आटलें ॥ ४ ॥

॥ २३७९ ॥

कर्म धर्म नव्हती सांग । उण्या अंगें पतन ॥१॥ भलत्या काळें नामावळी । सुलभ भोळी भाविकां ॥२॥ प्रायश्चितें पडती पायां । गाती तयां वैष्णवां ॥३॥ तुका ह्मणे नुपजे दोष । करा घोष आनंदें ॥४॥

॥ २३८० ॥

अनुहात ध्वनि वाहे सकळां पिंडीं । राम नाहीं तोंडीं कैसा तरे ॥१॥ सकळां जीवांमाजी देव आहे खरा । देखिल्या दुसरा विण न तरे २ ज्ञान सकळांमाजी आहे हें साच । भक्तीवीण तेंच ब्रह्म नव्हे ॥३॥ काय मुद्रा कळल्या कराव्या सांगतां । दीप न लगतां उन्मनीचा ४ ॥ तुका ह्मणे नका पिंडाचें पाळण । स्थापू नारायण आतुडेना ॥५॥

॥ २३८१ ॥

नाम ह्मणतां मोक्ष नाहीं । ऐसा उपदेश करितील कांहीं । बधिर व्हावें त्यांचे ठायीं । दुष्ट वचन वाक्य तें ॥ १ ॥ जयाचे राहिलें मानसीं । तेचि पावले तयासी । चांचपडतां मेलीं पिसीं । बलतैसीं वाचाळें ॥ २ ॥ नवविधीचा निषेध । जेणें मुखें करिती वाद । जन्मा आले निंद्य । सूकरयाती संसारा ॥ ३ ॥ काय सांगों वेळोवेळां । आठव नाहीं रे चांडाळा । नामासाठीं बाळा । क्षीरसागरीं कोंडिलें ॥ ४ ॥ आपुलिया नामासाठीं । लागे शंखासुरापाठीं । फोडोनिया पोटीं । वेद चारी काढिले ॥ ५ ॥ जगीं प्रसिद्ध बोली । नामें गणिका तारिली । आणिकें हीं उद्धरिलीं । पातकी महादोषी ॥ ६ ॥ जे हे पवाडे गर्जती । नाम प्रल्हादाच्या चित्तीं । जळतां बुडतां घातीं । राखे ह्यातीं विषाचे ॥ ७ ॥ काय सांगूं ऐशीं कीर्ती । तुका ह्मणे नाम ख्याती । नरकाप्रती जाती । निषेधितीं तीं एकें ॥ ८ ॥

॥ २३८२ ॥

नाम आहे जयापाशीं । जेथें राहे तेथेंचि काशी ॥ १ ॥ ऐसा नामाचा महिमा । जाणे वाल्मीक शंकर उमा ॥ २ ॥ नाम प्रल्हादबाळ । जाणे पापी अजामेळ ॥ ३ ॥ नाम जाणे तो नारद । नामें ध्रुवा अक्षय पद ॥ ४ ॥ नाम गणिकेतें तारी । पशु गजेंद्र उद्धरी ॥ ५ ॥ नाम जाणे हणुमंत । जाणताती महासंत ॥ ६ ॥ नाम जाणे शुकमूर्ति । जाणे राजा परिक्षिती ॥ ७ ॥ नाम जाणे तुका । नाहीं संसाराचा धोका ॥ ८ ॥

॥ २३८३ ॥

भोळे भक्त भाव धरिती मानसीं । त्यांसी हृषीकेशी जवळीच॥१॥ भाव नाहीं मनीं अभाविक सदा । त्याचिया खेदा काय सांगों॥२॥ गणिकेसारिखीं नामें उद्धरिलीं । सज्ञानें पडिलीं खटाटोपीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय शुद्ध माझी जाती । थोर केली ख्याती हरिनामें॥४

॥ २३८४ ॥

हाकेसरसी उडी । घालूनिया स्तंभ फोडी ॥ १ ॥ ऐसी कृपावंत कोण । माझे विठाईवांचून ॥२॥ कारितां आठव । धांवोनिया घाली कव ।॥३॥ तुका ह्मणे गीतीं गातां । नामें द्यावी सायुज्यता ॥ ४ ॥

॥ २३८५ ॥

नाम साराचें ही सार । शरणागत यमकिंकर ॥१॥ उत्तमा उत्तम । वाचे बोला पुरुषोत्तम ॥ २ ॥ नाम जपतां चंद्रमौळी । नामें तरला वाल्हाकोळी ॥३॥ तुका ह्मणे वर्णूं काय । तारक विठोबाचे पाय ॥४॥

॥ २३८६ ॥

नामाचे पवाडे बोलती पुराणें । होऊनि कीर्तन तूंचि ठेला ॥ १ ॥ आदिनाथा कंठीं आगळा हा मंत्र । आवडीचें स्तोत्र सदा घोकी २॥ आगळें हें सार उत्तमा उत्तम । ब्रह्मकर्मा नाम एक तुझें ॥ ३ ॥ तिहीं त्रिभुवनीं गमन नारदा । हातीं विणा सदा नाम मुखीं ॥४॥ परिक्षिती मृत्यु सातां दिवसांचा । मुक्त झाला वाचा उच्चारितां ५ कोळियाची कीर्ति वाढली गहन । केलें रामायण रामा आधीं ॥६॥ सगुण निर्गुण तुज ह्मणे वेद । तुका ह्मणे भेद नाहीं नामीं ॥ ७ ॥

॥ २३८७ ॥

पुराणप्रसिद्ध सीमा नामतारक महिमा ॥ १ ॥ मागें जाळी महा दोष । पुढें नाहीं गर्भवास ॥ २ ॥ जें निंदिलें शास्त्रें । वंद्य झालें नाममात्रें ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसा । त्रिभुवनीं नामठसा ॥ ४ ॥

॥ २३८८ ॥

तारिलीं बहुतें चुकवूनि घात । नाम हें अमृत स्वीकारितां ॥ १ ॥ नेणतां सायास शुद्ध आचरण । यातीकुळहीन नामासाठीं ॥ २॥ जन्म नांव धरी भक्तीचा पाळणा । आकार कारणा याचसाठीं ॥३॥ असुरीं दाटलीं पाप होतां फार । मग फेडी भार पृथिवीचा ॥४॥ तुका ह्मणे देव भक्तपण सार । कवतुकवेव्हार तयासाठीं ॥ ५ ॥

॥ २३८९ ॥

गोड झालें पोट धालें । अवचित वाचे आलें । म्हणतां पाप गेलें । विठ्ठलसें वाचेसी ॥ १ ॥ सत्य माना रे सकळ । उद्धरिला । अजामेळ । पातकी चांडाळ । नामासाठीं आपुलिया ॥ २ ॥ चित्त पावलें आनंदा । सुखसमाधीतें सदा । म्हणतां गोविंदा । वेळोवेळां वा-

चेसी ॥ ३ ॥ हें जाणती अनुभवी । जया चाड तो चोजवी । तुका ह्मणे दावी । रूप तेंचि अरूप ॥ ४ ॥

॥ २३९० ॥

तुज न भें मी कळिकाळा । मज नामाचा जिव्हाळा ॥ १ ॥ माझ्या बळिया नेणसी कोण । संतां साह्य नारायण ॥ २ ॥ शंख वधिला सागरीं । वेद घेउनि आला चारी ॥३॥ कूर्में दैत्य वधिला जेटी । हात पाय लपवी पोटीं ॥४॥ वराहरूप धरिलें गाढें । धरा प्रतापें धरिली दाढे ॥ ५ ॥ हिरण्यकश्यप विदारिला । भक्त प्रल्हाद रक्षिला ॥ ६ ॥ वामन झाला दिनानाथ । बळी पाताळीं घातला दैत्य ॥ ७ ॥ छेदुनिया सहस्र भुजा । कामधेनु आणिली बोजा ८॥ शिळा प्रतापें सागरीं तारी । स्थापीं बिभीषण रावणा मारी ॥९॥ मारोनिया कंसराव । पिता सोडविला वसुदेव ॥ १०॥ पांचाळीसी गांजितां वैरी । वस्त्रें आपण झाला हरी ॥ ११ ॥ गजेंद्र स्मरे राम राम । त्यासी पाववी वैकुंठधाम ॥ १२ ॥ तुका ह्मणे हरिरूप झालें । पुन्हा जन्मा नाहीं आलें ॥ १३ ॥

॥ २३९१ ॥

करुणा बहुत तुझिया अंतरा । मज विश्वंभरा कळों आलें ॥ १ ॥ पक्षियांसी तुझें नाम जें ठेविलें । तये उद्धरिलें गणिकेसी ॥ २ ॥ कुंटिणी ते दोष बहु आचरली । नाम घेतां आली करुणा तुज ३॥ हृदय कोमळ तुझें नारायणा । ऐसें बहुतां जनां तारियेलें ॥ ४ ॥ तुका ह्मणे सीमा नाहीं तुझे दये । कोमल हृदय पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ २३९२ ॥

तुझिया नामाचा विसर न पडावा । ध्यानीं तो रहावा पांडुरंग १॥ सांगितला मंत्र श्रीरामनामाचा । सर्वकाळ वाचा हेंचि बोले ॥२॥ उफराटें नाम वाल्मीक बोलला । तोही वंद्य केला नारायणें ॥३॥ तुका ह्मणे मज तुझाचि भरवसा । धांवुनिया कैसा येसी देवा ४॥

॥ २३९३ ॥

सर्वसुखा अधिकारी । मुखें उच्चारी हरिनाम ॥ १ ॥ सर्वांगें तो सर्वोत्तम । मुखीं नाम हरीचें ॥ २ ॥ ऐशी उभारिली बाहे । वेदीं पाहें पुराणीं ॥३॥ तुका ह्मणे येथें कांहीं । संदेह नाहीं भरंवसा ॥४॥

॥ २३९४ ॥

ठाव देऊनिया राखें पायांपासीं । मी तों आहें राशी पातकाची ॥१॥ पातकाची राशी ह्मणतां लागे वेळ । ऐके तो कृपाळ नारायण ॥२॥ नारायणनामें अवघें सांग झालें । असंगाचि केलें एकमय ॥३॥

एकमय झालें विठोबाच्या नामें । भेदाभेद कर्में आणिक कांहीं ४ ॥
तुका ह्मणे चित्तीं चिंतिलें जें होतें । तें होय आपैतें नामें याच्या॥५॥

॥ २३९५ ॥

धन्य दिवस आजि डोळियां लाधला । आनंद देखिला धणीवरी १॥
धन्य झालें मुख निवाली रसना । नाम नारायणा घोष करूं ॥२॥
धन्य हें मस्तक सर्वांग शोभलें । संतांचीं पाउलें लागतातीं ॥३॥
धन्य आजि पंथें चालतीं पाउलें । टाळिया शोभले धन्य कर ॥४॥
धन्य तुका ह्मणे आह्मांसी फावलें । पावलों पाउलें विठोबाचीं ॥५॥

॥ २३९६ ॥

काय करतील केलीं नित्य पापें । वसे नाम ज्यापें विठोबाचें ॥१॥
तृणीं हुताशन लागला ते रासी । जळतील तैसीं क्षणमात्रें ॥ २ ॥
विष्णुमूर्तिपाद पाहतां चरण । तेथें कर्म कोण राहूं शके ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाम जाळी महादोष । जेथें होय घोष कीर्तनाचा ॥ ४ ॥

॥ २३९७ ॥

फोडिलें भांडारें । माप घेऊनियां खरें ॥ १ ॥ केली हरिनामाची वरो । मागितलें आतां सरो ॥ २ ॥ देशांत सुकाळ । झाला हारपला काळ ॥ ३ ॥ घ्यावें धणीवरी । तुका ह्मणे लहान थोरीं ॥ ४ ॥

॥ २३९८ ॥

लागलें भरतें । ब्रह्मानंदाचें वरतें ॥ १ ॥ झाला हरिनामाचा तारा । शींड लागलें फरारा ॥ २ ॥ बैसोनि सकळ । बाळ चालिले गोपाळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाट । बरवी सांपडली नीट ॥ ४ ॥

॥ २३९९ ॥

आमिषाचे आसे गळ गिळी मासा । फुटोनिया घसा मरण पावे १
मरणाचे वेळे करी तळमळ । आठवी कृपाळ तये वेळीं ॥ २ ॥
अंतकाळीं ज्याच्या नाम आलें मुखा । तुका ह्मणे सुखा पार नाहीं ३

॥ २४०० ॥

सत्य साच खरें । नाम विटोबाचें बरें १ येणें तुटतीं बंधनें । उभयलोकीं कीर्ति जेणें ॥ २ ॥ भाव ज्याचे गांठीं । त्यासी लाभ उठाउठी ॥ ३ ॥ तुका ह्मणे भोळा । जिंकूं जाणे कळिकाळा ॥ ४ ॥

॥ २४०१ ॥

तुटे भवरोग । संचितक्रियमाणभोग ॥ १ ॥ ऐसें विठोबाचें नाम । उच्चारितां खंडे जन्म ॥२॥ वसों न सके पाप । जाय त्रिविध तो ताप ॥ ३ ॥ तुका ह्मणे माया । होय दासी लागे पायां ॥ ४ ॥

॥ २४०२ ॥

नाम गोड नाम गोड । पुरे कोड सकळही ॥ १ ॥ रसना येरां रसां विटे । घेतां घोट अधिक हें ॥ २ ॥ आणिकां रसें मरण गांठीं । येणें तुटी संसार॥३॥तुका ह्मणे आहार झाला । हा विठ्ठल आह्मांसी ४

॥ २४०३ ॥

निजल्यानें गातां उभा नारायण । बैसल्या कीर्तन करितां डोले १॥
उभा राहोनिया मुखीं नाम वदे । नाचे हा गोविंद नाना छंदें २ ॥
मार्गी चालतां मुखीं नाम वाणी । उभा चक्रपाणी मागें पुढें ॥३॥
तुका ह्मणे यासी कीर्तनाची गोडी । प्रेमें घाली उडी नामासाठीं४॥

॥ २४०४ ॥

काय करील तें नव्हे विश्वंभर । सेवकां दारिद्र लाज नाहीं ॥ १ ॥
मजपासूनि हें पडिलें अंतर । काय तो अव्हेर करूं जाणें ॥ २ ॥
नामाच्या चिंतनें नासी गर्भवास । नेदी करूं आस आणिकांची ३॥
तुका म्हणे नेणों किती वाया गेले । तयां उद्धरिलें पांडुरंगें ॥ ४ ॥

॥ २४०५ ॥

आलें फळ तेव्हां राहिलें पिकोन । जरि तें जतन होय देंठीं ॥ १ ॥
नामेंचि सिद्धि नामेंचि सिद्धि । व्यभिचार बुद्धि न पवतां ॥ २ ॥
चालिला पंथ तो पाववील ठाया । जरि आड तया नये कांहीं ३ ॥
तुका ह्मणे मध्यें पडती आघात । तेणें होय घात हानि लाभ ॥४॥

॥ २४०६ ॥

ज्याचे गर्जतां पवाडे । कळिकाळ पायां पडे ॥ १ ॥ तो हा पंढरीचा राणा । पुसा साहा चौं अठरां जणां ॥२॥ चिंतितां जयासी । भुक्ति-मुक्ति कामारी दासी ३ वैकुंठासी जावें । तुका ह्मणे ज्याच्या नावें४॥

॥ २४०७ ॥

नाम घेतां कंठ शीतळ शरीर । इंद्रियां व्यापार नाठवती ॥ १ ॥
गोड गोमटें हें अमृतासी वाड । केला कईवाड माझ्या चित्तें २ ॥
प्रेमरसें झाली पुष्ट अंगकांति । त्रिविध सांडिती ताप अंगें ॥ ३ ॥
तुका ह्मणे तेथें विकाराची मात । बोलों नये हित सकळांचें ॥ ४ ॥

॥ २४०८ ॥

मुखीं नाम हातीं मोक्ष । ऐसी साक्ष बहुतांसी ॥ १ ॥ वैष्णवाचा माल खरा । तुरतुरा वस्तूसी ॥ २ ॥ भस्म दंड नलगे काठी । तीर्थी आटी भ्रमण ॥३॥ तुका ह्मणे आडकाठी । नाहीं भेटी देवाचे ॥४ ॥

॥ २४०९ ॥

विठ्ठल नावाडा फुकाचा । आळविल्या साटीं वाचा ॥१॥ कटीं कर जैसे तैसे । उभा राहिला न बैसे ॥ २ ॥ न पाहे सिदोरी । जाती कुळ न विचारी ॥ ३॥ तुका ह्मणे भेटी । हाक देतां उठाउठीं ॥ ४ ॥

॥ २४१० ॥

हो कां दुराचारी । वाचे नाम जो उच्चारी ॥ १ ॥ त्याचा दास मी अंकित । कायावाचामनेंसहित २ नसो भाव चित्तीं । हरिचे गुण गातां गीतीं ॥३॥ करी अनाचार । वाचे हरिनामउच्चार ॥४॥

हो कां भलतें कूळ । शुचि अथवा चांडाळ ॥ ५ ॥ ह्मणवी हरीचा दास । तुका ह्मणे धन्य त्यास ॥ ६ ॥

॥ २४११ ॥

भेदाभेद ताळा न घडे घालितां । आठवा रे आतां नारायण ॥ १ ॥
येणें एक केलें अवघें होय सांग । अच्युताचा योग नाम छंदें ॥ २ ॥
भोंवरें खळाळ चोर वांटा घेती । पावलें मागिलीं [illegible] ॥ ३ ॥
तुका ह्मणे येथें भावेंविण पार । न पाविजे सार हेंचि आहे ॥ ४ ॥

॥ २४१२ ॥

जेथें आठवती स्वामीचे ते पाय । उत्तम तो ठाय रम्य स्थळ ॥ १ ॥
रान अथवा घर एकांत लोकांत । समाधान चित्त तें ते नाहीं ॥ २ ॥
धन्य तो हा काळ सरे आनंदरूप । वाहातां संकल्प गोविंदाचे ३
तुका ह्मणे लाभकाळ तोंचि जीणें । भाग्य नारायणें उत्तम तें ॥ ४ ॥

॥ २४१३ ॥

कस्तूरीचें रूप अति हीनवर । माजी असे सार मोल तया ॥ १ ॥
आणीक ही तैसीं चंदनाचीं झाडें । परिमळें वाढे मोल तया ॥ २ ॥
काय रूपें असे परीस चांगला । धातु केली मोला वाढ तेणें ॥ ३ ॥
फिरंग आटितां नये बारा रूके । गुणें मोलें विकें सहस्त्रवरी ॥ ४ ॥
तुका ह्मणे नाहीं जातीसवें काम । ज्याचे मुखीं नाम तोचि धन्य ५ ॥

॥ २४१४ ॥

कंठीं नामासिका । आतां कळिकाळासी धका ॥ १ ॥ रोखा माना सिका माना । रोखा सिका तत्समाना ॥ २ । रोखा न मना सिका न मना । जतन करा नाककाना ॥ ३ ॥ सिका न मानी रावण । त्याचें केलें निसंतान ॥ ४ ॥ सिका मानी हळाहळ । झालें सर्वांग शीतळ ॥ ५ ॥ तुका म्हणे नाम सिका । पटीं बैसवी निजसुखा ६ ॥

॥ २४१५ ॥

न कारा टांचणी । येथें काहीं आडचणी ॥ १ ॥ जिव्हा अमुप करी माप । विठ्ठल पिकला माझा बाप ॥ २ ॥ आठही प्रहर । बारा मास निरंतर ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाणी । वर्जेना हे घेतां धणी ॥ ४ ॥

॥ २४१६ ॥

लय लक्षी मन न राहे निश्चळ । मुख्य तेथें बळ आसनाचें ॥ १ ॥
हें तों असाध्य जी सर्वत्र या जना । भलें नारायणा आळवितां ॥ २ ॥
कामनेचा त्याग वैराग्य या नांवें । कुटुंब ते सर्वा विषयजात ॥ ३ ॥
कर्म उसंतावें चालतां पाउलीं । होय जंव राहिली देहबुद्धि ॥ ४ ॥
भक्ती तें नमावें जीवजंतुभूत । सांडूनि ऊत कामक्रोध ॥ ५ ॥
तुका ह्मणे साध्य साधन अवघड । देतां हें सांकडें देह बळी ॥ ६ ॥

॥ २४१७ ॥

पवित्र तें अन्न । हरिचिंतनीं भोजन ॥ १ ॥ येर वेठ्या पोट भरी । चाम मशकाच्या परी ॥ २ ॥ जेऊनि तो धाला । हरिचिंतनीं केला काला ॥ ३ ॥ तुका ह्मणे चवी आलें । जें कां मिश्रित विठ्ठलें ॥ ४ ॥

॥ २४१८ ॥

देवा ऐकें हे विनंती । मज नको रे हे मुक्ति । तया इच्छा गति । हें सुख आगळें ॥ १ ॥ या वैष्णवांचे घरीं । प्रेमसुख इच्छा करि । रिद्धिसिद्धि द्वारीं । कर जोडुनि तिष्ठती ॥ २ ॥ नको वैकुंठींचा वास । असे तया सुखा नाश । अद्भुत हा रस । कथाकाळीं नामाचा ॥ ३ ॥ तुझ्या नामाचा महिमा । तुज न कळे मेघश्यामा । तुका ह्मणे आह्मां । जन्म गोड यासाठीं ॥ ४ ॥

॥ २४१९ ॥

प्रेम तेथें वास करी । मुखीं उच्चारितां हरी ॥१॥ प्रेमें यावें तया गांवा । चोजवीत या वैष्णवां ॥ २ ॥ प्रेम पाठी लागे बळें । भक्त देखोनिया भोळे ॥ ३ ॥ प्रेम न वजे दवडितां । शिरे बळें जेथें कथा ॥ ४ ॥ तुका म्हणे थोर आशा । प्रेमा घरीं विष्णुदासां ॥ ५ ॥

॥ २४२० ॥

वंदूं चरणरज सेवूं उष्टावळी । पूर्वकर्मा होळी करुनी सांडूं ॥ १ ॥
अमुप हें गांठीं बांधूं भांडवल । अनाथा विठ्ठल आह्मां जोगा ॥२॥
अवघे होती लाभ एका या चिंतनें । नामसंकिर्तनें गोविंदाच्या ३
जन्ममरणाच्या खुंटतील खेपा । होईल हा सोपा सिद्ध पंथ ॥ ४ ॥
गेले पुढें त्यांचा शोधीत मारग । चला जाऊं माग घेत आह्मी ५ ॥
तुका ह्मणे घालूं जीवपणा चिरा । जाऊं त्या माहेरा निजाचिया ६

॥ २४२१ ॥

नामाची आवडी तोचि जाणा देव । न धरीं संदेह कांहीं मनीं १ ॥
ऐसें मी हें नाहीं बोलत नेणतां । आणोनि संमता संतांचिया २ ॥
नाम ह्मणे तया उरलें साधन । ऐसें हें वचन बोलों नये ॥ ३ ॥
तुका ह्मणे सुख पावे या वचनीं । ज्याचीं शुद्ध दोन्ही मायबापें ४

पंढरीमहात्म्य.

॥ २४२२ ॥

नको आतां पुसों कांहीं । लत्रलाही उसंती ॥१॥ जाय वेगीं पंढरपुरा । तो सोयरा दीनांचा २ वचनाचा न करीं गोवा । रिघे देवासी शरण ॥ ३ ॥ तुका ह्मणे कृपावंता । बहु चिंता दीनाची ॥ ४ ॥

॥ २४२३ ॥

करा करा लागपाठ । धरा पंढरीची वाट । जंव नाहीं चपेट ।

घात पडिला काळाच्या ॥ १ ॥ दुजा ऐसा नाहीं कोणी । जो या काढी भयांतूनि । करा म्हणऊनि । हा विचार ठायींचा ॥२॥ होतीं गात्रें बेंबळीं । दिवस अस्तमाना काळीं । हात पाय टाळीं । जीं मोकळीं आहे तीं ॥ ३ ॥ कां रे घेतलासी सोसें । तुज वाटताहे कैसें । तुका ह्मणे ऐसें । पुढें कें लाहासी ॥ ४ ॥

॥ २४२४ ॥

जाय जाय तूं पंढरी । होय होय वारकरी ॥१॥ सांडोनिया वाळवंट । काय इच्छिसी वैकुंठ ॥२॥ खांद्यां पातकांचे भार । तुळसीमाळा आणि अबीर ३ साधुसंतांच्या दाटणीं । तुका जाय लोटांगणीं ४

॥ २४२५ ॥

जा रे तुम्ही पंढरपुरा । तो सोयरा दीनाचा ॥१॥ गुण दोष नाणी मना । करी आपणासारिखें ॥ २ ॥ उभ गोनि उभा कर । भवपार उतराया ॥३॥ तुका ह्मणे तांतड मोठी । झाली भेटी उदंड ॥ ४ ॥

॥ २४२६ ॥

पंढरीसी जा रे आलेनो संसारा । दीनाचा सोयरा पांडुरंग ॥ १ ॥
वाट पाहे उभा भेटीची आवडी । कृपाळु तातडी उतावीळ ॥ २ ॥
मागील परिहार पुढें नाहीं सीण । जालिया दर्शन एकवेळा ॥ ३ ॥
तुका ह्मणे नेदी आणिकांचे हातीं । बैसला तो चित्तीं निवडेना ॥४॥

॥ २४२७ ॥

वेढा वेढा रे पंढरी । मोर्चे लावा भीमातिरीं ॥१॥ चला चला संत जन । करा देवाशीं भांडण ॥ २ ॥ लुटालुटा पंढरपुर । धरा रखुमाईचा वर ॥ ३ ॥ तुका म्हणे चला । घाव निशाणी घातला ॥ ४ ॥

॥ २४२८ ॥

होय वारकरी । पाहें पाहें रे पंढरी ॥ १ ॥काय करावीं साधनें । फळ अवघेंचि तेणें ॥ २ । अभिमान नुरे । कोड अवघेंचि पुरे ॥ ३ ॥ तुका ह्मणे डोळां । विटे बैसला सावळा ॥ ४ ॥

॥ २४२९ ॥

पुण्य उभें राहो आतां । संताचें या कारणें ॥ १ ॥ पंढरीचे लागा वाटे । सखा भेटे विठ्ठल ॥ २ ॥ संकल्प हे यावे फळा । कळवळा बहुतांचा ॥३॥ तुका ह्मणे होऊं नं क्षमा । पुरुषोत्तमा अपराध ४ ॥

॥ २४३० ॥

पंढरपुरींचें दैवत भजावें । काया वाचा जावें शरण त्या ॥ १ ॥
मनीं ध्यान करी अहंता धरूनी । तया चक्रपाणी दूर ठेला ॥ २ ॥
मान अभिमान सांडुनिया द्यावे । अवघ्या नीच व्हावें तरी प्राप्ति ३
तुका ह्मणे हेंचि कोणासी सांगावें । सादर होऊनि भावें भजे देवा ४

॥ २४३१ ॥

बहुतां जन्मां अंतीं जन्मलासी नरा । देव तूं सोयरा करीं आतां १
करीं आतां बापा स्वहिताचा स्वार्थ । अनर्थाचा अर्थ सांडीं आतां २
सांडीं आतां कुडी कल्पनेचि वाट । मार्ग आहे नीट पंढरीचा ॥३॥
पंढरीस जावें सर्व सुख घ्यावें । रूप तें पहावें विटेवरी ॥ ४ ॥
विटेवरी नीट आनंदाचा कंद । तुका नाचे छंद नाम घोषे ॥ ५ ॥

॥ २४३२ ॥

पंढरीस जाऊं ह्मणती । यम थोर चिंता करिती ॥ १ ॥ या रे नाचों ब्रह्मानंदें । विठ्ठल नामाचिया छंदें ॥ २ ॥ धरिली पंढरीची वाट । पापें रिगालीं कपाट ॥ ३ ॥ केलें भीवरेचें स्नान । यमपुरी पडिलें खान ॥ ४ ॥ दुरोनि देखिली पंढरी । पापें गेली दुरच्यादुरी ॥ ५ ॥ दुरोनि देखीलें राउळ । हरुषें नाचति गोपाळ ॥ ६ ॥ तुका ह्मणे नाहीं जाणें । अखंड पंढरीये राहणें ॥ ७ ॥

॥ २४३३ ॥

नाहीं रिकामीक परि वाहे मनीं । तया चक्रपाणि साह्य होय ॥ १ ॥
उद्वेग जीवासी पंढरीचें ध्यान । तया नारायण साह्य करी ॥ २ ॥
शरीरासी बळ नाहीं स्वता भाव । तया पंढरीराव साह्य करी ॥३॥
असो नसो बळ राहे पराधीन । तरी अनुमान करूं नका ॥ ४ ॥
तुका म्हणे येणें करोनी चिंतन । तया नारायण जवळीक ॥ ५ ॥

॥ २४३४ ॥

नव्हे आराणूक परि मनीं वाहे । होईल त्या साहे पांडुरंग ॥ १ ॥
पंढरीसि जावें उद्वेग मानसीं । धरिल्या पावसी संदेह नाहीं ॥२॥
नसो बळ देह असो पराधीन । परि हें चिंतन टाकों नको ॥ ३ ॥
तुका म्हणे देह पडो या चिंतनें । पुढें लागे येणें याजसाठीं ॥ ४ ॥

॥ २४३५ ॥

जाती पंढरीस । म्हणे जार्दन तयांस ॥ १ ॥ तया आहे संवसार । ऐसें बोले तो माहार ॥ २ ॥ असो नसो भाव । जो हा देखे पंढरिराव ॥ ३ ॥ चंद्रभागे न्हाती । तुका म्हणे भलते याती ॥ ४ ॥

॥ २४३६ ॥

चला पंढरीसी जाऊं । रखुमादेवीवरा पाहूं ॥१॥ डोळे निवतील कान । मना तेथें समाधान ॥२॥ संतां महंतां होतील भेटी । आनंदें नाचों वाळवंटीं ॥३॥ तें तीर्थांचें माहेर । सर्वसुखाचें भांडार ॥ ४ ॥ जन्म नाहीं रे आणीक । तुका ह्मणे माझी भाक ॥ ५ ॥

॥ २४३७ ॥

आमची मिरास पंढरी । आमुचें घर भीमातिरीं ॥ १ ॥ पांडुरंग आ-

मुचा पिता । रखुमाबाई आमुची माता २ भाऊ पुंडलीक मुनि । चंद्रभागा आमुची बहिणी ३ तुका जुनाट मिराशी । ठाव दिला पायांपाशीं ४

॥ २४३८ ॥

आतां जावें पंढरीसी । दंडवत विठोबासी ॥ १ ॥ जेथें चंद्रभागातिरीं । आह्मी नाचों पंढरपुरीं ॥२॥ जेथें संतांची दाटणी । त्याचें घेऊं पायवणी ३ तुका ह्मणे आम्ही बळी । जीव दिला पायां तळीं ४

॥ २४३९ ॥

पंढरीची वारी आहे माझे घरीं । आणीक न करीं तीर्थव्रत ॥ १ ॥ व्रत एकादशी करीन उपवासी । गाइन अहर्निशीं मुखीं नाम ॥२॥ नाम विठोबाचें घेईन मी वाचे । बीज कल्पांतींचें तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ २४४० ॥

पावलों पंढरी वैकुंठभुवन । धन्य आजि दिन सोनियाचा ॥ १ ॥
पावलों पंढरी आनंदगजरें । वाजतील तुरे शंख भेरी ॥ २ ॥
पावलों पंढरी क्षेम आलिंगनीं । संत या सज्जनीं निवविलों ॥ ३ ॥
पावलों पंढरी पार नाहीं सुखा । भेटला हा सखा मायबाप ॥ ४ ॥
पावलों पंढरी येरझार खुंटली । माउली वोळली प्रेमपान्हा ॥ ५ ॥
पावलों पंढरी आपुलें माहेर । नाहीं संवसार तुका ह्मणे ॥ ६ ॥

॥ २४४१ ॥

धन्य जालों हो संसारीं । आह्मी देखिली पंढरी ॥ १ ॥ चंद्रभागे करूं स्नान । पुंडलीकाचें दर्शन ॥२॥ करूं क्षेत्रप्रदक्षिणा । भेटूं संत या सज्जना ॥ ३ ॥ उभे राहूं गरुडपारीं । डोळे भरुनी पाहों हरी ४ तुका म्हणे वाळवंटीं । महालाभ फुकासाठीं ॥ ५ ॥

॥ २४४२ ॥

आम्ही ज्याचे दास । त्याचा पंढरिये वास ॥१॥ तो हा देवांचाही देव । काय कळिकाळाचा भेव २ वेद जया गाती । श्रुति म्हणती नेति नेति ॥ ३ ॥ तुका म्हणे निज । रूपडें हें तत्त्वबीज ॥ ४ ॥

॥ २४४३ ॥

आह्मां सुकाळ नामाचा । जवळी हाट पंढरीचा । सादाविती वाचा । रामनामें वैष्णव ॥ १ ॥ घ्यारे आपुलाल्या परि । नका ठेवूं कांहीं उरी । ओसरतां भरी । तोंडवरी अंबर ॥ २ ॥ वाहे बंदर द्वारका । खेप आली पुंडलिका । उभेंचि विकिलें एका । सनकादिकां सांपडलें ॥ ३ ॥ धन्य धन्य भूमंडळीं । प्रगटली नामावळी । घेती जीं दुबळीं । तीं आगळीं सदैव ॥ ४ ॥ माप आपुलेनि हातें । कोणी नाहीं निवारितें । पैस करूनि चित्तें । घ्यावें हितें आपुलिया ॥५॥ नाहीं वांटितां सरलें । आहे तैसेंहि भरलें । तुका ह्मणे गेलें । वायाविण न घेतां ॥ ६ ॥

॥ २४४४ ॥

जातां पंढरीच्या मार्गें । काय वर्णूं सुखा मग १ घडे लाभ लक्ष-कोटि । परब्रह्मीं होईल भेटी २ नाम गर्जत येती संत । त्यांच्या दर्शनें होईजे मुक्त ३ जो अलक्ष्य ब्रह्मादिकां । आला संन्निध ह्मणे तुका ॥ ४ ॥

॥ २४४५ ॥

सुखरूप ऐसा दुजा कोण सांगा । माझ्या पांडुरंगा सारिखा तो १॥
नलगे दंडणें मुंडणें तें कांहीं । साधनाची नाहीं आटाआटी ॥ २॥
चंद्रभागे स्नान विध तो हरिकथा । समाधान चित्ता सर्वकाळ ३ ॥
तुका ह्मणे काला वैकुंठीं दुर्लभ । विशेष तो लाभ संतसंग ॥ ४ ॥

॥ २४४६ ॥

मूर्तिमंत देव नांदतो पंढरीं । येर दिगांतरीं प्रतिमारूप ॥ १ ॥
जाउनिया वना करावें कीर्तन । मानुनी पाषाण विठ्ठलरूप ॥ २ ॥
तुका ह्मणे मुख्य पाहिजे हा भाव । भावापासीं देव शीघ्र उभा ३॥

॥ २४४७ ॥

पंढरियें माझें माहेर साजणी । ओवियें कांडणीं गाऊं गीत ॥ १ ॥
राही रखुमाई सत्यभामा माता । पांडुरंग पिता माहियेर ॥ २ ॥
उद्धव अक्रुर व्यास अंबऋषि । भाई नारदासी गौरवीन ॥ ३ ॥
गरुड बंधु लडिवाळ पुंडलीक । यांचें कवतुक वाटे मज ॥ ४ ॥
मज बहु गोत संत आणि महंत । नित्य आठवीत ओवियेसी ॥५॥
निवृत्ति ज्ञानदेव सोपान चांगया । जिवलगा माझिया नामदेवा ६॥
नागोजन मित्रा नरहरि सोनारा । रोहिदास कबिरा सोईरिया ७॥
परसा भागवता सुरदास सांवता । गाईन नेणतां सकळांसी ॥८॥
चोखामेळा संत जिवाचे सोईरे । न पडे विसर यांचा मज ॥ ९ ॥
जीवाच्या जीवना एका जनार्दना । पाठक कान्हया मिराबाई १०॥
आणीकही संत महानुभाव मुनि । सकळां चरणीं जीव माझा ११॥
आनंदें ओविया गाईन मी त्यांसी । जाती पंढरीसी वारकरी १२॥
तुका ह्मणे माझा बळिया बापमाय । हर्षें नांदताहे घराचारीं १३॥

॥ २४४८ ॥

कोण येथें रिता गेला । जो जो आला या ठाया ॥ १ ॥ तातडी ते काय आतां । ज्याची चिंता तयासी ॥ २ ॥ नांवासाठी नेघें भार । नलगे फार वितपत्ति॥३॥तुका ह्मणे नलगे जावें । कोठें देवें सुचनें ४

॥ २४४९ ॥

सिंचन करितां मूळ । वृक्ष ओलावे सकळ ॥१॥ नको पृथकाचें भेद । पडो एक मूळ धरीं ॥२॥ पाणचोऱ्याचें दार । वरिल दाटावें तें थोर ॥ ३ ॥ वश झाला राजा । मग आपल्या त्या प्रजा ॥ ४ ॥

एक चिंतामणी । फिटे सर्व सुखधणी ॥ ५ ॥ तुका ह्मणे धांवा । आहे पंढरी विसांवा ॥ ६ ॥

॥ २४५० ॥

सुख पंढरीसी आलें । पुंडलिकें सांठविलें ॥ १ ॥ आतां धांवा माझे बाप । जिव्हा घेउनिया माप ॥ २ ॥ करा एक खेप । मग नलगे हिंडावें ॥ ३ ॥ विषय गुंडूनि पसारा । धांव घ्या रे पंढरपुरा ॥ ४ ॥ आयुष्य वेंचे जंव आहे । तोंचि धांवोनिया जावें ५ ॥ आळस न करी या लाभाचा । तुका विनवी कुणबियाचा ॥ ६ ॥

॥ २४५१ ॥

पुराणींचा इतिहास । गोड रस सेविला ॥ १ ॥ नव्हती हे आहाच बोल । मोकळे फोल कवित्व ॥२॥ भावें घ्या रे भावें घ्या रे। एकदा जा रे पंढरिये ॥ ३ ॥ भाग्यें आलेति मनुष्यदेहा । तो हा पहा विठ्ठल ॥४॥ पापपुण्या करील झाडा । जाइल पीडा जन्माची ५ घ्यावी हातीं टाळ दिंडी । गावें तोंडीं गुणवाद ॥ ६ ॥ तुका ह्मणे घटापटा । नलगे वाटा शोधाव्या ॥ ७ ॥

॥ २४५२ ॥

धरितां पंढरीची वाट । नाहीं संकट मुक्तीचें ॥ १ ॥ वंदूं येती देव पदें । त्या आनंदें उत्साहें ॥ २ ॥ नृत्यछंदें उडती रज । जे सहज चालतां ॥ ३ ॥ तुका ह्मणे गरुड टके । वैष्णव निके संभ्रम ॥ ४ ॥

॥ २४५३ ॥

तिळ एक अर्ध राई । सीतबुंद पावे काई । तया सुखा नाहीं । अंतपार पाहतां ॥ १ ॥ ह्मणउनी करा लाहो । नका मागें पुढें पाहों । अवघ्यामध्यें आहों । अवघे सावचित्त तों ॥ २ ॥ तीर्थें न येती तुळणी । आजि या सुखाची धणी । जे कासी गयेहुनी । जीं आगळीं असतीं ॥ ३ ॥ येथें धरी लाज । वर्णाअभिमान काज । नाडला सहज । तुका ह्मणे तो येथें ॥ ४ ॥

॥ २४५४ ॥

तारूं लागलें बंदरीं । चंद्रभागेचिये तिरीं ॥ १ ॥ लुटा लुटा संतजन । अमुप हें रासी धन ॥ २ ॥ झाला हरिनामाचा तारा । सीड लागलें फरारा ॥३॥ तुका जवळी हमाल । भार चालवी विठ्ठल ॥४॥

॥ २४५५ ॥

आषाढी निकट । आणि कार्तिकीचा हाट ॥ १ ॥ पुरे दोन्हीच बाजार । नलगे आणीक व्यापार २ तेंचि घ्यावें तेंचि घ्यावें । कैवल्याच्या रासी भावें ॥ ३ ॥ कांहीं कोणा नेणे । विठो वांचूनि तुका ह्मणे ॥४॥

॥ २४५६ ॥

न सरे लुटितां मागें बहुतां जनीं । जुनाट हे खाणी उघडिली १ ॥

सिद्ध महामुनि साधक संपन्न । तींहीं हें जतन केलें होतें ॥ २ ॥
पाळायाच्या गुणें पाडिलें ठाऊकें । जगा पुंडलिकें दाखविलें ॥ ३ ॥
तुका म्हणे तेथें होतों मी दुबळा । आलें या कृपाळा थोडें बहु ४

॥ २४५७ ॥

जया दोषां परिहार । नाहीं नाहीं धुंडितां शास्त्र । ते हरती अपार । पंढरपूर देखिलिया ॥ १ ॥ धन्य धन्य भीमातीर । चंद्रभागासरोवर । पद्मतीर्थीं विठ्ठलें वीर । क्रीडास्थळ वेणुनादीं २ ॥ सकळ तीर्थांचें माहेर । भूवैकुंठ निर्विकार । होतो नामाचा गजर । असुरकाळ कांपती ॥ ३ ॥ नाहीं उपमा द्यावया । सम तुल्य आणिका ठाया । धन्य भाग्य जयां । जे पंढरपूर देखती ॥ ४ ॥ उपजोनी संसारीं । एक वेळ पाहें पंढरी । महा दोषां कैंची उरी । देवभक्त देखिलिया ॥ ५ ॥ ऐसी विष्णूची नगरी । चतुर्भुज नरनारी । सुदर्शन घरटी करी । रीग न पुरे कळिकाळा ॥ ६ ॥ तें सुख वर्णावया गति । एवढी कैंची मज मति । जे पंढरपूरा जाती । ते पावती वैकुंठ ॥ ७ ॥ तुका ह्मणे या शब्दाचा । जया विश्वास नाहीं साचा । तो अधम जन्मांतरींचा । तया पंढरी नावडे ॥ ८ ॥

॥ २४५८ ॥

आवडी पंढरी भीमा पांडुरंग । चंद्रभागा लिंग पुंडलीक ॥ १ ॥
कामधेनु कल्पतरु चिंतामणी । आवडीची धणी पूरवीती ॥ २ ॥
तुका ह्मणे जीवा थोर झालें सुख । नाठवे हे भूक तान कांहीं ॥ ३ ॥

॥ २४५९ ॥

पंढरीचा वारकरी । खेपा वैकुंठ मंदरीं ॥ १ ॥ तया नाहीं आणखी
येणें । सदा वैकुंठीं राहाणें २ आला गेला केल्या यात्रा । उद्धरिलें
कुळा सर्वत्रा ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं । यासि संदेह कल्पांतींही ४

॥ २४६० ॥

पंढरीची वारी जयाचिये घरीं । पाय धुळी शिरीं वंदिन त्यांची १
दासाचा मी दास पोसणा डोंगर । आतां बहु फार काय बोलों २
जातीचें मी हीन न कळे भजन । ह्मणोनि संतचरण इच्छीतसें ३॥
तुका ह्मणे मज ह्मणावें आपुलें । बहुतां तारिलें संतजनीं ॥ ४ ॥

॥ २४६१ ॥

पंढरीचे वारकरी । ते अधिकारी मोक्षाचे ॥ १ ॥ पुंडलिका दिला
वर । करुणाकरें विठ्ठलें ॥ २ ॥ मूढ पापी जैसे तैसे । उत्तरी कासे
लावूनि ॥ ३ ॥ तुका ह्मणे खरें झालें । एका बोलें संताच्या ॥ ४ ॥

॥ २४६२ ॥

आले भरा केणें । येरझार चुके जेणें ॥ १ ॥ उभें केलें विटेवरी ।

वेठ इनाम पंढरी ॥ २ ॥ वाहती मारग । अवघें मोहरलें जग ॥ ३ ॥ तुका ह्मणे माप । खरें आणा माझे बाप ॥ ४ ॥

॥ २४६३ ॥

उठउठीं अभिमान । जाय ऐसें स्थळ कोण ॥ १ ॥ तें या पंढरीस घडे । खळां पाझर रोकडे ॥ २ ॥ नेत्रीं आश्रुचिया धारा । कोठें रोमांच शरीरा ॥ ३ ॥ तुका ह्मणे काला । कोठें अभेद देखिला ४॥

॥ २३६४ ॥

अवघे जेणें पाप नासे । तें हें असें पंढरीसी ॥ १ ॥ गात जागा गात जागा । प्रेम मागा विठ्ठला ॥२॥ अवघी सुखाचीच राशी । पुंडलिकाशीं वोळली ३ तुका ह्मणे जवळी आलें । उभे ठेलें समचरणीं ४॥

॥ २४६५ ॥

अवघींच तीर्थें घडलीं एकवेळां । चंद्रभागा डोळां देखिलिया ॥१॥ अवघींच पापें गेलीं दिगांतरीं । वैकुंठ पंढरी देखिलिया ॥ २ ॥ अवघिया संतां एकवेळा भेटी । पुंडलीक दृष्टी देखिलिया ॥ ३ ॥ तुका ह्मणे जन्मा आल्याचें सार्थक । विठ्ठलचि एक देखिलिया ४॥

॥ २४६६ ॥

उदार चक्रवर्ती । वैकुंठीचा भूपति । पुंडलिकाचिया प्रीती । विटेवरी राहिला ॥१॥ सर्वसिद्धीचा दातार । सवें आणिला परिवार । भक्ता अभयंकर । घ्या घ्या ऐसें ह्मणतसे ॥ २ ॥ जेणें हें विश्व निर्मिलें । महर्षी देवा संस्थापिलें। एकवीस स्वर्गांतें धरिलें। सत्तामात्रें आपुलिया ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपावंत । इच्छिले पुरवी अर्थ । रिद्धिसिद्धिमुक्ति देत । शेखीं संग आपुला ॥ ४ ॥

॥ २४६७ ॥

नातुडे जो कवणे परी । उभा केला विटेवरी ॥ १ ॥ भला भला पुंडलिका । मानलासी जन लोकां ॥ २ ॥ कोण्या काळें सुखा । ऐसा कोण पावता ॥ ३ ॥ अवघा आणिला परिवार । गोपी गोपाळांचा भार ॥४॥ तुका ह्मणे धन्य झालें । भूमी वैकुंठ आणिलें ५॥

॥ २४६८ ॥

धन्य पुंडलिका बहु बरें केलें । निधान आणिलें पंढरीये ॥ १ ॥ न करी आळस आलिया संसारीं । पाहे पा पंढरी भू वैकुंठ ॥ २ ॥ न पवीजे केल्या तपांचियां राशी । तें जनलोकांसी दाखविलें ॥३॥ सर्वोत्तम तीर्थ क्षेत्र आणि देव । शास्त्रांनीं हा भाव निवडिला ४॥ विष्णुपद गया रामधाम काशी । अवघीं पायापाशीं विठोबाच्या ५ तुका ह्मणे मोक्ष देखिल्या कळस । तात्काळ हा नाश अहंकाराचा ६॥

॥ २४६९ ॥

कां रे पुंड्या मातलासी । उभें केलें विठ्ठलासी ॥१॥ ऐसा कैसा

रे तूं धीट । मागें भिरकाविली वीट ॥२॥ युगें झालीं अठ्ठावीस । अजुनि न ह्मणसी बैस ॥ ३ ॥ भाव देखोनि निकट । देवें सोडिलें वैकुंठ ॥४॥ तुका ह्मणे पुंडलिका । तूंचि बळिया एक निका ॥ ५ ॥

॥ २४७० ॥

कां रे पुंड्या मातलासी । उभें केलें विठ्ठलासी ॥१॥ वस्ति क्षीरसागरवासीं । आला उभा पंढरीसीं ॥ २ ॥ भक्ति देखोनी निकट । देवें सोडिलें वैकुंठ ॥३॥ तुका ह्मणे बळी । तूंचि एक भूमंडळीं ॥ ४ ॥

॥ २४७१ ॥

पुंडलीक भक्तराज । तेणें साधियलें काज । वैकुंठींचें निज । परब्रह्म आणिलें ॥ १ ॥ पांडुरंग बाळमूर्ति । गाईगोपाळांसंगती । येऊनिया प्रीति । उभे समचि राहिले ॥ २ ॥ एका आगळें अक्षरें । भूवैकुंठचि दुसरें । ह्मणविती येरें । परि तीं ऐशी नव्हेती ॥ ३ ॥ पाप पंचक्रोशीमधीं । येऊं न सकेचि कधीं । कैंची तेथें विधि । निषेधाची वसति ॥४॥ पुराणें वदती ऐसें । चतुर्भुज तीं मानसें । सुदर्शनावरी वसे । परि तें न बुडे कल्पांतीं ॥५॥ महाक्षेत्र हें पंढरी । अनुपम्य इची थोरी । धन्य धन्य वारकरी । तुका ह्मणे तेथींचे ६॥

॥ २४७२ ॥

भूत नावरे कोणासी । पुंडलीकें खिळिलें त्यासी ॥ १ ॥ समचरण असे विटे । कटिकर उभें नीट ॥२॥ वाळुवंटीं नाचतीं संत । प्रेमामृतें डुल्लत ॥३॥ तुका ह्मणे पुंडलिका । भक्तिबळें तूंचि निका ॥४॥

॥ २४७३ ॥

वैकुंठा जावया तपाचे सायास । करणें जीवनास नलगे कांहीं १ ॥ तया पुंडलिकें केला उपकार । फेडावया भार पृथीवीचा ॥ २ ॥ तुका ह्मणे सोपी केली पायवाट । पंढरी वैकुंठ भूमीवरी ॥ ३ ॥

॥ २४७४ ॥

वैकुंठींचा देव आणिला भूतळा । धन्य तो आगळा पुंडलीक॥ १ ॥ धारिष्ट धैर्याचा वरिष्ठ भक्तांचा । पवित्र पुण्याचा एकनिष्ठ ॥ २ ॥ पितृसेवापुण्यें लाधला निधान । ब्रह्म सनातन अंगसंगें ॥ ३ ॥ अंगसंगें रंगें क्रीडा करी जाणा । ज्या घरीं पाहुणा वैकुंठींचा ॥ ४ ॥ धन्य त्याची शक्ति भक्तिचि हे ख्याति । तुका ह्मणे मुक्ति पायीं लोळे ५

॥ २४७५ ॥

पंढरीचें भूत मोठें । आल्या गेल्या झडपी वाटे ॥ १ ॥ तेथें जाऊं नका कोणी । गेले नाहीं आले परतोनि ॥ २ ॥ तुका पंढरीसी गेला । पुन्हां जन्मा नाहीं आला ॥ ३ ॥

॥ २४७६ ॥

मैंद आला पंढरीस । हातीं घेऊनि प्रेमपाश १ पुढें माडियलें अंग ।

नेतो लागों नेदीं माग ॥२॥ उभारोनि बाहे । दृष्टादृष्टी वेधीताहे ३॥ वैकुंठहुनि पेणें । केलें पंढरी कारणें ॥४॥ पुंडलिकें थारा । देऊनि आणिलें या चोरा ॥५॥ तुका ह्मणे चला । तुह्मी आह्मी धरूं त्याला ६

॥ २४७७ ॥

पंढरीचा महिमा । देतां आणिक उपमा ॥ १ ऐसा ठाव नाहीं कोठें । देव उभाउभी भेटे ॥ २ ॥ आहेति सकळ । तीर्थें काळें देती फळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे पेठ । भूमिवरी हें वैकुण्ठ ॥ ४ ॥

॥ २४७८ ॥

पंढरी पंढरी । म्हणतां पापाची बोहरी ॥ १ ॥ धन्य धन्य जगीं ठाव । होतो नामाचा उत्साव ॥ २ ॥ रिद्धिसिद्धी लोटांगणीं । प्रेमसुखा-चिया खाणी ॥३॥ अधिक अक्षरानें एका । भूवैकुण्ठ ह्मणे तुका ॥४॥

॥ २४७९ ॥

पंढरीसी जाय । तो विसरे बापमाय ॥ १ ॥ अवघा होय पांडुरंग । राहे धरूनिया अंग ॥ २ ॥ न लगे धन मान । देहभावें उदासीन ॥ ३ ॥ तुका ह्मणे मळ । नासी तात्काळ तें स्थळ ॥ ४ ॥

॥ २४८० ॥

पंढरीस दुःख न मिळे ओखदा । प्रेमसुख सदा सर्वकाळ ॥ १ ॥ पुंडलिकें हाट भरियेली पेठ । अवघें वैकुण्ठ आणियेलें ॥ २ ॥ उद्मासी तुटी नाहीं कोणा हानि । घेऊनिया धणी लाभ घेती ॥ ३ ॥ पुरलें देशाशीं भरलें सिगेशी । अवघी पंचक्रोशी दुमदुमीत ॥ ४ ॥ तुका ह्मणे संतां लागलीसे धणी । बैसली राहोनि पंढरीस ॥ ५ ॥

॥ २४८१ ॥

पंढरीचा वास धन्य तेचि प्राणी । अमृताची वाणी दिव्य देह १ ॥ मूढ मतिहीन दुष्ट अविचारी । ते होती पंढरीं दयारूप ॥ २ ॥ शांति क्षमा अंगीं विरक्ती सकळ । नैराश्य निर्मळ नारी नर ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं वर्ण अभिमान । अवघे जीवन मुक्त लोक ॥ ४ ॥

॥ २४८२ ॥

भीमातीरवासी । तेथें निश्चयेंसी काशी ॥ १ ॥मुख्य मुक्तीचें माहेर । ऐसें जाणा पंढरपूर ॥ २ ॥ घडे भीवरेशीं स्नान । त्यासी पुन्हा नाहीं जन्म ॥ ३ ॥ भाव धरोनी नेटका । मोक्ष जवळी ह्मणे तुका ॥ ४ ॥

॥ २४८३ ॥

धन्य ते पंढरी धन्य भीमातीर । आणियेलें सार पुंडलिकें ॥ १ ॥ धन्य तोही लोक अवघा दैवांचा । सुकाळ प्रेमाचा घरोघरीं ॥ २ ॥ धन्य तेहि भूमी धन्य ते तरुवर । धन्य सरोवर तीर्थरूप ॥ ३ ॥ धन्य त्या नरनारी मुखीं नाम ध्यान । आनंदें भुवन गर्जतसे ॥ ४ ॥

धन्य पशु पक्षी कीटक पाषाण । अवघा नारायण अवतरलासे ५॥
तुका ह्मणे धन्य संसारातें आलीं । हरिरंगीं रंगलीं सर्वभावें ॥ ६ ॥

॥ २४८४ ॥

धन्य तो ग्राम जेथें हरिदास । धन्य तोचि वास भाग्य तया ॥१॥
ब्रह्मज्ञान तेथें असे घरोघरीं । धन्य त्या नरनारी चतुर्भुज ॥ २ ॥
नाहीं पापा रिघ काळाचें जीवन । हरिनामकीर्तन घरोघरीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे तींही तारिलें सकळां । आपल्या कोटिकुळासहित जीव४

॥ २४८५ ॥

धन्यधन्य ज्यास पंढरीसी वास । धन्य ते जन्मास प्राणी आले १॥
चहु खाणीमध्यें होत कोणी एक । त्रिगुण कीटक पक्षिराज ॥ २ ॥
उत्तम चांडाळ नर नारी बाळ । अवघेचि सकळ चतुर्भूज ॥ ३ ॥
अवघा विठ्ठल तेथें दुजा नाहीं । भरला अंतर्बाहीं सदोदित ॥ ४ ॥
तुका ह्मणे तेथें होउनी राहेन । सांडोवा पाषाण पंढरीचा ॥ ५ ॥

॥ २४८६ ॥

सकळतीर्थांहूनि । पंढरीनाथ मुगुटमणी ॥ १ ॥ धन्यधन्य पंढरी । जे मोक्षाची अक्षय पुरी ॥ २ ॥ विश्रांतीचा ठाव । तो हा माझा पंढरीराव ॥ ३ ॥ तुका ह्मणे सांगे स्पष्ट । दुजी पंढरी वैकुण्ठ ॥४॥

॥ २४८ ॥

सकळतीर्थांहुनि । पंढरी हे मुगुटमणि ॥ १ ॥ काय सांगों तेथिल शोभा । रमावल्लभ जेथें उभा ॥ २ ॥ न लभे व्रततीर्थेंदानीं । तें या विठ्ठलदर्शनीं ॥ ३ ॥ साधु संत गाती नाम । सकळ भूतांचा विश्राम ॥ ४ ॥ तुका ह्मणे स्तुती । करूं काय सांगों किती ॥ ५ ॥

॥ २४८८ ॥

सुरवर येती तीर्थें नित्य काळ । पेंठ त्या निर्मळ चंद्रभागा ॥ १ ॥
साक्षभूत नव्हे सांगितली मात । महिमा अत्यद्भुत वर्णवेना ॥२॥
पंचक्रोशीमाजी रीघ नाहीं दोषा । जळती आपैसा अघोर ते ॥३॥
निर्विषय नर चतुर्भुज नारी । अवघा घरोघरीं ब्रह्मानंदु । ४ ॥
तुका ह्मणे ज्यापें नाहीं पुण्यलेश । जा रे पंढरीस घेईं कोटि ५ ॥

॥ २४८९ ॥

वाराणसी गया पाहिली द्वारका । परी नये तुका पंढरीचा ॥ १ ॥
पंढरीसी नाहीं कोणा अभिमान । पायां पडे जन एकमेका ॥ २ ॥
तुका ह्मणे जाय एकवेळ पंढरी । तयाचिये घरीं यम नये ॥ ३ ॥

॥ २४९० ॥

जंववरी नाहीं देखिली पंढरी । तंववरी थोरी वैकुंठींची ॥ १ ॥
मोक्षसिद्धि तेथें हिंडे दारोदारीं । होऊनि कामारी दीनरूप ॥ २ ॥
वृंदावन सडे चौक रंगमाळा । अभिनव सोहोळा घरोघरीं ॥ ३ ॥

नामघोष कथापुराणकीर्तनीं । ओविया कांडणीं पांडुरंग ॥ ४ ॥
सर्व सुख तेथें असे सर्वकाळ । ब्रह्म तें केवळ नांदतसे ॥ ५ ॥
तुका ह्मणे जें न साधे सायासें । तें हें प्रत्यक्ष दिसे विटेवरि ॥ ६ ॥

॥ २४९१ ॥

तीर्थें केलीं कोटीवरी । नाहीं देखिली पंढरी ॥ १ ॥ जळो त्याचें ज्या-लेंपण । न देखेचि समचरण ॥ २ ॥ योग याग अनंत केले । नाहीं स-मचरण देखिले ३ तुका ह्मणे विठ्ठलपायीं । अनंत तीर्थें घडलीं पाहीं ४

॥ २४९२ ॥

काशीयात्रा पांच द्वारकेच्या तीन । पंढरीची जाण एक यात्रा ॥ १ ॥
काशी देह विटंबणें द्वारके जाळणें । पंढरीशीं होणें ब्रह्मरूप ॥ २ ॥
अठरापगडयाती सकळहि वैष्णव । दुजा नाहीं भाव पंढरीसी ॥ ३ ॥
तुका ह्मणे असो अथवा नसो भाव । दर्शनें पंढरीराव मोक्ष देतो ४

॥ २४९३ ॥

जो या गेला पंढरपुरा । आणीक यात्रा न मनी तो ॥ १ ॥ सुलभ माय पंढरि राणा । पुरवी खुणा अंतरींच्या ॥ २ ॥ जन्मांतरींच्या पुण्यरासी । वारी त्यासी पंढरीची ॥ ३ ॥ बाहेर येतां प्राण फुटे । रडे दाटे गहिंवरें ॥ ४ ॥ दधिमंगळ भोजन सारा । म्हणती करा मु -डींव ॥ ५ ॥ मागुता हा पाहों ठाव । पंढरिराव दर्शनें ॥ ६ ॥ तुका ह्मणे भूवैकुण्ठ । वाळुवंट भींवरा ॥ ७ ॥

॥ २४९४ ॥

आणीक ऐसें कोठें सांगा । पांडुरंगासारीखें ॥ १ ॥ दैवत ये भूम-डळीं । उद्धार कळी पाववितें ॥ २ ॥ कोठें कांहीं कोठें कांहीं । शोध ठायीं स्थळासी ॥ ३ ॥ अन्यत्रींचें तीर्थीं नासे । तीर्थीं वसे वज्रलेप ॥ ४ ॥ पांडुरंगींचें पांडुरंगीं । पाप अंगीं राहेना ॥ ५ ॥ ऐसें हर गिरिजेप्रति । गुह्य स्थिती सांगितली ॥ ६ ॥ तुका ह्मणे तीर्थ क्षेत्र । सर्वत्र हें दैवत ॥ ७ ॥

॥ २४९५ ॥

करोत तपादि साधनें । कोणी साधोत गोरांजनें १ आह्मी न वजों तया वाटा । नाचूं पंढरीचोहटा २ पावोत आत्मस्थिति । कोणी ह्मणोत उत्तम मुक्ति ३ तुका म्हणे छंद । आह्मा हरिच्या दासां निंद्य ४

॥ २४९६ ॥

कासया करावे तपाचे डोंगर । आणीक अपार दुःखरासी ॥ १ ॥
कासया फिरावे अनेक ते देश । दावितील आस पुढें लाभ ॥ २ ॥
कासया पुजावीं अनेक दैवतें । पोटभरे तेथें लाभ नाहीं ॥ ३ ॥
कासया करावे मुक्तीचे सायास । मिळे पंढरीस फुका साठीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे करीं कीर्तन पसारा । लाभ येईल घरा पाहिजे तो ॥ ५ ॥

॥ २४९७ ॥

जनाचिया मना जावें कासियेसी । माझी वाराणसी पांडुरंग ॥१॥
तेथें भागीरथी येथें भीमरथी । अधिक म्हणती चंद्रभागा ॥ २ ॥
तेथें माधवराव येथें यादवराव । जाणोनिया भाव पुंडलिकाचा ३॥
विष्णुपद गया तेचि येथें आहे । प्रत्यक्ष हें पाहें विटेवरी ॥ ४ ॥
तुका ह्मणे हेंचि प्रपंच उद्धरी । आतां पंढरपूरी घडो बापा ॥ ५ ॥

॥ २४९८ ॥

मानी भक्तांचे उपकार । ऋणीया म्हणवी निरंतर । केला निर्गुणीं आकार । कीर्त मुखें वर्णितां ॥१॥ ह्मणोनि जया जे वासना । ते पुरवितो पंढरीराणा । झाला भक्तांचा आंदणा । ते उपकार फेडावया ॥ २ ॥ अंबऋषीकारणें । जन्म घेतले नारायणें । एवढें भक्तीचें लहणें । दास्य करी दासाचें ॥ ३ ॥ म्हणिये करितां शंका न धरी । रक्षपाळ बळिच्या द्वारीं । भक्तीचा आभारी । रीग न पुरे जावया ॥ ४ ॥ अर्जुनाचे रथवारु । ते वागवी सर्वेश्वरु । एवढे भक्तीचे उपकारु । मागें मागें हिंडतसे ॥ ५ ॥ पुंडलिकाचे द्वारीं । सम पाउलीं विटेवरी । न वजे कट करीं । धरूनि तेथें राहिला ॥ ६ ॥ भावभक्तीचा अंकित । नाम साजे दिनानाथ । म्हणोनि राहिला निवांत । तुका चरण धरोनि ॥ ७ ॥

॥ २४९९ ॥

पंढरीसी जावें ऐसें माझे मनीं । विठाई जननी भेटे केव्हां ॥ १ ॥
नलगे त्याविण सुखाचा सोहळा । लागे मज ज्वाळा अग्निचिया ॥२॥
तुका ह्मणे त्याचे पाहिलीया पाय । मग दुःख जाय सर्व माझें ३ ॥

॥ २५०० ॥

पंढरीस जाते निरोप आइका । वैकुंठ नायका क्षेम सांगा ॥ १ ॥
अनाथांचा नाथ हें तुझें वचन । धांवें नको दीन गांजों देऊं ॥ २ ॥
ग्रासिलें भुजंगें सर्पें महाकाळें । न दिसे हें जाळें उगवतां ॥ ३ ॥
कामक्रोध सुनीं श्वापदीं बहुतीं । वेढलों अवर्तीं मायेचिये ॥ ४ ॥
मृगजलनदी बुडविना तरी । आणूनिया वरी तळा नेते ॥ ५ ॥
तुका ह्मणे तूंवा धरिले उदास । तरी पाहो वास कवणाची ॥ ६ ॥

॥ २५०१ ॥

संपत्ती सोहळा नावडे मनाला । लागला टकळा पंढरीचा ॥ १ ॥
जावें पंढरीसी आवडी मनासी । कधीं एकादशी आषाढी हे ॥२॥
तुका ह्मणे ऐसें आर्त ज्याचे मनीं । त्याची चक्रपाणी वाट पाहे ३॥

॥ २५०२ ॥

साधन संपत्ति हेंचि माझें धन । सकळ चरण विठोबाचे ॥ १ ॥

शीतळ हा पंथ माहेराची वाट । जवळीच नीट सुखरूप ॥ २ ॥
वैष्णवांचा संग रामनाम गाणें । मांडित भूषणें अलंकार ॥ ३ ॥
भवनदी आड नव्हतीसी झाली । कोरडीच चाली जावें पायीं ४ ॥
मायबाप दोघे पाहातील वाट । ठेवूनिया कटीं कर उभीं ॥ ५ ॥
तुका ह्मणे केव्हां देखेन कळस । पळाली आळस निद्रा भूक ॥६॥

॥ २५०३ ॥

सुखें घेऊं जन्मांतरें । एक बरे इहलोकीं ॥ १ ॥ पंढरीचे वारकरी। होतां थोरी जोडी हे ॥ २ ॥ हें तों आलें अनुभवा । पाहावें जीवा-वरुनि ॥ ३ ॥ तुका ह्मणे केला त्याग । सर्वसंग म्हणऊनि ॥ ४ ॥

॥ २५०४ ॥

सतोषें माउली आरुषा वचनीं । वोरसोनि स्तनीं लावी बाळा १ ॥
तैसें प्रेमळाचें अवघेंचि गोड । पुरवितो कोड पांडुरंगा ॥ २ ॥
सेवा करी साहे निष्ठुर उत्तर । त्याचे वाहे बरें तेंच मनीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे इच्छावसे खेळ खेळें । चिंता ते सकळ कांहीं नेणें ॥ ४ ॥

॥ २५०५ ॥

सांवळें रूपडें चोरटें चित्ताचें । उभें पंढरीचे विटेवरी ॥ १ ॥
डोळियांची धणी पाहातां न पुरे । तयालागीं झुरे मन माझें ॥ २ ॥
आन गोड कांहीं नलगे संसारीं । राहिले अतरीं पाय तुझे ॥ ३ ॥
प्राण रिघों पाहे कुडी हे सांडुनी । श्रीमुख नयनीं न देखतां ॥ ४ ॥
चित्त मोहियेलें नंदाच्या नंदनें । तुका ह्मणे येणें गरुडध्वजें ॥ ५ ॥

॥ २५०६ ॥

इनामाची भरली पेंठ । वाहती दाट मारगा ॥१॥ अवघेची येती वाण। अवघे शकुन लाभाचे ॥२॥ अडचणी त्या केल्या दुरी । देण्या उरी घेण्याच्या ३ तुका ह्मणे जोडी झाली । ते आपुली आपण ॥ ४ ॥

॥ २५०७ ॥

पृथक मीं सांगों किती । धर्म नीति सकळां ॥१॥ अवघियांचा एक ठाव । शुद्ध भाव विठ्ठलीं २ क्षराअक्षराचा भाग । करा लाग पंढ-रीये ॥३॥ तुका म्हणे आगमींचें । मथिलें साचें नवनीत ॥ ४ ॥

॥ २५०८ ॥

द्वारकेचें केणें आलें याचि ठाया । पुढें भक्तराया चोजवीत ॥ १ ॥
गोविलें विसारें माप केलें खरें । न पाहे माघारें अद्यापवरी ॥ २ ॥
वैष्णव मापारी नाहीं जाली सळे । पुढेंही न कळे पार त्याचा ३॥
लाभ जाला त्यांनीं धरिला तो विचार। आधिक्य परत्र सांठविलें४
तुका ह्मणे मज मिळाली मजुरी । विश्वास या घरीं संताचिया ॥५॥

॥ २५०९ ॥

तुझे पाय माझी काशी । कोण जाय माझे काशी ॥ १ ॥ तुझें रूप

तेंचि ध्यान । तेंचि माझें अनुष्ठान २ तुझे चरण तेचि गया । झालें गयावर्जन देहा ३ तुका ह्मणे सकळ तीर्थें । तुझे पायीं वसती येथें ४॥

॥ २५१० ॥

दोन्ही हात ठेवुनि कटीं । उभा भीवरेच्या तटीं । कष्टलासी सांटीं । भक्तिकाजें विठ्ठला ॥ १ ॥ भागलासी मायबापा । बहु श्रम केल्या खेपा । आम्हालागीं सोपा । दैत्या काळ कृतांत ॥ २ ॥ होतासी क्षीर-सागरीं । मही दाटली असुरीं । म्हणोनिया घरीं । गौळियांचे अवतार ॥ ३ ॥ केला पुंडलिकें गोवा । तुज पंढरीये देवा । तुका ह्मणे भावा । साठीं हातीं सांपडसी ॥ ४ ॥

॥ २५११ ॥

दुःखाचिये सांटीं तेथें मिळे सुख । अनाथाची भूक दैन्य जाय ॥ १ ॥
उदाराचा राणा पंढरीस आहे । उभारोनि बाहे पाळवितो ॥ २ ॥
जाणतियाहूनि नेणत्याची गोडी । आलिंगी आवडी करूनिया ॥३॥
शीण घेऊनिया प्रेम देतो सांटी । न विचारी तुटी लाभा कांहीं ४ ॥
तुका ह्मणे असों अनाथ दुबळीं । आम्हांसी तो पाळी पांडुरंग ॥ ५ ॥

॥ २५१२ ॥

धरियेलीं सोंगें । येणें अवघीं पांडुरंगें ॥१॥ तें हें ब्रह्म विटेवरी । उभें चंद्रभागे तिरीं ॥ २ ॥ अंतर्व्यापी बाहे । धांडोळितां कोठें नोहे ॥ ३ ॥ योगयागतपें । ज्याकारणें दानजपें ॥ ४ ॥ दिले नेदी जती । भोग सकळ ज्या होती ॥ ५ ॥ अवघी लीळा पाहे । तुका म्हणे दासां साहे ॥ ६ ॥

॥ २५१३ ॥

जो भक्तांचा विसावा । उभा पाचारितो धांवा ॥१॥ हातीं प्रेमाचें भातुकें । मुखीं घाली कवतुकें ॥ २ ॥ भवसिंधु सुखें । उतरी कासे लावूनि ॥ ३ ॥ थोर भक्तांची आस । पाहे भोंवताली वास ॥ ४ ॥ तुका म्हणे कृपादानी । फेडी आवडीची धणी ॥ ५ ॥

॥ २५१४ ॥

तिन्ही लोक ऋणें बांधिले जयानें । सर्वसिद्धि केणें तये घरीं ॥१॥
पंढरी चोहाटां घातला दुकान । मांडियेलें वान आवडीचे ॥ २ ॥
आषाढी कार्तिकी भरियेलें हाट । इनाम हे पेंठ घेतां देतां ॥ ३ ॥
मुक्ती कोणी तेथें हातीं नेघे फुका । लुटितील सुखा प्रेमाचिया ४॥
तुका ह्मणे संतसज्जन भाग्याचे । अनंता जन्मींचे सांटेकरी ॥ ५ ॥

॥ २५१५ ॥

तीर्थांचें जें मूळ व्रतांचें जें फळ । ब्रह्म तें केवळ पंढरिये ॥ १ ॥
तें आम्हीं देखिलें आपुल्या नयनीं । फिटलीं पारणीं डोळियांचीं२॥

जीवांचें जीवन सुखाचें शेजार । उभें कटीं कर ठेवूनिया ॥ ३ ॥
जगाचा जनिता कृपेचा सागर । दीनां लोभापर दुष्टां काळ ॥ ४ ॥
सुरवरां चिंतनीं मुनिवरां ध्यानीं । आकार निर्गुणीं तेंचि असे ५ ॥
तुका ह्मणे नाहीं श्रुती आतुडलें । आह्मां सांपडलें गीतीं गातां ॥६॥

॥ २५१६ ॥

नागर गोडें बाळरूप । तें स्वरूप काळींचें ॥१॥ गाईगोपाळांच्या संगें । आलें लागें पुंडलीका ॥ २ ॥ तें हें ध्यान दिगंबर । कटीं कर मिरवती ॥ ३ ॥ नेणपणें उगेंचि उभें । भक्तिलोभें राहिलें ४ ॥ नेणें वरदळाचा मान । विटे चरण सम उभे ॥५॥ सहज कटावरी हात । दहीं भात शिदोरी ॥ ६ ॥ मोहरी पांवा गांजिया पाटी । धरिली काठी ज्या काळें ॥ ७ ॥ रम्य स्थळ चंद्रभागा । पांडुरंगा क्रीडेसी ॥ ८ ॥ भीमा दक्षणमुख वाहे । दृष्टी पाहे समोर ॥ ९ ॥ तारावेसे मूढ लोक । दिली भाक पुंडलिका ॥ १० ॥ तुका म्हणे वैकुंठवासी । भक्तांपासी राहिला ॥ ११ ॥

॥ २५१७ ॥

आइत्या भाग्या धनी व्हावें । केणें घ्यावें न सरे तें ॥ १ ॥ केणें आलें पंढरपुरीं । उधाराचें लाभीक ॥२॥ वाखराची करुनी रीति । भरा पोटीं लवलाही ३ तुका ह्मणे संतापाडें । करू पुढें वाखती ४

॥ २५१८ ॥

आणिकांची सेवा करावी शरीरें । तीं येथें उत्तरें कोरडींच ॥ १ ॥
ऐसा पांडुरंग सुलभ सोपारा । नेघे येरझारा सेवकाच्या ॥ २ ॥
आणिकांचे भेटी आडकाठी पडे । येथें तें न घडे वचनही ॥ ३ ॥
आणिकांचें देणें काळीं पोट भरे । येथील न सरे कल्पांतींही ॥४॥
आणिकें दंडिती चुकलिया सेवा । येथें सोस हेवा नाहीं दोन्ही ५
तुका ह्मणे करी आपणासारिखें । उद्धरी पारिखें उंच नीच ॥ ६ ॥

॥ २५१९ ॥

आपुलिया लाजा । धांवे भक्तांचिया काजा ॥ १ ॥ नाम धरिलें दिनानाथ । सत्य करावया व्रत २ आघात निवारी । छाया पीतांबरें करी ॥ ३ ॥ उभा कर कटीं । तुका ह्मणे याजसाठीं ॥४॥

॥ २५२० ॥

आलिया संसारीं देखिली पंढरी । कीर्ति महाद्वारी वाणूं तुझी १॥
पताकांचे भार नामाचे गजर । देखिल्या संसार सफळ झाला २॥
साधुसंतांचिया धन्य झाल्या भेटी । सांपडलि लुटी मोक्षाची हे ३
तुका ह्मणे आतां हेंचि पैं मागणें । पुढती नाहीं येणें संसारासी ४

॥ २५२१ ॥

आह्मी आळीकरें । प्रेमसुखाचीं लेंकुरें ॥ १ ॥ पायीं गोविली वा-

सना । तुच्छ केलें ब्रह्मज्ञाना ॥ २ ॥ येतां पाहें मूळा । वाट पंढरीची डोळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे स्थळ । मग मी पाहेन सकळ ॥४॥

॥ २५२२ ॥

इंद्रियाचें पुरे कोड । तेंचि गोड पुढतीही ॥ १ ॥ जावें म्हणती पंढरपुरा । हाचि बरा संसार ॥ २ ॥ बैसलें तें मनामुळीं । सुख डोळीं देखिलें ॥३॥ तुका ह्मणे देती कान । वाणावाण निवडुनी ४

॥ २५२३ ॥

किती चौघाचारें । येथें गोविलीं वेव्हारें ॥ १ ॥ असे बांधविले गळे । होऊं न शकती निराळे ॥ २ ॥ आपलें आपण । केलें कां नाहीं जतन । ॥ ३ ॥ तुका ह्मणे खंडदंडें । येरझारीं लपती लंडें ४

॥ २५२४ ॥

केली प्रतिज्ञा मनाशीं । तई मी दान सत्यत्वेशीं । नेईन पायापाशीं । स्वामी मूळ पंढरिये ॥ १ ॥ तोंवरी हें भरीं पोट । केला तो मिथ्या बोभाट । नाहीं सांपडली वाट । सइराट फिरतसें॥ २ ॥ ज्यावें आदराचें जीणें । स्वामी कृपा करी तेणें । पाळिल्या वचनें । सख्यत्वाचा अनुभव ॥ ३ ॥ घडे तैसें घडो आतां । मायबापाची हे सत्ता । तुका ह्मणे चिंता । काय पाहें मारगा ॥ ४ ॥

॥ २५२५ ॥

झाली हरिकथा रंग वोसरला । उचितासी आला पांडुरंग ॥ १ ॥
वांटितो हें प्रेम उचिताचा दाता । घेईं रे तूं आतां धणीवरि ॥२॥
प्रेम देऊनिया अवघीं सुखी केलीं । जीं होतीं रंगलीं विठ्ठलीं तीं३॥
तुकें हें दुर्बळ देखियेलें संतीं । ह्मणउनि पुढती आणियेलें ॥ ४ ॥

॥ २५२६ ॥

जुनाट हें धन अंत नाहीं पार । खात आले फार सरलें नाहीं ॥१॥
नारद हा मुनि शुकसनकादिक । उरलें अमूप तुह्मां आह्मां ॥ २ ॥
येथूनिया धना खाती बहुत जन । वाल गुंज उणें झालें नाहीं॥३॥
तुका ह्मणे धना नाहीं अंतपार । कुंठित हे चार वाचा तेथें ॥ ४ ॥

॥ २५२७ ॥

जो का निर्गुण निराकार । तेणें धरियेले अवतार ॥ १ ॥ निर्गुण होता तो सगुणासी आला । भक्तीसाठीं प्रगटला ॥ २ ॥ जो का त्रिभुवनचालक । तो हा नंदाचा बाळक ३ सोडविलें वसुदेवदेवकीसी । अवतार धरिला तिचे कुशी ४ मारियेला कंसराणा । राज्यीं स्थापिलें उग्रसेना ५ तुका ह्मणे देवाधिदेव । तो हा उभा पंढरिराव ६

॥ २५२८ ॥

पांडुरंगा ऐसा सोडुनि वेव्हारा । आणिकांची करा आस वाया१॥
बहुतांसी दिला उद्धार उदारें । निवडीना खरें खोटें कांहीं ॥ २ ॥

याचिया अंकिता वैकुंठ बंदर । आणीक वेव्हार चालतीना ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझे हातींचें वजन । यासी बोल कोण ठेवूं सके ॥ ४ ॥

॥ २५२९ ॥

पुंडलिकाचे निकटसेवे । कैसा धांवे बराडी ॥ १ ॥ आपुलें तें थोरपण । नारायण विसरला ॥ २ ॥ उभा कटीं ठेवुनि कर । न ह्मणे पर बैससें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जगदीशा । करणें आशा भक्तांची ॥ ४ ॥

॥ २५३० ॥

बाप माझा दिनानाथ । वाट भक्तांची पाहात ॥ १ ॥ कर ठेवूनिया कटीं । उभा चंद्रभागे तटीं ॥ २ ॥ गळां वैजयंतीमाळा । रूपें डोळस सांवळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे भेटावया । सदा उभारिलिया बाह्या॥४॥

॥ २५३१ ॥

ब्रह्मज्ञान जेथें आहे घरोघरीं । सर्व निरंतरीं चतुर्भुज ॥ १ ॥ पापा नाहीं रीग काळाचें खंडण । हरिनामकीर्तन परोपरी ॥२॥ तुका ह्मणे हाचि भाव माझ्या चित्तीं । नाहीं आणिकां गती चाड मज ॥३॥

॥ २५३२ ॥

ब्रीद ज्याचें जगदानी । तोचि मनीं स्मरावा ॥ १ ॥ सम पाय कर कटीं । उभा तटीं भींवरेच्या ॥२॥ पाहिलिया वेध लावी । बैसे जीवीं जडोनि ॥३॥ तुका ह्मणे भक्तिकाजा । धांवे लाजा लवलाहें ॥४॥

॥ २५३३ ॥

भक्तवत्सल दीनानाथ । तिहीं लोकीं ज्याची मात ॥ १ ॥ तो हा पुंडलिकासाठीं । आला उभा वाळवंटीं ॥ २ ॥ गर्भवासा धरी । अंबऋषीचा कैवारी ॥ ३ ॥ सकळां देवा अधिष्ठान । एका मंत्रासी कारण ॥४॥ तुका ह्मणे ध्यानीं । ज्यासि ध्यातो शूळपाणी ॥ ५ ॥

॥ २५३४ ॥

लाघवी सूत्रधारी । दोरी नाचवी कुसरी । उपजवी पाळुनि संहारि । नानापरिचीं लाघवें ॥१॥ पुरोनि पंढरियें उरलें । भक्तिसुखें लांचावलें । उभें नीटचि राहिलें । कर कटीं न बैसे ॥ २ ॥ बहु काळें ना सांवळें । बहु कठिण ना कोंवळें । गुणत्रया वेगळें । बहुबळे आथीलें ॥ ३ ॥ असोनि नसे सकळांमधीं । मना अगोचर बुद्धी । स्वामी माझा कृपानिधि । तुका ह्मणे विठ्ठल ॥ ४ ॥

॥ २५३५ ॥

लाभ खरा नये तुटी । नाहीं आडखळा भेटी ॥१॥ जाय अवघिया देशा । येथें संचलासी तैसा ॥२॥ मग नलगे पारखी । अवघीं सकट सारखीं ॥३॥ तुका ह्मणे बोळे । रूपें भुलविले डोळे ॥४॥

॥ २५३६ ॥

[illegible]चिया आळा कवळिलें ब्रह्म । चुकलिया श्रम पृथक तो ॥१॥

सुलभ तें जालें सुलभ तें जालें । जवळी तें आलें पंढरिये ॥ २ ॥ नामरूपाचे बांधलें मोटलें । एक एका वेळे सारियेलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाटे चुकली वसती । उद्धार तो हातीं आणियेला ॥४॥

॥ २५३७ ॥

साधावया भक्तिकाज । नाहीं लाज हा धरीत ॥ १ ॥ ऐसियासी शरण जावें । शक्ती जीवें न वंची ॥ २ ॥ भीष्मपण केला खरा । धनुर्धरा रक्षीलें ३ तुका ह्मणे साक्ष हातीं । तो म्यां चित्तीं धरियेला४

॥ २५३८ ॥

पंढरीस घडे अतित्यायें मृत्य । तो जाय पतित अधःपाता ॥ १ ॥ दुराचारें मोक्ष सुखाचे वसति । भोळी बाळमूर्ति पांडुरंग ॥ २ ॥ केला न सहावे तीर्थ उपवास । कथेविण दोष साधन तें ॥ ३ ॥ कालियापें भेद मानितां निवडे । श्रोत्रियांसी जोडे अंत्यजता ॥४॥ माहेरीं सलज्ज ते जाणा सिंदळी । काळिमा काजळी पांवविते ॥५॥ तुका ह्मणे तेथें विश्वास जतन । पुरे भीमास्नान सम पाय ॥ ६ ॥

॥ २५३९ ॥

उमा रमा एक सरी । वाराणसी ते पंढरी ॥ १ ॥ दोघे सारिखे सारिखे । विश्वनाथ विठ्ठल सखे ॥ ॥ तेथें असे भागीरथी । येथें जाणा भीमरथी ॥३॥ वाराणसी त्रिशुलावरी । सुदर्शनावरी पंढरी ॥४॥ मनकर्णिका मनोहर । चंद्रभागा सरोवर ॥ ५ ॥ वाराणसी भैरवकाळ । पुंडलीक क्षेत्रपाळ ॥ ६ ॥ धुंडीराज दंडपाणी । उभा गरुड कर जोडुनी ॥७॥ गयां तेचि गोपाळपुर । प्रयाग निरा नरसिंगपुर ॥८॥ तेथें असती गयावळ । येथें गाई आणि गोपाळ ॥९॥ शमीपत्रपिंड देती । येथें काला निजसुखप्राप्ति ॥१०॥ संतसज्जनीं केला काला । तुका प्रसाद लाधला ॥ ११ ॥

॥ २५४० ॥

कार्तिकीचा सोहळा । चला जाऊं पाहूं डोळां । आलें वैकुंठ जवळां । पंढरीये सन्निध ॥ १ ॥ पीक पिकलें घुमरी । प्रेम न समाये अंबरीं । अवघी मातली पंढरी । घरोघरीं सुकाळ ॥ २ ॥ चालती स्थिर स्थिर । गरुड टकयांचे भार । गर्जती गंभीर । टाळ श्रुति मृदंग ॥ ३ ॥ मिळालिया भद्रजाती । कैशा आनंदें डुल्लती । शूर उटावती । एका एक आगळे ॥ ४ ॥ नामामृत कल्लोळ । वृंदें कोंदलीं सकळ । आलें वैष्णवदळ । कळिकाळ कांपती ॥ ५ ॥ आस करिती ब्रह्मादिक देखुनि वाळवंटींचें सुख । धन्य धन्य मृत्युलोक । ह्मणती भाग्याचा कैसा ॥६॥ मरण मुक्ति वाराणसी । पितृऋण गया नासी । उधार नाहीं पंढरीसी । पायापाशीं विठो-

बाच्या ॥७॥ तुका ह्मणे आतां । काय करणें आह्मां चिंता । सकळ सिद्धींचा दाता । तो सर्वथा नुपेक्षी ॥ ८ ॥

उपदेशपर अभंग.

॥ २५४१ ॥

जोडोनिया धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेच करी ॥ १ ॥
उत्तमाचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ॥ २ ॥
परउपकारी नेणें परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ॥ ३ ॥
भूतदया गाई पशूचें पालन । तान्हेल्या जीवन वनामाजीं ॥ ४ ॥
शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्व वडिलांचें ॥ ५ ॥
तुका ह्मणे हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥ ६ ॥

॥ २५४२ ॥

पराविया नारी माउलीसमान । मानिलिया धन काय वेचे ॥ १ ॥
न करितां परनिंदा परद्रव्यअभिलाष । काय तुमचें यास वेचे सांगा ॥ २
बैसलिये ठायीं ह्मणतां रामराम । काय होय श्रम ऐसें सांगा ३ ॥
संतांच्या वचनीं मानितां विश्वास । काय तुमचें यास वेचे सांगा ४
खरें बोलतां कोण लागती सायास । काय वेचे यास तुमचें सांगा ५
तुका ह्मणे देव जोडे याजसाटीं । आणीक ते आटी न लगे कांहीं ६

॥ २५४३ ॥

आलिया संसारा उठा वेग करा । शरण जा उदारा पांडुरंगा ॥ १ ॥
देह हें देवाचें धन कुबेराचें । तेथें मनुष्याचें काय आहे ॥ २ ॥
देता देवविता नेता नेवविता । येथें याची सत्ता काय आहे ॥ ३ ॥
निमित्याचा धनी केला असे प्राणी । माझेंमाझें ह्मणोनि व्यर्थ गेला ४
तुका ह्मणे कां रे नाशवंतासाटीं । देवासवें आटी पाडितोसी ५ ॥

॥ २५४४ ॥

सांगतों तरि तुह्मी भजा रे विठ्ठला । नाहीं तरि गेला जन्म वाया १
करितां भरोवरी दुरावसी दुरी । भवाचिये पुरीं वाहावसी ॥ २ ॥
कांहीं नलगे एक भावाचि कारण । तुका म्हणे आण विठ्ठलाची ३ ॥

॥ २५४५ ॥

अरे गिळिलें हो संसारें । कांहीं तरि राखा खरें । दिला करुणाकरें । मनुष्यदेह सत्संग १ येथें न घलीं न घलीं आड । संचितसा शब्द नाड । उठाउठीं गोड । बीजें बीज वाढवी २ केलें तें क्रियमाण । जालें तें संचित ह्मण । प्रारब्ध जाण । उरउरित उरलें तें ३ चित्त खोटें चालीवरि । रोग भोगाचे अंतरीं । रसने अनावरी । तुका ह्मणे दुग वाहे ४

॥ २५४६ ॥

आयुष्य वेचुनिया जाय । पूर्वपुण्यें होय लाभ याचा ॥ १ ॥

अनंत जन्मींचे शेवट पाहतां । नर देह हातां आला तुझ्या ॥ २ ॥
कराल ते जोडी येईल कार्यासी । ध्यावें विठ्ठलासी सुखालागी ३॥
सांचलिया धन होईल ठेवणें । तैसी नारायण जोडी करा ॥ ४ ॥
करा हरी भक्ती परलोकीं ये कामा । सोडविल यमापासोनिया ५॥
तुका ह्मणे करा आयुष्याचें मोल । नका वेंचूं बोल नामेंविण ॥६॥

॥ २५४७ ॥

लाभ झाला बहुतां दिसीं । लाहो करा पुढें नासी । मनुष्य-देहा ऐशी । उत्तम जोडी जोडिली ॥ १ ॥ घेई हरिनाम सादरें । भरा सुखाचीं भांडारें । जालिया व्यापारें । लाहो हेवा जोडीचा ॥ २ ॥ घेउनी माप हातीं । काळ मोवी दिवस राती । चोर लाग घेती । पुढें तैसें पळावें ॥ ३ ॥ हित सावकाशें । ह्मणे करीन तें पिसें । हातीं काय ऐसे । तुका ह्मणे नेणसी ॥ ४ ॥

॥ २५४८ ॥

कैसें असोनि ठाउकें नेणां । दुःख पावाल पुढिले पेणा ॥ १ ॥
आतां जागा रे जागा रे । चोर निजल्या नाडूनि भागा रे ॥ २ ॥
आतां नका रे भाई नका रे । आहे गांठीं तें लुटवूं लोकां, रे ॥ ३ ॥
तुका ह्मणे एकाच्या घायें । कां रे जाणोनि न धरा भय ॥ ४ ॥

॥ २५४९ ॥

बहुत सोसिले मागें न कळतां । पुढती काय आतां अंध व्हावें १॥
एकाचिये अंगीं हें ठेवावें लावून । नये भिन्न भिन्न चाचपडों ॥२॥
कोण होईल तो ब्रम्हांडचाळक । आपणाचि हाके देईल हाक ॥३ ॥
तुका ह्मणे दिलीं चेतवूनि खुणीं । कौतुकांवाचूनि नाहीं स्थळ ४॥

॥ २५५० ॥

आतां उघडी डोळे । जरी अद्यापि न कळे । तरी मातेचिये खोळे । दगड आला पोटाशीं ॥ १ ॥ मनुष्यदेहा ऐसा निध । साधिलें ते साधे सिद्ध । करूनि प्रबोध । संत पार उतरले ॥ २ ॥ नांव चंद्रभागे तीरीं । उभा पुंडलिकाचे द्वारीं । कट धरूनिया करीं । उभाउभी पालवी ॥ ३ ॥ तुका ह्मणे फुकासाठीं । पायीं घातली या मिठी । होतो उठाउठी । लवकरीच उतार ॥ ४ ॥

॥ २५५१ ॥

येऊनि नरदेहा झांकितील डोळे । बळेंचि अंधळे होती लोक ॥१॥
उजडासरसी न चलती वाट । पुढील बोभाट जाणोनिया ॥ २ ॥
बहु फेरे आले सोसोनिया वोळसा । पुढें नाहीं ऐसा लाभ मग ३
तुका ह्मणे जाऊं सादावीत वाट । भेटे तरी भेटो कोणी तरी ॥४॥

॥ २५५२ ॥

विषयाचें सुख येथें वाटे गोड । पुढें अवघड यमदंड ॥ १ ॥

मारिती तोडिती झोडिती निष्ठुर । यमाचे किंकर बहुसाल ॥ २ ॥ असिपत्रीं तरुवर खैराचे इंगळ । निघतील ज्वाळ तेलपाकीं ॥ ३ ॥ तप्तभूमीवरि चालविती पायीं । अग्निस्तंभ बाहीं कवळविती ॥ ४ ॥ म्हणऊनिया तुका येतो काकुलती । पुरे यातायाती गर्भवास ॥५॥

॥ २५५३ ॥

देह मृत्याचें भातुकें । कळों आलें कवतुकें ॥ १ ॥ काय मानियेलें सार । हेंचि वाटतें आश्चर्य ॥ २ ॥ नानाभोगांचीं संचितें । करूनि ठेविलें आइतें ॥३॥ तुका ह्मणे कोडीं । उगवूं न सकती बापुडीं ॥ ४ ॥

॥ २५५४ ॥

कां रे तुह्मी निर्मळ हरिगुण गाना । नाचत आनंदरूप वैकुंठासी जाना ॥ १ ॥ काय गणिकेच्या याती अधिकार मोठा । दोषी अजामेळ ऐसी नेलीं वैकुंठा ॥ २ ॥ ऐसे नेणों मागें किती तारिले अपार । पंच महा पातकी दोषा नाहीं पार ॥३॥ पुत्राचिया लोभें नष्ट ह्मणे नारायण । कोण कर्तव्य तुका ह्मणे त्याचें पुण्य ॥ ४ ॥

॥ २५५५ ॥

कां रे भजसी हरी । तुज कोण अंगीकारी ॥ १ ॥ होइल यमपुरी । यमदंड यातना ॥ २ ॥ कोण जाली लगबग । काय करिसी तेथें मग ॥ ३ ॥ कां रे भरला ताठा । करिती वोज नेता वाटा ॥ ४ ॥ तोंडा पडिली खिळणी । जिव्हा पिटिती वोढूनि ॥ ५ ॥ कां रे पडिली जनलाज । कोण सोडवील तुज ॥ ६ ॥ लाज धरीं ह्मणे तुका । नको वाया जाऊं फुका ॥ ७ ॥

॥ २५५६ ॥

कां रे नाठविसी कृपाळु देवासी । पोसितो जनासी एकला तो १॥ बाळा दुधा कोण करितें उत्पत्ती । वाढवी श्रीपति सवें दोन्ही २॥ फुटती तरुवर उष्णकाळमासीं । जीवन तयांसी कोण घाली ॥३॥ तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहे त्या अनंता आठवूनि ४ ॥ तुका ह्मणे ज्याचें नाम विश्वंभर । त्याचें निरंतर ध्यान करी ॥ ५॥

॥ २५५७ ॥

देवाचें भजन कां रे न करीसी । अखंड हव्यासी पीडितोसी १ ॥ देवासी शरण कां रे न वजसी तैसा । पुत्रस्नेहें जैसा मनुष्यालागीं२ देवाचा विश्वास कां रे नाहीं तैसा । पुत्रस्नेहें जैसा गुंतलासी ॥३॥ कां रे नाहीं तैसी देवाची ते गोडी । नागवूनि सोडी पत्नी जैसी ४ कां रे नाहीं तैसे देवाचे उपकार । माया मिथ्या भार पितृपूजना५ कां रे भय वाहासी लोकांचा तूं धाक । विसरोनिया एक नारायण६ तुका ह्मणे कां रे घातलेंसें वाया । सर्व आयुष्य जाया भक्तिविण७

॥ २५५८ ॥

रामनाम हाचि मांडिला दुकान । आहे वानोवाण घ्यारे कोणी १॥
नका कोणी करूं घेतां रे आळस । वांटतों तुम्हांस फुकाचें हें २॥
संचितासारिखें पडे त्याच्या हाता । फारसें मागतां तरी न ये ३॥
तुका ह्मणे आह्मी साठविलें सार । उरलिया थार विचारितां ॥४॥

॥ २५५९ ॥

बहुतां जन्मां अंतीं । जोडी लागली हे हातीं ॥ १ ॥ मनुष्यदेहा ऐसा ठाव । घरीं पांडुरंगीं भाव ॥२॥ बहु केला फेरा । येथें सांपडला थारा ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाणे । ऐसे भले ते शाहाणे ॥ ४ ॥

॥ २५६० ॥

भवसागर तरतां । कां रे करीतसा चिंता । पैल उभा दाता । कटीं कर ठेवुनिया ॥ १ ॥ त्यांचे पायीं घाला मिठी । मोल नेघे जगजेठी । भावा एकासाठीं । खांदा वाहे आपुल्या ॥ २ ॥ सुखें करावा संसार । परि न संडावे दोन्ही वार । दया क्षमा घर । चोजवीत येतील ॥ ३ ॥ भुक्तिमुक्तीची चिंता । नाहीं दैन्य दरिद्रता । तुका ह्मणे दाता । पांडुरंग वोळगिल्या ॥ ४ ॥

॥ २५६१ ॥

कोणें तुझा सांग केला अंगिकार । निश्चिंति त्वां थोर मानियेली १॥
कोणें ऐसा तुज उपदेश केला । नको या विठ्ठलों शरण जाऊं ॥२॥
तेव्हां तुज कोण घालील पाठीसी । घांसील भूमीसी वदन यम ॥३॥
कां रे नागवसी आयुष्य खातो काळ । दिसेंदिस बळ क्षीण होतें ॥४॥
तुका ह्मणे यासि सांगा कोणी तरी । विसरला हरी मायबाप ॥५॥

॥ २५६२ ॥

हरिच्या जागरणा । जातां कां रे नये मना ॥ १ ॥ कोठें पाहासील तुटी । आयुष्य वेंचे फुकासाठीं ॥२॥ ज्यासी तुज गुंती । तें तों मोकलिती अंतीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे बरा । लाभ कोण तो विचारा ॥४॥

॥ २५६३ ॥

दुःखाचे डोंगर लागती सोसावे । ऐसें तंव ठावें सकळांसीं ॥ १ ॥
कांहीं न करिती विचार हिताचा । न करिती वाचा नामघोष २॥
भोग कळों येतो मागिल ते जन्म । उत्तम जन्म कनिष्ठ ते ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें झांकितील डोळे । भोग देतेवेळे येइल कळों ॥४॥

॥ २५६४ ॥

बुद्धिचा पालट धरा रे कांहीं । मागुता नाहीं मनुष्यदेह ॥ १ ॥
आपुल्या हिताचे नव्हती सायास । गृहदारा आस धनवित्त ॥२॥
अवचितें निधान लागलें हें हातीं । भोगावी विपत्ति गर्भवास ३॥

यावें जावें पुढें ऐसेंचि कारण । भोगावें पतन नरकवासा ॥ ४ ॥ तुका ह्मणे धरीं आठव या देहीं । नाहीं तरि कांहीं बरें नव्हे ५ ॥

॥ २५६५ ॥

ह्मणवितां हरिदास कां रे नाहीं लाज । दीनासी महाराज ह्मणसी हीना १ काय ऐसें पोट न भरे ते गेलें । हात्कविसी कुळें सगेंमाजी २ ॥ तुका म्हणे पोटें केली विटंबना । दीन झाला जना कींव भाकी ३ ॥

॥ २५६६ ॥

ह्मणसी नाहीं रे संचित । न करीं ऐसी मात ॥ १ ॥ त्यासी घेई हरिनामाचा । जन्म जाऊं नेदीं साचा ॥ २ ॥ गळा पडेल यमफांसीं । मग कैंचा हरि ह्मणसी ॥ ३ ॥ पुरत्यासाटीं देहाडा । ऐसें न ह्मणें न ह्मणें मूढा ॥ ४ ॥ नरदेह दुबळा । ऐसें न ह्मणें रे चांडाळा ५ तुका ह्मणे सांगों किती । सेकीं तोंडीं पडेल माती ॥ ६ ॥

॥ २५६७ ॥

समश्रुळित असतां वाचा । घोष न करिसी कां नामाचा ॥ १ ॥ कां रे वैष्णव नव्हेसी । कवण्या दंभें नागवलासी ॥ २ ॥ हरि हरि ह्मणतां लाजसी । गर्वें फुगोनि चालसी ॥ ३ ॥ नाकर्ते उनागा । पुंसेविण बांडा सुना ॥४॥ जालेंसि महिमेचें वेडें । नाचों लाजसी दिंडीपुढें ॥५॥ अळंकारांच्यानि वळें । वेचलासी तुळसीमाळे ॥६॥ कैसा सकुमार जालासी । ह्मणसी न टके एकादशी ॥ ७ ॥ स्नान न करिसी आंघोळी । विभूती न लाविसी कपाळीं ॥ ८ ॥ वरिवरि न्याहाळिसी त्वचा । उपयोग नाहीं मांसाचा ॥ ९ ॥ पद्मनाभी विश्वनाथ । तुका अज्ञान रडत ॥ १० ॥

॥ २५६८ ॥

देहीं असोनिया देव । वृथा फिरतो निर्दैव ॥ १ ॥ देव आहे अंतर्यामीं । व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं ॥ २ ॥ नाभीं मृगाचे कस्तुरी । व्यर्थ हिंडे वनांतरीं ॥ ३ ॥ साखरेचें मूळ ऊंस । तैसा देहीं देव दिसे ॥ ४ ॥ दुधीं असतां नवनीत । नेणे तयाचें मथित ॥ ५ ॥ तुका सांगे मूढजना । देहीं देव कां पाहाना ॥ ६ ॥

॥ २५६९ ॥

कां रे दाटोन होतां वेडे । देव आहे तुह्मांपुढें ॥१॥ ज्यासी पाठ नाहीं पोट । करी त्रैलोक्याचा घोंट ॥२॥ तुमची तुम्हां नाहीं सोय । कोणाचें वा काय जाय ३ तुका गातो नामीं । तेथें नाहीं तुह्मी आह्मी ४॥

॥ २५७० ॥

ऐसे सांडुनिया धुरे । किविलवाणी दिसां कां रे । कामें उर भरे । हातीं तुरे मृत्तिका ॥१॥ उदार हा जगदानी । पांडुरंग अभि-

मानी । तुळसीदळ पाणी । चिंतनाचा भुकेला ॥२॥ नलगे पुसावी चाकरी । कोणी वकील ये घरीं । त्याचा तोचि करी । पारपत्य सकळ ॥३॥ नाहीं आडकाठी । तुका ह्मणे जातां भेटी । न बोलतां मिठी । उगीच पायीं घालावी ॥४॥

॥ २५७१ ॥

कां रे दास होसी संसाराचा खर । दुःखाचे डोंगर भोगावया ॥१॥ मिष्टान्नाची गोडी जिव्हेच्या अगरीं । मसक भरल्यावरी स्वाद नेणें २ आणीकही भोग आणिकां इंद्रियांचे । नाहीं ऐसे साचे जवळी कांहीं ३ रूप दृष्टि धाय पाहातां पाहातां । न घडे सर्वथा आणि तृष्णा ॥४॥ तुका ह्मणे कां रे नाशिवंतासाठीं । देवासवें तुटी करितोसी ॥५॥

॥ २५७२ ॥

गेले पळाले दिवस रोज । काय ह्मणासि माझें माझें ॥ १ ॥ सळे धरोनि बैसला काळ । फांको नेदी घटिका पळ ॥ २ ॥ कां रे अद्यापि न कळे । केश फिरले कान डोळे ॥ ३ ॥ हित कळोनि असतां हातीं । तोंडीं पाडोनि घेसी माती ॥ ४ ॥ तुज ठाउकें मी जाणार । पाया शोधोनि बांधिसी घर ॥५॥ तुका ह्मणे वेगें । पंढरिराया शरण रिघें ६

॥ २५७३ ॥

आयुष्य वेचूनि कुटुंब पोसिलें । काय हित केलें सांग बापा ॥ १ ॥ फुकोचा चाकर झालासी कावाडी । नाहीं सुख घडी भोगावया २ दुर्लभ मनुष्यजन्म कष्टें पावलासी । दिला कुटुंबासी कामभोग ३॥ तुका ह्मणे ऐसें आयुष्य नाशिलें । पाप तें सांचिलें पतनासी ॥ ४ ॥

॥ २५७४ ॥

माझें म्हणतां याला कां रे नाहीं लाज । कन्या पुत्र भाज धन वित्त ॥१॥ कोणी सोडवीना काळाचे हातींचे । एकाविण साचें नारायणा ॥२॥ तुका ह्मणे किती सांगावें चांडाळा । नेणें जीवकळा कोण्या जीतो ३

॥ २५७५ ॥

करूनि जतन । कोणा कामा आलें धन ॥१॥ ऐसें जाणता जाणता । कां रे होतोसी नेणता ॥ २ ॥ प्रिया पुत्र बंधु । नाहीं तुज यांशीं संबंधु ॥ ३ ॥ तुका ह्मणे एका । हरीविण नाहीं सखा ॥ ४ ॥

॥ २५७६ ॥

कां रे माझीं पोरें म्हणविशी ढोरें । मायबाप खरें काय एक ॥ १ ॥ कां रे गेलें म्हणोनि करिसी तळमळ । मिथ्याच कोल्हाळ मेलियाचा २ कां रे माझें माझें म्हणसील गोत । न सोडविती दूत यमा हातीं ३ ॥ कां रे मी बळिया ह्मणविसी ऐसा । सरणापाशीं कैसा उचलाविसी४ तुका ह्मणे न धरीं भरंवसा कांहीं । वेगीं शरण जाई पांडुरंगा ॥ ५॥

॥ २५७७ ॥

धन मेळवूनि कोटी । सवें नये रे लंगोटी ॥१॥ पानें खाशील उदंड । अंतीं जासी सुंकल्या तोंडें ॥२॥ पलंग न्याहाल्या सुपती । शेवटीं गोवऱ्या सांगाती ॥३॥ तुका ह्मणे राम । एक विसरतां श्रम ॥ ४ ॥

॥ २५७८ ॥

नित्य उठोनिया खायाचीच चिंता । आपुल्या तूं हिता नाठवीसी१॥ जननीचे पोटीं उपजलासी जेव्हां । चिंता तुझी तेव्हां केली तेणें२॥ चातकां लागूनि मेघ नित्य वर्षे । तो तुज उदास करील केवीं ३ ॥ पक्षी वनचरें आहेत भूमीवरि । नयालागीं हरि उपेक्षीना ॥ ४ ॥ तुका ह्मणे भाव धरून राहें चित्तीं । तरि तो श्रीपति उपेक्षीना ५॥

॥ २५७९ ॥

एक शेरा अन्ना चाड । येर वाउगी बडबड॥१॥कां रे तृष्णा वाढविसी । बांधवूनि मोहपाशीं ॥२॥ औट हात तुझा जागा । येर सिणसो वाउगा ॥ ३ ॥ तुका ह्मणे श्रम । एक विसरतां राम ॥ ४ ॥

॥ २५८० ॥

एक मन तुझ्या अवघ्या भांडवला । वांटितां तें तुला येई कैसें१॥ म्हणउनि दृढ धरीं पांडुरंग । देहा लावीं संग प्रारब्धाचा ॥ २ ॥ आणिका संकल्पा नको गोऊं मन । तरीच कारण साध्य होय ॥३॥ तुका ह्मणे ऐसें जाणावें उचित । तरी सहज स्थित येईल कळों४॥

॥ २५८१ ॥

मैत्र केला महाबळी । कामा न येती अंतकाळीं ॥ १ ॥ आधीं घे रे रामनाम । सामा भरीं हा उत्तम ॥ २ ॥ नाहीं तरी यम । दांत खातो करकरा ॥३॥ धन मेळविल्या कोडी । तुज घेतल्या न सोडी ॥ ४ ॥ कामा न ये हा परिवार । सैन्य लोक बहु फार ॥ ५ ॥ तंववरी तुमचें बळ । जंव आला नाहीं काळ ॥ ६ ॥ तुका ह्मणे बापा । चुकवीं चौऱ्याशींच्या खेपा ॥ ७ ॥

॥ २५८२ ॥

सोइरे धाइरे दिल्या घेतल्याचे । अंत हे काळींचें नाहीं कोणी ॥ १ ॥ सख्या गोत्रबहिणी सुखाचे सांगाती । मोकलूनी देती अंतकाळीं २॥ आपुलें शरीर आपणा पारिखें । परावीं होतील नवल काई ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां सोड यांची आस । धरीं रे या कास पांडुरंगा ॥४॥

॥ २५८३ ॥

आलें धरा येच पेंठे । पुढें मागुतें न भेटे ॥ १ ॥ होसी फजीती वरपडा । लक्ष चौऱ्यासीचे वेढा ॥ २ ॥ नाहीं कोणाचा सांगात । दुःख भोगितां आघात ॥ ३ ॥ एका पाउलाची वाट । कोणा सां-

गावा बोभाट ॥ ४ ॥ जुंतिजेसी घाणां । नाहीं मारितया करुणा ५॥ तुका म्हणे हित पाहे । जोंवरि हें हातीं आहे ॥ ६ ॥

॥ २५८४ ॥

देवाचिये चाडे प्रमाण उचित । नये वांटूं चित्त निषेधासीं ॥ १ ॥ नये राहों उभें कसमळापाशीं । भुंकतील तैसीं सांडावीं तीं ॥ २ ॥ तुका म्हणे क्षमा सुखाची हे रासी । सांडूनि कां ऐसी दुःखी व्हावें ३

॥ २५८५ ॥

भक्तिभावें करीं बैसोनि निश्चित । नको गोवूं चित्त प्रपंचासी ॥१॥ एक दृढ करीं पंढरीचा राव । मग तुज उपाव पुढिल सुचे ॥ २ ॥ नको करूं कांहीं देवतापूजन । जप तप ध्यान तेंही नको ॥ ३ ॥ मानिसील झणी आपलिक कांहीं । येरझार पाहीं न चुके कदा ४॥ ऐसे जन्म किती पावलासी देहीं। अझूनि कां नाहीं सकळी सोय५ सोय धरी आतां होय पां सावध । अनुभव आनंद आहे कैसा ६॥ सहज कैसें आहे तेथींचें तें गुज । अनुभवें निज पाहे तुकीं ॥ ७ ॥ तुका म्हणे आतां होई तूं सावध । तोडीं भवबंध एका जन्में ॥८॥

॥ २५८६ ॥

हरीविण जिणें व्यर्थचि संसारीं । प्रेत अळंकारीं मिरवत ॥ १ ॥ देवाविण शब्द व्यर्थचि कारण । भांड रंजवण सभेसी गा ॥ २ ॥ आचार करणें देवाविण जो गा । सर्पाचिया अंगा मृदुपण ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय बहु बोलें फार । भक्तीविण नर अभाग्य कीं ॥४॥

॥ २५८७ ॥

भक्तीवीण जिणें जळो लाजिरवाणें । संसार भोगणें दुःखमूळ ॥१॥ एकएक योनी कोटि कोटि फेरा । मनुष्य देह वारा मग लागे ॥२॥ वीसलक्ष योनि वृक्षांमाजी घ्याव्या । जळचरीं भोगाव्या नवलक्ष ३ अक्रा लक्ष योनि किडयांमाजी घ्याव्या । दशलक्ष भोगाव्या पक्षांमध्यें तीसलक्षयोनि पशूंचिये घरीं । मानवांभीतरी चारलक्ष ॥ ५ ॥ तुका ह्मणे तेव्हां नरदेह नरा । तयाचा मातेरा केला मूढें ॥ ६ ॥

॥ २५८८ ॥

पायां लावुनिया दोरी । भृंग बांधिना लेंकुरीं ॥ १ ॥ तैसा पावसी बंधन । मग सोडवील कोण ॥२॥ गळां बांधोनिया दोरी । वानर हिंडवी घरोघरीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे पाहें । रीस धांवा देत आहे ॥ ४ ॥

॥ २५८९ ॥

नरदेह वाया जाय । सेवीं सद्गुरूचे पाय ॥ १ ॥ सांडोनिया अहंभाव । धरीं भक्ति पूजीं देव ॥ २ ॥ थोराचिये वाटे । जातां भवशोक आटे ॥ ३ ॥ प्रल्हादातें तारी । तुका ह्मणे कंठीं धरी ॥ ४ ॥

॥ २५९० ॥

सोसें घडुगर्भवासीं । मेलों असों उपवासीं । नाहीं सखीं ऐसीं । तेथें कोणी भेटलीं ॥१॥ करीं करीं रे स्वहित । देह तंव हे अनित्य नाहीं दिलें चित्त । सोडवूं मोहापासूनि ॥ २ ॥ पाळी तोंडींचिया घांसें । तेंचि होय अनारिसें । ज्या नव्हे ऐसें । खेदी परि सोडवीना ॥ ३ ॥ तुका ह्मणे धनमानें । माझ्या बाटलों मीपणें । नाहीं दिला जरें । देखों लाभें अलाभ ॥ ४ ॥

॥ २५९१ ॥

काळ जवळिच उभा नेणां । घाली झांपडी खुंटी कानां ॥ १ ॥ कैसा हुशार सावध राहीं । आपुला तूं आपुले ठायीं ॥२॥ काळ जवळिच उभा पाहीं । नेदि कोणासि देऊं कांहीं ॥ ३ ॥ काळें पुरविली पाठी । वरुषें झाली तरी साठी ॥४॥ काळ भोंवताला भोंवे । राम येऊं नेदी जिव्हे ॥५॥ तुका ह्मणे काळा । कर्मे मिळतें तें जाला ६॥

॥ २५९२ ॥

दिकाचि या नाहीं संसारसंबंधा । तुटेना या बाधा भवरोगाची १॥
तांतडी ते करीं म्हऊनि तांतडी ।साधिली ते घडी सोमियाची २॥
संकल्पाच्या बीजें इंद्रियांची चाली । प्रारब्ध तें घाली गर्भवासीं ३
तुका म्हणे बीजें जाळुनी सकळ । करावा गोपाळ आपुले भाट.४

॥ २५९३ ॥

मृगजळ दिसे साचपणा ऐसें । खोटियाचें पिसें ऊर फोडी १ ॥
जाणोनि कां करा आपुलाले घात । विचारा रे हित लवलाही २॥
संचित सांगातीं बोळवण सर्वे । आचरलें द्यावें फळ तेणें ॥ ३ ॥
तुका म्हणे सेखी स्मशान तोंवरी । संबंध गोवरी अंगासवें ॥ ४ ॥

॥ २५९४ ॥

आठवे देव तो करावा उपाव । येर तजीं वाव खटपट ॥ १ ॥
होई बा जागा होई बा जागा । चाउणा कां गा सिणसील ॥ २ ॥
जाणिवेच्या भारें भवाचिये डोहीं । बुडसी तो कंही निघेसि ना ३॥
तुका ह्मणे देवा पावसील भावें । जाणतां तें ठावें कांही नव्हे ॥ ४ ॥

॥ २५९५ ॥

भवाचिया संगें बहुच नाडिले । कळिकाळें पाडिलें तोंडघसीं ॥ १॥
तया भवसंगें गुंतलासी वाया । धन पुत्र जाया भुलों नको ॥ २ ॥
जे जे घडी जाय ते ते काळ खाय । प्राण्या तरुणोपाय काय केला३
तुका ह्मणे करी सर्वही तूं त्याग । अर्पी हें सर्वांग जगदीशीं ॥ ४ ॥

॥ २५९६ ॥

अन्नाच्या परिमळें जरि जाय भूक । तरि कां हे पाक घरोघरीं १ ॥
आपुलालें तुह्मी करा रे स्वहित । वाचे स्मरा नित्य राम राम २ ॥

देखोनि जीवन जरि जाय तान । तरि कां सांठवण घरोघरीं ३ ॥
देखोनिया छाया सुख न पवीजे । जंव न बैसीजे तया तळीं ४ ॥
सुख तरी होय गातां अईकतां । जरि राहे चित्ता दृढ भाव ॥ ५ ॥
तुका ह्मणे होसी भावेंचि तूं मुक्त । काय करिसी युक्त जाणिवेचि ६॥

॥ २५९७ ॥

सदैव तुह्मां अवघें आहे । हातपाय चालाया ॥ . ॥ मुखीं वाणी कानीं कीर्ति । डोळे मूर्ति देखाया ॥ २ ॥ अंध बहिर ठकली किती । मुकीं होतीं पांगुळ ॥ ३ ॥ घरा अगी लावुनि जागा । न पळे तो गा वांचे ना ४ तुका ह्मणे जागा हिता । कांहीं आतां आपुल्या ५

॥ २५९८ ॥

आपुलिया आंगें तोडी मायाजाळ । ऐसें नाहीं बळ कोणापाशीं १
रांडापोरें त्याग करी कुटुंबाचा । नावरे हे वाचा आणि मन ॥ २॥
हर्षामर्ष जों हे नाहीं हो जिराले । तोंवरी हे केले चार त्यांनीं ३
मुक्त झालों ऐसें बोलों जाये मुखें । तुका ह्मणे दुःखें बांधला तो ४

॥ २५९९ ॥

काळोखी खाऊन कैवाड केला धीर । आपुलिया हितें झाले जनामध्यें शूर १ कां रे तुम्ही नेणां कां रे तुह्मी नेणा । अल्पसुखासाठीं पडशी विपत्तीचे घाणां ॥ २ ॥ नाहीं ऐसी लाज काय तयांपें आगळें । काय नव्हे केलें आपुलिया बळें ॥ ३ ॥ तुका ह्मणे तरी सुख अवघोचि बरें । जतन करूं हीं आपुलालीं ढोरें ॥ ४ ॥

॥ २६०० ॥

नलगे द्यावा जीव सहजचि जाणार । आहे तो विचार जाणा कांहीं १
मरण जो मागे गाढवाचा बाळ । बोलिजे चांडाळ शुद्ध त्यासी २
तुका ह्मणे कांहीं होईल स्वहित । निधान जो थीतें टाकूं पाहे ॥३॥

॥ २६०१ ॥

वांटा घेई लवकरि । मागें अंतरसी दुरी । केली भरोवरी । सार नेती आणीक ॥ १ ॥ ऐसीं भांबावलीं किती । काय जाणों नेणों किती । समय नेणती । माथां भार वाहोनि ॥ २ ॥ नाहीं सरिलें तोंवरी । धांव घेई वेग करीं । घेतलें पदरीं । फावलें तें आपुलें ॥ ३ ॥ फट लंडी ह्मणे तुका । एक न साहावे धका । तरिच या सुखा । मग कैसा पावशील ॥ ४ ॥

॥ २६०२ ॥

देवाचे ह्मणोनि देवीं अनादर । हें मोठें आश्चर्य वाटतसे ॥ १ ॥
आतां येरा जना ह्मणावें तें काई । जया भार डोई संसाराचा ॥२॥
त्यजुनी संसार अभिमान सांटा । जुलूम हा मोटा दिसतसे ॥३॥
तुका ह्मणे आळस करूनिया साहे । बळें कैसे पाहें वाया जासी ४॥

॥ २६०३ ॥

काय एका झालें तें कां नाहीं ठावें । काय हें सांगावें काय म्हूण १॥
देखतील डोळां ऐकतील कानीं । बोलिलें पुराणीं तेंही ठावें ॥ २ ॥
काय हें शरीर साच कीं जाणार । सकळ विचार जाणती हा ३ ॥
कां हें कळों नये आपुलें आपण । बाल्यत्व तारुण्य वृद्धदशा ॥४॥
कां हें आवडलें प्रियापुत्रधन । काय कामा कोण कोणा आलें ॥५॥
कां हें जन्म वाया घातलें उत्तम । कां हे रामराम न ह्मणती ॥६॥
काय भुली यांसी पडली जाणतां । देखती मरतां आणिकांसी ७॥
काय करिती हे बांधलिया काळें । तुका ह्मणे बळें वज्रपाशीं ॥८॥

॥ २६०४ ॥

वाटे या जनाचें थोर वा आश्चर्य । न करिती विचार कां हिताचा१
कोण दम ऐसा आहे यांचे पोटीं । येईल शेवटीं कोण कामा ॥२॥
काय मानुनिया राहिले निश्चिंती । काय जाब देती यमदूतां ॥३॥
कां हे विसरलीं मरण बापुडीं । काय यांसी गोडी लागलीसे ॥४॥
काय हातीं नाहीं करील तयासी । काय झालें यांसी काय जाणे ५
कां हे नाठविती देवकीनंदना । सुटाया बंधनापासूनिया ॥ ६ ॥
काय मोल यासी लागे धन वित्त । कां हे यांचें चित्त घेत नाहीं ७
तुका ह्मणे कां हे भोगतील खाणी । कां त्या चक्रपाणी विसरलीं ८॥

॥ २६०५ ॥

पडिली हे रूढि जगा परिचार । चालविती वेव्हार सत्य म्हूण ॥१॥
मरणाची कां रे नाहीं आठवण । संचिताचा धन लोभ हेवा ॥ २ ॥
देहाचें भय तें काळाचें भातुकें । ग्रासूनि तें एकें ठेविलेंसे ॥ ३ ॥
तुका ह्मणे कांहीं उघडा रे डोळे । जाणोनि अंधळे होऊं नका ॥४॥

॥ २६०६ ॥

म्हणसी होऊनी निश्चिंता । हरूनिया अवघी चिंता । मग जाऊं एकांता । भजन करूं ॥ १ ॥ संसार संभ्रमें आशा लागे पाठीं । तेणें जीवा साटी होईल तुझ्या ॥ २ ॥ ऐकें नाडसील नाडसील । विषयसंगें अवघा नाडसील । मागुता पडसील । भवडोहीं ॥ ३ ॥ शरीर सकळ मायेचा बांधा । यासी नाहीं कदा आराणूक ॥ ४ ॥ करिती ताडातोडी अंतर बाह्यात्कारीं । ऐसें जातां चारी दिवस वेगीं ॥ ५ ॥ मोलाची घडी जाते वायाविण । न मिळे मोल धन देतां कोडी ॥ ६ ॥ जागा होईं करीं हिताचा उपाय । तुका ह्मणे हाय करिसी मग ॥ ७ ॥

॥ २६०७ ॥

वृद्धपणीं न पुसे कोणी । विटंबणी देहाची ॥१॥ नव द्वारें झालीं

मोकळीक । गांड सरली वाजती ॥ २ ॥ दंत दाढा गळे थुंका । लागे नाका हनुवटी ॥ ३ ॥ शब्द नये मुखावाटा । करिती चेष्टा पोरें तीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे अजून तरी । स्मरें श्रीहरी सोडवील५

॥ २६०८ ॥

वृद्धपणीं आली जरा । शरीर कांपे थरथरा ॥१॥ आयुष्य गेलें हें कळेना । स्मरा वेगें पंढरिराणा ॥ २ ॥ दांत दाढा पडिल्या ओस । हनुवटी भेटे नाकास ॥ ३ ॥ हात पाय राहिले कान । नेत्रा पाझर हाले मान ॥ ४ ॥ अंगकांति परतली । चिरगुटा ऐसी झाली ॥ ५ ॥ आड पडे जिव्हा लोटे । शब्द नये मुखा वाटे ॥६॥ लोंब लोंबताती अंड । भरभरा वाजे गांड ॥ ७ ॥ तुका ह्मणे आतां तरी । स्मरा वेगीं हरी हरी ॥ ८ ॥

॥ २६०९ ॥

ओले मातीचा भरंवसा । कां रे धरिशी मानसा १ डोळे विरीव चांगले । वृद्धपणीं सरक्या झाले २ नाक सरळ चांगलें । येउन हनवटीं लागलें ३ तुका ह्मणे आलें नाहीं । तंव हरिला भज रे कांहीं ४॥

॥ २६१० ॥

इच्छेचें पाहिलें । डोळीं अंतीं मोकलिलें ॥ १ ॥ यांचा विश्वास तो काई । ऐसें विचारूनि पाहीं ॥ २ ॥ सुगंध अभ्यंगें पाळितां । केश फिरले जाणतां ॥ ३ ॥ पिंड पाळितां ओसरे । अवघे घेऊनि मागें सरे ॥ ४ ॥ करितां उपचार । कोणां नाहीं उपकार ॥ ५ ॥ अल्प जीवन करीं । तुका ह्मणे साधी हरी ॥ ६ ॥

॥ २६११ ॥

एक पाहतसां एकांचीं दहनें । सावध त्या गुणें कां रे नव्हा १ ॥ मारा हाक देवा भय अट्टाहासें । जंव काळाऐसें झालें नाहीं ॥२॥ मरणांची तंव गांठोडी पदरीं । जिणें तोंचि वरि माप भरे ॥ ३ ॥ तुका ह्मणे धीग वाहाती मारग । अंगा आलें मग हालों नेदी ४ ॥

॥ २६१२ ॥

हरि हरि तुह्मी ह्मणा रे सकळ । तेणें मायाजाळ तुटतील ॥ १ ॥ आणिक नका पडूं गाबाळाचे भरी । आहे ती ते थोरी नागवण ॥२॥ भावें तुळसीदळ पाणी जोडा हात । म्हणावें पतित वेळोवेळा ॥३॥ तुका ह्मणे हा तव कृपेचा सागर । नामासाठीं पार पाववील ॥ ४ ॥

॥ २६१३ ॥

कैं वाहावें जीवन । कैं पलंगीं शयन ॥ १ ॥ जैसी जैसी वेळ पडे । तैसें तैसें होणें घडे ॥ २ ॥ कैं भोज्य मानापरी । कैं कोरड्या भाकरी ॥ ३ ॥ कैं बसावें वाहनीं । कैं पायीं अनवाणी ॥ ४ ॥ कैं उत्तम प्रावणें । कैं वसनें तीं जीर्णें ॥ ५ ॥ कैं सकळ संपत्ती । कैं

भोगणें विपत्ती ॥ ६ ॥ कैं सज्जनाशीं संग । कैं दुर्जनाशीं योग ॥ ७ ॥ तुका ह्मणे जाण । सुख दुःख तें समान ॥ ८ ॥

॥ २६१४ ॥

सकळिकांच्या पायां माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥१॥ अहो श्रोते वक्ते सकळही जन । बरें पारखून बांधा गांठी ॥ २ ॥ फोडिलें भांडार धन्याचा हा माल । मी तंव हमाल भारवाही ॥३॥ तुका ह्मणे चाली झाली चहूं देशीं । उतरला कसीं खरा माल ॥४॥

॥ २६१५ ॥

अरे हें देह व्यर्थ जावें । ऐसें जरी तुज व्हावें । द्यूतकर्म मनोभावें । सारीपाट खेळावा ॥ १ ॥ मग कैंचे हरिचें नाम । निजेलिया जागा राम । जन्मोजन्मींचा अधम । दुःख थोर साधिलें २ विषयसुखाचा लंपट । दासीगमनीं अतिधीट । तया तेचि वाट । अधोगती जावया ॥३॥ आणीक एक कोड । नरका जावयाची चाड । तरी संतनिंदा गोड । करीं कवतुकें सदा ॥४॥ तुका ह्मणे ऐसें । मना लावी रामपिसें । नाहीं तरी आलिया सायासें । फुकट जासी ठकोनि ५॥

॥ २६१६ ॥

नका घालूं दुध जयामध्यें सार । ताकाचे उपकार तरी करा ॥१॥ नेदा तरी हें शो नका देऊं अन्न । फुकाचें जीवन तरी पाजा ॥ २ ॥ तुका ह्मणे मज सगुणाची चाड । पुरशा कोणी कोड दुर्बळाचें ॥३॥

॥ २६१७ ॥

आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥ १ ॥ सकळांच्या पायां माझें दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥ २ ॥ हित तें करावें देवाचें चिंतन । करूनिया मन शुद्धभावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे हित होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥४॥

॥ २६१८ ॥

ऐकें रे जना । तुझ्या स्वहिताच्या खुणा । पंढरीचा राणा । मनामाजी स्मरावा ॥ १ ॥ मग कैचें रे बंधन । वाचे गाता नारायण । भवसिंधु तो जाण । येचि तीरीं सरेल ॥ २ ॥ दास्य करील कळिकाळ । बंद तुटेल मायाजाळ । होतील सकळ । रिद्धिसिद्धी म्हाळियारीं ॥३॥ सकळ शास्त्रांचें सार । हें वेदांचें गव्हार । पाहातां विचार । हाचि करिती पुराणें ॥ ४ ॥ ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र । चांडाळांही अधिकार । बाळें नारीनर । आदिकरोनि वेश्याही ५॥ तुका ह्मणे अनुभवें । आम्हीं पाडियेलें ठावें । आणीकही दैवें । सुख घेती भाविकें ॥ ६ ॥

॥ २६१९ ॥

न करीं तळमळ राहें रे निश्चळ । आहे हा कृपाळ स्वामी माझा ॥१॥
अविनाश सुख देईल निर्वाणीं । चुकतील खाणी चौऱ्याशींच्या २
आणिकिया जीवा होईल उद्धार । तेही उपकार घडती कोटि ॥ ३ ॥
आहिक्य परत्रीं होसील सरता । वाचे उच्चारिता रामराम ॥ ४ ॥
तुका ह्मणे सांडीं संसाराचा छंद । मग परमानंद पावसील ॥ ५ ॥

॥ २६२० ॥

साधकाची दशा उदास असावी । उपाधि नसावी अंतर्बाही ॥ १ ॥
लोलुपता काय निद्रेसी जिंकावें । भोजन करावें परिमित ॥ २ ॥
एकांतीं लोकांतीं स्त्रियांशीं भाषण । प्राण गेल्या जाण बोलों नये ३
संग सज्जनाचा उच्चार नामाचा । घोष कीर्तनाचा अहर्निशीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे ऐशा साधनीं जो राहे । तोचि ज्ञान लाहे गुरुकृपा ॥ ५ ॥

॥ २६२१ ॥

निर्वाहापुरतें अन्नआच्छादन । आश्रमासी स्थान कोपीं गुहा ॥१॥
कोठेंही चित्तासी नसावें बंधन । हृदयीं नारायण सांठवावा ॥ २ ॥
नये बोलों फार बैसों जनामधीं । सावधान बुद्धी इंद्रियें दमी ३॥
तुका ह्मणे घडी घडीनें साधावी । त्रिगुणांची गोवी उगवूनि ॥४॥

॥ २६२२ ॥

सर्वस्वा मुकावें तेणें हरि जिंकावें । अर्थ प्राण जीवें देहत्याग ॥१॥
मोह ममता माया चाड नाहीं चिंता । विषयकंदुवेथा जाळूनियां२
लोकलज्जा दंभ आणि अहंकार । करूनि मत्सर देशधडी ॥ ३ ॥
शांति क्षमा दया सखिया विनऊनी । मूळ चक्रपाणी धाडी त्यांसी४
तुका ह्मणे या ती अक्षरें अभिमान । सांडोनिया शरण रिघे संता ५॥

॥ २६२३ ॥

आशा हे समूळ खाणोनि काढावी । तेव्हांचि गोसावी व्हावें तेणें१
नाहीं तरि सुखें असावें संसारीं । फजिती दुसरी करूं नये ॥ २ ॥
आशा मारूनिया जयवंत व्हावें । तेव्हांचि निघावें सर्वांतूनि ॥३॥
तुका ह्मणे जरी योगाची तांतडी । आशेची बीबुडी करीं आधीं ४॥

॥ २६२४ ॥

हित व्हावें तरी दंभ दुरी ठेवा । चित्तशुद्धि सेवा देवाची हे ॥१॥
आवडी विठ्ठल गाईजे एकांतीं । अलभ्य ते येती लाभ घरा ॥ २ ॥
आणीकां अंतरीं न द्यावी वसति । करावी हे शांती वासनेची ॥३॥
तुका ह्मणे वाण हाचि निर्वाणींचा । वाउगी हे वाचा वेचूं नये ४॥

॥ २६२५ ॥

करूनिया शुद्ध मन । नारायण स्मरावा ॥ १ ॥ तरीच हा तरिजे

सिंधु । भवबंधू । तोडोनिया ॥२॥ येथें सेर शुद्ध साचें । अंतरींचें बीज तें ॥३॥ तुका ह्मणे लवणकळी । पडतां जळीं तें होय ॥४॥

॥ २६२६ ॥

बैसोनि निवांत शुद्ध करीं चित्त । तया सुखा अंतपार नाहीं १ ॥ येऊनि अंतरीं राहील गोपाळ । सायासाचें फळ बैसलिया ॥ २ ॥ राम कृष्ण हरि मुकुंद मुरारि । मंत्र हा उच्चारीं वेळोवेळां ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसें देईन मी दिव्य । जरी होइल भाव एकविध ४ ॥

॥ २६२७ ॥

नये वांटूं मन । कांहीं न देखावें भिन्न १ पाय विटोबाचे चित्तीं । असों द्यावे दिवसराती २ नये काकुळती । कोणा यावें हरिभक्ति ३ तुका ह्मणे साई । करील कृपेची विठाई ॥ ४ ॥

॥ २६२८ ॥

नलगे देशकाळ । मंत्रविधान सकळ । मनेंचि निश्चळ । करूनि करुणा भाकावी ॥ १ ॥ येतो बैसलिया ठाया । आसनें व्यापी देवराया । निर्मळ ते काया । अधिष्ठान तयाचें ॥ २ ॥ कल्पनेचा साक्षी । तरि आदरेंचि लक्षी । आवडीनें भक्षी । कोरडें धान्य मटमटां ॥ ३ ॥ येणें तरि भाव । लक्षी दासांचा उपाव । तुका ह्मणे जीव । जीवीं मेळविल अनंत ॥ ४ ॥

॥ २६२९ ॥

सत्य आठविता देव । जातें भेव पळोनि ॥ १ ॥ नलगे कांहीं करणें चिंता । धरी सत्ता सर्व तो ॥ २ ॥ भावें भाव राहे पायीं । देव तैं संनिध ॥ ३ ॥ तुका ह्मणे कृष्णनामें । शीतळ प्रेम सर्वांसी ॥ ४ ॥

॥ २६३० ॥

कायावाचामनें झाला विष्णुदास । काम क्रोध त्यास बाधीतना १ ॥ विश्वासी तो करी स्वामीवरी सत्ता । सकळ भोगिता होय त्याचें २ तुका ह्मणे चित्त करावें निर्मळ । येऊनि गोपाळ राहे तेथें ।. ३ ॥

॥ २६३१ ॥

तेंचि करीं मात । जेणें होईल तुझें हित ॥ १ ॥ काय बडबड अमित । सुख जिव्हारीं सिणविसी ॥ २ ॥ जो मुळव्याधी पीडिला । त्यासी देखोन हांसे खरजुला ३ अरथकरी सोसी ॥ त्यासि हांसे तो आळसी ॥ ४ ॥ क्षयरोगी ह्मणे परतां । सर रोगिया तूं आतां ॥ ५ ॥ वडस दोहीं डोळां वाढले । आणिकां कानें कोंचे ह्मणे ॥ ६ ॥ तुका ह्मणे लागों पायां । शुद्ध करा आपणिया ॥ ७ ॥

॥ २६३२ ॥

थोडें परी निरें । अविट तें घ्यावें खरें ॥ १ ॥ घ्यावें जेणें नये तुटी ।

बीज वाढे बीजा पोटीं ॥ २ ॥ चित्त ठेवीं ग्वाही । आणिकांशीं चाड नाहीं ॥ ३ ॥ आपलें ते हित फार । तुका ह्मणे खरें सार ४॥

। २६३३ ॥

नम्र जाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता ॥ १ ॥ हेंचि शूरत्वाचें अंग । हारी आणिला श्रीरंग ॥ २ ॥ अवघा झाला पण । लवण सकळां कारण ॥३॥ तुका ह्मणे पाणी । पातळपणें तळा आणी ४॥

॥ २६३४ ॥

ऐका गा ए अवघे जन । शुद्ध मन तें हित ॥ १ ॥ अवघा काळ नव्हे जरी । समयावरी जाणावें ॥ २ ॥ नाहीं कोणी सवें येता । संचिता या वेगळें ॥ ३ ॥ बरवा अवकाश आहे । करा साहे इंद्रियें ॥ ४ ॥ कर्मभूमी ऐसा ठाव । वेवसाव जाणावा ॥ ५ ॥ तुका ह्मणे उत्तम जोडी । जाती घडी नरदेह ॥ ६ ॥

॥ २६३५ ॥

कठिण नारळाचें अंग । बाहेरी भीतरी तें चांग ॥ १ ॥ तैसा करी कां विचार । शुद्ध कारण अंतर ॥२॥ वरि कांटे फणसफळा । माजि अंतरीं जिव्हाळा ॥ ३ ॥ ऊंस बाहेरी कठिण काळा । माजी रसाचा जिव्हाळा ॥ ४ ॥ मिठें रुचविलें अन्न । नये स्वतंत कारण ५॥

॥ २६३६ ॥

चुकलिया ताळा । वाती घालोनि बैसे डोळां ॥ १ ॥ तैसें जागें करीं चित्ता । कांहीं आपुलिया हिता ॥ २ ॥ निक्षेपिलें धन । तेथें गुंतलेंसें मन ॥ ३ ॥ नाशिवंतासाठीं । तुका ह्मणे करिसी आटी ॥ ४ ॥

॥ २६३७ ॥

उचित जाणावें मुख्य धर्म आधीं । चित्तशुद्ध बुद्धी ठायीं स्थीर १॥ न घालावी धांव मनाचिये ओढी । वचन आवडी संताचिये ॥ २ ॥ अंतरीं या राहे वचनाचा विश्वास । न लगे उपदेश तुका म्हणे ॥३॥

॥ २६३८ ॥

संसाराचा माथां भार । कांहीं पर न ठेवीं ॥ १ ॥ भक्तीची ते जाती ऐसी । सर्वस्वासी मुकावें ॥ २ ॥ भिक्षा आणि वेवसाव । काला करितो गाढव ॥ ३ ॥ करुनि वस्ती बाजारीं । ह्मणसी कासया निस्पृही ॥ ४ ॥ प्रसादा आडुनि कवी । केलें तूप पाणी तेवीं ॥ ५ ॥ तुका ह्मणे होई शूर । किंवा निष्ठुर मजूर ॥ ६ ॥

॥ २३३९ ॥

उभय भाग्यवंत तरीच समान । स्थळीं समाधान तरीच राहे १ ॥ युक्तीचें गौरव नसतां जिव्हाळा । सांचवणी जळा परी नाश ॥२॥ लोखंडा परीस ज्ञानिया तो शठ । नांवाचा पालट दगड खरा ॥३॥ तुका ह्मणे अवघे विनोदाचे ठाव । एकात्मक भाव नाहीं तेथें ॥४॥

॥ २६४० ॥

कंथा प्रावर्ण । नव्हे भिक्षेचें तें अन्न ॥१॥ करीं यापरी स्वहित । विचारूनि धर्म नीत ॥२॥ देऊळ नव्हे घर । प्रपंच परउपकार ॥३॥ विधिसेवन काम । नव्हे शब्द रामराम ॥ ४ ॥ हत्या क्षत्रधर्म । नव्हे निष्काम तें कर्म ५ तुका ह्मणे संतीं । करुनि ठेविली आइती ॥ ६ ॥

॥ २६४१ ॥

डोळ्यामध्यें जैसें कणु । अणु तेंहि न समाये ॥ १ ॥ तैसें शुद्ध करीं हित । नका चित्त बाटवूं २ आपुल्याचा कळवळा । आणिका बाळावरि न ये ॥३॥ तुका ह्मणे बीज मुडा । जैसा चाडा पिकाच्या ४ ॥

॥ २६४२ ॥

करणें तें हेंचि करा । नरका अघोरा कां जातां ॥ १ ॥ जगामध्यें नारायण । शुद्ध पुण्य तें एक ॥२॥ शरणागतां देव राखे । येरां वाखे विघ्नाचे ३ तुका ह्मणे लीन व्हावें । कळे भावें वर्म हें ॥ ४ ॥

॥ २६४३ ॥

किती रांडवडे । घालूनि व्हाल रे बापुडे । संसाराचे भिडे । कासावीस झालेती ॥ १ ॥ माझ्या स्वामी शरण रिघा । कृपाळुवा पांडुरंगा । ठेवी अंगसंगा । विश्वासिया जवळी ॥ २ ॥ कांहीं न मागतां भलें । होईल तेंचि काम केलें । नसावें आथिलें । कांहीं एका संकल्पें ॥ ३ ॥ तुका ह्मणे भाव । पाववील ठायाठाव । एकविध जीव । ठेविलिया सेवेसी ॥ ४ ॥

॥ २६४४ ॥

सत्य आम्हां मनीं । नव्हों गाबाळाचे धनी ॥ १ ॥ ऐसें जाणा रे सकळ । भरा शुद्ध टाका मळ ॥ २ ॥ देतों तीक्ष्ण उत्तरें । पुढें व्हावयासी बरें ॥ ३ ॥ तुका ह्मणे बरें घडे । देशोदेशीं चालें कोडें ॥ ४ ॥

॥ २६४५ ॥

काय धोविलें बाहेरी । मन मळलें अंतरीं । गादलें जन्मवरी । असत्य काटें काटलें ॥ १ ॥ सांडी व्यापार दंभाचा । शुद्ध करीं रे मन वाचा । तुझिया चित्ताचा । तूंच ग्वाही आपुला ॥२॥ पापपुण्यविटाळ देहीं । भरितां न विचारिसी कांहीं । काय चाचपसी महीं । जो अखंड सोंवळी ॥ ३ ॥ कामक्रोधा वेगळा । ऐसा होई कां सोंवळा । तुका ह्मणे कळा । गुंडून ठेवीं कुसरी ॥ ४ ॥

॥ २६४६ ॥

निवडावे खडे । तरी दळण वोजें घडे ॥ १ ॥ नाहीं तरि नासोनि जाय । कारण आळस उरे हाय ॥२॥ निवडावें तन । सेतीं करावें राखण ॥ ३ ॥ तुका ह्मणे नीत । न विचारितां नव्हे हित ॥ ४ ॥

॥ २६४७ ॥

भय नाहीं भेव । अनुतापीं न्हातां जीव ॥ १ ॥ जेथें देवाची तळ-मळ । तेथें काशाचा विटाळ ॥ २ ॥ उच्चारितां दोष । नाहीं उरों देत लेश ॥ ३ ॥ तुका ह्मणे चित्त । होय आवडी मिश्रित ॥ ४ ॥

॥ २६४८ ॥

काय तो विवाद असो भेदाभेद । साधा परमानंद एका भावें ॥ १ ॥
निघोनि आयुष्य जातें हातोहात । विचारा या हित लवलाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे भावभक्ति हें कारण । नागवी भूषण दंभ तोंचि ॥ ३ ॥

॥ २६४९ ॥

जेणें घडे नारायणीं अंतराय । होत बाप माय वर्जावीं तीं ॥ १ ॥
येर प्रिया पुत्र धना कोण लेखा । करिती तीं दुःखा पात्र शत्रु ॥ २ ॥
प्रलहादें जनक विभीषणें बंधु । राज्य माता निंदु भरतें केली ॥ ३ ॥
तुका ह्मणे सर्व धर्म हरिचे पाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥ ४ ॥

॥ २६५० ॥

हो कां पुत्र पत्नी बंधु । त्यांचा तोडावा संबंधु ॥ १ ॥ कळों आलें खड्याळसें । शिवों नये लिंपो दोषें ॥ २ ॥ फोडावें मडक । मेलें लेखीं घायें एकें ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्यागें । विण चुकीजेना भोगें ॥ ४ ॥

॥ २६५१ ॥

न मनावें तैसें गुरूचें वचन । जेणें नारायण अंतरे तें ॥ १ ॥
आड आला ह्मून फोडियेला डोळा । बळिनें आंधळा शुक्र केला ॥ २ ॥
करी देव तरी काय नव्हे एक । कां तुम्ही पृथक सिणा वायां ॥ ३ ॥
उलंघुनिया भ्रताराची आज्ञा । अन्न ऋषिपत्न्या घेउनि गेल्या ॥ ४ ॥
अवघेचि त्यांचें देवें केलें काज । धर्म आणि लाज राखियेली ॥ ५ ॥
पितियासी पुत्रें केला वैरकार । प्रल्हादें असुर मारियेला ॥ ६ ॥
बहुत विघ्नें केलीं तया आड । परि नाहीं कैवाड सांडियेला ॥ ७ ॥
गौळणी करिती देवाशीं व्यभिचार । सांडुनी आचार भ्रष्ट नाहीं ॥ ८ ॥
तयांसी दिलें तें कवणासी न हो । अवघा अंतर्बाहीं तोचि झाला ॥ ९ ॥
देव जोडे ते करावें अधर्म । अंतरे तें कर्म नाचरावें ॥ १० ॥
तुका ह्मणे हा हा जाणतो कळवळा । ह्मणोनि अजामेळा उद्धारिलें ॥ ११ ॥

॥ २६५२ ॥

आली सिंहस्थपर्वणी । न्हाव्या भटा झाली धणी ॥ १ ॥ अंतरीं पा-पाच्या कोडी । वरिवरि बोडी डोई दाढी ॥ २ ॥ बोडिलें तें निघालें । काय पालटलें सांग वहिलें ॥ ३ ॥ पाप गेल्याची काय खूण । नाहीं पालटले अवगुण ॥ ४ ॥ भक्तिभावेंविण । तुका ह्मणे अवघा सीण ॥ ५ ॥

॥ २६५३ ॥

किती लाजिरवाणा । मरे उपजोनि शाहाणा ॥ १ ॥ एका भावें न

करीं तुटी । न निघे देवासोई भेटी ॥२॥ सोसूनि आ ाळी । घायाळ तें ढुंग चोळी ३ सावध करी तुका । ह्मणे निजले हो आइका ४॥

॥ २६५४ ॥

निर्वैर होणें साधनाचें मूळ । येर ते विल्हाळ सांडीमांडी ॥ १ ॥ नाहीं चालों येत सोंगसंपादणी । निवडे अवसानीं शुद्धाशुद्ध ॥ २ ॥ त्याग नांव तरी निर्विषयवासना । कार्यकारणांपुरते विधि ॥ ३ ॥ तुका ह्मणे राहे चिंतनीं आवडी । येणें नांवें जोडी सत्यत्वेशीं ॥ ४॥

॥ २६५५ ॥

नव्हे खळवादी मताचि पुरता । सत्याची हे सत्ता उपदेश ॥ १ ॥ साक्षत्वेंसि मना आणावीं उत्तरें । परिपाकीं खरें खोटें कळे ॥ २ ॥ नव्हे एकदेशी शब्द हा उखता । ब्रह्मांडापुरता घेईल त्यासी ॥३॥ तुका विनवणी करी जाणतिया । बहुमतें वाया श्रमूं नये ॥ ४ ॥

॥ २६५६ ॥

पात्र शुद्ध चित्त ग्वाही । नलगे कांहीं सांगणें ॥१॥ शूर तरी सत्यचि व्हावें । साटी जीवें करूनि ॥२॥ अमुप सुखमान । स्वामी जन मानवें ॥३॥ तुका ह्मणे जैसी वाणी । तैसें मनीं परिपाक ॥४॥

॥ २६५७ ॥

साजे अळंकार । तरि भोगितां भ्रतार ॥ १ ॥ व्यभिचारीण टाकमटिका । उपहास होती लोकां ॥ २ ॥ शूरत्वाची वाणी । रूप मिरवे मंडणीं ॥३॥ तुका ह्मणे जिणें । शर्तीविण लाजिरवाणें ॥४॥

॥ २६५८ ॥

शिष्याची जो नेघे सेवा । मानी देवासारिखें ॥ १ ॥ त्याचा फळे उपदेश । आणिकां दोष उफराटे ॥२॥ त्याचें खरें ब्रह्मज्ञान । उदासीन देहभाव ॥३॥ तुका ह्मणे सत्य सांगे । येत रागें येती ते ॥४॥

॥ २६५९ ॥

न मनीं ते ज्ञानी न मनीं ते पंडित । ऐसे परीचे एकएका भावें १॥ धातू पासोनिया आणिका उपदेश । अंतरीं तो लेश प्रेम नाहीं २॥ न मनीं ते योगी न मनीं ते हरिदास । दर्शनें बहुवस बहुतां परीचीं तुका ह्मणे तया नमन बाह्यात्कारी । आवडती परी चित्त शुद्धीचे ४

॥ २६६० ॥

नाहीं पाक होत उफराटे चालीं । बोलिली ते केली व्हावी नीत १ नाहीं मानूं येत वाजटाचे बोल । कोरडेंच फोल चवी नाहीं ॥२॥ तरुवरा आधीं कोठें आहे फळ । चावटा बरळ म्हणा त्यासी ॥३॥ तुका ह्मणे किती ठकलीं बापुडीं । गव्हा आहे गोडी मांडे पुऱ्या ४॥

॥ २६६१ ॥

करावी ते पूजा मनेंचि उत्तम । लौकिकाचें काम काय असे १ ॥ कळावें तयासि कळे अंतरींचें । कारण तें साचें साचा अंगीं २ ॥

अतिशयाअंतीं लाभ किंवा घात । फळ देतें चित्त बीजापेसें ३ ॥
तुका ह्मणे जेणें राहे समाधान । केलें तें भजन पार पावी ॥ ४ ॥

॥ २६६२ ॥

मनोमय पूजा । हेचि पढीयें केशीराजा ॥ १ ॥ घेतो कल्पनेचा भोग । न मानिती बाह्य रंग ॥ २ ॥ अंतरींचें जाणे । आदिवर्तमान खुणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे कुडें । कोठें सरे त्याच्या पुढें ॥ ४ ॥

॥ २६६३ ॥

साहोनिया टांकी घाये । पाषाण देवांचि झाला पाहें ॥१॥ तया रीती दृढ मन । करीं साधाया कारण ॥ २ ॥ बाण शस्त्र साहे गोळी । शूरा ठाव उंच स्थळीं ३ तुका ह्मणे सती । अग्न देखें ज्या रीती ४

॥ २६६४ ॥

फळाची तों पोटीं । घडे वियोगेंही भेटी ॥ १ ॥ करावें चिंतन । सार तेंचि आठवण ॥ २ ॥ चित्त चित्ता ग्वाही । उपचारें चाड नाहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । पावे अंतरींची सेवा ॥ ४ ॥

॥ २६६५ ॥

खरें बोले तरी । फुकासाठीं जोडे हरी ॥ १ ॥ ऐसे फुकाचे उपाय । सांडुनिया वाया जाय ॥२॥ परउपकार । एका वचनाचा फार ॥ ३ ॥ तुका ह्मणे मळ । मनें सांडितां शीतळ ॥ ४ ॥

॥ २६६६ ॥

वेदविहित तुम्ही आइका हो कर्म । बोलतों तों वर्म संतापुढें ॥ १ ॥
चारी वर्ण झाले एकाचिये अंगीं । पापपुण्य भागीं विभागिलें ॥२॥
प्रथम पाउलीं पावविला पंथ । आदि मध्य अंत भेद नाहीं ॥ ३ ॥
आंबे बोरी वड बाभुळा चंदन । गुणागुणीं भिन्न अग्नि एक ॥ ४ ॥
तुका ह्मणे मन उन्मन जों होय । तोंवरि हे सोय विधि पाळीं ॥५॥

॥ २६६७ ॥

जुंझायाच्या गोष्टी ऐकतांचि सुख । करितां हें दुःख घोर आहे ॥१॥
तैसी हरिभक्ति सुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ॥२॥
पिंड पोसिलिया विषयांचा पाईक । वैकुंठनायक कैचा तेथें ॥ ३ ॥
तुका ह्मणे व्हावें देहासी उदार । रखुमादेवीवर जोडावया ॥ ४ ॥

॥ २६६८ ॥

चित्तीं नाहीं तें जवळीं असोनि काय । वत्स सांडी माय तेणें न्यायें १
प्रीतीचा तो वायु गोड लागे मात । जरी जाय चित्त मिळोनिया २
तुका ह्मणे अवघे फिकें भावाविण । मीठ नाहीं अन्न तेणें न्यायें ३

॥ २६६९ ॥

यज्ञनिमित्त शरिरासी बंधन । तृष्णा वायाधीण वाढविली ॥ १ ॥
नव्हे ते भक्ति परलोकसाधन । विषयांनीं बंधन केलें तुज ॥ २ ॥

आशा धरूनि फळाची । तीर्थी व्रतीं मुक्ति कैंची ॥ ३ ॥
तुका ह्मणे सिणसी वाया । शरण न व्रजतां पंढरीराया ॥ ४ ॥

॥ २६७० ॥

काय बा करिसी सोवळें ओवळें । मन नाहीं निर्मळ वाउगेंचि १ ॥
काय बा करीसी पुस्तकांची मोट । घोंकितां हृदयस्फोट हाता नये २
काय बा करीसी टाळ आणि मृदंग । जेथें पांडुरंग रंगला नाहीं ३॥
काय बा करीसी ज्ञानाचिया गोष्टी । करणी नाहीं पोटीं बोलण्याची ४
काय बा करीसी दंभ लौकिकांतें । हित नाहीं मात तुका ह्मणे ५॥

॥ २६७१ ॥

परद्रव्य परनारीचा अभिलाश । तेथूनिया ऱ्हास सर्वभाग्या ॥१॥
घटिका दिवस मास वर्षे लागती तीन । बांधलें पतन गांठोडीस २
पुढें घात त्याचा रोकडा शकून । पुढें करी गुण निश्चयेंसी ॥ ३ ॥
तुका ह्मणे एका तडताथवड । काळ लागे नाड परी खरा ॥ ४ ॥

॥ २६७२ ॥

आर्तभूतां द्यावें दान । खरें पुण्य त्या नांवें ॥१॥ होणार तें सुखें घडो। लाभ जोडो महाबुद्धि ॥ २ ॥ सत्य संकल्पाच साठीं । उजळा पोटीं रविबिंब ॥ ३ ॥ तुका ह्मणे मनीं वाव । शुद्ध भाव राखावा ॥ ४ ॥

॥ २६७३ ॥

पुण्य परउपकार पाप ते परपीडा । आणिक नाहीं जोडा दुजा यासी१
सत्य तोचि धर्म असत्य तें कर्म । आणिक हें वर्म नाहीं दुजें ॥ २ ॥
गति तेचि मुखीं नामाचें स्मरण । अधोगति जाण विन्मुखता ॥३॥
संतांचा संग तोचि स्वर्गवास । नर्क तो उदास अनर्गळ ॥ ४ ॥
तुका म्हणे उघडें आहे हित घात । जयाचें उचित करा तैसें ॥ ५ ॥

॥ २६७४ ॥

कुळधर्मे ज्ञान कुळधर्मे साधन । कुळधर्म निधान हातीं चढे ॥ १ ॥
कुळधर्मे भक्ति कुळधर्मे गति । कुळधर्म विश्रांति पाववील ॥ २ ॥
कुळधर्मे दया कुळधर्मे उपकार । कुळधर्म सार साधनाचें ॥ ३ ॥
कुळधर्मे महत्त्व कुळधर्मे मान । कुळधर्म पावन परलोकीचें ॥ ४ ॥
तुका म्हणे कुळधर्म दावी देवी देव । यथाविध भाव जरी होय ५

॥ २६७५ ॥

जेणें वाढे अपकीर्ति । सर्वार्थी तें त्यजावें ॥१॥ सत्य रुचे भलेपण । वचन तें जगासी ॥२॥ होईजे तें शुद्ध त्यागें । वाउगें तें सारावें ॥ ३ ॥ तुका म्हणे खोटें वर्म । निंद्यकर्म काळिमा ॥ ४ ॥

॥ २६७६ ॥

भाव तैसें फळ । न चले देवापाशीं बळ ॥ १ ॥ धांवे जातीपाशीं

जाती । खुण येरयेरां चित्तीं ॥२॥ हिरा हिरकणी । काढी आंतुनि अहिरणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे भलें । मन शुद्ध तींही केलें ॥ ४ ॥

॥ २६७७ ॥

शाहाणिया पुरे एकचि वचन । विशारती खूण तेचि त्यासी ॥१॥
उपदेश असे बहुतांकारणें । घेतला तो मनें पाहिजे हा ॥ २ ॥
फांसावेना तरि दुःख घेतें वाव । मग होतो जीव कासावीस ॥ ३ ॥
तुका ह्मणे नको राग धरूं झोंडा । नुघडितां पीडा होइल डोळे ॥४॥

॥ २६७८ ॥

नाहीं सुगंधाची लागत लावणी । लावावी ते मनीं शुद्ध होतां ॥१॥
वाऱ्या हातीं माप चाले सज्जनाचें । कीर्ति मुख त्याचें नारायण २॥
प्रभा आणि रवि काय असे आन । उदयीं ते जन सकळ साक्षी॥३॥
तुका ह्मणे बरा सत्याचा सायास । नवनीता नाश नाहीं पुन्हा ॥४॥

॥ २६७९ ॥

अनुतापें दोष । जाय न लगतां निमिष ॥१॥ परि तो राहे विसावला । आदीं अवसानीं भला ॥ २ ॥ हेंचि प्रायश्चित । अनुतापीं न्हाय चित्त ॥ ३ ॥ तुका ह्मणे पापा । शिवों नये अनुतापा ॥ ४ ॥

॥ २६८० ॥

ढेंकरें जेवण दिसे साचें । नाहीं तरि काचें कुंथाकुंथी ॥ १ ॥
हेही बोल तेही बोल । कोरडे फोल रुचीविण ॥ २ ॥
गऱ्हांचिया होती परी । फके वरी खाऊं नये ॥ ३ ॥
तुका ह्मणे हातींचें कांकण । तयासी दर्पण विलहाळक ॥ ४ ॥

॥ २६८१ ॥

केलें नाहीं मनीं तया घडे त्याग । उबग उद्वेग नाहीं चित्तीं ॥ १ ॥
देवचि हा जाणे अंतरींचा भाव । मिथ्या तो उपाव बाह्य रंग ॥ २ ॥
त्यागिल्याचें ध्यान राहिलें अंतरीं । अवघी ते परी विटंबना ॥ ३ ॥
तुका ह्मणे आपआपणां विचारा । कोण हा दुसरा सांगे तुह्मां ॥४॥

॥ २६८२ ॥

अन्यायासी राजा जरि न करीं दंड । बहुच ते लंड पीडिती जना १
न करी निगा कुणबी न काढितां तण । कैंचें येती कण हातासी ते २
तुका ह्मणे संतां करूं नये अनुचित । पाप नाहीं नीत विचारितां ॥३॥

॥ २६८३ ॥

ऐसी एकां अटी । रीतीं सिणती करंटीं ॥ १ ॥ साच आपुल्या पुरतें । करून नेघे तीं कां हितें ॥ २ ॥ कां हे वेचितील वाणी । निरर्थकचि कारणीं ॥३॥ तुका ह्मणे देवा । कांहीं समर्पूनि सेवा ॥ ४ ॥

॥ २६८४ ॥

जळालें तें बाह्य सोंग । अंतर व्यंग पडिलिया ॥ १ ॥ कारण तें अंत

रलें । वाइट भलें म्हणवितां ॥ २ ॥ तांतडीनें नासी । तांतडीनेंच संतोषी ॥ ३ ॥ तुका ह्मणे धीर । नाहीं बुद्धि एक स्थिर ॥ ४ ॥

॥ २६८५ ॥

निष्ठुर तो दिसे निराकारपणें । कोंवळा सगुणें प्रतिपाळी ॥ १ ॥ केलाच करावा केला कइवाड । होईल तें गोड न परेते ॥ २ ॥ मथिलिया लागे नवनीत हातां । नासे चितळितां आहाच तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां मनाशीं विचार । करावा तो सार एकचित्त ॥ ४ ॥

॥ २६८६ ॥

भोजन तें पाशांतीचें । उंच निंचे उसाळी ॥ १ ॥ केशी कारंज्याची कळा । तो जिव्हाळा स्वहिताचा ॥ २ ॥ कल्पना ते देवाविण । न करी भिन्न इतरीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे पावे भूतीं । ते निश्चिती मापली ४ ॥

॥ २६८७ ॥

जीवित्व तें किती । हेंचि धरितां बरें चित्तीं ॥ १ ॥ संत सुमनें उत्तरें । मृदु रसाळ मधुरें ॥ २ ॥ विसावतां कानीं । परिपाक घडे मनीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे जोडी । होय जतन रोकडी ॥ ४ ॥

॥ २६८८ ॥

मायबापें जरी सर्पीण कीं बोका । त्यांचे संगे सुखा न पावे बाळ १ चंदनाचा शूळ सोनियाची बेडी । सुख नेदी फोडी प्राण नाशी २॥ तुका ह्मणे नरकीं घाली अभिमान । जरी होय ज्ञान गर्वे ताठा ॥ ३ ॥

॥ २६८९ ॥

सत्या मान वाढे । गबाळाची चाली खोडे ॥ १ ॥ उतरे तें कळे कसीं । विखरोन सर्वदर्शी ॥ २ ॥ घरा मध्यें राजा । नव्हे हो वा पाटपूजा ॥ ३ ॥ तुका ह्मणे साचें । रूप तें दर्पणाचें ॥ ४ ॥

॥ २६९० ॥

मंगळाचा मंगळ सांटा । विट तोटा नेणे तें ॥ १ ॥ हें भरा सातें आलें । भलें भलें ह्मणवावें ॥ २ ॥ जनीं जनार्दन वसे । येथें दिसे तें शुद्ध ॥ ३ ॥ तुका ह्मणे बहुतां मुखें । खरें सुखें ठेवावें ॥ ४ ॥

॥ २६९१ ॥

वांदिलें वंदावें जीवाचिये साटीं । किंवा बरी पुटी आरंभींच ॥ १ ॥ स्वहिताची चाड ते एका हे बोल । अवघेंचि मोल धीरा अंगीं २॥ सिंपिलें तें रोंप वरीवरी बरें । वाळलिया वरी कोंभ नये ॥ ३ ॥ तुका ह्मणे टांकी घायें देवपण । फुटलिया जन कुला पुसी ॥ ४ ॥

॥ २६९२ ॥

पाठेळ करितां न साहावे वारा । साहेलिया ढोरा गोणी चाले ॥ १ ॥ आपणां आपण हेचि कसवटी । हर्षामर्ष पोटीं विरो द्यावें ॥ २ ॥

नवनीत तोंवरी कडकडी लोणी । निश्चळ होऊनी राहे मग ॥ ३ ॥
तुका ह्मणे जरी जग टाकी वाया । त्याच्या पडे पायां जन मग ४॥

॥ २६९३ ॥

एका बोटाची निशाणी । परीपाक नाहीं मनीं १ तरि तें संपादिलें सोंग । कारणावांचूनिया व्यंग ॥२॥ वैष्णवांचा धर्म । जग विष्णु नेणें वर्म ॥ ३ ॥ अतिशय पाप । तुका सत्य करी माप ॥ ४ ॥

॥ २६९४ ॥

एका बीजा केला नास । मग भोगलें कणीस ॥१॥ कळे सकळां हा भाव । लहानथोरांवरी जीव ॥२॥ लाभ नाहीं फुकासाटीं । केल्या-विण जीवासाटीं ॥३॥ तुका ह्मणे रणीं । जीव देतां लाभ दुणी ४ ॥

॥ २६९५ ॥

सकळ देवांचें दैवत । उभें असे रंगा आंत १ रंग लुटा माझे बाप । शुद्ध भाव खरें माप ॥ २ ॥ रंग लुटिला बहुतीं । शुक नारदादि संतीं । ३ ॥ तुका लुटितां हे रंग । साह्य झाला पांडुरंग ॥ ४ ॥

॥ २६९६ ॥

सोनें दावी वरी तांबें तयापोटीं । खरियाचेसाठीं विकूं पाहे ॥ १ ॥
पारखी तो जाणे तयाचें जीवींचें । निवडी दोहींचें वेगळालें ॥२॥
क्षीरा नीरा कैसें होय एकपण । स्वावी तोचि भिन्न भिन्न काढी३
तुका ह्मणे थीता नागवलाचि खोटा । अपमान मोठा पावईल ४ ॥

॥ २६९७ ॥

समर्थासी नाहीं वर्णावर्णभेद । सामग्री ते सर्व सिद्ध घरीं ॥ १ ॥
आदराचे ठायीं बहुच आदर । मागितलें फार तेथें वाढी ॥ २ ॥
न ह्मणे सुहृद सोइरा आवश्यक । राजा आणि रंक सारिखेचि ३॥
भाव देखे तेथें करी लडबड । जडा राखे जड निरालेंचि ॥ ४ ॥
कोणा न विसंबे याचकाचा ठाव । विनवूनि देव शंका फेडी ॥५॥
तुका ह्मणे पोट भरूनी उरवी । आलें ऐसें दावी अनुभवा ॥ ६ ॥

॥ २६९८ ॥

गव्हांच्या घुगऱ्या । नाचण्यांच्या पुऱ्या । बऱ्या त्याचि बऱ्या पाधाणी त्या पाधाणी १ काय थोरपण । वाया जाळावा तो शीण । कारणापें भिन्न । निवडे तें निराळें ॥ २ ॥ रुचि वोजेपाशीं गरज ते जैशीतैशी । करूं नका नाशी । खावें खाणें झालें तें ॥३॥ तुका ह्मणे मोठा । काय करावा तो ताठा । नाहीं वीण नीटा । पाविजेत मारग ४

॥ २६९९ ॥

विषयांचे लोलिंगत । ते फजीत होतील ॥ १ ॥ न सरे येथें यातिकुळ शुद्ध मूल बीज व्हावें ॥ २ ॥ शिखासूत्र सोंग वरी । दुराचारी दंड पावे ॥ ३ ॥ तुका ह्मणे अभिमान । नारायणा न सोसे ॥ ४ ॥

॥ २७०० ॥

शंख करिसी ज्याच्या नांवें । त्याचें तुज नाहीं ठावें । ऐक सांगतों एका भावें । सांपडे तें घरीं जीवऊनि खावें । रे विठ्ठल ॥ १ ॥ टिळे माळा करंडी सोंग । धरूनी चाळविलें जग । पसरी हात नाहीं त्याग । दावी दगड पुजी भग । रे विठ्ठल ॥ २ ॥ राख लावुनि अंग मळी । वाये टोके मी एक बळी । वासने हातीं बांधवी नळी । त्यासी येऊनी काळ गिळी । रे विठ्ठल ॥ ३ ॥ कोण तें राहडीचें सुख । वरते पाय द्दारतें मुख । करवी पीडा भोगवी दुःख । पडे नरकीं परि न कळेचि मूर्ख । रे विठ्ठल ॥ ४ ॥ सिकला फाक मारी हाका । रांडा पोरें मेळवी लोकां । विटंबी शरीर मागे रुका । केलें तें गेलें अवघें फुका । रे विठ्ठल ॥ ५ ॥ कळावें जना मी एक बळी। उभा राहोनी मांडी फळी । फोडोनी गुडघे कोंपर चोळी । आपला घात करोनी आपणचि तळमळी । रे विठ्ठल ॥ ६ ॥ फुकट खेळे टकलीं वाया । धरूनी सोंग बोडक्या डोया । शिवों नये तीं अंतरीं माया । संपादणीविण विटंबिली काया । रे विठ्ठल ॥ ७ ॥ धुळी माती कांहीं खेळोंच नका । जवादी चंदन घ्यावा बुका । आपणा परिमळ आणिकां लोकां । मोलाची महिमा फजिती ते फुका । रे विठ्ठल ॥ ८ ॥ बहुत दुःखीं झालिया खेळ । अंगीं बुद्धि नाहींत बळें । पाठीवरी तोबा तोंड काळें । रसना द्रवे उपस्थाच्या मुळें । रे विठ्ठल ॥ ९ ॥ काय सांगतो तें ऐका तुका । मोडा खेळ कांहीं अवघोंच नका । चला जेवूं आधीं पोटीं लागल्या भुका । घाल्यावरी मग धरा टाकमटिका । रे विठ्ठल ॥ १० ॥

॥ २७०१ ॥

धाई अंतरिंच्या सुखें । काय बडबड वाचा मुखें ॥ १ ॥ विधिनिषेध उर फोडी । जंव नाहीं अनुभव गोडी ॥ २ ॥ वाढे तळमळ उभयतां । नाहीं देखिलें अनुभवितां ॥ ३ ॥ आपुल्या मतें पिसें । परि तें आहे जैसेंतैसें ॥ ४ ॥ साधनाची सिद्धि । मौन करा स्थिर बुद्धि ॥ ५ ॥ तुका ह्मणे वादें । वाया गेलीं ब्रह्मवृंदें ॥ ६ ॥

॥ २७०२ ॥

संसारसंगें परमार्थ जोडे । ऐसें काय घडे जाणतेनो ॥ १ ॥ हेंडग्याच्या आळां अवघीं चिपाडें । काय तेथें गोडें निवडावीं ॥ २ ॥ ढेकणाचे बाजे सुखाची कल्पना । मूर्खत्व वचना येऊं पाहे ॥ ३ ॥ तुका ह्मणे मद्य सांडवी लंगोटी । सांगितला सेटीं विचार त्या ॥ ४ ॥

॥ २७०३ ॥

नव्हे ब्रह्मचर्य बाइलेच्या त्यागें । वैराग्य वाउगें देहत्यागें ॥ १ ॥

काम वाढे भय वासनेच्या द्वारें । सांडावें तें धीरें आचावाचा २॥
कांपवूनि टिरी शूरत्वाची मात । केलें वाताहात उचित काळें ॥३॥
तुका ह्मणे करी जिव्हेसी विटाळ । लटिकयाची मळ स्तुति होतां ४

॥ २७०४ ॥

उदंड शाहणे होत तर्कवंत । परि या नेणवे अंत विठोबाचा ॥ १ ॥
उदंड अक्षरां करोत भरोवरी । परि नेणवे थोरी विठोबाची ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं भोळेपणाविण । जाणीव ते सिण रितें माप ॥ ३ ॥

॥ २७०५ ॥

नाना मतांतरें शब्दाची वित्पत्ति । पाठांतरें होती वाचाळ ते ॥१॥
माझ्या विठोबाचें वर्म आहे दुरी । कैंची तेथें उरी देहभाव ॥२ ॥
यज्ञ याग जप तप अनुष्ठान । राहे ध्येय ध्यान आलीकडे ॥ ३ ॥
तुका ह्मणे होय उपरति चित्ता । अंगीं सप्रेमता येणें लागे ॥ ४ ॥

॥ २७०६ ॥

शास्त्रज्ञ हो ज्ञाते असती बहुत । परि नाहीं चित्त हाता आलें ॥१॥
क्षणा एका साटीं न धरवे धीर । तेणें हा रघुवीर अंतरतो ॥ २ ॥
तोळाभर सोनें रतिभार राई । मेळविल्या पाहीं नास होतो ॥ ३ ॥
हरीचे अंकित असती विरळागत । तयांसी अच्युत कृपा करी ४ ॥
तुका ह्मणे काय धुडवण्या गोष्टी । जंव नाहीं गांठीं चित्त आलें ५॥

॥ २७०७ ॥

नाहीं सरों येत जोडिल्या वचनीं । कवित्वाणी वाणी कुशळता १
सत्याचा अनुभव वेधी सत्यपणें । अनुभवाच्या गुणें रुचों येते २॥
काय अगीपाशीं शृंगारिलें चाले । पोटींचें उकले कसापाशीं ॥३॥
तुका ह्मणे येथें करावा उकल । लागेचि ना बोल वाढवूनि ॥ ४ ॥

॥ २७०८ ॥

येथें नाहीं उरों आले अवतार । येर ते पामर जीव किती ॥ १ ॥
विषयांचे ह्मणी व्हाल लोलिंगत । चेवलिया अंत न लगे मज ॥२॥
वाहोनिया भार कुंथसील ओझें । नव्हे तेंचि ओझें थीता त्याग ३॥
तुका ह्मणे कैसी नाहीं त्याची लाज । संतीं केशीराज साधियेला ४

॥ २७०९ ॥

लय लक्षूनिया झालों म्हणती देव । तोंही नव्हे भाव सत्य जाणा १
झालों बहुश्रुत नलगे आतां कांहीं । नको राहूं तेंही निश्चितीनें ॥ २ ॥
तपें दानें काय मानसी विश्वास । बीज फळ त्यास आहे पुढें ॥३॥
कर्म आचरण यातीचा स्वगुण। विशेष तो गुण काय तेथें ॥ ४ ॥
तुका ह्मणे जरी होईल निष्काम । तरिच होय राम देखे डोळा ५ ॥

॥ २७१० ॥

घरोघरीं अवघे झाले ब्रह्मज्ञान । परि मेळवण बहु माजी ॥ १ ॥

निरें कोणापाशीं होय एक रज । तरि द्या रे मज दुर्बळासी ॥२॥
आशा तृष्णा माया कालवूनि दोन्ही । दंभ तो दुरोनि दिसतसे ॥३॥
काम क्रोध लोभ सिणवी बहुत । मेळवूनि आंत काळकूट ॥ ४ ॥
तुका ह्मणे तेथें कांहीं हातां नये । आयुष्य मोलें जाये वायाविण ५

॥ २७११ ॥

देखीचें तें ज्ञान करावें तें काई । अनुभव नाहीं आपणासी ॥ १ ॥
इंद्रियांचे गोडी टकलीं बहुतें । सोडितां मागुतें आवरेना ॥ २ ॥
युक्तीचा आहार नीतीचा वेव्हार । वैराग्य तें सार तरावया ॥३॥
नावरे वाळितां घाला घाली वारा । तैसा तो पसारा अहंतेचा ४॥
तुका ह्मणे बुद्धि आपुले अधीन । करी नारायण आतुडे तो ॥ ५॥

॥ २७१२ ॥

नव्हे ब्रह्मज्ञान बोलतां हे सिद्ध । जंव हा आत्मबोध नाहीं चित्तीं१
काय करिसी वाया लटिकाची पाल्हाळ । श्रम तो केवळ जाणिवेचा२
मीच देव ऐसें सांगसी या लोकां । विषयांच्या सुखा टोंकोनिया ३
अमृताची गोडी पुढिला सांगसी । आपण उपवासी मरोनिया ४॥
तुका ह्मणे जरि राहील तळमळ । ब्रह्म ते केवळ सदोदित ॥ ५ ॥

॥ २७१३ ॥

ब्रह्मज्ञान जरी एके दिवशीं कळे । तात्काळ हा गळे अभिमान ॥१॥
अभिमान लागे शुकाचिये पाठीं । व्यासें उपराटी दृष्टी केली ॥२॥
जनकभेटीसी पाठविला तेणें । अभिमान नाणें खोटें केलें ॥ ३ ॥
खोटें करूनिया लाविला अभ्यासीं । मेरुशिखरासी शुक गेला ४॥
जाउनिया तेणें साधिली समाधी । तुका ह्मणे तधीं हातों आह्मी ५

॥ २७१४ ॥

त्रिपुटाच्या योगें । कांहीं नव्हे कोणाजोगे । एक जातां लागे । एक पाठी लागतें ॥ १ ॥ मागें पुढें अवघा काळ । पळों नये नचले बळ । करितां कोल्हाळ । कृपे खांदी हरि वाहे ॥ २ ॥ पापपुण्यास्याच्या शक्ती । असती योजिल्या श्रीपती । यावें काकुलती । येथें सत्तानायेका ॥ ३ ॥ तुका उभा पैल थडी । तरि हे प्रकाश निवडी । घातल्या सांगडी । तापे पेटीं हाकारी ॥ ४ ॥

॥ २७१५ ॥

लापनिकशब्दें नातुडे हा देव । मनिंचे गुह्य भाव शुद्ध बोला ॥१॥
अंतरिंचा भेद जाणे परमानंद । जयासी संवाद करणें लागे ॥२॥
तुका ह्मणे जरी आपुलें स्वहित । तरी करीं चित्त शुद्धभावें ॥ ३ ॥

॥ २७१६ ॥

आम्हां हें कौतुक जगा द्यावी नीत । करावे फजित चुकती ते ॥१॥
कासयाचा बाध एकाच्या निरोपें । काय व्हावें कोपें जगाचिया २

अविद्येचा येथें कोठें परिश्रम । रामकृष्णनाम ऐसे बाण ॥ ३ ॥
तुका ह्मणे येथें खऱ्याचा विकरा । न सरती येरा खोट्या परी ॥४॥

॥ २७१७ ॥

नका धरूं कोणी । राग वचनाचा मनीं ॥१॥ येथें बहुतांचें हित । शुद्ध करोनि राखा चित्त ॥२॥ नाहीं केली निंदा । आम्हीं दूषिलेंसें भेदा ॥ ३ ॥ तुका ह्मणे मज । येणेंविण काय काज ॥ ४ ॥

॥ २७१८ ॥

सेवितों हा रस वांटितों आणिकां । घ्या रे होऊं नका रानभरी १॥
विटेवरी ज्याचीं पाउलें समान । तोचि एक दानशूर दाता ॥ २ ॥
मनाचे संकल्प पाववील सिद्धि । जरी राहे बुद्धि याचे पायीं ३ ॥
तुका ह्मणे मज धाडिलें निरोपा । मारग हा सोपा सुखरूप ॥ ४ ॥

॥ २७१९ ॥

ऐका कलीचें हें फळ । पुढें होईल ब्रह्मगोळ ॥ १ ॥ चारीवर्ण अठरा याती । भोजन करिती एके पंक्ती ॥ २ ॥ पूजिती असुरा रांडा । मद्य प्राशितील पेंढा ॥ ३ ॥ वामकवळ मार्जन । जन जाईल अधःपतन ॥४॥ तुका हरिभक्ति करी । शक्ति पाणी वाहे घरीं ५॥

॥ १७२० ॥

कलियुगीं कवित्व करिती पाषांड । कुशल हे भांड बहु झाले १ ॥
द्रव्य दारा चित्तीं प्रजांची आवडी । मुखें वडबडी कोरडाचि २ ॥
दंभ करी सोंग मानावया जग । मुखें बोले त्याग मनीं नाहीं ॥३॥
वेदाज्ञे करोनि न करिती स्वहित । नव्हती अलिप्त देहाहुनि ॥ ४ ॥
तुका ह्मणे दंड साहील यमाचे । न करी जो वाचे बोले तैसें ॥५॥

॥ २७२१ ॥

साधक झाले कळी । गुडगुडीची लांब नळी ॥ १ ॥ पचीं पडे मद्यपान । भांगभुर्का हें साधन ॥ २ ॥ अभेदाचें पाठांतर । अति विषयीं पडिभर ३ चेल्यांचा सुकाळ । पिंडदंड भंगपाळ ॥ ४ ॥ सेवा मानधन । बरें इच्छेनें संपन्न ॥५॥ सोंगाच्या नरकाडी । तुका बोडोनिया सोडी ॥ ६ ॥

॥ २७२२ ॥

गाजराची पुंगी । तैसे नवे झाले जोगी ॥ १ ॥ काय करोनि पठन । केली अहंता जतन ॥ २ ॥ अल्प असे ज्ञान । अंगीं ताठा अभिमान ॥३॥ तुका ह्मणे लंड । त्याचें हाणोनि फोडा तोंड ॥४॥

॥ २७२३ ॥

घालूनिया मध्यवर्ती । दाटुनि उपदेश देती ॥१॥ ऐसे पोट भरे संत । तयां कैंचा भगवंत ॥२॥ रांडापोरांतें गोविती । वर्षासन ते

लाविती ॥३॥ जसें बोलति निरोपणीं । तैसी न करिती करणी ४॥ तुका ह्मणे तया । तमोगुणियांची क्रिया ॥ ५ ॥

॥ २७२४ ॥

परद्रव्य परनारी । अभिलासूनि नाक धरी १ जळो तयाचा आचार । व्यर्थ भार वाहे खर २ सोंवळयाची स्फीति । क्रोधें विटाळला चित्तीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे सोंग । दावी बाहेरील रंग ॥ ४ ॥

॥ २७२५ ॥

भोंदावया मीस घेऊनि संतांचें । करी कुटुंबाचें दास्य सदा ॥ १ ॥ मनुष्याचे परी बोल रावा करी । रंजवी नरनारी जगामध्यें ॥ २ ॥ तिमयाचा बैल करी शिकविलें । चित्रींचें बाहुलें गोष्टी सांगे ३ ॥ तुका ह्मणे देवा जळो हे महंती । लाज नाहीं चित्तीं निलुगातें ४॥

॥ २७२६ ॥

आंगीं लावूनिया राख । डोळे झाकुनी करिती पाप ॥१॥ दाविती वैराग्याची कळा । भोगिती विषयाचा सोहाळा ॥ २ ॥ तुका ह्मणे सांगों किती । जळो तयांची संगति ॥ ३ ॥

॥ २७२७ ॥

पुराणिक म्हणविती । जाणोनि कांदे भक्षिती ॥१॥ अगस्तीचें मूत्र मळ । लावुनि ह्मणती कृष्णावळ २ श्रेष्ठ वर्ण ब्राह्मणाचा । संग न सुटे शूद्रीचा ३ बदगाहीच्या पाडी दाढा । लागे तुकयाच्या हुंदाडा ॥४॥

॥ २७२८ ॥

बोली मैंदाची बरवी असे । वाटे अंतरीं घालावे फांसे ॥ १ ॥ कैसा वरिवरि दिसताहे चांग । नव्हे भाविक केवळ मांग ॥२॥ टिळा टोपी माळा कंठीं । अंधारीं नेउनि चेपी घांटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे तो केवळ पुंड । त्यावरि वाजती यमदंड ॥ ४ ॥

॥ २७२९ ॥

डोई वाढवूनि केश । भूतें आणिती अंगास ॥१॥ तरी ते नव्हती संत जन । तेथें नाहीं आत्मखुण ॥२॥ मेळवूनि नरनारी । शकुन सांगती नानापरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे मैंद । नाहीं त्यापासीं गोविंद ॥ ४ ॥

॥ २७३० ॥

टिळा टोपी माळा देवाचें गबाळें । वागवी वोंगळें पोटासाठीं ॥ १ ॥ तुळसी खोवी कानीं दर्भ खोवी शेंडीं । लटिकी भरी बोंडी नासिकाची २ कीर्तनाचे वेळे रडे पडे लोळे । प्रेमेंविण गळे दाटताती ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसे मावेचे मइंद । त्यांपाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥ ४ ॥

॥ २७३१ ॥

होउनि संन्यासी भगवीं लुगडीं । वासना न सोडी विषयांची ॥ १ ॥ निंदिती कदान्न इच्छिती देवान्न । पाहताती मान आदराचा ॥ २ ॥ तुका ह्मणे ऐसें दांभिक भजन । तया जनार्दन भेटे केवीं ॥ ३ ॥

॥ २७३२ ॥

लांबवूनि जटा नेसोनि कासोटा । अभिमान मोठा करिताती ॥ १ ॥
सर्वांगा करिती विभूतिलेपन । पाहाती मिष्टान्न भक्षावया ॥ २ ॥
तुका ह्मणे त्यांचा नव्हे हा स्वधर्म । न कळतां वर्म मिथ्यावाद ३ ॥

॥ २७३३ ॥

कान फाडुनिया मुद्रा ते घालिती । नाथ ह्मणविती जगामाजी १ ॥
घालोनिया फेरा मागती द्रव्यासी । परि शंकरासी नोळखती २ ॥
पोट भरावया शिकती उपाय । तुका ह्मणे जाय नरकलोका ॥ ३ ॥

॥ २७३४ ॥

कौडीकौडीसाठीं फोडिताती शिर । काढुनि रुधिर मलंग ते ॥ १ ॥
पांघरती चर्म लोहाची सांकळी । मारिती आरोळी धैर्यबळें ॥ २ ॥
तुका ह्मणे त्यांचा नव्हेचि स्वधर्म । न कळेची वर्म गोविंदाचें ३ ॥

॥ २७३५ ॥

लावुनिया मुद्रा बांधोनिया कंठीं । हिंडे पोटासाठीं देशोदेशीं ॥१॥
नेसोनि कोपीन शुभ्रवर्ण जाण । पाहाती पक्वान्न क्षेत्रींचें तें ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसे मावेचे मईद । त्यापाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥ ३ ॥

॥ २७३६ ॥

होउनि जंगम विभूति लाविती । शंख वाजविती घरोघरीं ॥ १ ॥
शिवाचें निर्माल्य तीर्थ न सेविती । घंटा वाजविती पोटासाठीं ॥२॥
तुका ह्मणे त्यांसी नाहीं शिवभक्ति । व्यापार करिती संसाराचा ॥३॥

॥ २७३७ ॥

टिळा टोपी उंच दावी । जगीं मी एक गोसावी ॥ १ ॥ अवघा वरपंग सारा । पोटीं विषयांचा थारा २ मुद्रा लावितां कोरोनि । मान व्हावयासी जनीं ॥३॥ तुका ह्मणे ऐसे किती । नरका गेले पुढें जाती ॥४॥

॥ २७३८ ॥

लांब लांब जटा काय वाढवूनि । पावडें घेऊनि क्रोधें चाले ॥ १ ॥
खायाचा वोळसा शिव्या दे जनाला । ऐशा तापशाला बोध कैंचा २
सेवी भांग अफू तमाखू उदंड । परि तो अखंड भ्रांतीमाजी ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसा सर्वस्वें बुडाला । त्यासी अंतरला पांडुरंग ॥ ४ ॥

॥ २७३९ ॥

सदा सर्वकाळ अंतरीं कुटिल । तेणें गळां माळ घालूं नये ॥ १ ॥
ज्यासी नाहीं धर्म दया क्षमा शांति । तेणें अंगीं विभूति लावूं नये २
जयासी न कळे भक्तीचें महिमान । तेणें ब्रह्मज्ञान बोलों नये ॥ ३ ॥
ज्याचें मन नाहीं लागलें हातासी । तेणें प्रपंचासी टाकूं नये ॥ ४ ॥
तुका ह्मणे ज्यासी नाहीं हरिभक्ति । तेणें भगवें हातीं धरूं नये ॥५॥

॥ २७४० ॥

संतचिन्हें लेउनि अंगीं । भूषण मिरविती जगीं ॥ १ ॥ पिडले

दुःखाचे सागरीं। वहावले ते भवपुरीं ॥२॥ कामक्रोधलोभ चित्तीं। वरिवरि दाविती विरक्ती ॥ ३ ॥ आशापाशीं बांधोनि चित्त। म्हणती झालों आम्ही मुक्त ४ त्यांचे लागले संगती। जाली त्यांची तेचि गति ॥ ५ ॥ तुका ह्मणे शब्दज्ञानें। जग नाडियेलें तेणें ॥ ६ ॥

॥ २७४१ ॥

ऐसे कैसे झाले भोंदू। कर्म करोनि ह्मणती साधू १ अंगीं लावूनिया राख। डोळे झांकुनी करिती पाप २ दावुनि वैराग्याची कळा। भोगी विषयांचा सोहळा ३ तुका ह्मणे सांगों किती। जळो तयांची संगती४

॥ २७४२ ॥

ऐसे संत झाले कळीं। तोंडीं तमाखूची नळी ॥१॥ स्नानसंध्या बुडविली। पुढें भांग वोढवली ॥ २ ॥ भांगभुर्का हें साधन। पची पडे मद्यपान ॥ ३ ॥ तुका ह्मणे अवघें सोंग। तेथें कैचा पांडुरंग ॥ ४ ॥

॥ २७४३ ॥

ऐसे नाना भेष घेउनी हिंडती। पोटासाठीं घेती प्रतिग्रह ॥ १ ॥ परमार्थासी कोण त्यजी संवसार। सांगपां साचार नांव त्याचें २॥ जन्मतां संसार त्यजियेला शुकें। तोचि निष्कळंक तुका ह्मणे ॥३॥

॥ २७४४ ॥

एक करिती गुरु गुरु। भोंवता भारु शिष्यांचा ॥ १ ॥ पूंस नाहीं पाय चारी। मनुष्य पुरी कुतरीं तीं ॥ २ ॥ परस्त्री मद्यपान। पेंडखाण माजाविलें ॥३॥ तुका ह्मणे निर्भर चित्तीं। अधोगती जावया ४

॥ २७४५ ॥

सद्गुरुवांचूनि प्रेतरूप वाणी। बोलती पुराणीं व्यासऋषि ॥ १ ॥ ह्मणोनि तयाचें पाहूं नये तोंड। निगुरा अखंड सुतकाळा ॥ २ ॥ कोण परी तया नव्हेचि सुटका। देह त्याचा लटिका जाणा तुह्मी३ तुका ह्मणे ऐसीं बोलती पुराणें। संतांचीं वचनें मागिलीं हो ॥ ४ ॥

॥ २७४६ ॥

शिष्या सांगे उपदेश। गुरुपूजा हे विशेष ॥ १ ॥ दावी आचार सोवळे। दंड कमंडलु माळे ॥ २ ॥ छाटी भगवी मानसीं। व्यर्थ ह्मणवी संन्यासी ॥३॥ तुका ह्मणे लोभ। न सुटे नाहीं लाभ ॥ ४ ॥

॥ २७४७ ॥

देखोवेखीं करिती गुरु। नाहीं ठाउका विचारु ॥ १ ॥ वर्म तें न पडे ठायीं। पांडुरंगाविण कांहीं ॥ २ ॥ शिको कळा शिकों येती। प्रेम नाहीं कोणां हातीं॥ ३ ॥ तुका ह्मणे सार। भक्ति नेणती गव्हार ॥ ४ ॥

॥ २७४८ ॥

तक्र शिष्या मान। दुग्ध म्हणे नारायण ॥ १ ॥ ऐशीं ज्ञानाचीं डोंबडें। आशा विटंबिलीं मूढें २ उपदेश तो जगा। आपण सोंवळा इतका मांगा ॥ ३ ॥ रसना शिश्नाचे अंकित। तुका म्हणे वरदळ स्फीत ४

॥ २७४९ ॥

जळोजळो तें गुरुपण। जळोजळो तें चेलेपण ॥ १॥ गुरु आला वेशीं द्वारीं। शिष्य पळतो खिडोरीं॥ २ ॥ काशासाटीं झालें येणें। त्याचें आलें वर्षासन ॥ ३ ॥ तुका ह्मणे चेला। गुरु दोघे हि नरकाला ४॥

॥ २७५० ॥

गुरुमार्गामुळें भ्रष्ट सर्वकाळ। ह्मणती यातीकूळ नाहीं ब्रह्मीं ॥ १ ॥
पवित्राला ह्मणती नको हा कंटक। मानिती आत्मिक अनामिका॥ २
डोहार होलार दासी बलुती बारा। उपदेशिती फारा रांडापोरा ३
कांहीं टाण्या टोण्या विप्र शिष्य होती। उघडी फजिती स्वधर्माची४
नसता करुनी होम खाती एके ठायीं। म्हणती पाप नाहीं मोक्ष येणें५
इंद्रियांचे पेठे भला कौल देती। मर्यादा जकाती माफ केली॥ ६ ॥
नाहीं शास्त्राधार पात्रापात्र नेणें। उपदेशून घेणें द्रव्य कांहीं ॥ ७ ॥
तुका ह्मणे ऐसे गुरु शिष्य पूर्ण। विठोबाची आण नरका जाती ८॥

॥ २७५१ ॥

अंगीं घेऊनिया वारें दया देती। तया भक्तां हातीं चोट आहे ॥१॥
देव्हारा बैसोनि हालविती सुपें। ऐसीं पापी पापें लिंपताती ॥ २ ॥
एकीबेकीन्यायें होतसे प्रचित। तेणें लोक समस्त भुलताती ॥३॥
तयांचे स्वाधीन दैवतें असती। तरी कां मरती त्यांचीं पोरें ॥ ४ ॥
तुका ह्मणे पाणी अंगारा जयाचा। भक्त कान्होबाचा तोही नव्हे ५

॥ २७५२ ॥

जगीं कीर्ति व्हावी म्हणोनि झालासी गोसावी ॥ १ ॥ बहुत केलें पाठांतर वर्म राहिलेंसे दूर २ चित्तीं नाहीं अनुताप। लटिकें भगवें स्वरूप ३ तुका ह्मणे सिंदळीच्या। व्यर्थ श्रमविली वाचा ॥ ४ ॥

॥ २७५३ ॥

काहे लकडा घांस कटावे। खोद हि जुमीन गट बनावे ॥ १ ॥
देवलवासी तरवरछाया। घरघर माई खपरिन्नसमाया ॥ २ ॥
कां छांडियें भार फेरे सीर भागें। मायाकों दुःख मिटलिये अंगे ३॥
कहे तुका तुम सुनो हो सिद्धा। रामबिना और झुटा कछु धंदा ४

॥ २७५४ ॥

न कळे ब्रह्मज्ञान आचार विचार। लटिका वेव्हार करीतसे ॥ १ ॥
विश्वामित्रीं पोटीं तयाचा अवतार। नांव महाखर चांडाळाचें ॥ २ ॥
द्रव्यइच्छेसाठीं करीतसे कथा। काय त्या पापिष्ठा न मिळे खाया २
पोट पोसावया तोंडें बडबडी। नाहीं धडफुडी एक गोष्टी ॥ ४ ॥
तुका म्हणे तया काय व्याली रांड। येउनिया भांड जनामध्यें ॥ ५॥

॥ २७५५ ॥

ब्रह्मज्ञानाची भरोवरी। पुढिला सांगे आपण न करी ॥ १ ॥ थू थू

त्याच्या तोंडावरी । व्यर्थ शिणवी वैखरी ॥२॥ कथा करी वरिवरी । प्रेम नसेचि अंतरीं ३ तुका ह्मणे कवित्व करी । मान वस्तु हे आदरी ४

॥ २७५६ ॥

मुखें बोले ब्रह्मज्ञान । मनीं धन अभिमान ॥ १ ॥ ऐसियाची करितां सेवा । काय सुख होय जीवा ॥ २ ॥ पोटासाठीं संत । झाले कलींत बहुत ॥ ३ ॥ विरळा ऐसा कोणी । तुका त्यासि लोटांगणी ४॥

॥ २७५७ ॥

मुखें सांगे ब्रह्मज्ञान । जन लोकांची कापितो मान १ ज्ञान सांगतो जनासी। नाहीं अनुभव आपणासी२कथा करितो देवाची । अंतरीं आशा बहु लोभाची३तुका ह्मणे तोचि वेडा।त्याचें हाणूनि थोबाड फोडा ४

॥ २७५८ ॥

माया ब्रह्म ऐसें ह्मणती धर्मठक । आपणासारिसे लोक नागविले १
विषयींचा लंपट शिकवि कुविद्या । मनामागें नाद्या होऊनि फिरे २
करुनि खातां पाक जीरे सुरण राई । करितां अतित्याई दुःख पावे३
औषध द्यावया चाळविलें बाळा । दावूनिया गुळा दृष्टीपुढें ॥ ४ ॥
तरावया आधीं शोधा वेदवाणी । वांजट बोलणीं वारा त्यांचीं ५॥
तुका ह्मणे जयां पिंडाचें पाळण । न घडे नारायण भेट तया ॥ ६ ॥

॥ २७५९ ॥

अवघें ब्रह्मरूप रिता नाहीं ठाव । प्रतिमा तो देव कैसा नव्हे ॥ १ ॥
नाहीं भाव तया सांगावें तें किती । आपुलाल्या मतीं पाखांडिया २
जया भावें संत बोलिले वचन । नाहीं अनुमोदन शाब्दिकांसी ॥३॥
तुका ह्मणे संतीं भाव केला बळी । न कळतां खळीं दुषिला देव ॥४॥

॥ २७६० ॥

जीव तोचि देव भोजन ते भक्ति । मरण ते मुक्ति पाखांड्याची ॥ १॥
पिंडाच्या पोषकीं नागविलें जन । लटिकें पुराण केले वेद ॥ २ ॥
मना आला तैसा करिती विचार । म्हणती संसार नाहीं पुन्हा ॥३॥
तुका म्हणे पाठीं उडती यमदंड । पापपुण्य लंड न विचारिती ॥४॥

॥ २७६१ ॥

शब्दज्ञानी येऊं नेदी दृष्टीपुढें । छळवादी कुडे अभक्त ते ॥ १ ॥
जळो ते जाणीव जळो त्यांचे दंभ । जळो त्यांचें तोंड दुर्जनाचें ॥२॥
तुका म्हणे येती दाटुनि छळाया । त्यांच्या बाहूं डोया न धरूं भीड ३

॥ २७६२ ॥

अज्ञानाची भक्ति इच्छिती संपत्ती । तयाचिये चित्तीं बोध कैंचा १
अज्ञानाची पूजा कामिक भावना । तयाचिया ध्याना देव कैंचा २॥
अज्ञानाचें कर्म फळीं ठेवी मन। निष्काम साधन तया कैंचें ॥ ३ ॥

अज्ञानाचें ज्ञान विषयावरी ध्यान । ब्रह्म सनातन तया कैचें ॥ ४ ॥
तुका ह्मणे जळो पेशियांचें तोंड । अज्ञानाचें बंड वाढविती ॥ ५ ॥

॥ २७६३ ॥

शिकल्या बोलाचे सांगतील वाद । अनुभव भेद नाहीं कोणा ॥१॥
पंडित हे ज्ञानी करितील कथा । न मिळतील अर्था निजसुखा २ ॥
तुका म्हणे जैसी लाचासाठीं ग्वाही। देखतील हे नाहीं ठावी वस्तु ३ ॥

॥ २७६४ ॥

उचित न कळे इंद्रियांचे ओढी । मुखें बडबडी शिकलें तें ॥ १ ॥
आपण जाऊन न्यावीं नरकास । बळें बेताळीस कुळें जग ॥ २ ॥
अबोलणें बोले डोळे झांकुनिया । बडबडी वाया दंभासाठीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे आम्ही तेथील पारखी । नाचे देखोदेखीं जाणों खरें ॥४॥

॥ २७६५ ॥

पिंडपोषकाच्या जळो ज्ञानगोष्टी । झणी दृष्टिभेटी न हो त्याची १ ॥
नाहीं संतचिन्ह उमटलें अंगीं । उपदेशा लागीं पात्र झाला ॥ २ ॥
पोहों नेणें कासे लावितो आणिका । म्हणावें त्या मूर्खा काय आतां ३
शिणलें तें गेलें शिणालियापाशीं । झाली त्या दोघांसी एक गति ४॥
तुका म्हणे अहो देवा दिनानाथा। दारुषण आतां नको त्याचें ॥५॥

॥ २७६६ ॥

कोडियाचें गोरेपण। तैसें अहंकारी ज्ञान ॥ १ ॥ त्यासी अंतरीं रिझे कोण । जवळी जातां चिळसवाण २ प्रत देहा गौरविलें । तैसें विटंबवाणें झालें ३ तुका म्हणे खाणें विष्ठा । तैशा देहबुद्धि चेष्टा ॥ ४ ॥

॥ २७६७ ॥

जाली गाढवी दुधाळ । महिमा गाईची पावेल ॥१॥ श्वान झालेंसे चांगलें । तरी कां सांगातें जेवील २ झाली सिंदळा चांगली। तरी कां पतिव्रता झाली ३ तुका म्हणे ऐशा जाति। काय उंचपण पावती ॥ ४ ॥

॥ २७६८ ॥

घेऊं नये तैसें दान । ज्याचें धन अभिलाषी १ तोंही येथें कामा नये । नरका जाय म्हणोनि २ विकी स्नानसंध्या जप । करी तप पुढिलांचें ३ तुका म्हणे दांभिक तो । नरका जातो स्वइच्छा ॥ ४ ॥

॥ २७६९ ॥

ज्यासी विषयाचें ध्यान । त्यासी कैंचा नारायण ॥ १ ॥ साधु कैंचा पापीयासी । काय चांडाळासी काशी ॥ २ ॥ काय पतितासी पिता । काय अधमासी गीता ३ तुका ह्मणे निरंजनी । शठ कैंचा ब्रह्मज्ञानी ४

॥ २७७० ॥

तातडीची धांव अंगा आणि भाव । खोळंबा तो वाव निश्चयाचा ॥१॥
म्हणउनि बरी विचारावी चाली । उरीचि ते बोली कामा येते ॥ २ ॥

कोरडें वैराग्य भाजिरा बडिवार। उतरे तो शूर अंगींचें तें ॥ ३ ॥
तुका म्हणे बरी अभ्यासी ते चाली। सांचवण्या खोली कैसीयाची ४

॥ २७७१ ॥

लटिक्याचे ओतवणें जोखिलिया साच।काय त्या विश्वास नो विखरा१
कोल्हांटिणी लागे आकाशीं खेळत। ते काय पावत अमरपद ॥ २ ॥
जळमंडपाचे घोडे राउत नाचती। ते काय तगती युद्धालागीं ॥३॥
तुका म्हणे तैसें मतवादीयांचें जिणें। दिसे लाजिरवाणें बोलतांचि ४॥

॥ २७७२ ॥

भगवें तरी श्वान सहज वेष त्याचा। तेथें अनुभवाचा काय पंथ ॥१॥
वाढवुनी जटा फिरे दाही दिशा। तरी जंबु वेषा सहज स्थिति २॥
कोरोनिया भूमी करिती मधीं वास। तरी उंदरास काय वाणी ॥३॥
तुका ह्मणे ऐसें कासया करावें। देहासी दंडावें वाउगेंचि ॥ ४ ॥

॥ २७७३ ॥

वाघाचो कालभूत दिसे वाघाऐसा। परी नाहीं दशा साच अंगीं॥१॥
बाहेरील रंग निवडी कसोटी। संघट्टणें भेटी आपेआप ॥ २ ॥
शिकविलें तैसें नाचावें माकड। न चले त्यापुढें युक्ति कांहीं ॥ ३ ॥
तुका म्हणे करी लटिक्याचा सांठा। फजित तो खोटा शीघ्र होय ४॥

॥ २७७४ ॥

आतीचें तें चढे प्रेम। पक्षी स्मरे राम राम १ ते काय गुण लागती येरां। कागा पिंजरा शोभेना२शिकविलें तें सुजात सोसी। मग त्यासी मोल चढे ३ तुका म्हणे वेषधारी। हिजड्या नारी न होती त्या ४॥

॥ २७७५ ॥

तांबियाचें नाणें न चले खऱ्या मोलें। जरी हिंडविलें देशोदेशीं १॥
करणीचें कांहीं न मने सज्जना। यावें लागे मना वृद्धांचिया ॥ २ ॥
हिरियासारिखा दिसे शिरगोळा। पारखी ते डोळां न पाहती ३ ॥
देऊनिया भिंग कामाविलें मोतीं। पारखिया हातीं घेतां नये ॥ ४ ॥
तुका म्हणे काय नटोनिया व्यर्थ। आपुलें हें चित्त आपणा ग्वाही ५

॥ २७७६ ॥

मुसळाचें धनु नव्हे हो सर्वथा। पाषाण पिळितां रस कैंचा ॥ १ ॥
वांझे बाळा जैसें दूध नाहीं स्तनीं। गारा त्या अधर्णी न सीजती २
नवखंड पृथ्वी पिके मृग जळें। डोंगर भेटे बळें असमानासी ॥ ३ ॥
नैश्वर देह तैसें तेव्हां होय ब्रह्म। तुका म्हणे श्रम करुनी काय ॥४॥

॥ २७७७ ॥

दुधाचे घागरीं मद्याचा हा बुंद। पडिलिया शुद्ध नव्हे मग ॥ १ ॥
तैसें खळां मुखें न करावें श्रवण। अहंकारें मन विटाळलें ॥ २ ॥

काय करावीं तीं बत्तीस लक्षणें । नाक नाहीं तेणें वाया गेलीं ॥३॥
तुका म्हणे अन्न जिरों नेदी माशी । आपुलिया जैशी संसर्गे ॥ ४ ॥

॥ २७७८ ॥

वरीवरी बोले युद्धाचिया गोष्टी । परसैन्या भेटी नाहीं झाली ॥ १ ॥
पराव्याचे भार पाहुनिया दृष्टी । कांपतसे पोटीं थरथरां ॥ २ ॥
मनाचा उदार रायाचा जुंझार । फिरंगीचा मार मारीतसे ॥ ३ ॥
धन्य त्याची माय धन्य त्याचा बाप । अंगीं अनुताप हरिनामें ॥४॥
तुका ह्मणे साधु बोले खर्गधार । खोचतें अंतर दुर्जनाचें ॥ ५ ॥

॥ २७७९ ॥

लटिकी ग्वाही सभेआंत । देतां पतित आगळा ॥ १ ॥ कुंभपाकीं १ वस्ती करूं । होय धुरु कुळेसी ॥ २ ॥ रजस्वला रुधिर स्रवे । तेंचि स्यावें तृषेसी ॥३॥ तुका ह्मणे जन्मा आला । काळ झाला कुळासी ४

॥ २७८० ॥

चोरें चोरातें करावा उपदेश । आपुला अभ्यास असेल तो ॥ १ ॥
शिंदळीच्या आंगणीं वेचितां पाउलें । होईल आपुलें तिच्या ऐसें २
तुका ह्मणे भितों पुढिलिया दत्ता । ह्मणऊनि चिंता उपजली ॥ ३ ॥

॥ २७८१ ॥

एकाचिये सोई कवित्वाचे बांधे । बांधिलिया साधे काय तेथें ॥ १ ॥
काय हातीं लागे भुसाचे कांडणीं । सत्यासी दाटणी करूनि ठेवी २
कवित्वाचे रूढी पायां पाडी जग । सुखवोनि मग नरका जाव ॥ ३ ॥
तुका म्हणे देव केल्याविण साहे । फजिती ते आहे लटिक्या अंगीं ४

॥ २७८२ ॥

कानीं धरी बोल बहुतांचीं मतें । चाट त्यापरतें आणीक नाहीं ॥१॥
पावेल गौरव वोढाळाचे परी । दंड पाठीवरी यमदूतांचे ॥ २ ॥
शब्दज्ञानी एक आपुलाले मतें । सांगतां वेदांत भिन्नभावें ॥ ३ ॥
तुका म्हणे एक भाव न धरिती । पडिली हे माती त्याचे तोंडीं ४ ॥

॥ २७८३ ॥

भजन या नासिलें हेंडि । दंभा लंडा आवडी ॥१॥ जेवीत ना आद्दता पाक । नासी ताक घुसळूनि ॥२॥ एकाएकीं इच्छी पाट । नेणे चाट कां जेवूं ॥३॥ तुका म्हणे मुलास्याचें । बंधन साचें सेवटीं ॥४॥

॥ २७८४ ॥

तरी कां वोळगणे । राजद्वारीं होती सुने ॥१॥ अंगीं दावुनि निष्कामता । पोकळ पोकळीं ते वृथा ॥२॥ कासया मोकळ । भोंवतें शिष्यांचें गाबाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे ढाळे । बाह्य रंग तें निराळें ॥ ४ ॥

॥ २७८५ ॥

इंद्रियांसी नेम नाहीं । मुखीं राम म्हणोनि काई ॥ १ ॥ जेवीं

मासीखवें अन्न । मुख नेदी तें भोजन ॥ २ ॥ कीर्तन करावें । तैसें करूनी दाखावें ॥ ३ ॥ हे तों अंगीं नाहीं चिन्हें । गाइलें वेश्येच्या ढव्यानें ॥ ४ ॥ तुका म्हणे रागा । संत शिवूं नेदिती अंगा ॥ ५ ॥

॥ २७८६ ॥

गुळें माखोनिया दगड ठेविला । वर दिसे भला लोकाचारीं ॥ १ ॥ अंतरीं विषयाचें लागलें पैं पिसें । बाहिरल्या वेषें भुलवी लोकां ॥ पेशिया दांभिका कैंची हरिसेवा । नेणोचि सद्भावा कोणेकाळीं ३ ॥ तुका म्हणे येणें कैसा होय संत । विटाळलें चित्त कामक्रोधें ॥ ४ ॥

॥ २८८७ ॥

नाहीं संतांशीं शरण । काय वाचोनी पुराण ॥ १ ॥ म्हणे विठ्ठलाचा दास । देखोनी परनारीस हांसे ॥ २ ॥ करिती विठोबाची भक्ति । दयाधर्म नाहीं चित्तीं ३ तेथें नाहीं माझा देव । व्यर्थ श्रमवी हा जीव ॥४॥ अंगीं नाहीं क्षमा दया । म्हणती भेट पंढरीराया ॥५॥ नाहीं धर्माची वासना । काय करोनी प्रदक्षिणा ६ ऐसें नव्हे भक्तिवर्म । तेथें नाहीं माझा राम ॥७॥ नये कृपा कांहीं केल्या । नये घाम जीव गेल्या ८ जैसी खड्गाची धार । विठ्ठल चरणीं तुका शूर ॥९॥

॥ २७८८ ॥

चिरगुटें घालूनि वाढविलें पोट । गऱ्हवार बोभाट जनामध्यें ॥ १ ॥ लटिकेंची डोहाळे दाखवी प्रकार । दुध स्तनीं पोर पोटीं नाहीं २ ॥ तुका म्हणे अंतीं वांजचि ते खरी । फजिती दुसरी जनामध्यें ३ ॥

॥ २७८९ ॥

वांझेनें दाविलें गऱ्हवार लक्षण । चिरगुटें घालून वाथयाला ॥ १ ॥ तेवी शब्दज्ञानी करिती चावटी । ज्ञान पोटासाठीं विकूनिया ॥ २ ॥ बोलाचिच कढी बोलाचाचि भात । जेवुनिया तृप्त कोण झाला ३ ॥ कागदीं लिहितां नामाची साकर । चाटितां मधुर गोडी नेदी ॥ ४ ॥ तुका म्हणे जळो जळो ते महंती । नाहीं लाज चित्तीं आठवण ॥ ५ ॥

॥ २७९० ॥

व्याल्याविण करी शोभनतांतडी । चार ते गधडी करीतसे ॥ १ ॥ कासया पाल्हाळ आणिकांचे देखीं । सांगतां नव्हे सुखी साखरेसि २ कुंथाच्या ढेकरें न देवेल पुष्टी । रूप दावी कष्टी मळिण वरी ॥ ३ ॥ तुका म्हणे अरे वाचाळ हो ऐका । अनुभवेंविण नका वाव वेऊं ४॥

॥ २७९१ ॥

तरलों म्हणुनी धरिला ताठा । त्यासी चळ झाला फांटा ॥१॥ वायाविण तुटे दोड । मान सुख इच्छी भांड २ ग्वाहीविण मात । स्थापी आपुली सतत ३ तुका म्हणे ऐसीं किर्ती । नरका गेलीं अधोगतीं ॥ ४ ॥

॥ २७९२ ॥

अंधळें तें सांगे सांगितल्या खुणा । अनुभव देखणा प्रगट त्या ॥१॥
नांदणूक सांगे वडिलाचें बळ । कैसा तो दुर्बळ सुख पावे ॥ २ ॥
तुका ह्मणे नांदों आपल्या प्रतापें । तयाची लोकांपें स्तुती सांगों ३

॥ २७९३ ॥

स्वप्नींच्या व्यवहारा काळांतर लेखा । जागृतीसी रुका गांठी नाहीं१
तैंवीं शब्दज्ञानें करिती चावटी । ज्ञान पोटासाठीं विकूं नये ॥ २ ॥
बोलाचीच कढी बोलाचाचि भात । जेवूनिया तृप्त कोण झाला ३॥
कागदीं लिहिली नांवाची साकर । चाटितां मधुर केवीं लागे ॥४॥
तुका ह्मणे जळो जळो त्याचें ज्ञान । यमपुरी कोण दंड साहे ॥ ५ ॥

॥ २७९४ ॥

जाणे त्याचें वर्म नेणें त्याचें कर्म । केल्याविण धर्म नेणवती ॥१॥
मैथुनाचें सुख सांगितल्या शून्य । अनुभवाविण कळूं नये ॥ २ ॥
तुका ह्मणे जळो शाब्दिक हें ज्ञान । विठोबाची खूण विरळा जाणे३

॥ २७९५ ॥

जपाचें निमित्त झोंपेचा पसरु । देहाचा विसरू पाडुनिया ॥ १ ॥
ऐसें तें भजन अमंगळवाणी । सोंगसंपादणी बहुरुप्याची ॥ २ ॥
सेवेसी विकिलें लोभाचिया आसे । तया कोठें असे उरला देव ३
तुका ह्मणे मानदंभ जया चित्तीं । तयाची फजीती करूं आम्ही ४॥

॥ २७९६ ॥

माझी पाठ करा कवी । उट लावी दारोदार ॥१॥ तंव तया पारखी सिव । लाजे ठाव सांडितां ॥२॥ उष्टावळी करूनि जमा । कुंथुनि प्रेमा आणितसे ॥३॥ तुका ह्मणे बाहेरमुदी । आहाच गोविंदीं न सरती ४॥

॥ २७९७ ॥

भाव नाहीं काय मुद्रा वाणी । बैसे बगळा निश्चळ ध्यानीं ॥ १ ॥
न मनी नाम न मनी त्यासी । वाचाळ शब्द पिटी भासी ॥ २ ॥
नाहीं चाड देवाची कांहीं । छळणें टोंके तस्करघाई ॥ ३ ॥
तुका ह्मणे त्याचा संग । नको शब्द स्पर्शअंग ॥ ४ ॥

॥ २७९८ ॥

मोल्लें घातलें रडाया । नाहीं असूं आणि माया ॥१॥ तैसा भक्तिवाद काय । रंगवेगडीचा न्याय ॥२॥ वेठी धरिल्या दावी भाव । मागें पळायाचा पाव ॥३॥ काजव्याच्या ज्योती । तुका ह्मणे नलगे वाती ४

॥ २७९९ ॥

उभ्या बाजारांत कथा । हे तों नावडे पंढरिनाथा ॥१॥ अवघें पोटासाठीं ढोंग । तेथें कैचा पांडुरंग ॥२॥ लावी अनुसंधान । कांहीं देईल ह्मणऊन ॥३॥ काय केलें रांडलेंका । तुला राजी नाहीं तुका ॥४॥

॥ २८०० ॥

वरीवरी बोला रस । कथी ज्ञान माजी फोस ॥ १ ॥ ऐसे लटिके जे ठक । तयां इह ना परलोक ॥ २ ॥ परिस एक सांगे । अंगा धुळी ही न लगे ॥ ३ ॥ तुका ह्मणे हाडें । कुतऱ्या लाविलें झगडें ॥ ४ ॥

॥ २८०१ ॥

गांठोळीस धन भाकावी करुणा । दावूनि सज्जना कींव पीडी ॥ १ ॥ नीठेळाची भक्ति कुचराचें बळ । कोरडें वोंगळ मार खाय ॥ २ ॥ सांडोव्यासी घालीती देवाची करंडी । विल्हाळ त्या धोंडी पूजा दावी तुका ह्मणे ऐसे माकडाचे छंद । अवघे धंदधंद सिंदळीचे ॥ ४ ॥

॥ २८०२ ॥

मोल देऊनिया सांठवावे दोष । नटाचे ते वेश पाहोनिया ॥ १ ॥ हरिदासां मुखें हरिकथाकीर्तन । तेथें पुण्यापुण्य विशेषता ॥ २ ॥ हरितील वस्त्रें गोपिकांच्या वेशें । पाप त्या सरिसें मात्रागमन ३॥ तुका ह्मणे पाहा ऐसें झालें जन । सेवाभक्तिहीन रसीं गोडी ॥ ४ ॥

॥ २८०३ ॥

उष्टया पत्रावळी करूनिया गोळा । दाखविती कळा कवित्वाची १॥ ऐसे जे पातकी ते नरकीं पचती । जोंवरी भ्रमती चंद्रसूर्य ॥ २ ॥ तुका ह्मणे एका नारायणा ध्यायी । वरकडा वाहीं शोक असे ३ ॥

॥ २८०४ ॥

पुण्यविकरा तें मातेचें गमन । भाडी ऐसें धन विटाळ तो ॥ १ ॥ आत्महत्यार तो विषयांचा लोभी । ह्मणावें तें नाभी करवी दंड २॥ नागवला अल्प लोभाचिये साटीं । घेऊनि कांचवटि परिस दिला३ तुका ह्मणे हात झाडिले परत्रीं । श्रम तोचि श्रोत्रीं वेठी केली ॥४॥

॥ २८०५ ॥

पशु ऐसे होती ज्ञानी । चर्वणीं या विषयांची ॥ १ ॥ ठेवूनिया लोभीं लोभ । झाला क्षोभ आत्मत्वीं ॥२॥ केला आणिकां वाढी पाक । खाणें ताक मूर्खासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे मोठा घात । वाताहात हा देह ॥ ४ ॥

॥ २८०६ ॥

आशाबद्ध वक्ता । भय श्रोतियाच्यीं चित्ता ॥१॥ गातो नेंही नाहीं ठावें । तोंड वासी कांहीं द्यावें ॥२॥ झालें लोभाचें मांजर । भीक मागे दारोदार ॥ ३ ॥ भयता लोभी मन । वाया गेलें तें भजन ॥ ४ ॥ बहिरे मुके एके ठायीं । तैसें झालें तया दोही ॥ ५ ॥ माप आणि गोणी । तुका ह्मणे रितीं दोन्ही ॥ ६ ॥

॥ २८०७ ॥

नाइकावे कानीं तयाचे ते बोल । भक्तीविण फोल ज्ञान सांगे ॥१॥ वाखाणी अद्वैत भक्तिभावेंविण । दुःख पावे सीण श्रोता वक्ता ॥२॥ अहं ब्रह्म म्हणोनि पाळीतसे पिंडा । नये बोलों भांडा तयासवें ३ ॥

वेदबाह्य लंड बोले तो पाषांड । त्याचें काळें तोंड संतांमध्यें ॥ ४ ॥ तुका ह्मणे खंडी देवभक्तपण । वरिष्ठ त्याह्नूनि श्वपच तो ॥ ५ ॥

॥ २८०८ ॥

पंडित ह्मणतां थोर सुख । परि तो पाहतां अवघा मूर्ख १ काय करावें घोकिलें । वेदपठण वाया गेलें २ वेदीं सांगितलें तें न करी । सम ब्रह्म नेणें दुराचारी ३ तुका देखे जीवीं शिव । हाच तर्थींचा अनुभव ॥४॥

॥ २८०९ ॥

जैसें दावी तैसा राहे । तरि कां देव दुरी आहे ॥ १ ॥ दुःख पावायाचें मूळ । रहणी ठाव नाहीं ताळ ॥ २ ॥ माळामुद्रांवरी । कैंचा सोंगें जोडे हरि ॥३॥ तुका ह्मणे देखें । ऐसे परीचीं बहुतेकें ॥ ४ ॥

॥ २८१० ॥

वसोनि थिल्लरीं । बेडुक सागरा धिक्कारी ॥ १ ॥ नाहीं देखिला ना ठावा । तोंड पिटी करी हांवा ॥२॥ फुगतें काउळें । ह्मणे मी राजहंसा आगळें ॥ ३ ॥ गजाह्नूनि खर । ह्मणे चांगला मी फार ॥ ४ ॥ मुलाम्याचें नाणें । तुका म्हणे नव्हे सोनें ॥ ५ ॥

॥ २८११ ॥

कोरड्या गोष्टी चटक्या बोल । शिकल्या सांगे नाहीं ओल ॥१॥ कोण यांचें मना आणी । ऐकों कानीं नाइकोनि २ घरोघरीं सांगती ज्ञान । भूसं सिणें कांडिती ३ तुका म्हणे आपुलया मति । काय रितीं पोकळ४

॥ २८१२ ॥

निंदा स्तुती करवी पोट । सोंग दाखवी बोभाट ॥ १ ॥ जटा राख विटंबना । धीर नाहीं क्षमा मना ॥ २ ॥ शृंगारिलें मढें । जीवेवीण जैसें कुडें ॥ ३ ॥ तुका ह्मणे रागें । भलतें चावळे वाउगें ॥ ४ ॥

॥ २८१३ ॥

भक्त ह्मणऊनि वंचावें जीवें । तेणें शेण खावें काशासाठीं ॥ १ ॥ नासिले अडबंद कौपिन ते माळा । अडचण राउळामाजी केली २॥ अंगीकारिले सेवे घडे अंतराय । तया झाला न्याय खापराचा ३ ॥ तुका ह्मणे कोठें तगों येती घाणीं । आहाचहीं मनीं अधीरता ॥४॥

॥ २८१४ ॥

कथे उभा अंग राखेल जो कोणी । ऐसा कोण गणी तया पापा १॥ येथें तो पातकी न येतांच भला । रणीं कुचराला काय चाले ॥२॥ कथे बैसोनी आणीक चर्चा । धिग त्याची वाचा कुंभपाक ॥ ३ ॥ तुका ह्मणे पैलपैल ते थडीचे । बुडतील साच मध्यमार्गीं ॥ ४ ॥

॥ २८१५ ॥

नावडे ज्या कथा उठोनिया जाती । ते यमा फावती बरे बोजा १॥ तो असे जवळी गोचिडाच्या न्यायें । देशत्यागें ठाय तया दुरी २॥

नव्हे भला कोणी नावडे दुसरा । पाहुणा किंकरा यमा होय ॥ ३॥ तुका ह्मणे तया करावें तें काई । पाषाण कां नाहीं जळामध्यें ॥४॥

॥ २८१६ ॥

जवळी नाहीं चित्त । काय मांडियेलें प्रेत ॥१॥ कैसा पाहे चर्मदृष्टी दीप स्नेहाच्या शेवटीं ॥ २ ॥ कांतेलेंसें श्वान । तैसें दिशा हिंडे मन ॥ ३ ॥ त्याचे कानीं हाणे । कोण बोंब तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ २८१७ ॥

काय देवापाशीं उणें । हिंडे दारोदारीं सुनें ॥ १ ॥ करी अक्षरांची आटी । एके कवडीच साटीं ॥ २ ॥ निंदी कोणा स्तवी । चिंतातुर सदा जीवीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे भांड । जळो जळो त्याचें तोंड ॥ ४ ॥

॥ २८१८ ॥

ब्राह्मण तो नव्हे ऐसी ज्याची बुद्धि । पाहा श्रुतीमधीं विचारूनि ॥१॥ जयासी नावडे हरिनामकीर्तन । आणीक नर्त्तन वैष्णवांचें ॥ २ ॥ सत्य त्याचे वेळे घडला व्यभिचार । मातेशीं वेव्हार अंत्यजाचा ३॥ तुका ह्मणे येथें मानी आनसारिखें । तात्काळ तो मुखें कुष्ठ होय ४॥

॥ २८१९ ॥

आमचे गोसावी अयाचितवृत्ति । करवी शिष्याहातीं उपदेश ॥१॥ दगडाची नाव आधींच ते जड । ते काय दगड तारूं जाणे ॥ २ ॥ तुका ह्मणे वेष विटंबिला त्यांनीं । सोंगसंपादणी करिती वरी ॥३॥

॥ २८२० ॥

भजन घाली भोगावरी । अकर्तव्य मनीं धरी ॥१॥ धिग त्याचें साधुपण । विटाळूनि वर्ते मन ॥२॥ नाहीं वैराग्याचा लेश । अर्थचाड जीवें आस ॥ ३ ॥ हें ना तेंसें झालें । तुका ह्मणे वाया गेलें ॥ ४ ॥

॥ २८२१ ॥

घरोघरीं बहु झाले कवि । नेणे प्रसादाची चवी ॥ १ ॥ लंडा भूषणांची चाड । पुढें न विचारी नाड ॥ २ ॥ काढावें आइतें । तेंचि जोडावें स्वहितें ॥३॥ तुका ह्मणे कळे । अहाच झांकतील डोळे ॥४॥

॥ २८२२ ॥

कवीश्वरांचा तो आम्हांसी विटाळ । प्रसाद बोंगळ चिवडिती १॥ दंभाचे आवडी बहिरट अंधळे । सेवटासि काळें होईल तोंड २ ॥ सोन्यासेजारीं तो लाखेची जतन । संतत ते गुण जैसेतैसे ॥ ३ ॥ सेव्यसेवकता न पडतां ठावी । तुका ह्मणे गोवी पावती हीं ॥ ४ ॥

॥ २८२३ ॥

जळो प्रेमा तैसा रंग । जाय भुलोनि पतंग १ सासूसाटीं रडे सून । भाव अंतरींचा भिन्न २ मैंद मुखींचा कोंवळा । भाव अंतरीं निराळा ३ जैसी वृंदावनकांती । उत्तम धरूं नये हातीं ॥ ४ ॥ बक ध्यान

धरी । सोंग करूनि मासे मारी ॥ ५ ॥ तुका ह्मणे सर्प डोले । तैसा कथेमाजी खुले ॥ ६ ॥

॥ २८२४ ॥

संध्या करितोसि केशवाच्या नांवें । आरंभीं तें ठावें नाहीं कैसें १॥ कितीया सांगावें करूनि फजित । खळ नेणें हित जवळी तें ॥२॥ माजल्या न कळे उचित तें काय । न घ्यावें तें खाय घ्यावें सांडी३॥ तुका ह्मणे घेती भिंती सवें डोकें । वावसी तें एकें अंधारलें ॥ ४ ॥

॥ २८२५ ॥

अडचणीचें दार । बाहेर माजी पैस फार १ काय करावें तें मौन्य । दाही दिशा हिंडे मन २ बाहेर दावी वेश । माजी वासनेचे लेश ३॥ नाहीं इंद्रिया दमन । काय मांडिला दुकान ४ सारविलें निकें । वरि माजी अवघें पिकें ५ तुका ह्मणे अंतीं । कांहीं नलगेचि हातीं ॥ ६ ॥

॥ २८२६ ॥

काय सर्प खातो अन्न । काय ध्यान बगाचें ॥ १ ॥ अंतरींची बुद्धि खोटी । भरलें पोटीं वाईट ॥२॥ काय उंदीर नाहीं धांवी । राख लावी गाढव ॥ ३ ॥ तुका म्हणे सुसर जळीं । काउळीं कां न न्हाती ॥४॥

॥ २८२७ ॥

कांय धोविलें कातडें । काळकूट भीतरि कुडें ॥ १ ॥ उगा राहें लोक भांडा । चाळविल्या पोरें रांडा ॥ २ ॥ घेसी बुंथी पानवथां। उगाच हालविसी माथा ॥ ३ ॥ लावूनि बैसे टाळी । मन इंद्रियें मोकळीं ॥ ४ ॥ हालवीत बैस माळा । विषयजप वेळोवेळां ॥ ५ ॥ तुका म्हणे हा व्यापार । नाम विठोबाचें सार ॥ ६ ॥

॥ २८२८ ॥

काय काशी करिती गंगा । भीतरीं चांगा नाहीं तो १ अधर्णी कुचर बाहेर तैसा । नये रसा पाकासि ॥२॥ काय टिळे करिती माळा । भाव खळा नाहीं त्या ३ तुका म्हणे प्रेमेंविण । बोले भुंके अवघा शीण ४ ॥

॥ २८२९ ॥

काय नाहीं लवत झाडें । विसरे वेडें देहभाव ॥ १ ॥ जया न फळे उपदेश । धस पेसे त्या नांवें ॥ २ ॥ काय नाहीं असत जड । दगड तो अबोलणा ॥३॥ तुका ह्मणे कुचर दाणा । तैसा ह्मणा डेंगे हा ४

॥ २८३० ॥

नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ॥ १ ॥ तैसी चित्त-शुद्धि नाहीं । तेथें बोध करील काई ॥२॥ वृक्ष न धरि पुष्पफळ । काय करील वसंत काळ ३ वांजे न होती लेकुरें । काय कीजे त्या भ्रतारें ॥ ४ ॥ नपुंसका पुरुषासी । काय करील बाईल त्यासी

॥ ५ ॥ प्राण गेलिया शरीर । काय करील वेव्हार ॥ ६ ॥ तुका ह्मणे जीवनेंविण । पीक नव्हे नव्हे जाण ॥ ७ ॥

॥ २८३१ ॥

काय दरा करील वन । समाधान नाहीं जंव ॥ १ ॥ तरी काय तेथें असतीं थोडीं । काय जोडी तयांसी ॥ २ ॥ रिघतां धांवा पेंवामधीं । जोडे सिद्धि ते ठायीं ॥ ३ ॥ काय भस्म करील राख । अंतर पाक नाहीं तों ॥ ४ ॥ वर्णाश्रमाचे धर्म । जाती श्रम जालिया ॥ ५ ॥ तुका म्हणे सोंग पाश । निरसे आस तें हित ॥ ६ ॥

॥ २८३२ ॥

भोरप्यानें सोंग पालटिलें वरी । बकध्यान करी मत्स्या जैसें ॥ १ ॥
टिळे माळा मैंद मुद्रा लावी अंगीं । देखों नेदी जगीं फासे जैसे २॥
ढीवर या मत्स्या चारा घाली जैसा । भीतरील फांसा कळों नेदी३
खाटिक हा स्नेहवादें पशु पाळी । कापावया नळी तयासाठीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे तैसा भला मी लोकांत । परी तूं कृपावंत पांडुरंगा ५ ॥

॥ २८३३ ॥

मांडे पुऱ्या मुखें सांगे जाणे मात । तोंडीं लाळ हात चोळी रिते १॥
ऐसियाच्या गोष्टी फिक्या मिठेंविण । रुचि नेदी अन्न चवी नाहीं२
बोलों जाणे अंगीं नाहीं शूरपण । काय तें वचन जाळावें तें ॥ ३ ॥
तुका ह्मणे बहु तोंडें जे वाचाळ तगे तोंच मूळ लटिक्याचें ॥ ४ ॥

॥ २८३४ ॥

आवडीच्या मतें करितो भजन । भोग नारायणें म्हणती केला ॥१॥
अवघा देव म्हणे वेगळें तें काय । अर्थासाठीं डोय फोडूं पाहे॥२॥
लाजे कमंडलु धरितां भोपळा । आणीक थीगळा प्रावरण ॥ ३ ॥
शाला गडवे धातुद्रव्यइच्छा चित्तीं । नैश्वर बोलती अवघें मुखें ४
तुका ह्मणे तया देवा नाहीं भेटी । ऐसे कल्पकोटि जन्म घेतां ॥५॥

॥ २८३५ ॥

भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें । ऐसियासी नारायणें । उपेक्षिजे सर्वथा ॥ १ ॥ देवा पायीं नाहीं भाव । भक्ति वरी वरी वाव । समर्पिला नाहीं जिव । जाणावा हा व्यभिचार २ जगा घालावें सांकडें । दीन होउनि बापुडें । हेंचि अभाग्य रोकडें । मूळ आणि अविश्वास ॥ ३ ॥ काय न करी विश्वंभर । सत्य करितां निर्धार । तुका ह्मणे सार । दृढ पाय धरावे ॥ ४ ॥

॥ २८३६ ॥

आशाबद्ध जन । काय जाणे नारायण ॥ १ ॥ करी [illegible] सेवा । पाहे आवडीचा हेवा ॥ २ ॥ भ्रमलें चावळे । तैसें उचित न कळे ॥ ३ ॥ तुका ह्मणे विषें । अन्न नाशियेलें जैसें ॥ ४ ॥

॥ २८३७ ॥

आशाबद्ध वक्ता । भय श्रोतयाच्या चित्ता ॥ १ ॥ वाया गेलें तें भजन । उभयतां लोभी मन ॥२॥ बहिरे मुके एके ठायीं । तैसें झालें तया दोहीं ॥३॥ माप तैसी गोणी । तुका ह्मणे रितीं दोन्ही ॥ ४ ॥

॥ २८३८ ॥

वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती । जाणा त्या निश्चिती देव नाहीं १ भाडेकरी वाहे पाठीवरी भार । अंतरींचें सार लाभ नाहीं ॥ २ ॥ देवपूजेवरी ठेवूनिया मन । पाषाणा पाषाण पूजी लोभें ॥ ३ ॥ तुका ह्मणे फळ चिंतिती आदरें । लाघव हे चार शिंदळीचे ॥ ४ ॥

॥ २८३९ ॥

तीळ जाळिले तांदुळ । काम क्रोध तैसेचि खळ ॥ १ ॥ कारे सिणलासी वाउगा । न भजतां पांडुरंगा ॥ २ ॥ मानदंभासाठीं अक्षरांची आटी ॥ ३ ॥ तप करूनि तीर्थाटन । वाढवि[illegible] मान ॥ ४ ॥ वांटिलें तें धन । केली अहंता जतन [illegible] चुकलें वर्म । केला अवघाचि अधर्म ॥

॥ २८४[illegible]

झालासी पंडित पुराण सांगसी[illegible]

गाढवभरी पोथ्या उलथि[illegible]

तुका कुणबियाचा नेणे[illegible]

नेत्र झांकोनिया [illegible]

उपदेश मंत्र जाणा [illegible]

[illegible] काहीं करि[illegible]

[illegible] तुका [illegible] बीज मंत्र एक । भवासघुतारक रामकृष्ण ॥ ४ ॥

॥ २८४२ ॥

वरतें करोनिया तोंड । हाका मारितो प्रचंड ॥ १ ॥ राग आळवितो नाना । गातो काय तें कळेना ॥२॥ आशा धरोनि मनीं । कांहीं देईल ह्मणऊनि ॥ ३ ॥ पोटा एका साठीं । तुका ह्मणे झाले कष्टी ॥ ४ ॥

॥ २८४३ ॥

हाका मारी ज्याच्या नांवें । त्याचें गांवचि नाहीं ठावें १ काय गातो हें कळेना । राग आळवितो नाना ॥२॥ आशा करूनिया मनीं । कांहीं देईल ह्मणउनी ३ वितीभरी पोटासाठीं । तुका ह्मणे पडिली तुटी॥४॥

॥ २८४४ ॥

कुशळ गुंतले निषेधा । वादी प्रवर्तले वादा १ कैसी ठकलीं बापुडीं । दंभविषयांचे सांकडीं २ भूस उपणुनि केलें काय । हारपले दोन्ही ठाय ३ तुका ह्मणे लागे हातां । काय मथिलें घुसळितां ४

॥ २८४५ ॥

काळतोंडा सुना । भलतें चोरूनि करी जना १ धिग त्याचें साधुपण । विटाळुनि वर्ते मन ॥ २ ॥ मंत्र ऐसे घोकी । वश व्हावें जेणें लोकीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे थित । नागवला नव्हे हित ॥ ४ ॥

॥ २८४६ ॥

विचार नाहीं नर खर तो तैसा । वाहे ज्ञान पाठी भार लगड तैसा १ वादावाद करणें त्यासी तोंचि वरी । गुखाडीची चाड सरे तोंचि बाहेरी ॥ २ ॥ सौभाग्यसंपन्न हो कां वृद्ध प्रतिष्ठा । छी करूनि सांडी पायां लागली ते विष्टा ॥ ३ ॥ नाहीं याति कूळ फांसे ओढी तयासी । तुका ह्मणे काय मुद्रासोंग जाळिसी ॥ ४ ॥

॥ २८४७ ॥

एक ह्मणती आह्मी देवची पैं झालों । ऐसे नका बोलों पडाल [illegible]नीं ॥ १ ॥ एक ह्मणती आह्मी देवाचीं पैं रूपें । तरी तुमचिया [illegible] जन्म ॥ २ ॥ देवें उचलिली स्वकरें मेदिनी । तुमचेनि [illegible] ॥ ३ ॥ देवें मारियेले दैत्य दानव मोठे । तुमचेनी [illegible] ॥ ४ ॥ [illegible]या विठोबाचें पद जो अभिलाशी । पातका[illegible] ॥

॥ [illegible] ॥

स्वप्नींचें धन चित्रींच्या [illegible] । [illegible] आणा बांटिती पैं १ ॥ तैसें शब्दज्ञान करिती चाव[illegible] [illegible]निया ॥ २ ॥ बोलाचीच कढी बोलाचाचि भात [illegible] ३॥ कागदीं लिहीतां नामाची साखर । चाखतां [illegible] ॥ तुका ह्मणे जळो तैसें ज्ञानबंड । यमपुरीं दंड कठि[illegible] ॥

॥ २८४९ ॥

मुंगी होउनि साकर खावी । निजवस्तूची भेटी घ्यावी ॥ १ ॥ वाळवंटी साकर पडे । गज येउनि काय रडे ॥ २ ॥ झाला हरिदास गोसांवी । अवघी मायिक क्रिया दावी ३ पाठ पाठांतरिक विद्या । जनरंजवणी संध्या ॥ ४ ॥ प्रेम नसतां अंगा आणी । दृढ भाव नाहीं मनीं ॥ ५ ॥ ब्रह्मज्ञान वाचे बोले । करणी पाहातां न निवती डोळे ६ मिथ्या भगल वाढविती । आपुली आपण पूजा घेती ॥ ७ ॥ तुका ह्मणे धाकुटें व्हावें । जिनवस्तूसी मागुनि घ्यावें ॥ ८ ॥

॥ २८५० ॥

गासी तरि एक विठ्ठलाचे गाई । नाहीं तरि ठायीं राहें उगा ॥ १ ॥ अद्वैतीं तों नाहीं बोलाचें कारण । जाणिवेचा सीण करिसी वाया २ तुका ह्मणे किती करावी फजिती । लाज नाहीं चित्तीं निलाजिरा ३

॥ २८५१ ॥

मुकें होतां तुझ्या पदरींचें जातें। काय तें भोगितें मीमीपण ॥ १ ॥
आपुलिये घरीं मैंद होउनी बसे। कवण कवणासी बोलों नका २
तुका ह्मणे तुम्हां सांगतों मी खूण। देवासी तें ध्यान लावुनि बसा३

॥ २८५२ ॥

मस्तकीं सहावें टांकियासी जाण। तेव्हां देवपण भोगावें गा ॥ १ ॥
आपुलिये स्तुती निंदा अथवा मान। टाकावा थुंकोन पैलीकडे ॥२॥
सद्गुरुसेवन तेंचि अमृतपान। करूनी प्राशन बैसावें गा ॥ ३ ॥
आपुल्या मस्तकीं पडोत डोंगर। सुखाचें माहेर टाकूं नये ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां सांगूं तुला किती। जिण्याची फजिती करूं नये ५॥

॥ २८५३ ॥

देव तीर्थी येर दिसे जया ओस। तोचि तया दोष जाणतिया ॥१॥
तया बरें फावे देवा चुकाविता। संचिताची सत्ता अंतरा[illegible] ॥ [illegible]
शुद्धाशुद्ध ठाव पापपुण्य बीज। पाववील तुजे [illegible]
तुका ह्मणे विश्वंभरा ऐसें वर्म। चुकलिया [illegible]

॥ २८५४ ॥

जाऊनियां तीर्थी काय तुवां केलें। [illegible] ॥ १ ॥
अंतरींचें शुद्ध कासयानें झालें। [illegible] आपणया ॥ २ ॥
वृंदावन फळ घोळिलें [illegible]। [illegible] धारा मोडोचिना ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं [illegible]। [illegible]री कासया फुंदा तुम्ही ४॥

॥ २८५५ ॥

[illegible] काय सांगशी कहाणी ॥१॥ ठावा नाहीं पंढ-
रीराय। [illegible] अवघेंचि वाव ॥२॥ मानिताहे कोण। तुझें [illegible]
[illegible] ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा। जाणपण एक सवा ॥ ४ ॥

॥ २८५६ ॥

[illegible]य तीं करावीं मोलाचीं माकडें। नाचताती पुढें संसाराच्या ॥१॥
झाडा देते वेळे विचकिती दांत। घेती यमदूत दंडवरी ॥ २ ॥
हात दांत कान हलविती मान। दाखविती हे जन मानावया ३ ॥
तुका ह्मणे किती झालीं हीं फजित। मागें नाहीं नीत भारवाही ४॥

॥ २८५७ ॥

चोर टेंकाचे निघाले चोरी। आपलें तैसें पारखे घरीं ॥ १ ॥
नाहीं नफा नागवे आपण। गमाविले कान हात पाय ॥ २ ॥
बुद्धिहीन नये कांहींचि कारणा। तयासवें जाणा तेंचि सुख ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं ठाउकें वर्म। तयासी तें कर्म बोडवलें ॥ ४ ॥

॥ २८५८ ॥

सोंगें छंदें कांहीं। देव जोडे ऐसें नाहीं ॥१॥ सारा अवघें गाबाळ।

डोळ्या आडील पडळ ॥ २ ॥ शुद्ध भावाविण । जो जो केलातो तो सीण ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळे । परि होताती अंधळे ॥ ४ ॥

॥ २८५९ ॥

असंत लक्षण भूतांचा मत्सर । मनास निष्ठुर अतिवादी ॥ १ ॥
अंतरींचा रंग उमटे बाहेरी । बोलाखियापरी आपेंआप ॥ २ ॥
संत ते समय ओळखती वेळ । संतुष्ट निर्मळ चित्त सदा ॥ ३ ॥
तुका ह्मणे हित उचित अनुचित । मज लागे नित आचरावें ॥ ४ ॥

॥ २८६० ॥

बोली ओले पडे तें पीक उत्तम । उथळाचा श्रम वाया जाय ॥ १ ॥
लटिक्याचे आम्ही नव्हों सांटेकरी । थीतें घाली भरी पदरीचें २ ॥
कोणा इहलोकीं पाहिजे पसारा । दंभ पोट भरायाचे चाडे ॥ ३ ॥
तुका ह्मणे कसीं अगीं जें उतरे । तेंचि येथें सरे जाती शुद्ध ॥ ४ ॥

॥ २८६१ ॥

[illegible] सोंग संपादणें । नव्हे हें करणें स्वहिताचें ॥ १ ॥
[illegible] रंगें । हित तेंचि वेगें करूनि घेईं २ ॥
[illegible] नारायण । सोंग संपादून जैसा तैसा ॥ ३ ॥
पाषाणाचे [illegible] देव । आपुलिका तारी भाव परि तो तैसा ४ ॥
कनक झाड म्हूण वंदियेलें माथां । परि तेंही [illegible] न मिळे माझी ५
तुका म्हणे त्याचा भाव तारी त्यास । [illegible] तोचि पावे ६

॥ २७६२ ॥

नव्हती हे उसणे बोल । आहाच फोल [illegible] ॥ १ ॥ [illegible] तो वर्‍कीरी । नाहीं दुरी वेगळा ॥ २ ॥ पाहिजे तें [illegible] कुची काशाची ३ तुका म्हणे लाजे आड । त्याची चा [illegible]

॥ २८६३ ॥

नये नेत्रीं जळ । नाहीं अंतरीं कळवळ ॥ १ ॥ तों हे चाव[illegible] बोल । जग रंजवणें फोल ॥ २ ॥ न फळे उत्तर । नाहीं स्वामी जो सादर ॥ ३ ॥ तुका ह्मणे भेटी । जंव नाहीं दृष्टादृष्टी ॥ ४ ॥

॥ २८६४ ॥

आवडे सकळां मिष्टान्न । रोग्या विषा त्यासमान ॥ १ ॥ दर्पण नावडे तया एका । ठाव नाहीं ज्याच्या नाका ॥ २ ॥ तुका म्हणे तैशा खळा । उपदेशाचा कांटाळा ॥ ३ ॥

॥ २८६५ ॥

सेकीं हें ना तेंसें झालें । बोलणें तितुकें वाया गेलें १ स्वयें आपणाचि रितां । रडे पुढिलांच्या हिता ॥ २ ॥ सुखसागरीं नेघे वस्ती । अंगीं ज्ञानपणाची मस्ती ३ तुका ह्मणे गाढव लेखा । जेथें भेटेल तेथें ठोका ४

॥ २८६६ ॥

तोचि लटिक्यामाजी भला । ह्मणे देव ऱ्यां देखीला ॥ १ ॥ ऐशि-याच्यां उपदेशें । भवबंधन कैसें नासे ॥२॥ बुडवी आपणासारिसे । अभिमानें आणिकांस ॥ ३ ॥ आणिक नाहीं जोडा । देव ह्मणवितां या मूढा ॥४॥ आणिकांचे न मनी साचे । तुका ह्मणे या श्रेष्ठाचें ५

॥ २८६७ ॥

पाहों कलिचें महिमान । असत्यासी रिझलें जन । पापा देती अनुमोदन । करिती हेळण संतांचें ॥१॥ ऐसें अधर्मांचें बळ । लोक झकविलें सकळ । केलें धर्मांचें निर्मूळ । प्रळयकाळ आरंभला ॥ २ ॥ थोर या युगाचें आश्चर्य । ब्रह्मकर्म उत्तम सार । सांडूनिया द्विजवर । दावलपीर स्मरताती ॥ ३ ॥ ऐसे यथार्थाचे अनर्थ । झाला बुडाला परमार्थ । नाहीं झाली ऐसी नीत । आहा भूत पातलें ॥ ४ ॥ शांति क्षमा दया । भावभक्ति सत्क्रिया । ठाव नाहीं सांगावया । सत्त्वधैर्य भंगिलें ॥ ५ ॥ राहिले वर्णाश्रमधर्म । अन्योन्य विचरती कर्म । ह्मणवितां रामनाम । [illegible] महा मानिती ॥ ६ ॥ थेर भोरपाचेविशीं । धांवती भूतें [illegible] तैसीं । कथा पुराण ह्मणतां सिशीं । तिडिक [illegible] नरकभोज ॥ ७ ॥ विषयलोभासाठीं । सर्वार्थेंसीं [illegible] । [illegible]रमार्थी [illegible]ठ मुठी । मागतां उठती सुनींसी ॥ ८ ॥ [illegible] अनामिक । तयातें मानिती आव[illegible] । [illegible] वेदपाठक । सात्विक शास्त्रज्ञ संपन्न ॥ ९ ॥ [illegible] । सेवा घेती सेवका ऐसी । सुनांचिया दासी । [illegible] आदण्या ॥ १० ॥ खोटें झालें आली विवसी । केली [illegible] नाहींसी । भार्या भ्रतारेंसी रंक तैसीं मानिती ॥११॥ नमस्कारावया हरिदासां । लाजती धरिती कांहीं गर्वसा । पोटासाठीं खौसा । वंदिती म्लिंछाच्या ॥ १२ ॥ बहुत पाप झालें उचंबळ । उत्तम न ह्मणती चांडाळ । अभक्ष भक्षिती विटाळ । कोणी न धरी कोणाचा ॥ १३ ॥ कैसें झालें नष्ट वर्तमान । एकादशीस खाती अन्न । विडे घेऊनि ब्राह्मण । आविंदवाणी वदताती ॥१४॥ कामिनी विटंबिल्या कुळवंती । वदनें दासीचीं चुंबिती । सोवळ्याची स्फीती । जगीं मिरविती पवित्रता ॥ १५ ॥ मद्यपानाची सुराणी । नवनीता न पुसे कोणी । केळवती व्यभिचारिणी । दैन्यवाणी पतिव्रता ॥१६॥ केवढी दोषाची सबळता । झाली पाहा हो भगवंता । पुण्य बुडावोनी संता । तीर्थीं हरी आणिली ॥ १७ ॥ भेणें मंद झाली मेघवृष्टि । आकांतली कांपे सृष्टि । देव रिगाले कपाटीं ।

आटाआटी प्रवर्तली ॥ १८ ॥ अपीकें धान्यें दिवसें दिवस । गाई म्हैसी चेवल्या गोरसें । नगरें दिसती उध्वसें । पिकलीं बहुवसें पाखांडें ॥ १९ ॥ होम हरपलीं हवनें । यज्ञयाग अनुष्ठानें । जपतपादिसाधनें । आचरणें भ्रष्टलीं ॥ २० ॥ आठरा यातींचा व्यापार । करिती तस्कराई विप्र । सांडोनिया शुद्ध शुभ्र । वस्त्रें निळीं पांघरती ॥ २१ ॥ गीता लोपली गायत्री । भरले चमत्कार मंत्रीं । अश्वाचियेपरी । कुमारी विकिती वेदवक्ते ॥ २२ ॥ वेदाध्ययनसंहितारुचि । भकांद्या करिती तयांची । आवडी पंडितांची । मुसाफावरी बैसली ॥ २३ ॥ मुख्य सर्वोत्तम साधनें । तीं उच्छेदुनि केलीं दीनें । कुडीं कापट्यें महा मौन्यें । मिरविताती दुर्जनें ॥ २४ ॥ कळाकुशळता चतुराई । तर्कवादी भेद निंदेठायीं । विधिनिषेधाच्या [illegible] । [illegible] ऐसीं नाडलीं ॥ २५ ॥ सन्यासी तापसी [illegible] । होतां दिगांबर निस्पृही वैराग्यकारी । कामक्रोधें [illegible] । इच्छेकरीं न सुटती ॥ २६ ॥ कैसें विनाशकाळाचें कौतुक । [illegible] अंतक । पिते पुत्र सहोदर । एकाएक [illegible] ॥ २७ ॥ [illegible] रांडेची अंगवण । भ्रमविलें अवघें जन । याती [illegible] कर्दम करूनि विटाळिलें ॥ २८ ॥ पूर्वीं होतें भविष्य केलें । [illegible] यालें । ऐकत होतों तें देखिलें । प्रत्यक्ष लोचनीं ॥ २९ ॥ आतां [illegible] हें आघवें । गति नव्हे कलीमध्यें वावरावें । देवासीं [illegible] वेगें स्मरावें अंतरीं ॥ ३० ॥ आगा ये वैकुंठनायका । काय पा[illegible]का । धांव कलीनें गांजिलें लोकां । देतो हाका सेवक तुका[illegible] ॥

॥ २८६८ ॥

कलिधर्म मागें सांगितले संतीं । आचार सांडिती द्विजलोक ॥ १ ॥
तेचि कळों आतां येतसे प्रचिती । अधर्मी टेंकती धर्म नव्हे ॥ २ ॥
तप व्रत करितां लागती सायास । पोळितां पिंडास गोड वाटे ॥ ३ ॥
देव म्हणऊनी न येती देऊळा । संसार वेगळा तरी कां नव्हे ॥ ४ ॥
तुका म्हणे मज धरितां गुमान । ऐसे कोणी जन नरका जाती ॥ ५ ॥

॥ २८६९ ॥

तुम्हां सांगतों कलयुगफळ । पुढें होईल व्रह्मगोळ ॥ १ ॥ आम्हां म्हणतील कंटक । ऐसा पाडिती दंडक ॥ २ ॥ स्त्रिया पुजूनि सरे देती । भलते स्त्रियेसी भलते जाती ॥ ३ ॥ श्रेष्ठ वर्ण वेदविद्वांस । अंगीकारिति मद्यमांस ॥ ४ ॥ चारी वर्ण अठरा याती । करूं करिती एक पंक्ती ॥ ५ ॥ म्हणती अंबेचा क्रीडाकल्लोळ । शिवरूप

प्राणी सकळ ॥ ६ ॥ ऐसें होईल शकुन देतों । अगोदर सांगुन जातों ॥ ७ ॥ तुका सद्गुरुदास्य करी । रिद्धि पाणी वाहे घरीं ॥ ८ ॥

॥ २८७० ॥

मागें संतीं होतें जें जें सांगितलें । तें येऊं लागलें अनुभवा ॥ १ ॥
आचारभ्रष्ट होती लोक कली । पुण्य क्षीण बळी झालें पाप ॥ २ ॥
वर्णधर्म कोणी नधरी ती विटाळ । घालिती गोंधळ एके [illegible]
वेदाचे पाठक सेवितील मद्य । न देखती भेद विप्र [illegible]
तुका म्हणे किती करावे फजित । तेचि छंद [illegible]

॥ २८७१ ॥

उपदेश भलत्या हातीं । झाला [illegible] नये जाऊं पात्रावरी । कवटी सार [illegible] दाजन । नारायण स्मरविती ॥ ३ ॥ [illegible] आधार चिंधीचा ॥ ४ ॥

[illegible] ॥

[illegible] । येणेविण काय चाड आम्हां ॥ १ ॥
[illegible] डोळां । येतो कळवळा ह्मणउनि ॥ २ ॥
[illegible] माझे देखतिल डोळे । भोग देत वेळे येईल कळों ॥ ३ ॥

॥ २८७३ ॥

बोललों तें कांहीं तुमचिया हिता । वचन नेणता क्षमा कीजे ॥ १ ॥
वाट दावी तया न लगे शिणावें । अतित्याई जीवें नाश पावे ॥ २ ॥
निंब दिला रोग तुटाया अंतरीं । पोभाळितां वरी आंत चरे ॥ ३ ॥
तुका ह्मणे हित देखण्याशी कळे पडती आंधळे कूपामाजीं ॥ ४ ॥

॥ २८७४ ॥

आतां माझे नका वाणूं गुण दोष । करितों उपदेश याचा कांहीं ॥ १ ॥
मानदंभासाठीं छळीतसे कोणा । आण या चरणां विठोबाची ॥ २ ॥
तुका म्हणे हें तो ठावें पांडुरंगा । काय कळे जगा अंतरींचें ॥ ३ ॥

॥ २८७५ ॥

जन्मा येऊन उदार झाला । उद्धार केला वंशाचा । मेळवूनि धन मेळवी माती । सदा विपत्ती भोगितसे ॥ १ ॥ नाम घेतां न मिळे अन्न । नव्हे कारण देखिलिया । धर्म करितां ऐके कानीं । बांधे निजोनि डोकियासी ॥ २ ॥ घरा व्याही पाहुणा आला । ह्मणे त्याला बरें नाहीं । तुमचे गांवीं वैद्य आहे । बैसोनि काय प्रयोजन ॥ ३ ॥ उजवूं किती होतिल पोरें । मरतां बरें ह्मणे यांसी । म्हणऊनि देवा नवस करी । दावी घरींहुनि बोनें ॥ ४ ॥ पर्वकाळीं भट घरा आला । बोंब घाला ह्मणे पोरां । तुमचा उणा होईल वांटा । काल पिटासी पैं आला ॥ ५ ॥ दाढी करितां अडका गेला ।

घरांत आला बाइलेचें । म्हणे आतां उगवीं मोडी । डोई बोडीं आपुली ६ तीर्थ स्वप्नीं नेणें गंगा । पूजन लिंगा गांविंचिया । आड-कुंनि दा८ बैसे द्वारीं । आल्या घरीं ह्मणे ओस ॥ ७ ॥ तुका ह्मणे ऐसे आहेत गा हरी । याही तारीं जीवांसी । माझ्या भय वाटे चित्तीं । नरका जाती ह्मणोनि ॥ ८ ॥

॥ २८७६ ॥

[illegible] र्म न करी नासरी । खर्ची राजद्वारीं द्रव्यरासी ॥ १ ॥
[illegible] करी पाहुणेर बरा । कांडतो टोंबरा संतांलागीं ॥२॥
बाइल[illegible] पोसी । मातापितरांसी दवडोनी ॥ ३ ॥
श्राद्धीं कष्टी [illegible] ब्राह्मण । गोवार मागून सावडीतो ॥४॥
नेतो पानें फुलें वेश्येला [illegible] ब्राह्मणासी खांड नेदी एक ॥ ५ ॥
हातें मोन्या शोधी कष्ट करी [illegible] देवाच्या [illegible] जना कांटळतो ६॥
सारा वेळ धंदा करितां श्रमेना । साधूच्या [illegible] ७ ॥
हरीच्या कीर्तनीं गुंगायासी लागे । येरवीं [illegible] ॥८॥
पुराणीं बैसतां नाहीं रिकामटी । खेळतो सोंगटी [illegible] ॥ ९ ॥
देवाच्या विभूति न पाहे सर्वथा । करी पानवथा नेत्रांभक्षा ॥१०॥
गाईला देखोनी बदबदा मारी । घोड्याची चाकरी गोड लागे ११॥
ब्राह्मणाचें तीर्थ घेतां त्रास मोठा । प्रेमें घेतो घोंटा घटघटां ॥१२॥
तुका ह्मणे ऐसे प्रपंचीं गुंतले । जन्मोनि मुकले विठोबासी ॥ १३ ॥

॥ २८७७ ॥

सोईऱ्यासी करी पाहुणेर बरा । कांडितो टोंबरा संतांलागीं ॥ १ ॥
गाईसी देखोनि बदबदा मारी । घोड्याची चाकरी गोड वाटे ॥ २ ॥
पान फुल नेतो वेश्येसी उदंड । ब्राह्मणासी खांड देऊं नेदी ॥ ३ ॥
पर्वकाळीं धर्म न करी नासरी । वेची राजद्वारीं उदंडचि ॥ [illegible]
कीर्तना जावया होतसे हिंपुष्टि । खेळतो सोंकटी रात्रंदिवस ॥ [illegible]
बाइलेच्या गोता अवडीनें पोसी । मातापितयासी दवडितो ॥ [illegible]
तुका ह्मणे त्याच्या थुंका तोंडावरीं । जातो यमपुरी भोगावया [illegible] ॥

॥ २८७८ ॥

साधूच्या दर्शना लाजशी गव्हारा । वेश्येचिया घरा पुष्पें नेसी [illegible]
वेश्या दासी मुरळी जगाची वोंवळी । ते तुज सोंवळी वाटे कैशी [illegible]
तुका ह्मणे आतां लाज धरीं बुच्या । टांचराच्या कुच्या मारा वेगीं ३

॥ २८७९ ॥

देवाचिया वस्त्रा स्वप्नींही नाठवी । स्त्रियेसी पाटवी उंच साडी ॥१॥
गाईचें पाळण नयेचि विचारा । अश्वासी खरारा करी अंगें ॥ २ ॥

लेकराची गांड स्वयें धावे क्षाळूं । न ह्मणे प्रक्षाळूं द्विजपायां ॥३॥
तुका ह्मणे त्याच्या तोंडावरी थुंका । जातो यमलोका भोगावया ४॥

॥ २८८० ॥

उरा लावी उर आळंगितो कांता । संतासी भेटतां अंग चोरी ॥१॥
अतीत देखोनि होय पाठमोरा । व्याह्यासी सामोरा जाय वेगीं ॥२॥
द्विजा नमस्कार मनीं भाव कैचा । तुर्कांचे दासीचा लेंक होय ॥३॥
तुका ह्मणे तुह्मी क्रोधासी न यावें । स्वभावा करावें काय कोणी ४

॥ २८८१ ॥

बाइल तरी ऐसी व्हावी । नरकीं गोवी अनिवार ॥ १ ॥ घडो नेदी तीर्थयात्रा । केला कुतरा हातसोंका ॥२॥ आपुलीच करवी सेवा । पुजवी देवासारिखें ॥३ तुका ह्मणे गाढव पशु । केला नाशु आयुष्या४

॥ २८८२ ॥

बाइलें अधीन होय ज्याचें जिणें । तयाच्या अवलोकनें पडिजे द्वाड १
कासया ते जंव जितातीं संसारीं । माकडाच्या परी गारोड्यांच्या २
बाइलेच्या मना येईल तें खरें । अभागी तें पुरें बाइलेचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे मेग्या गाढवाचें जिणें । कुतऱ्याचें खाणें लगबगा ॥ ४ ॥

॥ २८८३ ॥

धिग जिणें तो बाईलेआधीन । परलोक मान नाहीं दोन्ही ॥ १ ॥
धिग जिणें ज्याचें लोभावरी मन । अतितपूजन घडेचिना ॥ २ ॥
धिग जिणें आळस निद्रा जया फार । अमित आहार अघोरिया ३
धिक जिणें नाहीं विवेक वैराग्य । झुरे मानालागीं साधुपणा ॥४॥
तुका ह्मणे धिग ऐसे झाले लोक । निंदक वाहक नरका जाती ५॥

॥ २८८४ ॥

सुखें वोळंब दावी गोहा । माझें दुःख नेण पाहा ॥१॥ आवडीचा मारिला वेडा । होय होय कैसा म्हणे भिडा ॥ २ ॥ निपट मज न चले अन्न । पायली गहूं सांजा तीन ॥ ३ ॥ गेले वारीं आणिली साकर । सात दिवसां दहा शेर ॥ ४ ॥ अखंड मज पोटाची व्यथा । दुधभात साखर पथ्या ॥ ५ ॥ दो पाहरा मज लहरी येती । शुद्ध नाहीं पडे सूपती ॥ ६ ॥ नीज नये घाली फुलें । जवळीं न साहती मुलें ॥ ७ ॥ अंगीं चंदन लावितें भोळीं । सदा शूळ माझे कपाळीं ॥ ८ ॥ हाड गळोनि आलें मास । माझें दुःख तुम्हां नेणवे कैसें ॥९॥
तुका म्हणे जिता गाढव केला । मेलियावरि नरका गेला ॥ १० ॥

॥ २८८५ ॥

भ्रतारासी भार्या बोले गुज गोष्टी । मज ऐसी कष्टी नाहीं दुजी १
अखंड तुमचें धंद्यावरी मन । माझें तों हेळण करिती सर्व ॥ २ ॥

जोडितसां तुम्ही खाती येरचोरें । माझीं तंव पोरें हळहळती ॥३॥
तुमची व्याली माझे डाई हो पेटली । सदा दुष्ट बोली सोसवेना॥४॥
दुष्टवृत्ति नंदुली सदा द्वेष करी । नांदों मी संसारीं कोण्या सुखें॥५॥
जावा दीर कांहीं धड ही न बोले । नांदों कोणा खालें कैसी आतां॥६॥
माझ्या अंगसंगें तुम्हांसी विश्रांति । मग धडगति नाहीं तुमची ७॥
ठाकतें ठमकतें जीव मुठी धरूनि । परि तुम्ही अजूनि धरा लाज ८
वेगळे निघतां संसार करीन । नाहीं तरी प्राण देतें आतां ॥ ९ ॥
तुका ह्मणे झाला कामाचा अंकित । सांगे मनोगत तैसा वर्ते ॥१०॥

॥ २८८६ ॥

कामाचा अंकित कांतेतें प्रार्थित । तूं कां हो दुश्चित निरंतर ॥ १ ॥
माझीं मायबापें बंधु हो बहिण । तुज करी सीण त्यागीन मी ॥ २ ॥
त्यांचें जरी तोंड पाहेन मागुता । तरी मज हत्या घडो तुझी ॥ ३ ॥
सकाळ उठोन वेगळा निघेन । वाहातों तुझी आण निश्चयेसी ॥ ४ ॥
वेगळें निडतां घडीन दोरे चुडा । तूं तंव माझा जोडा जन्माचा कीं ५
ताईत सांकळी गळांची दुलडी । बाजुबंद जोडी हातसर ॥ ६ ॥
वेणीचे जे नग सर्वही करीन । नको धरूं सीण मनीं कांहीं ॥ ७ ॥
नेसावया साडी शेलारी चुनडी । अंगींची कांचोळी जाळिया फुलें ८
तुका म्हणे केला रांडेनें गाढव । मनासवें धांव घेतलीसे ॥ ९ ॥

॥ २८८७ ॥

एका पुरुषा दोघी नारी । पाप वसे त्याचे घरीं ॥ १ ॥ पाप नलगे धुंडावें । लागेल तेणें तेथें जावें ॥ २ ॥ कांहीं दुसरा विचार । न लगे करावाचि फार ॥ ३ ॥ असत्य जे वाणी । तेथें पापाचीच खाणी ॥४॥ सत्य बोले मुखें । तेथें उचंबळती सुखें ॥५॥ तुका ह्मणे दोन्ही । जवळीच लाभहानी ॥ ६ ॥

॥ २८८८ ॥

बाईल सवासिण आई । आपण पितरांचे ठायीं १ थोर वेच झाला नष्टा । अवघ्या अपसव्य चेष्टा २ विषयांचे चरवणीं । केली आयुष्याची गाळणी ३ तुका ह्मणे लंडा । नाहीं दया देव धोंडा ॥ ४ ॥

॥ २८८९ ॥

दासीचा जो संग करी । त्याचे पूर्वज नर्कद्वारीं ॥१॥ ऐसें सांगों जातां जना । नये कोणाचिया मना ॥ २ ॥ बरें विचारूनी पाहें । तुज अंतीं कोण आहे ३ तुका ह्मणे रांडलेंका । अंतीं जाशिल यमलोका ॥ ४ ॥

॥ २८९० ॥

बाईल चालिली माहेरा । संगें दिधला म्हातारा ॥ १ ॥ सिधा सामग्री पोटाची । सवें स्वारी बइलाची ॥ २ ॥ जातां पडिली

ढोरानें । सिव्या देती अन्योविन्ये ॥३॥ न सावरी आपणातें । नग्न सावलें वरतें ॥४॥ फजित केलें जन लोकीं । मेला ह्मणे पडे नरकीं ॥ ५ ॥ गोहाची हे गेली लाज । गांजितां कां तुह्मी मज ॥ ६ ॥ तुका ह्मणे जनीं । छी थू केली विटंबणी ॥ ७ ॥

॥ २८९१ ॥

परिसें गे सुनेबाई । नको वेंचूं दूध दहीं ॥ १ ॥ आवा चालिली पंढरपुरा । वेसीपासुनि आली घरा ॥२॥ ऐकें गोष्टी सादर बाळे । करीं जतन फुटकें पाळें ॥ ३ ॥ माझे हातींचा कलवडू । मजवांचुनि नको फोडूं ॥ ४ ॥ वळवटक्षिराचें लिंपन । नको फोडूं मजवांचून ५ उखळ मुसळ जातें । माझें मन गुंतलें तेथें ॥ ६ ॥ भिक्षुक आल्या घरा । सांग गेली पंढरपुरा ॥ ७ ॥ भक्षीं परिमित आहारु । नको फारसी वरो सारू ॥ ८ ॥ सून ह्मणे बहुत निकें । तुम्ही यात्रेसि जावें सुखें ॥ ९ ॥ सासूबाई स्वहित जोडा । सर्व मागील आशा सोडा ॥ १० ॥ सूनमुखींचें वचन कानीं । ऐकोनि सासू विवंचि मनीं ॥ ११ ॥ सवतीचे चाळे खोटे । म्यां जावेंसें इला वाटे ॥ १२ ॥ आतां कासया यात्रे जाऊं । काय जाउनि तेथें पाहूं ॥ १३ ॥ मुलें लेंकरें घरदार । माझें येथेंचि पंढरपूर ॥ १४ ॥ तुका ह्मणे ऐसें जन । गोवियेलें मायकरून ॥ १५ ॥

॥ २८९२ ॥

पतिव्रतेची कीर्ती वाखाणितां । सिंदळीच्या माथां तिडिक उठे ॥१॥ आमुचें तें आहे सहज बोलणें । नाहीं विचारून केलें कोणीं ॥ २ ॥ अंगें उणें त्याच्या बैसे टाळक्यांत । तेणें ढिणग्या बहुत गाळीतसे ३ तुका ह्मणे आम्हीं काय करणें त्यासी । ढका खवंदासी लागतसे ४॥

॥ २८९३ ॥

जातीची शिंदळी । तिला कोण कसा वळी १ आपघर ना बापघर । चित्तीं मनीं व्यभिचार ॥ २ ॥ सेजे असोनिया धनी । परद्वार मना आणी ३ तुका ह्मणे असल जाती । जातीसाठीं खाती माती ॥ ४ ॥

॥ २८९४ ॥

पतिव्रता ऐसी जगामध्यें मात । भोगी पांच सात अंधारीं ते ॥ १ ॥ भ्रतारासी लेखी श्वानाचे समान । परपुरुषीं जाण शंभ्रम तो ॥ २ ॥ तुका ह्मणे तिच्या दोषा नाहीं पार । भोगील अघोर कुंभपाक ॥ ३ ॥

॥ २८९५ ॥

सिंदळीसी नाहीं पोराची पैं आस । राहे बीज त्यास काय करी १॥ अथवा सेतीं बीज पेरिलें भाजोन । सारा देईल कोण काका त्याचा२ तुका ह्मणे नाहीं राखायाची चाड । तरि कां लिगाड करुनी घेतो ३

॥ २८९६ ॥

सिंदळीचें चित्त परपुरुषावरी । पति चुरमुरी रात्रंदिवस ॥ १ ॥
ऐसी ते वोंगळ जाय वो नरका । तिच्या दोषें देखा पति जाय २॥
आपण बुडती पति बुडविती । दोन्ही कुळें नेती अधःपाता ॥ ३ ॥
तुका ह्मणे तिची न करावी संगती । होईल फजिती मागें पुढें ४ ॥

॥ २८९७ ॥

संत मागे पाणी नेदी एक चूळी । दासीस आंघोळी ठेवी पाणी १॥
संतांसी देखोनी होय पाठमोरा । दासीचिया पोरा चुंबन देतो २॥
संतासी देखोनि करितो ढवाळ्या । भावें धुतो चोळया दासीचिया ३
तुका ह्मणे त्याच्या तोंडावरी थुंका । जातो यमलोका भोगावया ४॥

॥ २८९८ ॥

दगडाच्या देवा बगाड नवस । बाईल कथेसी जाऊं नेदी ॥ १ ॥
वेची धनरासी बांधिलें स्मशान । दारीं वृंदावन झाड मानी ॥ २॥
चोरें नागविला न करी त्याची खंती । परि द्विजा हातीं नेदी रुका ३
करी पाहुणेर व्याह्याजावयासी । आल्या अतीतासी पाठमोरा ४ ॥
तुका म्हणे जळो धिग त्याचें जिणें । भार वाही सीण वर्म नेणें ॥५॥

॥ २८९९ ॥

गोहो यावा गांवा । ऐसे नवस करी आवा १ कैचें पुण्य तिचे गांठी । व्रतें वेची लोभासाठीं ॥२॥ वाढावें संतान । गृहीं व्हावें धनधान्य ॥३॥ मागे गारगोटी । परिसाचीये साटोवाटी ॥ ४ ॥ तुका ह्मणे मोल । देऊन घेतला सोमल ॥ ५ ॥

॥ २९०० ॥

गर्भाचें धारण । तिनें वागविला सिण ॥ १ ॥ व्याली कुऱ्हाडीचा दांडा । वर न घलीच तोंडा ॥ २ ॥ उपजला काळ । कुळा लाविला विटाळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाय । नरका अभक्ताची माय ॥ ४ ॥

॥ २९०१ ॥

देखोनि हरखली अंड । पुत्र झाला ह्मणे रांड । तंव तो झाला भांड । चाहाड चोर शिंदळ ॥१॥ जाय तिकडे पीडी लोकां । जोडी भांडवल थुंका । थोर झाला चुका । वर कां नाहीं घातली ॥ २ ॥ भूमि कांपे त्याच्या भारें । कुंभपाकाचीं शरीरें । बोले निष्ठुर उत्तरें पापदृष्टी मळिण चित्त ॥३॥ दुराचारी तो चांडाळ । पाप सांगातें विटाळ । तुका ह्मणे खळ । ह्मणोनिया निषिद्ध तो ॥ ४ ॥

॥ २९०२ ॥

पुत्र झाला चोर । मायबापां हर्ष थोर ॥ १ ॥ आतां काशासाठीं जोडी । हात धाटे गुडघे घडी ॥ २ ॥ ऐते अपाहार । आणूनिया भरी घर ३ मानिली निश्चिती । नरका जवया उभयतीं ४ झोडा-

झोडगीचे पोटीं । फळें बीजें तीं करंटीं ॥ ५ ॥ तुका ह्मणे वेश्या । भांडवल नलगे खच्या ॥ ६ ॥

॥ २९०३ ॥

ऐसे कुळीं पुत्र होती । बुडविती पूर्वजा ॥ १ ॥ चाहाडी चोरी भांडवला । वांटा आला भागासी ॥ २ ॥ त्याचियानें दुःखी मही । भार तेही न साहे ॥ ३ ॥ तुका ह्मणे ग्रामपशु । केला नाशु आयुष्या ४॥

॥ २९०४ ॥

अहाकटा त्याचे करिती पितर । वंशीं दुराचार पुत्र झाला ॥ १ ॥ गळेचिना गर्भ नव्होचि कां वांज । माता त्याची लाज लावी पापी २ परपीडे परद्वारीं सावधान । सादरचि मन अभाग्याचें ॥ ३ ॥ न मिळतां निंदा चाहडी उपवास । संग्रहावे दोष सकळही ॥ ४ ॥ परउकार पुण्य त्या वावडें । विषयाचें ते किडे दुर्गधीं मरे ॥ ५ ॥ तुका ह्मणे विटाळाचीच तो मूर्ति। द्या क्षमा शांति नातळे त्या॥६॥

॥ २९०५ ॥

जळो तिचे तोंड । ऐसी कां ते व्याली रांड ॥ १ ॥ सदा भोवयासी गांठीं । क्रोध घडघडीत पोटीं ॥ २ ॥ फोडिली गोंवरी ऐसी दिसे तोंडावरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं । चित्ता समाधान कांहीं ॥ ४ ॥

॥ २९०६ ॥

देवें दिला देह भजना गोमटा । तो या झाला भाटा बाधिकेच्या १ ताठोनिया मान राहिली वरती । अहंकारा हातीं लवों नेदी ॥ २ ॥ दास ह्मणावया न वळे रसना । सद्गुरवचना वासे गळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे कोठें ठेवावा विटाळ । स्नानें निर्मळ व्हावयासी ॥ ४ ॥

॥ २९०७ ॥

मायबाप करिती चिंता । पोर नाइके सांगतां ॥ १ ॥ नको जाऊं देउळासी । नेतो बागुल लोकांसी ॥ २ ॥ कर्णद्वारें पुराणिक । भुलवी शब्दें लावी भीक ॥ ३ ॥ वैष्णवांसंगती । हातीं पडलीं नेणों किती ॥ ४ ॥ आह्मां कैचा मग । करिसी उघडियांचा संग ॥ ५ ॥ तुका ह्मणे जाणे नरका । त्यांचा उपदेश आइका ॥ ६ ॥

॥ २९०८ ॥

काय पोरा लागली चट । धरी वाट देउळाची ॥ १ ॥ सांगितलें नेघे कानीं । दुजें मनीं विठ्ठल ॥२॥ काम घरीं न करी धंदा । येथें सदा दुश्चित ॥ ३ ॥ आमचे कुळीं नव्हतें ऐसें । हेंच पिसें निवडलें ॥ ४ ॥ लौकिकाचीं नाहीं लाज । माझें मज पारिखें ॥५॥ तुका ह्मणे नरका जाणें । त्या वचनें दुष्टांचीं ॥ ६ ॥

॥ २९०९ ॥

कन्या गौ करी कथेचा विकरा । चांडाळ तो खरा तया नांवें ॥१॥

गुण अवगुण हे दोन्ही प्रमाण । यातिशीं कारण नाहीं देवा ॥ २ ॥
जे जैसें करिती ते तैसें पावती । भोग ते भोगिती केले कर्मीं ॥ ३ ॥
आशाब्द्ध करूं नये तें करिती । तुका ह्मणे जाती नरकामधीं ॥ ४ ॥

॥ २९१० ॥

सालंकृत कन्यादान । पृथ्वीदानाच्या समान ॥१॥ परि तें न कळे या मूढा । येइल कळों भोग पुढां २ आचरितां कर्म । भरे पोट राहे धर्म ३ सत्या देव साहे । ऐसें करूनिया पाहें ४ अन्न मान धन । हें तों प्रारब्धा आधीन ५ तुका ह्मणे सोसे दुःख आतां पुढें नासे ॥६॥

॥ २९११ ॥

ब्रह्महत्या मारिलिया गाई । आणीक कांहीं पाप केलें ॥ १ ॥ ऐका जेणें विकिली कन्या । पवाडे त्या सुन्याचे ॥ २ ॥ नरमांस खादली भाडी । हाका मारी म्हणोनि ॥ ३ ॥ अवघें पाप केलें तेणें । जेणें सोनें अभिलाषिलें ॥ ४ ॥ उच्चारितां मज तें पाप । जिव्हे कांप सुटतसे ॥ ५ ॥ तुका ह्मणे कोरान्न रांड । बेटा भांड मागेना कां ॥ ६ ॥

॥ २९१२ ॥

हातीं होन दावी बेना । करिती लेंकीच्या धारणा ॥ १ ॥ ऐसे धर्म झाले कळीं । पुण्य रंक पाप बळी ॥२॥ सांडिले आचार । द्विज चाहाड झाले चोर ॥३॥ टिळे लपविती पातडीं । लेती विजारा कातडीं ॥४॥ बैसोनिया तक्तां । अन्नेविण पिडिती लोकां ॥५॥ मुदबख लिहिणें । तेलतुपावरी जिणें ६ नीचाचे चाकर । चुकलिया खाती मार ॥ ७ ॥ राजा प्रजा पीडी । क्षेत्री दुखितासी तोडी ८ वैश्यशूद्रादिक । हे तों सहज नीच लोक ॥ ९ ॥ अवघे बाह्य रंग । आंत हिरवें वरी सोंग १० तुका ह्मणे देवा । काय निद्रा केली धांवा ११॥

॥ २९१३ ॥

भाग्यासाठीं गुरू केला । नाहीं आम्हांसी फळला ॥ १ ॥ याचा मंत्र पडतां कानीं । आमुच्या पेवांत गेलें पाणी ॥ २ ॥ गुरू केला घरवासी । आमुच्या चुकल्या गाईह्मशी ॥ ३ ॥ स्वामी आपुली बुटबुट घ्यावी । आमुची परताप टाकून द्यावी ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसे नष्ट । त्यांसी दुणें होती कष्ट ॥ ५ ॥

॥ २९१४ ॥

आपुली बुटबुट घ्यावी । माझी परताप परत द्यावी ॥ १ ॥ आपुला मंत्र नव्हे बरा । माझा बईल चुकला मोरा ॥ २ ॥ तुका ह्मणे ऐशा नरा । परिस न ह्मे बे खापरा ॥ ३ ॥

॥ २९१५ ॥

एक ब्रह्मचारी गाढवा झोंबतां । हाणोनिया लाता पळालें तें ॥ १ ॥

गाळवही गेलें ब्रम्हचर्य गेलें । तोंड काळें झालें जगामाजी ॥ २ ॥
होणार तैसें झालें हें ना तैसें केलें। तुका ह्मणे गेलें वायाचि तें ॥३॥

॥ २९१६ ॥

दो दिवसाचा पाहुणा चालतो उताणा। कां रे नारायणा न भजसी १
तूं अखड दुश्चित्ता तुज नेती अवचित। मग पंढरिनाथा भजसी केव्हां २
तुका ह्मणे ऐसे आहेत उदंडा । तया केशव प्रचंड केवीं भेटे ॥ ३ ॥

॥ २९१७ ॥

दिवसा व्यापारचावटी । रात्रीं कुटुंब चिंता मोटी १ काय करूं या मनासी। नाठवे कां हृषीकेशी ॥२॥ वेश्येपाशीं रात्रीं जागे । हरिकीर्तनीं निद्रा लागे ३ तुका म्हणे काय झालासी। वृथा संसारा आलासी

॥ २९१८ ॥

कुंकवाची ठेवाठेवी। बोडका देवी काशाला १ दिवसगमा भरा पोट। कां गे नट नटावा ॥२॥ दिमाख हा कोणा दावा । लटकीं जीवा चडफड ॥३॥ तुका ह्मणे झोंडगी हो । फुंदा कां हो कोरडी ॥ ४ ॥

॥ २९१९ ॥

पोटासाटीं खटपट करिसी अवघा वीळ । राम राम ह्मणतां तुझी बसली दांतखीळ ॥ १ ॥ हरिचें नाम कदाकाळीं कां रे नये वाचे । ह्मणतां राम राम तुझ्या बाचे काय वेचे ॥ २ ॥ द्रव्याचिया आशा दाही दिशा न पुरती । कीर्तनासी जाता तुझी जड झाली माती ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐशा जीवा काय करूं आतां । राम राम न ह्मणे त्याचा गाढव मातापिता ॥ ४ ॥

॥ २९२० ॥

देह जाईल जाईल । यासी काळ वा खाईल ॥ १ ॥ कां रे नुमजसी दगडा । कैचे हत्ती घोडे वाडा ॥ २ ॥ लोडें बालिस्तें सुपती । जरा आलिया फजिती ॥३॥ शरीरसंबंधाचें नातें । भोरड्या बुडविती सेतातें ४ अझुनि तरी होईं जागा । तुका ह्मणे पुढें दगा ॥५॥

॥ २९२१ ॥

आयुष्य मोजावया बैसला मापारी। तूं कां रे वेव्हारी संसाराच्या १
नेईल ओढोनी ठाउकें नसतां । न राहे दुश्चिता हरिविण ॥ २ ॥
कठिण हें दुःख यम जाचतील । कोण सोडवील तये ठायीं ॥ ३ ॥
राहतील दुरी सज्जन सोयरीं । आठवीं श्रीहरी लवलाही ॥ ४ ॥
तुका ह्मणे किती करिसील लंडाई । होईल भंडाई पुढें थोर ॥ ५ ॥

॥ २९२२ ॥

जन्मा येउनि काय केलें । तुवां मुदल गमाविलें १ कां रे न फिरसी माघारा । अझुनि तरी फजितखोरा २ केली गांगोळीची नासी । पुढें भीकची मागसी ३ तुका ह्मणे ठाया । जाईं आपल्या आलिया४

॥ २९२३ ॥

रंगीं रंगेरे श्रीरंगे । काय भुललासी पतंगें १ शरीर जायाचें ठेवणें। धरिसी अभिलाश ह्मणे २ नव्हे तुझा हा परिवार। द्रव्य दारा क्षणभंगुर ३ अंतकाळींचा सोइरा । तुका ह्मणे विठो धरा ॥ ४ ॥

॥ २९२४ ॥

नये बोलों भांडा। खीळ घालुन बैस तोंडा ॥ १ ॥ एक विठो-बाचे गुण। करीं सादर श्रवण ॥ २ ॥ प्रेमसुखा आड। काय वाजतें चाभाड ३ तुका ह्मणे हिता। कां रे नागवसी स्थिता ॥४॥

॥ २९२५ ॥

पंधरा दिवसां एक एकादशी। कां रे न करिसी व्रतसार ॥ १ ॥ काय तुझा जीव जातो एका दिसें। फराळाच्या मिसें धणी घेसी २ स्वहित कारण मानवेल जन। हरिकथा पूजन वैष्णवांचें ॥ ३ ॥ थोडे तुज घरीं होती उजगरे। देउळासी कां रे मरसी जातां॥ ४ ॥ तुका ह्मणे कां रे सकुमार झालासी। काय जाब देसी यमदूतां ॥५॥

॥ २९२६ ॥

एकादशी सोमवार न करिती। कोण त्यांची गति होईल नेणों ॥ १ ॥ काय करूं बहु वाटे तळमळ। आंधळीं सकळ बहिर्मुख ॥ २ ॥ हरिहरां नाहीं बोटभरी वाती। कोण त्यांची गति होईल नेणें ॥३॥ तुका ह्मणे नाहीं नारायणीं प्रीति। कोण त्यांची गति होईल नेणों ४॥

॥ २९२७ ॥

धर्म तो न कळे। काय झांकिती डोळे ॥१॥ जीव भ्रमले या कामें। कैसीं कळों येती वर्मे ॥ २ ॥ विषयांचा माज । कांहीं धरूं नेदी लाज ॥ ३ ॥ तुका ह्मणे लांसी । माया नाचविते कैसी ॥ ४ ॥

॥ २९२८ ॥

किती वेळा खादला दगा। अझून कां गा जागसी ना १ लाज नाहीं हिंडतां गांवें। दुःख नवें नित्य नित्य २ सर्वे चोर हातीं फांसे। देखतां कैसे न देखसी ॥३॥ तुका ह्मणे सांडिती वाट। तळपट करावया ॥४॥

॥ २९२९ ॥

पैल घरीं झाली चोरी। देहा करी बोंब ॥ १ ॥ हाबा हाबा करिसी काय। फिराऊनि नेघ्या वाय ॥ २ ॥ सांडुनिया शुद्धी। [illegible] गेली बुद्धि ॥ ३ ॥ चोरीं तुझा काढिला बुर। वेगळें भावा घातलें दूर ॥ ४ ॥ भलतियासी देसी वाव । लाहोसि तूं एवढा ठाव ५ तुका ह्मणे अझुनि तरी। उरलें तें जतन करीं ॥ ६ ॥

॥ २९३० ॥

नीत सांडोनि अवनीत चाले। भंडउभंड भलतेंचि बोले ॥ १ ॥ त्यांत कोणाचें काय बा गेलें। ज्याचें तेणें अनहित केलें ॥ २ ॥

ज्यासि वंदावें त्यासी निंदी । मैत्री सांडोनि होतसे दंदी ॥ ३ ॥
आन यातीचे संगती लागे । संतसज्जनामध्यें ना वागे ॥ ४ ॥
केल्याविण पराक्रम सांगे । जेथें सांगे तेथेंचि भीक मागे ॥ ५ ॥
करी आपुलाचि संभ्रम । परि पुढें कठीण फार यम ॥ ६ ॥
तुका ह्मणे कांहीं नित्य नेम । चित्तीं न धरी तो अधम ॥ ७ ॥

॥ २९३१ ॥

वितीयेवढेंसें पोट । केवढा बोभाट तयाचा ॥१॥ जळो याची विटंबना । भूक जना नाचवी ॥२॥ अभिमाना सिरीं भार । झाले खर तृष्णेचे ॥३॥ तुका ह्मणे नरका जावें । हाचि जीवें व्यापार ॥४॥

॥ २९३२ ॥

शूरां साजती हतियारें । गांढया हांसतील पोरें ॥ १ ॥ काय केली विटंवण । मोतीं नासिकावांचून ॥ २ ॥ पतिव्रते रूप साजे । सिंदळ काजळ लेतां लाजे ॥ ३ ॥ दासी पत्नी सुता । नव्हे सरी एक पिता ॥ ४ ॥ मान बुद्धिमंता । थोर न मनिती पिता ॥ ५ ॥ तुका ह्मणे तरी । आंत शुद्ध दंडे वरी ॥ ६ ॥

॥ २९३३ ॥

छळी विष्णुदासा कोणी । त्याची अमंगळ वाणी ॥१॥ येऊं न द्यावा समोर । अभागी तो दुराचार ॥२॥ नावडे हरिकथा । त्याची व्यभिचारीण माता ॥३॥ तुका ह्मणे याति । भ्रष्ट तयाची ते मति ॥ ४ ॥

॥ २९३४ ॥

अखंड संत निंदी । ऐसी दुर्जनाची बुद्धि ॥ १ ॥ काय ह्मणावें तयासी । तो केवळ पापरासि ॥ २ ॥ जो स्मरे रामनामा । त्यासी ह्मणतो रिकामा ॥३॥ जो तीर्थव्रत करी । त्यासी ह्मणतो भिकारी ४ तुका म्हणे विंचवाची नांगी । तैसा दुर्जन सर्वांगीं ॥ ५ ॥

॥ २९३५ ॥

जयासी नावडे वैष्णवांचा संग । जाणावा तो मांग जन्मांतरीं ॥१॥ अपवित्र वाचा जातीचा अधम । आचरण धर्म नाहीं दया ॥ २ ॥ मंजुळवदनीं बचनागाची कांडी । शेवटीं विघडी जीवप्राणा ॥ ३ ॥ तुका ह्मणे ज्याचा पिता नाहीं शुद्ध । तयासी गोविंद अंतरला ॥४॥

॥ २९३६ ॥

पापिया चांडाळा हरिकथा नावडे । विषयालागीं आवडे गाणें त्याला ॥ १ ॥ ब्राह्मणा दक्षणा देतां रडे रुका । विषयालागीं फुका लुटीतसे ॥ २ ॥ वीतभरि लंगोटी नेदी अतीताला । कीरम्या देतो शाला भोरप्यासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याच्या थुंका तोंडावरि । जातो यमपुरी भोगावया ॥ ४ ॥

॥ २९३७ ॥

कुटल्याविण नव्हे मांडा । अळसें धोंडा पडतसे १ राग नको धरूं मनीं । गांडमणी सांगतों २ तरटापुढें बरें नाचे । सुतेकाचें मुसळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे काठी सार । करी फार शहाणे ॥ ४ ॥

॥ २९३८ ॥

नव्हाराचें ज्ञान अवघा रजोगुण । सुखवासी होऊन विषय भोगी१ त्यासी जरी ज्ञानउपदेश केला । संगेविण त्याला राहावेना ॥ २ ॥ तुका ह्मणे संग उत्तम असावा । याविण उपावा काय सांगों ॥३॥

॥ २९३९ ॥

आपुल्या पोटासाठीं । करी लोकाचिया गोष्टी ॥१॥ जेणें घातलें संसारीं । विसरला तोचि हरी ॥ २ ॥ पोटा घाली अन्न । न ह्मणे पतितपावन ॥ ३ ॥ मी कोठील आणि कोण । हें न कळे ज्यालागून ॥ ४ ॥ तुका ह्मणे नरस्तुति । करितो भाट त्रिजगतीं ॥ ५ ॥

॥ २९४० ॥

लोहो परिसासीं रुसलें । सोनेंपणासी मुकलें ॥१॥ येथें कोणाचें काय गेलें । ज्याचें तेणें अनहित केलें ॥ २ ॥ गंगा आली आळशावरी । आळसी देखोनि पळे दुरी ॥३॥ गांवा खालील ओहळें । रागें गंगेसी न मिळे ४ तुका केशवाचा दास । गुरुसीं न भजे शिष्य ॥५॥

॥ २९४१ ॥

देवाचें चरित्र नाठवे सर्वथा । विनोदार्थ कथा गोड वाटे ॥ १ ॥ हातावरि हात हासोनि आफळी । वाजवितां टाळी लाज वाटे २॥ तुका ह्मणे थुंका त्याच्या तोंडावरि । जातो यमपुरीं भोगायया ॥३॥

॥ २९४२ ॥

भाव धरी तया तारील पाषाण । दुर्जना सज्जन काय करी ॥ १ ॥ करितां नव्हे नीट श्वानाचें हें पुच्छ । खापरा परीस काय करी २ काय करिल तया साकरेचें आळें । बीज तैसीं फळें येती तया ॥३॥ तुका ह्मणे वज्र भंगे एक वेळ । कठीण हा खेळ तयाहूनी ॥ ४ ॥

॥ २९४३ ॥

एवढी अपकीर्ती । ऐकोनिया फजीती ॥१॥ जरि दाखविल वदन । थुंका थुंका तो देखोन ॥ २ ॥ काळिमेचें जिणें । जाऊनिया राहे सुनें ॥ ३ ॥ तुका ह्मणे गुण । दरुषणें अपशकुन ॥ ४ ॥

॥ २९४४ ॥

शूकरासी विष्ठा माने सावकास । मिष्टान्नाची त्यास काय गोडी १ तैसी अभक्तांसी आवडे पाखांड । न लगे त्यां गोड परमार्थ ॥ २॥ श्वानासी भोजन दिलें पंचामृत । तरी त्याचें चित्त हाडावरि ॥३॥ तुका ह्मणे सर्पा पाजिलीया क्षीर । वमितां विखार विष झालें ॥४॥

॥ २९४५ ॥

अंगीं ज्वर तया नावडे साकर । जाणे तो इतर गोडी जाणे ॥ १ ॥
एकाचिये तोंडीं पडियेली माती । अवघे ते खाती पोटभरी ॥ २ ॥
चारितां बळें येत असे दांतीं । मागेंनिया घेती भाग्यवंत ॥ ३ ॥
तुका ह्मणे नसे संचित हें बरें । तयासि दुसरें काय करी ॥ ४ ॥

॥ २९४६ ॥

आपुलें वेचुनि खोडा घाली पाव । ऐसा तो हा जीव हीनबुद्धि १॥
विषयांच्या संगें आयुष्याचा नास । पडियलें ओस स्वहिताचें २॥
भुलल्याचें अंग आपणा पारिखें । छंदाच सारिखें वर्ततसे ॥ ३ ॥
तुका ह्मणे दुःख उमटे परिणामीं । लपंटासी कामीं रतालिया ॥ ४ ॥

॥ २९४७ ॥

आंधळ्यासि जन अवघेचि अंधळे । आपणासि डोळे दृष्टी नाहीं १॥
रोग्या विषतुल्य लागे हें मिष्टान्न । तोंडासि कारण चवी नाहीं २॥
तुका ह्मणे शुद्ध नाहीं जो आपण । तया त्रिभुवन अवघें खोटें ॥३॥

॥ २९४८ ॥

शब्दा नाहीं धीर । ज्याची बुद्धि नाहीं स्थिर ॥ १ ॥ त्याचें न व्हावें दर्शन । खळा पंगती भोजन ॥२॥ संतास जो निंदी । अधम लोभासाठीं वंदी ॥३॥ तुका ह्मणे पोटीं । भाव अणीक जया होटीं ॥ ४ ॥

॥ २९४९ ॥

अतिवादी नव्हे शुद्ध या बीजाचा । ओळखा जातीचा अधम तो ॥१॥
वेद श्रुति नाहीं ग्रंथ ज्या प्रमाण । श्रेष्ठाचे वचन न मानी तो ॥२॥
तुका ह्मणे मद्यपानाचें मिष्टान्न । तैसा तो दुर्जन शिवो नये ॥ ३ ॥

॥ २९५० ॥

नव्हे आराणूक संवसारा हातीं । सर्वकाळ चित्तीं हाचि धंदा १ ॥
देवधर्म सांदीं पडिला सकळ । विषयीं गोंधळ गाजतसे ॥ २ ॥
रात्रि दीस न पुरे कुटुंबाचें समाधान । दुर्लभ दर्शन ईश्वराचें ३ ॥
तुका ह्मणे आत्महत्यारे घातकी । थोर होते चुकी नारायणीं ॥ ४ ॥

॥ २९५१ ॥

किती सांगों तरी नाइकती बटकीचे । पुढें सिंदळीचे रडतील १ ॥
नका नका करूं रांडेची संगती । नेवोनी अधोगती घालिल यम २॥
तुका ह्मणे जरी देवीं नाहीं चाड । हाणोनि थोबाड फोडी काळ ३

॥ २९५२ ॥

किती उपदेश करावा खळासी । नावडे तयासी बरें कांहीं ॥ १ ॥
शुद्ध हे वासना नाहीं चांडाळाची । होळी आयुष्याची केली तेणें २
नाहीं शुद्ध भाव नाइके वचन । आपणा आपण नाडियेलें ॥ ३ ॥
तुका ह्मणे त्यासी काय व्याली रांड । करितो बडबड रात्रंदिवस ४

॥ २९५३ ॥

गातां आइकतां कांटाळा जो करी । त्रास त्या अघोरीं कुंभपाकीं १॥
रागें यमधर्म जाचविती तया । तुज दिले कासया मुख कान २ ॥
विषयांच्या सुखें अखंड जागसी । न वजे एकादशी जागरणा ३ ॥
वेचूनिया द्रव्य सेवी मद्यपान । नाहीं दिलें अन्न अतीतासी ॥ ४ ॥
तीर्थाटण नाहीं केले उपकार । पाळिलें शरीर पुष्ट लोभें ॥ ५ ॥
तुका ह्मणे केला मग साहे दंड । नाइकती लंड सांगितलें ॥ ६ ॥

॥ २९५४ ॥

जातो न येतिया वाटा । काय निरपितो करंटा ॥ १ ॥ कैसा जालासे बेश्रम । लाज नाहीं न ह्मणे राम ॥ २ ॥ पाहे वैरियाकडे । डोळे वासुनिया रडे ॥ ३ ॥ बांधुनिया यमा हातीं । दिला नाहीं त्याची खंती ॥ ४ ॥ नाहीं यांपें काम । ऐसें जाणे तो अधम ॥ ५ ॥ अझुन तरि मुका । कां रे झालासि ह्मणे तुका ॥ ६ ॥

॥ २९५५ ॥

बुद्धिमंदा शिरीं । भार फजिती पदरीं ॥ १ ॥ जाय तेथें अपमान । पावे हानि थुंकी जन ॥ २ ॥ खरियाचा पाड । मागें लावावें लिगाड ॥ ३ ॥ तुका ह्मणे करी । वर्म नेणें भरोवरी ॥ ४ ॥

॥ २९५६ ॥

साकरेच्या गोण्या बैलाचिये पाठी । तयासी सेवटीं करबाडें ॥ १ ॥
मालाचे पै पेटे वाहाताती उंटे । तयालागीं कांटे भक्षावया ॥ २ ॥
वाउगा हा धंदा आशा वाढविती । बांधोनिया देती यमा हातीं ३
ज्यासी असे लाभ तोचि जाणे गोडी । येर तीं बापुडीं सिणली वाया४
तुका ह्मणे शाहणा होईं रे गव्हारा । चौऱ्यासीचा फेरा फिरो नको५

॥ २९५७ ॥

जेणें नाहीं केलें आपुलें स्वहित । पुढिलांचा घात इच्छीतसे ॥ १ ॥
संचितासी जाय मिळोनिया खोडी । पतनाची ओढी वरी हांव २ ॥
बांधलें गांठी तें लागलें भोगावें । ऐसियासी देवें काय कीजे ॥३॥
तुका ह्मणे जया गात्रा जाणे जया । पुसोनिया तया वाट चाले ॥४॥

॥ २९५८ ॥

स्तवूनिया नरा । केला आयुष्याचा मातेरा ॥ १ ॥ नारायणाचिया लोपें । घडलीं अवघींचि पापें ॥ २ ॥ जीव ज्याचें दान । त्याचा खंडूनिया मान ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाणी । आइके त्या दोष कानीं ॥४॥

॥ २९५९ ॥

ढालतरवारे गुंतले हे कर । ह्मणे तो झुंझार कैसा झुंजों १ पेटी पडदळे सिले टोप ओझें । हें तों जालें दुजें मरणमूळ २ बैसविलें मला येणें अश्वापरी । धांवू पळूं तरी कैसा आतां ॥ ३ ॥

असोनि उपाय ह्मणे हे अपाय । ह्मणे हाय हाय काय करूं ॥ ४ ॥
तुका ह्मणे हा तों स्वयें परब्रह्म । मूर्ख नेणे वर्म संतचरण ॥ ५ ॥

॥ २९६० ॥

जयाशी नाहीं एकादशी व्रत । जाणावें तें प्रेत शव लोकीं ॥ १ ॥
त्याचे दिवस नित्य काळ लेखीताहे । रागें दांत खाय करकरा ॥२॥
जयाचिये द्वारीं तुळसीवृंदावन । नाहीं तें स्मशान गृह जाणा ॥३॥
जये कुळीं नाहीं एकही वैष्णव । त्याचा बुडे भव नदीतापा ॥ ४ ॥
विटोबाचें नाम नुच्चारी जें तोंड । प्रत्यक्ष तें कुंड चर्मकाचें ॥ ५ ॥
तुका म्हणे त्याचे काष्ठ हातपाय । कीर्तना नव जाय हरीचिया ॥६॥

॥ २९६१ ॥

संसार करितो मोठ्या महत्वानें । दिसे लोकां उणें न कळे त्या १॥
पवित्रपण आपुलें घरच्यासीच दिसे । बाहेर उदास निंदिताती २॥
आपणा कळेना आपले अवगुण । पुढिलाचे दोषगुण वाखाणिती ३
विषयाचे ध्यासें जग बांधियेलें । म्हणोनी लागले जन्ममृत्यु ॥ ४ ॥
तुका म्हणे माझें संचितचि असें । देवाजीचें पिसें सहजगुण ॥ ५ ॥

॥ २९६२ ॥

किती सोसिती करंटीं । नेणों संसाराची आटी । सर्वकाळ पोटीं । चिंतेची हळहळ ॥१॥ रिकामिया तोंडें राम । काय उच्चारितां श्रम । उफराटा भ्रम । गोवी विषय माजिरा ॥२॥ कळतां न कळे । उघडे झाकियेले डोळे । भरलें त्यांचे चाळे । अंगीं वारें मायेचें ३ तुका ह्मणे जन । ऐसें नांवबुद्धिहीन । बहुरंगे भिन्न । एकीं एक निमालें ॥४॥

॥ २९६३ ॥

झालों म्हणती त्याचें मज वाटे आश्चर्य । ऐका नव्हे धीर वचन माझें
शिजलिया अन्ना ग्वाही दांत हात । जिव्हेसी चाखत नकळे कैसें २
तापलिया तेलीं बावन चंदन । बुंद एक क्षण शीतळ करी ॥ ३ ॥
पारखी तो जाणे अंतरींचा भेद । मूढजना छंद लावण्यांचा ॥ ४ ॥
तुका ह्मणे कसीं निवडे आपण । शुद्ध मंद हीन जैसें तैसें ॥ ५ ॥

॥ २९६४ ॥

लोभावरी ठेवुनि हेत । करी असत्य न्याय नीत ॥ १ ॥ त्याच्या पूर्वजां पतन। नरकीं किडे होती जाण ॥ २ ॥ कोटिगोहत्यापातक। त्यासी घडेल निष्टंक ॥ ३ ॥ मांसा श्रवे जे सुंदरा । पाजी विटाळ पितरां ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसियासी । यम गांजील सायासी ॥ ५ ॥

॥ २९६५ ॥

राउळासी जातां त्रास मानी मोटा । बैसतो चोहोटां आदरेशीं ॥१॥
न करी स्नान संध्या म्हणे रामराम । गुडगुडीचें प्रेम अहर्निशी २॥

देवब्राह्मणाशीं न जाई शरण । दासीचे चरण वंदी भावें ॥ ३ ॥
सुगंध चंदन सांडोनिया माशी । बसे दुर्गंधीशीं अति आदरें ॥ ४ ॥
तुका ह्मणे अरे ऐक्य भाग्यहीना । कां रे रामराणा विसरसी ॥ ५ ॥

॥ २९६६ ॥

संतांच्या हेळणें बाटलें जें तोंड । प्रत्यक्ष तें कुंड चर्मकाचें ॥ १ ॥
भेसळीचें वीर्य ऐशा अनुभवें । आपुलें परावें नाहीं खळा ॥ २ ॥
संतांचा जो शोध करितो चांढाळ । धरावा विटाळ बहु त्याचा ३ ॥
तुका ह्मणे केली प्रज्ञा या साठीं । कांहीं माझे पोटीं शंका नाहीं ॥४॥

॥ २९६७ ॥

ह्मणे विठ्ठल पाषाण । त्याच्या तोंडावरी वाहाण ॥१॥ नको नको दर्शन त्यांचें । गलितकुष्ट भरो वाचे २ शाळिग्रामासि ह्मण धोंडा। किडे पडोत त्याच्या तोंडा ॥ ३ ॥ भावी सद्गुरु मनुष्य । त्याचें खंडो कां आयुष्य ४ हरिभक्ताच्या करी चेष्टा । त्याचे तोंडीं पडो विष्टा ५ तुका ह्मणे किती ऐकों । कोठवरी मर्यादा राखों ॥ ६ ॥

॥ २९६८ ॥

हरिची हरिकथा नावडे जया । अधम म्हणतां तया वेळ लागे ॥१॥
मनुष्यदेहीं तया नाट लागलें । अघोर साधिलें कुंभपाक ॥ २ ॥
कासया जन्मा आला तो पाषाण । जंत कां होऊन पडिला नाहीं ॥३॥
उपजे मरोनि वेळोवेळा भांड परि न धरी लंड लाज कांहीं ॥ ४ ॥
ऐसियाची माता कासया प्रसवली । वर नाहीं घातली मुखावरी ५
देवधर्माविण चांडाळ हा नर । न साहे भूमि भार क्षणभरी ॥ ६ ॥
राम म्हणतां तुझें काय रे वेचलें । कां हित आपुलें न विचारिसी ७
जन्मोजन्मींचा होईल नरकीं । तुका ह्मणे चुकी जरी यासी ॥ ८ ॥

॥ २९६९ ॥

कांहीं नित्यनेमाविण । अन्न खाय तोचि श्वान । वायां मनुष्यपण । भार वाहे तो वृषभ ॥ १ ॥ त्याचा होय भूमी भार । नेणे यातीचा आचार । जाला दावेदार । भोगवी अघोर पितरांसि ॥ २ ॥ अखंड अशुभ वाणी । खरें न बोलेचि स्वप्नीं । पापी तयाहुनी । आणीक नाहीं दुसरा ॥ ३ ॥ पोट पोसी एकला । भूतीं दया नाहीं ज्याला। पाठीं लागे आल्या । अतिताचे दाराशीं ॥ ४ ॥ नाहीं संतांचें पूजन । न घडे तीर्थांचें भ्रमण । यमाचा आंदण । सीण थोर पावेल ॥ ५ ॥ तुका ह्मणे त्यांनीं । मनुष्यपणा केली हानी । देवा विसरूनि । गेलीं ह्मणतां मी माझें ॥ ६ ॥

॥ २९७० ॥

भक्ति ज्याची थोडी । पूर्ण विषयांची गोडी ॥ १ ॥ तो नराधि नव्हे

पाहीं । खर जाणावा तो देहीं ॥ २ ॥ भजन पूजनही नेणें । काय स्वरूपासी जाणे ३ तुका ह्मणे त्याला । भोवंडून बाहेर घाला ४ ॥

॥ २९७१ ॥

देव अवघे प्रतिपादी । वंदी सकळां एका निंदी ॥ १ ॥ तेथें अवघें गेलें वाया । विष घास एके ठाया ॥ २ ॥ सर्वांग कुरवाळी । उपटी एक रोमावळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे चित्त । नाहीं जयाचें अंकित ॥ ४ ॥

॥ २९७२ ॥

कींविलवाणा झाला आतां । दोष करितां न विचारी ॥१॥ अभिलाषी नारी धन । झकवी जन लटिकेंचि २ विश्वासिया करितां घात । न धरी चित्त कांटाळा ३ तुका ह्मणे नाहीं आला । वृथा गेला जन्मासी ॥४॥

॥ २९७३ ॥

जेणें मुखें स्तवी । तेंचि निंदेपाठीं लावी ॥ १ ॥ ऐशी अधमाची । याती । लोपी सोनें खाय माती ॥ २ ॥ गुदद्वारां वाटे । मिष्टान्नांचा नरक लोटे ॥ ३ ॥ विंचु लाभेविण । तुका ह्मणे वाहे शीण ॥ ४ ॥

॥ २९७४ ॥

आसुरी स्वभाव निर्दय अंतर । मानसीं निष्ठुर अतिवादी ॥ १ ॥
याति कुळ येथें असे अप्रमाण । गुणाचें कारण असे अंगीं ॥ २ ॥
काळेकूट पितळ सोनें शुद्ध रंग । अंगाचेंच अंग साक्षी देती ॥ ३ ॥
तुका म्हणे वरी जातीसवें भेटी । नवनीत पोटीं सांठविलें ॥ ४ ॥

॥ २९७५ ॥

दुर्बळ हें अवघें जन । नारायणीं विमुख १ झाडोनिया हात जाती । पात्र होती दंडासी ॥ २ ॥ सिदोरी तें पापपुण्य । सवें सिण भिकेचा ३ तुका म्हणे पडिला दाहो । कैसा पाहा हो लटिक्याचा ४

॥ २९७६ ॥

द्रव्य असतां धर्म न करी । नागवला राजद्वारीं ॥ १ ॥ माय त्यासि व्याली जेव्हां । रांड सटवी नव्हती तेव्हां २ कथाकाळीं निद्रा लागे । कामीं श्वानापरी जागे ३ भोग स्त्रियेसि देतां लाजे । वस्त्र दासीचें घेउनि निजे ॥ ४ ॥ तुका म्हणे जाण । नर गाढवाहुनी हीन ॥ ५ ॥

॥ २९७७ ॥

सज्जन तो शब्द सत्य जो मानी । छळी दुर्जन आणिकांसी ॥ १ ॥
एक गुण तो केलासे दोंठायीं । ज्याचा त्यास पाहीं जैसा तैसा २
भाविक तो शब्द बोले वाणीचा । लटिका वाचा वाचाळ तो ३
परउपकार घडे तोचि भला । नाठ्याळ तयाला दया नाहीं ॥ ४ ॥
जाणीवंत तोचि पायरी जाणे । अधम तो नेणे खुंट जैसा ॥ ५ ॥
हित तें अनहित केलें कैसें । तुका ह्मणे पिसें लागलें त्या ॥ ६ ॥

॥ २९७८ ॥

तोंडें खाये फार । पादे बोचा करी मार ॥१॥ एक ऐसे ते शा-

ह्मणे । आपुलें अधीन तें नेणे ॥ २ ॥ कुले घालूनि उघडे । रागें पाहे लोकांकडे ॥ ३ ॥ खेळे मृतकर्म । मग बोंबली जुलूम ॥ ४ ॥ निजतां आला मोहो । वीतां ह्मणे मेला गोहो ॥ ५ ॥ तुका ह्मणे त्यांनीं । मनुष्यपणा केली हानी ॥ ६ ॥

॥ २९७९ ॥

गोविंदावांचोनि वदे ज्याची वाणी । हगवण घाणी पिटपिट ते ॥१॥ मस्तक सांडुनि खिसफुल्ल गुडघीं । चार तो अवघा बावळ्याचा २ अंगभूत म्हूण पूजितो बाहाणा । म्हणतां शाहाणा येईल कैसा ॥३॥ तुका ह्मणे वेश्या सांगे सवासिणी । इतर पूजनीं भाव तैसा ॥ ४ ॥

॥ २९८० ॥

यमपुरी त्यांनीं वसविली जाणा । उच्छेद भजना विधि केला ॥१॥ अवघड कोणी न करी सांगतां । मुळस बहुतां गोड वाटे ॥ २ ॥ काय ते नेणते होते मागें ऋषी । आधार लोकांसी ग्रंथ केले ॥ ३ ॥ द्रव्य दारा कोणें स्थापियेलें धन । पिंडाचें पाळण विषयभोग ॥४॥ तुका ह्मणे दोहीं ठायीं हा फजित । पावे यमदूत जना हातीं ॥ ५ ॥

॥ २९८१ ॥

अगत्य ज्या नरका जाणें । कीर्तनीं तो वीट मानी १ नावडेसा झाला बाप । आलें पाप तस्तीसी ॥२॥ नारायण नाहीं वाचे । तें यमाचें अंदण ॥३॥ तुका ह्मणे अभक्तासी । माता दासी जग जोडी ॥४॥

॥ २९८२ ॥

नेदावी सलगी न करावा संग । करी चित्ता भंग वेळोवेळा ॥ १ ॥ सर्प शांतिरूप न म्हणावा भला । झोंबे खवळला तात्काळ तो २ ॥ तुका म्हणे दुरी राखावा दुर्जन । करावें वचन न घडे तें ॥ ३ ॥

॥ २९८३ ॥

याचा कोणी करी पक्ष । तोही त्यासी समतुल्य ॥१॥ फुकासाठीं पावे दुःखाच्या विभाग । पूर्वजांसि लाग निरयदंडीं ॥२॥ एकें राजा न करी दंड । जरि या लंड दुष्टासि २ तुका म्हणे त्याचें अन्न । मद्यपानासमान ४

॥ २९८४ ॥

दानें कांपे हात । नावडे तोविशीं मात ॥१॥ कथी चावटीचे बोल । हिंग क्षीरीं मिथ्या फोल ॥ २ ॥ न वजती पाय । तीर्था ह्मणे वेचूं काय ॥ ३ ॥ तुका ह्मणे मनीं नाहीं । न ये आकारातें कांहीं ॥ ४ ॥

॥ २९८५ ॥

उपदेश किती करावा खळासी । नावडे तयासी बरें कांहीं ॥ १ ॥ शुद्ध कां वासना नव्हे चांडाळाची । होळी संचिताची केली तेणें २ नाहीं भाव मनीं नाइके वचन । आपला आपण उणें घेतो ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्यासी काय व्याली रांड । करी बडबड रिती दिसे ४ ॥

॥ २९८६ ॥

चाहाडाची माता । व्यभिचारीण तत्वता ॥१॥ पाहे संतांचें उणें । छिद्र छळावया सुनें ॥२॥ जाणों त्याच्या वाचे । कांहीं सोडिलें गांठीचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे घात । व्हावा ऐसी जोडी मात ॥ ४ ॥

॥ २९८७ ॥

तीर्थ जळ देखे पाषाण प्रतिमा । संत ते अधमा माणसांऐसें ॥ १ ॥ वांजेच्या मैथुनापरी गेलें वाया । बांडेल्याचें जाया झालें पीक ॥ २ ॥ अभाविक सदा सुतकी चांडाळ । सदा तळमळ चुकेचि ना ॥ ३ ॥ तुका ह्मणे वरदळी ज्याची दृष्टी । देहबुद्धि कष्टी सदा दुःखी ॥ ४ ॥

॥ २९८८ ॥

संतनिंदा ज्याचे घरीं । नव्हे घर ते यमपुरी ॥१॥ त्याच्या पापा नाहीं जोडा । संगें जना होय पीडा ॥२॥ संतनिंदा आवडे ज्यासी । तो जिताचि नर्कवासी ॥३॥ तुका ह्मणे तो नष्ट । जाणा गाढव तो स्पष्ट ४

॥ २९८९ ॥

संत देखोनिया स्वयें दृष्टी टाळी । आदरें न्याहाळी परस्त्रीसी ॥ १ ॥ वीट ये कर्णासी संतवाक्यामृता । स्त्रीशब्द ऐकतां निवे कर्ण ॥२॥ कथेमाजी निज वाढे नित्यक्षणीं । स्त्रियेचे कीर्तनीं प्रेमें जागे ॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही क्रोधासी न यावें । स्वभावा करावें काय कोणी ४

॥ २९९० ॥

संता नाहीं मान । देव मानी मुसलमान ॥१॥ ऐसे पोटाचे मारिले । देवा आशा विटंबिले ॥ २ ॥ घाली लोटांगण । वंदी नीचाचे चरण ॥ ३ ॥ तुका ह्मणे धर्म । न कळे माजल्याचा भ्रम ॥ ४ ॥

॥ २९९१ ॥

विद्या अल्प परी गर्वाशिरोमणी । मजहुनी ज्ञानी कोण आहे ॥ १ ॥ अंगीं भरला ताठा कोणाचें मानीना । साधूची छळणा स्वयें करी २ साधूचे देहाचा मानी जो विटाळ । त्रिलोकीं चांडाळ तोचि एक ३ संतांचि जो निंदा करितो या मुखें । खतेला सकळ पापें तोचि एक४ तुका ह्मणे ऐसे मावेचे मईद । त्यापाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥ ५ ॥

॥ २९९२ ॥

तुळसीवृंदावनीं उपजला कांदा । नावडे गोविंदा कांहीं केल्या ॥ १ ॥ तैसे वंशामध्यें झाले जे मानव । जाणावे दानव अभक्त ते ॥ २ ॥ केवळ्यामधील निर्गंध कणसें । तैशीं तीं माणसें भक्तिहीन ॥ ३ ॥ तुका ह्मणे जेवीं चंदनांतील आळी । न चढे निढळीं देवाचिया ४ ॥

॥ २९९३ ॥

आणिकांच्या कापिती माना । निष्ठुरपणा पार नाहीं १ करिती बेटे उसणवारी । यमपुरीं भोगावया २ सेंदराचें दैवत केलें । नवस बोले तयासि ३ तुका म्हणे नाचति पोरें । खोडितां येरें अंग दुखे ॥४॥

॥ २९९४ ॥

[illegible]ल्यासी नाहीं द्या उपकार । काळिमा अंतर विटाळसें ॥ १ ॥ नेणे कुछनाचें जिणें अमंगळ । घाणेरी वोंगळ वदे वाणी ॥ २ ॥ कडू कोंवळ्याचा उपचारें पाक । सेविल्या तिडीक कपाळासी ॥ ३ ॥ तुका म्हणे विष सांडूं नेणे स्वाद । आदरें तें पाप त्याचे ठायीं ॥ ४ ॥

॥ २९९५ ॥

माकडें मुठी धरिले फुटाणे । गुंतलें तें नेणे हात तेथें ॥ १ ॥ काय नी नयाचा [illegible] अन्याय । हित नेणें काय आपुलें तें ॥ २ ॥ शुकें नळिकेसी गोविलें पाय । विसरोनि जाय पक्ष दोन्ही ॥ ३ ॥ तुका म्हणे एक ऐसे पशु जीव । न चले उपाव कांहीं तेथें ॥ ४ ॥

॥ २९९६ ॥

सोनियाचें ताट क्षीरीनें भरिलें । भक्षावया दिलें श्वानालागीं ॥ १ ॥ मुक्ताफळहार खरास घातला । कस्तुरी शुकराला चोजाविली ॥ २ ॥ वेदशास्त्र बधिरा सांगे ज्ञान । नयाची ते खुण काय जाणे ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याचें तोचि एक जाणे । भक्तीचें महिमान साधु जाणे ॥ ४ ॥

॥ २९९७ ॥

दिवाळणें नाक आधीं । पुढील ओढी कळेना ॥ १ ॥ निरयगांवीं भोग देना । तेथें स्वजा आणिकांची ॥ २ ॥ अवगुणांचा सांठा करी । नेंम धरी आयासी ॥ ३ ॥ तुका म्हणे जडबुद्धि । कर्मशुद्धी सांडवी ॥ ४ ॥

॥ २९९८ ॥

फळ्याचें बहु केंड नाहीं ना स्वाद । आपुल्यानि वाद आपणासी ॥ १ ॥ कोणा या शब्दांनि मरोनि भरणी । अंतरें शाहाणी राहिजे हो ॥ २ ॥ [illegible] भुंके आइकोनी कानीं । काय कोल्ह्याणी फिरवियेले ॥ ३ ॥ तुका म्हणे त्यासी शब्दें वचन । त्याचे येती गुण आंगास ते ॥ ४ ॥

॥ २९९९ ॥

विष भरी मया अमृत पारिखें । वोंगळानि सखे वोंगळाचें ॥ १ ॥ नये पाहों कांहीं गोव्हयाईचा अंत । म्हणी ठाका संत दुर्जनाचे ॥ २ ॥ अंतरलिया बीज अमंगळ गुण । उपजवी सीण दृष्टपणें ॥ ३ ॥ तुका म्हणे हीं भूं जया घरीं धन । तेथें तें कारण कासयानें ॥ ४ ॥

॥ ३००० ॥

दुर्जनाची जाती । त्याचे तोंडी पडे माती ॥ १ ॥ त्याची बुद्धि त्यासी नाडी । याचें अनुचित बडबडी ॥ २ ॥ पाहे संताकडे । दोषदृष्टी पाहे वांकडें ॥ ३ ॥ उंच नीच नाहीं । तुका म्हणे कळा कांहीं ॥ ४ ॥

॥ ३००१ ॥

नागलें दुर्जनीं चांगलें बोले । आपुलें येचूनि त्याजपुढें खुळे ॥ १ ॥ स्वधर्माचे आंगाळ गुण । उचित नेणें तो धर्म कोण ॥ २ ॥

आर्तभूता न घाली पाण्याचा चुळ । न मागे त्यासी घाली साखरगुळ ३
एकासी आड पडोनी होकरी । एकासी देखोनि लपवी भाकरी ४॥
एकासी धड न बोले वाचा । एकासी ह्मणे मी तुझे बांदीचा ॥५॥
तुका ह्मणे ते गाढवपशु । लाभेंविण केला आयुष्यनाशु ॥ ६ ॥

॥ ३००२ ॥

गाढव शृंगारिलें कोडें । कांहीं केल्या नव्हे घोडें १ त्याचें भुंकणें न राहे । स्वभावासी करील काये २ श्वान शिबिकें बैसविलें भुंकतां न राहे उगलें ३ तुका ह्मणे स्वभावकर्म । कांहीं केल्या न सुटे धर्म ॥४॥

॥ ३००३ ॥

कांहीं दुसरा विचार । नलगे करावाचि फार ॥ १ ॥ सेटया ना चौधरी । पांडेपण वाहे शिरीं ॥२॥ पाप नलगे धुंडावें । पाहिजे तरि तेथें जावें ॥३॥ जकातीचा धंदा । तेथें पाप वसे सदा ॥४॥ गाई म्हैसी हेड । तूप विक्री महा द्वाड ५ तुका ह्मणे पाहीं । तेथें पुण्या रीघ नाहीं ६

॥ ३००४ ॥

पापी तो नाठवी आपुल्या संचिता । ठेवी भगवंता वरी बोल ॥१॥
भेईना करितां पापाचे डोंगर । दुर्जन पामर दुराचारी ॥ २ ॥
नाठवी तो खळ आपुली करणी । देवासी निंदोनि बोलतसे ॥ ३ ॥
तुका म्हणे त्याच्या तोंडा लागो कांटी । नाहीं जगजेठी जया चित्तीं ४

॥ ३००५ ॥

अंगीं ब्रह्मक्रिया खिस्तीचा व्यापार । हिंडे घरोघर चांडाळांचे ॥१॥
अंत्यजाची खिचडी घेताती मागून । गाळियाप्रदान मायबहिणी २
उत्तमकुळीं जन्म क्रिया अमंगळ । बुडविलें कूळ उभयतां ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसी कलियुगाची चाली । स्वार्थें बुडविलीं आचरणें ४

॥ ३००६ ॥

खिस्तीचा उदीम ब्राह्मण कलयुगीं । महारवाडीं मांगीं हिंडतसे १ ॥
बेवसाव करितां पर्वत मांगासी । ते पैं विटाळासी न मानिती २ ॥
मांगिणीशीं नित्य करीतसे लेखा । तोंडावरी थुंका पडतसे ॥ ३ ॥
आशा माया रांडा नांव हें कागदीं । आठवीना कधीं नारायण ॥४॥
तुका म्हणे देह झाला पराधीन । पांडुरंगाविण गति नाहीं ॥ ५ ॥

॥ ३००७ ॥

बीजीं फळाचा भरंवसा । जतन सिंचनासरिसा । चाविलिया आसा । काकुलती ते नाड ॥१॥ हा तो गडसंदीचा ठाव । पिके पिकविला भाव । संकोचोनि जीव । दशा केली जतन ॥ २ ॥ माती घाली धनावरी । रांडा रोटा वरीवरी । सुखाचें सेजारीं । दुःख भ्रमें भोगीतसे ॥ ३ ॥ तुका म्हणे दिशाभुली । झाल्या उफराटी चाली । निवाडाची बोली । अनुभवे साक्षीसी ॥ ४ ॥

॥ ३००८ ॥

कथा पुराण ऐकतां । झोंपें नाथिलें तत्त्वता । खाटेवरि पडतां । व्यापी चिंता तळमळ ॥ १ ॥ ऐसी गहन कर्मगति । काय तयासी रडती । जाले जाणते जो चित्तीं । कांहीं नेघे आपुला ॥ २ ॥ उदक लावितां न धरे । चिंता करी केव्हां सरे । जाऊं नका धीरे । म्हणे करितां ढवाळ्या ॥ ३ ॥ जवळी गोंचिड क्षीरा । जैसी कमळणी दर्दुरा । तुका म्हणे दुरा । देशत्यागें तयासी ॥ ४ ॥

॥ ३००९ ॥

कळे परि न सुटे गांठीं । जालें पोटीं कुपथ्य ॥ १ ॥ अहंकाराचें आंदणें जीव । राहे कींव केली ते ॥ २ ॥ हेंकडाची एकीच वोढी । तेही खोडी सांगती ३ तुका म्हणे सांगों किती । कांहीं चित्तीं न राहे ॥४॥

॥ ३०१० ॥

कंठीं कृष्णमणी । नाहीं अशुभ ते वाणी ॥ १ हो का नर अथवा नारी । रांड तया नांवें खरी ॥ २ ॥ नाहीं हातीं दान । शूरपणाचें कांकण ॥ ३ ॥ वाळियेली संतीं । केली बोडोनि फजिती ॥ ४ ॥ तुका म्हणे ताळा । नाहीं त्याची अवकळा ॥ ५ ॥

॥ ३०११ ॥

बीजापोटीं पाहे फळ । विघ्न न करितां सकळ ॥ १ ॥ तया मूर्ख म्हणावें वेडें । कैसें तुटे सांकडें ॥ २ ॥ दावितिया वाट । चेठीं धरूं पाहे चाट ॥ ३ ॥ पुढिल्या उपाया । तुका ह्मणे राखे काया ॥ ४ ॥

॥ ३०१२ ॥

खद्योतें फुलविलें रविपुढें ढुंग । साक्षी तंव जग उभयतां ॥ १ ॥ आपल्या आपण नाहीं शोभा येत । चार करी स्फीत दाखवूनि २ ॥ खाणार ताकाचें असे तें माजीरें । आपणेंचि अधीर कळों येतें ३॥ तुका म्हणे जळो मैंदाची मवाळी । दावूनिया नळी कापी सुखें ४ ॥

॥ ३०१३ ॥

अभक्ताचे साधु गांवीं ह्मणजे काय । व्याघ्रवाडा गाय सांपडली १ कसाबाचे आळी मांडिलें प्रमाण । बस्वणाची आण तया काई २ ॥ केळी आणि बोरी वसती सेजारी । संवाद कोणे परी घडे तेथें ३॥ तुका ह्मणे खीर केली कान्हेळ्याची । शुद्ध गोडी कैची वसे तेथें ४

॥ ३०१४ ॥

नाहीं देवाचा विश्वास । करी संतांचा उपहास ॥१॥ त्याचे तोंडीं पडे माती । हीन शूकराची जाती ॥२॥ घोकुनी अक्षरें । वाद छळणा करीत फिरे ॥३॥ म्हणे देवासी पाषाण । तुका म्हणे भावहीन ॥४॥

॥ ३०१५ ॥

जाणिवेच्या भारें चेंपला उर । सदा बुरबुर सरेचि ना ॥ १ ॥

किती याचें पेकों कानीं । मारिलें वाणीं नाळकरी ॥ २ ॥
मिठेंविण आळणी बोल । कोरडी फोल घसघस ॥ ३ ॥
तुका म्हणे डेंगा न कळे हित । किती फजित करूं तरी ॥ ४ ॥

॥ ३०१६ ॥

माकडा दिसती कंवटी नारळा । भोक्ता तो निराळा वरील सारी ॥१॥
एका रस एका तोंडीं पडे माती । आलुलाले नेती विभाग ते ॥ २ ॥
सुनियांसी क्षीर चारिल्या ओकवी । भोक्ता तो सेवी धणीवरी ॥ ३ ॥
तुका म्हणे भार वागविती मूर्ख । नेतील ते सार परीक्षक ॥ ४ ॥

॥ ३०१७ ॥

दुबळें सदैवा । ह्मणे नागवेल केव्हां ॥१॥ आपणाऐसें करूं पाहे । स्वभावासी करिल काये ॥ २ ॥ मूढ सभे आंत । इच्छी पंडिताचा घात ॥३॥ गाढे देउनिया शूरा । उगी करिती बुरबुरा ॥४॥ आणिकांचा हेवा । न करी शरण जाई देवा ॥ ५ ॥ तुका म्हणे किती । करूं दुष्टाची फजिती ॥ ६ ॥

॥ ३०१८ ॥

निंबाचिया झाडा साकरेचें आळें । आपुलीं तीं फळें न संडीच ॥१॥
तैसें अधमाचें अमंगळ चित्त । वमन तें हित करूनि सांडी ॥ २ ॥
परिसाचे अंगीं लाविलें खापर । पालट अंतर नेघे त्याचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे वेळू चंदनासंगतीं । काय ते असती जवळिक ॥ ४ ॥

॥ ३०१९ ॥

मांस खातां हाउस करी । जोडोनि वैरी ठेवियेला ॥ १ ॥ कोण त्याची करील कींव । जीवें जीव नेणती ॥ २ ॥ पुडिलांसाठीं पाजवी सुरी । आपुली चोरी अंगुळी ॥३॥ तुका ह्मणे कुटिती हाडें । आपुल्या नाडें रडतील ॥ ४ ॥

॥ ३०२० ॥

सिंदळीचे सोइरे चोराचीया दया । तोही जाणा तया संसर्गीं १ ॥
फुकासाठीं भोगी दुःखाचा तो वाटा । उभारोनि कांटा वाटेवरी २॥
सर्प पोसूनिया दुधाचाही नाश । केलें थीता विष अमृताचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे यासी न करितां दंडण । पुढिल्या खंडण नव्हे दोषा ४॥

॥ ३०२१ ॥

काय वृंदावन मोहियेलें गुळें । काय जिरें काळें उपचारिलें ॥ १ ॥
तैसी अधमाची जातीच अधम । उपदेश श्रम करावा तो ॥ २ ॥
न कळे विंचासी कुरवाळिलें अंग । आपले ते रंग दावीतसे ॥ ३ ॥
तुका ह्मणे नये पाकासी दगड । शूकरासी गोड जैसी विष्ठा ॥ ४ ॥

॥ ३०२२ ॥

सुगरणीबाई थिता नास केला । गुळ तो घातला भाजी मध्यें ॥ १ ॥

क्षीरीमध्यें हिंग दुधामध्यें बोळ । थितेंचि वोंगळ कैसें केलें ॥ २ ॥ दळण दळोनी भरूं गेली पाळी । भरडोनि वोंगळी नास केला ॥ ३ ॥ कापुराचे सांते आणिला लसण । वागवितां सीण दुःख होय ॥ ४ ॥ रत्नाचा जोहारी रत्नची पारखी । येर देखोदेखीं हातीं घेती ॥ ५ ॥ तुका ह्मणे जरी योग घडे निका । न घडतां थुंका तोंडावरी ॥ ६ ॥

॥ ३०२३ ॥

कावळ्याच्या गळां मुक्ताफळमाळा । तरी काय त्याला भूषण शोभे १ गजालागीं केला कस्तुरीचा लेप । तिचें तो स्वरूप काय जाणे ॥२॥ बकापुढें सांगे भावार्थवचन । वाउगाचि सीण होय त्यासी ॥ ३ ॥ तुका म्हणे तैसे अभाविक जन । त्यांसी वाया सीण करूं नये ॥४॥

॥ ३०२४ ॥

कोणा चिंता आड । कोणा लोकलाज नाड ॥ १ ॥ कैचा राम अभागिया । करी बडबड वाया ॥ २ ॥ स्मरणाचा राग । क्रोधें विटाळलें अंग ॥३॥ तुका ह्मणे जडा । काय चाले त्या दगडा ॥ ४ ॥

॥ ३०२५ ॥

लटिक्याचे वाणी चवी ना सवाद । नाहीं कोणां वाद रुची येत ॥१॥ अन्याय तो त्याचा नव्हे वायचाळा । मायबापीं वेळा न साधिली २ अनावर अंगीं प्रबळ अवगुण । तांतडीनें मन लाहो साधी ॥ ३ ॥ तुका म्हणे दोष आणि अवकळा । न पडतां ताळा घडतसे ॥ ४ ॥

॥ ३०२६ ॥

दर्पणासी नखटें लाजे । शुद्ध खिजे देखोनि ॥१॥ ऐसें अवगुणांच्या बाधे । दिसे सुदें विपरीत ॥२॥ अंधळयासी काय हिरा । गारांचि तो सारिखा ॥३॥ तुका म्हणे भूंके सुनें । ठाया नेणे ठाव तो ॥४॥

॥ ३०२७ ॥

संसाराचे धांव वेठी । आवडी पोटीं कवडी ॥ १ ॥ हागों जातां दगड सांची । अंतरींही संकल्प ॥२॥ लाज तेवढी नारायणीं । बांकडी वाणी पोरांपे ॥ ३ ॥ तुका म्हणे बेशरमा । श्रमायेगी पडिभरू ॥ ४ ॥

॥ ३०२८ ॥

कैसा सिंदळीचा । नव्हे ऐशी ज्याची वाचा ॥ १ ॥ याचें नुचारी गोविंदा । सदा करी परनिंदा ॥ २ ॥ कैसा निरयगांवा । जाऊं न पवे विसावा ॥ ३ ॥ तुका ह्मणे दंड । कैसा न पवे तो लंड ॥ ४ ॥

॥ ३०२९ ॥

जन्मांतरिचा पारिट व्हावी । जात ठावी त्यानें ते ॥१॥ वाखर जैसा [illegible] । तोंड करी संवदणी ॥२॥ पूर्वजन्म शिखासूत्र । मळ मूत्र [illegible] तुका ह्मणे करिती निंदा । धुवटधंदा पुढिलांचा ॥ ४ ॥

॥ ३०३० ॥

महार माते चपणी भरे । न कळे खरें पुढील ॥१॥ वोंगळ अधमाचे गुण । जातां घडी नलगेचि ॥ २ ॥ श्वान झोळी स्मामिसत्ता । कोप येतां उतरे ३ तुका ह्मणे गुमान कां । सांगों लोकां अधमासी ॥ ४ ॥

॥ ३०३१ ॥

ऐसें ठावें नाहीं मूढा । सोस काकुलती पुढां ॥ १ ॥ माझी नका जाळूं भांडीं । पोटीं भय सोस तोंडीं २ पातलिया काळ । तेव्हां काय चाले बळ ३ सांचित तें करी । नरका जाय मेल्यावरी ४ परउपकार । न घडावा हा विचार ५ तुका ह्मणे लांसी । आतां भेटो नये ऐसी ॥६॥

॥ ३०३२ ॥

लाडाच्या उत्तरीं वाढविती कळहे । हा तो अमंगळ जातिगुण १ ॥ तमाचे शरीरीं विटाळचि वसे । विचाराचा नसे लेश तोही ॥ २ ॥ कवतुकें घ्यावे लेंकराचे बोल । साहिलिया मोल ऐसें नाहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय उपदेश खळा । न्हाउनि काउळा क्षतें धुंडी ॥ ४ ॥

॥ ३०३३ ॥

कुतऱ्याऐसें ज्याचें जिणें । संग कोणी न करीजे ॥१॥ जाय जिकडे हाडहाडी । गोऱ्हवाडीच सोइरीं २ अवगुणांचा त्याग नाहीं । खवळे पाहीं उपदेशें ३ तुका ह्मणे कैंची लवी । ठेंग्या केवीं अंकुर ॥ ४ ॥

॥ ३०३४ ॥

वेद शास्त्र नाहीं पुराण प्रमाण । तयाचें वदन नावलोका ॥ १ ॥ तार्किंयाचें अंग आपणा पारिखें । माजिऱ्यासारिखें वाईचाळे २ ॥ माता निंदी तया कोण तो आधार । भंगलें खापर याचे नांवें ३ ॥ तुका ह्मणे आडराणें ज्याची चाली । तयाची ते बोली मिठेंविण ४॥

॥ ३०३५ ॥

दुर्जनाचे जोडी । सज्जनाचे खेटर तोडी १ पाहे निमित्य तें उणें । धांवे छळावया सुनें २ न ह्मणे रामराम । मनें वाचे हेंचि काम ३ ॥ तुका ह्मणे भागा । आली निंदा करी मागा ॥ ४ ॥

॥ ३०३६ ॥

दुर्जनासि करी साह्य । तोही लाहे दंड हे १ शिंदळीच्या कुंटणी वाटा । संग खोटा खोट्याचा २ येरा येरा कांचणी भेटे । आगी उठे तेथूनी ३ तुका ह्मणे कापूं नाकें । पुढें आणिकें शिकविती ॥ ४ ॥

॥ ३०३७ ॥

दुर्जनाचें अंग अवघेंचि सरळ । नर्काचा कोथळ सांटवण ॥ १ ॥ खाय अमंगळ बोले अमंगळ । उठवी कपाळ संघट्टणें ॥ २ ॥ सर्पामंत्र चाले धरावया हातीं । खळाची ते जाती निखळचि ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं न साहे उपमा । आणीक अधमा वोखट्याची ४ ॥

॥ ३०३८ ॥

दुर्जनाचा मान । सुखें करावा खंडन ॥१॥ लात हाणोनिया वारी । गुंडा । वाट शुद्ध करी ॥ २ ॥ बहुतां पीडी खळ । त्याचा धरावा विटाळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे नखें । काढूनि टाकिजे तीं सुखें ४ ॥

॥ ३०३९ ॥

सापें ज्यासी खावें । तेणें प्राणासी मुकावें ॥ १ ॥ काय लाधला दुर्जन । तोंडावरी थुंकी जन ॥ २ ॥ विंचु हाणी नांगी । अग्न लावी आणिकां अंगीं ॥३॥ तुका ह्मणे जाती । नरक पाउलीं चालती ॥४॥

॥ ३०४० ॥

काय ढोरापुढें घालुनि मिष्टान्न । खरा विलेपन चंदनाचें ॥ १ ॥
नको देवा खळाचि संगति । रस ज्या पंगती नाहीं कथे ॥ २ ॥
काय सेज बाज माकडा विलास । अळंकारा नाश करूनि टाकी ३ ॥
तुका ह्मणे काय पाजूनि नवनीत । सर्पा विष थीत अमृताचें ॥ ४ ॥

॥ ३०४१ ॥

दुष्टाचें चित्त न भिजे अंतरीं । जरी जन्मवरी उपदेशिला ॥ १ ॥
पालथे घागरी घातलें जीवन । न धरीच जाण तेंही त्याला ॥ २ ॥
जन्मा येउनि तेणें पतनचि साधिलें । तमोगुणें व्यापिलें जया नरा ३
जळो जळो हें त्याचें ज्यालेपण । कासया हें आलें संवसारा ॥४॥
पाषाण जीवनीं असतां कल्पवरी । पाहातां अंतरीं कोरडा तो ॥५॥
कुचर मुग नयेचि पाका । पाहातां सारिखा होता तैसा ॥ ६ ॥
तुका ह्मणे असे उपाय सकळां । न चले या खळा प्रयत्न कांहीं ७
ह्मणउनि संग न करितां भला । धरिता अबोला सर्व हित ॥ ८॥

॥ ३०४२ ॥

दिवट्या वाद्यें लावुनि खाणें । करुनि मंडण दिली हातीं ॥ १ ॥
नवरा नेई नवरी घरा । पूजन वरा पायाचें ॥ २ ॥
गौरविली विहीण व्याही । घडिलें कांहीं ठेवूं नका ॥ ३ ॥
करूं द्यावें व्हावें बरें । ठायींचें कां रे न कळेचि ॥ ४ ॥
वऱ्हाडियांचे लागे पाठीं । जैसी उटिका तेली ॥ ५ ॥
तुका ह्मणे जोडिला थुंका । पुढें नरका सामुग्री ॥ ६ ॥

॥ ३०४३ ॥

दुर्जनाची गंधी विष्टेचिया परी । देखोनिया दुरी व्हावें तया ॥ १ ॥
आइका हो तुह्मी हे मात सज्जन । करूं संघष्टन नये बोलों ॥ २ ॥
दुर्जनाचे अंगीं अखंड विटाळ । वाणी रजस्वला स्रवे तैशी ॥ ॥३
दुर्जनाचें भय धरावें त्यापरी । पिसाळलेवरी धावें श्वान ॥ ४ ॥
दुर्जनाचा भला नव्हे अंगसंग । बोलिलासे त्याग देशाचा त्या ॥५॥
तुका ह्मणे किती सांगावें पृथक । अंग कुंभपाक दुर्जनाचें ॥ ६ ॥

॥ ३०४४ ॥

नये पाहों मुख मात्रागमन्याचें । तैसें अभक्ताचें गुरुपुत्रा ॥ १ ॥
ह्मणऊनि बरें धरितां एकांत । तेणें नव्हे घात भजनासी ॥ २ ॥
नये होऊं कदा निंदकाची भेटी । जया द्वैत पोटीं चांडाळाच्या ॥३॥
तुका ह्मणे नका बोलों त्यासी गोष्टी । जयाचिया दृष्टी पाप वाढे ४॥

॥ ३०४५ ॥

हुंदकी पिसवी हलवी दाढी । मणी ओढी निंदेचे ॥ १ ॥
त्याचें फळ पाकीं यमाचे दंड । घर केलें कुंड कुंभपाक ॥ २ ॥
क्रोध पोटीं मांग आणिला अंतरा । भुंकोन कुतरा जप करी ॥ ३ ॥
तुका ह्मणे स्नान केलें मळमूत्रें । जेवविलीं पितरें अमगंळ ॥ ४ ॥

॥ ३०४६ ॥

देखोनि पुराणिकाची दाढी । रडे फुंदे नाक ओढी ॥ १ ॥ प्रेम खरें दिसे जना । भिन्न अंतरीं भावना ॥ २ ॥ आवरितां नावरे । खुर आठवी नेवरे ॥ ३ ॥ बोलों नये मुखावाटां । ह्मणे होता ब्यांचा तोटा ॥ ४ ॥ दोन्हीं सिंगें चारी पाय । खुणा दावी ह्मणे होय ॥५॥ मना आणितां बोकड । मेला त्याची चरफड ॥६॥ होता भाव पोटीं । मुखा आलासे सेवटीं ॥७॥ तुका ह्मणे कुडें । कळों येतें तें रोकडें ॥८॥

॥ ३०४७ ॥

आड पडे काडी । तरि ते बहुत पाणी खोडी ॥१॥ दुर्जनाचे संगती । बहुतांचे घात होती ॥ २ ॥ एक पडे मासी । तरी ते बहु अन्न नासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे रांड । ऐसी कां ते व्याली भांड ॥ ४ ॥

॥ ३०४८ ॥

धिग तो दुर्जन नाहीं भूतदया । व्यर्थ तया माया प्रसवली ॥ १ ॥
कठिण हृदय तया चांडाळाचें । जो नेणे पराचें दुःख कांहीं ॥ २ ॥
आपुला हा प्राण तैसे सकळ लोक । न करी विवेक पशु जैसा ॥३॥
तुका ह्मणे सुखें कापीतसे गळे । आपुलिया वेळे रडतसे ॥ ४ ॥

॥ ३०४९ ॥

दोराच्या आधारें पर्वत चढला । पाउलासाठीं केला अपघात ॥ १ ॥
अष्टोत्तरशें व्याधि ज्या वैद्य दवडुनी । तो वैद्य मारूनि उत्तीर्ण झाला
नव मास माया वाहिलें उदरीं । ते माता चौबारीं नग्न केली ॥ ३ ॥
गायत्रीचें क्षीर पिळुनी घेउनी । उपवासी बांधोनी ताडन करी ॥४॥
तुका ह्मणे दासां निंदी त्याचें तोंड । पाहातां नरककुंड पूर्वजांसी ५

॥ ३०५० ॥

न विचारितां ठायाठाव । काय भुंके तो गाढव ॥१॥ केला तैसा लाहे दंड । खळ अविचारी लंड ॥२॥ करावें लाताळें । ऐसें नेणे कोण्या काळें ॥ ३ ॥ न कळे उचित । तुका ह्मणे नीत हित ॥ ४ ॥

॥ ३०५१ ॥

एक ते गाढव मनुष्याचे वेष । हालविती पुंस पुढें दाढी ॥ १ ॥
निंदा हें भोजन जेवण तयांसी । जोडी घरीं रासी पातकांच्या २ ॥
तुका ह्मणे सुखें बैसोनिया खाती । कुंभिपाकीं होती नर्कवासी ॥३॥

॥ ३०५२ ॥

रोगिया मिष्टान्न मर्कटा चंदन । कागासी लेपन कर्पूराचें ॥ १ ॥
निर्नासिका जैसा नावडे आरिसा । मूर्खालागीं तैसा शास्त्रबोध २
दास तुका ह्मणे विठ्ठल उदारें । अज्ञान अंधारें दूरी केलें ॥ ३ ॥

॥ ३०५३ ॥

महारासी शिवे । कोपे ब्राह्मण तो नव्हे ॥१॥ तया प्रायश्चित्त कांहीं । देहत्याग करितां नाहीं ॥ २ ॥ नातळे चांडाळ । त्याचा अंतरीं विटाळ ॥ ३ ॥ ज्याचा संग चित्तीं । तुका ह्मणे तो ते याती ॥४॥

॥ ३०५४ ॥

जातीचा ब्राह्मण । न करितां संध्यास्नान ॥१॥ तो एक नांवाचा ब्राह्मण । होय हीनाहूनि हीन ॥ २ ॥ सांडुनिया शालिग्राम । नित्य वेश्येचा समागम ॥३॥ नेघे संतांचें जो तीर्थ । अखंड वेश्येचा जो आर्त ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसे पापी । पाहूं नका पुनरपि ॥ ५ ॥

॥ ३०५५ ॥

अभक्त ब्राम्हण जळो त्याचें तोंड । काय त्यासी रांड प्रसवली ॥१॥
वैष्णव चांभार धन्य त्याची माता । शुद्ध उभयतां कुळयाती ॥ २ ॥
ऐसा हा निवाडा झालासे पुराणीं । नोहे माझी वाणी पदरींची ३॥
तुका ह्मणे आगी लागो थोरपणा । दृष्टि त्या दुर्जना न पडो माझी ४

॥ ३०५६ ॥

मुदल जतन झालें । मग लाभाचें काय आलें ॥१॥ घरीं देउनि अंतर गांठी । राखा पारिख्या न सुटे मिठी २ घाला पडे थोडें न वारे । काम मैंदाचेंच पेटे ३ तुका ह्मणे वरदळ खोटें । फांसे अंतरीच्या कपटें ॥४॥

॥ ३०५७ ॥

गाढवाचें तानें । पालटणें क्षणक्षणें ॥ १ ॥ तैसे अधमाचे गुण । एकविध नाहीं मन ॥ २ ॥ उपजतां बरें दिसे । रूप वाढतां तें नासे ॥ ३ ॥ तुका ह्मणे भुंकते वेळे । वेळ अवेळ न कळे ॥ ४ ॥

॥ ३०५८ ॥

वरगासाठीं खादलें शेण । मिळतां अन्न न संडी १ फजित तो केला लाहे । ताडण साहे गौरव २ ओढाळाची ओंगळ ओढी । उगी खोडी नवजाय ३ तुका फजीत करी बुच्या । विसरे कुच्या खोडी तेणें ४

॥ ३०५९ ॥

नावडे तरि कां येतील हे भांड । घेउनिया तोंड काळें येथें ॥ १ ॥
नासोनिया जाय रस यासंगती । खळाचे पंगती नारायण ॥ २ ॥

तोंडावाटा नर्क काढी अमंगळ । मिष्टान्ना विटाळ करी सुनें ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं संतांची मर्यादा । निंद्य तोचि निंदा मायझवा ॥४॥

॥ ३०६० ॥

जेवीं नवज्वरें तापलें शरीर । लागे तया क्षीर विषतुल्य ॥ १ ॥
तेवीं परमार्थ जींहीं दुराविला । तयालागी झाला सन्निपात ॥ २ ॥
कामिनी जयाच्या जाहाली नेत्रासी। देखी तो चंद्रासी पीतवर्ण ३॥
तुका ह्मणे मद्यपानाची आवडी। न रुचे त्या गोडी नवनीताची ॥४॥

॥ ३०६१ ॥

रासभ धुतला महा तीर्थामाजी । नव्हे जैसा तेजी शामवर्ण ॥ १ ॥
तेवीं खळा काय केल्या उपदेश । नव्हेचि मानस शुद्ध त्याचें ॥२॥
सर्पासी पाजिलें शर्करापीयुष । अंतरींचें विष जाऊं नेणे ॥ ३ ॥
तुका ह्मणे श्वाना क्षिरीचें भोजन । सवेंचि वमन जेवीं तया ॥ ४ ॥

॥ ३०६२ ॥

अवघ्या कोल्ह्यांचें वर्म अंडीं । धरितां तोंडीं खीळ पडे १ भुंकूं नका भुंकूं नका । आला तुका विष्णुदास २ कवणे ठायीं सादर व्हावें । नाहीं ठावें गाढवा ३ दुर्जनासी पंचानन । तुका रजरेण संतांचा ४

॥ ३०६३ ॥

स्मशान ते भूमि प्रेतरूप जन । सेवाभक्तिहीन ग्रामवासी ॥ १ ॥
भरतील पोट श्वानाचिया परी । वस्ति दिली घरीं यमदूता ॥ २ ॥
अपूज्य लिंग तेथें अतित नेघे थारा । ऐसी वस्ती चोरां कंटकाची३
तुका ह्मणे नाहीं ठावी स्थिति मती । यमाची निश्चिती कुळवाडी ४

॥ ३०६४ ॥

श्वान शीघ्रकोपी । आपणा घातकर पापी ॥ १ ॥ नाहीं भीड आणि धीर । उपदेश न जिरे क्षीर ॥ २ ॥ माणसांसि भुंके । विजातीनें द्यावे थुंके ॥३॥ तुका ह्मणे चित्त । मळिण करा तें फजित ॥ ४ ॥

॥ ३०६५ ॥

वृंदावना केलें साकरेचें आळें । न संडे वेगळें कडुपण ॥ १ ॥
कावळयाचें पिलूं कौतुकें पोशिलें । न राहे उगलें । विष्टेविण ॥ २॥
क्षेम देतां अंगा गांधेलाची पोळी । करवी नादळी महाशब्द ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसे न होती ते भले । घालिती ते घाले साधुजना ४ ॥

॥ ३०६६ ॥

मणि पडिला दाढेसी मकरतोंडीं । सुखें हस्तेंचि काढवेल प्रौढी १॥
परि मूर्खांचें चित्त बोधवेना । दुधें कूर्मीच्या पालवेल सेना २ ॥
सकळ पृथ्वी हिंडतां कदाचित । ससीसिंगाची प्राप्त होय तेथें ३ ॥
अतिप्रयत्नें गाळितां गाळुवेतें । दिव्य तेलाची प्राप्त होय तेथें ॥ ४ ॥

अतिक्रोधें खवळला फणी पाही । धरूं येतो मस्मकीं पुष्पप्रायी ५॥
पाहा ब्रह्मानंदेंचि एकीं हेळा । महापातकी तो तुका मुक्त केला ६॥

॥ ३०६७ ॥

अधमाचें चित्त अहंकारी मन । उपदेश शीण तया केला ॥ १ ॥
पापियाचें मन न करी आचार । विधवे शृंगार व्यर्थ केला ॥ २ ॥
अधमाचें चित्त दुश्चित ऐकेना । वाया सीण मना करूं काय ॥ ३ ॥
गर्दभासी दिली चंदनाची उटी । केशर ललाटीं शुकराच्या ॥ ४ ॥
पतिवंचकेसी सांगतां उदंड । परि ते पाषांड तिचे मनीं ॥ ५ ॥
तुका ह्मणे तैसें अभाविका सांगतां । वाउगाचि चित्ता सीण होय ६

॥ ३०६८ ॥

दावूनिया मांड । पुरे न करीती भांड ॥ १ ॥ जळो जळो तैसें जिणें । फटमर लाजिरवाणें ॥ २ ॥ घेतलें तैसें सोंग । बरवें संपादावें सांग ॥ ३ ॥ तुका ह्मणे धीरें । देव नुपेक्षील खरें ॥ ४ ॥

॥ ३०६९ ॥

घरीं रांडा पोरें मरती उपवासी । सांगे लोकांपासीं थोरपण ॥ १ ॥
नेऊनिया घरा दाखवावें काय । काळतोंडा जाय चुकावूनि ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी जाणों त्या प्रमाण । ठकावे हे जन तैसे नहों ॥३॥

॥ ३०७० ॥

गुरुपादाग्रींचें जळ । त्यास मानी जो विटाळ ॥१॥ संतीं पाळिला जो खळ । नरकीं पचे चिरकाळ ॥ २ ॥ गुरुतीर्थी अनमान । यथासांग मद्यपान ॥ ३ ॥ गुरुअंगुष्टा न चोखी । मुख घाली वेश्येमुखीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे सांगों किती । मुखीं पडो त्याचे माती ॥ ५ ॥

॥ ३०७१ ॥

जातों वाराणसी । निरवी गाई घोडे म्हैसी ॥१॥ गेलों येतों नाहीं ऐसा । सत्य मानावा भरंवसा ॥ २ ॥ नका काढूं माझीं पेवें । तुम्ही वरळा भूस खावें ॥३॥ भिकारियाचे पाठीं । तुम्ही घेउनि लागा काटी ॥४॥ सांगाल जेवाया ब्राह्मण । तरी कापाल माझी मान ॥५॥ बोकालिया बोका । म्यां खर्चिला नाहीं रुका ॥ ६ ॥ तुम्हीं खावें ताकपाणी । जतन करा तूप लोणी ॥ ७ ॥ नाहीं माझें मनीं । पोरें रांडा नागवणी ॥८॥ तुका ह्मणे नष्ट । होतें तैसें बोले स्पष्ट ॥ ९ ॥

॥ ३०७२ ॥

उद्धत त्या जाती । द्रवें रंगल्या उद्धती ॥१॥ ह्मणउनि बहु फार । त्यांसी असावें अंतर ॥२॥ कैचें पाठी पोट । गोडविषासी सेवट ३ तुका ह्मणे सापा । न कळे कुरवाळिलें बापा ॥ ४ ॥

॥ ३०७३ ॥

जेवितांही घरी । नाक हागतिया परी ॥ १ ॥ ऐसियाचा करी

चाळा । आपुलीच आवकळा ॥२॥ सांडावें मांडावें । काय ऐसें नाहीं ठावें ॥ ३॥ तुका ह्मणे करी । ताक दुधा एक सरी ॥ ४॥

॥ ३०७४ ॥

शिंद्ळा साल्याचा नाहीं हा विश्वास । बाईल तो त्यास न विसंबे १ दुष्ट बुद्धि चोरी करी निरंतर । तो ह्मणे इतर लोक तैसे ॥ २ ॥ तुका ह्मणे जया चित्तीं जे वासना । तयाची भावना तयापरी ॥३॥

॥ ३०७५ ॥

चुंबळीचा करी चुंबळीशीं संग । अंगीं वसे रंग क्रियाहीन ॥ १ ॥ बीजा ऐसें फळ दावी परिपाकीं । परिमळ लौकिकीं जाती ऐसा २ माकडाच्या गळां रत्न कुळांगना । सांडुनिया सुना बिदी धुंडी ॥३॥ तुका ह्मणे ऐसा व्याली ते गाढवी । फजिती ती व्हावी आहे पुढें ४

॥ ३०७६ ॥

आधींच आळशी । वरी गुरूचा उपदेशी ॥१॥ मग त्या कैंची अड-काठी । विधिनिषेधाची भेटी ॥ २ ॥ नाचरवे धर्म । न करवे विधि-कर्म ॥ ३ ॥ तुका ह्मणे ते गाढव । घेती मनासवें धांव ॥ ४ ॥

॥ ३०७७ ॥

गाढवाचे अंगीं चंदनाची उटी । राखेसवें भेटी केली तेणें ॥ १ ॥ सहज गुण जयाचिये देहीं । पालट ते कांहीं नव्हे तया ॥ २ ॥ माकडाचे गळां मोलाचा तो मणि । घातला चावुनि टाकी थुंकोनी ३ तुका ह्मणे खळा नावडे हित । अविद्या वाढवी आपुले मतें ॥ ४ ॥

॥ ३०७८ ॥

नेणें सुनें चोर पाहुणा मागता । देखून भलता भुंकतसे ॥ १ ॥ शिकविलें कांहीं न चले ते तया । बोलियेले वाया बोल जाती २॥ क्षीर ओकुनिया खाय अमंगळ । आपुली ते ढाळ जाऊं नेदी ॥ ३ ॥ वंदूं निंदूं संता काय दुराचार । खळाचा विचार तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ३०७९ ॥

कुचराचे श्रवण । गुणदोषांवरि मन १ असोनिया नसे कथे । मूर्ख अभागी ते तेथें २ निरर्थक कारणीं । कान डोळे वेची वाणी ३ पापाचे सांगाती । तोंडीं ओढाळांचे माती ४ हिताचिया नांवें । वोस पडिले देहभावें ॥५॥ फजीत करूनि सोडी । तुका करी बोडाबोडी ॥ ६ ॥

॥ ३०८० ॥

शादीचें तें सोंग । संपादितां राजा व्यंग ॥ १ ॥ पाहा कैसी विटं-बना । मूर्खा अभाग्याची जना ॥२॥ दिसतें तें लोपी । झिज्या वों-दुनिया पापी ३ सिंदळी त्या सती । तुका ह्मणे थुंका घेती ॥ ४॥

॥ ३०८१ ॥

गयाळाचें काम हिताचा आवारा । लाज फजितखोरा असत नाहीं १

चित्ता न मिळे तें डोळां सलों येतें । असावें परतें जवळूनि ॥ २ ॥
न करावा संग न बोलावी मात । सावधान चित्त नाहीं त्यासी ३
तुका ह्मणे दुःख देतील माकडें । घालिती सांकडें उफराटें ॥ ४ ॥

॥ ३०८२ ॥

मद्यें मातलें नागवें नाचे । अनुचित वाचे बडबडी ॥ १ ॥
आतां शिकवावा कोणासी विचार । कर्म तें दुस्तर करवी धीट २॥
आलें अंगासी तें बळिवंत गाढें । काय वेड्यापुढें धर्मनीत ॥ ३ ॥
तुका ह्मणे कळों येईल तो भाव । अंगावरि घाव उमटतां ॥ ४ ॥

॥ ३०८३ ॥

कर्कश संगति । दुःख उदंड फजिती ॥१॥ नाहीं इह ना परलोक । मजुर दिसे जैसें रंक ॥ २ ॥ वचन सेंटावर । त्याचें ठेवूनि धिकार ३ तुका ह्मणे पायीं बेडी । पडिलीं कपाळीं कुऱ्हाडी ॥ ४ ॥

॥ ३०८४ ॥

हागिल्याचे सिंके वोणवाचि राहे । अपशकुन पाहे वेडगळ ॥ १ ॥
अत्यंत समय नेणतां अवकळा । येऊं नये बळा सिंक धरा ॥ २ ॥
भोजनसमयीं ओकाचा आठव । ठकोनिया जीव कष्टी करी ॥ ३ ॥
तुका ह्मणे किती सांगों उगवून । अभाग्याचे गुण अनावर ॥ ४ ॥

॥ ३०८५ ॥

वेडिया उपचार करितां सोहाळे । काय सुख कळे तयासी तें ।
अंधापुढें दीप नाचती नाचणें । भक्तिभावेंविण भक्ति तैसी ॥ १ ॥
तिमाणें रावण ठेवियेलें सेता । वाळुनिया माथा चुना तया ।
खादलें ह्मणोनि सेवटीं बोंबली । ठायींची भुली कां नेणां त्या २ ॥
मुकियापासाव सांगतां पुराण । रोगिया मिष्टान्न काय होय ।
नपुंसका काय करील पद्मिणी । रुचिविण वाणी तैसे होय ॥ ३ ॥
हात पाय नाहीं करिल तो काय । वृक्षा फळ आहे अमोलिक ।
हातां नये तैसा वायाच तळमळी । भावेंविण भोळीं ह्मणे तुका ॥४॥

॥ ३०८६ ॥

क्षीर मागे तया रायतें वाढी । पाघांनी गधडी ऐसा नांवें ॥ १ ॥
समयो जाणां समयो जाणां । भलतें नाणां भलतेथें ॥ २ ॥
अमंगळ वाणी वदवी मंगळीं । अशुभ वोंगळी शोभेन तें ॥ ३ ॥
तुका ह्मणे नेणें समयो ठाया ठाव । राहाडी ते वाव नरकाडी ॥ ४॥

॥ ३०८७ ॥

फोडुनि सांगडी बांधली माजासी । पैल थडी कैसी पावे सहजीं १
आपला घात आपणचि करी । आणिक सांगतां नाइके तरी ॥ २ ॥
भुकेभेणें विष देऊं पाहे आतां । आपल्याचि घाता करूं पाहे ॥ ३ ॥
तुका ह्मणे एक चालतील पुढें । तयांसी बांकडें आतां ठके ॥ ४ ॥

॥ ३०८८ ॥

कामातुर चव्ही सांडी । बरळ तोंडीं बरळे ॥ १ ॥ रंगलें तें अंगीं दावी । विष देववी आसडे ॥२॥ धनसोसें लागे वेड । ते बडबड शमेना ॥३॥ तुका ह्मणे वेसनें दोन्ही । नर्कखाणीं भोगावया ॥ ४ ॥

॥ ३०८९ ॥

देहा लावी वात । पालव घाली जाली रात ॥१॥ वेडी ते वेडी बहुतच वेडी । चाखतां गोडी चवी नेणें ॥ २ ॥ कडिये मूल भोंवतें भोंये । मोकलुनि रडे धाये ॥ ३ ॥ लेंकरें वित्त पुसे जगा । माझा गोहो कोण तो सांगा ॥४॥ आपुली शुद्धि जया नाहीं । आणिकांची ते जाणे काई ॥५॥ तुका ह्मणे ऐसे जन । नरका जाता राखे कोण ६ ॥

॥ ३०९० ॥

मांडवाच्या दारा । पुढें आणिला ह्मातारा ॥ १ ॥ ह्मणे नवरी आणा रांड । जाळा नवऱ्याचें तोंड ॥ २ ॥ समय न कळे । काय उपयोगीं ये वेळे ॥ ३ ॥ तुका ह्मणे खरा । येथूनिया दूर करा ॥ ४ ॥

॥ ३०९१ ॥

मातेचीं जो थानें फाडी । तया जोडी कोण ते ॥ १ ॥ वेदां निंदी तो चांडाळ । भ्रष्ट सुतकीया खळ ॥ २ ॥ अगी लावी घरा । मग वसती कोठें थारा ॥ ३ ॥ तुका जाणे वर्म । येरा नाचवितो भ्रम ॥ ४ ॥

॥ ३०९२ ॥

अति झालें उत्तम वेश्येचें लावण्य । परि ते सवासीण न म्हणावी १ उचित अनुचित केले ठाया ठाव । गुणा मोल वाव थोरपणा ॥ २ ॥ शूरत्वावांचूनि शूरांमाजी ठाव । नाहीं आविर्भाव आणिलीया ॥३॥ तुका ह्मणे सोंग पोटाचे उपाय । कारण कमाईविण नाहीं ॥ ४ ॥

॥ ३०९३ ॥

सावित्रीचें विटंबण । रांडपण करीतसे ॥१॥ काय जाळावें तें नांव । अवघें वाव असे तें ॥ २ ॥ कुबेर नांव मोळी वाहे । कैसी पाहें फजिती ॥ ३ ॥ तुका ह्मणे ठुणगुण देखें । उगीं मूर्खें फुंदतां ॥४॥

॥ ३०९४ ॥

सामावें कारण । नाहीं सोसत धरणें १ लाही थींके लाजिरवाणी । हीनकमाईची घाणी ॥ २ ॥ पुष्प जवळी नाका । दुर्गंधीच्या नांवें थुंका ॥ ३ ॥ तुका ह्मणे किती । उपदेशहीन जाती ॥ ४ ॥

॥ ३०९५ ॥

वडिलें दिलें भूमिदान । तें जो मागे अभिलाशून ॥१॥ अग्रपूजेचा अधिकारी । श्रेष्ठ दंड यमा घरीं ॥ २ ॥ उभयकुल समवेत । नरकीं प्रवेश अद्भुत ॥ ३ ॥ तप्तलोहें भेटी । तुका ह्मणे कल्पकोटी ॥ ४ ॥

॥ ३०९६ ॥

आचरे दोष न धरी धाक । परिपाक दुःखाचा ॥१॥ चांडल तो दुरा-

चारी। अंगीकारी कोण त्या ॥२॥ नव्हे संतान घोस घर। अंधकार कुळासी ॥ ३॥ तुका ह्मणे त्याचें दान। घेतां पतन दुःखासी ॥४॥

॥ ३०९७ ॥

सदा तळमळ। चित्ताचीहे हळहळ ॥ १ ॥ त्याचें दर्शन न व्हावें। शव असतां तो जिवें ॥ २ ॥ कुशब्दाची घाणी। अमंगळविली वाणी ॥ ३ ॥ नेणें शब्द पर। तुका ह्मणे परउपकार ॥ ४ ॥

॥ ३०९८ ॥

काय केलें जळचरीं। ढविर त्यांच्या घातावरी ॥१॥ हा तों ठायींचा विचार। आहे यातिवैराकार ॥ २ ॥ श्वापदातें वधी। निरपराधें पारधी ॥ ३ ॥ तुका ह्मणे खळ। संतां पीडिती चांडाळ ॥ ४ ॥

॥ ३०९९ ॥

अंगा भरला ताठा। नये वळणी जैसा खुंटा ॥ १ ॥ कैसें न कळे त्या डेंगा। हित आदळलें अंगा ॥ २ ॥ जीव जाते वेळे। भरे लकडा ताटी डोळे ॥ ३ ॥ मुसळाचें धनु। तुका ह्मणे नव्हे अनु ॥ ४ ॥

॥ ३१०० ॥

दर्पणासी बुजे। नखटें तोंड पळवी लाजे ॥ १ ॥ गुण ज्याचे जो अंतरीं। तोचि त्यासि पीडा करी ॥२॥ चोरा रुचे निशी। देखोनि-या विटे शशी ॥३॥ तुका ह्मणे जन। देवा असे भाग्यहीन ॥ ४ ॥

॥ ३१०१ ॥

काय ह्याचें घ्यावें। नित्यानित्य कोणें गावें ॥१॥ केलें हरिकथेनें वाज। अंतरोनि जाते निज ॥ २ ॥ काम संसार। अंतरीं हे करकर ॥ ३ ॥ तुका ह्मणे हेंड। ऐसे मानिती ते लंड ॥ ४ ॥

॥ ३१०२ ॥

आणिकांच्या घातें। ज्यांचीं निवतील चित्तें ॥ १ ॥ तेचि ओळखावे पापी। निरयवासी शीघ्रकोपी ॥२॥ कान पसरोनी। ऐके वदे दुष्ट वाणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे भांडा। धीर नाहीं ज्याच्या तोंडा ॥ ४ ॥

॥ ३१०३ ॥

जाळें घातलें सागरीं। बिंदु न राहे भीतरी ॥ १ ॥ तैसें पापि-याचें मन। तया नावडे कीर्तन ॥ २ ॥ गाढव गंगेसी न्हाणिलें। जाउनि उकरड्यावरी लोळे ॥ ३ ॥ प्रीति पोशिलें काउळें। जाउनि विष्ठेवरी लोळे ॥४॥ तुका ह्मणे तैसी हरी। कीरड्या नावडे कस्तुरी ॥५

॥ ३१०४ ॥

निंदक तो परउपकारी। काय वर्णूं त्याची थोरी। तो रजका-हुनि भला। परि सर्व गुणें आगळा ॥ १ ॥ नेघे मोल धुतो फुका। पाय वरच्यावरी देखा। करीतसे साधका। शुद्ध सरते तिहीं लोकीं ॥ २ ॥ मुखसंवदणी सांगातें। अवघे सांठविलें तेथें। जिव्हा

साबण निरुतें । दोष काढी जन्माचे ॥ ३ ॥ तया ठाव यमपुरीं । वास करणें अघोरीं । त्यासी दंडण करी । तुका ह्मणे न्हाणी ते ॥ ४ ॥

॥ ३१०५ ॥

जीवें जीव नेणे पापी सारिखाचि । नळी दुजयाची कापूं बैसे ॥ १ ॥ आत्मा नारायण सर्वां घटीं आहे । पशुमध्यें काय कळों नये ॥ २ ॥ देखत हा जीव हुंबरे वरडत । निष्ठुराचे हात वाहाती कैसे ॥ ३ ॥ तुका म्हणे तया चांडाळासी नर्क । भोगिती अनेक महादुःखें ॥४॥

॥ ३१०६ ॥

मोलियांच्या रांडा इच्छिती लेंकरूं । लाज नाहीं धरूं प्रीत कैशी ॥१॥ मागिलां पुढिलां एक सरोबरी । काळाची पेटारी खांदा वाहे ॥ २ ॥ आन दिसे परी मरणेंचि खरें । सांपळा उंदिरें सामाविलीं ॥ ३ ॥ तुका म्हणे झाली मनाची परती । निवळली ज्योती दिसों आली ४

॥ ३१०७ ॥

चाकरीवांचून । खाणें अनुचित वेतन ॥ १ ॥ धणी काढोनिया निजा । करील ये कामाची पूजा ॥ २ ॥ उचितावेगळें । अभिलाषें तोंड काळें ॥ ३ ॥ सांगे तरी तुका । पाहा लाज नाहीं लोकां ॥ ४ ॥

॥ ३१०८ ॥

गहूं एक जाती । परी त्या पाथाणी नासती ॥ १ ॥ वर्म जाणावें तें सार । कोठें काय थोडें फार ॥ २ ॥ कमाईच्या सारें । जाती दाविती प्रकार ॥ ३ ॥ तुका ह्मणे मोल । गुणा मिथ्या फिके बोल ४

॥ ३१०९ ॥

गोमट्या बीजाचीं फळेंही गोमटीं । बाहे तेचि पोटीं समतुक ॥१॥ जातीच्या संतोषें चित्तासी विश्रांति । परतोनि मागुती फिरों नेणें २ खऱ्याचे पारखी येत नाहीं तोटा । निवडे तो खोटा ढाळें दुरी ३॥ तुका ह्मणे मज सत्याची आवडी । करितां तांतडी येत नाहीं ॥४॥

॥ ३११० ॥

जाणे वर्तमान । परि तें न वारे त्याच्यानें ॥ १ ॥ तोही कारणांचा दास । देव म्हणवितां पावे नास ॥ २ ॥ वेची अनुष्ठान । सिद्धी कराया प्रसन्न ॥३॥ तुका ह्मणे त्याचें । मुदल गेलें हाटवेचें ॥ ४ ॥

॥ ३१११ ॥

लटिकें तें रुचे । साच कोणांही न पचे ॥ १ ॥ ऐसा माजल्याचा गुण । भोगें कळों येईल सीण ॥ २ ॥ वाढवी ममता । नाहीं वरपडला तो दूतां ॥३॥ कांहीं न मनी हेकड । तुका उपदेश माकड ४॥

॥ ३११२ ॥

चंदनाचे गांवीं सर्पाची वसति । भोगिती ते होती द्विपांतरीं ॥ १॥ एका ओझें एका लाभ घडे देवा । संचिताचा ठेवा वेगळाला २॥

क्षीराची वसति अशुद्ध सेवावें । जवळी तें जावें भोगें दुरी ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसी बुद्धि ज्याची जड । त्याहुनी दगड बरे देवा ॥ ४ ॥

॥ ३११३ ॥

तोडुनि पुष्पवटिका फळवृक्षयाती । बाभळा राखती करूनि सार १
कोण हित तेणें देखिलें आपुलें । आणीक पाहिलें सुख काई ॥२॥
धान्य बीज जेणें जाळिलीं सकळें । पेरितो कारळें जिरें बीज ॥३॥
मोडोनिया वाटा पुढिलांची सोय । आडरानें जाय घेउनि लोकां ४
विषाचें अमृत ठेवूनिया नाम । करितो अधम ब्रह्महत्या ॥ ५ ॥
तुका ह्मणे त्यास नाइके सांगतां । तया हाल करितां पाप नाहीं ६॥

॥ ३११४ ॥

कामातुरा भय लाज ना विचार । शरीर असार तृणतुल्य ॥ १ ॥
नवल हे लीळा करी त्याचें लाघव । प्रारब्धें भाव दाखविले ॥ २ ॥
लोभालोभ एका धनाचिये ठायीं । आणिकांची सोई चाड नाहीं ३॥
तुका म्हणे भूक न विचारी प्रकार । योजे तें तें सार यथाकाळीं ॥४॥

॥ ३११५ ॥

बांधे सोडी हें तो धन्याचिये हातीं । हेंकड गोविती आपणां बळें१
भुललियासी नाहीं देहाचा आठव । धोतऱ्यानें भाव पालटिला २ ॥
घरांत रिघावें दाराचिये सोई । भिंतीसवें डोई घेऊनि फोडी ॥३॥
तुका ह्मणे देवा गेलीं विसरोन । आतां वर्म कोण दावी यासीं ४॥

॥ ३११६ ॥

पूर्वजांसी नरका । जाणे तें एक आइका । निंदा करावी चाहाडी । मनीं धरूनि आवडी ॥ २ ॥ मात्रागमना ऐसी । जोडी पातकांची रासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाट । कुंभपाकाची ते नीट ॥ ४ ॥

॥ ३११७ ॥

नाहीं पाइतन भूपतीशीं दावा । धिग त्या कर्तव्या आगी लागो ॥१॥
मुंगियांच्या मुखा गजाचा आहार । न साहावे भार जाय जीवें २॥
तुका म्हणे आधीं करावा विचार । शूरपणें तीर मोकलावा ॥ ३ ॥

॥ ३११८ ॥

सेवटासी जरी आलें । तरी झालें आंधळें ॥ १ ॥ स्वहिताचा लेश नाहीं । दगडा कांहीं अंतरीं २ काय परिसासवें भेटी । खापरखुंटी झालिया ॥ ३ ॥ तुका म्हणे अधम जन । अवगुणाचि वाढवी ॥ ४ ॥

॥ ३११९ ॥

चावळलें काय न करी बडबड । न ह्मणे फिकें गोड भुकेल तें ॥१॥
उमजल्याविण न धरी सांभाळ । असो खळखळ जनाची हे ॥ २॥
गरज्या न कळे आपुलिया चाडा । करावी ते पीडा कोणा काई ३॥
तुका ह्मणे भोग भोगितील भोगें । संचित तें जोगें आहे कोणा ४॥

॥ ३१२० ॥

तेज्या इशारती । तटा फोकावरी घेती ॥ १ ॥ काय सांगावें त्याहुनी । ऐका रे धरा मनीं ॥ २ ॥ नव्हे भांडखोर । ओढूनि धरूं पदर ॥ ३ ॥ तुका ह्मणे तोंड । काळें करा खालीं मुंड ॥ ४ ॥

॥ ३१२१ ॥

आचरणा ठाव । नाहीं अंगीं स्वतां भाव १ करवी आणिकांचे घात । खोडी काढूनि पंडित ॥ २ ॥ श्वानाचिया परि मिष्टान्नासि विटाळ करी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसा । सटवेचिना पांचा दिसां ॥ ४ ॥

॥ ३१२२ ॥

वेशा नाहीं बोल अवगुण दूषीले । ऐशा बोला भले ह्मणें क्षोभा १ कोण नेणें अन्न जीवाचें जीवन । विष मेळवण विष होय ॥ २ ॥ सोनें शुद्ध नेणे कोण हा विचार । डांके हीनवर केलें त्यासी ॥३॥ याती शुद्ध परि अधम लक्षण । वाया गेलें तेणें सोंगेंही तें ॥ ४ ॥ तुका म्हणे शूर तोचि पावे मान आणीक मंडण भार वाही ॥ ५ ॥

॥ ३१२३ ॥

जीवींचें जाणावें या नांवें आवडी । हेंकड तें ओढी अमंगळ ॥ १ ॥ चित्ताच्या संकोचें कांहींच न घडे । अतिशय वेडे चार तेचि ॥ २ ॥ काळाविण कांहीं नाहीं रुचों येत । करूनि संकेत ठेवियेला ॥ ३ ॥ तुका म्हणे कळे वचनें चांचणी । काय बोलवूनि वेळोवेळां ॥ ४ ॥

॥ ३१२४ ॥

गेला तरी जावो सुखें नरकासी । कळंकीं याविशीं शिवों नये १ ॥ रजस्वला करी वेलासी आघात । अंतर तो हित दुरी बरें ॥ २ ॥ उगीच कां आलीं नासवावीं फळें । विटाळ विटाळें कालवूनि ॥३॥ तुका म्हणे लोणी घालोनि शेणांत । उपेगाची मात काय असे ॥४॥

॥ ३१२५ ॥

अतित्याई बुडे गंगे । पाप लागे त्याचें त्या ॥ १ ॥ हें तों आपुलिया गुणें । असे जेणें योजिलें ॥ २ ॥ अवचटें अग्नि जाळी । न सांभाळी दुःख पावे २ जैसें तैसें द्यावी आरसा । नकटा कैसा पालटे ॥ ४ ॥

॥ ३१२६ ॥

हेंदऱ्याचे भरितां कान । हलवी मान भोंक रितें ॥१॥ नाहीं मी येथें सांगो स्पष्ट । भावें नष्ट घेत नाहीं ॥२॥ अवगुणी बाटलें चित्त । तया हित आतळे ना ३ तुका म्हणे फजितखोरा । म्हणतां बरा उगी रहा ४ ॥

॥ ३१२७ ॥

लचाळाच्या कामा नाहीं ताळावाळा । न कळे वोंगळा उपदेश ॥१॥ वचनचर्येची न कळे चांचणी । ऐसीं संघष्टनीं अमंगळ ॥ २ ॥ समयो न कळे वेडगळ बुद्धि । विजाती ते शुद्धि चांच चाड ॥३॥ तुका ह्मणे याचा धिक्कारचि बरा । बहुमति खराहूनि हीन ॥ ४ ॥

॥ ३१२८ ॥

न म्हणे वो आम्ही आपुलेनि चित्तीं। निःशेष अतिप्रीति विषयीं तो१
खोटा तो विटाळ खोटा तो विटाळ। म्हणोनि गाबाळ सांडियेलें २॥
भांगतमाखूच्या चित्ताचा आदर। कोरडें उत्तर चाटावें तें॥ ३ ॥
तुका म्हणे आम्ही नव्हों फजितखोर। तुटीचा व्यापार करावया४

॥ ३१२९ ॥

कलयुगामाजी थोर झालें बंड। नष्ट लोक लंड झाले फार॥ १ ॥
न धरिती सोय न पुसती कोणा। येतें जेसें मना तैसें चाले॥ २ ॥
सज्जनाचा वारा टेको नेदी द्वारा। ऐसिया पामरा तारी कोण ३॥
विश्वास तयाचा बैसेना कोठेंही। स्तुति निंदा पाहीं जीवीं धरी ॥४॥
तुका म्हणे कैसें केलें नारायणें। जाणावें हें कोणें तयाविण॥ ५ ॥

॥ ३१३० ॥

न मिळती एका एक। जये नगरीचे लोक॥ १ ॥ भलीं तेथें राहूं नये। क्षणें होईल न कळे काय॥ २ ॥ न करितां अन्याय। बळें करीती अपाय॥ ३ ॥ नाहीं पुराणाची प्रीति। ठायींठायीं पंचाइती ॥४॥ भल्या बुऱ्या मारी। होतां कोणी न निवारी ॥५॥ अविचाऱ्या हातीं। देऊनि प्रजा नागविती॥ ६ ॥ तुका ह्मणे दूरी। सुखें सेवावी ते बरी ॥ ७ ॥

॥ ३१३१ ॥

पायवाटें सांभाळिती। लोभाकारणें पाळिती १ तैसा नव्हे देवराव। याचा कृपाळू स्वभाव २ मनासारिखें न होतां। बाळकासी मारी माता ॥३॥ तुका ह्मणे सांगूं किती। बाप लेंकासी मारिती ॥ ४ ॥

॥ ३१३२ ॥

सत्यसंकल्पाचा दाता नारायण। सर्व करी पूर्ण मनोरथ ॥ १ ॥
येथें अळंकार शोभती सकळ। भावबळें फळ इच्छेचें तें ॥ २ ॥
अंतरींचें बीज जाणे कळवळा।। व्यापक सकळां ब्रह्मांडाचा ॥३॥
[illegible] ।अंतकाळ घडी आल्याविण ॥४॥

॥ ३१३३ ॥

काळाचिया सत्ता ते नाहीं घटिका। पंढरीनायका आठवितां ॥ १ ॥
सदा काळ गणना करी आयुष्याची। कथेचे वेळेची आज्ञा नाहीं२॥
याकारणें माझ्या विठोबाची कीर्ति। आहे हे त्रिजगतीं थोर वाट ३
तुका ह्मणे जन्मा आलियाचें फळ। स्मरावा गोपाळ तेंचि बरें ॥४॥

॥ ३१३४ ॥

जाणे अंतरींचा भाव। तोचि करितो उपाव ॥१॥ नलगे सांगावें मागावें। जीवें भावें अनुसरावें। अविनाश ध्यावें। फळ धीर

धरोनि ॥ २ ॥ बाळा न मागतां भोजन । माता घाली पाचारून ३॥
तुका ह्मणे तरी । एकीं लंघियेले गिरी ॥ ४ ॥

॥ ३१३५ ॥

करीं ऐसी धांवाधांवी । चित्त लावीं चरणापें ॥ १ ॥ मग तो माझा
मायबाप । घेइल ताप हरूनी ॥ २ ॥ बहुतांच्या मतें गोवा । होऊं
जीवा नेदावा ३ तुका ह्मणे करुणा बोले । धीर विठ्ठलें निघेना ॥४॥

॥ ३१३६ ॥

देव भक्तालागी करूं नेदी संसार । अंगे वारासार करीतसे ॥ १ ॥
भाग्य द्यावें तरी अंगें भरे ताठा । म्हणोनि करंटा करोनि ठेवी २॥
स्त्री द्यावी गुणवंती नसती गुंते आशा । यालागी कर्कश पाठी लावी३
तुका ह्मणे मज प्रचित आली देखा । आणीक या लोकां काय सांगों४

॥ ३१३७ ॥

विश्वंभर बोले । बहुत हात कान डोळे ॥१॥ जेथें असे तेथें देखे ॥
मागितलें तें आईकें ॥ २ ॥ जें जें वाटे गोड । तैसें पुरवितो
कोड ॥ ३ ॥ तुका ह्मणे भेटी । कांहीं पडों नेदी तुटी ॥ ४ ॥

॥ ३१३८ ॥

पाचारितां धावें । ऐसी ठायींची हे सवे ॥१॥ बोले करुणा वचनीं ।
करी कृपा लावी स्तनीं ॥ २ ॥ जाणे कळवळा । भावसिद्धींचा
जिव्हाळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाम । मागें मागें धावें प्रेम ॥ ४ ॥

॥ ३१३९ ॥

याचा तंव हाचि मोळा । देखिला डोळा उदंड ॥ १ ॥ नेदी मग
फिरों मागें । अंगा अंगें संचरे ॥ २ ॥ कां गा याची नेणां खोडी ।
जीभा जोडी करितसे ॥ ३ ॥ पांघरे तें बहु काळें । घोंगडेंही ठा-
यींचें ४ अंगीं वसेचि ना लाज । न ह्मणे भाज कोणाची ५ सर्वसाक्षी
अबोल्यानें । दुश्चित कोणे नसावें ॥ ६ ॥तुका ह्मणे धरिला हातीं ।
मग निश्चिती हरीनें ॥ ७ ॥

॥ ३१४० ॥

वर्णावे ते किती । केले पवाडे श्रीपति ॥१॥ विश्वासिया घडे लाभ ।
देइल तरी पद्मनाभ ॥ २ ॥ भाव शुद्ध तरी । सांगितलें काम
करी ॥ ३ ॥ तुका ह्मणे भोळा देव । परी हा नागवी संदेह ॥ ४ ॥

॥ ३१४१ ॥

धीर नव्हे मनें । काय तयापाशीं उणें ॥ १ ॥ भार घातलियावरी ।
दासां नुपेक्षील हरी ॥ २ ॥ याच्याऐसी आटी । द्यावी द्रव्याचिये
साटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे पोटें । देवा बहु केलें खोटें ॥ ४ ॥

॥ ३१४२ ॥

पाठवील ठाया । पांडुरंग चिंतिलिया १ त्यासी चिंतिलिया मनीं ।

चित्ता करी गंवसणी २ पावात्रया फळ । अंगीं असावें हें बळ ॥३॥ तुका ह्मणे तई । सिद्धि वोळंगती पायीं ॥ ४ ॥

॥ ३१४३ ॥

न करावी चिंता । भय न धरावें सर्वथा ॥ १ ॥ दासां साहे नारायण । होय रक्षिता आपण ॥२॥ नलगे परिहार । कांहीं योजावें उत्तर ॥ ३ ॥ न धरावी शंका । नये बोलों ह्मणे तुका ॥ ४ ॥

॥ ३१४४ ॥

मधुरा उत्तरासवें नाहीं चाड । अंतरंगीं वाड भाव असो ॥ १ ॥ प्राणावेगळा न करी नारायण । मग नसो ज्ञान मूर्ख बरा ॥ २ ॥ जनानिंदा होय तो बरा विचार । थोरवीचा भार कामा नये ॥ ३ ॥ तुका ह्मणे चित्तीं भाव निष्ठावंत । दया क्षमा शांत सर्वां भूतीं ४ ॥

॥ ३१४५ ॥

भय हरिजनीं कांहीं न धरावें मनीं ॥ १ ॥ नारायण ऐसा सखा । काय जगाचा हा लेखा ॥ २ ॥ चित्त वित्त हेवा । समर्पून राहा देवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे मन । असों द्यावें समाधान ॥ ४ ॥

॥ ३१४६ ॥

अभिमानी पांडुरंग । गोवा कादाचा हो मग ॥ १ ॥ अनुसरा लव-लाहीं । नका विचार करूं कांहीं ॥ कोठें राहातील पापें । जालिया हो अनुताप ३ तुका ह्मणे येचि घडी । उभ्या पाय्यांल थडी ॥ ४ ॥

॥ ३१४७ ॥

वैद्य एक पंढरिराव । अंतर्भाव तो जाणे ॥ १ ॥ रोगाऐशा द्याव्या वल्ली । जाणे झाली बाधा ते ॥ २ ॥ नेत्रीं रुका वेचों मोल । पाहे बोल प्रीतीचे ३ तुका ह्मणे दयावंता । सदा चिंता दीनांची ॥ ४ ॥

॥ ३१४८ ॥

चित्तीं नाहीं आस । त्याचा पांडुरंग दास ॥ १ ॥ असे भक्तांचिये घरीं । काम न सांगतां करी ॥ २ ॥ अनाथाचा बंधु । असे अंगीं हा संबंधु ॥ ३ ॥ तुका ह्मणे भावें । देवा सत्ता राबवावें ॥ ४ ॥

॥ ३१४९ ॥

भाविका हें वर्म सांपडलें निकें । सेविती कवतुकें धणीवरी ॥ १ ॥ इच्छितील तैसा नाचे त्यांचे छंदें । वंदिती तीं पदें सकुमारें ॥ २ ॥ विसरले मुक्ती भक्तिअभिलासें । ओढत सरिसें सुख आलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं मागायाची आस । पांडुरंग त्यांस विसंबेना ॥४॥

॥ ३१५० ॥

सत्य सत्यें देतें फळ । नाहीं लागतचि बळ ॥ १ ॥ ध्यावे देवाचे ते पाय । धीर सकळ उपाय ॥ २ ॥ करावीच चिंता । नाहीं लागत तत्वता ॥ ३ ॥ तुका ह्मणे भावें । शरण म्हणवितां बरवें ॥ ४ ॥

॥ ३१५१ ॥

शूरत्वासी मोल । नये कामा फिके बोल ॥१॥ केला न संडी कैवाड । जीवेंसाठीं तो हें कोड ॥ २ ॥ धीर तो कारण । साह्य होतो नारायण ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरि । दासा रक्षितो निर्धारीं ॥ ४ ॥

॥ ३१५२ ॥

लाभ पुढें करी । घात नारायण वारी ॥ १ ॥ ऐसी भक्तांची माउली । करी कृपेची साउली ॥ २ ॥ माय बाळकासी । जीव भाग्य वेची तैसी ३ तुका ह्मणे नाड । नाहीं शरणांगता चाड ॥ ४ ॥

॥ ३१५३ ॥

अनंत ब्रह्मांडें । एके रोमीं ऐसें धेंडें ॥ १ ॥ तो या गोळियांचे घरीं । उंबरा चढतां टेंका धरी ॥ २ ॥ मारी दैत्य गाढे । ज्यांचे पुराणीं पवाडे ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळा । अंगीं जयाच्या सकळा ॥ ४ ॥

॥ ३१५४ ॥

एवढा प्रभु भावें । तेणें संतुष्टीं राहावें ॥१॥ होय भक्तीं केला तैसा । पुरवी धरावी ते इच्छा ॥ २ ॥ एवढा जगदानी । मागे तुळसीदळ पाणी ॥ ३ ॥ आला नांवा रूपा । तुका ह्मणे झाला सोपा ॥ ४ ॥

॥ ३१५५ ॥

कृपावंत किती । दीनें बहु आवडती ॥१॥ त्यांचा भार वाहे माथां । करी योग क्षेम चिंता ॥ २ ॥ भुलों नेदी वाट । करीं धरूनि दावी मीट ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीवें । अनुसरतां एका भावें ॥ ४ ॥

॥ ३१५६ ॥

करितां कोणाचें ही काज । नाहीं लाज देवासी १ बरें करावें हें काम । धरिलें नाम दीनबंधु ॥२॥ करूनि आराणूक पाहे । भलत्या साह्य व्हावया ३ बोले तैसी करणी करी । तुका ह्मणे एक हरि [illegible]

॥ ३१५७ ॥

घेऊनिया चक्र गदा । हाचि धंदा करी तो १ भक्त[illegible] पायापासीं । दुर्जनासी संहारी ॥ २ ॥ अव्यक्त तें [illegible] आले गुणवंत २ तुका ह्मणे पुरवी इच्छा । [illegible] तैस[illegible] ॥ ४ ॥

॥ ३१५८ ॥

भक्ताविण देवा । कैचें रूप घडे सेवा ॥ १ ॥ [illegible]मोविलें येर येरां । सोनें एक ठायीं हिरा ॥ २ ॥ [illegible] । कोण देता निष्कामता ॥ ३ ॥ तुका ह्मणे [illegible] जैसें स्नेहजाळ ॥ ४ ॥

॥ [illegible] ॥

भक्त देवाघरीचा [illegible]काचा पोसणा १ येर येरां जडलें कैसें । जीवा अं[illegible] २ देव भक्ताची कृपाळु माता । भक्त देवाचा ज[illegible] ह्मणे अंगें । एक एकाचिया संगें ॥ ४ ॥

॥ ३१६० ॥

देव राखे तया मारील कोण । न मोडे कांटा हिंडतां वन १ जळे न बुडे नव्हे कांहीं । विष तेंही अमृत पाहीं २ न चुके वाट न पडे फंदीं । नव्हे कधीं यमबाधा ३ तुका ह्मणे नारायण । येतां गोळ्या वारी बाण ४

॥ ३१६१ ॥

आवडीनें धरिलीं नांवें । प्रियभावें चिंतन ॥ १ ॥ वेडा झाला वेडा झाला । लांचावला भक्तीसी ॥२॥ निचाड हा चाड धरी । तुळसी करीं दळ मागे ३ धरिला मग करी बळ । तुका ह्मणे कळपायीं ॥४॥

॥ ३१६२ ॥

प्रथम भेटी आलिंगन । मग चरण वंदावे १ ऐसा माझा भोळा बाप । हरी ताप कवळोनि ॥ २ ॥ न सांगतां सीण भाग । पांडुरंग जाणतसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे कृपावंतें । द्यावें मातें न मागतां ॥ ४ ॥

॥ ३१६३ ॥

देवाची ते खूण आला ज्याच्या घरा । त्याच्या पडे चिरा मनुष्यपणा१ देवाचि ते खूण करावें वाटोळें । आपणा वेगळें कोणी नाहीं ॥ २ ॥ देवाची ते खूण गुंतों नेदी आशा । ममतेच्या पाशा शिवों नेदी ३ देवाची ते खूण गुंतों नेदी वाचा । लागों असत्याचा मळ नेदी ४॥ देवाची ते खूण तोडी मायाजाळ । आणि हें सकळ जग हरी ॥५॥ पहा देवें तेंचि बळकाविलें स्थळ । तुक्यापें सकळ चिन्हें त्याचीं.६॥

॥ ३१६४ ॥

देवाच्या प्रसादें करा रे भोजन । व्हाल कोण कोण अधिकारी ते१ ब्रह्मादिकांसि हें दुर्लभ उच्छिष्ट । नका मानूं वीट ब्रह्मरसीं ॥ २ ॥ अवघियांपुरतें वोसंडलें पात्र । अधिकार सर्वत्र आहे येथें ॥ ३ ॥ [illegible]नी येथें वळलों समर्थ । अवघेंचि आर्त्त पुरवितो ॥ ४ ॥ [illegible] नाहीं कदाकाळीं । पुढती वाटे कवळीं घ्यावें ऐसें५॥ [illegible] पाक लक्ष्मीच्या हातें । कामारीसांगातें निरुपम ॥ ६ ॥

॥ ३१६५ ॥

देव [illegible]चा । जीव सकळ जीवांचा ॥१॥ देव आहे देव आहे । [illegible] पाहे २ देव गोड देव गोड । पुरवी कोडाचेंही कोड ॥ ३ ॥ [illegible] राखे । घाली कळिकाळासी काखे ॥ ४ ॥ देव द[illegible] । [illegible]री तुक्याचा सांभाळ ॥५॥

॥ [illegible] ॥

देव पाहों देव पाहों । [illegible] राहों १ देव देखिला देव देखिला । तो नाहीं कोणा भ्याला [illegible] कांहीं मागों मागों । जीव भाव त्यासी सांगों ३ देव ज[illegible] । [illegible]वी मनींचिये म्हणे ॥ ४ ॥ देव कातर देव कातर । तु[illegible] ॥ ५ ॥

॥ ३१६७ ॥

देव भला देव भला । मिळोनि जाय जैसा त्याला १ देव उदार देव उदार । देतां नाहीं थोडें फार २ देव बळी देव बळी । जोडा नाहीं भूमंडळीं ॥ ३ ॥ देव व्हावा देव व्हावा । आवडे तो सर्वां जीवा ४ देव चांगला देव चांगला । तुका ह्मणे चरणाशीं लागला ५

॥ ३१६८ ॥

देव दयाळ देव दयाळ । साहे कोल्हाळ बहुतांचा ॥ १ ॥ देव उदार देव उदार । थोड्यासाठीं फार देऊं जाणे ॥ २ ॥ देव चांगला देव चांगला । तुका लागला चरणीं ॥ ३ ॥

॥ ३१६९ ॥

देव बराडी देव बराडी । घाली देंठासाठीं उडी ॥१॥ देव भ्याड देव भ्याड । राखे धळीचें कवाड ॥ २ ॥ देव भाविक देव भाविक । होय दासांचा सेवक ॥३॥ देव होया देव होया । जैसा ह्मणे तैसा तया ॥ ४ ॥ देव लहान देव लहान । तुका ह्मणे अनुरेण ॥ ५ ॥

॥ ३१७० ॥

देव मजूर देव मजूर । नाहीं उजूर सेवेपुढें ॥ १ ॥ देव गांढ्याळ देव गांढ्याळ । देखोनिया बळ लपतसे ॥ २ ॥ देव तर काई देव तर काई । तुका ह्मणे राई तरी मोठी ॥ ३ ॥

॥ ३१७१ ॥

देव निढळ देव निढळ । मूळ नाहीं डाळ परदेशी ॥१॥ देव अकुळी देव अकुळी । भलते ठायीं सोयरीक ॥ २ ॥ देव लिगाड्या देव लिगाड्या । तुका ह्मणे भाड्या दंभें ठकी ॥ ३ ॥

॥ ३१७२ ॥

देव घ्या कोणी देव घ्या कोणी । आइता आला घर पुसोनि १ देव न लगे देव न लगे । सांठवणेचे रुधले जागे ॥ २ ॥ देव मंदला देव मंदला । भाव बुडाला काय करूं ॥ ३ ॥ देव घ्या फुका देव घ्या फुका । न लगे रुका मोल कांहीं ॥ ४ । दुबळा तुका भावहीण । उधारा देव घेतला ऋण ॥ ५ ॥

॥ ३१७३ ॥

देव वासर देव वासर । असे निरंतर जेथें तेथें १ देव खोळंबा देव खोळंबा । मज झळंबा ह्मणून कोंडी २ देव लागट देव लागट । लाविलिया चट जीवीं जडे ॥ ३ ॥ देव बावळा देव बावळा । भावें जवळा लुडबुडी ४ देव न व्हावा देव न व्हावा । तुका ह्मणे गोवा करी कामीं ५

॥ ३१७४ ॥

अंतरींची घेतो गोडी । पाहे जोडी भावाची १ देव सोयरा देव सो-

यरा । देव सोयरा दीनाचा ॥ २ ॥ आपुल्याच वैभवें । शृंगारावें निर्मळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे जेवी सर्वें । प्रेम द्यावें प्रीतीचें ॥ ४ ॥

॥ ३१७५ ॥

हरिहरां भेद । नाहीं करूं नये वाद ॥ १ ॥ एक एकाचे हृदयीं । गोडी साखरेच्या ठायीं ॥ २ ॥ भेदकासी नाड । एक वेलांटीच आड ॥ ३ ॥ उजवें वाम भाग । तुका ह्मणे एक अंग ॥ ४ ॥

॥ ३१७६ ॥

सांठविला हरी । जींहीं हृदयमंदिरीं ॥ १ ॥ त्यांची सरली येरझार । झाला सफळ व्यापार ॥ २ ॥ हरी आला हातां । मग कैंची भयचिंता ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरी । कांहीं उरों नेदीं उरी ॥ ४ ॥

॥ ३१७७ ॥

भक्तऋणी देव बोलती पुराणें । निर्धार वचनें साच करीं ॥ १ ॥
मागें काय जाणों अइकिली वार्त्ता । कबिर सातें जातां घडिया वांटी २
माघारिया धन आणिलें घरासि । न घे केला त्यासि त्याग तेणें ॥ ३ ॥
नामदेवाचिया घरासि आणिलें । तेणें लुटाविलें द्विजां हातीं ॥ ४ ॥
प्रत्यक्षासि काय द्यावें हें प्रमाण । व्यंकोबाचें ऋण फेडियलें ॥ ५ ॥
बीज दळोनिया केली आराधना । लागे नारायणा पेरणें तें ॥ ६ ॥
तुका ह्मणे नाहीं जयासि निर्धार । नाडला साचार तोचि एक ॥७॥

॥ ३१७८ ॥

कांहीं न मागती देवा । त्यांची करूं धांवे सेवा ॥१॥ हळूहळू फेडी ऋण । होऊनिया रुपें दीन ॥ २ ॥ होऊं न सके वेगळा । क्षण एक त्या निराळा ॥३॥ तुका ह्मणे भक्तिभाव । हाचि देवाचाही देव ॥४॥

॥ ३१७९ ॥

उंच निंच कांहीं नेणें भगवंतीं । तिष्ठे भावभक्ती देखोनिया ॥ १ ॥
दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी । दैत्य घरीं रक्षी प्रल्हादासी २
चर्म रंगूं लागे रोहिदासा संगें । कबिराचे मागे विणी शेले ॥ ३ ॥
सजनकासया विकूं लागे मांस । माळ्या सांवत्यास खुरपूं लागे ४
नरहरिसोनारा घडूं फुंकूं लागे । चोख्यामेळ्यासंगें ढोरें ओढी ५ ॥
नामयाची जनी सवें वेची शेणी । धर्मा घरीं पाणी वाहे झाडी ६॥
नाम्या सवें जेवी नव्हे संकोचित । ज्ञानियाची भिंत अंगें ओढी ७॥
अर्जुनाचे रथीं होय हा सारथी । भक्षी पोहे प्रीति सुदाम्याचे ॥८॥
गौळियांचे घरीं गाई अंगें वळी । द्वारपाळ बळी द्वारीं झाला ॥ ९ ॥
येकोबाचें ऋण फेडी ऋषिकेशी । आंबऋषीचे सोशी गर्भवास १०
मिराबाई साठीं घेतो विषप्याला । दामाजीचा झाला पाडेवार ११
घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची । हुंडी मेहत्याची अंगें भरी १२
पुंडलिकासाठीं अझूनि तिष्ठत । तुका ह्मणे मात धन्य त्याची ॥१३॥

॥ ३१८० ॥

अंगीकार ज्याचा केला नारायणें । निंद्य तेहि तेणें वंद्य केलें ॥ १ ॥ अजामेळ भिल्ली तारिली कुंटणी । प्रत्यक्ष पुराणीं वंद्य केली ॥ २ ॥ ब्रह्महत्याराशी पातकें अपार । वाल्मीक किंकर वंद्य केला ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें भजन प्रमाण । काय थोरपण जाळावें तें ॥ ४ ॥

॥ ३१८१ ॥

यातिगुणें रूपें काय ते वानर । तयांच्या विचारें वर्ते राम ॥ १ ॥ ब्रह्महत्यारासी पातकी अनेक । तो वंद्य वाल्मीक तिहीं लोकीं २ ॥ तुका ह्मणे नव्हे चोरीचा व्यापार । म्हणा रघुवीर वेळोवेळीं ॥ ३ ॥

॥ ३१८२ ॥

ऐका महिमा आवडीची । बोरें खाय भिल्लटीची ॥ १ ॥ थोर प्रेमाचा भुकेला । हाचि दुष्काळ तयाला ॥ २ ॥ पोहे सुदाम देवाचे । फके मारी कोरडेच ॥ ३ ॥ न म्हणे उच्छिष्ट अथवा थोडे । तुका म्हणे भक्तीपुढें ॥ ४ ॥

॥ ३१८३ ॥

पाहा कैसे कैसे । देवें उद्धरिले अनायासें ॥ ॥ ऐका नवल्याची ठेव । नेणतां भक्तिभाव ॥ २ ॥ कैलासासी नेला । भिल्ल पानेडी बैसला ॥ ३ ॥ पांखांच्या फडत्कारीं । उद्धरूनी नेली घारी ॥ ४ ॥ चोरें पिंडीं दिला पाय । त्या पूजनें धावे देव ॥ ५ ॥ तुका ह्मणे भोळा । स्वामी माझा हो कोंवळा ॥ ६ ॥

॥ ३१८४ ॥

ह्मणउनि शरण जावें । सर्वभावें देवासी ॥ १ ॥ तो हा उतरील पार । भवदुस्तर नदीचा ॥ २ ॥ बहु आहे करुणावंत । अनंत हें नाम ज्या ॥ ३ ॥ तुका ह्मणे साक्षी आलें । तरी केलें प्रगट ॥ ४ ॥

॥ ३१८५ ॥

तयासी नेणतीं बहु आवडती । होय जया चित्तीं एक भाव ॥ १ ॥ उपमन्यु ध्रुरु हे काय जाणती । प्रल्हादाच्या चित्तीं नारायण ॥ २ ॥ कोळी । भिल्ल पशु श्वापदें अपारें । कृपेच्या सागरें तारियेलीं ॥ ३ ॥ काय तीं गोपाळें चांगलीं शाहाणीं । तया चक्रपाणी जेवी सवें ४ ॥ तुका म्हणे भोळा भाविक हा देव । आम्ही त्याचे पाय धरूनी ठेलों ५

॥ ३१८६ ॥

विश्वाचा जनिता । ह्मणे यशोदेसि माता १ ऐसा भक्तांचा अंकित । लागे तैसी लावी प्रीत ॥ २ ॥ निष्काम निराळा । गोपी लावियेल्या चाळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे आलें । रूपा अव्यक्त चांगलें ॥ ४ ॥

॥ ३१८७ ॥

गौळीयाचीं ताकपिरें । कोण पोरें चांगलीं १ येवढा त्याचा छंद देवा ।

काय सेवा भक्ती ते २ काय उपास पडिले होते । कण्याभोंवतें विदुराच्या ३ तुका ह्मणे कुब्जा दासी । रूपरासी हीनकळा ॥ ४ ॥

॥ ३१८८ ॥

शुकसनकादिकीं उभारिला बाहो । परिक्षितीस हो दिसा सातां १ उठाउठी करी स्मरणाच्या धांवा । धरवत देवा नाहीं धीर ॥ २ ॥ त्वरा जाली गरुड टाकियेले मागें । द्रौपदीच्या लागें नारायणें ३ ॥ तुका ह्मणे करी बहुच तांतडी । प्रेमाची आवडी लोभ फार ॥ ४ ॥

॥ ३१८९ ॥

सोडिला संसार । माया तयावरि फार ॥ १ ॥ धांवे चाले मागें मागें । सुखदुःख साहे अंगें ॥ २ ॥ यानें घ्यावें नाम । तींही करणें त्याचें काम ॥ ३ ॥ तुका ह्मणे भोळी । विठ्ठलकृपेची कोंवळी ॥ ४ ॥

॥ ३१९० ॥

बोलिलों उत्कर्षें । प्रेमरस दासत्वें ॥ १ ॥ साच कारिता नारायण । जया शरण गेलों तो ॥ २ ॥ समर्थ तो आहे ऐसा । धरिली इच्छा पुरवी ॥ ३ ॥ तुका ह्मणे लडिवाळाचें । द्यावें साचें करूनिया ॥ ४ ॥

॥ ३१९१ ॥

पाहातां रूप डोळां भरे । अंतरे नुरे वेळ । इच्छावशें खेळ मांडी । अवघे सांडी बाहेरी ॥ १ ॥ तो हा नंदानंदन बाइये । यासी काय परिचार वो ॥ २ ॥ दिसतो हा नव्हे तैसा । असे दिशाव्यापक । लाघव हा खोळेसाठीं । होतां भेटी परतेना ॥ ३ ॥ ह्मणोनि उभी टाकलीये । परतलीये या वाटा । आड करोनिया तुका । जो या लोकां दाखवितो ॥ ४ ॥

॥ ३१९२ ॥

भाविकांचें काज अंगें देव करी । काढी धर्माघरीं उच्छिष्ट तें ॥ १ ॥ उच्छिष्ट तीं फळें खाय भिल्लटीचीं । आवडी तयांची मोठी देवा ॥२॥ काय देवा घरीं न मिळेचि अन्न । मागे भाजीपान द्रौपदीसी ॥ ३ ॥ अर्जुनाचीं घोडीं धुतलीं अनंतें । संकटें बहुतें निवारिलीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसीं आवडती लडिवाळें । जाणिवेचें काळें तोंड देवा ५ ॥

॥ ३१९३ ॥

उद्धाराचा संदेह नाहीं । याच्या कांहीं सेवकां ॥१॥ पांडुरंग अभिमानी । जीवदानीं कोंवसा ॥२॥ बुडतां जळीं जळतां अग्नीं । ते प्रसंगीं राखावें ॥३॥ तुका ह्मणे आम्हांसाठीं । कृपा पोटीं वागवी ॥४॥

॥ ३१९४ ॥

आपुलिया बळें नाहीं मी बोलत । सखा कृपावंत वाचा त्याची १॥ साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी । शिकवितां धनी वेगळाची ॥२॥

काय त्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलविलें ३॥
तुका ह्मणे त्याची कोण जाणे कळा । वागवी पांगुळा पायांविण४॥

॥ ३१९५ ॥

आवडीचें दान देतो नारायण । बाहे उभारोन राहिलासे ॥ १ ॥
जे जयासी रुचे तें करी समोर । सर्वज्ञ उदार मायबाप ॥ २ ॥
ठायीं पडिलिया तेंचि लागे खावें । ठायींचेंचि घ्यावें विचारूनि ३॥
बीज पेरूनिया तेंचि घ्यावें फळ । डोरलीस केळ कैचें लागे ॥ ४ ॥
तुका ह्मणे देवा बोल कांहीं नाहीं । तुझा तूंचि पाहीं शत्रु सखा५॥

॥ ३१९६ ॥

बैसोनि निश्चळ करीं त्याचें ध्यान । देईल तो अन्नवस्त्रदाता ॥ १ ॥
काय आह्मां करणें अधिक सांचुनि । देव झाला ऋणी पुरविता २
दयाळ मयाळ जाणे कळवळा । शरणागतां लळा राखों जाणे ॥ ३ ॥
नलगे मागणें सांगणें तयासी । जाणे इच्छा तैसी पुरवी त्याची४॥
तुका ह्मणे लेई अळंकार अंगीं । विठ्ठल हा जगीं तूंचि होसी ॥ ५ ॥

॥ ३१९७ ॥

जैसा निर्मळ गंगा ओघ । तैसा भाग वोगरीं ॥१॥ प्रेम वाढे ग्रासो-ग्रासीं । ब्रह्मरसीं भोजन ॥२॥ तृप्तीवरि आवडी उरे । ऐसे बरे प्रकार ॥ ३ ॥ तुका ह्मणे पाक मन । नारायण ते भोगी ॥ ४ ॥

॥ ३१९८ ॥

वर्णावी ते थोरी एका विठ्ठलाची । कीर्ति मानवाची बोलूं नये १॥
उदंडचि जाले जन्मोनिया मेले । होवोनिया गेले राव रंक ॥ २ ॥
त्यांचें नाम की[illegible] नेणे चराचरीं । साही वेद चारी वर्णिताती ॥३॥
अक्षय अढळ चळेना ढळेना । तया नारायणा ध्यात जावें ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुह्मी विठ्ठल चित्तीं ध्यातां । जन्म मरण व्यथा दूर होती५

॥ ३१९९ ॥

सादाविलें एका । सरे अवघिया लोकां ॥ १ ॥ आतां आवडीच्या हातीं । भेद नाहीं ये पंगती ॥ २ ॥ मोकळीच पोतीं । नाहीं पुसायाची गुंती ॥ ३ ॥ तुका ह्मणे वरा । आहे ढसाळ वेव्हारा ॥ ४ ॥

॥ ३२०० ॥

येणें मार्गें आले । त्यांचें निसंतान केलें ॥ १ ॥ ऐसी अवघड वाट । ऐकोन आलों बोभाट ॥ २ ॥ नागविल्या थाटी । उरों नेदीच लंगोटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे चार । तो हा उभा कटीकर ॥ ४ ॥

॥ ३२०१ ॥

जें जें केलें तें तें साहे । कैसें पाहें भाविक ॥ १ ॥ ओंवाळूनि माझी काया । सांडिली यावरूनि ॥ २ ॥ काय होय नव्हे करूं । नेणें धरूं सत्ता ते ॥ ३ ॥ तुका ह्मणे कटीकर । उभें धीर धरूनि ॥ ४ ॥

॥ ३२०२ ॥

जिव्हा जाणे फिकें मधुर कीं क्षार । येर मास पर हाता न कळे १ देखावें नेत्रीं बोलावें मुखें । चित्ता सुखदुःखें कळों येती ॥ २ ॥ परिमळासी घ्राण ऐकती श्रवण । एकाचें कारण एका नये ॥ ३ ॥ एकदेहीं भिन्न दावियेल्या कळा । नाचवी पुतळा सूत्रधारी ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐशी जयाची सत्ता । कां नया अनंता विसरलेती ५ ॥

॥ ३२०३ ॥

सोवळा तो जाला । अंगीकार देवें केला १ येर करिती भोजन । पोट पोसाया दुर्जन ॥ २ ॥ चुकला हा भार । तयाचीच येरझार ॥ ३ ॥ तुका ह्मणे दास । झाला तया नाहीं नास ॥ ४ ॥

॥ ३२०४ ॥

स्वामीच्या सामर्थ्ये । चाले बोलिला पुरुषार्थ ॥१॥ पाठी देवाचें हें बळ । मग लाभे हातीं काळ ॥२॥ देव ज्यासी साह्य । तेणें केलें सर्व होय ॥ ३ ॥ तुका ह्मणे स्वामीसत्ता । मग नाहीं भय चिंता ॥ ४ ॥

॥ ३२०५ ॥

न करि त्याचें गांढेपण । नारायण सिद्ध उभा ॥ १ ॥ भवसिंधूचा थडवा केला । बोलाविला पाहिजे ॥ २ ॥ याचे सोई पाउल वेचे । मग कैचे आडथळे ॥३॥ तुका ह्मणे खरे खोटें । न ह्मणे मोठें लहान ४॥

॥ ३२०६ ॥

स्वामिकाज गुरुभक्ति । पितृवचन सेवा पति ॥ १ ॥ हेचि विष्णूची महापूजा । अनुभव नाहीं दुजा ॥ २ ॥ सत्य बोले मुखें । दुखवे आणिकांच्या दुःखें ॥३॥ निश्चयाचें बळ । तुका ह्मणे तेंच फळ ४ ॥

॥ ३२०७ ॥

नाहीं काष्ठाचा गुमान । गोवी भ्रमरा सुमन ॥१॥ प्रेम प्रीतीचें बांधलें । तें न सुटे कांहीं केलें ॥ २ ॥ पदरीं घाली पिळा । बाप निर्मळ सांटी बाळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे भावें । भेणें देवें आकारावें ॥ ४ ॥

॥ ३२०८ ॥

सुखरूप चाली । हळूहळू उसंतिली ॥१॥ बाळगोपाळांची वाट । सेव्यसेवकता नीट ॥ २ ॥ जरी झाला श्रम । तरी पडों नये भ्रम ॥ ३ ॥ तुका म्हणे दासां । देव सरिसासरिसा ॥ ४ ॥

॥ ३२०९ ॥

आम्हां घरीं एक गाय दुभता हे । पान्हा न समाये त्रिभुवनीं ॥ १ ॥ वान ते सांवळी नांव ते श्रीधरा । चरे वसुंधरा चौदा भुवनें ॥ २ ॥ वत्स नाहीं माय भलत्या सवें जाय । कुर्वाळी तो लाहे भावभरणा ३ चहूं धारीं क्षीर वोळली अमुप । धाले सनकादिक सिद्ध मुनी ॥४॥ तुका म्हणे माझी भूक तेथें काय । जोगावितें माय तिन्ही लोकां ५

॥ ३२१० ॥

देवाच्या संबंधें विश्वचि सोयरें । सूत्र ओढें दोरें एका एक ॥ १ ॥ आहाच ते नव्हे विटायासारिखें । जीव जीवनीं देखें सामावलें २॥ आणिकांचें सुख दुःख उमटे अंतरीं । एथील इतरीं तेणें न्यायें ॥३॥ तुका म्हणे ठसावलें शुद्ध जाती । शोभा चि पुढती विशेषता ॥ ४ ॥

॥ ३२११ ॥

धन्य भावशीळ । ज्याचें हृदय निर्मळ ॥ १ ॥ पूजी प्रतिमेचे देव । संत म्हणती तेथें भाव ॥ २ ॥ विधिनिषेध नेणती । एक निष्ठा धरुनी चित्तीं ॥३॥ तुका म्हणे तैसा देवा । होणें लागे त्यांच्या भावा ४॥

॥ ३२१२ ॥

त्रैलोक्य पाळितां उबगला नाहीं । आमचे त्या काई असे ओझें ॥१॥ पाषाणाचे पोटीं बैसला दर्दुर । तया मुखीं चार कोण घाली ॥ २ ॥ पक्षी अजगर न करी संचित । तयासि अनंत प्रतिपाळी ॥ ३ ॥ तुका म्हणे तया भार घातलिया । उपेक्षीना दयासिंधु माझा ॥४ ॥

॥ ३२१३ ॥

राजा करी तैसे दाम । तेही चाम चालती ॥ १ ॥ कारण तो सत्ता शिरीं । कोण करी अव्हेर ॥ २ ॥ वाइलें तें सुनें खांदीं । चाले पदीं बैसविलें ॥३॥ तुका ह्मणे विश्वंभरें । करुणाकरें रक्षिलें ॥४॥

॥ ३२१४ ॥

सुखाचे व्यवहारीं सुखलाभ जाला । आनंद कोंदला मागें पुढें १ ॥ संगती पंगती देवासवें घडे । नित्यानित्य पडे तेंचि सांचा ॥ २ ॥ समर्थाचे घरीं सकळ संपदा । नाहीं तुटी कदा कासयाची ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें लाभाचिया कोटी । बहु वाव पोटीं समर्थाचे ॥ ४ ॥

॥ ३२१५ ॥

मथनीचें नवनीत । सर्व हितकारक ॥ १ ॥ दंडवत दंडा परी । मागें उरी नुगवी ॥ २ ॥ वचनाचा तो पसरु काई । तांतडी डोईपायींच ॥ ३ ॥ तुका म्हणे जगजेठी । लावी कंठीं उचलूनि ॥ ४ ॥

॥ ३२१६ ॥

संसारा आलिया एक सुख आहे । आठवावे पाये विटोबाचे ॥ १ ॥ येणें होय सर्व संसार सुखाचा । नलगे दुःखाचा लेश कांहीं ॥ २ ॥ घेतील तयांसी सोपें आहे सुख । बोलियेले मुखें नारायण ॥ ३ ॥ सांगितली सोय करुणासागरें । तुम्हां कां हो बरें न वाटे तें ॥ ४ ॥ तुका म्हणे तेणें उपकार केला । भोळ्या भाविकांला तारावया ॥५॥

॥ ३२१७ ॥

सुख नाहीं कोठें आलिया संसारीं । वाया हांवभरी होऊं नका ॥१॥ दुःखबांदवडी आहे हा संसार । सुखाचा विचार नाहीं कोठें ॥ २ ॥

चवदा कल्पवरी आयुष्य जयाला । परी तो राहिला ताटीतळीं ३॥
तुका म्हणे वेगीं जाय सुटोनिया । धरूनि हृदयामाजी हरि ॥ ४ ॥

॥ ३२१८ ॥

सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वताएवढें ॥ १ ॥ धरीं आठवण । मानीं संतांचें वचन ॥२॥ नेलें रात्रीनें तें अर्धें । बाळपण जराव्याधें ॥ ३ ॥ तुका म्हणे पुढा । घाणा जुंतीजसी मूढा ॥ ४ ॥

॥ ३२१९ ॥

सावधान ऐसें काय तें विचारा । आले हो संसारा सकळही ॥१॥
अंतीं समयाचा करणें विचार । वेचती सादर घटिका पळें ॥ २ ॥
मंगळ हें नोहे कन्यापुत्रादिक । राहिला लौकिक अंतरपाट ॥ ३ ॥
तुका ह्मणे देव अंतरला दुरी । डोळिया अंधारी पडलीसे ॥ ४ ॥

॥ ३२२० ॥

वैभम तें राज्य संपत्ती टाकावी । उदरार्थ मागावी माधोकरी १ ॥
आपुलें तें आधीं करावें स्वहित । ऐसी आहे नीत स्वधर्माची २ ॥
वर्ण कुळ जाति याचा अभिमान । त्यजावा सन्मान लौकिकाचा ३
तुका ह्मणे राहे एकाएकी निःशंक । देउनिया हाक कंठीं काळ ४ ॥

॥ ३२२१ ॥

क्षणक्षणा हाचि करावा विचार । तरावया पार भवसिंधु ॥ १ ॥
नाशिवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान २ ॥
संतसमागमीं धरावी आवडी । करावी तांतडी परमार्थी ॥ ३ ॥
तुका म्हणे इहलोकींचा वेव्हार । नये डोळे धूर भरूनि राहो ॥४॥

॥ ३२२२ ॥

येऊनि नरदेहा विचारावें सार । धरावा पैं धीर भजनमार्गीं ॥ १ ॥
चंचळ चित्तासी ठेवूनियां ठायीं । संतांचिये पायीं लीन व्हावें २ ॥
भावाचा पैं हाव धरावा निश्चयें । तेणें भवभय देशधडी ॥ ३ ॥
नामापरतें जगीं साधन सोपें नाहीं । आवडीनें गाई सर्वकाळ ॥४॥
तुका ह्मणे धन्य वंश त्या नराचा । ऐसा निश्चयाचा मेरू झाला५॥

॥ ३२२३ ॥

उपजला प्राणी न राहे संसारीं । बैसला शेजारीं काळ उसां ॥ १ ॥
पाहा तो उंदीर घेउनि जाय बोका । तैसा काळ लोकां नेत असे२॥
खाटिकाचे घरीं अजापुत्र पाहे । कसावाची गाय वांचे कैसी ॥ ३ ॥
तुका ह्मणे कांहीं करा काढाकाढी । जाती ऐसी घडी पुन्हा नये ४॥

॥ ३२२४ ॥

संवसारसांते आले हो आइका । तुटीचें तें नका केणें भरूं ॥ १ ॥
लाभाचा हा काळ अवघे विचारा । पारखी ते करा साह्य येथें ॥२॥

शृंगारिलें दिसे न कळे अंतर । गोंविला पदर उगवेना ॥ ३ ॥
तुका ह्मणे खोटें गुंपतां विसारें । हातिंचिया खरें हातीं घ्यावें ॥४॥

॥ ३२२५ ॥

कोणाशीं विचार करावा सेवटीं । एवढ्या लाभें तुटी जाल्या तरे १
सांभाळितो शूर आला घावडाव । पुढें दिला पाव न करी मागें २॥
घात तो या नांवें येथें अंतराय । अंतरल्या पाय गोविंदाचे ॥ ३ ॥
तुका ह्मणे गडसंदीचा हा ठाव । केला तो उपाय कार्या येतो ॥४॥

॥ ३२२६ ॥

°पोटापुरतें काम । परि अगत्य तो राम १ कारण तें हेंचि करीं । चित्तीं पांडुरंग धरीं ॥ २ ॥ प्रारब्धीं हेवा । जोडी देहाची ते सेवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे बळ । बुद्धी वेचुनि सकळ ॥ ४ ॥

॥ ३२२७ ॥

कृष्ण गातां गीतीं कृष्ण ध्यातां चित्तीं । ते ही कृष्ण होती कृष्णध्यानें ॥ १॥
आसनीं शयनीं भोजनीं जेवितां । म्हणा रे हा भोक्ता नारायण ॥२॥
ओंविया दळणीं गावा नारायण । कांडितां कांडण करितां काम ३ ॥
नर नारी याति हो कोणी भलतीं । भावें एका प्रीतीं नारायणा ॥४॥
तुका म्हणे एका भावें भजा हरी । कांति ते दुसरी रूप एक ॥ ५ ॥

॥ ३२२८ ॥

सवंग झालें सवंग झालें । घरा आलें पंढरीचें ॥ १ ॥ आतां हेवा करा सोस । भक्तिरस बहु गोड ॥ २ ॥ पावल वेचे चिंता नाहीं । आड कांहीं मग नये ॥ ३ ॥ तुका ह्मणे संचिताचें । नेणों काचें राहों तें ॥ ४ ॥

॥ ३२२९ ॥

नये जरी तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाहीं देवें ॥ १ ॥
नाहीं तयाविण भुकेला विठ्ठल । येइल तसा बोल रामकृष्ण ॥ २ ॥
देवापाशीं मागे आवडीची भक्ति । विश्वासेंसीं प्रीति भावबळें ॥३॥
तुका ह्मणे मना सांगतों विचार । धरावा निर्धार दिसंदिस ॥ ४ ॥

॥ ३२३० ॥

°साधनें तरी हींच दोन्ही । जरी कोणी साधील ॥ १ ॥ परद्रव्य परनारी यांचा धरी विटाळ ॥ २ ॥ देव भाग्यें घरा येती । संपत्ती त्या सकळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे तें शरीर । गृह भांडार देवाचें ॥ ४ ॥

॥ ३२३१ ॥

विटाळतो परद्रव्य परनारी । येथुनि जो दुरी सोंवळा तो ॥ १ ॥
गद्य पद्य कांहीं न धरावी उपाधी । स्वाधीनचि बुद्धि करुनी ठेवा २
विचाराचें कांहीं करावें स्वहित । पापपुण्यातीत भांडवल ॥ ३ ॥
तुका ह्मणे न लगे जावें वनांतरा । विश्व विश्वंभरा सारिखेंचि ॥४॥

॥ ३२३२ ॥

शांतीपरतें नाहीं सुख । येर अवघेंची दुःख १ ह्मणउनी शांति धरा ।

उतराल पैल तीरा २ खवळलिया कामक्रोधीं । अंगीं भरती आधि-व्याधी ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्रिविध ताप । जाती मग आपेआप ॥ ४ ॥

॥ ३२३३ ॥

सांडूनिया सर्व लौकिकाची लाज । आळवा यदुराज भक्तिभावें ॥१॥ पाहूनिया झाडें वरचढूनि पाला । खाऊनि विठ्ठला आळवावें ॥ २ ॥ वेंचूनिया चिंध्या भरूनिया धागा । गुंडाळूनि ढुंगा आळवावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसें मांडिल्या निर्वाण । तया नारायण उपेक्षीना ॥ ४ ॥

॥ ३२३४ ॥

भावें गावें गीत । शुद्ध करूनिया चित्त ॥ १ ॥ तुज व्हावा आहे देव । तरि हा सुलभ उपाव २ आणिकांचे कानीं । गुण दोष मना नाणीं ॥ ३ ॥ मस्तक ठेंगणा । करी संतांच्या चरणा ॥ ४ ॥ वेचीं तें वचन । जेणें राहे समाधान ॥ ५ ॥ तुका ह्मणे फार । थोडा तरी पर उपकार ॥ ६ ॥

॥ ३२३५ ॥

आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूं नये ॥ १ ॥ मग तो कृपासिंधु निवारी सांकडें । येर तें बापुडें काय रंक ॥ २ ॥ भयाचिये पोटीं दुःखाचिया रासी । शरण देवासी जातां भलें ३॥ तुका ह्मणे नव्हे काय त्या करितां । चिंतावा तो आतां विश्वंभर ४

॥ ३२३६ ॥

तरिच जन्मा यावें । दास विठ्ठलाचें व्हावें ॥ १ ॥ नाहीं तरि काय थोडीं । श्वानशूकरें बापुडीं ॥ २ ॥ ज्यालाचें तें फळ । अंगीं लागों नेदी मळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे भले । ज्याच्या नांवें मान्यवले ॥ ४ ॥

॥ ३२३७ ॥

निर्वैर व्हावें सर्वभूतांसवें । साधन बरवें हेंचि एक ॥१॥ तरीच करील अंगीकार नारायण । बडबडतो सीण येर त्रिण ॥ २॥ सोइरे पिशुन समानाचि घडे । चित्त पर ओढे उपकारी ॥ ३ ॥ तुका ह्मणे चित्त झालिया निर्मळ । तरिच सकळ केलें होय ॥ ४ ॥

॥ ३२३८ ॥

थोर ती पाहिजे गळाली अहंता । उपदेश घेतां सुख वाटे ॥ १ ॥ व्यर्थ भराभर केलें पाठांतर । जोंवरि अंतर शुद्ध नाहीं ॥ २ ॥ घोडें काय थोडें वागवितें ओझें । भावेंविण वोझें पाठांतर ॥ ३ ॥ तुका ह्मणे धरा निश्चयवंत भाव । जरी पंढरीराव पाहिजे तो ॥ ४ ॥

॥ ३२३९ ॥

जिंकावा संसार । येणें नांवें तरी शूर ॥१॥ येरें काय तीं बापुडीं । कीर अहंकाराचीं घोडीं ॥ २ ॥ पण ऐसा नांवें । देव धरिजेतो भावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे ज्यावें । संत कीर्तीनें बरवें ॥ ४ ॥

॥ ३२४० ॥

हालवूनि खुंट । आधीं करावा बळकट ॥ १ ॥ मग तयाच्या आ-धारें । करणें तें अवघें बरें ॥ २ ॥ सुख दुःख साहे । हर्षामर्षी भंगा नये ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीवें । आधीं मरोनि राहावें ॥ ४ ॥

॥ ३२४१ ॥

होऊं नको कांहीं या मना आधीन । नाइकें वचन याचें कांहीं ॥ १ ॥ हटियाची गोष्टी मोडून टाकावी । सोई ही धरावी विठोबाची ॥२॥ आपुलें आधीन करूनिया ठेवा । नाहीं तरि जीवा घातक हें ॥३॥ तुका ह्मणे झाले जे मना आधीन । तयांसी बंधन यम करी ॥ ४ ॥

॥ ३२४२ ॥

मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचें कारण । मोक्ष अथवा बंधन। सुख समाधान इच्छा ते ॥ १ ॥ मनें प्रतिमा स्थापिली । मनें मना पूजा केली । मनें इच्छा पुरविली । मन माउली सकळांची ॥२॥ मन गुरु आणि शिष्य । करीं आपुलेंचि दास्य । प्रसन्न आपआपणास। गति अथवा अधोगति ॥ ३ ॥ साधक वाचक पंडित । श्रोते वक्ते ऐका मात । नाहीं नाहीं आन दैवत । तुका ह्मणे दुसरें ॥ ४ ॥

॥ ३२४३ ॥

कथनी पठनी करूनि काय । वांचुनि रहणी वाया जाय ॥ १ ॥ मुखीं वाणी अमृतगोडी । मिथ्या भुकें चरफडी ॥२॥ पिळणी पाक करितां दगडा । काय जडा होय तें ॥ ३ ॥ मधु मेळवूनि माशी । आणिका सांसी पारधिया ॥४॥ मेळवूनि धन मेळवी माती। लोभ्या हातीं तेंचि मुखीं ५ आपलें केलें आपण खाय । तुका वंदी त्याचे पाय ६

॥ ३२४४ ॥

अवघेचि निजों नका अवघिये ठायीं । वेळ अवेळ तरी सांभा-ळावी कांहीं ॥१॥ जतन करा रे जतन करा । घालूं पाहे घरावरी घाला चोरटे ॥ २ ॥ सींतरिलीं फार खाती भोंवताले फेरे । गेलें नये हातां सेकीं तळमळ उरे ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मी करूं आपलें जतन । नलगे कांहीं कोणां द्यावें उघडा रे कान ॥ ४ ॥

॥ ३२४५ ॥

सरलें आतां नाहीं । न ह्मणे वेळकाळ कांहीं ॥ १ ॥ विठ्ठल कृपाळु माउली । सदा प्रेम पान्हायेली ॥ २ ॥ सीण विचारी भाग । नव्हे निष्ठुर नाहीं राग ॥३॥ भेदाभेद नाहीं । तुका ह्मणे तिच्याठायीं ॥ ४ ॥

॥ ३२४६ ॥

देह तंव असे भोगाचे अधीन । याचें सुखसीण क्षणभंगुर ॥ १ ॥ अविनाश जोडी देवापायीं भाव । कल्याणाचा ठाव सकळही ॥ २ ॥

क्षणभंगुर हा येथील पसारा । आलिया आकारा अवघें नासे ॥३॥ तुका ह्मणे येथें सकळ विश्रांति । आठवावा चित्तीं नारायण ॥ ४ ॥

॥ ३२४७ ॥

चालिलें न वाटे । गाऊनिया जातां वाटे ॥ १ ॥ बरवा वैष्णवांचा संग । येतो सामोरा श्रीरंग ॥ २ ॥ नाहीं भय आड । कांहीं विषमांत्रे जड ॥ ३ ॥ तुका ह्मणे भक्ति । सुखरूप आदीअंतीं ॥ ४ ॥

॥ ३२४८ ॥

बहुतां पुरे ऐसा वाण । आलें धन घरासी ॥१॥ घ्या रे फुका मोलें-विण । नारायण न भुला ॥ २ ॥ एका निवळल्या मनें । बरवें कानें सादर ॥ ३ ॥ तुका ह्मणे करुनि अंतीं । निश्चिंतीं हे ठेवावी ॥ ४ ॥

॥ ३२४९ ॥

मेघवृष्टीनें करावा उपदेश । परि गुरुनें न करावा शिष्य । वांटा लाभे त्यास । केल्या अर्धकर्माचा १ द्रव्य वेचावें अन्नछत्रीं । भूतीं द्यावें सर्वत्र । नेदावा हा पुत्र । उत्तमयाती पोसणा ॥२॥ बीज तें पेरावें खडकीं । ओल नाहीं ज्याचे बुडखीं । धीतां ठके सेखीं । पाठी लागे दिवाण ॥ ३ ॥ गुज बोलावें संतांशीं । पत्नी राखावी जैसी दासी । लाड देतां नियेसी । वांटा पावे कर्माचा ॥४॥ शुद्ध कसूनि पाहावें । वरि रंगा न भुलावें । तुका ह्मणे घ्यावें । जया नये तुटी तें ५

॥ ३२५० ॥

मारगीं चालतां पाउलापाउलीं । चिंतावी माउली पांडुरंग ॥ १ ॥ सर्व सुख लागे धेऊनिया पाठी । आवडीचा कंठीं रस ओती ॥२॥ पीतांबर छाया करी लोभापर । पाहे तें उत्तर आवडीचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे हेंचि करावें जीवन । वाचे नारायण तान भूक ॥ ४ ॥

॥ ३२५१ ॥

नका वांटूं मन विधिनिषेधांसी । स्मरावा मानसीं पांडुरंग ॥ १ ॥ खादलिया अन्ना मासी बोलों नये । अवघेंचि जाय एका वांसें ॥२॥ जोडी होते परी ते बहु कठिण । करितां जतन सांभाळावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें न मना विषाद । निर्वाण व्याध तुटों नये ॥ ४ ॥

॥ ३२५२ ॥

घ्या रे भाई घ्या रे भाई । कोणी कांहीं थोडें बहु ॥ १ ॥ येच हाटीं येच हाटीं । बांध गाठी पारखून ॥२॥ वेच आहे वेच आहे । सरलें पाहे मग खोटें ॥३॥ उघडें दुकान उघडें दुकान । रात्री जाली कोण सोडी मग ४ तुका ह्मणे अंतकाळीं । जाती टाळी बैसोनि ॥ ५ ॥

॥ ३२५३ ॥

येइल घरा देव न धरीं संदेहा । फकिराचा यावा व्हावा जेव्हां १ ॥

होइल फकीर योगी महानुभाव । घडी घडी देव सांभाळील ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसें बोलती बहुत । येणें गुणें संत झाले राम ॥ ३ ॥

॥ ३२५४ ॥

भागल्याचें तारूं शिणल्याची साउली । भुकेलिया घाली प्रेमपान्हा१
ऐसी हे कृपाळू अनाथांची वेशी । सुखाचीच राशी पांडुरंग ॥ २ ॥
सकळां सन्मुख कृपेचिया दृष्टी । पाहे बहु भेटी उतावीळां ॥ ३ ॥
तुका ह्मणे येथें आतां उरला कैंचा । अनंता जन्मींचा शीण भाग ४॥

॥ ३२५५ ॥

मनीं भाव असे कांहीं । तेथें देव येती पाहीं ॥१॥ पाहा जनाई सुंदरी ।
तेथें देव पाणी भरी ॥ २ ॥ शुद्ध पाहोनिया भाव । त्याचे हृदयीं
वसे देव ॥ ३ ॥ तुका ह्मणे विठोबासी । ठाव देई चरणांपासीं ॥४॥

॥ ३२५६ ॥

ऐका पंडितजन । तुमचे वंदितों चरण ॥ १ ॥ नका करूं नरस्तुती ।
माझी परिसा हे विनंती ॥ २ ॥ अन्न आच्छादन । हें तों प्रारब्धा
आधीन ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाणी । सुखें वेचा नारायणीं ॥ ४ ॥

॥ ३२५७ ॥

पंडित वाचक जरी झाला पुरता । तरी कृष्णकथा ऐके भावें ॥ १ ॥
क्षीर तुपा साकरे झालिया भेटी । तैसी पडे मिठी गोडपणें ॥ २ ॥
जाणोनिया लाभ घेई हा पदरीं । गोड गोडावरी सेवीं बापा ॥३॥
जाणिवेचें मूळ उपडोनी खोड । जरी तुज चाड आहे तुझी ॥ ४ ॥
नाना परिमळ द्रव्य उपचार । अंगीं उटी सार चंदनाची ॥ ५ ॥
जेविलियाविण शून्य ते शृंगारा । तैसी गोडी हरिकथेविण ॥ ६ ॥
ज्याकारणें वेदश्रुति हीं पुराणें । तेंचि विठ्ठल नाणें तिष्ठे कथे ॥७ ॥
तुका ह्मणे येर दगडाचीं पेवें । खळखळेंचि आघवें मूळ तेथें ॥८॥

॥ ३२५८ ॥

पर उपकारें कायावाचामन । वेचे सुदर्शन रक्षी तया ॥ १ ॥
याजसाठीं असें योजिलें श्रीपति । संकल्पाचे हातीं सर्व जोडी २॥
परपीडे त्याची जिव्हा मुंडताळे । यमदूत डाळे करिती पूजा ॥३॥
तुका ह्मणे अंबऋषि दुर्योधना । काय झालें नेणां दुर्वासया ॥ ४ ॥

॥ ३२५९ ॥

ऊंस वाढवितां वाढली गोडी । गुळ खाकर हे त्याची परवडी १॥
सत्यकर्मे आचरें रे । बापा सत्यकर्मे आचरें रे । सत्यकर्मे आचरें
होईल हित । वारेल दुःख असत्याचें ॥ २ ॥ साकरेच्या आळां
लाविला कांदा । स्थूळसानापरी वाढे दुर्गंधा ॥३॥ सत्य असत्य हें
ऐसिया परी । तुका ह्मणे याचा विचार करीं ॥ ४ ॥

॥ ३२६० ॥

नये वाचे अनुचित वाणी । नसो मनीं कुडी बुद्धि ॥१॥ ऐसें मागा अरे जना । नारायणा विनवूनि २ कामक्रोधां पडो चिरा । ऐसा बरा सायास ॥ ३ ॥ तुका ह्मणे नानाछंद या विनोदें न पडावें ॥ ४ ॥

॥ ३२६१ ॥

भाग्यवंत म्हणों तया । शरण गेले पंढरिराया ॥१॥ तरले तरले हा भरंवसा । नामधारकांचा ठसा ॥२॥ भुक्तिमुक्तीचें तें स्थळ । भोळे-भाविका निर्मळ ॥३॥ गाइलें पुराणीं । तुका ह्मणे वेदवाणी ॥ ४ ॥

॥ ३२६२ ॥

भार घाली देवा । नलगे देश डोई घ्यावा ॥ १ ॥ देह प्रारब्धा आधीन । सोसें अधिक वाढे सीण ॥ २ ॥ व्यवसाय निमित्त । फळ देतसे संचित ॥ ३ ॥ तुका ह्मणे फिरे । भोंवर्डीनें दम जिरे ॥ ४ ॥

॥ ३२६३ ॥

सेवकासी आज्ञा स्वामीची प्रमाण । जोंवरी हा प्राण जाय त्याचा१
आणिकांचा धाक न धरावा मनीं । निरोपावचनीं टळों नये ॥ २ ॥
समय सांभाळूनि आगळें उत्तर । द्यावें भेदी वज्र तयापरी ॥ ३ ॥
तुका ह्मणे तरी म्हणवावें सेवक । खादलें तें अन्न एक होय ॥ ४ ॥

॥ ३२६४ ॥

बीज पेरे सेतीं । मग गाडेवरी वाहाती ॥ १ ॥ वाया गेलें ऐसें दिसे । लाभ त्याचे अंगीं वसे ॥ २ ॥ पाल्याची जतन । तरि प्रांतीं येती कण ॥३॥ तुका ह्मणे आळा । उदक देतां लाभे फळा ॥ ४ ॥

॥ ३२६५ ॥

देव केंचा तया दुरी । भाकी बरी करुणा ॥ १ ॥ आळविल्या नलगे धर । माय जाणे र भातुकें ॥२॥ नावेवरी ज्याचा भार । पैल पार जवळी त्या ॥३॥ आतां परदेशी तुका । झाला लोकां वेगळा ॥४॥

॥ ३२६६ ॥

किती या काळाचा सोसावा वोळसा । लागला मारिसा पाठोवाळीं१
लक्ष चौऱ्याशीची करा सोडवण । रिघा या शरण पांडुरंगा ॥ २ ॥
उपजल्या पिंडा मरण सांगातें । मरतें उपजतें सवेंचि तें ॥ ३ ॥
तुका ह्मणे माळ गुंतली राहाटीं । गाडग्याची सुटी फुटलिया ॥४॥

॥ ३२६७ ॥

नको सांडूं अन्न नको सेवूं वन । चिंतीं नारायण सर्व भोगीं ॥ १ ॥
मातेचिये खांदीं बाळ नेणे सीण । भावना त्या भिन्न मुंडाविया २॥
नको गुंफों भोगीं नको पडों त्यागीं । लावुनि सरे अंगीं देवाचीया ३
तुका ह्मणे नको पुसूं वेळोवेळां । उपदेश वेगळा उरला नाहीं ॥ ४ ॥

॥ ३२६८ ॥

निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म । निर्धार हें वर्म चुकों नये ॥ १ ॥

निष्काम निश्चळ विठ्ठलीं विश्वास । पाहों नये वास आणिकांची २॥ तुका ह्मणे ऐसा कोण उपेक्षिला । नाहीं ऐकिला ऐसा कोणीं ॥ ३॥

॥ ३२६९ ॥

चिंतनासी नलगे वेळ । सर्व काळ करावें ॥ १ ॥ सदा वाचे नारायण । तें वदन मंगळ ॥ २ ॥ पढिये सर्वोत्तम भाव । येर वाव पसारा ॥ ३ ॥ ऐसें उपदेशी तुका । अवघ्या लोकां सकळां ॥ ४ ॥

॥ ३२७० ॥

कृपेच्या उत्तरें देवाचा प्रसाद । आनंदीं आनंद वाढवावा ॥ १ ॥ बहुतांच्या भाग्यें लाधलें जहाज । येथें आतां काज लवलाहो ॥ २॥ अलभ्य तें आलें दारावरी फुका । येथें आतां चुका न पाहिजे ॥३॥ तुका ह्मणे जिव्हा श्रवणाच्या द्वारें । माप भरा बरें सिगेवरि ॥४॥

॥ ३२७१ ॥

तप तीर्थ दान व्रत आचरण । गातां हरिगुण वारूं नये ॥ १ ॥ कोटि कुळे त्यांची वाडुळीं पाहाती । त्या तया घडती ब्रह्महत्या २ ॥ आपुलिया पापें न सुटे सायासें । कोणा काळें ऐसें निस्तरेल ॥ ३ ॥ व्हावें साह्य तया न घालावें भय । फुकासाठीं पाहे लाभ घात ॥ ४ ॥ तुका ह्मणे हित माना या वचना । सुख दुःख जाणा साधे फुका ५

॥ ३२७२ ॥

देवासाठीं जाणा तयासीच आटी । असेल ज्या गांठीं पुण्यराशी १ निर्बळा पाठवी बळें वाराणसी । मेला आला त्यासी अर्ध पुण्य २॥ कथेनिद्राभंग करावा भोजनीं । तया सुखा धणी पार नाहीं ॥ ३ ॥ यागीं ऋण घ्यावें द्यावें सुख लाही । बुडतां चिंता नाहीं उभयतां ४ तुका ह्मणे वर्म जाणोनि करावें । एक न घलावें एकावरी ॥ ५ ॥

॥ ३२७३ ॥

परस्त्रीतें म्हणतां माता । चित्त लाजवितें चित्ता ॥१॥ काय बोलोनिया तोंडें । मनामाजी कानकोंडें ॥ २ ॥ धर्मधारिष्ट गोष्टी सांगे । उष्ट्या हातें नुडवी काग ॥३॥ जें जें कर्म वसे अंगीं । तें तें आठवे प्रसंगीं ॥ ४ ॥ बोले तैसा चाले । तुका ह्मणे तो अमोल ॥ ५ ॥

॥ ३२७४ ॥

असत्य वचन होतां सर्व जोडी । जरी लग्नघडी परउपकार ॥ १ ॥ जाईल पतना यासि संदेह नाहीं । साक्ष आहे कांहीं सांगतों ते २ वदविलें मुखें नारायणें धर्मा । अंगुष्ट त्या कर्मासाठीं गेला ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां सांभाळा रे पुढें । अंतरींचें कुडें देइल दुःख ॥ ४ ॥

॥ ३२७५ ॥

जैसें चित्त जयावरि । तैसें जवळी तें दुरी ॥ १ ॥ नलगे द्यावा परिहार । या कोरडें उत्तर ॥२॥ असे अभ्यंतर । साक्षभूत जवळी ३

अवघें जागें सूत्रधारी । कोण नाचे कोणेपरी ॥ ४ ॥ तुका ह्मणे बुद्धि । ज्याची तेच तया सिद्धि ॥ ५ ॥

॥ ३२७६ ॥

भवसिंधूचें काय कोडें । दावी वाट चाले पुढें ॥१॥ तारूं भला पांडुरंग । पाय भिजों नेदी अंग ॥ २ ॥ मागें उतरिले बहुत । पैल तिरीं साधुसंत ॥३॥ तुका म्हणे लाग वेगें । जाऊं तयाचिया मागें ॥४॥

॥ ३२७७ ॥

द्रव्याचिया कोटी । नये गांडीची लंगोटी ॥ १ ॥ अंतीं चोळवणें-सांगीं । पांडुरंग धरा करीं ॥ २ ॥ लोभाचीं लोभिकें । यांचें सन्निधान फिकें ॥ ३ ॥ तुका ह्मणे हितें । जग नहो पडो रितें ॥ ४ ॥

॥ ३२७८ ॥

ब्रह्मचारी धर्म पोकाचें अक्षर । आश्रमीं विचार षटकर्में ॥ १ ॥ वानप्रस्थ तरी संयोगीं वियोग । संन्यास तो त्याग संकल्पाचा २॥ परमहंस तरी जाणे सहज वर्म । तेथें याति धर्म कुळ नाहीं ॥ ३ ॥ बोले वर्म जो चाले याविरहित । तो जाणा पतित श्रुति बोले ४ ॥ तुका ह्मणे कांहीं नाहीं नेमाविण । मोकळा तो सीण दुःख पावे ५॥

॥ ३२७९ ॥

कामिनीसी जैसा आवडे भ्रतार । इच्छीत चकोर चंद्र जैसा॥ १ ॥ तैसी हे आवडी विठ्ठलाचे पायीं । लागलिया नाहीं गर्भवास ॥ २ ॥ दुष्काळें पीडिलया आवडे भोजन । आणिक जीवन तृषाक्रांता ३ ॥ कामातुर जैसा भय लज्जा सांडोनी । आवडे कामिनी सर्वभावें ४॥ तुका ह्मणे तैसी राहिली आवडी । पांडुरंग थडी पाववील ॥ ५ ॥

॥ ३२८० ॥

लटिका तो प्रपंच एक हरि साच । हरिविण आहाच सर्व इंद्रियें १॥ लटिकें तें मौन श्रमाचें तें स्वप्न । हरिविण ध्यान नैश्वर्य अवघें ॥२॥ लटिकिया वित्पत्ति हरिविण करिती।हरि नाहीं चित्तीं तो शवजाणा ३ तुका ह्मणे हरि हें धरिसी निर्धारी । तरी तूं ब्रह्मकरी जासी वैकुंठा ४॥

॥ ३२८१ ॥

प्रपंच परमार्थ संपादीन दोन्ही । एकही निदानीं न घडे त्यासी ॥१॥ दोहीं पेंवावरी ठेवूं जातां हात । शेवटीं अपघात शरीराचा ॥ २ ॥ तुका ह्मणे तया दोहींकडे धका । शेवटीं तो नरकामाजी पडे ॥ ३ ॥

॥ ३२८२ ॥

काळ सारावा चिंतनें । एकांतवासीं गंगास्नानें । देवाचें पूजन। प्रदक्षणा तुळसीच्या ॥ १ ॥ युक्त अहार वेव्हार । नेम इंद्रियांचा सार । नसावी वासर । निद्रा बहु भाषण ॥२॥ परमार्थ महाधन । जोडी देवाचे चरण । व्हावया जतन । हे उपाय लाभाचे ॥ ३ ॥

देह समर्पिजे देवा । भार कांहींच न घ्यावा । होईल अनथा । तुका ह्मणे आनंद ॥ ४ ॥

॥ ३२८३ ॥

दीप न देखे अंधारा । आतां जतन हेंचि करा ॥१॥ नारायण नारायण । गांठी धन बळकट ॥२॥ चिंतामणीपाशीं चिंता । तत्वता ही न येल ॥ ३ ॥ तुका ह्मणे उभयलोकीं । हेंचि निकी सामुग्री ॥ ४ ॥

॥ ३२८४ ॥

मढें झांकुनिया करिती पेरणी । कुणबियाचे वाणी लवलाहें ॥ १ ॥
तयापरी करीं स्वहित आपुलें । जयासी फावलें नरदेह ॥ २ ॥
ओटीच्या परिस मुठीचें तें वाढे । यापरि कैवाड स्वहिताचें ॥ ३ ॥
नाहीं काळसत्ता आपुलिये हातीं । जाणते हे गुंती उगविती ॥ ४ ॥
तुका ह्मणे पाहें आपुली सूचना । करितो शहाणा मृत्युलोकीं ॥ ५ ॥

॥ ३२८५ ॥

घ्या रे लुटी प्रेम सुख । फेडा आजि धणी । चुकला तो मुकला । जाली वेरझार हाणी ॥ १ ॥ घाला घातला वैकुंठीं । करूनिया जीवें साटी । पुरविली पाठी । वैष्णवीं काळाची ॥ २ ॥ अवघें आणिलें अंबर । विठोसहित तेथें धुर । भेदूनि जिव्हार । नामबाणीं धरियेला ॥ ३ ॥ संचित प्रारब्ध क्रियमाण । अवघीं झालीं गहन । केलीं पापपुण्यें । देशधडी बापुडीं ॥ ४ ॥ आनंदें गर्जति निर्भर । घोष करिती निरंतर । कांपती असुर । वीर कवणा नागवती ॥ ५ ॥ जें दुर्लभ ब्रह्मादिकां । आजि सांपडलें फुका । घ्या रे ह्मणे तुका । सावचित्त होऊन ॥ ६ ॥

॥ ३२८६ ॥

देव सखा जरी । जग अवघें कृपा करी ॥ १ ॥ ऐसा असोनि अनुभव । कासाविस होती जीव २ देवाची जतन । त्यासी बांधूं न शके अग्न ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरी । प्रऱ्हादासि यत्न करी ॥ ४ ॥

॥ ३२८७ ॥

वैष्णव मुनि विप्रांचा सन्मान । करावा आपण घेऊं नये ॥ १ ॥
प्रभु झाला तरी संसाराचा दास । विहित तयासी याची सेवा ॥२॥
तुका ह्मणे हे आशीर्वादें बळी । जाईल तो छळी नरका यासीं ॥३॥

॥ ३५८८ ॥

परिमळ म्हणून चोळूं नये फूल । खाऊं नये मूल आवडतें ॥ १ ॥
मोतियाचें पाणी चाखूं नये स्वाद । यंत्र भेदुनि नाद पाहूं नये २॥
कर्मफळ ह्मणुनी इच्छूं नये काम । तुका ह्मणे वर्म दावूं लोकां ॥३॥

॥ ३२८८ ॥

मारगीं बहुत । याचि गेले साधुसंत ॥ १ ॥ नका जाऊं आडरानें ।

ऐसीं गर्जती पुराणें ॥ २ ॥ चोखाळिल्या वाटा । न लगे पुसाव्या धोपटा ॥ ३ ॥ झळकती पताका । गुरुड टके ह्मणे तुका ॥ ४ ॥

॥ ३२९० ॥

लेखी दुस्वप्नासमान । वेचला नारायणीं क्षण । उद्यांचें आजिच मरण । आणोनि ह्मणे हरि भोक्ता ॥ १ ॥ नाहीं कांहीं पडो येत तुटी । जाणें तो आहे शेवटीं । लाभ विचारोनि पोटीं । होईं शेवटीं जागृत ॥ २ ॥ आहे ते उरे कटा । लावुनि चळ आपुला फाटा । पुरे हें न पुरे शेवटा । तरण्या बळकटा सदा वास ॥ ३ ॥ ह्मणोनि मोडावा कांटाळा । अविद्यात्मक कोंवळा । होतील प्रबळा । आशा तृष्णा माया ॥ ४ ॥ क्षण या देहाच्या अंतीं । जड होउनि राहेल मातीं । परदेश तें परवर होतीं । चिळसविती नाकडोळे ॥ ५ ॥ जंव या नाहीं पातल्या विपत्ति । आयुष्य भविष्य आहे हातीं । लाभ विचारोनी गुंती । तुका ह्मणे अंतीं सर्व पिसुनें ॥ ६ ॥

॥ ३२९१ ॥

करितां देवार्चन । घरा आले संतजन ॥ १ ॥ देव सारावे परते । संत पूजावे आरते ॥ २ ॥ शाळिग्राम विष्णुमूर्ती । संत हो का भलते याती ॥ ३ ॥ तुका ह्मणे संधी । अधिक वैष्णवांची मांदी ४

॥ ३२९२ ॥

चुकवी ते वाट । पुढें सांपडवी नीट ॥ १ ॥ ह्मणउनी गर्भवास । नेणती ते हरिचे दास ॥ २ ॥ संचिताचा संग । काय जाणों पावे भंग ॥ ३ ॥ तुका म्हणे दृष्टी । उघडितां नव्हे कष्टी ॥ ४ ॥

॥ ३२९३ ॥

गर्भी असतां बाळा । कोण पाळी त्याच्या लळा ॥ १ ॥ कैसा लाघवी सूत्रधारी । कृपाळुवा माझा हरी ॥२॥ सर्प पिलीं वितांचि खाय । वांचलिया कोण माय ॥ ३ ॥ गगनीं लागला कोसेरा । कोण पुरवी तेथें चारा ॥ ४ ॥ पोटीं पाषाणाचे जीव । कवण जीव त्याचा भाव ॥५॥ तुका ह्मणे निश्चळ राहे । होईल तें सहज पाहे ६

॥ ३२९४ ॥

भावापुढें बळ । नाहीं कोणाचें सबळ ॥ १ ॥ करी देवावरी सत्ता । कोण त्याहूनि परता ॥ २ ॥ बैसे तेथें येती । न पाचारितां सर्व शक्ति ॥ ३ ॥ तुका ह्मणे राहे । तयाकडे कोण पाहे ॥ ४ ॥

॥ ३२९५ ॥

धांवे माते सोई । बाळ न विचारितां कांहीं ॥ १ ॥ मग त्याचें जाणें निकें । अंग वोडवी कौतुकें ॥ २ ॥ नेणे सर्प दोरी । अगी भलतें हातीं धरी ३ तीविणें तें नेणें । आणीक कांहीं तुका ह्मणे ४

॥ ३२९६ ॥

अगी देखोनि सती । अंगीं रोमांचा उठती ॥ १ ॥ हा तो नव्हे । उपदेश । सुख अंतरीं उल्हास ॥ २॥ वित्तगोतांकडे । चित्त न घाली न रडे ॥ ३ ॥ आठवूनि एका । उडी घाली ह्मणे तुका ॥ ४ ॥

॥ ३२९७ ॥

सकलगुणें संपन्न । एक देवाचें लक्षण ॥१॥ वरकड कोठें कांहीं एक आहे एक नाहीं ॥ २ ॥ षड्गुण ऐश्वर्य संपन्न । एक भगवंतीं जाणु ॥३॥ तुका ह्मणे जें जें बोला । तें तें साजे या विठ्ठला ॥४॥

॥ ३२९८ ॥

पाषाण देव पाषाण पायरी । पूजा एकावरी पाय ठेवी ॥ १ ॥ सार तो भाव सार तो भाव । अनुभवीं देव तेचि जाले ॥ २ ॥ उदका भिन्न पालट काई । गंगा गोड येरां चवी काय नाहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे हें भाविकांचें वर्म । येरी धर्माधर्म विचारावे ॥ ४ ॥

॥ ३२९९ ॥

ऐसा कोणी नाहीं हें जया नावडे । कन्या पुत्र घोडे दारा धन १ ॥ निंब घेतें रोगी कवणिया सुखें । हरावया दुःखें व्याधि पीडा २ ॥ काय पळे सुख चोर लागे पाठी । न घलावी काठी आड तया ॥३॥ जयाचें कारण तोचि जाणे करूं । नये कोणा वारूं आणिकांसी ४॥ तुका ह्मणे तरी सांपडे निधान । द्यावा ओंवाळून जीव बळी ॥५॥

॥ ३३०० ॥

नव्हे मतोळ्याचा वाण । नीच नवा नारायण ॥ १ ॥ सुख उपजे श्रवणें । खरें टांकसाळी नाणें ॥२॥ लाभ हातोहातीं । अधिक पुढ-तापुढती ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेणों किती । पुरोनि उरलें पुढती ॥४॥

॥ ३३०१ ॥

संकल्पासी अधिष्ठान । नारायण गोमटें १ अवधियांचे पुरे कोड । फिटे जड देहत्व ॥ २ ॥ उभय लोकीं उत्तम कीर्ति । देव चित्तीं राहिलिया ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीव भाय । नये हाय जवळी ॥४॥

॥ ३३०२ ॥

वचनेंचि व्हावें आपण उदार । होइल विश्वंभर संतुष्टचि ॥ १ ॥ सत्यसंकल्पाचीं फळें बीजापोटीं । शुद्ध नाहीं नासी पावों येत २॥ वंचिलिया काय येतसे उपेगा । शरीर हें नरकाचेंचि आलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीव जितां थारे लावा । पडिलिया गोवा देशभडी ॥४॥

॥ ३३०३ ॥

दह्यांचिया अंगीं निघे ताक लोणी । एका मोलें दोन्ही मागों नये १॥ आकाशाचे पोटीं चंद्र तारांगणें । दोहींशी समान पाहों नये ॥ २ ॥ पृथ्वीच्या पोटीं हिरा गारगोटी । दोहींसी संसाटी करूं नये ॥ ३ ॥ तुका ह्मणे तैसे संत आणि जन । दोहींसी समान भजूं नये ॥ ४ ॥

॥ ३३०४ ॥

जीव जीती जीवना संगें । मत्स्या मरण त्या वियोगें १ जया चित्तीं जैसा भाव । तया जवळि तैसा देव २ सकळां पढिये मानु । परि त्या कमळाचें जीवनु ३ तुका ह्मणे माता । वाहे तान्हयाचि चिंता ४

॥ ३३०५ ॥

करिती तया वेवसाव आहे । येथें व्हा रे साहे एका एक ॥ १ ॥ गातां आईकतां समानचि घडे । लाभें लाभ जोडे विशेषता ॥ २ ॥ प्रेमाचें भरतें भातें घ्यावें अंगीं । नटे टाळी रंगीं शूरत्वेंसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे बहुजन्माचें खंडण । होईल हा सीण निवारोनि ॥ ४ ॥

॥ ३३०६ ॥

भाग्यवंता हे परवडी । करिती गोडी जन्माची ॥ १ ॥ आपुलाल्या लाहीं भावें । जें ज्या व्हावें तें आहे २ इच्छाभोजनाचा दाता । नलगे चिंता करावी ३ तुका ह्मणे आल्या थान्या । वस्तु बन्या मोलाच्या ४

॥ ३३०७ ॥

जाणावें तें सार । नाहीं तरी दगा फार ॥ १ ॥ डोळे झांकिलिया रवि । नाहीं ऐसा होय जवीं ॥ २ ॥ बहुथोड्या आड । निवारितां लाभें जाड ॥ ३ ॥ तुका ह्मणे खरें । नेलें हातींचें अंधारें ॥ ४ ॥

॥ ३३०८ ॥

बरें सावधान । राहावें समय राखोन ॥१॥ नाहीं सारखिया वेळा । अवघ्या पावतां अवकळा ॥ २ ॥ लाभ अथवा हानी । थोड्यामध्येंच भोवनी ३ तुका ह्मणे राखा । आपणा नाहीं तोचि वाखा ४॥

॥ ३३०९ ॥

कस्तुरीचे अंगीं मीनली मृत्तिका । मग वेगळी कां येईल लेखूं १ ॥ तयापरि भेद नाहीं देवभक्तां । संदेहाच्या युक्ति सरों आल्या २ ॥ इंधनें तें आगी संयोगाच्या गुणें । सागरा दरुपणें वाहाळ तोचि ३ तुका ह्मणे माझें साक्षीचें वचन । येथें तो कारण शुद्ध भाव ॥४॥

॥ ३३१० ॥

धरितां इच्छा दुरी पळे । पाठी सोहळे उदासा ॥ १ ॥ ह्मणऊनि असट मन । नका खूण सांगतों ॥ २ ॥ आमिषापाशीं अवघें वर्म । सोस श्रम पाववी ॥३॥ तुका ह्मणे बीजन्यायें । तेथें यावें फळानें ॥४॥

॥ ३३११ ॥

देह निरसे तरी । बोलावया तुरे उरी ॥१॥ येर वाचेचें वाग्जाळ । अळंकारापुरते बोल ॥ २ ॥ काचें तरी कढे । जाती ऐसें चित्त ओढे ॥ ३ ॥ विष्णुदास तुका । पूर्ण धनी जाणे चुका ॥ ४ ॥

॥ ३३१२ ॥

याचि नांवें दोष । राहे अंतरीं किल्मिष ॥ १ ॥ मना अंगीं पुण्य

पाप । शुभ उत्तम संकल्प ॥ २ ॥ बिजाऐसीं फळें । उत्तम कां अमंगळें ॥ ३ ॥ तुका ह्मणे चित्त । शुद्ध करावें हे हित ॥ ४ ॥

॥ ३३१३ ॥

वेळोवेळां हेंचि सांगें । दान मागें जगासी ॥ १ ॥ विठ्ठल हे मंगळवाणी । वेऊं धणी पंगती ॥ २ ॥ वेचतसे पळें पळ । केलें बळ पाहिजे ॥ ३ ॥ तुका ह्मणे दुश्चित नका । राहों फुका नाड हा ॥४॥

॥ ३३१४ ॥

धावे त्यासी पावे । दुजें उगवूनि गोवें ॥ १ ॥ घ्यावें भरुनिया वर । मग नाहीं येरझार ॥ २ ॥ धणी उभें केलें । पुंडलिकें या उगलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे ठसा । गेला पडोनिया ऐसा ॥ ४ ॥

॥ ३३१५ ॥

ब्राह्मण तो याती अंत्यज असतां । मानावा तत्वता निश्चयेसी ॥१॥ रामकृष्णनाम उच्चारी सरळें । आठवी सांवळें रूप मनीं ॥ २ ॥ शांति क्षमा दया अलंकार अंगीं । अभंग प्रसंगीं धैर्यवंत ॥ ३ ॥ तुका ह्मणे गेल्या षडऊर्मी अंगें । सांडुनिया मग ब्रह्मचि तो ॥ ४ ॥

॥ ३३१६ ॥

पुढें आतां कैंचा जन्म । ऐसा श्रम वारेसा ॥ १ ॥ सर्वथाही फिरो नये । ऐसी सोय लागलिया ॥ २ ॥ पांडुरंगा ऐसी नाव । तारूं भाव असतां ॥ ३ ॥ तुका ह्मणे चुकती बापा । पुन्हा खेपा सकळी ॥ ४ ॥

॥ ३३१७ ॥

टाळ दिंडी हातीं । वैकुंठींचे ते सांगाती ॥ १ ॥ जाल तरी कोणी जागा । करा सिदोरी तें वेगा ॥ २ ॥ जाती सादवीत । तेथें असों द्यावें चित्त ॥ ३ ॥ तुका ह्मणे बोल । जाती बोलत विठ्ठल ॥ ४ ॥

॥ ३३१८ ॥

आह्मीं गावें तुह्मीं कोणीं कांहीं न ह्मणावें । ऐसें तंव आह्मां सांगितलें नाहीं देवें ॥ १ ॥ ह्मणा रामराम टाळी वाजवा हातें । नाचा डोला प्रेमें आपुलिया स्वहितें ॥२॥ सहज घडे तया आळस करणें तें काई । अग्नीचें भातुकें हात पोळितां कां पायीं ॥ ३ ॥ येथें नाहीं लाज भक्तिभाव लौकिक । हांसे तया घडे ब्रह्महत्यापातक ४ जया जैसा भाव निरोपण करावा । येथें नाहीं चाड ताळविताळ या देवा ॥ ५ ॥ सदैव ज्या कथा काळ घडे श्रवण । तुका ह्मणे येर जन्मा आले पाषाण ॥ ६ ॥

॥ ३३१९ ॥

तेलणीशीं रुसला वेडा । रागें कोरडें खातो भिडा ॥१॥ आपुलें हित आपण पाही । संकोच तो न धरी कांहीं ॥ २ ॥ नाडिलें लोकां टाकिला गोहो । बोडिलें डोकें सांडिला मोहो ॥ ३॥ शेजार-

णीच्या गेली रागें । कुतऱ्यांनीं घर भरिलें मागें ॥ ४ ॥ पिसारागें भाजिलें घर । नागविलें तें नेणें फार ॥ ५ ॥ तुका ह्मणे यांच्या रागें । फेडिलें सावळें देखिलें जगें ॥ ६ ॥

॥ ३३२० ॥

आलें देवाचिया मना । तेथें कोणाचें चालेना ॥१॥ हरिश्चंद्र ताराराणी । वाहे डोंबा घरीं पाणी २ पांडवांच्या साहाकारी । राज्यावरुनि केले दुरि ३ तुका ह्मणे उगेचि राहा । होईल तें सहज पाहा ॥४॥

॥ ३३२१ ॥

मजूराचें पोट भरे । दाता उरे संचला १ या रे या रे हातोहातीं । काम मातीं सारावी २ राजकीर्दी होतो झाडा । रोकडाचि पर्वत ॥ ३ ॥ तुका म्हणे खोल पाया । वेचों काया क्लेशेसीं ॥ ४ ॥

॥ ३३२२ ॥

शहाणपणें वेद मुका । गोपिका त्या ताकटी ॥ १ ॥ कैसें येथें कैसें तेथें । शहाणे ते जाणती ॥ २ ॥ यज्ञमुखें खोडी काढी । कोण गोडी बोरांची ॥३॥ तुका ह्मणे भावाविण । अवघा सीण केला तो ॥ ४ ॥

॥ ३३२३ ॥

गुरुशिष्यपण । हें तों अधमलक्षण ॥ १ ॥ भूतीं नारायण खरा । आप तैसाचि दुसरा ॥ २ ॥ न कळतां दोरी साप । राहे नेदावा तो कांप ॥ ३ ॥ तुका ह्मणे गुणदोषी । ऐसें न पडावें सोसीं ॥ ४ ॥

॥ ३३२४ ॥

सेजेचा एकांत अगीपाशीं कळे । झांकिलिया डोळे अधःपात ॥ १ ॥ राहो अथवा मग जळो अगीमधीं । निवाड तो आधीं होऊनि गेला २ भेणें झडपणी नाहीं येथें दुजें । पादरखिटा ओझें हतियारें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मज नाहीं जी भरंवसा । तोंवरि सहसा निवाड तो ४ ॥

॥ ३३२५ ॥

एक एका साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ ॥ १ ॥ कोण जाणे कैशी परी । पुढें उरी ठेवितां ॥ २ ॥ अवघें धन्य होऊं आतां । स्मरवितां स्मरण ॥ ३ ॥ तुका ह्मणे अवघी जोडी । ते आवडी चरणांची ॥४॥

॥ ३३२६ ॥

सोन्याचे पर्वत करवती पाषाण । अवघे रानोरान कल्पतरु ॥ १ ॥ परि या दुर्लभ विटोबाचे पाय । तेथें हे उपाय न सरती ॥ २ ॥ अमृतें सागर भरवती गंगा । ह्मणवेल उगा राहे काळा ॥ ३ ॥ भूत भविष्य कळों येईल वर्तमान । करवती प्रसन्न रिद्धिसिद्धी ४॥ स्थान मान कळों येती योगमुद्रा । नेणवेल पारा ब्रह्मांडासी ॥ ५ ॥ तुका म्हणे मोक्ष राहे पैलीकडे । इतर बापुडें काय तेथें ॥ ६ ॥

॥ ३३२७ ॥

नारे तरि काय नुजेडे कोंबडें । करूनिया वेडें आग्रो दावी ॥ १ ॥
आइत्याचे साहे फुकाचा विभाग । विक्षेपानें जग छी थू करी ॥२॥
नेमून ठेविला करत्यानें काळ । नल्हायेसें बळ करूं पुढें ॥ ३ ॥
तुका म्हणे देव साह्य झाल्यावरी । असांगचि करी सर्व सांग ॥४॥

॥ ३३२८ ॥

न करावी आतां पोटासाठीं चिंता । आहे त्या संचिता माप लावूं ॥१॥
दृष्टि ते घालावी परमार्थाठायीं क्षुल्लका उपायीं सिण झाला ॥ २ ॥
येथें तंव नाहीं येइजेसें सवें । कांहीं नये जीवें वेचों मिथ्या ॥ ३ ॥
खंडणेंचि नव्हे उद्वेग वेरझारीं । बापुडे संसारीं सदा असों ॥ ४ ॥
शेवटा पाववी नावेचें बैसणें । भुजाबळें कोणें कष्टी व्हावें ॥ ५ ॥
तुका ह्मणे आतां सकळांचें सार । करावा व्यापार तरी ऐसा ॥ ६॥

॥ ३३२९ ॥

अधिकार तैसा दावियेला मार्ग । चालतां हें मग कळों येतें ॥ १ ॥
जाळूं नये नाव पावलेनि पार । मागील आधार बहुतांचा ॥ २ ॥
तुका ह्मणे रोग वैद्याचे अंगीं । नाहीं करी जगीं उपकार ॥ ३ ॥

॥ ३३३० ॥

देहबुद्धि वसे लोभ जया चित्तीं । आपुलें जाणतीं परावें जे ॥ १ ॥
तयासी चालतां पाहिजे सिदोरी । दुःख पावे करी असत्य तो २॥
तुका ह्मणे धर्म रक्षाया कारणें । छाया इच्छी उन्हें तापला तो॥३॥

॥ ३३३१ ॥

अवघे देव साध । परी या अवगुणांचे बाध ॥ १ ॥ म्हणउनी नव्हे सरी। राहे एका एकी दुरी २ ऊंस कांदा एक आळां। स्वाद पाहतां निराळा ॥ ३ ॥ तुका म्हणे नव्हे सरी । विष अमृताची परी ॥४॥

॥ ३३३२ ॥

करी संध्यास्नान । वारी खाउनिया अन्न ॥ १ ॥ तया नाहीं लाभहानी । आदा वेंचाचिये मानी ॥ २ ॥ मजुराचें धन । विळा दोराचि जतन ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं । अधीरासी देव कांहीं ॥ ४ ॥

॥ ३३३३ ॥

अवगुण तो कोणीं नाहीं प्रतिष्ठिले । मागें होत आले शिष्टाचार १
दुर्बळाच्या नांवें पिटावा डांगोरा । हा तो नव्हे बरा सत्यवाद २ ॥
मद्य आणि मधु एकारासी नांवें । तरि का तें खावें आधारें त्या ३
तुका ह्मणे माझा उच्छिष्ट प्रसाद । निवडी भेदाभेद दृष्टिन्यावें ४ ॥

॥ ३३३४ ॥

न सांगावें वर्म । जनीं असों द्यावा भ्रम ॥ १ ॥ उगीच लागतील

पाठी । होतीं रितींच हिंपुटीं ॥ २ ॥ शिकविल्या गोटी । शिकोनि न धरिती पोटीं ॥३॥ तुका ह्मणे सीण । होइल अनुभवाविण ॥४॥

॥ ३३३५ ॥

नसावें ओशाळ । मग मानिती सकळ ॥१॥ जाय तेथें पावे मान । चाले बोलिलें वचन ॥ २ ॥ राहों नेदी बाकी । दान ज्याचें त्यासी टाकी ॥ ३ ॥ होवा वाटे जना । तुका ह्मणे सार्टी गुणां ॥ ४ ॥

॥ ३३३६ ॥

नसतां अधिकार । उपदेशासी बळात्कार । तरि ते केले हो चार । माकडा आणि गारोडी ॥१॥ धन धान्य राज्य बोल । वृथा रंजवणें फोल । नाहीं तेथें ओल । बीज वेची मूर्ख तो ॥२॥ नये बांधों गांठीं । पदरा आणी ऐसी तुटी । असोन कसोटी । शिष्टाचार अनुभव ३ उपदेसी तुका । मेघ वृष्टीनें आइका । संकळासी धोका । सहज ते उत्तम ४

॥ ३३३७ ॥

मन गुंतलें लुलयां । जाय धांवोनि त्या ठाया ॥ १ ॥ मागें परतवी तो बळी । । शूर एक भूमंडळीं ॥ २ ॥ येऊनिया घाली घाला । नेणों काय होईल तुला ३ तुका ह्मणे येणें । बहु ाडिले शाहाणे ४ ॥

॥ ३३३८ ॥

पतिव्रते आनंद मनीं । सिंदळ खोंचे व्यभिचार वचनीं ॥१॥ जळो वर्म लागो आगी । शुद्धपण भले जगीं ॥ २ ॥ सुख पुराणीं आचाराशिळा । दुःख वाटे अनर्गळा ॥ ३ ॥ शूरा उल्हास अंगीं । गांढ्या मरण ते प्रसंगीं ॥ ४ ॥ शुद्ध सोनें उजळे आगी । हीन काळे धांवे रंगीं ॥५॥ तुका म्हणे तोचि हिरा । घनघायें निवडे पुरा ॥ ६ ॥

॥ ३३३९ ॥

न कळतां कोणीं मोडियेलें व्रत । तया प्रायश्चित्त चाले कांहीं ॥ १ ॥ जाणतिया वज्रलेप झाले थोर । तयांस अघोर कुंभपाक ॥ २ ॥ आतां जरी कोणी नाइके सांगतां । तया शिकवितां तेंचि पाप ३ ॥ काय करूं मज देवें बोलविलें । माझें खोळंबलें काय होतें ॥ ४ ॥ तुका ह्मणे जना पाहा विचारूनी । सुख वाटे मनीं तेंचि करा ॥५॥

॥ ३३४० ॥

ढेंकणासी बाज गड । उतरचढ केवढी ॥ १ ॥ होता तैसा कळों भाव । आला वाव अंतरींचा ॥ २ ॥ बोरामध्यें वसे अळी । अळो-ळीच भोंवतीं ॥ ३ ॥ पोटासाठीं वेंची चणे । राजा ह्मणे तोंडें मी ॥ ४ ॥ बेडकानें चिखल खावा । काय ठावा सागर ॥ ५ ॥ तुका ह्मणे ऐसें आहे । काय पाहे त्यांत तें ॥ ६ ॥

॥ ३३४१ ॥

पर्जन्यें पडावें आपुल्या स्वभावें । आपुलाल्या दैवें पिके भूमि १॥

बीज तेंचि फळ येईल शेवटीं । लाभहानि तुटी ज्याची तया ॥२॥
दीपाचिये अंगीं नाहीं दुजाभाव । धणी चोर साव सारिखेचि ३॥
काउळें ढोंपरा कंकर तित्तिरा । राजहंस चारा मुक्ताफळें ॥ ४ ॥
तुका ह्मणे येथें आवडी कारण । पिकला नारायण जया तैसा ॥५॥

॥ ३३४२ ॥

दुर्बळा वाणीच्या एक दोनि सिद्धि । सदैवा समाधि विश्वरूपीं१॥
काय त्याचें वाया गेलें तें एक । सदा प्रेमसुख सर्वकाळ ॥ २ ॥
तीर्थ देव दुरी तया भाग्यहीना । विश्व त्या सज्जना दुमदुमिलें३॥
तुका ह्मणे एक वाहाती मोळिया । भाग्यें आगळिया घरा येती॥४॥

॥ ३३४३ ॥

वैद्य वांचविती जीवा । तरी कोण ध्यातें देवा ॥ १ ॥ काय जाणे कैसी परी । प्रारब्ध तें ठेवी उरी ॥ २ ॥ अंगीं दैवत संचरे । मग तेथें काय उरे ॥ ३ ॥ नवसें कन्यापुत्र होती । तरि कां करणें लागे पती ॥ ४ ॥ जाणे हा विचार । स्वामी तुकयाचा दातार ॥ ५ ॥

॥ ३३४४ ॥

कांहीं न मागे कोणांसी । तोचि आवडे देवासी ॥ १ ॥ देव तयासी ह्मणावें । त्याचे चरणीं लीन व्हावें ॥ २ ॥ भूतदया ज्याचे मनीं । त्याचे घरीं चक्रपाणी ३ नाहीं नाहीं त्या समान । तुका ह्मणे मी जमान ४

॥ ३३४५ ॥

कासिया पाषाण पूजिती पितळ । अष्ट धातु खळ भावहीन ॥ १ ॥
भावचि कारण भावचि कारण । मोक्षाचें साधन बोलियलें ॥ २ ॥
काय करिल जपमाळा कंठमाळा । करिशी वेळोवेळां विषयजप ३॥
काय करिशील पंडित व्हे वाणी । अक्षराभिमानी थोर होय ॥ ४ ॥
काय करिशील कुशल गायन । अंतरीं मळीण कुबुद्धि ते ॥ ५ ॥
तुका ह्मणे भाव नाहीं करी सेवा । तेणें काय देवा योग्य होशी ६॥

॥ ३३४६ ॥

दिली चाले वाचा । क्षय मागिल्या तपाचा ॥ १ ॥ रिद्धि सिद्धि येती घरा । त्याचा करिती पसारा २ मानदंभासाठीं । पडे देवासवें तुटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे मेवा । कैंचा वेठीच्या निर्दैवा ॥ ४ ॥

॥ ३३४७ ॥

आणिकां छळावया झालासी शाहणा । स्वहिता घातलें खान ॥ आडिके पैके करूनि सायास । कृपणें सांचलें धन ॥ न जिरे क्षीर श्वानासी भक्षितां । याती तयाचा गुण ॥ तारुण्यदशे अधम मातला दवडी हात पाय कान ॥ १ ॥ काय झालें यांस वाया कां ठकले । हातीं सांपडलें टाकीतसे ॥ घेउनि स्फटिकमणी टाकी चिंतामणी । नागवले आपुले इच्छे २ सिद्धीं सेविलें सेविती अधम । पात्रासारिखें

फळ ॥ सिंपिला मोतीं जन्मलें स्वाती। वर्षलें सर्वत्र जळ ॥ कापूस पट नयेचि कारणा । तयास पातला काळ ॥ तेंचि भुजंगें धरिलें कंठीं । मा विष जालें त्याची गरळ ३ भक्षूनि मिष्टान्न घृतसाखर । सहित सोलुनि केळें ॥ घालोनिया घसा अंगोळिया । वांती करू पाहे बळें ॥ कुंथावयाची आवडी देवा । उन्हवणी रडवी बाळें ॥ तुका ह्मणे जे जैसें करिती । ते पावती तैसींच फळें ॥ ४ ॥

॥ ३३४८ ॥

बोलावें तें धर्मा मिळे । बरे डोळे उघडूनी ॥१॥ काशासाठीं खावें शेण । जेणें जन थुंकतें ॥ २ ॥ दुजें ऐसें काय बळी । जें या जाळी अग्नीसि ॥ ३ ॥ तुका ह्मणे शूर रणीं । गांढे मनीं बुरबुरी ॥ ४ ॥

॥ ३३४९ ॥

आणितां त्या गती । हंस काउळे न होती १ सांडा सांडा रे मठारे । येथें गांठीसवें धुरें ॥ २ ॥ नाकेंविण मोति । उभ्या बाजारें फजिणी ॥ ३ ॥ हुकुमदाज तुका । येथें कोणी फुंदों नका ॥ ४ ॥

॥ ३३५० ॥

वंचुनिया पिंड । माता दान करी लंड ॥ १ ॥ जैसी याची चाली वरी । तैसा अंतरला दुरी ॥ २ ॥ मेला राखे दिस । ज्यालेपण जालें वोस ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । लोभें न पुरेचि सेवा ॥ ४ ॥

॥ ३३५१ ॥

ज्यासी नावडे एकादशी । तो जिताचि नरकवासी ॥ १ ॥ ज्यासी नावडे हें व्रत । त्यासी नरक नाहीं भीत ॥२॥ ज्यासी मान्य एकादशी । तो जिताचि मुक्तवासी ॥३॥ ज्यासी घडे एकादशी । जाणें लागे विष्णूपाशीं ४ तुका ह्मणे पुण्यराशी ।तोचि करी एकादशी५

॥ ३३५२ ॥

करवितां व्रत अर्धे पुण्य लाभे । मोडवितां दोघे नरका जाती १ ॥ शुद्धबुद्धि दोघां होय एक मान । चोरासवें कोण जिवें राखे २ ॥ आपुलें देऊनी आपुलाचि घात । न करावा थीत जाणोनिया ॥३॥ देऊनिया वेंच धाडी वाराणसी । नेदावें चोरासि चंद्रबळ ॥ ४ ॥ तुका ह्मणे तप तीर्थ व्रत याग । भक्ति हे मारग मोडूं नये ॥ ५ ॥

॥ ३३५३ ॥

एकादशीस अन्न पान । जे नर करिती भोजन । श्वानविष्ठेसमान । अधम जन तो एक ॥ १ ॥ ऐका व्रताचें महिमान । नेमें आचरती जन । गाती ऐकती हरिकीर्तन । ते समान विष्णूशीं ॥२॥ अशुद्ध विटाळशीचें खळ । विडा भक्षितां तांबूल । सांपडे सबळ । काळाहातीं न सुटे ॥ ३ ॥ शेज बाज विलास भोग । करी कामिनीशीं संग । तया जोडे क्षयरोग । जन्मव्याधी बळिवंत ॥ ४ ॥

आपण न वजे हरिकीर्तना । आणिकां वारी जातां जना । त्याच्या पापा जाणा । मह‍ा मेरु ठेंगणा ॥ ५ ॥ तया दंडी यमदूत । झाले तयाचे अंकित । तुका ह्मणे व्रत । एकादशी चुकलीया ॥ ६ ॥

॥ ३३५४ ॥

धनवंतालागी । सर्वमान्यता आहे जगीं ॥ १ ॥ माता पिता बंधु जन । सर्व मानिती वचन ॥ २ ॥ जव मोठा चाले धंदा । तंव बहिणी ह्मणे दादा ॥ ३ ॥ सदा शृंगारभूषणें । कांता लवे बहुमानें ॥ ४ ॥ तुका ह्मणे धन । भाग्य अशाश्वत जाण ॥ ५ ॥

॥ ३३५५ ॥

मायबापें केवळ काशी । तेणें नवजावें तीर्थासी ॥१॥ पुंडलीकें काय केलें । परब्रह्म उभें ठेलें ॥ २ ॥ तैसा होईं सावधान । हृदयीं धरीं नारायण ॥ ३ ॥ तुका म्हणे मायबापें । अवघीं देवाचीं स्वरूपें ॥४॥

॥ ३३५६ ॥

गंधर्व अग्नि सोम भोगिती कुमारी । कोणे चराचरी त्याग केला ॥
गायत्री स्वमुखें भक्षीतसे मळ । मिळाले वोहाळ गंगाओघ ॥ २ ॥
कागाचिये विष्टें जन्म पिंपळासि । पांडवकुळासि पाहतां दोष ३ ॥
शकुंतला सूत कर्ण शृंगी व्यास । यांच्या नामें नाश पातकांसि ४॥
गणिका अजामेळ कुब्जा तो विदुर । पाहतां विचार पिंगळेचा ५॥
वाल्हा विश्वामित्र वसिष्ठ नारद । यांचें पूर्व शुद्ध पाय आहे ॥६॥
न व्हावी तीं झालीं कर्में नरनारी । अनुतापें हरी स्मरतां मुक्त ७॥
तुका ह्मणे पूर्व नाठवे श्रीहरी । मूळ जो उच्चारी नरक त्यासि ॥८॥

॥ ३३५७ ॥

धाकुट्याचे मुखीं घांस घाली माता । वरी करी सत्ता शाहाणिया१
ऐसे जाणपणें पडिलें अंतर । वाढे तों तों थोर अंतराय ॥ २ ॥
दोन्ही उभायतां आपणचि व्याली । आवडीची चाली भिन्न भिन्न ३
तुका ह्मणे अंगापासूनि निराळें । निवडिलें बळें रडतें स्तनीं ॥ ४ ॥

॥ ३३५८ ॥

बाळ बापा ह्मणे काका । तरी कां निरपराध पारिखा १ जैसा तैसा भाव गोड । पुरवी कोड विठ्ठल २ साखरेसि ह्मणतां धोंडा । तरी कां तोंडा न रुचे ३ तुका ह्मणे आरुष बोल । नव्हे फोल आहाच ४

॥ ३३५९ ॥

साधूनी बचनाग खाती तोळा तोळा । आणिकातें डोळां न पाहवे १ ॥
साधूनी भुजंग धरितील हातीं । आणिकें कांपती देखोनिया ॥ २ ॥
असाध्य तें साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका ह्मणे ३ ॥

॥ ३३६० ॥

हित जाणे चित्त । कळों येतसे उचित ॥ १ ॥ परिहार ते संपा-

दनी । सत्य कारण कारणीं ॥ २ ॥ वरदळ तें गुतरे कसीं । आगी-मध्यें तें रसीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे करुनी खरें । ठेवितां तें पुढें बरें ॥ ४ ॥

॥ ३३६१ ॥

उचिताचा काळ । साधावया युक्तिबळ । आपलें सकळ । ते प्रसंगीं पाहिजे ॥ १ ॥ नेम नाहीं लाभ हानि । अवचित घडती दोनी । विचारूनि मनीं । पाहिजे तें प्रयोजावें ॥ २ ॥ जाळ जाळा काळें । करपो नेदावें आगळें । जेवितां वेगळें । ज्याचें त्याचें तेथें शोभे ॥३॥ पाळी नांगर पाभारीं । तन निवडूनि सोंकरी । तुका ह्मणे-घरी । सेज जमा सेवटीं ॥ ४ ॥

॥ ३३६२ ॥

करणें न करणें वारलें जेथें । जातों तेणें पंथें संतसंगें ॥ १ ॥ संतीं हें पाहिलें लाविलें निशाण । ते खुणा पाहोन गर्जे नाम ॥ २ ॥ तुका ह्मणे तुम्ही चला याचि वाटे । भरंवशानें भेटे पांडुरंग ॥ ३ ॥

॥ ३३६३ ॥

मारूं नये सर्प संतांचिये दृष्टी । होतील ते कष्टी व्यापकपणें ॥ १ ॥ एक सूत्र जीवशिवीं आइक्यता । रोम उपडितां अंग कांपे ॥ २ ॥ नाहीं साहों येत दुःखाची ते जाती । परपीडा भूतीं साम्य झालें ३॥ तुका ह्मणे दिला नीतीचा संकेत । पूजा नांवें चित्त सुखी तेणें ४॥

॥ ३३६४ ॥

सर्वां भूतीं द्यावें अन्न । द्रव्य पात्र विचारून । उपतिष्ठे कारण । तेथें बीज पेरीजे ॥ १ ॥ पुण्य करितां होय पाप । दुग्ध पाजोनि पोशिला साप । करोनि अघोराचा जप । दुःख विकत घेतलें ॥ २ ॥ भूमी पाहतां नाहीं वेगळी । माळ बरड एक काळी । उत्तम निराळी मध्यम ते कनिष्ट ॥३॥ ह्मणोनि विवेकें । कांहीं करणें तें निकें । तुका ह्मणे फिकें । रुची नेदी मिष्टान्न ॥ ४ ॥

॥ ३३६५ ॥

कवण दिस येइल कैसा । न कळे संपत्तीचा भरंवसा ॥ १ ॥ चौदा चौकडिया लंकापति । त्याची कोण झाली गति ॥२॥ लंकेसारिखें भुवन । त्याचें त्यासी पारखें जाण ॥३॥ तेहतीस कोटी भांदवडी । राज्य जातां न लगे घडी ॥४॥ ऐसें अहंतेनें नाडिले । तुका ह्मणे वाया गेले ५॥

॥ ३३६६ ॥

लंकेमाजी घरें किती तीं आइका । सांगतसें संख्या जैसी तैसी १॥ पांच लक्ष घरें पाषाणांचीं जेथें । सात लक्ष तेथें विटेबंदी ॥ २ ॥ कोटि घरें जेथें कांशा आणि तांब्याची । शुद्ध कांचनाची सप्त कोटी ३ तुका ह्मणे ज्याची संपदा एवढी । सांगातें कवडी गेली नाहीं ॥ ४ ॥

॥ ३३६७ ॥

क्षुधेलिया अन्न । द्यावें पात्र विचारून । १ ॥ धर्म आहे धर्मा अंगीं । कळलें पाहिजे प्रसंगीं ॥ २ ॥ द्रव्य आणि कन्या । येथें कुळ कर्म सोधण्या ॥३॥ तुका ह्मणे पुण्य गांठीं । तरिच उचितासी भेटी ॥४॥

॥ ३३६८ ॥

पायरवे अन्न । मग करी क्षीदक्षीण ॥ १ ॥ ऐसे होती घातपात । लाभेविण संगें थीत ॥ २ ॥ जन्माची जोडी । वाताहात एके घडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे शंका । हित आड या लौकिका ॥ ४ ॥

॥ ३३६९ ॥

जोंवरि तोंवरि जंबुक करि गर्जना । जंव त्या पंचानना देखिलें नाहीं १ तोंवरि तोंवरि सिंधु करि गर्जना । जंव त्या अगस्ति ब्राह्मणा देखिलें नाहीं ॥ २ ॥ तोंवरि तोंवरि वैराग्याच्या गोष्टी । जंव सुंदर वनिता दृष्टी देखिली नाहीं ॥ ३ ॥ तोंवरि तोंवरि शूरत्वाच्या गोष्टी । जंव परमाईचा पुत्र दृष्टी देखिला नाहीं ४ तोंवरि तोंवरि माळामुद्रांचीं भूषणें । जंव तुक्याचें दर्शन झालें नाहीं ॥ ५ ॥

॥ ३३७० ॥

पुढें जेणें लाभ घडे । तेंचि वेडे नाशिती १ येवढी कोठें नागवण । अंधारून विष घ्यावें ॥ २ ॥ होणारासी मिळे बुद्धि । नेदी शुद्धि धरूं तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जना सांग । दावी अंग आणीक ॥ ४ ॥

॥ ३३७१ ॥

ग्रंथाचे ते अर्थ नेणती खळ । बहु अनर्गळ झाले विषयीं ॥ १ ॥ नाहीं भेद म्हूण भलतेंचि आचरे । मोकळा विचरे मनामधें ॥ २ ॥ तुका ह्मणे विषा नांव तें अमृत । पापपुण्या भीत नाहीं नष्ट ॥ ३ ॥

॥ ३३७२ ॥

चलती आड वाटा । आणिका दाविती जे नीटा १ न मनीं न यांचे उपकार । नाहीं जोडा तो गव्हार २ विष सेवूनि वारी मारें । प्राण जातां जेणें संगें ३ बुडतां हाकें मारी । ठाव नाहीं आणिका वारी ४॥ तुका ह्मणे न करीं हिंका । गुण घेऊन अवगुण टाका ॥ ५ ॥

॥ ३३७३ ॥

जरी आलें राज्य मोळविक्या हातां । तरी तो मागुता व्यवसायी १ तृष्णेचीं मजूरें नेणती विसांवा । वाढे हांव हांवा काम कामीं ॥२॥ वैभवाचीं सुखें नातळतां अंगा । चिंता करी भोगा विघ्न जाळी ३॥ तुका ह्मणे वाहे मरणाचें भय । रक्षण उपाय करूनि असे ॥ ४ ॥

॥ ३३७४ ॥

अभिमानाचें तोंड काळें । दावी बळें अंधार ॥१॥ लाभ न्यावा हानी·

हातीं । तोंडीं माती पाडोनि ॥२॥ लागलीसे पाठी लाज । झालें काज नासाया ॥ ३ ॥ तुका ह्मणे कुश्चळ मनीं । विटंबनीं पडिलीं तीं ॥ ४ ॥

॥ ३३७५ ॥

चातुर्याच्या अनंतकळा । सत्या विरळा जाणता ॥ १ ॥ हांसत्यासवें हांसे जन । रडतां भिन्न पालटे २ जळो ऐसे वाजंट बोल । गुणां मोल भूल मिथ्या.॥३॥ तुका ह्मणे अंधळ्यापेसें । वोंगळ पिसें कौतुक ॥४॥

॥ ३३७६ ॥

गेली वीरसरी । मग त्यासि रांड मारी ॥१॥ मग नये तैसी सत्ता । गेली मागील आणितां ॥ २ ॥ भंगलिया चित्ता । न ये सांधितां ॥ ३ ॥ तुका ह्मणे धीर । भंगलिया पाठीं कीर ॥ ४ ॥

॥ ३३७७ ॥

खोट्याचा विकरा । येथें नव्हे कांच हिरा ॥ १ ॥ काय दावायाचें काम उगाच वाढवावा श्रम ॥ २ ॥ परीक्षकाविण । मिरवों जाणा तें तें हीण ॥ ३ ॥ तुका पाया पडे । वाद पुरे हे झगडे ॥ ४ ॥

॥ ३३७८ ॥

बोलविसी माझे मुखें । परी या जना वाटे दुःख ॥ १ ॥ जया जयाची आवडी । तया लागीं तें चरफडी ॥ २ ॥ कडीण देतां काढा । जलपे रोगी मेळवी दाढा ॥ ३ ॥ खाऊं नये तेंचि मागे । निवारितां रडों लागे ॥४॥ वैद्या भीड काय । अतित्याई जीवें जाय ॥ ५ ॥ नये भिडा सांगो आन । पथ्य औषधा कारण ॥ ६ ॥ धन माया पुत्र दारा । हे तो आवडी नरका थारा ॥ ७ ॥ तुका ह्मणे यांत । आवडे ते करा मात ॥ ८ ॥

॥ ३३७९ ॥

सर्वथाही खोटा संग । उपजे भंग मनासी ॥१॥ बहु रंगें भरलें जन । संपन्नचि अवगुणीं ॥ २ ॥ सेविलिया निष्कामबुद्धि । मदें शुद्धि सांडावी ॥ ३ ॥ त्रासोनिया बोले तुका । आतां लोकां दंडवत ॥ ४ ॥

॥ ३३८० ॥

भोगें घडे त्याग । त्यागें अंगा येती भोग ॥१॥ ऐसें उफराटें वर्म । धर्मा अंगींच अधर्म ॥२॥ देव अंतरे तें पाप । खोटे उगवा संकल्प ३ तुका ह्मणे भीड खोटी । लाभ विचारावा पोटीं ॥ ४ ॥

॥ ३३८१ ॥

या रे हरिदासानो जिंको कळिकाळा । आमुचिया बळा पुढें किती बापुडें १ रंग सुरंग घमंडी नाना छंदें । हास्यविनोदें नामाची आवडी ॥ २ ॥ येणें तेणें प्रकारें बहुतां सुख जोडे । पूजन तें घडे नारायणा अंतरीं ॥३॥ वांकड्या नाना बोल बोलावे आर्ष । येईल तो त्यांस छंद पढीये गोविंदा ॥ ४ ॥ आपुलाले आवडी एकापुढें

एक नटा । नाहीं थोर मोठा लहान या प्रसंगीं ॥ ५ ॥ तुका ह्मणे येथें प्रेम भंगूं नये कोणीं । देव भक्त दोन्ही निवडितां पातक ॥६॥

॥ ३३८२ ॥

वचनांचे मांडे दावावे प्रकार । काय त्या साचार कौतुकाचे ॥ १ ॥
जातां घरा मागें उरों नेणे खंती । मिळाल्या बहुती फांकलिया २ ॥
उदयींच अस्त उदयो संपादला । कल्पनेचा केला जागेपणें ॥ ३ ॥
जाणोनिया गेला हांडोरिया पोरां । सावध इतरां करुनि तुका ॥४॥

॥ ३३८३ ॥

न पालटे जाती जीवाचिये साटीं । वाहे तेंचि पोटीं दावी वरी ॥१॥
अंतरीं सबाहीं सारिखाचि रंग । वीट आणि भंग नाहीं रसा ॥२॥
घाणाचिया घायें पोटीं शिरे हिरा । सांडूं नेणे धीरा आपुलिया ॥३॥
तुका ह्मणे कढे करावी शीतळ । ऐसें जातिबळ चंदनाचें ॥ ४ ॥

॥ ३३८४ ॥

प्राक्तनाच्या योगें आळशावरी गंगा । स्नान काय जगा करूं नये १
उभी कामधेनु मांगाचे अंगणीं । तिसी काय ब्राह्मणीं वंदू नये ॥२॥
कोढियाचे हातें परिसें होय सोनें । अपवित्र ह्मणोन घेऊं नये ॥३॥
यातिहीन झाला गांवींचा मोकासी । त्याच्या वचनासी मानूं नये ४
भावारूढ तुका मुद्रा विठोबाची । न मनी तयांचीं तोंडें काळीं ॥५॥

॥ ३३८५ ॥

शीतळ तें शीतळाहुनी । पायवणी चरणींचें ॥१॥ सेवन हें शिरसा धरीं । अंतरीं ही वरद्ळा ॥ २ ॥ अवघेंचि नासी पाप । तीर्थ बाप माझ्याचें ॥३॥ बैसोनिया तुका तळीं । त्या कल्लोळीं डौरला ॥ ४ ॥

॥ ३३८६ ॥

विष पोटीं सर्पा । जन भीत तया दर्पा ॥१॥ पंच भूतें नाहीं भिन्न । गुण दुःख देती शीण ॥ २ ॥ चंदन प्रिय वासें । आवडती जाती ऐसें ॥ ३ ॥ तुका ह्मणे दाणा । कुचर मिळों नये अन्ना ॥ ४ ॥

॥ ३३८७ ॥

कारणापें असतां दृष्टी । शंका पोटीं उपजेना ॥१॥ शूर मिरवे रणांगणीं । मरणींच संतोष ॥ २ ॥ पाहिजे तो कळवळा । मग बाळा काय उणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे उदारपणें । काय उणें मनाचें ॥ ४ ॥

॥ ३३८८ ॥

झरा लागला सुखाचा । ऐसा मापारी कइंचा ॥ १ ॥ जो हें माप तोंडें धरी । सळी जाली ते आवरी ॥ २ ॥ जाले बहु काळ । कोणा नाहीं ऐसें बळ ॥३॥ तुका ह्मणे तळ । नाहीं पाहेसा सकळ ॥ ४ ॥

॥ ३३८९ ॥

बळ बुद्धी वेचुनिया शक्ती । उदक चालवावें युक्ती ॥ १ ॥ नाहीं

चळण तया अंगीं । धांवे लवणामागें वेगीं २ पाट मोट कळा । भरित पखाला सागळा ॥३॥ बीजा ज्यासी द्यावें । तुका ह्मणे तैसें व्हावें ४

॥ ३३९० ॥

जायांचें अंगुलें लेतां नाहीं मान । शोभा नेदी जन हांसविलें ॥ १ ॥ घुसळितां ताक कांडितां भूस । साध्य नाहीं क्लेश जाती वाया २॥ तुका ह्मणे नाहीं स्वता भांडवल । भिकेचें तें फोल बीज नव्हे ॥ ३॥

॥ ३३९१ ॥

समर्थाचें केलें । कोणां जाईल मोडिलें ॥ १ ॥ वाया करावी ते उरे । खटपट सोस पुरे ॥ २ ॥ ठेविला जो ठेवा । आपुलाला तैसा खावा ॥ ३ ॥ ज्याचें त्याचे हातीं । भुंके तयाची फजिती ॥४॥ तुका ह्मणे कोटी । वाळे झाले शूळ पोटीं ॥ ५ ॥

॥ ३३९२ ॥

इच्छिलें ते शकुनवंती । होय देती तात्काळ ॥ १ ॥ क्षीरा नीरा निवाड करी । बरावरी विठ्ठल ॥ २ ॥ भाग्याविण कैचें फळ । अंतर मळमूत्राचें ॥३॥ तुका ह्मणे संचित कुडें । तें बापुडें करीतसे ॥४॥

॥ ३३९३ ॥

वैभवाचे धणी सकळां शरणागत । सत्यभावें चित्त अर्पिलें तें १ ॥ नेदी उरों देव आपणावेगळें । भावाचिया बळें ठायाठाव ॥ २ ॥ जाणोनि नेणोनि अंगा आली दशा । मग होय इच्छा आपणच ३॥ तुका ह्मणे बरें धाकट्याचें जिणें । माता स्तनपानें वाढविते ॥ ४ ॥

॥ ३३९४ ॥

जें जें व्हावें संकल्पें । तेंचि पुण्य होय पाप ॥ १ ॥ कारण तें मनापाशीं । मेळविल्या मिळे रसीं ॥ २ ॥ सांडी मांडी हाली चाली । राहे तरि भली बोली ३ तुका ह्मणे सार । नांव जीवनाचे सागर ४

॥ ३३९५ ॥

आणिकांच्या घातें मानितां संतोष । सुखदुःख दोष अंगीं लागे १ ऐसे मनीं वाहूं न येती संकल्प । करूं नये पाप भांडवल ॥ २ ॥ किल्मिषाची चिरीं राहातां कांचणी । अग्नींत टाकोनी ठाव जाळी ३ तुका ह्मणे कोपें घडे पुण्यक्षय । होणार तें होय प्रारब्धींचें ॥ ४ ॥

॥ ३३९६ ॥

मथनासाठीं धर्माधर्म । त्याचें वर्म नवनीत ॥ ॥ तेंचि तें वाढूं नये । आलें जाब नासूनि ॥ २ ॥ सांभाळावें बरावर । वर्म दूर न वजावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे धालें पोट । मग बोटाचाटणी ॥ ४ ॥

॥ ३३९७ ॥

वदे साक्षत्वेंसीं वाणी । नारायणीं मिश्रित ॥१॥ नलगे कांहीं चाच-

पावें । जातों भावें पेरीत ॥ २ ॥ भांडार त्या दातयाचें । मी कैचें ये ठायीं ॥ ३ ॥ सादावीत गेला तुका । येथें एकाएकीं तो ॥ ४ ॥

॥ ३७९८ ॥

फळ पिकें देंटीं । निमित्य वारियाची भेटी ॥ १ ॥ हा तो अनुभव रोकडा । कळों येतो खरा कुडा ॥ २ ॥ तोडिलिया बळें । वाया जाती काचीं फळें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मन । तेथें सकळ कारण ॥ ४ ॥

॥ ३७९९ ॥

फळ देंटींहून झडे । मग मागुतें न जोडे ॥ १ ॥ ह्मणउनि नांवडी खोटी । कारण उचिताचें पोटीं ॥ २ ॥ पुढें मढें हात । त्याग मागिलां उचित ॥ ३ ॥ तुका ह्मणे रणीं । नये पाहों परतोनि ॥ ४ ॥

॥ ३८०० ॥

अवघी मिथ्या आटी । राम नाहीं तंव कंठीं ॥ १ ॥ सावधान सावधान । उगवीं संकल्पीं हें मन ॥ २ ॥ सांडिलें तें मांडे । आग्रह उरल्या काळ दंडे ॥ ३ ॥ तुका ह्मणे आलें भागा । देउनि चिंतीं पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ३८०१ ॥

नये इच्छूं सेवा स्वइच्छा जगाची । अवज्ञा देवाची घडे तेणें ॥ १ ॥ देहाचा निग्रही त्याचें तो सांभाळी । मग नये काळि अंगावरी ॥ २ ॥ आपालिया इच्छा माता सेवा करी । न बाधी ते थोरी येणें क्षोभें ३ तुका ह्मणे सांडा देखीचे दिमाख । मोडल्याने दुःख गांड फाटी ॥ ४ ॥

॥ ३८०२ ॥

शिळा जया देव । तैसा फळे त्याचा भाव ॥ १ ॥ होय जतन तें गोड । अंतरा येती नाड ॥ २ ॥ देव जोडे भावें । इच्छेचें तें प्रेम घ्यावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मोड दावी । तैशीं फळें आलीं ठायीं ॥ ४ ॥

॥ ३८०३ ॥

अंतरींचें गोड । राहे आवडीचें कोड ॥ १ ॥ संघष्टणें येती अंगा । गुणदोष मनोभंगा ॥ २ ॥ उचिताच्या काळा । नाहीं कळत सकळां ॥ ३ ॥ तुका ह्मणे अभावना । भावीं मूळ तें पतना ॥ ४ ॥

॥ ३८०४ ॥

धनवंता घरीं । करी धनचि चाकरी ॥ १ ॥ होय बैसल्या व्यापार । नलगे सांडावेंचि घर ॥ २ ॥ रानीं वनीं दीपीं । असतां होतीं सोपीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे मोल । देतां कांहीं नव्हे बोल ॥ ४ ॥

॥ ३८०५ ॥

जया शिरीं कारभार । बुद्धि सार तयाची ॥ १ ॥ वर्ते तैसें वर्ते जन । बहुतां गुण एकाचा ॥ २ ॥ आपणीया पाक करी । तो इतरीं सेविजे ॥ ३ ॥ तुका ह्मणे शूर राखे । गांढ्या वाखे सांगातें ॥ ४ ॥

॥ ३४०६ ॥

कल्पतरूअंगीं इच्छिलें तें फळ । अभावी दुर्बळ भावें सिद्धी ॥ १ ॥ धन्य त्या जाती धन्य त्या जाती । नारायण चित्तीं सांठविला ॥ २ ॥ बीजायेसा यावा उदकें अंकुर । गुणाचे प्रकार ज्याचे तया ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळे पारखिया हिरा । ओझें पाठी खरा चंदनाचें ॥ ४ ॥

॥ ३४०७ ॥

जळो अगीं पडो खाण । नारायण भोगिता ॥१॥ ऐसी ज्याची वदे वाणी । नारायणीं ते पावे ॥ २ ॥ भोजनकाळीं करितां धंदा । ह्मणा गोविंदा पावलें ॥३॥ तुका ह्मणे नलगे मोल । देवा बोल आवडती ॥४॥

॥ ३४०८ ॥

देईल तें उणें नाहीं । याचें कांहीं पदरीं १ पाहिजे तें संचित आतां । येथें सत्ता करावया २ गुणां ऐसा भरणा भरी । जो जें विचारी तें लाभे ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवीं देव । फळे भाव आपुला ॥ ४ ॥

॥ ३४०९ ॥

नाहीं लोपों येत गुण । वेधी आणिकां चंदन ॥ १ ॥ न संगतां पडे ताळा । रूप दर्पणीं सकळां ॥२॥ सारविलें वरी । आहाच तें क्षणभरी ॥ ३ ॥ तुका म्हणे वोहळें । सागराच्या ऐसें व्हावें ॥ ४ ॥

॥ ३४१० ॥

कल्पतरूखालीं । फळें येती मागीतलीं ॥१॥ येथें बैसल्याचा भाव । विचारूनि बोले ठाव ॥ २ ॥ द्यावें हें उत्तर । येतो प्रतिसादाचा फेर ॥ ३ ॥ तुका ह्मणे मनीं । आपुलियाचि लाभहानि ॥ ४ ॥

॥ ३४११ ॥

चोराचिया धुडका मनीं । वसे ध्यानीं लंछन १ ऐशा आह्मी करणें काय । वर्षो न्यायें पर्जन्य २ ज्याच्या बैसे खतावरी । ते चुरचुरी दुखवूनि ३ तुका ह्मणे ज्याची खोडी । त्याची जोडी त्या पीडा ४ ॥

॥ ३४१२ ॥

कुंभ अवघा एक आवा । पाकीं एकीं गुंफे डावा ॥ १ ॥ ऐसे भिन्न भिन्न साटे । केले प्रारब्धानें वांटे २ हिरे दगड एक खाणी । कैचें विजातीला पाणी ३ तुका ह्मणे शिरीं । एक एकाची पायरी ॥४॥

॥ ३४१३ ॥

भले ह्मणवितां संतांचे सेवक । आइत्याची भीक सुखरूप ॥ १ ॥ ठसावितां बहु लागती सायास । चुकल्या घडे नाश अल्प वर्म २॥ पाकसिद्धी लागे संचित आइतें । घडतां सोई तें तेव्हां गोड ॥ ३ ॥ तुका ह्मणे बरे सांगतांचि गोष्टी । रणभूमि दृष्टी न पडे तों ॥ ४ ॥

॥ ३४१४ ॥

येथील हा ठसा । गेला पडोनिया ऐसा ॥ १ ॥ धरी .देवाचा अ-

बोला । त्यासि तोचि सवे त्याला ॥ २ ॥ नाहीं पाहावें लागत । एका एकींच तें रितें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जन । तयामध्यें येवढें भिन्न ॥ ४ ॥

॥ ३४१५ ॥

एकांचीं उत्तरें । गोड अमृत मधुरें ॥ १ ॥ एका देवाच्या विभूती । भिन्न प्रारब्धाची गती ॥ २ ॥ एकांचीं वचनें । कडू अत्यंत तीक्ष्णें ॥ ३ ॥ प्रकाराचे तीन । तुका ह्मणे केले जन ॥ ४ ॥

॥ ३४१६ ॥

सांठविला वाण । पैस घातला दुकान १ जें ज्या पाहिजे जें काहीं । आहे सिद्धचि जवळी ॥ २ ॥ निवांडलें साचें । उत्तम मध्यम कनिष्ठाचें ॥ ३ ॥ तुका बैसला दुकानीं । दावी मोला ऐसी वाणी ॥ ४ ॥

॥ ३४१७ ॥

भोंवंडीसरिसें । अवघें भोंवतचि दिसे ॥१॥ डोयीं गाळिल्या निश्चळ । आहे अचळीं अचळ ॥२॥ एक हाकेचा कपाटीं । तेथें आणीक नाहीं उठी ॥ ३ ॥ अंध्रें धांवें शशी । तुका ह्मणे कुसरें भासी ॥ ४ ॥

॥ ३४१८ ॥

घातला दुकान । पढीये तैसा आहे वान ॥ १ ॥ आम्हां भांडारी देवाचें । घावें घ्यावें माप वाचे २ उगवूं जाणे मोडी । जाली नव्हे त्याची जोडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे पुडी । मोला ऐसी खरी कुडी ॥ ४ ॥

॥ ३४१९ ॥

राजा चाले तेथें वैभव सांगातें । हें काय लागतें सांगावें त्या ॥१॥ कोणी कोणा येथें न मनी जो फुका । कुबेरोण एका देवाचिया २ शृंगारिलें नाहीं तगों येत वरि । उमटे लौकरि जैसें तैसें ॥ ३ ॥ तुका ह्मणे घरीं वसे नारायण । कृपेचि ते खूण साक्ष्या येते ॥ ४ ॥

॥ ३४२० ॥

मोहोऱ्याच्या संगें । सुत नव्हे आगीजोगें ॥ १ ॥ नाहीं तरी त्याचें भक्ष । काय सांगणें ते साक्ष ॥ २ ॥ स्वामीचिया अंगें । रूप नव्हे कोणाजोगें ॥ ३ ॥ तुका ह्मणे खोडी । देवमनी न देती दडी ॥ ४ ॥

॥ ३४२१ ॥

महुरा ऐसीं फळें नाहीं । आलीं कांहीं गळती ॥ १ ॥ एकदशे येती थोडीं । नास आढी वेंच तो २ पिकला पावे पिकला पावे । अवघड गोवे सेवटाचे ॥ ३ ॥ उंच निच परिवार देवी । धन्या ठावी चाकरी ॥४॥ झळके तेथें पावे आणी । ऐसे क्षणीं बहु थोडे ॥ ५ ॥ पावेल तो पैल थडी । म्हणो गडी आपुला ॥ ६ ॥ तुका ह्मणे उभाऱ्यानें । कोण खरें मानितसे ॥ ७ ॥

॥ ३४२२ ॥

धन्य शुद्ध जाती । घरीं लौकरी परती ॥ १ ॥ देखिलें तेंचि कानीं ।

होय परिपाक मनीं ॥ २ ॥ कळवळा पोटीं । सावधान हिता-सांटीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे भाव । ज्याचा तोचि जाणा देव ॥ ४ ॥

॥ ३४२३ ॥

आणिकांसी तारी ऐसा नाहीं कोणी। घड तें नासोनि भलता टाकी सोनें शुद्ध होतें आविट तें घरीं । नासिलें सोनारीं अळंकारी ॥२॥ ओल शुद्ध काळी काळें जिरें बीज । कैचें लागे निज हातीं तेथें ३॥ एक गहुं करिती अनेक प्रकार । सांजा दिवसीं क्षीर घुगरिया ४॥ तुका ह्मणे विषा रुचि एका हातीं । दाखानी नासिती नवनीत ॥ ५ ॥

॥ ३४२४ ॥

दधिमाजीं लोणी जाणती सकळ । तें काढी निराळें जाणे मथन १॥ अग्नि काष्ठामाजी ऐसें जाणे जन । मथिलियाविण कैसा जाळी २॥ तुका ह्मणे मुख मळीण दर्पणीं । उजळिल्यावांचूनि कैसा भासे ३॥

॥ ३४२५ ॥

आपुल्याचा भोत चाटी। मारी करंटी पारख्या १ ऐसें जन भुललें देवा । मिथ्या हेवा वाढवी ॥२॥ गळ गिळी आमिषें मासा । प्राण आशा घेतला ३ तुका म्हणे बोकडमोहो। धरी पहाहो खाटिकाचा ४

॥ ३४२६ ॥

विषय तो मरणसंगीं । नेणे सुटिका अभागी ॥१॥ शास्त्राचा केला लुंडा । तोंडीं पाडियेला धोंडा ॥२॥ अगदीं मोक्ष नाहीं ठावा । काय सांगावें गाढवा ॥३॥ तुका ह्मणे ग्यानगड । सुखें पावो देवा नाड ॥४॥

॥ ३४२७ ॥

उरकडा आधीं अंगीं नरकाडी । जातीचे ते जोडी तेचि चित्तीं ॥१॥ कासयानें देखे अंधळें माणिकें । चवीविण फिके वाया जाय ॥ २॥ काय जाणे विष पालटों उपचारें । मुखासी अंतर तोंचि बरें ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय उपदेश वेड्या । संग होता रेड्यासवें कष्ट ॥ ४ ॥

॥ ३२४२८ ॥

विंचा पीडी नांगी । ज्याचा दोष त्याचे अंगीं ॥ १ ॥ केला पाहिजे विचार । मन मित्र दावेदार ॥ २ ॥ मधुरा उत्तरीं । रांवा खेळे उरावरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे रेडा । सुखें जाती पेशा पीडा ॥ ४ ॥

॥ ३४२९ ॥

मुखीं नेणपण । झाला तरी अभिमान ॥ १ ॥ वाया जावें हेंचि खरें । केलें तेणेंचि प्रकारें ॥ २ ॥ अराणूक नाहीं कधीं । झाली तरि भेद-बुद्धि ॥ ३ ॥ अंतरली नाव । तुका ह्मणे नाहीं ठाव ॥ ४ ॥

॥ ३४३० ॥

प्रायश्चितें देतो तुका । जातों लोकां सकळां ॥ १ ॥ धरितील ते तरती मनीं । जाती घाणी वाया त्या ॥ २ ॥ निग्रहअनुग्रहाचे ठाय । देतो घाय पाहोनि ॥३॥ तुका झाला नरसिंहीं । भय नाहीं कृपेनें ॥ ४ ॥

॥ ३४३१ ॥

वेचावें तें जीवें । पूजा घडे ऐशा नावें ॥ १ ॥ भिकारीची ते भि-
कारी । साक्षी अंतरींचा हरी ॥ २ ॥ फळ बीजाऐसें । कार्यकारणा-
सरिसें ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाम । लवणाऐसें लवण ॥ ४ ॥

॥ ३४३२ ॥

बाळपणें ऐसीं वरुषें गेलीं बारा । खेळतां या पोरा नानामतें ॥ १ ॥
विटू दांडू चेंडू लगोऱ्या वाघोडीं । चंपे पेंड वडी एकीबेकी ॥ २ ॥
हमामा हुंबरी पकव्याच्या बारे । खेळ जनीं भोवरे गुंड्यांची ३ ॥
सेलडेरा आणि निसरभोंवडी । उचली बाले घोडीं अंगवळें ॥ ४ ॥
तुका ह्मणे ऐसें बाळपण गेलें । मग तारुण्य आलें गर्वमूळ ॥ ५ ॥

॥ ३४३३ ॥

तारुण्याच्या मदें न मानी कोणासी । सदा मुसमुसी घुळी जैसा १
अटोनी वेटोनी बांधला मुंडासा । फिरतसे ऐसा जनामधीं ॥ २ ॥
हातीं दीडपान वरती करी मान । नाहीं तो सन्मान आलियासी ३॥
श्वानाचिया परी हिंडे दारोदारीं । पाहे परनारी पापदृष्टी ॥ ४ ॥
तुका ह्मणे ऐसी थोर हानि झाली । करितां टवाळी जन्म गेला ५॥

॥ ३४३४ ॥

ह्मातारपणीं थेटे पडसें खोकला । हात कपाळाला लावुनि बैसे १॥
खोबरियाची वाटी जालें असे मुख । गळतसे नाक श्लेष्मपुरीं २॥
बोलों जातां शब्द नयेचि हा नीट । गडगडी कंठ कफ भारी ॥३॥
सेजारी ह्मणती मरेना कां मेला । आणिला कांटाळा येणें आह्मां ४
तुका ह्मणे आतां सांडुनी या काम । स्मरा राम राम क्षणक्षणा ५॥

॥ ३४३५ ॥

बारा वर्षें बाळपण । तेंही वेचलें अज्ञानें ॥ १ ॥ ऐसा जन्म गेला
वाया । न भजतां पंढरीराया ॥ २ ॥ बाकी उरलीं अठ्यायशीं ।
तीस वेचिलीं कामासी ॥३॥ बाकी उरलीं अठ्ठावन्न । तीस वेचलीं
ममतेनें ॥ ४ ॥ बाकी उरलीं आटावीस । देहगेह निसरलास ॥५॥
तुका ह्मणे ऐसा झाडा । संसारि हा आहे थोडा ॥ ६ ॥

॥ ३४३६ ॥

बहु टाळाटाळी । होतां भोवताहे कळी ॥ १ ॥ बरें नव्हेल सेवटीं ।
भय असो द्यावें पोटीं ॥ २ ॥ मुरगाळीनां कान । घुम मांडील
सावधान ॥ ३ ॥ अबोलणा तुका । ऐसें कोणी लेखूं नका ॥ ४ ॥

॥ ३४३७ ॥

देवावरी भार । वृत्ति अयाचित सार ॥१॥ देह देवाचे सांभाळी ।
सार योजे यथाकाळीं ॥ २ ॥ विश्वासीं निर्धार । विस्तारिल
विश्वंभर ॥ ३ ॥ तुका म्हणे व्हावें । बळ एकचि जाणावें ॥ ४ ॥

॥ ३४३८ ॥

वाघें उपदेशिला कोल्हा । सुखें खावों द्यावें मला १ अंतीं मरसी तें न चुके । मज कां मारितोसी भुके ॥ २ ॥ येरू म्हणे भला भला । निवाड तुझ्या तोंडें झाला ॥ ३ ॥ देह तो जाणार । घडेल हा पर-उपकार ॥ ४ ॥ येरू म्हणे मनीं । ऐसे जावे समजोनि ॥ ५ ॥ गांठी पडली ठका ठका । त्याचें वर्म बोले तुका ॥ ६ ॥

॥ ३४३९ ॥

दुधाळ गाढवी जरी जाली पाहे । पावेल ते काय धेनुसरी ॥ १ ॥
कागाचिया गळा पुष्पाचिया माळा । हंसाची तो कळा काय जाणे२
मर्कटें अंघोळी लावियेले टिळे । ब्राह्मणाचे लीळे वर्तूं नेणे ॥ ३ ॥
जरी तो ब्राह्मण झाला कर्मभ्रष्ट । तुका ह्मणे श्रेष्ठ तिहीं लोकीं ॥४॥

॥ ३४४० ॥

भक्तिप्रेमसुख नेणवे आणिकां । पंडित वाचकां ज्ञानियांसीं ॥ १ ॥
आत्मनिष्ठ जरी झाले जीवन्मुक्त । तरी भक्ति सुख दुर्लभ त्या २ ॥
तुका ह्मणे कृपा करिल नारायण । तरिच हें वर्म पडे ठायीं ॥ ३ ॥

॥ ३४४१ ॥

भल्याचें दर्शन । तेथें शुभाचि वचन ॥ १ ॥ बोलावी हे धर्मनीत । क्षोभें होत नाहीं हित ॥ २ ॥ मर्यादा ते बरी । वेळ जाणावी चतुरीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे बहु । लागे ऐसें बरें मऊ ॥ ४ ॥

॥ ३४४२ ॥

बसतां चोरापाशीं तैसी होय बुद्धि । देखतांचि चिंधी मन धांवे ॥१॥
व्यभिचारापाशीं बैसतां क्षणभरी । देखताचि नारी मन धांवे ॥२॥
प्रपंचाचा छंद टाकुनिया गोवा । धरावें केशवा हृदयांत ॥ ३ ॥
सांडुनिया देई संसाराची बेडी । कीर्तनाची गोडी धरावी गा ॥४॥
तुका ह्मणे तुला सांगतों मी एक । रुक्मिणीनायक मुखीं गावा ५॥

॥ ३४४३ ॥

शिकवणेसाठीं वाटते तळमळ । पुढें येईल काळ फोडों डोई ॥ १ ॥
तेव्हां त्यासी काय देशील उत्तर । मेळवूनि अंतर ठेवितोसी ॥ २ ॥
येर्थाचिया सोंगें भोरपियाचे परी । होईल तें दुरी शृंगारिलें ॥ ३ ॥
तुका ह्मणे कां रे राखिलें खरकटें । रागेल्याचे तंट रागेलें का ॥४॥

॥ ३४४४ ॥

समर्थाचे सेवे बहु असे हित । विचार हृदयांत करुनी पाहें ॥ १ ॥
वरकडा ऐसा नव्हे हा समर्थ । क्षणेंचि घडित सृष्टि नासे ॥ २ ॥
ज्याची कृपा होतां आपणा ऐसें करी । उरों नेदी उरी दारिद्र्याची३
ऐशालागी मन वोळगे अहर्निशीं । तेणें वंद्य होशी ब्रह्मादिकां ४ ॥
तुका ह्मणे हेंचि आहे पैं मुद्दल । सत्य माझा बोल हाचि माना ५॥

॥ ३४४५ ॥

संत कृपा जाली । इमारत फळा आली १ ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिलें देवालया २ नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार ॥ ३ ॥ जनार्दन एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ४ तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ॥ ५ ॥

॥ ३४४६ ॥

चला आळंदीला जाऊं । ज्ञानदेवा डोळां पाहूं १ होतिल संतांचिया भेटी १ सुखाचिया सांगों गोष्टी २ ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर । मुखीं ह्मणतां चुकती फेर ॥३॥ तुह्मां जन्म नाहीं एक । तुका ह्मणे माझी भाक ४

॥ ३४४७ ॥

सकळ हे माया नागवे कवणा । भांबाविलें जना दाही दिशा ॥१॥ आशा तृष्णा दंभ लागली हे पाठी । नेदी बैसों हाटीं मोह ठायीं ॥२॥ काम क्रोध घरा लावितील आगी । निंदा हिंसा दोघी पळतां खाती ३ लाज पुढें उभी राहिली आडवी । ते करी गाढवी थोर घात ॥ ४ ॥ तुका ह्मणे चिंता घाली गर्भवासीं । ओढोनिया पाशीं चहूंकडे ॥५॥

॥ ३४४८ ॥

बरें झालीयाचें अवघे सांगातीं । वाइटाचे अंतीं कोणी नाहीं ॥ १ ॥ नोहे मातापिता नोहे कांतासुत । इतरांची मात काय सांगों ॥ २ ॥ तुका ह्मणे जन दुतोंडी सावज । सांपडे सहज तिकडे धरी ॥ ३ ॥

॥ ३४४९ ॥

यमाचे हे पाश नाटोपती कोणातें । आह्मां दीनानाथें रक्षियेलें ॥१॥ यम नेतां तुह्मा रक्षील हें कोण । तुह्मां धन्यधन्य कोण ह्मणती २॥ संतसज्जनमेळा पवित्रसंतकीर्ति। त्यांनीं उत्तम स्थिति सांगितली ३ तेंचि धरोनि चित्तीं तुका हित करी। यमासी पापरी हाणे आतां ॥४॥

॥ ३४५० ॥

भरणी आली मुक्त पेठा । करा लाटा व्यापार ॥ १ ॥ उधार घ्या रे उधार घ्या रे । अवघे या रे जातीचे २ येथें पंक्तिभेद नाहीं । मोठें कांहीं लहान ३ तुका ह्मणे लाभ घ्यावा । मुद्दल भावा जतन ॥४॥

॥ ३४५१ ॥

आजि नव्हे कालिच्या ऐसें । अनारिसें पालटे ॥१॥ आतां लागवेग करा । ज्याचें धरा टाके तें ॥२॥ नका सांगों वाउग्या गोष्टी । चाहुल खोटी ये ठायीं ३ तुका ह्मणे मोडा माग। आपल्या लाग वरूनी ॥४ ।

॥ ३४५२ ॥

अनुसरे त्यासी फिरों नेदी मागें। राहे समागमें अंगसंगें ॥ १ ॥ अंगसंगें असे कर्मसाक्ष देव । जैसा ज्याचा भाव तैसा राहे ॥ २ ॥ फळपाकीं देव देतील प्राणीये । तुका ह्मणे नये सवे कांहीं ॥ ३ ॥

॥ ३४५३ ॥

धनवंत एक बहिर अंधळे । शुभ्र कुष्ट काळे भोग अंगीं ॥ १ ॥
प्रारब्धाची गति न कळे विचित्र । आहे हातीं सूत्र विठोबाचे ॥२॥
आणीक रोगांचीं नांवें घेऊं किती । अखंड असती जडोनिया ॥ ३ ॥
तुका ह्मणे नष्ट संचिताचें दान । पात्रे आतां पण सुख नेदी ॥ ४ ॥

॥ ३४५४ ॥

धरिल्या देहाचें सार्थक करीन । आनंदें भरीन तिन्ही लोक ॥ १ ॥
लावीन निशाण जावया वैकुंठा । माजवीन पेठा कीर्तनाच्या ॥ २ ॥
नामाचिया नौका करीन सहस्रवरि । नावाडा श्रीहरि पांडुरंग ॥३॥
भाविक हो येथें धरा रे आवांका । ह्मणे दास तुका शुद्धयाति ॥४॥

॥ ३४५५ ॥

हे तों टाळाटाळी । परि भोवता हा कळी १ बरें नव्हेल शेवटीं । भय असों द्यावें पोटीं ॥ २ ॥ मुरगाळिल कान । गोसमाळी साव-धान ॥ ३ ॥ धन्य ह्मणे आतां । येथें नुधवा माथा ॥ ४ ॥ अबो-लणा तुका । ऐसें कांहीं लेखूं नका ॥ ५ ॥

॥ ३४५६ ॥

अग्नि हा पाचारी कोणासी साक्षेपें । हिंवे तोचि तापे जाऊनिया १
उदक ह्मणे काय या हो मज प्यावें । तृषित तो धांवे सेवावया २
काय वस्त्र ह्मणे याहो मज नेसा । आपुले स्वइच्छा जग वोढी ३॥
तुक्यास्वामी ह्मणे काय मज स्मरा । आपुल्या उद्धारा लागूनिया४

॥ ३४५७ ॥

मांस चर्म हाडें । देवा अवघींच गोडें ॥ १ ॥ जे जे हरिरंगीं रंगले । कांहीं न वजे वाया गेले ॥ २ ॥ वेद खाय शंकासूर । त्याचें वाग-वी कलिवर ॥ ३ ॥ तुका ह्मणे पैसा । बराडी या भक्तिरसा ॥४॥

॥ ३४५८ ॥

हितावरी यावें । कोणी बोलिलों या भावें ॥ १ ॥ नव्हे विनोद उ-त्तर । केलें रंजवाया चार ॥ २ ॥ केली अटाअटी । अक्षरांची देवासाठीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे खिजों । नका जागा येथें निजों ॥ ४ ॥

॥ ३४५९ ॥

पिकवावें धन । ज्याची आस करी जन ॥ १ ॥ पुरोनि उरे खातां देतां । नव्हे खंडन मवितां ॥ २ ॥ खोलीं पडे ओली बीज । तरीच हातां लागे निज ॥ ३ ॥ तुका ह्मणे धणी । विठ्ठल अक्षरें या तिन्ही ४॥

॥ ३४६० ॥

नका दंतकथा येथें सांगों कोणी । कोरडे ते मानी बोल कोण ॥ १ ॥
अनुभव येथें पाहिजे साचार । न चलती चार आह्मांपुढें ॥ २ ॥
निवडी वेगळें क्षीर आणि पाणी । राजहंस दोन्ही वेगळालीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे येथें पाहिजे जातीचें । येरा गाबाळाचें नाहीं काम ॥४॥

॥ ३४६१ ॥
मोक्ष देवापाशीं नाहीं । लटिक्या घाई विळवतो ॥ १ ॥ काय खर न धरि शुद्धि । गेली बुद्धी भ्रमलें २ अहंकारा उरलें काई । पांचां ठायीं हे वांटे ३ तुका ह्मणे कुंथे भारें । लटिकें खरें मानुनिया ॥४॥

॥ ३४६२ ॥
स्तुती अथवा निंदा करावी देवाची । अधम तो वेचि व्यर्थ वाणी१
आइकोनि होती बहिर हे बोल । वेचूनि ते मोल नरका जाती ॥२॥
इहलोकीं थुंका पडे तोंडावरी । करणें अघोरीं वास लागे ॥ ३ ॥
तुका ह्मणे माप वाचेऐसें निकें । भरलें नरकें निंदेसाटीं ॥ ४ ॥

॥ ३४६३ ॥
आम्हां देणें धरा सांगतों तें कानीं । चिंता पाय मनीं विठोबाचे १
तेणें माझें चित्त होय समाधान । विलास मिष्टान्न नलगे सोनें २ ॥
व्रत एकादशी दारीं वृंदावन । कंटीं ल्यारे लेणें तुळसी माळा ३॥
तुका ह्मणे त्याचे घरींची उष्टावळी । मज ते दिवाळी दसरा सण४ ॥

॥ ३४६४ ॥
आपणा लागे काम वाण्याघरीं गुळ । त्याचे याति कूळ काय किजे १
उकरड्यावरी वाढली तुळसी । टाकावी ते कैसी ठायागुणें ॥ २ ॥
गाईचा जो भक्ष अमंगळ खाय । तिचें दूध काय सेवूं नये ॥ ३ ॥
तुका म्हणे काय सलपटासी काज । फणसांतील बीज काढुनि घ्यावें४

॥ ३४६५ ॥
तीर्थाचिये पंथें चाले तो निदैव । पाविजेतो ठाव अंतराय ॥ १ ॥
ह्मणऊनि भलें निश्चळचि स्थळीं । मनाचिये मुळीं बैसोनिया ॥ २ ॥
संकल्पारूढ तें पराधीन जिणें । कार्यचि कारणें वाढतसे ॥ ३ ॥
तुका ह्मणे कामा नाहीं एक मुख । जिरवितां सुख होते पोटीं ॥ ४ ॥

॥ ३४६६ ॥
अहंकार तो नासा भेद । जगीं निंद्य ओवळा ॥१॥ नातळे तो धन्य त्यासी झाला वंशीं दीपक ॥ २ ॥ करवितो आत्महत्या । नेदी आह्मां आतळों ॥ ३ ॥ तुका ह्मणे गुरुगुरी । माथां थोरी धरोनि ४॥

॥ ३४६७ ॥
पाडावी ते बरी । गांठीं धुरेसवें खरी ॥ १ ॥ नये मरों लंडीपणें । काय बापुडें तें जिणें ॥ २ ॥ लुटावें भांडार । तरी जया नाहीं पार ॥ ३ ॥ तुका ह्मणे नांवें । कीर्ती आगळीनें ज्यावें ॥ ४ ॥

॥ ३४६८ ॥
भांडणेंचि झालें । मग जीवाचें काय आलें ॥१॥ येऊं नेदावी पुढती । आड भयाची ते जाती ॥२॥ करितां सरोबरी । कांहीं न ठेवावी उरी ॥ ३ ॥ तुका म्हणे शूर । व्हावें धुरेसींच धूर ॥ ४ ॥

॥ ३४६९ ॥

भूक पोटापुरती । तृष्णा भरवी वाखती । करवी फजीती । हांवे भार वाढला ॥ १॥ कुळिकेसी लांस फांस । डोई दाढी बोडवी दोष । अविहित नाश । करवी वचन चुकतां ॥२॥ विधिसेवनें विहितें । कार्य कारणापुरतें । न बाटे जो चित्तें । अधर्माच्या तो त्यागी ॥ ३ ॥ आज्ञा पाळणें ते सेवा । भय धरोनिया जीवा । तुका म्हणे ठेवा । ठेविला तो जतन ॥ ४ ॥

॥ ३४७० ॥

आवडीची सलगी पूजा । विभ्रम दुजा भाव तो ॥१॥ ऐसीं उफराटीं वर्मै । कळो भ्रमें न येती ॥ २ ॥ नलगे समाधान मोल । रुसतां बोल प्रीतीचे ॥ ३ ॥ तुका म्हणे एका जीवें । सूत्र व्हावें गुंतलें ॥ ४ ॥

॥ ३४७१ ॥

शिजल्यावरी जाळ । वाया जायाचें तें मूळ ॥ १ ॥ ऐसा वारावा तो श्रम । अतिशयीं नाहीं काम ॥२॥ सांभाळावें वर्म । उचिताच्या काळें धर्म ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळे । ऐसें कारणाचे वेळे ॥ ४ ॥

॥ ३४७२ ॥

उभा ऐल थडी । तेणें घालूं नये उडी ॥ १ ॥ पुढें गेल्याचे उपाय । करावे ते केले काय ॥ २ ॥ दिसतें आहारीं । नये जाऊं ऐलावरी ॥ ३ ॥ आळसाची धाडी । तुका ह्मणे बहु नाडी ॥ ४ ॥

॥ ३४७३ ॥

काय करूं सांगतांही न कळे वर्म । उपस्थित भ्रम उपजायेनो ॥ १ ॥ मन आधीं ज्याचें आलें होइल हातां । तयावरी सत्ता केली चाले २ अभुकेचे अंगीं त्रवी ना सवाद । मिथ्या ऐसा वाद दुराग्रह ॥ ३ ॥ तुका ह्मणे आप राखावें आपणा । संकोचोंनि कोणा नये आतां ४

॥ ३४७४ ॥

मुख्य आधीं विषयत्याग । विधि भाग पाळणें ॥ १ ॥ मन पावे समाधान । हेंचि दान देवाचें ॥ २ ॥ उदासीन वृत्ति देहीं । चाड नाहीं पाळणें ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं भय । सम सोय विषमाची ॥ ४ ॥

॥ ३४७५ ॥

हेंचि सार हेंचि सार । मूळबीज रे आइका ॥ १ ॥ आवडीनें आवडी उरे । जें ज्या झुरे तें त्यासी ॥ २ ॥ प्रेमाचिया सूत्रदोरी । नाहीं उरी उरवी ॥ ३ ॥ तुका म्हणे चिंतन बरें । आहे खरें सत्यापें ४

॥ ३४७६ ॥

मायबाप सवे नये धनवित्त । करावें संचित भोगावें तें ॥ १ ॥ म्हणऊनि लाभ काय तो विचारीं । नको वाळीवरी चित्त ठेवूं ॥२॥ आयुष्य सेवटीं सांडुनि जाणार । नव्हेचि साचार शरीर हें ॥ ३ ॥ तुका म्हणे काळें लावियेलें माप । जमा धरी पापपुण्याची हे ॥ ४ ॥

॥ ३४७७ ॥

कैसा होतो कृपावंत । बहुसंत सांगती १ पुसणें नाहीं याती कूळ। लागो वेळ नेदावी २ ऐसी काय जाणों किती । उतरती उतरले ३ दावी वैकुंठींच्या वाटा। पाहातां मोठा संपन्न ४ अभिमान तो नाहीं अंगीं । भक्तालागी न बैसे ५ तुका म्हणे आळस निद्रा । नाहीं थारा त्या अंगीं ६ आलें द्यावें भलत्या काळे । विठ्ठल बळें आगळा ७

॥ ३४७८ ॥

हित नाहीं ठावें जननीजनका । दाविला लौकिकाचार तींही ॥ १ ॥
अंधळयांचे काठी लागले अंधळें । घात एका वेळे पुढेमागें ॥ २ ॥
न धरावी चाली करावा विचार । वरील आहार गळी लावी ॥३॥
तुका ह्मणे केला निवाडा रोकडा । राउत हा घोडा हातोहातीं ॥४॥

॥ ३४७९ ॥

यासी कोणी ह्मणे निंदेचीं उत्तरें । नागवला खरे तोचि एक ॥ १ ॥
आड वाटे जातां लावी नीट सोई । धर्मनीत तेही ऐसी आहे ॥ २ ॥
नाइकतां सुखें करावें ताडण । पाप नाहीं पुण्य असे फार ॥ ३ ॥
जन्म व्याधि फार चुकतील दुःखें । खंडावा हा सुखें मान त्याचा ४ ॥
तुका ह्मणे निंब दिलियावांचून । अंतरींचा सीण केवी जाय ॥ ५ ॥

॥ ३४८० ॥

निवडे जेवण सेवटींच्या घांसे । होय त्याच्या ऐसे सकळही ॥१॥
न पाहिजे झाला बुद्धीचा पालट । केली खटपट जाय वाया ॥२॥
संपादिलें व्हावें धरिलें तें सोंग । विटंबना व्यंग पडिलिया ॥ ३ ॥
तुका म्हणे वर्म नेणतां जो रांधी । पाववी ते बुद्धि अवकळा ॥४॥

॥ ३४८१ ॥

फटकाळ देव्हारा फटकाळ अंगारा । फटकाळ विचारा चाळविले १॥
फटकाळ तो देव फटकाळ तो फक्त। करावितो घात आणिकां जीवा २
तुका म्हणे अवघे फटकाळ हे जन । अनुभवी खूण जाणतील ॥३॥

॥ ३१८२ ॥

देहबुद्धि वसे जयाचिये अंगीं । पूज्यता ते जगीं सुख मानी ॥ १ ॥
थोर असे दगा झाला त्यासी हातीं । सोडोनिया गांठी चोरीं नेली २
गांटीचे जाऊनि नव्हे तो मोकळा। बांधवीला गळा दंभलोभें ३ ॥
पुढिल्या उदिमा झालेसें खंडण । दिसे नागवण पडे गांटी ॥ ४ ॥
तुका म्हणे ऐसें बोलतील संत । जाणूनिया घात कोण करी ५॥

॥ ३४८३ ॥

ढेंकणाचे संगें हिरा जो भंगला । कुसंगें नाडला तैसा साधु ॥ १ ॥
ओढाळाच्या संगें सात्विक नासलीं। क्षण एक नाडलीं समागमें ॥२॥
डांकाचे संगतीं सोनें हीन झालें । मोल तें तुटलें लक्ष कोडी ॥ ३ ॥

विषानें पक्कानें गोड कडू झालीं । कुसंगानें केली तैसी परी ॥ ४ ॥
म्हणे तुका म्हणे सत्संग हा बरा । कुसंग हा फेरा चौऱ्यांशीचा ५॥

॥ ३४८४ ॥

आम्हां नावें पाप । योगीं लागे संकल्प ॥ १ ॥ सहजा ऐसें भांडवल । असोनि कां सांगा बोल ॥२॥ तें न भेटे तें काय । मना अंगींचे उपाय ॥ ३ ॥ तुका म्हणे धर्गी सोय । वासनेची फोडा डोय ॥ ४ ॥

॥ ३४८५ ॥

लागपाट केला । आतां वाटा नित्य त्याला १ करा जोडीचा व्यवस्थ । आले दुरीक घरास ॥ २ ॥ फोडिलीं भांडारें । मोहोरलीं एकसरें ॥ ३ ॥ अवघिया पुरतें । तुका म्हणे घ्यावें हातें ॥ ४ ॥

॥ ३४८६ ॥

सेर आम्हांपाशीं एक शुद्धभाव । नाहीं तरी वाव उपचार ॥ १ ॥
कोण मानी वरी रसाळ बोलणें । नाहीं झाली मनें ओळखी तों ॥२॥
तुका म्हणे आम्हां जाणिवेचें दुःख । न पाहों त्या मुख दुर्जनाचें ॥३॥

॥ ३४८७ ॥

देवाच्या निरोपें पिटितों डांगोरा । लाजे नका थारा देऊं कोणी १
मोडिले या रांडे सुपंथ मारग । चालविलें जग यमपंथें ॥ २ ॥
परिचारी केली आपुलीच रूढी । पोटींची ते कुडी ठावी नाहीं ॥३॥
तुका म्हणे आणा राउळा धरून । फजित करून सोडूं मग ॥ ४ ॥

॥ ३४८८ ॥

कोरडिया पेशा मारूनिया गोष्टी । करा उठाउठीं हित आधीं १ ॥
खोळंबला राहे आपुला मारग । पहावी ते मग तुटी कोठें ॥ २ ॥
लौकिकाचा आड येईल पसारा । मग येरझारा दुःख देती ॥ ३ ॥
तुका म्हणे डांख लागे अळंकारें । मग नव्हे खरें पुटाविण ॥ ४ ॥

॥ ३४८९ ॥

काळाच सारिखीं वाहातां क्षेत्रें । करितां दुसरें फळ नाहीं ॥ १ ॥
ऐसें करत्यानें ठेविलें करून । भरिलें भरून माप नेमें ॥ २ ॥
शीतउष्णकाळीं मेघ वरुषावे । वरषतां वाव होय शीण ॥ ३ ॥
तुका ह्मणे विष अमृताचे किडे । पालट न घडे जीणें तया ॥ ४ ॥

॥ ३४९० ॥

प्रेम नये सांगतां बोलतां दावितां । अनुभव चित्ता चित्त जाणे १॥
कासवीचें बाळ वाढे कृपादृष्टी । दुधा नाहीं भेटी अंगसंगें ॥ २ ॥
पोटामध्यें कोणें सांगितलें सर्पा । उपजत लपा ह्मणऊनि ॥ ३ ॥
बोलों नेणें परी जाणे गोड क्षार । अंतरीं विचार त्यासी ठावा ४ ॥
तुका ह्मणे बरें विचारावें मनीं । आणिक भल्यांनीं पुसों नये ॥ ५ ॥

॥ ३४९१ ॥

क्षोभ आणि कृपा मातेची समान । विभाग जतन करूनि ठेवी १ ॥

क्षणभंगुर ते उपजली चिंता । खरी अखंडता आवडीची ॥ २ ॥
सिकवूं जाणे ते गोमाठिया पाठीं । लोभें नाहीं तुटी निश्चयेंसी ॥३॥
अवघेंचि मिथ्या समया आरतें । देतां तो उचितें काळ जाणे ॥४॥
न करी वेव्हार नेदी गांजूं कोणा । भेडसावी तान्हें हाऊ आला ५॥
तुका ह्मणे करी जिवाची जतन । दचकूनि मन जवळी आणी ॥६॥

॥ ३४९२ ॥

राहिलों निराळा । पाहों कवतुक डोळा ॥ १ ॥ करूं जगाचा विनोद । डोळां पाहोनिया छंद ॥ २ ॥ भुललिया संसारें । आलें डोळ्यासी भाजिरें ॥३॥ तुका ह्मणे माथा । कोणी नुचली सर्वथा ॥४॥

॥ ३४९३ ॥

जीवें व्हावें साटीं । पडे संवसारें तुटी ॥१॥ ऐशीं बोलिलों वचनें । सवें घेउनि नारायणें २ येणें नाहीं जाणें । केलें कोणा न मागणें ३ नाहीं जन्मा आलों । करील ऐसें नेदीं बोलों ॥ ४ ॥ ठाव पुसी सेणें । तुका ह्मणे खुंटो येणें ॥ ५ ॥

॥ ३४९४ ॥

तडामोडी करा । परि उत्तम तें भरा ॥ १ ॥ जेणें खंडे पक्के खेपे । जाय तेथें लाभें वोपे ॥ २ ॥ दाविल्या सारिखें । मागें नसावें पारिखें ॥ ३ ॥ मागें पुढें ऋण । तुका ह्मणे फिटे हीण ॥ ४ ॥

॥ ३४९५ ॥

उपेक्षिला येणें कोणी शरणागत । ऐसी नाहीं मात आइकिली ॥१॥
आतां काय ब्रीद सांडील आपुलें । ठायींचें धरिलें जाणोनिया ॥२॥
माझ्या दोषासाठीं होइल पाठमोरा । ऐसा कोण पुरा भोग बळी ३
तुका ह्मणे रूप आमुच्या कैवारें । धरिलें गोजिरें चतुर्भुज ॥ ४ ॥

॥ ३४९६ ॥

सुखें न मनी अवगुण । दुःख भोगी त्याचें कोण ॥१॥ हें कां ठायींचें न कळे । राती करा झांकुनि डोळे ॥२॥ चालोनि आड वाटे । पायीं मोडविले कांटे ॥३॥ तुका ह्मणे कोणा । बोल ठेवितो शहाणा॥४॥

॥ ३४९७ ॥

उगविल्या गुंती । ऐशा मागें नेणों किती ॥१॥ ख्याती केली अजामेळें । होतें निघालें दिवाळें ॥२॥ मोकलिला प्रायश्चित्तीं । कोणी न धरिती हातीं॥३॥तुका ह्मणे मुक्त वाट । वैकुंठीची घडघडाट ॥ ४ ॥

॥ ३४९८ ॥

गोड नांवें क्षीर । परी साकरेचा धीर ॥१॥ तैसें जाणा ब्रह्मज्ञान । बापुडें तें भक्तीविण॥२॥रुची नेदी अन्न । ज्यांत नसतां लवण ॥ ३ ॥ अंधळ्याचे श्रम । शिकविल्याचेंचि नाम ॥ ४ ॥ तुका ह्मणे तारा । नाव तंबुऱ्याच्या सारा ॥ ५ ॥

॥ ३४९९ ॥

कोठें नाहीं अधिकार । गेले नर वाया ते ॥ १ ॥ ऐका हें सोपें वर्म । नलगे श्रम चिंतना ॥ २ ॥ मूल्यांचिये अंगीं छाये । [illegible] खुंटतां ॥ ३ ॥ तुका म्हणे अवघें जन । येथें मन असो द्या ॥ ४ ॥

॥ ३५०० ॥

[illegible] संप्रांत । उत्तम गोतांच्या त्या शांति ॥ १ ॥ फळ आणि समाधान । तेथें उत्तम कारण ॥ २ ॥ असो तो संतोषी । कधीं सांपडे उद्देशीं ॥ ३ ॥ सहज संगम । तुका म्हणे तो [illegible] ॥ ४ ॥

॥ ३५०१ ॥

देव होसी तरी आणिकांतें कासया । संदेह यांवळां [illegible] न लगे ॥ १ ॥ तुष्ट होसी तरी आणिकांतें कासया । संदेह येविशीं [illegible] न लगे ॥ २ ॥ तुका म्हणे जें दर्पणीं बिंबलें । तें तया वाटलें निजाचेंसी ॥ ३ ॥

॥ ३५०२ ॥

जन देव तरी पायांचि पडावें । त्याचिया स्वभावें चाड नाहीं ॥ १ ॥ अग्नीचें सौजन्य शीतनिवारण । पालवीं बांधोन नेतां नये ॥ २ ॥ तुका म्हणे विंचू सर्प नारायण । वंदावे दुरोन शिवों नये ॥ ३ ॥

॥ ३५०३ ॥

कीर्तनाची गोडी । देव निवडी आपण ॥ १ ॥ कोणी व्हावें अधिकारी । त्यासी हरि देईल ॥ २ ॥ वैराग्याचें बळ । माहीं स्थळ जिणावें ॥ ३ ॥ उरेल ना उरी । तुका करी बोभाट ॥ ४ ॥

॥ ३५०४ ॥

चालावा पंथ तो पाविजे त्या ठाया । ऐकिल्या वाया वारता त्या ॥ १ ॥ ऐका जी बोजे पडतसे पाया । भावाचि ते जाया वाट नव्हे ॥ २ ॥ व्याली कुमारीचा अनुभवें अनुभव । सांगतां तो भाव येत नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें पाहिजे आरालें । बिंब निवळलें तरि भासे ॥ ४ ॥

॥ ३५०५ ॥

गावें म्हणउनि गीत । धरुनि राहे तैसें चित्त ॥ १ ॥ हेंचि थोर अवघड आहे । अन्न देखोनि भूक राहे ॥ २ ॥ ऐकावी म्हूण कथा । राहे तैसें धरुनि चित्ता ॥ ३ ॥ तुका म्हणे धणी । नव्हे जेविल्यावांचुनि ॥ ४ ॥

॥ ३५०६ ॥

गंगेचिया अंताविण काय चाड । आपुलें तें कोड तृषेपाशीं ॥ १ ॥
विठ्ठल हे मूर्ति साजिरी सुंदर । घालूं निरंतर हृदयपुटीं ॥ २ ॥
कारण तें असे नवनीतापाशीं । गाबाळ तें सोसी येर कोण ॥ ३ ॥
बाळाचे सोईतें घांस घाली माता । अट्टाहास चिंता नाहीं तया ॥ ४ ॥
गाऊं नाच करूं आनंदकीर्तन । भावाचि वेगळा नाहीं हातां ॥ ५ ॥
तुका म्हणे अवघें झालें एकमय । परलोकींची काय चाड आतां ॥ ६ ॥

॥ ३५०७ ॥

चिंतिलें तें मनींचें जाणे । पुरवी खुणे अंतरींचें ॥ १ ॥ रात्री न कळे दिवस न कळे । अंगीं खेळे दैवत हें २ नवासियाचे पुरे नवस । भोगी त्यास भिन्न नाहीं ३ तुका ह्मणे समाचि देणें । समचरणीं उभा असे ४

॥ ३५०८ ॥

लागलिया मुख स्तनां । घाली पान्हा माउली ॥ १ ॥ उभयतां आवडी लाडे । कोडें कोड पुरतसे ॥२॥ मेळवितां अंगें अंग । प्रेम रंग वाढतो ॥३॥ तुका ह्मणे जड भारी । अवघें शिरीं जननीचे ॥४॥

॥ ३५०९ ॥

पाठीं पोटीं देव । कैचा हरिदासा भेव ॥ १ ॥ करा आनंदें कीर्तन । नका आशंकित मन ॥ २ ॥ येथें कोठें काळ । करील देवापाशीं बळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे धनी । सपुरता काय वाणी ॥ ४ ॥

॥ ३५१० ॥

नये जरी कांहीं । तरी भलतेंचि वाही ॥१॥ म्हणविल्या दास । कोणी न धरी वेठीस ॥ २ ॥ समर्थाच्या नांवें । भलतैसें विकावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे सत्ता । वरी असते बहुतां ॥ ४ ॥

॥ ३५११ ॥

ज्याची खरी सेवा । त्याच्या भय काय जीवा १ करितां स्वामीसवें वाद १ अधिक अधिक आनंद २ असावा तो धर्म । मग साहों जातें वर्म ॥ ३ ॥ वदे वाग्देवी । तुका विठ्ठलीं गौरवी ॥ ४ ॥

॥ ३५१२ ॥

भाव देवाचें उचित । भाव तोचि भगवंत १ धन्यधन्य शुद्ध जाती । संदेह कैचा तेथें चित्तीं २ बहुत बराडी । देव वावरीते आवडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे हें रोकडें । लाभा अधिकारी चोखडें ॥ ४ ॥

॥ ३५१३ ॥

वळितें जें गाई । त्यासि फार लागे काई १ निवे भावाचे उत्तरीं । भलते एके धणी वरी ॥ २ ॥ न लगती प्रकार । कांहीं मानाचा आदर ॥ ३ ॥ सांडी थोरपणा । तुका ह्मणे सवें दीना ॥ ४ ॥

॥ ३५१४ ॥

अवगुणांचे हातीं । आहे अवघी फजीती १ नाहीं पात्रासवें चाड । प्रमाण तें फिकें गोड ॥ २ ॥ विष तांब्या वाटी । भरली लावूं नये होटीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे भाव । शुद्ध बरा सोंग वाव ॥ ४ ॥

॥ ३५१५ ॥

जैसें तैसें राहे देवाचें हें देणें । यत्न करितां तेणें काय नव्हे ॥ १ ॥ दासां कृपासिंधु नुपेक्षी सर्वथा । अंतरींची व्यथा कळे त्यासी २॥ मागों नेणें परी माय जाणे वर्म । बाळा नेदी श्रम पावों कांहीं ३ ॥ तुका ह्मणे मज अनुभव अंगें । वचन वाउगें मानेना हें ॥ ४ ॥

॥ ३५१६ ॥

नव्हती माझे बोल । अवघें करितो विठ्ठल ॥ १ ॥ कांहीं न धरावी खंती । हित होईल धरा चित्तीं ॥ २ ॥ खोटी ते अहंता वाट टाकिली सांगतां ॥३॥ ज्याचे तोचि जाणे । मी मापाडें तुका ह्मणे४

॥ ३५१७ ॥

ज्याचे गांवीं केला वास । त्यासी नसावें उदास ॥ १ ॥ तरीच जोडिलें तें भोगे । कांहीं आघात नलगे ॥ २ ॥ वाढवावी थोरी । मुखें ह्मणे तुझे हरी ॥३॥ तुका ह्मणे हे गोमटी । दासा न घालावी तुटी ४॥

॥ ३५१८॥

पोटीं जन्मती रोग । तरि कां म्हणावे आप्तवर्ग ॥ १ ॥ रानीं वसती औषधी । तरि कां ह्मणाव्या निरापराधी ॥ २ ॥ तैसें शरीराचें नातें । तुका ह्मणे सर्व आप्तें ॥ ३ ॥

॥ ३५१९ ॥

गंधर्वनगरीं क्षण एक राहावें । तेंचि पैं करावें मूळक्षेत्र ॥ १ ॥ खपुष्पाची पूजा बांधोनि निर्गुणा । लक्ष्मीनारायणा तोषवावें ॥२॥ वंध्यापुत्राचा लग्नाचा सोहळा । आपुलिया डोळां पाहों वेगीं ॥३॥ मृगजळा पांही घालूनि सज्ञाना । तापलिया जना निववावें ॥ ४ ॥ तुका ह्मणे मिथ्या देहेंद्रियकर्मे । ब्रह्मार्पण ब्रह्म होय बापा ॥ ५ ॥

॥ ३५२० ॥

पाण्या निघाली गुजरी । मन ठेविलें दों घागरीं ॥ चाले मोकळ्या पदरीं । परी लक्ष तेथें ॥ १ ॥ वावडी उडाली अंबरीं । हातीं धरोनिया दोरी । दिसे दुरिच्या दुरी । परी लक्ष तेथें ॥२॥ चोर चोरी करी । ठेवी वनांतरीं । वर्ततसे चराचरीं । परी लक्ष तेथें ३॥ व्यभिचारिणी नारी । घराश्रम करी । परपुरुष जिव्हारीं । परी लक्ष तेथें ॥ ४ ॥ तुका ह्मणे असों । भलतिये व्यापारीं ॥ लक्ष सर्वेश्वरीं । चुकों नेदी ॥ ५ ॥

॥ ३५२१ ॥

अर्थेविण पाठांतर कासया करावें । व्यर्थचि मरावें घोकूनिया ॥१॥ घोकूनिया काय वेगी अर्थ पाहे । अर्थरूप राहे होऊनिया ॥ २ ॥ तुका ह्मणे ज्याला अर्थी आहे भेटी । नाहीं तरी गोष्टी बोलों नका ३

॥ ३५२२ ॥

बरवे दुकानीं बैसावें । श्रवण मनन असावें ॥ १ ॥ सारअसाराची पोतीं । ग्राहक पाहोनि करा रितीं ॥ २ ॥ उगेचि फुगवूं नका गाल । पूर्ण साठवावा माल ॥ ३ ॥ सत्य तराजू पैं धरा । नका कृत्रिम विकार ४ तुका झाला वाणी । चुकवुनि चौऱ्यासीच्या खाणी५

॥ ३५२३ ॥

गंगा न देखे विटाळ । तेंचि रांजणींही जळ ॥१॥ अल्प महद्‌वा नव्हे सरी । विटाळ तो भेद धरी २ काय खंडिली भूमिका । वर्णा पायरिकां लोकां ॥३॥ तुका ह्मणे अगीविण । बीजें वेगळीं तो भिन्न ॥ ४॥

॥ ३३२४ ॥

अभिमानाची स्वामिनी शांती । महत्व घेती सकळ ॥१॥ कळोनि हे. न कळे वर्म । तरि श्रम पावती २ सर्व सत्ता करितां धीर । वीर्या वीर्य आगळा ॥३॥ तुका ह्मणे तिखट तिखें । मृद्‌सखें आवडी ॥४॥

॥ ३५२५ ॥

ज्यानें ज्यानें जैसें ध्यावें । तैसें व्हावें कृपाळें ॥१॥ सगुणनिर्गुणांचा ठाव । विटे पाव धरियेले ॥ २ ॥ अवघें साकरेचें अंग । नये व्यंग निवडीतां ॥ ३ ॥ तुका ह्मणे जें जें करी । तें तें हरी भोगिता ॥ ४ ॥

॥ ३५२६ ॥

चहूं आश्रमांचे धर्म । न राखतां जोडे कर्म ॥ १ ॥ तैसी नव्हे भोळी सेवा । एक भावचि कारण देवा ॥२॥ तपें इंद्रियां आघात । क्षण एका वाताहात ॥ ३ ॥ मंत्र चळे थोडा । तरि घडचि होय वेडा ॥ ४ ॥ व्रतें करितां सांग । तरी एक चुकतां भंग ॥ ५ ॥ धर्म सत्वचि कारण । नाहीं तरी केला सिण ॥६॥ भूतदयेसि आघात । उंचनीचं वाताहात ॥७॥ तुका ह्मणे दुजें । विधिनिषेधाचें ओझें ॥८॥

॥ ३५२७ ॥

नव्हों वैद्य आम्ही अर्थाचे भुकेले । भलते द्यावे पाले भलत्यासी १॥ कुपथ्य करूनि विटंबावे रोगी । काय हे सलगी भीड त्याची ॥ २ ॥ तुका ह्मणे लासूं फांसूं देऊं डाव । सुखाचा उपाव पुढें आहे ॥ ३ ॥

॥ ३५२८ ॥

आम्हांपाशीं सरे एक शुद्ध भाव । चतुराई जाणीव नलगे कळा ॥१॥ सर्वजाण माझा स्वामी पांडुरंग । तया अंगसंग गोपाळासी ॥ २ ॥ तुका ह्मणे कर्मे धर्मे नये हातां । तयावरि सत्ता भाविकांची ॥ ३ ॥

॥ ३५२९ ॥

अधिकार तैसा करूं उपदेश । साहे ओझें त्यास तेंचि द्यावें ॥ १ ॥ मुंगीवरी भार गजाचें पालाण । घालितां तें कोण कार्यसिद्धि ॥२॥ तुका ह्मणे फांसे वाघुरा कुऱ्हाडी । प्रसंगीं तो काढी पारधी तो ॥३॥

॥ ३५३० ॥

करावें गोमटें । बाळा मातें तें उमटे ॥ १ ॥ आपुलिया जीवाहूनी । असे वाल्हें तें जननी ॥ २ ॥ वियोग तो तिस । त्याच्या उपचारें तें विष ॥ ३ ॥ हरणी चुकली पाडसा । धुंडाळीती दाही

दिशा ॥ ४ ॥ रानीं हिंडों गेली गाय । घरीं वत्स वाट पाहे ॥ ५ ॥ तुका ह्मणे पायें । डोळा सुखावे ज्या न्यायें ॥ ६ ॥

॥ ३५३१ ॥

नाहीं कोणी दिस जात वायाविण । साध्य नाहीं सीण लटिकाची १ एकाचिये माथां असावें निमित्त । नसो नाहीं हित कपाळीं तें २ ॥ कांहीं एक तरी बोलायाचा जागा । नेदिती वाउगा उभा ठाकों ३॥ तुका ह्मणे वर्मे कळों येती कांहीं । ओळखी जे नाहीं होईल ते ४ ॥

॥ ३५३२ ॥

कौलें भरियेली पेंठ । निग्रहाचे खोटे तंट ॥ १ ॥ ऐसें माता जाणे धर्म । बाळा वाढवितां धर्म ॥ २ ॥ कामावितां लोहो कसे । तांतडीनें काम नासे ॥ ३ ॥ तुका ह्मणे खडे । देतां अक्षर ते जोडे ॥ ४ ॥

॥ ३५३३ ॥

वैरागरापाशीं रत्नांचिया खाणी । हेचि घ्यावे धणी फावेल तों १॥ येथें नाहीं तर्क[illegible]ची चाड । होतसे निवाड खऱ्याखोट्यां २ ॥ उगाच सारावा वाढिला तो ठाव । वाढितिया भाव कळतसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे नव्हे टांचणीचें पाणी । येथें झरवणी जैशातैसें ॥ ४ ॥

॥ ३५३४ ॥

सोसें वाढे दोष । झाला पालटेना कस ॥ १ ॥ ऐसें बरवें वचन । करितां तें नारायण ॥ २ ॥ असे प्रारब्ध नेमें । श्रमाचि उरे श्रमें ॥ ३ ॥ सुख देते शांती । तुका ह्मणे धरितां चित्तीं ॥ ४ ॥

॥ ३५३५ ॥

चंदन तो चंदनपणें । सहजगुण संपन्न ॥ १ ॥ वेधलिया अन्य जाती । भाग्यें होती सन्मुख ॥ २ ॥ परिसा अंगीं परिसपण । बाणोनि तें राहिलें ३ तुका ह्मणे कैंची खंती । सुजाती ते टाकणी ४॥

॥ ३५३६ ॥

ऐकतों दाट । आले एकांचे बोभाट ॥ १ ॥ नका विश्वासों यावरी । चोर देहाचे खाणोरी ॥ २ ॥ हेचि यांची जोडी । सदा बोडकीं उघडीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे न्यावें । ज्याचें त्यासी नाहीं ठावें ॥ ४ ॥

॥ ३५३७ ॥

पोट लागलें पाठीशीं । हिंडवितें देशोदेशीं ॥ १ ॥ पोटाभेणें जिकडे जावें । तिकडे पोट येतें सवें ॥ २ ॥ जप तप अनुष्ठान । पोटासाठीं झाले दीन ॥ ३ ॥ पोटें सांडियेली चवी । नीचापुढें तें नाचवी ॥ ४ ॥ पोट कारियानें भरे । तुका ह्मणे झुरझुरूं मरे ॥ ५ ॥

॥ ३५३८ ॥

जग तरि आम्हां देव । परि हे निंदितों स्वभाव ॥१॥ येतो हिताचा कळवळा । पडती हातीं ह्मून काळा ॥ २ ॥ नाहीं कोणी सखा । आम्हां निपराध पारिखा ३ उपकारें वदे । तुका वर्मासी तें भेदे ४

॥ ३५३९ ॥

मथनें भोगे सार । ताकें घडे उपकार ॥ १ ॥ बरवी सायासाची जोडी । अनुभाविया ठावी गोडी ॥ २ ॥ पाक आणि रुची । जेथें तेथें ते कइंची ॥ ३ ॥ वाढितो पंगती । तुका आवडो संगती ॥ ४ ॥

॥ ३५४० ॥

करितां होया व्हावें चित्ताचि नाहीं । घटापटा कांहीं करूं नये ॥१॥ मग हालतचि नाहीं जवळून । करावा तो सीण सीणविता ॥ २ ॥ साहताचि नाहीं कांहीं पांकुळलें । उगल्या उगलें ढळत आहे ॥ ३ ॥ तुका ह्मणे तरी बोलावे झांकून । येथें खुणें खूण पुरतेचि ॥ ४ ॥

॥ ३५४१ ॥

अवघ्या वाटा जाल्या क्षीण । कळीं न घडे साधन । उचित विधि विधान । न कळे न घडे सर्वथा ॥१॥ भक्तिपंथ बहु सोपा । पुण्य नागवया पापा ॥ येणें जाणें खेपा । येणेंचि एक खंडती ॥२॥ उभारोनि बाहे । विठो पालवीत आहे ॥ दासां मीच्च साहे । मुखें बोले आपुल्या ॥ ३ ॥ भाविक विश्वासी । पार उतरिलें त्यांसी ॥ तुका ह्मणे नासा । कुतर्क्यांचे कपाळीं ॥ ४ ॥

॥ ३५४२ ॥

आडवा तो उभा । असे दाटोनिया प्रभा ॥ १ ॥ देव नाहीं एकविध । एक भाव असें शुद्ध ॥ २ ॥ भेदाभेद आटी । नाहीं फार कोठें तुटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे गोवा । उगवा वेव्हाराचा हेवा ॥ ४ ॥

॥ ३५४३ ॥

संचितावांचून । पंथ न चलवे कारण ॥ १ ॥ कोरडी ते अवघी आटी । वाया जाय लाळ घोटी ॥ २ ॥ धन वित्त जोडे । देव पेर्ले तो न घडे ॥ ३ ॥ तुका ह्मणे आड । स्वहितासी बहु नाड ॥ ४ ॥

॥ ३५४४ ॥

मागील ते आटी येणें घडे सांग । सुतबेल अंग एका सूत्रें ॥ १ ॥ पहिपाहुणेर ते सोहळ्यापुरते । तेथूनि आरते उपचार ते ॥ २ ॥ आवश्यक तेथें आगळा आदर । चाली थोडें फार संपादतें ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऋण फिटे एक घडी । अलभ्य ते जोडी हातां आल्या ४॥

॥ ३५४५ ॥

पतनासि जे नेती । तिचा खोटा स्नेह प्रीती ॥ १ ॥ विधिपुरतें कारण । बहु वारावें वचन ॥ २ ॥ सर्वस्वासि नाडी । ऐसी लाघवाची बेडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे दुरी । राखतां हे तोंचि बरी ॥ ४ ॥

॥ ३५४६ ॥

सांडियेला गर्भ उबगोनी माउली । नाहीं सांभाळिली भूमि शुद्ध ॥१॥ उष्ण तान भूक एवढिये आकांतीं । ओसंगा लाविती काय म्हूण २

खांद्यावरी शूळ मरणाचिये वाटे । अन्यायही मोठे केले साच ॥३॥
हातींचा हिरोनी घातला पाटीसी । तुका ह्मणे ऐसी परी झाली ॥४॥

॥ ३५४७ ॥

केलें पाप जेणें दिलें अनुमोदन । दोघांसि पतन सारिखेंचि ॥ १ ॥
विष नवनीता विष करी संगें । दुर्जनाच्या त्यागें सर्व हित ॥ २ ॥
देखिलें ओढाळ निवाळिया सेता । टाळावें निमित्त्या थैक म्हूण ३॥
तुका ह्मणे जोडे केल्याविण कर्म । देखतां तो श्रम न मानितां ४ ॥

॥ ३५४८ ॥

आशाबद्ध तो जगाचा दास । पूज्य तो उदास सर्वजना ॥ १ ॥
आहे तें आधीन आपुलें हातीं । आणिक टेविती काय बोल ॥ २ ॥
जाणतिया पाठीं लागला उपाध । नेणता तो सावध भोजनासी ३॥
तुका म्हणे भय बांधलेंसे गांठी । चोर लागे पाठी दुम तया ॥ ४ ॥

॥ ३५४९ ॥

वाइटानें भलें । हीन दाविलें चांगलें ॥१॥ एकाविण एका । कैंचे मोल होते फुका ॥ २ ॥ विषें दाखविलें अमृत । कडु गोड घाते हित ॥ ३ ॥ काळिमेनें ज्योती । दिवस कळो आला राती ॥ ४ ॥ उंच निंच गारा । हिरा परिस मोहरा ॥ ५ ॥ तुका म्हणे भले । ऐसे नष्टांनीं कळले ॥ ६ ॥

॥ ३५५० ॥

दिली मान तरी नेघावी शत्रूची । शरण आले त्यासी जतन जीवें १
समर्थांसी असे विचाराची आण । भलीं पाप पुण्य विचारावें ॥२॥
काकुळतीसाठीं सत्याचा विसर । पडिले अंतर न पाहिजे ॥ ३ ॥
तुका ह्मणे यश कीर्ति आणि मान । करितां जतन देव जोडे ॥ ४ ॥

॥ ३५५१ ॥

करितां तडातोडी । वत्सा माते सोई ओढी ॥ १ ॥ करित्याचा आग्रह उरे । एक एकासाठीं झुरे ॥ २ ॥ भुके इच्छी अन्न । तेंही त्यासाठीं निर्माण ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां । एक एकाचिये चित्तीं ॥४॥

॥ ३५५२ ॥

जग अमंगळ । लागे देखतां विटाळ ॥ १ ॥ धर्म भूतांची ते दया । संत कारण ऐसीया ॥ २ ॥ नव्हे माझें मत । साक्षी करूनि सांगे संत ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीवें । दावी उमटूनि अनुभवें ॥ ४ ॥

॥ ३५५३ ॥

लावुंनिया गोठी । चुकवूं आदरिली दिठी । देउनिया मिठी । पळे मही माथुलिया ॥ १ ॥ पुढें तोचि करी आड । तिचा लोभ तिसी गाड । लावूनी चरफड । हात मोडूनि पळावें ॥ २ ॥ आर्थी काकुलती । मोहो घालावा पुढती । तोंडीं पडे माती । फिरतां मागें कैंचा

तो ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । यासी रडवी याचा हेवा । भावें कां हे सेवा । सुखें तुम्हां नार्पिती ॥ ४ ॥

॥ ३५५४ ॥

ज्वरल्यासी काढा औषध पचन । मूढा नारायण स्मरवितो ॥ १ ॥ भवव्याधि येणें तुटेल रोकडा । करूनिया झाडा निश्चयेसी ॥ २ ॥ आणिकां उपाया अनुपान कठिण । भोगे बरें सीण शीघ्रवत ॥ ३ ॥ तुका ह्मणे केला उघडा पसारा । भाग्य आलें घरा दारावरी ॥ ४ ॥

॥ ३५५५ ॥

अंतिलाई देतां जीव । नये कींव देवासी ॥ १ ॥ थोड्यासाटीं राग आला । जीव दिला गंगेंत ॥२॥ त्यासि परलोकीं नाहीं मुक्ति । अधोगति चुकेना ॥३॥ तुका म्हणे कृष्णराम । स्मरता श्रम वारती ॥४॥

॥ ३५५६ ॥

संवदड आपटा रानचारा । हा तो दसऱ्याचा तुरा १ एरवी यासी पुसे कोण । एका देवासाठीं मान २ मातीची ते घागरी । पाण्यासाठीं बैसे शिरीं ३ तुका म्हणे माय जाण । धान्यासाठीं घेणें देणें ॥ ४ ॥

॥ ३५५७ ॥

ग्रासोग्रासीं भाव । तरी देहींच जेवी देव ॥१॥ घरीं स्मरण तें सार । नाहीं दुरी तें अंतर ॥२॥ भोगितां तूं भावें । देव जेवूं बैसे सवें ३॥ तुज पावो देवा । भावें अंतरींची सेवा ॥४॥ गुंतला साधनीं । देव नाहीं त्रिभुवनीं ॥५॥ तुका म्हणे हातीं । न धरितां गमाविती ॥६॥

॥ ३५५८ ॥

साच हा विठ्ठल साच हें करणें । संत जें वचनें बोलियेले ॥ १ ॥ साच तें स्वहित साच ते प्रचित । साच वेदें नीत सांगितली ॥२॥ तुका म्हणे घेती साच साच भावें । लटिकें वर्म ठावें नाहीं त्यासी३

॥ ३५५९ ॥

ज्याचे माथां जो जो भार । तेचि फार तयासी ॥ १ ॥ मागें पुढें अवघें रितें । कळों येतें अनुभवें ॥ २ ॥ परिसा अंगीं अमुप सोनें । पोटीं हीन धातूचें ॥३॥ आपुला तो करी धर्म । जाणे वर्म तुका तें ४॥

॥ ३५६० ॥

आवडीचे भेटी निवे । चित्त पावे विश्रांती ॥ १ ॥ बरवियाचा छंद मना । नारायणा अवीट ॥ २ ॥ तुळणें कांहीं साम्या पुरे । हें तों उरे ये रुचि ३ तुका म्हणे बरवें झालें । फावलें हें कळे त्या ॥ ४ ॥

॥ ३५६१ ॥

आनंदाचा थारा । सुखें मोहरला झरा ॥ १ ॥ ऐसी प्रभुची ज्या कळा । त्याच्या कोण पाहे बाळा ॥ २ ॥ अंकिता ऐसया । होईल पाववीलें ठाया ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसें । दिलें आभंड प्रकाशें ॥४॥

॥ ३५६२ ॥

आहो उभा विटेवरी । भरोवरी चुकविली ॥ १ ॥ निवारलें जाणें येणें । कोणा कोणें रुसावें ॥ २ ॥ संकल्पासी वेचे बळ । भारे फळ निर्माण ॥ ३ ॥ तुका ह्मणे उभयतां । भेटी सत्ता लोभाची ॥ ४ ॥

॥ ३५६३ ॥

सत्य त्यागाचि समान । नलगे वेचावें वचन ॥ १ ॥ नारायणा ऐसे दास । येरयेरांचीच आस ॥ २ ॥ मळ नाहीं चित्ता । तेथें देवाचीच सत्ता ॥ ३ ॥ तुका म्हणे जाण । तेच भल्याचें वचन ॥४॥

॥ ३५६४ ॥

खाणोरियांचीं पुसो घरें । जींहीं बरीं पाळती ॥ १ ॥ सांगती त्या जावें वाटा । धरोनी पोटामध्यें गोष्टी ॥२॥ आली गेली होती टाया । सत्य छाया कळली ॥३॥ तुका ह्मणे आपुले बळ । युक्तिकाळ कारण ४

॥ ३५६५ ॥

काळें खादला हा अवघा आकार । उत्पत्तिसंहारघडमोडी ॥ १ ॥ बीजें तो अंकुर आच्छादिला पोटीं । अनंता शेवटीं एकाचिया ॥२॥ तुका ह्मणे शब्दें व्यापिलें आकाश । गुढार हें कैसें कळों नये ॥ ३ ॥

॥ ३५६६ ॥

गोंदे कांठीं होता आड । करूनि कोड कवतुक ॥१॥ देखण्यांनीं एक केलें । आहत्या नेलें जिवनापें ॥ २ ॥ राखोनिया होतो ठाव । अल्प जीव लावूनि ३ तुका म्हणे फिटे धनी । हे सज्जनीं विश्रांति ॥ ४ ॥

॥ ३५६७ ॥

देती घेती परज गेली । घर खालीं करूनिया ॥१॥ धांवणियाचे न पडे हातीं । खादली राती काळोखी ॥ २ ॥ अवघियांचें अवघें नेलें । कांहीं ठेविले नाहीं मागें ॥ ३ ॥ सोंग संपादुनि दाविला भाव । गेला आधीं माव वरि होती ॥ ४ ॥ घराकडे पाहूं नयेसेंचि जालें । अमानत केले दिवाणांत ॥५॥ आतां तुका कोणा न लगेचि हातीं । जालो ते निश्चिती बोलों नये ॥ ६ ॥

॥ ३५६८ ॥

देव धरी नाना सोंगें । नाम श्रेष्ठ पांडुरंग ॥ १ ॥ तो हा गवळियाचे घरीं । नाम सारितो मुरारि ॥ २ ॥ धन्य यशोदेचे प्रारब्ध । नाचे अंगणीं गोविंद ॥ ३ ॥ ऐशीं भक्तासाठीं देवें । नाना धरियेलीं नांवें ॥ ४ ॥ होय दासांचा जो दास । तुका ह्मणे विठ्ठलास ॥ ५ ॥

॥ ३५६९ ॥

पवित्र सोवळीं । एक तींच भूमंडळीं ॥ १ ॥ ज्यांचा आवडता देव । अखंडित प्रेमभाव ॥ २ ॥ तींच भाग्यवंतें । सरतीं पुरतीं धनवित्तें ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । त्यांची केली पावे सेवा ॥ ४ ॥

॥ ३५७० ॥

मुदलामध्यें पडे तोटा । ऐसा खोटा उदीम ॥ १ ॥ आणिकांची कां लाज नाहीं । आळस जींही जितीले ॥२॥ एके सांते सारिखीं विकें । हानि हित वेगळालीं ३ तुका म्हणे हित धरा । नव्हे पुरा गांवढळ ॥४॥

॥ ३५७१ ॥

देखण्याच्या तीन जाती । वेठी वार्ता अत्यंतीं ॥१॥ जैसा भाव तैसें फळ । स्वाती तो एक जळ ॥ २ पाहे सांगे आणी जेवी । अंतर महद्वांतर तेवी ॥३॥ तुका ह्मणे हिरा । पारखिया मूढां गारा ॥ ४ ॥

॥ ३५७२ ॥

हरुष आनंदाचा । घोष करा हरिनामाचा । कोण हा दैवाचा । भाग पावे येथील ॥ १ ॥ पुण्य पाहिजे बहुत । जन्मांतरींचे संचित । होईळ करीत । आला अधिकारी तो ॥२॥ काय पाहातां हे भाई । हरुषे नाचा धरा घाई । पोटभरी कांहीं । घेतां उरी न ठेवा ॥ ३ ॥ जें सुख दृष्टी आहे । तेंच अंतरीं जो लाहे । तुका ह्मणे काय । कळिकाळ तें बापुडें ॥ ४ ॥

॥ ३५७३ ॥

तिर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनीं ॥ १ ॥ मिळालिया संतसंग । समर्पितां भलें अंग ॥ २ ॥ तिर्थी भाव फळे । येथें अनाड तें कळे ॥ ३ ॥ तुका ह्मणे पाप । गेलें गेल्या कळे ताप ॥ ४ ॥

॥ ३५७४ ॥

तरीच हीं केलीं । दानें वाईट चांगलीं ॥ १ ॥ एकें एका शोभवावें । केलें कवतुक देवें ॥ २ ॥ काय त्याची सत्ता । सूत्र आणिक चालिता ॥ ३ ॥ तुका ह्मणे धुरें । डोळे भरिले परि खरें ॥ ४ ॥

॥ ३५७५ ॥

एक परि बाहिर बरें । परि तीं ढोरें ग्यानगंडें ॥ १ ॥ कपाळास लागली अगी । अभागी कां जीतसे ॥ २ ॥ एके परि बरें वेडें । तार्कीक कुडें जळो तें ॥३॥ तुका ह्मणे खातडवासी । अमृतासी नोळखे ॥ ४ ॥

॥ ३५७६ ॥

करूनि कडविड । जमा घडिली लगड ॥ १ ॥ आतां होतें तेंचि जालें । नाम ठायींचें चांगलें ॥२॥ उतरलें डाई । उत्तम ते सुलाखताई ॥ ३ ॥ हिंडवितां देश । तुका ह्मणे नाहीं नाश ॥ ४ ॥

॥ ३५७७ ॥

मान इच्छी तो अपमान पावे । अमंगळ सर्व अभाग्याची ॥ १ ॥ एकाचिये अंगीं दुजियाचा वास । आशा पुढें नाश लिब करी २॥ आधीं फळाशीं कोठें पावों शके । वासनेची मिकेवरी चाली ॥३॥ तुका ह्मणे राजहंस ढोरा नांवें । काय तया घ्यावें अळंकाराचें ॥४॥

॥ ३५७८ ॥

नारायणा ऐसा । सेवूं नेणतील रसा ॥ १ ॥ जेणें भवव्याध तुटे । दुःख मागुतें न भेटे ॥ २ ॥ नलगे कांहीं आटी । बाधा राहों न सके पोटीं ३ कैवल्य तें जोडे । पालट लवकरी घडे ४ जन्ममरण दुःख अटे । जालें अवयेंचि तुटे ॥५॥ तुका ह्मणे झाला । याचा गुण बहुतांला ॥६॥

॥ ३५७९ ॥

मोठळें हातीं सोडिल्या गांठी । विकल्या घातले कण ॥ ज्याचे भाग त्यासी देऊनि वारिलें । सारूनि लिगाड दान ॥ खरें माप हातीं घेऊनि बैसलों । मानिती तेची चोंपे जने ॥ खरें वित्त तेथें आलें चोजवीत । गिऱ्हाइक संतजन ॥ १ ॥ झाडिला पालव केला हाट वेच । जाली सकाळीच अराणूक ॥ याल तरि तुम्ही करा लगबग । आमचे ते कोणी लोक ॥ २ ॥ एक उत्तम मध्यम कनिष्ट । वित्ताचे प्रकार तीन । बहुतां जनाचे बहुत प्रकार । वेगळाले वाण । लाभ हानि कोणा मुद्दल जालें । कोणासी पडिलें खाण ॥ अर्धमर्धे कोणी गुंतोनि राहिले । थोडे तैसे बहु जन ॥ ३ ॥ एके सांते आले एक गांवीहून । येकामेचि नव्हे जाणें ॥ येतां जातां रुजू नाहीं दिवाणा । काळतोंडीं एकी तेणें ॥ लाग भाग एकी एकांनीं गोविलें । मागील पुढलां ऋणें ॥ तुका ह्मणे आतां पाहूं नये वास । साधावें आपुलें पेणें ॥ ४ ॥

॥ ३५८० ॥

आह्मां कांहीं आह्मां कांहीं । आतां नाहीं या बोलें ॥१॥ मोल सांगा मोल सांगा । घेणें तींही गा पुसावें ॥२॥ कैसें घडे कैसें घडे । बडबड तुज मज ॥३॥ मुद्दलें सांटीं मुद्दलें सांटीं । लाभ पोटीं त्या मधीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे साठवूं घरीं । आडल्या काळें पुसती तरी ॥ ५ ॥

॥ ३५८१ ॥

शिळें खातां आला वीट । सुनें धीट पाय धरी ॥१॥ कान्होबा ते जाणे खूण । उन उन घांस घाली ॥ २ ॥ आपुलिये ठायींचें घ्यावें । लाड भावें पाळावा ३ तुका ह्मणे मी जुनाट सुनें । मोहो तेणें परतला ४

॥ ३५८२ ॥

वाखर घेउनि आलें । त्यासी तरवारेनें हालें॥१॥नव्हे आपुलें उचित करुनि टाकावें फजित ॥ २ ॥ अंगुलिया मोडी । त्यासी काय सिळे घोडीं ॥ ३ ॥ नपुंसकासाठीं । तुका ह्मणे नलगे जेठी ॥ ४ ॥

॥ ३५८३ ॥

निवडुनि दिलें नवनीत । संचित ते भोगीत १ आतां पुढें भावसार । जीवना थार पाहावया ॥ २ ॥ पारखियाचे पडिलें हातीं । चांचपती आंधळीं ॥३॥ तुका ह्मणे सेवन बडे । त्यासी जोडे काम हा ॥ ४ ॥

॥ ३५८४ ॥

न सरे भांडार । भरलें वेचितां अपार ॥१॥ मावित्याचें पोट भरे । पुढिलासी पुढें उरे॥ २॥ कारणापुरता । लाहो आपुलाल्या हिता ३ तुका ह्मणे देवा । पुढें केला चाले हेवा ॥ ४ ॥

॥ ३५८५ ॥

अनुभवें वदे वाणी । अंतर ध्यानीं आपुलें ॥१॥ कैंची चिका दुधा-चवी । जरी दावी पांढरें ॥२॥ जाती ऐसा दावी रंग । बहु जग या नांवृ ॥ ३ ॥ तुका ह्मणे खद्योत तें । ढुंगाभोंवतें आपुलिया ॥ ४ ॥

॥ ३५८६ ॥

एकीं असे एक हेवा । येर अनावडी जीवां ॥ १ ॥ देवें केल्या भिन्न जाती । उत्तम कनिष्ठ मध्यस्ती ॥२॥ प्रीतिसाठीं भेद । कोणी पूज्य कोणी निंद्य ॥ ३ ॥ तुका ह्मणे ळळा । त्याचा जाणे हा कळवळा ४॥

॥ ३५८७ ॥

निवडोनिया वाण काढिले निराळे । प्रमाण डोहळे यावरि ते ॥१॥ जयाचा विभाग तयासीच फळे । देखणें निराळें कौतुकाशी ॥ २ ॥ शूर तो ओळखे घायडायहात । येरा होइल मात सांगायासी ॥३॥ तुका ह्मणे माझी केळवते वाणी । केला निजस्थानीं जाणवसा ॥४॥

॥ ३५८८ ॥

लोह कफ गार सिद्ध हे सामुग्री । अग्नि टणत्कारी दिसों येतो ॥१॥ सांगावें तें काई सांगावें तें काई । चित्ता होय ठायीं अनुभव तो २ अन्नें सांगों येतो तृप्तीचा अनुभव । करूनि उपाव घेऊं हेवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे मिळे जीवनीं जीवन । तेथें.कोणा कोण नांव ठेवी ॥ ४॥

॥ ३५८९ ॥

एकल्या नव्हे खेळ चांग । धरिला संग म्हणऊनि ॥१॥ उमटे तेव्हां कळे नाद । भेदाभेद निवडेना २ दुसरा परी एक ऐसा । न वजे रिसा निकुरेंही २ तुका ह्मणे कळल्यां कळे । येरा खेळे खेळ म्हूण४

॥ ३५९० ॥

मुळाचिया मुळें । दुःखें वाढती सकळें ॥१॥ ऐसा योगियांचा धर्म । नव्हे वाढवावा श्रम ॥ २ ॥ न कळे आवडी । कोण आहे कैसी घडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे थीते । दुःख पाववावें चित्तें ॥ ४ ॥

॥ ३५९१ ॥

आइत्याची राशी । आली पाकसिद्धीपाशीं ॥ १ ॥ सातां सांडोनी भोजन । फिके जावें वेडेपण ॥ २ ॥ उसंतिली वाट । मागें परतावें फुकट ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाणी । वेचों वैसोन टाकणी ॥ ४ ॥

॥ ३५९२ ॥

जातिविजातीची व्हावयासि भेट । संकल्प तो पोटीं वाहों नये १ ॥ होणार तें घडों होणाराच्या गुणें । होइल नारायणें निर्मिलें तें ॥ २॥

व्याघ्राचिये भुके वधावी ते गाय । याचें नांव काय पुण्य असे ॥३॥ तुका ह्मणे न करी विचार पुरता । गरज्याची माता पिता खर ॥४॥

॥ ३५९३ ॥

केला मातीचा पशुपति । परि मातीसि काय ह्मणती । शिव-पुजा शिवासि पावे । माती मातीमाजी समावे ॥ १ ॥ तैसे पूजिती आह्मां संत । पूजा घेतो भगवंत । आह्मी किंकर संतांचे दास । संत पदवी नको आह्मांस ॥ २ ॥ केला पाषाणाचा विष्णु । परि पाषाण नव्हे विष्णु । विष्णुपूजा विष्णुसि अर्पे । पाषाण राहे पाषाण-रूपें ॥ ३ ॥ केली कांशाची जगदंबा । परि कांसे नव्हे अंबा । पूजा अंबेची अंबेला घेणें । कांसें राहे कांसेंपणें ॥४॥ ब्रह्मानंद पूर्णामाजी । तुका ह्मणे केलें कांजी । ज्याची पूजा तेणेंचि घेणें । आह्मा पाषाणरूप राहणें ॥ ५ ॥

॥ ३५९४ ॥

जगीं ऐसा बाप व्हावा । ज्याचा वंश मुक्तिस जावा ॥१॥ पोटा येतां हरलें पापा । ज्ञानदेवा मायबापा ॥ २ ॥ मुळीं बाप होता ज्ञानी । तरी आम्ही लागलों ध्यानीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे मी पोटींचें बाळ । माझा पुरवा ब्रह्मींची आळ ॥ ४ ॥

॥ ३५९५ ॥

काय दिवस गेले अवघेचि वऱ्हाडें । तें आलें सांकडें कथेमाजी १॥ क्षण एके ठायीं मन स्थिर नाहीं । अराणूक कइं होईल पुढें ॥ २ ॥ कथेचें विरसें दोषा मूळ होय । तरण उपाय कैचा मातीं ॥ ३ ॥ काय तें सांचवूनें उरलें हें मागें । घटिका एक संगें काय गेलें ४॥ तेचि वाणी येथें करा उजळणी । काढावीं मथूनि शब्दरत्नें ॥ ५ ॥ तुका ह्मणे हेंचि बोलावया चाड । उभयतां नाड हित असे ॥ ६ ॥

॥ ३५९६ ॥

लांब धांवे पाय चोरी । भरोवरी जनाच्या १ आतां कैसें होय याचें । सिजतां काचें राहिलें ॥ २ ॥ खाय ऐकी वेळोवेळां । कैसी कळा राहेल ॥ ३ ॥ तुका ह्मणे भावहीण । त्याचा सीण पावावा ॥ ४ ॥

॥ ३५९७ ॥

आवडी येते कळों । गुणें चिन्हें उमटती ॥ १ ॥ पोटींचें ओठीं उभें राहे । चित्त साहे मनासीं २ डोहोळियाची भूक गर्भा । ताटीं प्रभा प्रतिबिंबे ॥ ३ ॥ तुका ह्मणे मानोन घ्यावें । वाटे खावें वाटलें ॥४॥

॥ ३५९८ ॥

पाषाण परिस भूमि जांबूनद । वंशाचा संबंध धातयाचा ॥ १ ॥ सोनियाची पुरी समुद्राचा वेढा । समुदाय गाढा राक्षसांचा ॥२॥

ऐसी सहस्र त्या सुंदरा कामिनी । माजी मुखरणी मंदोदरी ॥३॥
पुत्रपौत्रांचा लेखा कोण करी । मुख्य पुत्र हरी इंद्रा आणी ॥ ४ ॥
चौदा चौकडिया आयुष्यगणना । बंधुवर्ग जाणा कुंभकर्ण ॥ ५ ॥
तुका ह्मणे ज्याचे देव बांदवडी । सांगातें कवडी गेली नाहीं ॥६॥

॥ ३५९९ ॥

धन्या आतां काय करूं । माझें तान्हुलें लेंकरूं ॥ १॥ धन्या अवचित मरण आलें । मज कोणासी निरविलें ॥ २ ॥ माझें दार नका पाडूं । त्याचे हातपाय तोडूं ॥ ३ ॥ एके हातीं धरली दाढी । दुजे हातीं घे कुंऱ्हाडी ॥ ४॥ येरी घाव घालूं पाहे । तंव तो उठोनि उभा राहे ॥५॥ तुका ह्मणे अवघीं चोरें । सेखीं रामनाम सोइरें ॥ ६ ॥

॥ ३६०० ॥

पोरा लागलीसे चट । धरी वाट देवळाची ॥ १ ॥ सांगितलें नेघे कानीं । दुजें मनीं विठ्ठल ॥२॥ काम घरीं न करी धंदा । येथें सदा दुश्चित ॥३ आमुचे कुळीं नव्हतें ऐसें । हेंचि पिसें निवडलें४ लौकिकाची नाहीं लाज । माझें मज पारिखें ॥ ५॥ तुका ह्मणे नरका जाणें । या या वचनें दुष्टाचे ॥ ६ ॥

॥ ३६०१ ॥

देव होईजेत देवाचे संगती । पतन पंगती जगाचिया ॥ १ ॥
दोहींकडे दोन्ही वाहातील वाटा । कारितील सांटा आपुलाला ॥२॥
दाखविले परी नाहीं वर्जिजेतां । आला तो तो चित्ता भाग भरा ३
तुका ह्मणे अंगीं आवडीचें बळ । उपदेश मूळ बीजमात्र ॥ ४ ॥

॥ ३६०२ ॥

भोग द्यावे देवा । त्याग भोगेंचि बरवा ॥ १ ॥ आपण व्हावें एकीकडे । देव कळेवरी जोडे ॥२॥ योजे यथाकाळें । उत्तम पाला कंद मुळें ॥३॥ वंचकसी दोष । तुका ह्मणे मिथ्या सोस ॥ ४ ॥

॥ ३६०३ ॥

आपल्याच स्फुंदें । जेथें तेथें घेती छंदें ॥ १ ॥ पडिला सत्याचा दुष्काळ । बहु फार झाली घोळ ॥ २ ॥ विश्वासाचे माट । त्याचे कपाळीं तें नाट ॥ ३ ॥ तुका ह्मणे घाणा । मूढा तीर्थ प्रदक्षणा ॥ ४ ॥

॥ ३६०४ ॥

नव्हे हें कवित्व टांकसाळी नाणें । घेती भले जन भले लोक ॥ १ ॥
लागलासे झरा पूर्ण नवनीतें । सेविलिया हित फार होय ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा केला बलात्कार । अंगा आलें फार महंतपण ॥ ३ ॥

॥ ३६०५ ॥

गौरव गौरवापुरतें । फळ सत्याचे संकल्प ॥ १ ॥ कठिण योगाहुनि

क्षेम । ओकलिया होतो श्रम ॥२॥ पावलें मरे सिवेपाशीं । क्लेश उरत ते क्लेशीं ॥३॥ तुका ह्मणे बहु आणी । कठिण निघालिया रणीं ॥४॥

॥ ३६०६ ॥

आदि मध्य अंत दावियला दीपें । हा तो आपणापें यत्न बरा ॥१॥
दासत्वें दाविलें धन्याचें भांडार । तोतो नव्हे सार येथुनिया ॥२॥
उपायानें सोस नासला सकळ । सत्ते सत्ताबळ अंगा आलें ॥३॥
तुका ह्मणे दृष्टी सकळांचे शिरीं । वचनाचि करीं बैसोनिया ॥४॥

॥ ३६०७ ॥

भ्रतारअंगसंगें सुखाची वेवस्था । आधीं तो सांगतां नये कोणा १॥
तथापि सांगणें कुमारिकेपाशीं । ते काय मानसीं सुख मानी ॥२॥
तैसा आत्मबोध आधीं बोलों नये । बोलासी तो काय सांपडेल३॥
तथापि सांगणें बहिर्मुखापाशीं । तो काय संतोषासी मूळ होय ४॥
तुका ह्मणे संत सुखाचे विभागी । ब्रह्मानंद जगीं साधुरूपें ॥५॥

॥ ३५०८ ॥

साराचीं लिगाडें धरावा सुपंथ । जावें उसंतीत हळूहळू ॥१॥
पुढें जातियाचे उमटले माग । भांबावलें जग आडरानें ॥२॥
वेव्हल्याचा पाहे वराबरि झाडा । बळाचा निधडा पुढिलिया ॥३॥
तुका ह्मणे जैसी दाखवावी वाणी । ते द्यावी भगोनी शेवट तो ४॥

॥ ३५०९ ॥

परमार्थी तो न म्हणावा आपुला । सलगी धाकुला हेतूं नये ॥१॥
थोडाचि स्फुलिंग बहुत दावाग्नि । वाढतां इंधनी वाढविला ॥२॥
पितियानें तैसा चंद्राचा कुमर । जयाचे अंतर देव वसे ॥३॥
तुका ह्मणे शिरीं वाहावें खापर । माजी असे सार नवनीत ॥४॥

॥ ३६१० ॥

पाहातां ठायाठाव । जातो अंतरोनि देव ॥१॥ नये वाटों गुण-दोषी । मना जतन येविशीं ॥२॥ त्रिविध देह परिचारा । जनीं जनार्दन खरा ॥३॥ तुका ह्मणे धीरें । विण कैसें होतें बरें ॥४॥

॥ ३६११ ॥

करावें चिंतन । तेंचि बरें न भेटून ॥१॥ बरवा अंगीं राहे भाव । तंव तोचि जाणा देव ॥२॥ दर्शनाची उरी । अवस्थाचि अंग धरी ॥३॥ तुका ह्मणे मन । तेथें सकळ कारण ॥४॥

॥ ३६१२ ॥

साधनाचे कष्ट मोठे । भय वाटे थोर हें ॥१॥ मुखें गावें भावें गीत । सर्व हित बैसलिया ॥२॥ दासा नव्हे कर्म दान । तन मन निश्चळ ॥३॥ तुका ह्मणे आत्मनिष्ठा । मागे चेष्टा मनाची ४

॥ ३६१३ ॥

शक्ती द्याव्या देवा । नाहीं पार्थिवांची सेवा ॥१॥ मुख्य आहे

ऐसा धर्म । जाणते हो जाणा वर्म ॥ २ ॥ मना घोटीं देव । जाणे जैसा तैसा भाव ॥३॥ तुका ह्मणे सोसें । लागे लाविल्याचें पिसें ४

॥ ३६१४ ॥

बहु प्रकार गव्हां । जिव्हा नाचे आवडी ॥ १ ॥ सरलें परि आवडी नवी । सिंधु दावी तरंग ॥२॥ घेतलें घ्यावें वेळोवेळां । माय बाळा न विसंबे ॥ ३ ॥ तुका ह्मणे रस वचनीं । पडताळूनि सेवीतसे ॥ ४ ॥

॥ ३६१५ ॥

भांडवी माउली कवतुकें बाळा । आपणा सकळा साक्षित्वेसीं ॥१॥ माझी माझी ह्मणे एकमेकां मारी । हें तों नाहीं दुरी उभयतां ॥ २ ॥ तुझें थोडें भातें माझें बहु फार । छंद करकर वाद मिथ्या ॥ ३ ॥ तुका ह्मणे एके ठायीं आहे वर्म । हेंचि होय श्रम निवारितें ॥ ४ ॥

॥ ३६१६ ॥

वत्स पळे धेनु धांवे पाठीलागी । प्रीतीचा तो अंगीं आविर्भाव ॥१॥ शिकविलें काय येईल कारणा । सूत्र ओढी मना आणिकांच्या ॥२॥ सांडिलें तें नाहीं घेत मेळवितां । ह्मणऊनि लाता मागें सारी ॥ ३ ॥ तुका ह्मणे आग्रह करावा न लगे । सांगतसे अंगें अनुभव ॥ ४ ॥

॥ ३६१७ ॥

विषम वाटे दुरवरी । चालूनि परती धरी । मागील ते उरी । नाहीं उरली भयाची ॥ १ ॥ मुख्य न व्हावा तो नाड । सेवटाचे हातीं गोड । सरलिया चाड । मग कैचे उद्वेग ॥२॥ होता पहिला अभ्यास । समयीं घालावया कास । तेव्हां लटिके दोष । योगें अनुतापाच्या ॥३॥ तुका ह्मणे आहे । बुद्धि केलियानें साहे । जवळीच पाहें । देव वाट स्मरणाची ॥ ४ ॥

॥ ३६१८ ॥

मृगाचिये अंगीं कस्तुरीचा वास । असे ज्याचा त्यास नसे ठावा १ भाग्यवंत घेती वेचूनिया मोलें । भारवाही मेले वाहतां वोझें ॥२॥ चंद्रामृतें तृप्ति पारणें चकोरा । भ्रमरासी चारा सुगंधाचा ॥ ३ ॥ अधिकारी येथें घेती हातवटी । परीक्षवंता दृष्टी रत्न जैसें ॥ ४ ॥ तुका म्हणे काय आंधळिया हातीं । दिलें जैसें मोतीं वाया जाय ५

॥ ३६१९ ॥

भागे तो न घडे संचितावांचूनि । करावें तें मनीं समाधान ॥ १ ॥ ह्मणऊनि मनीं मानूं नये खेद । म्हणावा गोविंद वेळोवेळां ॥ २ ॥ आणिकां रुसावें नलगे बहुतां । आपुल्या संचितावांचूनिया ॥ ३ ॥ तुका ह्मणे भार घातलियावरी । होईल कैवारी नारायण ॥ ४ ॥

॥ ३६२० ॥

दिवाळखोर नारायण । याचरी बहुतांचें ऋण ॥१॥ उठतांचि

उभे द्वारीं । अवर्घ दे दे ह्मणती हरी ॥ २ ॥ माजघरीं दडे हरी । माया तडकी आड करी ॥३॥ युगायुगींचें हें ऋण । म्हणउनि धरिलें मौन्य ॥ ४ ॥ रोखापत्र पाही । वेदशास्त्र देती ग्वाही ॥ ५ ॥ धनकोनाम तुका वाणी । रिणकोनाम विठ्ठल धणी ॥ ६ ॥

॥ ३६२१ ॥

डिवेना डसेना बुजेना निर्मळ । परी अमंगळ स्वीकारीना ॥ १ ॥ परंतु गर्दभ अपवित्र जाणा । पर्वकाळीं दाना देऊं नये ॥ २ ॥ डिवी लात्री बुजे बहु नेदी दुध । मुखीं नाहीं शुद्ध विष्ठा खाय ॥३॥ परंतु ते गाय पवित्र हो जाणा । पर्वकाळीं दाना देऊंजेते ॥ ४ ॥ ब्राम्हणें ब्राह्मणा सद्गुरू करावा । परि न करावा शूद्रादिक ॥ ५ ॥ तुका म्हणे देवें सांगितली सोय । म्हणोनि त्याचे पाय धरिलें जीवें ६

॥ ३६२२ ॥

पाया झाला नारू । तेथें बांधला कापूरू १ तेथें बिब्ब्याचें काम । अधमासी तो अधम ॥२॥ रुसला गुलाम । धणी करीतो सलाम ३ तेथें चाकराचें काम । अधमासी तो अधम ॥ ४ ॥ रुसली घरची दासी । धणी समजावी तियेसी ५ तेथें बटकीचें काम । अधमासी तो अधम ॥ ६ ॥ देव्हाऱ्यावरी विंचू आला । देवपूजा नावडे झाला ॥७॥ तेथें पैंजारेंचें काम । अधमासी तो अधम ॥ ८ ॥ तुका म्हणे जाती । जातीसाठीं खाती माती ॥ ९ ॥

॥ ३६२३ ॥

रत्नाच्या वोवणी कांचे ऐशा धरी । आव्हेरुनी दुरी अधिकारें १ ॥ जातिस्वभाव आला डोळयां आड । तया घडे नाड न कळतां ॥ २ ॥ कामधेनु देखे जैशा गाईम्हैशी । आणिकांतें ऐसी करोनिया ॥३॥ तुका म्हणे काय बोलोनिया फार । जयाचा वेव्हार तया साजे ४ ॥

॥ ३६२४ ॥

मागें नेणपणें घडलें तें क्षमा । आतां देतों सीमा करूनिया ॥ १ ॥ परनारीचें जया घडलें गमन । दावीतो वदन जननीरत ॥ २ ॥ उपदेशावरी मन नाहीं हातीं । तो आम्हां पुढती पाहूं नये ॥ ३ ॥ तुका ह्मणे साक्षी असों द्यावें मन । घातली ते आण पाळावया ४॥

॥ ३६२५ ॥

पूज्या एकासनीं असनीं आसन । बैसतां गमन मातेशीं तें ॥ १ ॥ सांगतों ते धर्म नीतीचे संकेत । सावधान हित व्हावें तरी ॥ २ ॥ संतां ठाया ठाव पूजनाची इच्छा । जीवनींच वळसा सांपडला ३ ॥ तुका ह्मणे एकापर्कीं वरासन । दुजें तेथें भिन्न अशोभ्य तें ॥ ४ ॥

॥ ३६२६ ॥

वीट नेघे ऐसें रांधा । जेणें बाध उपजेना ॥ १ ॥ तरीच तें गोड

राहे । निरें पाहे स्वयंभ २ आणिकां गुणां पोटीं वाव । दावी भाव आपुला ॥ ३ ॥ तुका ह्मणे शुद्ध जाती । ते मागुती परतेना ॥ ४ ॥

॥ ३६२७ ॥

पूर आला आनंदाचा । लाटा उसळती प्रेमाच्या ॥ १ ॥ बांधूं विठ्ठल सांगडी । पोहुनि जाऊं पैल थडी २ अवघे जन गडी । घाला उडी भाईनो ॥३॥ हें तों नाहीं सर्वकाळ । अमुप अमृताचें जळ ॥४॥ तुका ह्मणे थोरा पुण्यें । ओघ आला पंथें येणें ॥ ५ ॥

॥ ३६२८ ॥

नको होऊं देऊं भावीं अभावना । याचि नांवें जाणा बहु दोष ॥१॥ मेघवृष्टि येथें होते अनिवार । जिव्हाळया उखर लाभ नाड ॥ २ ॥ उत्तमा विभागें कनिष्ठाची इच्छा। कल्पतरु तैसा फळे त्यासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे जिणें बहु थोडें आहे । आपुलिया पाहें पुढें बरें ॥ ४ ॥

॥ ३६२९ ॥

मायेचा मारिला अंगीं नाहीं घाव । दुःखें तरी लव धडधडी ॥ १ ॥ न लभे हा काळ न सुटे हातींचा । न बोलवे वाचा खोडावली २ ॥ न पवे धांवणें न पवेची लाग । न चलती माग धरावया ॥ ३ ॥ भेणें तरि अंगा लावियेल्या राखा । परी त्यासी वाखा करीतसे ४॥ तुका ह्मणे नेदी हाका मारूं देवा । लोकांपाटीं हेवा लागतसे ॥५॥

॥ ३६३० ॥

दया तिचें नांव भूतांचें पाळण । आणिक निर्दळण कंटकांचें ॥ १ ॥ पाप त्याचें नांव न विचारी नीत । भलतेंचि उन्मत्त करी सदा २॥ धर्म नीतीचा हा ऐकु वेव्हार । निवडीलें सार असार तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे धर्म रक्षावयासाठीं । देवासही आटी जन्म घेणें ॥ ४ ॥

॥ ३६३१ ॥

शोकें शोक वाढे । हिमतीचे धीर गाढे ॥ १ ॥ येथें केलें नव्हे कांई लंडीपण खोटें भाई ॥ २ ॥ करिती होया होय । परी नव्हे कोणी साह्य ॥ ३ ॥ तुका ह्मणे घडी । साधिलिया एक थोडी ॥ ४ ॥

॥ ३६३२ ॥

आशा तृष्णा माया अपमानाचें बीज । नासिलिया पूज्य होईजेतें अधीरासी नाहीं चालों जातां मान । दुर्लभ दर्शन धीर त्याचें ॥२॥ तुका ह्मणे नाहीं आणिकांसी बोल । वाया जाय मोल बुद्धिपाशीं ३

॥ ३६३३ ॥

चालिले सोबती । काय मानिली निश्चिती ॥ १ ॥ काय करिसी एकला । काळ सन्निध पातला ॥ २ ॥ कांहीं सावध तो बरवा । करी आपुला काढावा ३ चालिले आगळे । हकूच कान केश डोळे ४

वोसरले दात दाढा गडबडल्या आंत ५ एकली तळमळे। जिव्हा भलते ठायीं लोळे ६ तुका ह्मणे यांणीं । तुह्मी मांडिली घालणी ७

॥ ३६३४ ॥

विधीनें सेवन । विषयत्यागातें समान १ मुख्य धर्म देव चित्तीं । आदि अवसान अंतीं २ बहु अतिशय खोटा । तर्के होती बहु वाटा ॥ ३ ॥ तुका ह्मणे भावें । कृपा करीजे ते देवें ॥ ४ ॥

॥ ३६३५ ॥

जीवन मुक्त ज्ञानी पर झाले पावन । त्यजा हो दुर्जन संगति हे १ बहुत अन्न विष मोहरीच्या मानें । अवघेंचि तेणें विष होय ॥ २ ॥ तुका ह्मणे जेणें आपुलें स्वहित । तैसी करी नीत विचारूनि ॥ ३ ॥

॥ ३६३६ ॥

द्रव्याचिया मागें कळिकाळाचा लाग। ह्मणोनिया संग खोटा त्याचा १ निरयाचें मूळ घालुनिया मागें । मांडिली प्रसंगें कथा पुढें ॥ २ ॥ आजिच्या प्रसंगें हाचि लाभ घ्यावा । पुढील भार देवावरी घाला ३ प्रालब्ध कांहीं न पालटे सोसें । तृष्णेचें हें पिसें वायांविण ॥ ४ ॥ तुका ह्मणे घेई राहे ऐसें धन । सादर श्रवण करोनिया ॥ ५ ॥

॥ ३६३७ ॥

योगाचें तें भाग्य क्षमा । आधीं दमा इंद्रियें १ अवघीं भाग्यें येती घरा । देव सोयरा जालिया २ मिरासीचें म्हूण सेत । नाहीं देत पीक उगें ३ तुका ह्मणे उचित जाणा । उगीं सिणा काशाला ॥४॥

॥ ३६३८ ॥

न म्हणे साना थोर । दुष्ट पापी अथवा चोर ॥ १ ॥ सकळां द्यावी एक चवी । तान हरूनि निववी २ न म्हणे दिवस राती । सर्व काळ सर्वां भूतीं ॥ ३ ॥ तुका म्हणे झारी । घेतां तांब्यानें खापरी ॥ ४ ॥

॥ ३६३९ ॥

सतीचें तें घेतां वाण । बहु कठीण परिणामीं ॥१॥ जिवासाठीं गौरव वाढे । आहाच जोडे तें नव्हे ॥२॥ जरि होय उघडी दृष्टी । तरि गोष्टी युद्धाच्या ॥ ३ ॥ तुका ह्मणे अंगा येतां । तरी सत्ता धैर्याची ॥ ४ ॥

॥ ३६४० ॥

समुद्र हा पिता बंधु हा चंद्रमा । भगिनी ते रमा शंखाची या ॥ १ ॥ मेहुणा जयांचा द्वारकेचा हरि । शंख दारोदारीं भीक मागे ॥ २ ॥ दृष्ट हें जाणावें आपुलें स्वहित । तुका ह्मणे मात ऐसी आहे ॥ ३ ॥

॥ ३६४१ ॥

करी आणिकांचा अपमान । खळ छळवादी ब्राह्मण । तया देतां दान । नरका जाती उभयतां ॥ १ ॥ तैसें जालें दोघांजणां । मागतिया यजमाना । जाळियलें वना । आपणासहित कांचणी ॥ २ ॥

घडितां दगडाची नाव । मोल क्लेश गेले वाव । तरता नाहीं ठाव । बुडवी तारूं तरतीया ॥ ३ ॥ चोरा दिधला साटा । तेणें मारियेल्या वाटा । तुका म्हणे ताटा । हें तंव दोघे नाडती ॥ ४ ॥

॥ ३६४२ ॥

एका म्हणे भले । आणिकां सहज निंदिले ॥ १ ॥ कांहीं न करितां आयास । सहज घडले ते दोष ॥ २ ॥ बरें वाइटाचें । नाहीं कांहीं मज साचें ॥ ३ ॥ तुका म्हणे वाणी । खंडोनि राहावें चिंतनीं ॥ ४ ॥

॥ ३६४३ ॥

संत संगतीं न करावा वास । एखादे गुणदोष अंगा येती ॥ १ ॥ मग तया दोषा नाहीं परिहार । होय अपहार सुकृताचा ॥ २ ॥ तुका म्हणे नमस्कारावे दुरून । अंतरीं धरून राहें रूप ॥ ३ ॥

॥ ३६४४ ॥

ज्याची जया आस । तयाजवळी त्या वास ॥ १ ॥ येर जवळी तें दुरी । धेनु वत्स सांडी घरीं ॥२॥ गोडी प्रियापाशी । सुख उपजे येरासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे बोल । घडे तया ठायीं मोल ॥ ४ ॥

॥ ३६४५ ॥

क्षमा शस्त्र जया नराचिया हातीं । दुष्ट तयाप्रति काय करी ॥ १ ॥ तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि । जाय तो विझोन आपसया ॥२॥ तुका ह्मणे क्षमा सर्वांचें स्वहित । धरा अखंडित सुखरूप ॥ ३ ॥

॥ ३६४६ ॥

अनुभवें आलें अंगा । तें या जगा देतसें ॥ १ ॥ नव्हती हाततुके बोल । मूळ ओल अंतरींची ॥२ ॥ उतरूनि दिलें कशीं । शुद्धरशीं सरे तें ॥३॥ तुका ह्मणे दुसरें नाहीं। ऐसी ग्वाही गुजरली ॥ ४ ॥

॥ ३६४७ ॥

स्त्रिया धन हें बा खोटें । नागवले मोठे मोठे ॥ १ ॥ ह्मणोनि सांडा दोनी । सुख पावाल निदानीं ॥ २ ॥ सर्व दुःखासी कारण । हींच दोन्हींच प्रमाण ॥३॥ आशा सर्वस्वें सांडावी । तेणें निजपदवी पावावी ॥ ४ ॥ देह लोभें नाडला । घाला यमाचा पडला ॥ ५ ॥ तुका ह्मणे निरापेक्षा । कांहीं न धरावी अपेक्षा ॥ ६ ॥

॥ ३६४८ ॥

आपुली कसोटी शुद्ध राखी कारण । आगीनें भूषण अधिक पुट १ नाहीं कोणासवे बोलणें लागत । निश्चितीनें चित्त समाधान ॥ २ ॥ लपविलें तेही ढेकरे उमटे । खोटियाचे खोटे उर फोडी ॥ ३ ॥ तुका म्हणे निंदा स्तुति दोन्ही वाव । आपुलाला भाव फळा येतो४

॥ ३६४९ ॥

उभानु काटीवरि चोपडुची आस । नवरा राजस मिरवतसे ॥ १ ॥

जिव्हाळ्याच्या काठी उबाळ्याच्या मोटा। नवरा चोहटा मिरवतसे२
तुळशीची माळ नवरीचे कंठीं । नोवरा वैकुंठीं वाट पाहे ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐशी नोवऱ्याची कथा । परमार्थ वृथा बुडविला ॥ ४ ॥

॥ ३६५० ॥

हित सांगे तेणें दिलें जीवदान । घातकी तो जाण मनामागें ॥ १ ॥
बळें हे वारावे अधर्म करितां । अंधळें चालतां आडरानें ॥ २ ॥
द्रव्य देऊनिया धाडावें तीर्थासी । नेदावें चोरासी चंद्रबळ ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसे आहे हें पुराणीं । नाहीं माझी वाणी पदरींची ॥४॥

॥ ३६५१ ॥

नाहीं हित ठावें जननीजनका । दाविले लौकिकाचार तींही ॥ १ ॥
अंधळ्याचे पाठी लागले आंधळे । घात एकवेळे मागेंपुढें ॥ २ ॥
न ठेवावी चाली करावा विचार । वरील आहार गळीं लावी ॥३ ॥
तुका ह्मणे केला निवाडा रोकडा । राऊत हा घोडा हातोहातीं ४ ॥

॥ ३६५२ ॥

निंदावें हे जग। ऐसा भागा आला भाग ॥१॥ होतें तैसें आलें फळ। गेलें निवडूनि सकळ ॥ २ ॥ दुसऱ्याच्या मता। मिळेनासें झालें चित्ता ॥ ३ ॥ तुका झाला सांडा। विटंबिती पोरें रांडा ॥ ४ ॥

॥ ३६५३ ॥

हेंही ऐसें तेंही ऐसें। उभय पिसें अविचार ॥ १ ॥ अभिमानाचे ठेला-ठेलीं। मधीं जालीं हिंपुष्टी ॥२॥ धीरा शांती ठाव नुरे। हाचि उरे आबाळ्या ॥ ३ ॥ कौतुक हे पाहे तुका। कढतां लोकां अभ्रणीं ॥ ४ ॥

॥ ३६५४ ॥

भूतीं भगवंत। हा तो जाणतो संकेत ॥१॥ भारी मोकलितो बाण। ज्याचा त्यासी कळे गुण ॥ २ ॥ करावा उपदेश। निवडोनि तरी दोष ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाटे। चुकतां आडराने कांटे ॥ ४ ॥

॥ ३६५५ ॥

जागा घरटी फिरे। तस्कराची दिवसाराती १ नीदसुरें नाडिलीं। असो ऐसीं मागें किती ॥ २ ॥ हाट करी सकळ जन। वस्तु करा रे जतन ॥३॥ हुशार टार्यी। निजनिजोलिया पाही ॥४॥ सावचित्त असे खरा। लाभ घेऊन जावे घरा ५ तराळ बोंबे उतराई। राखा आपुलिया भाई ६ हरिच्या नामीं घालूं जागा। तुका म्हणे हुशार गा ७

॥ ३६५६ ॥

चित्त समाधाने। तरी विष वाटे सोनें ॥ १ ॥ बहु खोटा अति-शय। जाणा भले सांगो काय ॥ २ ॥ मनाचे तळमळे। चंदनेंही अंग पोळे ॥३॥ तुका म्हणे दुजा। उपचार पीडा पूजा ॥ ४ ॥

॥ ३६५७ ॥

एक तटस्थ मानसीं। एक सहजचि आळसी ॥ १ ॥ दोन्ही

दिसती सारिखीं । वर्म जाणे तो पारखी ॥२॥ एक ध्यानीं करिती जप । एक बैसुनि घेती झोंप ॥ ३ ॥ एका सर्वस्वाचा त्याग । एका पोटासाठीं जोग ४ एका भक्ति पोटासाठीं । एका देवासवें गांठी ५ वर्म पोटीं एका । फळें दोन ह्मणे तुका ॥ ६ ॥

॥ ३६५८ ॥

यथार्थ वाद सांडुनि उपचार । बोलती ते अघोर भोगितील ॥ १ ॥ चोरा धरितां सांगे कुठाऱ्याचें नांव । दोघांचेही पाव हात जाती २ तुका ह्मणे असे पुराणीं निवाड । माझी हे बडबड नव्हे कांहीं ॥३॥

॥ ३६५९ ॥

सर्प विंचू दिसे । धन अभाग्या कोळसे ॥ १ ॥ आला डोळ्यांसी कवळ । तेणें मळलें जवळ ॥ २ ॥ अंगाचे भोवडी । भोय झाडें फिरे धोंडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाड । पाप ठाके हिता आड ॥ ४ ॥

॥ ३६६० ॥

भक्ति तो कठिण शुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर १ जेथें पाहे तेथें देखीचा पर्वत । पायाविण भिंत तांतडीची ॥ २ ॥ कामाविले तरि पाका ओज घडे । रुचि आणि जोडे श्लाघ्यता हे ३ तुका ह्मणे मना पाहिजे अंकुश । नित्य नवा दिस जागृतीचा ४ ॥

॥ ३६६१ ॥

चित्तीं मिळे त्याचा संग रुचिकर । क्षोभवितां दूर तोचि भले १ ॥ ऐशी परंपरा आलीसे चालत । भलत्याची नीत त्यागावरी २ ॥ हो कां पिता पुत्र बंधु कोणी तरी । विजाति संग्रहीं धरूं नये ३ ॥ तुका म्हणे सत्य पाळावें वचन । अन्यथा आपण करूं नये ॥ ४ ॥

॥ ३६६२ ॥

निगमाचें वन । नका शोधूं करूं सीण ॥१॥ या ते गौळियांचे घरीं । बांधलेसे दावे वरी ॥ २ ॥ पडिले ती भ्रमें । वाटा न कळतां वर्में ॥ ३ ॥ तुका म्हणे भार । माथा टाका अहंकार ॥ ४ ॥

॥ ३६६३ ॥

निरोप सांगतां । न धरीं भय न करीं चिंता ॥ १ ॥ असो ज्याचें त्याचे माथां । आपण करावी ते कथा ॥ २ ॥ उतरावा भार । किंवा न व्हावें सादर ३ तुका ह्मणे वाहे धाक । तया इह ना परलोक ॥ ४ ॥

॥ ३६६४ ॥

पापाचिया मूळें । जाले सत्याचे वाटोळें ॥ १ ॥ दोष जाले बळिवंत । नाहीं ऐसी जाली नीत ॥२॥ मेघ पडो भीती । पिकें सांडियेली क्षितीं ॥३॥ तुका म्हणे कांहीं । वेदा वीर्य शक्ति नाहीं ॥ ४ ॥

॥ ३६६५ ॥

उजळितां उजळे दीपकाची वाती । स्वयंभ तेज्योति हिऱ्या अंगीं १

एकीं महाकष्टें मिळविलें धन । एकासी जतन दैवयोगें ॥ २ ॥
परिमळें केलें चंदनाचें चिन्ह । निवडी ते भिन्न गाढव तो ॥ ३ ॥
तुका ह्मणे जया अंगीं हरिठसा । तो तरे सहसा वंद्य होय ॥ ४ ॥

॥ ३६६६ ॥

संचित तैशी बुद्धि उपजे मनामधीं । सांगितले सिद्धि नव जाय १
ज्याचा जैसा ठेवा तो त्यापाशीं धांवे । न लगती करावे उपदेश २॥
घेऊन उठती आपुलाले गुण । भाविष्याप्रमाणें तुका म्हणे ॥ ३ ॥

॥ ३६६७ ॥

रडोनिया मान । कोण मागतां भूषण ॥ १ ॥ देवें दिलें तरी गोड । राहे रुचि आणि कोड ॥ २ ॥ लावितां लावणी । विके भीके केज्या दानी ॥ ३ ॥ तुका ह्मणे धीरा । विण कैसा होतो हिरा ॥ ४ ॥

॥ ३६६८ ॥

पाषाण प्रतिमा सोन्याच्या पादुका । हे हो हातीं एका समर्थाचे १
अनामिका हातीं समर्थाचा शिका । न मानितां लोकां येइल कळो २
तुका म्हणे येथें दुराग्रह खोटा । आपुल्या अदृष्टा शरण जावें ३ ॥

॥ ३६६९ ॥

परद्रव्य परकांता । नातळे जयाचिया चित्ता । आणि कर्मी तो तत्वता । बांधला नवजाय ॥१॥ ऐसा अनुभव रोकडा । विश्वासीतो जीवा जोडा । एकांत त्या पुढा । अवघा करी उकल ॥२॥ सकट आंबले अन्न । शोधी तेचि मद्यपान । विषमाचें भिन्न । केले शुद्धाशुद्ध ॥ ३ ॥ तुका म्हणे नित । बरवे अनुभवे उचित । तरी काय हित । मोलें घ्यावें लागतें ॥ ४ ॥

॥ ३६७० ॥

अमृत आव्हेरे उचंबळे जातां । विष आर्तभूतां आवश्यक ॥ १ ॥
आदरासी मोल नये लावूं केजें । धीर शुद्धबीजें गोमटा तो ॥ २ ॥
खन्याचिये अंगीं आपणचि चाली । लावणी लागली काय लागे ३
तुका ह्मणे चाडें करा वेवसाव । आम्हांसी तो वाव धीर आहे ॥४॥

॥ ३६७१ ॥

नये स्तवूं काचे होते क्रियानष्ट । फुंदाचे ते कष्ट भंगा मूळ ॥ १ ॥
नाहीं परमार्थ साधत लौकिकें । धरून होतो फिके अंगा आले २॥
पारखिया पुढें नये घालूं तोंड । तुटी लाभा खंड होतो माना ३ ॥
तुका म्हणे तरी मिरवते परवडी । कामाविल्या गोडी अविनाश ४

॥ ३६७२ ॥

असतीं कांटाळा हा नव्हे मत्सर । ब्रह्म तें विकारविरहित ॥ २ ॥
तरि ह्मणा त्याग प्रतिपादिलासे । अनादि हा असे वैराकार ॥ २ ॥
सिजलें हिरवें एका नांवें धान्य । सेवनापें भिन्न निवडे तें ॥ ३ ॥
तुका ह्मणे भूतीं साक्ष नारायण । अवगुणीं दंडण गुणीं पूजा ॥४॥

॥ ३६७३ ॥

आहाच तो मोड वाळलियामधीं । अधीराची बुद्धि तेणें न्यायें १॥ ह्मणऊनि संग न करीं दुसरें । चित्त मळीन द्वारें झाड पडे ॥ २ ॥ विषासाठीं सर्पा भयाभीत लोक । हें तो सकळीक जाणतसां ॥३॥ तुका ह्मणे कांचें राहे कुळाकुड । अवगुण तो नाड ज्याचा तया ४॥

॥ ३६७४ ॥

नेणें फुंकों कान । नाहीं एकांतीचें ज्ञान १ तुम्ही आइकां हो संत । माझा सादर वृत्तांत ॥ २ ॥ नाहीं देखिला तो डोळां । देव दाखवूं सकळां ॥ ३ ॥ चिंतनाच्या सुखें । तुका ह्मणे नेणें दुःखें ॥ ४ ॥

॥ ३६७५ ॥

माझा पाहा अनुभव । केला देव आपुला १ बोलविलें तेंचि द्यावें । उत्तर व्हावें ते काळीं ॥ २ ॥ सोडिलिया जग निंद्य । मग गोविंद ह्मणियारा ॥ ३ ॥ तुका ह्मणे धीर केला । तेणें याला गोविलें ४ ॥

॥ ३६७६ ॥

कस्तुरी भिनली जये मृत्तिके । तयेसी आणिके कैसी सरी ॥ १ ॥ लोखंडाचे अंगीं लागता परिस। तया आणिकास कैसी सरी ॥२॥ तुका ह्मणे मी न वजें यातीवरी । पूज्यमान करीं वैष्णवासी ॥ ३ ॥

॥ ३६७७ ॥

नयें माझा तुह्मां होऊं शब्दस्पर्श । विप्रवृंदा तुह्मां ब्राह्मणांसी ॥१॥ ह्मणोनिया तुह्मां करितों विनंती । द्यावें शेष हातीं उरलें तें ॥ २ ॥ वेदीं कर्म जैसें बोलिलें विहित । करावी ते नीत विचारूनि ॥ ३ ॥ तुमचा स्वधर्म माझा अधिकार । भोजन उत्तर तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ३६७८ ॥

आह्मी वैकुंठवासी । आलों याचि कारणासी । बोलिले जे ऋषी । साच भावें वर्ताया १ झाडूं संतांचे मारग । आडरानीं भरलें जग । उच्छिष्टाचा भाग । शेष उरलें तो सेवूं ॥ २ ॥ अर्थें लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें । विषयलोभी मनें । साधनें बुडविलीं ॥ ३ ॥ पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा । तुका ह्मणे करा । जयजयकार आनंद ॥ ४ ॥

॥ ३६७९ ॥

कास घालोनी वळकट । झालों कळिकाळासी नीट । केली पायवाट । भवसिंधूवरूनि ॥ १ ॥ या रे या रे लहान थोर । याति भलते नारीनर । करावा विचार । न लगे चिंता कोणासी ॥ २ ॥ कामीं गुंतले रिकामे । जपी तपी येथें जमे । लाविले दमामे । मुक्त आणि मुमुक्षा ॥ ३ ॥ एकंदर शिक्का । पाटविला इहलोका । आलों ह्मणे तुका । मी नामाचा धारक ॥ ४ ॥

नारायण हें करी ॥ २ ॥ भ्रमणांच्या मोडीं वाटा । न भरे फाटा आडरानें ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझ्या जीवें । हेंचि घ्यावें धणीवरी॥४॥

॥ ३६९२ ॥

हरिनामवेली पावली विस्तार । फळीं पुष्पीं भार वोल्हावली ॥ १॥
तेथें माझ्या मना होई पक्षिराज । साधावया काज तृप्तीचें या २॥
मुळींचिया बीजें दाखविली गोडी । लवकरचि जोडी जालियाची३
तुका ह्मणे क्षणक्षणा जातो काळ । गोडी ते रसाळ अंतरेल ॥ ४ ॥

॥ ३६९३ ॥

सांवळें सुंदर पाहे दृष्टीभरी । ऐसें कांहीं करीं मन राझें ॥ १ ॥
मना तुज ठाव दिला त्याचे पायीं । राहें विठाबाईसवें सदा ॥ २ ॥
मना नको धरूं आणिकांचा संग । नाहीं पांडुरंग जया मनीं ॥ ३ ॥
वरपंग भाव नको ह्मणे तुका । करीं प्राणसखा नारायण ॥ ४ ॥

॥ ३६९४ ॥

आतां असो मना अभक्तांची कथा । न होई दुश्चिता हरिनामीं ॥१॥
नये त्याची कदा गोष्टी करूं मांत । जिव्हे प्रायश्चित्त त्याच्या नांवें२
प्रभातें न घ्यावें नांव माकडाचें । तैसें अभक्तांचें सर्वकाळ ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां आठवूं मंगळ । जेणें सर्व काळ सुखरूप ॥ ४ ॥

॥ ३६९५ ॥

नको घालूं झांसां । मना उपाधि वोळसा ॥ १ ॥ जे जे वाहावें संकल्प । पुण्य तरी तेंचि पाप ॥२॥ उपजतो भेव । होतो कासावीस जीव ॥ ३ ॥ तुका ह्मणे पाहों । होइल तें निवांत राहों ॥ ४ ॥

॥ ३६९६ ॥

करीं हेंचि काम । नाम जपें राम राम ॥१॥ लागो हाचि छंद । मना गोविंद गोविंद ॥२॥ तुका ह्मणे मना । मज भीक द्यावी दीना ॥३॥

॥ ३६९७ ॥

पंढरी पावन झालें माझें मन । आतां करूं ध्यान विठोबाचें ॥ १ ॥
आतां ऐसें करूं नाम गाऊं गीतीं । सुखाचा सांगाती विठो करूं २॥
संग करूं त्याचा तो सखा आमचा । अनंता जन्मांचा मायबाप॥३॥
परतोनि सोई धरीं कां रे मना । विठ्ठलचरणा घालीं मिठी ॥ ४ ॥
घातलीसे मिठी नाहीं भाक्तिभाव । उदार पंढरिराव तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ३६९८ ॥

मायारूपें ऐसें मोहिलेसें जन । भोगिती पतन नानाक्रमें ॥ १ ॥
काय याची प्रीती करितां आदर । दुराविता दूर तेंचि भले ॥ २ ॥
नाना छंद अंगीं बैसती विकार । छळियेले फार तपोनिधि ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसें सिकवितो तुज । आतां धरीं लाज मना पुढें ॥ ४ ॥

॥ ३६९९ ॥

सांगतां या मना तें माझें नाइके । घातावरी टेंके चांडाळ हे ॥ १ ॥

ह्मणऊनि पाहे तरतें बुडतें । न लाहे पुरतें बळ करूं ॥ २ ॥
काय तें संचित न कळे पाहातां । मतिमंद चित्ता उपजतें ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसें बळ नाहीं अंगीं । पाहोनिया वेगीं पार टाकी ॥ ४॥

॥ ३७०० ॥

चित्ता ऐसी नको देऊं आठवण । जेणें देवाचे चरण अंतरे तें ॥ १॥
आलिया वचनें रामनामध्वनि । ऐकावीं कानीं ऐसीं गोडें ॥ २ ॥
मत्सराचा ठाव शरीरीं नसावा । लाभेविण जीवा दुःख देतो ॥३॥
तुका ह्मणे राहे अंतर शीतळ । शांतीचें तें बळ क्षमा अंगीं ॥ ४ ॥

॥ ३७०१ ॥

नको येऊं लाजे होय तूं परती । भजों दे श्रीपती सखा माझा ॥१॥
तुझे संगतीनें मोठा झाला घात । झालों मी अंकित दुर्जनाचा ॥२॥
तुका ह्मणे रांडे घेइन काटीवरी । धनी सहाकारी राम केला ॥३॥

॥ ३७०२ ॥

आजिवारि होतों तुझे सत्तेखालीं । तोंवरी तो केली विटंबना ॥१॥
आतां तुज राहों नेदीं या देशांत । ऐसा म्यां समर्थ केला धणी॥२॥
सांपें रिग केला कोठें बाळपणीं । होतीसी पापिणी काय जाणों ३॥
तुका ह्मणे म्यां हा बुडविला वेव्हार । तुझेचि ढोपर सोलावया ४॥

॥ ३७०३ ॥

आतां येथें लाजे नाहीं तुझें काम । जाय मज राम आठवूं दे ॥ १ ॥
तुझे भिडे माझे बहु झाले घात । केलों या अंकित दुर्जनाचा ॥ २ ॥
माझें केलें मज पारिखें माहेर । नटोनी साचार चाळविलें ॥ ३ ॥
सुखासाठीं एक चाहियेलें खांदीं । तेणें बहु मांदी मेळविली ॥ ४ ॥
केला चौघाचार नेलों पंचांमधीं । नाहीं दिली शुद्धी धरूं आशा ५॥
तुका ह्मणे आतां घेइन काटीवरी । धनी म्यां कैवारी केला देव ॥६॥

॥ ३७०४ ॥

कोणाही कांडावें हा आह्मां अधर्म । जोजो पावे श्रम तोतो देव ॥१॥
ह्मणउनि चित्ता शिकाविलें वोजे । आतां होंचि दुजें न बोलावें ॥२॥
हालविलें जरि परउपकारें । जिव्हे पाप खरे उपाधीचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे जीव प्रारब्धा आधीन । कोण वाहे सीण करुणा शोभे ४

॥ ३७०५ ॥

आतां पुढें धरीं । माझे आठव वैखरी ॥ १ ॥ नको बडबडूं भांडे । कांहीं वाउगें तें रांडे ॥ २ ॥ विठ्ठल विठ्ठल । ऐसे सांडोनिया बोल ॥ ३ ॥ तुका ह्मणे आण । तुज स्वामीची हे जाण ॥ ४ ॥

॥ ३७०६ ॥

आणीक कांहीं या उत्तराचें काज । नाहीं आतां मज बोलावया १॥
भिन्न भेद हे भावना स्वभाव । नव्हे कांहीं देव एकविध ॥ २ ॥

गुण दोष कोणें निवडावे धर्म । कोण जाणे कर्म अकर्म तें ॥ ३ ॥
तरिच भलें आतां न करावा संग । दुःखाचा प्रसंग तोडावया ॥४॥
तुका ह्मणे गुण गाई या देवाचे । घेई माझे वाचे हेचि धणी ॥ ५ ॥

॥ ३७०७ ॥

जळो ते जाणीव जळो ते शाहाणीव । राहो माझा भाव विठ्ठलपायीं१
जळो तो आचार जळो तो विचार । राहो मन स्थीर विठ्ठलपायीं२
जळो हा लौकिक जळो दंभमान । लागो जीवा ध्यान विठ्ठलाचें ३॥
जळो हें शरीर जळो हा संबंध । राहो परमानंद माझ्या कंठीं ॥४॥
तुका ह्मणे येथें अवघेंचि होय । धरीं मना सोय विठोबाची ॥ ५ ॥

॥ ३७०८ ॥

ऐसी जिव्हा निकी । विठ्ठल विठ्ठल कां न घोकी ॥१॥ जेणें पाविजे उद्धार । तेथें राखावें अंतर ॥ २ ॥ गुंपोनि चावटी । तेथें कोणा लाभे भेटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळा । देवाविण अमंगळा ॥ ४ ॥

॥ ३७०९ ॥

घेई घेई माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ॥ १ ॥ तुह्मी घ्यारे डोळे सुख । पाहा विठोबाचें मुख ॥२॥ तुह्मी ऐकारे कान । माझ्या विठोबाचें गुण ॥३॥ मना तेथें धांव घेई । राहे विठोबाचे पायीं ४॥ तुका ह्मणे जीवा । नको सोडूं या केशवा ॥ ५ ॥

अद्वैतपर अभंग.

॥ ३७१० ॥

ॐ तत्सदिति सूत्राचें सार । कृपेचा सागर पांडुरंग ॥ १ ॥
हरिः ॐ सहित उदत्त अनुदत्त । प्रचुरीश्वरासहित पांडुरंग ॥ २ ॥
गोब्राह्मणहिता होऊनी निराळे । वेदाचें तें मूळ तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ३७११ ॥

पाहतां तव एकला दिसे । कैसा असे व्यापक ॥ १ ॥ त्याचे त्याच मिळणीं मिळे । तरी खेळे बहुरूपी ॥ २ ॥ जाणिवेचें नेदी अंग । दिसो रंग निवडीना ३ तुका ह्मणे येचि ठायीं । हें तो नाहीं सर्वत्र ॥ ४ ॥

॥ ३७१२ ॥

जीवाचें जीवन अमृताची तनु । ब्रह्मांड भूषणू नारायण ॥ १ ॥
सुखाचा सांगात अंतकासी अंत । निजाचा निवांत नारायण ॥२॥
गोडाचेंही गोड हर्षाचेंही कोड । प्रीतिचाही लाड नारायण ॥ ३ ॥
भावाचा निजभाव नांवांचाही नांव । अवघा पंढरीराव अवतरलासे ४
तुका ह्मणे जें हें साराचें हें सार । माझा अंगीकार तेणें केला ॥५॥

॥ ३७१३ ॥

जिकडे पाहें तिकडे उभा । अवघ्या गगनाचा गाभा ॥१ डोळां बैसलें

बैसलें। रूप राहोनि संचलें २ न वार्जितां दाही दिशा। जिकडे पाहें तिकडे सरिसा ॥ ३ ॥ तुका ह्मणे समपर्दी। उभा दिठीचिये आधीं ४

॥ ३७१४ ॥

जयापासोनि सकळे। महीमंडळ हे झालें १ तो एक पंढरीचा राणा। अनुमाना श्रुतीसी ॥ २॥ विवादती जयासाठीं । जेगजेठी तो विठ्ठल ॥ ३ ॥ तुका ह्मणे तो आकळ । आहे सकळ व्यापक ॥ ४ ॥

॥ ३७१५ ॥

पाहा रे हें दैवत कैसें। भक्तिपिसें भाविक १ पाचारिल्या सारिसें पावे। ऐसी सवे बराडी ॥ २ ॥ शुष्ककाष्ठीं गुरगुरी। लाज हरि न धरीतां ॥ ३ ॥ तुका ह्मणे अर्धनारी। ऐसीं धरी रूपडीं ॥ ४ ॥

॥ ३७१६ ॥

आंत हरि बाहेर हरि। हरिनें घरीं कोंडिलें १ हरिनें कामा घातला चिरा। चित्तवरा मुकविलें २ हरिनें जीवें केली साटी। पाहिली तुटी सकळांसी ३ तुका म्हणे वेगळा नव्हे। हरि भोवे भोंवताला ॥ ४ ॥

॥ ३७१७ ॥

देव जाणता देव जाणता। आपलीया सत्ता एकाएकीं ॥१॥ देव चतुर देव चतुर। जाणोनि अंतर वर्ततसे ॥ २ ॥ देव निराळा देव निराळा। अलिप्त विटाळा तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ३७१८ ॥

ब्रह्म न लिंपे त्या मेळे। कर्माअकर्मा वेगळे ॥ १ ॥ तोचि एक तया जाणे। पावे अनुभविलें खुणें २ शौच अशौचाचे संधी। तन आला तना मधीं ३ पापपुण्या नाहीं ठाव। तुका म्हणे सहज भाव ॥ ४ ॥

॥ ३७१९ ॥

लक्षूनिया योगी पाहाती आभास। तें दिसे आम्हांस दृष्टी पुढें १॥
कर दोनी कटी राहिलासे उभा। सांवळी हे प्रभा अंगकांती ॥२॥
व्यापूनि वेगळें राहिलेंसे दुरी । सकळां अंतरीं निर्विकार ॥ ३ ॥
रूप नाहीं रेखा नामही जयासी। आपुल्या मनासीं शिव ध्यान ४॥
अंत नाहीं पार वर्णा नाहीं थार। कुळ याति शिर हस्त पाद ॥५॥
अचेत चेतलें भक्तीचिया सुखें। आपुल्या कौतुकें तुका म्हणे ॥६॥

॥ ३७२० ॥

तुझे वर्णू गुण ऐसी नाहीं मती। राहिल्या त्या श्रुती मौन्यपणें १॥
मौन्यपणें वाचा थोंटावल्या चारी। ऐसें तुझें हरी रूप आहे ॥ २ ॥
रूप तुझें ऐसें डोळा न देखावे। जेथें हें झकवे ब्रह्मादिक ॥ ३ ॥
ब्रह्मादिक देवां कर्माची कचाटी। म्हणोनि आटाटी फार त्यासी ४॥
तुका म्हणे तुझे गुण नाम रूप। आहेसी अमूप वाणूं काय ॥ ५ ॥

॥ ३७२१ ॥

तुज वर्णी ऐसा तुजविण नाहीं । दुजा कोणी तीहीं त्रिभुवनीं ॥१॥
सहस्रमुखें शेष सिणला बापुडा । चिरलिया धडा जिव्हा त्याचा २
अव्यक्ता अलक्षा अपारा अनंता । निर्गुणा सच्चिदानंदा नारायणा ३
रूप नाम घेसी आपुल्या स्वइच्छा । होसी भाव तैसा त्याकारणें ॥४॥
तुका म्हणे जरी दाविसी आपणा । तरिच नारायणा कळों येसी ५॥

॥ ३७२२ ॥

स्तुति करूं तरी नव्होचि या वेदां । तेथें माझा धंदा कोणीकडे॥१॥
परी हे वैखरी गोडावली सुखें । रसना रस मुखें इच्छीतसे ॥ २ ॥
रूप वर्णावया कोठें पुरे मती । रोमीं होती जाती ब्रह्मांडें हीं ॥ ३॥
तुका ह्मणे तूंच ऐसा एक साचा । ऐसी तंव वाचा जाली नाहीं ४॥

॥ ३७२३ ॥

ज्याचे गर्जतां पवाडे । श्रुतिशास्त्रां मौन्य पडे ॥१॥ तेथें माझी वाचा किती । पुरे करावया स्तुती ॥२॥ सिणलीं सहस्र तोंडें । शेषाफणीऐसें धेंडें ॥३॥ तुका ह्मणे मही । पत्र सिंधु न पुरे शाई ॥ ४ ॥

॥ ३७२४ ॥

आवडीसारिखें संपादिलें सोंग । अनंत हें मग जालें नाम ॥ १ ॥
कळे ऐशा वाटा रचिलया सुलभा । दुर्गम या नभाचाही साक्षी ॥२॥
हातें जेवीं एक मुखीं मागे घांस । माउली जयास तैसी बाळा ॥३॥
तुका ह्मणे माझें ध्यान विटेवरी । तैसीच गोजिरी दिसे मूर्ति ॥४॥

॥ ३७२५ ॥

जाणोनि नेणतें करीं माझें मन । तुझी प्रेमखूण देऊनिया ॥ १ ॥
मग मी व्यवहारीं असेन वर्तत । जेवीं जळा आंत पद्मपत्र ॥ २ ॥
ऐकोनि नाइकें निंदास्तुति कानीं । जैसा कां उन्मनी योगिराज ३॥
देखोनि न देखें प्रपंच हा दृष्टी । स्वप्नींचिया सृष्टि चेविल्या जेवीं ४
तुका ह्मणे ऐसें जालियावांचून । करणें तें तें सीण वाटतसे ॥ ५ ॥

॥ ३७२६ ॥

उपाधिवेगळे तुह्मी निर्विकार । कांहींच संसार तुम्हा नाहीं ॥ १ ॥
ऐसें मज करूनि ठेवा नारायणा । समूळ वासना नुरवावी ॥ २ ॥
निःसंग तुम्हांसी राहणें एकट । नाहीं कटकट साहों येत ॥ ३ ॥
तुका म्हणे नाहीं मिळों येत शिळा । रंगासी सकळा स्फटिकाची ४

॥ ३७२७ ॥

पडिला प्रसंग कां मी ऐसा नेणें । संकल्प ते मनें जिरवले ॥ १ ॥
चेष्टविलें तरी सांगावें कारण । भक्ती ते उजवण करावया ॥ २ ॥
लावूनिया दृष्टि घेतली सामोरी । बैसलें जिव्हारीं ठसोन तें ॥ ३ ॥
तुका ह्मणे जीवा लाविला तो चाळा । करावें गोपाळा शीघ्र दान ४

॥ ३७२८ ॥

प्रगट व्हावें हे अज्ञानवासना । माझी नाराय॰ा हीनबुद्धि ॥ १ ॥ खाणीवाणी होसी काष्ठीं तूं पाषाणीं । जंतु जीवजनीं प्रसिद्ध हा २॥ ज्ञानहीन तुज पाहे अल्पमति । लहान हा चित्तीं धरोनिया ॥ ३ ॥ परि तूं कृपाळ होसी देवराणा । ब्रीदें तुझीं जना प्रसिद्ध हें ॥ ४ ॥ उतावीळ बहु भक्तांचिया काजा । होसी केशीराजा तुका ह्मणे ॥५॥

॥ ३७२९ ॥

गायनाचे रंगीं । शक्ति अद्भुत हे अंगीं ॥ १ ॥ हें तों देणें तुमचे देवा । घ्यावी अखंडित सेवा ॥ २ ॥ अंगीं प्रेमाचें भरतें । नेघे उतार चढतें ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाणी । परम अमृताची खाणी ॥ ४ ॥

॥ ३७३० ॥

शेवटींची विनंती । ऐका ऐका कमळापती ॥१॥ काया वाचा मन । चरणीं असे समर्पण ॥ २ ॥ जीवपरमात्मा ऐक्यासि । सदा वसो हृदयेंसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । कंठीं वसावें केशवा ॥ ४ ॥

॥ ३७३१ ॥

आम्ही तरी आस । जालों टाकोनि उदास ॥ १ ॥ आतां कोण भय धरी । पुढें मरणाचें हरी ॥ २ ॥ भलते ठायीं पडों । देह तुरंगी हा चढो ३ तुमचें तुह्मांपाशीं । आम्ही आहों जैसीं तैसीं ४ गेले मानामान । सुखदुःखाचें खंडन ५ तुका ह्मणे चित्तीं । नाहीं वागवीत खंती ६

॥ ३७३२ ॥

आम्ही जाणों तुझा भाव । कैंचा भक्त कैंचा देव । बीजा नाहीं ठाव । कैंचें फळ सेवटीं ॥१॥ संपादिलें बहु रूप । कैंचें पुण्य कैंचें पाप । नव्हतों आम्ही आप । आपणाजी देखिलें ॥ २ ॥ एके ठायीं घरच्याघरीं । न कळतां जाली चोरी । तेथें तेचि दुरी । जाणें येणें खुंटलें ॥ ३ ॥ तुका म्हणे धरूनि हातीं । उरी ठेविली मागुती । एकांतीं लोकांतीं । देवभक्ति सोहळा ॥ ४ ॥

॥ ३७३३ ॥

भोगावरि आम्हीं घातला पाषाण । मरणा मरण आणियेलें ॥ १ ॥ विश्व तूं व्यापक काय मी निराळा । काशासाठीं बळा येऊं आतां२ काय सारूनिया काढावें बाहेरी । आणूनि भीतरी काय ठेवूं ॥ ३ ॥ केला तरि उरे शीणचि कोरडा । बळें घ्यावी पीडा स्वपनींची ॥४॥ आवघेचि वाण आले तुम्हां घरा । मजुरी मजुरा रोजकीर्दी ॥ ५ ॥ तुका म्हणे कांहीं नेणें लाभ हानी । असेल तो धनी राखो वाडा६॥

॥ ३७३४ ॥

तरुवर बीजा पोटीं । बीज तरुवरा शेवटीं ॥१॥ तैसें तुम्हां आम्हां

जालें । एकीं एक सामावलें ॥ २ ॥ उदकावरील तरंग । तरंग उदकाचें अंग ॥ ३ ॥ तुका म्हणे बिंबछाया । ठायीं पावली विलया ४

॥ ३७३५ ॥

क्षरला सागर गंगा ओघीं मिळे । आपणाचि खेळे आपणाशीं ॥१॥ मधील ते वाव अवघी उपाधि । तुम्हां आम्हांमधीं तेचि परी ॥२॥ मट मट झाले आकाशाचे पोटीं । वचनेंचि तुटी तेथेंचि तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे बीजें बीज दाखविलें । फळपुष्प आलें गेलें वाया ॥ ४ ॥

॥ ३७३६ ॥

दूरि तोंचि होतों आपुले आशंके । नव्हतें ठाउकें मूळभेद ॥ १ ॥ आतां जेथें तेथें येईन सांगातें । लपाया पुरतें ऊर्गो नेदीं ॥ २ ॥ मिथ्या मोहें मज लाविला उशीर । तरी हें अंतर झालें होतें ॥३॥ तुका ह्मणे कां रे दाखविसी भिन्न । लटिकाचि सीण लपंडाई ४ ॥

॥ ३७३७ ॥

लवण मेळवितां जळें । काय उरलें निराळें ॥ १ ॥ तैसा समरस झालों । तुजमाजी हरपलों २ अग्निकर्पुराच्या मेळीं । काय उरली काजळी ३ तुका ह्मणे होती । तुझी माझी एक ज्योती ॥ ४ ॥

॥ ३७३८ ॥

तुज मज नाहीं भेद । केला सहज विनोद ॥ १ ॥ तूं माझा आकार । मी तों तूंच निर्धार ॥२॥ मी तुजमाजी देवा । घेसी माझ्या अंगें सेवा ॥ ३ ॥ मी तुजमाजी अचळ । मजमाजी तूं सबळ ४ ॥ तूं बोलसी माझ्या मुखें । मी तों तुजमाजी सुखें ॥ ५ ॥ तुका ह्मणे देवा । विपरीत ठायीं नांवा ॥ ६ ॥

॥ ३७३९ ॥

तुज मज ऐसी परी । जैसे तरंग सागरीं १ दोहींमाजी एक जाणा। विठ्ठल पंढरीचा राणा ॥ २ ॥ देव भक्त ऐसी बोली । जंव भ्रांति नाहीं गेली ॥ ३ ॥ तंतु पट जेवीं एक । तैसा विश्वेंसीं व्यापक ४॥

॥ ३७४० ॥

जें जें कांहीं करितों देवा । तें तें सेवा समर्पे ॥ १ ॥ भेद नाहीं सर्वात्मना । नारायणा तुज मज ॥२॥ आह्मी दुजें नेणों कोणा । हेंचि मना मन साक्ष ॥ ३ ॥ तुका ह्मणे जगन्नाथा । हें अन्यथा नव्हे कीं ॥ ४ ॥

॥ ३७४१ ॥

रज्जु धरूनिया हातीं । भेडसाविलीं नेणतीं । कळों येतां चित्तीं । दोरी दोघां सारिखी ॥ १ ॥ तुह्मां आह्मांमध्यें हरी । झाली होती तैसी परी । मृगजळाचे पुरीं । ठाव पाहों तरावया ॥ २ ॥ सरी चिंताक भोंवरी । अळंकाराचिया परी । नामें झालीं दुरी । एक सोनें

आटितां ॥ ३ ॥ पिसांचीं पारवीं । करोनि बाजागिरी दावी । तुका ह्मणे तेवीं । मज नको चाळवूं ॥ ४ ॥

॥ ३७४२ ॥

खडा रवाळी साखर । झाला नामाचाचि फेर । न दिसे अंतर । गोडी ठायीं निवडितां ॥ १ तुह्मी आह्मी पांडुरंगा । भिन्न ऐसें काय सांगा । चाळविलें जगा । मी हें माझें यासाठीं ॥ २ ॥ पायीं हातीं नाकीं शिरीं । हेम राहे अळंकारीं । मुसे आल्यावरी । काय निवडे वेगळें ॥ ३ ॥ निजालिया लाभ हानी । तोंच खरी ते स्वप्नीं । तुका ह्मणे दोन्ही । निवारलीं जागतां ॥ ४ ॥

॥ ३७४३ ॥

अस्त नाहीं आतां एकचि मोहोरा । पासूनि अंधारा दुरि जालों १॥
साक्षत्वें या जालों गुणाचा देखणा । करी नारायणा तरी खरें ॥२॥
आठवें विसरु पडियेला मागें । आलें तेंचि भागें यत्न केलें ॥ ३ ॥
तुका म्हणे माझा विनोद देवासी । आम्ही तुम्हां ऐसीं दोन्ही नव्हे४

॥ ३७४४ ॥

धन्य मी मानीन आपुलें संचित । राहिलीसे प्रीत तुझे नामीं ॥ १ ॥
धन्य जालों आतां यासी संदेह नाहीं । न पडो या वाही काळा हातीं २
ब्रह्मरस करूं भोजन पंगती । संतांचे संगती सर्वकाळ ॥ ३ ॥
तुका म्हणे पोट धालेंचि न धाये । खादलेंचि खाये आवडीनें ॥४॥

॥ ३७४५ ॥

कासियानें पूजा करूं केशीराजा । हाचि संदेह माझा फेडी आतां १
उदकें न्हाणूं तरी स्वरूपचि तुझें । तेथें देवा माझें काय वेचे ॥२॥
गंधाचा सुगंध पुष्पाचा परिमळ । तेथें मी दुर्बळ काय वाहूं ॥ ३ ॥
वाहूं परी दक्षिणा धातु नारायणा । अन्न परब्रह्म तुजें नाहीं ॥ ४ ॥
गातो तो ओंकार टाळी नादेश्वर । नाचावया थार नाहीं कोठें ॥५॥
फळदाता तूंच तांबोल अक्षता । तेथें मी अनंता काय वाहूं ॥ ६ ॥
तुका म्हणे हरी सर्व तुझें नाम । धूप दीप रामकृष्णहरी ॥ ७ ॥

॥ ३७४६ ॥

कवणा पाषाणासी धरूनि भाव । कवणावरी पाव ठेवूं आतां ॥१॥
म्हणऊनि निश्चित राहिलों मनीं । तूंचि सर्वां खाणीं देखोनिया २॥
कवणाचें कारण नलगेचि कांहीं । सर्वां सर्वां ठायीं तूं मज एक
कायावाचामन ठेविलें तुझ्या पायीं । आतां उरलें कांहीं न दिसे देवा
जळें जळ काय धोवियलें एक । कवण तें पातक हरलें तेथें ॥ ५
पापपुण्य हे वासना सकळ । ते तुज समूळ समर्पिली ॥ ६
पितरस्वरूपी तूंचि जनार्दन । सव्य तें कवण अपसव्य ॥ ७
तुका म्हणे जीत पिंड तुम्हां हातीं । देऊनि निश्चिती मानियेली ।

॥ ३७४७ ॥

जन्ममरणांची विसरलों चिंता । तूं माझा अनंता मायबापा ॥ १ ॥
होतील ते डोळां पाहेन प्रकार । भय आणि भार निरसलीं ॥ २ ॥
लिगाडाचें मूळें होतीं पंचभूतें । त्यांचें या पुरतें विभागिलें ॥ ३ ॥
तुका ह्मणे झाला प्रपंच पारिखा । जिवासी तूं सखा पांडुरंगा ॥४॥

॥ ३७४८ ॥

वंदीन मी भूतें । आतां अवघींचि समस्तें ॥ १ ॥ तुमची करीन भावना । पदोपदीं नारायणा ॥ २ ॥ गाळुनिया भेद । प्रमाण तो ऐसा वेद ॥ ३ ॥ तुका ह्मणे मग । नव्हे दुजयाचा संग ॥ ४ ॥

॥ ३७४९ ॥

जेथें जेथें जाली । तेथें मजचि तूं पाहसी १ ऐसा पसरीन भाव । रिता नाहीं कोणी ठाव २ चित्त जडलें पायीं । पाळती हे ठायीं ठायीं ३ तुका ह्मणे पोटीं । देव घालुनि सांगें गोष्टी ॥ ४ ॥

॥ ३७५० ॥

आह्मी न देखों अवगुणां । पापी पवित्र शहाणा ॥ १ ॥ अवघीं रूपें तुह्मीं देवा । वंदूं भावें करूं सेवा २ मज भक्ती सवें चाड । नेणें पाषाण धातु वाड ३ तुका ह्मणे घोटीं । विष अमृत तुजसाटीं ४ ॥

॥ ३७५१ ॥

तुज करितां होती ऐसे । मूढ चतुर पंडित पिसे ॥ १ ॥ परि-धर्मे नेणे तें कोणी । पीडाखाणी भोगितील २ उलंघितें पांगुळ गिरी । मुकें करी अनुवाद ३ पापी होय पुण्यवंत । न करी घात दुर्जन ४ अवघें हेळामात्रें हरि । मुक्त करी ब्रह्मांड ॥ ५ ॥ तुका ह्मणे खेळे लीळा । पाहे वेगळा व्यापूनि ॥ ६ ॥

॥ ३७५२ ॥

कडसणी धरितां अडचणीचा टाव । ह्मणवुनि जीव त्रासलासे ॥१॥
लौकिकाबाहेरि राहिलों निराळा । तुजविण वेगळा नाहीं दुजा २ ॥
संकोचानें नाहीं होत धणीवरी । उरवूनि उरी काय काज ॥ ३ ॥
तुका ह्मणे केलें इच्छेचि सारिखें । नाहींसे पारिखें येथें कोणी ॥ ४ ॥

॥ ३७५३ ॥

अंतराय पडे गोविंदीं अंतर । जो जो घ्यावा भार तोचि बाधी ॥१॥
बैसलिये ठायीं आठवीन पाय । पाहीन तो ठाय तुझा देवा ॥ २ ॥
अखंड तें खंडें संकल्पी विकल्प । मनोजन्य पाप रज्जुसर्प ॥ ३ ॥
तुका ह्मणे विश्वीं विश्वंभर वसे । राहों ऐसे दशे सुखरूप ॥ ४ ॥

॥ ३७५४ ॥

माझिया वेशाची मज नाहीं चाड । कोठें करूं कोड आणिकांचें ॥१॥
इच्छितां ते मान मागा देवापासीं । असा संचितासी गुंपले हो॥२॥

देह आम्ही केला भोगाचे सांभाळीं । राहिलों निराळीं मानामाना ३
तुका ह्मणे कोणें वेचावें वचन । नसतां तो सीण वाढवावा ॥ ४ ॥

॥ ३७५५ ॥

बोळविला देह आपुलेनि हातें । हुताशिलीं भूतें ब्रह्माग्नीसीं ॥ १ ॥
एक वेळे झालें सकळ कारण । आतां नारायण नारायण ॥ २ ॥
आमृतसंजीवनी निववीली खाई । अंगें तये ठायीं हारपलीं ॥ ३ ॥
एकादशीविध जागरण उपवास । बारावा दिवस भोजनाचा ॥४॥
अवघीं कर्में झालीं घटस्फोटापाशीं । संबंध एकेसी उरला नामीं ५
तुका ह्मणे आतां आनंदीं आनंदु । गोविंदें गोविंदु विस्तारला ॥६॥

॥ ३७५६ ॥

नलगे मरावें । ऐसा ठाव दिला देवें ॥ १ ॥ माझ्या उपकारासाठीं । वागविला म्हूण कंठीं ॥ २ ॥ घरीं दिला ठाव । अवघा सकळही वाव ॥ ३ ॥ तुका ह्मणे एके ठायीं । कोठें माझें तुझें नाहीं ॥ ४ ॥

॥ ३७५७ ॥

एकाएकीं आतां असावेंसें वाटे । तरिच हे खोटे चाळे केले ॥ १ ॥
वाजवूनि तोंड घातलों बाहेरी । कुलप करुनी दारीं माजी वसा २
उजेडाचा केला दाटोनि अंधार । सर्वे हुद्देदार चेष्टविला ॥ ३ ॥
तुका ह्मणे भय होतें तोंचि वरी । होती कांहीं उरी स्वामिसेवा ४

॥ ३७५८ ॥

सोसोनि विपत्ती । जोडी दिली तुझे हातीं १ त्याचा हाचि उपकार । अंतीं आह्मांशीं वेव्हार २ नामरूपा केला ठाव । तुज कोण ह्मणतें देव ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरी । तुज ठाव दिला घरीं ॥ ४ ॥

॥ ३७५९ ॥

जेथें देखें तेथें उभा । अवघ्या गगनाचा गाभा १ डोळा बैसलें बैसलें । ध्यान राहोनि संचलें ॥ २ ॥ सरसावलें मन । केले सोज्वळ लोचन ॥ ३ ॥ तुका म्हणे सर्वें । आतां असिजेत देवें ॥ ४ ॥

॥ ३७६० ॥

हेंचि तुझी पूजा । आतां करीन केशीराजा ॥ १ ॥ अवघीं तुझींच पदें । नमस्कारीन अभेदें ॥ २ ॥ न वर्जित दिशा । जाय तेथेंचि सरसा ॥ ३ ॥ नव्हे एकदेशी । तुका ह्मणे संकल्पेसी ॥ ४ ॥

॥ ३७६१ ॥

वेठी ऐसा भाव । न करी आह्माच उपाव ॥ १ ॥ रूप डसवीन जीवा । अवघा येच ठायीं हेवा ॥२॥ कृपणाचे परी । लेखा पळ निमिषेवरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे असा संनिधाचि जगदिशा ॥ ४ ॥

॥ ३७६२ ॥

नेलें सळेंबळें । चित्ताचित्तांचें गांठोळें ॥ १ ॥ साक्ष झालीं परिच्या

घरीं । होतां ठायींच कुठेरी ॥२॥ मी पातलों या भावा । कपट तें नेणें देवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे उघडें केलें । माझें माझ्या हातें नेलें ४

॥ ३७६३ ॥

एका वेळे केलें रिते कलिवर । आंत दिली थार पांडुरंगा ॥ १ ॥
पाळण पोषण लागलें ते सोई । देहाचें तें काई सर्व भाव ॥ २ ॥
मोक्षिया मरणें झाली हे वसति । लागली ते ज्योती अविनाश ॥३॥
झाला ऐसा एका घायें येथें नाहीं । तुका ह्मणे कांहीं बोलों नये ४॥

॥ ३७६४ ॥

नटनाट्य तुह्मी केले याचसाठीं । कवतुकें दृष्टी निववावी ॥ १ ॥
नाहीं तरि काय कळलेंचि आहे । वाघ आणि गाय लांकडाची ॥२॥
अभेदचि असे मांडियेलें खेळा । केल्या दीपकळा बहुएकी ॥ ३ ॥
तुका ह्मणे रूप नाहीं दर्पणांत । संतोषाची मात दुसरी तें ॥ ४ ॥

॥ ३७६५ ॥

अज्ञान हा देह स्वरूपीं मिनला । सर्व वोसावला देहपात ॥ १ ॥
ज्ञानस्वरूपाची सांगड मिळाली । अंतरीं पाहिली ज्ञानज्योति ॥ २॥
तुका ह्मणे चित्त स्वरूपीं राहिलें । देह विसावलें तुझ्या पायीं ॥३॥

॥ ३७६६ ॥

मुसावलें अंग । रंगीं मिळविला रंग ॥ १ ॥ एकीं एक दृढ झालें । मुळा आपुलिया आलें ॥ २ ॥ सागरीं थेंबुटा । पडिल्या निवडे कोण्या वाटा ॥ ३ ॥ तुका ह्मणे नवें । नव्हे जाणावें हें देवें ॥ ४ ॥

॥ ३७६७ ॥

तुझे पाय माझे राहियेले चित्तीं । ते मज दाविती वर्म देवा ॥ १ ॥
आम्हां अंधा तुझ्या पायांचा आधार । जाणसी विचार चालविता २
मन स्थिर टेलें इंद्रियें निश्चळ । हें तो माझें बळ नव्हे देवा ॥ ३ ॥
पापपुण्य भेद नासिलें तिमिर । त्रिगुण शरीर सांडियेलें ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुझा प्रताप हा खरा । मी जाणें दातारा शरणागत ॥५॥

॥ ३७६८ ॥

जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरूनिया १॥
चालों वाटे आम्ही तुझाचि आधार । चालविसी भार सवें माझा २॥
बोलों जातां बरळ करिसी तें नीट । नेली लाज धीट केलों देवा ३ ॥
अवघे जन मज झालें लोकपाळ । सोइरे सकळ प्राणसखे ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां खेळतों कौतुकें । झालें तुझें सुख अंतर्बाहीं ॥ ५ ॥

॥ ३७६९ ॥

रूपीं जडले लोचन । पायीं स्थिरावलें मन ॥ १॥ देहभाव हरपला । तुज पाहातां विठ्ठला ॥२॥ कळों नेदी सुखदुःख । तहान हरपली भूक ॥ ३ ॥ तुका म्हणे नव्हे परती । तुझ्या दर्शनें मागुती ॥ ४ ॥

॥ ३७७० ॥

तेव्हां होतों भोगाधीन । तुह्मां भिन्न पासुनि ॥ १ ॥ आतां बोलों नये ऐसें । अनारिसे वेगळें ॥ २ ॥ सन्मुख जालों स्वामीकडे । भव आंगडे निराळें ३ चिंतिलें तें चिन्तामणी । फिटे धणी तो द्यावें ४॥ सहज स्थिति आहे अंगीं । प्रसंगीं ते वचना ॥ ५॥ तुमची देवा धरिली कास । केला नास प्रपंचा ॥ ६ ॥ तुका म्हणे जाणोनि वर्म । कर्माकर्म ठेविलीं ॥ ७ ॥

॥ ३७७१ ॥

देव सखा आतां केलें नव्हे काई ॥ तेणें सकळही सोइरींच ॥ १ ॥
भाग्यवंत झालों गोतें सपुरतीं । आतां पुण्य नीती पार नाहीं ॥२॥
पाहातां दिसती भरलिया दिशा । ठसावला ठसा लोकत्रयीं ॥३॥
अविनाश जोडी आम्हां भाग्यवंता । झाली होती सत्ता संचितांची४
पायांवरी डोई ठेवाया आरोथा । झाली द्यावी सत्ता क्षेम ऐसी ५॥
तुका ह्मणे जीव पावला विसावा । म्हणवितां देवा तुमचीसीं ॥६ ॥

॥ ३७७२ ॥

करूनि उचित खेळें भोंवतालें । चित्त येथें आलें पायांपाशीं ॥ १ ॥
येथें नाहीं खोटा चालत परिहार । जाणसी अंतर पांडुरंगा ॥ २ ॥
सुख दुःख तुज देऊनि सकळ । नाहीं ऐसा काळ केला आम्हीं ॥३॥
तुका ह्मणे झाला देहाचा विसर । आतां आप पर नाहीं कोणी ॥४॥

॥ ३७७३ ॥

तेणें सुखें माझें निवालें हें अंग । विठ्ठल हें जग देखियेलें ॥ १ ॥
कवतुकें करुणा भाकितसे लाडें । आवडी बोबडें बोलोनिया ॥२॥
मज नाहीं दशा अंतरीं दुःखाची । भावना भेदाची समूळ गेली ३
तुका ह्मणे सुख झालें माझ्या जीवा । रंगलें केशवा तुझ्या रंगें ॥ ४ ॥

॥ ३७७४ ॥

दिला जीव भाव । तेव्हां सांडिला म्यां ठाव ॥ १ ॥ आतां वर्ते तुझी सत्ता । येथें सकळ आनंता ॥ २ ॥ माझिया मरणें तुझी बैसविलें ठाणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । मीं हें माझें येथें नाहीं ॥ ४ ॥

॥ ३७७५ ॥

आपुलिया काजा । आह्मीं सांडियेली लाजा ॥ १ ॥ तुह्मां असों जागवीत । आपुलिये हातीं हित ॥ २ ॥ तुह्मी देहशून्य । आह्मां कळे पापपुण्य ॥ ३ ॥ सांगायासी लोकां । उरउरीत उरला तुका ॥ ४ ॥

॥ ३७७६ ॥

पदोपदीं दिलें अंग । झालें सांग कारण ॥ १ ॥ रुधवूनि ठेलों ठाव । जागा वाव सकळ ॥ २ ॥ पुढती चाली मना लाहो । वाढे देहो संतोष ॥ ३ ॥ तुका ह्मणे क्षरभागीं । जालों जगीं व्यापक ॥ ४ ॥

॥ ३७७७ ॥

तुझें अंगभूत । आह्मी जाणतों समस्त ॥ १ ॥ येरा वाटतसे जना । गुढारसें नारायणा ॥ २ ॥ ठावा थारा मारा । घरचिया संव चोरा ॥ ३ ॥ तुका ह्मणे भेदा । करूनि करितों संवादा ॥ ४ ॥

॥ ३७७८ ॥

नाहीं मज कोणी उरला दुर्जन । मायबापाविण ब्रह्मांडांत ॥ १ ॥
कासया जिकीर करणें येविसीं । भयची मानसीं चिंता खंतीं २ ॥
विश्वंभराचिये लागलों सांभाळीं । संत नेती चाली आपुलिया ३ ॥
तुका ह्मणे माझें पाळणपोषण । करितां आपण पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ३७७९ ॥

श्रमपरिहारा । मूळ हें जालें दातारा ॥ १ ॥ देह निवेदूनि पायीं । जालों रिकामा उतराई ॥ २ ॥ आपली ते सत्ता । येथें असों नेदीं आतां ॥ ३ ॥ राहिला निराळा । तुका कटकटे वेगळा ॥ ४ ॥

॥ ३७८० ॥

मनाचिये साक्षी जाली सांगों मात । सकळ वृत्तांत आपला तो १॥
तुह्मां परामर्शे घेणें सत्ताबळें । धरितां निराळें कैसीं वांचों ॥ २ ॥
मी माझें सांडून यावया पसारा । आणीक दातारा काय काज ३ ॥
तुका म्हणे आह्मी तुजविण एका । निढळ लौकिका माजी असों ४॥

॥ ३७८१ ॥

पंचभूतांचिये सांपडलों संदीं । ठाकलोंसें बंदीं अहंकारें ॥ १ ॥
आपुला आपण बांधविला गळा । नेणोंचि निराळा असता ही ॥२॥
कासया हा सत्य मानिला संसार । कां हे केले चार माझें माझें ३
कां नाहीं शरण गेलों नारायणा । कां नाहीं वासना आवरिली ४॥
किंचित सुखाचा धरिला अभिलाश तेणें केला नाश बहु पुढें ॥५॥
तुका ह्मणे आतां देह देऊं बळी । करुनि सांडूं होळी संचिताची ६

॥ ३७८२ ॥

स्थिरावली वृत्ति पांगुळला प्राण । अंतरींची खूण पावूनिया ॥१॥
पुंजाळले नेत्र झाले अर्धोन्मीळित । कंठ सद्गदित रोमांच आले २ ॥
चित्त चाकाटलें स्वरूपामाझारी । न निघे बाहेरी सुखावलों ॥ ३ ॥
सुनीळ प्रकाश उदैजला दिन । अमृताचें पान जीवनकळा ॥ ४ ॥
शशिसूर्या झाली जीवें ओंवाळणी । आनंदा दाटणी आनंदाची ५॥
तुका म्हणे सुखें प्रेमेंसी डुलत । वीरालों निश्चित निश्चितीनें ॥६॥

॥ ३७८३ ॥

देवासी लागे सकळांसी पोसावें। आम्हां नलगे खावें काय चिंता १
देवासी विचारावें लागे पापपुण्य । आम्हासी हें जन अवघें भलें २

देवासी उत्पत्ति लागला संहार । आम्हां नाहीं फार थोडें कांहीं ३
देवासी काम लागला धंदा । आम्हासी ते सदा रिकामीक ॥ ४ ॥
तुका ह्मणे आम्ही भले देवाहून । विचारितां गुण सर्वभावें ॥ ५ ॥

॥ ३७८४ ॥

आतां मी सर्वथा नव्हें गा दुर्बळ । यातिहीन कूळ दैन्यवाणा ॥ १ ॥
माय रखुमाई पांडुरंग पिता । शुद्ध उभयतां पक्ष दोन्ही ॥ २ ॥
बापुडा मी नव्हें दुर्बळ ठेंगणा । पांगिला हा कोणा आणिकांसी ३
दुष्ट नव्हों आम्ही अभागी अनाथ । आमुचा समर्थ कैवारी हा ४॥
संवसार आम्हां सरला सकळ । लपोनिया काळ ठेला धाकें ॥ ५ ॥
तुका म्हणे झालों निर्भर मानसीं जोडलिया रासी सुखाचिया ६ ॥

॥ ३७८५ ॥

माझे मनोरथ पावले जे सिद्धी । तई पायीं बुद्धि स्थिरावली ॥१॥
समाधान जीव राहिला निश्चळ । गेली हळहळ स्मरणें हे ॥ २ ॥
त्रिविध तापाचें झालेंसे दहन । सुखावलें मन प्रेमसुखें ॥ ३ ॥
महालाभ वाचे वसे पांडुरंग । अंगाअंगीं संग अखंडित ॥ ४ ॥
जीवनाचा झाला ओलावा अंतरीं । विश्व विश्वंभरीं सामावलें ५॥
तुका म्हणे माप भरी आले सिगे । धारबोळ गंगे पूर वाहे ॥ ६ ॥

॥ ३७८६ ॥

स्वप्नींचिया गोष्टी । मज धरिलें होतें वेठी । झालिया सेवटीं । जागे लटिकें सकळ ॥ १ ॥ वाया भाकिली करुणा । मूळ पावावया सिणा । राव रंक राणा । कैचे स्थानावरी आहे ॥ २ ॥ सोसिलें तें अंगें । खरें होतें नव्हतां जागें । अनुभवही सांगे । दुःखें डोळे उघडिले ॥ ३ ॥ तुका ह्मणे संतीं । सावचित केलें अंतीं । नाहीं तरी होती । टाळी बैसोनि राहिली ॥ ४ ॥

॥ ३७८७ ॥

निंदी कोणी मारी । वंदी कोणी पूजा करी ॥ १ ॥ मज हेंही तेही नाहीं । वेगळा दोहींपासूनी ॥ २ ॥ देहभोग भोगें घडे । जें जें जोडे तें तें बरें ॥ ३ ॥ अवघें पावे नारायणीं । जनार्दनीं तुकयाचें ॥ ४ ॥

॥ ३७८८ ॥

जन विजन झालें आह्मां । विठ्ठलनामाप्रमाणें ॥१॥ पाहें तिकडे बापमाय । विठ्ठल आहे रखुमाई ॥२॥ वन पट्टण एकभाव । अवघा ठाव सरता झाला ॥३॥ आठव नाहीं सुखदुःखा । नाचे तुका कवतुकें ४॥

॥ ३७८९ ॥

माझिया मीपणा । झाला यावरी उगाणा ॥ १ ॥ भोगी त्यागी पांडुरंग । त्यानें वसविलें अंग ॥ २ ॥ टाळिलें निमित्त । फार थोडें घात हित ॥ ३ ॥ यावें कामावरी । तुका ह्मणे नाहीं उरी ॥ ४ ॥

॥ ३७९० ॥

न देखोन कांहीं । म्यां पाहिलें सकळही १ झालों अवघियापरी । मी हें माझें ठेलें दुरी २ न घेतां घेतलें । हात पाय उसंतिलें ३ खादलें न खातां । रसना रस झाली घेतां ४ न बोलोनि बोलें । केलें प्रगट झांकिलें ५ नाइकिलें कानीं । तुका ह्मणे आलें मनीं ६

॥ ३७९१ ॥

मीझें माझ्या हाता आलें । आतां भलें सकळ ॥१॥ काशासाटीं विषम थारा । तो अंतरा विटाळ ॥२॥ झालीं तया दुःखें तुटी । मागिल पोटीं नसावें ॥३॥ तुका ह्मणे शुद्ध कूळ । तेथें मळ काशाचा ॥ ४ ॥

॥ ३७९२ ॥

पंधरा दिवसांमाजी साक्षात्कार झाला । विटोबा भेटला निराकार १ भांबगिरिपाठारीं वस्ति जाण केली । वृत्ति थिरावली परब्रह्मीं २॥ निर्वाण जाणोनि आसन घातलें । ध्यान आरंभिलें देवाजीचें ३ ॥ सर्प विंचू व्याघ्र आंगासी झोंबले । पीडूं जे लागले सकळिक ४ ॥ दीपकीं कर्पूर कैसा तो विराला । तैसा देह जाला तुका म्हणे ५ ॥

॥ ३७९३ ॥

पांडुरंगें सत्य केला अनुग्रह । निरसोनि संदेह बुद्धिभेद ॥ १ ॥ जीवशिवा सेज रचिली आनंदें । आउठावे पदीं आरोहण ॥ २ ॥ निजीं निजरूपीं निजविला तुका । अनुहतें बाळका हल्लरु गाती ३॥

॥ ३७९४ ॥

निरंजनीं आह्मी बांधियेलें घर । निराकारीं निरंतर राहिलों आम्ही १ निराभासीं पूर्ण झालों समरस । अखंड ऐक्यास पावलों आम्ही २ ॥ तुका म्हणे आतां नाहीं अहंकार । झालों तदाकार नित्य शुद्ध ३ ॥

॥ ३७९५ ॥

रक्त श्वेत कृष्ण पीत प्रभा भिन्न । चिन्मय अंजन सुदलें डोळां १॥ तेणें अंजनगुणें दिव्यदृष्टि झाली । कल्पना निवाली द्वैताद्वैत २ ॥ देशकालवस्तु भेद मावळला । आत्मा निर्वाळला विश्वाकार ॥३ ॥ न झाला प्रपंच आहे परब्रह्म । अहंसोहं ब्रह्म आकळलें ॥ ४ ॥ तत्त्वमसि विद्या ब्रह्मानंद सांग । तेंचि झाला अंगें तुका आतां ५ ॥

॥ ३७९६ ॥

बीज भाजुनि केली लाही । आह्मां जन्ममरण नाहीं ॥ १ ॥ आकारासी कैंचा ठाव । देह प्रत्यक्ष जाला देव ॥२॥ साकरेचा नव्हे ऊंस । आह्मां कैंचा गर्भवास ३ तुका ह्मणे अवघा जग । सर्वां घटीं पांडुरंग ४॥

॥ ३७९७ ॥

पिकलिये सेंदे कडुपण गेलें । तैसें आह्मां केलें पांडुरंगें ॥ १ ॥ काम क्रोध लोभ निमाले ठायींचि । सर्व आनंदाची सृष्टि जाली २

आठव नाठव गेले भावाभाव। जाला स्वयमेव पांडुरंग ॥ ३ ॥
तुका ह्मणे भाग्य या नांवें ह्मणीजे । संसारीं जन्मीजे याचि लागीं ४

॥ ३७९८ ॥

सदा नामघोष करूं हरिकथा । तेणें सदा चित्ता समाधान ॥ १ ॥
सर्वसुख ल्यालों सर्व अलंकार । आनंदें निर्भर डुलतसों ॥ २ ॥
असों ऐसा कोठें आठवही नाहीं । देहींच विदेही भोगूं दशा ॥ ३ ॥
तुका ह्मणे आम्ही जालों अग्निरूप । लागों नेदूं पापपुण्य अंगा ४॥

॥ ३७९९ ॥

पुण्यपापा ठाव नाहीं सुखदुःखा । हानि लाभ शंका नासलिया १॥
जितां मरण आलें आप पर गेलें । मूळ छेदियेले संसाराचें ॥ २ ॥
अधिकार जाती वर्णधर्मयाती । ठाव नाहीं सत्य असत्याशीं ॥ ३ ॥
जनं वन भिन्न अचेत चळण । नाहीं दुर्जेपण ठाव यासी ॥ ४ ॥
तुका ह्मणे देह वाहिला विठ्ठलीं । तेव्हांच घडली सर्व पूजा ॥ ५ ॥

॥ ३८०० ॥

भोगीं जाला त्याग । गीतीं गातां पांडुरंग । इंद्रियांचा लाग । आह्मां वरूनि चुकला ॥ १ ॥ करूनि ठेविलों निश्चळ । भय नाहीं तळमळ । घेतला सकळ । अवघा भार विठ्ठलें ॥ २ ॥ तर्ळी पक्षिणीचे परी । नखें चोंची चारा धरी । आणुनिया घरीं । मुखीं घाली बाळका ॥ ३ ॥ तुका ह्मणे ये आवडी । आह्मी पायीं दिली बुडी । आहे तेथें जोडी । जन्मांतरींचें ठेवणें ॥ ४ ॥

॥ ३८०१ ॥

पडिलों बाहेरि आपुल्या कर्तव्यें । संसाराचा जीवें वीट आला ॥१॥
एकामध्यें एक नाहीं मिळों येत । ताक नवनीत निवडलिया ॥ २ ॥
दोनी झालीं नांवें एकाच्या मथनें । भुस सार गुणें वेगळालीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे कोठें वसे मुक्ताफळ । सिंपल्याचें स्थळ खंडलिया ॥ ४ ॥

॥ ३८०२ ॥

बहुतां दिसांची आजि झाली भेटी । झाली होती तुटी काळगती १
येथें सावकाश घेईन ते धणी । गेली अडचणी उगवोनि ॥ २ ॥
बहु दुःख दिलें होतें घरीं कामें । वाढला हा श्रमें श्रम होता ३ ॥
बहु दिस होता पडिला मारग । क्लेशाचा त्या त्याग आजि झाला४
बहु होती केली सोंगसंपादणी । लौकिकापासूनि निगमलें ॥ ५ ॥
तुका म्हणे येथें झालें अवसान । परमानंदीं मन विसावलें ॥ ६ ॥

॥ ३८०३ ॥

न मनावी चिंता । कांहीं माझेविशीं आतां ॥ १ ॥ ज्यानें लौकिक हा केला । तो हें निवारिता भला ॥ २ ॥ माझे इच्छे काय । होणार ते एक ठाय ॥ ३ ॥ सुखा आणि दुःखा । ह्मणे वेगळा मी तुका । ४ ॥

॥ ३८०४ ॥

आम्ही मेलों तेव्हां देह दिला देवा । आतां करूं सेवा कोणाची मी १
सूत्रधारी जैसा हालवितो कळा । नाचतो पुतळा नाचे छंदें ॥ २ ॥
बोलतसे जैसे बोलवितो देव । नाहीं हा संदेह कासयाचा ॥ ३ ॥
पाप पुण्य ज्याचे तोचि जाणे कांहीं । संबंध हा नाहीं आम्हांसवे ॥४॥
तुका ह्मणे तुम्ही आइका हो मात । आम्ही या अतीत देहाहूनी ॥ ५ ॥

॥ ३८०५ ॥

आपुले मरण पाहिले म्यां डोळां । तो झाला सोहळा अनुपम्य ॥ १ ॥
आनंदें दाटलीं तिन्ही त्रिभुवनें । सर्वात्मकपणें भोग झाला ॥ २ ॥
एकदेशी होतो अहंकारें आथिला । त्याच्या त्यागें झाला सुकाळ हा ३
फिटलें सुतक जन्ममरणाचें । मी माझ्या संकोचें दुरी झालों ॥४॥
नारायणें दिला वसतीस ठाव । ठेवूनिया भाव ठेलों पायीं ॥ ५ ॥
तुका ह्मणे दिले उमटूनि जगीं । घेतलें तें अंगीं लावूनिया ॥ ६ ॥

॥ ३८०६ ॥

मरण माझें मरोन गेलें । मज केलें अमर ॥१॥ ठाव पुसिलें बुड पुसिलें । वोस वोसलें देहभावा ॥२॥ आला होता गेला पुर । धरिला धीर जीवनीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे बुनादीचें । झालें साचें उजवणें ॥४॥

॥ ३८०७ ॥

जगा काळ खाय । आह्मी माथां दिले पाय ॥ १ ॥ नाचों तेथें उभा राहे । जातां व्यंग करी साहे ॥ २ ॥ हरिच्या गुणें घाला । होता खाताचि भुकेला ॥ ३ ॥ तुका ह्मणे हळू । झाला कढत शितळू ॥ ४ ॥

॥ ३८०८ ॥

हातीं घेऊनिया काठी । तुका लागला कळिवरा पाठी ॥ १ ॥
नेऊनि निजविलें स्मशानीं । माणसें जाळीं ते ठाकणीं ॥ २ ॥
काढिले ते ओढे । मागील उपचाराचे पुढें ३ नाहीं याटों आला भेव । सुख दुःख भोगिता देव ४ याजसाठीं हें निर्वाण । केलें कसियेलें मन ५ तुका ह्मणे अनुभव खरा । नाहीं तरी शास्त होय चोरा ६

॥ ३८०९ ॥

मरणा हातीं सुटली काया । विचारें या निश्चयें १ नासोनिया गेली खंती । सहजस्थिति भोगाचे ॥२॥ न देखेसें झाले श्रम । आलें वर्म हातां हें ॥ ३ ॥ तुका ह्मणे कैची कींव । कोठें जीव निराळा ॥ ४ ॥

॥ ३८१० ॥

झाला प्रेतरूप शरीराचा भाव । लक्षियेला ठाव स्मशानींचा ॥ १ ॥
रडती रात्रंदिवस कामक्रोध माया । म्हणती हायहाया यमधर्म २॥
[illegible] शेणी लागल्या शरीरा । ज्ञानाग्नि भरभरां जीवित्वेंसी ३
फिरविला घट फोडिला चरणीं । महावाक्य ध्वनीं बोंब झाली ४॥

दिली तिळांजुळी कुळनाम रूपासी। शरीर ज्याचे त्यासी समर्पिलें ५
तुका म्हणे रक्षा झाली आपींआप। उजळीला दीप गुरुकृपा ॥ ६ ॥

॥ ३८११ ॥

कोण आतां कलिकाळा। येऊं बळा देईल ॥१॥ सत्ता झाली त्रिभु-
वनीं। चक्रपाणी कोंवसा ॥ २ ॥ लडिवाळांचा भार वाहे। उभा
आहे कुडावया ३ तुका ह्मणे घटिका दिस। निमिषही न विसंबे ॥४॥

॥ ३८१२ ॥

आह्मां शरणागता। एवढी काय करणें चिंता ॥ १ ॥ परि हे कौतु-
काचे खेळ। अवघे पाहातों सकळ ॥ २ ॥ अभयदानवंदें। आम्हां
कैंचीं भयद्वंद्वें॥३॥ तुका म्हणे आम्ही। हरिजन साधनाचे स्वामी४

॥ ३८१३ ॥

अणुरणीयां थोकडा। तुका आकाशाएवढा ॥ १ ॥ गिळुनि सांडिलें
कलिवर। भवभ्रमाचा आकार ॥ २ ॥ सांडिली त्रिपुटी। दीप उज
ळला घटीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां। उरलों उपकारापुरता ॥ ४ ॥

॥ ३८१४ ॥

संचित प्रारब्ध क्रियमाण। अवघा जाला नारायण ॥१॥ नाहीं आ-
म्हांसी संबंधु। जरा मरण कांहीं बाधु ॥२॥ द्वैताद्वैतभावें। अवघें
व्यापियेलें देवें ॥३॥ तुका म्हणे हरि। आम्हांमाजी क्रीडा करी४॥

॥ ३८१५ ॥

पिंडदान पिंडें ठेविलें करून। तिळीं तिळवण मूळत्रयीं ॥ १ ॥
सारिले संकल्प एकाचि वचनें। ब्रह्मीं ब्रह्मार्पण सेवटींच्या ॥ २ ॥
सव्य अपसव्य बुडालें हें कर्म। एका एकी धर्म एकोविष्णु ॥ ३ ॥
पित्यापुत्रत्वाचें झालें अवसान। जनीं जनार्दन अभेदेसी ॥ ४ ॥
आहे तैसी पूजा पावली सकळ। सहज तो काळ सारियेला ॥५॥
तुका ह्मणे केला अवघ्यांचा उद्धार। आतां नमस्कार सेवटींचा ६॥

॥ ३८१६ ॥

नभोमय जाले जळ। एकीं सकळ हरपलें १ आतां काय सारासारी।
त्याच्या लहरी तयांत ॥ २ ॥ कैंचा तेथ याचा सांडी। आप कोंडी
आपणा ॥ ३ तुका म्हणे कल्प झाला। अस्त गेला उदयो ॥ ४ ॥

॥ ३८१७ ॥

उद्वेगाची धांव बैसली आसनीं। पडिले नारायणीं मोटळें हें ॥१॥
सकळ निश्चिंती झाली हा भरंवसा। नाहीं गर्भवासा येणें ऐसा २
आपुलिया नांवें नाहीं आह्मां जिणें। अभिमान तेणें नेला देवें ३ ॥
तुका ह्मणे चळे एकाचिया सत्ता। आपुलें मिरवितां पणें ऐसें ४ ॥

॥ ३८१८ ॥

सहज लीळा मी साक्षी याचा। नये वंचूं वाचा ऐसें झालें ॥ १ ॥
उपक्रमें वदे निशब्दाची वाणी। जे कोठें बंधनीं गुंपो नेणें ॥ २ ॥

तम नासी परि वेव्हारा वेगळा । रविप्रभाकळा वर्ते जन ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें गेला अतिशय । आतां पुन्हा नये तोंड दावूं ॥ ४ ॥

॥ ३८१९ ॥

भयाची तो आह्मां चित्तीं । राहो खंती शकेना ॥ १ ॥ समर्पिलों जीवें भावें । काशा भ्यावें कारणें ॥ २ ॥ करीन तें कवतुकें । अवघें निकें भोभेल ॥ ३ ॥ तुका ह्मणे माप भरूं । दिस सारूं कवतुकें ॥ ४ ॥

॥ ३८२० ॥

इहलोकीं आह्मां वस्तीचें पेणें । उदासीन तेणें देहभावीं ॥ १ ॥ कार्यो पुरतें कारण मारगीं । उल्लंघूनि वेगीं जावें स्थळा ॥ २ ॥ सोंग संपादणी चालवितों वेव्हार । अत्यंतीं आदरें नाहीं गोवा ३॥ तुका ह्मणे वेंच लाविला संचिता । होइल घेतां देतां लाभ कोणा ४

॥ ३८२१ ॥

नाहीं आह्मां शत्रु सासुरें पिशुन । दाटलें हें घन माहियेर ॥ १ ॥ पाहें तेथें पांडुरंग रखुमाई । सत्यभामा राही जननिया ॥ २ ॥ लज्जा भय कांहीं आह्मां चिंता नाहीं । सर्वसुखें पायीं वोळगती ३ तुका ह्मणे आह्मी सदैवाचीं बाळें । झालों लडिवाळें सकळांचीं ४ ॥

॥ ३८२२ ॥

शुभ जाल्या दिशा अवघाचि काळ । अशुभ मंगळ मंगळाचें ॥ १ ॥ हातींचिया दीपें दुराविली निशी । न देखिजे कैसी आहे तेही २॥ सुख दुःखाहूनि नाहीं विपरीत । देतील आघात हितफळें ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां आह्मांसी हे भलें । अवघेचि झाले जीव जंत ४ ॥

॥ ३८२३ ॥

जालें पीक आह्मां अवघा सुकाळ । घेऊं अवघा काळ प्रेमसुख १ ॥ झाली अराणुक अवघियांपासून । अवघा गेला सीणभाग आतां २॥ अवघा झाला आह्मां एक पांडुरंग । आतां नाहीं जग माझें तुझें ३॥ अवघेचि आह्मी ल्यालों अळंकार । शोभलोंहि फार अवघ्यांवरी ४ तुका ह्मणे आह्मी सदैवाचे दास । करणें नलगे आस आणिकांची५

॥ ३८२४ ॥

आनंदाच्या कोटी । सांठवल्या आम्हां पोटीं ॥ १ ॥ प्रेम चालिला प्रवाहो । नामओघ लवलाहो ॥ २ ॥ अखंड खंडेना जीवन । राम कृष्ण नारायण ॥३॥ थडी आहिक्य परत्र । तुका ह्मणे सम तीर ४

॥ ३८२५ ॥

संचितचि खावें । पुढें कोणाचें न घ्यावें ॥ १ ॥ आतां पुरे हे चाकरी । राहों बैसोनिया घरीं ॥ २ ॥ नाहीं काम हातीं । आराणुक दिवसराती ॥३॥ तुका ह्मणे सत्ता । पुरे पराधीनता आतां ॥ ४ ॥

॥ ३८२६ ॥

आतां बरें जालें । माझे माथांचें निघालें ॥ १ ॥ चुकली हे

मरमर । भार माथांचे डोंगर ॥ २ ॥ नसतां कांहीं जोडी । करिती बहुतें तडातोडी ॥३॥ जाला झाडापाडा । तुका ह्मणे गेली पीडा ४॥

॥ ३८२७ ॥

भावाचिया बळें । आह्मी निर्भर दुर्बळें ॥ १ ॥ नाहीं आणिकांची सत्ता । सदा समाधान चित्ता ॥ २ ॥ तर्का नाहीं ठाव । येथें रिघावया वाव ॥३॥ एकछत्री राज । तुक्या पांडुरंगीं काज ॥ ४ ॥

॥ ३८२८ ॥

घालों सुखें ढेंकर देऊं । उमटे जेवूं तोंवरी १ क्रीडा करूं निरंजनीं । न पुरे धणी हरिसवें ॥ २ ॥ अवघें खेळों अवघ्यामधीं । डाईं न पडों ऐसी बुद्धि ॥३॥ तुका ह्मणे वांचविता । आह्मां सत्ता समर्थ ॥४॥

॥ ३८२९ ॥

आमचा स्वदेश । भुवनत्रयामध्यें वास ॥ १ ॥ मायबापाची लाडकीं । कळों आलें हें लौकिकीं ॥ २ ॥ नाहीं निपराद । कोणां आह्मांमध्यें भेद ॥३॥ तुका ह्मणे नाम । अवघें आमचें हें धाम ॥४॥

॥ ३८३० ॥

विषयीं विसर पडिला निःशेष । अंगीं ब्रह्मरस ठसावला ॥ १ ॥ माझी मज झाली अनावर वाचा । छंद या नामाचा घेतलासे ॥ २॥ लाभाचिसा सोसें पुढें चालें मन । धनाचा कृपण लोभी जैसा ॥३॥ तुकां ह्मणे गंगा सागरसंगमीं । अवघ्या झाल्या ऊर्मि एकमय ॥ ४ ॥

॥ ३८३१ ॥

तान्हे तान्ह प्याली । भूक भुकेनें खादली ॥१॥ जेथें तेंच नाहीं झालें । झाडा घेतुला विठ्ठलें ॥ २ ॥ वास वासनेसी नाहीं । मन पांगुळलें पायीं ॥ ३ ॥ शेष उरला तुका । जीवीं जीवा झाला चुका ॥ ४ ॥

॥ ३८३२ ॥

घटीं अलिप्त असे रवि । आग्नि काष्ठामाजी जेवी । तैसा नारायण जीवीं । जीवसाक्षी वर्तनें ॥ १ ॥ भोग ज्याचे तया अंगीं । भिन्न प्रारब्ध जगीं । विचित्र ये रंगीं । रंगें रंगला गोसावी ॥ २॥ देह संकल्पासारिखें । एक एकांसी पारिखें । सुख आणि दुःखें । अंगीं कर्मे त्रिविध ॥ ३ ॥ तुका ह्मणे कोडें । न कळे तयासी सांकडें । त्याचिया निवाडें । उगवे केलें विदान ॥ ४ ॥

॥ ३७३३ ॥

आम्ही क्षेत्रीचे संन्यासी । देहभरित हृषीकेशी । नाहीं केली ऐशी । आशाकामबोहरी ॥ १ ॥ आलें अयाचित अंगा । सहज तें आम्हां भागा । दाता पांडुरंगा । ऐसा करितां निश्चिती ॥ २ ॥ दंड धारिला दंडायमान । मुळीं मुंडिलें मुंडण । बंदीं बंदाचा कौपीन । बहिरवास औठडें ॥ ३ ॥ काळें साधियेला काळ । मन करूनि नि-

श्चळ । लौकिकीं विटाळ । धरूनि असों एकांत ॥ ४ ॥ कार्यकारणाची चाली । वाचावाचत्वें नेमिली । एका नेमें चाली । स्वरूपींच राहाणें ॥ ५ ॥ नव्हे वेषधारी । तुका आहाच वरवरी । आहे तैसीं वरीं । खंडें निवडितें वेदांचीं ॥ ६ ॥

॥ ३८३४ ॥

काम नाहीं काम नाहीं । झालों पाहीं रिकामा १ फावल्या या करूं चेष्टा । निश्चळ द्रष्टा बैसोनि २ नसत्या छंदें नसत्या छंदें । जग विनोदें विव्हळतसे ३ एकाएकीं एकाएकीं । तुका लोकीं निराळा ॥४॥

॥ ३८३५ ॥

सर्वरसीं मीनलें चित्त । अखंडित आनंदु १ गोत पति विश्वंभरीं । झाला हरि सोयरा ॥२॥ वोळखी ते एका नांवें इतर भाव खंडणा ॥ ३ ॥ तुका ह्मणे नांवें रूपें । दुसरीं पापें हारपलीं ॥ ४ ॥

॥ ३७३६ ॥

ज्या ज्या आम्हांपाशीं होतील ज्या शक्ति । तेणें हा श्रीपती अळंकारूं१ अवघा पायांपाशीं दिला जीव भाव । जन्ममरण ठाव पुसियेला २ ज्याचें देणें त्यासी घातला संकल्प । बंधनाचें पाप चुकाविलें ॥३॥ तुका ह्मणे येथें उरला विठ्ठल । खाये बोले बोल गाय नाचे ॥ ४ ॥

॥ ३८३७ ॥

याजसाठीं केला होता आटाहास । शेवटचा दिस गोड व्हावा १ ॥ आतां निश्चितीनें पावलों विसांवा । खुंटलिया धांवा तृष्णेचिया २ कवतुक वाटे जालिया वेचावें । नांव मंगळाचें तेणें गुणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मुक्ति परिणिली नोवरी । आतां दिवस चारी खेळीमेळीं४

॥ ३८३८ ॥

अनुभवें अनुभव अवघाचि साधिला । तरि स्थिरावला मनु ठायीं१ पिटूनिया मुसे आला अळंकार । दग्ध तें असार होऊनिया ॥ २ ॥ एकचि उरलें कायावाचामना । आनंद भुवनामाजी त्रयीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे आम्ही जिंकिला संसार । होऊनि किंकर विठोबाचे ॥४॥

॥ ३८३९ ॥

यज्ञ भूतांच्या पाळणा । भेद कार्यां कारणा । पावावया उपासना । ब्रह्मस्थानीं प्रस्थान ॥ १ ॥ एक परी पडिलें मार्गी । फळ बीजाचिये अंगीं । धन्य तोचि जगीं । आदि अंत सांभाळी ॥ २ ॥ आवश्यक तो शेवट । मागें अवघी खटपट । चालों जाणें वाट । ऐसा विरळा एखादा ॥ ३ ॥ तुका होवोनि निराळा । क्षराअक्षरावेगळा । पाहे निगमकळा । बोले विठ्ठलप्रसादें ॥ ४ ॥

॥ ३८४० ॥

थुंकोनिया मान । दंभ करितों कीर्तन ॥ १ ॥ झालों उदासीन देहीं ।

एकाविण चाड नाहीं ॥ २ ॥ अर्थ अनर्थ सारिखा । करूनि ठेविला पारिखा ॥ ३ ॥ उपाधि वेगळा । तुका राहिला सोंवळा ॥ ४ ॥

॥ ३८४१ ॥

अवघ्या भूतांचें केलें संतर्पण । अवघीच दान दिली भूमि ॥ १ ॥
अवघाचि काळ दिनरातशुद्धी । साधियली विधि पर्वकाळ ॥ २ ॥
अवघींच तीर्थें व्रतें केले याग । अवघेंचि सांग झालें कर्म ॥ ३ ॥
अवघेंचि फळ आलें आम्हां हातां । अवघेंचि अनंता समर्पिलें ॥४॥
तुका ह्मणे आतां बोलों अबोलणें । कायावाचामनें उरलों नाहीं ॥५॥

॥ ३८४२ ॥

हरिनें माझें हरिलें चित्त । भार वित्त विसरलें १ आतां कैसी जाऊं घरा । नव्हे बरा लौकिक २ पारखियांसी सांगता गोष्टी । घरची कुटी खातील ॥३॥ तुका ह्मणे निवांत राहीं । पाहिलें पाहीं परतोनी ॥ ४ ॥

॥ ३८४३ ॥

मज अंगाच्या अनुभवें । काई वाईट बरें ठावें ॥ १ ॥ झालों दोहींचा देखणा । नये मागें पुढेंही मना ॥ २ ॥ वोस वसती ठावी । परि हे चाली दुःख पावी ३ तुका ह्मणे घेऊं देवा । सर्व करूनि बोळावा ४ ॥

॥ ३८४४ ॥

अंतरींची ज्योती प्रकाशली दीप्ति । मुळींची जे होती आच्छादिली१
तेथींचा आनंद ब्रह्मांडीं न समाये । उपमेशीं काये देऊं सुखा ॥२॥
भावाचे मथिले निर्गुण संचलें । तें हें उभें केलें विटेवरी ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मां ब्रह्मांड पंढरी । प्रेमाची जे थोरी सांटवण ॥ ४ ॥

॥ ३८४५ ॥

कृष्णांजनें झाले सोज्वळ लोचन । तेणें दिलें वान निवडुनी ॥ १ ॥
निरोपाच्या मापें करी लडबड । त्याचें तेणें गोड नारायणें ॥ २ ॥
भाग्यवंता घरीं करितां विश्वासें । कार्य त्यासरिसें होईजेतें ॥ ३ ॥
तुका ह्मणे पोट भरे बरे वोजा । निज ठाव निजा निजस्थानीं ॥४॥

॥ ३८४६ ॥

चिंतनें अचिंत राहिलों निश्चळ । तेंचि किती काळ वाढवावें ॥ १ ॥
अबोल्याचा काळ आतां पेशावरी । वचनाची उरी उरली नाहीं २॥
करूं आला तों तों केला लवलाहो । उरोंच संदेहो दिला नाहीं ३॥
तुका ह्मणे मोहो परतोचि ना मागें । ह्मणउनि त्यागें त्याग झाला ४॥

॥ ३८४७ ॥

उपाधीच्या नांवें घेतला सिंतोडा । नेदूं आतां पिडा आतळों ते ॥१॥
काशासाठीं हात भरूनि धुवावे । चालतिया गोवें मारगासि ॥२॥
काय नाहीं देवें करूनि ठेविलें । असे तें आपुलें ते ते ठायीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे जेव्हां गेला अहंकार । तेव्हां आपपर बोळविले ॥ ४ ॥

॥ ३८४८ ॥

बोलों अबोलणें मरोनिया जिवें । असोनि नसणें जनीं आह्मा ॥१॥
भोगीं त्याग जाला संगींच असंग । तोडियेले लाग माग दोन्ही ॥२॥
तुका ह्मणे नव्हे दिसतो मी तैसा । पुसणें तें पुसा पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ३८४९ ॥

अनुहातीं गुंतला नेणे बाह्य रंग । वृत्ति येतां मग बळ लागे ॥ १ ॥
मदें माते तया नाहीं देहभाव । आपुले अवयव आवरितां ॥ २ ॥
आणिकांची वाणी वदे तेणें मुखें । उपचार दुःखें नाठवती ॥ ३ ॥
तें सुख बोलतां आश्चर्य या जना । विपरीत मना भासतसे ॥ ४ ॥
तुका ह्मणे बाह्य रंग ते विठ्ठलें । अंतर निवालें ब्रह्मरसें ॥ ५ ॥

॥ ३८५० ॥

रंगलें या रंगें पालट न धरी । खेवलें अंतरीं पालटेना ॥ १ ॥
सावळें निखळ कृष्णनाम ठसे । अंगसंगें कैसें शोभा देती ॥ २ ॥
पवित्र झालें तें न लिंपे विटाळा । नेदी बैसों मळा आडवरी ॥ ३ ॥
तुका ह्मणे काळें काळें केलें तोंड । प्रकाश अभंड देखोनिया ॥ ४ ॥

॥ ३८५१ ॥

लटिका प्रपंच वांझेची संतति । तत्त्वज्ञा हे भ्रांति बाधूं नेणे ॥ १ ॥
सूर्यबिंबीं काय अंधार रिघेल । मृगजळें तिंबेल नभ काई ॥ २ ॥
तैसा दृश्यभास नाढळेचि डोळा । प्रकाश सोहळा भोगीतसे ॥ ३ ॥
भोग भोग्य भोक्ता नाढळेचि कांहीं । चैतन्यविग्रहीं पूर्णकाम ॥ ४ ॥
तुका ब्रह्मानंदीं आहे तुक ब्रह्म । प्रपंचाचें बंड न देखे डोळां ॥ ५ ॥

॥ ३८५२ ॥

पय दधि घृत आणि नवनीत । तैसें दृश्यजात एकपणें ॥ १ ॥
कनकाचे पाहीं अलंकार केले । कनकत्वा आले एकपणें ॥ २ ॥
मृत्तिकेचे घट झाले नानापरी । मृत्तिका आवघांरीं एकपणें ॥ ३ ॥
तुका ह्मणे एक एक ते अनेक । अनेकत्वीं एक एकपणा ॥ ४ ॥

॥ ३८५३ ॥

येथूनिया ठाव । अवघे लक्षायाचे भाव ॥ १ ॥ उंची देवाचे चरण । तेथें झालें अधिष्ठान ॥ २ ॥ आघाताबेगळा । असे ठाव हा निराळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे स्थळ । धरूनि राहिलों अचळ ॥ ४ ॥

॥ ३८५४ ॥

गोडपणें जैसा गूळ । तैसा देव झाला सकळ ॥ १ ॥ आतां भजों कोणे परी । देव सबाह्य अंतरीं ॥ २ ॥ उदका वेगळा । नव्हे तरंग निराळा ३ हेम अळंकार नामीं । तुका ह्मणे तैसे आह्मी ॥ ४ ॥

॥ ३८५५ ॥

ज्यांच्या संगें होतों पडिलों भोवनीं । ते केली धोवनी सांडोनिया१

आतां एकाएकीं मनासीं विचार । करूं नाहीं भार दुजियाचा २ ॥ प्रसादसेवनें आली उष्टावळी । उचित ते काळीं अवचित ॥ ३ ॥ तुका ह्मणे वर्म सांपडलें हातीं । सांडिली ते खंती चिंता देवा ४ ॥

॥ ३८५६ ॥

मायाबापाचिया भेटी । अवघ्या तुटी संकोचा १ भोगिलें तें आहे सुख । खातां मुख मोकळें ॥२॥ उत्तम तें बाळासाटीं । लावी ओठीं माउली ३ तुका ह्मणे झाली धणी । आनंद मनीं न समाये ॥ ४ ॥

॥ ३८५७ ॥

देव झाले अवघे जन । गुण दोष हारपले ॥ १ ॥ बरवें झालें वरवें जालें । चित्त धालें महालाभें ॥ २ ॥ दर्पणींचें दुसरें भासे । परि तें असे एक तें ३ तुका ह्मणे सिंधुभेटी । उदका तुटी वाहाळासी ॥४॥

॥ ३८५८ ॥

ध्यानीं ध्यातां पंढरिराया । मनासहित पालटे काया १ तेथें बोला कैंची उरी । माझें मीपण झाला हरि ॥ २ ॥ चित्तचैतन्यीं पडतां मिठी । दिसे हरिरूप अवघी सृष्टि ॥ ३ ॥ तुका ह्मणे सांगों काय । एकाएकीं हरिवृत्तिमय ॥ ४ ॥

॥ ३८५९ ॥

लटिकें हासें लटिकें रडें । लटिकें उडें लटिक्यापें ॥ १ ॥ लटिकें माझें लटिकें तुझें । लटिकें ओझें लठिक्याचें ॥ २ ॥ लटिकें गायें लटिकें ध्यायें । लटिकें जायें लटिक्यापें ॥ ३ ॥ लटिका भोगी लटिका त्यागी । लटिका जोगी जग माया ॥ ४ ॥ लटिका तुका लटिक्या भावें । लटिके बोले लटिक्यासवें ॥ ५ ॥

॥ ३८६० ॥

देव जडला जाइना अंगा । यासी काय करूं सांगा ॥१॥ वरकड देव येती जाती । हा देव जन्माचा सांगाती ॥ २ ॥ अंगीं भरलें देवाचें वारें । देव जगचि दिसे सारें ॥ ३ ॥ भूत न बोले निरुतें । कांहीं केलया न सुटे तें ॥ ४ ॥ जीव खादला दैवतें । मीमां येणें महाभूतें ॥ ५ ॥ तुका म्हणे वाडें कोडें । उभें पुंडलिकापुढें ॥ ६ ॥

॥ ३८६१ ॥

मानूं कांहीं आह्मी आपुलिया इच्छा । नाहीं तरी सरिसा रंकरावो १ आपुल्या उदास आह्मों देहभावीं । मग लज्जाजीवीं चाड नाहीं ॥२॥ तुका ह्मणे खेळों आम्ही सहज लीळे । म्हणोनी निराळें सुखदुःखा ३

॥ ३८६२ ॥

शोधूनि अन्यय वंश वंशावळी । परस्परा कुळीं उच्चारण ॥ १ ॥ म्हणविलें मागें पुढें चाले कैसें । केला सामरस्यें अभिषेक ॥ २ ॥

एकछत्र झळके उन्मनी निशाणी । अनुहात ध्वनी गगन गर्जे ॥३॥ तुकया स्वामी स्थापी निजपदीं दासा । करूनी उल्हासा सप्रेमता ४

॥ ३८६३ ॥

मागें बहुत जाले खेळ । आतां बळ वोसरलें ॥ १ ॥ हालों नये चालों आतां । घट रिता पोकळ ॥ २ ॥ भाजल्याची दिसे घडी । पट ओढी न साहे ३ तुका ह्मणे पाहतां घडी । जगा जोडी अंगारा ॥४॥

॥ ३८६४ ॥

उपचारांशी वाज जालों । नका बोलों यावरी ॥ १ ॥ असेल तें असो तैसें । भेटीसरिसें नमन ॥२॥ दुसऱ्यामध्यें कोण मिळे । छंद चाळे बहु मतें ॥३॥ एकापर्की आतां तुका । लौकिका या बाहेरी ४

॥ ३८६५ ॥

तन मन धन दिलें पंढरिराया । आतां सांगावया उरलें नाहीं ॥१॥ अर्थचाड चिंत्ता नाहीं मनीं आशा। तोडियेला फांसा उपाधीचा २ तुका ह्मणे एक विठोबाचें नाम । आहे जवळी दाम नाहीं रुका ३॥

॥ ३८६६ ॥

ह्मणउनि जाली तुटी । नाहीं भेटी अहंकारें ॥१॥ दाखविलें देवें वर्म अवघा भ्रम नासला ॥ २ ॥ हातें मुरगळितां कान । नाहीं भिन्न वेदना ॥ ३ ॥ तुका ह्मणे एकांतसुखें । अवघें गोतें गुंतलें ॥ ४ ॥

॥ ३८६७ ॥

मागें पुढें नाहीं । दुजें यावेगळें कांहीं ॥ १ ॥ नाहीं उरलें आणीक। केला झाडा सकळिक ॥ २ ॥ विश्वावांचून । नांवें दुजियाचें शून्य ॥ ३ ॥ देवाविण कांहीं । तुका ह्मणे उरी नाहीं ॥ ४ ॥

॥ ३८६८ ॥

विश्वीं विश्वंभर । बोले वेदांतींचा सार ॥ १ ॥ जगीं जगदीश । शास्त्रें वदती सावकाश ॥२॥ व्यापिलें हें नारायणें । ऐसीं गर्जती पुराणें ॥ ३ ॥ जनीं जनार्दन । संत बोलती वचन ॥ ४ ॥ सूर्याचिया परी । तुका लोकीं क्रीडा करी ॥ ५ ॥

॥ ३८६९ ॥

भय होतें आह्मीपणें । पाटी येणें घातलें ॥ १ ॥ अवघा आपुलाचि देश । काळा लेश उरोचि ना ॥२॥ समर्थाचें नाम घेतां । मग चिंता काशाची ॥ ३ ॥ तुका ह्मणे नारायणें । जालें जिणें सुखाचें ॥ ४ ॥

॥ ३८७० ॥

हारपोनि गेली निशी । निद्रा कैसी न देखों ॥१॥ नारायणीं बैसलें घर । निरंतर आनंद ॥ २॥ अवघा रुधविला ठाव । नेला वाव मी माझें ॥ ३ ॥ तुका ह्मणे एके ठायीं । असूं नाहीं क्षण भिन्न ॥ ४ ॥

॥ ३८७१ ॥

एके ठायीं अन्नपाणी । ग्रासोग्रासीं चिंतनीं ॥ १ ॥ वेळोवेळां जाग-

वितों । दुजें येईल म्हूण भीतों २ नाहीं गुंतत उपचारीं । मानदंभाचे वेव्हारीं ॥ ३ ॥ तुका जालासे शाहाणा । आड लपे नारायणा ४ ॥

॥ ३८७२ ॥

स्वामिचिया सत्ता । आर्धी वर्म येतें हाता । पुढती विशेषता । लाभें लाभ आगळा ॥ १ ॥ करीं कवतुकाचे बोल । परि जिव्हाळयाची ओल । आवडे रसाळ । मायबापा लाडाचें ॥ २ ॥ मनें मेळविलें मना । नाहीं अभावी शाहणा । अंतरींच्या खुणा । वरि दिल्या उमटोनि ॥ ३ ॥ नाहीं पराश्रमें काळा । अवघ्या जागविल्या वेळा । देवासी निराळा । तुका क्षण न सोडी ॥ ४ ॥

॥ ३८७३ ॥

पडिलिया ताळा । मग अवघाचि निर्वाळा । तेथें कोणी बळा । नाहीं येत कोणासी ॥ १ ॥ जोडिलें तें [illegible] हातीं । आपआपली निश्चिती । हर्ष आणि खंती । तेथें दोनी नासलीं ॥ २ ॥ सहज सरलिया कारण । मग एकला आपण । दिसे तरी भिन्न । वचनाचा प्रसंग ॥ ३ ॥ करूनि झाडा पाडा । तुका वेगळा लिगाडा । निश्चितीच्या गोडा । गोष्टी म्हूण लागती ॥ ४ ॥

॥ ३८७४ ॥

यांची कोठें लागली चट । बहु तट झालेंसे ॥ १ ॥ देवपिसी देवपिसीं । मजऐसीं जग ह्मणे ॥ २ ॥ एकांताचें बाहेर आलें । लपविलें झांकेना ॥ ३ ॥ तुका ह्मणे याचे भेटी । झाली तुटी आपल्यांसी ॥४॥

॥ ३८७५ ॥

माझिया मनाची बैसली आवडी । अवसान घडी एकी नेदे ॥ १ ॥ पाय चित्तीं रूप डोळांच राहिलें । चिंतनें गोविलें मुख सदा ॥२॥ अवघियांचा झाला विसर हा मागें । वेध हा श्रीरंगें लावियेला ३॥ तुका म्हणे कानीं आइकली मात । तोचि झाला घात जीवपणा ४॥

॥ ३८७६ ॥

खादलेंच खावें वाटे । भेटलें भेटे आवडी ॥ १ ॥ वीट नाहीं पांडुरंगीं । वाढे अंगीं आर्त तें ॥ २ ॥ इंद्रियांची हांव पुरे । परि हें उरे चिंतन ॥ ३ ॥ तुका ह्मणे पोट भरे । परि ते उरे भूक पुढें ॥ ४ ॥

॥ ३८७७ ॥

चक्रफेरीं गळीं गळा । होता गोवियेला माळा ॥१॥ फुटोनिया गेला कुंभ । झालों निष्काम स्वयंभ ॥२॥ धरितचि नाहीं धारा । वेठी भ्रमण खोंकरा ॥३॥ तुका ह्मणे कौतुक कोडें । आमी काय जाणें मढें ४

॥ ३८७८ ॥

पाहातां हें बरवें झालें । कळों आलें यावरी ॥१॥ मागिलांचा झाला

झाडा । त्या निवाडास्तव ॥२॥ विसांवले अंग दिसे । सरिसे बुद्धि अनुभव ॥ ३ ॥ तुका म्हणे बरें झालें । देवें नेलें गवसूनि ॥ ४ ॥

॥ ३८७९ ॥

चुकलों या ऐशा वर्मा । तरी कर्मा सांपडलों ॥ १ ॥ पाठी लागे करी नास । गर्भवास भोगवी ॥ २ ॥ माझें भिन्नभावें । गळां दावें मोहाचें ॥३॥ तुका ह्मणे पाठेळ केलों । नसत्या भ्यालों छंदासी ४॥

॥ ३८८० ॥

आतां नव्हे गोड कांहीं करितां संसार । आणीक संचार जाला माजी १ ब्रह्मरसें गेलें भरूनिया अंग । आधील तो रंग पालटला ॥ २ ॥ रसनेचिये रूची कंठीं नारायण । बैसोनिया मन निववीलें ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां बैसलों ठाकणीं । इच्छेची ते धणी पुरईल ॥ ४ ॥

॥ ३८८१ ॥

विचारिलें आधीं आपुल्या मानसीं । वांचों येथें कैसीं कोण्या द्वारें १ तंव जाला साह्य हृदयनिवासी । बुद्धि दिली ऐसी नास नाहीं ॥२॥ उद्वेगाचे होतों पडिलों समुद्रीं । कोणे रीती तरी पाविजेल ॥ ३ ॥ तुका म्हणे दुःखें आला आयुर्भाव । झाला बहु जीव कासावीस ४

॥ ३८८२ ॥

प्रवृत्तिनिवृत्तीचे आटूनिया भाग । उतारिले चांग रसायण ॥ १ ॥ ज्ञानाग्निहुताशीं कडशिलें वोजा । आत्मसिद्धिकाजा लागूनिया २॥ ब्रह्मीं ब्रह्मरस शीघ्र झाला पाक । घेतला रुचीक प्रतीतिमुखें ॥३॥ स्वानुभवें अंगीं झाला समरस । साधनीं निजध्यास ग्रासोग्रासीं ४ अरोग्यता तुका पावला अष्टांगीं । मिरविला रंगीं निजात्मरंगें ॥५॥

॥ ३८८३ ॥

एकाचिये वेठी । सांपडलों फुकासाटीं ॥ १ ॥ घेतो काम सत्ताबळें । माझें करूनि भेंडोळें ॥ २ ॥ धांवें मागें मागें । जाय तिकडेचि लागे ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेलें माझें सर्वस्व विठ्ठलें ॥ ४ ॥

॥ ३८८४ ॥

रुसलों संसारा । आम्ही आणीक व्यापारा ॥ १ ॥ म्हणऊनि केली सांडी । देउनि पडिलों मुरकुंडी ॥ २ ॥ परतोंच ना मागें । मोहो निष्ठुर झालों अंगें ॥ ३ ॥ सांपडला देव । तुका ह्मणे केला भेव ॥ ४ ॥

॥ ३८८५ ॥

धवळलें जगदाकार । आंधार तो निरसला ॥ १ ॥ लपों आतां नाहीं ठाव । प्रगट पाहें पसारा ॥२॥ खरियाचा दिवस आला । बाहीं बोला न पुरे ॥३॥ तुका ह्मणे जीवें साटीं । पडिली मिटी धुरेसी ॥४॥

॥ ३८८६ ॥

नाहीं लाग माग । न देखें हें केलें जग ॥१॥ आतां बैसोनिया खावें

दिलें आइतें या देवें ॥ २ ॥ निवारिलें भय । नाहीं दुसऱ्याची सोय ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । बोलायाचें काम नाहीं ॥ ४ ॥

॥ ३८८७ ॥

शरणागत जालों । तेणें मीपणा मुकलों ॥ १ ॥ आतां दिल्याचीच वाट । पाहों नाहीं खटपट ॥ २ ॥ नलगे उचित । कांहीं पाहावें संचित ॥ ३ ॥ तुका ह्मणे सेवा । माने तैसी करूं देवा ॥ ४ ॥

॥ ३८८८ ॥

आनंदाचे डोहीं आनंदतरंग । आनंदचि अंग आनंदाचें ॥ १ ॥
काय सांगों झालें कांहींचियाबाही । पुढें चाली नाहीं आवडीनें२॥
गर्भाचे आवडी मातेचा डोहळा । तेथींचा जिव्हाळा तेथें बिंबे ३॥
तुका ह्मणे तैसा ओतलासे ठसा । अनुभव सरिसा मुखा आला४॥

॥ ३८८९ ॥

आसन शयन भोजन गोविंदें । भरले आनंदें त्रिभुवन ॥ १ ॥
अवघिया केली काळें तडातोडी । अवसर घडी पुरों नये ॥ २ ॥
वांटणी घातले शरीराचे भाग । दुजियाचा लाग खंडियेला ॥ ३ ॥
आवडीच्या आलें आहारासी रूप । पृथक संकल्प मावळले ॥ ४ ॥
काम तरी क्रोध बुद्धि मन नासे । भ्रमाचे वोळसे गिळिले शांती ५
तुका ह्मणे मना श्रीरंगाचा रंग । बैसला अभंग एकविध ॥ ६ ॥

॥ ३८९० ॥

कां रे तुम्हीं ठेवा बहुतां निमित्तें । माझिया संचितें वोडवले १ ॥
भक्तिप्रेमगोडी बैसली जिव्हारीं । आनंद अंतरीं येणें झाला ॥ २ ॥
पुसिलें पडळ त्रिमिर विठ्ठले । जगचि भरले ब्रह्मानंदें ॥ ३ ॥
तुका ह्मणे केले कामनें वेगळा । आवडी गोपाळावरी असे ॥ ४ ॥

॥ ३८९१ ॥

होचि भेटी साच रूपाचा आठव । विसावला जीव आवडीपे ॥ १ ॥
सुखाचें भातुकें करावें जतन । सेविल्या ताहान भूक जाय ॥ २ ॥
दुरील जवळी आपणचि होते । कवळिले चित्ते जिवनासीं ॥ ३ ॥
तुका म्हणे नाम घेता वेळोवेळां । होतील सकळा शीतळा नाडी ४

॥ ३८९२ ॥

मीची विकळ मीची विखळ । येर सकळ बहु बरें ॥ १ ॥ पाहिजे हे क्षमा केले । येणें बोले विनवणी २ मीच माझे मीच माझे । जाले ओझें अन्याय ३ आर्धीं आंचवला आर्धीं आंचवला । तुका जाला निमनुष्य४

॥ ३८९३ ॥

सुधारसें ओलावली । रसना धाली न धाय ॥१॥ कळों नये जाली धणी । नारायणीं पूर्णता ॥ २ ॥ आवडे ते तेचि यासी । ब्रह्मरसीं निरसें ॥ ३ ॥ तुका ह्मणे बहुतां परी । करूनि करीं सेवन ॥ ४ ॥

॥ ३८९४ ॥

ह्मणऊनि झालों क्षेत्रींचे संन्यासी । चित्त आशापाशीं आवरूनि १॥
कदापिही नव्हे सीमा उल्लंघन । केलें विसर्जन आव्हानींच ॥ २ ॥
पारिखा तो आतां जाला दुजा ठाव । दृढ केला भाव एकविध ३॥
तुका ह्मणे कार्यकारणाचा हेवा । नाहीं जीव देवा समर्पिला ॥ ४ ॥

॥ ३८९५ ॥

कोण होईल आतां संसार पांगिलें । आहे उगविलें सहजचि ॥१ ॥
केला तो चालवीं आपुला प्रपंच । काय कोणां वेच आदा घे दे२॥
सहजचि घडे आतां मोळ्याविण । तेथें काय सीण आणि लाभ३॥
तुका म्हणे जालों सहज देखणा । ज्याच्या त्यानें खुणा दाखविल्या४

॥ ३८९६ ॥

कोणापाशीं द्यावें माप । आपेआप राहिलें ॥ १ ॥ कासयाची भरो वरी । काय दुरी जवळी ॥ २ ॥ एके दाखविले दाहा । फांटा पाहा पुसूनि ॥ ३ ॥ तुका म्हणे सरलें वोझें । आतां माझें सकळ ॥ ४ ॥

॥ ३८९७ ॥

सत्तेचे भोजन समर्यी आतुडे । सेवनही घडे रुचि नेसी ॥ १ ॥
वमें भ्रम नेला जाले एकमय । हृदयस्थीं सोय संग जाला ॥ २ ॥
कोथळीस जमा पडिले संचित । मापल्याचा वित्त नेम जाला ॥ ३
तुका म्हणे धणी ऐसा जालो आतां । करीन ते सत्ता माझी आहे४

॥ ३८९८ ॥

न सांडावा आतां ऐसा वाटे ठाव । भयाशी उपाव रक्षणाचा ॥१॥
म्हणऊनि मनें वळियेलें मन । कारियाकारण चाड नाहीं ॥ २ ॥
नानावी उपाधि करूनिया मूळ । राखतां विशाळ तेचि व्हावे ॥३॥
तुका म्हणे येथें न वेचे वचन । निर्जी निज खूण सांपडलीं ॥ ४ ॥

॥ ३८९९ ॥

हा तो नव्हे कांहीं निराशेचा ठाव । भले पोटीं वाव राखिलिया १
विश्वंभर विश्व सामाविलें पोटीं । तेथेंचि सेवटीं आम्ही असो ॥२॥
नेणता चिंतन करितो अंतरीं । तेथें अभ्यंतरीं उमटेल ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझा स्वामी अबोलणा । पुरवूं खुणे खुणा जाणतसो ४

॥ ३९०० ॥

नव्हती हीं माझीं जायाचीं भूषणें । असे नारायणें उचित केलें १॥
शब्दाच्या वोवणीं रत्नाचिया माळा । मुळींचा जिव्हाळा झरवणी२
अर्थांतरीं असे अनुभव सेवन । परिपाकीं मन साक्ष येथें ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज सरते परते । ते नाहीं अनंतें उरो दिलें ॥ ४ ॥

॥ ३९०१ ॥

बहु नांवें ठेविलीं स्तुतीचे आवडी । बहुत या गोडी आली रसा १॥

बहु सोसें सेवन केलें बहुवस । बहु आला दिस गोमट्याचा ॥२॥ बहुतां पुरला बहुतां उरला । बहुतांचा केला बहु नट ॥ ३ ॥ बहु तुका झाला निकट वृत्ती । बहु काकुलती येऊनिया ॥ ४ ॥

॥ ३९०२ ॥

उपाधीचे बीज । जळोनि राहिलें सहज ॥ १ ॥ आम्हां राहिली ते आतां । चाली देवाचिया सत्ता २ पराधीन तें जिणें । केलें सत्ता नारायणें ॥ ३ ॥ तुका म्हणे जाणे पाय । खुंटले आणीक उपाय ४॥

॥ ३९०३ ॥

जेथें माझी दृष्टी जाय । तेथें पाय भावीन ॥ १ ॥ असेन या समाधानें । पूजा मनें करीन ॥ २ ॥ अवघाच अवघे देसी । सुखरासी संपन्न ॥ ३ ॥ तुका ह्मणे बंधन नाहीं । ऐसें कांहीं तें करूं ॥ ४ ॥

॥ ३९०४ ॥

वेद जय गाती । आम्हां तयाची संगती ॥ १ ॥ नाम धरियेलें कंठीं । अवघा सांठविला पोटीं ॥ २ ॥ ॐकाराचे बीज । हातीं आमुचे तें निज ॥ ३ ॥ तुका म्हणे बहु मोठे । अणुरेणुया धाकुटे ४

॥ ३९०५ ॥

तेणें वेशें माझीं चोरिलीं अंगें । मानावया जग आत्मपणें ॥ नाहीं चाड भीड संसाराचें कोड । उदासीन सर्व गुणें ॥ भय मोह लज्जा निरसली शंका । अवघियां एकचि पणें ॥ विठ्ठलाच्या पायीं बैसोनि राहिलीं । भागलीं त्रुटित तेणें ॥ १ ॥ आतां त्यांसीं काय चाले माझें बळ । झालोसे दुर्बळ सत्त्वहीन ॥ दग्ध पट दिसे संगति बरवंट । काय त्याचें कारण ॥ २ ॥ आळसें दृष्टी न पाहे आपुले । एकचि देखिलें सर्वरूप ॥ मानामान तेथें खुंटोनि राहिले । पिशुन तो कोण बाप ॥ ज्योति ना अंधार अवघा एकंकार । तेथें काय पुण्यपाप ॥ विठ्ठलावांचुनि कांहींच नावडे । वेगळाल्या भावें रूप ३ बळबाडिवार लौकिक वेव्हार । गेली आशा तृष्णा माया ॥ सुखदुःखाची वार्ता नाइके । अंतरलों दुरी तया ॥ मीतूंपणनिष्काम होऊनि । राहिलों आपुलिया ठायां ॥ तुजविण आतां मज नाहीं कोणी । तुका म्हणे देवराया ॥ ४ ॥

॥ ३९०६ ॥

प्रेमअमृतें रसना ओलावली । मनाची राहिली वृत्ति पायीं ॥ १ ॥ सकळही तेथें बोललीं मंगळें । वृष्टि केली जळे आनंदाच्या ॥ २ ॥ सकळ इंद्रियें जालीं ब्रह्मरूप । ओतलें स्वरूप माजी तया ॥ ३ ॥ तुका म्हणे जेथें वसे भक्तराव । तेथें नांदे देव संदेह नाहीं ॥ ४ ॥

॥ ३९०७ ॥

जोडिलें ते आतां न सरे सारितां । जीव बळी देतां हाता आले १

संचित सारूनि बांधिले धरणें । तुंबिले जीवन साक्षेपें हें ॥ २ ॥
शीत उष्ण तेथें सुखदुःख नाहीं । अंतर सबाही एक झालें ॥ ३ ॥
बीज तो अंकुर पत्र शाखा फळें । प्राप्तबीज मुळें अवघें नासे ॥ ४ ॥
तुका म्हणे नामीं राहिलीसे गोडी । बीजाच्या परवडी होती जाती ५

॥ ३९०८ ॥

आमुचे जीवीन हे कथाअमृत । आणिकही संत समागम ॥ १ ॥
सारूं एके ठायीं भोजन परवडी । स्वादरसें गोडी पदोपदीं ॥ २ ॥
धालिया ढेकर येती आनंदाचे । वोसंडलें वाचे प्रेमसुख ॥ ३ ॥
पिकलें स्वरूप आलिया घुमरी । रासी ते अंबरीं न समाये ॥ ४ ॥
मोजिता तयाचा अंत नाहीं पार । खुंटला व्यापार तुका म्हणे ॥५॥

॥ ३९०९ ॥

साधनें आमुचीं आज्ञेचीं धारकें । प्रमाण सेवकें स्वामिसत्ता ॥ १ ॥
प्रकाशिलें जग आपुल्या प्रकाशें । रवि कर्मरसें अलिप्त त्या ॥ २ ॥
सांगणें तें नाहीं करणें तें आपण । मोलही वचन बाध झाले ॥३॥
तुका म्हणे आम्हां भांडवल हातीं । येरझारा खाती केवढिये ॥४॥

॥ ३९१० ॥

आठवो नेदी आवडी आणीक । भरूनिया लोक तिन्ही राहे ॥ १ ॥
मन धांवे तेथें तिचेचि दुभते । संपूर्ण आइते सर्वकाळ ॥ २ ॥
नलगे वळीवीं इंद्रिये धांवतां । ठाव नाहीं रिता उरो दिला ॥ ३ ॥
तुका म्हणे समपाउलांचा खुंट । केला बळकट हालो नेदी ॥ ४ ॥

॥ ३९११ ॥

सांगतो गोष्टी लागती गोडा । हा तो रोकडा अनुभव ॥१॥ सुख झालें सुख झालें । नये बोले बोलतां ॥२॥ अंतर द्वे नये दिसो । आतां सोस कासया ॥३॥ तुका म्हणे जतन करूं । हेंचि धरूं जीवेंसि ४ ॥

॥ ३९१२ ॥

पाणिपात्र दिगंबरा । हस्त करा सारिखे ॥ १ ॥ आवश्यक देव । मनीं । चिंतनींच सादर ॥ २ ॥ भिक्षाकामधेनुपेशी । अवकाशीं शयन ॥ ३ ॥ पांघरोनि तुका दिशा । केला वास अलक्षीं ॥ ४ ॥

॥ ३९१३ ॥

पटे ढाळूं आम्ही विष्णुदास जगीं । लागों नेदूं अंगीं पापपुण्य ॥१॥
निर्भर अंतरीं सदा सर्वकाळ । घेतला सकळ भार देवें ॥ २ ॥
बळिवंत जेणें रचिलें सकळ । आम्हां त्याचें बळ अंकितासी ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्ही देखताचि नाहीं । देवाविण कांहीं दुसरें तें ॥ ४॥

॥ ३९१४ ॥

बोलणेंचि नाहीं । आतां देवाविण कांहीं ॥१॥ एकसरें केला नेम ॥ देवा दिले क्रोध काम ॥ २ ॥ पाहेन ते पाय । जोंवरि हे दृष्टी धाय ॥ ३ ॥ तुका म्हणे मनें । हेचि संकल्प वाहाणें ॥ ४ ॥

॥ ३९१५ ॥

अवघाचि आकार ग्रासियेला काळें । एकचि निराळें हरिचें नाम १ धरूनि राहिलों अविनाश कंठीं । जीवन हें पोटीं । सांटविलें ॥२॥ शरीरसंपत्ति मृगजळभान । जाईल नासोन खरें नव्हे ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां उपाधीच्या नांवें । आणियेला देवें वीट मज ॥ ४ ॥

॥ ३९१६ ॥

समर्पिली वाणी । पांडुरंगीं घेती धणी ॥ १ ॥ पूजा होते मुक्ताफळीं । रस वोचिया मंगळीं ॥२॥ धार अखंडीत । ओघ चालियेला नित्य ॥ ३ ॥ पूर्णाहुति जीवें । तुका घेउनि ठेला भावें ॥ ४ ॥

॥ ३९१७ ॥

नव्हतियाचा सोस होता । झडो आतां पदर १ देखणें तें देखियेलें । आतां भले साक्षित्वें ॥२॥ लाभ कळों आली हानि । राहो दोन्ही निराळीं ॥ ३ ॥ तुका म्हणे एकाएकीं । हा कां लोकीं पसारा ॥ ४॥

॥ ३९१८ ॥

जळो आतां नांव रूप । माझें पाप गांठीचें १ संतांचिया चरणरजें । उतरूं ओझें मातीचें ॥ २ ॥ लटिकयाचा अभिमान । होता शीण पावत ॥ ३ ॥ तुका म्हणे अरुपीचें । सुख साचे निनांवें ॥ ४ ॥

॥ ३९१९ ॥

जाणपणें बरें देवाचिये शिरीं । आम्ही पेशीं बरीं नेणतींच ॥ १ ॥ देखणीयापुढें रुचे कवतुक । उभयतां सुख वाढतसें ॥ २ ॥ आशंकेची बाधा नाहीं लडिवाळां चित्त वरि खेळा समबुद्धि ॥३॥ तुका म्हणे दिशा मोकळ्या सकळा । अवकाशीं खेळा ठाव जाला ४

॥ ३९२० ॥

भक्तीचिया पोटीं रत्नाचिया खाणी । ब्रह्मींची ठेवणी सकळ वस्तु १ माउलीचे मागें बाळकांची हरी । एका सूत्रें दोरी ओढतसे ॥ २ ॥ जेथील जे मागे ते रायासमोर । नाहींसें उत्तर येत नाहीं ॥ ३ ॥ सेवेचिये सत्ते धनीच सेवक । आपुलें तें एक न वंची कांहीं ॥ ४ ॥ आदि अंता ठाव असे मध्यभाग । भोंवतें भासे मग उंचासन ॥५॥ भावारूढ तुका झाला एकाएकीं । देवच लौकिकीं अवघा केला ६॥

॥ ३९२१ ॥

ऐशिया संपत्ती आम्हां संवसारीं । भोगाचिया परि काय सांगूं १॥ काम तो कामना भोगीतसे देवा । आलिंगनें हेवा चरण चुंबी ॥२॥ शांतीच्या संयोगें निरसला ताप । दुसरें या पाप भेदबुद्धि ॥ ३ ॥ तुका ह्मणे पाहें तिकडे सारिखें । आपुलें पारिखें निरसलें ॥ ४ ॥

॥ ३९२२ ॥

सांपडला हातीं । जरी झाली हे निश्चिती ॥ १ ॥ नाहीं धांवा घेत

मन । इंद्रियांचें समाधान ॥ २ ॥ सांडियेला हेवा । अवघा संचिताचा ठेवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे काम । निरसुनिया घेतों नाम ॥ ४ ॥

॥ ३९२३ ॥

उत्तम घालावें आमुचिये मुखीं । निवारावें दुःखी होऊनि तें ॥ १ ॥ न बैसे न वजे जवळूनि दुरी । मागें पुढें वारी घात पात ॥ २ ॥ नाहीं शंका असो भलतिये ठायीं । माथळले पाहीं द्वैताद्वैत ॥ ३ ॥ तुका ह्मणे भार घेतला विठ्ठलें । अंतरीं भरलें बाह्य रूप ॥ ४ ॥

॥ ३९२४ ॥

एक वेळे प्रायश्चित्त । केलें चित्त मुंडण ॥१॥ अहंकारा नांवें दोष त्याचें ओस पाडिलें ॥ २ ॥ अनुतापें स्नानविधि । यज्ञ सिद्धि देहहोम ॥ ३ ॥ जीवशिवा होतां चुका । येथें तुका विनटला ॥ ४ ॥

॥ ३९२५ ॥

मग बोळी मना । बुद्धि बुद्धी क्षणक्षणां ॥ १ ॥ मीच मज राखण झालों । ज्याणें तेथेंचि धरिलों ॥ २ ॥ जें जें जेथें उठी । तें तें तय हातें कुंटी ॥३॥ भाजली खांजनी । तुका साक्ष उरला दोन्ही ॥ ४ ॥

॥ ३९२६ ॥

अक्षई तें झालें । आतां न मोडे रचिलें ॥ १ ॥ पाया पडिला खोले ठायीं । तेथें पुढें चाली नाहीं ॥२॥ होतें विखुरलें । ताळा जमे झडती आलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे बोली । पुढें कुंठितचि जाली ॥ ४ ॥

॥ ३९२७ ॥

दाता नारायण । स्वयें भोगिता आपण ॥ १ ॥ आतां काय उरलें वाचें । पुढें शब्द बोलायाचें ॥ २ ॥ देखती जे डोळे । रूप आपुलें तें खेळे ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाद । जाला अवघा गोविंद ॥ ४ ॥

॥ ३९२८ ॥

देव आड झाला । तो भोगितां मी उगला । अवघा निवारिला । शीण शुभअशुभाचा ॥ १ ॥ जीवाशिवाचें भातुकें । केलें होतें कौतुकें । कर्त्री येथें लोकें । आभास अनित्य ॥ २ ॥ विष्णुमय खरें जग । येथें लागतसे लाग । वांटिले विभाग । वर्णधर्म हा खेळ ॥३॥ अवघी एकाचीच वीण । तेथें कैंचें भिन्नाभिन्न । वेदपुरुष नारायण । तेणें केला निवाडा ॥ ४ ॥ प्रसादाचा रस । तुका लाधला सौरस । पायापाशीं वास । निकट नव्हे निराळा ॥ ५ ॥

॥ ३९२९ ॥

आतां येणेंविण नाहीं आह्मां चाड । कोण बडबड करी वाया ॥ १ ॥ सुख तेंचि दुःख पुण्यपाप खरें । हें तों आह्मां बरें कळों आलें ॥ २ ॥ तुका ह्मणे वाचा वाहिली अनंता । बोलायाचें आतां काम नाहीं ॥ ३ ॥

॥ ३९३० ॥

—लावें तें जवळी आलें । काय बोलें कारण ॥ १ ॥ नामरूपीं पडिली

गांठी । अवघ्या गोष्टी सरल्या ॥ २ ॥ मुकियाचे परी जीवीं । साखर जेवीं खादली ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय बोलें । आतां भलें मौन्यचि ४ ॥

॥ ३९३१ ॥

पावे ऐसा नाश । अवघिया दिला त्रास ॥ १ ॥ अविटाचा केला संग । सर्व भोगी पांडुरंग ॥ २ ॥ आइताची पाक । संयोगाचा सकळिक ॥ ३ ॥ तुका ह्मणे धणी । सीमा राहिली होउनी ॥ ४ ॥

॥ ३९३२ ॥

डोळियांचें दैव आजि उभें ठेलें । निधान देखिलें पंढरीये ॥ १ ॥ काय तें वानावें वाचेचे पालवें । वेदा न बोलवें रूप ज्याचें ॥ २ ॥ आनंदाच्या रसें ओंतीव चांगलें । देखतां रंगलें चित्त माझें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मी तों सगळाच विरालों । विठ्ठलचि झालों दर्शनानें ४ ॥

॥ ३९३३ ॥

नेंसणें आलें होतें गळया । लोक रळया करिती ॥ १ ॥ आपणिया सावरिलें । जग भलें आपण ॥ २ ॥ संबंध तो तुटला येणें । जागेपणें चेष्टाचा ॥ ३ ॥ भलती सेवा होती अंगें । वारस वेगें पडिलें ४ सावरिलें नीट वोजा । दृष्टी लाजा पुढिलांच्या ॥ ५ ॥ बरे उघडिले डोळे । हळहळेपासूनि ६ तुका ह्मणे विटंबना । नारायणा चुकली ७

॥ ३९३४ ॥

मुखें खती इंद्रियें जाती । आणिक नेणें भाव भक्ती १ देवा हेंचि दोन्ही पदें । येर गाइली विनोदें २ चित्ताचें आसन । तुका करितो कीर्तन ३

॥ ३९३५ ॥

ब्रह्मरसगोडी तयांसी फावली । वासना निमाली सकळ ज्यांची १ ॥ नाहीं त्या विटाळ अखंड सोंवळीं । अवघ्री वेगळीं जाणिवेच्या २ ॥ मन हें संचलें झालें एके ठायीं । तयां उणें काइ निजसुखा ॥ ३ ॥ तींचि पुन्यवंतें परउपकारी । प्रबोधी त्या नारी नर लोकां ॥ ४ ॥ तुका ह्मणे त्यांचे पायीं पायपोस । होऊनिया वास करिन तेथें ५ ॥

॥ ३९३६ ॥

तोंच हीं क्षुल्लकें सर्वी सहोदरें । नाहीं विश्वंभरें वोळखीं तों ॥ १ ॥ नारायण विश्वंभर विश्वपिता । प्रमाण तो होतां सकळ मिथ्या २ रवि नुगवे तों दीपकांचें काज । प्रकाश तें तेज सहज लोपे ॥ ३ ॥ तुका ह्मणे देहसंबंध संचितें । कारण निरुतें नारायणीं ॥ ४ ॥

॥ ३९३७ ॥

भरला दिसे हाट । अवघी वाढली खटपट । संचिताचे वाट । वाटा होउनि फांकती ॥ १ ॥ भोगा ऐसे ठायाठाव । कर्मां त्रिविधाचे भाव । द्रष्टा येथें देव । विरहित संकल्पा ॥ २ ॥ दिला पाडोनिया धडा । पापपुण्यांचा निवाडा । आचरती गोडा । आचरणें आपु-

लाल्या ॥३॥ तुका ह्मणे पराधीन । झालें ओढलीया ऋणें । तुटती बंधनें । जरि देवा आळविते ॥ ४ ॥

॥ ३९३८ ॥

उंबरांतील कीटका । हेंचि ब्रह्मांड ऐसें लेखा ॥ १ ॥ ऐसीं उंबरें किती झाडीं । ऐशीं झाडें किती नव खंडीं ॥ २ ॥ हेंचि ब्रह्मांड आह्मांसी । ऐशीं अगणित अंडें कैसीं ॥ ३ ॥ विराटाचे अंगीं तैसे । मोजूं जातां अगणित केश ॥ ४ ॥ ऐशा विराटाच्या कोटी । सांटवल्या ज्याच्या पोटीं ॥ ५ ॥ तो हा नंदाचा बाळमुकुंद । तान्हा म्हणवी परमानंद ॥ ६ ॥ ऐशी अगम्य ईश्वरी लीळा । ब्रह्मानंदीं गम्य तुक्याला ॥ ७ ॥

॥ ३९३९ ॥

पंचभूतांचा गोंधळ । केला एकेटायीं मेळ । लाविला सबळ । अहंकार त्यापाठीं ॥ १ ॥ तेथें काय मी तें माझें । कोण वागवी हें ओझें । देहा केवीं रिझे । हें काळाचें भातुकें ॥ २ ॥ जीव न देखे मरण । धरी नवी सांडी जीर्ण । संचित प्रमाण । भोग शुभा अशुभा ॥ ३ ॥ इच्छा वाढवी ते वेल । खुंटावा तो खरा बोल । तुका ह्मणे मोल । झाकलें तें पावेल ॥ ४ ॥

॥ ३९४० ॥

मी हें ऐसें काय जाती । अवघड किती पाहातां ॥ १ ॥ नाहीं होत उल्लंघन । नसतां भिन्न दुसरें ॥ २ ॥ अंधारानें तेज नेलें । दृष्टीखालें अंतर ॥ ३ ॥ तुका ह्मणे सर्वे देव । घेतां ठाव दावील ॥ ४ ॥

॥ ३९४१ ॥

मुक्त कासया म्हणावें । बंधन तें नाहीं ठावें ॥ १ ॥ सुखें करितों कीर्तन । भय विसरलें मन ॥ २ ॥ देखिजेना नाश । घालूं कोणावरी कास ॥ ३ ॥ तुका ह्मणे साहे । देव आहे तैसा आहे ॥ ४ ॥

॥ ३९४२ ॥

रूप नांव माया बोलावया ठाव । भागा आले भाव तयावरि ॥१॥ सींव वाटे परी न खंडे पृथिवी । शाहाणे ते जीवीं समजती ॥ २ ॥ पोटा आलें तिच्या लोळे मांडीवरि । पारखी न करी खंती चित्तीं ३ तुका ह्मणे भक्तिसाठीं हरिहर । अरूपीचें क्षर विभाग हें ॥ ४ ॥

॥ ३९४३ ॥

देवाची भांडारी । आदा विनियोग करी ॥१॥ आतां न माखे हातपाय । नेणों होतें ऐसें काय ॥ २ ॥ देवें नेली चिंता । झाला सकळ करिता ॥ ३ ॥ तुका ह्मणे धणी । त्यासी अवघी पुरवणी ॥ ४ ॥

॥ ३९४४ ॥

सुख मुखा विरजण झालें । तें मथलें नवनीत ॥१॥ हाले डोले हरुषे

काया । निवती बाह्या नयन ॥ २ ॥ प्रबल तो नारायण । गुणें गुण वाढला ॥ ३ ॥ तुका ह्मणे भरली सीग । वरी मग वोसंडे ॥ ४ ॥

॥ ३९४५ ॥

बहुतां जातीचा केला अंगीकार । बहुतही फार सर्वोत्तमें ॥ १ ॥
सरलाचि नाहीं कोणाचिये वेचें । अक्षोभ ठायींचें ठायीं आहे ॥ २ ॥
लागतचि नाहीं घेतां अंतपार । वसवी अंतर अणूचेंही ॥ ३ ॥
तुका ह्मणे केला होय टाकी ऐसा । पुरवाची इच्छा धरिली ते ४ ॥

॥ ३९४६ ॥

कासयां जी ऐसा माझे माथां ठेवा । भार तुम्ही देवा संतजन १॥
विचित्र विंदानीं नानाकळा खेळे । नाचवी पुतळे नारायण ॥ २ ॥
काय वानरांची अंगींची ते शक्ति । उदक तरती वरी शिळा ॥ ३ ॥
तुका ह्मणे करी निमित्याचे आड । चेष्टवूनि जड दावी पुढें ॥ ४ ॥

॥ ३९४७ ॥

वाजतील तुरें । येणें आनंदें गजरें ॥ १ ॥ जिंकोनिया अहंकार । पावटणी केलें शिर ॥ २ ॥ काळा नाहीं वाव । परा श्रमा कोठें ठाव ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां । सोपें वैकुंठासी जातां ॥ ४ ॥

॥ ३९४८ ॥

नव्हे शब्द एक देशी । सांडी गिवशी कोणाला ॥ १ ॥ झाली माझी हे वैखरी । विश्वंभरी व्यापक ॥ २ ॥ मोकलिलें जावें बाणें । भाता जेणें वाईलें ॥ ३ ॥ आतां येथें कैचा तुका । बोले सिका स्वामीचा ४

॥ ३९४९ ॥

आपलें तों कांहीं । येथें सांगिजेसें नाहीं ॥ १ ॥ परि हे वाणी बाचळ । छंद करविते बरळ ॥ २ ॥ पंचभूतांचा हा मेळा देह सत्यत्वें निराळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे भुली । इची उफराटी चाली ॥ ४ ॥

॥ ३९५० ॥

हीनसुखबुद्धीपाशीं । आकृतीसी भेद नाहीं ॥ १ ॥ एक दांडी एक खांदी । पदीं पदीं भोगणें ॥ २ ॥ एकाऐसें एक नाहीं । भिन्न पाहीं प्रकृती ॥ ३ ॥ तुका ह्मणे भूमी खंडे । पीक दंडे । जेथें तें ॥ ४ ॥

॥ ३९५१ ॥

देवासी तो पुरे एकभाव गांठी । तोचि त्याचे मिठी देईल पायीं १ ॥
पाहोनि राहीन कवतुकें निराळा । मी मज वेगळा होऊनिया ॥ २ ॥
कांहीं नेघें शिरीं निमित्ताचा भार । नलगे उत्तर वेचावेंचि ॥ ३ ॥
तुका ह्मणे जीवें पडिलिया गांठीं । मग नाहीं मिठी सुटों येत ॥४॥

॥ ३९५२ ॥

जाय तिकडे लागे पाठीं । नाहीं तुटी आठवाची ॥१॥ हिरोनिया नेलें चित्त । माझें थीत भांडवल ॥ २ ॥ दावूनिया रूप डोळां । मन चाळा लावियेलें ॥ ३ ॥ आणीक तोंडा पडिली मिठी । कान गोडी

नाइकती ॥ ४ ॥ बोलिल्याचा आठव न घडे । वाणी ओढे ते सोई ॥ ५ ॥ तुका ह्मणे प्रेमधगी । भरली अंगीं अखंड ॥ ६ ॥

॥ ३९५३ ॥

देवाचे घरीं देवें केली चोरी । देवें देव नागवूनि केला भिकारी १॥ धांवणिया धांवा धांवणिया धांवा। मागचि नाहीं जावें कवणिया गांवा सर्वांचि होता चोर घरिचिया घरीं। फावलियावरी केलें अवघें वाटोळें३ तुका ह्मणे येथें कोणीच्च नाहीं । नागवलें कोण गेलें कोणाचें काई४

॥ ३९५४ ॥

जाले आतां सांटे । कासयाचे लहान मोठे ॥ १ ॥ एक एका पांडेलों हातीं । जाली तेव्हांचि निश्चिती ॥ २ ॥ नाहीं फिरों येत मागें । जालें साक्षीचिया अंगें ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । आतां येथें कोठें हेवा ॥ ४ ॥

॥ ३९५५ ॥

वचन ही नाड । न बोले तें मुकें खोड ॥ १ ॥ दोहीं वेगळें तें हित । बोली अबोलणी नीत ॥ २ ॥ अंधार प्रकाशीं । जाय दिवस पावे निशी ॥ ३ ॥ बीज पृथिवीच्या पोटीं । तुका ह्मणे दावी दृष्टी ॥ ४ ॥

॥ ३९५६ ॥

वसवावें घर । देवें बरें निरंतर ॥ १ ॥ संग आसनीं शयनीं । घडे भोजनीं गमनीं ॥ २ ॥ संकल्प विकल्प । मावळोनि पुण्यपाप ॥ ३ ॥ तुका ह्मणे काळ । अवघा गोविंदीं सुकाळ ॥ ४ ॥

॥ ३९५७ ॥

याजसाठीं भक्ति । जगीं रूढावाया ख्याति ॥ १ ॥ नाहीं तरी कोठें दुजें । आहे बोलाया सहजें ॥ २ ॥ गौरवासाठीं । स्वामिसेवेची कसोटी ॥ ३ तुका ह्मणे अलंकारा । देवभक्त लोकीं खरा ४॥

॥ ३९५८ ॥

माझ्या मुखें मज बोलवितो हरि । सकळा अंतरीं नारायणा ॥ १ ॥ न करावा द्वेष भूतांचा मत्सर । हा तंव विचार जाणों आम्ही॥२॥ तुका ह्मणे दोष नाहीं या विचारें। हितामी उत्तरें शिकवितां ॥३॥

॥ ३९५९ ॥

अखंड मुडतर । सासुरवास करकर ॥१॥ याची जाली बोळवण आतां न देखों तो शीण ॥ २ ॥ बहुतांची दासी । तये घरीं सासुरवासी ॥३॥ तुका ह्मणे मुळें । खंड जाला एका वेळे ॥ ४ ॥

॥ ३९६० ॥

निरंजनीं एकटवाणें । संग नेणें दुसरा ॥ १ ॥ पाहा चाळविलें कैसें । लावूनि पिसें गोवळें॥ २ ॥ लपलें अंगें अंग । दिला संग होता तो ॥३॥ तुका ह्मणे नव्हते ठावें । झालें भावें वाटोळें ॥ ४ ॥

॥ ३९६१ ॥

होचि थोर भक्ति आवडते देवा । संकल्पावी माया संसाराची ॥१॥

ठेविलें अनंतें तैसेंचि राहावें । चित्तीं असो द्यावें समाधान ॥ २ ॥
वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ । भोगणें तें फळ संचिताचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे घालूं तयावरी भार । वाहूं हा संसार देवा पायीं ॥ ४ ॥

॥ ३९६२ ॥

आपला तो एक देव करूनि घ्यावा । देणेविण जीवा सुख नव्हे १॥
येर तीं माइकें दुःखाची जनितीं । नाहीं आदिअंतीं अवसान ॥२॥
अविनाश करी आपुलिया ऐसें । लावी मना पिसें गोविंदाच्या ३॥
तुका ह्मणे एका मरणेंचि सरे । उत्तमचि उरे कीर्ति मागें ॥ ४ ॥

॥ ३९६३ ॥

देवाचिया माथां घालुनिया भार । सांडी कलेवर ओवाळूनि ॥१॥
नाथिला हा छंद अभिमान अंगीं । निमित्याचे वेगीं सारीं ओझें२॥
करुणा वचनीं लाहो एकसरें । नेदावें दुसरें आड येऊं ॥ ३ ॥
तुका ह्मणे सांडीं लटिक्याचा संग । आनंद तो मग प्रगटेल ॥ ४ ॥

॥ ३९६४ ॥

थोडें आहे थोडें आहे । चित्त साहे जालिया ॥ १ ॥ हर्षामर्ष नाहीं अंगीं । पांडुरंगीं सरलें तें ॥ २ ॥ अवघ्या साधनांचें सार । न लगे फार शोधावें ३ तुका ह्मणे लटिकें पाहें । सांडीं देह अभिमान॥४॥

॥ ३९६५ ॥

मान अपमान गोवें । अवघें गुंडूनी ठेवावें ॥१॥ हेंचि देवाचें दर्शन सदा राहे समाधान ॥ २ ॥ शांतीची वसती । तेथें खुंटे काळ गती ॥ ३ ॥ आली ऊर्मी साहे । तुका ह्मणे थोडें आहे ॥ ४ ॥

॥ ३९६६ ॥

चाले हें शरीर कोणाचिये सत्ते । कोण बोलवितें हरीविण ॥ १ ॥
देखवी ऐकवी एक नारायण । तयाचें भजन चुकों नका ॥ २ ॥
मानसाची देव चालवी अहंता । मीचि एक कर्ता ह्मणोनिया ॥३॥
वृक्षाचेंही पान हाले त्याची सत्ता । राहिली अहंता मग कोठें ४ ॥
तुका ह्मणे विठो भरला सबाह्य । तया उणें कांहीं चराचरीं ॥ ५ ॥

॥ ३९६७ ॥

ऐसें कां हो न करा कांहीं । पुढें नाहीं नास त्या ॥१॥ विश्वंभरा शरणागत । भूतजात वंदूनि ॥ २ ॥ श्रुतीचें कां नेघा फळ । सारमूळ जाणोनि ॥ ३ ॥ तुका ह्मणे पुढें कांहीं । वाट नाहीं यावरी ॥ ४ ॥

॥ ३९६८ ॥

ऐसा घेईं कां रे संन्यास । करीं संकल्पाचा न्यास ॥१॥ मग तूं राहें भलते ठायीं । जनीं वनीं खाटे भोईं ॥२॥ तोडी जाणिवेची कळा । होईं वृत्तीसी वेगळा ॥३॥ तुका ह्मणे नभा । परता आणूचाही गाभा ४

॥ ३९६९ ॥

न करीं रे संग राहें रे निश्चळ । लागों नेदीं मळ ममतेचा ॥ १ ॥

या नांवें अद्वैत खरें ब्रह्मज्ञान । अनुभवावांचून बडबड ते ॥ २ ॥ इंद्रियांचा जय वासनेचा क्षय । संकल्पाही न ये वरी मन ॥ ३ ॥ तुका ह्मणे न ये जाणीव अंतरा । अंतरीं या धारा आनंदाचा ॥४॥

॥ ३९७० ॥

भक्ति तें नमन वैराग्य तो त्याग । ज्ञान ब्रह्मीं भोग ब्रह्मतनु ॥ १ ॥ देहाच्या निरसनें पाविजे या ठाया । माझी ऐसी काया जंव नव्हे २ उदक अग्नि धान्य झाल्या घडे पाक । एकाविण एक कामा नये ३ तुका ह्मणे मज कळते चाचणी । बडबडीची वाणी अथवा सत्य ॥४॥

॥ ३९७१ ॥

क्षणक्षणा सांभाळितों । साक्षी होतों आपुला ॥१॥ न घडावी पायीं तुटी । मनें मिठी घातली ॥ २ ॥ विचारतों वचनां आधीं । धरूनि शुद्धी ठेविली ॥३॥ तुका ह्मणे मागें भ्यालों । तरी झालों जागृत ४॥

॥ ३९७२ ॥

शिखा सूत्र तुझा गुंतला जमान । तंववरि तूं जाण श्रुतिदास ॥ १ ॥ त्याची तुज कांहीं चुकतांचि नीत । होसील पतित नरकवासी २ ॥ बहु तूं लाजसी चतुर शाहाणा । शुद्ध आचरणा चुकों नको ॥३॥ शिखा सूत्र याचा तोडीं तूं संबंध । मग तुज बाध नाहीं नाहीं ॥४॥ तुका ह्मणे तरि वर्तूनि निराळा । उमटती कळा ब्रह्मींचिया ॥ ५ ॥

॥ ३९७३ ॥

आपुलिया तुह्मी रूपासी समजा । कासया वरजा आरासिया ॥१॥ हें तों नव्हे देहबुद्धीचें कारण । होईल नारायणें दान केलें ॥ २ ॥ बभ्रूचिया बाणें वर्मासि स्पर्शावें । हें तों नाहीं ठावें मोकलित्या ३॥ तुका ह्मणे बहु सुख या वचना । सत्याविण जाणा चाली नाहीं ॥४॥

॥ ३९७४ ॥

सहज पावतां भगवंतां । परि हीं विकल्पें परतीं । फुकाची हे चित्तीं आठवण कां न धरितां ॥ १ ॥ हरि व्यापक सर्वगत हें तव मुख्यत्वें वेदांत । चिंतनासी चित्त । असों द्यावें सावध ॥२॥ विरजाहोम याचि नांवें । देह नव्हे मी जाणावें । मग कां जी यावें वरी लागे संकल्पा ॥ ३ ॥ कामक्रोधें देह मळिण । स्वाहाकारीं कैचें पुण्य । मंत्रीं पूजियेला यज्ञ । मनमुंडण नव्हेचि ॥४॥ अनन्यभक्तीचे उपाय ते या विठोबाचे पाय । ध्याइल तो काय । जाणें चुकों मारग ॥५॥ आतां सांगे तुका । एक तुह्मी चुकों नका । सांडीमांडी धोका । शरण रिघतां गोमटें ॥ ६ ॥

॥ ३९७५ ॥

मी माझें तुझें । तरि हें उतरतें ओझें ॥ १ ॥ नलगे सांडावें

मांडावें । आहे शुद्धचि स्वभावें ॥ २ ॥ घातला तो आशा । मोहो-जाळें गळां फासा ॥ ३ ॥ सुखाचा तो मान । नाहीं दुःखाचा तो शीण ॥ ४ ॥ करितां नारायण । एवढें वेचितां वचन ॥ ५ ॥ लाभ हानि हे समान । तैसा मान अपमान ॥ ६ ॥ तुका ह्मणे याचें । नांव सोंवळें साचें ॥ ७ ॥

॥ ३९७६ ॥

हेंचि याच्या ऐसें मागावें दान । वंदूनि चरण नारायणा ॥ १ ॥
धीर उदारींव निर्मळ निर्मत्सर । येणें सर्वेश्वर ऐसें नांव ॥ २ ॥
हाचि होईजेल याचिया विभागें । अनुभवी अंगें अनुभवील ३ ॥
जोडे तयाचे कां न करावे सायास । जाला तरि अळस दीनपणें४॥
पावल्यामागें कां न घालावी धांव । धरिल्या तरि हांव बळ येतें ५
तुका ह्मणे घालूं खंडीमध्यें टांक । देवाचे हें एक करुनी घेऊं ॥ ६ ॥

॥ ३९७७ ॥

वाढलिया मान न मनावी निश्चिती । भूतांचिये प्रीती भूतपण १ ॥
ह्मणऊनि मना लावावी कांचणी । इंद्रियांचे झणी ओढी भरे ॥ २ ॥
एका एकपणें एकाचिये अंगीं । लागे रंग रंगीं मिळालिया ॥ ३ ॥
तुका ह्मणे देव निष्काम निराळा । जीवदशे चाळा चळणांचा ॥४॥

॥ ३९७८ ॥

विष्णूमय जग वैष्णवाचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ॥ १ ॥
अइका जी तुम्ही भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ॥ २॥
कोणाही जिवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ॥ ४॥

॥ ३९७९ ॥

पुसावें तें ठाईं आपुल्या आपण । अहंकारा शून्य घालूनिया ॥ १ ॥
येर वाग्जाळ मायेचा अहंकार । वचनाशीं थार अज्ञान तें ॥ २ ॥
फळ तेंचि बीज बीज तेंचि फळ । उपनांवें मूळ न पालटे ॥ ३ ॥
तुका म्हणे अवघे गव्हांचे प्रकार । सोने अलंकार मिथ्या नांव ॥४॥

॥ ३९८० ॥

चित्ताचे बांधले जवळी ते वसे । प्रकाशीं प्रकाशे सर्वकाळ ॥ १ ॥
अंतरीं वसावी उत्तम ते भेटी । होऊं कांहीं तुटी न सकेची ॥ २ ॥
ब्रह्मांड कवळे आठवणेसाठीं । धरावा तो पोटीं वाव बरा ॥ ३ ॥
तुका ह्मणे लाभ घरींचिया घरीं । प्रेमतंतु दोरी न तुटतां ॥ ४ ॥

॥ ३९८१ ॥

साधावा तो देव सर्वस्वाचे साठीं । प्रारब्ध तुटी क्रियमाण ॥१॥
मग कासयानें पुन्हा संवसार । बीजाचें अंकुर दग्ध होती ॥ २ ॥

जिणें दिलें त्यासी द्यावा पिंड दान । उत्तीर्ण चरण धरूनि व्हावे ३
तुका ह्मणे निज भोगईल निजता । नाहीं होईल सत्ता दुजियाची४

॥ ३९८२ ॥

आपुले आपण जाणावें स्वहित । जेणें राहे चित्त समाधान ॥ १ ॥
बहुरंगे माया असे विखुरली । कुंटितचि चाली होता बरी ॥ २ ॥
पूजा ते अबोला चित्ताच्या प्रकारीं । भाव विश्वंभरीं समर्पावा ३॥
तुका ह्मणे गेला फिटोनिया भेव । मग होतो देव मनाचाचि ॥ ४ ॥

॥ ३९८३ ॥

चचळीं चंचळ निश्चळीं निश्चळ । वाजवी खळाळ उदकासी ॥ १ ॥
सोपें वर्म परि मन नाहीं हातीं । हा हा भूत चित्तीं भ्रम गाढा २ ॥
रविबिंब नाहीं तुटत उदका । छायेची ते नका सरी धरूं ॥ ३ ॥
तुका ह्मणे भय धरी रज्जूसाटीं । नाहीं साच पोटीं कळलें तें ॥४॥

॥ ३९८४ ॥

दुजें खंडे तरी । उरला तो अवघा हरि । आपणाबाहेरि । न लगे ठाय धुंडावा ॥ १ ॥ इतुलें जाणावया जाणा । कोणे तरी मनें मना । पारधीच्या खुणा । जाणतेनो साधाव्या ॥ २ ॥ देह आधीं काय खरा । देहसंबंध पसारा । बुजगावणें चोरा । रक्षणसें भासतें ॥ ३ ॥ तुका करी जागा । नको वासपूं वाउगा । आहेसि तूं अंगा। अंगीं डोळे उघडी ॥ ४ ॥

॥ ३९८५ ॥

मृगजळा काय करावा उतार । पावावया पार पैलथडी ॥ १ ॥
खापराचे होन खेळती लेंकुरें । कोण त्या वेव्हारें लाभ हानी ॥ २ ॥
मंगळदायक करिती कुमारी । काय त्यांची खरी सोयरीक ॥ ३ ॥
स्वप्नींचे जें सुख दुःख झालें कांहीं । जागृतीं तो नाहीं साच भाव४
सारीं झाली मेलीं लटिकें वचन । बद्धमुक्त शीण तुका ह्मणे ॥ ५॥

॥ ३९८६ ॥

माया तेंचि ब्रह्म ब्रह्म तेंचि माया । अंग आणि छाया तयापरी ॥१॥
तोडितां न तुटे सारितां निराळीं । लाटांगणांनळीं हारपते ॥ २ ॥
दुजें नाहीं तेथें बळ कोणासाठीं । आणीक ते अटी विचाराची॥ ३ ॥
तुका म्हणे उंच वाढे उंचपणें । ठेंगणीं लवणें जैसीं तैसीं ॥ ४ ॥

॥ ३९८७ ॥

गति अधोगति मनाची हे युक्ति । मन लावी एकांतीं साधुसंगे १ ॥
जतन करा जतन करा । धांवतें सैरा ओढाळ तें ॥ २ ॥
मान अपमान मनाचें लक्षण । लाविलिया ध्यान तेंचि करी ॥ ३ ॥
तुका ह्मणे मन उतरी भवसिंधु । मन करी बंधु चौऱ्यायशीचा ४ ॥

॥ ३९८८ ॥

विचारा वांचून । न पवीजे समाधान ॥ १ ॥ देह त्रिगुणांचा बांधा । माजी नाहीं गुण सुदा ॥ २ ॥ देवाचिये चाडे । देवा द्यावें जें जें घडे ॥ ३ ॥ तुका ह्मणे होतें । बहु गोमटें उचितें ॥ ४ ॥

॥ ३९८९ ॥

देह नव्हे मी हे सरे । उरला उरे विठ्ठल १ ह्मणऊनि लाहो करा । काळ सारा चिंतनें २ पाळणाची नाहीं चिंता । ठाव रिता देवाचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीवासाठीं । देव पोटीं पडेल ॥ ४ ॥

॥ ३९९० ॥

सर्वस्वाची साटी । तरिच देवासवें गांठी ॥ १ ॥ नाहीं तरी जया तैसा । भोग भोगवील इच्छा २ द्यावें तेंचि घ्यावें । ह्मणउनि जीवें जावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे उरी । मागें नुरवितां बरी ॥ ४ ॥

॥ ३९९१ ॥

अमर आह्मां अमर आह्मां । खरें कीं पाहा खोटें हें ॥१॥ न ह्मणां देह माझा ऐसा । मग भरवसा कळेल २ कैंचा धाक कैंचा धाक । सकळिक हें आपुलें ३ देवाचि बरें देवाचि बरें । तुका ह्मणे खरें तुह्मी ४

॥ ३९९२ ॥

आधीं देह पाहतां वाव । कैंचा प्रारब्धासी ठाव १ कां रे रडतोसी भाना । लागें विठ्ठल चरणा ॥ २ ॥ दुर्जेपण जालें वाव । त्रिभुवनीं नाहीं ठाव ३ तुका ह्मणे खरें पाहें । विठ्ठल पाहोनिया राहें ॥ ४ ॥

॥ ३९९३ ॥

नाहीं शब्दाधीन वर्म आहे दुरी । नव्हे तंत्रीं मंत्रीं अनुभव तो १ ॥ हर्षामर्षें अंगीं आदळती लाटा । कामक्रोधें तटा सांडियेलें ॥ २ ॥ न सरे ते भक्ति विठोबाचे पायीं । उपरति नाहीं जेथें चित्ता ॥ ३ ॥ तुका ह्मणे सुख देहनिरसनें । चिंतन चिंतनें तद्रूपता ॥ ४ ॥

॥ ३९९४ ॥

इच्छा चाड नाहीं । न धरी संकोचही कांहीं ॥१॥ उदका नेलें तिकडे जावें । केलें तैसें सहज व्हावें ॥२॥ मोहरी कांदा ऊंस । एक वाफा भिन्न रस ॥३॥ तुका ह्मणे सुख । पीडा इच्छा पावे दुःख ॥४॥

॥ ३९९५ ॥

संदेह बाधका आपआपणयांतें । रज्जुसर्पवत भासतसे ॥ १ ॥ भेऊनिया काय देखिलें येणें । मारें घायेंविण लोळतसे ॥ २ ॥ आपणाचि तारी आपणचि मारी । आपण उद्धरी आपणया ॥ ३ ॥ शुकनळिकेन्यायें गुंतलासी काय । विचारूनि पाहें मोकळिया ॥ ४ ॥ पापपुण्य कैसे मांजिले अंक । दशकाचा एक उरविला ॥ ५ ॥ जाणोनिया काय होतोसि नेणता । शून्या ठाव रिता नाहीं नाहीं ६॥

वुरा दृष्टी पाहें न्याहाळूनि । मृगजळा पाणी न ह्मणे चाडा ॥ ७ ॥
धांवतांचि फुटे नव्हे समाधान । तुका ह्मणे जाण पावे पीडा ॥ ८ ॥

॥ ३९९६ ॥

जें जें जेथें पावे । तें तें समर्पावें सेवे ॥१॥ सहज पूजा याचि नांवें । गळित अभिमानें व्हावें ॥ २ ॥ अवघे भोगिता गोसावी । आर्दी अवसानीं जीवीं ॥३॥ तुका ह्मणे सीण । न धरितां नव्हे भिन्न ॥ ४ ॥

॥ ३९९७ ॥

योग तप याचि नांवें । गळित व्हावें अभिमानें ॥ १ ॥ करणें तें हेंचि करा । सत्यें वरा व्यापार ॥ २ ॥ तरि खंडे येरझारा । निघे भार देहाचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे मानामान । हें बंधन नसावें ॥ ४ ॥

॥ ३९९८ ॥

देह हा सादर पाहावा निश्चित । सर्व सुख येथें नाम आहे ॥ १ ॥
ब्रह्म जें देखणें द्वैत जेव्हां गेलें । शरीर तें झालें ब्रह्मरूप ॥ २ ॥
यजन याजन तप व्रत करिती । विकल्पें नागवती शुद्ध पुण्या ३ ॥
तुका ह्मणे सर्व सुख येथें आहे । भ्रांति दूर पाहें टाकुनिया ॥ ४ ॥

॥ ३९९९ ॥

अक्षरांचा श्रम केला । फळा आला तेणें तो ॥ १ ॥ अवघियाचा तळ धरी । जीवा उरी नुरवुनी ॥२॥ फळलें तें लवे भारें । पिकें खरें आलें तई ॥ ३ ॥ तुका ह्मणे हा गे देव । पुढें भाव सारावा ॥ ४ ॥

॥ ४००० ॥

आशा ते करविते बुद्धीचा लोप । संदेह तें पाप कैसें नव्हे ॥ १ ॥
आपला आपण करावा विचार । प्रसन्न तें सार मन ग्वाही ॥ २ ॥
नांवें रूपें अंगीं लाविला विटाळ । होतें त्या निर्मळ शुद्ध बुद्ध ॥३॥
अंधळयानें नये देखण्याची चाली । चाला ऐसी बोली तुका बोले ४

॥ ४००१ ॥

साहोनिया टोले उरवावें सार । मग अंगीकार खऱ्या मोलें ॥ १ ॥
भोगाचे सांभाळीं द्यावें कळिवर । संचिताची धार मोडूनिया ॥ २ ॥
महत्त्वाचे द्वारीं भोगावी अप्रतिष्ठा । विटवावें नष्टा पंचभूता ॥ ३ ॥
तुका ह्मणे मग कैंचा संवसार । जयाचा आदर तेंचि व्हावें ॥ ४ ॥

॥ ४००२ ॥

भोग भोगावरी द्यावा । संचिताचा करुनी ठेवा ॥ १ ॥ शांती धरणें जिवासाठीं । दया उत्तम गोमटी ॥ २ ॥ देह लेखावें असार । सत्य परउपकार ॥३॥ तुका ह्मणे हे मिरासी । बुडी द्यावी ब्रह्मरसीं ॥४॥

॥ ४००३ ॥

त्याग तरी ऐसा करा । अहंकारा दवडावें ॥१॥ मग जैसा तैसा राहें । काय पाहें उरलें तें ॥ २ ॥ अंतरींचें विषम गाढें । येऊं पुढें नेदावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे शुद्ध मन । समाधान पाहिजे ॥ ४ ॥

॥ ४००४ ॥

शुद्ध ऐसें ब्रह्मज्ञान । करा मन सादर ॥ १ ॥ रवि रसा सकळा शोषी । गुणदोषीं न लिंपे ॥ २ ॥ कोणासवें नाहीं चोरी । सकळांवरी समत्व ॥ ३ ॥ सत्य तरी ऐसें आहे । तुका पाहे उपदेशीं ४

॥ ४००५ ॥

भूतांचिये नांदे जीवीं । गोसावीच सकळा ॥ १ ॥ क्षण क्षणा जागा ठायीं । दृढ पायीं विश्वास ॥ २ ॥ दावूनिया सोंग दुजें । अंतर बीजें वसतसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे धर्म । धरीं तें वर्म चिंतन ॥ ४ ॥

॥ ४००६ ॥

आधीं सोज्वळ करावा मारग । चालतां तें मग गोवी नाहीं ॥ १ ॥ ऐसा चालोनिया आला शिष्टाचार । गोवीचा वेव्हार पापपुण्य ॥२॥ पळणें तों पळा सांडुनि कांबळें । उपाधीच्या मुळें लाग पावे ॥३॥ तुका ह्मणे येथें शूर तो निवडे । पडिले बापुडे कालचक्रीं ॥ ४ ॥

॥ ४००७ ॥

एकविध नारायण । येथें विषमाचा सीण । पालटोंचि भिन्न । नये अणुप्रमाण ॥ १ ॥ अवघें सारावें गबाळ । चुकवूनिया कोल्हाळ । आनंदाचें स्थळ । एकाएकीं एकांत ॥ २ ॥ कायावाचामन स्वरूपींच अनुसंधान । लक्ष भेदी बाण । नेणें पाडें लवलाहो ॥३॥ तुका ह्मणे आळस निद्रा । येथें देउनिया चिरा । देउनिया धिरा । मिठी जाणा जागृती ॥ ४ ॥

॥ ४००८ ॥

देव तोंही बळें धरिला सायासें । करूनिया नास उपाधीचा ॥ १ पूर्वपक्षीं धातु धिःकारिलें जन । स्वयें जनार्दन तेचि झाले ॥ २ ॥ तुका ह्मणे यासी न चले तांतडी । अनुभवें गोडी येइल कळों ॥३॥

॥ ४००९ ॥

भक्तीचें तें वर्म जयाचिये हातीं । तया घरीं शांति क्षमा दया ॥१॥ अष्ट महा सिद्धि वोळगती द्वारीं । न वजती दुरी दवडितां ॥ २ ॥ येथें दुष्ट गुण न मिळे निःक्षेप । चैतन्याचा वास जयामाजी ॥ ३॥ संतुष्ट हें चित्त सदा सर्वकाळ । तुटली हळहळ त्रिगुणाची ॥ ४ ॥ तुका ह्मणे येथें काय तो संदेह । आमचें गौरव आम्ही करूं ॥ ५ ॥

॥ ४०१० ॥

सर्वस्वाचा त्याग तो सदा सोंवळा । न लिंपे विटाळा अग्नि जैसा १ सत्यावादी करी संसार सकळ । अलिप्त कमळ जळीं जैसें ॥ २ ॥ घडे ज्या उपकार भूतांची ते दया । आत्मस्थिति तया अंगीं वसे ३ न बोले गुणदोष नाइके जो कानीं । वर्तोनी तो जनीं जनार्दन ॥४॥ तुका ह्मणे वर्म जाणिल्याविण । पावे करितां सीण सांडीमांडी ॥५॥

॥ ४०११ ॥

पंडित तो भला । नित्य भजे जो विठ्ठला १ अवघें सम ब्रह्म पाहे । सर्वां भूतीं विठ्ठल आहे ॥ २ ॥ रिता नाहीं कोणी ठाव । सर्वां भूतीं वासुदेव ३ तुका ह्मणे तोचि दास । त्या देखिल्या जाती दोष ४ ॥

॥ ४०१२ ॥

अनुसरे तो अमर झाला । अंतरला संसारा १ न देखती गर्भवास । कधीं दास विष्णूचे २ विसंबेना माता बाळा । तैसा लळा पाळावा ॥ ३ ॥ त्रिभुवनीं ज्याची सत्ता । तुक्या रक्षिता तो जाला ॥ ४ ॥

॥ ४०१३ ॥

संवसार तींही केला पाठमोरा । नाहीं द्रव्य दारा जया चित्तीं १ ॥ शुभाशुभ नाहीं हर्षामर्ष अंगीं । जनार्दन जगीं होउनि ठेला ॥ २ ॥ तुका ह्मणे देह दिला एकसरें । जयासि दुसरें नाहीं मग ॥ ३ ॥

॥ ४०१४ ॥

जरि हा हो कृपा करिल नारायण । तरी हेंचि ज्ञान ब्रह्म होय १ ॥ कोठोनिया कांहीं नलगे आणावें । नलगे कोठें जावें तरावया २ ॥ जरी देव कांहीं धरिल पैं चित्तीं । तरि हेचि होती दिव्य चक्षु ३ ॥ तुका ह्मणे देव दावील आपणा । तरि जीवपणा ठाव नाहीं ॥ ४ ॥

॥ ४०१५ ॥

देवें देऊळ सेविलें । उदक कोरडेंचि ठेविलें ॥ १ ॥ नव्हे मत गूढ उमानें कांहीं । तूं आपआपणापें पाहीं ॥ २ ॥ पाठें पूर वोसंडला । सरिता सागर तुंबोनि ठेला ॥३॥ वांझे घरीं बाळ तान्हा । एक बाळी दो कानां ४ तुका ह्मणे पैस । अनुभविया गावा गोडी रस ५॥

॥ ४०१६ ॥

आहे सकळां वेगळा । खेळे कळा चोरोनि ॥ १ ॥ सांत्रसुत्रा-चिये परी । देव दोरी हालविते ॥ २ ॥ आपण राहोनि निराळा । कैसी कळा नाचवी ॥ ३ ॥ जेव्हां अतुडिते दोरी । भूमीवरी पडे तेव्हां ॥ ४ ॥ तुका ह्मणे तो जाणावा । सखा करावा आपुला ॥५॥

॥ ४०१७ ॥

नाहीं रूप नाहीं नांव । नाहीं ठाव धराया १ जेथें जावें तेथें आहे । विठ्ठल मायबहीण २ नाहीं आकार विकार । चराचर भरलेंसे ३ नव्हे निर्गुण सगुण । जाणे कोण तयासी ४ तुका ह्मणे भावाविण । त्याचें मन बोलेना ॥ ५ ॥

॥ ४०१८ ॥

प्रसिद्ध हा असे जगा । अवघ्या रंगारंगाचा ॥ १ ॥ तरी वाटा न वजे कोणीं । नारायणीं घरबुडी ॥ २ ॥ बहुतां ऐसें केलें मागें । लाग लागे लागेना ॥ ३ ॥ हो कां नर अथवा नारी । लहान थोरीं

आदर ॥ ४ ॥ झालें वेगळें लोकीं पुरे । मग नुरे समूळ ॥ ५ ॥ कळेना तो आहे कैसा । कोणी दिशा बहु थोडा ॥ ६ ॥ तुका ह्मणे दुसऱ्या भावें । छाये नावें न देखवे ॥ ७ ॥

॥ ४०१९ ॥

घालुनिया मापीं । देवभक्त बैसले जपीं ॥ १ ॥ तैसी होते सांड-उलंडी । निजनिजांची मुकुंडी ॥ २ ॥ अमुपीं उखतें । आपण वोस आपण यातें ॥ ३ ॥ देव आतां झाला । उगवे संकोच वाहिला ॥४॥ अखंड नेलें वेठी । भार सत्याविण गांठी ॥ ५ ॥ आडकिला झोंपा । रिता कळिचराचा खोंपा ॥ ६ ॥ गोदातीरीं आड । करिते करविते झाड ॥ ७ ॥ तुका ह्मणे बळें । उपदेशाचें तोंड काळें ॥ ८ ॥

॥ ४०२० ॥

ब्रह्मस्वरूपाचीं कर्में ब्रह्मरूप । विरहित संकल्प होती जाती ॥ १ ॥ ठेविलिया दिसे रंगापेसी शिळा । उपाधि निराळा स्फटिक मणि २ नानाभाषमतें आळविती बाळा । प्रबोधी तो मूळा जननीठायीं ३ ॥ तुका ह्मणे माझें नमन जाणतिया । लागतसें पायां वेळोवेळां ॥ ४ ॥

॥ ४०२१ ॥

स्वयें पाक करी । संशय तोचि धरी । संदेह सागरीं । आणीक परी बुडती ॥ १ ॥ जाणे विरळा एक । झालें तेथींचें हें सुख । देखिले बहुतेक । पुसतां वाट चुकले ॥ २ ॥ तोचि जाणे सोंवळें । शोधी विकल्पाचीं मुळें । नाचती पाल्हाळें । जे विटाळें कोंडिले ॥३॥ तोचि साधी संधी । सावधान त्रिकाळ बुद्धि । संदेहाचा संधी । वेठी आणीक धरियेली ॥४॥ अखंड तें ध्यान । समबुद्धि समाधान । सोंग वांयाविण । ते झांकून बैसती ॥५॥ करणें जयासाठीं । जो नातुडे कवणे आटी । तुका ह्मणे साटी । चित्तवित्तें वांचूनि ॥६॥

॥ ४०२२ ॥

चित्ताचा चाळक । त्याचें उभय सूत्र एक ॥ १ ॥ नाचवितें नाचे छंदें । सुखें आपुल्या विनोदें ॥ २ ॥ चंद्र कमळणी । नाहीं धाडीत सांगोनि ॥ ३ ॥ तुका ह्मणे उटी । लोह चुंबकाचे दृष्टी ॥ ४ ॥

॥ ४०२३ ॥

काय नाहीं माझे अंतरीं वसति । व्यापक हा भूतीं सकळां नांदे १ चित्तासी प्रसाद होईल चळण । तोचि तें वळण मनासही ॥ २ ॥ सर्व शक्ति जीवीं राहिल्या कुंटित । नाहीं केलें होत आपुलें तें ॥३॥ तुका ह्मणे दोरी खांब सूत्र्या हातीं । नाचवी नाचतीं जडे तैसीं ४ ॥

॥ ४०२४ ॥

चित्त तें चिंतन कल्पनेची धांव । जे जे वाटे हांव इंद्रियांची ॥ १ ॥

हात पाय दिसे शरीर चालतां । नांवें भेद सत्ता जीवाची ते ॥ २॥
रवीचिये अंगीं प्रकाश सकळा । वचनें निराळा भेद दिला ॥ ३ ॥
तुका म्हणे माप वचनाच्या अंगीं । मौल्य काय रंगीं निवडावें ॥४॥

॥ ४०२५ ॥

परिसाचे अंगें सोनें झाला विळा । वाकणें या कळा हीन नव्हे ॥१॥
अंतरीं पालट घडला कारण । मग समाधान तेंचि गोड ॥ २ ॥
पिकली या सेंद पूर्वकर्मा नये । अव्हेरु तो काये घडे मग ॥ ३ ॥
तुका म्हणे आणा पंगती सुरण । पृथक ते गुण केलें पाकें ॥ ४ ॥

॥ ४०२६ ॥

शुद्धाशुद्ध निवडे कैसें । चर्म मास भिन्न नाहीं १ कांहीं अधिक नाहीं उणें । कवण्या गुणें देवासी ॥ २ ॥ उदक असे भिन्न काई । वाहाळ बावी सरिता नई ॥ ३ ॥ सूर्य तेजें निवडी काय । रश्मी रसा सकळा साय ॥ ४ ॥ वर्णा भिन्न दुधा नाहीं । सकळा गाई सारखें ॥ ५ ॥ करितां भिन्न नाहीं माती । मडक्या गति भिन्न नांवें ॥ ६ ॥ वर्त्ते एकविध अग्नि । नाहीं मनीं शुद्धाशुद्ध ॥ ७ ॥ तुका ह्मणे पात्र चाड । किंवा विषें अमृत गोड ॥ ८ ॥

॥ ४०२७ ॥

जीविता तो माझा पिता । उखता तो उखत्यांचा १ जनार्दनीं सरती करीं ।। बाधा भ्रमें अन्यत्र २ अपसव्य सव्यामधीं । ऐसी शुद्धी न धरितां ३ तुका ह्मणे खांद्या पानें । सिंचनतां भिन्न कोरडीं ॥ ४ ॥

॥ ४०२८ ॥

अग्नीमाजी पडे धातु । लीन होउनि राहे आंतु ॥ होय शुद्ध न पावे धातु । परंतुप्रमाण ॥१॥ बाह्यरंगानें कारण । मिथ्या अवघेंचि भाषण ॥ गर्व नाश हें अज्ञान । मरण स्वयें वाहातासे ॥ २ ॥ पुरें मातलिया नदी । लव्हा नांदे जीवनसंधी ॥ वृक्ष उन्मळोनि भेदी । परि तो कधीं भंगना ॥ ३ ॥ हस्ती परदळा जो भंगी । तया पायीं न मरे मुंगी ॥ कोण जाय संगीं । प्राणाचाणीं तयाच्या ॥ ४ ॥ पिटितां घणें वरि सैरा । तया पोटीं राहे हिरा ॥ तैसा काय नगनी गारा । तया थोरा होऊनि ॥ ५ ॥ लीन दीन हेंचि सार । भव उतरावया पार ॥ बुडे माथां भार । तुका म्हणे वाहोनि ॥ ६ ॥

॥ ४०२९ ॥

योगियाची संपदा त्याग आणि शांति । उभयलोकीं कीर्ति सोहळा मान ॥ १ ॥ येरयेरांवरी जायांचें उसणें । भाग्यस्थळीं देणें झाडा-वेसीं ॥ २ ॥ केलिया फावला ठायींचा तो लाहो । तृष्णेचा तो काहो काहाविता ॥ ३ ॥ तुका ह्मणे लाभ अकर्तव्या नांवें । शिव-पद जीवें भोगिजेल ॥ ४ ॥

॥ ४०३० ॥

आहे तें सकळ कृष्णाशी अर्पण । न कळतां मन दुजें भावी ॥ १ ॥ म्हणऊनी पाठी लागतील भूतें । येती गिवसीत पांचजणें ॥ २ ॥ ज्याचें त्या वेचलें आठव न होतां। दंड या निमित्ताकारणें हा॥३॥ तुका ह्मणे काळें चेपियेला गळा । मी मी वेळोवेळा करीतसे॥४॥

॥ ४०३१ ॥

ओनाम्याच्या काळें । खडे मांडविले बाळें ॥ १ ॥ तेंचि पुढें पुढें काई । मग लागलिया सोई ॥ २ ॥ रज्जु सर्प होता । तोंवरीचि न कळतां ॥ ३ ॥ तुका ह्मणे साचें । भय नाहीं बागुलाचें ॥ ४ ॥

॥ ४०३२ ॥

चित्त ग्वाही तेथें लौकिकाचें काई । स्वहित तें ठायीं आपणापें १॥ मनोसीं विचार तोचि साच भाव । व्यापक हा देव अंतर्बाहीं ॥२॥ शुद्ध भावा न लगे सुचावा परिहार । उमटे साचार आणिके ठायीं३ भोगित्यासी काज अंतरींचें गोड । बाहिरल्या चाड नाहीं रंगे ॥४॥ तुका ह्मणे भाव शुद्ध हें कारण । भाट नारायण होईल त्यांचा ५ ॥

॥ ४०३३ ॥

देखीच्या दिमाख शिकोनिया दावी । हिऱ्या ऐसी केवीं गारगोटी१॥ मर्यादा ते जाणे अरे अभागिया । देवाच्या ऐसिया सकळ मूर्ति२॥ काय पडिलेंशी लटिक्याचे भरी । चोंवाळुनि थोरी परती सांडीं ३॥ तुका ह्मणे पुढें दिसतसे घात । करितो फजित म्हणऊनी ॥ ४ ॥

॥ ४०३४ ॥

ठेवा जाणीव गुंडून । येथें भावचि प्रमाण ॥ १ ॥ एका अनुसरल्या काज । अवघें जाणे पंढरिराज ॥ २ ॥ तर्कवितर्कांसि । वाव नलगे सायासीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे भावेंविण । अवघा बोलतो तो सीण४॥

॥ ४०३५ ॥

येथें दुसरी न सरे आटी । देवा भेटी जावया ॥ १ ॥ तोचि ध्यावा एक चित्तें । करुनि रितें कळिवर ॥ २ ॥ षडउर्मी हृदयांत । यांचा अंत पुरवूनि ॥ ३ ॥ तुका ह्मणे खुंटे आस । तेथें वास करी तो ॥ ४ ॥

॥ ४०३६ ॥

मुक्त तो आशंका नाहीं जया अंगीं । बद्ध मोहोसंगीं लज्जा चिंता१ सुख पावे शांती धरूनि एकांत । दुःखी तो लोकांत दंभ करी २ ॥ तुका ह्मणे लागे थोडाच विचार । परी हे प्रकार नागवती ॥ ३ ॥

॥ ४०३७ ॥

कुशळ वक्ता नव्हे जाणीव श्रोता । राहे भाव चित्ता धरूनिया ॥ १ ॥ धन्य तो जगीं धन्य तो जगीं । ब्रह्म तया अंगीं वसतसे ॥ २ ॥ न धोवी तोंड न करी अंघोळी । जपे सदाकाळीं रामनाम ॥ ३ ॥

जप तप ध्यान नेणे योग युक्ति । कृपाळु जो भूर्ती दयावंत ॥ ४ ॥
तुका म्हणे होय जाणोनि नेणता । आवडे अनंता जीवाहूनि ॥५॥

॥ ४०३८ ॥

वासनेच्या मुखीं अदळूनि भीतें । निर्वाहापुरतें कारण तें ॥ १ ॥
या नांव अंतरा आला नारायण । चित्त समाधान खूण त्याची ॥२॥
सर्वकाळ ह्याचि करणें विचार । विवेकीं सादर आत्मत्वाचे ॥ ३ ॥
तुका म्हणे जों जों भजनासी बोळे । अंगीं तों तों कळे सन्निधता ४॥

॥ ४०३९ ॥

देह आणि देहसंबंधें निंदावीं । इतरें वंदावीं श्वानशूकरें ॥ १ ॥
येणें नांवें झाला मी माझ्याचा झाडा । मोह नांवें खोडा गर्भवास २॥
गृह आणि वित्त स्वदेशा विटावें । इतरां भेटावें श्वापदांझाडां ॥३॥
तुका म्हणे मी हें माझें न यो वाचे । येणें नांवें साचें साधुजन ॥४॥

॥ ४०४० ॥

अंतरींचें ध्यान । मुख्य या नांवें पूजन ॥ १ ॥ उपाधि तें अवघें पाप । गोड निरसतां संकल्प ॥ २ ॥ आज्ञा पाळावी हा धर्म । जाणते हो जाणा वर्म ॥ ३ ॥ तुका म्हणे वृत्ति । अविट हे सहज स्थिति ॥४॥

॥ ४०४१ ॥

मुक्त होता परि बळें झाला बद्ध । घेउनिया छंद माझें माझें ॥ १ ॥
पाप पुण्य अंगीं घेतलें जडून । वर्म नेणे कोण करिता तो ॥ २ ॥
तुका म्हणे व्यर्थ गेलें वाया विण । मृग पावे शीण मृगजळीं ॥३॥

॥ ४०४२ ॥

तापल्यावांचून नव्हे अळंकार । पिटूनिया सार उरलें तें ॥ १ ॥
मग कदाकाळीं नव्हे शुद्ध जाति । नासे शत्रु होती मित्र तेचि २ ॥
काळिवर बरें भोगूं द्यावें भोगा । फांसिलें तें रोगा हातीं सुटे ॥ ३ ॥
तुका ह्मणे मन करावें पोटळ । सातावेचि जाळ सिजेवरि ॥ ४ ॥

॥ ४०४३ ॥

वचन तें नाहीं तोडित शरीरा । भेदत अंतरा वज्रापरीस ॥ १ ॥
कांहीं न सहावे काशाही कारणें । संदेह निधान देह बळी ॥ २ ॥
नाहीं शब्द मुखीं लागत निखट । नाहीं जड होत पोट तेणें ॥ ३ ॥
तुका ह्मणे जरी गिळे अहंकार । तरी वसे घर नारायण ॥ ४ ॥

॥ ४०४४ ॥

देवाच्या उद्देशीं जेथें जेथें भाव । तो तो वसे ठाव विश्वंभरें ॥ १ ॥
लोभाचें संकल्प पळालियावरी । कैंची तेथें उरी पापपुण्या ॥ २ ॥
शुद्ध भक्ती मन जालिया निर्मळ । कुश्चळी विटाळ वज्रलेप ॥ ३ ॥
तुका ह्मणे ज्याचें तयासीच कळे । प्रांत येतो फळें कळों मग ॥ ४ ॥

॥ ४०४५ ॥

लौकिकासाटीं या पसाऱ्याचा गोवा । कांहीं नाहीं देवा लागा येत १ ठेवावा माथा तो नुचलावा पायीं । ठायींचिये टायीं हालों नये २॥ ढवळिल्या मनें वितळलें रूप । नांव ऐसें पाप उपाधीचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे देव प्रीतीनें कवळी । ठेवील जवळी उठवूनि ॥ ४ ॥

॥ ४०४६ ॥

भूतीं भगवद्भाव । मात्रासहित जीव । अद्वैत तो ठाव । निरंजन एकला ॥ १ ॥ ऐसीं गर्जती पुराणें । वेदवाणी सकळ जन । संत गर्जतील तेणें । अनुभवें निर्भर ॥ २ ॥ माझें तुझें हा विकार । निरसतां एकंकार । नलगे कांहीं फार । विचाराचें करणें ३ तुका ह्मणे दुजें हें तों नाहींच सहजें । संकल्पाच्या काजें । आपेआप वाढलें ४॥

॥ ४०४७ ॥

हारपल्याची नका चिंत्तीं । धरूं खंती वायाच १ पावलें तें ह्मणा देवा सहज सेवा या नांव २ होणार तें तें भोगें घडे । लाभ जोडे संकल्पें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मोकळें मन । अवघें पुण्य या नांवें ॥४॥

॥ ४०४८ ॥

आहार निद्रे नलगे आदर । आपण सादर तेचि होय ॥ १ । परिमितीविणें बोलणें तें वाया । फार थोडें काया पिंड पीडी ॥२॥ समाधान त्याचें तोचि एक जाणे । आपुलिये खुणे पावोनिया ३ ॥ तुका ह्मणे होय पीडा ते न करीं । मग राहें परी भलतिये ॥ ४ ॥

॥ ४०४९ ॥

भूमि अवघी शुद्ध जाणा । अमंगळ हे वासना ॥ १ ॥ तैसे वोसपले जीव । सांडी नसतां अंगीं घाव ॥ ॥ २ ॥ जीव अवघे देव । खोटा नागवी संदेह ॥ ३ ॥ तुका ह्मणे शुद्ध । मग तुटलिया भेद ॥ ४ ॥

॥ ४०५० ॥

निघालें दिवाळें । जालें देवाचें वाटोळें ॥१॥ आतां वेचूं नये वाणी । विचारावें मनींच्या मनीं ॥ २ ॥ गुंडाळिलीं पोतीं । भीतरी लाविलेली वाती ॥ ३ ॥ तुका म्हणे करा । ऐसा राहे माजी घरा ॥ ४ ॥

॥ ४०५१ ॥

काय साधनाच्या कोटी । केल्या आटी होती त्या ॥ १ ॥ देव कृपा करी जरी । होय उजरी स्वरूपीं ॥२॥ केले होते व्यर्थ श्रम । उपरम न होतां ॥३॥ तुका ह्मणे कळों आलें । सर्व जालें आपरूप ॥४॥

॥ ४०५२ ॥

हात पाय मिळोनि मेळा । चला म्हणती पाहों डोळा ॥ १ ॥ देखणी नव्हे देखती कैसे । सकळांचा देखणा डोळाचि असे ॥ २ ॥ डोळयाचा डोळा पाहों गेला । तुका ह्मणे तो पाहों ठेला ॥ ३ ॥

॥ ४०५३ ॥

प्रगटलें ज्ञान । नारायण मूर्ती तें ॥ १ ॥ अनुभवचि घेऊं व्हावा । विनंती देवा करूनिया ॥२॥ देशोवेशीं वदे वाणी । पडिल्या कानीं प्रमाणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे योगक्षेम । घडे तें वर्म साधावें ॥ ४ ॥

॥ ४०५४ ॥

देह आहे सुकाळ देशीं । अभाग्यासी दुर्भिक्षा ॥१॥ नेणती हा करूं सांटा । भरलें फांटा आडरानें ॥ २ ॥ वसवूनि असे घर । माग दूर घातला ॥ ३ ॥ तुका ह्मणे मन मुरे । मग जें उरे तेंचि तूं ॥ ४ ॥

॥ ४०५५ ॥

होईल जाला अंगें देव जो आपण । तयासी हे जन अवघे देव १ ॥ येरांनीं सांगावी रेमट काहाणी । चित्तारंजविणी करावया ॥ २ ॥ धाला आणिकांची नेणे तान भूक । सुखें पाहे सुख आपुलिया ३ ॥ तुका ह्मणे येथें पाहिजे अनुभव । शब्दाचें गौरव कामा नये ४ ॥

॥ ४०५६ ॥

आहे ऐसा देव वदवावी वाणी । नाहीं ऐसा मनीं अनुभवावा॥१॥ आवडी आवडी कळिवरा कळिवरीं । वरिली अंतरीं ताळी पडे २॥ अपूर्व दर्शन मातेपुत्रा भेटी । रडूं मागें तुटी हर्षयोगें ॥ ३ ॥ तुका म्हणे एकें कळतें दुसरें । बरियाचें बरें आहाचें आहाच ॥४॥

॥ ४०५७ ॥

तेंही नव्हे जें करितां कांहीं । ध्यातां ध्यायीं तेंही नव्हे १ तेंही नव्हे जें जाणवी जना । वाटे मना तेंही नव्हे २ त्रास मानिजे कांटाळा । अशुभ वाचाळ तेंही नव्हे ३ तेंही नव्हे जें भोंवतें भोंवे । नागवें धांवे तेंही नव्हे ४ तुका ह्मणे एकचि आहे । सहजीं पाहें सहज ५

॥ ४०५८ ॥

एकली वना चालली राना । चोरुनि जना घराचारी ॥१॥ कोणी नाहीं संगी सवे । देहभावें उदास ॥ २ ॥ जाउनि पडे दुर्घट वनीं । श्वापदांनीं वेढिली ॥३॥ मार्ग न चले जातां पुढें । भय गाढें उदेलें ४ मागील मार्ग अंतरलीं । पुढील चाली खोळंबा ॥ ५ ॥ तुका म्हणे चिंती यासी । हृदयस्थासी आपुल्या ॥ ६ ॥

॥ ४०५९ ॥

पहिली माझी ओवी ओवीन जगत्र । गाईन पवित्र पांडुरंग ॥ १ ॥ दुसरी माझी ओवी दुजें नाहीं कोठें । जनीं वनीं भेटे पांडुरंग ॥ २॥ तिसरी माझी ओवी तिला नाहीं ठाव । अवघाचि देव जनीं वनीं ॥३॥ चवथी माझी ओवी वैरिलें दळण । गाईन निधान पांडुरंग ॥ ४ ॥ पांचवी माझी ओवी माझिया माहेरा । गाईन निरंतरा पांडुरंगा ५॥ साहावी माझी ओवी साहाही आटले । गुरुमूर्ति भेटले पांडुरंग ॥६॥

सातवी माझी ओवी आटवे वेळोवेळा । बैसलासे डोळा पांडुरंग ७
आठवी माझी ओवी अठ्ठावीस युगें । उभा चंद्रभागे पांडुरंग ॥८॥
नववी माझी ओवी सरलें दळण । चुकलें मरण संसारींचें ॥ ९ ॥
दहावी माझी ओवी दहा अवतारा । न यावें संसारा तुका ह्मणे १०

उत्तराधि पदें.

॥ ४०६० ॥

क्या गाऊं कोई सुननेवाला । देखें तों सब जग ही भुला ॥ १ ॥
खेलों आपनें रामहि सात । जैसी वैसी करहो मात ॥ २ ॥
कांहासे लाऊं मधुरा बानी । रीझे ऐसी लोक बिरानी ॥ ३ ॥
गिरिधर लाल तो भावका भुका । राग कला नहिं जानत तुका ४ ॥

॥ ४०६१ ॥

छोडे धन मंदिर बन बसाया । मांगत तुका घरघर खाया ॥ १ ॥
तीनसों हम करवों सलाम । ज्यामुख बैठा राजाराम ॥ २ ॥
तुलसीमाला बभूत चऱ्हावे । हरजीके गुण निर्मल गावे ॥ ३ ॥
कहे तुका जो सांई हमारा । हिरनकश्यप जिन्हे मारहि डारा ॥४॥

॥ ४०६२ ॥

मंत्रतंत्र नहिं मानत साखी । प्रेमभाव नहिं अंतर राखी ॥ १ ॥
राम कहे त्याके पग हूं लागूं । देखत कपट अभिमान दुर भागूं ॥२॥
अधिक याती कुलहीन नहिं जानूं । जाने नारायन सो प्रानी मानूं ३
कहे तुका जीव तन डारू वारी । राम उपासिहूं बलियारी ॥ ४ ॥

॥ ४०६३ ॥

हरिसूं मिल दे एकहि बेर । पाछें तूं फिर नावे घेर ॥ १ ॥
मात सुनों दुति आवे मनावन । जाया करति भर जोबन ॥ २ ॥
हरिसुख मोहि कहिया न जाये । तब तूं बुझे आगो पाये ॥ ३ ॥
देखहि भाव कछु एकरी हात । मिलाई तुका प्रभुसात ॥ ४ ॥

॥ ४०६४ ॥

क्या कहूं नहिं बुझत लोका । लिजावे जम मारत धोका ॥ १ ॥
क्या जीवनेकी पकडी आस । हातों लिया नहिं तेरा घांस ॥ २ ॥
किसे दिवाने कहता मेरा । कछु जावे तन तूं सब त्या न्यारा ॥ ३ ॥
कहे तुका तूं भया दिवाना । आपना विचार करले जना ॥ ४ ॥

॥ ४०६५ ॥

कब मरूं पाऊं चरन तुम्हारे । ठाकुर मेरे जीवन प्यारे ॥ १ ॥
जग डरे ज्याकूं सो मोहि मीटा । मीठा दर आनंदसोहि पैठा ॥ २ ॥
भला पाऊं जनम इन्हे बेर । बस मायाके असंग फेर ॥ ३ ॥
कहे तुका धन मानहि दारा । बोहि लिये गुंडलीया पसारा ॥ ४ ॥

॥ ४०६६ ॥

दासों पाछें दौरे राम । सोवे खडा आपें मुकाम ॥ १ ॥ प्रेमरसडी बांधी गले । खैंच चले उधर चेले ॥ २ ॥ आपने जनसुं भूल न देवे । कर हि धर आधें बाट बतावे ॥ ३ ॥ तुकाप्रभु दीनदयाला । वारि रें तुज पर हूं गोपाला ॥ ४ ॥

॥ ४०६७ ॥

ऐसा कर घर आवे राम । और धंदा सब छोर हि काम ॥ १ ॥ इतने गोते काहे खाता । जब तूं आपना भूल न होता ॥ २ ॥ अंतरजामी जानत साचा । मनका एक उपर वाचा ॥ ३ ॥ तुकाप्रभु देशविदेस । भरिया खाली नहि लेस ॥ ४ ॥

॥ ४०६८ ॥

मेरे रामको नाम जो लेवे वारोंवार । त्या के पाऊं मेरे तनकी पैजार ॥ १ ॥ हांसत खेलत चालत बाट । खाना खाते सोते खाट २ जातनसूं मुजे कछु नहिं प्यार । असतेके नहि हिंदू धेड चंभार ३ ॥ ज्याका चित लगा मेरे रामको नाम । कहे तुका मेरा चित लगा त्याके पाव ॥ ४ ॥

॥ ४०६९ ॥

आपें तरे त्याकी कोण बराई । औरनकूं भलो नाम घराई ॥ १ ॥
काहे भूमि इतना भार राखे । दुभत धेनु नहिं दुध चाखे ॥ २ ॥
बरसते मेघ फलतेहि बिरखा । कोन काम आपनी उन्होति रखा ३
काहे चंदा सुरज खावे फेरा । खिन एक बैठण पावत घेरा ॥ ४ ॥
काहे परिस कंचन करे धातु । नहिं मोल तुटत पावत घातु ॥ ५ ॥
कहे तुका उपकार हि काज । सब कर रहिया रघुराज ॥ ६ ॥

॥ ४०७० ॥

जग चले उस घाट कोन जाय । नहिं समजत फिरफिर गोते खाय १॥
नहिं एक दो सकल संसार । जो बुझे सो आगला स्वार ॥ २ ॥
उपर स्वार बैठे तृष्णापीट । नहिं बाचे कोइ जावे लूट ॥ ३ ॥
देख हि डर फेर बैठा तुका । जोबत मारग राम हि एका ॥ ४ ॥

॥ ४०७१ ॥

भले रे भाई जिन्हें किया चीज । आछा नहिं मिलत बीज ॥ १ ॥
फीरतफीरत पाया सारा । मीटत लोले धन किनारा ॥ २ ॥
तीरथ बरत फिर पाया जोग । नहिं तलमल तुटत भवरोग ॥ ३ ॥
कहे तुका मैं तोको दास । नहिं सिरभार चलावे पास ॥ ४ ॥

॥ ४०७२ ॥

लाल कमली ओढे पेनाये । मोसु हरिये कैसे बनाये ॥ १ ॥
कहे सखि तुझे कराति सोर । हिरदा हरिका कठिन कठोर ॥ २ ॥

नहिं क्रिया सरम कछू लाज । और सुनाउं बहुत हे भाज ॥ ३ ॥
और नामरूप नहिं गोवलिया । तुक प्रभु माखन खाया ॥ ४ ॥

॥ ४०७३ ॥

राम कहो जीवना फल सो ही । हरिभजनसुं विलंब न पाई ॥ १ ॥
कवनका मंदर कवनकी झोपरी । एक रामबिन सब हि फुकरी ॥ २ ॥
कवनकी काया कवनकी माया । एकराम बिन सब हि जाया ॥ ३ ॥
कहे तुका सब हि चलनार । एकराम बिन नहिं बा सार ॥ ४ ॥

॥ ४०७४ ॥

काहे भुलो धनसंपत्ती घोर । रामनाम सुन गाउ हो बाप रे ॥ १ ॥
राजे लोक सब कहे तूं आपना । जब काल नहिं पाया ठाना ॥ २ ॥
माया मिथ्या मनका सब धंदा । तजो अभिमान भजो गोबिंदा ३ ॥
राना रंक डोंगरकी राई । कहे तुका करे इलाहि ॥ ४ ॥

॥ ४०७५ ॥

काहे रोवे आगले मरना । गंव्हार तूं भूला आपना ॥ १ ॥ केते मालुम नहिं पडे । नव्हे पडे गये सो ॥ २ ॥ बाप भाई लेखा नहिं । पाछे तूं हि चलनार ३ काले बाल सिपत भये । खबर पकडो तुका कहे ४

॥ ४०७६ ॥

क्या मेरे राम कवन सुख सारा । कहकर दे पुछु दास तुह्मारा १ ॥
तनजोबनकी कोन बराई । ब्याधपीडा दिस काटहि खाई ॥ २ ॥
कीर्त बधाऊं तो नाम न मेरा । काहे झुटा पछतऊं घेरा ॥ ३ ॥
कहे तुका नहिं समजत मात । तुम्हारे शरन हे जोडत हात ॥ ४ ॥

॥ ४०७७ ॥

देखत आखो झुटा कोरा । तो काहे छोरा घरबार ॥ १ ॥ मनसुं किया चाहिये पाख । उपर खाक पसारा ॥ २ ॥ कामक्रोधसो संसार । वो सिरभार चलावे ३ कहे तुका सो संन्यास । छोडे आस तनकी हि ४

॥ ४०७८ ॥

रामभजन सब सार मिठाई । हरि संताप जनमदुख राई ॥ १ ॥ दूधभात घृत सकरपारे । हरते भूक नहि अंततारे २ खावते जुग सब चलिजावे । खटामिटा फिर पचतावे ॥ ३ ॥ कहे तुका राम-रस जो पीवे । बहुरीही फेरा वो कबहु न खावे ॥ ४ ॥

॥ ४०७९ ॥

बारबार काहे मरत अभागी । बहुरी मरनसे क्या तोरे भागी ॥ १ ॥
ये हि तन करते क्या ना होय । भजन भगति करे बैकुंठे जाय २ ॥
रामनाम मोल नहिं बेचे कवरि । वो हि सब माया छुरावत सगरी ३
कहे तुका मनसुं मिल राखो । रामरस जिव्हा नित चाखो ॥ ४ ॥

॥ ४०८० ॥

जोडुनिया कर चरणीं ठेविला माथा। परिसावी विनंती माझी पंढरीनाथा ॥ १ ॥ असो नसो भाव आलों तुझिया ठाया। कृपादृष्टी पाहे मजकडे पंढरीराया ॥ २ ॥ अखंडित असावें ऐसें वाटतें पायीं। तोहोनी संकोच ठाव थोडासा देई ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मी तुह्मी वेडीं वांकुडी। नामें भवपाश हस्तें आपुल्या तोडीं ॥ ४ ॥

॥ ४०८१ ॥

ऐसी वाट पाहे कांहीं निरोप कां मूळ। कांहो कळवळा तुम्हां उमटेचि ना ॥ १ ॥ आहो पांडुरंगे पंढरीचे निवासे। लावूनिया आसे माळवूनी ठेविलें ॥२॥ काय जन्मा येऊनिया केली म्या जोडी। ऐसा घडीघडी चित्ता येतो आठव ॥ ३ ॥ तुका म्हणे खरा न पवेचि विभाग। धिक्कारितें जग हेंचि लाहो हिशोबें ॥ ४ ॥

॥ ४०८२ ॥

माझें चित्त तुझे पायीं राही ऐसें करीं कांहीं। धरुनिया बाहीं भव हा तारीं दातारा ॥ १ ॥ चतुरा तूं शिरोमणी गुण लावण्याची खाणी। मुकुट सकळामणी धन्य तूंचि विठोबा ॥२॥ करी या तिमिराचा नाश उदय होऊनि प्रकाश। तोडी आशापाश करी वास हृदयीं ॥३॥ पायीं जडलों नेणता माझी असो तुम्हा चिंता। तुका ठेवी माथा पायीं आतां राखावें ॥ ४ ॥

॥ ४०८३ ॥

कामें नेलें चित्त नेदी अवलोकूं मुख। बहु धाटे दुःख फुटो पाहे हृदय ॥१॥ कां गा सासुरवासी मज केलें भगवंता। अपुलिया सत्ता स्वाधीनता ते नाहीं ॥ २ ॥ प्रभातेसी वाट तुमच्या यावें दर्शना। येथें न चले चोरी उरली राहे वासना ॥ ३ ॥ येथें अवघे वाया गेले दिसती सायास। तुका ह्मणे नाश दिसे जालया वेचाचा॥४

॥ ४०८४ ॥

बोलोनीया दाऊं कां तुह्मी नेणा जी देवा। ठेवाल तैं ठेवा ठायीं तैसा राहेन ॥१॥ पांगुळलें मन कांहीं नाठवे उपाय। ह्मणऊनी पाय जीवीं धरूनी राहिलों ॥ २ ॥ त्याग भोग दुःख काय सांडावें मांडावें। ऐसी धरियेली जीवें माझ्या थोर अशंका ॥ ३ ॥ तुका ह्मणे बाळ माता चुकलिया वनीं। न पवतां जननी मरणा पहावे विठ्ठला॥४

॥ ४०८५ ॥

तुझें दास्य करूं मागूं आणिका खावया। धीग जिणें झालें माझें पंढरीराया ॥१॥ काय गा विठोबा तुज आतां म्हणावें। शुभाशुभ कामें तुह्मां थोरांच्या नांवें ॥२॥ संसाराचा धाक निरंतर आम्हासी।

मरणें भलतें परी काय अवकळा ऐशी ॥ ३ ॥ तुझा शरणागत शरण जाऊं आणिकांसी । तुका ह्मणे लाज हे का कोणा नेणसी ४॥

॥ ४०८६ ॥

कां गा केविलवाणा केलों दीनाचा दीन । काय तुझी हीन शक्ति जालीसे दिसे ॥ १ ॥ लाज येते मना तुझा ह्मणवितां दास । गोडी नाहीं रस बोलिलींया सारिखी ॥२॥ लाजविलीं मागें संतां-चीं हीं उत्तरें । कळों येतें खरें दुजें एकावरूनी ३ तुका ह्मणे माझी कोणी वदविली वाणी । प्रसादावांचूनी तुमचिया विठ्ठला ॥ ४ ॥

॥ ४०८७ ॥

जळो माझें कर्म वाया केली कटकट । जालें तैसें परि नाहीं आलें अनुभवा ॥१॥ आतां पुढें धीर काय देऊं या मना । ऐसें नारायणा प्रेरिलें तें पाहिजे ॥ २ ॥ गुणवंत केलों दोष जाणायासाठीं । माझे माझे पोटीं बळकट दूषण ॥ ३ ॥ तुका ह्मणे अहो केशीराजा दयाळा । बरवा हा ळळा पाळियेला शेवटीं ॥ ४ ॥

॥ ४०८८ ॥

जळोत तीं येथें उपजविती अंतराय । सायासाची जोडी माझी तुमचे पाय ॥ १ ॥ आतां मज साह्य येथें करावें देवा । तुझी घेई सेवा सकळ गोवा उगवूनी ॥ २ ॥ भोगें रोगा जोडोनियां दिलें आणिकां । अरुचि ते हो कां आतां सकळांपासूनि ॥ ३ ॥ तुका ह्मणे असो तुझें तुझे मस्तकीं ॥ नाहीं ये लौकिकीं आतां मज वर्तणें ॥ ४ ॥

॥ ४०८९ ॥

केली कटकट गाऊं नाचों नेणतां । लाज नाहीं भय आह्मां पोटाची चिंता ॥ १ ॥ बैसा सिणलेती पाय रगडूं दातारा । जाणवूं द्या वारा उब झाली शरीरा ॥ २ ॥ उशिरा उशीर किती काय ह्मणावा । जननिये बाळका कोप कांहीं न धरावा ॥ ३ ॥ तुझिये संगतीं आह्मी करूं कोल्हाळ । तुका ह्मणे बाळें अवघीं मिळोन गोपाळ ॥४॥

॥ ४०९० ॥

आरुष शब्द बोलों मनीं न धरावें कांहीं । लडिवाळ बाळकें तूंचि आमुची आई ॥ १ ॥ देई गे विठाबाई प्रेमभातुकें । अवघिया कवतुकें लहाना थोरा सकळां ॥ २ ॥ असो नसो भाव आलों तुझिया ठाया । पाहें कृपादृष्टी आतां पंढरीराया ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मी तुझीं वेडीं वाकुडीं । नामें भवपाश आतां आपुले तोडीं ॥ ४ ॥

॥ ४०९१ ॥

न सांगतां तुह्मां कळों येतें अंतर । विश्वीं विश्वंभर परिहाराचि न लगे ॥ १ ॥ परि हें अनावर आवारितां आवडी । अवसान ते घडी पुरों देत नाहीं ॥ २ ॥ काय उणें मज येथें ठेवी एकी ठायीं । पोटा

आलों तईपासूनिया समर्थ ॥ ३ ॥ तुका ह्मणे अवघी आवरिली वासना । आतां नारायणा दुसरियापासूनी ॥ ४ ॥

॥ ४०९२ ॥

तुजसवें आम्ही अनुसरलों अबळा । नको अंगीं कळा राहों हरीहीन देऊं ॥१॥ सासुरवासा भीतें जीव ओढे तुजपाशीं । आतां दोहींविशीं लज्जा राखे आमुची ॥ २ ॥ न कळतां संग झाला । सहज खेळतां । प्रवर्तली चिंता मागिलाचियावरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे असतां जैसें तैसें बरवें । वचन या भावें वेचूनिया विनटलों ॥ ४ ॥

॥ ४०९३ ॥

उठा सकळ जन उठिले नारायण । आनंदले मुनिजन तिन्ही लोक१ करा जयजयकार वाद्यांचा गजर । मृदंग विणे अपार टाळ घोळ२ जोडोनिया कर मुख पाहा सादर । पायावरी शिर ठेवूनिया ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय पढियंते मागा । आपुलालें सांगा दुःख सकळ ॥४॥

॥ ४०९४ ॥

घडिया घालूनी तळीं चालती वनमाळी । उमटती कोमळीं कुंकुमाचीं१ वंदा चरणरज अवघे सकळ जन । तारियेले पाषाण उदकीं जेणें२ पैस धरूनी चला ठाकत ठायीं ठायीं । मौन्य धरूनी कांहीं न बोलावें३ तुका अवसरु जाणवितो पुढें । उघडिलें महाल मंदिरें कवाडें ॥४॥

॥ ४०९५ ॥

जाली पाकसिद्धि वाट पाहे रखुमाई । उदक तापलें डेरां चौकसा मर्दुन्या पाई १ उठा पांडुरंगा उशीर जाला भोजना । घ्या आंचवणा गोपी कळस घेऊनी ॥ २ ॥ अवघ्या सावचित सेवेलागीं सकळा । उद्धव अक्रूर आले पाचारूं मूळा ॥ ३ ॥ सावरिली सेज सुमनयाति सुगंधा । रत्नदीप ताटीं चाळा विडिया विनोदा ४ तुका विनंती करी पाहे पंढरीराणा । असा सावचित्त सांगे सकळ जना ॥ ५ ॥

॥ ४०९६ ॥

भीतरी गेले हरी राहा क्षणभरी । होईल फळ धीर करावा ॥ १ ॥ न करीं त्वरा ऐकें मात । क्षण एक निवांत बैसावें ॥ २ ॥ करूनी मर्दन सारिलें पाणी । न्हाले देव अंग पुसी भवानी ॥ ३ ॥ नेसला सोनसळा विनवी रखुमाई । वाढिलें आतां ठायीं चलावें जी४ करूनिया भोजन घेतलें आंचवण । आनंदें नारायण पहुडले ॥ ५ ॥ तुका मात जाणवी आतां । सकळां बहुतां होती चिंता ॥ ६ ॥

॥ ४०९७ ॥

या जी आम्हां कांहीं सांगा जी रखुमाई । शेष उरलें तें ठायीं सनकादिकांचें ॥ १ ॥ टोकत बाहेरी बैसलों आशा । पुरावा भासा

एकमेकां ॥२॥ येथवरी आलों तुझिया नांवें । आस करूनी आम्ही दातारा ॥ ३ ॥ प्रेम देऊनिया बहुडा आतां दिला । तुका ह्मणे आतां विठ्ठल बोला ॥ ४ ॥

॥ ४०९८ ॥

पावला प्रसाद आतां विठो निजावें । आपला तो श्रम कळों येतसे भावें ॥१॥ आतां स्वामी सुख निद्रा करा गोपाळा । पुरले मनोरथ जातों आपुलिया स्थळा ॥ २ ॥ तुम्हांसी जागवूं आह्मी आपुलिया चाडा । शुभाशुभ कर्मे दोष हराया पीडा ३ तुका ह्मणे दिलें उच्छिष्टाचें भोजन । नाहीं निवाडिलें आह्मां आपुलिया भिन्न ॥ ४ ॥

॥ ४०९९ ॥

बहुडविलें जन मन जालें निश्चळ । चुकवूनी कोल्हाळ आला तुका १ पर्यंकीं निद्रा करावें शयन । रखुमाई आपण समवेत ॥ २ ॥ घेऊनिया आलों हातीं टाळ वीणा । सेवेसी चरणा स्वामीचिया ॥३॥ तुका ह्मणे आतां परिसावीं सादरें । बोबडीं उत्तरें पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ४१०० ॥

नाच गाणें माझा जवळील ठाव । निरोपीन भाव होईल तो ॥ १ ॥ तुह्मां निद्रा मज आज्ञा ते स्वभावें । उतरूनी जिवें जाईन लोण २॥ एकाएकीं बहु करीन सुस्वरें । मधुर उत्तरें आवडीनें ॥ ३ ॥ तुका ह्मणे तूं जगदानी उदार । फेडशील भार एक वेळे ॥ ४ ॥

॥ ४१०१ ॥

उठोनिया तुका गेला निजस्थळा । उरले राउळामाजी देव ॥ १ ॥ निउल जालें सेवका स्वामीचें । आज्ञे करूनी चित्त समाधान ॥२॥ पहुडलिया हरी अनंतशयनावरी । तेथें नाहीं उरी कांहीं काम ३ ॥ अवघियांस बाहेर घालूनि गेला तुका । सांगितलें लोकां निजले देव ४

॥ ४१०२ ॥

आड केलें देवद्वार । व्यर्थ काय करकर ॥ १ ॥ आतां चला जाऊं घरा । नका करूं उजगरा ॥ २ ॥ देवा लागलीसे निज । तेथें उभ्या काय काज ॥ ३ ॥ राग येतो देवा । तुका ह्मणे नेघे सेवा ॥ ४ ॥

॥ ४१०३ ॥

शब्दाचींपै रत्नें करूनी अलंकार । तेणें विश्वंभर पूजियेला ॥ १ ॥ भावाचे उपचार करूनी भोजन । तेणें नारायण जेवविला ॥ २ ॥ संसारा हातीं दिलें आंचवण । मुखशुद्धि मन समर्पिलें ॥ ३ ॥ रंगलीं इंद्रियें सुरंग तांबूल । माथा तुळसीदळ समर्पिलें ॥ ४ ॥ एकभावदीप करूनी निरंजन । देऊनी आसन देहाचें या ॥ ५ ॥ न बोलोनी तुका करी चरणसेवा । निजविलें देवा माजघरीं ॥ ६ ॥

॥ ४१०४ ॥

विचार करिती बैसोनि गौळणी । ज्या कृष्णकामिनी कामातुरा १॥
एकांतीं एकल्या एकाच सुखाच्या । आवडती त्यांच्या गोष्टी त्याला२
तर्कवितर्किणी दुराविल्या दुरी । मौन त्या परिचारी आरंभिलें ३॥
कुशळा कवित्या कथित्या लोभिका । त्याही येथें नका आह्मांपाशीं ४
बोलक्या वाचाळा कृष्णरता नाहीं । त्या चोरोनी तिहीं खेट केली
भेऊनिया जना एकी सवा जाल्या । वाती विझविल्या दाटो वळें ६
कृष्णसुख नाहीं कळलें मानसीं । निंदिती त्या त्यासी कृष्णरता ७॥
तो नये जवळी देखोनी कोल्हाळ । ह्मणउनि समेळ मेळविला ॥ ८ ॥
अंतरीं कोमळा बाहेरी निर्मळा । तल्लीन त्या बाळा कृष्णध्यानीं ९॥
हरिरूपीं दृष्टि कानीं त्याची गोष्टी । आळंगिती कंठीं एका एकी १०
न साहे वियोग करिती रोदना । भ्रमिष्ट भावना देहाचिया ॥ ११ ॥
विसरल्या मागें गृह सुत पती । अवस्था या चित्तीं गोविंदाची १२
अवस्था लागोनी निवळाचि ठेल्या । एकाएकीं जाल्या कृष्णरूपा १३
कृष्ण म्हणोनिया देती आलिंगन । विरहताप तेणें निवारेना ॥ १४ ॥
ताप कोण वारी गोविंदावांचूनी । साच तो नयनीं न देखतां ॥१५॥
न देखतां त्यांचा प्राण रिघों पाहे । आजी कामाग्न ये उसिर केला१६
रिल्या आन गोष्टी तया नावडती । आलिंगन प्रीति कृष्णाचिया १७
मागें आह्मी कांहीं चुकलों त्याची सेवा । असेल या देवा राग आला १८
आठविती मागें पापपुण्यदोष । परिहार एकीस एक देती ॥ १९ ॥
अनुतापें जाल्या संपन्न त्या बाळा । टाकिती विव्हळा धरणी अंग २०
जाणोनि चरित्र जवळीच होता । आली त्या अनंता कृपा मग २१
होऊनी प्रगट दाखविलें रूप । तापत्रयताप निवविले ॥ २२ ॥
निवालिया देखोनी कृष्णाचें श्रीमुख । शोक मोह दुःख दुरावला२३
साच,भाव त्यांचा आणूनिया मना । आळंगितो राणा वैकुंठींचा २४
हरिअंगसंगें हरिरूप जाल्या । बोलों विसरल्या तया सुखा ॥ २५॥
व्यभिचारभावें भोगिलें अनंता । वर्तोनी असतां घराचारीं ॥ २६ ॥
सकळा चोरोनी हरि जया चित्तीं । धन्य त्या नांदती तयामध्यें २७
उणें पुरें त्याचें पडों नेदी कांहीं । राखे सर्वा ठायीं देव तया ॥ २८॥
न कळे लाघव ब्रह्मादिकां माव । भक्तिभावें देव केला तैसा ॥२९॥
तुका ह्मणे त्यांचा धन्य व्यभिचार । साधिलें अपार निजसुख॥३०॥

॥ ४१०५ ॥

करूनी आरती । चक्रपाणि ओवाळिती ॥१॥ आजी पुरले नवस । धन्य जाला हा दिवस ॥ २ ॥ पाहा वो सकळा । पुण्यवंता तुह्मी बाळा ॥ ३ ॥ तुका वाहे टाळी । उभा सन्निध जवळी ॥ ४ ॥

॥ ४१०६ ॥

गाऊं वाणूं तुज विठो तुझा करूं अनुवाद । जिकडे पाहे तिकडे सर्वमय गोविंद ॥ १ ॥ आनंदरे विठोबा झाला माझे मनीं । देखिले लोचनीं विटेसहित पाउलें ॥ २ ॥ न करीं तपसाधनें रे मुक्तीचे सायास । हाचि जन्मोजन्मीं गोड भक्तीचा रस ॥३॥ तुका ह्मणे आम्हां प्रेमा उणें तें काई । पंढरीचा राणा सांठविला ह्रदयीं ॥ ४॥

॥ ४१०७ ॥

भक्तीचिया पोटीं बोध कांकडा ज्योती । पंचप्राण जीवें भावें ओंवाळूं आरती १ ओंवाळूं आरती माझ्या पंढरीनाथा । दोन्ही कर जोडोनी चरणीं ठेवीन माथा २ काय महिमा वर्णूं आतां सांगणें तें किती । कोटि ब्रह्महत्या मुख पाहातां जाती ॥३॥ राही रखुमाई दोही दोंबाहीं । मयूर पिच्छचामरें ढळिती ठायीं ठायीं ४ तुका ह्मणे दीप घेउनि उन्मनती शोभा । विटेवरी उभा दिसे लावण्यगाभा ५॥

॥ ४१०८ ॥

कनकाच्या परियेळीं उजळूनी आरती । रत्नदीपशोभा कैशा पाजळल्या ज्योती १ ओंवाळूं गे माये सबाह्य साजिरा । राहिरखुमाईसत्यभामेच्या वरा २ मंडित चतुर्भूज दिव्य कानीं कुंडलें । श्री मुखाची शोभा पाहातां तेज फांकलें ३ वैजयंती माळ गळां शोभे श्रीमंत । शंखचक्रगदापद्म आयुधें शोभत ४ सांवळा सकुमार जैसा कर्दळीगाभा । चरणींचीं नेपुरें वांकी गर्जती नभा ५ ओंवाळितां मन हें उभें ठाकलें ठायीं । समदृष्टि समाधि तुकया लागली पायीं ६

॥ ४१०९ ॥

ओंवाळूं आरती पंढरीराया । सर्व भावें शरण आलों तुझीया पाया१ सर्व व्यापून कैसें रूप आकळ । तो हा गौळ्याघरीं झाला कृष्ण बाळ२ स्वरूप गुणातीत झाला अवतारधारी । तो हा पांडुरंग उभा विटेवरी३ भक्तीचिया काजा कैसा रूपासी आला । ब्रीदाचा तोडर चरणीं मिरविला ॥ ४ ॥ आरतें आरती कैसी ओंवाळिली । वाग्वाणितां कीर्ति वाचा परतली ॥ ५ ॥ भावें भक्तीबळें होसी कृपाळू देवा । तुका ह्मणे पांडुरंगा तुझ्या न कळती मावा ॥ ६ ॥

॥ ४११० ॥

अवतारनामभेद गणा आदि अगाध । जयासी पार नाहीं पुढें खुंटला वाद । एकचि दंत शोभे मुख विक्राळ दोंद । ब्रह्मांडामाजी दावी अनंत हे छंद ॥ १ ॥ जय जया गणपति ओंवाळीन आरती । साजिऱ्या सरळ भुजा फरशकमळ शोभती ॥ २ ॥ हे मही ठेंगणी हो तुज नृत्यनायका । भोंवरी फेर देतां असुर मर्दीले एका । घातलें तोडरीं हो भक्तजनपालका । सहस्र नाम तुज भुक्तिमुक्तिदायका ३

सुंदर शोभला हो रूपें लोपलीं तेजें । उपमा काय देऊं असे आणिक दुजें । रविशशितारांगणें जयामाजी सहजें । उदरीं सामावलीं जया ब्रह्मांडबीजें ४ वर्णितां शेष लीला तया भागलीं मुखें । पांगुळले वेद चारी कैसे राहिले मुके । अवतार जन्मला हो लिंगनामीं या मुखें । अमूर्त मूर्तिमंत होय भक्तिच्यां सुखें ५ विश्व हें रूप तुझें हस्तपाद मुखडें । देसःचि भाव देई तया नाचतां पुढें । धूप दीप पंचारति ओंवाळिन निवाडें । राखें या शरणांगता तुका खेळतां लाडें ॥ ६ ॥

॥ ४१११ ॥

महा जी महादेवा महाकाळमर्दना । मांडियेलें उग्र तप महादीप्त दारुणा । परिधान व्याघ्रांबर चिताभस्मलेपना । स्मशान क्रिडास्थळ तुम्हां जी त्रिनयना ॥ १ ॥ जय देवा हरेश्वरा जय पार्वतीवरा । आरति ओंवाळीन कैवल्यादातारा ॥जय०॥ २ ॥ रुद्र हें नाम तुम्हां उग्र संहारासी । शंकर शिव भोळा उदार सर्वस्वीं । उदक बेलपत्र टाळी वाहिल्या देसी । आपुलें पद दासां ठाव देई कैलासीं ३ त्रैलोक्यव्यापका हो जन आणि विजन । विराटस्वरूप हें तुझें साजिरें ध्यान । करिती वेद स्तुति कीर्ति मुखें आपण । जाणतां नेणवे हो तुमचें महिमान ४ बोलतां नाम महिमा असे आश्चर्य जगीं । उपदेश केल्यानंतर पापें पळतीं वेगीं । हरहरवाणी गर्जे प्रेम संचरे अंगीं । राहिली दृष्टि चरणीं रंग मीनला रंगीं ५ पूजूनि लिंग उभा तुका जोडोनी हात । करितो विज्ञापना परिसावी हे मात । अखंड राहूं द्यावें माझें चरणीं चित्त । घातलें साष्टांग मागें मस्तकीं हात ॥ ६ ॥

॥ ४११२ ॥

जगदीश जगदीश तुज म्हणती । परि या जगामाजी असलीस युक्ति । पुण्यपापविरहित सकळां अधिक अधिपती । दुष्टा परी नळणी आलिप्त गति १ जय देव जय देव जय पंढरीनाथा श्रीपंढरीनाथा । तुटे पाप विठ्ठल म्हणतां सर्वथा ॥ २ ॥ आगम निगम तुज नेणती कोणी । परि तूं भाव भक्ति जवळीच दोन्ही । नेणतां विधियुक्त ईश्वरातें पूजनी । न मागे ब्रह्मांडीं संपुष्ट शयनीं ॥ ३ ॥ असुरां काळ भासे विक्राळ पुढें । पसरीं मुख एक चावितो धुडें । भक्ता शरणांगता चालतो पुढें । दावी वाट जाऊं नेदी वांकडें ॥ ४ ॥ एकाएकीं बहु विस्तरला सुखें । खेळे त्याची लीला तोचि कवतुकें । तेथें नरनारी कवण बाळकें । काय पापपुण्य कवण सुखदुःखें ५ सकळां वर्मी तूंचि जाणशी एक । बद्ध मोक्ष प्राप्त आणि सुखदुःख । जाणों म्हणतां तुज ठकलीं बहुतेक । तुका म्हणे शरण आलों मज राख ६

॥ ४११३ ॥

दैत्यभारें पीडिली पृथ्वी बाळा। म्हणोनि तुज येणें जालें गोपाळा। भक्तिप्रतिपाळक उत्सव सोहळा। मंगळ तुज गाती अबळा बाळा ॥१॥ जय देव जय देव जय गरुडध्वजा। श्रीगरुडध्वजा। आरती ओंवाळूं तुज भक्तिकाजा ॥ २ ॥ गुण रूप नाम नाहीं जयासी। चिंतितां तैसाचि होसी तयांसीं। मत्स्य कूर्म वराह० नरसिंह० जालासी। असुरां काळ मुनि ठाके ध्यानासी ॥ ३ ॥ सहस्र रूपें नाम सांवळा ना गोरा। श्रुति नेति ह्मणती तुज विश्वंभरा। जीवना जीवन तूंचि होसी दातारा। न कळे पार ब्रह्मादिकां सुरवरा ॥४॥ संता महंता घरीं ह्मणवी ह्मणियारा। शंकचक्रगदाआयुधांचा भारा। सुदर्शन घरटी फिरे अवश्वरा। सकुमार ना स्थूळ होसी गोजिरा ॥ ५ ॥ भावेंविण तुझें न घडे पूजन। सकळही गंगा जाल्या तुजपासून। उत्पत्ति प्रळय तूंचि करिसी पाळण। धरूनि राहिला तुका निश्चयें चरण ॥ ६ ॥

॥ ४११४ ॥

काय तुझा महिमा वर्णूं मी किती। नाममात्रें भवपाश तुटती। पाहतां पाऊलें हे विष्णूमूर्ती। कोटिकुळांसहित जड जीव उद्धरती१ जय देव जय देव जय पंढरिराया। श्रीपंढरिराया। करुनिया कुरवंडी सांडीन काया ॥ २ ॥ मंगळआरतीचा थोर महिमा। आणीक द्यावया नाहीं उपमा। श्रीमुखासहित देखे जो कर्मा। पासुन सुटे जैसा रवि नासी तमा ॥ ३ ॥ धन्य व्रतकाळ हे एकादशी। जागरण उपवास घडे जयांसी। विष्णूचें पूजन एकाभावेंशी। नित्यमुक्त पूज्य तिहीं लोकांसी ॥ ४ ॥ न वजे वाया काळ जे तुज ध्याती। अखंड तुझा वास तयांच्या चित्तीं। धाले सुखें सदा प्रेमें डुल्लती। तीर्थें मलीन वास तयांचा पाहाती ॥ ५ ॥ देव भक्त तूंचि जालासी दोन्ही। वाढावया सुख भक्ति हे जनीं। जड जीवा उद्धार होय लागोनी। शरण तुका वंदी पाऊलें दोन्ही ॥ ६ ॥

॥ ४११५ ॥

अवतार गोकुळीं हो जन तारावयासी। लावण्यरूपडें हें तेजःपुंजाळरासी। उगवतां कोटि बिंबें रवि लोपले शशी। उत्साह सुरवरां मही थोर मानसीं ॥ १ ॥ जय देवा कृष्णनाथा जय रखुमाईकांता। आरति ओंवाळीन तुह्मां देवकीसुता। जय देवा कृष्णनाथा ॥ २ ॥ वसुदेवदेवकीची बंद फोडिली शाळ। होउनी विश्वजनिता तया पोटींचा बाळ। दैत्य हे त्रासियेले समूळ कंसासी काळ। राज्य उग्रसेना केला मथुरापाळ ॥ ३ ॥ राखतां गोधनें हो

इंद्र कोपला भारी । मेघ जो कडाडिला शिळा वर्षतां धारीं । राखिलें गोकुळ हें नखीं धरिला गिरी । निर्भय लोकपाळ अवतरले हरी ॥ ४ ॥ कौतुक पहावया माव ब्रह्मयानें केली । वत्सेंही चोरुनिया सत्यलोकासी नेलीं । गोपाळ गाईवत्सें दोहीं ठायीं राखीलीं। सुखाचा प्रेमसिंधु अनाथांची माऊली ५ तारिलें भक्तजना दैत्य निर्दाळूनि । पांडवा साहकारी आडल्या निर्वाणीं । गुण मी काय वर्णूं मति केवढी वाणी । विनवितो दास तुका ठाव मागे चरणीं६॥

॥ ४११६ ॥

सुंदर अंगकांती मुख भाळ सुरेख । बाणली उटी अंगीं टिळा साजिरा रेख । मस्तकीं मुगुट कानीं कुंडलें तेज फाके । आरक्त दंत हिरे कैसे शोभले निके ॥ १ ॥ जय देवा चतुर्भुजा जय लावण्यतेजा । आरति ओंवाळीन भवतारिया हा वोजा ॥ २ ॥ उदार झुंझार हा जया वाणिती श्रुति । परतल्या नेति ह्मणती तयां न कळे गति । भाट हा चतुर्मुखें अनुवाद करिती । पांगलीं साही अठरा रूप न कळे गति ३ ऐकोनी रूप ऐसें तुजलागीं धुंडिती । बोडके नग्न एक निराहार यति । साधनें योग नाना तपें दारुण किती । सांडिलें सुख दिलें संसाराचिया शांती ॥४॥ भरूनि माजी लोकां तिहीं नांदसि एक । कामिनीमनमोहना रूप नाम अनेक । नासती नाममात्रें भवपातकें शोक । पाउलें वंदिताती सिद्ध आणि साधक ॥५॥ उपमा द्यावयासी दुजें काय हें तुज । तत्त्वासी तत्त्वसार मूळ झालासी बीज । खेळसी बाळलीळा अवतार सहज । विनवितो दास तुका कर जोडुनि तुज ॥ ६ ॥

॥ ४११७ ॥

पंढरी पुण्यभूमी भीमा दक्षिणवाहिनी । तीर्थ हे चंद्रभागा महा पातकां धुनी । उतरलें वैकुंठ महासुख मेदिनी ॥ १ ॥ जय देवा पांडुरंगा जय अनाथनाथा । आरति ओंवाळीन तुम्हां लक्ष्मीकांता ॥ २ ॥ नित्य नवा सोहळा हो महावाद्यांचा गजर । सन्मुख गरुड पारीं उभा जोडुनि कर । मंडितचतुर्भुजा कटीं मिरवती कर३ हरिनामकीर्तन हो आनंद महाद्वारीं । नाचती प्रेमसुखें नर तेथींच्या नारी । जीवन्मुक्त लोक नित्य पाहाती हरी ॥ ४ ॥ आषाढी कार्तिकी हो गरुडटक्यांचे भार । गर्जती नामघोषें महावैष्णववीर । पापासी रीग नाहीं असुर कांपती सूर ॥ ५ ॥ हें सुख पुंडलिकें कसें आणिलें बापें । निर्गुण साकारलें आम्हांलागिं हें सोपें । म्हणोनि चरण धरोनी तुका राहिला सुखें ॥ ६ ॥

संतपर अभंग.

[मागें पृष्ठ ३८३ अभंग २२५१ पासून पुढें चालू.]

॥ ४११८ ॥

नव्हती ते संत करितां कवित्व । संताचे ते आप्त नव्हती संत ॥१॥
येथें नाहीं वेश सरतें आडनांवें । निवडे घावडाव व्हावा अंगीं॥२॥
नव्हती ते संत धरितां भोंपळा । पांघरती वाकळा नव्हती संत ३
नव्हती ते संत करितां कीर्तन । सांगतां पुराणें नव्हती संत ॥ ४ ॥
नव्हती ते संत वेदाच्या पठणें । कर्म आचारणें नव्हती संत ॥ ५॥
नव्हती संत करितां तप तीर्थाटण । सेविलिया वन नव्हती संत६॥
नव्हती संत माळामुद्रांच्या भूषणें । भस्मउधळणें नव्हती संत ॥७॥
तुका ह्मणे नाहीं निरसला संदेह । तोंवरी हे अवघे संसारिक ८ ॥

॥ ४११९ ॥

वर्णाश्रम करिसी चोख । तरि तूं पावसी उत्तम लोक १ परि तें तुज नाहीं ठावें । जेणें अंगें ब्रह्म व्हावें ॥२॥ जरि तूं जालासी पंडित करिसी शब्दांचें पांडित्य ॥ ३ ॥ गासी तान मान बंध । हाव भाव गीत छंद ॥४॥ जाणसील तूं स्वतंत्र । आगमोक्त पूजायंत्र ॥ ५ ॥ साधनाच्या ओढी । डोळियांच्या मोडामोडी ॥ ६ ॥ तुका ह्मणे देहीं । संत जाहाले विदेह ॥ ७ ॥

॥ ४१२० ॥

तरिच होय वेडी । नग्न होय धडफुडी ॥ १ ॥ काय बोलाचें गौरव। आंत वरी दोन भाव ॥ २ ॥ मृगजळा न्याहाळितां । तान न वजे सेवितां ॥ ३ ॥ न पाहे आणिकांची आस । शूर बोलिजे तयास ॥ ४ ॥ तुका ह्मणे या लक्षणें । संत अळंकार लेणें ॥ ५ ॥

॥ ४१२१ ॥

वेश वंदाया पुरते । कोण ब्राह्मण निरुते ॥ १ ॥ ऐसें सांगा मजपाशीं । संतां निरवितों येविशीं ॥ २ ॥ असा जी प्रवीण । ग्रंथीं कळे शुद्ध हीण ॥३॥ तुका ह्मणे लोपें । सत्याचिया घडती पापें ४॥

॥ ४१२२ ॥

देवाची पूजा हे भूताचें पाळण । मत्सर तो सीण बहुतांचा ॥ १ ॥
रुसावें फुगावें आपुलियावरी । उरला तो हरि सकळही ॥ २ ॥
तुका ह्मणे संतपण याचि नांवें । जरि होय जीव सकळांचा ॥ ३ ॥

॥ ४१२३ ॥

जाणे भक्तीचा जिव्हाळा । तोचि देवाचा पुतळा १ आणीक नये माझ्या मना । हो का पंडित शाहाणा २ नामरूपीं जडलें चित्त । त्याचा दास मी अंकित ३ तुका ह्मणे नवविध । भक्ति जाणे तोचि शुद्ध ॥ ४ ॥

॥ ४१२४ ॥

हरिच्या दासां भये । ऐसें बोलों तेंही नये ॥ १ ॥ राहोनिया आड। उभा देव पुरवी कोड ॥ २ ॥ हरिच्या दासां चिंता। अघटित हे वार्ता ॥ ३ ॥ खावें ल्यावें द्यावें । तुका ह्मणे पुरवावें ॥ ४ ॥

॥ ४१२५ ॥

भाते भरूनि हरिनामाचे । वीर गर्जती विठ्ठलाचे ॥१॥ अनंतनामाची आरोळी । एक एकाहूनि बळी॥२॥नाहीं आणिकांचा गुमान। ज्याचे अंकित त्यावांचून ३ रिद्धि सिद्धि ज्या कामारी।तुका ह्मणे ज्याचे घरीं४

॥ ४१२६ ॥

वीर विठ्ठलाचे गाढे । कळिकाळ पायां पडे ॥ १ ॥ करिती घोष जय-जयकार । जळती दोषांचे डोंगर ॥ २ ॥ दया क्षमा शांति । बाण अभंग हे हातीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे बळी । तेचि एक भूमंडळी ॥ ४ ॥

॥ ४१२७ ॥

उदासीनाचा देह ब्रह्मरूप । नाहीं पुण्य पाप लागत त्या ॥ १ ॥ अनुताप अंगीं अग्निचिया ज्वाळा । नाहीं मृगजळा विझों येत ॥२॥ दोष ऐशा नांवें देहाचा आदर । विठ्ठलें अंतर अहंभावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाय नासोनिया खंती । तंवचि हे चित्तीं बद्धता ते॥४॥

॥ ४१२८ ॥

भाग्यवंता हेंचि काम । मापी नाम वैखरी ॥ १ ॥ आनंदाची पुष्टि अंगीं । ओघो संगीं उद्धरती ॥ २ ॥ पिकलें तया खाणें किती । पंगतीस सुकाळ ॥३॥ तुका करी प्रणिपात । दंडवत आचारिया४॥

॥ ४१२९ ॥

तरी सदा निर्भर दास । चिंता आस विरहित ॥१॥ अवघाच एकीं ठाव । सर्व भाव विठ्ठलीं ॥२॥ निरविलें तेव्हां त्यास । जाला वास त्यामाजी ॥ ३ ॥ तुका ह्मणे रूप ध्यावें । नाहीं ठावे गुणदोष ॥ ४ ॥

॥ ४१३० ॥

कोटिजन्म पुण्यसाधन साधिलें । तेणें हातां आलें हरिदास्य ॥ १ ॥ रात्रीं दिवस ध्यान हरीचें भजन । कायावाचामन भगवंतीं ॥ २ ॥ ऐसिया प्रेमळा ह्मणताती वेडा । संसार रोकडा बुडविला ॥ ३ ॥ एकवीस कुळें जेणें उद्धरिलीं । हे तों न कळे खोली भाग्यमंदा ४॥ तुका ह्मणे त्याची पायधुळी मिळे । भवभय पळे वंदितांचि ॥ ५ ॥

॥ ४१३१ ॥

उत्तम त्या याति । देव शरण अनन्यगति ॥१॥ नाहीं दुजा ठाव। कांहीं उत्तम मध्यम भाव ॥ २ ॥ उमटती ठसे । ब्रह्मप्राप्ति अंगीं दिसे ॥ ३ ॥ भाविक विश्वासी । तुका ह्मणे नमन त्यांसी ॥ ४ ॥

॥ ४१३२ ॥

धनें वित्तें कुळें । अवघियानें ते आगळे ॥१॥ ज्याचे नारायण गांठीं।

भरला हृदय संपुष्टीं ॥ २ ॥ अवघेंचि गोड । त्याचें पुरें सर्व कोड ॥ ३ ॥ तुका ह्मणे अस्त । उदय त्याच्या तेजा नास्त ॥ ४ ॥

॥ ४१३३ ॥

ज्यासी आवडी हरिनामाची । तोचि एक बहु शुचि १ जपतो हरिनाम बीज । तोचि वर्णांमाजी द्विज ॥ २ ॥ तुका ह्मणे वर्ण धर्म । अवघे आहे सम ब्रह्म ॥ ३ ॥

॥ ४१३४ ॥

कल्पतरु रुया नव्हती बाभुळा । पुरवती फळा इच्छितिया ॥ १ ॥ उदंड त्या गाई ह्मैसी आणि शेळया । परि त्या निराळ्या कामधेनु २ तुका ह्मणे देव दाखविल दृष्टी । तया सवें भेटी थोर पुण्य ॥ ३ ॥

॥ ४१३५ ॥

कोण पुण्य कोणा गांठी । ज्यासी ऐसियांची भेटी १ जिहीं हरी धरिला मनीं । दिलें संसाराला पाणी २ कोण हा भाग्याचा । ऐसियांसी बोले वाचा ॥३॥ तुका म्हणे त्याचे भेटी । होय संसारासी तुटी ॥४॥

॥ ४१३६ ॥

आपुलिया हिता जो असे जागता । धन्य मातापिता तयाचिया १॥ कुळीं कन्यापुत्र होती जीं सात्विक । तयाचा हरिख वाटे देवा २॥ गीता भागवत करिती श्रवण । अखंड चिंतन विठोबाचें ॥ ३ ॥ तुका म्हणे मज घडो त्याची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाहीं ४

॥ ४१३७ ॥

त्यांचिया चरणा माझे दंडवत । ज्यांचें धनवित्त पांडुरंग ॥ १ ॥ येथें माझा जीव पावला विसांवा । ह्मणऊनि हावा भरलासे ॥२॥ चरणींचे रज लावीन कपाळा । जीं पदें राउळा सोई जाती ॥ ३ ॥ आणिक तीं भाग्यें येथें कुरवंडी । करूनिया सांडीं इंद्राएसी ॥ ४ ॥ वैष्णवांचे घरीं देवाची वसति । विश्वास हा चित्तीं सत्यभावें ॥५॥ तुका ह्मणे सखे हरिचे ते दास । आतां पुढें आस नाहीं दुजी ॥६॥

॥ ४१३८ ॥

बोल बोलतां वाटे सोपें । करणी करितां टीर कांपे १ नव्हे वैराग्य सोपारें । मज बोलतां न वाटे खरें २ विष खावें ग्रासोग्रासीं धन्य तोचि एक सोसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे करूनि दावी । त्याचे पाय माझे जीवीं ॥ ४ ॥

॥ ४१३९ ॥

वैष्णवांची कीर्ती गाइली पुराणीं । साही अठरांजणीं चहूं वेदीं १॥ ऐसे कोणी दावा ग्रंथाचे वाचक । कर्मठ धार्मिक पुण्यशील ॥ २ ॥ आदिनाथ शंकर नारद मुनीश्वर । शुका ऐसा थोर आणिक नाहीं ३ तुका ह्मणे मुगुटमणी हे भक्ति । आणीक विश्रांति आरतिया ॥ ४ ॥

॥ ४१४० ॥

नेणों काय नाड । आला उचित काळा आड ॥१॥ नाहीं जाली संत भेटी । येवढी हानी काय मोठी ॥ २ ॥ सहज पायांपासीं । जवळी पावलिया ऐसी ३ चुकी जाली आतां काय । तुका ह्मणे उरली हाय ४

॥ ४१४१ ॥

भेणें पडे डोळसा । न कळे मृत्यु तो सरिसा १ कैसी जाली दिशा भुली । न वजातिये वाटे चाली ॥ २ ॥ संसाराची खंती मावळल्या तरी शक्ति ॥ ३ ॥ तुका ह्मणे होणा । बुद्धि चुकली नारायणा ॥ ४ ॥

॥ ४१४२ ॥

बहु भितों जाणपणा । आड न यो नारायणा । घेइन प्रेमपान्हा । भक्तिमुख निवाडें ॥ १ ॥ यासी तुळे ऐसें कांहीं । दुजें त्रिभुवनीं नाहीं । काला भात दहीं । ब्रह्मादिकां दुर्लभ ॥ २ ॥ निमिषार्ध संतसंगति । वास वैकुंठीं कल्पांती । मोक्षपदें होती । ते विश्रांती बापुडी ॥३॥ तुका ह्मणे हेंचि देईं । मीतूंपणा खंड नाहीं । बोलिलों त्या नाहीं । अभेदाची आवडी ॥ ४ ॥

॥ ४१४३ ॥

बोलिलों तें धर्म अनुभव अंगें । काय पांडुरंगें उणें केलें ॥ १ ॥ सर्व सिद्धि पायीं वोळगति दासी । इच्छा नाहीं ऐसी व्हावें कांहीं २ संतसमागमें अळंकार वाणी । करूं हे पेरणी शुद्ध बीजा ॥ ३ ॥ तुका ह्मणे रामकृष्णनामें गोड । आवडीचें कोड माळ ओऊं ॥ ४ ॥

॥ ४१४४ ॥

वदवावी वाणी माझी कृपावंता । वाग्पुष्प संता समर्पीसी ॥ १ ॥ सर्वसंकटाचा तुह्मां परिहार । घालाया भार पांडुरंगा ॥ २ ॥ एकसरें चिंता ठेवूनिया पायीं । जालों उतराई होतों तेणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें जालें अवसान । काया वाचा मन वेचूनिया ॥ ४ ॥

॥ ४१४५ ॥

रवि दीप हिरा दाविती देखणें । अदृश्य दर्शनें संतांचेनी ॥ १ ॥ त्यांचा महिमा काय वर्णू मी पामर । न कळे तो सार ब्रह्मादिकां २ तापली चंदन निववितो कुडी । त्रिगुण तो काढी संतसंग ॥ ३ ॥ मायबापें पिंड पाळियेला माया । जन्ममरण जाया संतसंग ॥ ४ ॥ संतांचें वचन वारी जन्मदुःख । मिष्टान्न तें भूकनिवारण ॥ ५ ॥ तुका म्हणे जवळी न पाचारितां जावें । संतचरणीं भावें रिघावया६

॥ ४१४६ ॥

पवित्र तें कुळ पावन तो देश । जेथें हरिचे दास जन्म घेती ॥ १ ॥ कर्मधर्म त्याचे जाला नारायण । त्याचेनी पावन तिन्ही लोक ॥२॥ वर्ण अभिमानें कोण जाले पावन । ऐसें द्या सांगून मजपाशीं ॥३॥

अंत्यजादि योनि तरल्या हरिभजनें । तयाचीं पुराणें भाट जालीं ४
वैश्यतुळाधार गोरा तो कुंभार । धागा हा चांभार रोहिदास ॥५॥
कबीर मोमीन लतिफ मुसलमान । सेना न्हावी आणि विष्णुदास६
कान्होपात्र खोदु पिंजरी तो दादु । भजनीं अभेदू हरिचे पार्यी ७॥
चोखामेळा वंका जातीचा महार । त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी ८॥
नामयाची जनी कोण तिचा भाव । जेवी पंढरीराव तियेसवें ॥९॥
मैराळ जनक कोण कुळ त्याचें । महिमान तयाचें काय सांगों १०॥
यातायातीधर्म नाहीं विष्णुदासा । निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ११
तुका म्हणे तुह्मी विचारावे ग्रंथ । तारिले पतित नेणों किती १२ ॥

॥ ४१४७ ॥

घातलें दुकान । देती आलियासी दान ॥१॥ संत उदार उदार । भरलें अनंत भांडार ॥ २ ॥ मागल्याची पुरे । धणी आणिकांसी उरे ॥ ३ ॥ तुका ह्मणे पोतें । देवें भरिलें नव्हे रितें ॥ ४ ॥

॥ ४१४८ ॥

हरिचिया भक्ता नाहीं भयचिंता । दुःखनिवारिता नारायण ॥ १ ॥
नलगे वाहाणें संसार उद्वेग । जडों नेदी पांग देवराव ॥ २ ॥
असों द्यावा धीर सदा समाधान । आहे नारायण जवळीच ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझा सखा पांडुरंग । व्यापियेलें जग तेणें एकें ॥ ४ ॥

॥ ४१४९ ॥

प्रारब्ध क्रियमाण । भक्तां संचित नाहीं जाण १ अवघा देवचि जाला पाहीं । भरोनिया अंतर्बाहीं ॥ २ ॥ सत्वरजतमबाधा । नव्हे हरिभक्तांसि कदा ॥ ३ ॥ खाय बोले करी । अवघा त्यांच्या अंगें हरी ॥ ४ ॥ देवभक्तपण । तुका ह्मणे नाहीं भिन्न ॥ ५ ॥

॥ ४१५० ॥

ध्यानीं योगीराज बैसले कपाटीं । लागे पाठोपाठीं तयांचिया ॥१॥
तान भूक त्यांचें राखे शीत उष्ण । जाले उदासीन देहभावा ॥ २ ॥
कोण सखे तया आणीक सोयरें । असे त्यां दुसरें हरीविण ॥ ३ ॥
कोण सुख त्यांच्या जीवासि आनंद । नाहीं राज्यपद घडी तया ४॥
तुका ह्मणे विष अमृतासमान । कृपा नारायण करितां होय ॥ ५ ॥

॥ ४१५१ ॥

जन्मा येउनि तया लाभ झाला । भिडवई भेटला पांडुरंग ॥ १ ॥ संसारदुःखें नासिलीं तेणें । उत्तम हें केणें नामघोष २ धन्य ते संत सिद्ध महानुभाव । पंढरीचा ठाव टाकियेला ३ प्रेमदाते तेच पतितपावन । धन्य दरुषण होय त्याला ४ पावटणिया पंथें जालिया सिद्धि । वोळगे समाधि सायुज्यता ॥ ५ ॥ प्रेम आराणूक नाहीं भय धाक ।

मज तेणें सुखें कांहीं चिंता ॥ ६ ॥ ते दुर्लभ संसारासी । जडजीवउ-द्धार लोकासी ॥७॥ तुका ह्मणे त्यासी । धन्य भाग्य दरुषणें ॥८॥

॥ ४१५२ ॥

भक्ता समागमें सर्वभावें हरि । सर्व काम करी न सांगतां ॥ १ ॥ सांटवला राहे हृदयसंपुष्टीं । बाहेर धाकुटी मूर्ति उभा ॥ २ ॥ मागण्याची आस पाहे मुखाकडे । चिंतिल्या रोकडे मनोरथ ॥३॥ तुका ह्मणे जीव भाव देवापायीं । ठेवूनि ते कांहीं न मागती ॥४॥

॥ ४१५३ ॥

जेथें वैष्णवांचा वास । धन्य भूमि पुण्य देश ॥ १ ॥ दोष नाहीं ओखदासी । दूत सांगे यमापाशीं ॥ २ ॥ गरुडटकयांच्या भारें । भूमि गर्जे जयजयकारें ॥३॥ सहज तया जना छंद । वाचे गोविंद गोविंद ॥ ४ ॥ तुळसी वनें रंगमाळा । अवघा वैकुंठ सोहळा ॥५॥ तुका ह्मणे भेणें । काळ नये तेणें राणें ॥ ६ ॥

॥ ४१५४ ॥

तेथें सुखाची वसति । गाती वैष्णव नाचती । दिंड्या पताका झळकती । गर्जती हरिनामें ॥ १ ॥ दोषा जाली घेघेमारी । पळती भरले दिशा चारी । न येती माघारी । नाहीं उरी परताया ॥ २ ॥ विसरोनि वैवपणा । उभा पंढरीचा राणा । विटोनि निर्गुणा । रूप धरिलें गोजिरें ॥ ३ ॥ पोट सेवितां न धाये । भूक भुकेलीच राहे । तुका ह्मणे पाहे । कोण आस मुक्तीची ॥ ४ ॥

॥ ४१५५ ॥

चंदनाचे हात पायही चंदन । परिसा नाहीं हीन कोणी अंग ॥ १ ॥ दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार । सर्वांगें साकर अवघी गोड ॥२॥ तुका ह्मणे तैसा सज्जनापासून । पाहातां अवगुण मिळेचि ना ॥ ३ ॥

॥ ४१५६ ॥

वैराग्याचें भाग्य । संतसंग हाचि लाभ ॥१॥ संतकृपेचे हे दीप । करी साधका निष्पाप ॥ २ ॥ तोचि देवभक्त । भेदाभेद नाहीं ज्यांत ॥३॥ तुका प्रेमें नाचे गाये । गाणियांत विरोन जाये ॥ ४ ॥

॥ ४१५७ ॥

संतसमागम एखादिया परी । राहावें त्याचे द्वारीं श्वानयाती ॥१॥ येथें रामनाम होईल श्रवण । घडेल भोजन उच्छिष्टाचें ॥ २ ॥ कामारी बटीक सेवेचे सेवक । दीनपण रंक तेथें भलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे सर्व सुख त्या संगती । घडेल पंगती संतांचिया ॥ ४ ॥

॥ ४१५८ ॥

सदैव हे वारकरी । जे पंढरी देखती ॥ १ ॥ पदोपदीं विठ्ठल वाचा त्यांसी कैचा संसार ॥ २ ॥ दोष पळाले पळाले पैल आले हरि-

दास ३ प्रेमभातें भरलें अंगीं निर्लज रंगीं नाचती ४ गोपीचंदनाची उटी तुळसी कंठीं मिरवती ॥ ५ तुका ह्मणे देव चित्तीं । मोक्ष हातीं रोकडा ६ दुर्बळा या शक्तिहीना । त्या हीना जना पुरता ॥७॥

॥ ४१५९ ॥

ब्रह्मज्ञान दारीं येतें काकुलती । अव्हेरिलें संतीं विष्णुदासीं ॥ १ ॥ रिघों पाहे माजी बळें त्याचें घर । दवडिती दूर खणोनिया ॥ २ ॥ तुका ह्मणे येथें न चले सायास । पडिलें उदास त्याच्या गळा ॥३॥

॥ ४१६० ॥

वैष्णवें चोरटीं । आलीं घरासी करटीं ॥ १ ॥ आजि आपुलें जतन । करा भांडें पांघरूण ॥ २ ॥ ज्याचे घरीं खावें । त्याचे सर्वस्वही न्यावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे माग । नाहीं लागों देत लाग ॥ ४ ॥

॥ ४१६१ ॥

पाहुणे घरासी । आजी आले हृषीकेशी ॥ १ ॥ काय करूं उपचार । कोंप मोडकी जर्जर । कण्या दरदर पाण्यामाजी रांधिल्या ॥ २ ॥ घरीं मोडकिया बाजा । वरी वाकळांच्या शेजा ॥ ३ ॥ मुखशुद्धि तुळसीदळ । तुका ह्मणे मी दुर्बळ ॥ ४ ॥

॥ ४१६२ ॥

भक्तांहूनि देवा आवडतें काई । त्रिभुवनीं नाहीं आन दुजें ॥ १ ॥ नावडे वैकुंठ क्षीराचा सागर । धरोनी अंतर राहे दासा ॥ २ ॥ सर्वभावें त्याचें सर्वस्वेंही गोड । तुळसीदळ कोड करुनी घ्यावें ॥३॥ सर्वस्वें त्याचा ह्मणवी विकिला । चित्त द्यावें बोला सांगितल्या ४ ॥ तुका ह्मणे भक्तिसुखाचा बांधिला । आणीक विठ्ठला धर्म नाहीं ५॥

॥ ४१६३ ॥

भक्तांचीं सांकडीं स्वयें सोसी देव । त्यांपाशीं केशव सर्वकाळ ॥१॥ जये ठायीं कीर्तन वैष्णव करिती । तेथें हा श्रीपति उभा असे ॥२॥ तुका ह्मणे देव सर्वाठायीं झाला । भरुनी उरला पांडुरंग ॥ ३ ॥

॥ ४१६४ ॥

धन्य दिवस आजी दर्शन संतांचें । नांदे तया घरीं दैवत पंढरीचें ॥१॥ धन्य पुण्यरूप कैसा जाला संसार । देव आणि भक्त दुजा नाहीं विचार॥ २ ॥ धन्य पूर्व पुण्य वोढवलें निरुतें । संतांचें दर्शन झालें भाग्यें बहुतें ॥ ३ ॥ तुका म्हणे धन्य आम्हां जोडली जोडी । संतांचे चरण आतां जीवें न सोडीं ॥ ४ ॥

॥ ४१६५ ॥

माय वनीं घाल्या धाये । गर्भ आवतणें न पाहे ॥१॥ तैसें पूजितां वैष्णव । सुखें संतोषतो देव ॥२॥ पुत्राच्या विजयें । पिता सुखातें जाये ॥३॥ तुका म्हणे अमृतासीदि । हरे क्षुधा आणि व्याधि ॥४॥

॥ ४१६६ ॥

धन्य आजि दिन । झालें संतांचें दर्शन ॥ १ ॥ झाली पापाताप तुटी । दैन्य गेलें उठाउठीं ॥ २ ॥ झालें समाधान । पायीं विसांवलें मन ॥ ३ ॥ तुका ह्मणे आले घरा । तोचि दिवाळी दसरा ॥ ४ ॥

॥ ४१६७ ॥

शरण शरण वाणी । शरण त्रिवाचा विनवणी ॥ १ ॥ स्तुती न पुरे हे वाचा । सत्य दास मी दासांचा ॥ २ ॥ देह सांभाळुन । पायांवरी लोटांगण ॥ ३ ॥ विनवी तुका संतां दीन । नव्हे गौरव उत्तीर्ण ॥ ४ ॥

॥ ४१६८ ॥

सोनियांचा कळस । माजी भरिला सुरारस ॥ १ ॥ काय करावें प्रमाण । तुह्मी सांगा संतजन ॥ २ ॥ मृत्तिकेचा घट । माजी अमृताचा साट ॥ ३ ॥ तुका ह्मणे हित । तें मज सांगावें त्वरित ॥ ४ ॥

॥ ४१६९ ॥

पाळितों वचन । परि बहु भीतें मन ॥ १ ॥ करितों पायांशीं सलगी नये बैसों अंगसंगीं ॥ २ ॥ जोडोनिया कर । उभें असावें समोर ॥ ३ ॥ तुका ह्मणे संत । तुम्ही मी बहु पतित ॥ ४ ॥

॥ ४१७० ॥

जडलों तों आतां पायीं । होऊं काई वेगळा ॥ १ ॥ तुम्हीं संतीं कृपा केली । गंगे चाली ओपाची ॥ २ ॥ सांभाळिलों मायबापा । केलों तापावेगळा ॥ ३ ॥ वोरसें या जीव धाला । तुका टेला मौन्यानें ॥ ४ ॥

॥ ४१७१ ॥

मागें पुढें जालों लाटा । अवघा मोटा सुकाळ ॥ १ ॥ नाहीं कोठें रितें अंग । नित्य रंग नवाचि ॥ २ ॥ पोसिन्याचे पडिलों हातीं । माझे माती चुकली ॥ ३ ॥ जोगावलों पोटीं स्वरें । पाठी भार वरि नाहीं ॥ ४ ॥ अवघिया मोकळ्या दिशा । नाहीं वोळसा कामाचा ॥ ५ ॥ संताचिये लोळें द्वारीं । पळती दुरी गोमाशा ॥ ६ ॥ कांहीं न साहेसा जाला । तुका नेला समर्थ ॥ ७ ॥ पाशातो गे महाद्वारीं । वरि झुली वाकळा ॥ ८ ॥

॥ ४१७२ ॥

भल्याचें कारण सांगावें स्वहित । जेणें कळे नीत आपणासी ॥ १ ॥ परी आह्मी असों एकाचिये हातीं । नाचवितो सिर्ती त्याचें तैसें ॥ २ ॥ वाट सांगे त्याच्या पुण्या नाहीं पार । होती उपकार अगणित ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुह्मी बहु कृपावंत । आपुलें उचित केलें संतीं ॥ ४ ॥

॥ ४१७३ ॥

अवघे चुकविले सायास । तप रासी जीवा नास ॥ १ ॥ जीव देऊनिया बळी । अवघीं तारिलीं दुबळीं । केला भूमंडळीं ।

माजी थोर पवाडा ॥ २ ॥ कांहीं न मगे याची गती । लुटवितो जगा हातीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे भक्तराजा । कोण वर्णी पार तुझा ४॥

॥ ४१७४ ॥

हा गे आलों कोणी ह्मणे बुडतिया । तेणें किती तया बळ चढे १ ॥ तुह्मी तव भार घेतला सकळ । आश्वासिलों बाळ अभयकरें ॥२॥ भुकेलिया आस दावितां निर्धार । किती होय धीर समाधान ३ ॥ तुका ह्मणे दिली चिंतामणीसाटीं । उचित कांचवटी दंडवत ॥ ४ ॥

॥ ४१७५ ॥

पाठीवरी भार । जातो वाहूनिया खर ॥ १ ॥ संत नेतील त्या ठाया । मीझी आधीन त्या काया ॥२॥ मोटे चौफळ । अंगीं उच्छिष्टाचें बळ ॥ ३ ॥ न संडी मारग । येथें न चोरूनि अंग ॥ ४ ॥ आपुलिया सत्ता । चालविती नाहीं चिंता ॥ ५ ॥ कळवळिला तुका । घरांचार येथें नका ॥ ६ ॥

॥ ४१७६ ॥

त्रिविध कर्मांचे वेगळाले भाव । निवडूनि ठाव दाखविला ॥ १ ॥ आलियाचा झाडा राहिल्याचा ठाव । सुख गौरव संतां अंगीं ॥ २॥ हिशेबें आलें तें सकळांसी प्रमाण । तेथें नाहीं आन चालों येत॥३॥ तुका ह्मणे नाहीं पापपुण्य खर्ती । झाड्याची हुजती हातां आली ४

॥ ४१७७ ॥

आज्ञा पाळूनिया असें एकसरें । तुमची उत्तरें संतांची हीं ॥ १ ॥ भागवूनि देह ठेवियेला पायीं । चरणावरि डोई येथूनचि ॥ २ ॥ येणें जाणें हें तों उपाधीचें मूळ । पूजा ते सकळ अकर्तव्य ॥ ३ ॥ तुका ह्मणे असें चरणांचा रज । पदीच सहज जेथें तेथें ॥ ४ ॥

॥ ४१७८ ॥

तुमचिये दासाचा दास करूनि ठेवा । आशीर्वाद द्यावा हाचि मज नवविधा काय बोलिली जे भक्ती । घ्यावी माझ्या हातीं संतजनीं२ तुका ह्मणे तुमच्या पायांच्या आधारें । उतरेन पार भवनदी ॥ ३ ॥

॥ ४१७९ ॥

आतां तुह्मी कृपावंत । साधु संत जिवलग ॥१॥ गोमटें तें करा माझें । भार ओझें तुम्हांसी ॥२॥ वंचिलें तें पायांपाशीं । नाहीं यासी वेगळें ॥३॥ तुका ह्मणे सोडिल्या गांटी । दिली मिठी पायांसी ॥४॥

॥ ४१८० ॥

पायां पडावें हें माझें भांडवल । सरती हे बोल कोठें पायीं ॥ १ ॥ तरि हे सलगी कवतुक केलें । लडिवाळ धाकुलें असें बाळ ॥ २ ॥ काय उणें तुम्हां संताचिये घरीं । विदित या परी सकळही ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझें उचित हे सेवा । नये करूं ठेवाठेवी कांहीं ॥ ४ ॥

॥ ४१८१ ॥

गंगा आली आम्हांवरी । संत पाउलें साजिरीं १ तेथें करीन मी अंघोळी । उडे चरणरजधुळी । येती तीर्थावळी । पर्वकाळ सकळ २ पाप पळालें जळालें । भवदुःख दुरावलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे धन्य झालों । सप्तसागरांत न्हालों ॥ ४ ॥

॥ ४१८२ ॥

भाग्याचा उदय । ते हे जोडी संतपाय ॥१॥ येथूनिया उठों माथां । मरणावांचूनि सर्वथा ॥ २ ॥ होईं बळकट । माझ्या मना रे तूं धीट ॥ ३ ॥ तुका आला लोटांगणीं । भक्ति भाग्यें झाली धणी ४॥

॥ ४१८३ ॥

जग ऐसें बहुनांवें । बहुभावें भावना ॥ १ ॥ पाहों बोलों बहु नये । सत्य काय सांभाळा ॥ २ ॥ कारियासी जें कारण । तें जतन करावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे संतजनीं । हेंचि मनीं धरावें ॥ ४ ॥

॥ ४१८४ ॥

अभिनव सुख तरि या विचारें । विचारावें बरें संतजनीं ॥ १ ॥
रूपाच्या आठवें दोन्हीही आपण । वियोग तो क्षण होत नाहीं ॥२॥
पूजा तरि चित्तें कल्पावें ब्रह्मांड । अहाच तो खंड एकदेसी ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझा अनुभव यापरि । डोई पायांवरि ठेवीतसें ॥ ४ ॥

॥ ४१८५ ॥

ऐका हें वचन माझें संतजन । विनविनों जोडून कर तुम्हां ॥ १ ॥
तर्क करूनिया आपुल्या भावना । बोलतिया जना कोण वारी ॥२॥
आमुच्या जीवींचा तोचि जाणे भाव । रखुमाईचा नाहो पांडुरंग ३
चित्त माझें त्याचे गुंतलेंसे पायीं । ह्मणऊनि कांहीं नावडे त्या ॥ ४ ॥
तुका ह्मणे मज न साहे मीनती । खेद होय चित्तीं भंग मना ॥ ५ ॥

॥ ४१८६ ॥

नव्हे हें गुरुत्व मेघवृष्टि वाणी । ऐकावी कानीं संतजनीं ॥ १ ॥
आरुष हा शब्द देवाचा प्रसाद । करविला वाद तैसा केला ॥ २ ॥
देहपिंड दान दिला एकसरें । मुळिचें तें खरें टांकसाळ ॥ ३ ॥
तुका ह्मणे झरा लागला नवनीत । सेविलिया हित पोट धाय ॥४॥

॥ ४१८७ ॥

न मानावी चिंता तुम्हीं संतजनीं । हिरा स्फटिकमणी केंवि होय १
पडिला प्रसंग स्थळा त्या सारिखा । देखिला पारिखा भाव कांहीं २
बहुतांसी भय एकाचिया दंडें । बहुत या तोंडें वचनासी ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं वैखरी बासर । करायाचे चार वेडे वेडे ॥ ४ ॥

॥ ४१८८ ॥

ऐका जी संतजन । सादर मन करूनि ॥ १ ॥ सकळांचें सार एक ।

कंटक ते त्यजावे ॥ २ ॥ विशेषता कांद्याहूनि । सेवित्या घाणी आगळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ज्याची जोडी । ते परवडी बैसीजे ॥ ४ ॥

॥ ४१८९ ॥

जैसें तैसें बाळ मातेसी आवडे । बोलतां बोबडे शब्द गोड ॥ १ ॥
आपुले आवडी लेववी खाववी । पाहोनिया जीवीं सुख वाढे ॥ २ ॥
तुका ह्मणे काय देऊं परिहार । काय तें साचार जाणा संत ॥ ३ ॥

॥ ४१९० ॥

आरुष माझी वाणी बोबडीं उत्तरें । केली ते लेंकुरें सलगी पायीं १॥
करावें कवतुक संतीं मायबापीं । जीवन देउनि रोपीं विस्तारिजे २
आधारें वद्ली प्रसादाची वाणी । उच्छिष्टसेवनीं तुमचिया ॥ ३ ॥
तुका ह्मणे हेचि करितों विनंती । मागेन पुढती सेवादान ॥ ४ ॥

॥ ४१९१ ॥

हरिभक्त माझे जिवलग सोइरे । हृदयीं पाउलें धरीन त्यांचीं १ ॥
अंतकाळीं येती माझ्या सोडवणे । मस्तक बैसणें देईन त्यांसी २ ॥
आणिक सोइरे सज्जन वो कोणी । वैष्णवांवांचोनि नाहीं मज ३ ॥
देईन आलिंगन धरीन चरण । संवसारसीण नासे तेणें ॥ ४ ॥
कंठीं तुळशीमाळा नामाचे धारक । ते माझे तारक भवनदीचे ५ ॥
तयांचे चरणीं घालीन मी मिठी । चाड हे वैकुंठीं नाहीं मज ॥ ६ ॥
आळसें दंभें भावें हरिचें नाम गाती । ते माझे सांगाती परलोकींचे७
कायावाचामनें देईन क्षेम त्यासी । चाड जीवित्वासी नाहीं मज ८
हरिचें नाम मज ह्मणविनी कोणी । तया सुखा धणी धणी वरी ९
तुका ह्मणे तया उपकारें बांधलों । ह्मणऊनि आलों शरण संतां१०

॥ ४१९२ ॥

घेसी तरी घेई संतांची हे भेटी । आणीक ते गोष्टी नको मना १ ॥
सर्वभावें त्यांचें देव भांडवल । आणीक ते बोल न बोलती ॥ २ ॥
करिशील तो करी संतांचा सांगात । आणीक ते मात नको मना ३
बैससी तरी बैस संतांच मधीं । आणीक ते बुद्धि नको मना ४ ॥
जासी तरी जाई संतांचिया गांवा । होईल विसावा तेथें मना ५ ॥
तुका ह्मणे संत सुखाचे सागर । मना निरंतर धणी घेई ॥ ६ ॥

॥ ४१९३ ॥

संतजना माझी यावया करुणा । ह्मणउनी दीन हीन जालों ॥ १ ॥
नेणें योग युक्ती नाहीं ज्ञान मति । गातसें या गीतीं पांडुरंगा २ ॥
भाव भक्ती नेणें तप अनुष्ठान । करितों कीर्तन विठ्ठलाचें ॥ ३ ॥
ब्रह्मज्ञान ध्यान न कळे धारणा । एका नारायणा वांचूनिया ॥ ४ ॥
तुका ह्मणे माझा विठोबासी भार । जाणे हा विचार तोचि माझा ५

॥ ४१९४ ॥

बरवी हे वेळ सांपडली संधी । साह्य जाली बुद्धि संचितासी ॥१॥ येणें पंथें माझीं चालिलीं पाउलें । दरुषण जालें संतां पायीं ॥ २ ॥ आसिलें दरिद्र्य दोषा जाला खंड । त्याचि काळें पिंड पुनीत झाला ३ तुका म्हणे झाला अवघा व्यापार । आली वेरझार फळासी हे ॥ ४

॥ ४१९५ ॥

डौरलों भक्तिसुखें । सेवूं अमृत हें मुखें १ संतसंगें सारूं काळ । प्रेमसुखाचा कल्लोळ ॥ २ ॥ ब्रह्मादिकांसी शिराणी । तो ह्या आनंद मेदिनी ॥३॥ नाहीं वैकुंठींचा पांग । धांवे कथे पांडुरंग ॥ ४ ॥ मुक्त व्हावें काशासाठीं । कैची येणें रसें भेटी ॥ ५ ॥ तुका म्हणे गोड । होंचि पुरे माझें कोड ॥ ६ ॥

॥ ४१९६ ॥

गुणांचाचि सांटा । करूं न वजों आणिका वाटा १ करिती छंद नानापरि । भरोन सिणती आडभरी ॥२॥ नेमली पंगती । आम्हां संतांची संगती ३ तुका म्हणे लिळा । येर कवतुक पाहे डोळां ॥४॥

॥ ४१९७ ॥

काय नाहीं माता गौरवित बाळा । काय नाहीं लळा पाळीत ते १॥ काय नाहीं त्याची करीत ते सेवा । काय नाहीं जीवा गोमटें तें २ अमंगळपणें कांटाळा न धरी । उचलोनी करीं कंठीं लावी ॥ ३ ॥ लेववी आपुलें अंगें अळंकार । संतोषाय फार देखोनिया ॥ ४ ॥ तुका ह्मणे स्तुति योग्य नाहीं परी । तुह्मां लाज थोरी अंकिताची ५

॥ ४१९८ ॥

निजसेजेचीं अंतुरी । पादलिया कोण मारी ॥१॥ तैसा आह्मांसी उबगतां तुका विनवितो संतां ॥२॥ मूल मांडीवरी हागलें । तें बा कोणें रे त्यागिलें ॥ ३ ॥ दासी कामासी चुकली । तें बा कोणे रे विकली ॥४॥ पांडुरंगाचा तुका पापी । संतम्हाई काळासी वापी ५

॥ ४१९९ ॥

नव्हती माझे बोल जाणा हा निर्धार । मी आहें मजूर विठोबाचा १॥ निर्धारा वचन सोडविलें माझ्या । कृपाळुवें लज्जा राखियेली ॥ २॥ निर्भर मानसीं झालों आनंदाचा । गोडावली वाचा नामघोषें ॥३॥ आतां भय माझें नासलें संसारीं । झालोंसें यावरी गगनाचा ॥४॥ तुका ह्मणे हा तों संतांचा प्रसाद । लाधलों आनंद प्रेमसुख ॥५॥

॥ ४२०० ॥

हरिच्या दासां सोपें वर्म । सर्व धर्म पाउलें ॥ १ ॥ कढिये देव बाहेर खांदी । वैष्णव मांदी क्रीडेसी ॥ २॥ सरती येणें आटाआटी । नाहीं तुटी लाभाची ॥३॥ तुका ह्मणे समाधान । सदा मन आमुचें ॥४॥

॥ ४२०१ ॥

जायाचें शरीर जाईल क्षणांत । कां हा गोपीनाथ पावेचि ना ॥ १ ॥ तुह्मी संत सारे कृपेचे सागर । माझा निरोप फार सांगा देवा ॥२॥ अनाथ अज्ञान कोणी नाहीं त्याला । पायांपें विठ्ठला ठेवी मज ॥३॥ तुका ह्मणे ऐसी करा निरवण । मग तो रक्षण करील माझें ॥४॥

॥ ४२०२ ॥

येथीचिया अळंकारें । काय खरें पूजन ॥ १ ॥ वैकुंठींच्या लावूं वाटा । सर्व साटा ते ठायीं ॥ २ ॥ येथीचिया नाशवंतें । काय रितें चाळवूं ॥ ३ ॥ तुका ह्मणे वैष्णव जन । माझे गण समुदाय ॥ ४ ॥

॥ ४२०३ ॥

सर्वपक्षीं हरि साहेसखा झाला । ओल्या अंगणींच्या कल्पलता त्याला ॥ १ ॥ सहज चाली चालतां पायवाटे । चिंतामणीसमान होती गोटे ॥ २ ॥ ऐसें हरिभक्तांचें ज्ञान महिमान । अतर्क्य तयांचें दुर्लभ दरुशन ॥ ३ ॥ तुका तरी सहज बोले वाणी । त्याचे घरीं वेदांत वाहे पाणी ॥ ४ ॥

॥ ४२०४ ॥

पायांच्या प्रसादें । कांहीं बोलिलों विनोदें ॥ १ ॥ मज क्षमा करणें संतीं । नव्हे अंगभूत युक्ति ॥ २ ॥ नव्हे हा उपदेश । तुमचें बडबडिलों शेष ३ तुमचे कृपेचें पोसणें । जन्मोजन्मीं तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ४२०५ ॥

गुरुचिया मुखें होइल ब्रह्मज्ञान । न कळे प्रेमखुण विटोबाची ॥ १ ॥ वेदांतें विचारीं पुराणातें पुसा । विठोबाचा कैसा प्रेमभाव ॥ २ ॥ तुका म्हणे सांडा जाणीवेचा शीण । विठोबाची खूण जाणती संत३

॥ ४२०६ ॥

कळल हे खूण । तरि दावी नारायण ॥१॥ सत्य संतापाशीं राहे येरां भय आड आहे ॥२॥ अणूचिया ऐसें । असे भरलें प्रकाशें ३॥ इंद्रियांचे धनी । ते हे जाती समजूनि ॥ ४ ॥ तर्क कुतर्क वाटा । नागवण घटापटा ॥ ५ ॥ तुका म्हणे ल्यावें । डोळा अंजन बरवें ६॥

॥ ४२०७ ॥

अनंत लक्षणें वाणितां अपार । संतांचें तें घर सांपडेना ॥ १ ॥ ज्या घरीं संत राहाती आपण । तें तुम्हां ठिकाण आतुडेना ॥ २ ॥ ठिकाण धरूनी पाहावे ते संत । उगाच आकांत करूं नये ॥ ३ ॥ संत होऊनिया संतांसी पहावें । तरिच तरावें तुका म्हणे ॥ ४ ॥

॥ ४२०८ ॥

विष्णुमय सर्व वैष्णवांसी ठावें । येरांनीं वाहावे भार माथां ॥ १ ॥ साधनें संकटें सर्वांलागीं सीण । व्हावा लागे क्षीण अहंमान ॥ २ ॥

भाव हा कठीण वज्र हें भेदवे । परि न छेदवे मायाजाळ ॥ ३ ॥
तुका म्हणे वर्म भजनेंचि सांपडे । येरांसी तो पडे ओस दिशा ॥४॥

॥ ४२०९ ॥

सकळ पूजा स्तुति । करावी ते व्हावें याती ॥ १ ॥ ह्मणऊनि वारा जन । संतपूजा नारायण ॥ २ ॥ सेवावें तें वरी । दावी उमटूनि ढेंकरीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे सुरा । दुधा म्हणतां केवीं बरा ॥ ४ ॥

॥ ४२१० ॥

पडोनिया राहीं । उगाच संताचिये पायीं ॥ १ ॥ नलगे पुसणें सांगावें । चित्त शुद्ध करीं भावें ॥ २ ॥ सहज ते स्थिती । उपदेश परयुक्ति ॥३॥ तुका ह्मणे भाव । जवळी धरूनी आणि देव ॥ ४ ॥

॥ ४२११ ॥

जेथें जावें तेथें कपाळ सरिसें । लाभ तो विशेषें संतसंगें ॥ १ ॥
पूर्व पुण्यें जरि होतीं सानकूळ । अंतरायमूळ नुपजे तेथें ॥ २ ॥
भाग्य तरी नव्हे धन पुत्र दारा । निकट वास बरा संतापायीं ॥ ३॥
तुका म्हणे हेचि करावी मिरासी । बळी संतापाशीं द्यावा जीव ४॥

॥ ४२१२ ॥

बहुतां जन्मींचें संचित । सबळ होय जरि बहुत । तरिचि होय हरिभक्त । कृपावंत मानसीं ॥ १ ॥ ह्मणवी ह्मणियारा तयांचा । दास आपुल्या दासांचा । अनुसरले वाचा । काया मनें विठ्ठलीं २ असे भूतदया मानसीं । अवघा देखे हृषीकेशी । जीवें न विसंबे त्यासी । मागें मागें हिंडतसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे निर्विकार । शरणागतां वज्रपंजर । जे जे अनुसरले नर । तया जन्म चुकलें ॥ ४ ॥

॥ ४२१३ ॥

शुद्ध चर्या हेंचि संताचें पूजन । लागताचि धन नाहीं वित्त ॥ १ ॥
सगुणाचे सोई सगुण विश्रांती । आपणाचि येती चोजवीत ॥ २ ॥
कीर्तनींच वोळे कृपेचा ओरस । दूरीपणें वास संनिधता ॥ ३ ॥
तुका ह्मणे वर्म सांगतों सवेंगें । मन लावा लागें स्वहिताच्या ॥४॥

॥ ४२१४ ॥

भूतदयापरत्वें जया तया परी । संत नमस्कारीं सर्वभावें ॥ १ ॥
शिकल्या बोलाचा धरीसील ताठा । तरी जासी वाटा यमपंथें २॥
हिरा परिस मोहरा आणीक पाषाण । नव्हे परी जन संता तैसी ३
सारितां वाहाळां गंगे सागरा समान। लेखी तयाहून अधम नाहीं ४
आणीक अमुप होती तारांगणें । रविशशिमानें लेखूं नये ॥ ५॥
तुका ह्मणे नाहीं नम्रता अंगीं । नव्हे तें फिरंगी कठिण लोह ॥ ६॥

॥ ४२१५ ॥

हरिजनाची कोणां न घडावी निंदा। साहात गोविंदा नाहीं त्याचें

रूपा येऊनिया धरी अवतार। भक्तां अभयंकर खळां कष्ट ॥ २ ॥ दुर्वास हा छळों आला आंबऋषी । सुदर्शन त्यासी जाळित फिरे ॥ ३ ॥ द्रौपदीच्या क्षोभें कौरवांची शांति । होऊनि श्रीपति साह्य केलें ॥ ४ ॥ न साहेचि वस्त्र पांडवां पारिखा । धुडाविला सखा बळिभद्र ॥ ५ ॥ तुका म्हणे अंगीं राखिली दुर्गंधि । अश्वत्थामा वधी पांडवपुत्रा ॥ ६ ॥

॥ ४२१६ ॥

उपकारी असे आरोणि उरला। आपुलें तयाला पर नाहीं ॥ १ ॥
लाभावरि घ्यावें सांपडलें काम । आपला तो श्रम न विचारी २ ॥
जीवा ऐसें देखे आणिकां जिवांसी । निखळचि रासि गुणांचीच ३
तुका ह्मणे देव तयांचा पांगिला । न भंगे संचला धीर सदा ॥ ४ ॥

॥ ४२१७ ॥

चोरासी चांदणें वेश्येसी सेजार । परिसेसी खापर काय होय १ ॥
दुधाचे आधणीं वैरिलें पाषाण । कदा काळीं जाण पाक नव्हे २ ॥
तुका ह्मणे जरि पूर्वपुण्यें सिद्धि । तरिच राहे बुद्धि संतसंगीं ३ ॥

॥ ४२१८ ॥

संतचरणीं नाहीं गोडी । ज्यासी विषयीं आवडी ॥ १ ॥ त्यासी कैंचा भेटे देव । संतचरणीं नाहीं भाव ॥ २ ॥ संतसेवेसी आंग चोरी । दृष्टि न पडो तयावरी ॥ ३ ॥ पाहे गुणदोष संतांचे । जळो काळें तोंड त्याचें ४ तुका ह्मणे संतसेवा । आमुच्या पूर्वजांचा ठेवा ५

॥ ४२१९ ॥

संताचे गुणदोष आणितां या मना । केलिया उगाणा सुकृताचा १॥
पिळोनिया पाहे पुष्पाचा परिमळ । चिरोनि केळी केळ गाढव तो २॥
तुका म्हणे गंगे अग्नीसि विटाळ । लावी तो चांडाळ दुःख पावे ३॥

॥ ४२२० ॥

संतापाशीं बहु असावें मर्यादा । फळकटाचा धंदा उर फोडी ॥१॥
वासर तो भुंके गाढवाचे परी । उडे पाठीवरी दंड तेणें ॥ २ ॥
समय नेणे तें वेडें चाहाटळ । अवगुणाचा ओंगळ मान पावे ॥ ३ ॥
तुका ह्मणे काय घाया चाळवणी । पिटपिट पाणी हागवणेची ॥४॥

॥ ४२२१ ॥

संताचा अतिक्रम । देवपूजा तो अधर्म ॥ १ ॥ येती दगड तैसे वरी । मंत्रपुष्पें देवा शिरीं ॥ २ ॥ अतीतासी गाळी । देवा नैवेद्यासी पोळी ॥३॥ तुका ह्मणे देवा । ताडण भेदकांची सेवा ॥ ४ ॥

॥ ४२२२ ॥

अवघा भार वाटे देवा । संतसेवा न घडतां ॥१॥ कसोटी हे असे हातीं । सत्य भूमी भगवंत ॥२॥ चुकलोंसा दिसे पंथ । गेले संत तो ऐसा ॥३॥ तुका ह्मणे सोंग वाया । कारण या अनुभवें ॥४॥

॥ ४२२३ ॥

दुष्ट भूषण सज्जनाचें । अलभ्य लाभ पुण्य त्याचें ॥१॥ धन्य ऐसा परउपकारी । जाय नरका आणिकांवारी ॥२॥ मळ खाये संवदणी । करी आणिकांची उजळणी ॥३॥ तुका ह्मणे त्याचा । प्रीती आदर करा साचा ॥४॥

॥ ४२२४ ॥

झांबिली महारें । त्याची व्याली असे पोरें ॥१॥ करी संताचा मत्सर । कांपे उभारोनि कर ॥२॥ बीज तैसें फळ । वरी आलें अमंगळ ॥३॥ तुका ह्मणे टावें । ऐसें झालें अनुभवें ॥४॥


॥ ४२२५ ॥

भुंकुनिया सुनें लागे हस्तीपाठीं । होऊनि हिंपुटी दुःख पावे ॥१॥ काय त्या मशकें तयाचें करावें । आपुल्या स्वभावें पीडतसे ॥२॥ मातलें बोकड विटवी पंचानना । घेतलें मरणा धरणें तें ॥३॥ तुका ह्मणे संतां पीडितील खळ । घेती तोंड काळें करूनियां ॥४॥

तुकारामकृत अभंगांची गाथा.

भाग तिसरा.

प्रासंगीक अभंग.



तुकोबावर सद्गुरुकृपा.

॥ ४२२६ ॥

सद्गुरुरायें कृपा मज केली । परि नाहीं घडली सेवा कांहीं ॥ १ ॥
सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना । मस्तकीं तो जाणा ठेविला कर २
भोजना मागती नृप पावशेर । पडिला विसर स्वप्नामाजी ॥ ३ ॥
कांहीं कळे उपजला अंतराय । म्हणोनियां काय त्वरा जाली ॥४॥
राघवचैतन्य केशवचैतन्य । सांगितली खूण माळिकेची ॥ ५ ॥
बाबाजी आपलें सांगितलें नाम । मंत्र दिला राम कृष्ण हरि ॥ ६ ॥
माघशुद्ध दशमी पाहूनी गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे ॥७॥

॥ ४२२७ ॥

माझिये मनींचा जाणोनियां भाव । तो करी उपाव गुरुराजा ॥ १ ॥
आवडीचा मंत्र सांगितला सोपा । जेणें नव्हे गुंपा कांहीं कोठें २ ॥
जाती पुढें एक उतरले पार । हा भवसागर साधुसंत ॥ ३ ॥
जाणत्या नेणत्या ज्या जैसी आवडी । उतार सांगडी तापे पेटी ४ ॥
तुका म्हणे मज दाविंयला तारू । कृपेचा सागरु पांडुरंग ॥ ५ ॥

॥ ४२२८ ॥

घालूनिया भार राहिलों निश्चिंतीं । निरविलें संतीं विठोबासी १ ॥
लावूनिया हातें कुरवाळीला माथा । सांगितलें चिंता न करावी २

कटीं कर समचरण साजिरे । राहिला भीवरे तीरीं उभा ॥ ३ ॥
खुंटले सायास आणीक या जीवा । धरिले केशवा पाय तुझे ॥ ४ ॥
तुज वाटे आतां तें करीं अनंता । तुका ह्मणे संता लाज माझी ५ ॥

॥ ४२२९ ॥

माझिये मनींचा जाणा हा निर्धार । जिवासी उदार जालों आतां १
तुजविण दुजें न धरीं आणिका । भय लज्जा शंका टाकियेली ॥२॥
ठायींचा संबंध तुज मज होता । विशेष अनंत। केला संतीं ॥ ३ ॥
जीवभाव तुझ्या ठेवियेला पायीं हेंचि आतां नाहीं लाज तुह्मां ४॥
तुका ह्मणे संतीं घातला हावाला । न सोडीं विठ्ठला पाय आतां ॥५॥

तुकोबास कवित्व करण्याविषयीं दृष्टांत.

॥ ४२३० ॥

नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें । सवें पांडुरंगें येऊनिया ॥ १ ॥
सांगितलें काम करावें कवित्व । वाउगें निमित्य बोलों नको ॥२॥
माप टाकी सळ धरिली विठ्ठलें । थापटोनी केलें सावधान ॥ ३ ॥
प्रमाणाची संख्या सांगे शत कोटी । उरले ते शेवटीं लावी तुका ४॥

॥ ४२३१ ॥

घाल हात तरी राहेन संगतीं । संतांचे पंगती पायांपाशीं ॥ १ ॥
आवडीचा ठाव आलोंसें टाकून । आतां उदासीन न धरावें ॥ २ ॥
शेवटील स्थळ नीच माझी वृत्ति । आधारें विश्रांती पावईन ॥ ३ ॥
नामदेवापायीं तुक्या स्वप्नीं भेटी । प्रसाद हा पोटीं राहिलासे ॥४॥

कवित्वाचा निषेध व त्याचा परिहार.

॥ ४२३२ ॥

भूतबाधा आह्मां घरीं । हें तों आश्चर्य गा हरी ॥ १ ॥ जाला भक्तीचा कळस । आले वस्तीस दोष ॥२॥ जागरणाचें फळ । दिली जोडोनि तळमळ ॥३॥ तुका ह्मणे देवा । आह्मांच कळों आली सेवा ॥४॥

॥ ४२३३ ॥

करूं कवित्व काय नाहीं आतां लाज । मज भक्तराज हांसतील १॥
आतां आला एका निवाड्याचा दिस । सत्याविण रस विरसला २
अनुभवाविण कोण करी पाप । रितेंचि संकल्प लाजलावे ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां न धरवे धीर । नव्हे जीव स्थिर माझा मज ॥४॥

॥ ४२३४ ॥

पावावे संतोष । तुम्ही यासाठीं सायास ॥ १ ॥ करीं आवडी वचनें । पालटूनी क्षणक्षणें ॥ २ ॥ द्यावें अभयदान । भूमी न पडावें वचन ॥ ३ ॥ तुका ह्मणे परस्परें । कांहीं वाढवीं उत्तरें ॥ ४ ॥

॥ ४२३५ ॥

आतां नेम जाला । याच कळसीं विठ्ठला ॥ १ ॥ हातीं न धरी लेखणी । काय भुसकट ते वाणी ॥२॥ जाणें तेणें काळ । उरला सारीक सकळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे घाटी । चाटूं कोरडा शेवटीं ॥ ४ ॥

॥ ४२३६ ॥

कांहींच न लगे आदि अवसान । बहुत कठीण दिसतसे ॥ १ ॥ अवघ्याच माझ्या वेचविल्या शक्ति । न चलेसी युक्ति झाली पुढें २॥ बोलिलें वचन हारपलें नभीं । उतरलों तों उभीं आह्मी तैसीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं न करावेंसें झालें । थकितचि ठेलें चित्त उगें ४ ॥

॥ ४२३७ ॥

केल्यापुरती आळी । कांहीं होते टाळाटाळी ॥ १ ॥ सत्यसंकल्पाचें फळ । होतां न दिसेचि बळ २ दळणाच्या ओंव्या । रित्या खऱ्या मापें घ्याव्या ॥ ३ ॥ जातीं उखळें चाटूं । तुका ह्मणे राज्य घाटूं ४

॥ ४२३८ ॥

स्तुति तरी करूं काय कोणापाशीं । कीर्ति तरी कैसी वाखाणाची १ खोट्या तव नाहीं अनुवादाचें काम । उरला तो भ्रम वरीवरी २ ॥ ह्मणवावें त्याची खूण नाहीं हातीं । अवकळा फजिती सावकाश ३ तुका ह्मणे हेंगे तुमचें माझें तोंड । होऊनिया लंड आळवितों ॥ ४ ॥

॥ ४२३९ ॥

मागितल्यास कर पसरी । पळतां भरी चाकती ॥१॥ काय आम्ही नेणों वर्म । केला श्रम नेणतां ॥ २ ॥ बोलतां बरें येतां रागा । कठीण लागा मागेंमागें ३ तुका ह्मणे येथें बोली । असे चाली उफराटी ॥४॥

॥ ४२४० ॥

काशासाठीं बैसों करूनिया हाट । वाउगा बोभाट डांगोरा हा ॥१॥ काय आलें एका जिवाच्या उद्धारें । पावशी उधारें काय होतें ॥२॥ नेदी पट परी अन्न तों न मारी । आपुल्या थोरीसाठीं राजा ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां अव्हाशील तरी । मग कोण करी दुकान हा ॥ ४ ॥

॥ ४२४१ ॥

सांगा दास नव्हे तुमचा मी कैसा । ऐसें पंढरीशा विचारूनी ॥१॥ कोणासाठीं केली प्रपंचाची होळी । या पायां वेगळी मायबाप ॥२॥ नसेल तो द्यावा सत्याचा धीर । नये भाजूं हीर उफराटें ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मां आहिक्य परत्रीं । नाहीं कुळगोत्रीं तुजविण कोणी ४

॥ ४२४२ ॥

असो तुजपाशीं । आम्हां त्याची काय चाड ॥ १ ॥ विटोबें कां कोंडूं मन । समाधान असोनी ॥२॥ करावा तो टरे आठ । खटपट वाढतसे ॥३॥ तुका ह्मणे येउनि रागा । कां मी विभागा मुकेन ॥४॥

॥ ४२४३ ॥

अनन्यासी ठाव एक सर्वकाळें । एकाविण दुजें नेणे चित्त ॥ १ ॥
न पुरतां आळी देशधडी व्हावें । हें काय बरवें दिसतसे ॥ २ ॥
लेंकराचा भार माउलीचे शिरीं । निढळ तें दुरी धरिलिया ॥ ३ ॥
तुका ह्मणे किती घातली लांबणी । समर्थ होऊनी केवढ्यासाठीं ४

॥ ४२४४ ॥

आहे तेंचि पुढें पाहीं । बरें आहे येथेंचि ॥१॥ काय वाढवूनि काम । वगाच श्रम तृष्णेचा ॥ २ ॥ स्थिरावना ओघीं बरें । चाली पुरें पडेल ॥३॥ तुका ह्मणे वळितां मन । आह्मां क्षण न लगे ॥ ४ ॥

॥ ४२४५ ॥

नाहीं जों वेचलों जिवानिया त्यागें । तोंवरी वाउगें काय बोलों १॥
जाणिवलें आतां करीं ये उद्देश । जोडी किंवा नाश तुमची जीवें २
ठायींचेंचि आलें होतें ऐसें मना । जावें ऐसें वना दृढ जालें ॥ ३ ॥
तुका ह्मणे मग वेचीन उत्तरें । उद्देशिलें खरें जाल्यावरी ॥ ४ ॥

॥ ४२४६ ॥

कांहीं मागणें हें आह्मां अनुचित । वडिलांची रीत जाणतसों ॥१॥
देह तुच्छ जालें सकळ उपाधी । सेवापाशीं बुद्धि राहिलीसे ॥ २ ॥
शब्द तो उपाधि अचळ निश्चळ । अनुभव हा काय नाहीं अंगीं ३॥
तुका ह्मणे देह फांकिला विभागीं । उपकार अंगीं उरविला ॥ ४ ॥

॥ ४२४७ ॥

माझा मज नाहीं । आला उबग तो कांहीं ॥ १ ॥ तुमच्या नामाची जतन । नव्हतां थोर वाटे सीण ॥ २ ॥ न पडावी निंदा । कानीं स्वामीची गोविंदा ३ तुका ह्मणे लाज । आह्मां स्वामीचें तें काज ४

॥ ४२४८ ॥

बोलतां वचन असा पाठमोरे । मज भाव बरे कळों आले ॥ १ ॥
मागितलें नये अरुचीनें हातां । नाहीं वरी सत्ता आदराची ॥ २ ॥
समाधानासाठीं लाविलासे कान । चोरलें तें मन दिसतसां ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मां तुमचेचि फंद । वरदळ छंद कळों येती ॥ ४ ॥

॥ ४२४९ ॥

नव्हे तुह्मां सरी । येवढें कारण मुरारी ॥१॥ मग जैसा तैसा काळ । दाट सारावा पातळ ॥ २ ॥ स्वामीचें तें सांडे । पुत्र होतां काळ-तोंडें ॥ ३ ॥ शब्दा नाहीं रुचि । मग कोठें तुका वेची ॥ ४ ॥

॥ ४२५० ॥

नाहीं आइकत तुम्ही माझे बोल । कासया हे फोल उपणूं भूस १ ॥
ऐसी ते करीन बैसलिया ठाया । तूंचि तुझ्याचिया जवळी देवा ॥२॥
करावे ते केले सकळ उपाय । आतां पाहों काय अझुनी वास ॥३॥
तुका ह्मणे आला आइसी सेवट । होऊनिया नीट पायीं पडों ॥ ४ ॥

॥ ४२५१ ॥

रूपें गोविलें चित्त । पायीं राहिलें निश्चित ॥१॥ तुम्ही देवा अवघेचि गोमटे । मुख देखतां दुःख न भेटे २ झाली इंद्रियां विश्रांति । भ्रमतां पीडित होती ॥३॥ तुका ह्मणे भेटी । सुटली भवभेदाची गांठी ॥४॥

॥ ४२५२ ॥

थोर अन्याय केला । तुझा अंत म्यां पाहिला । जनाचिया बोला । साठीं चित्त क्षोभविलें ॥१॥ भागविलासी केला सीण । अधम मी यातीहीन । झांकूनी लोचन । दिवस तेरा राहिलों ॥ २ ॥ अवघें घालूनिया कोडें तानभूकेचें सांकडें । योगक्षेम । पुढें तुज करणें लागेल ॥ ३ ॥ उदकीं राखिले कागद चुकाविला जनवाद । तुका ह्मणे ब्रीद । साच केलें आपुलें ॥ ४ ॥

॥ ४२५३ ॥

नव्हती आली शिळा सुरी । अथवा घाव पाठीवरी । तो म्यां केला हरी । एवढा तुम्हां आकांत ॥१॥ वांटिलासी दोहीं ठायीं । मजपाशीं आणि डोहीं । लागों दिला नाहीं । येथें तेथें आघात ॥२॥ जीव घेती मायबापें । थोड्या अन्यायाच्या कोपें । हें तों नव्हे सोपें । साहों त्यांचि जाणितलें ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपावंता । तुज ऐसा नाहीं दाता । काय वाणूं आतां । वाणी माझी कुंठली ॥ ४ ॥

॥ ४२५४ ॥

कापो कोणी माझी मान । सुखें पीडोत दुर्जन । तुज होय सीण तें मी न करीं सर्वथा ॥ १ ॥ चुकी झाली एकवेळा । मजपासूनी चांडाळा । उभें करोनिया जळा । माजी वह्या राखिल्या ॥२॥ नाहीं केला हा विचार । माझा कोण अधिकार । समर्थासी भार । न कळे कैसा घालावा ॥ ३ ॥ गेलें होऊनिया मागें । नये बोलों तें वाउगें । पुढिलिया प्रसंग । तुका ह्मणे जाणावें ॥ ४ ॥

॥ ४२५५ ॥

तूं कृपाळू माउली । आम्हां दीनांची साउली । न संवरीत आली । बाळवेशें जवळी ॥ १ ॥ माझें केलें समाधान । रूप गोजिरें सगुण । निववीलें मन । आलिंगन देऊनी ॥ २ ॥ कृपा केली जना हातीं । पायीं ठाव दिला संतीं । कळों नये चित्तीं । दुःख कैसें आहे तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मी अन्यायी । क्षमा करीं वो माझे आई । आतां पुढें काई । तुज घालूं सांकडें ॥ ४ ॥

॥ ४२५६ ॥

काय जाणें मी पामर । पांडुरंगा तुझा पार । धरिलीया धीर । काय

एक न करिसी ॥१॥ उताविळ जालों आधीं । मतिमंद हीनबुद्धि । परि तूं कृपानिधि । नाहीं केला अव्हेर ॥२॥ तूं देवांचाही देव अवघ्या ब्रह्मांडाचा जीव । आम्हां दासा कींव । कां भाकणें लागली ३॥ तुका म्हणे विश्वंभरा । मी तों पतितचि खरा । अन्याय दुसरा । दारीं धरणें बैसलों ॥ ४ ॥

॥ ४२५७ ॥

तूं माउलीहून मयाळ । चंद्राहूनी शीतळ । पाणियाहूनी पातळ । कल्लोळ प्रेमाचा ॥ १ ॥ देऊं काशाची उपमा । दुजी तुज पुरुषोत्तमा । ओंवाळूनि नामा । तुझ्या वरूनी टाकिलों ॥२॥ तुवां केलें रे अमृता । गोड त्याही तूं परता । पांचातत्वांचा जनिता । सकळ सत्ता- नायका ३ कांहीं न बोलोनी आतां । उगाच चरणीं ठेवितों माथा । तुका म्हणे पंढरीनाथा । क्षमा करीं अपराध ॥ ४ ॥

॥ ४२५८ ॥

मी अवगुणी अन्यायी । किती म्हणोन सांगों काई । आतां मज पायीं । ठाव देई विठ्ठले १ पुरे पुरे हा संसार । कर्म बळिवंत दुस्तर । राहों नेदी स्थिर । एके ठायीं निश्चळ ॥ २ ॥ अनेक बुद्धीचे तरंग । क्षणक्षणां पालटती रंग । धरूं जातां संग । तंव तो होतो बाधक ३ तुका ह्मणे आतां तोडीं माझी अवघी चिंता । येऊनीयां पंढरीनाथा । वास करीं हृदयीं ॥ ४ ॥

ज्ञानेश्वर महाराजांनीं एका (धरणेकरी) ब्राह्मणास तुकोबाकडे पाठविलें होतें त्याविषयीं अभंग.

॥ ४२५९ ॥

काय ज्ञानेश्वरीं उणें । तिहीं पाठविलें धरणें ॥ १ ॥ ऐकोनिया लिखित । म्हूण जाणवली हे मात ॥ २ ॥ तरी जाणे धणी । वदे सेवकाची वाणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ठेवा । होतां सांभाळावें देवा ॥ ४ ॥

॥ ४२६० ॥

काय मी जाणता । तुह्माहूनी अनंता ॥ १ ॥ जों हा करूं अतिशय । कां तुह्मां दया नये ॥ २ ॥ काय तुज नाहीं कृपा । विश्वाचिया मायबापा ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाणी । माझी वदे तुह्मांहूनी ॥ ४ ॥

॥ ४२६१ ॥

नव्हे दास खरा । परि आला हा डांगोरा ॥ १ ॥ यासी काय करूं आतां । तूं हें सकळ जाणता ॥ २ ॥ नाहीं पुण्य गांठीं । जें हें वेचूं कोणासाठीं ३ तुका ह्मणे कां उपाधि । वाढविली कृपानिधि ॥ ४ ॥

॥ ४२६२ ॥

तुजविण सत्ता । नाहीं वाचा वदविता ॥ १ ॥ ऐसें आह्मी जाणों

दास । ह्मणोनी जालों उदास २ तुह्मी दिला धीर । तेणें मन झालें स्थिर ३ तुका ह्मणे आड । केलों मी हें तुझें कोड ॥ ४ ॥

॥ ४२६३ ॥

ठेवूनिया डोई । पायीं जालों उतराई ॥ १ ॥ कारण तें तुह्मी जाणा । मी तराळ नारायणा ॥२॥ प्रसंगीं वचन । दिलें तेंचि खावें अन्न ॥ ३ ॥ तुका ह्मणे भार । तुह्मी जाणा थोडा फार ॥ ४ ॥

॥ ४२६४ ॥

अगा ये उदारा अगा विश्वंभरा । रखुमाईच्या वरा पांडुरंगा ॥ १ ॥ अगा सर्वोत्तमा अगा कृष्णा रामा । अगा मेघश्यामा विश्वजनित्या २ अगा कृपावंता जीवन तूं दाता । अगा सर्वसत्ता धरितया ॥ ३ ॥ अगा सर्वजाणा अगा नारायणा । करुणावचना चित्त द्यावें ॥ ४ ॥ तुका ह्मणे नाहीं अधिकार तैसी । सरती पायांपाशीं केली मागें ५॥

॥ ४२६५ ॥

श्रीपंढरीशा पतितपावना । एक विज्ञापना पायांपाशीं ॥ १ ॥ अनाथा जीवांचा तूं काजकैवारी । ऐसी चराचरीं ब्रीदावळी ॥२॥ न सांगतां कळे अंतरींचें गुज । आतां तुझी लाज तुज देवा ॥ ३ ॥ आळिकार ज्याचें करिसी समाधान । अभयाचें दान देऊनिया ॥४॥ तुका ह्मणे तूंचि खेळें दोहीं ठायीं । नसेल तो देई धीर मना ॥ ५ ॥

॥ ४२६६ ॥

काय तुह्मी जाणा । करूं अव्हेर नारायणा ॥ १ ॥ तरी या लटिक्याची गोही । निवडली दुसरे ठायीं ॥२॥ कळों अंतरींचा गुण । नये फिटल्यावांचून ॥ ३ ॥ आणिलें अनुभवा । जनाच्या हें ज्ञानदेवा ॥४॥ आणीक कोणी भिती । त्यांच्या चिंतनें विश्रांति ॥ ५ ॥ तुका म्हणे बीज पोटीं । फळ तेंचि शेवटीं ॥ ६ ॥

धरणेकऱ्यास उपदेश.

॥ ४२६७ ॥

नको कांहीं पडों ग्रंथाचिये भरीं । शीघ्र व्रत करीं हेंचि एक ॥ १ ॥ देवाचिये चाडे आळवावे देवा । ओस देह भावा पाडोनिया ॥२॥ साधनें घालिती काळाचिये मुखीं । गर्भवास सेखीं न चुकती ॥३॥ उधाराचा मोक्ष होय नव्हे ऐसा । पतनासी इच्छा आवश्यक ॥४॥ रोकडी पातली अंगसंगें जरा । आतां उजगरा कोठवरी ॥ ५ ॥ तुका म्हणे घालीं नामासाठीं उडी । पांडुरंग थडी पाववील ॥ ६ ॥

॥ ४२६८ ॥

पाहूनिया ग्रंथ करावें कीर्तन । तेव्हां आलें जाण फळ त्याचें ॥१॥ नाहीं तरी वाया केली तोंडपिटी । उरी तें शेवटीं उरलीसे ॥ २ ॥

पढोनिया वेद हरिगुण गावे । ठावें तें जाणावें तेव्हां झालें ॥ ३ ॥
तपतीर्थाटणें तेव्हां कार्यसिद्धि । स्थिर राहे बुद्धि हरिच्या नामीं ४
यागयज्ञादिक काय दानधर्म । तरी फळ नाम कंठीं राहे ॥ ५ ॥
तुका ह्मणे नको कायाक्लेशें भरी । पडों सार धर्मी हेंचि एक ॥ ६ ॥

॥ ४२६९ ॥

गोविंद गोविंद । मना लागलिया छंद ॥ १ ॥ मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया ॥ २ ॥ आनंदलें मन । प्रेमें पाझरती लोचन ॥ ३ ॥ तुका ह्मणे आळी । जेवीं नुरेचि वेगळी ॥ ४ ॥

॥ ४२७० ॥

ज्याचें जया ध्यान । तेंचि होय त्याचें मन ॥ १ ॥ म्हणऊनी अवघें सारा । पांडुरंग दृढ धरा ॥ २ ॥ सम खूण ज्याचे पाय । उभा व्यापक विटे ठाय ॥३॥ तुका ह्मणे नभा । परता अनू नाहीं गाभा ॥४॥

॥ ४२७१ ॥

सुखें खावें अन्न । त्यानें करावें चिंतन ॥ १ ॥ त्यानें दिलें त्यासी । पावे फळ आपणासी ॥ २ ॥ आहे हा आधार । नाम त्याचें विश्वंभर ॥ ३ ॥ नाहीं रिता ठाव । तुका ह्मणे पसरीं भाव ॥ ४ ॥

॥ ४२७२ ॥

नाहीं देवापाशीं मोक्षाचें गांठोळें । आणुनी निराळें द्यावें हातीं १॥
इंद्रियांचा जय साधूनिया मन । निर्विषय करण असे तेथें ॥ २ ॥
उपास पारणीं अक्षरांची अटी । सत्कर्मी शेवटीं असे फळ ॥ ३ ॥
आदरें संकल्प वारीं अतिशय । सहज तें काय दुःख जाण ॥ ४ ॥
स्वप्नींच्या घायें चिरकसी वाया । रडे रडतिया सवें मिथ्या ॥ ५ ॥
तुका ह्मणे फळ आहे मूळापाशीं । शरण देवासीं जाय वेगीं ॥ ६ ॥

॥ ४२७३ ॥

त्यजिलें भेटवीं आणूनी वासना । दाविल्यानें जना काय काज १॥
आळवावें देवा भाकूनी करुणा । आपुलिया मना साक्ष करीं ॥ २ ॥
नाहीं जावें यावें दुरूनी लागत । आहे साक्षभूत अंतरींचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे हा आहे कृपासिंधु । तोडी भवबंधु तात्काळिक ॥ ४ ॥

॥ ४२७४ ॥

संकोचोनि काय झालासी लहान । घेई अपोशन ब्रह्मांडाचें ॥ १ ॥
करोनी पारणें आंचवें संसारा । उशीर उशिरा लावूं नको ॥ २ ॥
घरकुलानें होता पडिला अंधार । तेणें केलें फार कासावीस ॥३॥
झुगारूनी दुरी लपविलें काखे । तुका म्हणे वाखे कौतुकाचे ॥ ४ ॥

॥ ४२७५ ॥

माझ्या बापें मज दिधलें भातुकें । म्हणोनी कवतुकें क्रीडा करीं १॥
केली आळी पुढें बोलिलों वचन । उत्तम हें ज्ञान आलें त्याचें ॥२॥

घेऊनी विभाग जावें लवलाह्या । आलेती त्या ठाया आपुलिया ३॥
तुका ह्मणे ज्ञानदेवीं समुदाय । करावा मीं पाय येइन वंदूं ॥ ४ ॥

॥ ४२७६ ॥

जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ । अंगीं ऐसें बळ रेडा बोले ॥ १ ॥
करील तें काय नव्हे महाराज । परि पाहे बीज शुद्ध अंगीं ॥ २ ॥
जेणें हे घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ॥३॥
तुका ह्मणे तेथें सुखा काय उणें । राहे समाधानें चित्ताचिया ॥४॥

॥ ४२७७ ॥

सेवकें करावें स्वामीचें वचन । त्यासी हूंतूंपण कामा नये ॥ १ ॥
घेईल जीव कां सारील परतें । भंगलिया चित्तें सांदीजेना ॥ २ ॥
खद्योतें दावावी रवी केवीं वाट । आपुलेंचि नीट उसंतावें ॥ ३ ॥
तुका ह्मणे तो ज्ञानचा सागर । परि भेदी अगर भिन्नो भेदें ॥ ४ ॥

धरणेकऱ्यानें अभंग व नारळ टाकून दिल्याबद्दल ज्ञानेश्वर महाराजांस पत्र.

॥ ४२७८ ॥

तुम्ही येथें पाठविला धरणेकरी । त्याची झाली परी आइका ते १ ॥
आतां काय पुढें वाढवूनी विस्तार । झाला समाचार आइका तो २
देवाचें उचित एकादश अभंग । महाफळ त्याग करूनी गेला ॥ ३ ॥
तुका ह्मणे सेवा समर्पूनी पायीं । झालों उतराई ठावें असो ॥ ४ ॥

॥ ४२७९ ॥

बोलिलीं लेंकुरें । वेडीं वांकुडीं उत्तरें ॥ १ ॥ करा क्षमा अपराध । महाराज तुम्ही सिद्ध ॥ २ ॥ नाहीं विचारिला । अधिकार म्यां आपुला ॥ ३ ॥ तुका ह्मणे ज्ञानेश्वरा । राखा पायांपें किंकरा ॥ ४ ॥

॥ ४२८० ॥

ज्ञानियांचा राजा गुरु महाराज । म्हणती ज्ञानदेव ऐसें तुम्हां ॥१॥
मज पामरा हें काय थोरपण । पायींची वाहाण पायीं बरी ॥ २ ॥
ब्रह्मादिक जेथें तुह्मां वोळगणें । इतर तुळणे काय पुरे ॥ ३ ॥
तुका म्हणे नेणें युक्तीची ते खोली । म्हणोनि ठेविली पायीं डोई ४

वाराणसीस यात्रा चालली त्यावेळीं दिलेलें पत्र.

॥ ४२८१ ॥

परिसें वो माते माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥
भागीरथी महादोषनिवारणी । सकळां स्वामिणी तीर्थांचिये ॥ २ ॥
जितां भुक्ति मोक्ष मरणें तुझ्या तीरीं । अहिक्यपरत्रीं सुखरूप ३ ॥
तुका विष्णुदास संतांचें पोसणें । वाकपुष्प तेणें पाठविलें ॥ ४ ॥

॥ ४२८२ ॥

तुह्मी विश्वनाथ । दीन रंक मी अनाथ ॥ १ ॥ कृपा कराल ते थोडी । पाया पडिलों बराडीं ॥२॥ काय उणें तुम्हांपाशीं । मी तों अल्पार्थि संतोषी ॥३॥ तुका ह्मणे देवा । कांहीं भातुकें पाठवा ॥४॥

॥ ४२८३ ॥

पिंड पदावरी । दिला आपुलिये करीं ॥१॥ माझें जालें गयावर्जन । फिटलें पितरांचें ॠण ॥ २ ॥ केलें कर्मांतर । बोंब मारिली हरिहर ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें । भार उतरलें ओझें ॥ ४ ॥

पंढरीस वारकरी चालले त्यावेळीं देवांस दिलेलें पत्र.

॥ ४२८४ ॥

तुह्मी संतजनीं । माझी करावी विनवणी ॥ १ ॥ काय तुक्याचा अन्याय । त्यासी अंतरले पाय ॥ २ ॥ भाका बहुतां रीती । माझी कींव काकुलती ॥ ३ ॥ न देखे पंढरी । तुका चरण विटेवरी ॥ ४ ॥

॥ ४२८५ ॥

येती वारकरी । वाट पाहातों तोंवरी ॥१॥ घालूनिया दंडवत । पुसेन निरोपाची मात ॥ २ ॥ पत्र हातीं दिलें । जया येथें पाठविलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे येती । जाऊन सामोरा पुढती ॥ ४ ॥

॥ ४२८६ ॥

कळे महाद्वारीं । पायांखालील पायरी ॥१॥ तेसें माझें दंडवत । निरोप सांगतील संत ॥२॥ पडे दंडकाठी । देह भलतीसवा लोटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे बाळ । लोळे न धरितां सांभाळ ॥ ४ ॥

॥ ४२८७ ॥

होईल कृपा दान । तरी मी येईन धांवोन ॥ १ ॥ होती संतांचिया भेटी । आनंदें नाचों वाळवंटीं २ रिघेन मातेपुढें । स्तनपान करीन कोडें ॥ ३ ॥ तुका ह्मणे ताप । हरती देखोनिया बाप ॥ ४ ॥

॥ ४२८८ ॥

परिसोनी उत्तर । जाब देईजे सत्वर १ जरी तूं होसी कृपावंत । तरी हा बोलावीं पतित ॥२ ॥ नाणीं कांहीं मना । करूनी पापाचा उगाणा ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं । काय शक्ति तुझे पायीं ॥ ४ ॥

॥ ४२८९ ॥

कोणा मुखें ऐसी ऐकेन मी मात । चाल तुज पंढरीनाथ बोलावितो १ मग मी न धरीं आस मागील बोभाट । वेगीं धरिन वाट माहेराची २ निरांजलें चित्त करितें तळमळ । केधवां देखती मूळ आलें डोळे ३ तुका म्हणे कई भाग्याची उजरी । होईल पंढरी देखावया ॥ ४ ॥

॥ ४२९० ॥

समर्पक वाणी । नाहीं ऐकिजेसी कानीं ॥ १ ॥ आतां भावें करूनी

साचा । पायां पडिलों विटोबाच्या ॥२॥ न कळे उचित । करूं समाधान चित्त ॥३॥ तुका म्हणे विनंति । विनविली धरा चित्तीं ॥ ४ ॥

॥ ४२९१ ॥

कैंचा मज धीर । कोठें बुद्धि माझी स्थिर ॥ १ ॥ जें या मनासी आवरूं । आंत पोटीं वाव धरूं ॥ २ ॥ कैंची शुद्ध मति । भांडवल ऐसें हातीं ॥३॥ तुका म्हणे अंगा । कोण दशा आली सांगा ॥ ४॥

॥ ४२९२ ॥

पुढें तरी चित्ता । काय येईल तें आतां ॥ १ ॥ मज सांगोनिया धाडीं वाट पाहातों बराडी ॥ २ ॥ कंठीं धरिला प्राण । पायांपाशीं आलें मन ॥ ३ ॥ तुका ह्मणे चिंता । बहु वाटतसे आतां ॥ ४ ॥

॥ ४२९३ ॥

धरितों वासना परि नये फळ । प्राप्तीचा तो काळ नाहीं आला ॥१॥
तळमळी चित्त घातलें खापरीं । फुटतसे परी लाहीचिया ॥ २ ॥
प्रकार ते कांहीं नावडती जीवा । नाहीं पुढें ठावा काळ हातीं ॥३॥
जातों तळा येतों मागुतला वरी । वोळशाचे फेरी सांपडलों ॥ ४ ॥
तुका ह्मणे बहु करितों विचार । उतरें डोंगर एक चढे ॥ ५ ॥

॥ ४२९४ ॥

कां माझे पंढरी न देखती डोळा । काय हें न कळे पाप त्यांचें ॥ १ ॥
पाय पंथें कां हे न चलती वाट । कोण हें अदृष्ट कर्म बळी ॥ २ ॥
कां हें पायांवरी न पडे मस्तक । क्षेम कां हस्तक न पवती ॥ ३ ॥
कां या इंद्रियांची न पुरे वासना । पवित्र होईना जिव्हा कीर्ती ॥४॥
तुका ह्मणे कई जाऊनी मोटळें । पडेन हा लोळें महाद्वारीं ॥ ५ ॥

॥ ४२९५ ॥

किती करूं शोक । पुढें वाढें दुःखें दुःख १ आतां जाणसी तें करीं । माझें कोण मनीं धरी ॥ २ ॥ पुण्य होतें गांठी । तरि कां लागती हे आटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे बळ । माझी राहिली तळमळ ॥ ४ ॥

॥ ४२९६ ॥

कां माझा विसर पडिला मायबापा । सांडियेली कृपा कोण्या गुणें१
कैसा कंठूनिया राहों संवसार । काय एक धीर देऊं मना ॥ २ ॥
नाहीं निरोपाची पावली वारता । करावी ते चिंता ऐसी कांहीं ३॥
तुका ह्मणे एक वेचूनी वचन । नाहीं समाधान केलें माझें ॥ ४ ॥

॥ ४२९७ ॥

कांहीं माझे कळों आले गुणदोष । ह्मणऊनी उदास धरिलें ऐसें १
नाहीं तरी येथें न घडे अनुचित । नाहीं ऐसी रीत तया घरीं २ ॥
कळावें तें मना आपुलिया सवें । ठायींचें हें घ्यावें विचारूनी ३ ॥
तुका ह्मणे मज अव्हेरिलें देवें । माझिया कर्तव्यें बुद्धीचिया ॥ ४ ॥

॥ ४२८२ ॥

तुह्मी विश्वनाथ । दीन रंक मी अनाथ ॥ १ ॥ कृपा कराल ते थोडी । पाया पडिलों बराडी ॥२॥ काय उणें तुम्हांपाशीं । मी तों अल्पचि संतोषी ॥३॥ तुका ह्मणे देवा । कांहीं भातुकें पाठवा ॥४॥

॥ ४२८३ ॥

पिंड पदावरी । दिला आपुलिये करीं ॥१॥ माझें जालें गयावर्जन । फिटलें पितरांचें ऋण ॥ २ ॥ केलें कर्मांतर । बोंब मारिली हरिहर ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें । भार उतरलें ओझें ॥ ४ ॥

पंढरीस वारकरी चालले त्यावेळीं देवांस दिलेलें पत्र.

॥ ४२८४ ॥

तुह्मी संतजनीं । माझी करावी विनवणी ॥ १ ॥ काय तुक्याचा अन्याय । त्यासी अंतरले पाय ॥ २॥ भाका बहुतां रीती । माझी कींव काकुलती ॥ ३ ॥ न देखे पंढरी । तुका चरण विटेवरी ॥ ४ ॥

॥ ४२८५ ॥

येती वारकरी । वाट पाहातों तोंवरी ॥१॥ घालूनिया दंडवत । पुसेन निरोपाची मात ॥ २ ॥ पत्र हातीं दिलें । जया येथें पाठविलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे येती । जाइन सामोरा पुढती ॥ ४ ॥

॥ ४२८६ ॥

कळे महाद्वारीं । पायांखालील पायरी ॥१॥ तैसें माझें दंडवत । निरोप सांगतील संत ॥२॥ पडे दंडकाठी । देह अलतीसवा लोटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे बाळ । लोळे न धरितां सांभाळ ॥ ४ ॥

॥ ४२८७ ॥

होईल कृपा दान । तरी मी येईन धांवोन ॥ १ ॥ होती संतांचिया भेटी । आनंदें नाचों वाळवंटीं २ रिघेन मातेपुढें । स्तनपान करीन कोडें ॥ ३ ॥ तुका ह्मणे ताप । हरती देखोनिया बाप ॥ ४ ॥

॥ ४२८८ ॥

परिसोनी उत्तर । जाब देईजे सत्वर १ जरी तूं होसी कृपावंत । तरी हा बोलावीं पतित ॥२ ॥ नाणीं कांहीं मना । करूनी पापाचा उगाणा ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं । काय शक्ति तुझे पायीं ॥ ४ ॥

॥ ४२८९ ॥

कोणा मुखें ऐसी ऐकेन मी मात । चाल तुज पंढरीनाथ बोलावितो १ मग मी न धरीं आस मागील बोभाट । वेगीं धरिन वाट माहेराची २ निरांजलें चित्त करितें तळमळ । केधवां देखती मूळ आलें डोळे ३ तुका म्हणे कई भाग्याची उजरी । होईल पंढरी देखावया ॥ ४ ॥

॥ ४२९० ॥

समर्पक वाणी । नाहीं ऐकिजेसी कानीं ॥ १ ॥ आतां भावें करूनी

साचा । पायां पडिलों विटोबाच्या ॥२॥ न कळे उचित । करूं समाधान चित्त ॥३॥ तुका म्हणे विनंति । विनविली धरा चित्तीं ॥ ४ ॥

॥ ४२९१ ॥

कैंचा मज धीर । कोठें बुद्धि माझी स्थिर ॥ १ ॥ जें या मनासी आवरूं । आंत पोटीं वाव धरूं ॥ २ ॥ कैंची शुद्ध मति । भांडवल ऐसें हातीं ॥३॥ तुका म्हणे अंगा । कोण दशा आली सांगा ॥ ४ ॥

॥ ४२९२ ॥

पुढें तरी चित्ता । काय येईल तें आतां ॥ १ ॥ मज सांगोनिया धाडीं । वाट पाहातों बराडी ॥ २ ॥ कंठीं धरिला प्राण । पायांपाशीं आलें मन ॥ ३ ॥ तुका ह्मणे चिंता । बहु वाटतसे आतां ॥ ४ ॥

॥ ४२९३ ॥

धरितों वासना परि नये फळ । प्राप्तीचा तो काळ नाहीं आला ॥१॥
तळमळी चित्त घातलें खापरीं । फुटतसे परी लाहीचिया ॥ २ ॥
प्रकार ते कांहीं नावडती जीवा । नाहीं पुढें ठावा काळ हातीं ॥३॥
जातों तळा येतों मागुतला वरी । वोळशाचे फेरी सांपडलों ॥ ४ ॥
तुका ह्मणे बहु करितों विचार । उतरें डोंगर एक चढें ॥ ५ ॥

॥ ४२९४ ॥

कां माझे पंढरी न देखती डोळा । काय हें न कळे पाप त्यांचें ॥ १ ॥
पाय पंथें कां हे न चलती वाट । कोण हें अदृष्ट कर्म बळी ॥ २ ॥
कां हें पायांवरी न पडे मस्तक । क्षेम कां हस्तक न पवती ॥ ३ ॥
कां या इंद्रियांची न पुरे वासना । पवित्र होईना जिव्हा कीर्ती ॥४॥
तुका ह्मणे कई जाऊनी मोटळें । पडेन हा लोळें महाद्वारीं ॥ ५ ॥

॥ ४२९५ ॥

किती करूं शोक । पुढें वाढे दुःखें दुःख १ आतां जाणसी तें करीं । माझें कोण मनीं धरी ॥ २ ॥ पुण्य होतें गांठीं । तरि कां लागती हे आटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे बळ । माझी राहिली तळमळ ॥ ४ ॥

॥ ४२९६ ॥

कां माझा विसर पडिला मायबापा । सांडियेली कृपा कोण्या गुणें१
कैसा कंठूनिया राहों संवसार । काय एक धीर देऊं मना ॥ २ ॥
नाहीं निरोपाची पावली वारता । करावी ते चिंता ऐसी कांहीं ३॥
तुका ह्मणे एक वेंचूनी वचन । नाहीं समाधान केलें माझें ॥ ४ ॥

॥ ४२९७ ॥

कांहीं माझे कळों आले गुणदोष । ह्मणऊनी उदास धरिलें ऐसें १
नाहीं तरी येथें न घडे अनुचित । नाहीं ऐसी रीत तया घरीं २ ॥
कळावें तें मना आपुलिया सवें । ठायींचें हें घ्यावें विचारूनी २ ॥
तुका ह्मणे मज अव्हेरिलें देवें । माझिया कर्तव्यें बुद्धीचिया ॥ ४ ॥

॥ ४२९८ ॥

आतां पाहों पंथ माहेराची वाट । कामाचा बोभाट पडो सुखें १ ॥
काय करूं आतां न गमेसें जालें । बहुन सोसिलें बहु दिस ॥ २ ॥
घर लागे पाठी चित्ता उभें वारे । आतुलें तें झुरे पाहावया ॥ ३ ॥
तुका म्हणे जीव गेला तरी जाव । धरिला तो देव भाव सिद्धि ४॥

॥ ४२९९ ॥

विनवीजे ऐसें भाग्य नाहीं देवा । पायांशीं केशवा सलगी केली १
धीटपणें पत्र लिहिलें आवडी । पार नेणें थोडी मति माझी ॥ २ ॥
जेथें देवा तुझा कळेचिना पार । तेथें मी पामर काय वाणूं ॥ ३ ॥
जैसे तैसे माझे बोल अंगीकारीं । बोबड्या उत्तरीं गौरविनों ॥ ४ ॥
तुका म्हणे विटेवरी जीं पाउलें । तेथें म्यां ठेविलें मस्तक हें ॥५॥

॥ ४३०० ॥

देवांच्याही देवा गोपिकांच्या पति । उदार हे ख्याति त्रिभुवनीं१ ॥
पातकांच्या रासी नासिनोसी नामें । जळतील कर्में महा दोष २ ॥
सर्व सुखें तुझ्या वोळगती पायीं । रिद्धि सिद्धि ठायीं मुक्ति चारी ३
इंद्रासी दुर्लभ पाविजे तें पद । गीत गातां छंद वाहातां टाळी ४ ॥
तुका ह्मणे जड जीव शक्तिहीन ॥ त्यांचें तूं जीवन पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ ४३०१ ॥

काय झालें नेणों माझिया कपाळा । न देखिजे डोळां मूळ येतां १ ॥
बहु दिस पाहें वचनाची वास । धरिलें उदास पांडुरंगा ॥ २ ॥
नाहीं निरोपाचें पावलें उत्तर । ऐसें तों निष्ठुर न पाहिजे ॥ ३ ॥
पडिला विसर किंवा कांहीं धंदा । त्याहूनी गोविंदा जरूरसा ॥४॥
तुका ह्मणे आसें वेचाचें सांकडें । देणें घेणें पुढें तोही धाक ॥ ५ ॥

॥ ४३०२ ॥

कांहीं चिंतेविण । नाहीं उपजन ॥१॥ तरी हा पडिला विसर । माझा तुम्हां जाला भार ॥ २ ॥ आली कांहीं तुटी । गेली सुटोनिया गांठीं ॥३॥ तुका म्हणे घरीं । बहु बैसले रिणकरी ॥ ४ ॥

॥ ४३०३ ॥

पवाडा संकोच तरी कां व्यालासी । आम्ही कोणापाशीं तोंड वासूं १
कोण मज पुसे शिणलें भागलें । जरी मोकलिलें तुम्ही देवा ॥२॥
कवणाची वाट पाहों कोणीकडे । कोण मज ओढे जीवलग ॥ ३ ॥
कोण जाणे माझे जीवींचें सांकडें । उगवील कोडें संकटाचें ॥ ४ ॥
तुका म्हणे तुम्ही देखिली निश्चिंती । काय माझे चित्तीं पांडुरंगा ५॥

॥ ४३०४ ॥

काय पोरें जालीं फार । किंवा न साहे करकर ॥ १ ॥ म्हणऊनी

केली सांडी । घांस घेऊं न लहा तोडीं ॥२॥ करूं कलागती । तुज भांडणें भोवतीं ॥३॥ तुका म्हणे टांचे । घरीं जालेंसे वरोचे ॥ ४ ॥

॥ ४३०५ ॥

जोडी कोणासाठीं । एवढी करितोसी आटी ॥ १ ॥ जरी हें आम्हां नाहीं सुख । रडो पोरें पोटीं भूक ॥ २ ॥ करूनी जतन । कोणा देसील हें धन ॥३॥ आमचे तळमळें । तुझें होईल वाटोळें ४ घेशील हा श्राप । माझा होउनिया बाप ॥ ५ ॥ तुका म्हणे उरी । आतां न ठेवीं यावरी ॥ ६ ॥

॥ ४३०६ ॥

समर्थाचे पोटीं । आम्ही जन्मलों करंटीं ॥१॥ ऐशी झाली जगीं कीर्ति । तुझ्या नामाची फजिती ॥२॥ येथें नाहीं खाया । न ये कोणी मूळ न्याया ॥ ३ ॥ तुका म्हणे जिणें । आतां खोटें जीवपणें ॥ ४ ॥

॥ ४३०७ ॥

देई डोळे भेटी न धरीं संकोच । न घलीं कांहीं वेच तुजवरी ॥ १ ॥
तुज बुडवावें ऐसा कोण धर्म । अहर्निशीं नाम घेतां थोडें ॥ २ ॥
फार थोडें कांहीं करूनी पातळ । त्याजमध्यें काळ कंठ लावूं ॥ ३ ॥
आहे माझी तेचि सारीन सिदोरी । भार तुजवरी नेदीं माझा ४ ॥
तुका ह्मणे आह्मां लेकराची जाती । भेटावया खंती वाटतसे ॥ ५ ॥

॥ ४३०८ ॥

करील आबाळी । माझ्या दांताची कसाळी ॥ १ ॥ जासी एखादा मरोन । पाठी लागेल हें जन ॥ २ ॥ घरीं लागे कलह । नाहीं जात तो शीतळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे पोरवडे । मज येतील रोकडे ॥ ४ ॥

॥ ४३०९ ॥

जोडीच्या हव्यासें । लागे धनाचेंचि पिसें ॥ १ ॥ मग आणीक दुसरें । लोभ्या नावडती पोरें ॥ २ ॥ पाहे रुक्याकडे । मग अवघें ओस पडे ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । तुला बहुतचि हेवा ॥ ४ ॥

॥ ४३१० ॥

सीण भाग हरे तेथींच्या विरोपें । देखिलिया रूप उरी नुरे ॥ १ ॥
इंद्रियांची धांव होईल कुंठित । पावेल हें चित्त समाधान ॥ २ ॥
माहेर आहेसें लौकिकीं कळावें । निढळ बरवें शोभा नेदी ॥ ३ ॥
आस नाहीं परि उरी बरी वाटे । आपलें तें भेटे आपणासी ॥ ४ ॥
तुका ह्मणे माझी अवीट आवडी । खंडण तांतडी होऊं नेदीं ॥ ५ ॥

॥ ४३११ ॥

ऐकोनिया कीर्ति । ऐसी वाटती विश्रांति ॥ १ ॥ माते सुख डोळां पडे । तेथें कोण लाभ जोडे ॥ २ ॥ बोलतां ये वाचे । वीट नये जिव्हा नाचे ॥ ३ ॥ तुका ह्मणे धांवे । वासना ते रस घ्यावे ॥ ४ ॥

॥ ४३१२ ॥

न बैससी खालीं । सम उभाच पाउलीं १ ऐसे जाले बहुत दिस । जालीं युगें अठ्ठाविस ॥ २ ॥ नाहीं भाग सीण । आगाणूक एक क्षण ॥ ३ ॥ तुका ह्मणे किती । मापें केलीं देती घेती ॥ ४ ॥

॥ ४३१३ ॥

मपिलें मविती । नेणों रासी पाहिल्या किती ॥१ ॥ परि तूं धालाचि न धासी । आलें उभाउभीं घेसी ॥ २ ॥ अवघ्यां अवघा काळ । वाटा पाहाती सकळ ३ तुका ह्मणे नाहीं । आगाणूक तुज कांहीं ४

॥ ४३१४ ॥

करूनी चाहाडी । अवघी बुडवीन जोडी ॥ १ ॥ जरी तूं होऊनी उदास । माझी बुडविसी आस ॥ २ ॥ येथें न करीं काम । मुखें मेघे तुझें नाम ॥ ३ ॥ तुका ह्मणे कुळ । तुझें बुडवीन समूळ ॥ ४ ॥

॥ ४३१५ ॥

निरोपासी वेचे । काय बोलतां फुकाचें ॥ १ ॥ परि हें नेघेवेचि यश । भेणों नको सुखी आस ॥ २ ॥ सुख समाधानें । कोण पाहे देणें घेणें ॥ ३ ॥ न लगे निरोपासी मोल । तुका ह्मणे वेचे बोल ॥ ४ ॥

॥ ४३१६ ॥

नव्हे धीर कांहीं पाठवूं निरोप । आला तरी कोप येऊं सुखें ॥ १ ॥ कोपोनिया तरी देईल उत्तर । जैसें तैसें पर फिरावूनी ॥ २ ॥ नाहीं तयातरी काय एक पोर । मज तो माहेर आणीक नाहीं ॥३॥ तुका ह्मणे असे तयामध्यें हित । आपण निवांत असों नये ॥ ४ ॥

॥ ४३१७ ॥

आतां आसीर्वाद । माझा असो सुखें नाद ॥ १ ॥ म्हणसी कोण तरी काळें । आहेतसीं माझी बाळें ॥२॥ दुरी दुरांतर । तरी घेसी समाचार ॥ ३ ॥ नेसी कधीं तरी । तुका ह्मणे लाज हरी ॥ ४ ॥

॥ ४३१८ ॥

आतां हे शेवटीं । माझी आईकावी गोष्टी ॥ १ ॥ आतां यावा वचनाचा । जाब कळे तैसा याचा ॥ २ ॥ आतां करकर पुढें न करीं उत्तर ॥३॥ तुका ह्मणे ठसा । तुझा आहे रामा तैसा ॥ ४ ॥

॥ ४३१९ ॥

बोलिलों तें आतां । कांहीं जाणतां नेणतां ॥ १ ॥ क्षमा करावे अन्याय । पांडुरंगे माझे माय ॥२॥ स्तुति निंदा केली । लागे पाहिजे साहिली ॥ ३ ॥ तुका ह्मणे लाड । दिला तैसें पुरवा कोड ॥ ४ ॥

वारकरी परत येईतोंपर्यंत मनाची स्थिति.

॥ ४३२० ॥

माहेरींचा काय येईल निरोप । म्हणऊनि झोंप नाहीं डोळां ॥ १ ॥ वाट पाहे आस धरूनिया जीवीं । निढळा हे ठेवीं वरी बाहे ॥ २ ॥

वाटेवरी माप लेखितो दिवस । होतों कासावीस धीर नाहीं ॥ ३ ॥
काय नेणों संतां पडिला विसर । कीं नव्हे सादर मायबाप ॥ ४ ॥
तुका ह्मणे तेथें होईल दाटणी । कोण माझें आणी मना तेथें ॥ ५ ॥

॥ ४३२१ ॥

परि तो आहे कृपेचा सागर । तोंवरी अतंर पडों नेदी ॥ १ ॥
बहु कान दृष्टी आइके देखणा । पुरोनिया जना उरलासे ॥ २ ॥
सांगितल्याविणें जाणें अंतरींचें । पुरवावें ज्यांचें तैसें कोड ॥ ३ ॥
बहुमुखें किर्ति आइकिली कानीं । विश्वासही मनीं आहे माझ्या ४॥
तुका म्हणे नाहीं जात वायाविण । पाळितों वचन बोलिलों तें ॥५॥

॥ ४३२२ ॥

यावरी न कळे संचित आपुलें । कैसें वोढवलें होइल पुढें ॥ १ ॥
करील विक्षेप धाडितां मूळासी । किंवा धाडा ऐसी तांतडी हे २॥
जोंवरी हे डोळे देखें वारकरी । तों हें भरोवरी करी चित्त ॥ ३ ॥
आस वाढविते बुद्धीचे तरंग । मनाचेही वेग वावडती ॥ ४ ॥
तुका म्हणे तेव्हां होतील निश्चळ । इंद्रियें सकळ निरोपानें ॥ ५ ॥

॥ ४३२३ ॥

होईल निरोप घेतला यावरी । राऊळाभीतरीं जाऊनिया ॥ १ ॥
करूनिया दधि मंगळ भोजन । प्रयाण शकुन सुमुहूर्तें ॥ २ ॥
होतील दाटले सद्गदीत कंठीं । भरतें या पोटीं वियोगाचें ॥ ३ ॥
येरयेरां भेटी क्षेम आलिंगनें । केली समाधानें होती संतीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे चाली न साहे मनास । पाहाती कळस परतोनी ॥ ५ ॥

॥ ४३२४ ॥

ऐसी ते सांडिली होईल पंढरी । येत वारकरी होते वाटे ॥ १ ॥
देखिलें सोहळे होती आटवत । चालती ते मात करूनिया ॥ २ ॥
केली आइकिली होईल जे कथा । राहिलें तें चित्ता होईल प्रेम ३॥
गरुडटके टाळ मृदंग पताका । सांगती ते एकांएक सुख ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां येती लवलाही । आलिंगूनि बाहीं देइन क्षेम ५॥

॥ ४३२५ ॥

क्षेम मायबाप पुसेन हें आधीं । न घलीं हें मधीं सुख दुःख ॥ १ ॥
न करीं तांतडी आपणांपासूनि । आइकेन कानीं सांगती तें ॥ २ ॥
अंतरींचे संत जाणतील गुज । निरोप तो मज सांगतील ॥ ३ ॥
पायांवरी डोई ठेवीन आदरें । प्रीतिपडिभरें आलिंगून ॥ ४ ॥
तुका ह्मणे काया करीन कुरवंडी । ओंवाळून सांडीं त्यावरून ॥५॥

॥ ४३२६ ॥

होईल माझी संतीं भाकिली करुणा । जे त्या नारायणा मनीं बैसे १
शृंगारूनी माझीं बोबडीं उत्तरें । होतील विस्तारें सांगितलीं ॥२॥

क्षेम आहे ऐसें होईल सांगितलें । पाहिजे धाडिलें शीघ्र मूळ ॥३॥
अवस्था जे माझी ठावी आहे संता । होईल कृपावंता निरोपिली॥४॥
तुका ह्मणे सर्व येईल मुऱ्हाळी । किंवा कांहीं उरी राखतील ॥५॥

॥ ४३२७ ॥

दोहींमध्यें एक घडेल विश्वासें । भातुकें सरिसें मूळ तरी ॥१॥
करिती निरास निःशेष न घडे । कांहीं तरी ओढे चित्त माये ॥२॥
लौकिकाची तरी धरितील लाज । काय माझ्या काज आचरणें ॥३॥
अथवा कोणाचें येणें लागे रीण । नाहीं तरी हीन कर्मी कांहीं ॥४॥
व्यालीबिये अंगीं असती वेधना । तुका ह्मणे मना मन साक्ष ॥५॥

॥ ४३२८ ॥

बैसतां कोणापें नाहीं समाधान । विवरे हें मन तेचि सोई ॥१॥
घडीघडी मज आठवे माहेर । न पडे विसर क्षणभरी ॥२॥
न बोलावें ऐसा करितों विचार । प्रसंगीं तो फार आठवतें ॥३॥
इंद्रियांसी वाहो पडिली ते चाली । होतीं विसावलीं येचि ठायीं ४॥
एकसरें सोस माहेरासी जावें । तुका ह्मणे जीवें घेतलासे ॥५॥

॥ ४३२९ ॥

नाहीं हानि परि न रहावे निसुर । न पडे विसर काय करूं ॥१॥
पुसाविसी वाटे मात कापडिया । पाठविती न्याया मूळ मज ॥२॥
आणीक या मना नावडे सोहळा । करितें टकळा माहेरींचा ॥३॥
बहु कामें केलें बहु कासावीस । बहु झाले दिस भेटी नाहीं ॥४॥
तुका ह्मणे त्याचें न कळे अंतर । अवस्था तो फार होते मज ॥५॥

॥ ४३३० ॥

तोंवरी म्यां त्यास कैसें निरोपावें । जों नाहीं बरवें कळों आलें ॥१॥
कोणाचिया मुखें तंट नाहीं मागें । वचन वाउगें बोलों नये ॥२॥
दिसे हानि परि निरास न घडे । हें तंव रोकडें अनुभव ॥३॥
आपुलिया भोगें होईल उशीर । तोंवरी कां धीर केला नाहीं ॥४॥
तुका ह्मणे गोड करील सेवट । पाहिली ते वाट ठावी आहे ॥५॥

॥ ४३३१ ॥

माहेरींचें आलें तें मज माहेर । सुखाचें उत्तर करीन त्यासी ॥१॥
पायांवरी माथा आलिंगीन बाहीं । येईन लवलाही पायवणी ॥२॥
सुख समाचार पुसेन सकळ । कैसा पर्वकाळ आहे त्यास ॥३॥
आपुले जीवींचें सुखदुःख भावें । सांगेन आवघें आहे तैसें ॥४॥
तुका ह्मणे वीट नेणें आवडीचा । बोलिलीच वाचा बोलवीन ॥५॥

॥ ४३३२ ॥

वियोग न घडे सन्निध वसलें । अखंड राहिलें होय चित्तीं ॥१॥
विसर न पडे विकल्प न घडे । आलें तें आवडे तया पंथें ॥२॥

कामाचा विसर नाठवे शरीर । रसना मधुर नेणें फिकें ॥ ३ ॥
निरोपासी काज असो अनामिक । निवडितां एक नये मज ॥ ४ ॥
तुका ह्मणे हित चित्तें ओढियेलें । जेथें तें उगलें जावें येणें ॥ ५ ॥

॥ ४३३३ ॥

आतां माझे सखे येती वारकरी । जीवा आस थोरी लागलीसे १ ॥
सांगतील माझ्या निरोपाची मात । सकळ वृत्तांत माहेरींचा ॥ २ ॥
काय लाभ झाला काय होतें केणें । काय काय कोणें सांठविलें ॥३॥
मागपें तें काय धाडिलें भातुकें । पुसेन तें सुखें आहेतसी ॥ ४ ॥
तुका ह्मणे काय सांगती ते कानीं । ऐकोनिया मनीं धरुनी राहे ॥ ५

॥ ४३३४ ॥

काय करावें त्यां केले ते विचार । घडेल साचार काय पाहों ॥१॥
काय मन नाहीं धरीत आवडी । प्रारब्धीं जोडी तेचि खरी ॥ २ ॥
काय त्यां तेथींच रांधिलें चाखोनी । तें हें करी मनीं विवंचना ॥३॥
आणीकही त्यासी बहुत कारणें । बहु असे जिणें ओढीचेंही ॥ ४ ॥
तुका ह्मणे आह्मां बोळविल्यावरी । परती माघारी केली नाहीं ५ ॥

॥ ४३३५ ॥

आह्मां आराणूक संवसारा हातीं । पडिली नव्हती आजीवरी ॥१॥
पुत्रदाराधन होता मनीं धंदा । गोवियेलों सदा होतों कामें ॥ २ ॥
वोढवलें ऐसें दिसतें कपाळ । राहिलें सकळ आवरोनी ॥ ३ ॥
मागें पुढें कांहीं न दिसे पाहातां । तेथूनिया चिंता उपजली ॥ ४ ॥
तुका म्हणे वाट पाह्याचें कारण । येथींचिया हीन जालें भाग्य ५ ॥

॥ ४३३६ ॥

बहु दिस नाहीं माहेरींची भेटी । जाली होती तुटी व्यवसायें १ ॥
आपुलाल्या होतों गुंतलों व्यासंगें । नाहीं त्या प्रसंगें आठवलें २ ॥
तोडिलें तुटतें जडती जडलें । आहे तें आपुलें आपणापें ॥ ३ ॥
बहु निरोपाचें पावलें उत्तर । जवळीच पर एक तेंही ॥ ४ ॥
काय जाणों मोह होईल सांडिला । बहु दिस तुटला तुका ह्मणे ५॥

॥ ४३३७ ॥

होतीं नेणों झालीं कठिणें कठीण । जवळीच मन मनें ग्वाही ॥ १ ॥
आम्ही होतों सोई सांडिला मारग । घडलें तें मग तिकूनही ॥ २ ॥
निश्चितीनें होते पुढिलांची सांडी । न चाली ते कोंडी मायबापा ३॥
आम्हां नाहीं त्याचा घडला आठव । त्यांचा बहु जीव विखुरला ४॥
तुका ह्मणे झालें धर्माचें माहेर । पडिलें अंतर आम्हांकुनी ॥ ५ ॥

॥ ४३३८ ॥

आतां करावा कां सोस वायांविण । लटिकाचि सीण मनासी हा १
असेल तें कळों येईल लवकरी । आतां वारकरी आल्यापाठीं ॥ २ ॥

बहु विलंबाचें सन्निध पातलें । धीराचें राहिलें फळ पोटीं ॥ ३ ॥ चालिलें तें ठाव पावेल सेवटीं । पुरलिया तुटी पाउलांची ॥ ४ ॥ तुका ह्मणे आसे लागलासे जीव । ह्मणऊनी कींव भाकितसें ॥ ५ ॥

वारकरी परत आल्यानंतरचे अभंग.

॥ ४३३९ ॥

भागलेती देवा । माझा नमस्कार घ्यावा ॥ १ ॥ तुह्मी क्षेम कीं सकळ । बाळ अवघे गोपाळ ॥ २ ॥ मारगीं चालतां । श्रमलेती येतां जातां ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । कृपा आहे माझ्या आयीं ॥ ४ ॥

॥ ४३४० ॥

घाल्उनिया ज्योती । वाट पाहें दिवसराती ॥ १ ॥ बहु उताविळ मन । तुमचें व्हावें दरुषण ॥ २ ॥ आलों बोळवीत । तैसें याचि पंथें चित्त ॥ ३ ॥ तुका ह्मणे पेणीं । येतां जातां दिवस गणीं ॥ ४ ॥

॥ ४३४१ ॥

आजी दिवस धन्य । तुमचें जालें दरुषण ॥ १ ॥ सांगा माहेरींची मात । अवघा विस्तारीं वृत्तांत ॥ २ ॥ आइकतां मन । करूनी सादर श्रवण ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाम । माझा सकळ संभ्रम ॥ ४ ॥

॥ ४३४२ ॥

बोलिलीं तीं काय । माझा बाप आणि माय १ ऐसें सांगा जी झडकरी तुह्मी सखे वारकरी ॥ २ ॥ पत्राचें वचन । काय दिलें फिरावून ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । मना आणिलें कीं नाहीं ॥ ४ ॥

॥ ४३४३ ॥

काय पाठविलें । सांगा भातुकें विठ्ठलें ॥ १ ॥ आसे लागलासे जीव । काय केली माझी कींव ॥ २ ॥ फेडिले मुडतर । किंवा कांहीं जरजर ॥ ३ ॥ तुका ह्मणे सांगा । कैसें आर्त पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ४३४४ ॥

आजीचिया लाभें ब्रह्मांड ठेंगणें । सुखी जालें मन कल्पवेना ॥ १ ॥ आर्तभूत माझा जीव जयासाटीं । त्यांच्या जाल्या भेटी पायांसवें २ वाडुली पाहातां सिणले नयन । बहु होतें मन आर्तभूत ॥ ३ ॥ माझ्या निरोपाचें आणिलें उत्तर । होईल समाचार सांगती तो ४॥ तुका म्हणे भेटी निवारला ताप । फळले संकल्प संत आले ॥ ५ ॥

॥ ४३४५ ॥

आजी बरवें झालें । माझें माहेर भेटलें ॥ १ ॥ डोळां देखिले सज्जन । निवारला भाग सीण ॥ २ ॥ धन्य झालों आतां । क्षेम देऊनिया संतां ॥ ३ ॥ इच्छेचें पावलों । तुका म्हणे धन्य झालों ४ ॥

॥ ४३४६ ॥

वोरसोनि येती । वत्सें धेनुवेच्या चित्तीं ॥ १ ॥ माझा करावा सांभाळ । वोरसोनिया कृपाळ ॥ २ ॥ स्नेहें भूक तान । विसरती झाले सीण ॥ ३ ॥ तुका ह्मणे कवतुकें । दिलें प्रेमाचें भातुकें ॥ ४ ॥

॥ ४३४७ ॥

आलें तें आधीं खाईन भातुकें । मग कवतुकें गाईन ओव्या ॥ १ ॥ सांगितला आधीं आइको निरोप । होईल माझा बाप पुसे तो ते २॥ तुका ह्मणे माझे सखे वारकरी । आले हे माहेरीहून आजी ॥ ३ ॥

॥ ४३४८ ॥

अमूप जोडल्या सुखाचिया रासी । पार त्या भाग्यासी नाहीं आतां १ काय सांगों सुख झालें आलिंगनें । निवाली दर्शनें कांति माझी २ तुका ह्मणे यांच्या उपकारासाठीं । नाहीं माझे गांठीं कांहीं एक ३

॥ ४३४९ ॥

पवित्र व्हावया घालीन लोळणी । ठेवीन चरणीं मस्तक हे ॥ १ ॥ जोडोनि हस्तक करीन विनवणी । घेईन पायवणी धोवोनिया ॥२॥ तुका म्हणे माझें भांडवल सुचे । संतां हे ठायींचे ठावे आहे ॥३ ॥

अनघडसिद्धाच्या शब्देंकरून रामेश्वरास झालेला दाह या अभंगानें शमला.

॥ ४३५० ॥

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र ही न खाती सर्प तया १ विष तें अमृत आघात तें हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ॥ २ ॥ दुःख तें देईल सर्व सुख फळ । होतील शीतळ अग्निज्वाळा ॥३॥ आवडेल जीवा जिवाचिये परी । सकळां अंतरीं एक भाव ॥ ४ ॥ तुका ह्मणे कृपा केली नारायणें । जाणिजेते येणें अनुभवें ॥ ५ ॥

तुकावाचें अभंगांतील नांव काढून सालोमालो यांनीं आपलें नांव घातलें त्याबद्दल त्यांचा निषेध.

॥ ४३५१ ॥

नाहीं घाटावें लागत । एका सितें कळे भात ॥ १ ॥ क्षीर निवडिते पाणी । चोंची हंसाचिये आणी २ आंगडें फाडुनि घोंगडें करी । अवकळा तये परी ॥ ३ ॥ तुका ह्मणे कण । भूसीं निवडे केला सीण ॥ ४ ॥

॥ ४३५२ ॥

सालोमालो हरिचा दास । ह्मणउन केला अवघा नास ॥१॥ अवघें वचमंगळ केले । म्हणती एकांचें आपुलें ॥२॥ मोडूनी संतांचीं वचनें करिती आपणां भूषणें ३ तुका ह्मणे कवी । जगामधीं रूढ दावी ॥४॥

॥ ४३५३ ॥

कालवूनी विष । केला अमृताचा नास ॥ १॥ ऐशा अभाग्याच्या बुद्धि । सत्य लोपी नाहीं शुद्धि ॥ २ ॥ नाक कापुनी लावी सोनें । कोण अळंकार तेणें ३ तुका ह्मणे बावी । मोडूनि मदार बांधावी ॥४॥

॥ ४३५४ ॥

कण भुसाऱ्या आधारें । परि ते निवडितां बरे ॥ १ ॥ काय घोघाणी पाधाणी । ताकामध्यें घोटी लोणी ॥२॥ सुइणांपुढें चेटा । काय लपविसी चाटा ३ तुका ह्मणे ज्ञान । दिमाकाची भनभन ॥४॥

॥ ४३५५ ॥

जायांचे अळंकार । बुडवूनि होती चोर ॥ १ ॥ त्यांसी ताडणाची पूजा । योग घडे बऱ्या वोजा ॥२॥ अभिलाषाच्या सुखें । अंतीं होती काळीं मुखें ॥ ३ ॥ तुका ह्मणे चोरा । होय भूषण मातेरा ॥ ४ ॥

॥ ४३५६ ॥

विकल तेथें विका । माती नांव ठेवूनि बुका ॥ १ ॥ हा तो निवाड्याचा ठाव । खऱ्या खोट्या निवडी भाव ॥२॥ गऱ्हवारें हा विधि । पोट वाढविलें चिंधी ३ लावूं जाणे विल्हे । तुका साच आणिक कल्हे ॥ ४॥

॥ ४३५७ ॥

विषयीं अद्वये । त्यासी आम्हां सिवो नये ॥ १ ॥ देव तेथून निराळा । असे निष्काम वेगळा ॥ २ ॥ वासनेची बुंथी । तेथें कैंची ब्रह्मस्थिति ॥ ३ ॥ तुका ह्मणे असतां देहीं । तेथें नाहीं जमती ॥ ४ ॥

॥ ४३५८ ॥

नमितो या देवा । माझी एके ठायीं सेवा ॥ १ ॥ गुणअवगुण निवाडा । म्हैस म्हैस रेडा रेडा ॥२॥ जनीं जनार्दन । साक्ष त्यासी लोटांगण ॥ ३ ॥ तुका म्हणे खडे । निवडूं दळणीं घडघडे ॥ ४ ॥

तुकोबाचें चिंचवडच्या देवाशीं भाषण.

॥ ४३५९ ॥

चिंतामणि देवा गणपतीसी आणा । करवावे भोजना दुजे पात्रीं १॥ देव म्हणती तुक्या एवढी कैंची थोरी । अभिमानाभीतरी नागवले २ वाढ वेळ झाला ।शिळे झाले अन्न । तटस्थ ब्राह्मण बैसलेती ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा तुमच्या सुकृतें । आणीन त्वरित मोरयासी ॥ ४ ॥

॥ ४३६० ॥

वांजा गाई दुभती । देवा ऐसी तुझी ख्याति ॥ १ ॥ ऐसे मागत नाहीं तुज । चरण दाखवावे मज ॥ २ ॥ चातक पाखरूं । त्यासी वर्षे मेघधारु ॥ ३ ॥ पक्षी राजहंस । अमोलिक मोतीं त्यास ॥ ४ ॥ तुका ह्मणे देवा । कां गा खोचलासी जीवा ॥ ५ ॥

॥ ४३६१ ॥

भोक्ता नारायण लक्ष्मीचा पति । ह्मणोनी प्राणाहुति घेतलिया १॥
भर्ता आणि भोक्ता कर्ता आणि करविता। आपण सहजता पूर्णकाम२
विश्वीं विश्वंभर कृपादृष्टी सांभाळीत । प्रार्थना करीत ब्राह्मणांची ३
कवळोकवळीं नाम घ्यावें गोविंदाचें । भोजन भक्तांचें तुका ह्मणे४॥

॥ ४३६२ ॥

माझा स्वामी तुह्मी वागवितों लात । तेथें मी पतित काय आलों१
तीर्थें तुमच्या चरणीं जाहालीं निर्मळ । तेथें मी दुर्बळ काय वाणूं२
तुका म्हणे तुम्ही देवा द्विजवंद्य । मी तो काय निंद्य हीन याति ३॥

॥ ४३६३ ॥

परते मी आहे सहजचि दुरी । वेगळे भिकारी नामरूपा ॥ १ ॥
नलगे रुसावें धरावा संकोच । सहज ते नीच आले भागा ॥ २ ॥
पडिलिये ठायीं उच्छिष्ट सेवावें । आर्थें तेचि देवें केलें ऐसें ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुम्ही आम्हां जी वेगळे । केलेती निराळे द्विज देवे ४ ॥

एका ब्रह्मचाऱ्याचा निषेध.

॥ ४३६४ ॥

काखे कडासन आड पडे । खडबड खडबडे हुसकले ॥ १ ॥ दाद करा दाद करा । फजितखोरा लाज नाहीं ॥ २ ॥ अवघा झाला राम राम । कोणी वर्म आचरेना ॥ ३ ॥ हरिदासांच्या पडती पाया। ह्मणती तया नागवावें । ४॥ दोहीं ठायीं फजित झाले । पारणे केलें अवकळा ॥५॥ तुका ह्मणे नाश केला । विटंबिला वेश जिणें ॥ ६ ॥

॥ ४३६५ ॥

तारतिम वरी तोंडाच पुरतें । अंतर हें येतें अंतरींचें ॥ १ ॥
ऐसी काय वरी दिसे ठकाठकी । दिसतें लौकिकीं सत्या ऐसें ॥२॥
भोजनांत द्यावें विष कालवूनि । मोह चाळवणी मारावया ॥ ३ ॥
तुका ह्मणे मैंद देखों नेदी कुडें । आदरेंचि पुढें सोंग दावी ॥ ४ ॥

॥ ४३६६ ॥

ब्रह्मनिष्ठ काडी । जरी जीवानांवें मोडी ॥ १ ॥ तया घडली गुरुहत्या । गेला उपदेश तो मिथ्या ॥ २ ॥ सांगितलें कानीं । रूप आपुलें वाखाणी ॥ ३ ॥ भूतांच्या मत्सरें । ब्रह्मज्ञान नेलें चोरें ४॥ शिकल्या सांगे गोष्टी । भेद क्रोध वाहे पोटीं ॥ ५ ॥ निंदा स्तुति स्तवनीं । तुका ह्मणे वेची वाणी ॥ ६ ॥

॥ ४३६७ ॥

कुटुंबाचा केला त्याग । नाहीं राग जंव गेला १ भजन ते वोंगळ-

चाणें । नरका जाणे चुकेना २ अक्षरांची केली आटी । जरी पोटीं संत निंदा ३ तुका ह्मणे मागें पाय । तया जाय स्थळासी ॥ ४ ॥

तुकोबास मंबाजी गोसाव्यानें मारिलें त्याबद्दल देवाजवळ परिहार.

॥ ४३६८ ॥

न सोडीं न सोडीं न सोडीं । विठोबा चरण न सोडीं ॥ १ ॥ भलतें जड पडो भारी । जीवावरी आगोज २ शतखंड देह शस्त्रधारी । करितां परी न भीयें ३ तुका ह्मणे केली आधीं । दृढ बुद्धि सावध ॥ ४ ॥

॥ ४३६९ ॥

बरवें बरवें केलें विठोबा बरवें । पाहोनि अंत क्षमा अंगीं कांटीवरी माराविलें ॥ १ ॥ शिव्या गाळी नीत नाहीं । बहु फार विटंबिलें ॥२॥ तुका ह्मणे क्रोधा हातीं । सोडवूनी घेतलें रे ॥ ३ ॥

॥ ४३७० ॥

पावलों पावलों । देवा पावलों रे ॥ १ ॥ बरवें संचित होतें तैसें जालें रे । आतां काय बोलो रे ॥ २ ॥ सोज्वळ कंटकवाटा भावें करूं गेलों रें । तुका ह्मणे करूनी वेगळा केलों रे ॥ ३ ॥

॥ ४३७१ ॥

कां होती कां होती । देवा एवढी फजीती ॥ १॥ मुळीं वर्म नसतें चुकलों । तो मी ऐसे चित्तीं ॥ २ ॥ होणार होऊनी गेलें । मिथ्या आतां खंती रे ३ तुका ह्मणे पुरे । आतां दुर्जनाची संगती रे ॥४॥

॥ ४३७२ ॥

सोडवा सोडवा । सोडवा हो अनंता ॥१॥ तुजविण ऐसा । कोण दुजा प्राणदाता ॥ २ ॥ कोणा लाज नेणां ऐसें । आणिकां शरण आह्मी जातां ३ तुका ह्मणे सखया । माझ्या रखुमाईच्या कांता ४॥

॥ ४३७३ ॥

पुत्राची वारता । शुभ ऐके जेवीं माता ॥ १ ॥ तैसें राहो माझें मन । गातां ऐकतां हरिगुण ॥ २ ॥ नादें लुब्ध जाला मृग । देह विसरला अंग ॥३॥ तुका ह्मणे पाहे । कासवीचें पिलें माये ॥ ४ ॥

तुकोबास त्यांच्या स्त्रीचें कठोर भाषण.

॥ ४३७४ ॥

मजचि भोंवता केला येणें जोग । काय याचा भोग अंतरला ॥१॥ चालोनिया घरा सर्व सुखें येती । माझी तों फजीती चुकेचि ना २ कोणाची बाईल होऊनिया वोढूं । संवसारीं काढूं आपदा किती ३ काय तरी देऊं तोंडतील पोरें । मरतीं तरी बरें होतें आतां ॥ ४ ॥

कांहीं नेदी वांचों धोवियेलें घर । सारवावया ढोर शेण नाहीं ५॥ तुका ह्मणे रांड न करितां विचार । वाह्यानिया भार कुंथे माथां ६॥

॥ ४३७५ ॥

काय नेणों होता दावेदार मेला । वैर तो साधिला होऊनि गोहो १ किती सर्वकाळ सोसावें हें दुःख । किती लोकां मुख वासूं तरी २ ह्मवे आपुली आई काय माझें केलें । धड या विठ्ठले संसाराचें ३ ॥ तुका ह्मणे येती बाईले आसडे । फुंदोनिया रडे हांसे कांहीं ॥ ४ ॥

॥ ४३७६ ॥

गोणी आली घरा । दाणे खाऊं नेदी पोरा ॥ १ ॥ भरी लोकांची पांटोरी । मेला चोरटा खाणोरी ॥२॥ खवळली पिसी । हाता ह्मोंबे जैसी लांसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे खोटा । रांडे संचिताचा सांटा ४ ।

॥ ४३७७ ॥

आतां पोरा काय खासी । गोहो झाला देवलसी ॥ १ ॥ डोचकें तिंबी घातल्या माळा । उदमाचा सांडी चाळा ॥२॥ आपल्या पोटा केली थोर । आमचा नाहीं येसपार ३ हातीं टाळ तोंड वासी । गाय देउळीं देवापाशीं ४ आतां आम्ही करूं काय । न वसे घरीं राना जाय ५ तुका ह्मणे आतां धीरी । अझुनी नाहीं जालें तरी ॥ ६ ॥

॥ ४३७८ ॥

बरें झालें गेलें । आजी अवघें मिळालें १ आतां खाईन पोटभरी । ओल्या कोरड्या भाकरी २ किती तरी तोंड । यांशीं वाजवूं मी रांड ॥ ३ ॥ तुका बाइले मानवला । छिथू करूनिया बोला ॥ ४ ॥

॥ ४३७९ ॥

निजों नेदी सकाळ वेळीं । राती काळीं चिनचिनी ॥ १ ॥ बोंगळानें घेतली पाटी । केली ओटी जीवासी ॥२॥ मेळवूनी सर्व जन । चिंता नेणें देवळींच ॥३॥ तुका ह्मणे आलों घरा । तोंडा घोरा बाइलेच्या४॥

॥ ४३८० ॥

न करवे धंदा । आइता तोंडीं पडे लोंदा ॥ १ ॥ उठिलें तें कुटितें टाळ । अवघा मांडिला कोल्हाळ ॥ २ ॥ जिवंतचि मेले । लाजा वाटूनिया प्याले ॥ ३ ॥ संवसाराकडे । न पाहाती ओस पडे ॥४॥ तळमळती यांच्या रांडा । घालिती जीवा नांवें धोंडा ॥ ५ ॥ तुका ह्मणे बरें झालें । मेगे बाइले लिहिलें ॥ ६ ॥

॥ ४३८१ ॥

कोण घरा येतें आमुच्या कशाला । काय ज्याचा त्याला नाहीं धंदा१ देवासाठीं झालें ब्रह्मांड सोइरें । कोंवळ्या उत्तरें काय वेचे ॥ २ ॥ मागें पाचारितां नव्हे आराणूक । पेसें घेती लोक प्रीतीसाठीं ॥३॥ तुका ह्मणे रांडे नावडे भूषण । कांतेलें सें श्वान लागे पाठी ॥ ४ ॥

तुकोबाचा स्त्रीस उपदेश.

॥ ४३८२ ॥

पिकल्या सेताचा आह्मां देतो वांटा । चौधरी गोमटा पांडुरंग ॥१॥
सत्तर टके बाकी उरली मागे तो हा । मागें झडले दाहा आजीवरी२
हांडा भांडीं गुरें दाखवी ऐवज । माजघरीं बाजे बसलासे ॥ ३ ॥
मज यासीं भांडतां जाब नेदी बळें । ह्मणे एका वेळे घ्याल वांटा ४
तुका ह्मणे स्त्रिये काय वो करावें । नेदितां लपावें काय कोठें ॥५॥

॥ ४३८३ ॥

करितां विचार अवघें एक राज्य । दुजा कोण मज पाठीं घाली१॥
कोण्या रीती जावें आह्मी वो पळोनी । मोकळे अंगणीं मागें पुढें २॥
काय तें गव्हाणें हिंडावीं वो किती । दूत ते लागती याचे पाठीं ३॥
कोठें याची करूं गेलों कुळवाडी । आतां हा न सोडी जीवें आह्मां४
होऊनी बेबाख येथेंचि राहावें । देईल तें खावें तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ४३८४ ॥

नागवूनी एकें नागवींच केलीं । फिरोनिया आलीं नाहीं येथें ॥ १ ॥
भेणें सुती कोणी न घेती पालवी । करूनिया गोवी निसंतान ॥२॥
एकें तीं गोविलीं घेऊनी जमान । हांसतील जन लोक तमा ॥ ३ ॥
सरले तयांसी घालितो वैकुंठीं । न सोडी हे साटी जाली जीवें ४॥
तुका ह्मणे जालों जाणोनी नेणतीं । सांपडलों हातीं याचे आह्मी ५॥

॥ ४३८५ ॥

काय करूं आतां माझिया संचिता । तेणें जीवविता साटी केली १॥
न ह्मणावें कोणी माझें हें करणें । हुकूम तो येणें देवें केला ॥ २ ॥
करूनी मोकळा सोडिलों भिकारी । पुरविली तरी पाठी माझी ॥३॥
पाणिया भोंपळा जेवावया पानें । लाविलीं वो येणें देवें आम्हां ॥४॥
तुका ह्मणे यासी नाहीं वो करुणा । आहे नागवणा ठावा मज ॥५॥

॥ ४६८६ ॥

आतां तूं तयास होईं वो उदास । आरंभला नास माझ्या जीवा १॥
जरूर हें जालें तुज कां नावडे । उपास रोकडे येती आतां ॥ २ ॥
बरें म्यां तुझिया जीवाचें तें काय । व्हावें तें हें पाहें विचारूनि ॥३॥
तुज मज तुटी नव्हे या विचारें । साहित लेकरें राहों सुखें ॥ ४ ॥
तुका ह्मणे तरी तुझा माझा संग । घडेल वियोग कधीं नव्हे ॥ ५ ॥

॥ ४३८७ ॥

नको धरूं आस व्हावें या बाळांस । निर्माण तें त्यांचें त्यास आहे १
आपुला तूं गळा घेईं उगवूनी । चुकवीं जाचणी गर्भवास ॥ २ ॥
ऐवज देखोनी बांधितील गळा । ह्मणोनी निराळा पळतसें ॥ ३ ॥

देखोनिया त्यांचा अवघड मार । कांपे थरथर जीव माझा ॥ ४ ॥
तुका ह्मणे जरी आहे माझी चाड । तरी करीं वाड चित्त आतां ५॥

॥ ४३८८ ॥

भले लोक तुज बहु मानवती । वाढेल या कीर्ति जगामाजी ॥ १ ॥
ह्मणे मेलीं गुरें भांडीं नेलीं चोरें । नाहींत लेंकुरें झालीं मज ॥ २ ॥
आस निरसूनी कठिण हें मन । करीं वो समान वज्र तैसें ॥ ३ ॥
किंचित हें सुख टाकीं वो थुंकोनी । पावसील धणी परमानंद ॥४॥
तुका ह्मणे थोर चुकती सायास । भवबंधपाश तुटोनिया ॥ ५ ॥

॥ ४३८९ ॥

एक हें सुख होईल दोघांसी । सोहळे हे ऋषि करिती देव ॥ १ ॥
जडितविमानें बैसाविती माने । गंधर्वांचें गाणें नामघोष ॥ २ ॥
संत महंत सिद्ध येतील सामोरे । सर्वसुखा पुरे कोड तेथें ॥ ३ ॥
आलिंगुनी लोळों त्यांच्या पायांवरी । जाऊं तेथवरी मायबापें ४॥
तुका ह्मणे तया सुखा वर्णूं काय । जेव्हां बापमाय देखों डोळां ५॥

॥ ४३९० ॥

देव पाहावया करीं वो सायास । न धरी हे आस नाशिवंत १ ॥
दिन सोमे शुद्ध सकळीं पातला । द्वादशी घडला पर्वकाळ ॥ २ ॥
द्विजां पाचारूनी शुद्ध करीं मन । देईं वो हें दान यथाविध ॥ ३ ॥
नको चिंता करूं वस्त्रा या पोटाची । माउली आमुची पांडुरंग ४ ॥
तुका ह्मणे दुरी सांगतों पाल्हाळीं । परी तो जवळी आहे आम्हां ५

॥ ४३९१ ॥

सुख हें नावडे आह्मां कोण्या वेळे । नेणसी आंधळे जाल्मी तूं १
भूक तान कैसी राहिली निश्चळ । खुंटलें चपळ मन ठायीं ॥ २ ॥
द्रव्य जीवाहूनी आवडे या जना । आह्मांसी पाषाणाहूनी हीन ॥३॥
सोइरे सज्जन जन आणि वन । अवघें समान काय गुणें ॥ ४ ॥
तुका ह्मणे आह्मां जवळीच आहे । सुख दुःख साहे पांडुरंग ॥५॥

॥ ४३९२ ॥

गुरुरूपें मज बोलविलें देवें । होईल तें घ्यावें हित कांहीं ॥ १ ॥
सत्य देवें माझा केला अंगीकार । आणीक विचार नाहीं आतां २॥
होईं बळकट घालूनिया कास । हाचि उपदेश तुज आतां ॥ ३ ॥
सडा संमार्जन तुळसी वृंदावन । अतीतपूजन ब्राह्मणांचें ॥ ४ ॥
वैष्णवांची दासी होईं सर्व भावें । मुखीं नाम घ्यावें विठोबाचें ५॥
पूर्णबोध स्त्रीभ्रतारसंवाद । धन्य जिहीं वाद आइकिला ॥ ६ ॥
तुका ह्मणे आहे पांडुरंगकथा । तरेल जो चित्ता धरील कोणी ७॥

शिवाजी राजे यांनीं तुकोबास आपल्या येथें आणविण्याकरितां अबदागिरी, घोडा, कारकून पाठविला त्या वेळचे अभंग.

॥ ४३९३ ॥

दिवट्या छत्री घोडे । हें तों बऱ्यांत न पडे ॥ १ ॥ आतां येथें पंढरिराया । मज गोविसी कासया ॥ २ ॥ मान दंभ चेष्टा । हे तों शूकराची विष्ठा ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । माझे सोडवणें धांवा ॥४॥

॥ ४३९४ ॥

नावडे जें चित्ता । तेंचि होसी पुरविता ॥ १ ॥ कां हे पुरविली पाठी । माझी केली जीवें साटी ॥२॥ न करावा संग । वाटे दुरावावें जग ॥३॥ सेवावा एकांत । वाटे न बोलावी मात ॥४॥ जन धन तन । वाटे लेखावें वमन ॥५॥ तुका ह्मणे सत्ता । हातीं तुझ्या पंढरिनाथा ६॥

॥ ४३९५ ॥

काय दिला ठेवा । आम्हां विठ्ठलाचि व्हावा ॥ १ ॥ तुम्ही कळलेती उदार । साटीं परिसाची गार ॥ २ ॥ जीव दिला तरी । वचना माझ्या नये सरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे धन । आम्हां गोमासासमान ४॥

॥ ४३९६ ॥

मुंगी आणि राव । आह्मां सारखाचि जीव ॥ १ ॥ गेला मोह आणि आशा । कळिकाळाचा हा फांसा ॥ २ ॥ सोनें आणि माती । आह्मां समान हें चित्तीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे आलें । घरा वैकुंठ सगळें ॥ ४ ॥

॥ ४३९७ ॥

विरंचीनें केलें ब्रह्मांड सकळ । तयामाजी खेळ नाना युक्ती ॥ १ ॥
युक्तीचा बाळक ब्रह्मनिष्ठ ज्ञानी । गुरुभक्ति मनीं विश्वासेसी ॥२॥
ऐसा तुझा प्रेमा कळे कांहीं एक । पाहूनिया लेख पत्रिकींचे ॥ ३ ॥
शिव तुझें नाम ठेविलें पवित्र । छत्रपति सूत्र विश्वाचें कीं ॥ ४ ॥
व्रत नेम तप ध्यानयोग कळा । करूनी मोकळा जालासी तूं ॥ ५ ॥
हा हेत लागला आम्हुचिये भेटी । पत्रामाजी गोष्टी हेचि थोर ॥ ६ ॥
याचें हें उत्तर ऐक गा भूपति । लिहिली विनंती हेताची हे ॥ ७ ॥
अरण्यवासी आह्मी फिरों उदासीन । दर्शनही हीन अमंगळ ॥ ८ ॥
वस्त्राविण काया जालीसे मळीन । अन्नराहित हीन फळाहारी ॥९॥
रोडके हात पाय दिसे अवकळा । काय तो सोहळा दर्शनाचा ॥१०॥
तुका ह्मणे माझी विनंति सलगीची । वार्ता हे भेटीची करूं नका ११

॥ ४३९८ ॥

तुम्हांपाशीं आम्ही येऊनिया काय । वृथा सीण आहे चालण्याचा १॥ मागावें हें अन्न तरी भिक्षा थोर । वस्त्रासी हे थार चिंध्या बिदी २

निद्रेसी आसन उत्तम पाषाण । वरी आवरण आकाशाचें ॥ ३ ॥
तेथें काय करणें कवणाची आस । वाया होय नाश आयुष्याचा ४
राजगृहा यावें मानाचिया आसे । तेथें काय वसे समाधान ॥ ५ ॥
रायाचिये घरीं भाग्यवंता मान । इतरां सामान्यां मान नाहीं ॥६॥
देखोनिया वस्त्रें भूषणांचें जन । तात्काळ मरण येतें मज ॥ ७ ॥
ऐकोनिया मानाल उदासता जरी । तरी आह्मां हरि उपेक्षीना ॥ ८ ॥
आतां हेंचि तुह्मां सांगणें कौतुक । भिक्षेऐसें सुख नाहीं नाहीं ॥९॥
तपव्रतयाग महा भले जन । आशाबद्ध हीन वर्तताती ॥ १० ॥
तुका ह्मणे तुह्मी श्रीमंत मानाचे । पूर्वींच दैवाचे हरिभक्त ॥ ११ ॥

॥ ४३९९ ॥

ऐसी माझी वाणी दीनरूप पाहे । हे त्या करूणा आहे हृदयस्थाची १
नहें कीविलवाणें नाहीं आह्मी दीन । सर्वदा शरण पांडुरंगीं ॥२॥
पांडुरंग आह्मां पाळिता पोसिता । आणिकांची कथा काय तेथें ३॥
तुह्मी भेट घेणें काय हें मागणें । आशेचें हें शून्य केलें आह्मी ४ ॥
निराशेचा गांव दिधला आम्हांसी । प्रवृत्तिभागासी सांडियेलें ५॥
पतिव्रतेचें हें मन पति भेटो । तैसे आह्मी विठोमाजी नांदों ॥ ६ ॥
विश्व हें विठ्ठल नाहीं दुजें कांहीं । देखणें तुझेंही तयामाजी ॥७॥
तुजही विठ्ठल ऐसेंचि वाटलें । परि एक आलें आडवें हें ॥ ८ ॥
सद्गुरुश्रीरामदासाचें भूषण । तेथें घालीं मन चळों नको ॥ ९ ॥
बहुतां ठायीं वृत्ति चावळली जेव्हां । रामदास्य तेव्हां घडे केलें१०
तुका ह्मणे बापा चातुर्यसागरा । भक्तिभाव तारा भाविकांसी ११॥

॥ ४४०० ॥

आतां एक योग साधिवा हा नीट । भल्याचा तो वीट मानूं नये ॥१॥
जेणें योगें तुम्हां घडों पाहे दोष । ऐसा हा सायास करूं नये ॥ २ ॥
निंदक दुर्जन संग्रहीं असती । त्यांची युक्ति चित्तीं आणूं नका ॥३॥
परीक्षावे कोण राज्याचे रक्षक । विवेकाविवेक पाहोनिया ॥ ४ ॥
सांगणें न लगे सर्वज्ञ तूं राजा । अनाथांच्या काजा साह्य व्हावें ५
हेंचि ऐकोनिया चित्त समाधान । आणीक दर्शनें चाड नाहीं ॥ ६ ॥
घेऊनिया भेटी कोण हा संतोष । आयुष्याचे दिस गेले गेले ॥ ७ ॥
एकदोनी कर्में जाणोनिया वर्में । आपुलिया धर्में राहूं आतां ॥ ८ ॥
कल्याणकारक अर्थ याचा एक । सर्वां भूतीं देख एक आत्मा ॥९॥
आत्मारामीं मन ठेवूनिया राहे । रामदासीं पाहें आपणेया ॥ १० ॥
तुका ह्मणे राया धन्य जन्म क्षितीं । त्रैलोकीं हे ख्याति कीर्ति तुझी ११

॥ ४४०१ ॥

आतां हे विनवणी प्रधान अष्टक । प्रभूसी विवेक समजावा ॥ १ ॥

प्रतिनिधि मानरक्षक चतुर । सात्विकाचें घर तुम्हांपाशीं ॥ २ ॥
मजुमूचे धणी लेखनकारक । पत्रींचा विवेक समजावा ॥ ३ ॥
पेशवे सुरनिस चिटनिस डबीर । राजाज्ञा सुमंत सेनापति ॥ ४ ॥
भूषण पंडितराय विद्याधन । वैद्यराजा नमन माझें असे ॥ ५ ॥
पत्राचा हा अर्थ अंतरीं जाणोनी । विवंचोनीं श्रवणीं घाला तया ६॥
सात्विक प्रेमळ दृष्टांताच्या मतें । बोलिलों बहुत कळावया ॥ ७ ॥
यथास्थित निरोप सांगणें हा राया । अर्थ पाहा वाया जाऊं नेदा ८
भिडेसाटीं बोला गाळूनी अर्थातें । अनर्थकारी तुमतें होइल तेणें ९
तुका ह्मणे तुह्मां नमन अधिकाऱ्या । सांगणें तें राया पत्र माझें १०

शिवाजी स्वतः दर्शनास आले त्यावेळीं त्यास केलेला उपदेश.

॥ ४४०२ ॥

रायाछत्रपती ऐकावें वचन । रामादासीं ध्यान लावा वेगीं ॥ १ ॥
रामदासस्वामी सोयरा सज्जन । यासि तूं नमन अर्पी बापा ॥ २ ॥
मारुती अवतार स्वामी प्रगटला । उपदेश केला तुजलागीं ॥ ३ ॥
रामनाम मंत्र तारक केवळ । झालासे सीतळ उमाकांत ॥ ४ ॥
उफराटीं नामें उपजतां वाल्मीक । झाला पुण्य लोक तात्कालिक ५
तेंच बीज त्यासि वरिष्ठ उपदेश । त्याहूनी विशेष काय आहे ॥ ६ ॥
आतां धरूं नका भलत्याचा संग । राम पांडुरंग कृपा करी ॥ ७ ॥
धरूं नको आस आमुची भूपाळा । रामदासीं डोळा लावा वेगीं ८॥
तुझी चाड नाहीं आह्मां छत्रपति । आह्मी पत्रपति त्रैलोक्याचे ॥९॥
चारी दिशीं आम्हा भिक्षेचा अधिकार । न मिळे भाकर भक्षावया १०
पांडुरंगीं आमुची झाली पूर्ण भेटी । हातांत नरोटी दिधली देवें ११
आतां पडूं नको आमुचिया काजा । पवित्र तूं राजा रामभक्त ॥१२॥
विठ्ठलाचे दास केवळ भिकारी । आम्हांलागीं हरी उपेक्षी ना १३॥
शरण असावें रामदासालागीं । नमन साष्टांगीं घालीं त्यासी ॥१४॥
तुका ह्मणे राया मुला असो कल्याण । सद्गुरू शरण असे बापा १५॥

कीर्तनप्रसंगीं परचक्रवेढा पडला त्या वेळचे अभंग.

॥ ४४०३ ॥

न देखवे डोळां ऐसा हा आकांत । परपीडे चित्त दुःखी होतें ॥१॥
काय तुम्ही येथें नसालसें जालें । आह्मी न देखिलें पाहिजे हें ॥२॥
परचक्र कोठें हरिदासांच्या वासें । न देखिजेत देशें राहातिया ३॥
तुका म्हणे माझी लाजविली सेवा । हीनपणें देवा जिणें जालें ४ ॥

॥ ४४०४ ॥

काय म्यां मानावें हरिकथेचें फळ । तरिजे सकळ जन ऐसें ॥ १ ॥
उच्छेद तो असे हा गे आरंभला । रोकडें विठ्ठला परचक्र ॥ २ ॥
पापाविण नाहीं पाप येत पुढें । साक्षीसी रोकडें साक्ष आलें ॥३॥
तुका म्हणे जेथें वसतील दास । तेथें तुझा वास कैसा आतां ॥४॥

॥ ४४०५ ॥

भीत नाहीं आतां आपुल्या मरणा । दुःखी होता जना न देखवे ॥१॥
आमुची तो जाती ऐसी परंपरा । कां तुम्ही दातारा नेणां ऐसें ॥२॥
भजनीं विक्षेप तेंची पैं मरण । न वजाचा क्षण एक वाया ॥ ३ ॥
तुका म्हणे नाहीं आघाताचा वारा । ते स्थळीं दातारा ठाव मागें ४

लोहगांवीं कीर्तनांत मेलेलें मूल जीवंत होण्याविषयीं देवापाशीं करुणा.

॥ ४४०६ ॥

अशक्य तों तुम्हां नाहीं नारायणा । निर्जीवा चेतना आणावया १॥
मागें काय जाणों स्वामीचे पवाडे । आतां कां रोकडे दावूं नये २ ॥
थोर भाग्य आम्ही समर्थाचे दासे । म्हणवितों दास काय थोडें ३
तुका म्हणे माझे निववावे डोळे । दावूनि सोहळे सामर्थ्याचे ४ ॥

लोहगांवीं स्वामींच्या अंगावर ऊन पाणी घातलें तो अभंग.

॥ ४४०७ ॥

जळे माझी काया लागला वोणवा । धांव रे केशवा मायबापा १
पेटली सकळ कांति रोमावळी । नावरे हे होळी दहन जालें ॥ २ ॥
फुटोनिया दोन्ही भाग होऊं पाहे । पाहतोसी काय हृदय माझें ३
घेऊनी जीवन धांवें लवलाहीं । करुणाचें कांहीं न चले येथें ॥ ४ ॥
तुका ह्मणे माझी तूं होसी जननी । आणीक निर्वाणीं कोण राखे ५

विषयसुखप्राप्त्यर्थ एक स्त्री तुकोबाकडे गेली त्यावेळचे अभंग.

॥ ४४०८ ॥

पराविया नारी रखुमाईसमान । हें गेलें नेमून ठायींचेची ॥ १ ॥
जाईं वो तूं माते न करीं सायास । आह्मी विष्णुदास नव्हों तैसे २
न सहावे मज तुझें हें पतन । नको हें वचन दुष्ट वदों ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज पाहिजे भ्रतार । तरी कां इतर लोक थोडे ॥ ४ ॥

॥ ४४०९ ॥

स्त्रियांचा तो संग नको नारायण । काष्ठा या पाषाणामृत्तिकेच्या १

नाठवे हा देव न घडे भजन । लांचावलें मन आवरेना ॥ २ ॥
दृष्टिमुखें मरण इंद्रियांच्या द्वारें । लावण्य तें खरें दुःखमूळ ॥ ३ ॥
तुका ह्मणे जरी अग्नि जाला साधु । परी पावे बाधूं संघट्टणें ॥ ४ ॥

संतांनीं तुकोबास विचारलें कीं, तुम्हांस वैराग्य कसें झालें, त्याचें उत्तर.

॥ ४४१० ॥

याती शूद्र वंश केला वेवसाव । आदि तो हा देव कुळपूज्य ॥ १ ॥
नये बोलों परि पाळिलें वचन । केलियाचा प्रश्न तुम्ही संतीं ॥२॥
संवसारें जालों अतिदुःखें दुःखी । मायबाप सेखीं क्रमिलिया ॥३॥
दुष्काळें आटिलें द्रव्य नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली४
लज्जा वाटे जीवा त्रासलों या दुःखें । वेवसाय देखें तुटी येतां ॥५॥
देवाचें देऊळ होतें तें भंगलें । चित्तासी जें आलें करावेंसें ॥ ६ ॥
आरंभीं कीर्तन करी एकादशी । नव्हते अभ्यासीं चित्त आधीं ७ ॥
कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें । विश्वासें आदरें करोनिया ॥ ८ ॥
गाती पुढें त्यांचें धरावें ध्रुपद । भावें चित्त शुद्ध करोनिया ॥ ९ ॥
संतांचें सेविलें तीर्थ पायवणी । लाज नाहीं मनीं येऊं दिली ॥१०॥
टाकला तो कांहीं केला उपकार । केलें हें शरीर कष्टवुनी ॥ ११ ॥
वचन मानिलें नाहीं सुहृदांचें । समूळ प्रपंचें वीट आला ॥ १२ ॥
सत्यअसत्यासी मन केलें ग्वाही । मानियेलें नाहीं बहुमत ॥ १३ ॥
मानियेला स्वामीं गुरुचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं१४॥
यावरी या झाली कवित्वाची स्फूर्ति । पाय धरिले चित्तीं विठोबाचे१५
निषेधाचा कांहीं पडिला आघात । तेणें मध्यें चित्त दुखविलें ॥१६॥
बुडविल्या वह्या बैसलों धरणें । केलें नारायणें समाधान ॥ १७ ॥
विस्तारीं सांगतां बहुत प्रकार । होईल उशीर आतां पुरे ॥ १८ ॥
आतां आहे तैसा दिसतो विचार । पुढील प्रकार देव जाणे १९ ॥
भक्तां नारायण नुपेक्षी सर्वथा । कृपावंता ऐसा कळों आलें २० ॥
तुका ह्मणे माझें सर्व भांडवल । बोलविले बोल पांडुरंगें ॥ २१ ॥

॥ ४४११ ॥

ऐका वचन हें संत । मी तो आगळा पतित । काय काजें प्रीत । करीतसां आदरें ॥ १ ॥ माझें चित्त मज ग्वाही । सत्य तरलों मी नाहीं । एकांचिये वाहीं । एक देखी मानिती ॥ २ ॥ बहु पीडिलों संसारें । मोडीं पुसें पिटीं ढोरें । न पडतां पुरें । या विचारें राहिलों ॥३॥ सहज सरलें होतें कांहीं । द्रव्य थोडें बहु तेंही । त्याग केला

नाहीं । दिलें द्विजा याचका ॥ ४ ॥ प्रियापुत्रबंधु । यांचा तोडिला संबंधु । सहज जालों मंदु । भाग्यहीन करंटा ॥५॥ तोंड न दाखवे जना । शिरें सांदीं भरें राना । एकांत तो जाणा । तयासाठीं लागला ६ पोटें पिटिलों काहारें । दया नाहीं या विचारें । बोलावितां बरें । सहज म्हणे यासाठीं ७ सहज वडिलां होती सेवा । म्हणोनि पूजितो या देवा । तुका म्हणे भावा । साठीं झणी घ्या कोणी ॥८॥

॥ ४४१२ ॥

बरें झालें देवा निघालें दिवाळें । बरी या दुष्काळें पीडा केली ॥१॥ अनुतापें तुझें राहिलें चिंतन । झाला हा वमन संवसार ॥ २ ॥ बरें झालें देवा बाईल कर्कशा । बरी हे दुर्दशा जनामध्यें ॥ ३ ॥ बरें झालें जगीं पावलों अपमान । बरें गेलें धन ढोरें गुरें ॥ ४ ॥ बरें झालें नाहीं धरिली लोकलाज । बरा आलों तुज शरण देवा ५ बरें झालें तुझें केलें देवाईल । लेंकरें बाईल उपेक्षिलीं ॥ ६ ॥ तुका म्हणे बरें व्रत एकादशी । केलें उपवासी जागरण ॥ ७ ॥

पक्षी दाणे टिपीत असतां तुकोबास पाहून ते उडाले त्यामुळें तुकोबास खेद झाला तो अभंग.

॥ ४४१३ ॥

अवघीं भूतें साम्या आलीं । देखिलीं म्यां कैं होतीं ॥ १ ॥ विश्वास तो खरा मग । पांडुरंग कृपेचा २ माझी कोणी न धरो शंका । विश्व होकां निर्द्वंद्व ॥ ३ ॥ तुका म्हणे जे जे भेटे । ते ते वाटे मी ऐसें ॥ ४ ॥

निर्वाणाचे अभंग.

॥ ४४१४ ॥

शोधितांचि नये । म्हणोनी वोळगतों पाय ॥ १ ॥ आतां दिसों नये जना । ऐसें करा नारायणा ॥ २ ॥ परतोनी मन । गेलें ठायींचि मुरोन ॥ ३ ॥ विसरला तुका । बोलो चालो जाला मुका ॥ ४ ॥

॥ ४४१५ ॥

तुह्मी सनकादिक संत । ह्मणवितां कृपावंत ॥१॥ एवढा करा उपकार । देवा सांगा नमस्कार ॥२॥ भाकोनी करुणा । विनवा वैकुंठींचा राणा ॥३॥ तुका ह्मणे मज आठवा । मूळ लवकरी पाठवा ४

॥ ४४१६ ॥

आपुल्या माहेरा जाईन मी आतां । निरोप या संतां हातीं आला १ सुख दुःख माझें आइकिलें कानीं । कळवळा मनीं करुणेचा ॥२॥ करूनी सिद्ध मूळ साउलें भातुकें । येती दिसे एक म्याबगासी ३॥

त्याचि पंथें माझें लागलेंसें चित्त । वाट पाहे नित्य माहेराची ॥४॥
तुका ह्मणे आतां येतील न्यावया । अंगें आपुलिया मायबाप ॥५॥

॥ ४४१७ ॥

संतीं केला अंगीकार । त्यासी अभिमान थोर ॥ १ ॥ कांहीं ठेविले चरणीं । घेती तेचि पुरवूनी । तुका पायवणी । घेऊनिया निराळा ॥२॥ नसतां काहीं संचित । भेटी जाली अवचित ॥ ३ ॥ देव मिळोनिया भक्त । तुका केलासे सनाथ ॥ ४ ॥

॥ ४४१८ ॥

संसाराचे अंगीं अवघींच व्यसनें । आम्ही या कीर्तनें शुद्ध झालों १
आतां हे सोवळे झाले त्रिभुवन । विषम धोऊन सांडियेले ॥ २ ॥
ब्रह्मपुरीं वास करणें अखंड । न देखिजे तोंड विटाळाचें ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्हां एकांताचा वास । ब्रह्मीं ब्रह्मरस सेवूं सदा ॥४॥

॥ ४४१९ ॥

म्हणवितो दास । परी मी असे उदास ॥ १ ॥ हाचि निश्चय माझा । परि मी निश्चयाहूनी दुजा ॥ २ ॥ सरतें कर्तृत्व माझ्यानें । परि मी त्याहीहून भिन्न ॥३॥ तुका तुकासी तुकला । तुका तुकाहुनि निराळा ४

॥ ४४२० ॥

न देखिजे ऐसें केलें । या विठ्ठले दुःखासी ॥१॥ कृपेचिये सिंहासनीं । अधिष्ठानीं बैसविले ॥२॥ वाजता तो नलगे वारा । क्षीरसीगरा शयनीं ॥३॥ तुका ह्मणे अवघे ठायीं । मज पायीं राखिलें ॥४॥

॥ ४४२१ ॥

करावें तें काम । उगाच वाढवावा श्रम ॥ १ ॥ अवघें एकमय । राज्य बोलों चालों नये ॥ २ ॥ दुजयाची सत्ता । न चलेसी झाली आतां ॥ ३ ॥ आतां नाहीं तुका । पुन्हा हारपला लोकां ॥ ४ ॥

॥ ४४२२ ॥

रज्जुसर्पाकार । भासयेलें जगडंबर ॥ १ ॥ ह्मणोनी आठवितों पाय । घेतों आलाय बलाय ॥ २ ॥ दृश्य द्रुमाकार लाणी । केलों सर्वस्वासी धणी ॥ ३ ॥ तुकीं तुकला तुका । विश्वीं भरोनी उरला लोकां ४॥

॥ ४४२३ ॥

घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं । मुक्तां आत्मस्थिति सांडवीन १॥
ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं । भाग्य तरी ऋणी देवा ऐसा २ ॥
तीर्थभ्रामकासी आणीन आळस । कडू स्वर्गवास करिन भोग ३ ॥
सांडवीन तपोनिधा अभिमान । यज्ञ आणि दान लाजवीन ॥ ४ ॥
भक्तिभाग्यप्रेमा साधीन पुरुषार्थ । ब्रह्मींचा जो अर्थ निजठेवा ५ ॥
धन्य ह्मणवीन इह लोकीं लोकां । भाग्य आह्मी तुका देखियेला ६॥

॥ ४४२४ ॥

अवघियांच्या आलों मुळें । एका वेळे न्यावया ॥ १ ॥ सिद्ध

व्हावें सिद्ध व्हावें । आधीं ठावें करितों ॥ २ ॥ जोंवरी ते घटिका दुरी । आहे उरी तो काळ ॥ ३ ॥ मंगळाचे वेळे उभे । असों शोभे सावध ॥ ४ ॥ अवघियांचा योग घडे । तरी जोडे श्लाघ्यता ॥ ५ ॥ तुका ह्मणे पाहें वाट । बहु आट करूनी ॥ ६ ॥

॥ ४४२५ ॥

चिन्हें उमटती अंगीं । शकुनाजोगीं उत्तम ॥ १ ॥ आठवला बाप माय । येईल काय मूळ नेणों ॥ २ ॥ उत्कंटित झालें मन । तेंचि खुण तेथींचि ॥ ३ ॥ तुका ह्मणे कामा वारीं । आळस घरीं करमेना ॥४॥

॥ ४४२६ ॥

आरोनिया पाहे वाट । कटकट सोसेना ॥ १ ॥ आलियांस पुसें मात । तेथें चित्त लागलें ॥ २ ॥ दळीं कांडीं लोकांपेसें । परि मी नसें ते ठायीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें पिसें । तेथें तैसें असेल ॥ ४ ॥

॥ ४४२७ ॥

येथीलिया अनुभवें । कळों जीवें येतसे ॥१॥ दोहीं ठायीं एक जीव । माझी कींव त्या अंगीं ॥ २ ॥ भूक भुकेची खाउनि धाय । नाहीं हाय अन्नाची ॥ ३ ॥ तुका ह्मणे सुख झालें । अंतर धालें त्यागुणें ॥ ४ ॥

॥ ४४२८ ॥

पैल आले हरि । शंख चक्र शोभे करीं ॥ १ ॥ गरुड येतो फडत्कारें । ना भी ना भी ह्मणे त्वरें ॥ २ ॥ मुगुटकुंडलांच्या दीप्ति । तेजें लोपला गभस्ति ॥ ३ ॥ मेघश्यामवर्ण हरि । मूर्ति डोळस साजिरी ॥४॥ चतुर्भुज वैजयंती । गळां माळ हे रुळती ॥५॥ पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ॥ ६ ॥ तुका झालासे संतुष्ट । घरा आलें वैकुंठपीठ ॥ ७ ॥

॥ ४४२९ ॥

शंखचक्रगदापद्म । पैल आला पुरुषोत्तम ॥ १ ॥ ना भी ना भी भक्तराया । वेगीं पावलों सखया ॥२॥ दुरूनी येतां दिसे दृष्टी । धाके दोष पळती सृष्टी ३ तुका देखोनि एकला । वैकुंठींहुनि हरि आला ॥४॥

॥ ४४३० ॥

पैल दिसतील भार । दिंडी पताका अपार ॥ १ ॥ आला पंढरीचा राणा । दिसतील त्याच्या खुणा ॥ २ ॥ सुख वाटे मना । डोळे बाह्या स्फुरती ॥ ३ ॥ उठिले गजर नामाचे । दळभार वैष्णवांचे ॥ ४ ॥ तुका करी रिता ठाव । त्यांसी बैसावया वाव ॥ ५ ॥

॥ ४४३१ ॥

चला जाऊं रे सामोरे । पुढें भेटों विठ्ठल धुरे ॥ १ ॥ तुका आनंदला मनीं । कैसा जातो लोटांगणीं । फेडावया धणी । प्रेमसु-

त्याची आजी ॥ २ ॥ पुढें आले कृपावंत । मायबाप साधुसंत ३ ॥ तुका आळंगिला बाहीं । ठेविला विठोबाचे पायीं ॥ ४ ॥

॥ ४४३२ ॥

सकळही माझी बोळवण करा । परतोनी घरा जावें तुह्मी ॥ १ ॥ कर्मधर्में तुह्मां असावें कल्याण । घ्या माझें वचन आशीर्वाद ॥ २ ॥ वांटवूनी दिलों एकाचिये हातीं । सकळ निश्चिती जाली तेथें ॥३॥ आतां मज जाणें प्राणेश्वरासवें । मी माझिया भावें अनुसरलों ४ ॥ वाढवितां लोभ होईल उशीर । अवघींच स्थिर करा ठायीं ॥ ५ ॥ धर्म अर्थ काम जाला एकें ठायीं । मेळविला जिहीं हाता हातीं ॥६॥ तुका ह्मणे आतां जाली हेचि भेटी । उरल्या त्या गोष्टी बोलावया ७

॥ ४४३३ ॥

तुका उतरला तुकीं । नवल जालें तिहीं लोकीं ॥१॥ नित्य करितों कीर्तन । हेंचि माझें अनुष्ठान ॥ २ ॥ तुका बैसला विमानीं । संत पाहाती लोचनीं ॥३॥ देव भावाचा भुकेला । तुका वैकुंठासी नेला ४

॥ ४४३४ ॥

वाराणसीपर्यंत असों सुखरूप । सांगावा निरोप संतासी हा ॥ १ ॥ येथूनिया आह्मां जाणें निजधामा । सवें असे आह्मां गरुड हा ॥ २ ॥ कृपा असों द्यावी मज दीनावरी । जातसों माहेरीं तुका ह्मणे ॥३॥

॥ ४४३५ ॥

आह्मी जातों तुम्ही कृपा असो द्यावी । सकळां सांगावी विनंती माझी१ वाढवेळ झाला उभा पांडुरंग । वैकुंठा श्रीरंग बोलाविलों ॥ २ ॥ अंतकाळीं विठो आम्हासी पावला । कुडीसहित झाला गुप्त तुका ॥३॥

कान्होबाचे अभंग.

नाट.

॥ ४४३६ ॥

अगा ये वैकुंठनायका । अगा ये त्रैलोक्यतारका । अगा जनार्दना जगद्व्यापका । अगा पालका भक्तांचिया ॥१॥ अगा ये वसुदेवदेवकीनंदना । अगा ये गोपिकारमणा । अगा बळिबंधा वामना । अगा निधाना गुणनिधि ॥ २ ॥ अगा ये द्रौपदीबांधवा । अगा ये सखया पांडवा । अगा जिवाचिये जीवा । अगा माधवा मधुसूदना ॥ ३ ॥ अगा महेश्वरा महाराजा । अगा श्रीहरि गरुडध्वजा । अगा सुंदरा सहस्रभुजा । पार मी तुझा काय वर्णूं ॥ ४ ॥ अगा अंबरधरिपरात्परा निरालंबा निर्विकारा । अगा गोवर्धनधरणीधरा । अगा माहेरा दीनाचिया ॥ ५ ॥ अगा धर्मराया धर्मशीळा । अगा कृपासिंधु

कृपाळा । अगा प्रेमाचिया कल्लोळा । सकळकळाप्रवीणा ॥ ६ ॥ अगा चतुरा सुजाणा । मधुरगिरा सुलक्षणा । अगा उदारा । असुरमर्दना । राखें शरणा तुकयाबंधु ॥ ७ ॥

॥ ४४३७ ॥

देवा मी चांडाळ चांडाळ । म्हणतां लागताहे वेळ । नसे पाहतां भूमंडळ । ऐसा अमंगळ खळ दुसरा ॥ १ ॥ जन्मा उपजलियापासूनी । असत्य कर्म तें अझूनी । सत्य आचरण नेणें स्वप्नीं । निखळ खाणी अवगुणांची ॥ २ ॥ भक्ति दया अथवा कथा । कानीं न साहवे वार्ता । अखंड विषयांची वेथा । अधम पुरता अधमाहूनी ३ काम क्रोध दंभ अहंकार । गर्व ताठा मद मत्सर । यांचें तरी माहेरघर । परउपकार वैरी जैसा ॥ ४ ॥ निंदा द्वेष घात विश्वास । करितां नाहीं केला आळस । करूं नये ते केले संतउपहास । अभक्ष तेंहीं भक्षिलें ॥ ५ ॥ पाळिलें नाहीं पितृवचन । सदा परद्वारीं परधनी ध्यान । बोलों नये घडलें ऐसें अन्योन्यविण । दासीगमन आदिकरूनी ६ कायामनें वाचाइंद्रियाशीं । सकळ पापांचीच राशी । तुकयाबंधु म्हणे ऐसियासी । आलों हृषीकेशी तुज शरण ७

॥ ४४३८ ॥

काय काय करितों या मना । परि नाइके नारायणा । करूं नये त्याची करी विवंचना । पतना नेऊं आदरिलें ॥ १ ॥ भलतिया सवें धांवे सैराट । वाट आडवाट दरे दरकूट । न विचारी कुडें कांहीं कपट । घातें बळकट मांडियेला ॥ २ ॥ न पुरती भ्रमणा दाही दिशा । सप्त ही पाताळें आकाशा । घाली उडी बळेंचि देखोनी फांसा । केलों या दशा पाहुणा ॥ ३ ॥ चेतवूनी इंद्रियें सकळ । आशा तृष्णा कल्पना काम क्रोध काळ । दुराविली शुद्ध बुद्धि केली राळ । ऐसें चांडाळ अनिवार हें ॥ ४ ॥ आतां काय ऐसें करावें यासी । बहु जाचिलों केलों कासाविसी । तुकयाबंधु म्हणे हृषीकेशी । धांव मज ऐसी परी झाली ॥ ५

॥ ४४३९ ॥

एक मागणें हृषीकेशी । चित्त द्यावें सांगतों वचनासी । मज अंतर तुझ्या चरणासी । न पडे ऐसी कृपा करीं ॥ १ ॥ नको दुजी बुद्धि आणीक । रिद्धिसिद्धि परलोक । तूं स्वामी मी सेवक । खंडणा नको करूं ऐसी ॥ २ ॥ मना येईल तो जन्म देईं । भलतें कुळीं भलतें ठायीं । तें मी सांकडें घालीत नाहीं । हृदयींहुनी तुवा नव जावें ॥ ३ ॥ इतुकें करीं भलत्या परी । भलत्या भावें तुझें द्वारीं ।

राहेन दास होऊनी कामारी । वदो वैखरी नित्य नाम ॥ ४ ॥ नका विचारूं दुसरें आतां । शरण आलों पंढरीनाथा । तुकयाबंधु ह्मणे रे अच्युता । आहेसी तूं दाता दानशूर ॥ ५ ॥

॥ ४४४० ॥

तूं बळिया शिरोमणी । आहेसी माझी ये त्रिभुवनीं । रिघालों पाठी तुझी म्हणउनी । आतां करीन मी असेल तें ॥ १ ॥ तूं देवा प्रताप दिनकर । सुरा असुरांचा सुर । महावीरा वीर धनुर्धर । मी तो पामर काय तेथें ॥ २ ॥ कृपासिंधु दीनवत्सल । फोडिली देवांची बंदीशाळ । संहारूनी राक्षसदळ । शरणांगत राज्यीं स्थापिला ॥ ३ ॥ उपक्रम करावा बहुत । तरी तूं जाणसी धर्मनीत । उचित काय तें अनुचित । राखें शरणागत आलों आतां ॥ ४ ॥ किती म्यां काय विनवावें । शरण आलों जीवें भावें । तुकयाबंधु ह्मणे करावें । क्षेम आवघें येणें काळें ॥ ५ ॥

॥ ४४४१ ॥

उभा देखिला भीमातीरीं । कर मिरवले कटावरी । पाउलें तरी समचि साजिरीं । नाम तरी अनंत अति गोड ॥ १ ॥ शंखचक्रांकित भूषणें । जडितमेखळा चित्रन्नें । पीतांबर उटी शोभे गोरेपणें । लोपलीं तेणें रवितेजें ॥ २ ॥ श्रवणीं कुंडलें देती ढाळ । दशांगुळीं मुद्रिका माळ । दंत ओळी हिरे झळाळ । मुख निर्मळ सुनासी ॥ ३ ॥ कटीं कडदोरा वांकी वेळा । बाहीं बाहुवटे पदक गळां । मृगनाभी रेखिला टिळा । लवती डोळां विद्युलता ॥ ४ ॥ सुंदरपणाची साम्यता । काय वर्णूं ते पावे आतां । तुकयाबंधु ह्मणे रे अच्युता । धन्य ते माता प्रसवली ॥ ५ ॥

॥ ४४४२ ॥

कंई देखतां होईन डोळीं । सकळां भूतीं मूर्ति सांवळी । जीवा नांव भूमंडळीं । जळीं स्थळीं काष्टीं पाषाणीं ॥ १ ॥ ऐसा कृपा करील नारायण । जीव जगाचा होईन । प्रेमसागरीं बुडईन । होईल स्नान अनुतापीं ॥ २ ॥ ऐसा कंई येईन दैवास । हृदय नासोनी जाईल आस । सदा संतचरणीं देहाचा वास । सेवीन शेष धणीवरी ॥ ३ ॥ कंई नवसा येतील अंकुर । सुखा नाहीं पार । अमृत तें पृथ्वी जळ सागर । वाहाती पूर आनंदाचे ॥ ४ ॥ प्रसन्न दया क्षमा शांति । कंई नवविधा होईल भक्ति । भोगीन वैराग्यसंपत्ति । मनोरथ कळती तंई पुरले ॥ ५ ॥ तुकयाबंधु ह्मणे सांग । नव्हे तुजविण निरसेना पांग । म्हणोनी घातलें साष्टांग । पांडुरंगा चरणावरी ॥ ६ ॥

कान्होबास तुकोबाच्या वियोगानें झालेला विरह.

॥ ४४४३ ॥

दुःखें दुभागलें हृदयसंपुट । गहिंवरें कंठ दाटताहे ॥ १ ॥
ऐसें काय केलें सुमित्रा सखया । दिलें टाकोनिया वनामाजीं ॥ २॥
आक्रंदती बाळें करुणावचनीं । त्या शोकें मेदिनी फुटों पाहे ॥ ३॥
काय हें सामर्थ्य नव्हतें तुजपाशीं । संगें न्यावयासी अंगभूतां ॥४॥
तुजं ठावें आम्हां कोणी नाहीं सखा । उभय लोकीं तुका तुजविण ५
कान्हो म्हणे तुझ्या वियोगें पोरटीं । झालों दे रे भेटी बंधुराया ॥६॥

॥ ४४४४ ॥

सख्यत्वासी गेलों करीत सलगी । नेणेंचि अभागी महिमा तुझा १॥
पावलों आपुलें केलें लाहे रस । निर्दैवा परिस काय होय ॥ २ ॥
कष्टविलासी म्यां चांडाळें संसारीं । अद्यापिवरी तरी उपदेशीं ३॥
उचित अनुचित सांभाळिलें नाहीं । कान्हा ह्मणे कांहीं बोलों आतां४

॥ ४४४५ ॥

असो आतां कांहीं करोनिया ग्लांती । कोणा काकुलती येइल येथें१
करूं कांहीं दिस राहे तो सायास । झोंबों त्या लागास भावाचिये२
करितां रोदना बापुडें म्हणती । परि नये अंतीं कामा कोणी ॥ ३ ॥
तुकयाबंधु ह्मणे पडिलिया वनीं विचार तो मनीं [illegible]ला हे ॥४॥

॥ ४४४६ ॥

चरफडे चरफड शोकें शोक होये । कार्यमूळ आहे श्रीरापाशीं ॥१॥
कल्पतसे मज ऐसें हें पाहतां । करावी ते चिंता मिथ्या खोटी ॥२॥
न चुके होणार सांडिल्या शूरत्वा । फुकटचि सत्त्वा होईल हानि३॥
तुकयाबंधु ह्मणे दिल्या बंद मना । वांचूनी निधाना न पवीजे ॥४॥

कान्होबानें तुकोबाच्या वियोगामुळें देवाशीं कठोर भाषण.

॥ ४४४७ ॥

नलगे चिंता आतां अनुमोदून हातां । आलें मूळ भ्राता गेला त्याचें१
घरभेद्या येथें आहे तें सुकानू । धरितों कवळून पाय दोन्हीं ॥ २ ॥
त्याचें त्याचिया मुखें पडियेलें ठावें । नलगे सारावें मागें पुढें ॥ ३ ॥
तुकयाबंधु ह्मणे करील भेटी भावा । सोडीन तेधवा या विठ्ठला ४॥

॥ ४४४८ ॥

मूळस्थळ ज्याचें गोमतीचे तीरीं । तो हा सारी दोरी खेळवितो ॥१॥
ऐसें हें कळलें असावें सकळां । चोर त्या वेगळा नाहीं दुजा ॥ २ ॥
वैष्णव हे हेर तयाचे पाळती । खूण हे निरुती सांगितली ॥ ३ ॥
तुकयाबंधु ह्मणे आलें अनुभवास । तेणेंच आह्मांस नागविलें ॥४॥

॥ ४४४९ ॥

नये सोमसरी उपचाराची हरी । करकरेचें करीं काळें तोंड ॥ १ ॥
मागतों इतुकें जोडूनिया कर । ठेवूनिया शिर पायावरी ॥ २ ॥
तुह्मां आह्मां एके ठायीं सहवास । येथें द्वैत द्वेष काय बरा ॥ ३ ॥
तुकयाबंधु ह्मणे बहुतां बहुतां रीती । अनंता विनंती परिसावी हे ॥ ४ ॥

॥ ४४५० ॥

बरा रे निर्गुणा नष्ट नारायणा । घरबुडवणा भेटलासी ॥ १ ॥
एके घरीं कोणी कोणासी न धरी । ऐसी अपरांपरी केली आह्मां ॥ २ ॥
कान्हा ह्मणे कां रे निष्काम देखिलें । ह्मणोनि मना आलें करितोसी ॥ ३ ॥

॥ ४४५१ ॥

निनांव हें तुला । नांव साजे रे विठ्ठला । बरा शिरकाविला । फाटक्यामध्यें पाव ॥ १ ॥ कांहीं तरी विचारिलें । पाप पुण्य ऐसें केलें । भुरळें घातलें । एकाएकीं भावासी ॥ २ ॥ मुद्राधारण माळा टिळे । बोल रसाळ कोंवळे । हातीं फांशांचे गुंडाळें । कोण चाळे गृहस्था हे ॥ ३ ॥ तुकयाबंधू ह्मणे मिस्कीन । करितोसी देखोन । पाहा दुरीवरी विच्छिन्न । केला परी संहार ॥ ४ ॥

॥ ४४५२ ॥

लालुचाईसाठीं बळकाविसी भावा । परि मी जाण देवा जिरों नेदीं ॥ १ ॥
असों द्या निश्चय हा मनीं मानसीं । घातली येविशीं दृढ कास ॥ २ ॥
मज आहे बळ आळीचें सबळ । फोडीन अंत्राळ हृदय तुझें ॥ ३ ॥
करुणारसें तुकयाबंधु ह्मणे भुलवीन । काढूनी घेईन बिज्ज वस्तु ॥ ४ ॥

॥ ४४५३ ॥

भक्ति मुक्ति तुझें जळों ब्रह्मज्ञान । दे माझ्या आणोनि भावा वेगीं ॥ १ ॥
रिद्धि सिद्धि मोक्ष ठेवी गुंडाळून । दे माझ्या आणून भावा वेगीं ॥ २ ॥
नको आपुलिया नेऊं वैकुंठासी । दे माझ्या भावासी आणून वेगीं ॥ ३ ॥
नको होऊं कांहीं होसील प्रसन्न । दे माझ्या आणून भावा वेगीं ॥ ४ ॥
तुकयाबंधु ह्मणे पाहा हो नाहीं तरी । हत्या होईल शिरीं पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ ४४५४ ॥

धींदधींद तुझ्या करीन चिंधड्या । ऐसें काय वेड्या जाणितलें ॥ १ ॥
केली तरी बरें मज भेटी भावास । नाहीं तरी नास आरंभिला ॥ २ ॥
मरावें मारावें या आलें प्रसंगा । बरें पांडुरंगा कळलें सावें ॥ ३ ॥
तुकयाबंधु ह्मणे तुझी माझी उरी । उडाली न धरीं भीड कांहीं ॥ ४ ॥

॥ ४४५५ ॥

तुझीं वर्मे आम्हां ठावीं नारायणा । परि तूं शाहाणा होत नाहीं ॥ १ ॥
मग कालावुली हाका देते वेळे । होतोसी परि डोळे झांकडिसी ॥ २ ॥

जाणोनी अज्ञान करावें मोहरें । खोटी खोडी हे रे तुझी देवा ॥३॥
तुकयाबंधु ह्मणे कारण प्रचीति । पाहातों वेळ किती तेच गुण ॥४॥

॥ ४४५६ ॥

मुख्य आहे आम्हां मातेचा पटंगा । तुज पांडुरंगा कोण लेखी ॥१॥
नको लावूं आह्मां सवें तूं तोंवरी । पाहा दूरवरी विचारूनी ॥ २ ॥
साहे संतजन केले महाराज । न घडे आतां तुज भेईन मी ॥ ३ ॥
तुकयाबंधु ह्मणे अइक्यें पेक्यतां । वाढतें अनंता दुःखें दुःख ॥ ४ ॥

॥ ४४५७ ॥

नाहीं घटिका म्हणसी । लाग लागला तुजपाशीं । पडिला हृषी-केशी । जाब सकळ करणें १ माझें नेलें पांघरूण । ठावें असोन दुर्बळ दीन । माणसांमधून । उठविलें खाणोऱ्या ॥ २ ॥ आह्मी हें जगवूनि होतों पाणी । संदीं देवदेव करूनी । जालासी कोठोनी । पैदा चोरा देहाच्या ॥३॥ तुकयाबंधु ह्मणे केलें । उघडें मजाचि उमगिलें । ऐसें काय गेलें । होतें तुज न पुरतें ॥ ४ ॥

॥ ४४५८ ॥

अवघीं तुज बाळें सारिखें नाहीं तें । नवल वाटतें पांडुरंगा ॥ १ ॥
म्हणतां लाज नाहीं सकळांची माउली । जवळी धरिलीं एकें दुरी२
एका सुख द्यावें घेऊनी वोसंगा । एकें दारीं गळा श्रमविती ॥ ३ ॥
एका नवनीत पाजावें दाटून । एकें अन्न अन्न करितील ॥ ४ ॥
एकें चाटतील न वजावीं दूर । एकांचा मत्सर जवळी येतां ॥ ५ ॥
तुकयाबंधु म्हणे नावडती त्यास । कासया व्यालास नारायणा ६॥

॥ ४४५९ ॥

कनवाळ कृपाळ उदार दयाळ मायाळ । ह्मणवितोसी परि केवळ । गळे काटू दिसतोसी ॥१॥ काय केलें होतें आम्ही । सांग तुझें एक ये जन्मीं । जालासी जो स्वामी । एवढी सत्ता करावया२ भलेपणाचा पवाडा । बरा दाविला रोकडा । करूनी बंधु वेडा । जोडा माझा विखंडिला ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे भला । कैसें ह्मणताती तुजला । जीव आमुचा नेला । अंत पाहिला कांहीं तरी ॥४॥

॥ ४४६० ॥

आतां कळों आले गुण । अवघेचि यावरून । चोखट लक्षण । धरिलें हें घरघेणें ॥ १ ॥ या नांवें कृपासिंधु । ह्मणवितोसी दीन-बंधु । मज तरी मैंदु । दिसतोसी पाहतां ॥ २ ॥ अंमळ दया नाहीं पोटीं । कठीण तैसाचि कपटी । आंधळ्याची काठी । माझी गुदर-सीच ना ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे पुरता । नाहीं म्हूण बरें अनंता । परवीं असतां । तुझा घोट भरिला ॥ ४ ॥

॥ ४४६१ ॥

काय सांगों हृषीकेशा । आहे अनुताप झाला ऐसा । गिळायासी निमिषा । निमिष लागों नेदावें ॥ १ ॥ माझें बुडविलें घर । लेंकरें बाळें दारोदार । लाविलीं काहार । तारातीर करोनी ॥ २ ॥ जीव घ्यावा किंवा द्यावा । तुझा आपुला केशवा । इतुकें उरलें आहे । भावाचिया निमित्यें ॥३॥ तुकयाबंधु म्हणे जग । बरें वाईट म्हणों मग । या कारणें परि लाग । न संडावा सर्वथा ॥ ४ ॥

॥ ४४६२ ॥

मायबाप निमाल्यावरी । घातलें भावाचे आभारीं । तोंडीं परि हरी । तुज जाला असमाई ॥ १ ॥ हे कां भक्तीचे उपकार । नांदतें विध्वंसिलें घर । प्रसन्नता व्यवहार । सेवटीं हे जालासी ॥ २ ॥ एका जीवावरी । होतों दोनी कुटुंबारी । चाळवूं तो तरी । तुज येतो निर्लज्जा ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे भला । आणीक काय ह्मणावें तुला । वेडा त्यानें केला । तुजसवें संबंधु ॥ ४ ॥

॥ ४४६३ ॥

पूर्वी पूर्वजांचीं गति । हेचि आइकिली होती । सेवे लावूनी श्रीपती । निश्चिंती केली तयांची ॥ १ ॥ कां रे पाठी लागलासी । ऐसा सांग हृषीकेशी । अद्यापवरी न राहासी । अंत पहासी किती म्हूण ॥ २ ॥ जन्मजन्मांतरीं दावा । आह्मां आपणां केशवा । निमित्य चालवा । काईस्यास्तव हें ३ तुकयाबंधु ह्मणे अट्टहासा । किती होसी नारायणा । देखों सकवेना । खातयासी न खात्या ४॥

॥ ४४६४ ॥

निष्ठुर संसार करून । होतों पोट भरून । केली विवसी निर्माण । देवपण दाखविलें ॥१॥ ऐसा काढियेला नीस । काय म्हूण सहित वंश । आणिलें शेवटास । हाउस तरी न पुरे ॥ २ ॥ उरलों पाल्या शेवटीं । तेंही न देखवे दृष्टी । दोघांमध्यें तुटी । रोकडीचि पाडिली ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे गोड । बहु जालें अति वाड । ह्मणोनी कां बुड । मुळ्यांसहित खावें ॥ ४ ॥

॥ ४४६५ ॥

बरा जाणतोसी धर्मनीति । उचित अनुचित श्रीपति । करूं येते राती । ऐसी डोळे झांकूनी ॥ १ ॥ आतां जाब काय कैसा । देसी तो दे जगदीशा । आणीला बोलसा । आपणां भोंवता ॥२॥ सेवेचिया सुखास्तव । बळें धरिलें अज्ञानत्व । येईल परि हा भाव । ज्याचा त्यासी कारणा ॥३॥ तुकयाबंधु ह्मणे नाहीं । आतां आह्मां बोल कांहीं । जडोनिया पायीं । तुझे त्यांचि घेतले ॥ ४ ॥

॥ ४४६६ ॥

कांहीं विपत्ति आपल्यां । आतां आमुचिया होतां । काय होईल अनंता । पहा बोलों कासया ॥ १ ॥ बरें अनायासें जालें । साया- सेंविण बोले । चाले काबाड चुकलें । केलें कष्टावेगळें ॥ २ ॥ बरा सांपडलासी वोजा । वर्मावरी केशी राजा । बोलायासी तुझा । उजु- रचि नाहींसा ॥३॥ तुकयाबंधु ह्मणे दगा । बरा दिला होता बगा । झडकरी चलागा । चांग दैवें पावलों ॥ ४ ॥

॥ ४४६७ ॥

देवा तुजपें माझ्या पूर्वजांचें ऋण । आहे तें कां नेदिसी अझून । अवगलासी झोंडपणें । परि मी जाण जीवें जिरों नेदीं ॥ १ ॥ कळों येईल रोकडें । उभा करीन संतापुढें । तुझें काय एवढें । भय आ- पुलें मागतां ॥ २ ॥ आजीवरी होतों नेणतां । तों तुज फावलें रे अनंता । कवडीचा तो आतां । पडों नेदी न फेर ॥ ३ ॥ ठेविला ये जीवनीं जीव । ह्मणे तुकयाचा बांधव । माझा गळा तुझा पाव । एके ठायीं बांधेन ॥ ४ ॥

॥ ४४६८ ॥

मागें असतांशी कळला । उमस घेऊं नसता दिला । तेणेंचि काळें केला । असता अवघा निवाडा ॥ १ ॥ इतका न लगतां उशीर । न धरितों भीडभार । सिद्धासी व्यवहार । कासयासी लागला २ ॥ असोनिया माल खरा । किती केल्या येरझारा । धरणेंही दिवस तेरा । माझ्या भावें घेतलें ॥ ३ ॥ अझून तरी इतक्यावरी । चुकवीं अनाचार हरी । तुकयाबंधु ह्मणे उरी । नाहीं तरी तुरे कांहीं ॥ ४ ॥

॥ ४४६९ ॥

आतां न राहे क्षण एक । तुझा कळला रे लौकिक । नेदीं हालों एक । कांहीं केल्यावांचूनी ॥ १ ॥ संबंध पडिला कोणाशीं । काय डोळे झांकितोसी । नेईन पांचापाशीं । दे नाहीं तरी वोढूनी ॥ २ ॥ सुखें नेदीस जाणवलें । नाश केल्याविण उगलें । तरि तेंही विचा- रिलें । आम्हीं आहे तुज आधीं ॥ ३ ॥ असेंच करूनी किती । नाग- विलीं नाहीं नीति । तुकयाबंधु ह्मणे अंतीं । न सोडिसी ते खोडी ४

॥ ४४७० ॥

तुज ते सवे आहे ठावें । घ्यावें त्याचें बुडवावें । परि तें आह्मासवें । आतां न फावे कांहीं ॥ १ ॥ नव्हों सोडायाचे धणी । कष्टें मेळविलें करोनी । पहा विचारोनी । आढी धरोनी काम नाहीं ॥ २ ॥ अवघे राहिले प्रकार । झालों जीवासी उदार । असा हा निर्धार । कळला

असावा असेल ॥ ३ ॥ आतां निदसुर नसावें । गांठ पडली कुणब्यासवें । तुकयाबंधु ह्मणे राखावें । देवा महत्व आपुलें ॥ ४ ॥

॥ ४४७१ ॥

बहु बोलणें नये कामा । वाउगें तें पुरुषोत्तमा । एकाचि वचनें आह्मा । काय सांगणें तें सांग ॥ १ ॥ देणें आहे कीं भंडाई । करणें आहे सांग भाई । आतां भीड कांहीं । कोणी न धरी सर्वथा ॥ २ ॥ मागें गेलें जें होऊनी । असो तें धरित नाहीं मनीं । आतां पुढें येथूनी । कैसा काय विचार ॥ ३ ॥ साक्षी नाहीं अवघी वेळ । हें तों कळलें सकळ । तुकयाबंधु ह्मणे खळखळ । करावी ते उरेल ॥ ४ ॥

॥ ४४७२ ॥

आतां हें न सुटे न चुके । बोल कां द्वाडिसी फिके । जन लोक पारिखे । अवघे केले म्यां यासाठीं ॥ १ ॥ नये सरतां नव्हे भलें । तुझें लक्षण कळलें । बैसलासी काढिलें । देहाचें मुळीं दिवाळें २॥ दिसतोसी बरा बोल कां कळे । गुण मैंदाचे चाळे । दिसताती येवेळे । काय करूं विश्वंभरानी ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे देखता । अंध बहिर ऐकतां । कैसें व्हावें आतां । इतुकियाउपरी ॥ ४ ॥

॥ ४४७३ ॥

तिहीं ताळीं हेचि हाक । म्हणती पांढरा स्फटिक । अवघा बुडविला लौकिक । सुखेंचि भीके लाविलीं ॥ १ ॥ थोटा नांव शिरोमणी । नाहीं जोडा त्रिभुवनीं । म्हणोनी शाहाणे ते कोणी । तुझे दारीं बैसतीना ॥२॥ निर्गुण निळाजिरा निनांवा । लंड भोंड कुडा देवा । नागवणा या नांवा । वांचूनि तुजा नाइकों ॥३॥ सर्वगुणें संपन्न । कळों आलासी संपूर्ण । तुकयाबंधु ह्मणे चरण । आतां जीवें न सोडीं ४॥

॥ ४४७४ ॥

तोचि प्रसंग आला सहज । गुज धरितां नव्हे काज । न संडितां लाज । पुढें बोज न दिसे ॥ १ ॥ तूं तर न होसी शाहाणा । नये सांगतां तेंही मना । आपण आपणा । आतां प्रयत्न देखावा ॥ २ ॥ न पुरवी पाहातां वाट । द्यावें प्रमाण चोखट । कास घालूनिया नीट । चौबाचार करावा ॥ ३ ॥ आतां श्रमाचें कारण । नव्हे व्हावें उदासीन । न पडे तयाविण । गांठी तुकयाबंधु ह्मणे ॥ ४ ॥

॥ ४४७५ ॥

हळूहळू जाड । होत चाललें लिगाड । जाणवेल निवाड । न करिसी परि पुढें ॥ १ ॥ मी तों सांगून उतराई । जालों आतां तुज काई । कळों येईल भाई । तैसा करीं विचार ॥ २ ॥ मागें युगें अठ्ठाविस । झालीं दिवसाचा दिवस । मुद्दल व्याज कासावीस । होसी

देवा ये कामें ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे राखें । आतां टाकीं तुझीं तीं सुखें । जगजाहीर ठाउकें । झालें नाहीं खंडलेंसें ॥ ४ ॥

॥ ४४७६ ॥

पत्र उचटिलें प्रयत्नें । ग्वाही कराया कारणें । नाहीं तरी पुण्यें । तुझ्या काय उणें आम्हां ॥ १ ॥ नांव तुझेंचि करोनी । आह्मीं सुखें पोट भरोनी । केली केली जाणवणी । ह्मणउनी नाहीं ह्मणसील ॥२॥ आतां इतुकिया उपरी । दे नको भलतें करीं । ह्मणती ऋणकरी । आमुचा इतकें उदंड ॥ ३ ॥ तुकयाबंधु जागा । आळवावया पांडुरंगा । केला कांहीं मागायाची नव्हती गरज ॥ ४ ॥

॥ ४४७७ ॥

माझ्या भावें केली जोडी । न सरेसी कल्पकोडी । आणियेलें धाडी । घालूनी अवघें वैकुंठ ॥ १ ॥ आतां नलगे यावें जावें । कोठें कांहींच करावें । जन्मोजन्मीं सुखें खावें । बैसोनसें जालें ॥ २ ॥ असंख्य संख्या नाहीं पार । आनंदें दाटलें अंबर । न माये अपार । त्रिभुवनीं सांठवितां ॥ ३ ॥ अवघें भरलें सदोदित । जाले सुखाचे पर्वत । तुकयाबंधु ह्मणे परमार्थ । धन अद्भूत सांपडलें ॥ ४ ॥

॥ ४४७८ ॥

आतां चुकलें देशावर । करणें अकरणें सर्वत्र । घरासी आगर । आला सकळ सिद्धींचा ॥ १ ॥ झालों निधाई निधानें । लागलें अनंतगुणरत्न । जन्माचें विच्छिन्न । दुःख झालें दारिद्र ॥ २ ॥ तारूं सागरींचें अवचितें । हेंदोवलें आलें येथें । ओढिलें संचितें । पूर्वदत्तें लाधलें ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे सीमा । नाहीं आमुचिया दैवा । आतां पुरुषोत्तमा । ऐसा सौदागर सांपडला ॥ ४ ॥

॥ ४४७९ ॥

सांपडलें जुनें । आमच्या वडिलांचें ठेवणें । केली नारायणें । कृपा पुण्यें पूर्वींचिया ॥ १ ॥ सुखें आनंदरूप आतां । आह्मी आहों याकारितां । निवारिली चिंता । देणें घेणें चुकलें ॥२॥ जालें भांडवल घरींचें । अमूप नाम विठ्ठलाचें । सुकृत भावाचें । हें तयानें दाविलें ॥३॥ तुकयाबंधु ह्मणे फिटला । पांग नाहीं बोलायाला । चाड दुसरी विठ्ठला । वांचूनिया आणीक ॥ ४ ॥

॥ ४४८० ॥

कोठें गुंतलासी द्वारकेच्या राया । वेळ कां सखया लावियेला ॥ १ ॥
दिनानाथ ब्रीद सांभाळीं आपुलें । नको पाहों केलें पापपुण्य ॥ २ ॥
पतितपावन ब्रीदें चराचर । पातकी अपार उद्धरीले ॥ ३ ॥
तुकयाबंधु ह्मणे द्रौपदीचा धांवा । केला तैसा मला पावें आतां ॥ ४

॥ ४४८१ ॥

वचन एका कमळापति । मज रंकाची विनंती १ कर जोडीतों कथे-काळीं । आपण असावें जवळी २ घेई घेई माझी भाक । जरि कां मागेन आणीक ३ तुकयाबंधु ह्मणे देवा । शब्द इतुकाची राखावा ४

॥ ४४८२ ॥

करूनी उचित । प्रेम घालीं हृदयांत ॥१॥ आलों दान मागायास । थोरी करूनिया आस ॥२॥ चिंतन समयीं । सेवा आपुलीच देई ३ तुकयाबंधू ह्मणे भावा । मज निरवावें देवा ॥ ४ ॥

॥ ४४८३ ॥

कामक्रोध अहंकार नको देहीं । आशा तृष्णा माया लज्जा चिंता कांहीं । वास पंढरीचा जन्म सदा देई । आणीक तुजें मागणें तुज नाहीं ॥ १ ॥ कृपा देई दान हरि मज कृपा देई दान । नासीं त्रिमिर दाखवीं चरण । आर्त पुरवावें भेटी देऊन । नको उपेक्षूं आलिया शरण ॥ २ ॥ नाम अखंड हृदयीं राहो वाणी । न पडो विसर क्षण जागृतिं स्वप्नीं । संतसमागम ऐसा दे लावूनि । आणीक दुजें कांहीं नेगे तुजवांचूनि ॥ ३ ॥ पंथपुरींचा रविसुत पुरे आतां । आड करावा भवसिंधु ऐसा नव्हता । नाहीं आडताळा त्रैलोक्या माजी सरता । विनवी तुकयाबंधु चरणीं ठेवूनि माथा ॥ ४ ॥

॥ ४४८४ ॥

आतां मागतों तें ऐक नारायणा । भावपूर्वक मनापासूनिया१ ॥ असों दे मोकळी जिव्हा जरि गाइल गुण । नाहीं तरी खिळुन टाकीं परतीं ॥ २ ॥ मातेचिया परी देखती परनारी । ठेवीं नेत्र तरी नाहीं तरि नको ॥ ३ ॥ तरी बरें कांटाळा करिती निंदास्तुतीचा । नाहीं तरी कानांचाही देख प्रेतन ४ सकळ इंद्रियांचा निग्रह करूनि एक । राखावीं पृथक तोडोनि भ्रम ॥ ५ ॥ तुकयाबंधु ह्मणे तेचि वाट प्राणां । पडतां नारायणा विसर तुझा ॥ ६ ॥

॥ ४४८५ ॥

म्हणसी दावीन अवस्था । तैसें नको रे अनंता ॥ १ ॥ होऊनिया सहाकार । रूप दाखवीं सुंदर ॥ २ ॥ मृगजळाचियापरी । तैसें न करावें हरी ३ तुकयाबंधु म्हणे हरी । कामा नये वाहात्कारी ॥४॥

॥ ४४८६ ॥

नेणें गाऊं कांहीं धड बोलतां वचन । कायावाचेमनेंसहित आलों शरण ॥ १ ॥ करीं अंगीकार नको मोकलूं हरी । पतितपावन ब्रीदें करावीं खरीं ॥ २ ॥ नेणें भक्तिभाव तुझा म्हणवितों दास । जरी देसी अंतर तरी लज्जा कोणास ॥ ३ ॥ म्हणे तुकयाबंधु तुझे धरियेले पाये । आतां कोण तुजा ऐसा आम्हांसी आहे ॥ ४ ॥

॥ ४४८७ ॥

तूंच मायबाप बंधु सखा आमचा । वित्त गोत जीवलग जीवाचा ॥ १ ॥ आणीक प्रमाण नाहीं दुसरें आतां । योगक्षेमभार तुझे घातला माथां ॥ २ ॥ तूंच क्रियाकर्म धर्म देव तूं कुळ । तूंच तप तीर्थ व्रत गुरु सकळ ॥ ३ ॥ ह्मणे तुकयाबंधु करिता कार्यता देवा । तूंच भाव भक्ति पूजा पुनस्कार अवघा ॥ ४ ॥

॥ ४४८८ ॥

गाऊं वाहूं टाळी रंगीं नाचों उदास । सांडोनी भय लज्जा शंका आस निरास १ बळियाचा बळी तो कैवारी आमुचा । भुक्तिमुक्तिदाता सकळांही सिद्धींचा ॥२॥ मारूं शब्दशस्त्रबाण निःशंक अनिवार । कंटकांचा चूर फोडूं काळाचें शीर ॥ ३ ॥ ह्मणे तुकयाबंधु नाहीं जीवाची चाड । आपुलिया तेथें काय आणिकांची भीड ॥४॥

॥ ४४८९ ॥

सांडुनी वैकुंठ । उभा विटेवरी नीट ॥१॥ आला आला रे जगजेठी । भक्ता पुंडलिकाचे भेटी ॥ २॥ पैल चंद्रभागे तिरीं । कट धरूनिया करीं ॥ ३ ॥ तुकयाबंधु ह्मणे अंबर । गजर होतो जयजयकार ॥४॥

॥ ४४९० ॥

कृपाळू भक्तांचा । ऐसा पति गोपिकांचा ॥ १ ॥ उभा न पाचारितां दारीं । न सांगतां काम करी ॥२॥ भाव देखोनि निर्मळ । रजां वोडवी कपाळ ३ तुकयाबंधू ह्मणे न भजा । कां रे ऐसा भोळा राजा ॥४॥

॥ ४४९१ ॥

केला अंगीकार पंढरीच्या देवें । आतां काय करितील काळ मशक मानवें ॥ १ ॥ घातलीं बाहेर तीं भय होतें ज्यानें । बैसला आपण तेथें घालुनिया ठाणें ॥ २ ॥ लागों नेदी वारा दुजियाचा अंगासी । हा पुरता निर्धार कळों आला आह्मांसी ॥ ३ ॥ ह्मणे तुकयाबंधू नलगे करावी चिंता । कोणेविशीं आतां बैसलों हस्तीवरी माथा ॥ ४ ॥

कान्होबा देवाशीं बोलले ते अभंग.

॥ ४४९२ ॥

अगोचरी बोलिलों आह्मेविण आगळें । परी तें आतां न संडावें राउळें ॥ १ ॥ जाईल रोकडा बोल न पुसती आह्मां । तुझा तुझें ह्मणविलें पाहा पुरुषोत्तमा ॥ २ ॥ न व्हावा न वजाचा न कळतां अन्याय । न धरावें तें मनीं भलता करा उपाय ३ ह्मणे तुकयाबंधु हीन मी ह्मणोनि लाजसी । वारा लागों पाहातोहे उंच्या झाडासीं

॥ ४४९३ ॥

उदार कृपाळ सांगसी जना । तरी कां त्या रावणा मारियेलें ॥ नित्य नित्य पूजा करी श्रीकमळीं । तेणें तुझें काय केलें ॥ १ ॥ काय बडिवार सांगसी वाया । ठावा पंढरिराया आहोसि आम्हां ॥ एकलाचि : री देऊं परिहार । आहे दुरिवरी सीमा ॥ २ ॥ कर्णा-ऐसा वीर उदार झुंझार । तो तुवां जर्जर केला बाणीं ॥ पडिला भूमी परी नयेचि करुणा । दांत पाडियेले दोन्ही ॥ ३ ॥ श्रियाळ बापुडे सात्विकवाणी । खादलें कापूनि त्याचें पोर ॥ ऐसा कठिण कोण होईल दुसरा । उखळीं कांडाविलें शिर ॥ ४ ॥ शिबी चक्र-वर्ती करितां यज्ञयाग । त्याचें चिरिलें अंग ठायीं ठायीं ॥ जाचउनि प्राण घेतला मागें । पुढें न पाहतां कांहीं ॥ ५ ॥ बळीचा अन्याय सांग होता काय । बुडविला तो पाय देउनि माथां ॥ कोंडिलें द्वार हा काय कहार । सांगतोसी चित्र कथा ॥ ६ ॥ हरिश्चंद्राचें राज्य घेउनिया सर्व । विकाविला जीव डोंबाघरीं ॥ पाडिला विघड नळा-दमयंतीमधीं । ऐसी तुझी बुद्धि हरि ॥ ७ ॥ आणिकही गुण सां-गावे किती । केलिया विपत्ति माउसीच्या । वधियेला मामा सखा पुरुषोत्तमा । ह्मणे बंधु तुकयाचा ॥ ८ ॥

॥ ४४९४ ॥

मरोनि जाईन गुणनामावरूनी । तुझ्या चक्रपाणी मायबापा ॥ १ ॥ चुकविलीं दुःखें मायेचा वोळसा । तोडोनिया आशापाश तेणें ॥२॥ केली काया ततु हिंवसी शीतळ । चिंता तळमळ नाहीं ऐसी ॥ ३ ॥ काळें तोंड काळ करूनि राहिलें । भूतमात्र जालें सज्जनसखें ॥ ४ ॥ तुकयाबंधु ह्मणे अवघ्या दशदिशा । मुक्त रे परेशा तुझ्या पुण्यें ५॥

॥ ४४९५ ॥

तुम्हांआम्हांसी दरुषण । जालें दुर्लभ भाषण ॥१॥ ह्मणऊनि करितों आतां । दंडवत घ्या समस्ता २ भविष्याचे माथा देह । कोण जाणे होईल काय ॥३॥ ह्मणे तुकयाचा बांधव । आमचा तो जाला भाव ४॥

॥ ४४९६ ॥

कोण या पुरुषार्थाची गति । आणियेला हातोहातीं । जाहाज पृथ्वीपति । केली ख्याती अद्भुत ॥१॥ भला पुंडलिका भला । महि-मा नव जाये वर्णिला । दगा देउनि अचपियांला । सांठविलें अधिनाश२ केलें एक घरीं केणें । भरलीं सदोदित दुकानें । दुमदुमिलीं सुखानें । हे भाग्याची पंढरी ॥३॥ तुकयाबंधु ह्मणे किल्या । संताच्या हातीं दिल्या । आंगावेगळें आपुल्या । टाकुनि जाला मदिमान ॥ ५ ॥

॥ ४४९७ ॥

चवदा भुवनें लोक तिन्हीं दाढे जो कवळी । संपुष्ट संबळीमध्यें देखा ॥ १ ॥ उत्पत्तीसंहार करिता जो पाळण । तो नंदा नंदन म्हणवीतसे ॥ २ ॥ असुर तोडरी दैत्यांचा काळ । झाला द्वारपाळ बळीचा तो३ लक्ष्मीचा स्वामी क्षीराच्या सागरा। उच्छिष्ट कवळा पसरी मुख ४ तुकयाबंधु ह्मणे चतुराचा रावो । भावें तो पाहा हो केला वेडा५

॥ ४४९८ ॥

चित्तीं बैसलें चिंतन । नारायण नारायण ॥ १ ॥ नलगे गोड कांहीं आतां । आणीक दुसरें सर्वथा ॥ २ ॥ हरपला द्वैतभाव । तेणें देह जाला वाव॥३॥तुकयाबंधु ह्मणे आह्मी ।जालों निष्काम ये कामीं ४॥

॥ ४४९९ ॥

व्यापिलें सर्वत्र । बाहेरी भीतरी अंतर ॥१॥ ऐसें गोविंदें गोविलें । बोलें न वजाये बोलिलें ॥ २ ॥ संचिताची होळी । करूनि जीव घेतला बळी ३ तुकयाबंधु ह्मणे नाहीं । आतां संसारा उरी कांहीं४॥

॥ ४५०० ॥

केली हार्णीळां अंघोळी। येऊनि बैसलों राऊळीं १ आजिचें झालें भोजन। राम कृष्ण नारायण २ तुकयाबंधु ह्मणे नास। नाहीं कल्पांतीं जयास ३

॥ ४५०१ ॥

अनंतजन्में जरी केल्या तपरासी । तरी हा न पवसी ह्मणे देह १ ॥ ऐसें जें निधान लागलेंसें हातीं । त्याची केली माती भाग्यहीना २॥ उत्तमाचें सार वेदाचें भांडार । ज्याच्यानें पवित्र तीर्थें होतीं ॥ ३ ॥ ह्मणे तुकयाबंधु आणीक उपमा । नाहीं या तो जन्मा द्यावयासी ४॥

॥ ४५०२ ॥

राम म्हणतां कामक्रोधाचें दहन । होय अभिमान देशधडी ॥ १ ॥
रामें म्हणतां कर्म तुटेल भवबंधन । नये श्रम सीण स्वप्नामाजी २॥
राम म्हणतां जन्म नाहीं गर्भवास । नव्हे दारिद्र्यास पात्र कधीं ३॥
राम ह्मणतां यम शरणागत बापुडें । आढळपद पुढें काय तेथें ॥ ४ ॥
राम म्हणतां धर्म घडती सकळ । तिमिरपडळ नासे हेळीं ॥ ५ ॥
राम म्हणतां ह्मणे तुकयाचा बंधू। तरिजेल भवसिंधु संदेह नाहीं ६॥

॥ ४५०३ ॥

तट्टाचे जातीला नाहीं भीड भार । लाता मारी थोर लहान नेणें ॥१॥
परी त्या विशेष मनुष्य होऊनि । करी खंड मान वडिलांचा ॥ २ ॥
बेरसा गाढव माय ना बहिण । भुंकें चवीविण भलतेंचि ॥ ३ ॥
तुकयाबंधु म्हणे बोकड मातलें । न विचारी आपुलें तोंडीं मुतें ४॥

॥ ४५०४ ॥

मायझवा खर गाढवाचें बीज । तें ऐसें सहज कळों येतें १ अपमानिलें जेणें श्रेष्ठाचें वचन । तेंचि त्याची खूण ओळखावी २ मद्यपि तो

पुरा अधम यातीचा । तया उपदेशाचा राग याया ॥ ३ ॥ तुकया बंधु म्हणे पिसाळलें सुनें । आपपर तेणें न विचारावें ॥ ४ ॥

॥ ४५०५ ॥

हम उदास तीन्हके सुनाहो लोकां । रावन मार बिभीषण दिई लंका१
गोवरधन नखपर गोकुल राखा । बर्सन लागा जब मेहु फत्तरका२
वैकुंठनायक काल कौंसासुरका । दैत डुबाय सब मंगाय गोपिका३
स्तंभ फोड पेट चिरीया कश्यपका।प्रल्हादके लिये कहे भाई तुकयाका४

॥ ४५०६ ॥

चुराचुराकर माखन खाया । गौळनीका नंद कुमर कनइया ॥ १ ॥
काहे बराई दिखावत मोहि । जानतहुं प्रभुपना तेरा सब हि ॥ २ ॥
और बात सुन उखलसुं गला । बांधलिया आपना तूं गोपाला ३ ॥
फेरत बनबन गाऊं धरायत । कहे तुकयाबंधु लकरी लेले हात ४

॥ ४५०७ ॥

मत्स्यकूर्मशेषा कोणाचा आधार । पृथिवीचा भार वाहावया ॥१॥
काय धाक आह्मां कासयाची चिंता । ऐसा तो असतां साह्यकारी२
शंखचक्रगदा आयुधें अपार । वागवितो भार भक्तांसाठीं ॥ ३ ॥
पांडवा जोहरीं राखिलें कुसरी । तो हा बंधूचा कैवारी तुकयाच्या४

॥ ४५०८ ॥

न गमे न गमे न गमे हरिविण । न गमे न गमे न गमे मेळवा शाम कोणी गे ॥ १ ॥ तळमळ करी तैसा जीव जळाविण मासा । दिसती दिशा ओस यो ॥ २ ॥ नाठवे भूक तान विकळ जालें मन । घडी जाय प्रमाण जुगा एकी यो ॥ ३ ॥ जरी तुम्ही मेळवा सांगतों ऐका । तुकयाबंधूचा सखा जगजीवन ॥ ४ ॥

॥ ४५०९ ॥

नमस्कारी भूतें विसरोनि याती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥१॥
परउपकारीं वेचियेल्या शक्ती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥२॥
द्वैताद्वैतभाव नाहीं जया चित्तीं । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥३॥
जयाचिये वाचे नये निंदास्तुती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ४॥
उचित अनुचित जाणे धर्मनीती । दृढ भाव भक्ति मानव तो ॥ ५ ॥
तुकयाबंधु ह्मणे वरकड ते येर । संसाराचें खर भार वाही ॥ ६ ॥

॥ ४५१० ॥

विठ्ठला रे तुज वर्णितां गुणवाद । विठ्ठला रे दग्ध जालीं पापें १ ॥
विठ्ठला रे तुझें पाहातां श्रीमुख । विठ्ठला रे सुख जालें नयना २॥
विठ्ठला रे तुज देतां आलिंगन । विठ्ठला तनमन निवाल्या बाह्या ३
विठ्ठला रे तुझी ऐकतां कीर्ति । विठ्ठल हे विश्रांति पावले स्मरणें४
विठ्ठला रे तुकयाबंधु ह्मणे देहभाव । विठ्ठला जीवीं पाव धरितां गेला५

॥ ४५११ ॥

आकारवंत मूर्ति । जेव्हां देखेन मी दृष्टी १ मग मी राहेन निवांत । ठेवूनिया तेथें चित्त ॥ २ ॥ श्रुति वाखाणिती । तैसा येसील प्रचिती ॥ ३ ॥ ह्मणे तुकयाचा सेवक । उभा देखेन सन्मुख ॥ ४ ॥

॥ ४५१२ ॥

उठा भागलेती उजगरा । जाला स्वामी निद्रा करा ॥१॥ वाट पाहाते रुक्मिणी । उभी मंचक सावरूनी ॥ २ ॥ केली करा क्षमा । बडबड पुरुषोत्तमा ॥ ३ ॥ लागतो चरणा । तुकयाबंधु नारायणा ॥ ४ ॥

॥ ४५१३ ॥

कंसरायें गर्भ वधियेले सात । म्हणोनि गोकुळासी आले अनंत । घ्यावया अवतार झालें हेंचि निमित्त । असुर संहारुनी तारावे भक्त ॥ १ ॥ जय देव जय देव जय विश्वरूपा । श्रीविश्वरूपा । ओवाळीन तुज देहदीपें बापा २ स्थूळरूप होउनि धरिलसें सानें । जैसा भाव तैसा तयांकारणें । दैत्यांसी भा ला सिंह गजानें । काळासी महाकाळ यशोदेसी तान्हें ३ अनंत वर्णी कोणा न कळेचि पार । सगुण कीं निर्गुण हाही निर्धार । पांगलीं साही अठरा करितां वेव्हार । तो बळितसे गौळियाचें खिल्लार ॥४॥ तेहतीस कोटि तिहीं देवांसी श्रेष्ठ । पाउलें पाताळीं स्वर्गी मुगुट । गिळिलीं चौदा भुवनें तरि न भरेचि पोट । तो खाउन धाला गोपाळांचें उच्छिष्ट ५ महिमा वर्णू तरि पांगलिया श्रुति । सिणला शेष चिरल्या जिव्हा करितां स्तुति । भावेंविण कांहीं न चलेचि युक्ति । राखें शरण तुकयाबंधु करी विनंती ॥ ६ ॥

॥ ४५१४ ॥

*सकुमार मुखकमळ निजसारनिर्मळ । सांवळी सुनीळ तनु भ्रमरांग कुरळ । झळकति दिव्य तेजें दंत माज पातळ । मिरवलि मयूरपत्रें मुगुट कुंडलें माळ ॥ १ ॥ जय देवा जगदीश्वरा । धन्य रखुमाईवरा । आरती करीन काया । ओंवाळीन सुंदरा ॥२॥ गोजिरे ठाणमान भुजा मंडित चारी । शोभती शंख चक्र गदा पद्म मोहरी । हृदयीं ब्रह्मपद बाणलें शृंगारी । गर्जती चरणीं वांकी कंठ कोकिळस्वरीं ॥ ३ ॥ घवघवित उटी अंगीं बावन चंदनाची । ललाटीं कस्तुरीचा कास पितांबराची । कटिसूत्र वरि साजिरें प्रभा वर मोतियांची । संगीत सकळ मुद्रा पाउलें कुंकुमाचीं ॥ ४ ॥ सौभाग्यसुखसागर गुणलावण्यखाणी । लाघवी दीनवत्सल विश्व लाविलें ध्यानीं । आश्चर्य देव करिती ऋषि राहिले मुनि । धन्य ते प्रसवली देखिया नंदपत्नी ॥ ५ ॥ वर्णितां ध्यान महिमा श्रुति

राहिल्या नेति । रविकोटि चंद्र तारा प्रकाशा न तुळती । उदार सुर गंभीर पूर्ण आनंदमूर्ति । तुकयाबंधू ह्मणे स्तवूं मी काय किती ६

॥ ४५१५ ॥

परमानंदा परमपुरुषोत्तमरामा । अच्युता अनंता हरि मेघश्यामा । अविनाशा अलक्षा परता परब्रह्मा । अकळकळा कमळापति न कळे महिमा ॥१॥ जय देव जय देव जय जी श्रीपति । मंगळशुभदायका करीन आरती ॥ २ ॥ गोविंदा गोपाळा गोकुलरक्षणा । गिरिधरकर भवसागरतारका दधिमथना । मधुसूदन मुनिजीवन धरणीश्रम-हरणा । दीनवत्सल सकळां मूळ जय जय निधाना ३ विश्वंभरा सर्वे-श्वरा जगदाधारा । चक्रधर करुणाकर पावन गजेंद्रा । सुखसागर गुणआगर मुगुटमणी शूरा । कल्याणकैवल्यमूर्ती मनोहरा ४ गरुडा-सना शेषशयना नरहरी । नारायणा ध्याना सुरवरहरगौरी । नंदा नंदनवंदन त्रिभुवनाभीतरी । अनंतनामीं ठसा आवतारांवरी ५ सगुण निर्गुणसाक्ष श्रीमंत संतां । भगवाना भगवंता कालकृतांता । उत्पत्ति-पालनापासून संहारणसत्ता । शरण तुकयाबंधू तारीं रीती बहुतां ६॥

स्फुट अभंग.

[मागील प्रकरणीं घालावयाचे राहिले ते अभंग.]

॥ ४५१६ ॥

नमोनमो तुज माझें हें कारण । काय जालें उणें करितां स्नान ॥१॥
संतांच्या मारग चालतों झाडूनि । हो कां लाभ हानि कांहींतरी २॥
न करिसी तरी हेंचि कोडें मज । भक्ति गोड काज आणीक नाहीं ३
करीं सेवा कथा नाचेन रंगणीं । प्रेमसुखधणी पुरेल तों ॥ ४ ॥
महाद्वारीं सुख वैष्णवांचे मेळीं । वैकुंठ जवळी वसे तेथें ॥ ५ ॥
तुका ह्मणे नाहीं मुक्तिसवें चाड । हेंचि जन्म गोड घेतां मज ॥ ६॥

॥ भेटीचा अभंग–४५१७ ॥

कधीं कृपा करिसी नेणें । मज दीनाचें धांवणें ॥ १॥ भेटीलागीं पंढरीनाथा । जीवीं लागली तळमळ व्यथा ॥ २॥ सिणलें माझें मन । वाट पाहतां लोचन ॥ ३ ॥ तुका ह्मणे लागली भूक । तुझें पहावया श्रीमुख ॥ ४ ॥

॥ देवाशीं सलगीचीं भाषणें–४५१८ ॥

वर्णूं महिमा ऐसी नाहीं मज वाचा । न बोलवे साचा पार तुझा १
ठायींची हे काया ठेविली चरणीं । आतां ओवाळुनि काय सांडूं २॥
नाहीं भाव ऐसा करूं तुझी सेवा । जीव वाहूं देवा तोही तुझा ३॥
मज माझें कांहीं न दिसे पाहातां । ते तुज अनंता समर्पावें ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां नाहीं मज थार । तुझे उपकार फेडावया ॥ ५ ॥

॥ ४५१९ ॥

हे माझी मिराशी । ठाव तुझ्या पायांपाशीं ॥ १ ॥ याचा करीन अभिमान । करीन आपुलें जतन ॥ २ ॥ देऊनिया जीव । बळिलें साधिला हा ठाव ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । जुनाट हे माझी सेवा ४

॥ ४५२० ॥

दीनानाथा तुझीं ब्रिदें चराचर । घेसील कैवार शरणागता ॥ १ ॥
पुराणीं जे तुझे गर्जती पवाडे । ते आह्मां रोकडे कळों आले ॥ २ ॥
आपुल्या दासांचें न साहासी उणें । उभा त्याकारणें राहिलासी ३
चक्र गदा हातीं आयुधें अपार । न्यून तेचीं पुरें करूं धांवे ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुज भक्तींचें कारण । करावया पूर्ण अवतार ॥ ५ ॥

॥ ४५२१ ॥

तुह्मां ठावा होता देवा । माझे अंतरींचा हेवा ॥ १ ॥ होती काशानें सुटका । तारी हे वैकुंठनायका ॥२॥ नसते सांभाळिले । जरि तुह्मी आश्वासिलें ॥३॥ तुका ह्मणे कृपाळुवा । बरवा केला सावाधावा ४॥

॥ ४५२२ ॥

कोण जाणे कोणा घडे उपासना । कोण या वचनाप्रति पावे ॥ १ ॥
आतां माझा श्रोता वक्ता तूंचि देवा । करावी ते सेवा तुझीच म्यां २
कुशळ चतुर येथें न सरते । करितील रितें तर्क मतें ॥ ३ ॥
तुका ह्मणे केणें झालें एके घरीं । मज आणि हरी तुम्हां गांठी ॥४॥

॥ ४५२३ ॥

करिसी तें देवा करीं माझें सुख । परी मी त्यासी मुख न ह्मणे संत १
जया राज्य द्रव्य करणें उपार्जना । यश दंभमाना इच्छे झाले ॥ २ ॥
जगदेव परी निवडीन निराळे । ज्ञानाचे आंधळे भार वाही ॥ ३ ॥
तुका ह्मणे भय न धरी मानसीं । येशियाचे विशीं करितां दंड ॥४॥

॥ ४५२४ ॥

दीप घेउनिया धुंडिती अंधार । भेटे हा विचार अघटित ॥ १ ॥
विष्णुदास आम्ही न भ्यों कळिकाळा । भुलों मृगजळा न घडे तें ॥२॥
उघळितां माती रविकळा मळे । हें कैसें न कळे भाग्यहीना ॥ ३ ॥
तुका ह्मणे तृणें झांके हुताशन । हें तंव वचन वाउगेंचि ॥ ४ ॥

॥ ४५२५ ॥

बोलिलों तें आतां पाळावें वचन । ऐसें पुण्य कोण माझे गांठीं ॥ १ ॥
जातों आतां आज्ञा घेऊनिया स्वामी । काळक्षेप आह्मी करूं कोठें २
न घडे यावरी न धरवे धीर । पीडतां राष्ट्र देखोनी जग ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुम्ही दिलें मोकलिलें । काय आतां आलें जीवीत्वाचें ४

॥ ४५२६ ॥

दिनदिन शंका वाढे । आयुष्य नेणवतां गाढे ॥ १ ॥ कैसीं भुललीं बापुडीं । दंभविषयांचे सांकडीं ॥ २ ॥ विसरला मरण । त्याची नाहीं आठवण ॥ ३ ॥ देखत देखत पाहीं । तुका ह्मणे आठव नाहीं ॥४॥

॥ ४५२७ ॥

करविली तैसी केली कटकट । वांकडें कीं नीट देव जाणे ॥ १ ॥
कोणाकारणें हें झालेंसे निर्माण । देवाचें कारण देव जाणे ॥ २ ॥
तुका ह्मणे मी या अभिमाना वेगळा । घालूनी गोपाळा भार असें ॥ ३ ॥

॥ ४५२८ ॥

आमचा विनोद तें जगा मरण । करिती भावहीन देखोवेखी ॥ १ ॥
न कळे संतत हिताचा विचार । तों हे दारोदार खाती फेरे ॥ २ ॥
वंदिलें वंदावें निंदिलें निंदावें । एक गेलें जावें त्याचि वाटा ॥ ३ ॥
तुका ह्मणे कोणी नाइके सांगतां । होती यमदूता वरपडे ॥ ४ ॥

॥ ४५२९ ॥

न संडी अवगुण । वर्में मानीतसे सिण ॥ १ ॥ भोग देतां करिती काई । फुटतां यमदंडें डोई ॥ २ ॥ पापपुण्य झाडा । देतां तेथें मोठी पीडा ॥ ३ ॥ तुका ह्मणे बोला । माझ्या सिणती विठ्ठला ॥ ४ ॥

॥ देवापाशीं मागणें—४५३० ॥

कंठीं राहो नाम । अंगीं भरोनिया प्रेम ॥ १ ॥ ऐसें द्यावें कांहीं दान आलों पतित शरण ॥ २ ॥ संतांचिये पायीं । वेळोवेळां ठेवीं डोई ॥ ३ ॥ तुका ह्मणे तरे । भवसिंधु एका सरे ॥ ४ ॥

॥ ४५३१ ॥

रणीं निघतां शूर न पाहे माघारें । ऐसा मज धीरे राख आतां ॥ १ ॥
संसारा हातीं अंतरलों दुरी । आतां कृपा करीं नारायणा ॥ २ ॥
वागवितों तुझिया नामाचें हत्यार । हाचि बडिवार मिरवितों ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज फिरतां माघारें । तेथें उणें पुरें तुम्ही जाणा ॥ ४ ॥

॥ देवाशीं प्रेमाचें भांडण—४५३२ ॥

जाणोनी अंतर । टाळिसील करकर ॥ १ ॥ तुज लागली हे खोडी । पांडुरंगा बहु कुडी ॥ २ ॥ उठविसी दारीं । धरणें एखादिया परी ॥ ३ ॥ तुका ह्मणे पाय । कैसे सोडीन तें पाहें ॥ ४ ॥

॥ ४५३३ ॥

मागत्याची टळाटाळी । झिझ्या वोढूनि कपाळीं ॥ १ ॥ ऐसा तंव मोळा । तुमचा नसेल गोपाळा ॥ २ ॥ नसेल ना नवे । ऐसे धरियेले देवें ॥ ३ ॥ तुका ह्मणे झाला । उशीर नाहीं तो विठ्ठला ॥ ४ ॥

॥ स्थितिपर—४५३४ ॥

उपास करार्डी । तिहीं करावीं बापुडीं ॥ १ ॥ आह्मी विठोबाचे

दास । चिंता उगारिली आस ॥ २ ॥ भक्तीच्या उत्कर्षें । नाहीं मुक्तीचें तें पिसें ॥३॥ तुका ह्मणे बळ । अंगीं आमुच्या सकळ ॥४॥

॥ ४५३५ ॥

न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो १॥ ऐसी माझी वाचा मज उपदेशी । आणीक लोकांसी हेंचि सांगे २॥ विटंबो शरीर होत कां विपत्ती । परि राहो चित्तीं नारायण ॥३॥ तुका ह्मणे नाशिवंत हें सकळ । आठवे गोपाळ तेंचि हित ॥ ४ ॥

॥ ४५३६ ॥

तिहीं त्रिभुवनीं । आह्मी वैभवाचे धनी १ हातां आले घाव डाव । आमचा मायबाप देव ॥ २ ॥ काय त्रिभूवनीं बळ । अंगीं आमुच्या सकळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे सत्ता । अवघी आमुचीच आतां ॥ ४ ॥

॥ ४५३७ ॥

रवि रश्मिकळा । नये काढितां निराळा ॥१॥ तैसा आह्मां झाला भाव । अंगीं जडोनि ठेला देव ॥२॥ गोडी साकरेपासूनी । कैसी निवडतों दोन्ही ॥३॥ तुका ह्मणे नाद उठी । विरोनि जाय नभा पोटीं ४॥

॥ ४५३८ ॥

नव्हे सुख मज न लगे हा मान । न राहे हें जन काय करूं ॥ १ ॥ देहउपचारें पोळतसे अंग । विषतुल्य चांग मिष्टान्न तें ॥ २ ॥ नाइकवे स्तुति वाणितां थोरीव । होतो माझा जीव कासावीस ३॥ तुज पावे ऐसी सांग कांहीं कळा । न करो मृगजळा गोवूं मज ॥ ४ ॥ तुका ह्मणे आतां करीं माझें हित । काढावें जळत आगींतूनि ॥५॥

॥ ४५३९ ॥

नटनाट्य अवघें संपादिलें सांग । भेद दाऊं रंग न पालटे ॥ १ ॥ मांडियेला खेळ कौतुकें बहुरूप । आपुलें स्वरूप जाणतसों ॥ २ ॥ स्फटिकाची शिळा उपाधि न मिळे । भाव दावी पिवळे लाल संगे ३ तुका ह्मणे आह्मी या जना विरहित । होउनि निश्चिंत क्रीडा करूं ४

॥ ४५४० ॥

असें येथीचिया दीनें । भाग्यहीन सकळां ॥१॥ भांडवल पदरीं गांठीं । नाम कंठीं धरियेलें ॥ २ ॥ आणीक तें दुजें कांहीं । मज नाहीं यावरी ॥ ३ ॥ तुका म्हणे केला कोणें । पवाडा नेणें लौकिक ॥ ४ ॥

॥ ४५४१ ॥

कांहींच मी नव्हे कोणिये गांवींचा । एकटा ठायींचा ठायीं एक १॥ नाहीं जात कोठें येत फिरोनिया । अवघेंचि वायांविण बोले ॥२॥ नाहीं मज कोणी आपुलें दुसरें । कोणाचा मी खरें कांहीं नव्हे ३॥ नाहीं आह्मां ज्यावें मरावें लागत । आहों अखंडित जैसे तैसे ॥४॥ तुका ह्मणे नांव रूप नाहीं आह्मां । वेगळा त्या कर्मा अकर्मासी ५॥

॥ ४५४२ ॥

ठेविलें जतन । करूनिया निज धन ॥ १ ॥ जयापासाव उत्पत्ति । तें हें बीज धरिलें हातीं ॥ २ ॥ निवडिलें वरळा भूस । सार आइन जिन्नस ॥ ३ ॥ तुका ह्मणे नारायण । भाग संचिताचा गुण ॥ ४ ॥

॥ ४५४३ ॥

साधनांच्या कळा आकार आकृति । कारण नवनीतीं मथनाचें १ ॥ पक्षियासी नाहीं मारगीं आडताळा । अंतरिक्षीं फळासीचि पावे २ भक्तीची जोडी ते उखत्याचि सांटीं । उणें पुरें तुटीं तेथें नाहीं ३ ॥ तुका ह्मणे आलें सांचत सांचणी । आजी झाली धणी एकसरें ४ ॥

॥ ४५४४ ॥

पडली घोर रजनी । संगी कोणी नसेचि १ पाहा हो कैसें चालविलें । पिसें गोवलें लावूनी ॥२॥ कोठें लपविलें तें अंग । होता संग दिला तो ॥३॥ मज कधीं नव्हतें ठावें । दोहीं भावें वाटोळें ॥ ४ ॥ तुका ह्मणे कैंची उरी । दोहीपरी नाडिलें ॥ ५ ॥

॥ ४५४५ ॥

नाहीं येथें वाणी । सकळां वर्णीं घ्यावी धणी ॥१॥ झालें दर्पणाचें अंग । ज्याचा त्यासी दावी रंग ॥ २ ॥ एका भावाचा एकांत । पीक पिकला अनंत ॥३॥ तुका खेळ दार्णीं । करी बैसोनी वांटणी ॥ ४ ॥

॥ ४५४६ ॥

मीचि मज व्यालों । पोटा आपुलिया आलों ॥ १ ॥ आतां पुरले नवस । निरसोनी गेली आस ॥ २ ॥ झालों बरा बळी । गेलों मरोनी ते काळीं ॥ ३ ॥ दोहींकडे पाहे । तुका आहे तैसा आहे ॥ ४॥

॥ संतपर—४५४७ ॥

हरिकथेवांचून इच्छिती स्वहित । हरिजन चित्त न घाला तेथें १॥ जाईल भंगोन आपुला विश्वास । होईल या नास कारणांचा २ ॥ ज्याचिया बैसावें भोजनपंगती । त्याचिया संगती तैसें खावें॥ ३ ॥ तुका ह्मणे काय जालेती जाणते । देवा ही परते थोर तुह्मी ॥ ४ ॥

॥ कीर्तनपर—४५४८ ॥

प्रेम अमृताची धार । वाहे देवा ही समोर ॥ १ ॥ ऊर्ध्ववाहिनी हरिकथा । मुगुटमणि सकळां तीर्थां ॥२॥ शिवाचें जीवन । जाळी महादोष कीर्तन ३ तुका म्हणे हरि । इची स्तुति वाणी थोरी ४ ॥

॥ ४५४९ ॥

हरिकथे नाहीं । विश्वास ज्याचे ठायीं ॥ १ ॥ त्याची वाणी अमंगळ । कान उंदराचें बीळ ॥ २ ॥ सांडुनी हा रस । करिती आणीक सायास ॥ ३ ॥तुका ह्मणे पीसीं । वाया गेलीं किती ऐसीं ॥ ४ ॥

॥ उपदेशपर—४५५० ॥

आह्मी तेणें सुखी । ह्मणा विठ्ठल विठ्ठल मुखीं ॥१॥ तुमचें येर वित्त धन । तें मज मृत्तिकेसमान २ कंठीं मिरवा तुळसी । व्रत करा एकादशी ३ ह्मणवा हरीचे दास । तुका ह्मणे मज हे आस ॥ ४ ॥

॥ ४५५१ ॥

बोलावा विठ्ठल पाहावा विठ्ठल । करावा विठ्ठल जीवभाव ॥ १ ॥
येणें सोसें मन झालें हांवभरी । परती माघारी घेत नाहीं ॥ २ ॥
बंधनापासूनी उकलली गांठी । देतां आली मिठी सावकाशें ॥ ३ ॥
तुका ह्मणे देह भरिला विठ्ठलें । कामक्रोध केलें घर रितें ॥ ४ ॥

॥ ४५५२ ॥

आणीक काळें न चले उपाय । धरावे ते पाय विठोबाचे ॥ १ ॥
अवघेंचि पुण्य असे तया पोटीं । अवघिया तुटी होय पापा ॥ २ ॥
अवघें मोकळें अवघिया काळें । उद्धरती कुळें नरनारी ॥ ३ ॥
काळ वेळ नाहीं गर्भवासदुःखें । उच्चारितां मुखें नाम एक ॥ ४ ॥
तुका ह्मणे कांहीं न लगे सांडावें । सांगतसें भावें घेती तया ॥ ५ ॥

॥ ४५५३ ॥

बहुतां छंदानें बहु वसे जन । नये वांटूं मन त्याच्या संगें ॥ १ ॥
करावा जतन आपुला विश्वास । अंगा आला रस आवडीचा ॥२॥
सुखांची समाधि हरिकथा माउली । विश्रांति साउली सिणालियांची ३
तुका म्हणे बुडे बांधोनी दगड । तेथें काय कोड धांवायाचें ॥ ४ ॥

॥ ४५५४ ॥

भ्रमणा पाउलें वेचिलीं तीं वाव । प्रवेशतां ठाव एक द्वार ॥ १ ॥
सार तीं पाउलें विठोबाचीं जीवीं । कोणी न विसंबावीं क्षणभरी २
सुलभ हें केलें सकळां जीवन । फुंकावेंचि कान न लगेसें ॥ ३ ॥
तुका ह्मणे येथें सकळही कोड । पुरे मूळ खोड विस्ताराचें ॥ ४ ॥

॥ ४५५५ ॥

कांहीं जाणों नये पांडुरंगाविण । पाविजेल सीण संदेहानें ॥ १ ॥
भलतिया नांवें आळविला पिता । तरी तो जाणता कळवळा ॥ २ ॥
अलंकार जातो गौरवितां वाणी । सर्व गात्रां धणी हरिकथा ॥ ३ ॥
तुका ह्मणे उपजे विल्हाळें आवडी । करावा तो घडीघडी लाहो ४॥

॥ ४५५६ ॥

दाता तो एक जाणा । नारायण स्मरवी ॥ १ ॥ आणीक नाशिवंतें काय । न सरे हाय ज्यांच्यानें ॥ २ ॥ यावें तया काकुलती । जे दाविती सुपंथ ॥ ३ ॥ तुका ह्मणे उरी नुरे । त्याचे सरे उपकार ॥४॥

॥ ४५५७ ॥

जग अवघें देव । मुख्य उपदेशाची ठेव ॥ १ ॥ आधीं आपणया

नासी । तरी उतरे ये कर्सी ॥ २ ॥ ब्रह्मज्ञानाचें कोठार । तें हें निश्चयें उत्तर ॥३॥ तुका ह्मणे ते उन्मनीं । नाश कारया कारणीं४॥

॥ ४५५८ ॥

नाहीं विचारीत । मेघ हगणदारी सेत ॥ १ ॥ नये पाहों त्याचा अंत । ठेवीं कारणापें चित्त ॥ २ ॥ वर्जीत गंगा । नाहीं उत्तम अधम जगा ॥ ३ ॥ तुका ह्मणे मळ । नाहीं अग्नीसी विटाळ ॥ ४ ॥

॥ ४५५९ ॥

गुळ सांडुनि गोडी घ्यावी । मीठ सांडुनि चावि चाखावी ॥ १ ॥ ऐसा प्रपंच सांडुनि द्यावा । मग परमार्थ जोडावा ॥२॥ साकरेचा नव्हे ऊंस । आम्हां कैचा गर्भवास ॥ ३ ॥ बीज भाजुनि केली लाही । जन्ममरण आम्हां नाहीं ॥४॥ आकारासी कैचा ठाव । देह प्रत्यक्ष जाला वाव ५ तुका म्हणे अवघें जग । सर्वां घटीं पांडुरंग ६॥

॥ ४५६० ॥

भुंकतीं तीं द्यावीं भुंकों । आपण त्यांचे नये शिकों ॥ १ ॥ भाविकांनीं दुर्जनाचें । मानूं नये कांहीं साचें ॥२॥ होइल तैसें बळ । फजीत करावे ते खळ ॥३॥ तुका ह्मणे त्यांचें । पाप नाहीं ताडणाचें ४॥

॥ ४५६१ ॥

ह्मणवितो ऐसे आइकतों संत । न देखिजे होत डोळां कोणी ॥ १ ॥ ऐसियांचा कोण मानितें विश्वास । निवडे तो रस घाईडाई ॥ २ ॥ पर्जन्याचे काळीं वोहाळाचें नद । ओसरतां बुंद न थारेचि ॥ ३ ॥ हिऱ्या ऐशा गारा दिसती दुरोन । तुका ह्मणे घन न भेटे तों ॥ ४॥

॥ ४५६२ ॥

अंगीं देवी खेळे । कां रे तुह्मांसी न कळे । कोणाचें हें चाळे । सुख दुःख न मानितां ॥ १ ॥ मी तों आतां येथें नाहीं । ओळखी वचनाच्या ठायीं । पालटाचा घेई । भाव खरें लोपे ना ॥ २ ॥ आपुलाले तुम्ही पुसा । सोवा पळ्याच सारिसा । स्थिरावल्या कैसा । काय जाणों विचार ॥ ३ ॥ तुका ह्मणे लाभकाळ । तेथें नसावें शातिळ । मग तैशी वेळ । कोठे जाते सांपडों ॥ ४ ॥

॥ ४५६३ ॥

जप करितां राग । आला जवळी तो मांग ॥ १ ॥ नको भोवताले जगीं । पाहों जवळी राख अंगीं ॥ २ ॥ कुड्याची संगती । सदा भोजन पंगती ॥ ३ ॥ तुका ह्मणे ब्रह्म । साधी विरहित कर्म ॥ ४ ॥

॥ ४५६४ ॥

तामसाचीं तपें पापाची सिदोरी । तमोगुणें भरी घातले ते ॥ १ ॥ राज्यमदा आड सुखाची संपत्ति । उलंघूनी जाती निरयगांवा २॥ इंद्रियें दमिलीं इच्छा जीती जीवीं । नागविती ठावीं नाहीं पुढें ३॥ तुका ह्मणे हरिभजनावांचून । करिती तो सीण पाहों नये ॥ ४ ॥

॥ ४५६५ ॥

फिरंगी वाखर लोखंडाचे विळे । परि ते निराळे गुणमोल ॥ १ ॥
पायरी प्रतिमा एकचि पाषाण । परि तें महिमान वेगळालें ॥ २ ॥
तुका ह्मणे तैशा नव्हतील परी । संत जना सरी सारिखिया ॥ ३॥

॥ ४५६६ ॥

रुचे सकळां मिष्टान्न । रोग्या विखाच्या समान ॥१॥ तरि कां तयां एकासाठीं । कामें अवघीं करणें खोटीं ॥२॥ दर्पण नावडे एका । ठाव नाहीं ज्याच्या नाका ३ तुका ह्मणे खळा । उपदेशाचा कांटाळा ४॥

॥ ४५६७ ॥

अविश्वासीयाचें शरीर सुतकी । विटाळ पातकी भेदवाही ॥ १ ॥
काय त्याचा वेल जाईल मांडवा । होता तैसा ठेवा आला पुढें २ ॥
मातेचा संकल्प व्हावा राजबिंडा । कपाळींचा धोंडा उभा ठाके ३॥
तुका ह्मणे जैसा कुचराचा दाणा । परिपाकीं अन्ना न मिळे जैसा४

॥ ४५६८ ॥

अतिवादें लावी । एक पोट सोंग दावी ॥१॥ त्याचा बहु रूपी नट । नव्हे वैष्णव तो चाट ॥ २ ॥ प्रतिपादी वाळी । एका पुजी एका छळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं । भूतदया ज्याचे ठायीं ॥ ४ ॥

॥ ४५६९ ॥

दाढी डोई मुंडी मुंडुनिया सर्व । पांघुरती बरवें वस्त्र काळें ॥ १ ॥
उफराटी काठी घेउनिया हातीं । उपदेश देती सर्वत्रासी ॥ २ ॥
चाळवुनी रांडा देउनिया भेष । तुका ह्मणे त्यास यम दंडी ॥ ३ ॥

॥ ४५७० ॥

पिंड पोसावें हें अधमाचें ज्ञान । विलास मिष्टान्न करूनिया ॥ १ ॥
शरीर रक्षावें हा धर्म बोलती । काय असे हातीं तयांचिया ॥ २ ॥
क्षणभंगुर हें जाय न कळतां । ग्रास गिळों सत्ता नाहीं हातीं ॥ ३ ॥
कर्वतिलीं देहें कापियेलें मांस । गेले वनवासा शुकादिक ॥ ४ ॥
तुका ह्मणे राज्य करितां जनक । अग्नीमाजी एक पाव जळे ॥५ ॥

॥ ४५७१ ॥

पोटाचे ते नट पाहों नये छंद । विषयांचे भेद विषयरूप ॥ १ ॥
अर्थी परमार्थ कैसा घडों शके । चित्त लोभीं भीकें सोंग वाया २॥
देवाचीं चरित्रें दाखविती लीळा । लाघवाच्या कळा मोहावया ॥३॥
तुका ह्मणे चित्तीं राहे अभिलाष । दोघां नरकवास सारिखाचि ४॥

॥ ४५७२ ॥

स्वयें आपणचि रिता । रडे पुढिलांच्या हिता १ सेखीं हें ना तैसें झालें । बोलणें तितुकें वाया गेलें ॥२॥ सुखसागरीं नेघे वस्ती । अंगीं ज्ञानपणाची मस्ती ३ तुका ह्मणे गाढव लेखा । जेथें भेटेल तेथें ठोका ४

॥ ४५७३ ॥

आतां माझ्या मना । हेची घडो उपासना १ ऐसें करीं पांडुरंगा । प्रेम वोसंडेसें अंगा ॥ २॥ सर्व काळ नये । वाचे वीट आड भये ३ तुका वैष्णवांसंगतीं । हेचि भजनपंगती ॥ ४ ॥

॥ ४५७४ ॥

जरी माझीं कोणी कापितील मान । तरी नको आन वदो जिव्हे १ सकळां इंद्रियां हे माझी विनंती । नका होऊं परतीं पांडुरंगा ॥ २ ॥ आणिकांची मात नाइकावी कानीं । आणीक नयनीं न पाहावें ॥३॥ चित्ता तुवां पायीं रहावें अखंडित । होउनी निश्चित एकविध ॥ ४ ॥ चला हात पाय हेंचि काम करा । माझ्या नमस्कारा विठोबासी ५ तुका ह्मणे तुह्मां भय काय करी । आमुचा कैवारी नारायण ॥ ६ ॥

॥ पौराणिक अभंग-४५७५ ॥

आह्मां निकट वासें । कळो आलें जैसें तैसें । नाहीं अनारिसें । कान्होबाचे अंतरीं ॥ १ ॥ पीडती आपुल्या भावना । जैसी जयाची वासना । कर्माचा देखणा । पाहे लीळा कौतुक ॥ २ ॥ खेळ खेळे न पडे डाई । ज्याचा भार त्याचे ठायीं । कोणी पडतील डाई । कोणी कोडीं उगाविती ॥ ३ ॥ तुका ह्मणे कवळ । हातीं घेऊनि गोपाळ । देतो ज्यांचें बळ । त्यासी तैसा विभाग ॥ ४ ॥

रामेश्वरभट्टाचे अभंग.

॥ १ ॥

तुकाराम तुकाराम । नाम घेतां कांपे यम ॥१॥ धन्य तुकोबा समर्थ । जेणें केला पुरुषार्थ ॥ २ ॥ जळीं दगडा सहित वह्या । तारियल्या जैशा लाह्या ॥ ३ ॥ ह्मणे रामेश्वर भट्ट द्विजा । तुका विष्णु नाहीं दुजा ॥ ४ ॥

॥ २ ॥

पंडित वैदिक अथवा दशग्रंथी । परी सरी न पवती तुकयाची १ शास्त्रही पुराणें गीता नित्य नेम । वाचिताती वर्म न कळे त्यासी २ कर्म अभिमानें वर्ण अभिमानें । नाडलें ब्राह्मण कलियुगीं ३ तैसा नव्हे तुका वाणी व्यवसाई । भाव त्याचा पायीं विठोबाचे धृ० ४ अमृताची वाणी वरुषला शुद्ध । करी त्या अशुद्ध ऐसा कोण ५ ॥ चहूं वेदांचें हें केलें विवरण । अर्थही गहन करूनिया ६ ॥ उत्तम मध्यम कनिष्ट वेगळे । करूनि निराळे ठेविले ते ॥ ७ ॥ भक्तिज्ञानें आणि वैराग्यें आगळा । ऐसा नाहीं डोळां देखियेला ८॥

जपतप यज्ञ लाजविलीं दानें । हरी नाम कीर्तन करूनिया ॥ ९ ॥
मागें कवीश्वर झाले थोर थोर । नेले कलेवर कोणी सांगा १० ॥
ह्मणे रामेश्वर सकळा पुसोनि । गेला तो विमानीं बैसोनिया ११ ॥

॥ ३ ॥

माझी मज आली रोकडी प्रचीत । होऊनि फजित दुःख पावे ॥१॥
कांहीं द्वेष त्याचा करितां अंतरीं । व्यथा या शरीरीं बहुत झाली २
ज्ञानेश्वरें मज केला उपकार । स्वप्नीं सविस्तर सांगितलें ॥ ३ ॥
तुका सर्वां श्रेष्ठ प्रिय आह्मा थोर । कां जे अवतार नामयाचा ॥४॥
त्याची तुज कांहीं घडली रे निंदा । ह्मणुनि हे बाधा घडली तुज ५
आतां एक करी सांगेन एक तुला । शरण जाई त्याला निश्चयेंसी ६
दर्शनेंचि तुझ्या दोषा परिहार । होय तो विचार सांगितला ॥७॥
तोचि हा विश्वास धरोनि मानसीं । जाय कीर्तनासी नित्यकाळ ८
ह्मणे रामेश्वर त्याच्या समागमें । आलें हें आराम देह माझे ॥ ९ ॥

॥ ४ ॥

वैष्णवांची याती वाणी जो आपण । भोगी तो पतन कुंभपाकीं १॥
ऐसी वेदश्रुति बोलती पुराणें । नाहीं तें दूषण हरिभक्तां ॥ २ ॥
उंच निंच वर्ण न म्हणावा कोणीं । जे कां नारायणीं प्रिय झाले ३ ॥
चहूं वर्णांसी हा असे अधिकार । करितां नमस्कार दोष नाहीं ४ ॥
जैसा शालिग्राम न म्हणावा पाषाण । होय पूज्यमान सर्वत्रांसी ५॥
गुरु परब्रह्म देवाचा तो देव । त्यासी तो मानव म्हणूं नये ॥ ६ ॥
ह्मणे रामेश्वर नामीं जे रंगले । स्वयेंचि ते झाले देवरूप ॥ ७ ॥

॥ ५ ॥

आरती तुकारामा । स्वामि सद्गुरुधामा । सच्चिदानंद मूर्ति । पाय दाखवी आम्हां ॥ १ ॥ आरती० ॥ राघवें सागरांत । पाषाण तारिले । तैसे हे तुकोबाचे । अभंग रक्षिले ॥ २ ॥ आरती० ॥ तुकिता तुळणेसी । ब्रह्म तुकासी आलें । म्हणुनि रामेश्वरें । चरणीं मस्तक ठेविलें ॥ ३ ॥ आरती० ॥


॥ ६ ॥

तूंचि आत्माराम नव्हेजी देहधारी । स्तुति जरी होय झडो माझी वैखरी । पातकी मूढजन घडतील अघोरीं । याकारणें अवतार केला महीवरी ॥ १ ॥ जय जय भक्तराया धर्ममूर्ति तुकया । आरती ओंवाळी भावें तुझिया पायां ॥ ॥ ध्रु० ॥ २ ॥ तुझे ठायीं असे भ्रम कोणा न कळे नेम । जन हें काय जाणे अनु-

भवितों राम। टाकोनि अभिमान जीवीं धरिलें प्रेम। बोलोनि महिमा तुझा जना दिला विश्राम ॥ ३ ॥ अद्भुत महिमा तुझा काय वर्णू दातारा। उदकेंविण अन्न दिवस क्रमिले तेरा। आतां हे ऐसी प्राप्ति काय घडेल येरा। उदकीं कागद दिन रक्षिले आठरा ॥ ४ ॥ ऐकतां तुझें वचन मन होय उन्मन। सच्चिदानंद गाभा तुजसाठीं पूर्ण। नित्य हें असो माझें तुझें ठायीं अनुसंधान। करूनि कृपादान देई इतुकें दान ॥ ५ ॥ शास्त्र आणि वेदांत शिष्टाचार समस्त। आणिला एक वाक्या जन लोक कृतार्थ। विशेष रामेश्वरा प्रेम दिलें बहुत। निवितों तुज आतां ठेवीं मस्तकीं हात ॥ ६ ॥

॥ ७ ॥

प्रपंचरचना सर्वही भोगुनि त्यागिली। अनुतापाचे ज्वाळीं देहबुद्धि हविली। वैराग्याची निष्ठा प्रगटुनि दाखविली। अहंता ममता दवडुनि निजशांति वरिली ॥ १ ॥ जय जयजी सद्गुरू तुकया दातारा। तारक संतांचा तूं जीवलग सोयरा ॥ धृ० ॥ हरीभक्तीचा महिमा विशेष वाढविला। विरक्ती ज्ञानाचा ठेवा उघडुनि दाखविला। जगदोद्धारालागीं उपाय सुचविला। निंदक दुर्जनांचा संदेह निरसिला ॥ जय० ॥ २ ॥ तेरा दिवस वह्या रक्षुनियां उदकीं। कोरड्याची काढूनि दाखविल्या शेखी। अपार कविता शक्ति मिरवुनि इह लोकीं। कीर्तन श्रवणें तुमच्या उद्धरती जन लोकीं ॥ ज० ३ ॥ बाळवेष घेउनि श्रीहरी भेटला। विधि ज्या जानिना तोचि आठवा हा दिधला। तेणें ब्रह्मानंदें प्रेमा डोलविला। न तुके म्हणुनि तुका नामीं गौरविला ॥ जय० ॥ ४ ॥ प्रयाणकाळीं देवें विमान पाठविलें। कलिच्या काळामाजी अद्भुत वर्तविलें। मानव देह घेउनि निजधामा गेले। निळा म्हणे सकळ संत तोषविले ॥ जय जयजी सद्गुरु तुकया दातारा ॥ तारक० ॥ ५ ॥



विषयवर्णानुक्रमणिका.

भाग पहिला.

मंगलाचरण.

बाळक्रीडा.

गौळणी.

काला.

खेळावरील रूपकें.

टिपरी.

विटूदांडू.

मृदंगपाट्या.

सुतुतू-हाल.

हुंबरी-हमामा.

फुगड्या.

लखोटा.

अडसण.

दळण.

कांडण.

पाळणा.

आशीर्वाद.

ललित.

रूपकें.

एकारखडी.

ओव्या.

त्रोटक चरित्रें व त्रोटक प्रकरणें.

दोहरे.

भाग दुसरा.

एकविध अभंग.

भेटीचे अभंग.

देवाशीं सलगीचीं भाषणें.

देवापाशीं मागणें.

देवाशीं प्रेमाचें भांडण.

करुणापर अभंग.

स्थितीपर अभंग.

देवाशीं उद्गार.

जनाशीं उद्गार.

संतपर अभंग.

कीर्तनपर अभंग.

नामपर अभंग.

पंढरीमहात्म्य.

उपदेशपर अभंग.

अद्वैतपर अभंग.

उत्तराधिपदें.

भाग तिसरा.

प्रासंगीक अभंग.

कान्होबाचे अभंग.



शब्दार्थकोश.

अ

अकळन—न समजण्यासारखा.

अकिंचन—दरिद्री, कंगाल.

अकिल्ला—[illegible]

अखइ—अक्षय, नेहमीं.

अखना—अक्षना. [illegible]

अखंड [illegible] वर्षी,

अखम—पंगु आंधळा.

अखळ—[illegible]

अंगद—[illegible]

अगर—शेन, साठा.

अंगलग—समागम.

अंगवर्णे—[illegible]; मुकर्णे.

अंगिसुनी—[illegible]

अगुणा—निर्गुण, भोळा अवगुणी.

अंगुळे—अंगठी. [जप.

अघोर [illegible] मंत्र-

अटक—[illegible]

अट्टहास [illegible], हेका.

अटी—[illegible], हट्ट.

अठरा—अठरा पुराणें.

अठिवेटी [illegible] [कडा.

अठोनी [illegible]

अडकन—आडमार्ग, रान.

अडका—पैशाचा षष्टांश.

अडंदू—कटरोग.

अडमोडी—आपल्या मताचें प्रतिपादन.

अडवंगी—कुमार्ग.

अडाणा—[illegible], नाळा.

अनी—अपेक्षा.

अ[illegible] गुप्त गुज.

अनन्याई [illegible], कौ-

धानें [illegible]

अ[illegible]—[illegible] अनुभव.

अत्यद्भुत—अतिशय चमत्कार.

अ[illegible]—[illegible], श्रेष्ठ [illegible] [चांग.

अ[illegible]—[illegible], [illegible]

अनामिक—अंत्यज, चांडाळ

अ[illegible] [illegible], निराळे.

अनु—दुर्गे

अ[illegible]—[illegible] कानीं येई पानळी असता ध्वनि निघतो, तो.

अंबर—आकाश, वस्त्र.

अ[illegible] [illegible]

अबोलणा—न बोलण्यासारखा.

अ[illegible]—[illegible]

अ[illegible] [illegible] मूळ.

अ[illegible] [illegible] चमत्कार

अ[illegible] [illegible]. [न वर्णी.

अ[illegible] [illegible], लक्ष्यांत

अ[illegible] निराळा, कधीं न [illegible]. [नाश.

अ[illegible] [illegible], स्वरूप-

अवगणी—[illegible], सोळंबा.

अवगणें—[illegible]

अवलिला—[illegible]

अवसान—वेळ, शक्ति, अंतकाळ.

अ[illegible] [illegible]

अशद्र—रंक.

अशोभी—अशुभ.

अष्टांग—आठ अंगे, दोन पायाचे आंगठे.

,, गुडघे.

,, नकहात.

[illegible] व भाळ.

असन—[illegible], वैभव.

अ[illegible] [illegible]

अ[illegible] [illegible], ईर्षा, उ[illegible], [illegible].

अ[illegible] [illegible]

अहैक्य—ऐक्य, एकी.

अ[illegible] [illegible] [illegible] क्षेत्र जो दिवे बोबाळ्याचा संस्कार करितात तें.

आ.

आ[illegible]—[illegible] न करितो.

आ[illegible]—[illegible] परवाना.

आगळा—अधिक, [illegible] मोठा.

आ[illegible] [illegible]

आ[illegible] [illegible] श्रेष्ठ.

आगोज—अगाध विशाळ,

आगर्व—[illegible]

आग्रो—आग्रह.

आ[illegible] [illegible]

आ[illegible] [illegible]

आ[illegible] [illegible]—अलिकडची, या जन्मांची.

आट—[illegible]

आर[illegible] [illegible] सान्या.

आ[illegible] [illegible], वस्त्र; प्रकाश.

आनळणें—जवळ येणें, स्पर्श करणें.

आ[illegible] [illegible] होणें, मिळणें.

आर्त—इच्छा.

आ[illegible]—[illegible]

आ[illegible] [illegible] रहणारा

आद्रा–उत्पन्न.
आमोडोंचे–मोभाचे.
आन–दुसरें.
आपसकु–आपणाला.
आपंगणें–आपलें म्हणणें.
आपसया–आपोआप.
आपैसें–आपोआप, एनें.
आबाळी–[illegible], अवेळा.
आम्हांकुरें–आम्हांकडे.
आम्हांसी–आम्हांपाशीं
आयि–आली
आ[illegible]–[illegible]. [ढणें.
आरंबळणें–[illegible] ओर
आरोगणें–शांति, सौख्य.
आर्तला–उत्सुक, उत्कंठि-
त झालेला.
आल्य–आणि, अडाणी.
आलंगणें–भक्षणें खाऊन
टाकणें.
आलगट–अडाणी.
आलोची–[illegible] कर-
ण्याची इच्छा.
आवांका–अवमान, धाक.
आविस–आमिष.
आसक–आसक्ति लोभ.
आसाटा–[illegible]
णारा हिसका व त्या
नंतर होणारी व्यथा.
आस्कुडणें–[illegible], ओ-
रड, आक्रोश.
आहाच–वरवर.
आहिलेला–[illegible]
साधारण.
आंदु–हद्द, हद, आपड.
आंवसणें–[illegible].
आं[illegible]–[illegible], मनी-
स येईल असें [illegible].

इ.

इ[illegible]–मनास येईल
तितकें.
इतिमिरा–इडापिडा.
इमाड–[illegible].

इहपरलोक–हा मृत्युलोक
व स्वर्गलोक.
इहा–इच्छा.

उ.

उभली–उभाळा, उभाडा.
उखता–अवघा, सगळा.
उखर–सडवडीत, ओबड-
धोबड.
उखिते–अवघे.
उगलें–व्यर्थ, दुसरें, शांत.
उगवणें–उलगडा करणें,
सोडवणें.
उगळणें–ओकणें, परत
घेणें.
उगाणा–सर्व दोष व पापें
आपणावर घेऊन के-
लेली सोडवणूक, गण-
ना, अनुभव.
उच्छेद–हेळणा, धिक्कार.
उजगं–उदय, उत्कर्ष,
स्वच्छता.
उजळणें–शुद्ध होणें, पवि-
त्र होणें.
उजावें–उदो करावें.
उदंड–पुष्कळ.
उद्धारिव–उद्धार.
उदीमणें–उगवणें, उदय
होणें.
उद्योग–श्रम.
उधानु–नाना, भरती.
उन्मन–लीन.
उन्मनी–मनाची लीनते-
ची पांचवी अवस्था.
१ जागृति, २ स्वप्न,
३ सुषुप्ति, ४ तुर्या,
५ उन्मनी अशा एकं-
दर पांच अवस्था आ-
हेत.
उन्मीलित–उघडलेला, वि-
कासित.
उन्हवणी–ऊन पाणी
उपक्रम–आरंभ.

उपणेंण–झाडपणें, पाखडणें
उपनिष्ट–उभे रहाणें.
उपाधि–श्रम, अडथळा.
उपेग–उपयोग [स्तब्धता]
उभागा–स्थिरता, दृढता,
उमग–आकाश, सदेह,
विस्तार, उपद्रव
उमाणें–उमजणें
उरगीन–शिल्लक, बाकी.
उरी–बाकी; ठिकाण,
मांड, मेद्, स्थळ, स्थिती.
उल्हणें–ओलांडणें.
उसंतणें–शेवटास नेणें, पु-
रे करणें. [दूर करणें.
उसाळणें–इवळणें आनं-

ऊ.

ऊर्वी–बरवी
ऊल–मस्ती.
ऊर्मी–मनाचे तरंग, म-
नाच्या लहरी.

ए.

एकमय–एकसारखे, एक-
रूप. [सणारा.
एकनिष्ठ–एकनियमानें अ-
एकांडशी–[illegible], अहंकारयु-
क्त असा.
एकांगी–[illegible] भक्ताला
एकावळी–एकेरी हार, माळ
एकोत्मा–एके ठायीं, एके
वाजूस.
एकात्म–[illegible].

ओ.

ओखद–वाईट.
ओसरु–ओवरी.
ओढाळ–ओढून चाल.
ओठाळ–[illegible] गुरू.
ओनवलें–पनावलें, केलें.
ओल–पुष्कळ.
ओलावा–जिव्हाळा.
ओहोळ–ओढा.

औ.

औट–साडेतीन (३॥)

औंढें—[illegible] स्थान, योगशास्त्रोक्त महाकारणस्थान.

क.

कंकर—[illegible] लहान खडे, इंगळ.

कडबिड—बिडुकमिडुक.

कडसणी—[illegible], चोकशी

कडाळोरी—[illegible] कलून देणें.

कणव—करुणा, दया.

कणधार—[illegible], सुकाणदार.

कंदी—केळ.

कप—कापस

कपाट देणें—द्वार लावणें.

कपाई—[illegible].

कमर—[illegible]

कमळी—[illegible] मोच.

कय—[illegible]

कलवर—[illegible] लिपलेला ढीग.

कल्हरी—[illegible].

कव—मिठी, आलिंगन.

कवळ—[illegible], डोळ्यावर पिवळेपणा येणें, घास, [करणें.

कवळणें—ग्रास घेणें, कृपा

कहा—कोठें

कळस—शेवट, कळस.

कळसा आले—पूर्ण झालें.

कळह—कलह, कज्जा.

कळांतर—व्याज.

कळी—[illegible].

काकमालिन्यायें—प्रयोग न करतां अकल्पित लाभ होतो तद्वत.

कापणी—[illegible]

कांचणी—[illegible].

काळ—[illegible] यम, वेळ.

कांदवण—कांदेरान.

कानकांडे—चोरटे

[illegible], [illegible]

[illegible].

[illegible]

[illegible] नोकर.

[illegible].

[illegible]

[illegible].

[illegible]

[illegible]—[illegible], चिडविणें, छळ करणें.

[illegible] प्रकारचें वाद्य.

काहा—घोंग.

[illegible], अंधार.

कीड—कीटण, किडुक.

[illegible], खासखा, निश्चयात्मक.

[illegible]

[illegible].

[illegible] मारचेल.

[illegible], व्यर्थ. (गळ्यांत कुचाचें)

[illegible].

[illegible].

[illegible], कुडावा, रक्षण, भिंत.

[illegible].

[illegible].

[illegible].

[illegible].

[illegible].

[illegible] जाळणें.

[illegible].

[illegible]

[illegible], मलिन.

[illegible], [illegible] कसब.

[illegible].

[illegible], व्यवसाय.

कुडांक—अजाणं, मोडशी.

कुड [illegible] करणें.

[illegible], [illegible].

[illegible], [illegible].

[illegible].

[illegible], [illegible].

[illegible] भिरवणें.

[illegible].

[illegible], [illegible].

[illegible].

[illegible], इच्छा, आवड.

[illegible] [illegible], बोपट.

[illegible].

कोवसा आश्रय, आधार, आसरा, [द्वाद.

कोमवणा [illegible] करणाऱ्या.

[illegible], जाणें.

ख.

[illegible], मोठा करणारा.

खंडुर—[illegible] बाहेर.

खन—क्षण.

[illegible].

खपोल—कानवा.

[illegible]—[illegible]. [illegible].

[illegible].

[illegible], [illegible], [illegible].

[illegible], [illegible], स्मशान, अडगळ.

[illegible].

[illegible], [खाम-

खामट—[illegible], [illegible].

[illegible].

[illegible], [illegible] [illegible].

[illegible], कोंड करणें.

खुरचाणी—[illegible] घाम.

गुर्गी—अडथळा [लेला.
गुळा—अवयव; आंखड-
खेटा—फेरा.
गोडी—[illegible]
गोटा—[illegible] पडणें.
खोडणें—[illegible] खोडी ला-
गणें.
खोटावणें—[illegible] होऊन
पडणें.
खोड—[illegible]; पोट घोंगता.
खोमा—[illegible]
खैयाल—[illegible]

ग.

गडसंद—अडचण, अचाट.
गद्यांगोल—[illegible] गजर,
पांडित्य.
गर्भाल—[illegible]
गमणें—[illegible]
गरुडटका—गरुड अचमा-
[illegible] असलेला, पताका.
[illegible] प्रकारचें अ-
भिषेकाचें शिंग.
गवांडी—[illegible]
गव्हर—आंसुपाय.
[illegible]
[illegible] हा-
तांतील देऊण.
[illegible]
[illegible] अपंग.
[illegible] देवळी
जाडें.
[illegible]
[illegible]या, कपटी, कांडनी.
[illegible], विखेवाल.
[illegible] शोकहीन,
[illegible]
[illegible]
गिर्दे—[illegible]
गिळमणी—[illegible]
गुलाल—[illegible]
गुड्डा—[illegible], चेंडू, [illegible]

च्या चरर्याच्या डों-
पड्या, अंघारी, गुप्त
गोष्ट.
गुढी—निशाण, गुंती.
गुणागर—गुणवान.
गुमान—गुम पर्वा.
गेंद—[illegible] डागिना.
गोंगरें—[illegible]
गोठी—गोष्टी.
[illegible] मनांतील गोष्ट.
[illegible] समुदाय.
[illegible]
[illegible]
गोरस—दूध
गोर—गोड.
गोरमें—गोरें [illegible]
[illegible] किंवा पु-
रुष [illegible] आ-
पणास [illegible]
त्या साधनाचें नांव.
[illegible]
[illegible] भून.
[illegible], पोटाळा.
[illegible]
[illegible] वाजणारा,
[illegible] देव-
णारा.
[illegible] अचानी.
गोंद्या—[illegible],
[illegible]
[illegible] दूर्णे
ग्यानगड—ज्ञानाचें गड.
[illegible], मागणें.

घ.

[illegible] मि-
पुतना.
[illegible]
[illegible], प-
ग्रहाज.
[illegible]
[illegible]
[illegible]

घाला—[illegible] धान्याचा
भात.
घाटें—वाईट बुद्धि.
घाळन—[illegible], संकट; चो-
राचें रान.
घालमेल—गलबल. [खेळ.
[illegible], घाव.
घुमरी—[illegible], भरपूर,
घुरद—[illegible], घाण.
घुसमटणें—[illegible] कोंडणें,
कोंडमारा करणें.
घुळा—[illegible], सांड
[illegible] केलें.
[illegible] लवकर.
[illegible]

च.

[illegible]
चबोल—शब्द.
[illegible]
चर—नादु.
[illegible]
[illegible], कोनाम,
[illegible]
[illegible]
[illegible], प्रकार.
[illegible]
[illegible] सोडणें.
[illegible] होणें.
[illegible], मला.
[illegible], हुशार,
[illegible], चाचाक
[illegible] लोक-
ही पक्षी.
[illegible] पर्वा.
[illegible]
[illegible], वेडू, वेड्या
वेड्या कमि, जपिर्दा.
चामबोम—[illegible]
चावरी—[illegible]
चाट—नादु.
[illegible] करणें
चिकारणें—चिकरणें, चिक-

चिनावणें—[illegible] प-डणें.

चिंतामणी—[illegible] ब-स्तु देणारा पाषाण.

चिन्मय—आनंदमय.

चिमचिमी अ. चिर्णाच-र्णी—रात्रीं चिर्नाचिन असें ओरडणारा प्राणी, रात्र.

चिरा घालणें [illegible] अ. दगड घालणें; नाहींसें करणें.

[illegible]—[illegible]; आशाळ-भूत.

[illegible]—[illegible], [illegible] करणें.

[illegible]—[illegible].

[illegible]—[illegible]. [णें.

[illegible]—[illegible] होणें अ. कर-

[illegible]—[illegible]पणा.

चोखटा अ. [illegible] गला; चोख.

चोज—नवल.

चोजवणें—विस्मित करणें, मोठ्या उल्हासानें क-रणें.

चोथा [illegible] वगैरे चोप-डलेला पदार्थ.

चोहटा अ. [illegible] टा, बाजारांत.

चौक [illegible] बसण्याक-रितां [illegible] केलेलें आसन.

चौगण—चार गुण.

चौधारी—[illegible]

चौघाचार—पंचाईत.

चौरस—[illegible].

ज.

जति—[illegible], संन्यासी; अ-वसान.

जती—शक्ति, अधिकार, जत्रा.

जनाचार—पंचाईत.

[illegible] पुनर्जन्म.

[illegible]—[illegible].

[illegible]—[illegible] वस्त्र.

[illegible]—[illegible], सांनिध.

[illegible]—[illegible].

[illegible], सडनी.

[illegible], शहा-णपणा.

[illegible].

[illegible]—[illegible]; जास्ती.

[illegible], प्राण.

जिव्हार—[illegible]; मर्म, [illegible].

जाणें—[illegible], जीवन अ [illegible], जि-वन.

जग—[illegible]. [चोद्वा.

[illegible] अ. [illegible]

[illegible]—[illegible], जोडणें.

[illegible].

[illegible]—[illegible]. मल,

[illegible].

[illegible].

जोड अ. [illegible].

[illegible].

जोहर—अग्नि, आग.

[illegible]—[illegible], जोहार करणें. [म,

[illegible], ज-

झ.

झळणें—[illegible] होणें; प-सणें.

[illegible]—[illegible].

[illegible] लष्कर.

झणी—[illegible], कदाचित, नाहीं तर.

[illegible]—[illegible]; उष्णता.

[illegible]—[illegible]; पोळणें, गुडाळणें.

[illegible].

[illegible], जास्ती.

[illegible].

[illegible],

[illegible]—[illegible], शेंडी.

ट.

[illegible].

[illegible] बंध.

[illegible].

[illegible].

[illegible], आयद, एक हत्यार.

टाचणी—[illegible], उपहास,

[illegible].

[illegible], उपळे.

[illegible], गलथा.

टवा—[illegible], डौल.

टवी—बाहेर [illegible].

[illegible] पाल ण्याचें शिक्षण.

ठ

ठकडा [illegible] फस-विणारा.

[illegible] फसवूं.

ठाकणें अ. [illegible] न, स्थान आगा.

ठाडा—उभा.

[illegible] चांपा अ. स्थान, मुक्कामणा.

[illegible], स्थळ.

ठेंगा अ. [illegible] काठी.

ठेवें—[illegible].

[illegible] पाप्य.

[illegible].

ड.

[illegible] करून टाकणें. [ण्यांत.

डाई—[illegible], ग्रा-ध्यांत, गो.

डांक—एक वाद्य.

डांग अ. [illegible].

[illegible].

[illegible] [किंवा डाग, [illegible] सापडून ढि-

[illegible], ठिकर.

[illegible] अ. इजा करणें, मारणें.

[illegible]

इंगा-इ, जड, मंदबुद्धि.

[illegible]

संदूक, दिवा.

[illegible], डोमरा, विघ्न, [illegible]

[illegible], शोभणें.

ढ.

[illegible] ढोलेअंग घर.

[illegible], चाल.

[illegible], हालवणें.

[illegible], मोठें, विशाल.

त.

[illegible], प्रतरणा, मंदा.

[illegible], कांति.

[illegible]

[illegible], मदन.

ताकविं-ताक विणारें, [illegible]

[illegible]

[illegible], अभाव.

[illegible]

[illegible] स्थळ.

[illegible], मुक्ती.

[illegible] माणसाच्या आकृतीचें बनावणें.

[illegible]

[illegible], मदत.

[illegible]

[illegible]

[illegible], [illegible]

[illegible]-वाघें.

[illegible] पाषाण [illegible] घोडा.

[illegible], बाळा.

[illegible], नोमडी, पालणें अ. [illegible] जान देवणें.

[illegible]

[illegible], ज्ञाता, ज्ञान ध्येय, ध्याता, ध्यान, इत्यादि त्रिनय.

[illegible], काळोख.

थ.

[illegible] झालेला.

[illegible] लर्डे.

[illegible] कढ.

[illegible], समुदाय, थवा.

[illegible]

थोम अ. [illegible], व्यर्थ.

[illegible] इयंके.

[illegible], पडसें.

[illegible]

[illegible], उद्धट, कुचाळ.

द.

दंडणें-सजणें, [illegible]

[illegible]

[illegible] इत्यादि एका प्रकारचें वाद्य.

[illegible] करणें.

दुमडा अ. [illegible]

[illegible]

[illegible], उंबरा.

[illegible], नजर.

[illegible]

[illegible] केलेला पदार्थ.

दुकळलो-दुष्काळांत सांपडलो.

दुरेम-[illegible]

[illegible], त्रिमटा.

[illegible] इत्यादि.

[illegible]

[illegible] करणें.

[illegible]

[illegible] कडा.

[illegible] नाहीं.

[illegible], पृष्ठभाग.

[illegible]

[illegible]

[illegible] भागिना

[illegible], भिन्न.

[illegible]-भयंकर, फार कठीण.

[illegible]

[illegible]

[illegible], पाहणारा.

[illegible], दृष्टि, अवलोकन. [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible], देवाचें मंदीर.

[illegible] नसणें.

[illegible]

[illegible]

ध.

[illegible]

[illegible], सामर्थ्य.

[illegible]

[illegible], तृप्ति, [illegible]

[illegible], रूप, ढंग.

[illegible]

[illegible], निर्भय, धीट, मुख्य.

धाणें-तृप्त होणें, संतुष्ट होणें.

[illegible], हाक मंजूर.
[illegible], मुख्य मांस.
[illegible]
[illegible], मढा.
[illegible], गजमथुन, भर.
[illegible] प्रांसि[illegible], [illegible]थान.
[illegible], हिम्मत.
[illegible], उशीर.
[illegible] [illegible]ण्या, [illegible]ष्या, वायचळ.
[illegible]
[illegible], मर्दी.
[illegible] माहवर, [illegible] काया ढोल.

न.

[illegible]
न पचना न माना.
[illegible] [णाली.
[illegible] न जाना, न जा.
न समावे [illegible] नाहीं.
नजी–नजा, मान. [णा.
नागर [illegible], [illegible]
नागोवा–नागवा, उघडा.
नाठेठ–नाम होत नाहीं.
नाटक [illegible], खेळ करणारा.
नाड–विघ्न, अडचण, प्रतिबंध.
नाडिये नर्क.
[illegible]
[illegible] दूर्ण, खोड मोडणें.
[illegible] प्रसार.
[illegible], मुके, ह.
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible], मरी, बागली, मरी.
निकुर–निश्चय, निश्चयानें
[illegible]
[illegible]
[illegible], यथार्थ.
[illegible] गुह केला नाहीं तो.
निचेंत–स्वस्थ, गप्प, परिपूर्ण.
[illegible] आपलें घर.
निडळ अ. [illegible], कपाळ. [निफ होणें.
[illegible]
निर्दुष्ट [illegible]
[illegible], कृतार्थ.
निवड–अलग्द, केवळ.
[illegible], नीच, हलकट. [[illegible]
[illegible], अ[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible] वाढिलेली फळें.
[illegible]
[illegible] [न करणें.
[illegible], [illegible]
[illegible] करणें,
निष्कारणें. [कुजाळणें.
[illegible], बेनामणी
निरुतें–खरें, निश्चित, निश्चय. [[illegible]
[illegible], शुद्ध.
[illegible], मोक्ष.
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible], [illegible]
[illegible] ठेवणें, [illegible] पुरून ठेवणें.
[illegible] नम्रतेनें शेत.
[illegible], पृथक्करण.
[illegible] उपटणें.
[illegible] नाहीं
[illegible]
[illegible] नाहीं.
[illegible] नाहीं.
[illegible], पैंजण.
[illegible], नर्मा. [[illegible]
[illegible]
[illegible]

प.

[illegible], पावसाची खूण.
[illegible], सांड.
[illegible] कामाच्या आनंद [illegible] मध्ये.
[illegible], आधार.
[illegible], पत्र.
[illegible] हुणें.
[illegible] अडकलेल्या पयाचा पट्टा, सामान.
[illegible]
[illegible]
[illegible], विष.
[illegible]
[illegible]
[illegible], पंडित.
[illegible] एक लाकूड, पाचर.
[illegible] मूढ.
[illegible], प्रताप.
[illegible]
[illegible]
[illegible], प्रकार.
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible] बोलणें, निवडून काढणें.

[illegible], वर्णन.
पंथ–मोहले.
पहुडणें पडणें, निजणें.
[illegible]
[illegible] सेवक.
पाइ[illegible], ग्राम्य
[illegible]
पाश–गड, स्वच्छ, साफ.
[illegible]
[illegible] होणें.
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible] बिर.
[illegible] जना-
[illegible]
पाहिजार महार
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible] बायका
पानमग–आडवा.
[illegible] कुठार.
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible] पाणी.
[illegible] भाग, विभ.
पारणें–उपास सोडणें.
पारखें–परकें, दुसरें.
[illegible]
[illegible], मोचन.
[illegible]
[illegible]
[illegible] मन, अवि-
चि मन.
[illegible], स्वच्छ, निर्मळ
[illegible]
[illegible]
[illegible] पाहाणें.
पिरणें–दुःखें होणें.

पिरपिर–चिरचिर.
[illegible]
[illegible] पुढें धावणें.
[illegible]
[illegible], द्वाड.
पिसें–वेड.
पुट–लपेटा, रुपांतर.
[illegible]
[illegible]
[illegible] ग-
गमान.
पुस अ. पुंस–[illegible], शेंपूट.
[illegible]
[illegible], भिक्षा-
गी, मागणी.
[illegible], सोमा.
[illegible]
[illegible] येणें.
[illegible], वस्ती.
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible] शौर्य.
[illegible] [शुद्ध.
[illegible], मोकळें,

फ.

[illegible] भाव इतका.
[illegible]
[illegible], व्याज.
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible], हाकलून.
फांदा–[illegible], [illegible]
फावणें–साधणें हातीलागणें
फांकावणें–[illegible] आणणें
[illegible], पोकळ.
फिरव–माघार.

फिरंगी–एक जात.
फुंज–अभिमान; गर्व.
फुडें–खरें, खरोखर.
[illegible] गर्वकरणें
[illegible], गजरा.
[illegible] करी.
फोल–[illegible], पोकळ.

ब

[illegible]
[illegible]
[illegible]
बरवट–चांगला, सुंदर.
[illegible]
[illegible]
[illegible] [देणें.
[illegible] लागून
[illegible], विशाळ.
[illegible]
[illegible]–मरण.
बाजीगिरी–गारुडविद्या.
बांडा काहीं काळा व काहीं
[illegible] रंगाचा.
[illegible], कळणें.
[illegible], पराधीनता.
[illegible], दुःख.
[illegible]
[illegible]
बाण–सेप, पाळी.
[illegible], उशी.
[illegible] अन्न.
[illegible], ढिलकली.
[illegible], बस्ती.
[illegible]
[illegible]
बाजवर्म–मरुम गोष्ट.
[illegible]
बुच्या–मिळाजरा, मर्दी.
[illegible]–समजावणें.
बुडबुद–गृहमंत्र
बनादंचें–अनादिकालाचें
[illegible] काढणें.
बेनाळीस–बेचाळीस कळें.

चैयक-[illegible].
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible] नैवेद्य.
[illegible] बांध.
[illegible]
[illegible]

भ

[illegible] निद्रा.
भगणें [illegible].
[illegible] बहुधा
[illegible] अम.
[illegible]
भवनाशा-भवनाशक.
भवव्यथा-संसार दुःख.
भावष्य-[illegible].
[illegible] बाणांनी वि-
 ध्वंस करणें.
[illegible], बाथका आ
 [illegible].
[illegible]
[illegible]
 [illegible]
[illegible] भिक्षानें
 पोट भरणारा.
भांडाई [illegible].
भांडें [illegible], पात्र.
[illegible], माकड,
 मत्स्य.
[illegible]
भार-समुदाय, जमाव.
भावर्णें-[illegible] करणें,
 कांपणें.
भावना [illegible].
भोंवरा [illegible] कोंडा.
[illegible]-[illegible]
 सोन.
[illegible]
भोवरी-[illegible].
भुन-झांडे.

[illegible] माथावर
 मोन.
[illegible]
[illegible]
भेद-भय.
[illegible] कानीं
 [illegible] गर्जनें मी
 [illegible] बाहेर भाग.
[illegible] कर
 कोना.
[illegible] दिंग.
[illegible] गिरका.

म.

[illegible], चांगला.
[illegible]
[illegible]
[illegible] मांथक,
 इच्छा.
मथणें [illegible].
[illegible]
[illegible]
 [illegible] भाग
[illegible]
[illegible]
[illegible] मापणें.
[illegible] मायेचा
 ब्यामा.
[illegible] मनन्.
महदंतर-पृथक्‌ दूर.
[illegible]
[illegible] मग्मक्ष,
 उन्मत्त.
[illegible] उन्माद,
 मस्ती.
मात-मद्यमान, अडथा?.
[illegible]
[illegible]
[illegible] विषय,
 भाजन सामग्री.
[illegible]
मादाय-मृदंग.
मांदूं-जमाव, समूह, मेळा.

[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible] [illegible]
 एक जात झाली.
[illegible]
[illegible]
[illegible] दर्शन, मुखं.
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible] माकर्णें, के-
 स कारणें.
[illegible], कुरूप, कुरू-
 माव.
[illegible], सव-
 लवणें.
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
 [illegible]
 [illegible] पुरुष.
[illegible]
[illegible]
 मुग्ध
[illegible] भरणें,
 [illegible] आणी.
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
 [illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible] [illegible],
 शोन, पोपळा.
[illegible]
 [illegible], [illegible], [illegible]
 [illegible].
मोहरा-[illegible].

मोहन—[illegible].
मोळा—ओझें; चाल.
मोक्ष—[illegible] मुक्त दुःख निवृत्त अशी स्थिति.
[illegible] चाकर, दूत.
[illegible]

य.

[illegible] निरर्थक.
[illegible] विकलपणा.
यात्रा—उदय, प्राप्ती, [illegible].
[illegible]
येहु—इह, येथे, हा.
[illegible] मार्ग — व निर्वि [illegible].

र.

[illegible] गुणाची प्रेरणा.
[illegible] योग्यता.
[illegible] ठिकाण.
[illegible] मोघक, [illegible].
[illegible]
[illegible] स्त्रियां.

[illegible] चिमकलाची थिरथिरी.
[illegible], शिग.
[illegible] लज्जा, अम्लत.
[illegible]
[illegible] सुगुंधा.
[illegible] गोष्ट
[illegible]

ल.

[illegible] महाळ, [illegible], सोंदा
[illegible] लवकरा. [illegible] [illegible] अप्रगु.
[illegible]
[illegible], मृगांनी.
[illegible] अप्रगु.
[illegible] निर्यात
[illegible] आनंदी.
[illegible] तत्काळ.
[illegible] आले.
[illegible]
[illegible] [illegible] सामृत.
[illegible]
[illegible], स्त्रिया, लाभणे, मिळणें.
[illegible]—मोठा

लाहाणे—चिरकाळाचा लाभ.
[illegible]—छंद, नाद.
[illegible]
[illegible]—लबाड.
[illegible]
[illegible] समजतो.
[illegible] बडबड करुन भिकेवर पोट भरणारा.
[illegible] लोंकांची
[illegible] आसक्त, लंपट.

व.

[illegible] गाळणें, सोडणें.
वजणें—जाणें.
वमन—ओकारी.
[illegible] [निरस.
[illegible] हलकें, [illegible] झाले-ला.
[illegible] व धान्य यांची मिसळ, भुस.
[illegible]
[illegible]; वरी.
[illegible]
[illegible], त्वरित.
[illegible]
[illegible], वाजविणे.
[illegible]
[illegible] ([illegible] पोटाखी [illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

[illegible] निरर्थक, व्यर्थ.
[illegible] [illegible], मार्ग
[illegible] [illegible], थोर, मोठे.
[illegible] [illegible] [illegible].
[illegible] [illegible] कौतुका-
नें; [illegible].
[illegible] [illegible]; [illegible], भिन्न
[illegible]; [illegible].
[illegible] [illegible], [illegible].
[illegible] [illegible] [illegible].
[illegible] [illegible] [illegible], प-
दार्थ
[illegible] [illegible]; [illegible]
[illegible] [illegible], [illegible].
[illegible] [illegible], [illegible]
[illegible] [illegible], [illegible]
[illegible] निरर्थक, [illegible], आ-
[illegible]; [illegible].
[illegible] [illegible].
[illegible] [illegible], [illegible],
[illegible].
[illegible] [illegible].
[illegible] [illegible], [illegible], [illegible]
[illegible].
[illegible] [illegible], बडबड
करणें.
[illegible] [illegible], [illegible]-
शा, सोडचिट्ठी.
[illegible]–व्यर्थ, निष्फळ.
[illegible], [illegible] [illegible], [illegible].
[illegible] [illegible]
[illegible] [illegible], [illegible].
[illegible] [illegible] [illegible],
बहिष्कार करणें.
[illegible] [illegible].
[illegible] [illegible], [illegible], [illegible]
[illegible].
[illegible] [illegible] [illegible] [illegible]
[illegible].
[illegible]–[illegible].
विद्वान–कौशल्य, कारा-
गिरी.

[illegible] [illegible] होणें, [illegible]-
मग्न होणें.
[illegible] [illegible].
[illegible] [illegible] होणें स-
[illegible] [illegible].
[illegible] [illegible] गांठी
[illegible].
[illegible] निरर्थक नि-
ष्कारण.
[illegible] [illegible], [illegible]
[illegible]
[illegible] [illegible].
विषम –विरुद्ध, प्रतिकूल
विलक्षण [illegible].
[illegible] [illegible] [illegible],
त्याग करणें [illegible].
[illegible] [illegible] [illegible] [illegible].
[illegible] [illegible], [illegible] करणें
[illegible] [illegible].
[illegible] [illegible].
[illegible]–मार्ग आधार.
[illegible] [illegible], [illegible]
[illegible] [illegible], [illegible].
[illegible] [illegible] [illegible].
[illegible] [illegible], अन्न [illegible]-
[illegible].
[illegible] [illegible] [illegible].
[illegible] [illegible], निर्मळ-
[illegible], [illegible].
[illegible] [illegible] [illegible], [illegible]-
[illegible].
[illegible] [illegible], [illegible].
[illegible] [illegible].
[illegible] [illegible], [illegible]-
[illegible].
[illegible] [illegible].
[illegible] [illegible] [illegible]
[illegible] [illegible], [illegible].
[illegible] [illegible], [illegible]-
[illegible].
[illegible]–[illegible], [illegible].
[illegible]–[illegible].

[illegible] [illegible], मित्र, कौतुक
[illegible] [illegible], [illegible], [illegible]-
[illegible].
[illegible] [illegible].
[illegible] [illegible].

श.

[illegible], [illegible], [illegible]-
[illegible].
[illegible] [illegible] [illegible].
[illegible] [illegible].
[illegible] [illegible].
[illegible] [illegible].
[illegible] [illegible]; [illegible]-
[illegible] [illegible].
[illegible] [illegible].
[illegible]–[illegible] चांडाळ.

स.

[illegible] [illegible], [illegible]–यथा-
विधान, [illegible].
[illegible] [illegible]
[illegible] [illegible], [illegible]-
[illegible]. [[illegible].
[illegible] [illegible], [illegible]
[illegible] [illegible] [illegible]-
[illegible].
[illegible] [illegible] संगमांत.
[illegible] [illegible].
[illegible]–[illegible], [illegible],
[illegible].
[illegible] [illegible] [illegible].
[illegible] [illegible], [illegible].
[illegible], [illegible], [illegible]
[illegible] [illegible] [illegible],
[illegible].
[illegible] [illegible], [illegible]
[illegible] [illegible]-
[illegible], [illegible].
[illegible] [illegible], [illegible]–[illegible],
[illegible] [illegible].
[illegible] [illegible], [illegible].
[illegible]–आकांक्षा.
[illegible]–[illegible], [illegible].

सा.

आदर आतिथ्य [illegible] [illegible]न, आ[illegible] [पणा.

[illegible] [illegible]गावरी, आग[illegible] [illegible]डे, करून पाहीं.

सवाद्–[illegible]द, रुचि.

सळ–अभिमान; आपढ, छळ; वैर.

[illegible] [illegible].

[illegible] [illegible].

सा अ. सहा अ. साहा–सहा शास्त्रें.

साउलें अ. सावलें [illegible],

[illegible] [illegible], अरिष्ट.

सांग परिपूर्ण, सहा अंगें.

सांच अ. साचर खरें, [illegible]; [illegible].

[illegible] बदला, मोबदला, [illegible] [illegible].

[illegible] [illegible], भाग-भर, बदला.

[illegible] [illegible].

[illegible] [illegible].

[illegible] [illegible]; त्याग.

[illegible] [illegible], लागोपाठ होण्याची स्थिति.

[illegible] [illegible].

सादवर्णे अ. साद[illegible] शब्द आवाज करणें.

[illegible] [illegible].

[illegible] [illegible], मोकळा.

[illegible] [illegible], मळून.

[illegible] [illegible], [illegible].

[illegible] [illegible], माल, साधनी.

साधुत्व–[illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] आनंद [illegible] [illegible].

सार–सत्व, शांत.

सारणें–सारणें, आरोपणें;

सिद्ध करणें. [साम्य.

[illegible] सारखें, बरोबरी,

[illegible]–[illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible].

[illegible] [illegible] करणारा, के

सावळ अ. [illegible] [illegible].

साहे–साथ, मदत.

[illegible] [illegible].

[illegible] [illegible].

[illegible] –[illegible] पदार्थ.

[illegible] [illegible].

[illegible] [illegible].

[illegible] [illegible], शस्त्रें.

[illegible] [illegible].

[illegible] [illegible].

[illegible] [illegible].

[illegible] [illegible], [illegible], [illegible]

[illegible] [illegible] प्रकारचा खेळ.

[illegible]–[illegible], चांगला,

[illegible] [illegible], स्वार्थ.

[illegible] [illegible]; गाढा.

सुभट–[illegible], चांगलें, वि[illegible]; योद्धा.

[illegible] [illegible].

[illegible] –सुमदाय करणें.

सुगणा अ. [illegible] उपभोग; आवड.

सेकूं अ. [illegible] [illegible], परिणामीं.

सेंदु–एक कडू फळ. (याच्या कषाय करून [illegible].)

[illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible].

[illegible] अ. [illegible]–[illegible], यश.

[illegible]–[illegible].

सोम–सौम्य.

सोमवळ–सोमल.

सोर–नातेवाईक, जार, आकांत.

[illegible]–[illegible] गोष्टी.

[illegible]–उत्कंठा, हाव; हावरेपणा.

[illegible] [illegible].

[illegible] एक झाड.

[illegible] [illegible], डाग (प-[illegible] इत्यादिकांचा)

[illegible] [illegible], प्रमाद, यत्न. आनंद.

[illegible] [illegible], निळाजरी असी [illegible], मूर्च्छा,

[illegible] [illegible], प्रत्यक्ष.

ह.

[illegible] [illegible] करणारा.

[illegible] [illegible], गाणें.

[illegible] अ हारी–ओळ, रां-ग, माळ.

हाऊ–बाऊ.

[illegible]–[illegible].

[illegible] [illegible], ओ-रडणें, हाका मारणें.

[illegible]–[illegible]. [डी.

[illegible]–[illegible], अना-

[illegible]–[illegible].

[illegible]–[illegible].

[illegible]–[illegible] संबंधीचा.

[illegible]–[illegible] त-त्काळ.

[illegible]–[illegible] हाव.

[illegible] [illegible], उत्कंठा.

[illegible]–[illegible] सांपडणें

[illegible] [illegible], क्षय, हानि

[illegible]–[illegible], आनंद.

हाळमाकळमें–एकमेकांचें मागचा, पुढचा

हाले–मारिलें. [ला

हालो–निजध्यास, चिर

हिका–हेका, दुराग्रह.

हिपुटी–कष्टी दुःखी.

[illegible]

ह

[illegible]

[illegible]

PRINTED AT THE "INDIRA" PRESS, POONA.

शुद्धिपत्र.

अभंग.	अशुद्ध.	शुद्ध.
५२	वाला	वाल्हा
८२३	भोंवनी	भोंवतीं
८२४	विनेसीं	विसावी
८३७	आजुन	अजून.
८६४	जागावें	जागावें
९२२	दुकाळलों	दुकाळलों
९३१	लाठी	लाठी
९३४	दूइ मंग	दूई मज
९३५	दुःश्चित	चित्त
९४८	धाम	मम
९६०	हेळमाजें	हेळामाजें
९६२	[illegible]	[illegible]
९७३	नाळडावें	नावडावें
९९[illegible]	आपुला	आपुले
९९६	गोपाळ	गोपाळा
९९७	[illegible]	माझीं पतिते
९९८	सुंद	सुंद
९९९	नेंधे पवे	नेंधे न पवे
१०१२	धनामान	धनमान
१०१८	जेंणें	अंणें
१०२०	१०[illegible]	१०२०
१०५६	अनुमानु	अनुवानु
१०[illegible]६	बोलसी	बोलसी
११०७	येथीं	येथें
१११५	अन्याया	अन्यायी
११६४	बाळा	बळा
११८३	शक्तीहीण	शक्तीहीन
१२०२	मीनीपा	मीनावली
१२३२	[illegible]	[illegible]
१२३३	भेटी अन अनादर	भेटी अनादर
१२४८	[illegible]	[illegible]
१[illegible]१	[illegible]	[illegible]
१५६०	[illegible]	[illegible]
१६०५	शत्रूसारिखें	शत्रूसारखें
२१०[illegible]	जेंथें	जेथें
२१०७	जांचें	जांचें
२११७	आवडतें प्राण	आवडे तें मन
२११८	निवेदून	निवेदून
२१२८	शृंगारिला	शृंगारिलें
२१४१	उपकारें	परोपकारें
२१६४	मान	मानी
२१६४	उद्दाम	मानिली
२१७०	अवघार	व्यवहार
२१७१	[illegible]	भवनदीचा
२१७१	उतारा	उतरा
२१७२	मथुरा	मथुरा
२१८१	जों वदे	जों वदे.
२१९२	पूर्वींचें	उर्वीचें
२२३६	सिद्धीच	सिद्धीचा
२२८०	दुष्काळसीं	दुर्वासी
२२८९	यम सांगे	यमधर्म सांगे
२३१९	नारायण	नारायण
२३८५	उत्तमा उत्तम	नाम उत्तमा उत्तम
२५०१	आवडी	उद्वेग
२५०१	कधीं	कई
२५०६	मारगा	मारग
१५१६	काळें	काळीं
२५१७	पोटीं	पोळीं
२५२५	भोभाट	बोभाट
२५३१	जेथें	येथें
२५३४	विठ्ठल	श्रीविठ्ठल
२५३६	मोडलें	मोडलें
२५४५	[illegible]	मारवें तें जाण
२५६२	उपासी	उपाची
२५६६	नकरीं ऐसी	नकरी नकरी ऐसी
२५६७	जालेंसि.	जालेंसें.
२५९[illegible]	[illegible]	सर्वां
२५९[illegible]	अंगासवें	अंगासवें
२६५१	उद्धारिलें	उद्धारिलें
१६५८	वेत	वेवांन
२६८८	कोंडी	घरीं
२७०३	कालभूत	कलभूत
२७८१	जाव	जाय